THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_196029
UNIVERSAL
LIBRARY

OUP—880—5-8-74—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M294.6 B22S Accession No. PGM 134

Author बापट शास्त्री, वि. वा.

Title सुबोध उपनिषदांतील

This book should be returned on or before the date last marked below.

ॐ तत्सत्

शांकरभाष्यानुसार

सुबोध उपनिषत्संग्रह.

[ईश-केन-कठ-प्रश्न-मुंड-माण्डूक्य-तित्तिरि-ऐतरेय-छान्दोग्य-बृहदारण्यक-कौषीतकि-श्वेताश्वतर जाबाल]

(मूळ श्रुति, अन्वयार्थ, स्पष्टीकरण, सिंहावलोकन यासह.)

लेखक

आचार्यभक्त–विष्णु वामन बापटशास्त्री

आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः । मैत्रेयि आत्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदं सर्वं विदितम् ॥

बृ. २.४.५. सु. उ. पृ. ५९४.

यो वा एतदक्षरं गार्ग्यविदित्वास्माल्लोकात्प्रैति स कृपणोऽथ य एतदक्षरं गार्गि विदित्वास्माल्लोकात् प्रैति स ब्राह्मणः ॥ ब. ३.८.१०. सु. उ. पृ. ६३८.

आश्विन शुक्ल १ शके १८४५. इ. स. १९२३.

आमच्या या कार्यास अयाचित मदत.

श्री. छोटालाल डाह्याभाई मुंबई, या अपरिचित गृहस्थांनीं निरनिराळ्या वेळीं या कार्यास ३२५ रुपयांची अयाचित मदत केली. तिचा आह्मांला या कामीं फार उपयोग झाला.

प्रकाशक—विष्णु वामन बापट शास्त्री पुणें पेठ सदाशिव घ. नं. २७० यांनी हा ग्रंथ पुणें पेठ सदाशिव घ. नं. २७० येथें प्रसिद्ध केला.

मुद्रक—त्र्यंबक हरि आवटे पुणें पेठ सदाशिव घ. नं. २७० यांनी पुणें पेठ सदाशिव घ. नं. २७० येथील आपल्या '**इंदिरा**' छापखान्यांत छापिला.

प्रकाशकानां सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

सूचना—आमच्या संकल्पित कार्यांतील योग—सांख्य—न्याय—वैशेषिक हीं दर्शनें व आरंभिलेल्या कार्यांतील, अनुभूतिप्रकाश व आत्मपुराण हे ग्रंथ अपूर्ण राहिले आहेत. पण फार श्रमांचें, मोठ्या खर्चाचें व अत्यंत महत्त्वाचें शारीरक-भाष्यार्थ आचार्यकृपेनें तडीस गेल्यावर त्यांच्या प्रकाशनाची कांहीं व्यवस्था करूं. सर्व प्रस्थानत्रयाची सूची आम्ही शारीरकभाष्यार्थाच्या शेवटीं उपसंहारा-बरोबर देणार आहों.

प्रस्तावना.

सर्वान्तर्यामीच्या अनुग्रहानें आमच्या संकल्पाप्रमाणें **'सुबोध वेदान्तप्रस्थानत्रयांतील'** हें महत्त्वाचें प्रस्थान आज आम्ही प्रसिद्ध करीत आहों. हें गीता व ब्रह्मसूत्र या दोहोंचाहि आधार आहे. त्यामुळें तें शेवटीं जरी प्रसिद्ध करीत असलों तरी महत्त्वाच्या दृष्टीनें हें पहिलें प्रस्थान आहे. कारण उपनिषद् ही श्रुति आहे, गीता स्मृति आहे व ब्रह्मसूत्र त्यांविषयींच पूज्य विचार—त्याचीच मीमांसा आहे. त्यामुळें उपनिषदें हा दोन्हींचा आधार—गीता व ब्रह्ममीमांसा यांचें मूळ आहे. किंबहुना उपनिषदें हें सर्व तत्त्वज्ञानाचें मूळ आहे. द्वैताद्वैतादि सर्व वादांचें व सर्व पंथांचें मूळ आहे. तें वैदिक धर्माचें तर मूळ आहेच आहे. पण वैदिकेतर धर्महि तत्त्वतः त्याच्याच एकदेशाश्रयानें प्रवृत्त झाले आहेत. सर्व आस्तिक-नास्तिक दर्शनांची प्रवृत्ति यांपासूनच झाली आहे. उपनिषदांनाच वेदान्त हें दुसरें प्रसिद्ध नाव आहे. याला 'औपनिषद दर्शन' असेंहि म्हणतात. आत्मा हा याचा विषय आहे. संसारमोक्ष किंवा अविद्यानिवृत्तिपूर्वक परमानंदप्राप्ति, हें फल व शरीरादि अनात्माध्यासाची सर्वथा निवृत्ति होऊन आत्मस्वरूपावस्थान, हें त्या मोक्षाचें स्वरूप आहे. अविद्या-काम-कर्म-वासना यांचा सर्वथा अभाव होणें, हें यांचें पूर्वचिह्न आहे. काम-क्रोध-लोभादि चित्तविक्षेपजनक वृत्तींचा अभाव होऊन परम शांति प्राप्त होणें, हीच जीवन्मुक्ति असून ती प्रत्यक्ष—दृष्ट—याच जन्मीं साक्षात् अनुभवास येणारी आहे. सर्वकर्मत्यागपूर्वक म्ह० संन्यासपूर्वक श्रवण-मनन-निदिध्यासनानें तिचा उदय होत असल्यामुळें तेंच तिचें साधन आहे. नित्य तृप्ति किंवा समाधान, यांमध्यें तिचें पर्यवसान होतें. गीतेंत स्थितप्रज्ञ, ज्ञाननिष्ठ, भगवद्भक्त व गुणातीत या शब्दांनीं या जीवन्मुक्तीचाच उल्लेख केला आहे.

यावरून तत्त्वजिज्ञासूंना उपनिषदांचा अभ्यास करण्याची किती आवश्यकता आहे, हें ध्यानांत येईल. उपनिषदांचा अभ्यास केल्यावांचून गीता-ब्रह्मसूत्रादि किंवा दुसरा कोणताहि संस्कृत-प्राकृत प्रकरण ग्रंथ बरोबर कळणें शक्य नाहीं, भक्तिमार्गादि दुसऱ्या कोणत्याहि साधनभूत मार्गाचें संपूर्ण रहस्य लक्ष्यांत येणें

शक्य नाहीं. ' कोऽहं कथं इदं जातं को वा कर्ताऽस्य विद्यते '– मी कोण, हें जगत् कसें झालें व याचा कर्ता कोण आहे, ही जिज्ञासा–ही तळमळ उपनिषदांच्या अभ्यासानेंच शांत होते. कारण त्यांत या प्रश्नांचाच सविस्तर, सोपपत्तिक व ससाधन विचार केला आहे. त्यामुळें या मूळ प्रकाशाला सोडून गीता-भागवतादि ग्रथांचा आश्रय जे करितात त्यांची स्थिति अंधकारांतून अडखळत जाणाऱ्या माणसासारखी होते. पण औपनिषद पुरुषाची–आत्मतत्त्वाची चांगली ओळख झाल्यावर जे जिज्ञासु इतर संस्कृत-प्राकृत अध्यात्म ग्रंथ हातीं घेतात त्यांना तळहातावर ठेवलेल्या आवळ्याप्रमाणें त्यातील प्रतिपाद्य विषय स्पष्ट प्रतीत होतो. उपनिषदांतील निरुपाधिक आत्माच गीतेंतील अहं व पुराणांतील राम–कृष्ण–हरि आहे. तोच भागवताचा भगवान्, वैष्णवांचा विष्णु, शैवांचा शिव, गाणपतांचा गणेश वगैरे आहे. फार काय पण इतर पंथ व धर्म यांतील तटस्थ ईश्वर वगैरे तोच आहे. हें कळल्यावर जी एक प्रकारची विशिष्ट दृष्टि प्राप्त होते ती खरोखरच अवर्णनीय आहे. तात्पर्य उपनिषद् सर्व तात्त्विक ज्ञानाचें मूळ आहे, व त्यावरून ज्ञात होणारा औपनिषद पुरुषच–आत्माच सर्व आहे.

श्रीशंकराचार्यांनीं औपनिषद आत्मतत्त्वाचें स्वरूप विशद करण्यासाठीं वेदान्त प्रस्थानत्रयावर भाष्य केलें. पण तें विस्तृत व सोपपत्तिक–परपक्षनिराकरणपूर्वक स्वपक्षस्थापनरूप असल्यामुळें एकाएकीं कळण्यास अवघड जातें. कारण तें या मूळाकडे दृष्टि ठेवून लिहिलेलें आहे. पण अगोदर मूळ सुबोध उपनिषद्, गीता व ब्रह्मसूत्र, यांचा अभ्यास करून मग त्याच क्रमानें त्याच्या भाष्यार्थांचें अध्ययन आरंभिल्यास तें सुलभ वाटेल. वेदान्तांचें–उपनिषदांचें प्रमेय चांगलें समजेल व जिज्ञासूंची वृत्ति परोक्षज्ञानपूर्वक अपरोक्षज्ञानाभिमुख होईल. मनुष्यजन्माचें सार्थक त्यानेंच होईल आत्मज्ञान व आत्मस्वरूपस्थिति हाच परम पुरुषार्थ आहे.

महाराष्ट्रांतील विचारी विद्याप्रिय वर्गानें स्वधर्मोन्मुख होऊन त्याचें विवेकपूर्वक अनुष्ठान करावें, स्वाभाविक बहिर्मुखतेला थोडासा तरी आळा घालून अन्तर्मुख व्हावें, म्हणून आम्ही हें वेदान्तप्रस्थानत्रयाचे १ सुबोध व २भाष्यार्थासह असे दोन विभाग केले आहेत. ज्यांना संस्कृत भाषा अवगत असेल त्यांनीं दोन्ही भागांचा क्रमानें उपयोग करावा व ज्यांना संस्कृत भाषा येत नसेल त्यांनीं निदान सुबोध वेदान्त प्रस्थानत्रयाचा तरी उपयोग करावा. त्यांतील

या ग्रंथाच्या प्रकाशानें पहिला विभाग पुरा झाला आहे. दुसऱ्या विभागांतील **१ गीताभाष्यार्थ** व **२ दशोपनिषद्भाष्यार्थ**—हीं दोन प्रस्थानें तयार आहेत. तिसरें प्रस्थान—**ब्रह्मसूत्रशारीरभाष्यार्थ**—आज दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सुरू केलें आहे व तें पुढच्या दसऱ्यापूर्वी क्रमानें दोन भागांत प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. परमात्मस्वरूप आचार्यांच्या कृपेनें आमचा संकल्प सिद्धीस जाईल, याबद्दल आम्हांला मुळीच शंका नाहीं. कारण 'यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनं' या न्यायानें आम्ही चोवीस तास जें जें कांहीं करितों तें सर्व या एका ज्ञानयज्ञासाठी करीत आहों. आचार्यांचें औपनिषद आत्मतत्त्वज्ञान महाराष्ट्र वाचकांस सुलभ करून देणें, या एका महत्कार्यासाठीच आमचें जीवन आहे व त्यासाठीच आहार-निद्रादि सर्व व्यवहार चालू आहेत. 'नान्यं शृणोमि न वदामि न चिंतयामि'—या एका विषयावांचून आम्ही दुसरें काही ऐकत नाहीं, बोलत नाहीं, किंवा दुसऱ्या कशाचें चिंतन करीत नाही, त्यामुळें ईशकृपेनें आम्हांला आध्यात्मिक-आधिभौतिक-आधिदैविक तापहि होत नाहींत व झाले तरी भासत नाहींत. अशा अनन्यतेनें हा ज्ञानयज्ञ सुरू असल्यामुळें हा महायज्ञ कसा शेवटास जाईल, याची आम्हांस मुळींच चिंता वाटत नाहीं. असो;

या ग्रंथांत आम्ही ब्रह्मसूत्रशारीरकभाष्यांत ज्यांचा विचार केला आहे अशा अतिशय महत्त्वाच्या तेरा उपनिषदांचा संग्रह केला आहे. प्रत्येक उपनिषदाच्या शेवटीं त्याचें सिंहावलोकन केलें आहे, त्यावरून सर्व उपनिषदाचा सारभूत अर्थ सहज लक्षांत येईल. या ग्रंथाच्या शुद्धीसाठी आम्ही अतिशय मेहनत केली असूनहि छापखान्यांतील सर्वसाधारण कारणांमुळें काना-मात्रा उडून जाणें वगैरे कांही सामान्य दोष झाले आहेत, त्यांतील कांहीं ठळक चुकांचें शुद्धीपत्र पुढें जोडलें आहे. त्याप्रमाणें ग्रंथ शुद्ध करून वाचावा. काहीं सामान्य चुका मूळ, अन्वय, अर्थ यांतील संदर्भावरून वाचतांना सहज लक्ष्यांत येण्यासारख्या आहेत. एकंदरीत हा ग्रंथ सर्वोपकारक व्हावा व त्याच्या अध्ययनानें भाग्यवानांनी आत्मनिष्ठ व्हावें, अशी शुभ इच्छा करून ही अल्पकृति आचार्यचरणीं अर्पण करितों.

आश्विन शु. १० शके १८४५
पर्णकुटी, पोष्ट येरवडा, (पुणें)

आचार्यभक्त—**विष्णु वामन बापटशास्त्री.**

विषयानुक्रमणिका.

१ **ईशावास्योपनिषद्**—१–१०. ज्ञाननिष्ठा, कर्मनिष्ठा, अविद्वन्निंदा २; आत्मस्वरूप ३; कर्म व उपासना यांच्या समुच्चयासाठीं त्यांतील एकेकाची निंदा ५. आत्मप्राप्तीच्या द्वाराची याचना, मार्गयाचना, सिंहावलोकन ८.

२ **केनोपनिषद्**—११–३०. (१) इंद्रियांच्या प्रेरकाविषयीं प्रश्न, 'श्रोत्रस्य श्रोत्रं' इत्यादि उत्तर १२; ब्रह्म इंद्रियांचा अविषय आहे १३; ब्रह्माचें अनुपास्यत्व १४; (२) ज्ञानाच्या दृढतेसाठीं शिष्याचें बुद्धिचालन, त्याचें निश्चित ज्ञान १६; (३) ब्रह्माच्या अस्तित्वासाठीं आख्यायिका, त्याचें सर्वशक्तिमत्त्व–सर्वातिशायित्व २०; (४) इंद्राला विद्याप्राप्ति २४; ब्रह्माचा अधिदैव-अध्यात्म उपदेश २५; तप-दम-सत्यादि साधनें २७; सिंहावलोकन २८.

३ **काठकोपनिषद्**—३०–९०. (१) वाजश्रवाचा विश्वजित् यज्ञ, दुर्बल गायींची दक्षिणा, नचिकेत पुत्राचा स्वदानाविषयी प्रश्न, यमाला पुत्र-प्रदान ३१; नचिकेतार्चे यमलोकीं गमन, तीन दिवस उपवास, वरप्रदान, पित्याचा संतोष हा प्रथम वर, अग्निविद्या, हा दुसरा, संतुष्ट झालेल्या यमानें दिलेला अधिक वर ३२–३६; आत्मविषयक तिसरा वर, तो न मागण्याविषयीं यमाचा आग्रह, अलौकिक विषयांचें आमिष, नचिकेताची विरक्ति व तोच वर देण्याविषयीं आग्रह ३७–४०; (२) यमकृत नचिकेतप्रशंसा, श्रेयःप्रेयःप्राप्ति, अविद्या-विद्या, अविद्वन्निंदा, आत्मज्ञानार्चे दुर्लभत्व, अतत्त्वज्ञाचा उपदेश व्यर्थ, तर्कानें आत्मज्ञान दुर्लभ होतें, नचिकेतासारखाच प्रश्नकर्ता असावा ४०–४३; पुनः शिष्याची प्रशंसा, ओंकार या ब्रह्माच्या आलंबनाचा उपदेश–ओंकारोपासनेचें फल ४४–४५, आत्म्याचें स्वरूप ४८–५१; आत्मा प्रवचनादिकांनीं दुर्ज्ञेय आहे, तथापि उपायानें सुज्ञेय ५१; दुराचरणी, चंचलचित्त इत्यादिकांना नुस्त्या ब्रह्म-ज्ञानानें तो प्राप्त होत नाहीं ५२; विश्वाचा संहार करणाऱ्या आत्म्याला कोण जाणणार? ५३; (३) साधक व साध्य आत्म्यांचा 'ऋतं पिबन्तौ०' इत्यादि उल्लेख ५३; कर्मठांचा व ब्रह्मज्ञांचा आश्रय, अशा परब्रह्माला जाणावें ५४; शरीररथार्चे रूपक ५४; अकुशल बुद्धिसारथ्याला त्याचें नियमन करितां येत नाहीं, त्यामुळें संसारप्राप्ति, कुशल बुद्धिसारथिच त्याचें नियमन करितो,

त्यामुळें मोक्ष ५७; परम पद, तीच उत्तरोत्तर श्रेष्ठ पदार्थांची सीमा ५८; आत्मा सर्व भूतांत गूढ, तो सूक्ष्मदर्शींना सूक्ष्मबुद्धीनें दृश्य ५९; आत्मज्ञानाचा 'यच्छेद्वाङ्मनसि०' इत्यादि उपाय ६०; उठा, अविद्या निद्रा सोडा, तत्त्वज्ञानरूपी मार्ग फार दुर्गम आहे ६०; ज्ञेय आत्म्याचें सूक्ष्मत्व, ज्ञानाची स्तुति आणि ब्रह्मसभेंत व श्राद्धकालीं त्याचें श्रवण करविणारास फल ६१; (४) ईश्वरानें इंद्रियांना बहिर्मुख मारलें ६२; अज्ञ सकाम मृत्युपाशांत पडतात, विवेकी विरक्त जिज्ञासु होतात ६३; ब्रह्मज्ञान कसें होतें? ६४; भेददर्शी मृत्युपरंपरेंत पडतो, शुद्ध मनानें आत्मज्ञान ६६; अंगुष्ठमात्र पुरुष, भेददर्शी द्वैतभावास प्राप्त होतो ६७; शुद्ध जलांत शुद्ध जल मिळून जातें, तसाच ज्ञान्याचा आत्मा परमात्म्यांत मिळतो ६८; (५) दुर्ज्ञेय आत्म्याचा दुसऱ्या प्रकारें उपदेश ६९; विनाशी देहाहून आत्मा भिन्न, त्याच्या योगानेंच शरीराचें जीवन, यथाश्रुत-यथाधर्म उत्तमाधम जन्म ७०; साक्षीच शुद्ध ब्रह्म, अग्नि व वायु यांप्रमाणें तो उपाधीसारखा होतो ७१; सूर्य चाक्षुषदोषांनीं जसा, तसाच तो लोकदुःखानें दुःखी होत नाही, त्या एका सर्वभूतान्तरात्म्याला जे जाणतात त्यांना शाश्वत शांति व सुख ७२; तें अनिर्देश्य सुख कसें भासतें? याचें 'न तत्र सूर्यो भाति०' इत्यादि उत्तर ७३; (६) संसारवृक्षाचें रूपक, त्या चेतन जगन्मूलाचें अस्तित्व, त्याचें भयहेतुत्व ७४, याच देहांत त्याला न जाणल्यास शरीरप्राप्ति, यालोकीं व ब्रह्मलोकींच स्पष्ट ब्रह्मज्ञान ७९; ज्ञानाचा उपाय ७६; निर्विषय आत्म्याचें ज्ञान कसें होतें, त्याचें मोक्ष हें फल, योगाचें स्वरूप ७७, आस्तिक्यानेंच आत्मप्राप्ति ७८; कामत्याग केल्यानें व हृदयग्रंथिभेद झाल्यानेंच मोक्ष, ७९; हृदयाच्या एकशें एक नाड्या, त्यांतील एका ऊर्ध्व नाडीनेंच शरीरांतून जाणारा क्रममुक्तीला प्राप्त होतो. इतर नाड्यांनीं जाणारा संसारांत पडतो. हृदयस्थ अंगुष्ठमात्र पुरुषाचा मोठ्या धैर्यानें उद्धार करावा ८०; यमानें सांगितलेल्या या ज्ञानानें व योगानें नचिकेत मुक्त झाला, तसाच दुसराहि अधिकारी मुक्त होतो, सिंहावलोकन ८१.

४ प्रश्नोपनिषद्—९१–१३१. (१) भारद्वाजादिसहा शिष्य ब्रह्मज्ञानासाठीं पिप्पलादाकडे आले ९१; त्यांचा एक वर्ष ब्रह्मचर्यवास, प्रजा कोठून उत्पन्न होते, असा कात्यायनाचा प्रश्न ९२; प्रजाकाम प्रजापतीनें तप करून रयि व प्राण या

जोडप्यास उत्पन्न केलें, आदित्य प्राण, चंद्रमा रयि, मूर्तामूर्त सर्व रयि, आदित्य उदय पावून सर्व दिशांतील प्राणांस किरणांत प्रविष्ट करितो. तो आदित्य प्राणच अग्नि—अत्ता व चंद्रमा रयि—अन्न. तेंच जोडपें, संवत्सरच प्रजापति, त्याचे दोन अयन, इष्टापूर्त कर्म करणारे प्रजाकाम कर्मठ दक्षिणायनास प्राप्त होतात. ते चंद्राख्य पितृलोकास जातात. ते पुनः परत येतात. हाच पितृयाण मार्ग रयि आहे ९४; तप—ब्रह्मचर्य—श्रद्धा—उपासना यांनी सोपाधिक आत्म्याला जाणून आदित्यास प्राप्त होतात. त्यांना पुनर्जन्म नाहीं ९५; मास व अहोरात्र प्रजापति, शुक्लपक्ष व दिवस प्राण, आणि कृष्णपक्ष व रात्र रयि, दिवसा मैथुन करणारे प्राणाचाच नाश करितात, रात्री विहित मैथुन हें ब्रह्मचर्यच, अन्न प्रजापति ९७; त्यापासून रेत व रेतापासून शरीररूप प्रजा, प्रजापतिव्रत करणारांस कन्या-पुत्रप्राप्ति हें दृष्ट फल व त्याच तप-सत्य-ब्रह्मचर्यवानांस चंद्राख्य ब्रह्मलोक ९८; निष्कपट उपासकांनाच उत्तरायणमार्गप्राप्य ब्रह्मलोक ९९; (२) 'किती देव प्रजेचें धारण-प्रकाशन करितात व त्यांच्यामध्यें श्रेष्ठ कोण ?' असा प्रश्न व वाय्वादि देव धारण करितात व प्राण सर्वांत श्रेष्ठ असें सविस्तर सोपपत्तिक उत्तर ९९; (३) प्राण कोठून उत्पन्न होतो इत्यादि प्रश्न व तो आत्म्यापासून होतो वगैरे उत्तर १०४;—(४) या शरीरांत कोण जागतात व कोण निजतात वगैरे प्रश्न व मनांत सर्व लीन होतें व प्राणाग्नि जागतात, वगैरे उत्तर ११०; (५) ओंकारोपासनेविषयीं प्रश्नोत्तरें ११८; (६) षोडशकल पुरुषाविषयी प्रश्नोत्तरें १२२; सिंहावलोकन १२६.

५—मुंडकोपनिषद्—१३३—१७२.—(१) ब्रह्मविद्येचा संप्रदाय, कोणाला जाणलें असतां सर्व ज्ञात होतें, असा शौनकाचा प्रश्न; व अंगिरसाचें पर व अपर अशा दोन विद्या आहेत इत्यादि उत्तर १३३; (२) परविद्याविषय ब्रह्म, त्याचीं, विशेषणें, सृष्टिक्रम, अपर विद्येचें फल व शेवटीं त्याविषयीं विरक्त होण्याचा उपदेश १३६, (३) ब्रह्माचें वर्णन, त्याच्यापासून अग्निविस्फुलिंगन्यायानें सर्व सृष्टि १४२, (४) अरूप ब्रह्माला कसें जाणावें, त्याला वेध कसा करावा, त्यालाच जाणावें, त्याचेंच ओंकारानें ध्यान, पर विद्याप्रदेश, परमात्मज्ञानाचें हृदयग्रंथिभेदादि फल, ब्रह्मच सर्वत्र आहे १४६,(५) 'द्वा सुपर्णा०' 'समाने वृक्षे०' ईश्वरज्ञानाचें फल, निवृत्तिप्रधान सत्यादि,

साधनें, सत्याचें परम निधान, ज्ञानप्रसादानेंच त्याचें ग्रहण, सूक्ष्म आत्म्याचें अतिशुद्ध चित्तानेंच ज्ञान, आत्मज्ञ पूजार्ह आहे १५२; (६) ज्ञानी शरीर-धारण करीत नाहीं, कामत्याग हेंच मुमुक्षूचें प्रधान साधन, आत्मज्ञानाचीं प्रधान व गौण साधनें, ज्ञानी आत्मा ब्रह्मरूप कसा होतो, त्याचें सदृष्टान्त वर्णन, ब्रह्मज्ञ ब्रह्मच होतो, निःशोक, अविद्याग्रंथिशून्य होतो, ब्रह्मविद्येचे अधिकारी १५९; सिंहावलोकन १६५.

मांडूक्योपनिषद्—१७२–१८२. ओंकारच हें सर्व, हें सर्व ब्रह्म,हा आत्मा ब्रह्म, आत्मा चतुष्पाद,ओंकाराच्या चार मात्रा, विश्वादि पादांचें वर्णन, पादच मात्रा, अमात्र ओंकार व तुरीय ब्रह्म, त्यांच्या ज्ञानानें मोक्ष १७२; सिंहावलोकन.१७०.

तैत्तिरीयोपनिषद्–१८३–२५७. (शिक्षाध्याय) शांति, पाठशिक्षा, पांच अधिकरणांत संहितोपासना, मेधा व श्री यांच्या प्राप्तीसाठीं जप व होम १८३; स्वाराज्यफलासाठीं व्याहृत्यात्मक हिरण्यगर्भोपासना १९२; हृदयाकाशांत मनोमयत्वादिविशिष्ट ब्रह्मोपासना व सर्वात्मभावप्राप्तीचा मार्ग १९४; पृथिव्यादि पांक्तरूपानें ब्रह्मोपासन १९६; ओंकारोपासन १९७; ऋत, सत्य, स्वाध्याय-प्रवचन, तप, दम इत्यादि साधनें १९९; स्वाध्यायार्थ मंत्र २०१; ब्रह्मविज्ञानापूर्वी श्रौत-स्मार्त कर्मांची आवश्यकता, 'सत्यं-वद, धर्मं चर-' इत्यादि उपदेश २०२; (ब्रह्मवल्लि) ' ब्रह्मवित् आप्नोति परं' ब्रह्माचें स्वरूपलक्षण २०७; आत्म्यापासून सर्व भूतें २०८; अन्नमयकोश, त्याचें उपपादन २१०; प्राणमय–उपपादन २१२; मनोमय–उपपादन २१५; विज्ञानमय–उपपादन २१६; आनंदमय–त्याचें उपपादन २१८; असद्ब्रह्मवादी असत् होतो २१९; ब्रह्माच्या अस्तित्वाविषयीं प्रश्नोत्तरें २२१; आत्म्याचा सृष्टींत प्रवेश व त्याचें विविधत्व २२२; तें स्वयंकृत, रस, आनंद देणारें, तद्रूप झालेला अभयास प्राप्त होतो, भेददृष्टीनें भयप्राप्ति, त्याच्या भीतीनेंच वाय्वादिकांची नियमानें प्रवृत्ति २२३–२७; उत्तरोत्तर शतपट आनंदाची मीमांसा, निष्काम श्रोत्रियाचा परमानंद २२८; आनंदाचें एकत्व, ज्ञान्याची आनंदब्रह्मप्राप्ति २३२; आनंदज्ञ निर्भय होतो २३३; त्याला पुण्य-पाप अंत्य-समयीं ताप देत नाहींत, त्याविषयीं उपपत्ति २३४; (भृगुवल्लि) भृगुप्रश्न, अन्न-प्राणादि आत्मोपलब्धीचीं स्थानें, तटस्थलक्षण,तप–विचार २३६; क्रमानें

अन्नादि-विज्ञानान्त अमुख्य ब्रह्माचें ज्ञान, तपानेंच शेवटीं ' आनंद ब्रह्म ' असें मुख्य ब्रह्माचें ज्ञान, त्याचें आत्मप्रतिष्ठा हें फल, कांहीं व्रतें व त्यांचें दृष्ट फल, ज्ञानी पुरुषाचें सामगान २३७–२५१. सिंहावलोकन; २५१.

ऐतरेयोपनिषद्—२५८–२९१. 'वाङ्मे मनसि' इत्यादि शांति २५८; (१) सृष्टीच्या पूर्वी एक आत्माच होता २६०; त्यानें ईक्षणपूर्वक सृष्टि केली २६१; ब्रह्मांडोत्पत्ति, मुखादि गोलक, वागादि इंद्रियें व त्यांपासून अग्न्यादि देवता २६२; (२) अशनाया-पिपासा, अन्नभक्षणासाठी शरीराची प्रार्थना, सर्वांत मनुष्यशरीरच पसंत करणें २६४; त्यांत ईश्वराच्या आज्ञेनें अग्न्यादि देवतांचा वागादिरूपानें प्रवेश २६६; अशनाया-पिपासांना त्या देवतांमध्येंच भागीदार करणें २६७; (३) मूर्तिरूप अन्नाची उत्पत्ति, त्याचें अपानानें ग्रहण २६८; कार्यांत विचारपूर्वक मस्तकांतून प्रवेश, दक्षिण नेत्रादि व पितृशरीरादि तीन आवसथ २७०; विचारानें व्यापक ब्रह्मज्ञान, 'इंद्र' हें परोक्ष नाम २७३; (४) अनुशयी जीवाचे–अन्नद्वारा रेतोरूपानें प्रथम पितृशरीरांतून–नंतर मातृशरीरांतून व शेवटीं पुत्राला प्रतिनिधि करून स्वशरीरांतून, असे तीन जन्म, गर्भस्थ वामदेवाचें ज्ञान २७५–८०; (५) 'कोऽयमात्मा ' असा विचार व प्रज्ञानच सर्व 'प्रज्ञानं ब्रह्म' असें निश्चित ज्ञान, त्यानेंच मोक्ष २८१–८५; सिंहावलोकन २८६.

छान्दोग्योपनिषद्—२८७–५२३. (१) शांति, कर्मकांडाशी संबंध, उद्गीथाख्य ओंकारोपासना, माहात्म्य, फल, विद्या-अविद्या नाना, विद्येनें वगैरे केलेलें कर्म वीर्यवत्तर २८७–९६; ओंकाराची प्राण-आदित्यदृष्ट्या उपासना, इतर इंद्रियांचा असुरपाप्मवेध, प्राणाचें श्रेष्ठत्व, व्यानादिदृष्ट्या ओंकारोपासना, कामसमृद्धि हें फल २९७–३०४; मृत्यूला भिणाऱ्या देवांची आख्यायिकेसह ओंकारोपासना ३०५–७; अनेक पुत्रत्व हें फल देणारें उपासन ३०७; समग्र ऐश्वर्य देणारें अध्यात्म-अधिदैव उद्गीथोपासन ३०८–१२; आख्यायिकेसह परोवरीयस्त्व गुणविशिष्ट परमात्मदृष्ट्या उद्गीथोपासन ३१३–१६; उष्टे व शिळे कुल्माष खाणाऱ्या चाक्रायणाच्या कथेसह प्रस्ताव-प्रतिहारविषयक उपासन ३१७–२२; अन्नप्राप्तीसाठीं शौव उद्गीथोपासन ३२२; (२) साधुगुणविशिष्ट समस्त सामोपासना ३२५; लोकदृष्ट्या, वृष्टिदृष्ट्या, आप्-दृष्ट्या, ऋतुदृष्ट्या, पशुदृष्ट्या व प्राणदृष्ट्या, हिंकारादि पंचविध सामोपासना ३२६; वाक्-दृष्ट्या व आदित्य

दृष्ट्या सप्तविध सामोपासना ३३०; आत्मसंमित सप्तविध सामभक्ति-अक्षरोपासना, विशिष्ट फल देणारीं गायत्र-रथंतरादि सामोपासनें ३३२; त्रयीविद्यादृष्ट्या हिंकारादि सामभक्ति-उपासना, उद्गात्याची स्वरसंपत्ति ३४०; अधिकाऱ्यासाठीं स्वतंत्र ओंकारोपासना, 'त्रयो धर्मस्कंधाः' इत्यादि आश्रम व संन्यास यांचा विचार ३४३; यज्ञांगभूत साम-मंत्र-होम-उत्थान ३४५; (३) आदित्याची मधुदृष्ट्या स्वतंत्र उपासना ३४८; कोणत्या मधूवर कोण उपजीविका करितात—देव खात-पीत नाहींत, अमृत पाहूनच तृप्त होतात ३५१; मधुविद्येचें ब्रह्मविद्येंत पर्यवसान, विद्येचा संप्रदाय व पात्र ३५५; गायत्रीद्वारा ब्रह्मविद्या, उपासनेचें पंचछिद्रयुक्त हृदयस्थान, त्याच्या पांच द्वारपालांची उपासना, ज्योतीची उपासना ३५६; शांडिल्योक्त ब्रह्मोपासना, मनोमयः-प्राणशरीरादि क्रतुकरण ३६०; पुत्राच्या व स्वतःच्या दीर्घायुष्ट्वासाठीं कर्म, स्वशरीरांत यज्ञकल्पना ३६१; मन, आकाश व आदित्य यांची समस्त ब्रह्मदृष्ट्या उपासना ३६७; (४) जानश्रुति पौत्रायण व रैक्व यांची कथा ३७०; संवर्गविद्या—देवांतील वायु व प्राणांतील प्राण संवर्ग ३७४; सत्यकाम जाबालाची कथा ३७७; त्याचें ब्रह्मचर्य, अग्न्यादिकांनीं केलेला चतुष्कल ब्रह्माचा उपदेश, आचार्योपदेश ३७९; उपकोसलाला सत्यकाम जाबालाच्या अग्नींचा उपदेश, नंतर जाबालानें केलेला अक्षिपुरुषोपदेश व गति ३८३; यज्ञांतील क्षतपूर्तीसाठीं प्रायश्चित्तार्थ व्याहृति-उपदेश ३८९; नैमित्तिक प्रायश्चित्त ३९१; (५) प्राण, वाक्, चक्षुः, श्रोत्र, मन यांच्या श्रेष्ठत्वादि गुणांचें विधान ३९३; श्रेष्ठत्वादिक मुख्य प्राणांतच आहेत, त्याविषयीं प्राणांचा कलह व निर्णय ३९४; प्राणांचें अन्न, वस्त्र, महत्त्वप्राप्तीसाठीं मंथाख्य कर्म ३९७; श्वेतकेतु व जैवलि यांचा पंचाग्नीविषयीं संवाद ४००; जैवलीनें गौतमास केलेला पंचाग्नींचा उपदेश ४०३; पंचाग्न्युपासक गृहस्थ व अरण्यवासी यांचा देवयान मार्ग ४०५; इतर कर्मठांचा पितृयाण मार्ग ४०६; त्यांची पुनरावृत्ति व तिचा क्रम, पुण्याचरणी पुण्ययोनीस, पापाचरणी पापयोनीस व अत्यंत पापी क्षुद्रजीवयोनीस प्राप्त होतात. ४०७; केकयराजानें प्राचीनशालादिकांस सांगितलेली वैश्वानरविद्या ४०९; प्राणाग्निहोत्र ४१६; (६) श्वेतकेतूची कथा—अभिमान, एकविज्ञानानें सर्व विज्ञान होतें, असा आदेश ४२०; 'सदेव सोम्येदमग्र आसीत्' ईक्षणपूर्वक

तजोऽबन्नसृष्टि ४२२; भूतांचीं तीन बीजें, नाम-रूपांना व्यक्त करण्यासाठीं जीवरूपानें भौतिककार्यांत प्रवेश, त्रिवृत्करण, विकार नाममात्र, लोहितादि रूपेंच सत्य ४२४; अन्नादिकांचा परिणाम, मन अन्नमय, प्राण आपोमय, वाक् तेजोमयी, त्याचें उपपादन ४२७; जीवविशिष्ट शरीरेंद्रियसंघात षोडशकल आहे, यांचें उपपादन, मनाच्या अन्नमयत्वाची पंधरा दिवसांच्या उपवासानें सिद्धि ४२८; सुषुप्तींत मनोलयानें जीवाची सत्संपत्ति, मन-उपाधिक जीवाचें प्राण बंधन आहे, याविषयीं दृष्टांत ४३०; जीवाचें सत्यस्वरूपच जगाचें मूळ, अन्नादि-कार्यकारणपरंपरेनें सत्च जगाचें मूळ, तद्रूपच हें सर्व, तोच आत्मा व तोच तूं—श्वेतकेतु ४३१; प्रजा सुषुप्तींत सत्संपन्न होत असूनहि तें न कळण्याचें सदृष्टान्त कारण ४३३; आम्ही सत्-पासून आलों, हें न कळण्याचें सदृष्टान्त कारण ४३५; जीव सुषुप्ति, मरण व प्रलय यांत कारणभावास प्राप्त होत असूनहि विनाश पावत नाहीं, याविषयीं दृष्टान्त ४३६; अतिशय स्थूल जगत् अतिसूक्ष्म बीजापासून कसें होतें, याविषयीं दृष्टान्त ४३७; विद्यमान स्थूल जगत्हि उपलब्ध न होण्याचें सदृष्टान्त कारण ४३८; चोरांनीं डोळे बांधून अरण्यांत सोडलेल्या गंधार देशच्या मनुष्याच्या दृष्टान्तानें सत्-च्या ज्ञानाचा उपाय ४३९; मरणसमयीं विद्वान् व अविद्वान् यांच्या सत्संपत्तीचा क्रम सारखाच ४४०; तथापि एक मुक्त व दुसरा बद्ध कां याविषयीं तप्त परशुग्रहणाचा दृष्टान्त—सत्याभिसंध मुक्त होतो व असत्याभिसंध बद्ध होतो. ४४१; (७) सर्व विद्या-कलांनीं युक्त पण संतप्त होणारा नारद सनत्कुमारास 'मला दुःखरहित कर' असें म्हणून शरण गेला ४४३; सर्व अध्ययन हें नाम आहे. त्या नामाची उपासना कर ४४४; त्यानंतर क्रमानें वागादि—प्राणान्त उत्तरोत्तर अधिक तत्त्वांचा उपदेश ४४५—५८; प्राणच सर्व ४५९; सत्य ब्रह्मानें बोलणारा अतिवादी ४६०; सत्याचें विज्ञान, त्याचें मनन, मननाचें श्रद्धा, श्रद्धेचें निष्ठा व निष्ठेचें कृति कारण ४६१; कृतीचें निमित्त सुख, सुखाचीच जिज्ञासा करावी, भूमा हेंच सुख, त्याचें 'नान्यत्पश्यति' इत्यादि लक्षण, तो स्वमहिम्यांत प्रतिष्ठित आहे ४६२; भूमाच सर्वतः सर्वत्र आहे, अहंकारादेश, आत्मादेश, आत्मज्ञ आत्मक्रीड वगैरे होतो ४६३; विद्वानाच्या आत्म्यापासून सर्व उत्पन्न होतें ४६४; 'न पश्यो मृत्युं पश्यति' व 'आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः०' ४६५; (८)

शरीराख्य ब्रह्मपुरांतील हृदयाकाशस्थ ब्रह्माची विजिज्ञासा, याविषयीं शंका-समाधान, त्याचे अपहतपाप्मत्वादि गुण, कर्मांचें विनाशी व ज्ञानाचें नित्य फल ४६७; आत्मज्ञाच्या संकल्पानेंच त्याचे पितृलोकादि काम सिद्ध होतात ४६९; आत्मस्थ सत्य कामहि मिथ्या अभिनिवेशामुळें प्राप्त होत नाहींत, हिरण्यनिधि-दृष्टन्तानें प्रत्यहीं ब्रह्मलोकास प्राप्त होणारीहि प्रजा अनृताभिनिवेशामुळें त्यास जाणत नाहींत ४७१; हृदयशब्दाची व्युत्पत्ति, जीवाची स्वरूपप्राप्ति, सत्य नांव, त्याची व्युत्पत्ति ४७२; आत्मा सेतु—विधृति, त्यापासून सर्व पापानिवृत्ति, हा ब्रह्मलोक निष्पाप व नित्यप्रकाशरूप, ब्रह्मचर्यानें त्याची प्राप्ति ४७३; ब्रह्मचर्याची यज्ञादिकानें स्तुति, ब्रह्मलोकांतील 'अर' व 'प्य' समुद्र, त्यांतील भोग मनोमय ४७४; सगुणविद्येच्या फलप्राप्तीसाठीं नाडीद्वारा गति, नाड्या व आदित्य यांचा संबंध, आदित्य अज्ञांचा निरोध व विद्वानांचें द्वार ४७६; प्रजापतीचें 'य आत्माऽपहतपाप्मा' इत्यादि वचन, इंद्र-विरोचनांचें त्याच्यापाशीं गमन, ब्रह्मचर्यवास, अक्षिपुरुषाचा उपदेश ४७८; उदकादिकांतील छायाच आत्मा, असा त्यांचा भ्रम, कृतार्थ होऊन जाणें, प्रजापतीचा शाप, विरोचनाचा देहात्मवाद ४८०; इंद्राचें छायात्मवादांतील भय, परत येणें, पुनः ब्रह्मचर्यवास, स्वाप्न पुरुषाचा उपदेश, पुनः कृतार्थ मानून जाणें, पुनः भय व परत येणें, ब्रह्मचर्य, सुषुप्त पुरुषाचा उपदेश, कृतार्थता—गमन—भय—पुनः परत येणें—अल्प ब्रह्मचर्य, अशरीर आत्मोपदेश, पूर्ण कृतार्थता ४८२—९०; दहर विद्येच्या अंग-भूत जपाचें विधान, ध्यानासाठीं ब्रह्मलक्षण, मोक्षाची प्रार्थना ४९०; विद्येचा संप्रदाय, अध्ययनादि नियम, धर्माचरणाचें फल ४९१; सिंहावलोकन ४९२-५२३.

बृहदारण्यकोपनिषद् ५२४—८१२.—(१) अश्वमेधयज्ञांतील प्रधान अश्वाच्या मस्तकामध्यें उषादिकालदृष्टि, महिमासंज्ञक ग्रहादिकांत दिवस-रात्र यांची दृष्टि ५२५; अश्वमेधोपयोगी अग्नीची उत्पत्ति, तत्प्रसंगानें सत्कारणवाद-सिद्धि, सर्व मृत्युग्रस्त, अशनाया हाच मृत्यु, मनस्वितेसाठीं मनाची उत्पत्ति, प्रजापतीच्या संकल्पानें जलसृष्टि, त्यापासून विराड्रूप अग्नीची उत्पत्ति, त्याच्या अंगांत प्राच्यादि दिशांची सृष्टि, अवशिष्ट सृष्टि, अश्व-अश्वमेधशब्दांचें निर्वचन, अश्वमेधोपासना, फल ५२६; प्रजापतीचे प्राणच देवासुर, त्यांची स्पर्धा, देवांसाठीं इंद्रियांचें उद्गान, असुरांनीं त्यांस केलेला वेध, मुख्य प्राणाला पाप्मवेध

न होणें, त्यामुळें असुरांचा पराभव, देवांचा विजय, प्राणाचें श्रेष्ठत्व, आंगिरसत्व, त्याच्यापासून मृत्यु दूर असतो, त्याची बृहस्पत्यादिदृष्ट्या उपासना, फल, प्राणच साम--सर्वांशीं सम, प्रतिष्ठागुणोपासना, फल, जपमंत्र, देवभाव हें जपफल ५३१–५४४; प्रजापतीच्या ' अहं ' व ' पुरुष ' या नांवांचें निमित्त, तदुपासकास फल, प्रजापतिपदालाहि संसारत्व, त्याचें गमक भय व अरति, दुसऱ्यापासून भय, अरति घालविण्यासाठीं मनुशतरूपादि मिथुनोत्पत्ति, त्याच्या द्वारा मनुष्यादि-पिपीलिकान्त सृष्टि, ब्राह्मणादिवर्णनियामक देवता, पूर्वी अव्याकृत, त्यापासून नाम-रूपव्यक्ति, त्यांत नखशिखान्त प्रवेश, त्याची अपूर्णता, तिचें कारण, त्याचींच प्राण, वाक्, चक्षुः इत्यादि कर्मनामें, पूर्णतेसाठीं आत्म्याचीच उपासना, तोच जाणण्यास योग्य, पुत्रादि सर्वांहून अतिप्रिय, ब्रह्म आपल्यालाच जाणून सर्व झालें, देव-मनुष्यादि सर्व ज्ञानी ब्रह्म झाले, आत्मज्ञानाच्या सर्वात्मतेला देवहि प्रतिबंध करीत नाहींत, भेददृष्ट्या उपासना करणारा पशुतुल्य, देव त्याला विघ्न करूं शकतात, क्षत्रियादिवर्ण व क्षत्रियांचें नियमन करणारा धर्म, यांची उत्पत्ति, स्वलोकाला न जाणतां मरणाराला तो लोक रक्षीत नाहीं, म्हणून आत्मलोकाचीच उपासना, कर्माधिकारी गृहस्थ पशूप्रमाणें देवादि-पिपीलिकान्त भूतांच्या उपयोगी कसा, त्याचें वर्णन, सकाम ब्रह्मचाऱ्याची जायादिकांविषयीं कामना, तीं न मिळाल्यास विरक्ताचें काल्पनिक पांक्त यज्ञादिकथन ५४४–६०; सप्तान्न ब्राह्मण—सात अन्नें, त्यांचा विनियोग, तीं क्षीण न होण्याचें कारण, तीन आत्मान्नें, त्यांचा आधिदैविक व आधिभौतिक विस्तार, पुत्रादि साधनांचे साध्य लोक, संप्रत्तिकर्म, तें केलेल्या पित्यामध्यें दैव वागादिकांचा प्रवेश, व्रतमीमांसा, वागादिकांचा श्रमामुळें व्रतभंग, अध्यात्म प्राण व अधिदैव वायु यांनाच श्रमानें ग्रासलें नाहीं, या ज्ञानाचें फल ५६१-७४; अविद्याकार्याचा संक्षिप्त उपसंहार ५७५; (२) दृप्त बालाकि अजातशत्रूला ' मी तुला ब्रह्म सांगतों ' असें म्हणाला, त्याबद्दलच राजा सहस्र गायी देण्यास तयार झाला ५७७; बालाकीनें आदित्य, चंद्र, विद्युत् इत्यादिकांतील पुरुषाचीच मी ब्रह्मदृष्ट्या उपासना करितों, असें म्हटलें. पण अजातशत्रूनें त्या प्रत्येकाचें ' हें मुख्य ब्रह्म नव्हे ' असें म्हणून निराकरण केलें ५७८–८२; नंतर राजानेंच त्याला सुषुप्त पुरुषापाशीं नेऊन व त्याला प्राणाच्या नांवांनीं

हाका मारून, तो न उठल्यामुळें त्याला हातानें जागें करून, प्राण आत्मा नव्हे, साक्षी आत्मा—ब्रह्म आहे, असा बोध केला, विज्ञानमयाच्या सुषुप्त्यादि अवस्थांचें वर्णन, जागृतींतून नाड्यांच्या द्वारा हृदयांत जाण्याचा मार्ग, इंद्रियांचें ग्रहण, स्वप्नांत संचार, शरीरांत सुखानें शयन, त्याविषयीं दृष्टान्त, प्राणादिकांची आत्म्यापासूनच अग्निविस्फुलिंगन्यायानें निष्पत्ति ५८२—८६; भूतें सत्य कशीं, तें सांगण्यासाठीं शिशुब्राह्मण व मूर्तामूर्त ब्राह्मण—मस्तकच ऊर्ध्वबुध्न अर्वाक्-बिल चमस, त्यांतील सात छिद्रें हेच सप्तर्षि, आकाश-वायु अमूर्त; तेजादि तीन भूतें मूर्त, मूर्तच सत्, मर्त्य, स्थित व अमूर्त अमृत, त्यत्, यत् वगैरे ५८६—९१; संन्यासविधानासाठीं मैत्रेयीब्राह्मण—वित्तानें मोक्षाची आशा नाहीं, सर्वाला स्वतःसाठीं सर्व प्रिय होतें, आत्माच सर्वांहून अधिक प्रिय, तोच द्रष्टव्य-श्रोतव्य वगैरे आहे. चिन्मात्राची सर्वत्र अनुवृत्ति, त्याविषयी दुंदुभि वगैरे तीन दृष्टान्त, आत्म्यापासून वेदादिकांची निःश्वसितन्यायानें उत्पत्ति, लवण उदकांत लीन होतें, तसाच आत्मा भूतांबरोबर विशेष आकारानें उत्पन्न होऊन त्यांच्या मागोमाग स्वरूपांत मिळून जातो. त्यानंतर त्याला विशेष विज्ञान नसतें. द्वैतावस्थेंतच द्वैताचें भान, सर्व आत्मरूप झाल्यावर विशेष भान नाहीं. सर्वज्ञात्याला दुसरा कोण जाणणार? ५९२—९९; मधुब्राह्मण—पृथिव्यादिकांतील तेजोमय-अमृतमय पुरुष, शरीरादिकांतील तेजोमयादि पुरुष, तोच आत्मा, तेंच ब्रह्म, तेंच सर्व, त्याच न्यायानें अधिदैव—अग्न्यादि व अध्यात्म—वागादि पुरुषच आत्मा, ब्रह्म व सर्व आहे, आत्माच सर्वाधार, सर्वाधिपति वगैरे, हें मधुज्ञान दध्यङ्-आथर्वणानें अश्विनीकुमारांना कसें सांगितलें त्याचें वर्णन ६००-६०६; मधुविद्येचा वंश ६०९; (३) जनकाच्या यज्ञांत ब्राह्मणसंमेलन, त्यांत अतिब्रह्मिष्ठत्वाविषयीं सहस्र गायींचा पण, त्याला कोणी जिंकीत नाहीं, असें पाहून याज्ञवल्क्य तो उचलतो, ब्राह्मण रागावतात, अश्वल व याज्ञवल्क्य यांचा 'यजमान कोणत्या उपायानें मृत्यूच्या व्याप्तीपासून अतिमुक्त होतो' याविषयीं संवाद ६०९—१५; याज्ञवल्क्य व आर्तभाग यांचा ग्रहातिग्रहाविषयीं संवाद—त्यांत बंधरूप मृत्यूचें स्वरूपकथन, विद्वानाचे प्राण उत्क्रमण करीत नाहींत, मरणोत्तर त्याला नांव सोडीत नाहीं, मरणोत्तर पुरुष कर्ममय होतो, पुण्यकर्मानें पुण्य, पापकर्मानें पापी ६१५—१८; भुज्यु व याज्ञवल्क्य यांचा अश्वमेधयाजी कोठें जातात, याविषयीं संवाद.

शास्त्रीय पुण्यकर्म व उपासनासहित पुण्यकर्म यांचें फल संसारच ६१९; उषस्त व याज्ञवल्क्य यांचा सर्वान्तर आत्म्याविषयीं संवाद ६२१; कहोल व याज्ञवल्क्य यांचा संन्यासासह सर्वान्तर आत्मज्ञानाविषयीं संवाद ६२३; गार्गी व याज्ञवल्क्य यांचा जगाच्या ओतप्रोतभावाविषयीं संवाद ६२५; उद्दालक व याज्ञवल्क्य यांचा सूत्र व अन्तर्यामी यांविषयींचा संवाद, अन्तर्यामीचें अधिदैवत, व अध्यात्म वर्णन ६२६–३३; गार्गीचे सर्वान्तर अक्षर ब्रह्माविषयीं दोन प्रश्न, त्यांचीं उत्तरें, याज्ञवल्क्याशीं वाद न करण्याविषयीं ब्राह्मणांस तिचा उपदेश ६३४–३९; याज्ञवल्क्य व विदग्ध शाकल्य यांचा देवतांचा प्राणापर्यंत संकोच व आनन्त्यापर्यंत विकास याविषयीं संवाद, औपनिषद पुरुषाला जाणत नसल्यामुळें याज्ञवल्क्याच्या शापानें शाकल्याचा मूर्धापात, इतर ब्राह्मण भ्याले, याज्ञवल्क्याचें वादास आह्वान, शरीराचें वृक्षसाम्य, त्याच्या मूळाविषयीं याज्ञवल्क्याचा सर्वांस प्रश्न, ब्राह्मण निरुत्तर झाले, श्रुति ' विज्ञानं आनंदं ब्रह्म ' हेंच मूळ सांगते. ६३९–५४. (४) जनकाकडे याज्ञवल्क्य आले, त्यांना पशूंसाठीं आगमन कीं सूक्ष्मवस्तूच्या निर्णयासाठीं? असा प्रश्न, 'दोन्हीसाठीं' असें उत्तर, राजाला इतरांनीं केलेला उपदेश विचारून घेऊन तीं–वागादि सर्व अंगें आहेत, असा उपदेश, राजाचें सहस्र गोदान, शिष्याला कृतार्थ केल्यावांचून कांहीं न घेण्याविषयीं पित्याचें मतकथन ६५५; जनकाचें निरभिमानानें उपसदन, ' सर्वसाधनसंपन्न असा तूं मरणोत्तर कोठें जाशील ?' ' माहीत नाहीं ' असें उत्तर, दक्षिण नेत्रांतील इंध, त्याचेंच ' इंद्र ' हें परोक्ष नाम, इंधोपासनेसाठीं इंद्र-इंद्राणीकल्पना, त्यांचें समागमस्थान, अन्न–प्रावरण–मार्ग, प्राणात्मरूप विद्वानाचें आत्मत्व, सर्वात्मकत्व, जनकाची अभयप्राप्ति ६६६; याज्ञवल्क्य कांहीं न सांगण्याच्या निश्चयानें जनकाकडे गेला, कामप्रश्नाच्या बलावर ' किं ज्योतिरयं पुरुषः ' असा प्रश्न, क्रमानें आदित्य, चंद्र, अग्नि, वाक् व आत्मा, या ज्योतींचा उपदेश, आत्मा कोण ? वागादि प्राणांतील विज्ञानमय आत्मा, बुद्धिरूपानें त्याचा संचार, तो देहाला आत्मा मानून सशरीर होतो, मरतांना त्याचा त्याग, हा लोक, परलोक व तिसरें संध्यस्थान, परलोकाच्या साधनानुसार दुःख सुख, शरीराला भानशून्य करून शयन, वासनामय देहानें स्वप्नदर्शन, त्यांत नसलेले बाह्य रथादिपदार्थ निर्मितो, त्याविषयीं मंत्र, स्वप्नस्थान

स्वयंज्योतिष्ट्व, सहस्रदानाची प्रतिज्ञा, मोक्षसाधनाविषयीं प्रार्थना, सुषुप्तादिकांत पुण्य-पापफल नुस्तें पाहूनच गेल्यामार्गानें यथास्थान परत येणें, प्रत्येक अवस्थेंतील पुण्य-पापानें अनन्वागत, पुरुषाचें असंगत्व व त्याविषयीं महामत्स्याचा दृष्टान्त, श्रांत झाल्यावर सुषुप्ताकडे धांवणें, पक्ष्याचा दृष्टान्त, हितानाम नाड्या, जाग्रत्प्रमाणेंच स्वप्नांत भयादि, आत्मा असंग, आत्म्याचें निष्काम—निष्पाप—असंग रूप, आत्मसंलग्न आत्म्याला बाह्य-आंतर भान नाहीं, सुषुप्तींत पिता, माता वगैरेचा बाध, आत्मा पुण्य-पापशून्य, शोकरहित होतो, सुषुप्तींत त्याच्य अविनाशी दृक्-शक्तीचा अलोप, द्वितीय वस्तूच्या अभावीं तो पहात वगैरे नाहीं, द्वैतावस्थेंतच अन्य द्रष्टा अन्य दृश्य पाहतो, सुषुप्तींत द्रष्टा अद्वैत होतो, हाच त्याचा परम लोक, परम गति, परम संपत्, परम आनंद, त्याच्या लेशावर भूतांचा निर्वाह, मनुष्यापासून हिरण्यगर्भापर्यंत उत्तरोत्तर शतगुण अधिक आनंद, तोच श्रोत्रियप्रत्यक्ष परम आनंद, तोच परम लोक, पुनः मोक्षसाधनाविषयीं प्रश्न, मुनीची भीति, आत्म्याच्या स्वप्नादि अवस्थांतील संचाराच अनुवाद, मरणसमयीं क्लेश, सदृष्टान्त शरीरत्याग, अन्य शरीरग्रहणाठीं गमन, राजभृत्यांप्रमाणें भूतें त्याची प्रतीक्षा करितात, तो ऊर्ध्वोच्छ्वासी झाला असतां प्राण राजभृत्यांप्रमाणें त्याच्या मागून जातात ६६७—८७; तो निर्बल व मोहितसा झाला कीं सर्व त्यास प्राप्त होतात, तो इंद्रियांच्या तेजोमात्रा आकर्षण करून घेतो, त्याचें विज्ञान हृदयांत व्यक्त होतें; 'हा पहात नाहीं,' वगैरे लोकांचें कथन, हृदयाग्राचें प्रकाशन, त्या प्रकाशानें चक्षुःप्रभृति द्वारा बाहेर पडणें, त्याच्या मागोमाग सर्व प्राण जातात, त्याच्याबरोबर विद्या, कर्म, पूर्वप्रज्ञा जाते, आत्मा उत्तर देहाचें भावनेनें ग्रहण करून पूर्व देह सोडतो, याविषयीं तृणजळूचा दृष्टान्त, सोनार जुन्या अलंकारांतील सोनें काढून नवा अलंकार करितो तसाच आत्मा पूर्व शरीराला मारून नवीन शरीर करितो, तो शुभाशुभ कर्माप्रमाणें होतो, त्याविषयीं मंत्रप्रमाण, कामी पुरुषच हें गमनागमन करितो, अकाम पुरुषाला गति-आगति नाहीं. कामत्यागानें सशरीर अवस्थेतच ब्रह्मरूप होणें, नंतर शरीरस्थितीविषयीं सापाच्या कातेचा दृष्टान्त, आत्मकाम ब्रह्मज्ञाला मोक्ष, याविषयीं प्रमाणभूत मंत्र, हा महान् अज आत्मा सर्वांचा वशी, ईशान वगैरे, कर्माकर्मानें न्यूनाधिक न होणारा, सर्वेश्वर, सर्वाधिपति, सर्व लोकांचा सेतु, वेदानुवचनादि

ज्ञानसाधनें, ज्ञानानें मुनि, आत्मलोकेच्छु एषणात्याग करितात, आत्मा अगृह्यादि रूप, त्याला पुण्य-पाप ताप देत नाहींत, 'एष नित्यो महिमा०,' आत्मा कर्मफल-संबंधरहित आहे, असें जाणणारा शमादिसंपन्न होऊन शरीरांतच त्याला पाहतो. तो पाप-पुण्यशून्य होतो, हाच ब्रह्मलोक, राजाचें सर्वस्वदान, हा महान्, अज, आत्मा अन्नाद, वसुदान, अजर, अमर, अमृत, अभय आहे, आरण्यकाचा समुचित अर्थ ६८७–७००; पूर्वोक्तच मैत्रेयी ब्राह्मण ७०१; याज्ञवल्कीय कांडाचें वंशकथन ७०७;(५) सर्व उपासनांच्या अंगत्वानें ओंकार, दान, दम, दया यांचें विधान, हृदयच प्रजापति, ब्रह्म, व सर्व आहे, उपासना व फल, ' सत्यं ब्रह्म ' अशी प्रथमज महत् यक्षाची उपासना, फल, सत्य ब्रह्माची, आदित्य व चाक्षुष पुरुषाची वैगेरे उपासना, मनोमयादि पुरुषाची उपासना व विद्युत्ब्रह्म इत्यादि अनेक उपासना ७०८–७२४; (६) ज्येष्ठ-श्रेष्ठगुणत्वानें प्राणादि उपासना, इंद्रियांचा श्रेष्ठत्वाविषयीं कलह, पंचाग्निविद्या, दक्षिणोत्तर मार्ग, अधोगति, महत्त्वप्राप्तीसाठीं कर्म, पुत्रमंथ, वंश ७२५–७४८; सिंहावलोकन ७४९.

कौषीतकिब्राह्मणोपनिषद् —८१३–९०९ (१) चित्र व श्वेतकेतु यांचा संवाद–पंचाग्निविद्या, गुरूचें कर्तव्य, उत्तरमार्गानें मिळणारा ब्रह्मलोक, त्याचें सविस्तर वर्णन, पर्यंकविद्या ८१३–३४; (२) ' प्राणो ब्रह्म ' अशी उपासना, अयाचित व्रत, त्याचें फल, धनप्राप्तीसाठीं कर्तव्य, वश्योपाय, आंतर अग्निहोत्र, विशेष फलसिद्धीसाठीं तीन कर्में, सपुत्र सोमोपासकाचें आणखी कर्तव्य, दैव परिमर, अध्यात्म परिमरदर्शन, त्यांचें फल, पितापुत्रीय संप्रदान, त्याचा सविस्तर विधि ८३५–६३; (३) इंद्र-प्रतर्दनसंवाद, आत्मज्ञानच मनुष्याला हिततम, 'प्राणोऽस्मि प्रज्ञात्मा तं मां आयुरमृतमित्युपास्स्व', आत्मज्ञाला महापातकांचाहि लेप लागत नाहीं, प्राणांचें एकत्व, उपपत्ति, प्राणामध्येंच निःश्रेयस, त्याविषयीं उपपत्ति, सुषुप्तीत सर्व इंद्रियें प्राणांत लीन होतात व त्यापासूनच उद्भवतात, मरणावस्थेंतहि असाच प्रकार, प्रज्ञेचा इंद्रियरूपानें विभाग, प्रज्ञेनेंच इंद्रियव्यवहार, प्रज्ञेवांचून इंद्रियें कांहीं करूं शकत नाहींत यास्तव प्रज्ञात्म्या प्राणाचीच उपासना करावी. इंद्रियें व विषय परस्पर सापेक्ष, ती सर्व प्रज्ञेंत प्रतिष्ठित आहेत ८६३–८४; (४) बालाकि व अजातशत्रु यांचा ब्रह्मविषयीं संवाद, मुख्य प्राणसाक्षी ब्रह्माचा निर्णय, त्यांत इंद्रियादि सर्व लीन होतें

व त्यापासूनच उद्भवतें, त्याच्या ज्ञानाचा उपाय, त्याच्यावर सर्व इंद्रियादिकांचा निर्वाह, आत्मज्ञानाचें फल ८८५–९००; सिंहावलोकन ९०१–९०९.

श्वेताश्वतरोपनिषद्—९१०–९७२. (१) कारणाविषयीं विचार, देवात्मशक्तीचें ध्यानयोगानें ज्ञान, शक्तिमान् ईश्वरच कारण, ईश्वराचें वर्णन–चक्र–नदी, ज्ञानच मोक्षसाधन, जीवेश्वरवैलक्षण्य, अक्षर–क्षर, आत्मसंस्थ आत्म्याला पहावें, प्रणवद्वारा ध्यान, ९१०–२१; (२) ध्यानसिद्धीसाठीं प्रार्थना, स्तुति, योगाचें स्थान, आसनादि योगांगें, प्राणायाम, आसनासाठीं देश, योगप्रवृत्तीचीं चिन्हें, साधारण सिद्धि, ज्ञानानें शोकत्याग, आत्मानुभव, आत्मनमस्कार ९२१; (३) ब्रह्मपदाचा अर्थ, ईश्वराचें त्रिकालीं एकत्व तो उत्पत्त्यादि करण्यास स्वतंत्र, चराचरांचा उत्पादक, त्याची प्रार्थना, ज्ञानानें अमृतत्व व ज्ञानावांचून मोक्ष नाहीं, आत्मस्वरूप, त्याचें मंगलत्व, त्याचें विश्वरूपत्व. पुरुषच हें सर्व, भगवान् निर्विशेष, इंद्रियात्मत्व, 'त्वं' पदार्थ, परमात्मदर्शन, मंत्रदृष्ट्याचा अनुभव ९३१; (४) परमात्म्याचेंच कथन, मायेचें स्वरूप, 'द्वा सुपर्णा' माया प्रकृति, मायावी महेश्वर, त्याचेंच स्वरूप व प्रार्थना वगैरे ९४१–४९; (५) तत्पदार्थवर्णन, त्वंपदार्थवर्णन, अंगुष्ठमात्रत्व, शरीरग्रहणकारण, ज्ञानानें मोक्ष ९४९–५५; (६) कारणवादाचा उल्लेख, देवाचा महिमा, देवाचें स्वरूप, ईश्वरचिंतन, ईश्वरस्वरूप, तो ईश्वरांचा ईश्वर, कार्यकरणशून्य, त्याची विविधा शक्ति, त्याचा पति कोणी नाहीं, त्याचेंच आणखी वर्णन, त्याच्या ज्ञानाचा तच्छरणता हा उपाय, त्याचें स्वरूप, ज्ञानावांचून मोक्ष नाहीं, अधिकाऱ्यालाच ज्ञानदान, आत्मादेव-गुरु यांच्या भक्तालाच ज्ञान ९५५–६५; सिंहावलोकन ९६६.

जाबालोपनिषद्—९७४–९८९ (१) अविमुक्त–सोपाधिक ईश्वरस्वरूपच कुरुक्षेत्र, त्याचेंच सतत उपासन, त्याला मरणकालीं ईश्वर तारक ब्रह्मोपदेश करितो. (२) अविमुक्तच अव्यक्त अनन्त आत्मा. त्याचें वरणानासीमध्यें उपासन, तोच ज्ञानोपदेश करितो. (३) शतरुद्रीयजपानें ज्ञान होतें. (४) ब्रह्मचर्यापासून गृहस्थ वगैरे क्रमानें संन्यास किंवा विरक्ति येतांच संन्यास. त्याचें विधान. (५) आत्मा हेंच परमहंसाचें यज्ञोपवीत, त्याचे धर्म, आतुरांचा वाचिक किंवा मानसिक संन्यास, संन्यासाचा विधि. (६) प्राचीन परमहंस व त्यांचे धर्म ९७४–८७; सिंहावलोकन ९८८.

संक्षिप्त चिह्नांचा खुलासा.

सु. गी.=सुबोध गीता, सु. ब्र.=सुबोध ब्रह्मसूत्र, सु. पं.=सुबोध पंचदशी, गी. भा.=गीताभाष्यार्थ. — =म्हणजे.

ब्रह्मसूत्रशारीरभाष्यार्थ—वेदान्त-प्रस्थान-त्रयांतील हें तिसरें प्रस्थान—मूळ सूत्र, सरळ सूत्रार्थ, शांकर भाष्य व त्याचा सरळ व अत्यंत सुबोध स्पष्टीकरणासह भाष्यार्थ—यांसह २ भागांत प्रसिद्ध करीत आहों. शके १८४६ सालीं दोन्ही भाग प्रसिद्ध होतील. शेवटच्या भागांत तिन्ही प्रस्थानांवरील आचार्यांच्या भाष्यांचा सविस्तर उपसंहार लिहिणार आहों. त्यांत सर्ववाद व आचार्यांनीं ठिकठिकाणीं केलेले त्यांचें खंडन, यांचें स्वरूप अगदीं विशद करून तिन्ही प्रस्थानांची वर्णानुक्रम सूचि, कोश वगैरे त्यालाच एकत्र जोडणार आहों. प्रत्येक भागाची किंमत सुमारें ५ रु. ठेवूं. तरी **श्रीशंकराचार्य, सनातन वैदिक धर्म** आणि **वेदान्तशास्त्र** यांविषयीं आदर बाळगणाऱ्या प्रत्येकानें या सुबोध व सभाष्यार्थ वेदान्तप्रस्थानत्रयाचा **संग्रह अवश्य** करावा, अशी विनंति आहे.

ॐतत्सत्

शांकरभाष्यानुसार

सुबोध उपनिषत्संग्रह.

ईशावास्योपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह.]

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

शांतीचा अर्थ—[पूर्णं अदः—] तें परब्रह्म पूर्ण आहे. [पूर्णं इदं—] हें सोपाधिक ब्रह्महि स्वरूपानें पूर्ण आहे. [पूर्णं पूर्णात् उदच्यते—] तें हें कार्यात्मक ब्रह्म पूर्ण म्हणजे कारणात्मक ब्रह्मापासून उद्भवतें. पण तें त्याच्यापासून जरी निराळें होत असलें तरी आपलें पूर्णत्व सोडीत नाहीं. तर तें पूर्णच उद्भवतें. [पूर्णस्य पूर्णं आदाय—] कार्यरूप ब्रह्माचें पूर्णत्व घेऊन [पूर्णं एव अवशिष्यते—] पूर्णच—केवल ब्रह्म—अवशिष्ट राहतें. (म्हणजे सृष्टीच्या पूर्वीं जें अखंड एकरस सर्वव्यापी ब्रह्म होतें तेंच हें सृष्टीनंतरचें नामरूपोपाधियुक्त कार्यब्रह्म आहे. पण तेंहि पूर्ण आहे. त्या कारणरूप पूर्णापासून हें कार्यरूप ब्रह्म पृथक् आहे, असें भासूं लागतें. प्रलयसमयीं त्या द्वैतरूप कार्यब्रह्मांतील पूर्णत्व तेवढें घेऊन म्हणजे पूर्णत्व हा आपला धर्म त्यांतून काढून घेऊन तें पहिलें कारणरूप ब्रह्मच अवशिष्ट राहतें.) त्रिविध तापांची शांति होवो.

ॐ । ईशा वास्यमिदꣳ सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥ १

अन्वयार्थ—[जगत्यां यत्किंच जगत् तत् इदं सर्वं ईशा वास्यं—] या पृथ्वींत जें कांहीं जगत् आहे तें हें सर्व ईश्वरानें आच्छादित करावें. परमार्थ सत्यरूपानें हें सर्व चराचर झांकून टाकावें. सर्वविकारजात आत्मरूप आहे, अशी भावना करावी. तशी भावना केली असतां हें सर्व सोडल्यासारखें होतें, [तेन त्यक्तेन भुञ्जीथाः—] त्या त्यागानें तूं आपलें पालन कर [कस्य स्विद् धनं मा गृधः—] आणि ज्यानें अशा रीतीनें त्याग केला आहे असा तूं कोणाच्याहि धनाची आकांक्षा करूं नको. १—पहिल्या मंत्राच्या पूर्वार्धानें तत्त्वाचा उपदेश केला. तिसऱ्या पादानें ज्याचें ज्ञान परिपक्व झालेलें नाहीं त्याच्याकरितां संन्यासाचें विधान केलें व चवथ्या पादानें संन्यासाचा नियम सांगितला. याप्रमाणें आत्मवेत्त्यानें पुत्रादि एषणात्रयाचा त्याग करून व आत्मज्ञाननिष्ठ होऊन आत्म्याचें रक्षण करावें; असा हा पूर्व मंत्राचा अर्थ झाला. आतां 'कुर्वन्नेव०' हा दुसरा मंत्र अनात्मज्ञतेमुळें आत्मग्रहण करण्यास असमर्थ असलेल्या दुसऱ्या अनात्मज्ञ पुरुषास उपदेश करीत आहे—

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳ समाः ।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥ २

अन्वयार्थ—[इह कर्माणि कुर्वन् एव शतं समाः जिजीविषेत्—] या लोकी अग्निहोत्रादि कर्में करीतच शंभर वर्षें जिवंत राहण्याची इच्छा करावी. [एवं त्वयि नरे इतः अन्यथा न अस्ति येन कर्म न लिप्यते—] अशा रीतीनें जिवंत राहण्याची इच्छा करणाऱ्या व केवल मी नर आहें, एवढाच अभिमान धरणाऱ्या तुझ्याविषयीं कर्में करणें या प्रकाराहून दुसरा प्रकारच नाहीं; कीं ज्याच्या योगानें तूं अशुभ कर्मानें लिप्त होणार नाहींस. (अशुभ कर्माचा तुला लेप लागणार नाहीं.) २.—पहिल्या मंत्रार्थाचा स्वीकार करण्यास्तव आतां अगोदर अविद्वानाची निंदा करण्याकरितां हा तिसरा मंत्र आरंभिला जातो—

असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः ।
ताꣳस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ॥ ३

अन्वयार्थ—[ते असुर्याः नाम लोकाः—] ते असुर्य लोक (देवादिकांचे जन्म) [अन्धेन तमसा आवृताः—] अज्ञानतमानें आच्छादित झालेले आहेत. [ये के च आत्महनः जनाः—] जे कोणी आत्मघाती लोक असतात [ते प्रेत्य तान् अभिगच्छन्ति—] ते या देहाला सोडून त्या स्थावरान्त देहाला प्राप्त होतात. ३.

—ज्या आत्म्याच्या हननानें अविद्वान् संसार करितात व ज्याचें हनन न केल्यानें विद्वान् मुक्त होतात आणि ते आत्महन नव्हेत त्या आत्म्याचें तत्त्व कशाप्रकारचें आहे, तें श्रुति सांगते—

अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत् ।
तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ॥ ४

अन्वयार्थ—[अनेजत्–] तें आत्मतत्त्व आपल्या स्वरूपापासून कधींहि च्युत न होणारें [एकं–] एक व [मनसः जवीयः–] मनाहूनहि अधिक वेगवान् आहे. [देवाः एनत् न आप्नुवन्–] इंद्रियें त्याला प्राप्त झालेलीं नाहींत. कारण [पूर्वं अर्षत्–] तें सर्वांच्या पूर्वीं जेथें तेथें गेलेलें असतें. [तत् तिष्ठत् धावतः अन्यान् अत्येति–] तें स्वतः एकाच अविक्रियावस्थेंत असूनहि सत्वर गमन करणाऱ्या दुसऱ्या–मन-वाणी इत्यादिकांचें उल्लंघन करून जातें. [तस्मिन् मातरिश्वा अपः दधाति–] तें सद्रूप आत्मतत्त्व विद्यमान असतांनाच क्रियात्मक वायु अग्नि, सूर्य, पर्जन्य इत्यादिकांचीं ज्वलनादि कर्में विभागून देतो. ४. —मंत्रांना आळस नाहीं. यास्तव पूर्व मंत्रांत सांगितलेलाहि अर्थ हा मंत्र पुनः सांगतो—

तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वान्तिके ।
तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ ५

अन्वयार्थ—[तत् एजति–] तें आत्मतत्त्व चळतें. [तत् न एजति–] पण तेंच चळत नाही. म्हणजे वस्तुतः तें विभु असल्यामुळें अचल आहे. पण उपाधीमुळें चंचल असल्यासारखें वाटतें. [तत् दूरे–] तें अविद्वानांच्या दृष्टीनें दूरसें आहे व [तत उ अन्तिके–] तेंच विद्वानांच्या दृष्टीनें अगदीं समीप असतें. [तत् अस्य सर्वस्य अन्तः–] तें या सर्वांच्या अन्तर्भागीं आहे व [तत् उ अस्य सर्वस्य बाह्यतः–] तेंच या सर्वांच्या बाहेर आहे. ५.—विधि-निषेधशून्य जीवन्मुक्तस्वरूपानें राहणें, हें वरील आत्मज्ञानाचें फल आहे, असें आतां श्रुति सांगते—

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥

अन्वयार्थ—[यः तु–] जो संन्यासी मुमुक्षु [सर्वाणि भूतानि–] सर्व भूतें [आत्मनि एव अनुपश्यति–] आत्म्यामध्येंच पाहतो [च सर्वभूतेषु आत्मानं–] व सर्वभूतांमध्यें आत्म्याला पाहतो [ततः–] तो त्या पाहण्यामुळेंच [न विजुगुप्सते–] कोणाची घृणा–निंदा करीत नाहीं. ६.–हाच अर्थ ' यस्मिन्-' इत्यादि दुसराहि मंत्र सांगत आहे—

यस्मिन्त्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ ७

अन्वयार्थ—[यस्मिन्–] ज्या वेळीं [विजानतः–] ज्ञानी पुरुषाला [सर्वाणि भूतानि–] सर्व भूतें [आत्मा एव अभूत्–] आत्माच झाला [तत्र–] तेव्हां [एकत्वं अनुपश्यतः–] त्या एकत्व पाहणाऱ्या विद्वानाला [कः शोकः कः मोहः–] शोक कशाचा व मोह कशाचा ? ७.–हा जो वरील मंत्रांनीं सांगितलेला आत्मा त्याचें स्वभावतः काय लक्षण आहे, हें हा मंत्र सांगत आहे—

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरꣳशुद्धमपापविद्धम् ।
कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान्व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ ८

अन्वयार्थ—[सः पर्यगात्–] तो आत्मा सर्वोंवार पसरलेला आहे. [शुक्रं–] तो शुद्ध, [अकायं–] लिंगशरीररहित, [अव्रणं–] अक्षत व [अस्नाविरं–] शिरांनीं रहित ह्मणजे स्थूल शरीरशून्य, [शुद्धं–] अविद्यामलरहित, [अपापविद्धं-] धर्माधर्मादि पापरहित, [कविः–] सर्वद्रष्टा, [मनीषी–] सर्वज्ञ, [परिभूः–] सर्वांहून श्रेष्ठ असणारा व [स्वयंभूः–] स्वयंभू आहे, तो नित्यमुक्त ईश्वर [याथातथ्यतः–] अगदी जसें पाहिजे तसें म्हणजे कर्म, फल व साधन यांच्या अनुसार [शाश्वतीभ्यः समाभ्यः अर्थान् व्यदधात्–] नित्य प्रजापतींना कर्तव्यांचा विभाग करून देता झाला. ८.

या उपनिषदाच्या पहिल्या मंत्रांत सर्व एषणात्यागपूर्वक ज्ञाननिष्ठा सांगितली. दुसऱ्या मंत्रांत अज्ञासाठीं कर्मनिष्ठा सांगितली. नंतर तिसऱ्या मंत्रांत अविद्वानांची निंदा करून चवथ्या मंत्रापासून आठव्या मंत्रापर्यंत आत्म्याचें याथात्म्य–यथार्थ स्वरूप सांगितलें. आतां येथून पुढें कर्में करूनच जिवंत राहण्याची इच्छा करणारे जे कर्मनिष्ठ त्यांच्यासाठी हें असें सांगितलें जात आहे--

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाꣳरताः ॥ ९

अन्वयार्थ—[ये अविद्यां उपासते ते अन्धं तमः प्रविशन्ति—] जे कर्मामध्यें रत असतात ते अविद्येमध्यें प्रवेश करितात. [ये उ विद्यायां रताः ते ततः अपि भूयः इव तमः—] पण जे कर्म सोडून नुस्त्या विद्येमध्यें ह्मणजे उपासनेमध्यें रत असतात ते त्याहूनहि अधिक अविद्येमध्यें प्रवेश करितात. ९.

अन्यदेवाहुर्विद्ययाऽन्यदाहुरविद्यया ।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १०

अन्वयार्थ—[विद्यया अन्यद् एव आहुः—] उपासनेच्या योगानें निराळेंच फल मिळतें असें ह्मणतात व [अविद्यया अन्यद् एव आहुः—] कर्माच्या योगानें निराळेंच फल मिळतें, असें सांगतात. [इति ये नः तत् विचचक्षिरे तेषां धीराणां शुश्रुम—] असें आम्हीं ज्या आचार्यांनी आम्हांला कर्म व देवताज्ञान यांचें व्याख्यान करून सांगितलें त्या बुद्धिमानांच्या तोंडून ऐकलें आहे. १०. —आणि ज्याअर्थी असें आहे त्याअर्थी—

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयꣳसह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥ ११

अन्वयार्थ—[विद्यां च अविद्यां च तत् उभयं सह यः वेद—] विद्या व अविद्या ह्म० देवताज्ञान व कर्म यांना सह अनुष्ठेय ह्म० एकाच पुरुषाकडून एकाच वेळीं अनुष्ठान केलें जाण्यास योग्य, असें जो जाणतो तो [अविद्यया मृत्युं तीर्त्वा—] अगोदर कर्माच्या योगानें स्वाभाविक कर्म व ज्ञान यांचें उल्लंघन करून [विद्यया अमृतं अश्नुते—] देवताज्ञानानें अमृतभावास म्ह० देवतारूपास प्राप्त होतो. ११.—आतां व्याकृत व अव्याकृत यांच्या उपासनांचा समुच्चय करण्याच्या इच्छेनें त्यांतील प्रत्येकाच्या पृथक् उपासनेची निंदा केली जात आहे—

अन्धं तमः प्रविशन्ति येऽसंभूतिमुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ संभूत्याꣳरताः ॥ १२

अन्वयार्थ—[ये असंभूतिं उपासते ते अन्धं तमः प्रविशन्ति—] जे प्रकृतीची उपासना करितात ते अविद्याख्य अन्धतमांत प्रवेश करितात. आणि [ये उ संभूत्यां रताः ते ततः भूयः इव तमः प्रविशन्ति—] जे कार्यब्रह्मामध्यें ह्म०

हिरण्यगर्भामध्यें रत असतात ते त्याहूनहि अधिक अन्धतमांत पडतात. १२. —आतां त्या दोन्ही उपासनांच्या समुच्चयाचें कारण—त्यांतील प्रत्येक अवयवाचें म्ह० नुस्त्या अव्याकृताच्या उपासनेचें व नुस्त्या व्याकृताच्या उपासनेचें फल भिन्न असणें, हें आहे. यास्तव आतां तो अवयवफलभेदच सांगतात—

अन्यदेवाहुः संभवादन्यदाहुरसंभवात् ।
इति शुश्रुम धीराणां ये नस्तद्विचचक्षिरे ॥ १३

अन्वयार्थ—[संभवात् अन्यद् एव आहुः—] कार्यब्रह्माच्या उपासनेनें अन्य फल मिळतें असें सांगतात व [असंभवात् अन्यद् आहुः—] अव्याकृताच्या—कारण ब्रह्माच्या उपासनेनें निराळेंच फल मिळतें, असें सांगतात [ये नः तत् विचचक्षिरे तेषां धीराणां इति शुश्रुम—]ज्यांनी आम्हांला व्याकृत व अव्याकृत यांच्या उपासनेचें व्याख्यान करून सांगितलें त्या बुद्धिमानांच्या तोंडून आम्हीं असें ऐकलें आहे. १३.—ज्याअर्थी असें आहे त्याअर्थी संभूति व असंभूति यांच्या उपासनांचा समुच्चय युक्तच आहे. शिवाय त्यांना एकपुरुषार्थत्व असल्यामुळेंहि म्ह० एक पुरुषार्थ हा त्या दोहोंचा धर्म असल्यामुळेंहि समुच्चय युक्त आहे, असें श्रुति सांगते—

संभूतिं च विनाशं च यस्तद्वेदोभयꣳसह ।
विनाशेन मृत्युं तीर्त्वासंभूत्यामृतमश्नुते ॥ १४

अन्वयार्थ—[असंभूतिं च विनाशं च तत् उभयं सह यः वेद—] कारण ब्रह्म व कार्यब्रह्म या दोहोंची उपासना एकाच वेळी जो करितो तो [विनाशेन मृत्युं तीर्त्वा—] कार्यब्रह्माच्या उपासनेनें अनैश्वर्याचें—अधर्म-कामादि दोषजाताचें उल्लंघन करून म्ह० अणिमा, लघिमा इत्यादि ऐश्वर्यास प्राप्त होऊन [असंभूत्या अमृतं अश्नुते—] कारणब्रह्माच्या उपासनेनें प्रकृतिलयरूप मोक्षास प्राप्त होतो. १४. —जो ब्रह्मोपासक व वेदोक्त कर्म करणारा असतो तो अन्तकाल समीप आला असतां आत्म्यापाशींच आत्म्याच्या प्राप्तीच्या द्वाराची याचना करितो—

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥ १५

अन्वयार्थ—[हिरण्मयेन पात्रेण सत्यस्य मुखं अपिहितं—] ज्योतिर्मय—तेजस्वी पात्राच्या योगानें आदित्यमंडलस्थ ब्रह्माचें मुख—द्वार झांकलेलें आहे.

[पूषन् त्वं सत्यधर्माय दृष्टये तत् अपावृणु–] हे पूषन्, सत्यधर्मा जो मी त्या मला तुझ्या सत्य आत्म्याची उपलब्धि व्हावी म्हणून तूं तें उघड. १५.

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन्त्समूह ।
तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि ॥
योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥ १६

अन्वयार्थ––[पूषन्–] हे जगत्पोषक सूर्या, [एकर्षे–] हे एकाकी गमन करणाऱ्या एकर्षे [यम–] हे नियमन करणाऱ्या यमा, [सूर्य–] हे प्राण व रस यांचें शोषण करणाऱ्या सूर्या, [प्राजापत्य–] हे प्रजापतिपुत्रा, [व्यूह रश्मीन् समूह–] तूं आपल्या किरणांना घालीव, एकत्र कर. तूं आपल्या संताप देणाऱ्या ज्योतीचा उपसंहार कर. [ते यत् कल्याणतमं रूपं तजः तत् ते पश्यामि–] तुझें जें अत्यंत सुंदर रूप–तेज तें मी पाहतों. [असौ यः असौ पुरुषः सः अहं अस्मि–] तो जो आदित्यमंडलस्थ पुरुष तोच मी आहें. १६.

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्त ꣳशरीरम् ।
ॐक्रतो स्मर कृत ꣳस्मर क्रतो स्मर कृत ꣳस्मर ॥ १७

अन्वयार्थ––[वायुः अमृतं अनिलं–] आता मज मरणाऱ्या पुरुषाचा शरीरस्थ वायु सर्वात्मक सूत्रात्म्यास प्राप्त होवो. म्हणजे ज्ञान, उपासना व कर्म यांच्यायोगानें संस्कृत झालेलें हें लिंगशरीर स्थूल शरीराला सोडून निघो. [अथ इदं शरीरं भस्मान्तं–] नंतर अग्नींत ज्याचा होम केला आहे, असें हें शरीर भस्म होवो [ॐ क्रतो स्मर–] संकल्पात्मक क्रतो आठव. [कृतं स्मर–] हे क्रतो, मीं जें केलें आहे त्याचें स्मरण कर. माझ्या कृतकर्माचें स्मरण कर. ' क्रतो स्मर कृतं स्मर ' ही द्विरुक्ति आदरार्थ आहे १७–पुनः दुसऱ्या मंत्रानें मार्गाची याचना करितो––

अग्ने नय सुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥ १८

इत्युपनिषद् ॥ इति वाजसनेयसंहितोपनिषत्समाप्ता ॥

ॐ पूर्णमदः० इति शान्तिः ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

अन्वयार्थ—[अग्ने अस्मान् राये सुपथा नय–] हे अग्ने, आम्हांला कर्मफल भोगण्याकरितां सुंदर–देवयान मार्गानें ने. [देव विश्वानि वयुनानि विद्वान्–] हे देवा, तूं सर्व कर्में व उपासना जाणणारा आहेस. [अस्मत्-जुहुराणं एनः युयोधि–] आमच्या वंचनात्मक पापाचा नाश कर. [ते भूयिष्ठां नमउक्तिं विधेम–] आम्ही तुला पुष्कळ नमस्कारोक्ति करतों. या वेळीं नुस्त्या नमस्कारानेंच तुझी परिचर्या करतों. १८.

ईशावास्योपनिषदाचें सिंहावलोकन

वाजसनेयी संहितेचा चाळिसावा अध्याय म्हणजेच ही ईशावास्योपनिषद् आहे. ही संहितेचा एकदेश असल्यामुळें हिला सांहिती उपनिषद् म्हणतात. त्यामुळेंच ही मंत्रात्मक आहे. पण हिच्यामध्यें ब्रह्मविद्या सांगितली असल्यामुळें ती कर्मोपयोगी नाहीं, म्हणूनच आचार्यांनीं या उपनिषदाच्या भाष्यारंभीं 'ईशावास्यादिमंत्रांचा कर्मामध्यें विनियोग केलेला नाहीं. कारण ते मंत्र कर्माचा शेष–कर्माचें अंग न होणाऱ्या आत्म्याचें यथार्थ स्वरूप प्रकाशित करितात,' असें म्हटलें आहे. अर्थात् 'जेवढे मंत्र तेवढे सर्व कर्मोपयोगी' असें जें कर्मठांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं. त्रिविध तापांची शांति होण्यासाठी आरंभीं 'पूर्णमदः पूर्णमिदं०' या मंत्रानें तत्त्वानुस्मरणरूप शांतिपाठ केला आहे. पहिल्या मंत्राच्या पूर्वार्धानें 'हें सर्व जगत् ईश्वरमय पहावें' असा तत्त्वोपदेश केला. तिसऱ्या पादानें ज्याचें ज्ञान परिपक्व झालेलें नाहीं त्याच्यासाठीं 'त्या आत्मवेत्त्यानें पुत्रादि एषणात्रयाचा–कामाचा त्याग करून व आत्मनिष्ठ होऊन आत्म्याचें रक्षण करावें' असें सांगितलें व चवथ्या पादानें संन्यासाचा नियम सांगितला. दुसऱ्या मंत्रांत अनात्मज्ञतेमुळें आत्मग्रहण करण्यास असमर्थ असलेल्या कर्माधिकारी अनात्मज्ञ पुरुषानें 'या लोकीं अग्निहोत्रादि कर्में करीतच शंभर वर्षे जिवंत राहण्याची इच्छा करावी' असें सांगितलें आहे. येथील कर्में म्ह० अग्निहोत्रादि व पंचमहायज्ञादि श्रौत-स्मार्त कर्मेंच आहेत. लौकिक कर्में नव्हेत व तींहि जिवंत राहण्याची इच्छा करणाऱ्या अनात्मज्ञासाठीं आहेत. ज्ञाननिष्ठेच्या अधिकाऱ्यासाठीं नव्हेत. वैदिक धर्माचे हे दोन मार्ग सृष्टीच्या आरंभापासून प्रवृत्त झाले आहेत. याविषयीं अधिक विचार ईशावास्यभाष्यार्थ पृ.८–१० गीता-

भाष्यार्थ ३. ३. पृ. १५५–यांत केला आहे. अनात्मज्ञाचीं अग्निहोत्रादि निष्काम कर्में परंपरेनें आत्मज्ञानोपयोगी होतात, असा वेदान्तसिद्धान्त आहे. सु. ब्र. अ. ३. पाद ४ अ. १. पृ. ३९०-९१ पहा. तिसऱ्या मंत्रांत अनात्मज्ञांना 'आत्मघाती' म्हणून व ते अज्ञानावृत असुर्य–देवादि असुरांच्या–लोकांस जातात असें सांगून त्यांची जी निंदा केली आहे ती विचारी मानवांनी स्वर्गादि लोकांचा अभिलाष सोडून आत्माभिमुख व्हावें ह्मणून आहे.

चवथ्या व पांचव्या मंत्रांत–ज्याच्या ज्ञानानें विद्वान् मुक्त होतात तें आत्मतत्त्व कशाप्रकारचें आहे तें सोपाधिक-निरुपाधिक अवस्थेंत उपपन्न होणाऱ्या परस्परविरुद्ध विशेषणांनीं सांगितलें आहे. सर्व आत्ममय आहे, असा ज्याला साक्षात्कार झाला आहे तो कोणाची निंदास्तुति करण्यास प्रवृत्त होत नाही व त्या एकत्वदर्शी पुरुषाला शोक व मोह होत नाहीं, असें ह्मणून सहाव्या मंत्रांत आत्मज्ञानाचें लक्षण व सातव्यांत आत्मज्ञानाचें फल सांगितलें आहे. आठव्या मंत्रांत आत्म्याचें याथात्म्य वर्णिलें आहे. येथें आत्मज्ञानाचें प्रकरण संपलें. येथून पुढें कर्म व उपासना यांच्या सह अनुष्ठानाचें–समुच्चयाचें विधान करण्याकरितां दुसरें प्रकरण आरंभिलें आहे. ज्ञाननिष्ठा व कर्मनिष्ठा किंवा निवृत्तिमार्ग व प्रवृत्तिमार्ग हे दोनच वेदाचे प्रतिपाद्य अर्थ आहेत. त्यांतील पहिल्या वेदार्थाचा निर्देश या उपनिषदाच्या पहिल्या मंत्रांत व दुसऱ्या वेदार्थाचा निर्देश दुसऱ्या मंत्रांत करून पहिल्या निष्ठेचा विस्तार तिसऱ्या मंत्रापासून आठव्या मंत्राच्या अंतापर्यंत केला आहे. नवव्या मंत्रापासून अकराव्या मंत्राच्या अंतापर्यंत–कर्म व उपासना यांच्या पृथक् अनुष्ठानाची निंदा, त्यांतील प्रत्येकाचें पृथक् अवांतर फल व सहानुष्ठानाचें–'मृत्यूचें उल्लंघन व अमृतप्राप्ति'–हें मुख्य फल सांगून बाराव्या मंत्रापासून चवदाव्या मंत्रापर्यंत अव्याकृत व हिरण्यगर्भसंज्ञक कार्यब्रह्म यांच्या पृथक् उपासनेची निंदा, त्यांतील प्रत्येक उपासनेचें पृथक् फल व सहानुष्ठानाचें पूर्वोक्तच मुख्य फल सांगितलें आहे. प्रकृतीत लीन होणें, हें कर्म व उपासना यांनीं साध्य होणाऱ्या फलांतील शेवटचें फल आहे. तेथवरच संसाराची गति आहे. त्याच्या पुढें सर्वात्मभाव हें ज्ञाननिष्ठेचें परम फल आहे. याप्रमाणें दोन्ही प्रकारचा वेदार्थ या उपनिषदांत प्रकाशित केला आहे.

११ व्या मंत्रांत अपर ब्रह्माची उपासना व गर्भाधानादि-अंत्येष्टीपर्यंत कर्म,

यांचें सह अनुष्ठान करीत जिवंत राहण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाला अमृतत्व-प्राप्ति होते, असें म्हटलें आहे. पण ती फलप्राप्ति कोणत्या मार्गानें होते तें पंधराव्या मंत्रांत सांगितलें आहे. त्या मंत्रांत उपासक अंतकाल समीप आला असतां सत्य आत्म्याच्या उपलब्धीकरितां मार्गाची याचना कशी करितो, तें सांगितलें आहे. अथवा ब्राह्मणांत विनियोग केल्याप्रमाणें त्यानें 'हिरण्मयेन पात्रेण०' या मंत्रानें द्वाराची याचना करावी. सोळा, सतरा व शेवटचा अठरा या मंत्रांतहि मरणोन्मुख पुरुषाच्या याचनेचाच प्रकार सांगितला आहे. अर्थात् ९–१८ मंत्रांत वेदाच्या प्रवृत्तिलक्षण धर्माचें प्रतिपादन केलें आहे. त्यांतील विद्या व अमृत या पदांचा अर्थ क्रमानें परमात्मसाक्षात्कार व मोक्ष असा न करितां उपासना व देवतात्मभाव असाच करणें उचित आहे. आत्मज्ञान व कर्म यांचें सह अनुष्ठान होणें शक्य आहे, असे ज्ञानकर्मसमुच्चयवाद्यांचें म्हणणें आहे आणि आत्मज्ञान झाल्यावर अविद्येच्या अस्तित्वाचा संभवच नसल्यामुळें निष्काम आत्मज्ञाच्या हातून वैदिक चोदनाप्राप्त कर्में घडणें मुळीच शक्य नाही, असें सिद्धान्त्यांचें मत आहे. आतां जीवन्मुक्त विद्वानाचें शरीरहि भिक्षेकरितां फिरणें, अन्न खाणें, स्नान, शिष्यांना वेदान्ताचा पाठ सांगणें इत्यादि कर्में करीत असतें, पण ती खरीं कर्में नसून कर्माभास आहे. वृक्षाच्या इच्छेवांचूनहि वाऱ्याच्या वेगामुळें तो जसा हालत असतो, त्याप्रमाणें प्रारब्धवशात् विद्वानाचें शरीरहि यदृच्छेनें चेष्टा करतें. पण तो विवेकी ती मी करीत आहें, असें समजत नसल्यामुळें तें त्याचें कर्म होत नाही. शिवाय येथील 'विद्या-'शब्दानें परमात्मविद्याच घेतल्यास तिच्या अमृतस्वरूप फलाच्या प्राप्तीकरितां द्वार व उत्तरमार्ग यांची पंधरापासून पुढील चार मंत्रांनी जी याचना केली आहे ती उपपन्न होत नाहीं. कारण परमात्मविद्येचें सर्वात्मभाव हें फल येथेंच, या शरीरांत असतांनाच मिळतें. त्यामुळें विद्वान् पुरुषाचे प्राण उत्क्रमण करून (शरीर सोडून) जात नाहींत, तर ते शरीरांतच ब्रह्माला मिळतात, असें श्रुतीनें सांगितलें आहे.—बृ.ब्र.४.२.६ पृ. ४६२—अकराव्या व चवदाव्या मंत्रांतील 'मृत्यु' व 'अमृत' या शब्दांचा अर्थहि उपासकाच्या उपासनाप्रकाराला अनुसरून क्रमानें 'स्वाभाविक कर्म व ज्ञान' आणि 'देवतात्मभाव' व 'अनैश्वर्य' आणि 'प्रकृतिलय' असाच करणें उचित आहे.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रहांतील ईशावास्योपनिषद् समाप्त झाले.

अथ केनोपनिषद्

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

सह नाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥

अर्थ—[नौ सह अवतु–] परमात्मा शिष्य व आचार्य अशा या आम्हां दोघांचें एकाच वेळी रक्षण करो. [नौ सह भुनक्तु–] आम्हां दोघांकडून एकाच वेळी भोग घेववो. किंवा पालन करो. [वीर्यं सह करवावहै–] आम्ही दोघे विद्यादिनिमित्त सामर्थ्य बरोबर संपादन करूं [नौ अधीतं तेजस्वि अस्तु–] आम्हां तेजस्व्यांचें अध्ययन स्वधीत–तेजस्वि असो म्ह० तें अर्थज्ञानास योग्य असो [मा विद्विषावहै–] आम्ही परस्परांचा द्वेष न करावा.हा आशीर्वाद आहे.

ॐ आप्यायंतु ममांगानि वाक् प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिंद्रियाणि च सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि संतु ते मयि संतु ॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

अर्थ—[मम अंगानि वाक् प्राणः चक्षुः श्रोत्रं–] माझी हस्त-पादादि अंगें तशींच वाक्, प्राण, चक्षु, श्रोत्र [आप्यायन्तु–] पुष्ट होवोत. ब्रह्मविद्येच्या अभ्यासाला समर्थ होवोत. [अथो इंद्रियाणि च सर्वाणि बलं–] सर्व इंद्रियांमध्यें बल येवो. [औपनिषदं सर्वं ब्रह्म–] सर्व उपनिषदांत ज्याचें प्रतिपादन केलें आहे तें हें सर्व ब्रह्मच आहे. [अहं ब्रह्म मा निराकुर्यां–] मी त्या ब्रह्माचें निराकरण न करावें. [ब्रह्म मा मा निराकरोत्–] ब्रह्म माझें निराकरण न करो. मला तें परोक्ष न होवो. [मे अनिराकरणं अस्तु अनिराकरणं अस्तु–] माझें अनिराकरण असो, अनिराकरण असो [उपनिषत्सु ये धर्माः ते तदात्मनि निरते मयि सन्तु मयि सन्तु–] उपनिषदांतील जे धर्म ते त्या आत्म्यामध्यें निरत असलेल्या माझ्या ठायी असोत; माझ्या ठिकाणी असोत. येथील दोन्ही द्विरुक्ती

आदरार्थ आहेत. तिन्ही तापांची शांति होवो. कोणी एक मुमुक्षु शिष्य ब्रह्मनिष्ठ गुरूपाशीं यथाविधि गमन करून, प्रत्यगात्म्याहून आपल्याला कोणाचा आधार नाहीं, असें जाणून, त्या अभय, नित्य, शिव, अचल तत्त्वाची इच्छा करून, त्यास असें विचारूं लागला—

ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः ।
केनेषितां वाचमिमां वदन्ति चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥ १

अर्थ—[केन—] कोणाकडून [इषितं प्रेषितं मनः पतति—] केवल इच्छेनें प्रेरित केलेलें मन आपल्या विषयाकडे जातें, त्याचप्रमाणें [केन युक्तः प्रथमः प्राणः प्रैति—] कोणाकडून प्रेरित झालेला पहिला प्राण आपला व्यापार करितो, (प्राणाची प्रवृत्ति इतर सर्व करणांच्या पूर्वी होते, म्हणून त्याला प्रथम—पहिला असें म्हटलें आहे.) [केन इषितां इमां वाचं वदन्ति—] लोक कोणाच्या इच्छामात्रानें प्रेरित झालेली ही शब्दरूप वाणी बोलतात, [कः उ देवः चक्षुः श्रोत्रं युनक्ति—] आणि कोणता प्रकाशमान देव चक्षु व श्रोत्र यांना त्यांच्या त्यांच्या व्यापारांत नियुक्त करितो ? १.—असा प्रश्न करणाऱ्या योग्य शिष्याला गुरु ह्मणतो—मन आदि इंद्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांकडे प्रेरित करणारा देव कोण आहे व तो कशी प्रेरणा करितो, असें जें तूं विचारीत आहेस, तें ऐक—

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्वाचो ह वाचं स उ प्राणस्य
प्राणश्चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २

अर्थ—[यत् श्रोत्रस्य श्रोत्रं—] जें श्रोत्रेंद्रियाचें श्रोत्र म्ह० आपल्या विषयाला व्यक्त करण्याचें सामर्थ्य, [मनसः मनः—] मनाचें मन, [वाचः ह वाचं—] वागिंद्रियाचें वाक् [सः उ प्राणस्य प्राणः चक्षुषः चक्षुः—] व तो प्रेरक प्राणाचा प्राण व चक्षूचा चक्षु आहे. [धीराः—] बुद्धिमान् लोक अशा त्या सर्वप्रवर्तक आत्म्याला जाणून व [अतिमुच्य—] त्या श्रोत्रादिकांतील आत्मभाव टाकून [अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति—] देह-पुत्रादिकांतील अहंममाभिमान टाकून—एषणाशून्य होऊन किंवा या शरीरांतून निघून जाऊन—मरून अमृत—अमरणधर्मवान् होतात. (इंद्रियादिकांचें आपापल्या विषयाला अभिव्यक्त करण्याचें सामर्थ्य नित्य चैतन्यात्मज्योति असली तरच असतें. आत्मज्योतीच्या अभावीं तें नसतें. त्यामुळें त्याला ' श्रोत्राचें श्रोत्र, मनाचें मन'

इत्यादि म्हणतां येतें.) २.—ज्याअर्थीं ब्रह्म श्रोत्रादिकांचेंहि श्रोत्र—आत्मभूत आहे त्याअर्थीं—

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मनो न विद्मो न
विजानीमो यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि ।
इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्व्याचचक्षिरे ॥ ३

अर्थ—[तत्र—] त्या ब्रह्मामध्यें [चक्षुः न गच्छति—] चक्षुरिंद्रिय जात नाहीं. (कारण स्वरूपामध्यें गमन संभवत नाहीं.) तशीच [वाक् न गच्छति—] वाक् जात नाहीं. (वाणीनें उच्चारलेला शब्द आपल्या अर्थाला जेव्हां प्रकाशित करितो तेव्हां त्याच्याकडे वाक् जाते असें ह्मणतात. पण त्या शब्दाचा व त्याला उत्पन्न करणाऱ्या वाक्-इंद्रियाचा आत्मा ब्रह्म आहे. त्यामुळें ब्रह्मामध्यें वाक् जात नाहीं. अग्नि दाहक व प्रकाशक असूनहि स्वरूपाचाच दाह किंवा प्रकाश करीत नाहीं.) तसेंच [नो मनः—] इतर अनात्म पदार्थांचा संकल्प व निश्चय करणारेंहि मन—अन्तःकरण आत्म्याचा संकल्प किंवा निश्चय करूं शकत नाहीं. कारण ब्रह्म त्याचाहि आत्मा आहे, आणि इंद्रियें व मन यांच्या योगानेंच वस्तूचें विज्ञान होत असल्यामुळें त्यांचा विषय न होणाऱ्या ब्रह्माला [न विद्मः—] तें अशा प्रकारचें आहे, असें आम्ही जाणत नाहीं. [एतत् यथा अनुशिष्यात् तत् न विजानीमः—] त्यामुळें या ब्रह्माचें शिष्याला अनुशासन कसें करावें, शिष्याला त्याचा उपदेश कसा करावा, तें आम्ही जाणत नाहीं. (इंद्रियांचा विषय होणाऱ्या वस्तूचाच जाति, गुण, क्रिया इत्यादि विशेषणांनीं दुसऱ्याला उपदेश करितां येतो. ब्रह्म इंद्रियांचा विषय होत नाहीं व जात्यादि विशेषांनींहि युक्त नाहीं. त्यामुळें नुस्त्या उपदेशानें शिष्याला त्याचा प्रत्यय आणून देणें फार कठिण आहे. ' न विद्मः० ' इत्यादि वाक्य ब्रह्माचा उपदेश व त्याच्या अर्थाचें ग्रहण यांविषयीं अतिशय यत्न केला पाहिजे, असें सांगतें. असो; तें ब्रह्म याप्रमाणें प्रत्यक्षादि प्रमाणांचीं विषय जरी होत नसलें तरी आगमप्रमाणानें शिष्याला त्यांचा प्रत्यय आणून देतां येतो. यास्तव त्याच्या उपदेशासाठीं आगम—[तत् विदितात् अन्यत् एव—] ' श्रोत्रादिकांचें श्रोत्रादि ' म्हणून वर प्रकृत असलेलें व श्रोत्रादिकांचा विषय न होणारें जें ब्रह्म तें विदिताहून अगदीं पृथक्च आहे. ' विद् ' म्ह० जाणणें, त्या विदिक्रियेचें

कर्म होणारें–ज्ञानाचा विषय होणारें जें व्याकृत–व्यक्त अनात्म वस्तुजात तें सर्व विदित होय. त्याहून तें अविषय ब्रह्म अगदीं विलक्षण आहे. [अथो अविदितात् अधि–] तसेंच तें श्रोत्रादिकांचें श्रोत्रादि ब्रह्म अविदिताहून–विदिताहून विपरीत असलेल्या अविद्यारूप अव्याकृताहून–व्याकृताच्या बीजाहून अधि–वर–अन्य आहे. विदित–व्याकृत–व्यक्त व अविदित–अव्याकृत–अव्यक्त म्ह० कार्य व कारण. ब्रह्म या दोहोंहून अगदीं पृथक्–कार्य-कारणशून्य आहे. [ये नः तत् व्याचचक्षिरे–] ज्या आचार्यांनी आम्हांला त्या ब्रह्माचें अगदीं स्पष्टपणें कथन केलें, ब्रह्मोपदेश केला, त्या [पूर्वेषां इति शुश्रुम–] पूर्वाचार्यांचें असें वचन आम्हीं ऐकलें आहे. (सर्वविशेषरहित चैतन्यमात्रज्योति सर्वात्म्याचें ब्रह्मत्व सांगणाऱ्या महावाक्यांचें अर्थज्ञान आचार्योपदेशपरंपरेनेंच संपादन करावें. तर्कानें किंवा प्रवचन, मेधा, बहुश्रुतत्व, तप, यज्ञ इत्यादिकांनीहि तें संपादन करण्याचा वृथा यत्न करूं नये, असें पूर्वाचार्यांचें वचन आम्ही ऐकलें आहे. किंवा ' तें विदिताविदिताहून विलक्षण आहे, ' असें आचार्यांच्या तोंडून आम्हीं ऐकलें आहे.) ३. –' तें विदिताविदिताहून अन्य–विलक्षण आहे, ' या वाक्यानें आत्मा ब्रह्म आहे, असें प्रतिपादन केलें असतां श्रोत्याला ' आत्मा ब्रह्म कसा ' अशी आशंका येते, म्हणून सांगतात—

यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ४

अन्वयार्थ—[यत्–] जें ब्रह्म [वाचा–] इंद्रियरूप व शब्दात्मक वाणीकडून [अनभ्युदितं–] अप्रकाशित–अनुक्त–न बोललें जाणारें [येन वाक् अभ्युद्यते–] ज्या ब्रह्माकडून–चैतन्यज्योतीकडून विवक्षित अर्थीं इंद्रियासह वाक् प्रेरणा केली जाते [तत् एव ब्रह्म त्वं विद्धि–] तेंच आत्मस्वरूप निरतिशय भूमाख्य ब्रह्म आहे असें तूं जाण. [यत् इदं उपासते तत् इदं न–] जें हें उपाधिभेदविशिष्ट अनात्म-ईश्वरादि उपासितात–ज्या उपाधिभेदविशिष्ट अनात्म्याचें ध्यान करितात, तें ब्रह्म नव्हे. ४.

यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ५

अन्वयार्थ—[यत् मनसा न मनुते—] ज्या चैतन्यज्योति ब्रह्माचा कामादि-वृत्तींनीं युक्त असलेल्या मनानें संकल्प—निश्चय करितां येत नाहीं [येन मनः मतं आहुः—] ब्रह्मवेत्ते ज्या अन्तःस्थ चैतन्याकडून मन व्याप्त आहे, असें सांगतात —ज्या ब्रह्मानें मनाला विषय केलें आहे, असें ह्मणतात [तत् एव ब्रह्म त्वं विद्धि—] तेंच ब्रह्म आहे असें तूं जाण. [यत् इदं उपासते तत् इदं न—] ज्या अनात्म्याची लोक उपासना करितात तें ब्रह्म नव्हे. ५.

यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूꣳषि पश्यति ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ६

अन्वयार्थ—[यत् चक्षुषा न पश्यति—] मनुष्य जें चक्षूच्या योगानें पहात नाही—ज्याला चक्षूनें पहात नाही? पण [येन चक्षूंषि पश्यति—] अन्तःकरणवृत्तीनें युक्त अशा ज्याच्या योगानें चक्षूंना—अन्तःकरणाच्या भिन्न भिन्न वृत्तींमुळें भिन्न झालेल्या अनेक चक्षुर्वृत्तींना पहातो, सर्व लोक ज्या चैतन्य-आत्मज्योतीनें चक्षुरिंद्रियाच्या वृत्तीना व्यापतो—त्यांना आपल्या ज्ञानाचा विषय करितो [तत् एव ब्रह्म त्वं विद्धि—] तेंच ब्रह्म आहे, असें तूं जाण [यत् इदं उपासते तत् इदं न—] ज्याची उपासना केली जाते तें नव्हे. ६

यच्छ्रोत्रेण न शृणोति येन श्रोत्रमिदꣳ श्रुतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ७

अन्वयार्थ—[यत् श्रोत्रेण न शृणोति—] लोक ज्या तत्त्वाला दिग्देवते-कडून अधिष्ठित, आकाशाच्या सत्त्वगुणापासून झालेलें कार्य व मनोवृत्तीनें युक्त अशा श्रोत्रेंद्रियानें विषय करीत नाही उलट [येन इदं श्रोत्रं श्रुतं—] ज्या चैतन्य आत्मज्योतीकडून हें श्रोत्र विषय केलें जातें [तत् एव ब्रह्म०] तेंच ब्रह्म आहे असें तूं समज ज्याची उपासना करितात तें ब्रह्म नव्हे. ७

यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्रणीयते ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ८

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

अन्वयार्थ—[यत् प्राणेन न प्राणिति—] लोक ज्या तत्त्वाला पार्थिव, नासिकापुटांत अवस्थित होणाऱ्या, अन्तःकरण व प्राण यांच्या वृत्तीनें युक्त अशा घ्राणेंद्रियानें गंधाप्रमाणें विषय करीत नाही तर उलट [येन प्राणः प्रणी-

यते–] ज्या चैतन्य-आत्मज्योतीकडून प्राण आपल्या विषयाकडे प्रेरणा केला जातो [तदेव ब्रह्म०–] तेंच ब्रह्म आहे, असें तूं जाण. ज्याची उपासना करितात तें ब्रह्म नव्हे. ८. (१)

याप्रमाणें विदिताविदिताहून विलक्षण–हेयोपादेयरहित असा जो तूं आत्मा तेंच ब्रह्म आहे, असें प्रत्ययास आणून दिलेला शिष्य 'मीच ब्रह्म आहें' असें, मी आपल्याला उत्तम प्रकारें जाणतों, असें कदाचित् समजेल, अशी आशंका घेऊन आचार्य शिष्याच्या बुद्धीला विचालन देण्यासाठीं म्हणतो—

यदि मन्यसे सुवेदेति दहरमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपं यदस्य त्वं यदस्य देवेष्वथ नु मीमाꣳस्यमेव ते मन्ये विदितम् ॥ ९ ॥ १

अन्वयार्थ—[यदि–] जर कदाचित् [सुवेद इति मन्यसे–] मी ब्रह्माला चांगल्या प्रकारें जाणतों असें तूं समजत असशील तर [त्वं नूनं ब्रह्मणः दहरं एव-अपि रूपं वेत्थ–] तूं खचित ब्रह्माचें अल्पच रूप जाणतोस [यत् अस्य ब्रह्मणः रूपं त्वं वेत्थ–] जें या शरीरोपाधीनें परिच्छिन्न झालेल्या ब्रह्माचें रूप तूं जाणतोस तेंच तेवढें अल्प आहे असें नाही तर [यत् अस्य देवेषु–] जें या अधिदैवतोपाधीनें परिच्छिन्न झालेल्या ब्रह्माचें रूप तूं देवांमध्यें जाणतोस तेंहि अल्पच आहे. (जें अध्यात्म व जें अधिदैव ब्रह्मरूप तें उपाधिपरिच्छिन्न असल्यामुळें दहरच–अल्पच होय. पण जें सर्व उपाधिशून्य, शांत, अनन्त, एक भूमाख्य नित्य ब्रह्म तें तसें सुवेद नाही, असा याचा भावार्थ.) ज्या अर्थी असें आहे [अथ नु–] त्याअर्थी [ते मीमांस्यं एव मन्ये–] तुला तें ब्रह्म विचार्यच–विचार करण्यास योग्य असेंच आहे, असें मी समजतों. याप्रमाणें आचार्यांकडून सांगितला गेलेला शिष्य एकांतांत शांत मनानें बसला. आचार्यानें सांगितलेल्या आगमाच्या अर्थाचा विचार करून व तर्कतः त्याचा निश्चय करून–त्याचा स्वानुभव घेऊन आचार्याजवळ येऊन म्हणाला–[विदितं मन्ये–] मी आतां ब्रह्माला जाणलें, असें समजतों. ९.१.–कसें तें ऐका—

नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च ।
यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च ॥ १० ॥ २

अन्वयार्थ—[अहं ब्रह्म सुवेद इति न मन्ये—] मी ब्रह्माला घट-पटादि पदार्थांप्रमाणें प्रत्यक्षादि-इंद्रियादि प्रमाणांनी उत्तम प्रकारें जाणतों, असें समजत नाही. तर मग तुला तें कळलेंच नाही, असें आचार्यानें म्हटलें असतां शिष्य म्हणतो [न वेद इति नो—] मी त्याला जाणत नाही, असेंहि नाही तर [वेद च—]जाणतोहि व 'च-'कारामुळें जाणत नाहीहि. पण हें म्हणणें विरुद्ध आहे. जर तूं त्याला जाणत नाहीस तर 'मी जाणतों,' असें म्हणणें विरुद्ध आहे. संशयावांचून किंवा विपरीत भावनेवांचून असें विरुद्ध बोलणें संभवत नाहीं आणि संशय व विपर्यय हे तर सर्व अनर्थांचे बीजभूत दोष आहेत, असें बोलून आचार्यानें त्याच्या बुद्धीला विचलित—डळमळित करण्याचा प्रयत्न केला. पण तो निश्चित ज्ञानामुळें मनांत डळमळला नाही तर उलट—'अन्यदेव तद्विदितादथोऽविदितादधि' असा हा आचार्योक्त आगम—संप्रदाय, उपपत्ति व स्वानुभव यांच्या बलानें गर्जना करून असें बोलला—[नः यः तत् वेद सः तत् वेद—] आह्मां सहाध्यायांतील जो कोणी तें पूर्वोक्त वचन तत्त्वतः जाणतो तोच त्या ब्रह्माला जाणतो. तें पूर्वोक्त वचन कोणतें तेंच शिष्य सांगतो—['नो न वेदेति वेद च'—] मी जाणत नाही, असें नाही तर जाणतों व जाणत नाहींहि. (आचार्यानें 'अन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि' असें जें वस्तुस्वरूप सांगितलें त्यांतच अनुमान व स्वानुभव यांची भर घालून गुरुप्रतीतीशी आपली प्रतीति जुळते, असें व्यक्त करण्यासाठी शिष्य 'नो न वेदेति वेद च' असें दुसऱ्या शब्दांनी सांगत आहे. मंदबुद्धि लोकांना त्याचें ग्रहण करितां येणें शक्य नाहीं, असेंहि त्यानें त्या वाक्यानें सुचविलें आहे.) १०. २.—आतां शिष्य व आचार्य यांच्या संवादापासून निवृत्त होऊन श्रुति स्वतः या सर्व संवादापासून निष्पन्न झालेला अर्थ सांगते—

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।
अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥ ११ ॥ ३

अन्वयार्थ—[यस्य—] ज्या ब्रह्मवेत्त्याचें [अमतं—] अविज्ञात—अविदित ब्रह्म आहे, असें मत—असा अभिप्राय—निश्चय असतो [तस्य मतं—] त्याला ब्रह्म चांगल्या प्रकारें ज्ञात झालेलें असतें. पण [यस्य मतं—] ज्याला तें मत असतें म्ह० ब्रह्म मला विदित—ज्ञात झालें आहे, असा ज्याचा निश्चय असतो

[सः न वेद–] तो ब्रह्माला जाणत नाहीच. श्रुति आतां विद्वान् व अविद्वान् यांच्या या दोन पक्षांचें अवधारण–निश्चय करिते [विजानतां अविज्ञातं–] सम्यक् ज्ञानवानांना ब्रह्म अविदित–अज्ञात–अमतच असतें व [अविजानतां विज्ञातं–] असम्यक् ज्ञानवानांना ह्म० इंद्रियें, मन, बुद्धि यांमध्यें आत्मदृष्टि ठेवणारांना ब्रह्म विदित असतें. ज्यांची बुद्धि अगदीच अव्युत्पन्न–असंस्कृत असते त्यांना ब्रह्म विदितहि नसतें. आम्ही ब्रह्माला जाणलें आहे, असेंहि त्यांना वाटत नाही. पण इंद्रियें, मन, बुद्धि या उपाधीमध्यें आत्मदृष्टि ठेवणारांना ब्रह्म व उपाधि यांचा विवेक होत नसल्यामुळें आणि बुद्ध्यादि उपाधि विज्ञात असल्यामुळें ब्रह्मच विदित आहे, अशी भ्रांति होऊं शकते. यास्तव विपरीत ब्रह्मज्ञांना ब्रह्म विदित असतें. किंवा या मंत्राचा सर्व उत्तरार्ध हेत्वर्थी आहे. ' ज्याअर्थी ब्रह्म विद्वानाना अविज्ञात व अविद्वानांना विज्ञात आहे त्याअर्थी ज्याला तें अमत असतें त्यालाच मत–विज्ञात असतें व ज्याला मत–ज्ञात असतें तो त्याला जाणत नाही, ' असा त्याचा भावार्थ ११.३.–ज्ञानी पुरुषाना ब्रह्म अविज्ञात आहे, असा निश्चय केला. पण ब्रह्म जर अत्यंत अविज्ञातच असेल तर सामान्य लोक व ब्रह्मज्ञ यांमध्यें कांहींच विशेष राहिला नाही. शिवाय ' ज्ञान्याना अविज्ञात ' हें म्हणणें परस्पर विरोधी आहे. तेव्हां तें ब्रह्म सम्यग्ज्ञात कसें बरें होईल, असें कोणी विचारील म्हणून श्रुति सांगते—

प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विन्दते ।
आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥ १२ ॥ ४

अन्वयार्थ—[प्रतिबोधविदितं–] प्रत्येक बोधाबरोबर विदित झालेलें, येथें ' बोध-'शब्दानें बुद्धीचे प्रत्यय सांगितले जातात. बुद्धीचे सर्व प्रत्यय ज्याचे विषय होतात तो आत्मा त्या सर्व बोधांच्या द्वारा जाणला जातो. सर्वप्रत्ययदर्शी केवल चिच्छक्तिस्वरूप आत्मा त्या प्रत्ययांच्या योगानेंच लक्षित होतो. आत्म्याच्या विज्ञानाचें दुसरें द्वार नाही. यास्तव सर्व प्रत्ययांच्या प्रत्यक्स्वरूपानें जेव्हां ब्रह्म विदित होतें तेव्हां तें [मतं–] मत होतें. तेव्हां तें सम्यग्दर्शन होय. [हि अमृतत्वं विन्दते–] ज्याअर्थी प्रतिबोधविदितरूप ब्रह्मापासून अमृतत्व–अमरणभाव–स्वात्म्यामध्ये अवस्थानरूप मोक्ष प्राप्त होतो, त्याअर्थी प्रति-

बोधविदितच मत—सम्यग्ज्ञान होय. पण असल्या आत्मविद्येनें अमृतत्व कसें प्राप्त होतें ? उत्तर—[आत्मना वीर्यं विन्दते—] स्वरूपानें वीर्य—बल—सामर्थ्य प्राप्त होतें. धन, साह्यकर्ते, मंत्र, औषधि, तप, योग यांच्या योगानें प्राप्त होणारें वीर्य मृत्यूचा पराभव करूं शकत नाहीं. कारण तें वीर्य अनात्मवस्तूपासून प्राप्त झालेलें असतें. पण आत्मविद्येपासून प्राप्त झालेलें बल आत्म्याच्या योगानेंच प्राप्त होतें. आत्मविद्याकृत वीर्य दुसऱ्या कोणत्याहि साधनानें साध्य होत नाही. तेंच वीर्य मृत्यूचा पराभव करूं शकतें; आणि ज्याअर्थी अशाप्रकारें आत्मविद्याकृत वीर्य आत्म्यानेंच प्राप्त होतें त्याअर्थी [विद्यया अमृतं विंदते—] आत्मविषयक विद्येनें अमृत प्राप्त होतें. १२.४.—जन्म-मरण-सुख-दुःखप्राप्तिरूप संसारगति अतिशय कष्टकर आहे. यास्तव—

इह चेदवेदीदथ सत्यमस्ति न चेदिहावेदीन्महती विनष्टिः ।
भूतेषु भूतेषु विचित्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता
भवन्ति ॥ १३ ॥ ५ ॥

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

अन्वयार्थ—[इह—] या लोकी अधिकारी—समर्थ मनुष्य होऊन त्यानें [चेत् अवेदीत्—] जर पूर्वोक्त प्रकारें उक्तलक्षण आत्म्याला जाणलें [अथ सत्यं अस्ति—] तरच त्या मनुष्यजन्मांत सत्य आहे. तरच त्या जन्माचा उपयोग. तरच त्यांत कांही परमार्थता आहे. [इह न अवेदीत् चेत्—] पण त्यानें जिवंत असतांनाच येथें जर आत्म्याला न जाणलें [महती विनष्टिः—] तर फारच मोठा नाश होतो म्ह० जन्म-जरा-मरणादिपरंपरेचा अविच्छेद होणें, ती परंपरा न तुटणें, या स्वरूपाची दीर्घ संसारगति प्राप्त होते. यास्तव असे हे गुणदोष जाणणारे [धीराः—] बुद्धिमान् ब्राह्मण [भूतेषु भूतेषु—] सर्व चराचर भूतांमध्यें [विचित्य—] एका आत्मतत्त्वाला—ब्रह्माला जाणून—त्याचा साक्षात् अनुभव घेऊन [अस्मात् लोकात् प्रेत्य—] अहं-ममाभिमानरूप अविद्यालक्षण अशा या लोकापासून निवृत्त होऊन [अमृताः भवन्ति—] सर्वात्मैकत्वभावास प्राप्त होत्साते अमृत होतात—ब्रह्मच होतात. १३.५. (२)

'ज्ञानी पुरुषांना तें ब्रह्म अविज्ञात आहे व अज्ञांना विज्ञात आहे' हें ऐकून जें असतें तें प्रमाणांनीं अवगत होतें व जें नसतें तें म्ह० जें सशाच्या शिंगासारखें अत्यंत असत् असतें तें अविज्ञात असतें, यास्तव ब्रह्महि अविज्ञात असल्यामुळें असत्च आहे, असा मतिमंदांना व्यामोह होऊं नये, म्हणून येथें ही आख्यायिका आरंभिली जाते—

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥ १४ ॥ १

अन्वयार्थ—[ब्रह्म ह देवेभ्यः विजिग्ये—] पूर्वोक्तलक्षण परब्रह्म खरोखर देवांसाठी जय मिळवितें झालें. देवासुरांच्या संग्रामात जगाचे शत्रु व ईश्वरानें घालून दिलेल्या मर्यादेचें उल्लंघन करणारे जे असुर त्यांना जिंकून ब्रह्मानें जगाच्या स्थैर्यासाठी देवांना विजय व त्याचें फल दिलें [तस्य ह ब्रह्मणः विजये—] त्या ब्रह्माच्या विजयामुळें—त्याचा विजय झाला असतां [देवाः अमहीयन्त—] अग्न्यादि देव मोठ्या महत्त्वास प्राप्त झाले व त्यांच्या प्रत्यगात्मरूपानें स्थित असलेल्या, सर्वज्ञ, प्राण्यांना सर्व क्रियाचें फल देणाऱ्या, सर्वशक्तिमान्, जगाच्या स्थितीची इच्छा करणाऱ्या ईश्वराचाच हा जय व महिमा आहे असें न जाणणारे [ते—] ते देव [अस्माकं एव अयं विजयः अस्माकं एव अयं महिमा इति ऐक्षन्त—] आमचाच हा विजय आहे, आमचाच हा महिमा आहे, असें समजले. अग्न्यादिस्वरूपानें परिच्छिन्न झालेल्या आत्म्याचाच हा अग्नि-वायु-इंद्रत्वादिरूप महिमा आहे, आमच्या प्रत्यगात्मभूत ईश्वराचा नव्हे, असें त्यांनी मिथ्या आलोचन केलें. १४.१.—तेव्हां—

तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव ।
तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥ १५ ॥ २

अन्वयार्थ—[तत् ह एषां विजज्ञौ—] तें त्यांचें मिथ्या ईक्षण—खोटी कल्पना—ब्रह्मानें जाणली. सर्व भूतांच्या इंद्रियांचें प्रेरक असल्यामुळें तें सर्वज्ञ आहे. त्यामुळें देवांचें तें मिथ्या ज्ञान जाणून असुरांप्रमाणें या देवांचाहि मिथ्या ज्ञानामुळें पराभव न व्हावा म्हणून अनुकंपेनें त्यांचा मिथ्या अभिमान घालवून यांवर अनुग्रह करण्यासाठी [तेभ्यः ह प्रादुर्बभूव—] त्या देवांपुढें तें प्रादुर्भूत झालें. आपल्या योगमाहात्म्यानें उत्पन्न केलेल्या अद्भुत रूपानें तें देवांच्या

दृष्टिगोचर झालें. [तत् किं इदं यक्षं इति न व्यजानत–] पण त्या प्रकट झालेल्या ब्रह्माला, हें पूज्य महद्भूत काय आहे तें, देवांनीं जाणलें नाहीं .१५.२.

तेऽग्निमब्रुवन् जातवेद एतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति ॥१६॥३

अन्वयार्थ—[ते–] त्या पूज्य महद्भूताला न जाणणारे ते देव तें काय आहे, हें जाणण्याची इच्छा करणारे होत्साते [अग्निं–] सर्वज्ञसदृश असलेल्या अग्रगामी जातवेदाला–अग्निदेवाला [अब्रुवन्–] बोलले–म्हणाले. [जातवेदः एतत् विजानीहि–] हे अग्ने, आम्हांला प्रत्यक्ष दिसणारें हें यक्ष काय आहे तें तूं जाण. तूं आम्हांमध्यें अतिशय तेजस्वी आहेस. यास्तव [किं एतत् यक्षं इति–] हें पूज्य भूत कोण आहे, तें विशेषतः जाण. तेव्हां [तथा इति–] ठीक आहे, असें अग्नि बोलला. १६.३.

तदभ्यद्रवत्तमभ्यवदत् कोऽसीत्यग्निर्वा अहमस्मी-
त्यब्रवीज्जातवेदा वा अहमस्मीति ॥ १७ ॥ ४

अन्वयार्थ—[तत अभ्यद्रवत्–] अग्नि त्या यक्षाजवळ वेगानें गेला. [तं अभ्यवदत्–] पण विचारण्यासाठीं आपल्यापाशी येऊन घाबरून गेलेल्या–भांबावलेल्या त्या अग्नीला तें यक्षच म्हणालें [कः असि इति–] तूं कोण आहेस ? ब्रह्माकडून असें विचारला गेलेला अग्नि म्हणाला–[अग्निः वै अहं अस्मि इति जातवेदाः वै अहं अस्मि इति अब्रवीत्–] मी प्रसिद्ध अग्नि आहें, मी सुप्रसिद्ध जातवेदा आहें, अशी आपली दोन नांवें सांगून श्लाघा करीतच तो असें बोलला. १७.४.–याप्रमाणें श्लाघापूर्वक बोलणाऱ्या त्याला ब्रह्म म्हणालें—

तस्मिꣳस्त्वयि किं वीर्यमित्यपीदꣳ सर्वं दहेयम् ।
यदिदं पृथिव्यामिति ॥ १८ ॥ ५

अन्वयार्थ—[तस्मिन् त्वयि–] अशा प्रसिद्ध गुण-नांवांनी युक्त असलेल्या तुजमध्यें [किं वीर्यं इति–] काय सामर्थ्य आहे ? असें विचारला गेलेला तो अग्नि म्हणाला–[यत् इदं पृथिव्यां तत् इदं सर्वं अपि दहेयं इति–] जें हें स्थावरादि पदार्थजात या पृथ्वीवर आहे तें सर्वहि मी जाळून भस्म करीन. येथील ' पृथिव्यां ' हा शब्द सर्व जगाच्या उपलक्षणार्थ आहे. कारण अग्नि अन्तरिक्षादिकांतील पदार्थांनाहि जाळतो, हें प्रसिद्ध आहे. असो; असें तो अग्नि बोलला. १८.५.–तेव्हां––

तस्मै तृणं निदधावेतद्दहेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ १९ ॥ ६

अन्वयार्थ—[तस्मै–] अशा अभिमानानें युक्त असलेल्या त्या अग्नीसाठीं त्या ब्रह्मानें [तृणं निदधौ–] त्याच्या पुढें तृण–गवत ठेवलें व [एतत् दह इति–] याला जाळ असें तें बोललें. या एका कस्पटाला माझ्या समोर जाळ व त्याला जाळण्यास जर समर्थ नसशील तर 'सर्व पदार्थांना मी जाळीन' हा अभिमान सोड, असें बोलला गेलेला तो अग्नि [तत् सर्वजवेन उपप्रेयाय–] त्या तृणाजवळ सर्व वेगानें गेला. पण त्याला जाळण्याविषयीच्या सर्व उत्साहानें जाऊनहि [तत् दग्धुं न शशाक–] त्याला जाळूं शकला नाही. तेव्हां [सः ततः एव निववृते–] तो अग्नि तृणालाहि जाळण्यास असमर्थ झाल्यामुळें लज्जित होऊन त्या यक्षापासून मुकाट्यानें देवांकडे परत आला व म्हणाला [यत् एतत् यक्षं इति एतत् विज्ञातुं न अशकं–] हें यक्ष कोण आहे तें मी विशेषतः जाणूं शकलों नाही. १९. ६.

अथ वायुमब्रुवन् वायवेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति तथेति ॥२०॥७ तदभ्यद्रवत्तमभ्यवदत्कोऽसीति वायुर्वा अहमस्मीत्यब्रवीन्मातरिश्वा वा अहमस्मीति ॥ २१ ॥ ८ ॥ तस्मिꣳस्त्वयि किं वीर्यमित्यपीदं सर्वमाददीयं यदिदं पृथिव्यामिति ॥ २२ ॥ ९ ॥ तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाकादातुं स तत एव निववृते नैतदशकं विज्ञातुं यदेतद्यक्षमिति ॥ २३ ॥ १०

अन्वयार्थ—त्यानंतर देव वायूस ह्मणाले, 'हे वायो, तूं हें यक्ष कोण आहे, तें जाण' तेव्हां बरें आहे ७, असें ह्मणन तोहि त्वरेनें त्या यक्षाजवळ गेला. तो समीप आला आहे, असें पाहून ब्रह्म त्याला 'तूं कोण आहेस' असा प्रश्न करूं लागलें. तेव्हां 'मी वायु किंवा मातरिश्वा या नांवाचा प्रख्यात देव आहें' असें त्यानें उत्तर दिलें ८. (गमन अथवा सूचन या अर्थीं असलेल्या 'वा-' धातूपासून झालेल्या वायुशब्दांत गति अथवा गंधन–सूचन करणारा, हा अर्थ आहे. अंतरिक्षांत पसरणें या धर्मामुळें त्याला मातरिश्वा हें नांव प्राप्त झालें आहे. असो:) 'अशा तुज प्रसिद्ध देवामध्यें कोणतें सामर्थ्य आहे,' असा प्रश्न ब्रह्मानें

केला असतां 'या सृष्टीत असलेल्या या सर्व पदार्थांचें मी ग्रहण करतों. त्यांना आपल्या बरोबर नेतों' असें तो म्हणाला ९ तेव्हां तें त्याचें उत्तर ऐकून व त्याच्यापुढें गवताची काडी ठेवून 'हें एवढें उडवून ने बघूं' असें ब्रह्म म्हणालें. अग्नीप्रमाणेंच वायुहि सर्व सामर्थ्याचा उपयोग करूनसुद्धा त्याला हालवूं शकला नाहीं. त्यामुळें तो अतिशय लज्जित होऊन देवांकडे परत आला व 'तें यक्ष कोण आहे हें मला कळलें नाहीं' असें सांगूं लागला. १०.२०-२३.

अथेंद्रमब्रुवन्मघवन्नेतद्विजानीहि किमेतद्यक्षमिति
तथेति तदभ्यद्रवत्तस्मात्तिरोदधे ॥ २४ ॥ ११

अन्वयार्थ—[अथ—] त्यानंतर ते देव [इंद्रं अब्रुवन्—] इंद्राला म्हणाले [मघवन् किं एतत् यक्षं इति एतत् विजानीहि—] हे बलवाना देवेंद्रा, हें यक्ष काय आहे तें तूं विशेषतः जाण. तेव्हा [तथा इति तत् अभ्यद्रवत्—] ठीक आहे, असें बोलून इंद्र मोठ्या वेगानें त्याच्याजवळ गेला. पण [तस्मात् तिरोदधे—] तें ब्रह्म आपल्या समीप आलेल्या इंद्रापासून गुप्त झालें. इंद्राचा इंद्रत्वाभिमान सर्वथा घालविणें अत्यंत उचित आहे असें जाणून त्यानें त्याच्याशी तुस्तें भाषणहि केलें नाहीं. २४.११.

स तस्मिन्नेवाकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमां
हैमवतीं ताꣳ होवाच किमेतद्यक्षमिति ॥ २५ ॥ १२
॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

अन्वयार्थ—तें यक्ष ज्या आकाशप्रदेशांत स्वतःला व्यक्त करून गुप्त झालें व त्याच्या अन्तर्धानकाली इंद्र ज्या आकाशप्रदेशांत होता [तस्मिन् एव आकाशे सः—] त्याच आकाशप्रदेशात तो इंद्र 'हें यक्ष महद्भूत काय आहे,' असें चिंतन करीत राहिला. अग्नि व वायु यांप्रमाणें तो देवांकडे परत आला नाहीं. तेव्हां त्या इंद्राची यक्षाविषयी भक्ति जाणून उमारूपिणी विद्या स्त्रीचा आकार धारण करून प्रादुर्भूत झाली. इंद्र [स्त्रियं उमां हैमवतीं बहुशोभमानां आजगाम—] त्या स्त्री-उमेपाशी आला. ती सोन्याच्या आभरणांनी युक्त असल्यामुळें अतिशय शोभणारी होती. कारण विद्या सर्व सुशोभित पदार्थांमध्यें अतिशय शोभणारी आहे. किंवा हैमवती उमा म्ह० हिमालयाची कन्या पार्वती. ती नित्य

सर्वज्ञ ईश्वराबरोबर राहते. त्यामुळें ती या यक्षाला जाणूं शकेल, असें समजून इंद्र तिच्या जवळ आला आणि [किं एतत् यक्षं इति तां ह उवाच–] हें प्रकट होऊन गुप्त झालेलें यक्ष कोण आहे, तें सांग असें तिला म्हणाला. २५.१२(३.)

सा ब्रह्मेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये मही-
यध्वमिति ततो हैव विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २६ ॥ १

अन्वयार्थ— [सा ब्रह्म इति ह उवाच–] ती उमा तें ब्रह्म आहे, असें बोलली [ब्रह्मणः वै विजये एतत् महीयध्वं इति–] ब्रह्माच्याच विजयामुळें तुम्हांला हा महिमा प्राप्त झाला आहे. त्या ईश्वरानें असुरांना जिंकलें. तुम्ही त्या विजयांत केवल निमित्तमात्र आहां. त्याच्याच विजयानें तुम्ही या माहात्म्यास प्राप्त झालां आहां. ' आमचाच हा विजय आहे व आमचाच हा महिमा आहे ' हा तुमचा मिथ्या अभिमान आहे. [ततः ह एव–] त्या उमावाक्यावरूनच इंद्र [ब्रह्म इति विदांचकार–] ब्रह्म असें जाणता झाला. ' ततो हैव' असें अवधारण केलेलें असल्यामुळें इंद्राला उमावाक्यानें ब्रह्मज्ञान झालें, स्वातंत्र्यानें नाही, असा भावार्थ. २६.१.–ज्याअर्थी अग्नि, वायु व इंद्र हे देव संवाद, दर्शन इत्यादिकाच्या योगानें ब्रह्माच्या समीप गेले—

तस्माद्वा एते देवा अतितरामिवान्यान्देवान् यदग्निर्वायुरिन्द्रस्ते ह्येन-
न्नेदिष्ठं पस्पृशुस्ते ह्येनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २७ ॥ २

अन्वयार्थ—[तस्मात् वै एते देवाः अन्यान् देवान् अतितरां इव–] त्याअर्थी हे देव अन्य देवाहून शक्ति-गुणादि महाभाग्यांनीं अधिक आहेत. त्यांहून अत्यंत महत्त्ववान् आहेत. [यत् अग्निः वायुः इंद्रः ते हि एनत् नेदिष्ठं पस्पृशुः–] कारण अग्नि, वायु व इंद्र हे देव या अतिशय समीप असलेल्या–अतिशय प्रिय ब्रह्माला स्पर्श करिते झाले. वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्माशी संवाद करणें वगैरे प्रकारांनी त्याच्याशी संबद्ध झाले. [हि ते प्रथमः एनत् ब्रह्म इति विदांचकार–] तसेच ते प्रधान–मुख्य होऊन याला ब्रह्म असें जाणते झाले, त्यामुळें ते इतर देवांहून अधिक आहेत. २७.२.–ज्याअर्थी अग्नि व वायु यांनीहि इंद्राच्या सांगण्यावरून ब्रह्माला जाणलें व इंद्रानें उमेच्या सांगण्यावरून प्रथम ब्रह्माला जाणलें—

तस्माद्वा इन्द्रोऽतितरामिवान्यान् देवान् स ह्येनन्नेदिष्ठं पस्पर्श स ह्येनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २८ ॥ ३

अन्वयार्थ—[तस्मात् वै इंद्रः अन्यान् देवान् अतितरां इव—] त्याअर्थी इंद्र इतर देवांहून अत्यंत अधिक ऐश्वर्यवान् आहे. [हि सः एनत् नेदिष्ठं पस्पर्श—] कारण तो ब्रह्माला अत्यंत समीप जाऊन स्पर्श करिता झाला व [सः हि प्रथमः एनत् ब्रह्म इति विदांचकार—] तो त्याला प्रधान होऊन 'ब्रह्म' असें जाणता झाला, किंवा त्यानें त्याला सर्व देवांच्या पूर्वी जाणलें. २८.३ आतां—

तस्यैष आदेशो यदेतद्विद्युतो व्यद्युतदा ३ इती-न्न्यमीमिषदा ३ इत्यधिदैवतम् ॥ २९ ॥ ४

अन्वयार्थ—[तस्य—] त्या प्रकृत ब्रह्माचा [एषः आदेशः—] हा असा आदेश—उपमेचा उपदेश आहे. निरुपम ब्रह्माचाहि ज्या उपमेनें उपदेश केला जातो तो हा आदेश आहे. [यत् एतत् विद्युतः व्यद्युतत् आ—] जें हें व्यवहारांत प्रसिद्ध असलेलें विद्युत्चे विद्योतन—प्रकाशन त्यासारखें ब्रह्म देवांना एकदाच दर्शन देऊन गुप्त झालें. किंवा 'विद्युतः' याच्यापुढें 'तेजः' या पदाचा अध्याहार करावा. जणुंकाय विजेच्या चमकण्यासारखें ब्रह्म एकदा चमकून गुप्त झालें. [इति—] असा त्याचा उपदेश आहे. [इत्—] हा शब्द समुच्चय या अर्थी आहे. हा त्याचा दुसरा आदेश आहे. तो कोणता ? [न्यमीमिषत् आ—] व जसा चक्षु निमेष करितो तसें तें व्यक्त होऊन गुप्त झालें. चक्षुरिंद्रिय विषय पहात असतांनाच एकदम डोळे मिटल्यास जसा तो विषय गुप्त होतो, तसें तें दिसून गुप्त झालें. [इति अधिदैवतं—] असें हें अधिदैवत—देवांतील ब्रह्माचें उपमानदर्शन आहे. २९. ४.

अथाध्यात्मं यदेतद्गच्छतीव च मनोऽनेन चैतदुपस्मरत्यभीक्ष्णं सङ्कल्पः ॥ ३० ॥ ५

अन्वयार्थ—[अथ अध्यात्मं—] आता त्यानंतर अध्यात्म म्ह० प्रत्यगात्मविषय आदेश—उपासनेचा उपदेश सांगितला जातो. [मनः यत् एतत् गच्छति इव च—] मन या ब्रह्माला जणुंकाय विषय करतें, [अनेन च एतत् उपस्मरति—] साधक जसा या मनानें ब्रह्माचें समीपतः स्मरण करितो [अभीक्ष्णं संकल्पः—] मनाचा ब्रह्मविषयक अत्यंत संकल्प होतो. ब्रह्म मन-उपाधिक असल्यामुळें

मनाच्या संकल्प-स्मृत्यादिप्रत्ययांनीं अभिव्यक्त होतें. यास्तव हा ब्रह्माचा अध्यात्म आदेश आहे. अधिदैवत आदेश विजेच्या निमेषणाप्रमाणें सत्वर प्रकाशनधर्मी आहे व अध्यात्म आदेश मनःप्रत्ययाच्या वेळीच अभिव्यक्त होणें, या धर्मानें युक्त आहे. अशाप्रकारें सांगितलें जाणारें ब्रह्मच मंदबुद्धीचा विषय होतें, म्हणून हा ब्रह्माचा उपदेश आहे. निरुपाधिक ब्रह्माचें मंदबुद्धि पुरुषांना आकलन करितां येत नाहीं. ३०. ५.—

तद्ध तद्वनं नाम तद्वनमित्युपासितव्यं स य एतदेवं
वेदाऽभि हैनं सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति ॥ ३१ ॥ ६

अन्वयार्थ—[तत्—] तें ब्रह्म [ह—] खरोखर [तद्वनं नाम—] त्याचें वन म्हं० त्या प्राणिजातांचें प्रत्यगात्मभूत असल्यामुळें वननीय—संभजनीय—सम्यक भजन करण्यास योग्य आहे. यास्तव [तद्वनं इति उपासितव्यं—] 'तद्वन' म्हणून प्रसिद्ध असलेलें ब्रह्म 'तद्वनं' अशा याच गुणाभिधानानें—गौण नामानें उपासना करण्यास—चिंतन करण्यास योग्य आहे. 'तद्वन' या नांवानें उपासना करणाराला कोणतें फल मिळतें तें श्रुति सांगते—[सः यः] जो कोणी [एतत् एवं वेद—] या पूर्वोक्त ब्रह्माची पूर्वोक्त गुणांनी युक्त अशी उपासना करितो [ह एनं उपासकं सर्वाणि भूतानि अभिसंवांछन्ति—] त्या उपासकाला सर्व भूतें सर्वप्रकारें इच्छितात. तीं ब्रह्माची जशी अत्यंत इच्छा करितात तशीच त्या उपासकाची इच्छा करितात. ३१. ६.—याप्रमाणें उपदेश केला गेलेला शिष्य आचार्यास म्हणाला—

उपनिषदं भो ब्रूहीत्युक्ता त उपनिषद्ब्राह्मीं
वाव त उपनिषदमब्रूमेति ॥ ३२ ॥ ७

अन्वयार्थ—[भो—] भगवन् [उपनिषदं ब्रूहि—] चिंतन करण्यास योग्य असें रहस्य सांग. शिष्यानें असें म्हटलें असतां आचार्य त्याला म्हणतो—[ते उपनिषद् उक्ता—] तुला उपनिषद् सांगितली. कोणती ती ? [ब्राह्मी—] ब्राह्मी —ब्रह्माची—परमात्म्याची उपनिषद् सांगितली. मागें सांगितलेलें विज्ञान परमात्म्या-विषयींचेंच असल्यामुळें [ते उपनिषदं वाव अब्रूम इति—] तुला आम्ही तें चिंतनीय रहस्यच सांगितलें आहे, असें आचार्य बोलला. (मोक्षोपयोगी ब्रह्म-ज्ञान काय तें हें एवढेंच. याच्या पलीकडे कांही उरलें नाहीं; आणि तें ज्ञान

कर्मादि दुसऱ्या कोणत्या सहकारी साधनाची अपेक्षाहि करीत नाहीं, हा सिद्धान्त या प्रश्नोत्तरांनीं दृढ केला आहे.) ३२.७.—ही जी ब्रह्मविद्या तुला सांगितली—

तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा
वेदाः सर्वाङ्गानि सत्यमायतनम् ॥ ३३ ॥ ८

अन्वयार्थ—[तस्यै—] त्या उक्त उपनिषदाच्या—विद्येच्या प्राप्तीचे उपाय [तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा—] शरीरेंद्रिय-मनांचें समाधान हें तप, उपशम हा दम, अग्निहोत्रादि कर्मे व अमानित्वादि दुसरींहि सर्व ज्ञानोत्पत्तीची साधनें, ही प्रतिष्ठा—विद्येचे पाय आहेत. कारण या तपादिकांच्या योगानें सुसंस्कृत झालेल्या पुरुषाला चित्तशुद्धीच्या द्वारा तत्त्वज्ञान होतें. पुरुष पायांनीं जसा प्रवृत्त होतो तशी ब्रह्मविद्या तपादि साधनांच्या योगानें प्रवृत्त होते. [वेदाः सर्वांगाणि—] चार वेद व सहा अंगें ही सुद्धां प्रतिष्ठा किंवा चार वेद हींच त्या विद्येचीं इतर अंगें आहेत. [सत्यं आयतनं—] सत्य हें ब्रह्मविद्येचें आयतन—निवासस्थान—आधार आहे. (कारण विद्या सत्यनिष्ठ पुरुषांमध्येंच राहते. मायावी व आसुरप्रकृतीच्या लोकांमध्यें राहत नाही. 'प्रतिष्ठा' या रूपानें तपादिकांमध्येंच सत्याचा अन्तर्भाव होत असताहि सत्याचें पुनः आयतनत्वानें ग्रहण करून तें सर्वांत श्रेष्ठ साधन आहे, असें सुचविलें आहे.) ३३.८.

यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनन्ते स्वर्गे
लोके ज्येये प्रतिष्ठति प्रतितिष्ठति ॥ ३४ ॥ ९

॥ इति चतुर्थ खण्डः ॥ ४

इति सामवेदीयतलवकारोपनिषत्समाप्ता ॥

अन्वयार्थ—[यः वै—] जो कोणी जिज्ञासु [एतां एवं वेद—] ' केनेषितं० ' इत्यादि ग्रंथानें सांगितलेल्या व ' ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये० ' या ग्रंथानें स्तविलेल्या श्रेष्ठ विद्येला जाणतो तो [पाप्मानं अपहत्य—] अविद्या-काम-कर्मरूप संसारबीजाचा नाश करून [अनन्ते ज्येये स्वर्गे लोके प्रतितिष्ठति—] अन्तरहित श्रेष्ठ सुखात्मक ब्रह्मामध्यें प्रतिष्ठित होतो. (' अमृतत्वं हि विदन्ते ' असें ब्रह्मविद्याफल जरी पूर्वी सांगितलें आहे तरी शेवटीं त्याचेंच पुनः निगमन केलें आहे, त्याचाच उपसंहार केला आहे. येथील स्वर्ग म्ह० प्रसिद्ध कर्मप्राप्य स्वर्ग नव्हे.

कारण त्याला 'अनन्ते' असें विशेषण दिलें आहे. हा 'अनन्त-'शब्द औपचारिक असेल असेंहि म्हणतां येत नाही. कारण 'ज्येये' म्ह० सर्वांहून अतिशय महान्, असें आणखीं विशेषण आहे. त्यामुळें ज्ञानी मुख्य आत्म्यांतच प्रतिष्ठित होतो. पुनः संसारांत पडत नाही.)९. ३४. (४).

केनोपनिषदाचें सिंहावलोकन

'केनेषितं०' इत्यादि, हें सामवेदाच्या तलवकारशाखेचें ब्राह्मणोपनिषद् आहे. त्याच्या आरंभीं कोणी एक शिष्य विरक्त ब्रह्मनिष्ठ गुरूपार्शी यथाशास्त्र जाऊन आत्मजिज्ञासेनें गुरूला 'जड मन, श्रोत्रादि इंद्रियें, प्राण यांना केवल इच्छामात्रानें आपापल्या विषयात प्रेरणा करणारा चेतन कोण आहे' असें विचारूं लागला, तेव्हां आचार्यानें श्रोत्रादि इंद्रियांमध्यें शब्दादि-विषयग्रहणाचें जें सामर्थ्य आहे तें ज्याच्यामध्यें नित्य स्थित आहे तो चैतन्यात्माच त्या सर्वांचा प्रेरक आहे; विवेकी लोक त्याला जाणून, शरीरेंद्रियांवरील आत्मभाव सोडून, सर्व एषणा त्याग करून मरणोत्तर अमृत होतात—मुक्त होतात. हें आत्मज्ञानाचें फल आहे. आत्मा—ब्रह्म कोणत्याहि इंद्रियाचा विषय होत नाहीं. त्यामुळें त्याचा उपदेश कसा करावा, तें कळत नाही. कारण आत्मतत्त्व विदित व अविदित म्ह० ज्ञात व अज्ञात अशा दोन्ही प्रकारच्या विषयांहून अगदीं विलक्षण म्ह० साक्षात् अपरोक्ष आहे. यास्तव तें शास्त्रप्रत्यय, आचार्यप्रत्यय व आत्मप्रत्यय यांच्या योगानेंच जाणलें पाहिजे. केवल तर्क, विद्वत्ता, बुद्धिमत्ता, यज्ञ, दान, तप इत्यादिकांच्या योगानें तें ज्ञात होत नाही. तें ब्रह्म वाक्, मन, चक्षुः, श्रोत्र, प्राण यांचा विषय होत नाही. तर उलट वागादिकांचे भाषण, मनन, दर्शन, श्रवण व प्राणन हे व्यापार ज्याच्या प्रेरणेनें होतात तें ब्रह्म—आत्मा आहे. तें सर्व विशेषशून्य आहे. लोक ज्या अनात्म—उपाधिभेदविशिष्ट पदार्थांची उपासना करितात तें मुख्य ब्रह्म नव्हे. तें सविशेष ब्रह्म आहे. निर्विशेष ब्रह्म उपासनेचाहि विषय होत नाही. यास्तव श्रोत्राचें श्रोत्र, मनाचें मन, कर्ता, भोक्ता, विज्ञाता, शासिता, विज्ञानं, आनंदं ब्रह्म इत्यादि हे सर्व विशेष निर्विशेष सम ब्रह्माच्या ठिकाणीं जरी प्रवृत्त होत असले तरी त्यांचें निरसन करून निर्विशेष आत्माच ब्रह्म आहे, असें तूं जाण, असा उपदेश करून आचार्यांनी शिष्याला पुनः म्हटलें

'पण तूं ब्रह्म घटादि बाह्य पदार्थांप्रमाणें सुज्ञेय आहे, असें जर समजशील तर तें माल तुझें अल्प ब्रह्मज्ञान होईल,तूं विरोचनाप्रमाणें शरीरालाच आत्मा मानूं लागशील, यास्तव तूं एकांतांत बसून माझ्या उपदेशाचा चांगला विचार कर.' तेव्हां शिष्यानेंहि एकांतांत शांतमनानें बसून आचार्योपदेशाचा चांगला विचार केला आणि स्वानुभवानें त्याचा निश्चय करून आचार्यांप्रमाणेंच आपला अनुभव प्रकट केला. मी 'ब्रह्म सुज्ञेय आहे,' असें समजत नाहीं व 'तें अज्ञेय आहे,' असेंहि नाहीं. अर्थात् तें सुसंस्कृत मनानें स्वसंवेद्य आहे. आम्हां शिष्यांतील जो कोणी त्याला अशा प्रकारें जाणतो त्यालाच यथार्थ ज्ञान होतें

याप्रमाणें प्रश्नोत्तररूपानें आत्मतत्त्वोपदेश केल्यावर स्वतः श्रुति म्हणते— 'ज्या ब्रह्मज्ञाला ब्रह्म इतर अनात्म पदार्थांप्रमाणें ज्ञात होणारें नाही, असें वाटतें, ज्याचा स्वानुभवानें तसा निश्चय झालेला असतो त्यालाच त्याचें सम्यक् ज्ञान झालेलें असतें; पण ज्याला तें ज्ञात झालें असें वाटतें तो त्या ब्रह्माला जाणत नाहीं. कारण सम्यग्ज्ञानी पुरुषांना तें अविदित वाटतें व असम्यग्दर्शी पुरुषांना तें विदित—ज्ञात वाटतें. इंद्रियें, मन, बुद्धि, यांमध्यें आत्म्याला पाहणाऱ्या लोकांना ब्रह्म व उपाधि यांचा विवेकच होत नाही. बुद्ध्यादि उपाधि मात्र विशेषतः ज्ञात होतात. त्यामुळें आम्हांला ब्रह्म विदित आहे, अशी त्यांना भ्रांति होते. तापलेल्या लोखंडांत अग्नीची जशी व्याप्ति असते तशी प्रत्येक बुद्धिप्रत्ययांत चैतन्याची व्याप्ति असते. तो प्रत्येक बुद्धिवृत्तीला पाहतो. यास्तव प्रत्येक वृत्तिज्ञानाबरोबर त्याच्या द्वारा तो ज्ञात होतो. बुद्धिप्रत्यय हेंच त्याच्या ज्ञानाचें द्वार आहे. यास्तव त्यांच्या द्वारा ब्रह्माला जाणणें हेंच सम्यग्ज्ञान होय. विद्यार्थ्याला स्वरूपानेंच बल प्राप्त होतें व विद्येनें अमृतप्राप्ति होते. या मनुष्य-जन्मांतच जर आत्म्याला जाणलें तरच खरें, नाहीं तर फार मोठा नाश होतो. संसाराचा अविच्छेद होतो. बुद्धिमान्—विवेकी लोक प्रत्येक भूतांत ब्रह्माला साक्षात् जाणून व या ममाहंभावरूप अविद्यात्मक लोकापासून निवृत्त होऊन अमृत ब्रह्म होतात.'

याप्रमाणें दोन खंडांत फलासह ब्रह्मविद्येचा उपदेश करून तिच्या स्तुती-साठीं श्रुतीनें आख्यायिका सांगितली आहे. सर्व प्रकारचा उत्कर्ष व महिमा ब्रह्माचा आहे. तथापि देवांना तो आमचा आहे, असा भ्रम झाला. पण

ब्रह्मानें ब्रह्मविद्येच्या योगानें त्यांच्या त्या मिथ्या ज्ञानाचें निवारण करून त्यांच्यावर अनुग्रह केला. शेवटी अधिदैव व अध्यात्म उपासना सांगून ब्रह्मविद्या काय ती ही एवढीच असा निश्चय करून तप, दम, कर्म, वेद, वेदांगें, ही त्या विद्येची प्रतिष्ठा व 'सत्य' हा श्रेष्ठ आधार आहे, असें सांगितलें आहे.

या उपनिषदांत केवल ब्रह्मविद्या वर्णिली आहे. त्यांत केवल निवृत्तिमार्ग उपदेशिला आहे. तपादिकांचा तिच्या साधनत्वानें उपदेश केला आहे. ईशावास्याप्रमाणें यांत मुख्याधिकाऱ्यासाठी निवृत्तिमार्ग सांगून मंदाधिकाऱ्यासाठीं प्रवृत्ति मार्ग जरी स्पष्टपणें सांगितलेला नाहीं, तरी उत्तमाधिकाऱ्यासाठीं निर्गुणज्ञान व मंदाधिकाऱ्यासाठीं सगुणोपासना सांगितली आहे.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रहांतील केनोपनिषद् समाप्त झाले.

अथ काठकोपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥ ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

या शांतीचा अर्थ केनोपनिषद् पृ. ११ वर पहा. विद्येच्या स्तुतीसाठीं आख्यायिका—

ॐ ॥ उशन् ह वै वाजश्रवसः सर्ववेदसं ददौ ।
तस्य ह नचिकेता नाम पुत्र आस ॥ १

अन्वयार्थ—[उशन्—] कामना करणारा 'ह वै' हे निपात गतवृत्ताच्या स्मरणार्थ आहेत. [वाजश्रवसः—] वाज म्ह० अन्न; तें देणें, इत्यादि निमित्तानें ज्याचें 'श्रवस्' म्हणजे यश झालें आहे तो 'वाजश्रवाः' किंवा केवल रूढीनेंच तो वाजश्रवा होय. त्याचें अपत्य वाजश्रवस होय. तो ज्यांत सर्वस्व दक्षिणा दिली जाते अशा विश्वजित्-नांवाच्या यज्ञाने, त्याच्या फलाची इच्छा करून यजन करिता झाला. म्हणजे त्यानें काम्य विश्वजित् यज्ञ केला. त्यानें त्या क्रतूंत [सर्ववेदसं ददौ—] सर्वस्व दान दिलें. [तस्य ह नचिकेताः नाम पुत्रः आस—] त्या यजमानाचा नचिकेता या नांवाचा पुत्र होता. १.

तꣳह कुमारꣳ सन्तं दक्षिणासु नीयमानासु श्रद्धाऽऽविवेश सोऽमन्यत २

अन्वयार्थ—[तं ह कुमारं सन्तं—] तो अद्यापि बालच—सोळा वर्षांच्या आंतील वयाचा असतांना [दक्षिणासु नीयमानासु—] त्याचा पिता ऋत्विजादिकांना दक्षिणा वाटूं लागला असतां त्याच्या मनांत [श्रद्धा आविवेश—] आस्तिक्य बुद्धि उत्पन्न झाली. [सः अमन्यत—] तो असें मनन करूं लागला. २ —त्यानें कसें मनन केलें तें श्रुति सांगते—

पीतोदका जग्धतृणा दुग्धदोहा निरिन्द्रियाः ।
अनन्दा नाम ते लोकास्तान् स गच्छति ता ददत् ॥ ३

अन्वयार्थ—[पीतोदकाः—] ज्यानी उदक प्राशन केलें आहे, [जग्धतृणाः—] तृण खालें आहे, [दुग्धदोहाः—] ज्यांचा दोह—दुग्ध काढून घेतलें आहे, [निरिंद्रियाः—] आणि ज्या निरिंद्रिय—प्रजननसामर्थ्यशून्य आहेत [ताः ददत् सः—] त्या गायी देणारा यजमान [अनन्दाः नाम ते लोकाः तान् गच्छति—] अनन्द—आनन्दशून्य असे जे लोक त्यास प्राप्त होतो. ३.—' यास्तव अशारीतीनें क्रतूची पूर्णता न झाल्यामुळें पित्याला प्राप्त होणाऱ्या अनिष्ट फलाचें माझ्यासारख्या सत्पुत्रानें आत्मप्रदान करूनहि निवारण करावें हें उचित आहे' असें समजून व पित्यापाशी जाऊन—

स होवाच पितरं तत कस्मै मां दास्यसीति ।
द्वितीयं तृतीयं तꣳ होवाच मृत्यवे त्वा ददामीति ॥ ४

अन्वयार्थ—[सः ह पितरं उवाच—] तो पित्याला म्हणाला, [तत मां कस्मै दास्यसि इति—] " बाबा, तू माझें कोणाला समर्पण करणार ?" असें म्हणाला. पण पित्यानें त्याला उत्तरच दिलें नाही. [द्वितीयं तृतीयं—] म्हणून तो तसेंच दुसऱ्यांदा व तिसऱ्यादा विचारूं लागला. तेव्हा पिता त्याला क्रोधानें [मृत्यवे त्वा ददामि इति—] ' मी तुला मृत्यूला देतों ' असें म्हणाला. ४.—पित्यानें क्रोधानें ज्याला असें सांगितलें आहे, असा तो नचिकेता एकान्तांत जाऊन अशी दीर्घ चिंता करूं लागला—

बहूनामेमि प्रथमो बहूनामेमि मध्यमः ।
किꣳ स्विद्यमस्य कर्तव्यं यन्मयाद्य करिष्यति ॥ ५

अन्वयार्थ—[बहूनां प्रथमः एमि–] अनेक शिष्य किंवा पुत्र यांत मी प्रथम असतों. मुख्य वृत्तीनें राहतों [बहूनां मध्यमः एमि–] त्याचप्रमाणें अनेक शिष्यादिकांत मी निदान मध्यम वृत्तीनें असतों. तेव्हां [किं स्विद् यमस्य कर्तव्यं यत् अद्य मया करिष्यति–] यमाचें कोणतें बरें कर्तव्य–प्रयोजन हा पिता आज माझ्या दानानें करील ? ५. कांहीं नाहीं. केवल क्रोधानें हा असें बोलून गेला आहे. तथापि त्याचें वचन असत्य न होवो, असा विचार करून व ' मी हें काय बोलून गेलों, ' असें म्हणून शोकयुक्त झालेल्या पित्याजवळ येऊन तो म्हणाला—

अनुपश्य यथा पूर्वे प्रतिपश्य तथाऽपरे । सस्य-
मिव मर्त्यः पच्यते सस्यमिवाऽऽजायते पुनः ॥ ६

अन्वयार्थ—[यथा पूर्वे अनुपश्य–] ज्याप्रमाणें तुझे पूर्वींचे–पितृ-पितामहादिक वागले तें पहा, [तथा अपरे प्रतिपश्य–] व तसेच इतर वर्तमान कालीन साधू कसे वागतात तें पहा आणि त्याप्रमाणें तूंहि वाग. आपलें वचन मिथ्या केल्यानें [मर्त्यः सस्यं इव पच्यते–] मनुष्य सस्याप्रमाणें–तृणाप्रमाणें–परिपक्व होतो–मरतो व [सस्यं इव पुनः आजायते–] सस्याप्रमाणेंच पुनः मरून या जीवलोकीं उत्पन्न होतो. (यास्तव आपल्या सत्याचें पालन कर. मला यमाकडे पाठीव.) ६.–पुत्राकडून असें बोलला गेलेला पिता आपलें सत्य राखण्यासाठीं त्याला यमाकडे पाठविता झाला. पण त्याचवेळीं यम कोठें प्रवासास गेला होता. तो बाहेर गेला असतां नचिकेत त्याच्या घरीं तीन दिवस उपाशीं राहिला. तेव्हा प्रवासांतून परत आलेल्या यमाला त्याचे अमात्य किंवा भार्या बोध करीत म्हणतात—

वैश्वानरः प्राविशत्यतिथिर्ब्राह्मणो गृहान् ।
तस्यैताः शान्तिं कुर्वन्ति हर वैवस्वतोदकम् ॥ ७

अन्वयार्थ—[ब्राह्मणः अतिथिः वैश्वानरः गृहान् प्रविशति–] ब्राह्मण अतिथि होऊन साक्षात् अग्नीच जळतचसा गृहांत प्रवेश करतो. [तस्य एतां शान्तिं कुर्वन्ति–] त्या अतिथीची ही–पाद्य-अर्घ्य इत्यादि दानरूप शांति करितात. [वैवस्वत उदकं हर–] यास्तव हे सूर्यपुत्रा यमा, याला पाद्यादिकांकरितां उदक दे. त्याच्या पाद्यादिकांसाठीं उदक घेऊन जा. कारण तें समर्पण न केल्यास प्रत्यवाय सांगितलेला आहे ७.–

आशाप्रतीक्षे सङ्गतꣳ सूनृतां चेष्टापूर्ते पुत्रपशूꣳश्च सर्वान् । एतद्-
वृङ्क्ते पुरुषस्याल्पमेधसो यस्यानश्नन् वसति ब्राह्मणो गृहे ॥ ८

अन्वयार्थ—[यस्य गृहे ब्राह्मणः अनश्नन् वसति—] ज्याच्या घरी ब्राह्मण उपाशी राहतो [तस्य अल्पमेधसः पुरुषस्य—] त्या अल्पप्रज्ञ पुरुषाच्या [आशाप्रतीक्षे संगतं सूनृतां च इष्टापूर्ते च सर्वान् पुत्रपशून्—] अज्ञात प्राप्य वस्तूविषयीं इच्छा, ज्ञात वस्तूविषयी इच्छा, त्याच्या संयोगापासून होणारें फल, प्रियवाणीचें फल, इष्टापूर्तकर्माचें फल, सर्व पुत्र व पशू [एतत् वृङ्क्ते—] यांचा तो नाश करतो. (यास्तव अतिथीची कोणत्याच अवस्थेंत उपेक्षा करूं नये.) ८.—याप्रमाणें अमात्यादिकांकडून उपदेश केला गेलेला यम नचिकेतापाशीं जाऊन पूजापूर्वक म्हणाला—

तिस्रो रात्रीर्यदवात्सीर्गृहे मेऽनश्नन्ब्रह्मन्नतिथिर्नमस्यः ।
नमस्तेऽस्तु ब्रह्मन्स्वस्ति मेऽस्तु तस्मात्प्रति त्रीन् वरान् वृणीष्व ॥ ९

अन्वयार्थ—[ब्रह्मन् यत् मे गृहे अतिथिः नमस्यः तिस्रः रात्रीः अनश्नन् अवात्सीः—] हे ब्राह्मणा, ज्याअर्थी तूं माझ्या गृही अतिथि व नमस्कारार्ह असून तीन रात्री कांही न खातां राहिला आहेस [तत् ते नमः अस्तु—] त्याअर्थीं तुला नमस्कार असो. [ब्रह्मन् तस्मात् मे स्वस्ति अस्तु—] ब्राह्मणा त्यामुळें माझें कल्याण असो. [त्रीन् वरान् प्रति वृणीष्व—] माझ्यापासून तीन वर मागून घे. (तुझ्या अनुग्रहानेंच माझे सर्व कल्याण होईल. तथापि तुला अधिक प्रसन्न करण्यासाठी तीन वर मी देतों ते मजपासून मागून घे.) ९.—त्यावर नचिकेता म्हणतो—

शान्तसङ्कल्पः सुमना यथा स्याद्वीतमन्युर्गौतमो माभि मृत्यो ।
त्वत्प्रसृष्टं माभिवदेत् प्रतीत एतत्त्रयाणां प्रथमं वरं वृणे ॥ १०

अन्वयार्थ—[मृत्यो, गौतमः मा अभि शान्तसंकल्पः सुमनाः वीतमन्युः यथा स्यात्—] हे मृत्यो, तो गौतम—माझा पिता मजप्रत शांतसंकल्प, प्रसन्नचित्त व क्रोधशून्य जसा होईल त्याचप्रमाणें [त्वत्प्रसृष्टं मा प्रतीतः अभिवदेत्—] तूं ज्याला घरी परत जाण्यासाठी प्रेरणा केली आहेस अशा मला तो आठवून—ओळखून माझ्याशीं संभाषण करील, [एतत् त्रयाणां प्रथमं वरं वृणे—] यासाठीं मी तीन वरांतील हा पहिला वर मागत आहें. (मृत्यो, तूं जर मला वर

देण्याचीच इच्छा करीत असशील तर मजविषयी ज्याचा सर्व संकल्प शांत झाला आहे, म्हणजे माझा पुत्र यमापाशीं जाऊन काय वरें करील, इत्यादि प्रकारची मजविषयीची चिंता ज्याची शांत झाली आहे, त्याचप्रमाणें ज्याचें मन प्रसन्न झालें आहे व ज्याचा मजवरील क्रोध गेला आहे, असा माझा पिता —गौतम होवो आणि तूं ज्याला घरीं परत जाण्याची अनुज्ञा दिली आहेस, असा मी घरीं गेलों असतां 'तोच माझा हा पुत्र आला आहे,' अशी स्मृति होऊन, मला ओळखून, माझ्याशीं प्रेमाने भाषण करो. यासाठी तूं दिलेल्या तीन वरांतील पित्याचा परितोष, हा प्रथम वर मी मागत आहें. १०.–त्यावर मृत्यु म्हणाला—

यथा पुरस्ताद्भविता प्रतीत औद्दालकिरारुणिर्मत्प्रसृष्टः ।
सुखꣳ रात्रीः शयिता वीतमन्युस्त्वा ददृशिवान्मृत्युमुखात्प्रमुक्तम्॥११

अन्वयार्थ—[आरुणिः औद्दालकिः मत्प्रसृष्ट. यथा पुरस्तात् प्रतीतः भविता–] अरुणपुत्र औद्दालकि मी ज्याला अनुज्ञा दिली आहे, असा होत्साता पूर्वीप्रमाणेंच तुजवर प्रेम करील; तुला ओळखील. [रात्रीः सुख शयिता–] तो इतर रात्रीमध्येंहि सुखानें शयन करील, [वीतमन्युः–] तो क्रोधशून्य होईल. [त्वा मृत्युमुखात् प्रमुक्तं ददृशिवान्–] तुला मृत्यूच्या मुखातून मुक्त झालेलें, त्यानें पाहिलें आहे. (तुला मी सोडलें आहे. परत पाठविलें आहे, असें तो समजेल व तुजवर रागावणार नाही.) ११.–त्यावर नचिकेता म्हणाला—

स्वर्गे लोके न भयं किञ्चनास्ति न तत्र त्वं न जरया बिभेति ।
उभे तीर्त्वाऽशनायापिपासे शोकातिगो मोदते स्वर्गलोके ॥.१२

अन्वयार्थ—[स्वर्गे लोके किंचन भयं न अस्ति–] स्वर्गलोकात कांही भय नाही. [तत्र त्वं न असि–] तेथें तूं नाहींस [जरया न बिभेति–] इहलोकाप्रमाणें जरेमुळें कोणी भीत नाही. [उभे अशनायापिपासे तीर्त्वा शोकातिगः–] तर क्षुधा व तृषा या दोन्ही ऊर्मींचें उल्लंघन करून पुरुष शोकातिग–मानसिक दुःखरहित होतो व [स्वर्गलोके मोदते–] दिव्य स्वर्ग लोकात हृष्ट होतो. १२.—

स त्वमग्निꣳ स्वर्ग्यमध्येषि मृत्यो प्रब्रूहि त्वꣳ श्रद्दधानाय मह्यम् ।
स्वर्गलोका अमृतत्वं भजन्त एतद्द्वितीयेन वृणे वरेण ॥ १३

अन्वयार्थ—[स. त्वं–] तो तूं यम [स्वर्ग्यं अग्निं अध्येषि–] स्वर्गसाधनभूत अग्नीला जाणतोस. [मृत्यो त्वं श्रद्दधानाय मह्यं प्रब्रूहि–] हे मृत्यो,

तूं तो अग्नि मज श्रद्धावानाला सांग. कारण [स्वर्गलोकाः अमृतत्वं भजन्ते–] त्या अग्नीचें चयन केल्यानें स्वर्गच ज्यांचा लोक आहे ते स्वर्गलोक–यजमान अमृतत्वास–देवत्वास प्राप्त होतात. [एतत द्वितीयेन वरेण वृणे–] मी हें अग्निविज्ञान दुसऱ्या वरानें मागतों. १३.–यावर मृत्यु अग्निविज्ञान सांगण्याची प्रतिज्ञा करितो––

प्र ते ब्रवीमि तदु मे निबोध स्वर्ग्यमग्निं नचिकेतः प्रजानन् ।
अनन्तलोकाप्तिमथो प्रतिष्ठां विद्धि त्वमेतं निहितं गुहायां ॥ १४

अन्वयार्थ––[हे नचिकेतः प्रजानन् अहं ते स्वर्ग्यं अग्निं प्रब्रवीमि–] हे नचिकेता, ज्याला त्याचें ज्ञान झालें आहे, असा होत्साता मी तुला स्वर्गसाधनभूत अग्नि सांगतों; [तत् उ मे निबोध–] तो तूं मजपासून ऐक. आतां त्या अग्नीची स्तुति करितो–[अनन्तलोकाप्ति–] अनन्त लोकाची प्राप्ति करून देणारा–स्वर्गलोकप्राप्तीचें साधन, [अथो प्रतिष्ठां–] व विराड्रूपानें जगाचा आश्रय [एतं गुहायां निहितं त्व विद्धि–] अशा ज्याचें मी कथन करणार आहें तो हा विद्वानांच्या बुद्धिरूप गुहेंत निविष्ट झाला आहे. असें तूं जाण. १४. –त्यानंतर श्रुति म्हणते––

लोकादिमग्निं तमुवाच तस्मै या इष्टका यावतीर्वा यथा वा ।
स चापि तत्प्रत्यवदद्यथोक्तमथास्य मृत्युः पुनरेवाऽऽह तुष्टः ॥ १५

अन्वयार्थ––[तं लोकादिं अग्निं तस्मै उवाच–] यम नचिकेताला प्रथमशरीरी असल्यामुळें लोकांचा आदिभूत अग्नि सांगता झाला. [याः इष्टकाः–] ज्या इष्टका (इटा) चयन करण्यास योग्य आहेत [यावतीः वा यथा वा–] त्या जितक्या असतात व चयन जसें होतें तेंहि त्यानें त्याला सांगितलें. तेव्हां [सः च अपि तत् यथोक्तं प्रत्यवदत्–] तो नचिकेतहि त्यानें सांगितल्याप्रमाणें बरोबर समजून तसाच उच्चार करता झाला. (त्यानें प्रत्युचार केला.) त्यामुळें[अथ तुष्टः मृत्युः अस्य पुनः एव आह–] संतुष्ट झालेला मृत्यु पुनः त्याला असें बोलला. १५.–

तमब्रवीत्प्रीयमाणो महात्मा वरं तवेहाद्य ददामि भूयः ।
तवैव नाम्ना भविताऽयमग्निः सृङ्कां चेमामनेकरूपां गृहाण ॥ १६

अन्वयार्थ––[तं–] त्या नचिकेताला [प्रीयमाणः महात्मा अब्रवीत–] शिष्याची योग्यता पाहून संतुष्ट झालेला महात्मा यम म्हणाला [इह तव अद्य

भूयः वरं ददामि—] 'मी आतां यावेळी तुला आणखी वर देतों. [तव एव नाम्ना अयं अग्निः भविता—] तुझ्याच नांवानें हा अग्नि लोकांत प्रसिद्ध होईल. [च इमां अनेकरूपां सृङ्कां गृहाण—] तूं ही विचित्र शब्दमय माला घे. (किंवा कर्ममय अनिंद्य गतीचा स्वीकार कर. अनेक फलांना कारण होणारें दुसरेंहि कर्मविज्ञान ग्रहण कर.) १६. यम पुनरपि कर्माचीच स्तुति करितो—

त्रिणाचिकेतस्त्रिभिरेत्य सन्धिं त्रिकर्मकृत्तरति जन्ममृत्यू ।
ब्रह्मजज्ञं देवमीड्यं विदित्वा निचाय्येमां शान्तिमत्यन्तमेति ॥१७

अन्वयार्थ—[त्रिणाचिकेत त्रिभिः संधिं एत्य—] ज्यानें नाचिकेत अग्नीचें तीनदा चयन केलें आहे तो त्रिणाचिकेत—माता, पिता व आचार्य किंवा वेद, स्मृति व शिष्ट अथवा प्रत्यक्ष, अनुमान व आगम अशा तिन्हींशीं संबंधास प्राप्त होऊन [त्रिकर्मकृत् जन्ममृत्यू तरति—] यज्ञ, अध्ययन व दान ही तीन कर्मे करणारा होत्साता जन्म-मृत्यूंचें उल्लंघन करतो. [ब्रह्मजज्ञं ईड्यं देवं विदित्वा—] हिरण्यगर्भापासून झालेल्या सर्वज्ञ व स्तुत्य देवाला जाणून आणि [निचाय्य—] आत्मत्वानें पाहून [इमां शान्तिं अत्यन्तं एति—] या साक्षात् शांतीला पूर्णपणें प्राप्त होतो. (ज्ञानकर्मसमुच्चयाच्या अनुष्ठानानें वैराज पदाला प्राप्त होतो.)१७.—आतां अग्निविज्ञान व अग्निचयन यांचें फल आणि हें प्रकरण यांचा उपसंहार—

त्रिणाचिकेतस्त्रयमेतद्विदित्वा य एवं विद्वांश्चिनुते नाचिकेतम् ।
स मृत्युपाशान् पुरतः प्रणोद्य शोकातिगो मोदते स्वर्गलोके ॥ १८

अन्वयार्थ—[त्रिणाचिकेत—] त्रिणाचिकेत [एतत् त्रयं विदित्वा—] इष्टका कोणत्या, त्यांची संख्या किती व अग्नीचें चयन कसें करावें, हें त्रय जाणून [यः एवं विद्वान् नाचिकेतं चिनुते—] व जो अशाप्रकारें म्हणजे आत्मरूपानें अग्नीला जाणणारा पुरुष नाचिकेत क्रतु संपादन करतो [सः पुरतः मृत्युपाशान् प्रणोद्य—] तो शरीरपात होण्यापूर्वीच मृत्युपाशांचा त्याग करून [शोकातिगः—] मानसदुःखशून्य होत्साता [स्वर्गलोके मोदते—] स्वर्गलोकीं आनंद पावतो. १८.—

एष तेऽग्निर्नाचिकेतः स्वर्ग्यो यमवृणीथा द्वितीयेन वरेण ।
एतमग्निं तवैव प्रवक्ष्यन्ति जनासस्तृतीयं वरं नाचिकेतो वृणीष्व ॥ १९

अन्वयार्थ—[नाचिकेतः द्वितीयेन वरेण यं अवृणीथाः—] हे नाचिकेता,

तूं दुसऱ्या वरानें ज्याच्या विषयीं प्रार्थना केली होतीस [एषः स्वर्ग्यः अग्निः ते दत्तः—] तो हा स्वर्गसाधनभूत अग्नि—हा वर तुला दिला [जनासः एतं अग्निं तव एव प्रवक्ष्यन्ति—] लोक या अग्नीला तुझ्याच नांवानें बोलतील. [नचिकेतः तृतीयं वरं वृणीष्व—] हे नचिकेता, आतां तिसरा वर माग. १९. —तिसरा वर माग असें बोलला गेलेला नचिकेत म्हणाला—

येयं प्रेते विचिकित्सा मनुष्येऽस्तीत्येके नायमस्तीति चैके ।
एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाऽहं वरणामेष वरस्तृतीयः ॥ २०

अन्वयार्थ—[प्रेते मनुष्ये या इयं विचिकित्सा—] मेलेल्या मनुष्याविषयीं ही जी शंका [एके अस्ति इति एके च अयं न अस्ति इति—] कोणी तो आहे, असें म्हणतात व कोणी तो नाही असें म्हणतात. यास्तव [त्वया अनुशिष्टः अहं एतत् विद्याम्—] तूं ज्याला बोध केला आहेस अशा मीं हें जाणावें. त्याचा निर्णय मला कळवा. [एषः वराणां तृतीयः वरः—] हा वरांतील तिसरा वर आहे. (परलोकसंबंधी आत्मा आहे की नाही असा हा प्रश्न आहे.) २०.— पण हा खरोखरीच मोक्षाचें साधन जे ज्ञान त्याचा अधिकारी आहे की नाहीं, हें जाणण्यासाठी यम त्याची परीक्षा पाहतो—

देवैरत्रापि विचिकित्सितं पुरा न हि सुज्ञेयमणुरेष धर्मः ।
अन्यं वरं नचिकेतो वृणीष्व मा मोपरोत्सीरति मा सृजैनम् ॥ २१

अन्वयार्थ—[पुरा देवैः अपि अत्र विचिकित्सितं—] पूर्वी देवांनींहि या-विषयी असा संशय घेतला होता [सुज्ञेयं न हि—] पण तें कांहीं सुज्ञेय—सहज समजण्यासारखें नाही. [एषः धर्मः अणुः—] कारण हा धर्म सूक्ष्म आहे. यास्तव [नचिकेतः अन्यं वरं वृणीष्व—] हे नचिकेता, दुसरा वर माग. [मा मा उपरोत्सीः—] मला उपरोध करूं नकोस, असा अडवूं नकोस. [मा एनं अतिसृज—] मला हा वर सोड. २१.—त्यावर नचिकेत म्हणतो—

देवैरत्रापि विचिकित्सितं किल त्वं च मृत्यो यन्न सुज्ञेयमात्थ ।
वक्ता चास्य त्वादृगन्यो न लभ्यो नान्यो वरस्तुल्य एतस्य कश्चित् २२

अन्वयार्थ—[अत्र देवैः अपि विचिकित्सितं किल—] याविषयी पूर्वी देवां-नींहि खरोखर संशय घेतला; हें मी तुझ्याच मुखानें ऐकत आहें [च मृत्यो त्वं यत् सुज्ञेयं न आत्थ—] व हे मृत्यो, तूं जें सुज्ञेय आहे, असें म्हणत

नाहींस [च अस्य वक्ता त्वादृक् अन्यः न लभ्यः—] या धर्माचा तुझ्यासारखा दुसरा वक्ता मिळणें शक्य नाही [एतस्य तुल्यः अन्यः कश्चित् वरः न—] व या वराच्या बरोबरीचा दुसरा कोणताहि वर नाहीं. २२.—नचिकेतानें जरी असें म्हटलें तरी यम त्याच्या मनांत लोभ उत्पन्न करण्यासाठीं पुनः म्हणतो—

शतायुषः पुत्रपौत्रान्वृणीष्व बहून्पशून्हस्तिहिरण्यमश्वान् ।
भूमेर्महदायतनं वृणीष्व स्वयं च जीव शरदो यावदिच्छसि २३

अन्वयार्थ—[शतायुषः पुत्र-पौत्रान् वृणीष्व—] तूं शतायु पुत्र व पौत्र मागून घे. [बहून् पशून् हस्तिहिरण्यं अश्वान्—] अनेक पशू, हत्ती, सोनें, अश्व व [भूमेः महत् आयतनं वृणीष्व—] भूमीचें मोठें मंडल मागून घे. [च स्वयं यावत इच्छसि तावन्त्यः शरदः जीव—] आणि तूं स्वतः जोंवर तुझी इच्छा असेल तोंवर—तितकीं वर्षें जिवंत रहा. २३.—

एतत्तुल्यं यदि मन्यसे वरं वृणीष्व वित्तं चिरजीविकां च ।
महाभूमौ नचिकेतस्त्वमेधि कामानां त्वा कामभाजं करोमि ॥

अन्वयार्थ—[एतत्तुल्यं वरं यदि मन्यसे वित्तं चिरजीविकां च वृणीष्व—] या वराच्या बरोबरीचा असा दुसरा एखादा वर जर तुला वाटत असेल तर तो, वित्त व दीर्घ आयुष्य मागून घे. [नचिकेतः त्वं महाभूमौ एधि—] हे नचिकेता, तूं महाभूमीमध्यें राजा हो. [त्वा कामानां कामभाजं करोमि—] मी तुला सर्व कामांचा कामभाक् करतों. २४.—

ये ये कामा दुर्लभा मर्त्यलोके सर्वान्कामाꣳश्छन्दतः प्रार्थयस्व ।
इमा रामाः सरथाः सतूर्या न हीदृशा लम्भनीया मनुष्यैः ।
आभिर्मत्प्रत्ताभिः परिचारयस्व नचिकेतो मरणं माऽनुप्राक्षीः ॥

अन्वयार्थ—[मर्त्यलोके ये ये कामाः दुर्लभाः—] या मर्त्यलोकांत जे जे काम दुर्लभ आहेत [तान् सर्वान् कामान् छन्दतः प्रार्थयस्व—] त्या सर्व कामांस आपल्या इच्छेप्रमाणें मागून घे. [सरथाः सतूर्याः इमाः रामाः—] रथांसह व वाद्यांसह अशा या अप्सरा मागून घे. [ईदृशाः मनुष्यैः न लंभनीयाः—] अशा प्रकारच्या स्त्रिया मनुष्यांकडून प्रापणीय नाहींत. अशा सुंदरी मनुष्यांना प्राप्त होत नाहींत. [मत्प्रत्ताभिः आभिः परिचारयस्व—] मीं दिलेल्या या स्त्रियांकडून आपली परिचर्या करीव. [नचिकेतः मरणं मा अनुप्राक्षीः—]

पण नचिकेता, मरणाविषयीचा प्रश्न विचारूं नको. २५.—मृत्यु याप्रमाणें त्याच्या मनांत लोभ उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असतांनाहि नचिकेत मनांत मुळींच क्षुब्ध न होतां त्याला म्हणतो—

श्वोभावा मर्त्यस्य यदन्तकैतत्सर्वेंद्रियाणां जरयन्ति तेजः ।
अपि सर्वं जीवितमल्पमेव तवैव वाहास्तव नृत्यगीते ॥ २६

अन्वयार्थ—[श्वोभावाः—] हे सर्व भोग, उद्यां राहतील की नाही, याचाहि वानवाच, असे आहेत. शिवाय [अन्तक मर्त्यस्य यत् एतत् सर्वेंद्रियाणां तेजः तत् जरयन्ति—] अन्तका, हें जें मनुष्याच्या सर्वेंद्रियांचें तेज तें ते अप्सरा-प्रभृति भोग क्षीण करितात [सर्वं अपि जीवितं अल्पं एव—] ब्रह्मदेवाचेंहि सर्व जीवित अल्पच आहे. [तव एव वाहाः तव नृत्यगीते—] यास्तव अश्व व नृत्यगीत तुझें तुलाच असो. २६.—शिवाय—

न वित्तेन तर्पणीयो मनुष्यो लप्स्यामहे वित्तमद्राक्ष्म चेत्त्वा ।
जीविष्यामो यावदीशिष्यसि त्वं वरस्तु मे वरणीयः स एव ॥

अन्वयार्थ—[मनुष्यः वित्तेन न तर्पणीयः—] मनुष्य वित्तानें तृप्त करता येण्यासारखा नाही. पुष्कळ धनानेंहि त्याची वित्ततृष्णा शांत होणें शक्य नाही. [त्वा अद्राक्ष्म चेत् वित्तं लप्स्यामहे—] आम्ही जर तुला पाहिलें तर आम्हांला वित्तहि मिळेल. (तुझ्या पासून आम्ही दीर्घ जीवित जरी मिळविलें तरी) [यावत् त्वं ईशिष्यसि तावत् जीविष्यामः—] जोंवर तूं याम्य पदावर आरूढ असशील तोंवरच आम्ही जिवंत राहणार ! [तु मे वरणीयः वरः सः एव—] यास्तव मला वरणीय वर तोच आहे. २७.—कारण—

अजीर्यताममृतानामुपेत्य जीर्यन्मर्त्यः क्वधःस्थः प्रजानन् ।
अभिध्यायन्वर्णरतिप्रमोदानतिदीर्घे जीविते को रमेत ॥ २८

अन्वयार्थ—[अजीर्यता अमृतानां उपेत्य—] वयोहानीस प्राप्त न होणाऱ्या अमृतांच्या—देवांच्या समीप येऊन [प्रजानन्—] त्यांच्यापासून निराळेंच प्रयोजन साध्य होणारें आहे, असें जाणणारा [जीर्यन् मर्त्यः क्वधःस्थः—] जीर्ण होणारा मर्त्य पृथिवीसारख्या अधःप्रदेशी राहणारा असतांना त्यांच्यापाशी पुत्रादिकांचीच प्रार्थना कशी करील ? शिवाय[वर्ण-रति-प्रमोदान्-]अप्सराप्रभृति वर्ण-गीति, रति—क्रीडा, व प्रमोद—तज्जन्य सुख यांचें [अभिध्यायन् कः—]अनवस्थितरूपानें

चिंतन करणारा कोणता विवेकी [अतिदीर्घ जीविते रमेत–] अतिदीर्घ जीविता-मध्यें रममाण होणार आहे ? कोणी नाही. २८.–यास्तव अनित्य कामादिकांच्या योगानें मला लुब्ध करण्याचा हा नाद सोडून—

यस्मिन्निदं विचिकित्सन्ति मृत्यो यत्सांपराये महति ब्रूहि नस्तत्।
योऽयं वरो गूढमनुप्रविष्टो नान्यं तस्मान्नचिकेता वृणीते ॥ २९

अन्वयार्थ––[मृत्यो यस्मिन् इदं विचिकित्सन्ति–] हे मृत्यो, ज्या प्रेताविषयीं हा ' आहे ' व ' नाही ' अशा प्रकारें देवादि सर्व संशयित होतात व [महति सांपराये यत् तत् नः ब्रूहि–] मोठ्या प्रयोजनाचें निमित्त अशा परलोकासंबंधीं जें आत्म्याचें निर्णयाविज्ञान तें आम्हाला सांग.[यः अयं गूढं अनुप्रविष्टः वरः-] हा जो आत्मविषयक वर गहनतेस प्राप्त झाला आहे [तस्मात् अन्यं नचिकेताः न वृणीते–] त्याहून अन्य वर नचिकेता मागत नाही. २९. १.

याप्रमाणें शिष्याची परीक्षा पाहून व त्याच्यामध्यें विद्येची योग्यता आहे, असें जाणून मृत्यु म्हणतो––

अन्यच्छ्रेयोऽन्यदुतैव प्रेयस्ते उभे नानार्थे पुरुषꣳ सिनीतः।
तयोः श्रेय आददानस्य साधुर्भवति हीयतेऽर्थाद्य उ प्रेयो वृणीते १

अन्वयार्थ––[श्रेयः अन्यत् प्रेयः उत अन्यत् एव–] श्रेय–निःश्रेयस निराळें व प्रेय–प्रियतर निराळें आहे. [ते उभे नानार्थे–] ती दोन्हीं ज्यांचें प्रयोजन भिन्न भिन्न आहे, अशी होत्साती [पुरुषं सिनीतः–] वर्णाश्रमादिविशिष्ट पुरुषाला बद्ध करितात. श्रेयः-प्रेयांकडून पुरुष आत्मकर्तव्यतेनें प्रेरित होतो. [तयोः श्रेयः आददानस्य साधुः भवति–] त्यांतील श्रेयाचेंच उपादान–ग्रहण करणाऱ्या पुरुषाचे कल्याण होतें [यः उ प्रेयः वृणीते–] पण जो अदूरदर्शी प्रेयाचें ग्रहण करतो [सः अर्थात् हीयते–] तो पुरुषार्थापासून च्युत होतो. १. –श्रेय व प्रेय या दोहोंतील हवें त्याचें ग्रहण करणें जर पुरुषाच्या स्वाधीन आहे तर व्यवहारांत श्रेयाला सोडून पुरुष प्रायः प्रेयाचेंच ग्रहण कां करतो ? असें कोणी विचारलि ह्मणून हा मंत्र म्हणतो—

श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतस्तौ संपरीत्य विविनक्ति धीरः।
श्रेयो हि धीरोऽभि प्रेयसो वृणीते प्रेयो मन्दो योगक्षेमाद्वृणीते२

अन्वयार्थ—[श्रेयः च प्रेयः च मनुष्यं एतः—] श्रेय व प्रेय मिश्रित होऊन मनुष्यास प्राप्त होतात. पण [धीरः तौ संपरीत्य विविनक्ति—] बुद्धिमान् पुरुष त्या श्रेयः-प्रेयांचें मनानें चांगलें आलोचन करून त्यांचें विवेचन—पृथक्करण करतो; आणि [धीरः हि प्रेयसः श्रेयः अभिवृणीते—] तो धीमान् प्रेयाहून श्रेय अधिक इष्ट असल्यामुळें तेंच सर्वथा इच्छितो. पण [मंदः योगक्षेमात् प्रेयः वृणीते—] जो मंद असतो तो योगक्षेमाकरितां प्रेय इच्छितो. २. परंतु—

स त्वं प्रियान्प्रियरूपाꣳश्च कामानभिध्यायन्नचिकेतोऽत्यस्राक्षीः ।
नैताꣳ सृङ्कां वित्तमयीमवाप्तो यस्यां मज्जन्ति बहवो मनुष्याः ३

अन्वयार्थ—[नचिकेतः सः त्वं प्रियान् च प्रियरूपान् कामान् अभिध्यायन् अत्यस्राक्षीः—] हे नचिकेता, तो तू पुत्रादि प्रिय व अप्सरःप्रभृति प्रियरूप कामांना, त्यांच्या अनित्यत्व-असारत्वादिदोषांचें चिंतन करीत होत्साता, सोडता झालास, हें महदाश्चर्य आहे. [यस्यां बहवः मनुष्याः मज्जंति—] जिच्यामध्यें पुष्कळ मनुष्यें निमग्न होतात [एतां वित्तमयीं सृंकां न अवाप्तः—] त्या वित्तमयी निंद्य गतीला तू प्राप्त झाला नाहींस. ३.—श्रेय व प्रेय यांतील श्रेयाचें ग्रहण करणाराचें कल्याण होतें व प्रेयाचें ग्रहण करणारा स्वार्थापासून भ्रंश पावतो, असें वर याच वल्लीच्या पहिल्या मंत्रांत सांगितलें. पण तें असें कां होतें, तें यम सांगतो—

दूरमेते विपरीते विषूची अविद्या या च विद्येति ज्ञाता ।
विद्याभीप्सिनं नचिकेतसं मन्ये न त्वा कामा बहवोऽलोलुपन्त ॥४

अन्वयार्थ—[अविद्या या च विद्या इति ज्ञाता एते—] अविद्या व विद्या म्हणून ज्ञात असलेल्या या दोन [दूरं विपरीते—] फारच विपरीत—अन्योन्यविलक्षण व [विषूची—] भिन्न फल देणाऱ्या आहेत. एक संसार देणारी व दुसरी मोक्ष देणारी. [नचिकेतसं विद्याभीप्सिनं मन्ये—] पण तुज नचिकेताला मी विद्येची आकांक्षा करणारा—विद्यार्थी समजतों. [बहवः कामाः त्वा न अलोलुपन्त—] कारण तुला अप्सरादि बहुत कामहि लोलुप करूं शकले नाहींत. तुला श्रेयोमार्गापासून भ्रष्ट करण्यास समर्थ झाले नाहींत. यास्तव तूं कल्याणाचें पात्र आहेस असें मी समजतों. ४.—पण जे संसाराचे अधिकारी असतात ते—

अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितंमन्यमानाः ।
दन्द्रम्यमाणाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथाऽन्धाः ५

अन्वयार्थ—[अविद्याया अन्तरे वर्तमानाः—] गाढ अन्धकारांत जसे, त्याप्रमाणेंच अविद्येमध्यें पुत्र-पशु इत्यादिकांच्या तृष्णा, याच शेंकडों पाशांनीं वेष्टित होत्साते व्यवहार करीत राहतात. [स्वयं धीराः पंडितंमन्यमानाः—] ते स्वतःच आम्ही मोठे प्रज्ञावान् व पंडित—शास्त्रकुशल आहों, असें समजतात. पण [अन्धेन नीयमानाः अन्धाः यथा—] दृष्टिरहित आंधळ्याकडून विषम मार्गांतून—उंच-सखल प्रदेशांतून नेले जाणारे अनेक अंध जसे मोठ्या अनर्थास प्राप्त होतात [तथा—] त्याप्रमाणें ते [दंद्रम्यमाणाः मूढाः—] अत्यंत कुटिल—उत्तरायणादि अनेक रूप गतीस इच्छिणारे मूढ—अविवेकी जरा-मरण-रोगादि-दुःखांनीं [परियन्ति—] परिवेष्टित होतात ५.—आणि मूढत्वामुळेंच—

न सांपरायः प्रतिभाति बालं प्रमाद्यन्तं वित्तमोहेन मूढम् ।
अयं लोको नास्ति पर इति मानी पुनः पुनर्वशमापद्यते मे ॥ ६

अन्वयार्थ—[प्रमाद्यन्तं वित्तमोहेन मूढं बालं सांपरायः न प्रतिभाति—] पुत्र, पशु इत्यादि विषयांच्या साधनांमध्यें ज्याचें मन आसक्त आहे अशा प्रमादशील व वित्तमोहानें मूढ झालेल्या अविवेक्याला परलोकाचें शास्त्रीय साधन स्फुरत नाही. [अयं लोकः—] हाच लोक आहे, [परः नास्ति—] पर लोक नाही, [इति मानी—] असें मानणारा तो [पुनः पुनः मे वशं आपद्यते—] पुनः पुनः माझ्या स्वाधीन होतो. पुनः पुनः माझ्या ताब्यांत येतो. ६.—अनेक सहस्र लोकांमध्यें तुझ्यासारखा कोणी एखादाच श्रेयोर्थी आत्मज्ञ निपजतो. कारण—

श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः शृण्वन्तोऽपि बहवो यं न विद्युः ।
आश्चर्यो वक्ता कुशलोऽस्य लब्धाऽऽश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः ७

अन्वयार्थ—[यः बहुभिः श्रवणाय अपि न लभ्यः—] जो पुष्कळांना नुस्ता ऐकावयालाहि सापडत नाही; [शृण्वन्तः अपि बहवः यं न विद्युः—] ऐकणारेहि पुष्कळ ज्याला जाणत नाहीत; [अस्य वक्ता आश्चर्यः—] याचा वक्ता आश्चर्यासारखा एखादाच असतो. [लब्धा निपुणः—] तसाच याला प्राप्त करणारा एखादाच निपुण असतो. कारण [कुशलानुशिष्टः आश्चर्यः ज्ञाता—] कुशल आचार्यानें ज्याला अनुशासन—उपदेश केला आहे अशा होत्साता एखादाच आश्चर्यासारखा याचा ज्ञाता होतो. सु. गी. २. २९. पृ. ३२ पहा (पुष्कळाना तर जो आत्मा नुस्ता ऐकावयासहि मिळत नाही म्हणजे आत्म्याचें स्वरूप असें असें आहे, हें त्यांच्या

कधीं कानावरहि येत नाहीं, दुसरे पुष्कळसे लोक श्रवण करीत असले तरी त्यांच्या चित्ताला नित्य नैमित्तिक कर्मांच्या योगानें शुभ संस्कार झालेले नसल्यामुळें ज्या आत्म्याला जाणत नाहीत, शिवाय ज्याअर्थी आत्म्याचे श्रोते व ज्ञाते हे दोन्ही दुर्लभ आहेत त्याअर्थी या आत्म्याविषयी वक्ताहि एखाद्या आश्चर्याप्रमाणें, अनेकांत एखादाच विरळा निपजतो. तसेंच, वर म्हटल्याप्रमाणें श्रवण करूनहि आत्म्याला प्राप्त होणारा निपुण मनुष्य अनेकांमध्यें कोणी एखादाच असतो. कारण निपुण–आत्मसाक्षात्कारवान् आचार्यानें ज्याला वेदान्ताचें अनुशासन–उपदेश केला आहे, असा होत्साता आश्चर्यासारखा एखादाच त्याचा ज्ञाता–साक्षात्कारवान् होतो.) ७. याचें कारण––

न नरेणावरेण प्रोक्त एष सुविज्ञेयो बहुधा चिन्त्यमानः ।
अनन्यप्रोक्ते गतिरत्र नास्त्यणीयान्ह्यतर्क्यमणुप्रमाणात् ॥ ८

अन्वयार्थ––[अवरेण नरेण प्रोक्तः एषः–] प्राकृतबुद्धि हीन पुरुषानें सांगितलेला हा आत्मा [बहुधा चिन्त्यमानः–]वाद्यांकडून आहे, नाहीं, असा बहुत प्रकारें चिंतन केला जात असल्यामुळें [सुविज्ञेयः न–]सुविज्ञेय नाही.[अनन्यप्रोक्ते अत्र गतिः नास्ति–] अभेददर्शी आचार्यानें सांगितलेल्या या आत्म्याविषयीं तो आहे, नाहीं, इत्यादि प्रकारची चिंताच नाहीं. आत्मज्ञानानंतर ज्ञातव्य उरत नाहीं. आत्मा [अणुप्रमाणात् अणीयान्–] अणुप्रमाणाहून अणु आहे; [हि अतर्क्य–] त्यामुळें तो अतर्क्य आहे. (यास्तव आगमसंपन्न आचार्याच्या उपदेशानेंच तो सुविज्ञेय होतो) ८.–यास्तव अभेददर्शी आचार्यानें आत्म्याचा बोध केला असतां उत्पन्न झालेली जी ही आगमप्रतिपाद्य आत्म्याविषयींची मति ती––

नैषा तर्केण मतिरापनेया प्रोक्ताऽन्येनैव सुज्ञानाय प्रेष्ठ ।
यां त्वमापः सत्यधृतिर्बतासि त्वादृङ्नो भूयान्नचिकेतः प्रष्टा ॥९

अन्वयार्थ––[एषा मतिः तर्केण न आपनेया–] ही आत्ममति तर्कानें प्रापणीय नाही. किंवा तर्कानें [न आपनेया–] तिचा त्याग करूं नये. [हे प्रेष्ठ अन्येन एव प्रोक्ता सुज्ञानाय–] हे प्रियतमा, तार्किकाहून निराळ्या अशा आगमज्ञानेंच सांगितलेली ती मति सम्यग्ज्ञानाला कारण होते. [यां त्वं आपः–] ज्या मतीला तूं प्राप्त झाला आहेस ती आगमज्ञानें सांगितली असतांच उत्तम ज्ञानाला कारण होते. [बत सत्यधृतिः असि–] अहाहा, खरोखर तूं सत्यधृति

आहेस. (तुझें धैर्य अमिश्र्या पदार्थाविषयी आहे.) [नचिकेतः नः त्वादृक् प्रष्टा भूयात्–] हे नचिकेता, आम्हांला तुझ्यासारखाच प्रश्न करणारा शिष्य किंवा पुत्र असो. ९.–पुनरपि संतुष्ट झालेला मृत्यु म्हणतो––

जानाम्यहं शेवधिरित्यनित्यं न ह्यध्रुवैः प्राप्यते हि ध्रुवं तत् ।
ततो मया नाचिकेताश्चितोऽग्निरनित्यैर्द्रव्यैः प्राप्तवानस्मि नित्यम् ॥१०

अन्वयार्थ––[शेवधिः अनित्यं इति अहं जानामि–] लौकिक निधीप्रमाणें इच्छिला जाणारा कर्मफलरूप निधि अनित्य आहे, हें मी जाणतों. [हि अध्रुवैः तत् ध्रुवं न हि प्राप्यते–] कारण अनित्य साधनांच्या योगानें तें नित्य आत्मतत्त्व –तो परमात्मसंज्ञक निधि मिळतच नाही. तर जो अनित्य सुखात्मक निधि तोच अनित्य द्रव्यांच्या योगानें प्राप्त होतो, [हि–] असें ज्या अर्थीं आहे [ततः मया अनित्यैः द्रव्यैः नाचिकेतः अग्निः चितः–] त्या अर्थी मी असें जाणत असूनहि अनित्य द्रव्यांच्या योगानें नाचिकेत अग्नीचें चयन केलें व [नित्यं प्राप्तवान् अस्मि–] त्यामुळें या आपेक्षिक नित्य याग्यपदाला प्राप्त झालों आहें १०. पण तूं तर–

कामस्याऽऽप्तिं जगतः प्रतिष्ठां क्रतोरानन्त्यमभयस्य पारम् ।
स्तोममहदुरुगायं प्रतिष्ठां दृष्ट्वा धृत्या धीरो नचिकेतोऽत्यस्राक्षीः ॥

अन्वयार्थ––[कामस्य आप्तिं–] कामाच्या समाप्तीस म्ह० येथेंच–या आत्म्यांतच सर्व काम परिसमाप्त झाले आहेत [जगतः प्रतिष्ठा–] अध्यात्म, अधिभूत, अधिदैव इत्यादि सर्व भेदयुक्त जगाच्या प्रतिष्ठेस, ह्मणजे सर्वात्मक असल्यामुळें सर्व जगाच्या आश्रयास, [क्रतोः आनन्त्यं–] हिरण्यगर्भाची उपासना करणें, या क्रतूच्या हिरण्यगर्भाचें पद प्राप्त होणें, या अनन्त फलास ह्मणजे इतर फलांच्या अपेक्षेनें कांहीं काल अधिक टिकणाऱ्या फलास; [अभयस्य पारं–] अभयाच्या पारास, पराकाष्ठेस, [स्तोममहत्–] स्तुत्य आणि अणिमादि ऐश्वर्य इत्यादि अनेक गुणांनी युक्त, अर्थात् जें स्तुत्य व निरतिशयत्वामुळें महत् तें स्तोममहत् त्यास; [उरुगायम्–] विस्तीर्ण गतीस व [प्रतिष्ठाम्–] आपल्या अत्युत्तम अशाहि स्थितीस [दृष्ट्वा–] पाहून ह्मणजे कामाच्या समाप्तीपासून आपल्या अत्युत्तम स्थितीपर्यंत सर्वांचा चांगला विचार करून [नचिकेतः–] हे नचिकेता, तूं [धृत्या–] मोठ्या धैर्यानें [धीरः–] बुद्धिमान् होऊन व परम तत्त्वाचीच आकांक्षा धरून या यज्ञयावत् सर्व संसाररूपभोगांचा

[अत्यस्राक्षीः–] त्याग केला आहेस ! अहाहा ! खरोखर तूं अत्युत्तम गुणवान् आहेस ११.–यम आणखी स्तुति करितो–तूं ज्या आत्म्याला जाणण्याची इच्छा करीत आहेस–

तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गह्वरेष्ठं पुराणम् ।
अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ॥ १२

अन्वयार्थ––[तं दुर्दर्शम्–] त्या अतिसूक्ष्मत्वामुळें दुर्दर्श झालेल्या, दुःखानें ज्याचें दर्शन होतें तो दुर्दर्श; [गूढं अनुप्रविष्टम्–] गूढ–गहन स्थानीं प्रवेश केलेल्या म्हणजे प्रकृतीच्या शब्दादि विषयरूप विकारांच्या विज्ञानांनी–अनुभवांनी आच्छादित झालेल्या असा याचा इत्यर्थ. [गुहाहितम्–] बुद्धींत उपलब्ध होत असल्यामुळें बुद्धिरूप गुहेंत असलेल्या [गह्वरेष्ठम्–] गह्वर म्हणजे विषम, अनेक अनर्थांनीं भरलेला प्रदेश त्यांत राहणाऱ्या, (आत्मा ज्याअर्थीं अशा रीतीनें ' गूढमनुप्रविष्ट ' व ' गुहाहित ' आहे त्याअर्थीं तो ' गह्वरेष्ठ ' आणि गह्वरांत स्थित असल्यामुळेंच दुर्दर्श असा या विशेषणांचा संबंध लावावा.) असो; अशा त्या [पुराणम्–] पुरातन [देवं–] देवास–आत्म्यास [अध्यात्मयोगाधिगमेन–] अध्यात्मयोगाधिगमानें [मत्वा धीरः हर्षशोकौ जहाति–] जाणून धीमान् हर्ष व शोक यांचा त्याग करतो. (चित्ताला विषयांपासून परत फिरवून आत्म्याच्या ठिकाणीच स्थिर ठेवणें, याला अध्यात्मयोग म्हणतात. त्याला संपादन करून त्याच्या योगानें प्रकाशरूप आत्म्याला जाणून धीर आत्म्याचा उत्कर्ष व अपकर्ष यांचाच अभाव असल्यामुळें हर्ष व शोक यांचा त्याग करतो. आपला उत्कर्ष व दुसऱ्याचा अपकर्ष झाला असतां सुख आणि आपला अपकर्ष व दुसऱ्याचा उत्कर्ष झाला असतां दुःख होतें. पण आत्म्याच्या ठिकाणी उत्कर्ष व अपकर्ष या दोहोंचाहि अभाव असल्यामुळें आत्मज्ञास हर्ष व शोक होत नाहीत, असा याचा भावार्थ.) १२.–शिवाय––

एतच्छ्रुत्वा संपरिगृह्य मर्त्यः प्रवृह्य धर्म्यमणुमेतमाप्य ।
स मोदते मोदनीयꣳ हि लब्ध्वा विवृतꣳ सद्म नाचिकेतसं मन्ये १३

अन्वयार्थ––[एतत् श्रुत्वा–] मी जें पुढें सांगणार आहें तें आत्मतत्त्व ऐकून, [संपरिगृह्य–] आचार्यांच्या प्रसादानें यथार्थ आत्मभावानें ग्रहण करून [मर्त्यः–] मरणधर्मवान् मनुष्य [धर्म्यं–] धर्मास सोडून नसलेल्या–धर्मरूप

अशा या आत्म्यास [प्रवृह्य–] शरीरादिकांपासून वर काढून–पृथक् करून [अणुं एतं आप्य–] व या सूक्ष्म आत्म्याला प्राप्त होऊन [सः–] तो मर्त्य विद्वान् [मोदनीयं हि लब्ध्वा–] हर्ष करण्यास योग्य असलेल्या आत्म्यास प्राप्त करून घेऊन [मोदते–] हृष्ट होतो. [सम्न–] हें अशा प्रकारचें ब्रह्मभवन [नचिकेतसं–] तुज नचिकेताकरितां [विवृतं मन्ये–] आपलें द्वार उघडून सन्मुख उभेंच आहे, असें मी समजतों. तूं मोक्षास योग्य आहेस, असें मी समजतों, असा याचा भावार्थ. १३.–त्यावर नचिकेत ह्मणतो–जर मी आत्मज्ञानाला योग्य आहें व तूंहि मजवर प्रसन्न आहेस तर हे भगवन्–

अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मादन्यत्रास्मात्कृताकृतात् ।
अन्यत्र भूताच्च भव्याच्च यत्तत्पश्यसि तद्वद ॥ १४

अन्वयार्थ–[अन्यत्र धर्मात्–] शास्त्रीय धर्मानुष्ठान, त्याचें फल, त्या धर्माचीं कर्ता, करण इत्यादि कारकें, यांहून पृथक् असलेलें असा याचा भावार्थ; [अन्यत्र अधर्मात्–] त्याचप्रमाणें अधर्माहूनहि अगदी भिन्न असलेलें, [अन्यत्र अस्मात् कृताकृतात्–] कृत–कार्य व अकृत–कारण यांहूनहि पृथक्, [अन्यत्र भूताच्च भव्याच्च–] भूतकाल, भविष्यत् काल व वर्तमानकाल यांहून निराळें असलेलें, म्हणजे जें त्रिकालानें परिच्छिन्न होत नाही, असा याचा भावार्थ; अशा प्रकारचें व सर्व व्यवहारविषयातीत असें [यत् तत् पश्यसि–] जें तत्त्व तूं जाणतोस [तत् वद–] तेंच मला सांग. (वरील तिसऱ्या वराकरितां विचारलेल्या प्रश्नाहून हा निराळा प्रश्न आहे, असें येथें समजूं नये. हाहि आत्म्याच्या यथार्थ स्वरूपाविषयींच प्रश्न आहे.) १४.–याप्रमाणें प्रश्न करणाऱ्या नचिकेताला त्यानें विचारलेलें तत्त्व व त्याचेंच आणखी विशेषण, ही सांगण्याची इच्छा करणारा मृत्यु ह्मणाला–

सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपा ंसि सर्वाणि च यद्वदन्ति ।
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पद ंसंग्रहेण ब्रवीम्योमित्येतत् १५

अन्वयार्थ–[सर्वे वेदाः यत् पदं आमनन्ति–] सर्व वेद म्हणजे वेदांचा एक देश–एक भाग अशीं उपनिषदें जें पद ह्मणजे अविभागानें जाण्यास योग्य, एकरूपानें मिळण्यास उचित आहे, असें सांगतात [सर्वाणि तपांसि च यत् वदन्ति–] सर्व तपें ज्याच्या प्राप्तीकरितां आहेत, असें विद्वान् सांगतात; [यत्

इच्छन्तः ब्रह्मचर्यं चरन्ति—] ज्याची इच्छा करणारे गुरुकुलवासरूप ब्रह्मचर्य अथवा ब्रह्मप्राप्तीच्या उपयोगीं असलेलें दुसरें एखादें व्रत करितात [तत् पदं—] तें पद, कीं ज्याला जाणण्याची तूं इच्छा करीत आहेस, [ते संग्रहेण ब्रवीमि—] तुला संक्षेपतः सांगतों. [ओं इति एतत्—] 'ओं' हें तें पद आहे. जें जाणण्याची तूं इच्छा करीत आहेस तें हें पद 'ओं-'शब्दवाच्य व 'ओं-'शब्दप्रतीक आहे. (सु. गी. अ. ८.११ पृ. १६६ पहा.) १५.—यास्तव—

एतदध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम् ।
एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥ १६

अन्वयार्थ—[एतत् हि एव अक्षरं ब्रह्म—] हें अक्षरच अपर ब्रह्म व [एतत् हि एव अक्षरं परं—] हें अक्षरच पर ब्रह्म आहे. अपर व पर ब्रह्माचें हें अक्षर प्रतीक आहे. [एतत् हि एव अक्षरं ज्ञात्वा—] हें 'ओं' अक्षरच ब्रह्म आहे, अशी त्याची उपासना करून [यः यत् इच्छति तस्य तत्—] जो ज्या पर अथवा अपर ब्रह्माची इच्छा करतो त्याचें तें होतें. म्हणजे त्याला त्याची प्राप्ति होते. (उपासकाला परब्रह्माची जर इच्छा असेल तर त्याला तें ज्ञातव्य—जाणण्यास योग्य होतें व अपर ब्रह्माचें ओंकार हें आलंबन होऊन राहिलें आहे, अशी ज्या उपासकाची भावना असते त्याला तें प्राप्तव्य—प्राप्त करून घेण्यास योग्य होतें. कारण मीच ओंकाराश्रय पर ब्रह्म आहें, अशी भावना केल्यानें पहिल्या प्रकारच्या उपासकाला केवल साक्षात्कारार्थीच आवश्यकता असते. पण दुसऱ्या प्रकारचा म्हणजे अपर ब्रह्मोपासक मी उपासक निराळा व माझें हें उपास्य निराळें, अशी भावना करीत असल्यामुळें त्याला उत्तरायण मार्गानें जाऊन उपास्य अपर ब्रह्माला म्हणजे हिरण्यगर्भाला प्राप्त व्हावें लागतें.)१६.—ज्या अर्थी असें आहे त्या अर्थी ब्रह्मप्राप्तीची जी गायत्रीप्रभृति अनेक आलंबनें—आधार आहेत त्यात—

एतदालम्बनꣳ श्रेष्ठमेतदालम्बनं परम् । एत-
दालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ॥ १७

अन्वयार्थ—[एतत् आलंबनं श्रेष्ठं—] ओं हें श्रेष्ठ—सर्वांत अधिक प्रशंसनीय आलंबन आहे. [एतत् आलंबनं परं—] तसेंच पर व अपर ब्रह्म हा याचा विषय असल्यामुळें हें पर आलंबन व अपर आलंबन आहे. [एतत् आलंबनं ज्ञात्वा—] या आलंबनाला जाणून [ब्रह्मलोके महीयते—] ब्रह्म-

लोकात म्हणजे ब्रह्मरूप लोकांत—परब्रह्मामध्यें पूज्य होतो व अपर ब्रह्मांत ब्रह्मभूत—हिरण्यगर्भरूप होऊन त्या ब्रह्मप्रमाणें उपास्य होतो, असा इत्यर्थ. (म्हणजे परब्रह्मोपासकास ब्रह्मरूप मोक्ष व अपर ब्रह्मोपासकास अपरब्रह्मभावप्राप्ति हीं फलें मिळतात.) १७. या वल्लीच्या चवदाव्या मंत्रांत नचिकेतानें ज्या आत्म्याविषयीं प्रश्न केला होता त्या सर्वविशेषरहित वस्तूच्या आलंबनरूपानें व प्रतीकरूपानें आणि मंद व मध्यम उपासकाकरिता अपर ब्रह्माच्या आलंबनत्वानें व प्रतीकत्वानें ओंकाराचा वरील दोन मंत्रात निर्देश केला. आतां ओंकार हें ज्याचें आलंबन आहे, अशा त्या आत्म्याच्या साक्षात् स्वरूपाचा निश्चय करण्याच्या इच्छेनें मृत्यु असे सांगत आहे. साधनशून्य पुरुषाला उपदेश करणें व्यर्थ आहे, असें जाणून यमानें प्रथम निरनिराळ्या योग्यतेच्या अधिकाऱ्यांकरिता उच्च-नीच साधनें सांगून आतां साक्षात् वस्तूचें वर्णन करण्यास आरंभ केला आहे—

न जायते म्रियते वा विपश्चिन्नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे १८

अन्वयार्थ—[न जायते म्रियते वा—] हा आत्मा उत्पन्न होत नाही व मरत नाही. उत्पत्तिमान् अनित्य वस्तूला अनेक विक्रिया होतात. त्यांतील जन्म ही पहिली व विनाश ही शेवटची विक्रिया आहे. आत्म्याचें ठिकाणी त्या दोन्ही नाहींत, असा दुसऱ्या सर्व विकारांचाहि निषेध करण्यासाठी प्रथमतःच त्यांचा येथें निषेध केला आहे. कधींहि कोणत्याहि कारणानें लुप्त न होणारें चैतन्य हाच आत्म्याचा स्वभाव असल्यामुळें तो [विपश्चित्—] मेधावी—धारणाशक्तिमान् आहे. [अयं कुतश्चित् न—] तसाच हा आत्मा दुसऱ्या कोणत्याहि कारणापासून झालेला नाही व [कश्चित् न बभूव—] स्वतःच्या स्वरूपापासूनहि निराळाच कोणी पदार्थ झालेला नाही. यास्तव हा आत्मा [अजः नित्यः शाश्वतः—] अज, नित्य, शाश्वत म्हणजे अपक्षयरहित आहे. अपक्षय म्हणजे तारुण्य जाऊन वृद्धावस्था येऊं लागली असतां उत्तरोत्तर होणारा शक्त्यादिकांचा ऱ्हास. कारण जो अशाश्वत असतो त्याचा अपक्षय होतो. पण हा तर शाश्वत आहे. त्यामुळेंच [पुराणः—] पुराण म्हणजे पूर्वीहि नवाच. जो पदार्थ अवयवांचा उपचय—वृद्धि होणें, याच्या द्वारा म्हणजे अवयवांच्या उपचयाच्या द्वारा

निष्पन्न केला जातो ते सर्व नवा झाला आहे, असें समजतात. जसे—मातीचा घट, सुवर्णाचें कडें इत्यादि. पण आत्मा असा उत्पन्न झालेला नाहीं. म्हणून तो पुराण—बुद्धिशून्य आहे, असा याचा मथितार्थ जर अर्थ तो असा आहे त्या अर्थी [शरीरे हन्यमाने न हन्यते—] शरीराला शस्त्रादिकांच्या योगानें तोडीत असलें तरी तें मारला जात नाहीं. म्हणजे शरीरांत स्थित असलेला हा तो आकाशाप्रमाणेंच अविच्छिन्न राहतो. (त्याला कांहीं व्यथा होत नाहीं त्याची कांहीं हानि होत नाहीं. ब्रह्म स्थूल हून जर निराळें असतें तर त्या ब्रह्माच्या ठिकाणीं जन्मादिकांच्या प्रसक्तीचाच अभाव असल्यामुळें या मंत्रांतील त्याच्या जन्मादिकांचा प्रतिषेध व्यर्थ झाला असता. वास्तव जन्मादिकांच्या प्रतिषेधानें ब्रह्माचा उपदेश करणारा मृत्यु आत्मस्वरूपाचाच उपदेश करीत आहे, असा अर्थात् सिद्ध होतें मरणामुळें एखाद्या नास्तित्वाची शंका येत असते. पण आत्म्याच्या मरणाचाच निषेध केल्यामुळें तो अहे; कांहीं वाद्यांच्या समजुतीप्रमाणें 'परलोकसंबंधी देहातिरिक्त आत्मा नाहीं,' असें मुळींच नाहीं. असें नचिकेताच्या प्रश्नाचें उत्तर मृत्यूनें येथें दिलें आहे, असें जाणावें. सु. गी. अ. २८. पृ. २८. पहा.) १८.—पण असा प्रकारच्याहि आत्म्याला—

हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ १९

अन्वयार्थ—[हन्ता चेत् हन्तुं मन्यते—] शरीरालाच आत्मा समजणारा एखादा अज्ञ हन्ता—मारणारा 'मी याला मारीन' असें मनांत म्हणूं लागला व [हतः चेत् हतं मन्यते—] जो दुसराहि मारला गेलेला तो 'मी मारला गेलों आहें', असें समजूं लागला म्हणजे मी आत्म्याला मारलें व आत्मा मारला गेला, असें जाणणारे [उभौ तौ न विजानीतः—] ते दोघेहि आपल्याला—आत्म्याला—यथार्थस्वरूपाला जाणत नाहींत. कारण [अयं न हन्ति न हन्यते—] हा आत्मा अविक्रिय असल्यामुळें मारीत नाहीं व आकाशप्रमाणें अविक्रिय असल्यामुळेंच मारलाहि जात नाहीं. यास्तव धर्माधर्मादिरूप संसार हा आत्म्याला न जाणण्याच्या अज्ञाचाच विषय आहे. तो ब्रह्मज्ञाचा विषय नव्हे सु. गी. अ. १९. पृ. २८. पहा. १९.—आतां मुमुक्षु त्या आत्म्याला कसा जाणतो, ते यम सांगतो—

अणोरणीयान्महतो महीयानात्माऽस्य जन्तोर्निहितो गुहायाम् ।
तमक्रतुः पश्यति वीतशोको धातुप्रसादान्महिमानमात्मनः ॥ २०

अन्वयार्थ—[अणोः अणीयान्—] साव्याचा दाणा फार सूक्ष्म असतो. पण त्या सूक्ष्माहूनहि अधिक सूक्ष्म व [महतो महीयान् आत्मा—] पृथिवी-प्रभृति महत्परिमाणवान् पदार्थांहूनहि अधिक मोठा आत्मा आहे. 'पण एकच वस्तु अणु व महत् आहे, असें विरुद्ध कसें सांगतां,' असें कोणी विचारील म्हणून तें ब्रह्म अणुत्वादिकांच्या आरोपाचें अधिष्ठान असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं अणुत्वादिव्यवहार होतो. तो तात्त्विक नव्हे. त्यामुळें तसें म्हणणें विरुद्धहि नाहीं. [अस्य जन्तोः गुहायां निहितः—] तो आत्मा ब्रह्मादि स्तंबपर्यंत सर्व प्राण्यांच्या गुहेमध्यें म्हणजे हृदयात आत्मभूत होऊन राहिला आहे, असा इत्यर्थ. [तं अक्रतुः—] पाहणें, ऐकणें, मनन करणें, जाणणें, इत्यादि ज्याचीं लिंगें आहेत त्या आत्म्याला अक्रतुः—अकाम म्हणजे दृष्ट व अदृष्ट बाह्य विषयांविषयीं ज्याची बुद्धि विरक्त झाली आहे, असा अकाम पुरुष पाहतो; आणि तो जेव्हां अशा रीतीनें निष्काम होतो तेव्हां [धातुप्रसादात्—] मन इत्यादि करणें, हेच शरीर धारण केल्यामुळें धातू, प्रसन्न होतात. मन इत्यादि धातूंच्या प्रसादानें साधक [आत्मनः महिमानं—] कर्मामुळें वृद्धि क्षय इत्यादि विकारांस प्राप्त न होणें, या आत्म्याच्या महिम्यास [पश्यति—] पाहतो. तोच महिमावान् मी आहें, असें साक्षात् जाणतो आणि त्यामुळें [वीतशोकः—] शोकरहित होतो. २०.—नाहींतर, हा आत्मा कामी प्राकृत पुरुषांना दुर्विज्ञेयच आहे, कारण—

आसीनो दूरं व्रजति शयानो याति सर्वतः ।
कस्तं मदामदं देवं मदन्यो ज्ञातुमर्हति ॥ २१

अन्वयार्थ—[आसीनो दूरं व्रजति—] हा आत्मा एकत्र अचल अवस्थित असतांनाच फार दूर जातो; व [शयानो सर्वतः याति—] शयन करीत असतांनाच सर्व बाजूस जातो. [तं मदामदं देवं मदन्यः कः ज्ञातुं अर्हति—] अशा प्रकारें हा आत्मा देव मदयुक्त व मदरहित म्हणजे सहर्ष व हर्षरहित अर्थात् विरुद्ध धर्मवान् आहे. त्यामुळें त्याला जाणणें अशक्य आहे. यास्तव त्या देवाला मजवांचून दुसरा कोण जाणण्यास समर्थ आहे ? आमच्यासारख्या सूक्ष्मबुद्धि पंडितालाच हा आत्मा सुविज्ञेय होतो. स्थिति-गति, नित्य-अनित्य इत्यादि अनेक विरुद्ध धर्म, या उपाधींनी युक्त असल्यामुळें तो स्वतः विरुद्ध धर्मवान्सा

होऊन चिंतामणीप्रमाणें अनेकरूप भासतो. यास्तव माझ्यावांचून दुसरा कोण त्याला जाणण्यास समर्थ आहे, असें ह्मणून मृत्यु त्याचें दुर्ज्ञेयत्व सांगत आहे. इंद्रियांचा उपशम हेंच शयन होय. निजणाऱ्या पुरुषाच्या इंद्रियजनित एकदेशी विज्ञानाचा उपशम होत असतो. पण जेव्हां असें होतें तेव्हां विशेष विज्ञान जरी नसलें तरी त्याला केवल सामान्य विज्ञान असतें. त्यामुळें जणुं काय तो सर्वतः जातो. पण तो जेव्हां विशेष विज्ञानांत स्थित असतो ह्मणजे जागत असतो, इंद्रियांच्या द्वारा घटादि विशेष वस्तूंचें ज्ञान त्याला होत असतें, तेव्हां देहरूपानें तो जरी एकाच जागीं स्थिर असला तरी मन इत्यादिकांचें गमनादि होऊं लागलें असतां, नीं (मन-आदि इंद्रियें) त्याच्या उपाधि असल्यामुळें, आत्माच जणुं काय दूर जातो. पण वस्तुतः तो देह असलेल्या जागींच असतो. २१.—आणि त्याच्या साक्षात्कारानें शोकाचें उल्लंघन करितां येतें, असेंहि यम दाखवितो—

अशरीरꣳ शरीरेष्वनवस्थेष्ववस्थितम् ।
महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥ २२

अन्वयार्थ—[शरीरेषु—] देव, पितर, मनुष्य इत्यादि शरीरांत [अशरीरं—] स्वतःच्या रूपानें आत्मा आकाशतुल्य आहे;त्या अशरीराला—आकाशाप्रमाणें अशरीर असलेल्या आत्म्याला,[अनवस्थेषु—]अवस्थितिरहित म्ह० अनित्य पदार्थांमध्यें [अवस्थितं—] नित्य, निर्विकार असा याचा भावार्थ; [महान्तं विभुं आत्मानं—] महान्, पण हें महत्त्व आपेक्षिक—इतरांच्या अपेक्षेनें असेल, अशी आशंका आली असतां मंत्र म्हणतो—विभु—व्यापी आत्म्याला—येथील आत्मशब्दाचें ग्रहण स्वतः— स्वाभाविक अनन्यत्व प्रदर्शित करण्यासाठी आहे. कारण आत्मशब्द प्रत्यगात्मा या अर्थींच मुख्य आहे. त्या आत्म्याला 'हा मी असें [मत्वा—] मानून—समजून [धीरः—] धीमान् [न शोचति—] शोक करीत नाहीं. कारण, अशाप्रकारच्या आत्मवेत्त्याच्या शोकाची उपपत्ति नाहीं. २२.—जरी हा आत्मा असा दुर्विज्ञेय आहे तथापि उपायानें सुविज्ञेय होतो, असें यम सांगतो—

नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूꣳ स्वाम् २३

अन्वयार्थ—[अयं आत्मा प्रवचनेन न लभ्यः—] हा आत्मा अनेक

वेदांचा स्वीकार केल्यानें—पठनेल्यानें लभ्य जे होत नाहीं. [न मेधया-] ग्रंथाचा अर्थ धारण करण्या शक्तीनें व [न बहुना श्रुतेन—] केवल पुष्कळ श्रवणानेंहि म्हणजे सिद्ध न होणारा उपदेश व चूक कोरडा अभ्यास बुद्धीनें केलेला उपनिषदादि या विद्यांनीं अथवा आत्मप्रतिपादक उपनिषद ग्रंथ इतर शास्त्रांच्या विचारानें तो ज्ञेय होत नाहीं. तर मग तो कशाच्या उपयोगानें ज्ञेय होतो, तें सांगितलें जातें—[यं एव एष वृणुते—] ज्या स्वात्म्य लाभ हा साधक प्रार्थितो [तेन लभ्य—] त्याच प्रार्थना करणाऱ्या आत्म्याकडून तो स्वतः—आत्मा लभ्य होतो, साक्षात् जाणला जातो, असा याचा अर्थ. निष्कर्म व आत्म्याचीच प्रार्थना करणाऱ्या साधकाला आत्म्याच्या योगानेंच आत्मा प्राप्त होतो, असा इयर्थ. अर्थात तो कसा प्राप्त होतो तें सांगितलें जातें- [तस्य एषः आत्मा स्वां तनुं विवृणुते-] त्या आत्मकाम पुरुषाचा हा आत्मा आपली स्वाभाविक—पारमार्थिक तनु—आपलें याथात्म्य आपणच प्रकाशित करते. (जो साधक श्रवण-मननादिकाच्या योगानें स्वात्म्याचेंच सेवन करतो, श्रवणादिकांच्या वळींहि तो मी आहें, अशा अभेद-भावानेंच त्याचें अनुसंधान करतो त्याला परमात्मा व उपदेशक आचार्य यांच्या अनुग्रहानें आत्मरूपानेंच परमात्मा प्राप्य होतो. अथवा अंतर्यामिरूपानें किंवा आचार्यरूपानें व्यवस्थित असलेला परमात्माच मुमुक्षूवर अनुग्रह करतो, आणि ज्याच्यावर आत्म्याचाच अनुग्रह झाला आहे त्या अभेदानुसंधानवान् साधकालाच आत्मा लभ्य होतो.) २६.—शिवाय—

नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः ।
नाशान्तमानसो वाऽपि प्रज्ञानेनैनमाप्नुयात् ॥ २४

अन्वयार्थ—[दुश्चरितात्—] दुश्चरितापासून—शारीरपापापासून—निषिद्ध—श्रुति व स्मृति यांनीं विधान न केलेल्या पापकर्मापासून [न अविरतः—] निवृत्त न झालेला, त्याचप्रमाणे [न अशान्तः—] इंद्रियाच्या लौल्यापासून—चंचलतेस सोडून शांत न झालेला; [न असमाहितः—] असमाहितचित्त—ज्याचें मन एकाग्र नाहीं, विक्षिप्तचित्त; किंवा समाहितचित्त असला तरी फलाची इच्छा निवृत्त झालेली नसल्यामुळें [न वा अशान्तमानसः—] अशांतचित्त, ज्याचें चित्त व्यापार करीत आहे असा पुरुष [प्रज्ञानेन एनं आप्नुयात्—] केवल ब्रह्मज्ञानानें या प्रस्तुत आत्म्यास प्राप्त होत नाहीं. तर जो दुष्कर्मापासून निवृत्त झालेला, इंद्रियांच्या

चंचलतेचा त्याग केलेला, एकाग्रचित्त व एकाग्रतेच्या फलापासून हि ज्याचें चित्त अगदीं शांत झालें आहे, असा आचार्यवान् साधक ब्रह्मविज्ञानानें पूर्वोक्त आत्म्यास प्राप्त होतो असा याचा भावार्थ. ४—परंतु जे अशा प्रकारचा नाहीं, जो पूर्वोक्त साधनांनीं संपन्न नसतो तो आत्म्याला कसा जाणणार? असें यम म्हणतो—

यस्य ब्रह्म च क्षत्रं च उभे भवत ओदनः ।
मृत्युर्यस्योपसेचनं क इत्था वेद यत्र सः ॥ २५

इति काठकोपनिषदि प्रथमाध्याये द्वितीया वल्ली समाप्ता ॥ २

अन्वयार्थ—[यस्य—] ज्या आत्म्याचा [ब्रह्म च क्षत्रं च—] सर्व धर्मांचें धारण करणारे ब्राह्मण व सर्वांचें त्राण रक्षण करणारे क्षत्रिय असेहि [उभे—] दोन जातीचे लोक [ओदनः भवत—] भात—खाण्याचा पदार्थ होतात; [मृत्युः यस्य उपसेचनं—] सर्वांचे हरण करणाराहि मृत्यु ज्याच्या ओदनाचें नुस्तें कालवण, तोंडी लावणें होतो, म्हणजे जो त्याचें अन्नहि होण्यास पुरेसा नाहीं; तर भाजीसारखा आहे, त्या आत्म्याला [कः—] पूर्वोक्त साधनशून्य व प्राकृत-बुद्धि असा कोण [इत्था—] अशा प्रकारें, पूर्वोक्त साधनवानांप्रमाणें असा भावार्थ; [वेद—] जाणणार? [यत्र सः—] ज्या स्वतःच्या महिम्यामध्यें तो विश्वाचा संहार करणारा आत्मा राहतो त्या अशा महिम्यानें युक्त असलेल्या त्याला कोण जाणणार, असा याचा भावार्थ. सु ब्र १. २. २. ४८ पहा. २५. २.

'ऋतं पिबन्तौ०' या तिसऱ्या वल्लीचा मागच्या वल्लीशीं संबंध असा—वरील वल्लींत विद्या व अविद्या नाना व विरुद्ध फल देणाऱ्या आहेत, असा उल्लेख केला पण फलासह त्याचा पूर्णपणें निर्णय केला नाहीं. त्यांचा सफल निर्णय करण्यासाठी प्रसिद्ध रथाच्या सादृश्याची कल्पना येथें केली आहे. त्या कल्पनेनें आत्मज्ञान मुकर होतें तसेंच प्राप्त करणारा व प्राप्य, जाणारा व जावयास योग्य यांचा विवेक करण्याकरितां येथें दोन आत्म्यांचा उपन्यास केला जातो—

ऋतं पिबन्तौ सुकृतस्य लोके गुहां प्रविष्टौ परमे परार्धे (र्ध्ये) ।
छायातपौ ब्रह्मविदो वदन्ति पञ्चाग्नयो ये च त्रिणाचिकेताः ॥ १

अन्वयार्थ—[ऋतं पिबन्तौ—] ऋत म्हणजे सत्य—अवश्य होणारं असल्यामुळें कर्मफल. त्यास प्राशन करणारे दोघे. पण त्यांतील एक—जीव कर्मफल भोगतो, दुसरा—ईश्वर भोगीत नाहीं; तथापि तोहि भोक्त्याशीं संबद्ध

झालेला असतो. ह्मणून त्या दोघांनाहि 'प्राशन करणारे' असें छत्रिन्यायानें ह्मटलें आहे. (कांहीं लोकांचा समूह जात असला व त्यांतील कांहीं जणांपाशीं छत्र्या असून बाकींच्यापाशीं त्या नसल्या तरी दुरून त्यांस पाहणारा 'ते पहा छत्रीवाले जात आहेत,' असें ह्मणून छत्रीवाल्यांबरोबर छत्रीवांचून असलेल्या लोकांचा उल्लेख करितो. यालाच छत्रीन्याय ह्मणतात. या न्यायानें कर्मफल-भोक्त्या जीवाबरोबर अभोक्त्या साक्षीलाहि भोक्ता ह्मटलें आहे. कशाचें फल भोगणारे, तें मंत्र सांगतो—) [सुकृतस्य—] ह्मणजे स्वतः केलेल्या कर्माचें फल भोगणारे असा 'ऋतं पिबन्तौ' या पूर्व शब्दाशी संबंध. [लोके—] या शरीरांत. (अर्थात्—'ऋतं पिबन्तौ सुकृतस्य लोके-' या मंत्राचा सरळ अर्थ असा—या शरीरांत स्वयं केलेल्या कर्माचें फल भोगणारे दोघे) [गुहां प्रविष्टौ—] बुद्धिरूप गुहेंत प्रविष्ट झालेले, त्या गुहेंतील परम परार्धांत प्रविष्ट झालेले, [परमे परार्ध्ये—] परम ह्मणजे श्रेष्ठ व परार्ध्य ह्मणजे पर ब्रह्माचें स्थान; देहाश्रित आकाशाच्या अपेक्षेनें बुद्धिस्थ आकाश श्रेष्ठ आहे व त्यांतच पर ब्रह्माचा साक्षात्कार होत असतो. यास्तव तसल्या परम परार्ध्यांत—हृदयस्थ आकाशांत ते दोघे प्रविष्ट झालेले आहेत, असा याचा अर्थ. [छायातपौ ब्रह्मविदो वदन्ति—] पण ते छाया व ऊन ह्मणजे अंधकार व प्रकाश यांप्रमाणें संसारित्व व असंसारित्व यांच्या योगानें परस्पर विलक्षण आहेत, असें ब्रह्मवेत्ते सांगतात. केवल कर्मे न करणारे ज्ञानीच सांगतात, असें नाहीं तर [पञ्चाग्नयो ये च त्रिणाचिकेताः—] ज्यांनीं तीन विभाग करून अथवा तीनदा नाचिकेत अग्नीचें चयन केलें आहे ते त्रिणाचिकेत व पंचाग्निमान् गृहस्थहि तसें सांगतात. (गार्हपत्य, दक्षिण, आहवनीय, सभ्य व आवसथ्य हे पांच अग्नी ज्यांनीं ठेवलेले असतात अथवा छान्दोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांत सांगितलेल्या अग्निविद्येप्रमाणें द्युलोक, पर्जन्य, पृथिवी, पुरुष व स्त्री या पांच पदार्थांत जे अग्निदृष्टि करितात ते पंचाग्निमान्, असें येथें जाणावें. या मंत्रांत अवश्य भोक्तव्य कर्मफलाचा भोग घेणारे दोघे सांगितले आहेत. त्यांतील एक तर चेतन जीव आहे, यांत संशयच नाहीं. पण दुसरा कोण ? अशी शंका आली असतां लौकिकन्यायास अनुसरून त्याच्याच स्वभावाचा परमात्मा दुसरा असावा, असा प्रत्यय येतो. पण त्याला जीवसंबंधामुळें प्राप्त होणारें जें 'भोक्ता' असें विशेषण तें औप-

चारिक आहे, मुख्य नव्हे. सु. ब्र. १. २. ३. पृ. ५० पहा.) १.—पण तसले ब्रह्मवेत्ते व कर्मठ पंचाग्निवेत्ते हल्लीं दिसत नाहींत, असें कोणी म्हणेल म्हणून यम सांगतो—

यः सेतुरीजानानामक्षरं ब्रह्म यत्परम् ।
अभयं तितीर्षतां पारं नाचिकेतꣳ शकेमहि ॥ २

अन्वयार्थ—[यः ईजानानां सेतुः—] जो कर्मठ यजमानांना दुःखांतून चांगल्या रीतीनें तरून जाण्याकरितां लौकिक सेतूसारखा—पुलासारखा—सेतुच, [नाचिकेतं शकेमहि—] असा नाचिकेत अग्नि त्याला जाणण्यास म्हणजे त्याची उपासना करण्यास व त्याचें चयन करण्यास आम्ही समर्थ होतों. त्याचप्रमाणें [अभयं पारं तितीर्षतां—] जें अभय—भयशून्य संसारपार त्याला तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या ब्रह्मवेत्त्या पुरुषांचें [यत् अक्षरं परं ब्रह्म—] जें परम आश्रयभूत आत्माख्य अक्षर ब्रह्म त्याला साक्षात् जाणण्यास आम्ही [शकेमहि—] समर्थ होतों. (आम्हांमध्येंहि प्राचीन लोकांमध्यें असलेलें तेंच चेतन ब्रह्म असल्यामुळें आमच्यामध्येंहि ब्रह्मज्ञानाची योग्यता स्वाभाविकपणेंच आहे. कर्मवेत्त्यांचा आश्रय अपर ब्रह्म व ब्रह्मवेत्त्यांचा आश्रय पर ब्रह्म हीं दोन्ही जाणावीं, असा या सर्व वाक्याचा अर्थ. ' ऋतं पिबन्तौ० ' या वरील मंत्रानेंहि या दोन प्रकारच्या ब्रह्माचाच उपन्यास केला आहे.)२.—वर सांगितलेल्या त्या दोन आत्म्यांमध्यें जो उपाधीमुळें परिच्छिन्न झालेला संसारी—विद्या व अविद्या यांचा अधिकारी म्ह० मोक्ष प्राप्त करून घेण्याकरितां विद्येमध्यें व संसारप्राप्तीकरितां अविद्येमध्यें ज्याचा अधिकार आहे त्याचें मोक्ष व संसार या दोन्ही फलांस जाऊन पोंचण्याचें साधन अशा रथाची कल्पना येथें केली जाते—

आत्मानꣳ रथिनं विद्धि शरीरꣳ रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥ ३

अन्वयार्थ—[आत्मानं—] त्या दोन भोक्त्यांतील जो कर्मफलरूप ऋताचें पान करणारा संसारी आत्मा त्याला तूं [रथिनं विद्धि—] रथी—रथाचा स्वामी जाण. [शरीरं रथमेव तु—] शरीर हा त्याचा रथ आहे. कारण तें शरीर रथास जोडलेल्या घोड्यांच्या जागी असलेल्या इंद्रियांकडून आकर्षण केलें जात असतें. [बुद्धिं तु सारथिं विद्धि—] निश्चय हेंच जिचें स्वरूप आहे, त्या बुद्धीला

तूं सारथि समज. कारण रथाला इष्ट स्थानी नेऊन पोंचविणार सा थि जस स्वतंत्र असतो त्याप्रमाणें शरीराच्याहि इष्ट कार्यांत प्रवृत्त करणारी बुद्धि प्रधान आहे. प्रायः सर्व देहगत कार्य बुद्धीचेंच कर्तव्य असतें, आणि [मनः प्रग्रहमेव च—] संकल्प-विकल्पादिरूप मन हाच प्रग्रह—रशना—लगाम आहे, अस जाण. कारण रशनेनें म्हणजे लगामानें जसे घोडे आवरून धरले जातात अथवा त्याच्या योगान ते इष्ट मार्गानें प्रवृत्त केले जातात, त्याप्रमाणें मनानेंच धारण केलेलीं श्रोत्रादि इंद्रिय आपापल्या विषयग्रहणरूप कार्यांत प्रवृत्त होत असतात. ३.

इन्द्रियाणि हयानाहुर्विषयांस्तेषु गोचरान् ।
आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥ ४

अन्वयार्थ—शरीर रथ आहे, अशी कल्पना करण्यांत कुशल असलेले विद्वान् [इंद्रियाणि हयान् आहुः—] चक्षुरादि इंद्रियांस घोडे म्हणतात. कारण शरीराला व रथाला ओढणें, हा धर्म इंद्रियें व घोडे याच्यामध्यें समान आहे. इंद्रियांची घोड्यांच्या रूपानें कल्पना केल्यावर [विषयान् तेषु गोचरान्—] रूप-रसादि विषय हे त्या घोड्यांचे जाण्याचे मार्ग असतात, असें जाण. याचवर—मंत्र ३—रथस्वामी म्हणून ज्याची कल्पना केली आहे त्या आत्म्याचें भोक्तृ व स्वाभाविक नव्हे, असें आतां यम सांगतो—, [मनीषिणः आत्मेन्द्रियमनोयुक्तम्—] विवेकी लोक शरीर, इंद्रियें व मन यांनी सहित—संयुक्त असलेल्या आत्म्याला [भोक्ता इति आहुः—] भोक्ता, संसारी असें म्हणतात. केवल आत्म्याला भोक्तृत्व नाहीं. तर बुद्ध्यादि-उपाधीमुळेंच त्याला भोक्तृत्व आहे. ' ध्यायतीव, लेलायतीव ' बृ.४.३.७. इत्यादि दुसरी श्रुति केवल आत्म्याचें अभोक्तृत्वच दाखवीत आहे. बुद्ध्यादि उपाधीमुळें तो आत्मा ध्यान करीत असल्यासारखा, क्रिया करीत असल्यासारखा भासतो, असा वरील श्रुतिवचनाचा अर्थ आहे. अर्थात् आत्म्याचें भोक्तृत्व औपाधिक आहे; ४—असें असल्यामुळें—

यस्त्वविज्ञानवान्भवत्ययुक्तेन मनसा सदा ।
तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः ॥ ५

अन्वयार्थ—[यः तु अविज्ञानवान् भवति—] जो बुद्धिसंज्ञक सारथि, रथ कसा चालवावा हें न जाणणाऱ्या इतर लौकिक सारथ्याप्रमाणें, अनिपुण—प्रवृत्ति कोठें करावी व निवृत्त कशापासून व्हावें, याचा विवेक करण्यास असमर्थ

असतो व [अयुक्तेन मनसा सदा–] अयुक्त–अप्रगृहीत–अशांत प्रग्रहस्थानीय मनानें सदा युक्त असतो [तस्य–] त्या अकुशल बुद्धिसारथ्याचीं [इन्द्रियाणि–] अश्वस्थानीय इंद्रियें [अवश्यानि–] अवश–अशक्य–अनिवारणीय असतात. [दुष्टाश्वाः इव सारथेः–] लौकिक सारथ्याला दुष्ट घोड्यांचें, दमन न केलेल्या घोड्यांचें निवारण करणें जसें अशक्य होतें त्याप्रमाणें बुद्धिसारथ्याला इंद्रियाश्वांचा निग्रह करतां येत नाही. ५.

यस्तु विज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा ।
तस्येन्द्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥ ६

अन्वयार्थ—[तु यः विज्ञानवान् च युक्तेन मनसा सदा भवति–] पण जो सारथि विज्ञानवान् व समाहित मनानें सदा युक्त असतो [इंद्रियाणि तस्य वश्यानि–] इंद्रियें त्याचा अधीन राहतात. [सदश्वाः सारथेः इव–] उत्तम घोडे जसे लौकिक सारथ्याचा अधीन असतात त्याप्रमाणें (इंद्रियाश्व निगृहीतचित्तवान् बुद्धिसारथ्याच्या अधीन राहतात.) ६.

यस्त्वविज्ञानवान्भवत्यमनस्कः सदाऽशुचिः ।
न स तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति ॥ ७

अन्वयार्थ—[तु यः अविज्ञानवान् अमनस्कः सदा अशुचिः भवति–] जो अविज्ञानवान्, अनिगृहीतमनस्क व त्यामुळेंच सदा अशुचि असतो [सः तत् पदं न आप्नोति–] तो त्या पदास प्राप्त होत नाहीं. [च संसारं अधिगच्छति–] तर उलट संसाराला प्राप्त होतो ७.

यस्तु विज्ञानवान्भवति समनस्कः सदा शुचिः ।
स तु तत्पदमाप्नोति यस्माद्भूयो न जायते ॥ ८

अन्वयार्थ—[तु यः विज्ञानवान् समनस्कः सदा शुचिः भवति–] परंतु जो दुसरा रथी ह्मणजे विद्वान् विज्ञानवान् सारथ्यानें युक्त असतो, समाहितचित्त असतो व त्यामुळेंच सदा शुचि असतो [सः तु तत् पदं आप्नोति–] तो त्या पदास प्राप्त होतो, की [यस्मात् भूयः न जायते–] ज्या प्राप्त झालेल्या पदापासून च्युत होऊन पुनः या कष्टकर संसारांत उत्पन्न होत नाहीं. तर त्या पदापासून अप्रच्युत होतो ८.–आतां तें पद कोणतें तें हा मंत्र सांगतो––

विज्ञानसारथिर्यस्तु मनःप्रग्रहवान्नरः ।
सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम् ॥ ९

अन्वयार्थ—[तु यः नरः—] जो पूर्वोक्त विद्वान् नर [विज्ञानसारथिः—] विवेकयुक्त बुद्धिसारथ्याने युक्त व [मनः-प्रग्रहवान्—] प्रगृहीतचित्त, समाहित-चित्त होऊन सदा शुचि असतो [सः अध्वनः पारं आप्नोति—] तो संसार-गतीच्या पारास, अवश्य प्राप्तव्य असलेल्या परब्रह्मासच प्राप्त होतो, असा इत्यर्थ. सर्व संसारबंधनांपासून मुक्त होतो. ज्याला विद्वान् प्राप्त होतो [तद्विष्णोः परमं पदम्—] तें व्यापनशील वासुदेवसंज्ञक ब्रह्माचें—परमात्म्याचें परम—सर्वोत्कृष्ट पद—स्थान—स्वरूप आहे.९—आतां ज्या पदास जावयाचें त्याचें स्थूल इंद्रियांपासून आरंभ करून सूक्ष्मतेच्या न्यूनाधिकताक्रमानें प्रत्यगात्मरूपानें ज्ञान करून द्यावें, म्हणून हें पुढील वचन आरंभिलें जातें—

इन्द्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान्परः ॥ १०

अन्वयार्थ—[इंद्रियेभ्यः पराः हि अर्थाः—] इंद्रियें तर स्थूल आहेत. तीं ज्या शब्द-स्पर्शादि विषयांकडून आपल्या प्रकाशनार्थ आरंभलेली आहेत त्या स्वकार्यरूप इंद्रियांहून स्वतः विषय सूक्ष्म, महत्परिमाणवान् व नित्यस्वरूपभूत आहेत. [अर्थेभ्यः च परं मनः—] त्या विषयांहूनहि मन अधिक सूक्ष्म, महत व नित्यस्वरूपभूत आहे. येथें मन म्हणजे मनःशब्दवाच्य व मनाचें आरंभक भूतसूक्ष्म, असें समजावें. कारण त्याला संकल्प-विकल्पादिकांचें आरंभकत्व आहे. [मनसः तु परा बुद्धिः—] मनाहूनहि बुद्धिशब्दवाच्य निश्चयादिकांचें आरंभक भूतसूक्ष्म अधिक सूक्ष्म, अधिक महत् व अपायरहित स्वरूपभूत आहे. [बुद्धेः आत्मा महान् परः—] बुद्धीहून आत्मा महान् व पर आहे. तो सर्व प्राण्यांच्या बुद्धींचा प्रत्यगात्मा—अनपायिस्वरूप असल्यामुळें ' आत्मा ' व त्याला सर्वांहून अधिक महत्त्व असल्यामुळें तो ' महान् ' होय. अव्यक्तापासून प्रथम झालेलें जें हिरण्यगर्भसंबंधी बोधाबोधात्मक तत्त्व तोच हा महान् आत्मा बुद्धीहून पर, असें म्हटलें जातें. याविषयी अधिक विचार काठकभाष्यांत पहावा. १०

महतः परमव्यक्तमव्यक्तात्पुरुषः परः ।
पुरुषान्न परं किंचित्सा काष्ठा सा परा गतिः ॥ ११

अन्वयार्थ—[महतः परं अव्यक्तम्—] पूर्व मंत्रांत सांगितलेल्या महतहून-हि पर ह्मणजे अधिक सूक्ष्म, अनपायिस्वरूप व सर्वांहून अधिक महत् अव्यक्त आहे. तें सर्व जगाचें बीजभूत, अव्याकृत—अव्यक्तनामरूपस्वरूप, सर्व कार्य-कारणशक्तिसमाहाररूप, अव्यक्त, अव्याकृत, आकाश इत्यादि नावांनीं निर्देश करण्यास योग्य व वडाच्या बिजांतील एकेका सूक्ष्म कणामध्यें जशी वडाच्या झाडाची शक्ति असते त्याप्रमाणें परमात्म्याच्या ठिकाणीं ओतप्रोतभावानें आश्रय धरून राहिलेलें आहे. [अव्यक्तात्पुरुषः परः—]त्या सर्वशक्तिसमूहरूप अव्यक्ता-हून पुरुष सर्व कारणांचें कारण असल्यामुळें अधिक सूक्ष्म व अनपायिस्वरूप असल्यामुळें महान् आहे. सर्व सृष्टीला भरून सोडल्यामुळें तो पुरुष होय. आतां त्याहून आणखी कांही अधिक सूक्ष्म असेल असें कोणाला वाटेल ह्मणून त्या प्रसंगाचें निवारण करीत मृत्यु ह्मणतो—[पुरुषात् न परं किंचित्—] पुरुषाहून पर दुसरें कांहीं नाहीं. [सा काष्ठा—] ज्या अर्थीं चिन्मात्रघन पुरुषा-हून श्रेष्ठ, किंवा अधिक सूक्ष्म अशी दुसरी वस्तु नाहीं त्याअर्थीं सूक्ष्मत्व, महत्त्व व प्रत्यगात्मत्व यांची ती काष्ठा—निष्ठा—पर्यवसान—अंत—सीमा आहे. इंद्रि-यांपासून जी उत्तरोत्तर सूक्ष्मत्वादिकांची परंपरा लागली होती तिची येथें परि-समाप्ति होते. [सा परा गतिः—] ह्मणूनच गमन करणाऱ्या सर्व गतिमान् संसारी जीवांची ती सर्वोत्कृष्ट गति आहे. सु.गीता अ. ३-४२. पृ. ७६. अ. १५.६.पृ.२८०. सु. ब्र. अ.१ पा.४ अ.१ पृ.१०५. ११.—पण येथें 'गति-' शब्दाचा गमन हा मुख्य अर्थ विवक्षित नाही तर प्राप्ति हा अमुख्य अर्थ विवक्षित आहे, असें सुचविण्यासाठी हा मंत्र पुरुषाला सर्वांचें प्रत्यगात्मत्व आहे, असें दाखवितो—

एष सर्वेषु भूतेषु गूढोऽऽत्मा न प्रकाशते ।
दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ॥ १२

अन्वयार्थ—[एषः सर्वेषु भूतेषु गूढः आत्मा न प्रकाशते—] हा पुरुष ब्रह्मादिस्तंबपर्यंत सर्व भूतांत गूढ—आच्छादित—पाहणें, ऐकणें इत्यादि कर्मे करणारा व अविद्यामायेनें आच्छादित; ह्मणूनच तो सर्वांचा आत्मा. पण तो गूढ असल्याकारणानें हा माझा आत्मा आहे, अशा रीतीनें कोणालाहि प्रकाशमान होत नाहीं. (तो जर कोणालाच प्रकाशमान होत नसेल ह्मणजे कोणाच्याच

अनुभवास येत नसेल तर तो मुळी नाहीच, असेंहि नाही तर–) [तु सूक्ष्मदर्शीभिः अग्रया सूक्ष्मया बुद्ध्या दृश्यते–]सूक्ष्मदर्शी लोकांकडून ह्म० 'इंद्रियांहून विषय पर आहेत. ' इत्यादि पूर्वोक्त प्रकारें सूक्ष्मतेचें पारंपर्य पाहिल्यानें अत्यंत सूक्ष्म पाहण्याचें ज्यांचें शील आहे अशा सूक्ष्मदर्शींकडून संस्कारयुक्त –एखाद्या बारिक अग्रासारख्या सूक्ष्म–एकाग्रतेनें युक्त–सूक्ष्म वस्तूचें निरीक्षण करण्यांत तत्पर अशा बुद्धीनें तें तत्त्व पाहिलें जातें. १२.–आतां मृत्यु त्याच्या ज्ञानाचा उपाय सांगतो––

यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेज्ज्ञान आत्मनि ।
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि १३

अन्वयार्थ––[प्राज्ञः वाक् मनसि यच्छेत्–] विवेकी पुरुषानें वाक्-इंद्रियाचा मनांत उपसंहार करावा. (येथील 'मनसी ' हा दीर्घ पाठ छांदस आहे व 'वाक्-'शब्द इतर इंद्रियांच्या उपलक्षणार्थ आहे.) [तत् ज्ञाने आत्मनि यच्छेत्–] त्या मनाचा प्रकाशस्वरूप आत्म्यांत–बुद्धीत उपसंहार करावा. बुद्धि मन-आदि इंद्रियांना व्यापते ह्मणून ती त्यांचा आत्मा–प्रत्यक्. [ज्ञानं महति आत्मनि नियच्छेत्–] बुद्धीचा महान् आत्म्यामध्यें उपसंहार करावा; आणि [तत् शान्ते आत्मनि यच्छेत्–] त्या महान् आत्म्याचा शान्त निर्विशेष अविक्रिय सर्वान्तर बुद्धिप्रत्ययसाक्षी अशा मुख्य आत्म्यामध्यें उपसंहार करावा. १३.–याप्रमाणें पुरुष आत्म्यामध्यें सर्वकार्यांचा प्रविलय करून कृतकृत्य होतो. यास्तव––

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत । क्षुरस्य धारा
निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ॥ १४

अन्वयार्थ––हे अनादि अविद्येनें शयन केलेल्या पुरुषांनो–[उत्तिष्ठत–] उठा; [जाग्रत–] अज्ञाननिद्रेपासून जागे व्हा. सर्व अनर्थांचें बीज अशा त्या अज्ञाननिद्रेचा क्षय करा. तो कसा करावा ? उत्तर–[वरान् प्राप्य निबोधत–] आत्मज्ञ श्रेष्ठ आचार्यांस प्राप्त होऊन–त्यांना शरण जाऊन आत्म्याला जाणा. [क्षुरस्य निशिता धारा दुरत्यया–] वस्तऱ्याची धार चांगली पाजळली असतां ती जशी दुरुल्लंघ्य होते [तत् दुर्गं पथः कवयः वदन्ति–] त्याप्रमाणें तो तत्त्वज्ञानरूपी मार्ग फार कठिण–दुःसंपाद्य आहे, असें विद्वान् ह्मणतात १४. –तें ज्ञेय आत्मतत्त्व अति सूक्ष्म कसें ? तें सांगितलें जातें. ही स्थूल पृथ्वी

तर शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध यांनी उपचित—वृद्धि पावलेली व सर्व इंद्रियांचा विषय होणारी आहे. हें शरीरहि तसेंच आहे. त्यांतील उत्तरोत्तर गंधादि गुणांतील एकेका गुणाचा अपकर्ष—क्षय होऊन जलापासून आकाशापर्यंत जीं चार भूतें आहेत त्यांमध्येंहि उत्तरोत्तर सूक्ष्मत्व, महत्त्व, अधिक शुद्धत्व, नित्यत्व इत्यादिकांचें तारतम्य होत असल्याचें अनुभवास येतें. पण ते गंधापासून शब्दापर्यंत सर्वच विकार जेथें नाहीत त्या आत्मतत्त्वाला सूक्ष्मत्वादिकांचें निरतिशयत्व आहे, हें काय सांगावें, असें श्रुति दाखविते—

अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं तथाऽरसं नित्यमगन्धवच्च यत् ।
अनाद्यनन्तं महतः परं ध्रुवं निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते १५

अन्वयार्थ—[अशब्दं अस्पर्शं०—] अशब्द, अस्पर्श, अरूप, अव्यय, तसेंच अरस व जें नित्य अगंधयुक्त, अनादि, अनन्त, महत्तत्त्वाहून पर, व ध्रुव—कूटस्थ नित्य [तत् निचाय्य मृत्युमुखात् प्रमुच्यते—] अशा आत्मतत्त्वाला—ब्रह्माला साक्षात् जाणून मृत्युमुखांतून जीव मुक्त होतो १५.—या प्रस्तुत विज्ञानाची स्तुति करण्यासाठीं श्रुति म्हणते—

नाचिकेतमुपाख्यानं मृत्युप्रोक्तꣳ सनातनम् ।
उक्त्वा श्रुत्वा च मेधावी ब्रह्मलोके महीयते ॥ १६

अन्वयार्थ—[नाचिकेतं—] नचिकेत्यानें प्राप्त केलेलें व [मृत्युप्रोक्तं—] मृत्यूनें सांगितलेलें, व वैदिक असल्यामुळें [सनातनं—] चिरंतन—चिरकाल टिकणारें [उपाख्यानं—] असें हें तीन वल्लीनी युक्त असलेलें उपाख्यान [उक्त्वा श्रुत्वा च—] ब्राह्मणास सांगून व आचार्याच्या मुखानें ऐकून [मेधावी—] महाबुद्धिमान् साधक [ब्रह्मलोके—] ब्रह्म हाच लोक त्या ब्रह्मलोकांत [महीयते—] पूज्य होतो. सर्वांचा आत्माच होऊन उपास्य होतो, असा याचा भावार्थ. १६

य इमं परमं गुह्यं श्रावयेद्ब्रह्मसꣳसदि । प्रयतः श्राद्धकाले
वा तदानन्त्याय कल्पते तदानन्त्याय कल्पत इति ॥ १७

इति काठकोपनिषदि प्रथमाध्याये तृतीया वल्ली समाप्ता ॥३

इति काठकोपनिषदि प्रथमोऽध्यायः समाप्तः ॥ १

अन्वयार्थ—[यः इमं परमं गुह्यं—] जो कोणी हा परम गुह्य—अतिशय गुप्त ठेवण्यास योग्य असलेला ग्रंथ;[ब्रह्मसंसदि—]ब्राह्मणांच्या सभेंत [प्रयतः—]

शुचिर्भूत होऊन ग्रंथरूपानें—अक्षररूपानें पाठमात्र करून अथवा अर्थतः [श्रावयेत्—] ऐकवील [वा श्राद्धकाले—] किंवा श्राद्धसमयीं ब्राह्मण भोजनास बसले असतां त्यांना हा ऐकवितो [तत् आनन्त्याय कल्पते—] त्याचें तें श्राद्ध अनन्त फल देण्यास समर्थ होतें. या मंत्राच्या शेवटीं 'तदानन्त्याय कल्पते' या पदांची द्विरुक्ति अध्यायाच्या समाप्तीकरितां केली आहे १७. ३.(१)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रहांतील काठकोपनिषदाचा प्रथमाध्याय समाप्त झाला

हा सर्व भूतांमध्यें गूढ असलेला आत्मा प्रकाशमान होत नाही. तो अतिसूक्ष्म बुद्धीनें दिसतो, असें वर सांगितलें. पण 'सूक्ष्म बुद्धीचा प्रतिबंधक कोण आहे, कीं ज्याच्या योगानें—सूक्ष्मतेच्या अभावामुळें आत्मा पाहिला जात नाही,' असें कोणी विचारील म्हणून त्याच्या दर्शनाचें कारण दाखविण्याकरितां ही वल्ली आरंभिली जाते. कारण श्रेयाच्या—कल्याणाच्या प्रतिबंधाचें कारण कळलें असतां त्याच्या निरसनार्थ यत्न आरंभिता येतो. त्यावांचून तो करितां येत नाही, म्हणून मृत्यु म्हणतो—

पराञ्चि खानि व्यतृणत्स्वयंभूस्तस्मात्पराङ्पश्यति नान्तरात्मन् ।
कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षदावृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन् ॥ १

अन्वयार्थ—[पराञ्चि—] पराक्—बाहेर अञ्चन्ति—जातात म्हणून 'परांचि'—बाहेर जाणारीं [खानि—] छिद्रें, गोलक, त्यांवरून उपलक्षित होणारीं श्रोत्रादि इंद्रियें 'खानि' म्हणून म्हटलीं जातात. ती बाहेरच शब्दादिविषयप्रकाशन करण्यासाठीं प्रवृत्त होतात. कारण ती अशा स्वभावांचीं [व्यतृणत्—] मारता झाला. त्यांचें हनन केलें, असा भावार्थ. कोणीं हनन केलें ? [स्वयंभूः—] परमेश्वर, स्वतःच सर्वदा स्वतंत्र असतो, परतंत्र नसतो, म्हणून स्वयंभू. (त्यांना बहिर्मुख करणें हें त्यांचें हननच होय. कारण इंद्रियें जर अंतर्मुखस्वभावाचीं असतीं तर तीं आत्मनिष्ठ होऊन अमृतत्वास प्राप्त झालीं असतीं. यास्तव त्यांना अंतर्मुख न होऊं देतां स्वभावतःच बहिर्मुख करणें म्हणजे त्यांना मारणेंच होय.) आणि ज्याअर्थीं त्यांना अशीं बहिर्मुख मारलीं आहेत [तस्मात्—] त्याअर्थीं [पराङ्—] बहिर्-रूप—अनात्मभूत शब्दादिकांस [पश्यति—]

विषयांचा अनुभव घेणारा जीव पाहतो. [अन्तरात्मन् न—] अंतरात्म्यास पहात नाहीं पण लोकांचा असा स्वभाव जरी असला तरी [कश्चित् धीरः—] कोणी एखादा बुद्धिमान् विवेकी, नदीला प्रवाहाच्या उलट दिशेनें प्रवृत्त करण्याप्रमाणें इंद्रियांच्या प्रवाहास प्रतिबंध करून [प्रत्यगात्मानं ऐक्षत—] प्रत्यगात्म्यास पाहतो. कोणी एखादाच विवेकी प्रत्यगात्म्यास—आपल्या स्वभावास पाहतो. मूळ मंत्रांत 'ऐक्षत' असें भूतकाळी रूप जरी असलें तरी छंदांमध्यें—वैदिक प्रयोगांत कालाचा नियम नसल्यामुळें 'पाहता झाला' असा अर्थ न करतां 'पाहतो' असाच करावा. तो कसा पाहतो, तें सांगितलें जातें—[आवृत्तचक्षुः—] ज्याचीं श्रोत्रादि सर्व इंद्रियें सर्व विषयांपासून परतलीं आहेत तो आवृत्तचक्षु होय. तो अशा रीतीनें संसारयुक्त झालेला साधक प्रत्यगात्म्यास पाहतो. बाह्यविषयालोचनपरायण होणें व प्रत्यगात्म्यास पाहणें, हीं दोन्ही एकाच वेळीं एकालाच करतां येत नाहीत. पण अशा मोठ्या प्रयासानें स्वाभाविक प्रवृत्तीचा निरोध करून बुद्धिमान् प्रत्यगात्म्यास कशाकरितां पाहतो, तें सांगितलें जातें.—[अमृतत्वं इच्छन्—] अमृतत्व—अमरणधर्मत्व, नित्यस्वभावता; आत्म्याच्या अथवा आपल्या अमरधर्मत्वाची इच्छा धरून साधक त्याला पाहतो. (अर्थात् मोक्षाची इच्छा हें आत्मदर्शनाचें निमित्त आहे.)१.—स्वाभाविक बाह्य अनात्मदर्शन ही अविद्या व बाह्य विषयतृष्णा, यांनीं ज्यांच्या आत्मदर्शनास प्रतिबंध केला आहे असे—

पराचः कामाननुयन्ति बालास्ते मृत्योर्यन्ति विततस्य पाशम् ।
अथ धीरा अमृतत्वं विदित्वा ध्रुवमध्रुवेष्विह न प्रार्थयन्ते ॥ २

अन्वयार्थ—[ये बालाः—] जे बाल—अल्पप्रज्ञ [पराचः कामान्] बाह्य—बहिर्गत विषयांच्याच [अनुयन्ति—] मागें लागत असतात आणि त्या कारणानें [ते—] ते [विततस्य मृत्योः—] विस्तीर्ण—सर्वतः व्याप्त असलेल्या अविद्या-काम-कर्मसमुदायरूप मृत्यूच्या [पाशं—] पाशास—ज्याच्या योगानें बांधलें जातें त्या पाशास; देह, इंद्रियें इत्यादिकांच्या संयोग-वियोगरूप पाशास [यन्ति—] प्राप्त होतात. सतत जन्म-मरण-जरा-रोग इत्यादि अनेक अनर्थसमूहास प्राप्त होतात, असा याचा भावार्थ. [अथ] ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं [धीराः—] विवेकी—साधक [अमृतत्वं ध्रुवं विदित्वा—] प्रत्यगात्मस्वरूपावस्थानरूप—प्रत्य-

गात्म्याच्या स्वरूपानें राहणें, एतद्रूप अमृतत्वच ध्रुव–नित्य आहे, असें जाणून; कारण देवादिकांचें अमृतत्व अध्रुव आहे. पण हें प्रत्यगात्मस्वरूपावस्थानरूप अमृतत्व 'कर्माच्या योगानें वाढत नाहीं व कमीहि होत नाही,' म्हणून ध्रुव आहे. यास्तव अशा प्रकारच्या कूटस्थ–अविचाल्य, निर्विकार, एकरूप अमृतत्वास जाणून ब्राह्मण [इह–] अनर्थप्राय अशा या संसारांतील [अध्रुवेषु–] सर्व अनित्य पदार्थांपैकी [न प्रार्थयन्ते–] कशाचीहि प्रार्थना–आशा करीत नाहींत. कारण त्यांतील एखाद्या वस्तूचीहि आशा प्रत्यगात्मदर्शनाच्या प्रतिकूल आहे. पुत्र, वित्त व लोक या एषणांपासून ते व्युत्थानच करितात; असा याचा भावार्थ. २.–ब्राह्मण ज्याच्या विज्ञानावांचून दुसऱ्या कशाचीहि आकांक्षा करीत नाहींत त्या ब्रह्माचें ज्ञान कसें होतें, तें या मंत्रांत सांगितलें जातें—

येन रूपं रसं गन्धं शब्दान्स्पर्शांश्च मैथुनान् ।
एतेनैव विजानाति किमत्र परिशिष्यते । एतद्वै तत् ॥३

अन्वयार्थ—[येन रूपं रसं गन्धं शब्दान् स्पर्शान् च मैथुनान् विजानाति–] ज्याच्यायोगानें रूप, रस, गन्ध, शब्द, स्पर्श आणि मैथुनजन्य सुखानुभव यांस स्पष्टपणें सर्व लोक जाणतो तो [एतेन एव विजानाति–] या आत्म्याच्या योगानेंच जाणतो. [अत्र किं परिशिष्यते–] त्या आत्म्याला अविज्ञेय, असें या जगांत काय अवशिष्ट रहातें? (कांही नाही.) [एतत् वै तत्–] हेंच तें नचिकेतानें विचारलेलें तत्त्व होय. ३.–ब्रह्म अतिसूक्ष्म असल्यामुळें दुर्विज्ञेय आहे, असें समजून मृत्यु पूर्वोक्त अर्थच पुनः पुनः सांगतो—

स्वप्नान्तं जागरितान्तं चोभौ येनानुपश्यति ।
महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति ॥ ४

अन्वयार्थ—[स्वप्नान्तं–] स्वप्नातील विज्ञेय [च जागरितान्तं–] व जागरितांतील विज्ञेय [उभौ येन अनुपश्यति–] ही दोन्ही ज्या आत्म्याच्या योगानें पहातो [महान्तं विभुं आत्मानं मत्वा–] त्या महान्, विभु, आत्म्याला आत्मत्वानें जाणून [धीरः न शोचति–] धीमान् शोक करीत नाही. ४.–ब्रह्माला साक्षात् आत्मभावानें–मीच तें असें जाणणारा विद्वान् शोक करीत नाही.४ तसेंच–

य इमं मध्वदं वेद आत्मानं जीवमन्तिकात् ।
ईशानं भूतभव्यस्य न ततो विजुगुप्सते । एतद्वै तत् ॥ ५

अन्वयार्थ—[यः इमं मध्वदं जीवं आत्मानं अन्तिकात् **भूतभव्यस्य ईशानं** वेद—] जो कोणी या कर्मफलभोक्त्या, प्राणादिसमूहाच्या धारक **जीवाला—आत्म्याला** समीप राहून भूत, भविष्यत् (आणि वर्तमान) यांचा शास्ता जाणतो तो [ततः न विजुगुप्सते—] त्या विज्ञानानंतर आत्म्याचें रक्षण करण्याची इच्छा करीत नाही. [एतत् वै तत्—] हेंच तें तत्त्व होय. ५.—ज्या प्रत्यगात्म्याचा ईश्वरभावानें निर्देश केला आहे तोच सर्वात्मा, असें आतां यम सांगतो—

यः पूर्वं तपसो जातमद्भ्यः पूर्वमजायत । गुहां
प्रविश्य तिष्ठन्तं यो भूतेभिर्व्यपश्यत । एतद्वै तत् ॥ ६

अन्वयार्थ—[यः पूर्वं तपसः जातं—] जो मुमुक्षु प्रथम तपापासून—ज्ञानादिरूप ब्रह्मापासून उत्पन्न झालेल्या हिरण्यगर्भाला ' प्रथम ' **ह्म०**—[अद्भ्यः पूर्वं अजायत—] जो जलादि पंचभूतांच्या पूर्वी झाला त्याला, [**गुहां** प्रविश्य भूतेभिः तिष्ठन्तं व्यपश्यत—] हृदयाकाशांत प्रवेश करून भूतांसह **असणाऱ्या** त्याला पाहता झाला तो [एतत् वै तत्—] हेंच पाहता झाला. ६.—तसेंच—

या प्राणेन संभवत्यदितिर्देवतामयी । गुहां
प्रविश्य तिष्ठन्ती या भूतेभिर्व्यजायत । एतद्वै तत् ॥ ७

अन्वयार्थ—[या देवतामयी अदितिः—] जी सर्व देवतारूप **अदिति ह्म०** श०दादि विषयांचें भक्षण करणारी—अनुभव घेणारी [प्राणेन संभवति—] परमात्म्यापासून हिरण्यगर्भरूपानें उत्पन्न होते [गुहां प्रविश्य तिष्ठन्ती—] जी पूर्वीप्रमाणेंच गुहेत प्रविष्ट होऊन राहिली आहे (तिचेच विशेषण—) [या भूतेभिः व्यजायत—] जी भूतासह वर्तमानच झाली आहे [एतत् वै तत्—] तेंच नचिकेतानें विचारलेलें तत्त्व आहे. ७.—तसेंच—

अरण्योर्निहितो जातवेदा गर्भ इव सुभृतो गर्भिणीभिः ।
दिवे दिव ईड्यो जागृवद्भिर्हविष्मद्भिर्मनुष्येभिरग्निः । एतद्वै तत् ८

अन्वयार्थ—[यः अरण्योः निहितः जातवेदाः] जो यज्ञांत दोन **अरणी**च्या मध्यभागी स्थित असलेला जातवेद—अग्नि [गर्भिणीभिः गर्भः **इव सुभृतः**—] गर्भिणी स्त्रियांकडून जसा गर्भ त्याप्रमाणें योग्यांकडून शरीरांत चांगल्या रीतीनें पोसला गेला आहे; त्याप्रमाणें [दिवे दिवे जागृवद्भिः हविष्मद्भिः मनुष्येभिः

ईड्यः अग्निः—] प्रत्यही प्रमादशून्य व हविष्यांनीं युक्त अशा मनुष्यांकडून जो स्तुत्य आहे तो अग्निच [एतत् वै तत्—] हें प्रकृत ब्रह्म आहे. ८.

यतश्चोदेति सूर्योऽस्तं यत्र च गच्छति । तं देवाः
सर्वे अर्पितास्तदु नात्येति कश्चन । एतद्वै तत् ॥ ९

अन्वयार्थ—[यतः च सूर्यः उदेति—] ज्यापासून सूर्य प्रत्यहीं उत्थान पावतो—उदय पावतो [च यत्र अस्तं गच्छति—] व ज्या प्राणांत अस्त पावतो [तं सर्वे देवाः अर्पिताः—] त्या प्राणात्म्यामध्यें अग्न्यादिक व वागादिक सर्व देव स्थितिकालीं चांगल्या रीतीनें प्रविष्ट केलेले आहेत. [कश्चन तत् उ न अत्येति—] कोणीहि त्याचें उल्लंघन करीत नाहीं. [एतत् वै तत्—] तेंच तें ब्रह्म होय. ९.—जें ब्रह्मादि स्थावरान्त पदार्थांमध्यें राहणारें व सृष्टीतील प्रत्येक वस्तु ही त्याची उपाधि झाल्यामुळें अब्रह्मप्रमाणें—परिच्छिन्नत्वानें भासणारें संसारी जीवतत्त्व तें पर ब्रह्माहून भिन्न आहे, अशी कोणाला शंका येऊं नये, म्हणून यम म्हणतो—

यदेवेह तदमुत्र यदमुत्र तदन्विह ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥ १०

अन्वयार्थ—[यत् एव इह—] हें जें येथें कार्य-करण-उपाधियुक्त व अविवेक्याप्त संसारधर्मयुक्त असल्यासारखें वाटणारें स्वशरीरस्थ जीवतत्त्व [तत् अमुत्र—] तेंच त्या जगत्कारणत्व-उपाधीत नित्यविज्ञानघनस्वभाव सर्वसंसारधर्मशून्य ब्रह्म आहे, व [यत् अमुत्र—] जें परमात्म्यामध्यें स्थित असलेलें ब्रह्म [तत् अनु इह—] तेंच हें येथें नाम-रूप-कार्य-करणोपाधीच्या अनुसार भासणारें आत्मतत्त्व आहे. पण असें असतांना [यः इह नान' इव पश्यति—] जो अविद्येनें मोहित झालेला या अनानाभूत—एकरूप ब्रह्मामध्यें मी परमात्म्याहून भिन्न व पर ब्रह्म मजहून भिन्न असें नानात्व—भेद पाहतो जणुं काय नानासें पाहतो [सः मृत्योः मृत्युं आप्नोति—] तो एका मृत्यूपासून दुसऱ्या मृत्यूस—पुनः पुनः जन्म-मरण-भावास प्राप्त होतो. (यास्तव तशी भेददृष्टि ठेवूं नये. तर विज्ञानैकरस, निरंतर, आकाशाप्रमाणें परिपूर्ण ब्रह्मच मी आहें, अशी दृष्टि ठेवावी, असा भावार्थ.)१०.

मनसैवेदमाप्तव्यं नेह नानाऽस्ति किंचन ।
मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नानेव पश्यति ॥११

अन्वयार्थ—[मनसा एव इदं आप्तव्यं–] एकत्वविज्ञानापूर्वी आचार्योपदेश व आगम यांच्या योगानें सुसंस्कृत मनानेंच हें तत्त्व व्यापण्यास–जाणण्यास योग्य आहे. [इह किंचन नाना न अस्ति–] ब्रह्मामध्यें अणुमात्रहि नानात्व ' नाहीं. [यः इह नाना इव पश्यति–] जो या ब्रह्मामध्यें नानासें पाहातो [सः मृत्योः मृत्युं गच्छति–] तो मरणापासून मरणास प्राप्त होतो. मरणपरंपरेंत पडतो. ११.–पुनरपि तेंच प्रकृत ब्रह्म यम सांगतो—

अङ्गुष्ठमात्रः पुरुषो मध्य आत्मनि तिष्ठति ।
ईशानो भूतभव्यस्य न ततो विजुगुप्सते । एतद्वै तत् ॥ १२

अन्वयार्थ—[अंगुष्ठमात्रः पुरुषः मध्ये आत्मनि तिष्ठति–] अंगुष्ठप्रमाण पुरुष मध्य आत्म्यांत–शरीरांत राहतो. (हृदयकमल अंगुष्ठपरिमाण आहे. वास्तव त्याच्या छिद्रांत राहणारा–अन्तःकरणोपाधि अंगुष्ठमात्र आहे. वेळूच्या अंगुष्ठपरिमाण पेरांत जसें आकाश अंगुष्ठपरिमाण असतें, तसाच तो पुरुष अंगुष्ठपरिमाण आहे.) [भूतभव्यस्य ईशानः] भूत व भविष्यत् अशा सर्वांचा ईशान आहे. [तं विदित्वा–] त्याला जाणून [ततः न विजुगुप्सते–] आपलें रक्षण करण्याची इच्छा करीत नाही. [एतत् वै तत्–] नचिकेतानें विचारलेलें तेंच हें आहे. सु. ब्र. १. ३. ७. पृ. ८५ पहा.१२.–तसेंच—

अङ्गुष्ठमात्रः पुरुषो ज्योतिरिवाधूमकः । ईशानो
भूतभव्यस्य स एवाद्य स उ श्वः । एतद्वै तत् १३

अन्वयार्थ—[अंगुष्ठमात्रः पुरुषः ज्योतिः इव अधूमकः–] अंगुष्ठमात्र पुरुष ज्योतीसारखा धूमरहित आहे, [भूतभव्यस्य ईशानः–] असा जो भूत व भविष्यत् याचा ईशान–शास्ता [सः एव अद्य सः उ श्वः–] तोच वर्तमानसमयी आहे व तोच उद्यां भविष्यत्काळी असणार. [एतत् वै तत्–] हेंच तें नचिकेतानें विचारलेलें ब्रह्म आहे. १२–पुनरपि भेददर्शनाचा अपवाद सांगतात–

यथोदकं दुर्गे वृष्टं पर्वतेषु विधावति ।
एवं धर्मान्पृथक्पश्यंस्तानेवानुविधावति ॥ १४

अन्वयार्थ—[यथा दुर्गे वृष्टं उदकं पर्वतेषु विधावति–] ज्याप्रमाणें दुर्गम –उंच स्थानी वृष्टीच्या योगानें पडलेलें जल पर्वतयुक्त सखलप्रदेशीं इतस्ततः पसरून विनाश पावतें [एवं धर्मान् पृथक् पश्यन्–] त्याप्रमाणें आत्म्याना पृथक्

पाहणारा [तान् एव अनुविधावति—] त्या भिन्नात्मत्वालाच प्राप्त होतो. (पुनः पुनः पृथक् शरीरभेदासच प्राप्त होतो.) १४.—पण जो विद्वान् आहे, ज्याचें उपाधिकृत भेददर्शन विध्वंस पावलें आहे, जो अतिशुद्ध, विज्ञानघनैकरस व अद्वय आत्म्यास पहात आहे अशा विज्ञानी, मननशील मुनीचें आत्मस्वरूप कसें संभवतें, तें यम सांगतो—

यथोदकं शुद्धे शुद्धमासिक्तं तादृगेव भवति ।
एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम ॥ १५

अन्वयार्थ—[यथा शुद्धे आसिक्तं शुद्धं उदकं तादृक् एव भवति—] ज्याप्रमाणें शुद्ध—प्रसन्न जलांत टाकलेलें शुद्ध जल तसेंच—एकस्वरूप होतें [एवं गौतम विजानतः मुनेः आत्मा भवति—]त्याप्रमाणें हे गौतमा, विज्ञानी मुनीचा आत्मा एकरस ब्रह्मरूप होतो,(यास्तव कुतार्किकांची भेददृष्टि व नास्तिकांची कुदृष्टि यांचा त्याग करून सहस्रावधि माता व पिते यांहूनहि अधिक हिताची इच्छा करणाऱ्या वेदानें उपदेशिलेलें तें आत्मैकत्वदर्शन निरभिमान रुषांनी अंगीकारावें; सर्व दर्प सोडून त्याचा आदर करावा. असा याचा इत्यर्थ.) १५. १.

हितवचन वारंवार सांगावें अशी नीति असल्यामुळे अतिशय हित, पण अत्यंत दुर्ज्ञेय अशा ब्रह्माचा दुसऱ्या प्रकारें उपदेश करण्यासाठी पुढील ग्रथाचा आरंभ

पुरमेकादशद्वारमजस्यावक्रचेतसः । अनुष्ठाय
न शोचति विमुक्तश्च विमुच्यते । एतद्वै तत् ॥ १

अन्वयार्थ—[अवक्रचेतसः अजस्य पुरं एकादशद्वारं—] नित्य विज्ञानस्वरूप अज आत्म्याचें पुर अकरा द्वारांनीं युक्त आहे. [अनुष्ठाय न शोचति—] त्याचें ध्यान करून पुरुष शोक करीत नाहीं. [विमुक्तः च विमुच्यते—] तर तो या शरीरांत असतांनाच काम कर्मादिबंधनांनी मुक्त होऊन विमुक्त होतो; पुनः शरीर धारण करीत नाहीं, [एतत् वै तत्—] हेंच तें ब्रह्म आहे. १.—तो पुरस्वामी आत्मा एकाच शरीररूपी नगरांत रहाणारा नाही तर सर्व पुरांत राहणारा आहे. तो कसा? उत्तर—

हंसः शुचिषद्वसुरन्तरिक्षसद्धोता वेदिषदतिथिर्दुरोणसत् ।
नृषद्वरसदृतसद्व्योमसदब्जा गोजा ऋतजा अद्रिजा ऋतं बृहत् २

अन्वयार्थ—[हंसः—] तो गमन करणारा, [शुचिषद्—] आदित्यरूपानें आकाशांत जाणारा, [वसुः—] सर्वांना वसविणारा, [अन्तरिक्षसद्—] वायुरूपानें अंतरिक्षात गमन करणारा [होता—] होता—अग्नि, [वेदिषद्—] पृथ्वींत जाणारा [अतिथिः दुरोणसद्—] सोम होऊन कलशांत जाणारा, [नृषद्—] मनुष्यांत गमन करणारा, [वरसद्—] देवांत जाणारा, [ऋतसद्—] सत्य अथवा यज्ञ यांत जाणणारा [व्योमसद्—] आकाशांत जाणारा, [अब्जा—] जलांत होणारा, [गोजा—] पृथ्वीत होणारा, [ऋतजा—] यज्ञांगरूपान होणारा, [अद्रिजा—] पर्वतांमध्यें होणारा, [ऋतं—] सत्यस्वभाव [बृहत्—] व महान् आहे (या व या पूर्वीच्या मंत्राचा सविस्तर अर्थ काठकभाष्यार्थांत पहा.) २—आतां हा मंत्र आत्म्याच्या स्वरूपाचें ज्ञान करून देणारें लिंग सांगतो—

ऊर्ध्वं प्राणमुन्नयत्यपानं प्रत्यगस्यति ।
मध्ये वामनमासीनं विश्वे देवा उपासते ॥ ३

अन्वयार्थ—[प्राणं ऊर्ध्वं उन्नयति—] जो प्राणवृत्तिरूप वायूला हृदयापासून वर जावयास लावतो. त्याचप्रमाणें [अपानं प्रत्यक् अस्यति—] अपानाला खाली फेकतो [मध्ये आसीनं वामनं—] त्या हृदयकमलाकाशांत असलेल्या वामनास—भजनीयास [विश्वे देवाः उपासते—] सर्व देव भजतात. (वामनारा म्हणजे ज्याचा विज्ञानरूप प्रकाश बुद्धीत व्यक्त होतो त्या उत्तम प्रकारें भजन करण्यास योग्य असलेल्या आत्म्यास व देव म्हणजे चक्षुरादि प्राण—इंद्रियें. त्या बुद्धिस्थ भजनीय वामनास चक्षुरादि देव रूप-रसादि विषयविज्ञान हाच बलि आणून देऊन, कर आणून देणारे वैश्य जसे राजाची उपासना करितात त्याप्रमाणें उपासितात. सर्व इंद्रियें व प्राण त्या हृदयस्थ वामनाकरितां सतत व्यापार करीत राहतात, असा याचा भावार्थ. अर्थात् ज्याच्या करितां व ज्याच्या प्रेरणेनें हे सर्व वायु व इंद्रियें यांचे व्यापार चालतात तो कोणी यांहून निराळाच आहे, असें सिद्ध झालें.) ३.—तसेंच—

अस्य विस्रंसमानस्य शरीरस्थस्य देहिनः । देहाद्वि-
मुच्यमानस्य किमत्र परिशिष्यते । एतद्वै तत् ॥ ४

अन्वयार्थ—[अस्य विस्रंसमानस्य शरीरस्थस्य देहिनः—] विस्रंस पावणाऱ्या ध्वंस पावणाऱ्या या शरीरस्थ जीवस्याचें—देहवानाचें; ' विस्रंसन ' शब्दाचा

अर्थ—[देहात विमुच्यमानस्य—] देहापासून अगदी पृथक् होणाऱ्या, अशा देहीचें [अत्र किं परिशिष्यते—] मागें या शरीरांत प्राणादिसमुदायांतील काय अवशिष्ट राहतें ? कांहीं अवशिष्ट रहात नाहीं. नगराचा स्वामी पळून गेला असतां त्या नगरांत राहणाऱ्यांची जशी दुर्दशा होते त्याप्रमाणें जो आत्मा निघून गेला असतां एका क्षणांतच कार्यकरणसमुदायरूप असें हें सर्व हतबल—विध्वस्त होतें, सर्वथा नष्ट होतें तो कोणी दुसराच आहे, असें ठरलें. [एतद्वै तत्—] नचिकेतानें ज्याविषयीं प्रश्न केला होता तें तत्त्व हेंच होय. ४.—अहोपण, प्राणापानादि वायु निघून गेल्यानेंच शरीराचा विध्वंस होतो. आत्मा गेल्यानें नव्हे. कारण प्राणी प्राणापानामुळेंच जिवंत राहतो, उत्तर—

न प्राणेन नापानेन मर्त्यो जीवति कश्चन ।
इतरेण तु जीवन्ति यस्मिन्नेतावपाश्रितौ ॥ ५

अन्वयार्थ—[कश्चन मर्त्यः प्राणेन न अपानेन न जीवति—] कोणताहि मर्त्य प्राणानें नाहीं व अपानानेंहि जिवंत रहात नाहीं. तर [यस्मिन् एतौ उपाश्रितौ—] ज्याच्यामध्यें हे दोघे आश्रित आहेत [तेन तु इतरेण जीवन्ति—] त्यांहून निराळ्याच आत्म्याच्या योगानें ते—मर्त्य जिवंत राहतात. ५.

हन्त त इदं प्रवक्ष्यामि गुह्यं ब्रह्म सनातनम् ।
यथा च मरणं प्राप्य आत्मा भवति गौतम ॥ ६

अन्वयार्थ—[हन्त ते इदं गुह्यं सनातनं ब्रह्म प्रवक्ष्यामि—] बरें तर आतां मी तुला तें गुह्य, सनातन ब्रह्म सांगेन. [मरणं प्राप्य—] मरणास प्राप्त होऊन [आत्मा यथा भवति—] आत्मा जसा होतो, [तत् गौतम शृणु—] तें हे गौतमा, ऐक. ६.—

योनिमन्ये प्रपद्यन्ते शरीरत्वाय देहिनः ।
स्थाणुमन्येऽनुसंयन्ति यथाकर्म यथाश्रुतम् ॥ ७

अन्वयार्थ—[अन्ये देहिनः शरीरत्वाय योनिं प्रपद्यन्ते—] कित्येक देहवान् शरीरधारणार्थ योनिद्वारास प्राप्त होतात. योनींत प्रवेश करितात. [अन्ये यथाकर्म यथाश्रुतं स्थाणुं अनुसंयन्ति—] दुसरे कित्येक पापी आपल्या कर्माप्रमाणें व विज्ञानाप्रमाणें वृक्षादि स्थावरभावास प्राप्त होतात. ७.

य एष सुप्तेषु जागर्ति कामं कामं पुरुषो निर्मिमाणः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदेवामृतमुच्यते । तस्मिँल्लोकाः
श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन । एतद्वै तत् ॥ ८

अन्वयार्थ—[यः एषः सुप्तेषु कामं कामं निर्मिमाणः पुरुषः जागर्ति–] जो हा प्राणादिक निजले असतां स्त्र्यादि निरनिराळ्या इष्ट विषयांना निर्माण करणारा पुरुष जागतो [तत् एव शुक्रं तत् ब्रह्म–] तेंच शुद्ध व तें ब्रह्म आहे. [तत् एव अमृतं उच्यते–] तेच अमृत म्हटलें जातें. [सर्वे लोकाः तस्मिन् श्रिताः–] सर्व लोक त्याचाच आश्रय करून राहिले आहेत. [कश्चन तत् उ न अत्येति–] कोणीहि त्याचें उल्लंघन करून जात नाहीं. [एतत् वै तत्–] हेंच तें ब्रह्म आहे. ८.–अनेक तार्किकांच्या कुबुद्धीनें ज्यांचीं चित्तें विशेष प्रकारें चाळविली गेली आहेत, म्हणजे ज्यांच्या बुद्धीचा भेद केला गेला आहे व त्यामुळें ज्यांच्या बुद्धि सरळ नाहीत अशा ब्राह्मणांच्या चित्तांत प्रमाणांनीं युक्त ठरलेलेंहि आत्मैकत्वविज्ञान, वारंवार सांगितलें गेलें तरी, दृढ होत नाही. एवढ्यासाठी त्याचें प्रतिपादन करण्याविषयी मोठा आदर बाळगणारी श्रुति पुनः पुनः म्हणते—

अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ।
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥ ९

अन्वयार्थ—[यथा एकः अग्निः भुवनं प्रविष्टः रूपं रूपं प्रतिरूपः बभूव–] ज्याप्रमाणें एक अग्नि भुवनात प्रविष्ट होऊन प्रतिवस्तूप्रमाणें होतो; काष्ठादि दाह्य पदार्थांच्या आकाराचा होतो [तथा एकः सर्वभूतान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपः–] त्याप्रमाणें एक, सर्व भूताचा अन्तरात्मा ज्या देहांत प्रविष्ट झालेला असतो त्या रूपाचा होतो [बहिः च–] व त्याच्या बाहेरहि असतो. (ज्या लाकडाला जाळावयाचें त्याला आपल्या तेजानें सभोंवार ग्रासल्यावर अग्निहि त्याच्यासारखाच लांब, रुंद, उंच इत्यादि दिसतो, हें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें आत्मा उपाधिसदृश होतो.) ९. दुसरा दृष्टान्त—

वायुर्यथैको भुवनं प्रविष्टो रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ।
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥ १०

अन्वयार्थ—[यथा एकः वायुः भुवनं प्रविष्टः—] जसा एक वायु भुवनांत—या लोकी—प्राणरूपानें देहांत प्रविष्ट होऊन [रूपं रूपं प्रतिरूपः बभूव—] प्रत्येक पदार्थाच्या प्रतिरूप होतो, [तथा एकः सर्वभूतान्तरात्मा—] तसाच एक सर्व भूतान्तरात्मा [रूपं रूपं प्रतिरूपः—] प्रत्येक रूपाप्रमाणें प्रतिरूप झाला [बहिः च—] व बाहेरहि आहे. १०.—एक परमात्माच जर सर्वांचा आत्मा असेल तर सुखित्व-दुःखित्वादि संसार त्यालाच प्राप्त होईल, या शंकेचें समाधान—

सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षुर्न लिप्यते चाक्षुषैर्बाह्यदोषैः ।
एकस्तथा सर्वभूतान्तरात्मा न लिप्यते लोकदुःखेन बाह्यः ॥११

अन्वयार्थ—[यथा सूर्यः सर्वलोकस्य चक्षुः—] सूर्य जसा सर्व लोकाचा चक्षुहि असून [चाक्षुषैः बाह्यदोषैः न लिप्यते—] चक्षूच्या बाह्य दोषांनी लिप्त होत नाही [तथा एकः सर्वभूतान्तरात्मा लोकदुःखेन न लिप्यते—] तसा एक सर्वभूतान्तरात्मा लोकदुःखानें लिप्त होत नाही. [बाह्यः—] तर बाह्य—अन्यासापासून अगदी दूर असतो. ११.

एको वशी सर्वभूतान्तरात्मा एकं रूपं बहुधा यः करोति ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् १२

अन्वयार्थ—[यः एकः—] जो एक, [वशी—] सर्वांना वश ठेवणारा, [सर्वभूतान्तरात्मा—] सर्वभूतान्तरात्मा [एकं रूपं बहुधा करोति—] एकाच विज्ञानरूपाला बहुधा करतो [तं आत्मस्थं—] त्या बुद्धिस्थ आत्म्याला [ये धीराः—] जे विवेकी [अनुपश्यन्ति—] आचार्य व आगम याच्या उपदेशानंतर पाहतात [तेषां शाश्वतं सुखं—] त्यांना शाश्वत सुख होतं. [इतरेषां न—] इतरांना—अविवेक्यांना होत नाही. १२.

नित्योऽनित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान् ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां शान्तिः शाश्वती नेतरेषाम् १३

अन्वयार्थ—[यः अनित्यानां नित्यः—] जो विनाश पावणाऱ्या पदार्थांतील अविनाशिरूप आहे, [चेतनानां चेतनः—] जो ब्रह्मादिचेतनांतील चेतन आहे, [यः एकः बहूनां कामान् विदधाति—] जो एक अनेकांना कर्मफलरूप काम देतो [तं आत्मस्थं ये धीराः अनुपश्यन्ति—] त्या बुद्धिस्थ आत्म्याला जे बुद्धिमान

पाहतात [तेषां शाश्वती शान्तिः—] त्यांना नित्य शान्ति प्राप्त होते. [इतरेषां न—] इतरांना ती प्राप्त होत नाही. १३.

तदेतदिति मन्यन्तेऽनिर्देश्यं परमं सुखम् । कथं
नु तद्विजानीयां किमु भाति विभाति वा ॥ १४

अन्वयार्थ—[तत् अनिर्देश्य परमं सुखं एतत् इति मन्यन्ते—] तें अनिर्वाच्य सर्वोत्तम आत्मविज्ञानसुख वाङ्मनसातीत जरी आहे तरी निष्काम ब्राह्मण तें प्रत्यक्षच आहे असें मानितात. [कथं नु तत् विजानीयां—] कोणत्या प्रकारानें बरें मी तें जाणूं शकेन ? निष्काम यतीप्रमाणें तें माझ्याहि बुद्धीचा विषय कसें बरें होईल ? [किमु भाति विभाति वा—] तें प्रकाशमान आहे. तेव्हां तें आमच्या बुद्धीचा विषय होऊन स्पष्ट अनुभवास येईल का ? कीं नाहीं. १४.—या प्रश्नाचें ' तें भासतें, विशेषप्रकारे भासतें ' हें उत्तर आहे. तेंच हा मंत्र सांगतो—

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।
तमेव भान्तमनुभाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ १५

अन्वयार्थ—[तत्र सूर्यः न भाति—] त्या स्वात्मभूत ब्रह्माचे ठिकाणीं सर्वांना प्रकाशित करणाराहि सूर्य भासत नाहीं. तो त्या ब्रह्माला प्रकाशित करीत नाहीं, असा याचा भावार्थ. [चन्द्रतारकं न—] त्याचप्रमाणें चंद्र, नक्षत्रें प्रकाशित करीत नाहींत. [इमाः विद्युतः न—] या विजाहि त्याच्या ठिकाणी प्रकाशमान होत नाहींत. [अयं अग्निः कुतः—] मग आमच्या दृष्टीचा विषय होणारा हा प्रत्यक्ष अग्नि त्याला प्रकाशित केल्यानें करणार ? [सर्वं भान्तं तं एव अनुभाति—] फार काय पण हें जें सर्व कांहीं भासत आहे तें तो परमेश्वर प्रकाशमान होऊं लागला असतांच त्याच्या मागोमाग प्रकाशित होतें [तस्य भासा इदं सर्वं विभाति—] त्याच्याच प्रकाशानें हें सर्व सूर्यादि स्पष्टपणे प्रकाशमान होतें. सु. मी. अ. १५. ६ पृ. २८०. १५. २.

ज्याप्रमाणें व्यवहारांत तूलाच्या निश्चयानेंच वृक्षाच्या मूळाचा निश्चय करितात त्याप्रमाणें संसारकार्यरूप वृक्षाच्या निश्चयानें त्याच्या मूलभूत ब्रह्माच्या स्वरूपाचा निश्चय करविण्याच्या इच्छेनें ही सहावी वल्ली आरंभिलेली आहे—

ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः । तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदेवामृतमुच्यते ॥ तस्मिल्लँलोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन । एतद्वै तत् ॥ १

अन्वयार्थ—[ऊर्ध्वमूलः—] ज्याचें मूळ उत्कृष्ट आहे व [अवाक्शाखः—] शाखा अधोमुख—निकृष्ट आहेत, असा [एषः अश्वत्थः सनातनः—] हा अश्वत्थ सनातन आहे [तत् एव शुक्रं—] तेंच शुद्ध चैतन्य ज्योतिःस्वरूप, [तत् ब्रह्म—]तेंच ब्रह्म व [तत् एव अमृतं उच्यते—] तेंच अमृत म्हटलें जातें. [तस्मिन् सर्वे लोकाः श्रिताः—] त्याच्यामध्यें सर्व लोक आश्रित आहेत. [कश्चन तदु न अत्येति—] त्याचें उल्लंघन कोणी करीत नाहीत. [एतत् वै तत्—] तेंच नाचिकेतानें विचारलेलें ब्रह्म आहे. (अव्यक्तापासून स्थावरापर्यंत परिणाम पावलेला हा संसारवृक्ष ऊर्ध्वमूल आहे ज्याचें मूल ऊर्ध्व म्ह० सर्वोत्तम विष्णूचें परम पद आहे, तो ऊर्ध्वमूल होय. यांतील ' अवाक्शाखः ' इत्यादि इतर विशेषणांचा वगैरे सोपपत्तिक अर्थ—गीताभाष्यार्थ अ. १५. १ पृ. १०१९ व काठकभाष्यार्थ पृ. १३५—३८—वर पहा.) १—ज्याच्या विज्ञानानें अमृत होतात, असें सांगितलें जातें तें जगाचें मूळच मुळी नाही. असत्-पासूनच हें सर्व उद्भवलें आहे अशी आशंका घेऊन सांगतात—

यदिदं किंच जगत्सर्वं प्राण एजति निःसृतम् । महद्भयं वज्रमुद्यतं य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ २

अन्वयार्थ—[यत इदं किंच जगत् सर्वं प्राणे सति निःसृतं एजति] हें जें कांही सर्व जगत् आहे तें प्राण—ब्रह्म अस्तित्वाचा त्याच्यापासून निघालेलें असें होत्साते प्रचलित होतें, चेष्टा करतें. [महत् भयं—] तें ब्रह्म मोठें भय—भयाचें निमित्त आहे. [उद्यत वज्र—] वर उचललेलें जणुकाय वज्रच आहे. [एतत् ये विदुः ते अमृताः भवन्ति—] यांला जे जाणतात ते अमृत होतात. सु. ब्र. १. ३. १० पृ २६. २.—त्याच्या भयानें सर्व जगत् आपला व्यवहार कसें करितें तें हा मंत्र सांगतो—

भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः । भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥ ३

अन्वयार्थ—[अस्य भयात् अग्निः तपति—] या परमेश्वराच्या भयानें अग्नि तापतो. [भयात् सूर्यः तपति—] याच्या भयानेंच सूर्य प्रकाशमान होतो.

[भयात् इंद्रः च वायुः च पंचमः मृत्युः धावति–] याच्या भयानें इंद्र, वायु, व पांचवा मृत्यु धावतो. (स्वतः समर्थ व ईश्वर असलेल्या लोकपालांचा हातानें वज्र उगारलेल्याप्रमाणें जर कोणी नियन्ता नसता तर स्वामीच्या भीतीनें भयभीत झालेल्या भृत्याप्रमाणें अग्नि-सूर्य इत्यादिकांची नियत प्रवृत्ति उपपन्न झाली नसती.) ३.–देवांच्या भयाचें कारण अशाहि या ब्रह्माला–

इह चेदशकद्बोद्धुं प्राक्शरीरस्य विस्रसः ।
ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते ॥ ४

अन्वयार्थ—[इह शरीरस्य विस्रसः प्राक् चेत् बोद्धुं अशकत्–] येथें जिवंतपणीच–शरीराचा पात होण्यापूर्वी जर ब्रह्माला जाणण्यास समर्थ झाला तर मनुष्य संसारबंधनापासून मुक्त होतो. पण तो जर त्याला जाणण्यास समर्थ झाला नाही [ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते–] तर ज्यांत प्राणी उत्पन्न केले जातात अशा पृथिव्यादि लोकांत तो शरीरभावास समर्थ होतो. ४ –कारण आरशांत प्रतिबिंबित झालेल्या मुखाचें दर्शन असें स्पष्ट होऊं शकतें त्याप्रमाणें जिवंत असतांनाच आत्म्याचें दर्शन स्पष्ट होतें. या शरीरांत तें जितकें स्पष्ट होतें तितकें एका ब्रह्मलोकाला सोडून दुसऱ्या कोणत्याहि लोकीं होऊं शकत नाही. पण तो ब्रह्मलोक प्राप्त होणें फारच कठिण आहे. तें कसें तें सांगितलें जातें—

यथाऽऽदर्शे तथाऽऽत्मनि यथा स्वप्ने तथा पितृलोके ।
यथाऽप्सु परीव ददृशे तथा गन्धर्वलोके छायातपयोरिव ब्रह्मलोके ॥

अन्वयार्थ—[यथा आदर्शे तथा आत्मनि–] ज्याप्रमाणें लोक आरशांत प्रतिबिंबित झालेल्या आपल्याला अगदी स्पष्टपणें पाहतो त्याप्रमाणें येथें, आरशाप्रमाणें अतिशय निर्मल झालेल्या आपल्या बुद्धींत आत्म्याचें अगदी स्पष्ट दर्शन होतें, असा याचा अर्थ; [यथा स्वप्ने तथा पितृलोके–] ज्याप्रमाणें स्वप्नांत जाग्रद्वासनांपासून उद्भवलेलें दर्शन अस्पष्ट असतें त्याप्रमाणें पितृलोकी आत्म्याचें दर्शन अस्पष्टच होतें. कारण त्या लोकी जीव कर्मफलाच्या उपभोगांत आसक्त असतात. [यथा अप्सु परीव ददृशे तथा गन्धर्वलोके–] ज्याप्रमाणें जलांत ज्याचे अवयव विभक्त नाहीत असें म्हणजे अस्पष्टच आत्मरूप सर्वतः दिसतें त्याप्रमाणें गंधर्वलोकांत आत्म्याचें दर्शन अविविक्तच–अस्प-

ष्ट च होतें. येणेंप्रमाणें शास्त्रप्रमाण असल्याकारणानें इतर लोकीहि आत्म्याचें दर्शन होतें. पण तें स्पष्ट होत नाही. [छाया-आतपयोः इव ब्रह्मलोके–] छाया व ऊन यांप्रमाणें अतिशय स्पष्ट आत्मदर्शन एका ब्रह्मलोकीच होतें. पण तो लोक विशिष्ट कर्म व उपासना याच्या योगानेंच साध्य होणारा असल्याकारणानें अत्यंत दुष्प्राप आहे. यास्तव आत्मदर्शनाकरिता येथेंच–या लोकीं व या मानुषशरीरांत असेपर्यंतच यत्न करावा, असा याचा अभिप्राय. ५.–त्याला कसें जाणावें व त्याच्या ज्ञानाचें प्रयोजन काय, तें सांगितलें जातें—

इन्द्रियाणां पृथग्भावमुदयास्तमयौ च यत् ।
पृथगुत्पद्यमानानां मत्वा धीरो न शोचति ॥ ६

अन्वयार्थ—[पृथग् उत्पद्यमानानां इंद्रियाणां पृथग्भाव–] आपापल्या विषयाचें ग्रहण करण्यासाठी आकाशादिकारणांपासून पृथक् उत्पन्न होणाऱ्या इंद्रियांचा शुद्ध चिन्मात्र स्वरूपाहून पृथग्भाव–स्वाभाविकपणेंच विलक्षणरूपत्व [च यत् उदयास्तमयौ–] व जाग्रत् आणि निद्रा या अवस्थांच्या अपेक्षेनें प्रत्यहीं होणारी उत्पत्ति व प्रलय यांस [मत्वा–] जाणून–निद्रासमयीं इंद्रियांचा लय होतो आत्म्याचा नाही व जागृतीत त्यांचाच उदय होतो, आत्म्याचा नाहीं, असें विवेकपूर्वक जाणून [धीरः न शोचति–] बुद्धिमान्–ज्ञानी शोक करीत नाही ६. –ज्या आत्म्याहून इंद्रियांचा पृथग्भाव सांगितला तो बाहेर कोठें आहे, असें समजूं नये. कारण तो सर्वांच्या आत राहणारा प्रत्यगात्मा आहे. तो कसा तेंच हा मंत्र सांगतो–

इन्द्रियेभ्यः परं मनो मनसः सत्त्वमुत्तमम् ।
सत्त्वादधि महानात्मा महतोऽव्यक्तमुत्तमम् ॥ ७

अन्वयार्थ—[इंद्रियेभ्यः परं मनः–] इंद्रियांहून पर मन आहे. [मनसः सत्त्वं उत्तमं–] मनाहून बुद्धि पर आहे. [सत्त्वात् महान् आत्मा अधि–] सत्त्वाहून महान् आत्मा पर आहे व [महतः अव्यक्तं उत्तमम्–] महत्-हून अव्यक्त उत्तम आहे. ७.

अव्यक्तात्तु परः पुरुषो व्यापकोऽलिङ्ग एव च ।
यं ज्ञात्वा मुच्यते जन्तुरमृतत्वं च गच्छति ॥ ८

अन्वयार्थ—[अव्यक्तात् तु परः पुरुषः व्यापकः अलिंगः एव च–] अव्यक्ताहून पर असलेला पुरुष व्यापक व अलिंगच–बुद्धि, इंद्रियें, यांनी रहित आहे. [यं ज्ञात्वा जन्तुः मुच्यते–] त्याला शास्त्र व आचार्य यांच्या द्वारा जाणून प्राणी मुक्त होतो [च अमृतत्वं गच्छति–] व अमृतत्वाला प्राप्त होतो. ज्याला शास्त्रतः व आचार्यतः जाणून जन्तु जिवंत असतांनाच अविद्यादि हृदयग्रंथीकडून सोडला जातो आणि शरीराचा पात झाल्यावरहि अमृतत्वास प्राप्त होतो, तो अलिंग व अव्यक्ताहून पर पुरुष आहे, असा पूर्व वाक्याशीं अन्वय लावावा.) ८–तर मग अलिंग आत्म्याचें दर्शन कसें उपपन्न होतें ? उत्तर—

न संदृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ।
हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ ९

अन्वयार्थ—[अस्य रूपं संदृशे न तिष्ठति–] या प्रत्यगात्म्याचें रूप दर्शनविषयामध्यें रहात नाही; [एनं कश्चन चक्षुषा न पश्यति–] याला कोणी चक्षूनें पहात नाही किंवा दुसऱ्या कोणत्याच इंद्रियानें त्याचें ग्रहण करूं शकत नाही [हृदा मनीषा मनसा अभिक्लृप्तः–] तर मनाचे नियमन करणाऱ्या हृदयस्थ बुद्धीनें–मननरूप यथार्थ दर्शनानें सर्व प्रकारें प्रकाशित केलेला आत्मा जाणतां येणें शक्य आहे. [ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति–] जे त्या आत्म्याला ब्रह्म, असें जाणतात ते अमृत होतात. (या मंत्राच्या उत्तरार्धांत आत्मज्ञान कसें होतें तें सांगितलें आहे.) ९.–ती संकल्पशून्य बुद्धि कशी प्राप्त होते तें सांगतात—

यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह ।
बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम् ॥ १०

अन्वयार्थ—[यदा पंच ज्ञानानि मनसा सह अवतिष्ठन्ते–] ज्यावेळीं श्रोत्रादि पंच ज्ञानेंद्रियें अन्तःकरणासह आत्म्यामध्येंच स्थिर राहतात [च बुद्धिः न विचेष्टति–] व बुद्धि आपला निश्चयरूप व्यापार करीत नाही, [तां परमां गतिं आहुः–] त्या अवस्थेला परम गति म्हणतात. १०.

तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् ।
अप्रमत्तस्तदा भवति योगो हि प्रभवाप्ययौ ॥ ११

अन्वयार्थ—[तां स्थिरां इंद्रियधारणां योगं इति मन्यन्ते—] त्या स्थिर इंद्रियधारणेला योग असें म्हणतात. [तदा अप्रमत्तः भवति—] त्यावेळी साधक अप्रमत्त—प्रमादरहित—समाधानासाठी सतत यत्नवान् होतो. [हि योगः प्रभवाप्ययौ—] कारण योगच उत्पत्ति व नाश आहे. ११.—पण इंद्रियांचा विषय न होणारें तें ब्रह्म नाहीच, यास्तव योग व्यर्थ आहे. किंवा उपलब्ध न होणारें ब्रह्म नाही, असेंच जाणावें, या शंकेचा परिहार—

नैव वाचा न मनसा प्राप्तुं शक्यो न चक्षुषा ।
अस्तीति ब्रुवतोऽन्यत्र कथं तदुपलभ्यते ॥ १२

अन्वयार्थ—[वाचा न एव प्राप्तुं शक्यः न मनसा न चक्षुषा—] तो आत्मा वागिंद्रियानें नाही, मनानें नाही व चक्षुरिंद्रियानेंहि प्राप्त होणें शक्य नाही. [अस्ति इति ब्रुवतः अन्यत्र तत् कथं उपलभ्यते—] कारण ब्रह्म—आत्मा आहे, असें बोलणाऱ्यावांचून दुसऱ्याला तें उपलब्ध कसें होणार ! (आत्मा सर्व विशेषरहित जरी असला तरी ' जगाचें मूळ ' या रूपानें तो अवगत झालेला असल्यामुळें आहेच. कारण कोणत्याहि कार्याचा लय अस्तित्वाच्या आश्रयानेंच होतो. यास्तव जगाचें मूळ आत्मा आहेच असें समजावें. अशा आगमानुसारी श्रद्धाळु अस्तित्ववाद्याला ब्रह्मज्ञान होतें नास्तित्ववाद्याला तें होऊं शकत नाही कारण जगाचें मूळ नाहीच असें म्हणणाराला त्याचें ज्ञान कसें होऊं शकेल ! याविषयी अधिक विवेचन काठकभाष्यार्थांत—पृ. १५१-५२—पहावें) १२.—तस्मात् असद्वाद्याच्या आसुरपक्षाचें निराकरण करून बुद्धि, इंद्रियें, इत्यादि ज्याची उपाधि आहे व ज्याचें सत्त्व—अस्तित्व—सत्ता कार्यांत अनुवृत्त होते, तो आत्मा—

अस्तीत्येवोपलब्धव्यस्तत्त्वभावेन चोभयोः ।
अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभावः प्रसीदति ॥ १३

अन्वयार्थ—[अस्ति इति-एव उपलब्धव्यः—] आत्मा आहे असेंच जाणावें. [तत्त्वभावेन च उपलब्धव्यः—] तत्त्वभावानें त्याला जाणावें. [उभयोः अस्ति इति-एव उपलब्धस्य तत्त्वभावः प्रसीदति—] ' अस्ति ' व ' तत्त्वभाव ' या दोहोंतील प्रथम ' अस्ति '—आहे असें जाणलेल्या आत्म्याचा मागून तत्त्वभाव सन्मुख होतो. (प्रथम ' तो आहे ' असें उपाधीच्या अस्तित्वावरून जाणणें

हा सोपाधिक प्रत्यय असून पुढें त्याच्याच द्वारा निरुपाधिक प्रत्यय म्ह० तत्त्वभाव उपलब्ध होतो.) १३.—येणेंप्रमाणें—

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥ १४

अन्वयार्थ—[यदा अस्य हृदि श्रिताः ये कामाः ते सर्वे प्रमुच्यन्ते—] ज्यावेळी याच्या हृदयाचा—बुद्धीचा आश्रय करून राहिलेले जे सर्व काम ते क्षीण होतात [अथ मर्त्यः अमृतः भवति—] त्यावेळी मर्त्य अमृत होतो. [अत्र ब्रह्म समश्नुते—] तो या शरीरांतच ब्रह्म होतो. (कामांचा आश्रय आत्मा नव्हे, अन्तःकरण आहे. ज्ञानापूर्वी अन्तःकरणांत राहणारे सर्व काम नष्ट झाले म्हणजे अविद्यावस्थेंत मर्त्य असलेला साधक ज्ञानोत्तर अविद्या-काम-कर्मरूप मृत्यूचा नाश झाल्यामुळें अमृत होतो व गमनाचें निमित्त जो मृत्यु त्याच्या अभावीं दीपाच्या निर्वाणाप्रमाणें तो सर्वबंधरहित शांत ब्रह्म होतो.१४

—पण कामांच्या समूहाचा नाश केव्हां होतो तें सांगतात—

यदा सर्वे प्रभिद्यन्ते हृदयस्येह ग्रन्थयः । अथ
मर्त्योऽमृतो भवत्येतावद्ध्यनुशासनम् ॥ १५

अन्वयार्थ—[यदा इह हृदयस्य सर्वे ग्रन्थयः प्रभिद्यन्ते—] जेव्हा जीवदवस्थेतच हृदयाच्या सर्व ग्रंथी—दृढ अविद्याप्रत्यय भेद पावतात [अथ मर्त्यः अमृतः भवति—] तेव्हा मर्त्य अमृत होतो. [एतावत् हि अनुशासनं—] सर्व वेदान्तांचा हा एवढाच उपदेश आहे. १५. सर्व विशेषरहित व व्यापी ब्रह्मच आत्मा आहे, अशा ज्ञानानें ज्याच्या अविद्यादि सर्व ग्रंथी तुटल्या आहेत त्या जिवंत असतानाच ब्रह्म झालेल्या विद्वानाला गति नाही; त्याला कोठें जावें लागत नाही, असें वर सांगितलें. कारण चवदाव्या मंत्रात ' अत्र ब्रह्म समश्नुते ' असें म्हटलें आहे. दुसऱ्याहि श्रुतींत ' आत्मज्ञाचे प्राण त्याच्या शरीरास सोडून जात नाहीत, तर तो स्वतः ब्रह्म होऊन ब्रह्मास मिळतो ' असें म्हटलें आहे. परंतु जे ब्रह्मलोकास पात्र होणारे मंद ब्रह्मवेत्ते व अन्य उपासनेचें परिशीलन करणारे आणि जे त्यांच्याहि विपरीत असणारे संसारभाक् जन, त्यांना कोणती विशेष गति मिळते तें प्रकृत ब्रह्मविद्येच्या उत्कृष्ट फलाची स्तुति करण्याकरितां या मंत्रांत सांगितलें आहे. शिवाय नचिकेतानें पहिल्या अध्यायाच्या

पहिल्या वल्लीत अग्निविद्या विचारिली व यमानें तिचें वर्णनहि केलें आहे. यास्तव तिच्या फलप्राप्तीचा प्रकारहि सांगितला पाहिजे, म्हणून या मंत्राचा आरंभ आहे—

शतं चैका च हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनिःसृतैका ।
तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवन्ति ॥ १६

अन्वयार्थ—[शतं च एका च हृदयस्य नाड्यः—] शंभर व एक अशा नाड्या पुरुषाच्या हृदयांतून निघालेल्या आहेत. [तासां एका मूर्धानं अभिनिःसृता—] त्यांतील सुषुम्ना या नांवाची एक नाडी मस्तकाचा भेद करून बाहेर निघून गेली आहे. [तया ऊर्ध्वं आयन्—] अन्तकाली आत्म्याला हृदयामध्यें वश करून घेऊन तिच्यायोगें योजावें व त्या नाडीनें वर जाणारा आदित्याच्या द्वारा [अमृतत्वं एति—] आपेक्षिक अमृतत्वास—अमरणधर्मत्वास प्राप्त होतो. 'सर्व भूतांचा क्षय होईपर्यंत राहणाऱ्या स्थानाला अमृत म्हणतात अथवा भूतांचा प्रलय होईतों ब्रह्मादि उत्तम लोकीं राहणें हें अमृतत्व आहे, असें म्हणतात,' ही स्मृति आपेक्षिक अमृतत्वाविषयी प्रमाण आहे. अथवा त्या नाडीनें जाणारा ब्रह्मलोकांतील अनुपम भोग भोगून हिरण्यगर्भासह कालांतरी मुख्य अमृतत्वास प्राप्त होतो. पण [विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवन्ति—] ज्याच्या गती नानाविध आहेत अशा इतर शंभर नाड्या उत्क्रमणाचें निमित्त होतात. म्हणजे त्या संसार प्राप्त करून देण्याच्याच उपयोगी पडतात. १६. —आता वल्लींच्या अर्थाचा उपसंहार करण्यासाठी हा मंत्र म्हणतो—

अङ्गुष्ठमात्रः पुरुषोऽन्तरात्मा सदा जनानां हृदये
संनिविष्टः । तं स्वाच्छरीरात्प्रवृहेन्मुञ्जादिवेषीकां धैर्येण ।
तं विद्याच्छुक्रममृतं तं विद्याच्छुक्रममृतमिति ॥ १७

अन्वयार्थ—[अंगुष्ठमात्रः पुरुषः अन्तरात्मा सदा जनानां हृदये संनिविष्टः—] अंगुष्ठमात्र पुरुष अन्तरात्मा सदा लोकांच्या हृदयात उत्तमप्रकारें प्रवेश करून राहिलेला आहे. [मुंजात् इषीकां इव तं स्वात् शरीरात् धैर्येण प्रवृहेत्—] मुंजानांवाच्या तृणातून जशी काडी त्याप्रमाणें त्याला आपल्या शरीरांतून धैर्यानें—अप्रमादानें बाहेर काढावें; पृथक् करावें. [तं शुक्रं अमृतं विद्यात्—] त्यालाच शुक्र अमृत समजावें, 'तं विद्याच्छुक्रममृतं इति' ही

द्विरुक्ति उपनिषत्परिसमाप्तीसाठीं आहे. १७.—आतां विद्येच्या स्तुतीसाठीं या आख्यायिकेच्या अर्थाचा उपसंहार—

मृत्युप्रोक्तां नाचिकेतोऽथ लब्ध्वा विद्यामेतां योगविधिं च कृत्स्नम् ।
ब्रह्मप्राप्तो विरजोऽभूद्विमृत्युरन्योऽप्येवं यो विदध्यात्ममेव ॥ १८

अन्वयार्थ—[अथ मृत्युप्रोक्ता एतां विद्यां—] आतां मृत्यूनें सांगितलेल्या या विद्येला [च कृत्स्नं योगविधिं—] व संपूर्ण योगविधीला [लब्ध्वा नाचिकेतः—] प्राप्त होऊन नाचिकेत [ब्रह्मप्राप्तः विरजः विमृत्युः अभूत्—] ब्रह्मप्राप्त, विरज—धर्माधर्मरहित, आणि विमृत्यु—काम व अविद्या यांनी रहित झाला. [यः एवं अध्यात्मं एव विद्—] जो अशा रीतीनें अध्यात्मच जाणतो [सः अन्यः अपि—] असा दुसराहि कोणी असाच विरज व विमृत्यु होतो. १८.

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥ १९ ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

इति काठकोपनिषदि द्वितीयाध्याये तृतीया वल्ली समाप्ता ॥ ३

इति काठकोपनिषदि द्वितीयोऽध्यायः समाप्तः ॥ २ ॥

अन्वयार्थ—तो परमात्मा आम्हां शिष्याचार्यांचें सह रक्षण करो; आमचें सह पालन करो; आम्ही वीर्य एकदाच निष्पन्न करूं; आमचें अध्ययन तेजस्वी असो; व आम्ही परस्पर द्वेष करूं नये. त्रितापांची शांति होवो. १९.

काठकोपनिषदाचें सिंहावलोकन.

कृष्णयजुर्वेदाच्या कठशाखेंत यमानें नचिकेताला ब्रह्मविद्या सांगितली आहे. नचिकेताचा पिता वाजश्रवस, त्यानें विश्वजित् यज्ञांत सर्वस्व दान दिलें व तो ब्राह्मणांना अगदीं निरुपयोगी गाईंची दक्षिणा देऊं लागला. तें पाहून नचिकेता मनांत म्हणाला "असल्या गायींचें दान दिल्यानें माझ्या पित्याला इष्ट फल मिळणार नाहीं. यास्तव आपलें जीवित समर्पण करूनहि त्याचें पारलौकिक हित करणें, माझें कर्तव्य आहे." त्यानंतर तो पित्याला 'बाबा, माझें दान कोणाला करितां ? कारण मीहि तुमच्या सर्वस्वांत अन्तर्भूत होतों' असें विचारूं

लागला. त्यावेळीं त्याचें वय सोळा वर्षाच्या आतच होतें. म्हणजे तो अद्यापि कुमारावस्थेंत होता. त्यामुळें हा बालक आहे, असें समजून पित्यानें त्याकडे दुर्लक्ष केलें. तथापि त्याला तो पुनः पुनः तेंच विचारूं लागला. म्हणून पित्याला क्रोध आला व त्यानें 'तुला मी मृत्यूला देतों' असें म्हटलें. तेव्हां एकीकडे जाऊन त्यानें आपल्याशींच असा विचार केला—मी अनेक पुत्र व शिष्य यात प्रथम—उत्तम वृत्तीनें वागतों, निदान मध्यम वृत्तीनें तर वागतोंच. असें असूनहि ज्याअर्थी पित्यानें मला 'यमाला देतों' म्हणून म्हटलें आहे त्याअर्थी तें क्रोधावेशानें म्हटलें आहे. तथापि त्याचें वचन असत्य होणें उचित नाही. असा विचार करून व पित्याला सत्यवचन पाळण्याविषयी आग्रह करून पित्राज्ञेनें तो यमालयी गेला. त्याच वेळी दैववशात् यम कोठें बाहेर प्रवासास गेला होता. तो तीन दिवसानी परत आला. तोंवर हा ब्राह्मण त्याच्या घरी उपाशी राहिला. प्रवासांतून परत आलेल्या यमाला त्याच्या अमात्यादिकानी अतिथीचें महत्त्व सागून नचिकेताला शांत करण्याचा उपदेश केला. यमानें त्याला शांत करून तीन उपोषणासाठी तीन वर मागावयास सांगितलें. तेव्हां नचिकेतानें प्रथम वरानें पित्याचा संतोष संपादन केला. दुसऱ्या वरानें स्वर्ग-साधनभूत अग्निज्ञान संपादन केलें व तिसऱ्या वरानें आत्मज्ञान सांगण्यासाठी प्रार्थना केली. मेलेल्या मनुष्याविषयी मोठा मतभेद दिसतो. कोणी 'मनुष्य मेल्यावरहि त्याचा परलोकसंबंधी—परलोकी पुण्य-पापाचें सुख-दुःखादि फल भोगणारा आत्मा असतो,' असें म्हणतात, कोणी 'नसतो' असें म्हणतात. चार्वाक देहालाच आत्मा मानतात. त्यामुळें त्याच्या मताप्रमाणें मरणानंतर आत्मा रहात नाहीं. कर्मठ स्वर्गलोकी जाणारा आत्मा आहे, असें म्हणतात व मुमुक्षु मुक्त होणारा आत्मा आहे, असें म्हणतात. यास्तव त्याचा निर्णय तूं मला सांग. त्यावर यम म्हणाला—बाबा, हें आत्मतत्त्व अतिशय सूक्ष्म असल्यामुळें दुर्विज्ञेय आहे. देवांनाहि पूर्वी त्याविषयीं संशय आला. यास्तव तूं त्याविषयीचा आग्रह सोडून पुत्र-वित्तादि इष्ट भोगसाधनें मागून घे. त्यावर नचिकेत म्हणतो—पुत्रादि सर्व भोगसाधनें नश्वर व दुःखाची निमित्तें आहेत व मला दुर्विज्ञेय तत्त्वाचा उपदेश करणारा तुझ्यासारखा दुसरा कोणी मिळणें शक्य नाहीं. यास्तव तूं मला तें आत्मतत्त्वच सांग. १

याप्रमाणें पहिल्या वल्लीत नचिकेत ब्रह्मविद्योपदेशास योग्य आहे—तो विद्याधिकारी आहे, अशी आपली खात्री करून घेऊन आतां यम म्हणतो—पुरुष श्रेय व प्रेय अशा दोन पदार्थांतील कोणत्या तरी एका पदार्थाची इच्छा करितो. त्यांतील पुत्रादि विषयजात हें प्रेय-प्रीतिविषय असून आत्माच श्रेय आहे. कारण तो सर्वदुःखशून्य आहे. अविवेक व विवेक असे दोन मार्ग आहेत. प्रिय पुत्रादिकांची इच्छा करणारे अविवेकी असतात. पण तूं तसा नाहींस. यास्तव मी तुला ज्ञानोपदेश करितों. तूं अत्यंत विवेकी आहेस. मूढ व अतिमूढ तुझी बरोबरी करण्यास मुळींच योग्य नाहींत. मूढ किंचित् विवेकी असतो. तो स्वर्गाची इच्छा करितो. ऐहिक सुखाची फारशी इच्छा करीत नाही. त्याचा गुरुहि तसाच असतो. त्यामुळें आंधळ्याकडून नेल्या जाणाऱ्या आंधळ्याप्रमाणें ते दोघे स्थित असतात. आत्मतत्त्वानभिज्ञतेमुळें ते दोघेहि अविद्येंतच घुटमळत असतात. अतिमूढ तर धनाच्या इच्छेनें वाटेल तें महापातकहि करितो. त्याला परलोकाचें भानहि नसतें. अशा अतिमूढांना व मूढ कर्मठांनाहि आत्मा नुस्ता ऐकावयासहि मिळत नाही. गुरु दोन प्रकारचा असतो. एक शब्दार्थज्ञ व दुसरा स्वात्मतत्त्वानुभवी. पहिला गुरु हा मनुष्यच आहे. ब्रह्म नव्हे. कारण त्याची 'मी मनुष्य' ही भ्रान्ति गेलेली नसते. अर्थात् अशा गुरूनें तत्त्वोपदेश जरी केला तरी त्याविषयी संशय येतात. कारण त्याचें ज्ञान शाब्दिक—परोक्ष असतें. पण ब्रह्मानुभवी साक्षात् ब्रह्मच असतो. त्यामुळें त्याच्या उपदेशानें ब्रह्मबोध होतो. कुतर्कामुळें विद्या नष्ट होते. त्यामुळें तार्किक गुरु होऊं शकत नाही. तर आगम व अनुभव यांत कुशल असलेलाच गुरु होऊं शकतो. चित्ताला विषयांपासून पराङ्मुख करून आत्म्यामध्यें स्थिर करणें, या अध्यात्मयोगाचा अभ्यास करणाऱ्या मुमुक्षूला दुर्दर्श, गुढ, गुहाहित इत्यादि विशेषणांनीं युक्त असलेल्या आत्म्याचाहि साक्षात्कार होतो. गूढ स्थानांत प्रवेश केल्यामुळें हा आत्मा बाह्य इंद्रियांनी दृश्य नाही. पंचकोशरूप गुहेंत (सु. पं. प्र. ३.२.पृ. १११) राहणारा हा गाढ तमामध्यें स्थित आहे. पण योगाभ्यासानें अन्तर्मुख केलेली बुद्धि त्या तमाचा नाश करिते. त्यामुळें हा मुमुक्षु स्वप्रकाश देवाला जाणून हर्ष व शोक यांचा त्याग करितो. हे नचिकेता, तुझ्यामध्यें त्याला जाणण्याची योग्यता आहे.

यमाचें हें भाषण ऐकून नचिकेत म्हणतो—मी जर खरोखरच योग्य असेन तर हे मृत्यो, माझ्या संसारमोक्षासाठीं सर्वसंसारगुणांनी रहित असें जें रहस्य तूं जाणतोस तेंच मला सांग. ज्यामध्यें धर्म-अधर्म, कार्य-कारण, भूत-भविष्यत् व तसेंच दुसरेंहि कांहीच नाहीं तेंच मला अपेक्षित आहे. त्याचा मला उपदेश कर. यम म्हणतो—सर्व वेदांमध्यें जें वेद्य—ज्ञेय, ज्याच्या प्राप्तीसाठीं सर्व तपें व ब्रह्मचर्य तें तत्त्व प्रणवाच्या योगानें सांगितलें जातें. प्रणव हा त्याचा वाचक शब्द—नांव आहे व उपासनेसाठी तोच प्रतीक आहे. त्याच्या योगानें ब्रह्माला जो जाणतो त्याला मुक्ति मिळते व त्याची जो उपासना करितो त्याला ब्रह्मलोकप्राप्ति होते. प्रणवाचा अर्थ असा जो चिदात्मा तो उत्पन्न होत नाहीं व मरत नाही. तो अज असल्यामुळें पुराण व अमृत असल्यामुळें नित्य आहे. त्याचें कारण नाही व कार्य नाही. देहाला मारलें तरी तो मरत नाही. एक देह दुसऱ्या देहाला मारतो. चिदात्मा कोणाला मारीत नाही व मारला जात नाहीं. चिदात्म्यामध्येंच अणूची कल्पना केलेली असल्यामुळें तो अणूंहून अणु व त्याच्यावरच आकाशादिकांची कल्पना केलेली असल्यामुळें महत्हून महान् आहे. तो प्राण्याच्या हृदयरूप गुहेंत स्थित आहे. निष्काम पुरुषच त्याला पाहतो आणि आत्मदर्शनानें इंद्रियें प्रसन्न होत असल्यामुळें ज्ञानी सर्व शोकरहित होतो. मी अन्तर्मुख आहें. त्यामुळें मी त्याला पाहतों. पण दुसरा बाह्य विपरीतदृष्टि पुरुष त्याला कसा पाहणार? येथें बसलेला तो दूर जातो. वनांत ध्यान करावयास बसलेला पुरुष मानस देह कल्पून नगरांत येतो व क्रय-विक्रय करितो. मंचकावर शयन करणारा तो इंद्रियें विलीन झाली असतां निराकार आकाशाप्रमाणें सर्वगत होऊन एकटाच शांत स्थित होतो. धन-विद्यादिकांनी मत्त झालेला तो सभेंत पांडित्य प्रकट करीत असलेला दिसतो. वैराग्याचें मिष करून तो मदहीन असलेलाहि दिसतो. असे परस्पर विरुद्ध धर्म प्रतीत होत असल्यामुळें याचा वास्तविक भाव काय आहे तें कळणें अशक्य आहे.यास्तव अन्तर्दृष्टीनेंच त्याला पहावें. शरीरांमध्यें अशरीर, अनित्यांमध्यें नित्य, सर्वव्यापी व बहुभावाचें—द्वैताचें अधिष्ठान अशा त्याला जाणून पुरुष शोक करीत नाहीं. बहिर्मुख पुरुषाला हा आत्मा पुष्कळ पाठानें, बहुश्रुतपणानें व धारणाशक्तीनेंहि प्राप्त होण्यासारखा नाही. कारण त्याच्यावर ईश्वराचा अनुग्रह

झालेला नसतो. पण ज्या अन्तर्मुख मुमुक्षूवर ईश्वर अनुग्रह करितो त्यालाच तो प्राप्त होतो. ईश्वर त्याला आपलें समग्र रूप स्पष्टपणें प्रकाशित करितो. जो पाप, क्रोध, चित्तार्चे अनैकाग्र्य व योगाच्या सिद्धि यांचा त्याग करितो त्याच्यावर ईश्वर अनुग्रह करितो व तो साक्षात्कारानें आत्म्याला प्राप्त होतो. जो मृत्यूसह ब्राह्मणादि सर्व जगाचा उपसंहार करितो तो उग्र आत्मा चित्ताच्या नियमनावांचून कसा जाणतां येणें शक्य आहे ? २.

ज्ञाता कोण व ज्ञातव्य कोण म्हणून विचारशील तर सांगतों—बुद्धींत चिदाभासरूपानें प्रविष्ट झालेला जीव ज्ञाता व ईश ज्ञातव्य झाला आहे. बुद्धीनें अवच्छिन्न झालेला चिदाभास जीव होतो व तिच्या योगानें अवच्छिन्न न झालेला महेश्वर होतो. रथाचा स्वामी व त्याला गन्तव्य—गमन करण्यास योग्य असलेला देश, यांप्रमाणें ते दोन पदार्थ आहेत. तूं जीवाला रथी—रथस्वामी समज. शरीर रथ आहे. जीवाची उपाधि असा जो बुद्धीचा भाग अहंकार त्याला सारथि व मन प्रग्रह—लगाम आहे. इंद्रियें हेच घोडे आहेत. शब्दादि विषय ह्याच त्याच्या गम्य—गमन करण्यास योग्य अशा भूमि—मार्ग आहेत. (गीताभाष्यार्थ व सुबोध गीता यांतील रथाचें चित्र पहा.) रथी पुरुषाची सत् किंवा असत् गति नेहमी सारथ्याच्या अधीन असते. कर्ता जो बुद्धिसारथि तो मनानें इंद्रियांचें क्रमानें नियमन करून अन्तर्मुख होऊन जाऊं लागला असतां संसारमार्गाच्या पलीकडे असलेल्या व्यापक परमात्मपदाला प्राप्त होतो. इंद्रियांपासून व्यापकतत्त्वापर्यंत उत्तरोत्तर आन्तरत्वाचा क्रम असा आहे. भौतिक इंद्रियांहून शब्दादि सूक्ष्म भूततन्मात्रें आन्तर म्ह० अधिक सूक्ष्म, व्यापक, श्रेष्ठ आहेत. त्यांहून सूक्ष्म भूतांचें कार्य मन आंतर आहे. मनाहून कर्तृत्वोपाधि बुद्धि आन्तर आहे. त्या व्यष्टि-कर्तृत्वोपाधीहून समष्टिकर्तृत्वोपाधि आंतर आहे. समष्टिसंज्ञक महत्तत्त्वाहून त्याचें कारण अव्यक्त आन्तर आहे. त्या मायाख्य अव्यक्ताचा आधार पुरुष आन्तर आहे. पुरुषाच्या पलीकडे कांहीं नाहीं. अव्यक्तादि सर्व त्यानें पूर्ण आहे. तो सर्वान्तर पुरुष सद्रूप आहे. त्याच्या सत्तेनें अव्यक्तादि सर्व परिपूर्ण असल्यामुळें तें 'आहे' असें भासतें. त्यांचा पूरक—त्यांना भरून सोडणारा, म्हणून तो चिदात्मा 'पुरुष' होय. वस्तुतत्त्वाचा विचार या अन्तःपुरुषामध्यें परिसमाप्त होतो. ती गन्तव्यतत्त्वाची सीमा

आहे. पूर्वोक्त रथी—जीव क्रमानें त्याला प्राप्त होतो. त्या रथी जीवाचें वास्तविक रूप पूर्णत्व आहे. पण त्याच्या अज्ञानामुळें त्याला अवच्छिन्नत्व—मर्यादितपणा प्राप्त झाला आहे. ज्ञानानें त्याची निवृत्ति होते. या अवच्छिन्नत्व-भ्रांतीमुळें सर्व देहांत गूढ असलेला आत्मा भासत नाही. अभ्यासशील झाल्यानें एकाग्र व सूक्ष्म बुद्धीनें त्याचें दर्शन होतें. योगाभ्यासानें बुद्धीची एकाग्रता होते. योगाच्या चार भूमिका आहेत. वाक्, बुद्धि, कर्ता व समष्टि यांच्या निरोधामुळें त्या चार भूमिका झाल्या आहेत. अगोदर वागादि बाह्य इंद्रियांचा निरोध करून मनाला अवशिष्ट ठेवावें. नंतर मनाचा निरोध करून व्यष्टिरूप कर्त्याला अवशिष्ट ठेवावें. त्या सविकल्पक कर्त्याचा निरोध करून 'निर्विकल्पकं अहं अस्मि' या एवढ्याच स्वरूपाच्या महान् आत्म्याला अवशिष्ट ठेवावे. शेवटी त्याचाहि निरोध केला असता स्वतः शांतात्मा अवशिष्ट राहतो. मंदबुद्धि पुरुषाला हा योग वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेप्रमाणें विषम आहे. यास्तव योग्यानें सावधान राहून मनाच्या लय-विक्षेपांचें निवारण करून त्याला परमात्म्यामध्यें समाहित करावें. आत्मा शब्द-स्पर्शादि गुणरहित आहे. त्यामुळें अत्यंत सूक्ष्म असलेला तो सूक्ष्म बुद्धीनेंच ज्ञात होतो. आकाशादि पंच भूतांचें स्थूलत्व उत्तरोत्तर गुणाच्या वृद्धीमुळें वाढत जातें. शब्दादिगुण आकाशादिकांत एक-दोन-तीन या क्रमानें राहतात. सु. पं. प्र. २ श्लो. २—५. पृ. ५१-५२ पहा. तसेंच त्यांचें स्थौल्यहि उत्तरोत्तर वाढतें. गुण जसे जसे कमी होतात तसें तसें सूक्ष्मत्व वाढत जातें. आत्मा निर्गुण आहे. त्यामुळें तो अति सूक्ष्म आहे. सूक्ष्मत्वामुळें अति सूक्ष्म बुद्धीचाच तो विषय होतो. याप्रमाणें यमानें विद्या व योग सांगितला. नचिकेतामध्यें वैराग्य तर स्वतःच सिद्ध होतें. असें हें शुभ नाचिकेत उपाख्यान आहे. ३

यम म्हणतो नचिकेता, मी पुनः हीच गोष्ट अधिक स्पष्ट करून सांगतों. इंद्रियांची बहिर्मुखता हाच विद्येचा मोठा प्रतिबंध आहे. स्वयंभू परमेश्वरानें इंद्रियांना बाह्य विषय पाहण्यासाठीच उत्पन्न केलें आहे. त्यामुळें तीं बाह्य शब्दादिकांनाच स्वभावतः पाहतात. कोणी एखादाच विवेकी त्यांना प्रयत्नानें अन्तर्मुख करून प्रत्यगात्म्याला पाहतो. मन प्रायः सकाम असतें. पण निष्काम मन चित्तशुद्धीला कारण होतें. त्या दोन प्रकारच्या मनांतील योगयुक्त निष्काम

न आत्मदर्शन करूं शकतें. पुरुष चैतन्याच्या अनुग्रहानें इंद्रियांच्या द्वारा रूप-रसादि विषयांना जाणतो व स्वप्नादिकांचा अनुभव घेतो. त्या चैतन्याचें विषयापासून विवेचन करावें. चैतन्याकडून सर्व जड अज्ञान जाणलें जातें. याला जाणणारें चैतन्यच ब्रह्मवस्तु आहे. कर्मकांडात्मक वेदालाहि संदिग्ध असलेलें, नचिकेतानें विचारलेलें, धर्माधर्मादि रहित जें ब्रह्म तेंच हें आहे. त्याचेंच हें वर्णन आहे. कर्मफलभोक्ता व प्राणादिकांचें धारण करणारा असा जो बुद्ध्युपाधिक जीव आहे त्याला उपाधीपासून पृथक् करून व 'तोच ईश आहे' असें जाणून पुरुष जुगुप्सा करीत नाही. योनिप्राप्ति हीच जुगुप्सा, ती ज्ञात्याला नाहीं. जगत्कर्ता, या रूपानें लक्ष्य होणारा जो ईश त्याला जन्म कोठचा? जें ब्रह्म देहामध्ये आहे तेंच देवादिकात आहे. तथापि त्याच्यामध्यें जो भेद पाहतो तो मृत्यूच्या अविच्छिन्न परंपरेला प्राप्त होतो. एकाग्र मनानेंच हें जीवेश्वराचें अद्वैततत्त्व जाणावें. योगी त्यात भेद पहात नाही. हृदयात राहणारा बुद्ध्यवच्छिन्न जीव अगुष्ठमात्र असल्याचा भास होतो, पण उपाधीचा नाश झाला असता तोच भूत व भविष्यत् सृष्टीचा ईश्वर होतो. वृष्टीच्या योगानें पर्वताच्या शिखरावर पडलेलें जल अनेक मार्गोनी खाली वहात येतें, त्याच न्यायानें जीव व ईश्वर याच्यामध्यें भेददृष्टी ठेवणारा अनेक योनीमध्यें उत्पन्न होतो. निर्मल कूपामध्यें ठेवलेलें जल निर्मल राहतें व ते अमृताप्रमाणें प्राशन केलें जातें. त्याचप्रमाणें स्वतःची ब्रह्मता जाणणारा ज्ञानी मुक्त होतो.४

शरीर हें त्या ब्रह्माचें अकरा द्वारानी युक्त असें पुर आहे, हें जाणणारा जीवदवस्थेतच काम-क्रोधादि बधानीं मुक्त होऊन शरीरपात होताच विदेह मुक्त होतो. तो परमात्मा प्राणाला वर नेतो व अपानाला खाली नेतो. चक्षुरादि इंद्रियें हे त्याचे सेवक आहेत. याच लिंगावरून आत्म्याचें असें अनुमान होतें—प्राण-चक्षु इत्यादि कुठारादिकाप्रमाणें साधनें आहेत. त्यामुळें त्याना प्रेरक—प्रयोजक कर्त्याची अपेक्षा आहे. अर्थात् 'आत्मा नाही,' या वादाचें निराकरण झालें. देह प्राणापानादिकांमुळें जिवंत राहतो, असें जें म्हणतात तें खरें नव्हे. कारण प्राणादिकांचा आश्रय जो कर्ता त्याच्यामुळें देह जिवत राहतो. शरीर मृत झालें असता तो कर्ता स्वकर्मवशात् ब्राह्मणादि योनीस किंवा लता-वृक्षादि स्थावरभावास प्राप्त होतो. प्रासाद किंवा पर्णशाला यांप्रमाणें उत्तम किंवा नीच देह तसले—

उत्तम अधम कर्म करणारामुळें उत्पन्न होतात. सर्व इंद्रियें लीन झालीं असतां जो स्वप्नामध्यें निरनिराळे इष्टानिष्ट विषय उत्पन्न करितो त्या देहातिरिक्त आत्म्याचें निराकरण करण्यास कोण समर्थ आहे ! याप्रमाणें जीवात्म्याची सिद्धि करून त्याचीच ब्रह्मता जगत् या उपाधीच्या द्वारा, जगदाधार या रूपानें, लक्षणेनें जाणता येते. जसा एकच अग्नि अनेक काष्ठामध्यें प्रवेश करून अनेक प्रकारचा होतो तसा एकच आत्मा या सर्व देहात बहुत प्रकारें सांगितला जातो. एकच असलेला वायुहि देहात प्राणरूपानें प्रवेश करून बहुप्रकारें भासतो, तसा आत्मा प्रत्येक उपाधीत पृथक् प्रतीत होतो. सूर्य सर्वप्राण्याच्या चक्षूंमध्यें स्थित असूनहि नेत्ररोगादि दोषानी दूषित होत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्म सर्वात्मा असूनहि दुःखांनीं लिप्त होत नाही. एक व स्वतंत्र असलेला सर्व भूतांचा अन्तरात्मा मायेनें आवृत होऊन बहुरूपी नटाप्रमाणें अनेकरूप होतो. हा मायोपाधिक ईश्वर बुद्ध्युपाधिमान् मनुष्याना त्याच्या कर्मानुसार फलोपभोग देतो. जे मानव स्वचित्तस्थ साक्षिरूप ईश्वराला पाहतात त्याच्या दुःखाची नित्य शांति होते व त्यांना शाश्वत ब्रह्मानंद होतो. ज्ञानी त्या अनिर्देश्य आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. तो स्वप्रकाश आत्मा दृश्य नाही. त्या स्वयंप्रकाश आत्म्याला सूर्यादिक किंवा बुद्ध्यादिक प्रकाशित करीत नाहीत. त्याच्याच प्रकाशानें ती सर्व प्रकाशित होतात. ५

ब्रह्म सर्वोत्तम आहे. तें संसारमायावृक्षाचें मूळ आहे. देव, मनुष्य, पशु इत्यादि त्या वृक्षाच्या उत्तरोत्तर अधम शाखा आहेत. त्याचें मूळ स्वयंज्योति आहे. त्यालाच अमृत म्हणतात. सर्व लोक त्याचाच आश्रय करून राहिले आहेत. त्याचे उल्लंघन कोणी करूं शकत नाही. मायाशक्तीनें युक्त असलेल्या त्याच्याकडून सर्व जगाचे नियमन केले जाते. त्याच्या भयानेंच अग्नि-सूर्यादि आपापल्या कार्यात तत्पर असतात. या नरशरीराचा नाश होण्यापूर्वी जर मनुष्य त्याला जाणूं शकला नाहीं तर जन्मान्तरीं त्याचा बोध होणें प्रायः दुर्लभ आहे. स्वप्नाप्रमाणे पितृलोकाला काही स्वातंत्र्य नाहीं. गंधर्वलोकी भोगेच्छेमुळें बुद्धि अतिशय चंचल असते. त्यामुळें त्या दोन लोकातील बोध स्वप्नाप्रमाणें किंवा जलातील प्रतिबिंबाप्रमाणें अस्पष्ट असतो. ब्रह्मलोकी मात्र तो अतिशय स्पष्ट होतो. पण तो लोक सुलभ नाही. आरशात जसें आपलें मुख पहावें त्याप्रमाणें

मनुष्य शुद्ध चित्तांत त्याला स्पष्ट पाहूं शकतो. जाग्रत् व सुषुप्ति यांत इंद्रियांचा उदय व अस्त होत असलेला दिसतो. त्यावरून त्यांचें अनात्मत्व निश्चित होऊन त्यांच्या उदयास्ताचाहि साक्षी जो आत्मा त्याचें ब्रह्मत्व अनायासानें ज्ञात होतें. मंद अधिकारी इंद्रियें, बुद्धि, व्यष्टि कर्ता, समष्टि महान् व अव्यक्त यांपासून क्रमानें आत्म्याचें विवेचन करून सूक्ष्म दृष्टीनें त्याला पाहूं शकतो. बाह्य चक्षूंच्या विषयामध्यें आत्मस्वरूप रहात नाही. म्ह० तें दृश्य नाही. यास्तव ज्यानें आपली दृष्टि अन्तर्मुख केली आहे असा मुमुक्षु सूक्ष्म मनानें त्याला पाहतो. पुरुष अतिशय सावधान राहून कर्त्यासह म्ह० बुद्धीसह सर्व इंद्रियांचा जेव्हां निरोध करितो तेव्हां त्या अवस्थेला 'योग' असें म्हणतात. आत्मा कोणत्याच इंद्रियाचा विषय जरी होत नसला तरी तत्त्ववेत्ता 'तो आहे' असेंच मानतो. कारण आत्माच नाही, असें झटल्यास जगत शून्य होण्याचा प्रसंग येतो. कारण कार्याचें कारणच जर नाही तर कार्य कसें असूं शकणार ! यास्तव हे नचिकेता, तूं आत्मा आहे, हीच भावना दृढ कर. 'तो नाहींच' असें समजूं नको. कारण सर्वत्र अनुवृत्त असलेलें तत्त्व नाही, असें कसें म्हणतां येईल ! मुमुक्षु अगोदर सोपाधिकतत्त्व आहे, असें जाणून मग उपाधीचा त्याग करून तत्त्वभावानें त्याला पाहतो. बुद्ध्यादि सर्व उपाधि मायाकल्पित आहेत. त्यामुळें त्यांनी विरहित असेंच सन्मात्र तत्त्व आहे. त्याला तसेंच पहावें. गढूळ पाण्याला निवळीची बी उगाळून लाविली असतां तें जसें प्रसन्न होतें त्याप्रमाणें सोपाधिक योगानें ज्ञानवानालाच क्रमानें निरुपाधिक ज्ञान होऊं शकतें. योगानें बुद्धि निष्काम होते. याच्या मनातील सर्व काम जेव्हां क्षीण होतात तेव्हांच तो मर्त्यत्व टाकून जिवंतपणीच ब्रह्मत्वाला प्राप्त होतो. अहंकाराशी चैतन्याला एकरूप करून मनुष्य जेव्हां विषयांची इच्छा करूं लागतो तेव्हा त्या कामाना हृदयग्रंथी म्हणतात. पण विवेक्याच्या त्या हृदयग्रंथी तुटतात. अहंकार व चित् याची ऐक्यभ्रांति निवृत्त झाल्यावर मग चित्तांत कांहीं कामाभास राहिले तर राहूं देत. क्रमानें तेहि नाहींसे होतील. निष्काम जीवन्मुक्त मरत नाही. प्राणांच्या उत्क्रमणालाच मरण म्हणतात. ज्ञान्याचें प्राणोत्क्रमण होत नाही. ते शरीरांतच तापलेल्या पाषाणावर टाकलेल्या जलाप्रमाणें लीन होतात. सु. ब्र.४.२.६ पृ. ४६५-६७पहा.ज्ञानी पूर्वीहि ब्रह्मच

असतो व प्राणांचा लय झाल्यावर ब्रह्मच होतो. पण येथेंच ब्रह्म जाणण्यास असमर्थ असलेला मुमुक्षु उपासना करून 'सुषुम्ना-'नांवाच्या मूर्धन्य नाडीनें ब्रह्मलोकास जाऊन कल्पान्ती मुक्त होतो. त्या उपासकाची बुद्धि येथेंच जर शुद्ध झाली तर तो आत्म्याला देहापासून पृथक् करून ब्रह्मत्वानें जाणतो. मृत्यूनें सांगितलेली विद्या व समग्र योग यांस संपादन करून नाचिकेत ब्रह्मरूप झाला. त्याच्याप्रमाणेंच दुसराहि साधक मुक्त होतो. विद्या व विद्याफल यांच्या विघ्नांची शांति होण्यासाठीं 'सह नाववतु०' या मंत्राचा जप करावा. म्हणजे विघ्नें शांत होतात. जो कोणी परमेश्वराची उपासना करितो त्याला नाचिकेतासारखेंच तीव्र वैराग्य प्राप्त होतें. प्रस्तुत उपनिषद फार महत्त्वाचें आहे. ब्रह्मसूत्रांत यांतील बऱ्याच वाक्याची मीमांसा केली आहे, हें सुबोध ब्रह्मसूत्रावरून वाचकाच्या ध्यानांत येईलच. शिवाय आम्हीहि वर मूळ मंत्रात ब्रह्मसूत्राचा निर्देश करून त्यांचा अन्योन्य संबंध दाखविला आहे. पण त्याहिपेक्षां भगवद्गीतेशीं याचा निकट संबंध आहे. यातील कांही मंत्र गीतेंत थोड्याशाच फरकानें जसेच्या तसेच घेतलेले आढळतात. त्याचाहि निर्देश आम्ही वर मुळांत केलाच आहे. किंबहुना 'हन्ता चेन्मन्यते हन्तुं हतश्चेन्मन्यते हतं०' या काठकांतील मंत्रापेक्षा 'य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतं०' हें गीतेंतील वचन त्या प्रसंगाला अधिक अनुरूप आहे, हें विचक्षण वाचकाच्या सहज लक्षांत येतें. कारण आत्म्यानें मारणें किंवा मारलें जाणें याचा संबंध यम-नचिकेतांच्या संवादापेक्षा कृष्णार्जुनाच्या संवादाशी अधिक आहे त्यामुळें काठकांतील प्रस्तुत वचन उदाहरणानें विशद करण्यासाठीच गीतोपदेशाची कल्पना केली आहे की काय असा भास होतो. स्थितप्रज्ञाचें 'प्रजहाति यदा कामान् सर्वान् पार्थ मनोगतान्' हें लक्षण 'यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः' या काठकवचनाला अक्षरशः धरून आहे. गीतेंतील संसारवृक्षाची कल्पना काठकांतील 'ऊर्ध्वमूलोऽवाक्शाखः' या मंत्राच्या आधारानेंच केली आहे. 'देवं मत्वा धीरः हर्षशोकौ जहाति' पृ. ४५. 'मत्वा धीरो न शोचति' ५१, ६४ ७६, इत्यादि वचनांचा 'नैनं शोचितुमर्हसि' इत्यादि गीतेंतील वचनांशी स्पष्ट संबंध प्रतीत होतो. अर्थाच्या दृष्टीनेंहि त्यातील अनेक वचनांचा संबंध प्रतीत होतो. पण विस्तरभयास्तव तो येथें दाखवीत नाहीं.

इति शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रहांतील काठकोपनिषद् समाप्त झालें.

प्रश्नोपनिषद्

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

शांतीचा अर्थ—[देवा कर्णेभिः भद्रं शृणुयाम—] अहो देवांनो, आम्हीं कानानीं भद्र—कल्याण—शुभ वचन ऐकावें; आणि [यजत्राः अक्षिभिः भद्रं पश्येम—] यागास समर्थ होऊन आम्ही नेत्रांनी भद्रच पहावें. [स्थिरैः अंगैः तनूभिः तुष्टुवांस —] स्थिर अंगांनीं व शरीरांनी आम्ही तुमची स्तुति करणारे होत्साते [देवहितं यत् आयुः तत् व्यशेम—] देवांनें दिलेल्या सर्व आयुष्यास प्राप्त होऊं. त्रितापाची शांति होवो.

ॐ सुकेशा च भारद्वाजः शैब्यश्च सत्यकामः सौर्यायणी च गार्ग्यः कौसल्यश्चाऽऽश्वलायनो भार्गवो वैदर्भिः कबन्धी कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा ब्रह्मनिष्ठाः परं ब्रह्मान्वेषमाणा एष ह वै तत्सर्वं वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवन्तं पिप्पलादमुपसन्नाः ॥ १

अन्वयार्थ— [भारद्वाज सुकेशा—] भारद्वाज सुकेशा, [शैब्यः सत्यकामः—] शैब्य सत्यकाम, [गार्ग्यः सौर्यायणिः—] गार्ग्य सौर्यायणि, [आश्वलायनः कौसल्यः—] आश्वलायन कौसल्य, [भार्गवः वैदर्भिः—] भार्गव वैदर्भि, [कबन्धी कात्यायनः—] व कबन्धी कात्यायन, [ते ह एते ब्रह्मपराः—] असे हे सहा ऋषी अपर ब्रह्माला पर ब्रह्म समजून, वेदोक्त कर्मानुष्ठान करण्यांत अगदीं तत्पर होऊन राहिले होते. परंतु पुढे थोडासा विचार करितांच त्यांना पर ब्रह्म निराळेंच असलें पाहिजे, असें वाटून [ब्रह्मनिष्ठाः—] ते सर्वजण ब्रह्मनिष्ठ झाले. (अपर ब्रह्म अनित्य आहे. कारण तेंहि कार्य आहे. कोणतेंहि कार्य जन्य —उत्पन्न होणारें—असल्यामुळें अनित्य असतें असा न्याय व अनुभवहि आहे.

अपर ब्रह्म म्हणजे मायाशबल ब्रह्म, हिरण्यगर्भ; त्याला आदि आहे. तस्मात् कधीं तरी त्याचा अंतहि होणारच ! असा निश्चय करून) [परं ब्रह्म अन्वेषमाणाः—] व पर ब्रह्माचें अन्वेषण करणारे ते [एषः ह वै तत् सर्वं वक्ष्यति इति—] हा आम्हांला तें सर्व सांगेल, असें समजून [ते ह समित्पाणयः भगवन्तं पिप्पलादं उपसन्नाः—] ते समत्पाणि होऊन भगवान् पिप्पलादापाशीं शिष्यभावानें आले. (येथील भारद्वाज, शैब्य इत्यादि कुल-गोत्रसूचक विशेषणें असून सुकेशा, सत्यकाम इत्यादि नांवें आहेत.) १.

तान्ह स ऋषिरुवाच भूय एव तपसा ब्रह्मचर्येण
श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ यथाकामं प्रश्नान्पृच्छत
यदि विज्ञास्यामः सर्वं ह वो वक्ष्याम इति ॥ २

अन्वयार्थ—[तान् ह सः ऋषिः उवाच—] त्यांना तो ऋषि म्हणाला, [भूयः एव तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संवत्सरं संवत्स्यथ—] तुम्ही पुनरपि तप, ब्रह्मचर्य व श्रद्धा यांनी युक्त होऊन एक संवत्सर येथें रहा. [यथाकामं प्रश्नान् पृच्छत—] नंतर आपापल्या इच्छेप्रमाणें प्रश्न विचारा. [यदि विज्ञास्यामः सर्वं ह वः वक्ष्यामः इति—] जर आम्ही तें जाणत असलों तर तें सर्व तुम्हांला सांगूं. (असें ऋषि म्हणाला. तुम्ही जरी पूर्वीच तपस्वी अहां तरी पुनः येथें वर्षभर ब्रह्मचर्यानें रहां, असें ' भूयः ' इत्यादि वाक्याचा भावार्थ आहे. 'यदि विज्ञास्यामः ' या वाक्यानें ऋषीनें आपलें शालीनत्व प्रकट केलें आहे.) २.

अथ कबन्धी कात्यायन उपेत्य पप्रच्छ ।
भगवन्कुतो ह वा इमाः प्रजाः प्रजायन्त इति ॥ ३

अन्वयार्थ—[अथ—] नंतर [कात्यायनः कबन्धी उपेत्य पप्रच्छ—] कात्यायन कबन्धी गुरूपाशी येऊन विचारूं लागला,—[भगवन् इमाः प्रजाः कुतः ह वै प्रजायन्ते इति—] "भगवन्, या सर्व प्रजा कोणापासून उत्पन्न होतात ?" असें विचारूं लागला. (पर ब्रह्माचा शोध करण्याच्या इच्छेनें आलेल्या मुनीचा उपासना व कर्म यांच्या फलाविषयींचा हा प्रश्न जरी असंगतसा भासला तरी तो तसा नाही. कारण कर्मादिकांच्या फलाविषयीं विरक्त झालेल्या पुरुषालाच ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार असतो, असा नियम असल्यामुळें वैराग्याकरितांच हें वर्णन आहे. येथील प्रश्न व प्रतिवचन यांतील शब्दांवरून सृष्टीचें वर्णन जरी

प्रतीत होत असलें तरी तें करण्यांत कांहीं विशेष प्रयोजन नसल्यामुळें सृष्टि-वर्णनाच्या मिषानें येथें अपरविद्येचें फलच सांगितलें आहे.) ३.

तस्मै स होवाच प्रजाकामो वै प्रजापतिः स तपोऽ-
तप्यत स तपस्तप्त्वा स मिथुनमुत्पादयते । रयिं च
प्राणं चेत्येतौ मे बहुधाः प्रजाः करिष्यत इति ॥ ४

अन्वयार्थ—[तस्मै सः ह उवाच–] त्याला तो पिप्पलाद म्हणाला, [प्रजाकामः वै प्रजापतिः–] आपल्या प्रजा उत्पन्न करण्याची इच्छा करणारा प्रजापति [सः तपः अतप्यत–] तप करता झाला. [सः तपः तप्त्वा–] तो तप करून [सः मिथुनं उत्पादयते–] जोडप्याला उत्पन्न करता झाला [रयिं च प्राणं च इति एतौ मे बहुधाः प्रजाः करिष्यतः इति–] रयि व प्राण, हे दोघे माझी प्रजा पुष्कळप्रकारें उत्पन्न करतील असें (चिंतन करून तो सूर्य व सोम यांना उत्पन्न करता झाला.) ४.

आदित्यो ह वै प्राणो रयिरेव चन्द्रमा रयिर्वा
एतत्सर्वं यन्मूर्तं चामूर्तं च तस्मान्मूर्तिरेव रयिः ॥ ५

अन्वयार्थ—त्या जोडप्यांतील [आदित्यः ह वै प्राणः–] आदित्य हाच प्राण [रयिः एव चंद्रमाः–] व रयिच चंद्रमा. [यत् मूर्तं च अमूर्तं च एतत् सर्वं रयिः वै–] जें मूर्त व अमूर्त आहे तें हें सर्व रयिच आहे. [तस्मात् मूर्तिः एव रयिः–] तस्मात् मूर्तिच रयि होय. आदित्यच प्राण–अत्ता–अग्नि व रयिच अन्न –चंद्रमा आहे. ५–त्याचप्रमाणें अमूर्तहि प्राण–अत्ता सर्व आद्य–भक्ष्य–अन्न आहे. ते कसें? उत्तर—

अथाऽऽदित्य उदयन्यत्प्राचीं दिशं प्रविशति तेन
प्राच्यान्प्राणान्रश्मिषु संनिधत्ते । यद्दक्षिणां यत्प्रतीचीं
यदुदीचीं यदधो यदूर्ध्वं यदन्तरा दिशो यत्सर्वं
प्रकाशयति तेन सर्वान्प्राणान्रश्मिषु संनिधत्ते ॥ ६

अन्वयार्थ—[अथ आदित्यः उदयन् यत् प्राची दिशं प्रविशति–] आतां आदित्य वर गमन करीत होत्साता जो पूर्व दिशेंत प्रवेश करतो [तेन प्राच्यान् प्राणान् रश्मिषु संनिधत्ते–] त्याच्या योगानें प्राच्य–पूर्व दिशेंतील–प्राणांस रश्मीं-मध्यें प्रविष्ट करतो.[यत् दक्षिणां यत् प्रतीचीं.....यत् सर्वं प्रकाशयति–]तो जो

दक्षिण, प्रतीची, उदीची, अधोदिशा, ऊर्ध्व दिशा, अवान्तर दिशा व दुसरें सर्व यास प्रकाशित करतो [तेन सर्वान् प्राणान् रश्मिषु संनिधत्ते—] त्याच्या योगानें सर्व प्राणांस किरणात संनिविष्ट करतो. ६.

स एष वैश्वानरो विश्वरूपः प्राणोऽग्निरुदयते । तदेतदृचाऽभ्युक्तम् ॥ ७

अन्वयार्थ—[सः एषः वैश्वानरः विश्वरूपः प्राणः अग्निः उदयते—] तो हा वैश्वानर विश्वरूप अत्ता प्राण अग्नि उदय पावतो. [तत् एतत् ऋचा अभ्युक्तम्—] तें हें तत्त्व ऋचेनें पुढील मंत्रांत सांगितलें आहे. ७.

विश्वरूपं हरिणं जातवेदसं परायणं ज्योतिरेकं तपन्तम् ।
सहस्ररश्मिः शतधा वर्तमानः प्राणः प्रजानामुदयत्येष सूर्यः ॥८

अन्वयार्थ—पूर्वोक्त वस्तुस्थितीचें वर्णन करणाऱ्या 'विश्वरूपं हरिणं जातवेदस०' इत्यादि मंत्राचा अर्थ असा—[विश्वरूपं—] सर्वरूप, [हरिणं—] किरणवान्, [जातवेदसं—] आत्मसाक्षात्कारवान् [परायणं—] सर्व प्राणांचा आश्रय, [एकं ज्योतिः—] सर्व प्राण्यांची दृक्शक्तिभूत एक ज्योति व [तपन्तं—] तापक्रिया—ताप, संताप देणें ही क्रिया करणारा अशा स्वात्म्याला, सूर्याला ब्रह्मवेत्ते जाणते झाले. ज्याला त्या सूरींनीं—ज्ञान्यांनीं जाणलें तो कोण म्हणून विचाराल तर सांगतों—[सहस्ररश्मिः—] ज्याचे किरण अनेक आहेत, व जो भिन्न भिन्न प्राण्याच्या योगानें [शतधा वर्तमानः—] अनेक प्रकारचा होऊन राहणारा [एषः प्रजाना प्राणः सूर्यः उदयति—] तो हा प्रजांचा—लोकांचा—सर्व जीवांचा प्राण, सूर्य उदय पावतो. ८.—हा जो चंद्रमा—मूर्ति—अन्न व अमूर्ति—प्राण—अत्ता—आदित्य, तें हें सर्व एक मिथुन आहे. पण तें प्रजेला कसें करतें, तें सांगितलें जातें—

संवत्सरो वै प्रजापतिस्तस्यायने दक्षिणं चोत्तरं च । तद्ये ह वै तदिष्टापूर्ते कृतमित्युपासते । ते चान्द्रमसमेव लोकमभिजयन्ते । त एव पुनरावर्तन्ते तस्मादेत ऋषयः प्रजाकामा दक्षिणं प्रतिपद्यन्ते । एष ह वै रयिर्यः पितृयाणः ॥ ९

अन्वयार्थ—[संवत्सरः वै प्रजापतिः—] संवत्सरच प्रजापति आहे. [तस्य अयने दक्षिणं च उत्तरं च—] दक्षिण व उत्तर हीं त्याचीं अयनें आहेत. [तत् ये ह वै तत इष्टापूर्तं कृतं इति उपासते—] ते जे इष्टापूर्तदत्त इत्यादि कृतच—कर्मच

उपासितात [ते चांद्रमसं एव लोकं अभिजयन्ते—] ते चंद्राच्या लोकालाच संपादन करितात [ते एव पुनरावर्तन्ते—] आणि तेच पुनरावर्तन करितात—पुनः जन्म घेतात. [तस्मात् एते प्रजाकामाः ऋषयः दक्षिणं प्रतिपद्यन्ते—] म्हणून हे प्रजेची इच्छा करणारे ऋषी दक्षिण मार्गास प्राप्त होतात. [यः पितृयाणः एषः ह वै रयिः—] जो पितृयाण मार्ग तोच रयि होय. (अग्निहोत्र, तप, सत्य, वेदांचें अध्ययनादिकाच्या योगानें पालन, आतिथ्य व वैश्वदेव, याला इष्ट; वापी-कूप-तडागादि जलाशय तयार करून त्यांचा लोकोपयोगार्थ उत्सर्ग करणें, देवालयें बांधणें, अन्नदान करणें, बागा करणें, इत्यादि जीवाची साक्षात् तृप्ति करणाऱ्या कर्मास पूर्त व दानास दत्त असें म्हणतात.) ९.

अथोत्तरेण तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया विद्ययाऽऽत्मानमन्विष्याऽऽदित्यमभिजयन्ते । एतद्वै प्राणानामायतनमेतदमृतमभयमेतत्परायणमेतस्मान्न पुनरावर्तन्त इत्येष निरोधस्तदेष श्लोकः ॥ १०

अन्वयार्थ—[अथ—] श्रुति आतां दुसऱ्या मार्गाचें वर्णन आरंभिते—ब्राह्मणादिकातील प्रजा [उत्तरेण—] उत्तर अयनानें प्रजापतीचा अंश जो प्राण, अत्ता, आदित्य त्यास प्राप्त होतात. सर्व प्रकारें जिंकतात. कोणत्या उपायानें ? [तपसा—] इंद्रियजयानें, [ब्रह्मचर्येण—] विशेषत. ब्रह्मचर्यानें [श्रद्धया—] श्रद्धेनें व [विद्यया—] प्रजापतितादात्म्यविषयक—प्रजापतीच मी आहें, अशा प्रकारच्या उपासनेनें, [आत्मानं अन्विष्य आदित्यं अभिजयन्ते—] आत्म्याला म्हणजे स्थावर-जंगमाच्या प्राणाला—सूर्याला 'हा मी आहे,' असें जाणून आदित्यास सर्व प्रकारें प्राप्त होतात. [एतत् वै प्राणानां आयतनं—] हे सूर्यरूपच सर्व प्राणाचें सामान्य—समष्टिरूप आयतन—आश्रय आहे. [एतत् अमृतं—] हेंच अमृत—अविनाशी व म्हणूनच हें [अभयं—] भयरहित आहे. चंद्रामार्गे याला क्षयाची व वृद्धीची भीति नाही. [एतत्परायणं—] कर्माचा अधिकार नसल्यामुळें केवल उपासना करणाऱ्या संन्यासीप्रभृतीची व उपासनेसह कर्मानुष्ठान करणाऱ्या लोकाची ही परा गति आहे. [एतस्मात् न पुनरावर्तन्ते—] जसे दुसरे केवल कर्म करणारे कर्मठ पुनः या लोकी येऊन जन्म घेतात त्याप्रमाणें ते आदित्यापासून पुनरावृत्त होत नाहीत. कारण [इति एषः निरोधः—] हा आदित्य उपासनाशून्य पुरुषांचा निरोध आहे. अविद्वान् आदित्याकडून

निरुद्ध झालेले असतात. यास्तव ते संवत्सरात्मक आदित्यास म्हणजे आत्म्यास —प्राणास सर्व प्रकारें प्राप्त होत नाहींत. यास्तव तो कालात्मा संवत्सर अविद्वानांचा निरोध आहे. निरोध म्हणजे प्रतिबंध [तदेषः श्लोकः—] याच अर्थी हा पुढील मंत्र आहे. १०.

पञ्चपादं पितरं द्वादशाकृतिं दिव आहुः परे अर्धे पुरीषिणम् ।
अथेमे अन्य उ परे विचक्षणं सप्तचक्रे षडर आहुरर्पितमिति ॥ ११

अन्वयार्थ—[पंचपादं—] पांच ऋतु हे या संवत्सरात्मक आदित्याचे जणु काय पाय आहेत. त्या ऋतूंच्या योगानें जणुं काय पायांप्रमाणेंच आदित्य आवर्तन—पुनः पुनः संचार—करीत असतो. हेमंत व शिशिर या दोन ऋतूंना एक समजून ही पांच पादांची कल्पना केली आहे. [पितरं—] तसाच तो पिता आहे. त्याला सर्व वस्तूंचे उत्पादकत्व असल्यामुळें सर्वांचें पितृत्व आहे. [द्वादशाकृतिम्—] बारा मास हेच त्याचे ' आकृति '—अवयव आहेत; अथवा बारा मासांनी ज्याला अवयवी केलें आहे, तो द्वादशाकृति. दोन्हीपक्षीं अर्थ एकच.त्याचप्रमाणें [दिवः परे अर्धे पुरीषिणं आहुः—] आकाशरूप अंतरिक्षलोकाच्या वरील स्थानी, म्हणजे तिसऱ्या स्वर्गांत तो पुरीषवान् म्हणजे उदकवान् आहे, असें कालवेत्ते म्हणतात. अर्थात् कालज्ञ त्याला पंचपाद, पिता, द्वादशाकृति व पुरीषिण म्हणतात. [अथ इमे अन्ये उ परे—] पण त्यालाच दुसरे कालज्ञ [विचक्षणं—] निपुण, सर्वज्ञ म्हणतात. [सप्तचक्रे षडरे अर्पितं इति आहुः—] सतत गतिमान् अशा कालरूप व सहा ऋतुरूपी अरानी युक्त अशा सात अश्वरूप चक्रामध्यें हें सर्व जगत् अर्पिलेलें आहे असें म्हणतात (रथाच्या चाकाच्या नाभीमध्यें अर जसे ठोकून घट्ट बसविलेले असतात तसें हें जगत् त्या निपुण, सप्ताश्वरूप, सदा गतिमान् व षड्ऋतुरूप कालचक्रांत घट्ट बसविलेलें आहे.) ११.

मासो वै प्रजापतिस्तस्य कृष्णपक्ष एव रयिः शुक्लः प्राणस्तस्मादेत ऋषयः शुक्ल इष्टं कुर्वन्तीतर इतरस्मिन् ॥ १२

अन्वयार्थ—ज्याच्या मध्यें हें विश्व आश्रय करून राहिलें आहे तोच संवत्सराख्य प्रजापति आपल्या अवयवभूत मासांमध्यें सर्व परिसमाप्त होतो. (तो मासरूप झाला आहे.) [मासो वै प्रजापतिः—] मासच यथोक्तलक्षण—

संवत्सररूप, रयि-प्राणमिथुनात्मक प्रजापति आहे. [तस्य कृष्णपक्ष एव रयिः—] त्या मासात्मक प्रजापतीचा एक भाग म्हणजे कृष्णपक्ष रयि—अन्न—चंद्रमा आहे आणि [शुक्लः प्राणः—] दुसरा भाग शुक्ल पक्ष प्राण—आदित्य—अत्ता—भक्षक अग्नि आहे. [तस्मात्—] ज्या अर्थी शुक्लपक्षरूप प्राणास सर्वात्मकच पाहतात म्ह० ज्या अर्थी ते कृष्णपक्षाला प्राणाहून पृथक् पहात नाहीत त्याअर्थी [एते ऋषयः शुक्ले इष्टं कुर्वन्ति—] हे कृष्णपक्षांतहि इष्ट—याग करणारे प्राणदर्शी ऋषी तो जणु काय शुक्लपक्षांतच करितात. (प्राण शुक्लपक्षात्मक आहे व कृष्णपक्षादि सर्व जगाला प्राणरूपत्व आहे. यास्तव प्राणाच्या द्वारा कृष्णपक्षालाहि शुक्लपक्षत्व प्राप्त झालें असतां ते प्राणदर्शी ऋषी कृष्णपक्षांत जरी याग करीत असले तरी तो प्रकाशात्मक शुक्लपक्षातच केल्यासारखा होतो. शुक्लपक्षाला प्राण समजणें, या उपासनेची ही स्तुति आहे.) [इतरे इतरस्मिन्—] परंतु दुसरे ऋषी सर्वात्मक प्राणास पहात नाहीत. त्यामुळें ते अज्ञानात्मक कृष्णपक्षालाच पाहतात. यास्तव ते वस्तुतः शुक्लपक्षांत जरी याग करीत असले तरी तो कृष्णपक्षांतच केल्यासारखा होतो. १२.—तोहि मासरूप प्रजापति पूर्वी प्रमाणेंच आपल्या अवयवरूप अहोरात्रांत परिसमाप्त होतो—

अहोरात्रो वै प्रजापतिस्तस्याहरेव प्राणो रात्रिरेव रयिः प्राणं वा एते प्रस्कन्दन्ति ये दिवा रत्या संयुज्यन्ते ब्रह्मचर्यमेव तद्यद्रात्रौ रत्या संयुज्यन्ते ॥ १३

अन्वयार्थ—[अहोरात्रः वै प्रजापतिः—] अहोरात्र हाच प्रजापति आहे. [तस्य अहर् एव प्राणः—] त्याचा दिवस हाच प्राण—अत्ता व [रात्रिः एव रयिः—] रात्रिच रयि—अन्न आहे.[ये दिवा रत्या संयुज्यन्ते—] जे दिवसा रतिकारणभूत स्त्रीशी संयुक्त होतात [एते प्राणं व प्रस्कंदन्ति—] ते प्राणांचाच विनाश करितात. [यत् रात्रौ रत्या संयुज्यन्ते—] पण जो रात्री स्त्रीशी संबंध केला जातो [तत् ब्रह्मचर्यं एव—] तें ब्रह्मचर्यच होय १३.

अन्नं वै प्रजापतिस्ततो ह वै तद्रेतस्तस्मादिमाः प्रजाः प्रजायन्त इति १४

अन्वयार्थ—[अन्नं वै प्रजापतिः—] रयि—प्राण—संवत्सर इत्यादि क्रमानें परिणाम पावून तो प्रजापति धान्यरूपानें—अन्नरूपानें परिणत होऊन राहिला आहे. पण अन्नरूप झालेल्याहि त्याला प्रजेचें जनकत्व—उत्पादकत्व कसें ? म्हणून

विचाराल तर सांगतों—[ततो ह वै तत् रेतः—]भक्षण केलेल्या त्या अन्नापासून रेत झालें ('रेतः-'शब्दानें स्त्रीशरीरांतील 'शोणित-'नांवाचा सातवा धातुहि घ्यावा.) रेत म्हणजे नृबीज (नरांचें बीज, जरायुज व अंडज प्राण्यांच्या शरीरांचें बीज) तें प्रजेचें कारण आहे. [तस्मात् इमाः प्रजाः प्रजायन्ते इति—] स्त्रीच्या ठिकाणी सेचन केलेल्या त्या बीजापासून या मनुष्यादिलक्षण प्रजा उत्पन्न होतात. (कबंधी कात्यायनानें ह्या सर्व प्रजा कोणापासून उत्पन्न होतात, असा जो प्रश्न केला होता त्याचा—चंद्रादित्यांच्या मिथुनापासून अहोरात्रापर्यंत वर सांगितलेल्या क्रमानें अन्न, शोणित, रेत यांच्या द्वारा या प्रजा निर्माण होतात,—असा निर्णय केला आहे. सु. गी. ३. १४. पृ. ६२ पहा.) १४.

तद्ये ह वै तत्प्रजापतिव्रतं चरन्ति ते मिथुनमुत्पादयन्ते।
तेषामेवैष ब्रह्मलोको येषां तपो ब्रह्मचर्यं येषु सत्यं प्रतिष्ठितम् १५

अन्वयार्थ—[तत् ये ह वै]अशी वस्तुस्थिति असल्यामुळें जे गृहस्थ; 'ह वै' हे प्रसिद्धिस्मरणार्थ निपात आहेत. [तत् प्रजापतिव्रतं चरन्ति—] ऋतुकाळी भार्यागमनरूप प्रजापतिव्रत करितात [ते मिथुनं उत्पादयन्ते—] ते पुत्र व कन्या या मिथुनास—जोडप्यास उत्पन्न करितात. हें दृष्ट फल आहे. पण केवल हें प्रजापतिव्रत केल्यानेंच चंद्रलोकप्राप्तिरूप अदृष्ट फल मिळत नाही. कारण तेव ढ्यानेंच तें मिळतें असें समजल्यास मूर्खांना व पश्वादिकांनाहि तें मिळण्याचा प्रसंग येईल ! कारण तेहि ऋतुकाली स्त्रीसमागम करून मिथुन उत्पन्न करितात. यास्तव [तेषा एव एषः ब्रह्मलोकः—] त्या ऋतुकालीं भार्यागमन करणाऱ्या गृहस्थातील जे इष्टापूर्तदत्तकारी—इष्टादि करणारे असतात त्यांनाच पितृयाणलक्षण चांद्रमस ब्रह्मलोक हें अदृष्ट फल मिळतें. इष्टादि कर्में करणाऱ्या गृहस्थांना प्रजापतीच्या अंशरूप चांद्रमस लोकाची प्राप्ति होण्या-करितां तप, ब्रह्मचर्य व सत्य यांचीहि अपेक्षा असते, असें आतां श्रुतिच सागते—[येषां तपः ब्रह्मचर्यं—] ज्या गृहस्थांमध्यें स्नातकव्रतादि तप, ऋतुकालास सोडून इतर समयी मैथुन न करणें, हें ब्रह्मचर्य असतें व [येषु सत्यं प्रतिष्ठितं—] ज्यांच्यामध्यें मिथ्यात्याग, हें सत्य सतत प्रतिष्ठित झालेलें असतें—क्षणभरहि व्यभिचार न पावतां स्थिर राहतें त्यांनाच हें वरील अदृष्ट फल मिळतें १५.

—आतां आदित्योपलक्षित, शुद्ध, वृद्धिक्षयरहित, उत्तरायणसंज्ञक, प्राणात्मभाव कोणाला प्राप्त होतो, तें सांगतात—

तेषामसौ विरजो ब्रह्मलोको न येषु जिह्ममनृतं न माया चेति ॥ १६

इत्यथर्ववेदीयप्रश्नोपनिषदि प्रथमः प्रश्नः ॥ १ ॥

अन्वयार्थ—[तेषां एव असौ ब्रह्मलोकः—] त्यांनाच हा शुद्ध ब्रह्मलोक मिळतो; कोणाला ? [येषु न जिह्मं अनृतं न माया च इति—] ज्यांच्यामध्यें कौटिल्य व अनृत नाही व ज्यांच्यामध्यें माया नाही त्यांनाच. गृहस्थांना व्यवहारांत कौटिल्य, अनृत व माया यांचा अंगीकार करावाच लागतो. यास्तव (ब्रह्मचारी, वानप्रस्थ, व परमहंसास सोडून बाकीच भिक्षु इत्यादि ज्या अधिकारी पुरुषांमध्यें, कौटिल्यादिकांचें कांही निमित्तच नसल्यामुळें, कौटिल्य, अनृत व माया हे दोष नसतात त्यांना, त्यांच्या साधनानुसारच, हा विरज—शुद्ध ब्रह्मलोक मिळतो. ही ज्ञानयुक्त—उपासनायुक्त—कर्मवानांची गति आहे. वरच्या मंत्रांत सांगितलेला जो चंद्रलक्षण ब्रह्मलोक तो केवल गृहस्थ कर्मठांस मिळतो व हा उपासनायुक्त कर्मवानास मिळतो १६. १.

अथ द्वितीयः प्रश्नः ।

प्राण अत्ता प्रजापति आहे, असें पहिल्या प्रश्नांत सांगितलें. आतां त्याचें तें प्रजापतित्व व अत्तृत्व या शरीरांत निश्चित करावें, म्हणून हा प्रश्न आरंभिला जातो.—

अथ हैनं भार्गवो वैदर्भिः पप्रच्छ । भगवन्कत्येव देवाः प्रजा विधारयन्ते कतर एतत्प्रकाशयन्ते कः पुनरेषां वरिष्ठ इति ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह एनं भार्गवः वैदर्भिः पप्रच्छ—] त्यानंतर पिप्पलाद आचार्याला भार्गव वैदर्भि विचारूं लागला, [हे भगवन् कति एव देवाः प्रजाः विधारयन्ते—] हे भगवन्, किती देव प्रजेचें विशेषतः धारण करितात. [कतरे एतत् प्रकाशयन्ते—] बुद्धीन्द्रिय-कर्मेंद्रियरूप देवांतील कोणते देव हें प्रकाशन करितात; व [एषां वरिष्ठः कः पुनः इति—] यांतील वरिष्ठ कोण ? असें ह्मणाला. १.

तस्मै स होवाचाऽऽकाशो ह वा एष देवो वायुरग्निरापः पृथिवी वाङ्मनश्चक्षुःश्रोत्रं च। ते प्रकाश्याभिवदन्ति वयमेतद्बाणमवष्टभ्य विधारयामः ॥ २

अन्वयार्थ—[तस्मै सः ह उवाच–] असें विचारणाऱ्या त्याला तो पिप्पलाद आचार्य म्हणाला, [आकाशः ह वै एषः देवः–] तो प्रसिद्ध देव हा आकाशच आहे. आकाश, [वायुः अग्निः आपः पृथिवी–] वायु, अग्नि, जल व पृथिवी हीं पांच शरीरारंभक–शरीराचा आरंभ करणारी महाभूतें व [वाक् मनः चक्षुः श्रोत्रं–] वाक्, मन, चक्षु, श्रोत्र इत्यादि कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें, हेच कार्यलक्षण व करणलक्षण देव आहेत. [ते प्रकाश्य अभिवदन्ति–] ते देव आपलें माहात्म्य प्रकट करून आपापल्या श्रेष्ठत्वाकरितां परस्पर स्पर्धा करीत बोलूं लागले. कसें ? स्तम्भादिक–खांब वगैरे प्रासादाला–मोठ्या धनिकाच्या किंवा राजाच्या वाड्याला–जसे धारण करितात त्याप्रमाणें [वयं–] आम्ही [एतद् बाणं–] या कार्यकरणसंघातरूप शरीरास [अवष्टभ्य–] चोहोंकडून आधार देऊन, त्याला फारसें शिथिल होऊं न देतां, [विधारयामः–] उघड उघड धारण करितों. त्यांतील प्रत्येकाचा ' मीच एकटा या सर्व संघाताला धारण करतों, ' असा अभिप्राय होता. (त्या कार्यकरणरूप देवांतील प्रत्येकजण आपापलें कार्य लोकांत प्रकट करून सर्व शरीराचें धारण मीच करतों, असें अभिमानानें म्हणू लागला.) २.

तान्वरिष्ठः प्राण उवाच । मा मोहमापद्यथाहमेवैतत्पञ्चधाऽऽत्मानं प्रविभज्यैतद्बाणमवष्टभ्य विधारयामीति तेऽश्रद्दधाना बभूवुः ॥३

अन्वयार्थ—पण [तान्–] अशा रीतीनें अभिमान करणाऱ्या त्या देवांना [वरिष्ठः–] त्या सर्वांतील वरिष्ठ–मुख्य [प्राणः उवाच–] प्राण ह्मणाला, [मा मोहं आपद्यथ–] अविवेकामुळें अशा मोहांत पडूं नका. मूर्खपणामुळें असा अभिमान करूं नका. कारण [अहं एव पंचधा आत्मानं प्रविभज्य–] मीच आपल्याला पांचप्रकारें विभागून–आपले प्राणापानादि वृत्तिभेद करून व [एतत् बाणं अवष्टभ्य विधारयामि–] या निंद्य गंधास वाहणाऱ्या आणि विनाश पावणाऱ्या शरीरास बलकटी देऊन धारण करतों. [ते अश्रद्दधानाः बभूवुः–] पण तो असें म्हणूं लागला असतां ते इतर देव ' असें कसें होईल ' असें बोलून

त्यावर विश्वास ठेवीनातसे झाले. (प्राणांचें ह्मणणें खरें आहे, असें त्यांना वाटलें नाहीं. त्याच्या म्हणण्यावर त्यांचा विश्वास बसला नाहीं. ते अश्रद्दधान —त्यावर श्रद्धा न करणारे—झाले. सु. ब्र. २. ४. ५. पृ. २४१.) ३.

सोऽभिमानादूर्ध्वमुत्क्रमत इव तस्मिन्नुत्क्रामत्यथेतरे सर्व एवोत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्व एव प्रातिष्ठन्ते तद्यथा मक्षिका मधुकरराजानमुत्क्रामन्तं सर्वा एवोत्क्रामन्ते तस्मिंश्च प्रतिष्ठमाने सर्वा एव प्रातिष्ठन्त एवं वाङ्मनश्चक्षुःश्रोत्रं च ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति ॥ ४

अन्वयार्थ—[सः—] तो प्राण तेव्हां त्या देवांची ती अश्रद्दधानता —अविश्वास पाहून [अभिमानात् ऊर्ध्वं उत्क्रमते इव—] अभिमानानें जणुं काय हें शरीर सोडून वर जाऊंसा लागला. पण क्रोधानें शरीर व त्यांतील देवता यांविषयी निरपेक्ष होऊन—आपल्या मागें यांचा नाश होईल, याची कांहीच चिंता न करितां (अथवा स्वतः एकटाच तो प्राण वर जाऊं लागला असतां जें झालें तें श्रुति दृष्टान्तानें स्पष्ट करून दाखविते.)—[तस्मिन् उत्क्रामति अथ इतरे सर्वे एव उत्क्रामन्ते—]तो प्राण वर जाऊं लागला असतां त्याच्या अनंतर क्षणींच चक्षुरादि इतर देवहि वर जावयास—शरीर सोडून निघाले [च तस्मिन् प्रतिष्ठमाने सर्वे एव प्रातिष्ठन्ते—] आणि तो प्राण प्रतिष्ठित होऊन मुकाट्यानें राहिला असतां, त्यानें आपलें उत्क्रमण—शरीर सोडून जाण्याची क्रिया—थांबविली असतां, ते सर्व चक्षुरादि प्रतिष्ठित—तूष्णीं व्यवस्थित झाले [तत् यथा—] त्याविषयीं दृष्टान्त—[मधुकरराजानं उत्क्रामन्तं सर्वाः एव मक्षिकाः उत्क्रामन्ते—] व्यवहारांत मधमाशांचा राजा एखाद्या स्थानावरून उठून जाऊं लागला असतां त्याच्या पाठी मागून सर्वेच मधमाशा उत्क्रमण करितात [च तस्मिन् प्रतिष्ठमाने सर्वाः एव प्रातिष्ठन्ते—] व तो एके स्थानीं प्रतिष्ठित झाला असतां सर्व मधुकर तेथेंच तूष्णीं व्यवस्थित होतात, [एवं—] त्याप्रमाणेंच म्हणजे या दृष्टान्ताप्रमाणेंच [वाङ्मनः-चक्षुः-श्रोत्रं च—] वाक्, मन, चक्षु, श्रोत्र इत्यादि प्राणाबरोबर उत्क्रमण व स्थिति करितात. [ते प्रीताः प्राणं स्तुन्वन्ति (स्तुवन्ति)—] त्या इंद्रियांच्या सचेतन देवता आपली अश्रद्धालूता

सोडून व प्राणमाहात्म्य जाणून संतुष्ट होऊन प्राणास स्तवूं लागतात. ४. —त्यांच्या स्तवनाचा प्रकार—

एषोऽग्निस्तपत्येष सूर्य एष पर्जन्यो मघवानेष
वायुरेष पृथिवी रयिर्देवः सदसच्चामृतं च यत् ॥ ५

अन्वयार्थ—[एषः अग्निः तपति–] हा प्राण अग्नि होऊन संताप करतो. [एषः सूर्यः–] सूर्य होऊन प्रकाशमान होतो. [एषः पर्जन्यः मघवान्०–] हा पर्जन्य, इंद्र, हा वायु, हा देव पृथिवी, रयि–अन्न, सत्, असत् व जें अमृत तें आहे ५.

अरा इव रथनाभौ प्राणे सर्वं प्रतिष्ठितम् ।
ऋचो यजूंषि सामानि यज्ञः क्षत्रं ब्रह्म च ॥ ६

अन्वयार्थ—[रथनाभौ अराः इव–] रथाच्या नाभीमध्यें जसे अर त्याप्रमाणें [प्राणे सर्वं प्रतिष्ठितं–] प्राणांत सर्व प्रतिष्ठित आहे. स्थितिकाली सहाव्या प्रश्नांतील सोळा कला प्राणांत प्रतिष्ठित आहेत. त्याचप्रमाणें [ऋचः यजूंषि०–]ऋचा, यजूंषें,सामें,यज्ञ,क्षत्रजाति,ब्राह्मणजाति हें सर्व प्रतिष्ठित आहे ६

प्रजापतिश्चरसि गर्भे त्वमेव प्रतिजायसे । तुभ्यं प्राण
प्रजास्त्विमा बलिं हरन्ति यः प्राणैः प्रतितिष्ठसि ॥ ७

अन्वयार्थ—[हे प्राण प्रजापतिः त्वं एव–] हे प्राणा, प्रजापति तूंच आहेस. [गर्भे चरसि–] तूंच गर्भांत संचार करतोस[प्रतिजायसे–]व मातापित्यासारखा होऊन उत्पन्न होतोस. [तु इमाः प्रजाः तुभ्यं बलि हरन्ति–] या सर्व प्रजा तुझ्याकरितांच चक्षुरादिद्वारांनी बलि आणतात [यः प्राणैः प्रतितिष्ठसि–] कारण तूं सर्व शरीरांत इंद्रियांसह राहतोस. ७.

देवानामसि वह्नितमः पितॄणां प्रथमा स्वधा ।
ऋषीणां चरितं सत्यमथर्वाङ्गिरसामसि ॥ ८

अन्वयार्थ—[देवानां वह्नितमः आस–] देवांचा तूं हवींना उत्तमप्रकारें पोंचविणारा आहेस. [पितॄणां प्रथमा स्वधा–] पितरांची पहिली स्वधा आहेस. [अथर्वाङ्गिरसां ऋषीणां सत्यं चरितं असि–] अथर्वांगिरस ऋषींचें म्ह० चक्षुरादि प्राणांचें तूं सत्य चरित आहेस. ८.

इन्द्रस्त्वं प्राण तेजसा रुद्रोऽसि परिरक्षिता । त्वमन्तरिक्षे चरसि सूर्यस्त्वं ज्योतिषां पतिः ॥ ९

अन्वयार्थ—[प्राण त्वं इंद्रः] हे प्राणा, तूं 'इंद्र' परमेश्वर आहेस [तेजसा रुद्रः असि] आपल्या वीर्यानें जगाचा संहार करणारा रुद्रहि तूंच आहेस. त्याचप्रमाणें [परिरक्षिता] स्थितिसमयीं सौम्य विष्णुरूपानें जगाचें सर्व बाजूंनी परिरक्षण—पालन—करणारहि तूंच. [त्वं अन्तरिक्षे चरसि] तूं अंतरिक्षांत उदय व अस्त यांच्या योगानें सतत गमन करतोस. [त्वं ज्योतिषां पतिः सूर्यः] तूंच सर्व ज्योतीचा पति सूर्य आहेस ९.

यदा त्वमभिवर्षस्यथेमाः प्राणते प्रजाः । आनन्दरूपास्तिष्ठन्ति कामायान्नं भविष्यतीति ॥ १०

अन्वयार्थ—[यदा त्वं अभिवर्षसि] तूं जेव्हां पर्जन्य होऊन वर्षाव करतोस [अथ इमाः प्रजाः प्राणते] तेव्हां ह्या प्रजा प्राणचेष्टा करितात आणि [कामाय अन्नं भविष्यति इति] आम्हांला आतां यथेच्छ अन्न होईल, असें म्हणून [आनन्दरूपाः तिष्ठन्ति] आनन्दरूप राहतात. १०.

व्रात्यस्त्वं प्राणैकऋषिरत्ता विश्वस्य सत्पतिः । वयमाद्यस्य दातारः पिता त्वं मातरिश्वनः ॥ ११

अन्वयार्थ—[प्राण त्वं व्रात्यः] हे प्राणा, तूं व्रात्य—संस्कारहीन आहेस. [एकऋषिः अत्ता विश्वस्य सत्पतिः] एकऋषि नावाचा अग्नि, अत्ता—भक्षक, विश्वाचा सत्पति आहेस. [वय आद्यस्य दातारः] आम्ही तुझ्या भक्षणीय हवीचे दाते आहों. [हे मातरिश्वन् त्वं नः पिता] हे वायो, तूं आमचा पिता आहेस. किंवा [त्वं मातरिश्वनः पिता] तूं वायूचा पिता आहेस. ११.

या ते तनूर्वाचि प्रतिष्ठिता या श्रोत्रे या च चक्षुषि । या च मनसि संतता शिवां तां कुरु मोत्क्रमीः ॥ १२

अन्वयार्थ—[या ते तनूः वाचि प्रतिष्ठिता] जी तुझी तनु वाणीमध्यें प्रतिष्ठित आहे, [या श्रोत्रे च या चक्षुषि] जी श्रोत्रांत व जी चक्षूमध्यें आहे, [या च मनसि संतता] जी मनामध्ये संतत—व्याप्त आहे [तां शिवां कुरु] तिला शांत कर. [मा उत्क्रमीः] स्वतःच्या उत्क्रमणानें तिचा नाश करूं नको १२.—किंबहुना—

प्राणस्येदं वशे सर्वं त्रिदिवे यत्प्रतिष्ठितम् ।
मातेव पुत्रान्रक्षस्व श्रीश्च प्रज्ञां च विधेहि न इति ॥ १३
इत्यथर्ववेदीयप्रश्नोपनिषदि द्वितीयः प्रश्नः ॥ २ ॥

अन्वयार्थ—[इदं सर्वं प्राणस्य वशे–]या लोकीं जेवढें म्हणून उपभोगजात आहे, तें सर्व प्राणाच्याच वश आहे. [त्रिदिवे यत् प्रतिष्ठितं–] स्वर्गसंज्ञक तिसऱ्या द्युलोकांत देवादिकांच्या उपभोगरूप जें कांही आहे त्याचाहि रक्षक प्राणच आहे. यास्तव [माता इव पुत्रान् रक्षस्व–] माता जशी पुत्रांचें तसें तूं आमचें पालन कर. तुझ्या निमित्तानेंच ब्राह्मणाच्या व क्षत्रियांच्या श्री–विभूती विद्यमान असतात. [श्रीः च प्रज्ञां च नः विधेहि इति–] त्या श्री व तुझ्या स्थितीमुळें स्थित होणारी–त्वत्स्थितिनिमित्त प्रज्ञा तूं कर–आम्हांस दे, असा भावार्थ.(असो; अशा रीतीनें वागादि प्राणांनीं स्तुतीच्या योगानें ज्याचा महिमा सर्वात्मतेनें सर्वांस ज्ञात केला आहे असा प्राण प्रजापति–अत्ता आहे हें निश्चित झालें. १३. २.

अथ तृतीयः प्रश्नः

वरील प्रश्नांत प्राणाचें प्रजापतित्व, अत्तृत्व, इत्यादि गुणजात निश्चित केलें. आतां त्याच्या उत्पत्त्यादिकांचा निश्चय करून त्याच्या उपासनेचें विधान करण्यास्तव हा तिसरा प्रश्न आरंभितात—

अथ हैनं कौसल्यश्चाऽऽश्वलायनः पप्रच्छ । भगवन्कुत एष प्राणो जायते कथमायात्यस्मिञ्शरीर आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते केनोत्क्रमते कथं बाह्यमभिधत्ते कथमध्यात्ममिति १

अन्वयार्थ—[अथ–]पिप्पलाद आचार्यांनी विदर्भाच्या प्रश्नाचें उत्तर दिल्यानंतर [ह एनं कौसल्यः आश्वलायनः पप्रच्छ–] त्यांस कौसल्य आश्वलायन विचारूं लागला. [भगवन्–] भगवन्, वर वर्णन केल्याप्रमाणें ज्यांनी प्राणाच्या तत्त्वाचा निश्चय केला आहे अशा वागादिकांनीं त्याचा महिमा जरी जाणला तरी तो संहत–इतरांशीं संघात पावलेला–मिळालेला, अनेकात्मक, सावयव असल्यामुळें त्याला कार्यत्वहि असेल; म्हणून मी विचारितों, कीं [कुतः एषः

प्राणः जायते–] कोणत्या कारणापासून हा पूर्वोक्त प्राण उत्पन्न होतो? आणि उत्पन्न झालेला हा [कथं आयाति अस्मिन् शरीरे–] कोणत्या विशेषवृत्तीनें–व्यापारानें या शरीरांत येतो? ह्याचें शरीरग्रहण किंनिमित्त आहे, त्याच्या शरीरधारणाचें निमित्त काय? हा इत्यर्थ, [आत्मानं वा प्रविभज्य कथं प्रातिष्ठते–] त्याचप्रमाणें शरीरांत प्रविष्ट झालेला हा आपल्याला विभक्त करून कोणत्या प्रकारानें प्रतिष्ठित होतो? [केन उत्क्रमते–] कोणत्या विशेष वृत्तीनें या शरीरांतून उत्क्रमण करतो? [कथं बाह्यं अभिधत्ते कथं अध्यात्मं इति–] बाह्य म्ह० अधिभूत व अधिदैव यांचें तो कर्में धारण करतो? आणि अध्यात्माचें कसें धारण करतो? १.—

तस्मै स होवाचातिप्रश्नान्पृच्छसि ब्रह्मिष्ठोऽसीतितस्मात्तेऽहं ब्रवीमि ॥ २

अन्वयार्थ—[सः तस्मै ह उवाच–] शिष्यानें असा प्रश्न केला असतां आचार्य त्यास म्हणतो–प्राणच अगोदर दुर्ज्ञेय असल्यामुळें त्याविषयीं प्रश्न करणें फार कठिण आहे. पण तूं तर त्याचेंहि जन्मादि विचारीत आहेस. तस्मात् [अतिप्रश्नान् पृच्छसि–] तूं दुसऱ्या सर्वांच्या प्रश्नांचें अतिक्रमण करून सूक्ष्मविषयक प्रश्न विचारीत आहेस [ब्रह्मिष्ठः असि इति–] तूं ब्रह्मिष्ठ आहेस. अपर ब्रह्माच्या अपेक्षेनें अतिशयित–मुख्य, वरिष्ठ असलेल्या ब्रह्माला तूं जाणतोस. प्रोत्साहन देण्याकरिता ही स्तुति आहे. [तस्मात् ते अहं ब्रवीमि] यास्तव तुझा प्रश्न ऐकून मी संतुष्ट झालों आहें. मी तुझ्या प्रश्नाचें उत्तर सांगतों, तें ऐक. २.

आत्मन एष प्राणो जायते । यथैषा पुरुषे छायैतस्मिन्नेतदाततं मनोकृतेनाऽऽयात्यस्मिञ्शरीरे ॥ ३

अन्वयार्थ—[आत्मनः एषः प्राणः जायते–] आत्म्यापासून हा प्राण उत्पन्न होतो. [यथा एषा पुरुषे छाया–] ज्याप्रमाणें ही पुरुषामुळें छाया [एतस्मिन् एतत् आततं–] त्याप्रमाणें या सत्य पुरुषामध्यें हे प्राणतत्त्व समर्पिलेलें आहे. [मनोकृतेन अस्मिन् शरीरे आयाति–] तो प्राण मनःसंकल्पादिजन्य कर्मामुळें या शरीरांत येतो.

यथा सम्राडेवाधिकृतान्विनियुङ्क्ते । एतान्ग्रामानेतान्ग्रामानधितिष्ठस्वेत्येवमेवैष प्राण इतरान्प्राणान्पृथक्पृथगेव संनिधत्ते ॥ ४

अन्वयार्थ—[यथा सम्राडेव—] लोकांमध्यें जसा एखादा सम्राट् राजा [एतान् ग्रामान् एतान् ग्रामान् अधितिष्ठस्व इति अधिकृतान विनियुंक्ते—] 'तूं या गावांत रहा, तूं या गावात रहा,' असें आज्ञावचन बोलून ग्रामादिकांमध्यें अधिकाऱ्यांस नियुक्त करतो—नेमतो [एवं एव एषः प्राणः इतरान् प्राणान् पृथक् पृथक् एव संनिधत्ते—] याप्रमाणेंच—या वरील दृष्टान्तानुसार हा मुख्य प्राण इतर अमुख्य प्राणांस—चक्षुरादि आपल्या भेदास, पृथक् पृथक्च ज्याच्या त्यांच्या उचित स्थानीं नियुक्त करतो.४.—त्यानें त्यांचा विभाग कसा केला आहे तें सांगतात—

पायूपस्थेऽपानं चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः
स्वयं प्रातिष्ठते मध्ये तु समानः एष ह्येतद्धुतमन्नं
समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥ ५

अन्वयार्थ—[पायूपस्थे अपानं—] पायु—गुदेंद्रिय व उपस्थ—जननेंद्रिय यांमध्यें 'अपान-'नांवाच्या आपल्या भेदाला स्थापून पुरीष—विष्ठा, मूत्र इत्यादिकांना बाहेर घालविणें, या कामांत त्याचा विनियोग करतो याचप्रमाणें [चक्षुःश्रोत्रे मुखनासिकाभ्यां प्राणः स्वयं प्रातिष्ठते—] मुख व नासिका याच्या द्वारा बाहेर पडणारा व स्वतः सम्राटासारखा असलेला प्राण चक्षु व श्रोत्र यात प्रतिष्ठित होतो. [मध्ये तु समानः—] प्राण व अपान या दोहोंच्या स्थानांमध्यें म्हणजे नाभीत समानाला तो नियुक्त करतो. खाल्लेल्या व प्यालेल्या पदार्थांना जो शरीरभर सम पोंचवितो तो समान होय. [हि एषः एतत् हुतं अन्नं समं नयति—] कारण हा समानच आत्माग्नीत—जठराग्नींत हवन केलेलें—खाल्लेलें व प्यालेलें अन्न शरीरभर एकसारखें पोंचवितो. नंतर तें खाल्लेलें व प्यालेलें अन्न हेंच ज्याचें इंधन आहे अशा हृदयप्रदेशी प्राप्त झालेल्या त्या जठराग्नीपासून या मस्तकसंबंधी गोलकांत राहणाऱ्या सात ज्वाला—दीप्ती निघतात. प्राणाच्या द्वारा रूप-रसादि विषयाचें दर्शन, श्रवण इत्यादि प्रकाश याच त्या सात दीप्ती होत. (दोन दर्शन, दोन श्रवण, दोन प्राण व मुखस्थ रसना, अशा त्या सात ज्वाला आहेत. जठराग्नीच्या योगानें परिपक्व झालेल्या अन्नरसाच्या बलानें दर्शनादिकांची प्रवृत्ति होत असल्यामुळें त्यांना जठराग्नीच्या ज्वाला म्हटलें आहे.)५

हृदि ह्येष आत्मा । अत्रैतदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्यां द्वासप्ततिर्द्वासप्ततिः प्रतिशाखा-नाडीसहस्राणि भवन्त्यासु व्यानश्चरति ॥ ६

अन्वयार्थ—[हृदि–]शुभ्रकमलाकार मांसाच्या पिंडानें–गोळ्यानें–परिच्छिन्न झालेल्या हृदयाकाशांत [एषः हि आत्मा–] हा आत्मा, आत्म्यानें संयुक्त झालेला लिंगात्मा राहतो. कारण हृदय हें लिंगात्म्याचें स्थान आहे [अत्र नाडीनां एतत् एकशतं–] या हृदयामध्यें–संख्येनें एकशें एक प्रधान–मुख्य नाड्या आहेत. [तासां एकैकस्यां शतं शतं–] त्यांतील एकेका प्रधान नाडीचे शंभर शंभर शाखाभेद आहेत [द्वासप्ततिः द्वासप्ततिः प्रतिशाखानाडीसहस्राणि भवन्ति–] प्रत्येक प्रधान नाडीच्या या शंभर शाखानाड्यांचे प्रत्येकीं बहात्तरसहस्र प्रतिशाखाभेद आहेत. (म्हणजे सर्व मिळून बहात्तर कोटी, बहात्तर लक्ष, दहा सहस्र, दोनशें एक इतक्या नाड्या शरीरांत आहेत.) [आसु व्यानः चरति–] या नाड्यांमध्यें व्यान संचार करतो. सर्व शरीराला व्यापल्यामुळें 'व्यान' हें त्याचें नांव रूढ झालें आहे. ६.–आतां उदानवायूचें स्थान सांगून प्राण कोणत्या मार्गानें उत्क्रमण करितो, या प्रश्नाचें उत्तर—

अथैकयोर्ध्व उदानः पुण्येन पुण्यं लोकं नयति पापेन पापमुभाभ्यामेव मनुष्यलोकम् ॥ ७

अन्वयार्थ—[अथ एकया–] आतां त्या हृदयस्थ एकशें एक नाड्यांतील जी एक ऊर्ध्व गमन करणारी 'सुषुम्ना-'नांवाची नाडी आहे त्या एका नाडीच्या द्वारा [ऊर्ध्वः उदानः–] ऊर्ध्व वृत्ति होऊन, उदान वायु पादतला-पासून मस्तकापर्यंत ज्याची वृत्ति आहे, असा होत्साता संचार करीत [पुण्येन पुण्यं लोकं नयति–] शास्त्रविहित पुण्य कर्मानें देवादिस्थानलक्षण पुण्य लोकास व [पापेन पापं–] शास्त्रनिषिद्ध पापकर्मानें पाप लोकास, तिर्यग्योनि–इत्यादि लक्षण नरकास जीवाला पोंचवितो. [उभाभ्यां एव मनुष्यलोकं–] पण ज्यांचें प्राधान्य समान आहे अशा दोन्ही पुण्य-पापांच्या योगानेंच तो जीवाला मनुष्य-लोकास पोंचवितो. अर्थात् उदान पुण्याचें आधिक्य झाल्यास जीवाला देवलो-कास, पापाचें आधिक्य झाल्यास नरक लोकास व पुण्य आणि पाप हीं दोन्ही

समान झाल्यास मनुष्य लोकास पोंचवितो. सु.गी.१८.१२.पृ.३१८पहा. ७. हा बाह्य व अध्यात्म यांस कसें धारण करितो, या प्रश्नाचें उत्तर—

आदित्यो ह वै बाह्यः प्राण उदयत्येष ह्येनं चाक्षुषं प्राणमनुगृह्णानः। पृथिव्यां या देवता सैषा पुरुषस्यापानमवष्टभ्यान्तरा यदाकाशः स समानो वायुर्व्यानः ॥ ८

अन्वयार्थ—[आदित्यः ह वै बाह्यः प्राणः उदयति—] हा प्रसिद्ध आदित्यच अधिदैवत बाह्य प्राण असून तो उदय पावतो. [एषः हि एनं चाक्षुषं प्राणं अनुगृह्णानः—] हा या शरीरसंबंधी चक्षूंतील—चाक्षुष प्राणावर आपल्या प्रकाशानें अनुग्रह करीत राहतो. रूपाच्या उपलब्धीसाठी नेत्राला प्रकाश देत, रूपोपलब्धीचें—रूपग्रहणाचें सामर्थ्य देत, तो राहतो, असा याचा भावार्थ. [पृथिव्यां या देवता—] त्याचप्रमाणें पृथ्वीमध्यें जी ही अग्निसंज्ञक अभिमानिनी देवता प्रसिद्ध आहे [सा एषा पुरुषस्य अपानं अवष्टभ्य—] ती पुरुषाच्या अपानवृत्तीला आकर्षण करून—आपल्या वश करून—तिला खालीच आकर्षण करणें, याच्या योगानें अनुग्रह करीत राहते, असा भावार्थ. त्या अग्निदेवताक पृथ्वीनें पुरुषाच्या अपानवृत्तीला जर खालीच ओढून धरलें नसतें तर शरीर जड—भारी असल्यामुळें पडलें असतें. किंवा अवकाशयुक्त अंतरिक्षांत गेलें असतें [अन्तरा यत् आकाशः सः समानः वायुः व्यानः—] द्युलोक व पृथिवी यांच्यामध्यें जो हा आकाश आहे त्यांतील वायूलाहि 'आकाश' असें लक्षणावृत्तीनें येथें म्हटलें आहे. तो आकाशसंज्ञक वायु समान आहे. तो समानावर अनुग्रह करीत राहतो, असा भावार्थ. कारण अंतराकाशांत स्थित होणें, हा समानवायूचा धर्म त्याच्या ठिकाणीं आहे. (समान शरीरांतील आकाशात असतो व बाह्य वायु द्यावापृथिवीमधील आकाशांत राहतो. त्यामुळें त्या दोहोंचें अंतराकाशस्थत्व समान आहे) आणि सामान्यतः जो बाह्य वायु तोच व्याप्ति या समान धर्मामुळें व्यान होतो. म्हणजे व्यानावर अनुग्रह करीत राहतो, असा याचा अभिप्राय. (बाह्य सामान्य वायु व शरीरांतील व्यान यांमध्यें व्याप्ति—व्यापून राहणें—हा समान धर्म आहे.) ८.

**तेजो ह वा उदानस्तस्मादुपशान्ततेजाः।
पुनर्भवमिन्द्रियैर्मनसि संपद्यमानैः ॥ ९**

अन्वयार्थ—[तेजः ह वै उदानः—] जें बाह्य सामान्य प्रसिद्ध तेज, आदित्यसंज्ञक विशेष तेज नव्हे, तोच उदान; आपल्या प्रकाशानें तें उदान वायूवर अनुग्रह करतें, असा अभिप्राय. अर्थात् तें तेजच या शरीरांतील उदान आहे. तो ज्याअर्थीं तेजःस्वभाव, बाह्य तेजाकडून अनुग्रह केला गेलेला व उत्क्रांतिकर्ता आहे [तस्मात् उपशांततेजाः—] त्याअर्थीं हा लौकिक पुरुष जेव्हां उपशान्ततेज म्ह० ज्याचें स्वाभाविक तेज उपशान्त झालें आहे असा होतो तेव्हा तो क्षीणायु—मुमूर्षु मरणोन्मुख झाला आहे, असें जाणावें. [पुनर्भवं—] नंतर तो पुनः होणाऱ्या दुसऱ्या शरीरास प्राप्त होतो. पण अक्रिय आत्मा अन्यशरीराचें ग्रहण कसें करूं शकतो? [मनसि संपद्यमानैः इंद्रियैः—] मनामध्यें प्रवेश करणाऱ्या—लीन होणाऱ्या—वागादि इंद्रियांसह तो दुसऱ्या शरीरांत जातो. २.—उत्क्रांतीचा क्रम दाखवून दुसऱ्या शरीराची प्राप्ति कशी होते तें स्पष्ट करितात—

यच्चित्तस्तेनैष प्राणमायाति प्राणस्तेजसा युक्तः ।
सहाऽऽत्मना यथासंकल्पितं लोकं नयति ॥ १०

अन्वयार्थ—[यच्चित्तः—] जीव मरणसमयी ज्या देवादि शरीरांत चित्त आसक्त झालें आहे असा होतो [तेन एषः प्राणं आयाति—]त्याच चित्तानें, त्याच संकल्पानें तो इंद्रियांसह मुख्य प्राणवृत्तीस प्राप्त होतो. प्राणी मरणसमयी ज्याची सर्व इंद्रियवृत्ति क्षीण झाली आहे, असा होऊन मुख्य प्राणवृत्तीनेंच राहतो, असा याचा इत्यर्थ. तेव्हां त्याच्याजवळ बसलेले याच्या ज्ञातीचे लोक हा उच्छ्वास सोडीत आहे, जिवंत आहे, असें म्हणतात. पण[प्राणः तेजसा युक्तः—]तो प्राण तेजानें म्हणजे उदानवृत्तीनें युक्त होऊन [आत्मना सह—] आत्म्यासह—भोक्त्या स्वामीसह शरीर सोडून जातो. अशाप्रकारें उदानवृत्तीनें युक्त झालेला तो प्राण पूर्वोक्त भोक्त्याला पुण्य-पापकर्मवशात् [यथासंकल्पितं लोकं नयति—] यथासंकल्पित—यथाभिप्रेत, इष्ट—लोकास नेतो (पुण्य-पापकर्मानुसार कर्मज्ञान इत्यादि साधनांचें अनुष्ठान करीत असतांना ज्याच्याविषयीं संकल्प केला होता व जो मरणसमयी वासनारूपानें पुनः अभिव्यक्त झाला आहे त्या लोकास म्हणजे देवादि शरीरास पोंचवितो.) १०.—याप्रमाणें प्राणस्वरूपाचा निश्चय करून श्रुति त्याच्या उपासनेचें विधान करिते—

य एवं विद्वान्प्राणं वेद । न हास्य प्रजा हीयतेऽमृतो भवति तदेष श्लोकः ॥ ११

अन्वयार्थ—[यः एवं विद्वान् प्राणं वेद—] जो कोणी असें जाणणारा विद्वान् पूर्वोक्त उत्पत्त्यादि विशेषणांनी विशिष्ट असलेल्या प्राणास जाणतो—त्याची उपासना—चिंतन—ध्यान करितो त्याला हें ऐहिक व आमुष्मिक—पारलौकिक फल सांगितलें जातें—[ह अस्य प्रजा न हीयते—] या विद्वानाची पुत्रपौत्रादि लक्षण प्रजा—संतति विच्छिन्न होत नाहीं. [अमृतः भवति—] त्याच्या शरीराचा पात झाल्यावर—म्ह० मरणोत्तर—प्राणसायुज्यतेनें तो अमरण धर्मवान् होतो. (या श्रुतीत सांगितलेलें अमृतत्व मुख्य नव्हे. तर तें प्राणसायुज्यच होय पण हें सुद्धां फल सकाम उपासकालाच मिळतें निष्कामाला चित्ताचें ऐकाग्र्य हेंच फल प्राप्त होतें, आणि त्या चित्तशुद्धीच्या द्वारा त्याला क्रमानें मुख्य अमृतत्व मिळतें.) [तत् एषः श्लोकः—] त्याचेंच संक्षेपतः वर्णन करणारा हा असा श्लोक—मंत्र आहे. १ १.

उत्पत्तिमायतिं स्थानं विभुत्वं चैव पञ्चधा । अध्यात्मं चैव प्राणस्य विज्ञायामृतमश्नुते विज्ञायामृतमश्नुत इति ॥ १२

अन्वयार्थ—[प्राणस्य उत्पत्तिं—] परमात्म्यापासून प्राणाची उत्पत्ति, [आयतिं—] मनःसंकल्पाने या शरीरांत येणें, [स्थानं—] पायु-उपस्थादि स्थानी स्थिति, [विभुत्वं—] विभुत्व—स्वामित्व, [पंचधा—] सम्राडाप्रमाणें प्राणवृत्तीचें पंचधा स्थापन, [च अध्यात्मं एव—] आदित्यादिरूपानें बाह्य व चक्षुरादिरूपानें अध्यात्म अवस्थान, [विज्ञाय अमृतं अश्नुते—] इत्यादि प्रकारें प्राणाला जाणून पुरुष अमृतत्वाचा अनुभव घेतो. प्रश्नाच्या परिसमाप्तीसाठीं 'विज्ञायामृतमश्नुते' या वाक्याची आवृत्ति केली आहे. १२. ३.

अथ चतुर्थः प्रश्नः

अथ हैनं सौर्यायणी गार्ग्यः पप्रच्छ ।

अन्वयार्थ—[अथ ह एनं सौर्यायणिः गार्ग्यः पप्रच्छ—] त्यानंतर त्याला सौर्यायणी गार्ग्य विचारूं लागला. मागील तीन प्रश्नांनी अपर विद्याविषयक, व्याकृताश्रय, साध्यसाधनलक्षण सर्व अनित्य संसार प्रतिपादिला. अपर विद्या

ह्मणजे कर्म व उपासना. तिच्या योगानें प्राप्त होणाऱ्या, कार्यरूप सृष्टीच्या अंतर्गत, साध्य-साधनसंबंधानें अभिव्यक्त–उत्पन्न होणाऱ्या व त्यामुळेंच अनित्य, अशा संसारात्मक तत्त्वाचें वर्णन वर केलें. आतां साध्य-साधनसंबंधानें लक्षित न होणाऱ्या, प्राणरहित, मनाचा विषय न होणाऱ्या, अतींद्रिय–इंद्रियांचा अविषय, अकार्य, सुखरूप, सर्व अनर्थशून्य, अविकृत, अक्षर, सत्य, पर विद्याविषय, पुरुषाख्य व सबाह्याभ्यन्तर अज तत्त्वाचें वर्णन करावें म्हणून या पुढील तीन प्रश्न आरंभिलेले आहेत. 'चांगल्या पेटलेल्या अग्नीपासून जसे विस्फुलिंग–किटोळें त्याप्रमाणें ज्या पर अक्षरापासून सर्व भाव उत्पन्न होतात व त्यांतच लीन होतात' असें दुसऱ्या मुंडकांत सांगितलें आहे. पण अक्षरापासून विभाग पावणारे ते सर्व भाव कोणते व ते विभक्त होऊन त्यांतच लीन कसे होतात, त्या अक्षराचें लक्षण काय आहे? हें सांगण्याच्या इच्छेनें गार्ग्य आतां पुढील प्रश्नास उत्थापित करीत आहे—

भगवन्नेतस्मिन्पुरुषे कानि स्वपन्ति कान्यस्मिञ्जाग्रति
कतर एष देवः स्वप्नान्पश्यति कस्यैतत्सुखं भवति
कस्मिन्नु सर्वे संप्रतिष्ठिता भवन्तीति ॥ १

अन्वयार्थ—[भगवन् एतस्मिन् पुरुषे कानि स्वपन्ति–] भगवन्, या शरीररूप पुरुषांत कोणती इंद्रियें निजतात–आपल्या व्यापारापासून उपरत होतात [अस्मिन् कानि जाग्रति–] व त्यांतील कोणती जागतात; [कतरः एषः देवः स्वप्नान् पश्यति–] यांतील कोणता देव स्वप्नें पाहतो? [एतत्सुखं कस्य भवति–] हें सुख कोणाला होतें? [कस्मिन् नु सर्वे संप्रतिष्ठिताः भवन्ति इति–] व सर्व देव कोणामध्यें बरें उत्तमप्रकारें प्रतिष्ठित होतात. (या प्रश्नाचा अधिक खुलासा प्रश्नोपनिषद्भाष्यार्थांत पहा.) १.

तस्मै स होवाच । यथा गार्ग्य मरीचयोऽर्कस्यास्तं गच्छतः सर्वा एतस्मिंस्तेजोमण्डल एकी भवन्ति । ताः पुनः पुनरुदयतः प्रचरन्त्येवं ह वै तत्सर्वं परे देवे मनस्येकी भवति । तेन तर्ह्येष पुरुषो न शृणोति न पश्यति न जिघ्रति न रसयते न स्पृशते नाभिवदते नाऽऽदत्ते नाऽऽनन्दयते न विसृजते नेयायते स्वपितीत्याचक्षते २

अन्वयार्थ—[तस्मै सः ह उवाच—] आचार्य त्या प्रश्नकर्त्या मुनीला म्हणाला, —हे गार्ग्या, तूं जें विचारलेंस त्याचें उत्तर ऐक—[यथा गार्ग्य अस्तं गच्छतः अर्कस्य सर्वाः मरीचयः एतस्मिन् तेजोमंडले एकीभवन्ति—] ज्याप्रमाणें अस्त पावणाऱ्या—दृष्टीच्या आड जाणाऱ्या सूर्याचे सर्व किरण या तेजोराशिरूप तेजोमंडलांत एकरूप होतात; ते पृथक् पृथक् आहेत असा विवेक करितां येत नाही, विशेष अवस्था सोडून सामान्य अवस्थेस प्राप्त होतात, [पुनः पुनः उदयतः ताः प्रचरन्ति—] पुनः पुनः उदय पावणाऱ्या त्याच सूर्याचे तेच किरण दश दिशांमध्यें पसरतात [एवं ह तत् सर्वं परे देवे मनसि एकी भवति—] त्याप्रमाणें —जसा हा दृष्टान्त आहे तसें तें सर्व विषय-इंद्रियादि पर—सर्वोत्कृष्ट देवामध्यें—द्योतनवानामध्यें—मनामध्यें निद्रासमयी एकरूप होतें. चक्षुरादि इतर देव मनस्तंत्र—मनाच्या अधीन असल्यामुळें मन त्यांचा पर देव होय. त्या पर देवांत, निद्रासमयी सर्व एकरूप होतें. सूर्यमंडलात जसे किरण त्याप्रमाणें स्वापकाली मनात इंद्रियें सामान्यभावास प्राप्त होतात आणि सूर्यमंडलापासून जसे किरण त्याप्रमाणें जागृत होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाच्या मनापासूनच ती सर्व आपापल्या व्यापाराकरितां निघतात. ज्याअर्थी निद्राकालीं शब्दादि विषयांच्या उपलब्धीचीं श्रोत्रादि साधनें मनांत एकीभूतशी होऊन आपल्या करणव्यापारापासून उपरत होतात [तेन—] त्याअर्थी [तर्हि—] त्या स्वापकाली [एषः पुरुषः न शृणोति न पश्यति०—न इयायते—] हा देवदत्तादि पुरुष ऐकत नाही, पहात नाही, वास घत नाहीं, रस चाखीत नाही, स्पर्श करीत नाहीं, बोलत नाहीं, हातांनी कांही घेत नाहीं, उपस्थेंद्रियानें आनंद भोगीत नाही, मळाचा त्याग करीत नाही व जात नाही, तर [स्वपिति इति आचक्षते—] तो झोंप घेत आहे असें लौकिक जन सांगतात. (येथें 'निद्रा-'शब्दानें स्वप्नहि घ्यावें. कारण स्वप्नांतहि बाह्य इंद्रियव्यापार होत नाहींत. तसेंच श्रोत्रादिकांचा एकीभाव म्ह० मनस्तंत्र होऊन राहणें, मनांत लय होणें नव्हे,कारण मन ही श्रोत्रादिकांची प्रकृति नव्हे.कार्याचा प्रकृतीतच—उपादानांतच लय होतो.सु.ब्र.४.२.१.पृ.४५३पहा)२.

वरील ब्राह्मणखंडांत कोणतीं इंद्रियें निजतात? या प्रश्नाचें—विषयांसह बाह्य इंद्रियें निजतात, उपरम पावतात आणि त्यामुळें जागरण हा त्यांचाच धर्म

आहे असें उत्तर देऊन आता कोणतीं इंद्रियें जागतात, या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर येथें दिलें आहे–

प्राणाग्नय एवैतस्मिन्पुरे जाग्रति । गार्हपत्यो ह वा एषोऽपानो व्यानोऽन्वाहार्यपचनो यद्गार्हपत्यात्प्रणीयते प्रणयनादाहवनीयः प्राणः ॥ ३

अन्वयार्थ—[एतस्मिन् पुरे–] श्रोत्रादि करणें निजली असतां या पुरांत म्हणजे नवद्वार युक्त देहात [प्राणाग्नयः एव जाग्रति–] प्राणादि पाच वायू हेच कोणी अग्नी जागतात. हें प्राणाचें अग्नित्व गौण आहे, मुख्य नव्हे. आतां प्राणादि पंच वायूंच्या ठिकाणी अग्नीचें सामान्य–साधर्म्य कोणतें आहे, तें सांगतात–[एषः अपानः गार्हपत्यः ह वै–] हा जो प्रसिद्ध अपान तो गार्हपत्य अग्नि आहे. तो कसा, कोणत्या सामान्यामुळें ? [यत् गार्हपत्यात् प्रणीयते–] कारण अग्निहोत्राचे वेळी गार्हपत्य अग्नीपासून दुसरा आहवनीय अग्नि नेला जातो व [प्रणयनात् आहवनीयः प्राणः–] अशा रीतीनें त्याच्यापासून नेल्यामुळेंच गार्हपत्य अग्नि 'प्रणयन' या यौगिक नांवास पात्र होतो; त्याचप्रमाणें निजलेल्या पुरुषाच्या अपानवृत्तीपासून जणुं काय नेला जाणारा प्राण मुख व नासिका यांच्या द्वारा संचार करतो, म्हणून प्राण आहवनीयस्थानीय वायु आहे. [व्यानः अन्वाहार्यपचनः–] व्यान तर हृदयापासून उजव्या छिद्रद्वारानें निघत असल्यामुळें त्याचा दक्षिण दिशेशी संबंध असतो; ह्मणून तो अन्वाहार्यपचन–दक्षिणाग्नि आहे. ३.

यदुच्छ्वासनिःश्वासावेतावाहुती समं नयतीति स समानः। मनो ह वाव यजमान इष्टफलमेवोदानः स एनं यजमानमहरहर्ब्रह्म गमयति ॥ ४

अन्वयार्थ—[यत्–] ज्याअर्थी [उच्छ्वास-निःश्वासौ एतौ आहुती–] उच्छ्वास व निःश्वास ह्या जणुं काय अग्निहोत्राच्या आहुती आहेत. [समं नयति इति सः समानः–] त्यांना साम्यानें शरीरस्थितिभावास नेतो म्हणून तो समान. [मनः ह वाव यजमानः–] मन हाच यजमान आहे. [इष्टफलं एव उदानः–] इष्टफलच उदान आहे. [सः एनं यजमानं अहरहर् ब्रह्म गमयति–] तो या यजमानाला प्रत्यही सुषुप्तीत ब्रह्माला पोंचवितो. (उच्छ्वास-निःश्वास दोन व आहवनीयांतील होमाच्या आहुतीहि दोन. या द्वित्व साधर्म्यामुळें उच्छ्वास-

निःश्वासाला आहुती म्हटलें आहे. समान वायु हाच होता. कारण होमकर्त्या-प्रमाणें तो उच्छ्वास-निःश्वासरूप आहुतीना शरीरस्थितीसाठी सम पोंचवितो, असें जाणणाऱ्या उपासकाची निद्रा हेंच अग्निहोत्रहवन आहे. याविषयी अधिक विवेचन भाष्यार्थांत पहावें.) ४.

अत्रैष देवः स्वप्ने महिमानमनुभवति । यद्दृष्टं दृष्टमनुपश्यति श्रुतं श्रुतमेवार्थमनुशृणोति देशदिगन्तरैश्च प्रत्यनुभूतं पुनः पुनः प्रत्यनुभवति दृष्टं चादृष्टं च श्रुतं चाश्रुतं चानुभूतं चाननुभूतं च सच्चासच्च सर्वं पश्यति सर्वः पश्यति ॥ ५

अन्वयार्थ—[अत्र—] श्रोत्रादि इंद्रियें उपरत झाली असता व प्राणादि वायु देहरक्षणार्थ जागत असता सुषुप्ति प्राप्त होण्यापूर्वी—गाढ झोप लागण्याच्या पूर्वी म्हणजे जाग्रत् व सुषुप्ति या दोन अवस्थाच्या अंतराली [एषः देवः—] ज्यानें सूर्यकिरणाप्रमाणें आपल्या स्वरूपांत श्रोत्रादि करणांचा—इंद्रियांचा उपसंहार केला आहे तो हा देव [स्वप्ने महिमान अनुभवति—] स्वप्नांत महिम्यास—विभूतीस—विषय-विषयिरूप अनेकात्मभावगमनास अनुभवितो. स्वतः विषय होऊन त्याचा ग्राहक भोक्ताहि स्वतःच होणें, या अनेकरूपत्व-अवस्थेस प्राप्त होतो. आता तो येथें विभूतीचा अनुभव कसा घेतो ? तें सागतों—[यत् दृष्टं दृष्टं अनुपश्यति—] त्यानें ज्या मित्राला किंवा पुत्रादिकाला पूर्वी पाहिलेलें असतें त्याच्या वासनेनें वासित झालेला तो पुत्र-मित्रादिकाच्या वासनेपासून उत्पन्न झालेल्या पुत्राला किंवा मित्रालाचसें अज्ञानानें पाहतो असें समजलें जातें. कारण नेत्रादिकांच्या अभावी खरोखरच त्याना पहाणें शक्य नसतें. त्याचप्रमाणें [श्रुतं श्रुतं एव अर्थं अनुशृणोति—] ऐकलेलाच अर्थ त्याच्या वासनेनें जणुं काय पुनरपि ऐकतो. [देश-दिगन्तरैः च प्रत्यनुभूतं पुन पुनः प्रत्यनुभवति—] निर-निराळे नदीतीरादि देश व पूर्वादि दिशा यामध्यें प्रत्यही अनुभविलेलें वस्तु-जात पुनः पुनः अनुभवितो, अविद्येनें जणुकाय त्याचा पुनः पुनः अनुभव घेतो. त्याचप्रमाणें [दृष्टं च अदृष्टं च—] या जन्मी पाहिलेलें किंवा अन्य जन्मीं पाहिलेलें असा भावार्थ. कारण ज्याचा कधींच अनुभव घेतलेला नसतो त्याच्याविषयीं वासना उत्पन्न होणेंहि उपपन्न नसतें. तसेंच, [श्रुतं च अश्रुतं च—]श्रुत व अश्रुत—या व पूर्व जन्मीं ऐकलेलें [अनुभूतं च अननुभूतं च—] या

जन्मी केवल मनानें अनुभविलेलें व पूर्व जन्मी मनानेंच अनुभविलेलें, [सत् च—] खरें जल, भक्ष्य इत्यादि व [असत् च—]मृगजळादि [सर्वं पश्यति सर्वः पश्यति—] फार काय पण येथें सांगितलेलें व न सांगितलेलेंहि सर्व प्रत्येक जीव पाहतो. सर्व मनोवासना हीच ज्याची उपाधि आहे असा होत्साता सर्वकरणात्मा मनोदेव वर सांगितल्याप्रमाणें स्वप्नांत सर्व पाहतो. ५.

स यदा तेजसाऽभिभूतो भवति । अत्रैष देवः स्वप्नान्न पश्यत्यथ तदैतस्मिञ्शरीर एतत्सुखं भवति ॥ ६

अन्वयार्थ—[सः यदा—] मनोरूप देव जेव्हा [तेजसा अभिभूतः भवति—] नाडीगत पित्ताख्य सौर—सूर्याच्या तेजानें व चिद्रूप ब्रह्माच्या योगानें सर्व बाजूंनी अभिभूत—पराभूत होतो; वासनेच्या अभिव्यक्तीचें द्वार, म्हणजे स्वप्न-भोग देणारें कर्म जेव्हा उपरत होतें तेव्हां करणांसह मनाचे किरण—वासना हृदयामध्यें उपसंहृत होतात—हृदयात एकत्र आकर्षण केल्या जातात. जेव्हां मन काष्ठांतील अग्निप्रमाणें सामान्य चैतन्यरूपानें सर्व शरीराम व्यापून राहतें तेव्हां सुषुप्त होतें. अशा अवस्थेस प्राप्त झालेल्या मनालाच सुषुप्त म्हणतात. [अत्र एषः देवः स्वप्नान् न पश्यति—] त्याकाळी हा मनः-संज्ञक देव स्वप्नांस पहात नाही. कारण स्वप्नदर्शनाचें द्वार—कर्म तेजाच्या योगानें निरुद्ध झालेलें असतें. [अथ तदा एतस्मिन् शरीरे एतत् सुखं भवति—] त्यावेळी या शरीरांत हें सुख होतें. (त्यावेळी विषय व इन्द्रियें यांच्या संयोगापासून होणारें सुख संभवत नसल्यामुळें, विशेषविज्ञानरूप विक्षेपाच्या अभावी, निवातप्रदेशांतील दीपा-प्रमाणें, पूर्वीहि सिद्ध असलेलेंच सुख चांगल्या रीतीनें प्रकाश पावतें.) ६. —त्यावेळी (सुषुप्तांत)अविद्या-काम-कर्मजन्य कार्य-करणें—शरीर व इन्द्रियें—शांत होतात. तीं शांत झाली असता पूर्वीच्या जाग्रत्स्वप्नाख्य दोन अवस्थांमध्यें उपाधीच्या योगानें विपरीत भासणारें आत्मस्वरूप अद्वय, एक, शिव व शांत होतें. यास्तव पृथिवीप्रभृति अविद्याकृत मात्रांचा विवेकानें अक्षरांत प्रवेश करून ही अवस्था व्यक्त करण्याकरितां पिप्पलाद आचार्य दृष्टान्त सांगतात—

स यथा सोम्य वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठन्ते एवं ह वै तत्सर्वं पर आत्मनि संप्रतिष्ठते ॥ ७

अन्वयार्थ—[सः यथा–] तो दृष्टान्त असा–[सोम्य यथा वयांसि वासोवृक्षं संप्रतिष्ठन्ते–] हे शिष्या, पक्षी जसे आपल्या निवासवृक्षाकडे जावयास निघतात [एवं ह वै तत् सर्वं परे आत्मनि संप्रतिष्ठते–] त्याप्रमाणें पुढें सांगितलेलें हें सर्व पर आत्म्यामध्यें जातें. ७.–आतां हें सर्व म्हणजे काय तें सांगतात—

पृथिवी च पृथिवीमात्रा चाऽऽपश्चाऽऽपोमात्रा च तेजश्च तेजोमात्रा च वायुश्च वायुमात्रा चाऽऽकाशश्चाऽऽकाशमात्रा च चक्षुश्च द्रष्टव्यं च श्रोत्रं च श्रोतव्यं च घ्राणं च घ्रातव्यं च रसश्च रसयितव्यं च त्वक्च स्पर्शयितव्यं च वाक्च वक्तव्यं च हस्तौ चाऽऽदातव्यं चोपस्थश्चाऽऽनन्दयितव्यं च पायुश्च विसर्जयितव्यं च पादौ च गन्तव्यं च मनश्च मन्तव्य च बुद्धिश्च बोद्धव्यं चाहंकारश्चाहंकर्तव्यं च चित्तं च चेतयितव्यं च तेजश्च विद्योतयितव्यं च प्राणश्च विधारयितव्यं च ॥ ८

अन्वयार्थ—[पृथिवी च पृथिवीमात्रा च०–] स्थूल–शब्दादि पंच गुणयुक्त पृथ्वी व तिची कारणभूत पृथिवीमात्रा म्हणजे गंधतन्मात्रा, त्याचप्रमाणें आप व आपोमात्रा, तेज व तेजोमात्रा, वायु व वायुमात्रा, आकाश व आकाशमात्रा, (पंचीकृत स्थूल व अपंचीकृत सूक्ष्म भूतें हा याचा अर्थ; त्याचप्रमाणें) 'चक्षुः'–इंद्रिय व 'द्रष्टव्य'–पाहण्यास योग्य रूप, सु.ब्र.२३४–'श्रोत्रं'–इंद्रिय व श्रोतव्य शब्द, घ्राण–इंद्रिय व घ्रातव्य–गंध, रसना–इंद्रिय व रसयितव्य–रस –विषय, त्वक् व स्पर्शयितव्य स्पर्श, वाक् इंद्रिय व वक्तव्य वचन, हात व आदातव्य–ग्राह्य पदार्थ, उपस्थ व आनन्दयितव्य, पायु व विसर्जयितव्य मळ, पाय व गन्तव्य प्रदेश, (अर्थात् ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें सांगितलीं.) पूर्वोक्त मन व त्याचा मंतव्य विषय, निश्चयात्मिका बुद्धि व तिचा बोधव्य विषय, अहंकार –अभिमानलक्षण अन्तःकरण व त्याचा अहंकर्तव्य विषय, चित्त–चेतनायुक्त अन्तःकरण व त्याचा चेतयितव्य विषय, तेज म्हणजे त्वगिंद्रियाहून भिन्न व प्रकाशविशिष्ट त्वचा व [विद्योतयितव्य च–] तिच्या प्रकाशानें भासमान होणारा विषय–चर्म, [प्राणः च–] सूत्र म्हणून ज्याला म्हणतात तो प्राण व [विधारयितव्यं च–] त्याच्या योगानें धारण करण्यास, ग्रथन करण्यास योग्य

असलेलें हें सर्व पर आत्म्यामध्यें जावयास निघतें. पृथिवीपासून 'विधारयितव्या-'पर्यंत आत्मव्यतिरिक्त व त्याच्या उपाधिभूत, असें हें सर्व सांगितलें आहे, पर आत्म्याकरितां संहत झालेलें—संघात पावलेलें सर्व नाम-रूपात्मक कार्यकरणजात काय तें एवढेंच आहे. ८.—आतां जलांतील सूर्यप्रतिबिंबाप्रमाणें जें आत्मस्वरूप या कार्यकरणसंघातांत भोक्तृत्व-कर्तृत्वरूपानें प्रविष्ट झालें आहे त्याचें वर्णन—

एष हि द्रष्टा स्प्रष्टा श्रोता घ्राता रसयिता मन्ता बोद्धा
कर्ता विज्ञानात्मा पुरुषः स परेऽक्षर आत्मनि संप्रतिष्ठते ९.

अन्वयार्थ—[एषः हि द्रष्टा० पुरुषः—] हाच द्रष्टा, स्प्रष्टा—स्पर्श करणारा, श्रोता, घ्राता—वास घेणारा, रस चाखणारा, मनन करणारा, जाणणारा, कर्ता, विज्ञानात्मा पुरुष आहे. [सः परे अक्षरे आत्मनि संप्रतिष्ठते—] तो पर अक्षर आत्म्यामध्यें चागल्या प्रकारें प्रतिष्ठित होतो. ९.—आतां त्याचें ऐक्य जाणणाऱ्या पुरुषाला मिळणारें फल सांगतात—

परमेवाक्षरं प्रतिपद्यते स यो ह वै तदच्छायमशरीरमलोहितं शुभ्रमक्षरं वेदयते यस्तु सोम्य । स सर्वज्ञः सर्वो भवति तदेष श्लोकः ॥

अन्वयार्थ—[परं एव अक्षरं प्रतिपद्यते—] ज्याची विशेषणें पुढें सांगावयाची आहेत त्या पर अक्षरालाच ज्ञानी प्राप्त होतो, असें येथें सांगितलें जातें. [सः यः ह वै तत् अच्छायं अशरीरं—] जो एखादा फार दुर्लभ अधिकारी, सर्व एषणांपासून मुक्त झालेला अति विरक्त होऊन त्या अच्छाय—तमोरहित, अशरीर—नामरूपादि सर्व उपाधिभूत शरीररहित [अलोहितं—] अलोहित—लोहितादि सर्व गुणरहित अर्थात् कारण, सूक्ष्म व स्थूल ही शरीरें व जाग्रत्, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था यांनी रहित असलेलें आणि असें असल्यामुळेंच [शुभ्र—] शुद्ध [अक्षरं—] सर्वविशेषणरहित असल्यामुळेंच अक्षर सत्य—पुरुषसंज्ञक, प्राणरहित, मनाचा विषय न होणारें, शिव, शांत व सबाह्य अभ्यंतर अज, अशा ब्रह्माला [हे सोम्य तु यः वेदयते—] हे प्रियदर्शन शिष्या, जो सर्वत्यागी पूर्वोक्त तत्त्व जाणतो [सः सर्वज्ञ.—] तो सर्वज्ञ [सर्वः भवति—] सर्व होतो. त्यानें ज्याला जाणलें नाही, असें या जगांत कांही संभवत नाहीं. परंतु असें जाणण्यापूर्वी जो द्रष्टा, स्प्रष्टा इत्यादि संज्ञक उपहित आत्मा अविद्येनें असर्वज्ञ असतो तोच पुनः विद्येनें अविद्येचा अपनय—निरास केला असतां

सर्वज्ञ व सर्व होतो [तत् एषः श्लोकः भवति–] याच अर्थी–पूर्वोक्त अर्थाचा संग्रह करणारा ' विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः० ' हा पुढील मंत्र आहे. (मुंडकोपनिषदांतील ' हे भगवन्, कोणाला विशेष प्रकारें जाणलें असतां हें सर्व विज्ञात होतें,' या प्रश्नाचें उत्तर येथे दिलें आहे. एका अद्वितीय आत्मतत्त्वाला जाणलें असता सर्व ज्ञात होतें. त्यानंतर ज्ञातव्य कांही रहात नाहीं.) १०.

विज्ञानात्मा सह देवैश्च सर्वैः प्राणा भूतानि संप्रतिष्ठन्ति यत्र ।
तदक्षरं वेदयते यस्तु सोम्य स सर्वज्ञः सर्वमेवाऽऽविवेशेति ॥ ११

इत्यथर्ववेदीयप्रश्नोपनिषदि चतुर्थः प्रश्नः ॥ ४ ॥

अन्वयार्थ— [विज्ञानात्मा–] वर सांगितलेला विज्ञानात्मा–विज्ञानस्वभाव [सर्वैः देवैः च सह–] अग्नि, सूर्य इत्यादि सर्व देवांसह [प्राणाः भूतानि यत्र संप्रतिष्ठन्ति–] चक्षुरादि प्राण व पृथिव्यादि भूतें ही सर्व ज्या अक्षरांत प्रवेश करितात [तत् अक्षरं–] त्या अक्षराला [सोम्य–] हे सोम्य–प्रियदर्शन [यः तु वेदयते–] जो जाणतो [सः सर्वज्ञः सर्वं एव आविवेश इति–] तो सर्वज्ञ सर्वामध्येंच प्रविष्ट झाला–प्रवेश करतो, असा भावार्थ. ११. ४.

अथ पञ्चमः प्रश्नः

पर व अपर ब्रह्माच्या प्राप्तीचें साधन या रूपानें ओंकाराच्या उपासनेचें विधान करण्यासाठी या प्रश्नाचा आरंभ केला जातो—

अथ हैनं शैब्यः सत्यकामः पप्रच्छ ।

अन्वयार्थ—[अथ हैनं०–] त्यानंतर पिप्पलाद आचार्याला सत्यकाम शैब्य विचारता झाला.

स यो ह वै तद्भगवन्मनुष्येषु प्रायणान्तमोंकारमभिध्यायीत ।
कतमं वाव स तेन लोकं जयतीति तस्मै स होवाच ॥ १

अन्वयार्थ—[भगवन् मनुष्येषु सः यः ह वै तत् प्रायणान्तं ओंकारं अभिध्यायीत–] भगवन्, मनुष्यांतील तो जो कोणी प्रसिद्ध पुरुष मरणपर्यंत प्रणवाचें सर्वतः ध्यान करतो [सः तेन कतमं वाव लोकं जयति इति–] तो त्या प्रण-

वाच्या ध्यानानें कोणत्या लोकास जिकतो ? [तस्मै सः ह उवाच–] तेव्हां त्याला आचार्य म्हणाला. १.

एतद्वै सत्यकाम परं चापरं च ब्रह्म यदोंकारः
तस्माद्विद्वानेतेनैवाऽऽयतनेनैकतरमन्वेति ॥ २

अन्वयार्थ—[सत्यकाम यत् ओंकारः एतत् वै परं च अपरं च ब्रह्म–] हे सत्यकामा, जो ओंकार तेंच पर व अपर ब्रह्म आहे. [तस्मात् एतेन एव आयतनेन विद्वान् एकतरं अन्वेति–] तस्मात् याच आलंबनानें उपासक त्यातील एका ब्रह्माला प्राप्त होतो. सु. ब्र. १. ३. ४. पृ. ७४ पहा. २.

स यद्येकमात्रमभिध्यायीत स तेनैव संवेदितस्तूर्णमेव
जगत्यामभिसंपद्यते । तमृचो मनुष्यलोकमुपनयन्ते स
तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया संपन्नो महिमानमनुभवति ३

अन्वयार्थ—[सः यदि एकमात्रं अभिध्यायीत–] तो जर एकमात्राविशिष्ट ओंकाराचें ध्यान करील[सः तेन एव संवेदितः–]तर तो त्या एकमात्राविशिष्ट ओंकाराच्या ध्यानानेंच संबोधित होत्साता [तूर्ण एव जगत्या अभिसंपद्यते–] सत्वरच पृथ्वीमध्यें मनुष्यशरीरास प्राप्त होतो. [तं ऋचः मनुष्यलोकं उपनयन्ते–] त्या साधकाला ऋग्वेदरूप ऋचा मनुष्यशरीरास पोंचवितात, [सः तत्र तपसा ब्रह्मचर्येण श्रद्धया सपन्नः–] नंतर तो त्या मनुष्यजन्मांत तप, ब्रह्मचर्य, श्रद्धा यांनी संपन्न होऊन [महिमान अनुभवति–] विभूतीचा अनुभव घेतो. ३.

अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते सोऽन्तरिक्षं यजुर्भिरुन्नीयते
सोमलोकम् । स सोमलोके विभूतिमनुभूय पुनरावर्तते ॥ ४

अन्वयार्थ—[अथ यदि द्विमात्रेण मनसि संपद्यते–] पण जर द्विमात्राविभागज्ञ उपासक द्वितीयमात्रारूपानें विशिष्ट असलेल्या ओंकाराचें म्हणजे ओंकारांतील उकार या दुसऱ्या मात्रेचें अभिध्यान करील; तर स्वप्रात्मक, सोम ही ज्याची देवता आहे अशा यजुर्मय मननीय मनामध्यें संपन्न होतो; एकाग्रतेनें मनच मी आहें, अशा आत्मभावास प्राप्त होतो. [सः अन्तरिक्षं सोमलोकं यजुर्भिः उन्नीयते–] अशा प्रकारें संपन्न झालेला तो उपासक मेल्यावर अन्तरिक्ष हा ज्याचा आधार आहे अशा द्वितीयमात्रारूप सोमलोकास द्वितीयमात्रारूप यजुःसंज्ञक मंत्रांकडूनच नेला जातो. यजुर्मंत्र त्याला सोमलोकांतील जन्मास

पोंचवि..ल, असा याचा इत्यर्थ. [सः सोमलोके विभूतिं अनुभूय पुनः आवर्तते—] नंतर तो उपासक सोमलोकी विभूतीचा—तेथील ऐश्वर्याचा अनुभव घेऊन मनुष्यलोकास पुनः परत येतो. ४.

यः पुनरेतं त्रिमात्रेणोमित्येतेनैवाक्षरेण परं पुरुषमभिध्यायीत स तेजसि सूर्ये संपन्नः। यथा पादोदरस्त्वचा विनिर्मुच्यत एवं ह वै स पाप्मना विनिर्मुक्तः स सामभिरुन्नीयते ब्रह्मलोकं स एतस्माज्जीवघनात्परात्परं पुरिशयं पुरुषमीक्षते तदेतौ श्लोकौ भवतः ॥ ५

अन्वयार्थ—(याप्रमाणें वरील दोन ब्राह्मणात ओंकाराची स्तुति करून आतां त्याच्या परब्रह्मविषयक उपासनेचें विधान करितात—) [यः पुनः एतं त्रिमात्रेण ओं इति-एतेन एव अक्षरेण—] पण जो उपासक या ओंकाराचें —त्रिमात्राविषयविज्ञानविशिष्ट ओंकार या अक्षरानेंच (म्हणजे पूर्वीप्रमाणें एकेका मात्रेनें नव्हे, तर), ओं या अक्षरप्रतीकानेंच [परं पुरुषं अभिध्यायीत—] सूर्यान्तर्गत परपुरुषाचें अभिध्यान करितो [सः तेजसि सूर्ये संपन्नः—] तो त्या अभिध्यानानें तृतीय ओकारमात्रारूप होऊन तेजात म्हणजे सूर्यात संपन्न होतो. तो ध्यान करणारा जरी मेला तरी सोमलोकातून उपासक जसा परत मनुष्यलोकांत येतो, तसा सूर्यलोकाहून परत येत नाही. तर तो केवल सूर्यामध्यें तादात्म्य पावतो. [यथा पादोदरः त्वचा विनिर्मुच्यते एवं ह वै सः पाप्मना विनिर्मुक्तः सः—] जसा सर्प त्वचेकडून विनिर्मुक्त होतो व जीर्ण त्वचेपासून मुक्त झालेला—कात टाकलेला तो पुनः नवा होतो त्याप्रमाणें ह्म० जसा हा दृष्टान्त आहे त्याप्रमाणें सर्पाच्या कातेच्या स्थानीं असलेल्या अशुद्धिरूप पापानें अगदी रहित झालेला—पापानें ज्याला सोडलें आहे असा तो [सामभिः ब्रह्मलोकं उन्नीयते—] त्रिमात्र-ओंकारोपासक तृतीयमात्रारूप 'साम-'मंत्राकडून ऊर्ध्व लोकीं—उच्च लोकी हिरण्यगर्भसंज्ञक ब्रह्माच्या सत्यसंज्ञक लोकी—सत्यलोकीं नेला जातो. कारण तो हिरण्यगर्भ सर्व संसारी जीवाच्या आत्मभूत आहे. [सः एतस्मात् जीवघनात् परात् परं पुरिशयं पुरुषं ईक्षते—] त्रिमात्र ओंकारास जाणणारा तो उपासक या जीवघन हिरण्यगर्भाहून परात्पर परमात्मसंज्ञक पुरुषास पाहतो. ध्यान करणारा तो सर्व शरीरात प्रविष्ट झालेल्या हिरण्यगर्भाला

पाहतां. सु. ब्र. ७४. [तत् एतौ श्लोकौ भवतः—] हाच अर्थ व्यक्त करणारे याविषयीं हे दोन मंत्र आहेत. ५.

तिस्रो मात्रा मृत्युमत्यः प्रयुक्ता अन्योन्यसक्ता अनविप्रयुक्ताः ।
क्रियासु बाह्याभ्यन्तरमध्यमासु सम्यक्प्रयुक्तासु न कम्पते ज्ञः ६

अन्वयार्थ—[तिस्रः मात्राः—] ओंकाराच्या अकार, उकार व मकार अशा तीन मात्रा आहेत. पण त्या [मृत्युमत्य —] मृत्युमती, ज्यांना मृत्यु आहे, ज्यांनीं मृत्यूच्या विषयाचें अतिक्रमण केलेलें नाहीं, तर ज्या मृत्युगोचरच आहेत, अशा आहेत, असा इत्यर्थ. [प्रयुक्ताः—] त्यांचा आत्म्याच्या ध्यानक्रियेंत विनियोग केला आहे. शिवाय [अन्योन्यसक्ताः—] त्या तिन्ही मात्रा अन्योन्यसंबद्ध आहेत. [अनविप्रयुक्ताः—] विशेषेंकरून एकेका विषयांतच ज्यांचा प्रयोग केलेला असतो त्या विप्रयुक्त, तशा ज्या विप्रयुक्त नसतात त्या अविप्रयुक्त, ज्या अविप्रयुक्त, नसतात त्या अनविप्रयुक्त. त्या अविप्रयुक्त नसतात तर काय ? [बाह्याभ्यन्तरमध्यमासु क्रियासु सम्यक् प्रयुक्तासु ज्ञः न कम्पते—] विशेषतः एकाच ध्यानकालीं बाह्य, आभ्यन्तर व मध्यम या तीन योगक्रियांमध्यें त्यांचा चांगल्या प्रकारें प्रयोग केला असतां ओंकाराचा हा पूर्वोक्त विभाग जाणणारा योगी मनांत चंचल होत नाही. जाग्रत्, स्वप्न व सुषुप्त स्थानातील पुरुषाचें अभिध्यान करणें, ह्या बाह्य, मध्यम व आभ्यन्तर अशा तीन योगक्रिया आहेत. (जाग्रत्पुरुष—वैश्वानराभिन्न विश्व आणि त्याचें स्थान स्थूलशरीर व जागरित, स्वाप्न पुरुष—हिरण्यगर्भाभिन्न तैजस, आणि त्याचें स्थान लिंगशरीर व स्वप्न आणि सुषुप्तपुरुष—ईश्वराभिन्न प्राज्ञ, त्याचें स्थान अव्याकृत व सुषुप्ति; त्याचेंपुढें मांडूक्योपनिषदांत सांगितल्याप्रमाणें अकार, उकार व मकार याच्या तादात्म्यानें अभिध्यान करणें, या योगक्रियांमध्यें अन्योन्यसंबद्ध व ब्रह्मदृष्टीनें संश्लिष्ट अशा तीन मात्रांचा उपयोग केला असतां उपासक मनांत कंपित होत नाहीं. अर्थात् या वाक्यानें सर्वात्मक परब्रह्माचें ओंकारभेदानें ध्यान करावयास सांगितलें आहे.) ६.—पूर्वोक्त सर्व अर्थाचा संग्रह करण्यासाठी हा दुसरा मंत्र आहे—

ऋग्भिरेतं यजुर्भिरन्तरिक्षं सामभिर्यत्तत्कवयो वेदयन्ते । तमोंकारेणैवाऽऽयतनेनान्वेति विद्वान्यत्तच्छान्तमजरममृतमभयं परं चेति ॥ ७ ॥ इत्यथर्ववेदीयप्रश्नोपनिषदि पञ्चमः प्रश्नः ॥ ५ ॥

अन्वयार्थ—[ऋग्भिः एतं–] ऋचांच्या योगानें या मनुष्यलोकास, [यजुर्भिः अन्तरिक्षं–] यजूच्या योगानें सोमाधिष्ठित अन्तरिक्षास व [सामभिः यत् तत् कवयः वेदयन्ते–] सामाच्या योगानें तिसऱ्या ब्रह्मलोकास विद्वान् जाणतात. [तं ओंकारेण एव आयतनेन अन्वेति–] त्या त्रिविध लोकास ओंकार याच आयतनानें–आधारानें विद्वान् जातो. [यत् तत् शांतं अजरं अमृतं अभयं परं च इति–] तें जें शांत, अजर, अमृत, अभय व पर ब्रह्म त्यास तो ओंकार, या गमनसाधनानेंच जातो. (ज्या ओंकाराच्या योगानें उपासक ब्रह्मलोकास जातो, त्याच ओंकाराच्या योगानें तो परब्रह्मालाहि जातो. उपासनाबलानें प्रथम ब्रह्मलोकी जाऊन कल्पान्ती तेथील हिरण्यगर्भाबरोबर ब्रह्माला जाऊन मिळणें हीच क्रममुक्ति आहे.) ७ ५.

अथ षष्ठः प्रश्नः

अथ हैनं सुकेशा भारद्वाजः पप्रच्छ ।

अन्वयार्थ—[अथ ह एनं०–] त्यानंतर त्याला सुकेशा भारद्वाज विचारता झाला.(कार्यकारणात्मक सर्व जगत् विज्ञानात्म्या–जीवासह सुषुप्तिकाली पर अक्षरात संप्रतिष्ठित होतें, असें वर सांगितलें. त्याच सामर्थ्यावरून प्रलयकालीहि जगत् त्याच अक्षरांत संप्रतिष्ठित होतें व उत्पत्तिसमयी त्याच्यापासूनच उत्पन्न होतें, हेंहि सिद्ध होतें अक्षरब्रह्माचें कारणत्व सिद्ध व्हावें, म्हणून प्रलयकालीहि त्यांतच जगाचा लय सांगितला आहे. कारण जें कारण नसतें त्यांत कार्याचें संप्रतिष्ठान संभवत नाही. आत्म्यापासून हा प्राण उत्पन्न होतो, असें वर–तिसऱ्या प्रश्नांत म्हटलेंच आहे. [illegible]चें जे मूळ त्याच्या परिज्ञानानें–साक्षात्कारानें, तें मूळ अद्वितीय आहे, अशा प्रकारच्या आत्मज्ञानानें परम श्रेय, अमृतभाव, संसारमोक्ष होतो, असा सर्व उपनिषदांचा निश्चित अर्थ आहे. येथेंहि वर नुक्तेंच 'स सर्वज्ञः सर्वो भवति' या वाक्यानें अद्वितीय आत्मज्ञानानेंच सर्वात्मभावरूप श्रेय होतें, असें सांगितलें आहे. वास्तव तें विज्ञेय, पुरुषाख्य, सत्य, अक्षर कोठें आहे, तें सांगणें उचित आहे. त्याकरितां हा प्रश्न

आरंभिलेला आहे. त्या मूळ तत्त्वाचें विज्ञान अतिशय दुर्लभ आहे, हें स्पष्ट सांगून त्याच्या प्राप्तीकरितां मुमुक्षूंनी विशेष यत्न करावा, म्हणून येथें मागें घडलेल्या एका वृत्तान्ताचा अनुवाद केला आहे.)

भगवन्हिरण्यनाभः कौसल्यो राजपुत्रो मामुपेत्यैतं प्रश्नम-
पृच्छत । षोडशकलं भारद्वाज पुरुषं वेत्थ तमहं कुमारम-
ब्रुवं नाहमिमं वेद यद्यहमिममवेदिषं कथं ते नावक्ष्य-
मिति समूलो वा एष परिशुष्यति योऽनृतमभिवदति
तस्मान्नार्हाम्यनृतं वक्तुं स तूष्णीं रथमारुह्य प्रवव्राज ।
तं त्वा पृच्छामि कामा पुरुष इति ॥ १

अन्वयार्थ—[भगवन् हिरण्यनाभः०—] भगवन, हिरण्यनाभ या नांवाचा कोसल देशाचा राजपुत्र मजपाशी येऊन हा प्रश्न विचारूं लागला. [भारद्वाज षोडशकलं पुरुषं वेत्थ—] हे भारद्वाजा, तू षोडशकल—ज्याला सोळा कला आहेत अशा पुरुषाला जाणतोस का ? [तं कुमारं अहं अब्रुवं—] त्या कुमाराला मीं म्हटलें, [अहं इमं न वेद—] मी त्याला जाणत नाही. [यदि अहं इमं अवेदिषं—] जर मी त्याला जाणत असतों [कथं ते न अवक्ष्यम् इति—] तर तुला कसें सांगितलें नसतें. [यः अनृतं अभिवदति समूलः वा एषः परिशुष्यति—] जो अनृत भाषण करतो तो समूल सर्वतः शुष्क होतो. [तस्मात् अनृतं वक्तुं न अर्हामि—] तस्मात् मी अनृत बोलण्यास समर्थ नाही. [सः तूष्णी रथं आरुह्य प्रवव्राज—] तेव्हां तो मुकाट्यानें रथावर बसून निघून गेला. [त्वा तं पृच्छामि क्व असौ पुरुषः इति—] मी तुम्हांला त्याच्याविषयी विचारतों.तो पुरुष कोठें आहे ?१.

तस्मै स होवाच । इहैवान्तःशरीरे सोम्य स
पुरुषो यस्मिन्नेताः षोडश कलाः प्रभवन्तीति ॥ २

अन्वयार्थ—[सः तस्मै ह उवाच—] पिप्पलाद त्या सुकेशाला म्हणाले, [सोम्य इह एव अन्त शरीरे सः पुरुषः—] हे प्रिय शिष्या, याच शरीरांतील हृदयकमलाकाशात तो पुरुष आहे, [यस्मिन् एताः षोडश कलाः प्रभवन्ति इति—] की ज्यामध्यें या सोळा कला उद्भवतात. (यांचें सविस्तर व्याख्यान भाष्यार्थांत पहा.) २.—त्या कलांच्या उत्पत्तीचा क्रम व चेतन पुरुषानें संकल्पपूर्वक सृष्टि केली, हें सांगण्यासाठी पुढील ब्राह्मणभाग आहे—

स ईक्षांचक्रे । कस्मिन्नहमुत्क्रान्त उत्क्रान्तो
भविष्यामि कस्मिन्वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामीति ॥ ३

अन्वयार्थ—[सः ईक्षां चक्र—] भारद्वाजानें ज्या षोडशकल पुरुषाविषयीं प्रश्न केला आहे तो पुरुष ईक्षा करता झाला. ईक्षा म्हणजे ईक्षण. ईक्षण म्हणजे दर्शन—विचार—संकल्प. त्यानें प्राणादिकांची सृष्टि, तिचें उत्क्रांत्यादि फल, प्राणापासून श्रद्धा इत्यादि क्रम, आधार-आधेयभाव इत्यादिकांविषयीं ईक्षण केलें, अशा याचा इत्यर्थ. तें कसें म्हणून म्हणाल तर सांगतों—[कस्मिन् उत्क्रान्ते अहं उत्क्रान्तः भविष्यामि—] कोणता कर्तृविशेष—विशेष प्रकारचा कर्ता—या देहातून उत्क्रांत झाला असतां—यांतून निघून गेला असतां—मीं उत्क्रान्त होईन! तसेंच [कस्मिन् वा प्रतिष्ठिते प्रतिष्ठास्यामि इति—] कोण शरीरांत प्रतिष्ठित झाला असतां मी प्रतिष्ठित होईन! असें त्यानें ईक्षण केलें. ३. —राजा जसा आपल्या सर्वाधिकारसंपन्न भृत्याला—अमात्याला निर्मितो त्याप्रमाणें पुरुष प्राणाला निर्मितो. तो कसा, तें मुनि सांगतो—

स प्राणमसृजत प्राणाच्छ्रद्धां खं वायुर्ज्योति-
रापः पृथिवीन्द्रियं मनः । अन्नमन्नाद्वीर्यं तपो
मन्त्राः कर्म लोका लोकेषु च नाम च ॥ ४

अन्वयार्थ—[सः प्राणं असृजत—] तो पुरुष वर सांगितल्याप्रमाणें ईक्षण करून हिरण्यगर्भाख्य प्राणाला उत्पन्न करता झाला. [प्राणात् श्रद्धां खं०—] त्या प्राणापासून श्रद्धा, आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी, इंद्रियें, मन, अन्न, अन्नापासून वीर्य, तप, मंत्र, अग्निहोत्रादि कर्म, लोक व लोकांमध्यें नाम उत्पन्न केलें. (याचा सविस्तर अर्थ भाष्यार्थात पहा. मु.ब्र.पृ. २३८.) ४.

स यथेमा नद्यः स्यन्दमानाः समुद्रायणाः समुद्रं प्राप्या-
स्तं गच्छन्ति भिद्येते तासां नामरूपे समुद्र इत्येवं प्रोच्यते ।
एवमेवास्य परिद्रष्टुरिमाः षोडश कलाः पुरुषायणाः पुरुषं
प्राप्यास्तं गच्छन्ति भिद्येते चाऽऽसां नामरूपे पुरुष
इत्येवं प्रोच्यते स एषोऽकलोऽमृतो भवति तदेष श्लोकः ॥ ५

अन्वयार्थ—[सः—] तो दृष्टान्त असा—[यथा समुद्रायणाः इमाः स्यंदमानाः नद्यः—] ज्याप्रमाणें समुद्रच ज्याची गति आहे अशा या वाहणाऱ्या नद्या

समुद्रं प्राप्य अस्तं गच्छन्ति–] समुद्राला प्राप्त होऊन अस्त पावतात [तासां नाम रूपे भिद्येते–] त्यांचीं नामरूपेंहि नाहीशीं होतात; व [समुद्रः इति-एवं प्रोच्यते–] त्यांना समुद्र असेंच म्हणतात; [एवं एव अस्य परिद्रष्टुः इमाः षोडश कलाः पुरुषायणाः–] त्याचप्रमाणें या सर्वतः द्रष्ट्याच्या पुरुष हेंच ज्यांचें अधिष्ठान आहे अशा या वरील सोळा कला [पुरुषं प्राप्य अस्तं गच्छन्ति–] पुरुषास प्राप्त होऊन अस्त पावतात [च आसां नाम-रूपे भिद्येते–] त्यांचें नाम व रूप नाश पावतें. [पुरुषः इति-एवं प्रोच्यते–] त्यांना पुरुष असेंच म्हणतात. [सः एषः अकलः अमृतः भवति–] तो हा विद्वान् अकल व अमृत होतो. सु.ब्र.पृ.४६५ [तत् एषः श्लोकः –] या अर्थी हा मंत्र आहे. ५.

अरा इव रथनाभौ कला यस्मिन्प्रतिष्ठिताः । तं वेद्यं पुरुषं वेद यथा मा वो मृत्युः परिव्यथा इति ॥ ६

अन्वयार्थ––[रथनाभौ अराः इव यस्मिन् कलाः प्रतिष्ठिताः––] रथचक्राच्या नाभीमध्यें जसे अर त्याप्रमाणें ज्यामध्यें या सोळा कला प्रतिष्ठित आहेत [तं वेद्यं पुरुषं वेद––] त्या वेद्य–ज्ञेय पुरुषाला जाणावें; [यथा मृत्युः वः मा परिव्यथा इति –] की ज्यामुळें हे शिष्यांनों, मृत्यु तुम्हांला पीडा न देवो. (तुम्ही पुरुषाला जर न जाणाल तर तुम्हांला मृत्युनिमित्त दुःख होईल. यास्तव ज्ञानामुळें तुम्हांला तें न होवो असें आचार्य म्हणतो.)६.याप्रमाणें उपदेश करून–

तान्होवाचैतावदेवाहमेतत्परं ब्रह्म वेद । नातः परमस्तीति ॥ ७

अन्वयार्थ––[तान् ह उवाच–] पिप्पलाद त्या शिष्यांस म्हणाला [एतावत् एव अहं एतत् परं ब्रह्म वेद–] " मी एवढेंच हें पर ब्रह्म जाणतों. [न अतः परं अस्ति इति–] याहून श्रेष्ठ असें अन्य कांहीं वेद्य आहे, असें मी जाणत नाहीं. " ७.–गुरूनें ज्याना असा उपदेश केला आहे असे ते शिष्य कृतार्थ होऊन या विद्येचा योग्य निष्क्रय–मूल्य आपल्यापाशी नाही, असें जाणून काय करिते झाले, तें श्रुति सांगते––

ते तमर्चयन्तस्त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसीति । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ८

ॐ भद्र कर्णेभिरिति शान्तिः ॥

इत्यथर्ववेदीयप्रश्नोपनिषदि षष्ठः प्रश्नः ॥ ६

इत्यथर्ववेदीया प्रश्नोपनिषत्समाप्ता ॥

अन्वयार्थ—[ते तं अर्चयन्तः –] तेव्हां ते शिष्य त्यांची पुष्पादिकांनी पूजा करीत होत्साते [यः त्वं अस्माकं अविद्यायाः परं पारं तारयसि इति सः त्वं हि नः पिता–] 'जो तूं आम्हांला विपरीत ज्ञानरूप अविद्येच्या पर तीरास पोंचवीत आहेस तो तूंच आमचा पिता आहेस,' असें म्हणाले. [परम-ऋषिभ्यः नमः परमऋषिभ्यः नमः–] परम ऋषींना नमस्कार असो; परम ऋषींना नमस्कार असो. (इतर लौकिक जनक पित्याहून आम्हांला तुझें पितृत्वच संमत आहे. इतर पिता केवल शरीर निर्माण करतो. तथापि तो लोकांमध्यें अतिशय पूज्य होतो. मग आत्यंतिक–नित्य अभय देणाऱ्या गुरूच्या पितृत्वाविषयी व अति पूज्यतेविषयी काय सांगावें ! ब्रह्मविद्यासंप्रदायकर्त्या परम ऋषींना नमस्कार असो; परम ऋषींना नमस्कार असो. आदरकरितां दोनदा नमस्कार केला आहे.) ८. ६.

प्रश्नोपनिषदाचें सिंहावलोकन

अथर्ववेदाच्या प्रश्नोपनिषदांत पिप्पलादमुनीनें सहा मुनींना ज्ञानोपदेश केला आहे. सगुण ब्रह्माची उपासना करणारे कात्यायनादि सहा मुनि पर-ब्रह्माला जाणण्याच्या इच्छेनें हातांत समिधा घेऊन गुरूपाशीं गेले. यालाच गुरूपसदन असें म्हणतात. त्याच्या पूर्तीसाठी एक वर्ष ब्रह्मचर्यव्रतानें राहिले. वर्षभर गुरुशुश्रूषा केल्यावर प्रथम कात्यायनानें स्थूल देहाच्या जन्माचा क्रम विचारला. या प्रश्नोत्तरावरून अपर विद्येचें फल स्पष्ट होतें. अपर विद्येंत कर्म व उपासना श्रुत आहे. जन्मकष्ट हें त्यांचें फल आहे. प्रजेची इच्छा करणारा प्रजापति विराट्सृष्टीनंतर स्रष्टव्य-उत्पाद्य पदार्थांचें आलोचन करणें, एतद्रूप तप करून प्रजेला उत्पन्न करिता झाला. त्यानें प्रथम रयि-प्राणसंज्ञक भोग्य-भोक्तृरूप द्वंद्व उत्पन्न करून चंद्र व आदित्य हे त्याचे अभिमानी देव निर्मिले. ओषधि वनस्पति वगैरे हें मूर्त भोग्य व शब्द-गंध-रसादि हें अमूर्त भोग्य आहे. चंद्र देव त्यांची वृद्धि करितो. आदित्य उदय पावून पूर्व-दक्षिणादि दिशांमध्यें राहणाऱ्या भोक्त्यांच्या प्राणांना प्रवृत्त करितो. प्राणच भोक्ते आहेत. त्याच्या प्रेरणेमुळें ते अन्नाचा उपभोग घेतात. सूर्य चंद्राची स्थिति, व

अहोरात्र यांचेंहि संपादन करितो. त्यामुळें त्या सर्वांचा समूहरूप काल संवत्सर झाला. जें जें उत्पन्न होतें तो तो प्रजापतीची उपाधि आहे. त्यामुळें संवत्सरात्मक प्रजापति पुनः दोन प्रकारचा झाला. दक्षिण व उत्तर ही दोन अयनें हे त्या संवत्सराचे अंश झाले. दक्षिणमार्गातील देव चंद्र व उत्तरमार्गातील देव आदित्य. इष्टा-पूर्त-दत्त कर्म करणारा दक्षिणमार्गानें चंद्राला प्राप्त होतो. पण त्याची पुनरावृत्ति—पुनर्जन्म होतो. कर्मठ गृहस्थांना क्रममुक्ति नाही. योगी सगुण ध्यान केल्यामुळें उत्तरमार्गानें सूर्याला प्राप्त होऊन, सूर्यमंडलाचा भेद करून ब्रह्मलोकाला जातात. पुढें प्रजापति माप्त झाला. शुक्ल व कृष्णपक्ष हे त्याचे दोन अंश व सूर्य-चंद्र हे अभिमानी देव होत. काम्य कर्मांचें फल शुक्लपक्षात अधिक मिळतें, असे शास्त्रात सांगितलें आहे. पण सूर्याचें ध्यान करणाराला कृष्णपक्षांतील ध्यानादि कर्मांचें फलहि शुक्लपक्षाप्रमाणें अधिक मिळतें. पुढें प्रजापति अहोरात्ररूप झाला. त्यातील दिवसाचा देव सूर्य व रात्रीचा चंद्र. याप्रमाणें भोक्तृ-भोग्यात्मक द्वंद्व उत्पन्न करून तो स्वतः अन्नरूप झाला. त्या अन्नापासून रेत झालें. त्यापासून या सर्व प्रजा—स्थूल शरीरें झाली. ऋतुकाली रेतःसेक करणें हें प्रजापतीचें व्रत जे आचरितात त्यांना पुत्र व कन्या यांची प्राप्ति, हें दृष्ट फल व दक्षिणमार्गानें चंद्रलोक, हें अदृष्ट फल प्राप्त होतें. पण ब्रह्मचर्यामध्यें रत असलेले जे ब्रह्मचिंतक—सगुण ब्रह्मोपासक ते उत्तरायणमार्गानें ब्रह्मलोकी जातात. ते पुनः जन्म घेत नाहीत. त्यांना क्रममुक्ति मिळते. जे तपःशून्य असतात त्यांना तो लोक प्राप्त होत नाही. याप्रमाणें कबंधी कात्यायनानें अत्यंत त्याज्य असलेल्या जन्माविषयी जो प्रश्न केला होता त्याचें उत्तर पिप्पलादानें दिलें. (१).

भार्गवानें स्थूल देहापासून सूक्ष्मदेहाचें विवेचन करण्यासाठी प्रश्न केला. कारण सूक्ष्मदेहाचें स्थूल शरीराहून विवेचन—पृथक्त्वानें निश्चय केला असतां स्थूलाचें अनात्मत्व स्पष्ट होतें. या प्रश्नात त्यानें स्थूल देहाचा धारक, द्योतक व श्रेष्ठ याविषयी तीन प्रश्न केले. स्थूल देहाचें धारण किती देव करितात ? उत्पादन व प्रेरणा असें दोन प्रकारचें धारण संभवतें. स्थूल शरीरांत ज्ञानवर्ग व क्रियावर्ग, असे दोन वर्ग आहेत. त्यांतील कोण, कोण देव त्याला प्रकाशित करितात. प्रेरणाख्य धारण करणाऱ्या देवांतील श्रेष्ठ देव कोण ?

स्थूल शरीरांत काठिन्य, द्रव, उष्णता, चलन व छिद्रें हे पृथिव्यादि पांच भूताचे गुण दिसतात. त्यामुळें देह पंचभूतजन्य आहे, असें ठरतें. हस्तपादादि हा क्रियावर्ग आहे. तो केवल क्रिया करितो. त्यामुळें तो शरीराला प्रकाशित करीत नाहीं. मनश्चक्षुरादि ज्ञानवर्ग त्याला प्रकाशित करितो. प्रेरणाख्य धारण प्राणच करितो. तथापि भूतें व इंद्रियें यांच्या देवतांना 'आम्हीच या देहाचें धारण करून त्याला कर्मामध्यें प्रेरित करितों' असा गर्व झाला. पण प्राणदेवाने अन्य देवतांच्या त्या गर्वाचें निवारण करण्यासाठीं त्यांस म्हटलें, 'तुम्ही अशा भ्रांत होऊं नका. मीच आपल्याला प्राण-अपानादि भागांनीं पांच प्रकारें विभागून या शरीराचें विधारण करितों.' पण प्राणाच्या या बोलण्यावर त्या देवतांचा विश्वास बसेना. म्हणून तो त्यांची खात्री करण्यासाठीं शरीरांतून बाहेर जाण्यास निघाला. त्याबरोबर सर्व देवता विह्वल झाल्या. मधमाशा आपला राजा स्थित असला की स्वतः तेथेंच स्थित होतात व तो निघाला की त्याहि त्याच्या पाठोपाठ निघतात, त्याप्रमाणेंच त्या देवताहि सर्वथा प्राणाच्या अधीन असतात. प्राण या सूत्राकडून बद्ध झालेल्या त्या सर्व देवता त्याच्या वश असतात. प्राणानें उत्क्रमण केल्यास या शरीरांत आमचें अस्तित्व संभवत नाहीं, अशी खात्री होतांच त्या इतर देवानी प्राणाच्या उत्क्रांतीचें निवारण केलें, व त्याची स्तुति केली. पिप्पलाद आचार्यानें असा बोध केला असतां, भार्गवानें 'देह अकिंचित्कर—फुकट आहे व संसाराचें कारण प्राणच आहे' असा निश्चय केला. (२.)

या प्राणाच्या उपासनेचें—ध्यानाचें फल क्रममुक्ति हें आहे, यास्तव आश्वलायन कौसल्यानें त्या प्राणाविषयी असे सहा प्रश्न विचारले—१ हा प्राण कोणापासून उत्पन्न झाला, २ तो या शरीरांत कसा येतो, ३ आपल्या स्वरूपाचा विभाग करून शरीरांत कसा अवस्थित होतो, ४ कोणत्या विशिष्ट वृत्तीनें तो शरीरांतून उत्क्रमण करितो, ५ तो बाह्य जगाचें धारण कसें करितो व ६ अध्यात्माचें धारण कसा करितो ? त्याची उपासना करावी, या श्रद्धेनें त्यानें असे प्रश्न विचारले असतां, संतुष्ट झालेला गुरु त्याला म्हणाला. 'परमात्मा वस्तुतः अविक्रिय आहे. तथापि शरीरामध्यें कोणत्याहि प्रकारचा विकार उत्पन्न न करितां देहाची छाया—प्रतिबिंब—जसें उद्भवतें त्याप्रमाणें त्या परमात्म्यापासून प्राण उत्पन्न

झाला. देहप्रतिबिंब जसें मिथ्या, तसाच हा प्राण आत्म्यामध्यें कल्पित आहे. आरशाची दीप्ति—निर्मलता वगैरे जशी असते तशीच आत्म्याची माया ही उपाधि आहे. पूर्वकल्पांत मनानें केलेलें जें कर्म असतें तेंच प्राणाला स्थूल शरीरांत येण्याचें कारण आहे. सार्वभौम राजा आपल्या अधिकाऱ्यांना निरनिराळ्या ग्रामांमध्यें जसा नेमतो त्याप्रमाणें प्राण आपल्या वृत्तीना शरीरांतील यथायोग्य स्थानीं स्थापितो. मल-मूत्रादिकांच्या त्यागासाठीं अपानाला अधोभागी स्थापितो. तो स्वतः श्वासोच्छ्वास करीत मुख नासिकादि स्थानी अवस्थित होतो. समानाला मध्यें स्थापिलें आहे. तो खालेल्या अन्नाला शरीरभर सम नेतो. अन्नाच्या योगानें वृद्धि पावलेला तो मूर्धच्छिद्रात म्ह० दोन कान, दोन नेत्र, दोन नासिका व मुख या गोलकात सात प्रकारचा होतो. हृदयकमलांत जीवात्मा स्थित आहे. तें हृदय अनेक नाड्यानी परिवेष्टित झालें आहे. मुख्य नाड्यांची संख्या एकशें एक आहे. त्यांतील प्रत्येक नाडीच्या शंभर शाखानाड्या व त्या प्रत्येक शाखेच्या बहात्तर हजार प्रतिशाखा नाड्या सांगितलेल्या आहेत. त्या सर्व नाड्यांमध्यें अवस्थित होऊन व्यान सर्व शरीराला बल देतो. कंठस्थ उदान दुसऱ्या जन्मासाठी उत्क्रमण करितो. याप्रमाणें हा प्राण आपला पांच प्रकारें विभाग करून या शरीरात व्यवस्थित आहे. उदानवायूच्या योगानें उत्क्रमण सांगितलें. आतां त्याचे बाह्य धारण सांगतों. पृथिव्यादि पंच भूताचे जे देव त्यांच्या रूपानें प्राण हा बाह्य जगाला धारण करितो. पुनरपि त्या देवतांच्या रूपानेंच तो चक्षुरादि शरीर प्राणावर अनुग्रह करितो. हेंच त्याचें अध्यात्मधारण आहे. रवीचा अनुग्रह चक्षूवर आहे. त्याचप्रमाणें अपानादि दुसऱ्या प्राणांवरहि भूम्यादिकांचा अनुग्रह आहे, असें शास्त्रतः अवगत होतें. तेजोदेवतेकडून उदान अनुगृहीत आहे. त्यामुळें शरीरातील उष्णत्व शांत झालें असतां पुरुष एका देहांतून दुसऱ्या देहात जातो. प्रथम इंद्रियें मनामध्यें एकरूप होतात. नंतर मनोरूपानें तो ज्या देहाची भावना करितो त्या देहास प्राण जीवासह प्राप्त होतो. याप्रमाणें सहा प्रश्नांच्या द्वारा ज्याचा निर्णय केला आहे, त्या प्राणाचें ध्यान जो करितो, तो सोपाधिक ब्रह्मोपासक क्रमानें मुक्त होतो. (३)

पूर्वोक्त अपरविद्येचें म्ह० कर्म व उपासना यांचें फल, ब्रह्मलोकपर्यंत संसार हेंच आहे. म्हणून गार्ग्यानें संसारातीत मोक्षसंज्ञक फल देणाऱ्या पर विद्येसाठीं

पांच प्रश्न विचारले. या शरीरेंद्रियसंघातांतील १ निजतात कोण, २ जागतात कोण, ३ स्वप्न कोण पाहतो, ४ झोंपेंत सुख कोणाला होतें व ५ जगत् कशामध्यें लीन होतें पिप्पलाद मुनि म्हणतोः—संध्याकाळीं सूर्याबरोबर त्याचे किरण जसे अस्त पावतात त्याप्रमाणें बाह्य दशेंद्रियें आंतर बुद्धीसह निजतात. त्यामुळें इंद्रियांच्या श्रवणादि क्रिया त्यावेळी होत नाहीत. पण झोंपेंतहि प्राण जागतो. कारण त्याची श्वासोच्छ्वास ही क्रिया सुरू असते. झोंपेंतहि जाठर अग्नि खालेलें अन्न उत्तम प्रकारें पचवितो. यास्तव प्राणांचें यागांतील अग्नींच्या रूपानें चिंतन करणाराला यागाचें फल मिळतें. जेव्हा बाह्य इंद्रियांचा उपरम होऊन मनाचा उपरम होत नाही तेव्हां जीवात्मा मन-उपाधिक होऊन सदा स्वप्न पाहतो. नाड्यांतून संचार करणारा जीव, नाना जन्मांत संपादन केलेल्या वासना पाहतो. त्यालाच स्वप्न म्हणतात. सुषुप्तीत पित्ताख्य तेजाकडून हृदयाचीं छिद्रें आच्छादित होतात. त्यामुळें चित्तोपाधिक जीवहि त्या पित्ताकडून पराभूत केला जातो. छिद्रांचा निरोध झाल्यामुळें चित्तात दुःखवृत्तीचा अनुभव येत नाही. तेव्हां अर्थात्च जीवाचा स्वप्रकाश आत्मानंद अवशिष्ट राहतो. संध्याकाळीं पक्षी आपापल्या निवासवृक्षावर जाऊन जसे झोंपतात त्याप्रमाणें सुप्ति, प्रलय व मुक्ति या अवस्थांमध्यें जगत् आत्म्यामध्यें लीन होतें. तन्मात्रें—सूक्ष्म भूतें, स्थूल भूतें, ज्ञान-कर्मेंद्रियें, अन्तःकरणाचे भेद, ज्ञान-क्रियात्मक शक्ति, त्याचे सर्व विषय व अन्तःकरणस्थ जीव, हेंच सर्व जगत् आहे. तें निद्रावस्थेत त्या निद्रित पुरुषाला भासत नाहीं. सर्वांचा प्रलय झाल्यावर तर त्याचा कोणालाच अनुभव येत नाही. त्याच प्रमाणें तत्त्ववेत्त्याला मुक्तीत त्याचा अनुभव येत नाही. परमात्मा जसा जगाचा आधार आहे, तसाच तो जगत्स्थितीचाहि आधार आहे. जगदाधार या रूपानेंच परमात्म्याला लक्षणेनें ओळखावें. येथें बुद्धीतील चित्तप्रतिबिंब हा उपलक्षयिता जीव आहे. ब्रह्म उपलक्ष्य आहे. तें 'अच्छायं०' इत्यादि मूळ वाक्यांत वर्णन केल्या प्रमाणें आहे. अशा या अक्षर ब्रह्माला जो जाणतो तो सर्वज्ञ व सर्वात्मा होतो. (४)

नंतर सत्यकामानें पूर्वोक्त ब्रह्मानुभवाचें साधन जें प्रणवध्यान, तें त्याच्या पृथक् फलासह विचारलें. 'मरेपर्यंत प्रणवाचें ध्यान करणारा ज्ञान व कर्म यांनीं साध्य होणाऱ्या कोणत्या लोकाला प्राप्त होतो?' असा त्यानें प्रश्न केला असतां,

पिप्पलाद म्हणतोः—ओंकार हें अपर ब्रह्माचें व पर ब्रह्माचें प्रतीक आहे. यास्तव प्रवणाच्या योगानें त्यांतील कोणत्या तरी एका ब्रह्माचें चिंतन करावें. विराट्, सूत्रात्मा व अव्याकृत हें अपर ब्रह्म आहे व सत्य-ज्ञानात्मक पर ब्रह्म आहे. अपर ब्रह्माचें चिंतन तीन मात्रांनी विभक्त असतें. 'अ-'कार हा विराट्, 'उ-'कार सूत्रात्मा व 'म-'कार अव्याकृत आहे, असा अपर ब्रह्माच्या चिंतनांतील विभाग जाणावा. सूत्रात्मा व अव्याकृत याचें ज्ञान नसलेल्या उपासकानें विराण्मात्र ओंकाराची उपासना जरी केली, तरी ती व्यर्थ जात नाहीं. ऋगाख्य देव त्याला भूलोकास पोंचवितात व पूर्ववासनेनें तो योगाचा पुनरपि अधिक अभ्यास करतो. तात्पर्य योगभ्रष्ट केव्हाहि दुर्गतीला जात नाही. विराट्-सूत्रात्मक दोन मात्रांचें ध्यान करणाराला यजुराख्य देव सोमलोकाला नेतात. पण त्याला पुनः जन्म घ्यावा लागतो. विराट्-सूत्र-अव्याकृत या नांवांच्या त्रिमात्र प्रणवाचें जो स्मरण करतो, त्याला सामाख्य देव ब्रह्मलोकाला नेतात. तो लोक मुक्तीला कारण होतो. समस्त जीवघन जो सूत्रात्मा तो दुसऱ्या सर्वांहून श्रेष्ठ आहे. त्याहूनहि श्रेष्ठ जें ब्रह्मतत्त्व त्याला तो त्या लोकी पहातो. याप्रमाणें अपर ब्रह्मचिंतनानें क्रम मुक्ति मिळते. ओंकारानें परब्रह्माचें ध्यान करून, साक्षात् अनुभव घेतल्यानें उपासक मुक्त होतो. जें शांत, जरा-मरणरहित, अभय, परब्रह्म त्याची ओंकारानें उपासना करणारा व त्याला जाणणारा पुरुष तद्रूप होतो, असें परब्रह्मोपासनेचें पृथक् फल श्रुत आहे. (५)

मुक्तीमध्यें प्राप्य—प्राप्त होण्यास योग्य असलेलें जें परब्रह्म त्याचेंच प्रत्यगात्मत्व जाणण्याची इच्छा करणारा भरद्वाज पुरुषाविषयीं प्रश्न करूं लागला. भगवन्, एक राजपुत्र सोळा कलांनीं युक्त असलेल्या पुरुषाविषयीं मला विचारूं लागला. पण मी त्याला जाणत नव्हतों. म्हणून मी राजपुत्राला तसें स्पष्ट सांगितलें, तेव्हां तो निघून गेला. यास्तव हे मुने, तो पुरुष कोण आहे, तें मला सांग. त्यावर पिप्पलाद मुनि म्हणतो, हे प्रिय शिष्या, तो पुरुष आपल्या शरीरांतच हृदयामध्यें सर्वकाल असतो, त्याच्यामध्यें प्राणापासून नामापर्यंत सोळा कला मायेनें उत्पन्न झाल्या आहेत. प्राण, श्रद्धा, आकाशादि भूतपंचक, इंद्रियें, मन, अन्न, वीर्य, तप, मंत्र, कर्म, लोक व नाम अशा या सोळा कला ज्याच्या ठिकाणीं आरोपित आहेत तो पुरुष पूर्ण आहे. तथापि त्याचें ज्ञान या शरीरामध्येंच

होणें सर्वथा उचित आहे. दर्शन, श्रवण, इत्यादि क्रियांवरून शरीरांतील चिद्रूपता अगदीं स्पष्ट भासते. देह विद्यमान असतांनाच त्या चिद्रूपतेच्या पूर्णत्वाचें ज्ञान झालें असतां जीवत्वाची निवृत्ति होते पूर्ण चिद्रूपाला जीवत्व देणारी उपाधि प्राण आहे. त्यामुळें प्राणाची उत्क्रांति व स्थिति यांचा आरोप स्वात्म्यावर केला जातो. म्हणून ' कोण उत्क्रांत झाला असतां मी उत्क्रांतीला प्राप्त होईन बरें, ' असा विचार करून परमात्म्यानें प्राणाला उत्पन्न केलें. या आरोपित जीवत्वाच्या निवृत्तीसाठी देहस्थ चिदात्म्याचें पूर्णरूपानें पुरुषत्व जाणावें. प्राणापासून नामापर्यंत सर्व जगत् या चिदात्म्यामध्यें कल्पिलेलें आहे, त्यामुळें चिदात्मा सर्वाधिष्ठान आहे. म्हणून त्याचें पूर्णत्व उपपन्न होतें. नद्या समुद्राला जाऊन मिळाल्या असतां त्यांचें नाम-रूप लीन होतें. त्याच न्यायानें या सोळा कला आत्मबोधानें स्वात्म्यामध्यें लीन झाल्या असतां आत्मा समुद्रासारखा अवस्थित होतो. हा कलारहित, अमृत, पूर्ण, चिदात्मा मुक्त म्हटला जातो. त्याचें ज्ञान करून देण्यासाठीच सर्व वेदान्त प्रवृत्त झाले आहेत. रथनाभीमध्यें जसे अर त्याप्रमाणें या प्राणादिकला ज्याच्यामध्यें प्रतिष्ठित आहेत, त्या ज्ञेय पुरुषाला तुम्ही सर्वजण, मृत्यूच्या नाशासाठी, साक्षात् जाणा. हे कात्यायनादि श्रेष्ठ मुनीहो, ऐका, मी हें एवढच ब्रह्म जाणतों. याहून अधिक ब्रह्म मला माहित नाहीं. तेव्हां ते मुनीहि त्या पिप्पलादाची पूजा करून म्हणाले,'या संसारभयांतून आमचें रक्षण केल्यामुळें तूंच आमचा खरा पिता आहेस. अविद्येच्या परतीराला नेऊन पोंचविणाऱ्या तुझी नमस्कारावाचून दुसरी कोणतीच उचित शुश्रूषा करण्यास आम्ही समर्थ नाहीं. परम ऋषि जे गुरु त्यास पुनः पुनः नमस्कार असो. ' पिप्पलादमुनीनें याप्रमाणें त्या सहा मुनीवर अनुग्रह केला. हें उपनिषदहि महत्त्वाचें आहे. 'मुंडक' या नांवाच्या मंत्रोपनिषदाचें हें ब्राह्मणोपनिषद् आहे. त्यामुळेंच मुंडकातील ' ओमित्येवं ध्यायथ आत्मानं०' व ' प्रणवो धनुः शरो ह्यात्मा०' या मंत्रांनी सुचविलेली ओंकारोपासना याच्या पांचव्या प्रश्नांत सांगितली आहे. त्याचप्रमाणें ' गताः कलाः पंचदश०' व ' यथा नद्यः स्यंदमानाः०' या मुंडकातील मंत्राचा विस्तृत अर्थ सांगण्यासाठीं याचा सहावा प्रश्न आहे. ब्रह्मसूत्रांतहि यातील वाक्यांचा पांच-सहा ठिकाणी विचार व उल्लेख केला आहे. (६)

इति सुबोध उपनिषत्समग्रहांतील प्रश्नोपनिषद समाप्त झाले.

मुण्डकोपनिषद्

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाꣳसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अन्वयार्थ—अहो देवानो, आम्ही कानांनीं भद्र—कल्याण—शुभ वचन ऐकावें; आणि यागास समर्थ होऊन आम्हीं नेत्रांनी भद्रच पहावें; स्थिर अंगांनीं व शरीरांनी आम्ही तुमची स्तुति करणारे होत्साते देवांनें दिलेल्या सर्व आयुष्यास प्राप्त व्हावें.

ॐ ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता ।
स ब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठामथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥ १

अन्वयार्थ—[ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव—] ब्रह्मा इंद्रादि देवांमध्यें गुणांनी श्रेष्ठ होऊन, किंवा सर्वांच्या पूर्वी, अभिव्यक्त झाला. [विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता—] तो सर्व जगाचा कर्ता व उत्पन्न झालेल्या भुवनाचा रक्षक आहे.[सः सर्वविद्याप्रतिष्ठां ब्रह्मविद्यां अथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह—]तो सर्व विद्यांच्या आश्रयभूत ब्रह्मविद्येला आपल्या अथर्वनांवाच्या ज्येष्ठ पुत्रास प्रत सांगता झाला. १.

अथर्वणे यां प्रवदेत ब्रह्माऽथर्वा तां पुरोवाचाङ्गिरे ब्रह्मविद्याम् ।
स भारद्वाजाय सत्यवहाय प्राह भारद्वाजोऽङ्गिरसे परावराम् ॥ २

अन्वयार्थ—[ब्रह्मा अथर्वणे यां प्रवदेत—] ब्रह्मा अथर्वाला जी ब्रह्मविद्या सांगता झाला [तां ब्रह्मविद्यां अथर्वा अंगिरे पुरा उवाच—] तीच ब्रह्मविद्या अथर्वा अङ्गीला पूर्वी सांगता झाला [सः सत्यवहाय भारद्वाजाय प्राह—] तो अंगी सत्यवहनांवाच्या भारद्वाजाला सांगता झाला. [परावरां भारद्वाजः अंगिरसे—] याप्रमाणें श्रेष्ठापासून कनिष्ठाला प्राप्त झालेली ती विद्या भारद्वाज अंगिरसाला सांगता झाला. २.

शौनको ह वै महाशालोऽङ्गिरसं विधिवदुपसन्नः पप्रच्छ ।
कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥ ३

अन्वयार्थ—[महाशालः शौनकः ह वै अंगिरसं विधिवत् उपसन्नः पप्रच्छ–] महा गृहस्थ शौनक अंगिरसापाशी यथाशास्त्र–हातात समिधा घेऊन–समीप प्राप्त होऊन म्हणाला. [भगवः कस्मिन् नु विज्ञाते इदं सर्वं विज्ञातं भवति इति–] 'हे भगवन्, काय बरें जाणलें असतां हें सर्व विशेषतः ज्ञात होतें.' (या प्रश्नाविषयीचा अधिक विचार भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. ६६.) ३.

तस्मै स होवाच । द्वे विद्ये वेदितव्ये इति ह
स्म यद्ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापरा च ॥ ४

अन्वयार्थ—[तस्मै सः ह उवाच–] शौनकाला अंगिरस म्हणाला–[द्वे विद्ये वेदितव्ये–] 'दोन विद्या आहेत, असें जाणावें;' [इति ह स्म यत् ब्रह्मविदः वदन्ति–] असें वेदवेत्ते परमार्थदर्शी म्हणतात. [परा च एव अपरा च–] एक पर विद्या व दुसरी अपर विद्या. ४.

तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः शिक्षा कल्पो व्याकरणं
निरुक्तं छन्दो ज्योतिषमिति । अथ परा यया तदक्षरमधिगम्यते ॥ ५

अन्वयार्थ—[तत्र ऋग्वेदः०....ज्योतिषं इति अपरा–] त्यांतील ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द व ज्योतिष ही अपरा विद्या [अथ यया तत् अक्षरं अधिगम्यते सा परा–] आणि जिच्या योगानें तें अक्षर ब्रह्म अवगत होतें ती परा. ५.–आतां त्या अक्षर ब्रह्माचींच विशेषणें—

यत्तदद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुःश्रोत्रं तदपाणिपादम् ।
नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं तदव्ययं यद्भूतयोनिं परिपश्यन्ति धीराः ६

अन्वयार्थ—[यत् तत् अद्रेश्यं० .यत् भूतयोनिं–] अदृश्य, कर्मेंद्रियांचें अविषय, अन्वयरहित, द्रव्यधर्मरहित, चक्षुः-श्रोत्ररहित, तसेंच तें हस्त-पादादि कर्मेंद्रियरहित, नित्य, विविधरूपांनी होणारें, सर्वगत, अतिसूक्ष्म व अव्यय असें जें भूतांचें कारण त्याला [धीराः परिपश्यन्ति–] विवेकी लोक सर्वतः पाहतात.–सु.ब्र. अ.१. पा.२. अ.६. पृ.५८।३४८पहा. ६.–वर सांगितलेलें

अक्षर भूतियोनि आहे, असें सांगितलें. पण त्याला भूतांचें योनित्व–कारणत्व कसें, तें प्रसिद्ध दृष्टान्तांनी व्यक्त करितात––

यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च यथा पृथिव्यामोषधयः संभवन्ति ।
यथा सतः पुरुषात्केशलोमानि तथाऽक्षरात्संभवतीह विश्वम् ॥ ७

अन्वयार्थ––[यथा ऊर्णनाभिः सृजते गृह्णते च–] ज्याप्रमाणें कोळी तंतूंना उत्पन्न करतो व पुनः त्यांना आपल्या शरीरांत ओढून घेतो, [यथा पृथिव्यां ओषधयः संभवन्ति–] किंवा ज्याप्रमाणें पृथ्वीमध्यें ओषधि-वनस्पती उत्पन्न होतात, [यथा सतः पुरुषात् केशलोमानि–] अथवा ज्याप्रमाणें जिवंत पुरुषापासून केंस व लोम उत्पन्न होतात [तथा अक्षरात् इह विश्वं संभवति–] त्याप्रमाणें अक्षरापासून या संसारमंडलांत विश्व संभवतें. ७.–ब्रह्मापासून उत्पन्न होणारें विश्व या पुढील क्रमानें उत्पन्न होतें, असा क्रमनियम सांगण्यासाठी हा मंत्र आरंभिला आहे––

तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते । अन्ना-
त्प्राणो मनः सत्यं लोकाः कर्मसु चामृतम् ॥ ८

अन्वयार्थ––[तपसा ब्रह्म चीयते–] ज्ञानलक्षण तपाच्या योगानें ब्रह्म किंचित् उपचय पावतें–बीज जसें अंकुरित होतें त्याप्रमाणें ब्रह्म किंचित् विकास पावतें [ततः अन्नं अभिजायते–] त्या उपचित ब्रह्मापासून अन्न–अव्याकृत–उत्पन्न होतें. [अन्नात् प्राणः–] अव्याकृतापासून हिरण्यगर्भाख्य प्राण उत्पन्न होतो. [ततः मनः–] प्राणापासून अंतःकरण–समष्टि मन, [सत्यं–] त्या समष्टि मनापासून सत्यसंज्ञक भूतपंचक उद्भवतें. [लोकाः–] त्यापासून ब्रह्मांडाच्या द्वारा सप्त लोक, [कर्मसु च अमृतं–] लोकांतील मनुष्यादिकांपासून कर्म व कर्माच्या योगानें अमृतसंज्ञक कर्मफल उत्पन्न होतें. याचें सविस्तर व सोपपत्तिक व्याख्यान भाष्यार्थांत पहा. ८.–आतां यापुढें अविद्याप्रकरण आरंभावयाचें असल्यामुळें त्यासाठी मागें सांगितलेल्या अर्थाचा उपसंहार केला जातो––

यः सर्वज्ञः सर्ववित्यस्य ज्ञानमयं तपः ।
तस्मादेतद्ब्रह्म नाम रूपमन्नं च जायते ॥ ९

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि प्रथममुण्डके प्रथमः खण्डः ॥ १ ॥

अन्वयार्थ—[यः सर्वज्ञः—] जो वर सांगितलेल्या लक्षणाचा अक्षरसंज्ञक 'सर्वज्ञ'—सामान्यतः समष्टिरूपानें मायोपाधीच्या द्वारा सर्व जाणतो म्हणून सर्वज्ञ व [सर्वविद्—] विशेषतः व्यष्टिरूपानें—अविद्यासंज्ञक उपाधीने अनन्त जीवभावास प्राप्त झालेला तोच आपली सर्व उपाधि व तिच्याशी संबद्ध झालेलें दुसरें सर्व जाणतो म्हणून सर्वविद् आहे. [यस्य ज्ञानमयं तपः—] ज्याचें ज्ञानमय —ज्ञानसंज्ञक विकाररूप सर्वज्ञलक्षण तप आहे, आयासरूप तप नाही [तस्मात् एतत् ब्रह्म नाम रूपं अन्नं च जायते—] अशा त्या सर्वज्ञापासून वर सांगितलेलें कार्यलक्षण हिरण्यगर्भसंज्ञक ब्रह्म उत्पन्न होतें. तसेंच त्यापासून हा देवदत्त, हा यज्ञदत्त इत्यादि नांव, हें शुभ्र, हें काळें इत्यादि रूप, व्रीहि-यव इत्यादि अन्न उत्पन्न होतें. पूर्वीच्या मंत्रात सांगितलेल्या क्रमानें सर्व होत असल्यामुळें त्या व या मंत्रार्थात विरोध येत नाही, असें जाणावें. सु. ब्र. पृ. ६६ पहा.९.(१.१.)

'अंगांसह चार वेद ही अपरा विद्या व जिच्या योगानें अक्षर ब्रह्माचा साक्षात्कार होतो ती परा विद्या' असें सांगून अक्षराची विशेषणें सांगितली. त्याच्यापासून सृष्टीचा क्रम सांगितला. दुःखरूप संसार हें अपरा विद्येचें फल व निरतिशय सुखरूप मोक्ष हें पराविद्येचें फल आहे. आता या दुसऱ्या खंडांत श्रुति प्रथम अपर विद्येचें फल वैराग्यासाठी स्पष्टपणें दाखविते व शेवटी कर्मफलाचें परीक्षण करून विरक्त व्हावे, असें विधान करिते—

तदेतत्सत्यं मन्त्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यंस्तानि
त्रेतायां बहुधा संततानि । तान्याचरथ नियतं
सत्यकामा एष वः पन्थाः सुकृतस्य लोके ॥ १

अन्वयार्थ—[तत् एतत् सत्यं—] तें हें सत्य आहे. तें काय ? [कवयः यानि कर्माणि अपश्यन्—] बुद्धिमान् ऋषींनी मंत्रांमध्यें जीं कर्मे पाहिली तेंच हें सत्य आहे. [तानि त्रेतायां बहुधा संततानि—] तीं कर्मे त्रेतायुगात बहुत प्रकारें प्रवृत्त झाली आहेत. यास्तव [सत्यकामाः तानि नियतं आचरथ—] तुम्हीं कर्मफलाची इच्छा करणारे होत्साते तीं कर्मे नित्य करा. [सुकृतस्य लोके एषः वः पन्थाः] स्वतः केलेल्या कर्माच्या फलाची प्राप्ति होण्यास हाच

तुम्हांला मार्ग आहे. १.—श्रुति उदाहरणार्थ त्यांतील अग्निहोत्राचाच प्रथम उल्लेख करिते. कारण सर्व अग्निसाध्य कर्मांतील तें प्रथम कर्म आहे——

यदा लेलायते ह्यर्चिः समिद्धे हव्यवाहने ।
तदाऽऽज्यभागावन्तरेणाऽऽहुतीः प्रतिपादयेत् ॥२

अन्वयार्थ—[समिद्धे हव्यवाहने यदा हि अर्चिः लेलायते—] अग्नि चांगला प्रदीप्त झाला असतां जेव्हा त्याची ज्वाला वर चालू लागते [तदा आज्यभागौ अन्तरेण आहुतीः प्रतिपादयेत्—] तेव्हा तिच्यामध्यें आज्यभागांच्या मध्यभागी—आवापस्थानी देवतांना उद्देशून आहुत्या द्याव्यात. २.—आहुतीचा यथाविधि त्याग करणें, इत्यादि हा कर्ममार्ग लोकप्राप्तीचा उपाय आहे. पण त्याचें यथाशास्त्र अनुष्ठान दुष्कर आहे. त्यांत अनेक विपत्ति संभवतात कशा त्या पहा——

यस्याग्निहोत्रमदर्शमपौर्णमासमचातुर्मास्यमनाग्रयणमतिथिवर्जितं च ।
अहुतमवैश्वदेवमविधिना हुतमासप्तमांस्तस्य लोकान्हिनस्ति ॥ ३

अन्वयार्थ—[यस्य अग्निहोत्र—] ज्या अग्निहोत्र्याचें अग्निहोत्र कर्म [अदर्श०.....अनाग्रयणं—] दर्श, पौर्णमास, चातुर्मास्य, आग्रयण, या कर्मांनी रहित [च अतिथिवर्जितं—] त्याचप्रमाणें अतिथिपूजनरहित [अहुत अवैश्वदेवं अविधिना हुत—] तसेंच योग्यसमयी हवन न केलेलें, वैश्वदेवकर्मरहित व अविधीनें हवन केलेलें असतें त्याचे तें अग्निहोत्र [आसप्तमान् तस्य लोकान् हिनस्ति—] जणु काय त्याच्या सात पुरुषांचा नाश करतें. ३.

काली कराली च मनोजवा च सुलोहिता या च सुधूम्रवर्णा ।
स्फुलिङ्गिनी विश्वरुची च देवी लेलायमाना इति सप्त जिह्वाः ॥ ४

अन्वयार्थ—[काली कराली०—] काली, कराली, मनोजवा, सुलोहिता, सुधूम्रवर्णा, स्फुलिंगिनी, विश्वरुची देवी अशा या चलन पावणाऱ्या अग्नीच्या सात जिव्हा आहेत. ४.

एतेषु यश्चरते भ्राजमानेषु यथाकालं चाऽऽहुतयो ह्याददायन् ।
तं नयन्त्येताः सूर्यस्य रश्मयो यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः ॥ ५

अन्वयार्थ—[यः एतेषु भ्राजमानेषु यथाकालं आहुतयः आददायन् हि चरते—] जो अग्निहोत्री दीप्त होणाऱ्या या सात अग्निजिव्हाभेदांमध्यें यथाकाली

आहुत्या देत अग्निहोत्रादि कर्म करतो [तं एताः सूर्यस्य रश्मयः भूत्वा—] त्याला त्या सूर्याचे किरण होऊन—सूर्यकिरणाच्या द्वारा [यत्र देवानां पतिः एकः अधिवासः तत्र नयन्ति—] ज्या स्वर्गात देवांचा पति इंद्र सर्वश्रेष्ठ होऊन राहतो त्यांत नेतात. ५.—त्या आहुत्या सूर्यकिरणांच्या द्वारा यजमानाला कशा नेतात तें या मंत्रांत सांगितलें आहे—

एह्येहीति तमाहुतयः सुवर्चसः सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं वहन्ति ।
प्रियां वाचमभिवदन्त्योऽर्चयन्त्य एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः ६

अन्वयार्थ—[सुवर्चसः अर्चयन्त्यः एषः वः पुण्यः सुकृतः ब्रह्मलोकः इति प्रियां वाचं अभिवदन्त्यः आहुतयः—] दीप्तिमत्, पूजा करणाऱ्या व हा तुमचा पुण्य, सुकृत ब्रह्मलोक आहे अशी स्तुतिरूप प्रियवाणी उच्चारणाऱ्या त्या आहुत्या [तं यजमानं सूर्यस्य रश्मिभिः एहि एहि इति वहन्ति—] त्या यजमानाला सूर्याच्या किरणाच्या द्वारा 'ये ये' असे म्हणत नेतात. येथील ब्रह्मलोक म्हणजे स्वर्ग. कारण हे कर्मप्रकरण आहे. ६.—हें ज्ञानरहित कर्म इतकेंच फल देणारें आहे. तें अविद्या-कर्म-कर्माचें कार्य आहे. त्यामुळें तें असार व दुःखमूल आहे. म्हणून त्याची निंदा करितात—

प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपा अष्टादशोक्तमवरं येषु कर्म ।
एतच्छ्रेयो येऽभिनन्दन्ति मूढा जरामृत्युं ते पुनरेवापि यन्ति ७

अन्वयार्थ—[येषु अवरं कर्म उक्तं—] ज्याच्यामध्ये निकृष्ट कर्म सांगितलें आहे [हि एते अष्टादश यज्ञरूपाः अदृढाः प्लवाः—] ते हे अठरा यज्ञरूप अदृढ—विनाशी प्लव आहेत. प्लव म्हणजे नौका, विनाशी नौका. यत् ये मूढाः एतत् श्रेयः अभिनंदन्ति—] जे मूढ हे श्रेयस्कर नाहीं, असें म्हणून त्याचें अभिनंदन करितात [ते पुनरेव अपि जरामृत्यु यन्ति—] ते पुनरपि जरा व मृत्यु यास प्राप्त होतात. (हे यज्ञ करणारे अठराजण म्हणजे सोळा ऋत्विज, यजमान व पत्नी, विनाश पावणारे आहेत. कारण ते अस्थिर आहेत. शास्त्राच्या आश्रयानें असलेलें कर्म सांगितलें आहे. पण त्या अठराजणांमध्यें ज्ञानरहित कर्मच असतें' तस्मात् ते अवर—ज्ञानरहित—कर्माचे आश्रयभूत अठराजण अदृढ—अस्थिर असल्यामुळें नाश पावतात ते नाश पावणे म्हणजे त्याच्या अनुष्ठानानेंच सिद्ध होणारें कर्महि फलासह नाश पावतें. भांडें फुटलें असतां त्यांतील दही,

दूध इत्यादि जसें नाश पावतें त्याप्रमाणेंच त्यांच्या आश्रयानें राहणारीं कर्में विनाश पावतात. पण असें असतानाहि–हें कर्मच श्रेयस्कर आहे. असें समजून जे अविवेकी मूढ अतिशय दुष्ट होतात ते स्वर्गामुळेंच, कांही काळ स्वर्गात राहून पुनरपि जरा व मृत्यु यांस प्राप्त होतात) ७.

अविद्यायामन्तरे वर्तमानाः स्वयं धीराः पण्डितंमन्यमानाः ।
जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना यथाऽन्धाः ॥

अन्वयार्थ—[अविद्याया अन्तरे वर्तमानाः -] अविद्येमध्यें राहणारे–अविवेकी व [स्वयं धीराः पण्डितंमन्यमानाः मूढाः—] स्वतःला मोठे बुद्धिमान् पंडित मानणारे ते मूढ [अन्धेन एव नीयमानाः अंधाः यथा तथा जंघन्यमानाः परियन्ति—] अंधाकडूनच नेल्या जाणाऱ्या अंधाप्रमाणें पीडित होत्साते भ्रमण करितात. ८.

अविद्यायां बहुधा वर्तमाना वयं कृतार्था इत्य-
भिमन्यन्ति बालाः । यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति
रागात्तेनाऽऽतुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते ॥ ९ ॥

अन्वयार्थ—[अविद्याया बहुधा वर्तमानाः बालाः -] अविद्येमध्यें बहुतप्रकारें असणारे ते मूढ [वयं कृतार्थाः इति अभिमन्यन्ति—] आम्ही कृतार्थ आहों, असा अभिमान धरतात. [यत् कर्मिणः रागात् न प्रवेदयन्ति -] ज्याअर्थी अशा रीतीनें कर्मठ लोक कर्मफलाविषयीच्या रागामुळें तत्त्व जाणत नाहीत [तेन आतुराः क्षीणलोकाः च्यवन्ते -] त्याअर्थी ते दुःखित होऊन ज्यांचें कर्मफल क्षीण झालें आहे, असे होत्साते स्वर्गातून च्युत होतात. ९

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः ।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति ॥ १०

अन्वयार्थ—[इष्टापूर्तं—] यागादि श्रौत कर्म हें इष्ट; वापी कूप-तडागादि लोकोपकारक वस्तु निर्माण करून त्यांचा लोकोपयोगार्थ उत्सर्ग करणें हें स्मार्त पूर्त कर्म; या दोन प्रकारच्या कर्मालाच [वरिष्ठं मन्यमानाः प्रमूढाः—] सर्वोत्तम पुरुषार्थसाधन समजणारे, इष्टापूर्त कर्म हेंच प्रधान साधन आहे, असें चिंतन करणारे ते अतिशय मूढ [अन्यत् श्रेयः न वेदयन्ते—] आत्मज्ञानसंज्ञक दुसरें श्रेयःसाधन जाणत नाहीत. [ते—] पुत्र-पशु-बंधु इत्यादिकांविषयी अतिशय मत्त झाल्या कारणानें विवेकहीन बनलेले ते [नाकस्य पृष्ठे सुकृते अनुभूत्वा—]

स्वर्गाच्या पृष्ठभागीं उत्तम शरीरांत प्रवेश करून कर्मांचें फल भोगतात व [इमं लोकं हीनतरं वा विशन्ति—] पुनः या मानुष लोकांत अथवा याहून अधिक हीन पश्वादि तिर्यक्-नरक इत्यादि लक्षण—लोकांत प्रवेश करितात. १० —याप्रमाणें केवल कर्मठाना मिळणारें फल सांगून आतां सगुण ब्रह्माच्या उपासनेसह आश्रम कर्म करणारांना मिळणारें संसारविषयक फलच सांगतात—

तपःश्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो
भैक्ष्यचर्यां चरन्तः । सूर्यद्वारेण ते विरजाः
प्रयान्ति यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा ॥ ११

अन्वयार्थ—[ये अरण्ये तपःश्रद्धे उपवसन्ति—] जे यांहून विपरीत असलेले ज्ञानयुक्त वानप्रस्थ व संन्यासी अरण्यात राहून तप ह्मणजे स्वाश्रमविहित कर्म व श्रद्धा—हिरण्यगर्भादि देवताविषय विद्या—उपासना, यांचें सेवन करितात; [शान्ताः विद्वांसः भैक्ष्यचर्यां चरन्तः—] जे शांत म्हणजे ज्यांचा इंद्रियसंघ उपरत झाला आहे असे आहेत, आणि जे ज्ञानप्रधान गृहस्थ परिग्रहाचा त्याग केल्यामुळें भिक्षाचरण करून अरण्यांत राहतात [ते विरजाः सूर्यद्वारेण—] ते ज्यांचें पुण्य-पाप कर्म क्षीण झालें आहे, असे होत्साते सूर्यद्वारानें म्हणजे सूर्योपलक्षित उत्तरायण मार्गानें [यत्र सः अव्ययात्मा हि अमृतः पुरुषः तत्र प्रयान्ति—] ज्या सत्य लोकादिकांमध्ये तो अव्ययस्वभाव—संसार असे पर्यंत राहणारा—अमृत, हिरण्यगर्भाख्य, प्रथम प्रकट झालेला पुरुष असतो तेथें जातात. अपर विद्येच्या योगानें प्राप्त होणाऱ्या संसारगती येथवरच आहेत. (येथील अरण्य ह्मणजे स्त्रीजनांनीं व्याप्त नसलेला देश. येथील फल मोक्ष नव्हे, तर ब्रह्मलोकप्राप्ति आहे, याविषयी अधिक सोपपत्तिक विवेचन भाष्यार्थांत पहा.)११. —आतां या साध्य-साधनरूप सर्व संसाराविषयी विरक्त झालेल्या पुरुषाचाच परा विद्येमध्यें अधिकार आहे, हें प्रदर्शित करण्यासाठीं असें सांगितलें जातें—

परीक्ष्य लोकान्कर्मचितान्ब्राह्मणो निर्वेदमा-
यान्नास्त्यकृतः कृतेन । तद्विज्ञानार्थं स गुरुमे-
वाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥१२

अन्वयार्थ—[कर्मचितान् लोकान् परीक्ष्य—] धर्माधर्मरूप कर्मांमुळें झालेल्या लोकांचें परीक्षण करून [ब्राह्मणः निर्वेदं आयात्—] ब्राह्मणानें निर्वेदास

म्ह० वैराग्यास प्राप्त व्हावें. [अकृतः न अस्ति–] या संसारांत अकृत–नित्य पदार्थ नाहीं. [कृतेन किं–] तेव्हां मला कर्मानें काय करावयाचें आहे ? (असें म्हणून [समित्पाणिः सः तत्-विज्ञानार्थं श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं गुरुं एव अभिगच्छेत्–] हातांत समिधा घेऊन नित्यपदाच्या साक्षात्काराकरितां त्यानें श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरूपाशींच जावें. (कर्मानें संपादन केलेलीं सर्व फळें अनित्य आहेत, असा निश्चय करून ब्राह्मणानें त्यांविषयी विरक्त व्हावें. या संसारांत अकृत म्ह० नित्य–कर्मानें संपादन न केलेला असा एकहि पदार्थ नाही. संसारांतील सर्व फलें कर्मकृत आहेत. त्यामुळें तीं अनित्य आहेत. मला नित्य, अमृत, अभय, कूटस्थ आत्मतत्त्वाची इच्छा आहे. तेव्हां ज्यांत अतिशय क्लेश आहेत व जीं परिणामीहि दुःखाचीच निमित्तें होणार त्या कर्मांचा मला काय उपयोग, असें म्हणून ब्राह्मणानें त्यांविषयी विरक्त व्हावें आणि अभय, नित्य, कल्याणरूप पदाच्या साक्षात्कारासाठी त्या विरक्त ब्राह्मणानें शम दम-दयादि गुणांनीं युक्त असलेल्या आचार्यालाच यथाविधि शरण जावें, शास्त्रज्ञानेंहि स्वतःच स्वतंत्रपणें ब्रह्मान्वेषण करूं नये, असा ' आचार्यालाच ' या शब्दांतील ' च-'चा ध्वन्यर्थ आहे.) १२.–याप्रमाणें शिष्य समीप आला असतां—

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक्प्रशान्तचित्ताय शमान्विताय ।
येनाक्षरं पुरुषं वेद सत्यं प्रोवाच तां तत्त्वतो ब्रह्मविद्याम् ॥ १३

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि प्रथममुण्डकं समाप्तम् ॥ १ ॥

अन्वयार्थ—[सः विद्वान्–] त्या विद्वान्–ब्रह्मज्ञ गुरूनें [सम्यक् उपसन्नाय तस्मै–] यथाशास्त्र समीप आलेल्या त्या[प्रशान्तचित्ताय शमान्विताय–] दर्पादि दोषरहित व शान्तियुक्त शिष्याला [येन–] ज्या विज्ञानानें–जिच्या योगानें तो[अक्षरं सत्यं पुरुषं वेद–] अक्षर व नित्य पुरुषाला जाणेल [तां ब्रह्मविद्यां तत्त्वतः प्रोवाच–] ती ब्रह्मविद्या तत्त्वतः सांगावी. (यथाशास्त्र व यथान्याय शरण आलेल्या शिष्याचा संसारमहासागरांतून उद्धार करणें,हें आचार्याचें कर्तव्य आहे.)१२.१.२

अथ द्वितीयं मुण्डकं

अपर विद्येचें सर्व कार्य सांगितलें. संसार हेंच तें सर्व कार्य आहे. पण त्याचें जे सार आहे, ज्या मूलभूत अक्षरापासून तो—संसार संभवतो व ज्यांत लीन होतो तें पुरुषसंज्ञक सत्य आहे. त्याचें ज्ञान झाल्यानें हें सर्व ज्ञात होतें. पर ब्रह्मविद्येचा तोच विषय आहे. त्याचें निरूपण करण्यासाठी या पुढील ग्रंथ आरंभिला जातो—

तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिङ्गाः
सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाऽक्षराद्विविधाः
सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवापियन्ति ॥ १

अन्वयार्थ—[तत् एतत् सत्य—] तें हें सत्य आहे. [यथा सुदीप्तात् पावकात् सरूपा विस्फुलिंगाः सहस्रशः प्रभवन्ते—] ज्याप्रमाणें अत्यंत दीप्त अग्नीपासून त्याच स्वरूपाचे विस्फुलिंग सहस्रशः उत्पन्न होतात, [तथा सोम्य—] त्याचप्रमाणें हे प्रिय शिष्या, [अक्षरात् विविधाः भावाः प्रजायन्ते—] अक्षरापासून विविध भाव उत्पन्न होतात व [तत्र च एव आपियन्ति—] ते सर्व त्यांतच जाऊन मिळतात. नाम व रूप यांच्या बीजभूत, अव्याकृतसंज्ञक, आपल्या विकाराच्या अपेक्षेनें पर असलेल्या अक्षरापर, संघीपाधिभेदरहित अक्षराचें स्वरूप सामान्याच्या दृष्टीनें हा मंत्र सांगतो—

दिव्यो ह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यन्तरो ह्यजः ।
अप्राणो ह्यमनाः शुभ्रो ह्यक्षरात्परतः परः ॥ २

अन्वयार्थ—[दिव्यः—] स्वयंज्योतिःस्वरूपत्वामुळें द्योतनवान्, किंवा स्वात्म्यामध्यें होणारा किंवा अलौकिक; कारण—[अमूर्तः—] सर्व मूर्तिशून्य—निराकार [पुरुषः—] पूर्ण किंवा शरीररूप पुरांत शयन करणारा [सबाह्याभ्यन्तरः—] बाह्य व आभ्यन्तर यांनाही जो असतो तो सबाह्याभ्यन्तर, अन्तर्बाह्य व्यापून राहणारा, [अजः—] स्वाभाविक किंवा आगंतुक जन्मनिमित्तांचा अभाव असल्यामुळें उत्पन्न न होणारा, देहादि उपाधिवशात् सप्राण, समन, सेंद्रिय, सविषय असल्याप्रमाणें जरी भासत असला तरी स्वभावतः [अप्राणः—] अनेक क्रियाशक्तियुक्त चलनात्मक वायु ज्याच्यामध्यें नाही, असा [अमनाः—]

अनेक ज्ञानशक्तियुक्त संकल्पात्मक मनहि ज्याच्यामध्यें विद्यमान नसतें, असा [हि शुभ्रः—] ज्याअर्थीं ज्ञान-क्रिया-उपाधिद्वयशून्य आहे त्याअर्थीं शुद्ध व [परतः अक्षरात् परः—] पर—आपल्या विकाराच्या अपेक्षेनें पर असलेल्या अक्षरसंज्ञक अव्यक्ताहून पर—निरुपाधिक अक्षर आहे (गी. भा.अ.१५-१६ पृ. १०४४ पहा.) २.—पण त्या परात्पर अक्षराचे ठिकाणी प्राणादिक कसे नसतात तें हा मंत्र सांगतो—

एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च ।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥ ३

अन्वयार्थ—[एतस्मात् प्राणः जायते—] या पुरुषापासून प्राण उत्पन्न होतो [मनः सर्वेन्द्रियाणि च खं वायुः ज्योतिः आपः विश्वस्य धारिणी पृथिवी—] मन, सर्व इन्द्रियें, आकाश, वायु, ज्योति, आप व सर्व चराचराला धारण करणारी पृथ्वी उत्पन्न होते. सु.ब्र. पृ. २०८,२३२.२४६. पहा. ३.

अग्निर्मूर्धा चक्षुषी चन्द्रसूर्यौ दिशः श्रोत्रे वाग्वि-
वृताश्च वेदाः । वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य
पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतान्तरात्मा ॥ ४

अन्वयार्थ—[अग्निः मूर्धा—] अग्नि म्हणजे द्युलोक, हा ज्याचा मूर्धा—मस्तक आहे, [चन्द्रसूर्यौ चक्षुषी—] चंद्र व सूर्य नेत्र आहेत, [दिशः श्रोत्रे—] दिशा श्रोत्रेंद्रिय आहे, [विवृताः वेदाः च वाक्—] प्रसिद्ध वेद हीच वाक् आहे, [वायुः प्राणः—] वायु प्राण आहे, [विश्वं अस्य हृदयं—] सर्व जगत् याचें हृदय आहे, आणि [पद्भ्यां पृथिवी—] ज्याच्या पायापासून पृथिवी झाली आहे, [हि एषः सर्वभूतान्तरात्मा—] विष्णु, अनंत, प्रथमशरीरी, त्रैलोक्य ही ज्याची उपाधि आहे तो हा देव सर्व भूताचा अन्तरात्मा आहे. तोच सर्व भूतांमध्यें द्रष्टा, श्रोता, मन्ता, विज्ञाता, सर्वकारणात्मा आहे. ४.—पंचाग्निद्वारा ज्या प्रजा संसार करितात त्याहि त्याच पुरुषापासून उत्पन्न होतात असें सांगितलें जातें—

तस्मादग्निः समिधो यस्य सूर्यः सोमात्पर्जन्य
ओषधयः पृथिव्याम् । पुमान्रेतः सिञ्चति
योषितायां बह्वीः प्रजाः पुरुषात्संप्रसूताः ॥ ५

अन्वयार्थ—[तस्मात्—] त्या पुरुषापासून [सूर्यः यस्य समिधः सः अग्निः—] सूर्य ह्या ज्याच्या समिधा आहेत असा अग्नि झाला; [सोमात् पर्जन्यः पृथिव्यां ओषधयः—] सोमापासून पर्जन्य व पर्जन्यापासून पृथ्वीत ओषधी झाल्या. [पुमान् रेतः योषितायां सिंचति—] पुरुष त्या ओषधींपासून झालेलें रेत स्त्रीमध्यें सिंचितो. [बह्वीः प्रजाः पुरुषात् संप्रसूताः—]अशा रीतीनें पुष्कळ प्रजा—शरीरें परमात्म्यापासून उत्पन्न झाली आहेत. (पंचाग्निविद्येचें वर्णन छां.अ.५.बृ.अ. ६.भाष्यार्थ व विशेषतः सु.ब्र.अ.३पा'१अ.१-२ पृ.२५२. यांत पहा.) ५. —कर्माचीं साधनें व फलेंहि त्याच्यापासूनच झाली, असें आतां हा मंत्र सांगतो—

तस्मादृचः साम यजूंषि दीक्षा यज्ञाश्च सर्वे क्रतवो दक्षिणाश्च ।
संवत्सरश्च यजमानश्च लोकाः सोमो यत्र पवते यत्र सूर्यः ॥ ६

अन्वयार्थ—[तस्मात् ऋचः०—] त्याच्यापासून ऋचा, साम, यजुर्षे, दीक्षा, [सर्वे यज्ञाः च क्रतवः च दक्षिणाः—] सर्व अग्निहोत्रादि यज्ञ, यूपसहित क्रतु, दक्षिणा, [संवत्सरः च यजमानः च यत्र सोमः पवते यत्र सूर्यः ते लोकाः—] काल, कर्ता, व ज्यांत चंद्र लोकाना पवित्र करतो व सूर्य तप्त करतो ते लोक झाले. ६.

तस्माच्च देवा बहुधा संप्रसूताः साध्या मनुष्याः पशवो वयांसि ।
प्राणापानौ व्रीहियवौ तपश्च श्रद्धा सत्यं ब्रह्मचर्यं विधिश्च ॥ ७

अन्वयार्थ—[तस्मात् च देवाः बहुधा संप्रसूताः—] पुरुषापासून कर्मांग भूत देव अनेकधा उत्पन्न झाले आहेत. [साध्याः०—] साध्य, मनुष्य, पशू, पक्षी, प्राणापान, व्रीहि-यवादि हविर्द्रव्यें, तप, श्रद्धा, सत्य, ब्रह्मचर्य व विधि हीं सर्व उत्पन्न झालीं. ७.

सप्त प्राणाः प्रभवन्ति तस्मात्सप्तार्चिषः समिधः
सप्त होमाः । सप्त इमे लोका येषु चरन्ति प्राणा
गुहाशया निहिताः सप्त सप्त ॥ ८

अन्वयार्थ—[सप्त प्राणाः तस्मात् प्रभवन्ति—] मस्तकांतील सात प्राण त्याच पुरुषापासून उत्पन्न होतात. [सप्त अर्चिषः—] त्यांच्या सात ज्वाला म्ह० आपापला विषय व्यक्त करणाऱ्या शक्ती, [सप्त समिधः—] सात विषयरूप समिधा, [सप्त होमाः—] सात विषयसाक्षात्काररूप होम, [येषु प्राणाः चरन्ति

ते इमे सप्त लोकाः—] तसेच ज्यांत प्राण संचार करितात असे हे सात इंद्रियरूप लोक; इत्यादि सर्व त्या पुरुषापासून झालें आहे. [गुहाशयाः सप्त सप्त निहिताः—] विधात्यानें असे हे शरीरांत किंवा निद्रासमयीं हृदयांत शयन करणारे प्राण प्रत्येक प्राण्यांत सात सात स्थापिले आहेत. सु. ब्र. २. ४. २ पृ. २३४. पहा. ८.

अतः समुद्रा गिरयश्च सर्वेऽस्मात्स्यन्दन्ते सिन्धवः सर्वरूपाः ।
अतश्च सर्वा ओषधयो रसश्च येनैष भूतैस्तिष्ठते ह्यन्तरात्मा ॥ ९

अन्वयार्थ—[अतः सर्वे समुद्राः च गिरयः—] या पुरुषापासून सर्व समुद्र व पर्वत उत्पन्न होतात. [अस्मात् सर्वरूपाः सिन्धवः स्यन्दन्ते—] यापासूनच बहुरूप नद्या स्रवतात. [अतः च सर्वाः ओषधयः रसः च—] याच्यापासूनच व्रीहि-यवादि सर्व ओषधी व मधुरादि रस होतात. [येन भूतैः एषः हि अन्तरात्मा तिष्ठते—] या रसाच्या योगानें पंच स्थूल भूतांनी परिवेष्टित झालेला अन्तरात्मा—लिंगशरीर—राहतो. ९.—याप्रमाणें पुरुषापासून हें सर्व उत्पन्न झालें आहे, यास्तव केवल वाणीनें बोलतां येण्यासारखा व म्हणूनच शब्दमात्र असलेला विकार मिथ्या आहे. पुरुष मात्र सत्य आहे. म्हणून—

पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रह्म परामृतम् । एतद्यो वेद
निहितं गुहायां सोऽविद्याग्रन्थिं विकिरतीह सोम्य ॥१०

इत्यथर्ववेदीयमुण्डकोपनिषदि द्वितीयमुण्डके प्रथमः खंडः ॥ १ ॥

अन्वयार्थ—[पुरुषः एव इदं विश्वं—] पुरुषच हें सर्व विश्व आहे, विश्व म्हणून पुरुषाहून पृथक् कांही नाही. यास्तव 'हे भगवन्, कोणाचें ज्ञान झालें असतां हें सर्व विज्ञात होतें ?' असें जें वर विचारलें होतें त्याचें हें उत्तर सांगितलें आहे. याच सर्व कारणभूत परमात्म्याला—पुरुषाला साक्षात् जाणलें असतां पुरुषच हें सर्व विश्व आहे, त्याहून अन्य कांहीं नाही, अस विज्ञात होतें. पण 'विश्व' असें कोणाला म्हटलें जातें, तें सांगतों—[कर्म—] अग्निहोत्रादिलक्षण कर्म, [तपः—] तप—ज्ञान, त्यामुळें प्राप्त होणारें फल आणि अशाच प्रकारचें दुसरेंहि सर्व हें विश्व होय. [ब्रह्म परामृतं—] तें ब्रह्माचें कार्य आहे. तस्मात् सर्व ब्रह्म—परम अमृत आहे व तें परम अमृत मीच आहें. [गुहायां निहितं एतत् यः वेद—] सर्व प्राण्यांच्या हृदयरूप गुहेमध्ये स्थित असलेल्या या ब्रह्माला जो जाणतो [सः अविद्याग्रंथिं—] तो अशा विज्ञानामुळें

अविद्याग्रंथीस म्हणजे ग्रंथीप्रमाणें दृढ झालेल्या अविद्यावासनेस [इह–] या लोकीं जिवंत असतांनाच, मेल्यावर नव्हे, [सोम्य–] हे प्रियदर्शन शौनका, [विकिरति–] नष्ट करून सोडतो. (हें सर्व परमात्म्यापासून होतें. यास्तव परमात्ममात्र असलेलें हें सर्व त्याच्या विज्ञानानें विज्ञात होतें. अविद्याक्षयरूप फल सांगून, येथें वरील प्रश्नाच्या उत्तराचा उपसंहार केला आहे.) १०.(२.१).

–अरूप सत् अक्षराला कोणत्या प्रकारें जाणावें, तें सांगितलें जातें––

आविः संनिहितं गुहाचरं नाम महत्पदमत्रैत-
त्समर्पितम् । एजत्प्राणन्निमिषच्च यदेतज्जानथ
सदसद्वरेण्यं परं विज्ञानाद्यद्वरिष्ठं प्रजानाम् ॥१

अन्वयार्थ––[आविः–] प्रकाश व [संनिहितं–] समीप स्थित. वागादि उपाधींनीं तें दीप्त होतें, प्रकाशमान होतें, अशी दुसरी श्रुति असल्यामुळें शब्दादिकांस जाणत असल्यासारखें तें भासतें. तें सर्व प्राण्यांच्या हृदयांत पाहणें, ऐकणें, मनन करणें, जाणणें, इत्यादि उपाधिधर्मांनीं आविर्भूत झाल्यासारखें दिसतें. जें हें प्रकाशरूप ब्रह्म संनिहित आहे, हृदयांत चांगल्याप्रकारें स्थित आहे, तें [गुहाचरं नाम–] ' गुहाचर ' म्हणून प्रसिद्ध आहे. गुहेमध्यें संचार करतें, म्हणून गुहाचर. पाहणें, ऐकणें, इत्यादि प्रकारांनीं गुहाचर म्हणून तें प्रख्यात आहे. [महत् पदं–] तें सर्वांहून महत्त्ववान् असल्यामुळें 'महत्' व सर्व पदार्थांचें आस्पद–आधार असल्यामुळें ' पद ' आहे. कारण सर्व त्या आपल्या आस्पदास प्राप्त होतात. तें महत्पद कसें ? म्हणून विचारशील तर सांगतों– [अत्र एतत् समर्पितं–] रथचक्राच्या नाभीमध्यें अर जसे बसविलेले असतात त्याप्रमाणें या ब्रह्मामध्यें हें सर्व विश्व बसविलेलें आहे. आतां त्यांत काय काय प्रविष्ट केलें आहे, तें सांगतात–[यत् एजत्–] चलन करणारे पक्षी इत्यादि; [प्राणन्–] प्राणापानादिकांनीं युक्त असलेले मनुष्य-पशु इत्यादि; [निमिषत्–] निमिषोन्मेष–नेत्रांची उघड-झांप करणारे [च–] व निमिषादि क्रिया न करणारे आणि दुसरेंहि सर्व जगत् या ब्रह्मामध्येंच समर्पिलेलें आहे. [एतत् सत्-असत जानथ–] हे शिष्यांनो, ह्या सर्वांचें जें आस्पद आहे तेंच तुमचें आत्मभूत सदसत्स्वरूप आहे, असें जाणा. कारण सत्-असत् म्हणजे मूर्ता-

मूर्त–व्यक्ताव्यक्त–स्थूल-सूक्ष्म पदार्थांचा त्या तत्त्वाहून पृथक्पणानें अभाव आहे. म्हणजे स्थूल-सूक्ष्म भूतें त्या तत्त्वाहून पृथक् नाहींत. तसेंच तें नित्यत्वामुळें [वरेण्यं–] म्हणजे सर्वांना वरण्यास–प्रार्थना करण्यास योग्य आहे. [यत् प्रजानां विज्ञानात् परं–] जें सामान्य प्रजाजनांच्या विज्ञानाहून अगदीं दूर आहे. तें लौकिकविज्ञानाचा विषय होत नाहीं, असा याचा इत्यर्थ. तसेंच तें [वरिष्ठं–] वरिष्ठ आहे. वरिष्ठ म्हणजे अतिशय श्रेष्ठ. सर्व उत्तम पदार्थांमध्यें तेंच एक ब्रह्म सर्वदोषरहित असल्यामुळें अतिशय श्रेष्ठ आहे. १.–तसेंच—

यदर्चिमद्यदणुभ्योऽणु च यस्मिँल्लोका निहिता लोकिनश्च । तदेतदक्षरं ब्रह्म स प्राणस्तदु वाङ्मनः । तदेतत्सत्यं तदमृतं तद्वेद्धव्यं सोम्य विद्धि ॥ २

अन्वयार्थ—[यत् अर्चिमत्–] जें दीप्तियुक्त आहे, [यत् अणुभ्यः अणु च–] जें अणु–सूक्ष्म पदार्थांहून अणु–सूक्ष्म आहे [च यस्मिन् लोकाः निहिताः लोकिनः च–] व ज्याच्यामध्यें भूरादि लोक व त्या लोकांत राहणारे मनुष्यादि प्राणी स्थित आहेत [तत् एतत् अक्षरं ब्रह्म–] तें हें अक्षर ब्रह्म आहे. [सः प्राणः–] तोच प्राण आहे, [तत् उ वाक्-मनः–] तेंच वाणी व मन आहे. [तत् एतत् सत्यं–] तेंच हें सत्य [तत् अमृतं–] तेंच अमृत आहे. [सोम्य तत् वेद्धव्यं–] हे शिष्या, त्याला वेध करावा –मनानें ताडन करावें. [विद्धि–] त्याला तूं वेध कर–अक्षर ब्रह्मामध्यें चित्ताचें समाधान कर. २.–त्या अक्षराला वेध कसा करावा तें या मंत्रांत सांगितलें आहे—

धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासानिशितं संधयीत । आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षरं सोम्य विद्धि ॥ ३

अन्वयार्थ—[औपनिषदं महास्त्रं धनुः गृहीत्वा–] उपनिषदांतील महास्त्ररूप धनुष्य घेऊन [उपासानिशितं शरं हि संधयीत–] उपासनेनें तीक्ष्ण केलेला –सतत ध्यानानें संस्कारयुक्त केलेला शर त्याला जोडावा [आयम्य–]नंतर त्याची प्रत्यंचा ओढून [सोम्य तद्भावगतेन चेतसा तत् एव अक्षरं लक्ष्यं विद्धि–] हे प्रियदर्शन शिष्या, ब्रह्मविषयक भावनायुक्त चित्तानें त्याच अक्षररूप लक्ष्याला वेध कर (धनुष्याची दोरी जशी ओढतात त्याप्रमाणें इंद्रियांसह अन्तःकरणाला

विषयांपासून परावृत्त करावें व त्याला अक्षर ब्रह्मांत तन्मय करून सोडावें. १२. –वर सांगितलेलें धनुष्यादि काय आहे, तें या मंत्रांत सांगितलें आहे—

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ॥ ४

अन्वयार्थ—[प्रणवः धनुः–] प्रणव–ओंकार हेंच धनुष्य आहे [हि आत्मा शरः–] सोपाधिक आत्मा हा शर आहे. [ब्रह्म तल्लक्ष्यं उच्यते–] ब्रह्म हें त्याचें लक्ष्य आहे, असें म्हटलेलें आहे. [अप्रमत्तेन वेद्धव्यं–] त्याला सावधान मनानें वेध करावा [शरवत् तन्मयः भवेत्–] शराप्रमाणेंच तन्मय व्हावें. (प्रणवच ब्रह्म आहे, असें ध्यान करणाऱ्या व इंद्रियसमूहास स्ववश ठेवणाऱ्या पुरुषाला प्रणवोपरक्त चित्प्रतिबिंब स्फुरत असतें. म्हणजे त्या प्रणवानें मर्यादित झालेलें चिद्भान होत असतें. तोच आत्मा, असें अनुसंधान करणें, हेंच प्रणवाचे ठायी शरसंधान व त्या चित्प्रतिबिंबाचें बिंबाशीं ऐक्य आहे, असें अनुसंधान करणें हा लक्ष्यवेध आहे. व्यवहारांत निशाण मारणारे लोक ज्यावर नेम धरितात तें लक्ष्य होय.)४.–पण तें अक्षरच अतिशय दुर्लक्ष्य असल्यामुळें तें सुलक्ष्य होण्यासाठीं श्रुति पुनः तेंच सांगते—

यस्मिन्द्यौः पृथिवी चान्तरिक्षमोतं मनः सह
प्राणैश्च सर्वैः । तमेवैकं जानथ आत्मान-
मन्या वाचो विमुञ्चथामृतस्यैष सेतुः ॥ ५

अन्वयार्थ—[यस्मिन् द्यौः पृथिवी च अन्तरिक्षं ओतं–] ज्या अक्षर पुरुषामध्यें स्वर्गलोक, पृथिवी, व अंतरिक्ष समर्पण केलेलें आहे [च सर्वैः प्राणैः सह मनः–] व इतर सर्व इंद्रियांसह मनहि त्यांतच समर्पिलेलें आहे [तं एव एकं आत्मानं जानथ–] त्याच एका–अद्वितीय सर्वाश्रय आत्म्याला जाणा. हे शिष्यांनों, तुमच्या व इतर सर्व प्राण्यांच्या प्रत्यगात्म्यास जाणून [अन्याः वाचः विमुंचथ–] अपर विद्यारूप अन्य वाणी सोडा व त्या वाणीनें प्रकाशित होणारें साधनासह सर्व कर्महि सोडा. कारण [एषः अमृतस्य सेतुः–] हा अमृताचा सेतु आहे. हें आत्मज्ञान अमृतत्वाचा–म्हणजे मोक्षाच्या प्राप्तीकरितां लौकिक सेतूसारखा सेतु आहे. कारण त्याचें ज्ञान संसारमहासाग-

रांतून तरून जाण्याचें, पार होण्याचें सेतूप्रमाणें निमित्त होत असतें. ५. सु. ब्र. १. ३. १. पृ. ६५ पहा. ५.—तसेंच—

अरा इव रथनाभौ संहता यत्र नाड्यः स एषोऽ-
न्तश्चरते बहुधा जायमानः । ओमित्येवं ध्यायथ
आत्मानं स्वस्ति वः पराय तमसः परस्तात् ॥ ६

अन्वयार्थ—[रथनाभौ अराः इव–] रथचक्राच्या नाभीमध्यें अर जसे शिरकविलेले असतात त्याप्रमाणें [यत्र नाड्यः संहताः–] ज्या हृदयामध्यें सर्वतः देहास व्यापणाऱ्या नाड्या शिरकविलेल्या असतात त्या हृदयामध्यें [सः एषः अन्तः चरते–] तो बुद्धिप्रत्ययसाक्षी प्रकृत आत्मा आंतल्या आंत संचार करतो. [बहुधा जायमानः–] तो पहात, ऐकत, मनन करीत व विशेषतः जाणत राहतो. तो अंतःकरणरूपी उपाधीच्या मागोमाग तिच्या सारखा होणारा असल्यामुळें क्रोध-हर्ष इत्यादि प्रत्ययांनी जणुं काय क्षणोक्षणीं उत्पन्नच होतो, असा भास होतो. म्हणून सामान्य जन 'तो हृष्ट झाला, आतां तो क्रुद्ध झाला' असें म्हणतात. [आत्मानं 'ओं' इति-एवं ध्यायथ–] त्या आत्म्याचें 'ओं' अशा प्रकारें, ओंकाराचा आधार धरून पूर्वोक्तप्रकारें ध्यान करा. त्याचें ओंकाराच्या द्वारा चिंतन करा. विद्वान् आचार्यानें शिष्यांस जें अवश्य सांगण्या-सारखें होतें तें सांगितलें व शिष्यहि ब्रह्मविद्येला जाणण्याची इच्छा करणारे असल्यामुळें कर्मांपासून निवृत्त होऊन मोक्षमार्गांत प्रवृत्त झाले. आतां आचार्य त्यांना निर्विघ्नपणें ब्रह्मप्राप्ति व्हावी असा आशीर्वाद देतात [वः तमसः परस्तात् पराय स्वस्ति–] तुम्हांला अविद्या तमाच्या पलीकडे असलेल्या पर तीरास जात असतांना कांहीं विघ्न न येवो. तुम्ही निर्विघ्नपणें परतीरास जा. ६.—हा जो अविद्यातमाच्या पलीकडे असलेला व संसारमहासागराचें उल्लंघन करून जाण्यास योग्य, असा परविद्येचा प्रदेश तो कोठेंसा आहे, तें हा मंत्र सांगतो—

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्यैष महिमा भुवि दिव्ये ब्रह्मपुरे
ह्येष व्योम्न्यात्मा प्रतिष्ठितः । मनोमयः प्राणशरीर-
नेता प्रतिष्ठितोऽन्ने हृदयं संनिधाय तद्विज्ञानेन परि-
पश्यन्ति धीरा आनन्दरूपममृतं यद्विभाति ॥ ७

अन्वयार्थ—[यः सर्वज्ञः सर्ववि ् –] जो सामान्यतः सर्व जाणतो व विशेषतः सर्व जाणतो; [भुवि यस्य एषः महिमा–] भूलोकीं ज्याचा हा महिमा आहे [एषः आत्मा हि दिव्ये ब्रह्मपुरे व्योम्नि प्रतिष्ठितः–] तो आत्मा दिव्य ब्रह्मपुरांतील म्हणजे प्रकाशमय हृदयकमलांतील आकाशांत प्रतिष्ठित आहे. [मनोमयः–] तो मनोमय–मनोवृत्तींच्या योगानेंच अनुभवास येणारा, [प्राण-शरीरनेता–] प्राण व शरीर यांचा नेता–एका स्थूलशरीरांतून दुसऱ्या स्थूल-शरीरांत नेणारा [अन्ने हृदयं संनिधाय प्रतिष्ठितः–] पिण्डाकार अन्नांत बुद्धीची संस्थापना करून राहिला आहे. [यत् आनंदरूपं अमृतं विभाति तत् धीराः विज्ञानेन परिपश्यन्ति–] जें आनंदरूप अमृत विशेषतः भासतें तें आत्मतत्त्व-विवेकी विज्ञानानें सर्वतः पूर्ण पाहतात. ७.–आतां परमात्मज्ञानाचं फल सांगितलें जातें—

भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ ८

अन्वयार्थ—[तस्मिन् परावरे दृष्टे–] त्या परावर परब्रह्माला–पृ. १४२–पाहिलें असतां [हृदयग्रंथेः भिद्यते–] हृदयग्रंथि भेद पावते. हृदयग्रंथि म्हणजे अविद्यावासनाप्रचय–अविद्येमुळें उद्भवलेल्या अनेक वासनांचा समुदाय, बुद्धीचा आश्रय करून राहणारा काम.–सु. का. उ. २.३पृ.७९.–पहा. [सर्वसंशयाः छिद्यन्ते–] सामान्य लोकांच्या मनांत मरेपर्यंत गंगेच्या प्रवाहाप्रमाणें एक-सारखे राहणारे ज्ञेयाविषयीचे सर्व संशय तुटतात. [अस्य कर्माणि च क्षीयन्ते–] या संशयरहित ज्ञानी पुरुषाचीं संचित-क्रियमाण कर्में क्षीण होतात. (प्रारब्ध कर्मांचा मात्र ज्ञानानें क्षय होत नाहीं. तो भोगानेंच होतो. सर्वज्ञ, असंसारी कारणरूपानें पर व कार्यरूपानें अपर अशा परब्रह्माला 'तेंच मी' असें साक्षात् जाणलें असतां संसाराच्या कारणाचाच उच्छेद होत असल्यामुळें तो मुक्त होतो, असा याचा भावार्थ. सु. ब्र. पृ. ४४३ पहा.) ८.–उक्तार्थाचाच संक्षेपतः अनुवाद करणारे हे पुढील तीन मंत्र आहेत—

हिरण्मये परे कोशे विरजं ब्रह्म निष्कलम् ।
तच्छुभ्रं ज्योतिषां ज्योतिस्तद्यदात्मविदो विदुः ॥ ९

अन्वयार्थ—[हिरण्मये परे कोशे–] ज्योतिर्मय श्रेष्ठ कोशांत [विरजं निष्कलं ब्रह्म–] अविद्यादिदोषरहित व निरवयव ब्रह्म आहे. [तत् शुभ्रं–] तें निर्दोष व निरवयव असल्यामुळेंच शुभ्र आहे. [ज्योतिषां ज्योतिः–] सर्व ज्योतींची ज्योति [तत् यत् आत्मविदः विदुः–] असें जें ब्रह्म त्याला आत्मानुभवी जाणतात. (बुद्धिविज्ञानप्रकाश हाच कोश, तो आत्मस्वरूपाच्या उपलब्धीचें स्थान असल्यामुळें व सर्वांच्या अभ्यन्तरीं असल्यामुळें 'पर' आहे. त्या परकोशांत अविद्यादि सर्व दोषरहित व निरवयव ब्रह्म आहे. त्यामुळेंच तें शुद्ध, अग्न्यादिकांचेंहि अवभासक आहे. अर्थात अग्न्यादिकांचें प्रकाशरूपत्व त्यांतील चैतन्यज्योतीच्या निमित्तानेंच आहे. ज्याअर्थी ब्रह्म असें परं ज्योति आहे त्याअर्थी आत्मानुभवाचें अनुसरण करणारेच त्याला जाणतात. बाह्य विषयानुभवाचें अनुसरण करणारे इतर बहिर्मुख जन त्याला जाणत नाहींत.)९. –ब्रह्म ज्योतींची ज्योति कसें, तें पुढील मंत्र सांगतो––

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो
भान्ति कुतोऽयमग्निः । तमेव भान्तमनुभाति
सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ १०

अन्वयार्थ—[तत्र सूर्यः न भाति–] त्या स्वात्मभूत ब्रह्माच्या ठिकाणीं सूर्य प्रकाशमान होत नाही–त्याला प्रकाशित करीत नाहीं. [न चन्द्रतारकं–] चंद्र व तारा प्रकाशमान होत नाहीत, [इमाः विद्युतः न भान्ति–] या विजा प्रकाशमान होत नाहींत, [अयं अग्निः कुतः–] मग हा अग्नि कोठून प्रकाशमान होणार ? [सर्वं तं एव भान्तं अनुभाति–] हें सर्व स्वयं प्रकाशमान होणाऱ्या त्या परमेश्वराच्याच मागून प्रकाशमान होतें. [तस्य भासा इदं सर्वं विभाति–] त्याच्या प्रकाशानें हें सर्व प्रकाशमान होतें. (ज्याप्रमाणें जल, कोलीत इत्यादि अग्निसंयोगामुळें, अग्नि जाळूं लागला असतां त्याच्या मागून आपणहि जाळूं लागतें पण स्वतः जाळीत नाहीं, त्याप्रमाणें त्या अक्षर ब्रह्माच्या प्रकाशानें–दीप्तीनें हें सर्व सूर्यादि जगत् विशेषप्रकारें प्रकाशमान होतें; आणि ज्याअर्थी अशारीतीनें तें ब्रह्मच स्वतः भासतें व कार्यरूप जगांतील नानाप्रकारच्या दीप्तीनेंहि विशेषप्रकारें भासतें त्याअर्थी ब्रह्माचें प्रकाशरूपत्व स्वाभाविक आहे. सु.ब्र. १.३. ६.पृ.८२पहा.)१०.–ज्योतींची ज्योति असें जें ब्रह्म तेंच सत्य व त्याचा दुसरा सर्व

विकार केवळ वाणीनें बोलण्या पुरताच, शब्दमात्र आणि त्यामुळेंच अनृत–मिथ्या, हा अर्थ वर विस्तरपूर्वक हेतु देऊन प्रतिपादिला आहे. आतां पुनः या निगमनाच्या स्थानीं असलेल्या मंत्रानें त्याच प्रतिपादित अर्थाचा उपसंहार केला जातो.

ब्रह्मैवेदममृतं पुरस्ताद्ब्रह्म पश्चाद्ब्रह्म दक्षिणतश्चोत्तरेण ।
अधश्चोर्ध्वं च प्रसृतं ब्रह्मैवेदं विश्वमिदं वरिष्ठम् ॥ ११
इति द्वितीयं मुण्डकं समाप्तम् ॥ २ ॥

अन्वयार्थ––[इदं अमृतं ब्रह्म एव पुरस्तात्–] हें पूर्वोक्त अमृत ब्रह्मच पुढें भासत आहे. [ब्रह्म पश्चात्–] ब्रह्मच मागें, [ब्रह्म दक्षिणतः–] ब्रह्मच उजव्या हातास, [च उत्तरेण–] डाव्या हातास, [अधः च ऊर्ध्वं च प्रसृतं–] खालीं व वर पसरलेलें आहे. [इदं विश्वं इदं वरिष्ठं ब्रह्म एव–] हें सर्व जगत् हें वरिष्ठ ब्रह्मच आहे. (अविद्यादृष्टि पुरुषांच्या अग्रभागीं भासमान होणारें हें सर्व ब्रह्मच आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या मागच्या बाजूस भासणारेंहि ब्रह्मच. तसेंच उजव्या व डाव्या बाजूस, अधोभागी व ऊर्ध्वभागी भासणारें, तात्पर्य सर्वतः कार्याच्या आकारानें पसरलेलें व अब्रह्मसें, परिच्छिन्नसें झालेलें हें सर्व नाम-रूपयुक्त पदार्थजात ब्रह्मच आहे. फार काय सांगावें, पण हें समस्त विश्व ब्रह्मच आहे. हें सर्व जगत् अति श्रेष्ठ ब्रह्मच.) ११. (२. २.)

जिच्या योगानें तें सत्य पुरुषसंज्ञक अक्षर जाणलें जातें ती परा विद्या सांगितली. त्या सत्य तत्त्वाचा अधिगम–ज्ञान–साक्षात्कार झाला असतां हृदयग्रंथी इत्यादि संसारकारणाचा आत्यंतिक–सकारण विनाश होतो. त्याच्या अधिगमाचा उपाय–योग, धनुष्यादिकांचें ग्रहण करणें, या कल्पनेनें सांगितला. योग हा त्याच्या ज्ञानाचा उपाय आहे व त्याचेंच प्रतिपादन वर–पृ.१४७-४८.– केलें आहे. आतां त्या योगाचीं सत्यादि सहकारी साधनें सांगावीं म्हणून पुढील ग्रंथाचा आरंभ केला जातो; तत्त्वनिश्चय जरी पूर्वी केलेला असला तरी तो चित्तावर आरूढ होणें, अत्यंत कठिन असल्यामुळें या पुढील ग्रंथांत तात्पर्यतः अन्य प्रकारानें तो करावयाचा आहे.पण आतां अगोदर परमार्थ वस्तूच्या निश्चयार्थ ' द्वा सुपर्णा सयुजा सखया० ' या सूत्ररूप मंत्राचा उपन्यास केला जातो––

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ॥ १

अन्वयार्थ—[द्वा सुपर्णा–] दोन सुपर्ण, ' सु ' ह्मणजे शोभन, उचित व ' पर्ण ' ह्मणजे पतन, गमन. ज्यांचें नियम्य-नियामकभावास प्राप्त होणें उचितच आहे. जीव अज्ञ असल्यामुळें ईश्वराच्या नियमनाचा विषय होतो व ईश्वर सर्वज्ञ असल्यामुळें नियामक शक्तीनें युक्त होतो. ह्मणजे एकामध्यें नियम्य होण्याची योग्यता व दुसऱ्यामध्यें नियामक होण्याची योग्यता असणें, हें त्यांचें शोभनत्व–उचितत्व व नियम्य-नियामकभावास प्राप्त होणें हेंच पतन होय. ' द्वौ सुपर्णौ ' याचा अर्थ असा–दोन उचित भावास प्राप्त होणारे. अथवा वृक्षाचा आश्रय करणें, फल खाणें, इत्यादि पक्ष्यांचें सामान्य–सादृश्य असल्यामुळें दोन सुपर्ण ह्मणजे दोन पक्षी, असेंच समजावें. ते दोघे [सयुजौ–] सदा एकत्र राहणारे, परस्पर संबंध ठेवणारे व [सखायौ–] ह्मणजे समान आख्यानाचे –ज्यांच्या अभिव्यक्तीचें कारण समान आहे अशा प्रकारचे ते दोन सुपर्ण [समानं वृक्षं परिषस्वजाते–] समान वृक्षास ह्मणजे त्याच–दोघांच्याहि उपलब्धीचें अधिष्ठान, अशा एकाच वृक्षास–शरीरास; नाश पावणें, हा धर्म वृक्षाप्रमाणें शरीराचे ठिकाणीहि समान असल्यामुळें येथील वृक्ष ह्मणजे शरीर. त्या एकाच वृक्षास आलिंगन देतात. त्याच्या आश्रयानें राहतात. दोन पक्ष्यांप्रमाणें फलोपभोगाकरितां शरीर या एका वृक्षाचा आश्रय करून राहतात. याच क्षेत्रसंज्ञक शरीरवृक्षाचें काठकांत –'ऊर्ध्वमूलोऽवाक्शाखः०' सु.का. २.३ पृ.७४.– व गीतेंत–'ऊर्ध्वमूलं अवःशाखं०' सु. गी. १५.१. पृ. २७७.–यांत वर्णन केलें आहे. [तयोः अन्यः स्वादु पिप्पलं अत्ति–] समान वृक्षास आलिंगन देऊन राहिलेल्या त्या दोघांपैकीं एक क्षेत्रज्ञ–लिंगोपाधि, वृक्षाचा आश्रय केलेला, स्वादु पिप्पल–गोड फल खातो कर्मामुळें निष्पन्न झालेलें सुख-दुःखलक्षण फल कीं जें अनेक विचित्र वेदना–अनुभवरूप आहे तें अविवेकानें खातो [अन्यः अनश्नन्–] आणि दुसरा नित्यशुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव सर्वज्ञ मायोपाधि ईश्वर तें खात नाहीं. [अभिचाकशीति–] भोज्य विषय व भोक्ता क्षेत्रज्ञ या दोघांना तो आपल्या केवल नित्य साक्षित्वाच्या सत्तेनें प्रेरणा करणारा आहे. तो दुसरा

पक्षी स्वतः फल न खातांच केवल पहातो मात्र. राजाप्रमाणें केवल पाहणें, हेंच त्याचें प्रेरयितृत्व आहे. सु.ब्र.पृ.५०,६६,३५०पहा.१—असें असतांना—

समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥ २

अन्वयार्थ—[समाने वृक्षे निमग्नः पुरुषः—] समान वृक्षामध्यें म्हणजे वर सांगितलेल्या शरीरामध्यें निमग्न झालेला पुरुष [अनीशया मुह्यमानः शोचति—] अनीशेनें मोहित होत्साता शोक करितो. (पुरुष म्हणजे भोक्ता, जीव कीं जो अविद्या-काम-कर्म-फलकामना इत्यादिकांच्या गुरु भारानें आक्रांत झाला आहे. मोठ्या भारानें आक्रांत झालेला भोपळा जसा समुद्राच्या जलांत बुडतो त्याप्रमाणें निमग्न म्हणजे निश्चयानें देहादिकच आत्मा आहे, या भावास, या समजुतीस प्राप्त झालेला, हा देहच मी, या अमक्याचा पुत्र, अमक्याचा नातु, कृश, स्थूल, गुणवान्, निर्गुण, सुखी, दुःखी, इत्यादि प्रत्ययानें युक्त असलेला व या देहाहून दुसरा कोणी आत्मा नाही, यास्तव तोच उत्पन्न होतो, मरतो, संबंधी जन व बांधव यांच्याशी संयुक्त व वियुक्त होतो, असें समजणारा, असा तो शरीरांत निमग्न होतो. त्यामुळें अनीशेनें म्हणजे मी कोणाचें कांहीं करण्यास समर्थ नाही; माझा पुत्र नष्ट झाला, माझी भार्या मेली, आतां माझ्या जीविताचा काय उपयोग ? अशा प्रकरचा दीनभाव हीच अनीशा, तिच्या योगानें शोक करितो.) [जुष्टं अन्यं ईशं यदा पश्यति—] पण अनेक जन्मांतील पुण्यपरिपाकामुळें अहिंसा, सत्य, शम, दम इत्यादिकांनीं युक्त होऊन अनेक योगमार्गांनीं व कर्मांनीं आराधना केलेल्या अन्य—स्वतःहून अगदी विलक्षण अशा ईश्वराला जेव्हां पाहतो [अस्य महिमानं इति—] परमेश्वरस्वरूप अशा माझी ही सर्व जगद्रूप विभूति आहे, असें जाणतो [वीतशोकः—] तेव्हां तो शोकरहित होतो. शोकसागरापासून मुक्त होतो. २- हा मंत्रहि पूर्वोक्त अर्थच सविस्तर सांगत आहे—

यदा पश्यः पश्यते रुक्मवर्णं कर्तारमीशं पुरुषं ब्रह्मयोनिम् ।
तदा विद्वान्पुण्यपापे विधूय निरञ्जनः परमं साम्यमुपैति ॥ ३

अन्वयार्थ—[यदा पश्य.—] ज्या वेळीं ' पश्य ' म्हणजे पाहणारा—विद्वान् साधक [रुक्मवर्ण—] स्वयंज्योतिः-स्वभाव अथवा रुक्माच्या म्हणजे सोन्याच्या वर्णाप्रमाणें ज्याची अविनाशी ज्योति आहे, [कर्तारं—] जो सर्व जगाचा कर्ता

व [ईशं–] ईश आहे, [पुरुषं ब्रह्मयोनिं पश्यते–] जो पुरुष ब्रह्मरूप योनि–उत्पत्ति-स्थान अथवा हिरण्यगर्भसंज्ञक अपर ब्रह्माची योनि आहे, अशा त्याला साधक जेव्हां पाहतो [तदा विद्वान् पुण्यपापे विधूय–] तेव्हां तो विद्वान् पुण्य पाप म्हणजे बंधनास कारण होणारीं शुभ व अशुभ कर्में समूळ नाहींशीं करून–जाळून, [निरंजनः–] निर्लेप–क्लेशशून्य होत्साता [परमं साम्यं उपैति–] अद्वयरूप निरतिशय साम्यास प्राप्त होतो. द्वैतविषयक साम्य या अद्वयलक्षण साम्याच्या अपेक्षेनें निकृष्ट आहे. यास्तव तो विद्वान् साधक या अद्वयलक्षण परम साम्यास प्राप्त होतो. सु. ब्र ३.३.१५. पृ. ३३४ पहा. ३.–तसेंच—

प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति विजानन्विद्वान्भवते नातिवादी ।
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥ ४

अन्वयार्थ—[यः हि एषः प्राणः–] जो हा प्राणाचा प्राण, हा प्रकृत पर ईश्वरच [सर्वभूतैः विभाति–] ब्रह्मादि-स्तंबपर्यंत सर्व भूतांच्या योगानें उपलक्षित होत्साता, सर्व भूतस्थ, सर्वात्मा होत्साता, विविध रूपानें प्रकाशमान होतो [विजानन् विद्वान् अतिवादी न भवते–] याप्रमाणें सर्व भूतांमध्यें स्थित असलेल्या त्याला जो कोणी साक्षात् आत्मभावानें 'हा मी आहें' असें केवल महावाक्याच्या अर्थाचें ज्ञान होतांच जाणतो तो अतिवादी होत नाही (आत्मतत्त्वास सोडून दुसऱ्या सर्व पदार्थांविषयीं बोलण्याचें ज्याचें शील आहे तो अतिवादी होय. पण जो अशा रीतीनें साक्षात् आत्म्याला, प्राणाच्या प्राणाला जाणतो तो अतिवादी होत नाही, असा भावार्थ. जेव्हां सर्व आत्माच आहे, दुसरें कांहीं नाहीं, असें साक्षात् अनुभवास आलें तेव्हां तो विद्वान् त्याला सोडून दुसरें काय बोलणार? ज्याला आत्म्याहून अन्य वस्तु दिसलेली असते, तो आत्म्याला सोडून बोलतो. पण हा विद्वान् तर आत्म्याहून दुसरें कांहीं पहात नाहीं, ऐकत नाहीं व जाणत नाहीं. त्यामुळें त्याला सोडून तो दुसऱ्याविषयीं बोलत नाहीं.) शिवाय [आत्मक्रीडः–] आत्मक्रीड–आत्म्याच्या ठिकाणींच ज्याचें क्रीडन असतें, पुत्र-भार्या इत्यादि अन्य पदार्थांमध्यें नसतें तो आत्मक्रीड होय. त्याचप्रमाणें [आत्मरतिः–] ज्याची आत्म्याचे ठिकाणींच रति–रमण–प्रीति आहे तो आत्मरति. क्रीडा बाह्य साधनांच्या अपेक्षेनें युक्त असते व रति म्ह० साधननिरपेक्ष, केवल बाह्य विषयप्रीति, हा या दोन शब्दांच्या

अर्थात विशेष आहे. त्याचप्रमाणें [क्रियावान्–] ज्याची ज्ञान-ध्यान-वैराग्यादि क्रिया आहे तो क्रियावान् होय. [एषः ब्रह्मविदां वरिष्ठः–] हा ब्रह्मवेत्त्यांमध्यें वरिष्ठ आहे. ४.–आतां या मंत्रांत संन्याश्याच्या निवृत्तिप्रधान व तत्त्वज्ञान-सहकारी अशा सत्यादि साधनांचें विधान केलें जातें—

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा सम्यग्ज्ञानेन
ब्रह्मचर्येण नित्यम् । अन्तःशरीरे ज्योतिर्मयो
हि शुभ्रो यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः ॥ ५

अन्वयार्थ—[एषः हि आत्मा सत्येन लभ्यः–] हा आत्मा सत्यानें–अनृत भाषणाच्या त्यागानें लभ्य–प्राप्त होण्यास योग्य आहे. [तपसा–] मन व इंद्रियें यांचें ऐकाग्र्य याच तपानें तो लभ्य आहे. हें प्रस्तुत तपच आत्म-ज्ञानाला अनुकूल आहे. त्यामुळें येथें तेंच घ्यावें. कृच्छ्र-चांद्रायणादि तप येथें विवक्षित नाहीं. [सम्यग्ज्ञानेन–] यथाभूत आत्मदर्शनानें [नित्यं ब्रह्मचर्येण–] व नित्य ब्रह्मचर्यानें–मैथुनत्यागानें तो लभ्य आहे, 'नित्य-'शब्दाचा नित्य सत्यानें, नित्य तपानें, नित्य समग्ज्ञानानें हा आत्मा लभ्य आहे, असा सर्व साधनांशीं अन्वय लावावा पण या साधनांनी लभ्य, असा हा आत्मा कोण, तें सांगतात–[अन्तःशरीरे–] शरीरामध्यें हृदयकमलांतील आकाशांत [ज्योति-र्मयः हि शुभ्रः--] हा ज्योतिर्मय शुक्लवर्णाच्या वर्णाचा व शुद्ध आत्मा आहे. [यं क्षीणदोषाः यतयः पश्यन्ति–] त्याला ज्यांचे क्रोधादि चित्तमल क्षीण झाले आहेत असे संन्याशी पाहतात–अनुभव घेतात; संन्याश्यांकडून नित्य सत्यादि साध-नांनींच तो आत्मा प्राप्त केला जातो, असा याचा भावार्थ. केव्हां केव्हां आच-रणांत आणलेल्या सत्यादिकांच्या योगानें तो प्राप्त होत नाही. सत्यादि साध-नांच्या स्तुतीकरितां हा अर्थवाद आहे. ५.

सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः ।
येनाऽऽक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥ ६

अन्वयार्थ—[सत्यं एव जयति–] सत्यवानाचाच विजय होतो [न अनृतं–] मिथ्या भाषण करणाराचा जय होत नाहीं. पुरुषाचा आश्रय न केलेल्या केवल सत्याचा व केवल असत्याचा जय किंवा पराजय संभवत नाहीं. म्हणून 'सत्यवानाचाच० ' इत्यादि अर्थ वर केला आहे. शास्त्रावरूनहि सत्याचें श्रेष्ठ

साधनत्व ज्ञात होतें असें मंत्र सांगतो–[सत्येन देवयानः पन्थाः विततः–] सत्यानें म्ह० जसें आपल्याला अवगत झालें असेल तसें बोलणें या स्वरूपाच्या सत्यानें देवयान मार्ग सतत प्रवृत झाला आहे. [येन हि यत्र तत् सत्यस्य परमं निधानं तत्र हि आप्तकामाः ऋषयः आक्रमन्ति–] ज्या उत्तरमार्गानें जेथें सत्य या उत्तम साधनाचें साध्य असें श्रेष्ठ पुरुषार्थनिधान असतें त्याचें निष्काम–विरक्त ऋषि–ज्ञानी आक्रमण करितात–त्याला जाऊन पोंचतात. तो मार्ग सत्यानें विस्तारला आहे, असा पूर्ववाक्याशी संबंध. ६–तें सत्याचें परम निधान काय व कोठें आहे, तें हा मंत्र सांगतो––

बृहच्च तद्दिव्यमचिन्त्यरूपं सूक्ष्माच्च तत्सूक्ष्मतरं विभाति ।
दूरात्सुदूरे तदिहान्तिके च पश्यत्स्विहैव निहितं गुहायाम् ॥ ७

अन्वयार्थ––[बृहत् च तत् दिव्यं अचिन्त्यरूपं–] तें तत्त्व महत् आहे, दिव्य व अचिन्त्यरूप आहे. [सूक्ष्मात् च तत् सूक्ष्मतरं विभाति–] तें सूक्ष्माहून अत्यंत सूक्ष्म आहे, असें भासतें. [दुरात् सुदूरे तत् इह अन्तिके च–] तें अति दूर प्रदेशाहून अतिदूर व विद्वानांच्या दृष्टीनें अगदी समीप आहे. [इह एव पश्यत्सु गुहायां निहितं–] येथेंच चेतनावान् जीवांमध्यें तें बुद्धिलक्षण गुहेंत स्थित आहे (महत् म्ह० सर्वतः व्याप्त, दिव्य म्ह० स्वयंप्रकाश, इंद्रियांचा विषय न होणारें म्हणून अचिंत्यरूप, आकाशादि सूक्ष्मांहून सूक्ष्म, अविद्वानांना अगम्य असल्यामुळें अतिदूर व विद्वानांचा आत्माच असल्यामुळें अगदीं समीप आहे. या पाहणाऱ्या–चेतनावान् पुरुषामध्यें तें स्थित आहे. पाहणें ऐकणें, इत्यादि क्रियांनीं युक्त अशा धर्मानें तें योग्यांकडून पाहिलें जातें. पण तें कोठें, या बुद्धिरूप गुहेंत स्थित आहे, अतिशय गूढ आहे, असें पाहिलें जातें.७. –पुढील मंत्र पुनः त्याच्या उपलब्धीचें असाधारण साधन सांगतो––

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा ।
ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः॥ ८

अन्वयार्थ––[चक्षुषा न गृह्यते–] तें रूपशून्य असल्यामुळें कोणालाहि चक्षुरिंद्रियानें त्याचें ग्रहण करितां येत नाहीं. [वाचा अपि न–] शब्दानें सांगतां येण्यासारखें नसल्यामुळें वाणीनेंहि तें ग्राह्य होत नाहीं. [अन्यैः देवैः न–] इतर इंद्रियांनींहि त्याचें ग्रहण करितां येत नाहीं. [तपसा कर्मणा वा न–]

तप सर्व प्राप्तीचें साधन असलें तरी त्या तपाच्या योगानें त्याचें ग्रहण करवत नाही. तसेंच ज्याचें महत्त्व अत्यंत प्रसिद्ध आहे अशा वैदिक अग्निहोत्रादि कर्मानेंहि तें ग्रहण केलें जात नाहीं. तर मग त्याच्या ज्ञानाचें साधन काय आहे? उत्तर–[ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वः–] सर्व प्राण्यांचें ज्ञान–बुद्धि –स्वभावतःच आत्मावबोधनास समर्थ असलें तरी बाह्य विषय-रागादि दोषांनीं कलुषित, अप्रसन्न, अशुद्ध, होत्सातें नित्य अगदीं समीप असलेल्याहि आत्म-तत्त्वास, मलानें आच्छादित झालेल्या आरशाप्रमाणें किंवा हालविलेल्या पाण्याप्रमाणें, साक्षात् दाखविण्यास समर्थ होत नाहीं, आत्मतत्त्वाचा साक्षात बोध करीत नाहीं. पण तेंच जेव्हां इंद्रियें व विषय यांच्या संसर्गामुळें होणाऱ्या रागादि मलापासून उद्भवलेलें मलिनत्व घालविल्यानें आरसा किंवा जल यांप्रमाणें प्रसन्न, स्वच्छ, शांत होऊन राहतें तेव्हां ज्ञानाचा प्रसाद होतो. त्या ज्ञानप्रसादानें ज्याचें अन्तःकरण अतिशय शुद्ध झालें आहे असा साधक ब्रह्म पाहण्यास योग्य होतो आणि ज्याअर्थी असा प्रकार आहे [ततः तु ध्यायमानः निष्कलं तं पश्यते–]त्याअर्थी सत्यादि साधनसंपन्न व ज्यानें आपल्या सर्व इंद्रियांचा उपसंहार केला आहे, असा साधक एकाग्र मनानें चिंतन करूं लागला असतां त्या निष्कल–सर्व अवयवभेदरहित आत्म्यास पाहतो ८.–

एषोऽणुरात्मा चेतसा वेदितव्यो यस्मिन्प्राणः
पञ्चधा संविवेश । प्राणैश्चित्तं सर्वमोतं प्रजानां
यस्मिन्विशुद्धे विभवत्येष आत्मा ॥ ९

अन्वयार्थ—ज्या आत्म्याला साधक अशा रीतीनें पाहतो [एषः अणुः आत्मा चेतसा वेदितव्य –] तो अणु–सूक्ष्म आहे. तो चितानें–केवल अतिशुद्ध ज्ञानानेंच–जाणण्यास योग्य आहे. तो कोठें जाणण्यास योग्य आहे? [यस्मिन् प्राणः पंचधा संविवेश–] ज्या शरीरांत प्राणवायु प्राण-अपान इत्यादि भेदांनी पांच प्रकारचा होऊन प्रविष्ट झाला आहे त्याच शरीरांतील हृदयांत चित्तानें जाणण्यास योग्य आहे, असा याचा भावार्थ. कशाप्रकारच्या चित्तानें तो जाण-ण्यास योग्य आहे, तें मंत्र सांगतो–[प्रजानां प्राणैः सर्वं चित्तं ओतं–] स्नेहानें जसें दुधाला किंवा अग्नीनें काष्ठाला व्यापावें त्याप्रमाणें प्रजांचें इन्द्रियांसह सर्व अंतःकरण त्यानें व्यापलें आहे, कारण सर्व प्रजांचें अंतःकरण चेतनायुक्त आहे,

हें लोकांत प्रसिद्ध आहे. पण सर्वांचें चित्त चैतन्यानें जर व्याप्त आहे तर त्यांत ब्रह्म स्वतःच कां साक्षात् व्यक्त होत नाहीं, तें मंत्र सांगतो– [यस्मिन् विशुद्धे एषः आत्मा विभवति–] ज्या क्लेशादि मलरहित शुद्ध चित्तांत पूर्वोक्त आत्मा विशेषतः स्वरूपानें प्रकट होतो, आपणाला त्यांत प्रकाशित करतो, असा याचा भावार्थ. मु. ब्र. २. ३. १३ पृ. २१५ पहा ९.–अशा प्रकारें जो साधक पूर्वोक्त लक्षणाच्या सर्वात्म्यास आत्मरूपानें जाणतो त्याच्या सर्वात्मभावामुळेंच सर्वप्राप्तिरूप फल हा मंत्र सांगतो––

यं यं लोकं मनसा संविभाति विशुद्धसत्त्वः कामयते यांश्च कामान् ।
तं तं लोकं जयते तांश्च कामांस्तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद्भूतिकामः ॥ १०

इति तृतीयमुंडके प्रथमः खंडः ॥

अन्वयार्थ––[यं यं लोकं मनसा संविभाति–] तो मला किंवा दुसऱ्या कोणाला जो जो पित्र्यादि लोक प्राप्त व्हावा, अशी मनानें कल्पना करतो [च विशुद्धसत्त्वः यान् कामान् कामयते–] त्याचप्रमाणें तो अतिशुद्धचित्त–क्लेश-शून्य–निर्मलान्तःकरण आत्मवेत्ता ज्या भोगाची उत्कट इच्छा करतो [तं तं लोकं तान् च कामान् जयते–] त्या त्या लोकास व त्या संकल्पित भोगांस प्राप्त होतो. [तस्मात् भूतिकामः आत्मज्ञं अर्चयेत् हि–] येणेंप्रमाणें विद्वान् सत्य-संकल्प होत असल्यामुळें विभूतीची इच्छा करणारानें आत्मज्ञाची, आत्मज्ञानानें ज्याचें अन्तःकरण शुद्ध झालें आहे त्याची पादप्रक्षालन, शुश्रूषा, नमस्कार इत्यादिकांच्या योगानें पूजा करावी. अर्थात् सत्यसंकल्पत्वामुळें आत्मज्ञ पूजार्ह होतो. १०. (३.१.)

स वेदैतत्परमं ब्रह्म धाम यत्र विश्वं निहितं भाति शुभ्रम् ।
उपासते पुरुषं ये ह्यकामास्ते शुक्रमेतदतिवर्तन्ति धीराः ॥ १

अन्वयार्थ––[सः वेद–] ज्याअर्थी तो साधक हें पूर्वोक्तलक्षण ब्रह्म जाणतो त्याअर्थी त्याची पूजा करावी, असा अभिप्राय. [एतत् परमं ब्रह्म धाम–] तें ब्रह्म अतिशय उत्कृष्ट धाम आहे, सर्व कामांचें आश्रयस्थान आहे. [यत्र विश्वं निहितं–] ज्या ब्रह्मामध्यें–धामामध्यें समस्त जगत् समर्पण केलेलें आहे, व [शुभ्रं भाति–] जें स्वतःच्या ज्योतीनें–स्वयंप्रकाशानें भासतें, तें शुभ्र

म्हणजे शुद्ध आहे. [पुरुषं ये हि अकामाः उपासते–] त्या अशा आत्मज्ञ पुरुषालाहि जे कामनाशून्य–विभूतीच्या तृष्णेनें रहित असलेले–मुमुक्षू सेवितात, पर ब्रह्मप्रमाणेंच त्या आत्मज्ञाची उपासना करितात [ते धीराः एतत् शुक्रं अतिवर्तन्ति–] ते धीर शुक्राचें म्हणजे शरीराचें उपादान कारण म्हणून प्रसिद्ध असलेल्या या मनुष्यबीजाचें अतिक्रमण करितात. म्हणजे ते बुद्धिमान् पुनः योनीस प्राप्त होत नाहीत. १.–मुमुक्षूचें कामत्याग हेंच प्रधान साधन आहे, हें मंत्र दाखवितो—

कामान्यः कामयते मन्यमानः स कामभिर्जायते तत्र तत्र ।
पर्याप्तकामस्य कृतात्मनस्त्विहैव सर्वे प्रविलीयन्ति कामाः ॥ २

अन्वयार्थ—[यः कामान् मन्यमानः कामयते–] जो दृष्ट–ऐहिक व अदृष्ट–पारलौकिक इष्ट विषयांची, त्यांच्या गुणांचें चिंतन करीत, कामना करतो [सः कामभिः तत्र तत्र जायते–] तो त्या धर्माधर्मप्रवृत्तीस कारण होणाऱ्या विषयेच्छारूप कामांसह तेथें तेथें उत्पन्न होतो. तेथें म्हणजे कोठें? जेथें जेथें काम पुरुषास विषयप्राप्तीकरितां कर्मांत नियुक्त करितात त्या त्या प्रदेशामध्यें त्याच कामांनी वेष्टित होत्साता पुरुष उत्पन्न होतो. [तु पर्याप्तकामस्य कृतात्मनः सर्वे कामाः इह एव प्रविलीयन्ति–] पण जो परमार्थतत्त्वाच्या साक्षात्कारामुळें सर्वथा प्राप्तकाम झालेला असतो म्हणजे केवल आत्म्याचीच इच्छा असल्यामुळें ज्याला समंततः सर्व काम जणुकाय प्राप्त झालेले असतात त्या पर्याप्तकाम –प्राप्तकाम आणि जो कृतात्मा असतो म्हणजे ज्यानें विद्येच्या योगानें आत्म्याला अविद्यालक्षण अपर रूपापासून पृथक् करून आपल्या स्वाभाविक पररूपानें निष्पन्न केलेलें आहे त्या पर्याप्तकाम व कृतात्म पुरुषाच्या धर्माधर्मप्रवृत्तीचे हेतू सर्व येथेंच म्हणजे या जन्मीच, शरीर विद्यमान असतांनाच विलीन होतात, विलयास प्राप्त होतात, नाश पावतात, असा याचा भावार्थ. कामांच्या उत्पत्तीचें निमित्तच नष्ट झाल्यामुळें ते उत्पन्न होत नाहींत, असा याचा अभिप्राय. २.–सर्वलाभापेक्षां आत्मलाभच सर्वोत्तम आहे, हें जर खरें असेल तर त्याच्या लाभासाठीं प्रवचनादि उपाय पुष्कळ प्रमाणानें करणेंच उचित आहे, असें प्राप्त झालें असतां हा मंत्र म्हणतो—

नाऽयमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम् ॥ ३

अन्वयार्थ—[अयं आत्मा प्रवचनेन न लभ्यः] हा आत्मा पुष्कळ वेदशास्त्राध्ययनानें प्राप्त होण्यासारखा नाहीं, [मेधया न–] धारणाशक्तीनें प्राप्त होण्याजोगा नाहीं व [बहुना श्रुतेन न–] पुष्कळ श्रवणानेंहि मिळणारा नाहीं. [एषः यं एव वृणुते तेन लभ्यः–] तर तो विद्वान् ज्या परमात्म्याला प्राप्त होण्याची इच्छा करतो त्याच्या त्या वरणानेंच–त्याला प्राप्त होण्याच्या इच्छेनेंच–तो लभ्य आहे. [तस्य एषः आत्मा स्वां तनुं विवृणुते–] त्याचा हा आत्मा आपल्या स्वरूपाला प्रकट करतो. (आत्मा अविद्येनें आच्छादित झालेली आपली तनु–स्वात्मतत्त्वस्वरूप प्रकट करितो, असा याचा भावार्थ. तस्मात् अन्य कामांचा त्याग करून आत्मलाभाची इच्छा करणें, हेंच आत्मलाभाचें साधन आहे, असा भावार्थ. सु. उ. का. १.२.२३.पृ.५१) ३. बल, अप्रमाद व संन्यासयुक्त तप ही आत्मप्राप्तीनेचीं सहायभूत साधनें आहेत. कारण—

नायमात्मा बलहीनेन लभ्यो न च प्रमादात्तपसो वाऽप्यलिङ्गात् ।
एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वांस्तस्यैष आत्मा विशते ब्रह्मधाम ॥ ४

अन्वयार्थ—[अयं आत्मा बलहीनेन न लभ्यः–] हा आत्मा बलहीनास –आत्मनिष्ठाजनित वीर्यानें हीन असलेल्या पुरुषास लभ्य नसतो. त्याचप्रमाणें [प्रमादात् च न–] तो लौकिक पुत्र, पशु इत्यादि विषयसंगनिमित्त प्रमादानेंहि लभ्य नाहीं. [अलिंगात तपसः वा अपि न लभ्यः –] तसाच लिंगरहित तपाच्या योगानेंहि तो प्राप्त होत नाही. येथें तप म्हणजे ज्ञान, आणि लिंग म्हणजे संन्यास. संन्यासरहित ज्ञानानें प्राप्त होत नाहीं, असा याचा भावार्थ. (इंद्र, जनक, गार्गी इत्यादिकानाहि आत्मलाभ झाल्याचें श्रुतीनें सांगितलें आहे. तेव्हां ' संन्यासरहित ज्ञानानें ' असें येथें का म्हटलें आहे ? उत्तर–संन्यास म्हणजे सर्वत्याग. इंद्र, जनक इत्यादिकानीं स्वत्वाचा अभिमान सोडलेला असल्यामुळें आतर संन्यास त्याच्या ठिकाणींहि होता. येथें बाह्य लिंगाचा जो निर्देश केलेला आहे, तो विवक्षित नाही, कारण 'न लिङ्गं धर्मकारणम्' म्हणजे लिंग हेंच धर्माचें निमित्त नव्हे, असें स्मृतिवचन आहे. तात्पर्य [एतैः उपायैः तु यः विद्वान् यतते–] बल, अप्रमाद व संन्यासयुक्त ज्ञान या उपायानीं जो विवेकी, आत्मवेत्ता, विद्वान् यत्न करतो [तस्य एषः आत्मा ब्रह्मधाम विशते–]

त्या विद्वानाचा हा आत्मा ब्रह्मरूप धामामध्यें प्रवेश करतो. ४.—त्याचा आत्मा ब्रह्मामध्यें कसा प्रवेश करितो तें हा मंत्र सांगतो—

संप्राप्यैनमृषयो ज्ञानतृप्ताः कृतात्मानो वीत-
रागाः प्रशान्ताः । ते सर्वगं सर्वतः प्राप्य
धीरा युक्तात्मानः सर्वमेवाऽऽविशन्ति ॥ ५

अन्वयार्थ—[एनं संप्राप्य—] या आत्म्याला यथार्थपणें जाणून [ऋषयः—] ऋषि म्हणजे दर्शनवान् [ज्ञानतृप्ताः—] त्याच ज्ञानानें तृप्त होतात. (शरीराच्या वृद्धीस कारण होणाऱ्या बाह्य तृप्तिसाधनानें नव्हे.) [कृतात्मानः—] त्याचे आत्मे परमात्मस्वरूपानेंच निष्पन्न झालेले असतात. [वीतरागाः—] ते रागादि दोषरहित असतात. [प्रशान्ताः—] त्याची इंद्रियें उपरत झालेलीं असतात. [ते सर्वगं सर्वतः प्राप्य—] अशा प्रकारचे ते आकाशाप्रमाणें सर्वव्यापी असलेल्या ब्रह्माला सर्वत्र प्राप्त होऊन, म्हणजे उपाधीच्या योगानें मर्यादित झालेल्या एकदेशानें नव्हे, तर तें अद्वय ब्रह्मच आमचा आत्मा आहे, असें जाणून [धीराः—] म्हणजे अत्यंत विवेकी [युक्तात्मानः—] व युक्तात्मे म्हणजे नित्य समाहितस्वभाव पुरुष [सर्व एव आविशन्ति—] सर्व ब्रह्मामध्येंच शरीरपातसमयींहि म्हणजे मरणकालीहि प्रवेश करितात (घट फुटला असतां घटाकाश जसें महाकाशात जाऊन मिळतें त्याप्रमाणें विद्वान् शरीरपात होतांच उपाधिकृत मर्यादितपणाहि सोडतात. अशा प्रकारें ब्रह्मवेत्ते ब्रह्मधामांत प्रवेश करितात.) ५.—तसेंच—

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः शुद्धसत्त्वाः ।
ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥ ६

अन्वयार्थ—[वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः—] वेदान्तापासून उत्पन्न झालेलें जें विज्ञान तें वेदान्तविज्ञान; त्या विज्ञानाचा अर्थ—विज्ञेय—जाणण्यास योग्य—परमात्मा आहे. तो अर्थ ज्यांच्या चित्तांत अगदी चांगल्या प्रकारें निश्चित झालेला असतो ते वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थ. [संन्यासयोगात्—] ते सर्वकर्मपरित्यागरूप केवल ब्रह्मनिष्ठास्वरूप संन्यासयोगामुळें [यतयः—] यत्नशील व [शुद्धसत्त्वाः—] शुद्धचित्त होत्साते [ते सर्वे—] ते सर्व [ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति—] ब्रह्मलोकामध्यें परान्तकालीं परमामृत होऊन मुक्त होतात. (संसारी

पुरुषांचे जे मरणकाल ते अपरान्त; त्यांच्या अपेक्षेनें मुमुक्षूंच्या संसाराची परिसमाप्ति झाली असतां देहपरित्यागाचा जो काल तो परान्तकाल. त्या परान्तसमयीं. ब्रह्मलोकेषु—ब्रह्म हाच लोक, असा कर्मधारय समास करावा. तो वस्तुतः जरी एक आहे तरी साधक पुष्कळ असल्यामुळें अनेक लोकांसारखा दिसतो, अथवा अनेक लोकाप्रमाणें प्राप्त केला जातो. म्हणून येथें 'ब्रह्मलोकेषु' असें बहुवचन योजलें आहे. पण त्याचा अर्थ ब्रह्मामध्यें, असाच जाणावा. परामृताः—परम अमृत—अमरणधर्मक ब्रह्म ज्यांच्या आत्मभूत आहे ते परामृत होत. जिवंतपणींच ब्रह्मभूत परामृत होऊन. विझलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणें अथवा घटाकाशाप्रमाणें, सर्वतः मुक्त होतात. सर्वतः निवृत्तीस प्राप्त होतात. ६.—तसेंच—

गताः कलाः पञ्चदश प्रतिष्ठा देवाश्च सर्वे प्रति देवतासु ।
कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा परेऽव्यये सर्व एकी भवन्ति ॥ ७

अन्वयार्थ—[पंचदश कलाः प्रतिष्ठाः गताः—] देहारंभक प्राणादि पंधरा कला—सु. प्र. ६ पृ. १२४. पहा—आपापल्या प्रतिष्ठेस—कारणास जाऊन मिळाल्या [च सर्वे देवाः प्रतिदेवतासु गताः—] आणि देहाचा आश्रय केलेले चक्षुरादि करणस्थ सर्व देव आदित्यादि प्रति देवतांमध्यें गेलें. [कर्माणि—] मुमुक्षूचीं फलोन्मुख न झालेलीं—संचित कर्मे [च विज्ञानमयः आत्मा—] व विज्ञानमय आत्मा—बुद्ध्युपाधि जीव [सर्वे परे अव्यये एकी भवन्ति—] हे सर्व पर अव्यय शांत आत्म्यामध्यें एकरूप होतात. उपाधीच्या नाशानें सूर्याचें प्रतिबिंब जसें सूर्यांत किंवा घटाकाश महाकाशात एकरूप होतें त्याप्रमाणें बुद्ध्युपाधीचा लय होतांच सर्व परमात्म्यांत एकरूप होतें. सु. ब्र. ४. २. ७ पृ. ४६५ पहा. ७.

यथा नद्यः स्यन्दमानाः समुद्रेऽस्तं गच्छन्ति
नामरूपे विहाय । तथा विद्वान्नामरूपाद्वि-
मुक्तः परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ ८

अन्वयार्थ—[यथा स्यन्दमानाः नद्यः—] ज्याप्रमाणें एकसारख्या वाहत राहणाऱ्या गंगादि नद्या [समुद्रे नामरूपे विहाय अस्तं गच्छन्ति—] समुद्रास प्राप्त होऊन व नाम-रूप सोडून समुद्रांत अस्तास—अदर्शनास, अविशेषात्म-

भावास प्राप्त होतात [तथा नाम-रूपात् विमुक्तः विद्वान्–] तसा अविद्याकृत नाम-रूपापासून विशेषतः मुक्त झालेला विद्वान [परात् परं दिव्यं पुरुषं उपैति–] पूर्वोक्त पर अक्षराहून पर–दिव्य पुरुषास प्राप्त होतो. सु.ब्र.पृ.६५.८. '–अहोपण कल्याणकर अनुष्ठानात अनेक विघ्नें उद्भवतात, हें प्रसिद्ध आहे. यास्तव अविद्यादि क्लेशातील कोणत्या तरी एका क्लेशानें किंवा देवादि दुसऱ्या कोणी ज्यास विघ्न केलें आहे असा ब्रह्मवेत्ताहि मेल्यावर अन्य गतीस जातो; ब्रह्मालाच जात नाही, असें समजणें युक्त होय. ' म्हणून म्हणाल तर तें बरोबर नाही. कारण विद्येच्या योगानें सर्व प्रतिबंधाचा क्षय होतो. मोक्षाला केवल अविद्येचाच प्रतिबंध असतो यास्तव—

स यो ह वै तत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति
नास्याब्रह्मवित्कुले भवति । तरति शोकं तरति
पाप्मानं गुहाग्रन्थिभ्यो विमुक्तोऽमृतो भवति ॥ ९

अन्वयार्थ—[सः यः ह वै तत् परमं ब्रह्म वेद–] जो कोणी या लोकी त्या परम ब्रह्माला ' साक्षात् मीच तें आहे ' अशा प्रकारें जाणतो तो [ब्रह्म एव भवति–] ब्रह्मच होतो. तो अन्य गतीस जात नाही. देवहि त्याच्या ब्रह्मप्राप्तीस विघ्न करीत नाहीत. कारण तो त्यांचा आत्मा होतो. तस्मात् ब्रह्मज्ञ ब्रह्मच होतो. [अस्य कुले अब्रह्मविद् न भवति–] शिवाय या विद्वानाच्या कुलांत अब्रह्मवेत्ता होत नाहीं. [शोकं तरति–] तो शोकास तरतो. म्हणजे जिवंत असतांनाच अनेक इष्ट वस्तूंचा वियोग होणें, त्यांचा क्षय होणें, या निमित्तानें होणाऱ्या मानस संतापाचें उल्लघन करून जातो. [पाप्मानं तरति–] धर्म व अधर्म या नावाच्या पापास तरतो. [गुहाग्रंथिभ्यः विमुक्तः अमृतः भवति–] हृदयस्थ अविद्याग्रंथीपासून सर्वथा मुक्त होऊन अमृत होतो. सु. ब्र. पृ. २९१, ३८८. ९.–आतां या ब्रह्मविद्येचा संप्रदानविधि प्रदर्शित करून उपसंहार करितात—

तदेतदृचाऽभ्युक्तम्–क्रियावन्तः श्रोत्रिया ब्रह्मनिष्ठाः
स्वयं जुह्वत एकर्षिं श्रद्धयन्तः । तेषामेवैतां
ब्रह्मविद्यां वदेत शिरोव्रतं विधिवद्यैस्तु चीर्णम् ॥ १०

अन्वयार्थ—[तत् एतत् ऋचा अभ्युक्तं–] तें हें विद्यासंप्रदानविधान मंत्रानें सर्व प्रकारें प्रकाशित केलें आहे. [क्रियावन्तः–] यथाशास्त्र कर्मानुष्ठानानें युक्त, [श्रोत्रियाः–] वेदाध्यायी, [ब्रह्मनिष्ठाः–] ब्रह्मनिष्ठ–अपर ब्रह्मामध्यें निष्णात व पर ब्रह्मास जाणण्याची इच्छा करणारे व [श्रद्धयन्तः–] जे मोठे श्रद्धावान् होऊन [स्वयं एकर्षि जुह्वते–] स्वतः एकर्षिनामक अग्नीचें हवन करितात [तेषां एव एतां ब्रह्मविद्यां वदेत–]त्याच संस्कृतचित्त पात्रभूत विद्यार्थ्यांस ही ब्रह्मविद्या सांगावी. [तु यैः शिरोव्रतं विधिवत् चीर्णं–] व ज्यांनी मस्तकावर अग्नि धारण करणें, या लक्षणाचें शिरोव्रत यथाशास्त्र आचरिलें असेल त्यांनाच ही विद्या सांगावी. सु. ब्र. पृ. ३०४ पहा. १०.

तदेतत्सत्यमृषिरङ्गिराः पुरोवाच नैतदचीर्णव्रतोऽधीते । नमः परमऋषिभ्यो नमः परमऋषिभ्यः ॥ ११

इति तृतीयमण्डके द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

ॐ भद्रं कर्णेभिरिति शान्तिः ॥

इत्यथर्ववेदीया मुण्डकोपनिषत्समाप्ता ॥

अन्वयार्थ—[ऋषिः अंगिराः तत् एतत् सत्यं पुरा उवाच–] अंगिरा ऋषि तें हें सत्य अक्षर पूर्वी शौनकाला सांगता झाला. [अचीर्णव्रतः एतत् न अधीते–]ज्यानें शिरोव्रत केलेलें नसतें तो याचें अध्ययन करीत नाहीं. [परमऋषिभ्यः नमः–] परम ऋषीना नमस्कार असो;[परमऋषिभ्यः नमः] परम ऋषीना नमस्कार असो,ही द्विरुक्ति मुंडकसमाप्त्यर्थ आहे. सु.ब्र.पृ.३०३.११.(.३.२.)

मुंडकोपनिषदाचें सिंहावलोकन.

अथर्ववेदाच्या मुंडकोपनिषदांत अंगिरा मुनीनें चतुर्मुख, अथर्वा, अंगी व भारद्वाज या संप्रदायानें प्राप्त झालेली विद्या शौनकाला सांगितली. महागृहस्थ शौनक अंगिरा आचार्यापाशी यथाविधि उपसदन करून ' भगवन् एकाचें ज्ञान झालें असतां सर्व विज्ञात होतें, अशी जी वैदिक प्रसिद्धि आहे तिला अनुसरून कोणती एक वस्तु विशेषतः ज्ञात झाली असतां हें सर्व विज्ञात होतें '

असें विचारूं लागला. तेव्हां भारद्वाजशिष्य अंगिरा यथाविधि प्रश्न करणाऱ्या त्या शिष्याला म्हणाला—पर व अपर अशा दोन विद्या आहेत. त्यांतील पर विद्येनें तूं विचारलेली वस्तु ज्ञात होते. ज्या बुद्धीनें षडंगांसह वेद ज्ञात होतात ती अपरा विद्या व ब्रह्मज्ञान ही परा विद्या आहे. उपनीत द्विजानें सर्व वेदांचें अध्ययन करावें. पण तेवढ्यानें ब्रह्मज्ञान होत नाहीं. तर वैराग्य आल्यावर आचार्योपदेशानें तें होतें. पर व अपर या दोन्ही विद्या वैदिक आहेत. तथापि अधिकारभेदामुळें पर विद्या पृथक् सांगितली आहे. गृहस्थ ब्राह्मण व संन्यासी तिचा आश्रय करितात. अपरविद्येमध्यें कर्मे सांगितलीं आहेत. त्यांच्या योगानें चित्तशुद्धि करून घेऊन मुमुक्षु परा विद्येनें अक्षर ब्रह्माला जाणतात. ब्रह्म सर्वात्मक असल्यामुळें त्याला जाणल्यानें सर्व ज्ञात होतें. कर्मांच्या अनुष्ठानावांचून ज्ञानाधिकार प्राप्त होत नाहीं. कर्मांच्या योगानें आत्मजिज्ञासा होते व विचाराचें पर्यवसान ज्ञानांत होतें. आतां ते ज्ञेय ब्रह्म कसें आहे, म्हणून विचारशील तर सांगतों. तें ज्ञानेंद्रियांचा विषय होत नाही. कर्मेंद्रियें त्याचें ग्रहण करूं शकत नाहीत. त्याला काश्यपादि गोत्र नाहीं, शुक्लादिवर्ण नाही. त्याला ज्ञानेंद्रियें नाहीत, कर्मेंद्रियें नाहींत, तें अक्षर म्ह० नित्य आहे. कारण त्याचा नाश झाला आहे, असा कधीच कोणाला अनुभव येणें शक्य नाहीं. तेंच मायाशक्तींनी विविध होतें व सर्वात्मक आहे म्हणून विभु आहे. आकाशाप्रमाणें सर्वव्यापी आहे. त्यामुळें त्याचा देशतः परिच्छेद होत नाहीं. नित्य असल्यामुळें कालतः परिच्छेद होत नाही. विभु असल्यामुळें वस्तुतःहि परिच्छेद होत नाहीं. (सु प.प्र.२. श्लो. २०-२६ पृ. ५९-६१.) पण तें सर्वव्यापी जरी असलें तरी सूक्ष्म असल्यामुळें इंद्रियांचा विषय होत नाहीं. पण परमाणूप्रमाणें अल्पप्रमाणत्व हा त्याच्या सूक्ष्मत्वाचा अर्थ नव्हे, तर दुर्लक्ष्यत्व हा त्याचा अर्थ आहे. घटाला हाताने उचलतां येतें. म्हणून तो स्थूल, पण त्यांतीलच 'शब्द-'गुणाला तसें हातांनीं धरतां येत नाही. म्हणून तो सूक्ष्म. अक्षर ब्रह्माचें सूक्ष्मत्वहि अशाच स्वरूपाचें आहे. धनाचा जसा व्यय होतो तसा अक्षर ब्रह्माचा व्यय—क्षय होत नाही. कारण त्याच्या ठिकाणीं विक्रियादिकांचा असंभवच आहे. तत्त्वज्ञानी त्याला चराचरसृष्टीचें कारण मानितात. हें पूर्वोक्त जगत्कारण कूटस्थ असल्यामुळें तें 'अक्षर' आहे. त्याचें ज्ञान ज्या विद्येच्या योगानें होतें ती परा विद्या. एका भूमीपासून जशा

विविध औषधी उत्पन्न होतात त्याप्रमाणें त्या एका अक्षरापासून विविध सृष्टि होते. चेतन पुरुषापासून जसे केंस व नखें होतात त्याप्रमाणें चेतन अक्षरापासून अचेतन जगत् होतें. अर्थात् एक चेतन अक्षर अनेक व चराचर सृष्टीचें कारण होऊं शकत नाहीं, हें म्हणणें अयोग्य आहे. (सु. ब्र. अ. २. पा. २. अ. १. पृ. १३४ पहा.) कोळी जसा दुसऱ्या कोणत्याहि सहकारी कारणाची अपेक्षा न करितां आपल्या शरीरापासून तंतु उत्पन्न करितो व त्यांचा उपसंहारहि करितो त्याप्रमाणें एक असहाय अक्षरहि जगत्कारण होतें. ब्रह्मापासून जगदुत्पत्तीचा क्रम असा आहे. जलाचा संबंध होतांच बीज जसें अंकुरोन्मुख होतें त्याप्रमाणें उत्पाद्य सृष्टीच्या इच्छेनें युक्त झालेलें ब्रह्म तपाच्या योगानें उपचय पावतें. त्यापासून 'सर्व भोग्यवर्गाचा अंकुर' या नांवाचें अन्न उत्पन्न होतें. व्यक्त व्हावयास तयार झालेलें जें अव्याकृत तेंच येथील अन्न आहे. त्या अन्नापासून क्रियाशक्ति प्राण व ज्ञानसाधन मन उद्भवतें. त्यापासून सत्यसंज्ञक स्थूल भूतपंचक, त्यापासून भूम्यादि लोक, ज्योतिष्टोमादि कर्मांतील अमृतसंज्ञक कर्मफल, असें हें सर्व उत्पन्न होतें. अशा क्रमानें ब्रह्मापासून हें सर्व उत्पन्न झालें आहे. पण स्वतः ब्रह्मच जर जगदाकार झालें तर तें विकृत होईल, त्यांत विकार उद्भवेल व तें जर विकार न पावलें तर जगत्च होणार नाहीं, अशी येथें शंका येते. परंतु निरुपाधिक ब्रह्मतत्त्व जगदाकारास पात्र होत नाही. त्यामुळें तो मायोपाधिक सर्वज्ञ ईश्वरच जगत् उत्पन्न करितो. तो सामान्यतः सर्व जाणतो म्हणून सर्वज्ञ व विशेषतः सर्व जाणतो म्हणून सर्वविद् आहे. त्याचें ज्ञान हेंच तप आहे. त्याच्यापासून वेदादि सर्व जगत् झालें. तें अद्वैत जगत्-कारण परा विद्येच्या योगानें जाणावें. त्याला जाणलें असतां सर्व जगाचें तत्त्व ज्ञात होतें. १. १.

अपरा वेदविद्या कर्मानुष्ठानाच्या द्वारा परा विद्येचें साधन होते. काम्यकर्मांचें फल स्वर्ग व नित्यकर्मांचें फल चित्तशुद्धि आहे. कर्म केल्यानें तें दोन्ही प्रकारचें फल अवश्य प्राप्त होतें. यास्तव अहो मंत्र-ब्राह्मणदर्शी सत्यकाम पुरुषांनो, भोग व मोक्ष यांच्या सिद्धीसाठीं कर्म करा. तुम्हांसाठीं हाच मार्ग आहे. अग्निहोत्र ठेवून दर्शादिकांचें अनुष्ठान करावें. कारण त्याच्या अभावीं सात जन्मीं दुर्गति प्राप्त होते. काली, कराली इत्यादि अग्नीच्या जिह्वा असून

त्यांत होम करणाऱ्या अग्निहोत्र्याला आहुति-संज्ञक देवता इंद्रलोकीं नेतात. त्या देवता 'ये ये' असें त्याच्याशीं प्रिय भाषण करितात. 'हा तुझा पुण्यानें संपादन केलेला लोक आहे,' असें सांगून त्याला सूर्यकिरणांनीं वाहून नेतात व त्या लोकीं पोंचवितात. पण हें काम्य कर्मांचें फल आहे. ईश्वरार्पण केलेल्या कर्मांचें फल संसार त्याज्य आहे, अशी बुद्धि होणें, हें आहे. यास्तव त्यांचेंच आतां विवेचन करितों. एखाद्या क्षुद्र नदीचें तरण—उल्लंघन अदृढ नौकेनें करितां येतें. पण तिच्याच योगानें महासागरांतून तरून जातां येत नाहीं. यास्तव अग्निहोत्रादिरूप यज्ञ हें शिथिल साधन आहे. त्याच्या योगानें केवल स्वर्ग मिळतो. मोक्ष प्राप्त होत नाही. कर्मनिष्ठा पुनः पुनः जरा-मरण देते. 'ज्ञान जसें वैदिक तसेंच कर्महि वैदिक असल्यामुळें त्याला मुक्तिहेतुत्व आहे, कर्महि ज्ञानाप्रमाणेंच मोक्षाचें साधन आहे,' असें कोणी म्हणेल तर तें बरोबर नाही. कारण कर्म संसाराच्या मूल कारणाचें निराकरण करूं शकत नाही. अविद्या—आत्म्याचें अज्ञान किंवा विपरीत ज्ञान हें संसाराचें मूळ आहे. कर्मठ त्यांतच निमग्न झालेले असतात. ते सत्-अद्वितीय ब्रह्माला जाणत नाहीत. कर्मकांडाचा अर्थ जाणल्यामुळें ते स्वतःला पंडित समजतात. त्यांचे गुरुहि तसेंच पंडितंमन्य असतात. त्यामुळें ते सर्व अंधाकडून नेल्या जाणाऱ्या अंधांप्रमाणेंच असतात. 'मी यथाविधि यज्ञ-याग करणारा आहें. वाजपेय-राजसूय इत्यादि यज्ञांनीं मी कृतार्थ झालों आहें,' असें मानून ते कर्मांमध्यें आसक्त होतात, पण त्यांच्या स्वर्गरूप फलाचा भोगानें क्षय होतांच ते खालीं येतात. कर्मठ कर्मच श्रेष्ठ आहे, असें समजतो. त्याहून आणखी कांहीं श्रेयःसाधन आहे, हें त्याला माहीतहि नसतें. त्यामुळें स्वर्गांतून च्युत होऊन तो ब्राह्मणादि उत्तम योनीस किंवा श्व-चांडालादि अधम योनीस प्राप्त होतो. त्याचें अवशिष्ट कर्म जर शुभ असलें तर तो ब्राह्मण-क्षत्रियादि उत्तम योनीस प्राप्त होतो व अवशिष्ट कर्म अशुभ असलें तर श्वा, चांडाल इत्यादि अधम योनीस प्राप्त होतो.—मु. ब्र. पृ.२५७—पहा. पण नित्य कर्मांच्या अनुष्ठानानेंच ज्याची बुद्धि शुद्ध झाली आहे तो संसाराच्या या असारतेला जाणतो. उपासक पुनरावृत्तिरहित ब्रह्मलोकाला प्राप्त होतो. तथापि त्याला पुष्कळ आयास पडतात व त्याच्या स्वरूपावस्थानरूप मोक्षाला विलंब लागतो. यास्तव कर्मामुळें प्राप्त होणाऱ्या लोकांचे परीक्षण करून,

कर्मानें मोक्ष प्राप्त होण्याचा संभव नसल्यामुळें कर्म व कर्मफल यांविषयीं विरक्त झालेला पुरुष ब्रह्मज्ञानासाठीं तत्त्ववेत्त्या गुरूला यथाविधि शरण जातो. वेदान्त अनेक असल्यामुळें सिद्धान्ताविषयी संशयहि अनेक येतात. आणि वेद्य-ज्ञेय ब्रह्मात्मतत्त्वहि अतिशय सूक्ष्म आहे. त्यामुळें योग्य ब्रह्मनिष्ठ गुरूवांचून आत्मज्ञान होत नाहीं. गुरुमुखानें संपादन केलेल्या श्रवण-मनन-निदिध्यासनरूप उपायानें अज्ञान, संशय व विपरीत भावना यांचा नाश करावा. यथाविधि शरण आलेल्या शिष्याला गुरूनेंहि आपल्या ब्रह्मविद्येचा संप्रदाय प्रवृत्त होण्यासाठी—तो विच्छिन्न होऊं नये म्हणून अक्षर ब्रह्माचा बोध करून देणारी विद्या द्यावी. त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करावा. (१. २.)

अग्नीपासून जसे विस्फुलिंग—ठिणग्या उद्भवतात त्याप्रमाणें मायाशक्तियुक्त सत्य अक्षरापासून सर्व भाव उत्पन्न झाले आहेत. स्वयंज्योति अक्षरात्मा माया-रूप अक्षराहून पर—श्रेष्ठ—व्यापक आहे. त्याच्या ठिकाणी त्याची अचिंत्य मिथ्या मायाशक्ति जगत् कल्पिते. त्या मायावी महेश्वरापासून प्राणादि व आकाशादि पदार्थ उत्पन्न होतात. त्यापासून विराट् झाला. त्याच्यामध्यें हें सर्व जगत् झालें. पुरुष मायेनें सर्व जगद्रूपानें भासतो. त्यामुळें तत्त्वदृष्ट्या पाहिल्यास हें सर्व पुरुषच आहे. कारण-सूक्ष्म-स्थूल देहरूप गुहेंत जें साक्षी चैतन्य आहे तेंच सर्वात्मक ब्रह्म आहे, असें जाणून तमाला घालवावें. 'मी अज्ञ आहें' हें अज्ञान व आत्मा यांचें जें तादात्म्य तीच अविद्याग्रंथी असून ज्ञानानें ती तुटते. २. १

हें सर्व स्वयंप्रकाश आत्म्यापासून आविर्भूत झालें आहे. आत्मरूप ब्रह्मामध्यें हें सर्व कल्पित आहे अशी जी बुद्धि तोच बोध होय. ती बुद्धि जर स्थिर नसेल तर प्रणवानें ध्यान करावें. बाणानें लक्ष्याला जसा वेध करितात त्याप्रमाणें बुद्धीनें ब्रह्माला वेध करावा. ओंकार हें धनुष्य, बुद्धि हा बाण, व ब्रह्म त्याचें लक्ष्य आहे. सावधानतेनें त्याला वेध करावा. म्हणजे बुद्धि ब्रह्मामध्यें गढून जाते. बाणाचें शल्य लक्ष्यामध्यें निमग्न झालें म्हणजे मग तें ओढलें तरी बाहेर येत नाहीं. तर तें त्यांतच अडकून राहून नुस्ती बाणाची काठी हातांत येते. पण ती निरुपयोगी असते. त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें दृढ संलग्न—निमग्न झालेली बुद्धि स्वतः कोठेंहि जात नाहीं. तर अकिंचित्कर चक्षुरादिक बाहेर संचार करितात. जो पूर्वीप्रमाणें इंद्रियांनीं दर्शनादि क्रिया करितो पण त्यांची सिद्धि व असिद्धि

जाणत नाहीं त्याला जीवन्मुक्त म्हणतात. शास्त्रोक्त मार्गानें प्रणवाचें—ओंकाराचें ध्यान करावें. म्हणजे एक जगदधिष्ठानच सदा अनुभवास येतें. सर्व लौकिक व वैदिक वाणींचा त्याग करावा. अशा प्रकारें ब्रह्माचें ध्यान केल्यास बुद्धिग्रंथी तुटते. अव्याकृत सर्व व्यक्त कार्यांहून पर आहे. तथापि तें चिदात्म्याहून अवर—निकृष्टच आहे. अशा त्या परावर चिदात्म्याला पाहिलें असतां —त्याचा साक्षात् अनुभव घेतला असतां अहंकार व चित् यांची ग्रंथी तुटते. अहंकाराचें कर्तृत्व चिदात्म्यावर व आत्म्याची स्फूर्ति—ज्ञान—अनुभव अहंकारावर आरोपून माया त्या दोहोंची ग्रंथी—गांठ बांधते. पण विवेकानें तिचा भेद झाला असतां ब्रह्मतत्त्वाविषयींचे सर्व संशय जातात व उत्तरजन्माला कारण होणारें संचित-क्रियमाण कर्म क्षीण होतें. प्राण्यांच्या हृदयकोशांत जें आनंदरूप सदा भासतें तें सर्व ज्योतीची ज्योति आहे. मुमुक्षूंनी त्या ज्योतीला साक्षात् जाणावें. सूर्यादि प्रकाशरूप देव दुसऱ्या सर्वांना प्रकाशित करितात पण त्याला प्रकाशित करण्यास ते असमर्थ आहेत. कारण इतर सर्व प्रकाशांच्या पूर्वी तें आत्मतत्त्व प्रकाशित होतें व त्याच्या प्रकाशानें इतर सर्व प्रकाश-अप्रकाशरूप पदार्थ प्रकाश पावतात. सर्व दिशांमध्यें तेंच प्रकाशमान होतें. त्याच्यामध्यें या सर्व जगाचा अन्तर्भाव होतो. त्यामुळें तरंगादिक जलाहून जसे पृथक् नाहींत त्याचप्रमाणें जगत् त्याहून पृथक् नाहीं. तरंगादिकांत जसें एक जलतत्त्व तसें या सृष्टींत एक ब्रह्मतत्त्व आहे. त्यामुळें एका ब्रह्माला जाणल्यानें सर्व विज्ञात होतें. पण तें अखंड एकरस ब्रह्म समाधीतच अनुभवास येतें. (२. २.)

व्युत्थानसमयी भोक्ता व भोग घेवविणारा असे दोघे पक्ष्यांप्रमाणें पृथक् भासतात. शरीररूपी संसारवृक्षावरील त्या दोन पक्ष्यांतील एक क्षुधित झालेला पक्षी कर्मफल भोगतो व दुसरा केवल तें पाहतो. चिदाभासानें युक्त असलेला अहंकार फल भोगतो व चिदात्मा तें नुस्तें पाहतो. ज्ञानापूर्वी चित् भ्रांतीनें भोक्त्यामध्यें निमग्न होऊन शोक करिते. ती भ्रांति भोक्त्यामध्यें असते व चित्-जडविवेकहि भोक्तृनिष्ठच असतो. भोग व भोगाचे अवांतर भेद, भ्रांति व भ्रांतीचा बाधक विवेक इत्यादि सर्व चैतन्यावर आरोपित आहेत. ते खरे नव्हेत. भोक्ता जेव्हां त्यांचें विवेचन करितो म्ह० त्यांना चित्-हून अगदीं पृथक् जाणतो तेव्हां त्याला पुण्य-पाप नाहीं. मूढ जशी द्यूतादि क्रीडा करितो तसा तो

विवेकी सर्वदा आत्म्यामध्यें क्रीडा करितो. तो नित्य कर्मांप्रमाणें सदा आत्म्यामध्यें च प्रीति करितो. तो व्यर्थ क्षण घालवीत नसल्यामुळें ब्रह्मवेत्त्यामध्यें वरिष्ठ आहे. सत्य, तप व ब्रह्मचर्य हें विद्याधिकाराचें निमित्त आहे. विद्येचा मुख्याधिकारीच वरिष्ठ ब्रह्मवेत्ता होतो. वाक्-चक्षुरादि इंद्रियें, कर्म व तप यांच्या योगानें आत्म्याचें ग्रहण करितां येत नाही. केवल अन्तर्मुख झाल्यानेंच आत्मग्रहण संभवतें. ध्यानानें अन्तर्मुख झालेला जिज्ञासु महावाक्याच्या योगानें ब्रह्मात्म्याला साक्षात् जाणतो. विशुद्धबुद्धि आत्मज्ञ जसें बोलतो तसें होतें. ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें ऐश्वर्यासाठी सर्वदा आत्मज्ञाची पूजा करावी. ३.१

पण ऐश्वर्यादि कोणत्याच कामाच्या इच्छेवांचून आत्मज्ञाची उपासना जो करितो तो आत्म्याचें ब्रह्मत्व जाणतो. कामांना श्रेष्ठ मानून तत्पर झालेला उपासक त्या कामांमुळेंच निरनिराळ्या योनींत उत्पन्न होतो. आत्मज्ञ जीवदवस्थेतच सर्वकामांच्या लयाला प्राप्त होतो. पुष्कळ वेदपाठ केल्यानें, धारणाशक्तीनें किंवा बहुश्रुतपणानें हा आत्मा देव ज्ञात होत नाहीं. तर तोच ज्याच्यावर कृपा—अनुग्रह करितो त्याला त्याचें ज्ञान होतें. ईश्वराच्या अनुग्रहानेंच अद्वैतवासना होते. यास्तव ईश्वराच्या प्रसादासाठीं कर्म ब्रह्मार्पण करावें. ईश्वराच्या अनुग्रहानें युक्त असलेल्या पुरुषापुढें परमात्मा आपलें सच्चिदानंद स्वरूप प्रकट करितो. ज्याचें श्रवण, मनन व निदिध्यासन प्रबल नसतें किंवा ज्याच्या ठिकाणीं विषयासक्तिरूप प्रमाद असतो त्याला आत्मज्ञान होत नाही. ज्याच्या ठिकाणीं संन्यासाश्रमानें युक्त असें तप नसतें, ज्याची बुद्धि शुद्ध नसते, त्याला नुस्त्या श्रवणादिकांच्या योगानेंच ज्ञान होत नाही. वेदान्तज्ञानानें जे निश्चितार्थ झालेले असतात, संन्यासानें ज्यांची बुद्धि शुद्ध झालेली असते व ब्रह्मदृष्टीमध्यें जे स्थिर असतात ते अन्तीं मूल कारणापासून—अज्ञानापासून मुक्त होतात. संसारी जीवांच्या शरीरपाताला अपरान्त म्हणतात. कारण त्यांचा पुनः जन्म होतो. पण विद्वान् पुनः जन्म घेत नसल्यामुळें त्याच्या देहपाताला परान्त म्हणतात. अशा परान्त समयीं जे मुक्त होतात त्यांना ब्रह्मत्व असल्यामुळें ते परामृत होतात. त्यांच्या पूर्वोक्त—सु. प्र. ६ पृ. १२४ पहा—प्राणादि पंधरा कला आपापल्या कारणांत लीन होतात. वागादि इंद्रियांवर अनुग्रह करणाऱ्या अग्न्यादि देवतांच्या शक्ति आपापल्या देवतांस प्राप्त होतात. कारण ज्यांच्यावर अनु-

ग्रह करावयाचा त्या ज्ञानी पुरुषाच्या वागादिकांचाच लोप झालेला असतो. घृताचें काठिन्य अग्निसंयोगामुळें जसें विलीन होतें त्याप्रमाणें अनारब्ध म्ह० संचित-क्रियमाण कर्मे व विज्ञानमयसंज्ञक कर्ता विद्येनें लीन होतो. नद्या नाम-रूपांचा त्याग करून समुद्रांत अस्त पावतात तसाच विद्वान् नाम-रूपापासून मुक्त होऊन परमपदाला प्राप्त होतो. जो कोणी ब्रह्माला जाणतो तो स्वतः ब्रह्म होतो. त्याच्या कुलांत अब्रह्मविद् उत्पन्न होत नाही. ब्रह्मज्ञ शोकाचें उल्लंघन करितो. सर्व पापांचेंहि उल्लंघन करितो. सर्व बुद्धिग्रंथीपासून मुक्त होतो व ब्रह्मात्मज्ञानानें अमृत व सर्व होतो. जे क्रियावान्, श्रोत्रिय, व सगुणब्रह्मोपासक असतात त्यांनाच ही ब्रह्मविद्या सांगावी. इतरांना सांगूं नये. (३. २.)

इति शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रहांतील मुंडकोपनिषद् समाप्त झाले.

माण्डूक्योपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥
भद्रं नो अपि वातय मनः ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अन्वयार्थ—अहो देवांनो, आम्हीं कानांनीं भद्र—शुभ वचन ऐकावें आणि यागास समर्थ होऊन आम्ही नेत्रांनीं भद्रच पहावें. स्थिर अंगांनीं व शरीरांनी आम्ही तुमची स्तुति करणारे होत्साते देवानें दिलेल्या सर्व आयुष्यास प्राप्त व्हावें. आमच्या मनास शुभाकडेच प्रेरणा कर. त्रिविध तापांची शांति होवो.

ॐ ओमित्येतदक्षरमिदꣳसर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोंकार एव । यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योंकार एव १

अन्वयार्थ—हें जें सर्व विषयजात आहे तें आपल्या अभिधानाहून—नांवाहून—वाचकशब्दाहून भिन्न नाही. कारण वाच्य व वाचक किंवा अर्थ व शब्द यांचा अभेद आहे. वाच्य, अर्थ—पदार्थ, अभिधेय हे परस्पर पर्याय

शब्द आहेत. तसेच वाचक, शब्द, अभिधान हेहि पर्याय शब्द आहेत. वाच्य वाचकाहून जसें भिन्न नाहीं त्याचप्रमाणें अभिधान–वाचक शब्द ओंकाराहून पृथक् नाहीं. त्यामुळें [ओं इति-एतत् अक्षरं इदं सर्वं–] ओं हें अक्षरच हें सर्व जगत् आहे. पर ब्रह्महि अभिधान-अभिधेय-उपायपूर्वकच ज्ञात होतें. त्यामुळें तें ओंकारच आहे. [तस्य–] त्या ' ओं ' या पर-अपरब्रह्मरूप अक्षराचें [उपव्याख्यानं–] अगदीं स्पष्टपणें कथन प्रस्तुत आहे, असें जाणावें. [भूतं भवत् भविष्यत् इति सर्वं ओंकारः एव–] त्याच न्यायानें भूतकालीन, वर्तमान कालीन व भविष्यत्कालीन सर्व वस्तुजात ओंकारच आहे. [यत् च अन्यत् त्रिकालातीतं तत् अपि ओंकारः एव–] आणि जें दुसरें त्रिकालातीत– केवल कार्यावरून ज्ञात होणारें अव्याकृत, सूत्रात्मा इत्यादि तेंहि ओंकारच आहे. (ओंकार हें ब्रह्माचें वाचक नाम व ध्यानाचें आलंबन असल्यामुळें त्याचा निर्णय हा आत्मतत्त्वज्ञानाचा उपाय आहे. ओंकार ब्रह्मवाचक व ब्रह्मप्रतीक आहे हें काठक, प्रश्न, मुंडक, तैत्तिरीय, छांदोग्य, गीता इत्यादि अनेक श्रुतिस्मृतीवरून सिद्ध होतें. यास्तव त्याच्या निर्णयासाठीं हें प्रकरण आरंभिलें आहे. रोगार्ताच्या रोगाची निवृत्ति झाली असतां स्वाभाविक स्वस्थता जशी प्रत्ययाला येते त्याचप्रमाणें दुःखात्मक आत्म्याच्या द्वैतप्रपंचाचा उपशम झाला असतां स्वाभाविक स्वस्थता अभिव्यक्त होते. हेंच या ब्रह्मप्रकरणाचें प्रयोजन आहे.)१. –अभिधान–वाचक–शब्द व अभिधेय–वाच्य–अर्थ यांचें जरी एकत्व असलें तरी पहिल्या श्रुतिवचनांत अभिधानप्राधान्यानें ब्रह्माचा निर्देश केला. आतां या दुसऱ्या श्रुतिवचनांत अभिधान व अभिधेय यांचें एकत्वज्ञान होण्यासाठीं त्याचाच पुनः अभिधेयप्राधान्यानें निर्देश केला जातो—

सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥ २

अन्वयार्थ—[सर्वं हि एतत् ब्रह्म–] कार्य-कारणात्मक सर्व जगत् ओंकारमात्र आहे म्हणून वर सांगितलेलें हें सर्व ब्रह्म आहे. त्या सर्वात्मक परोक्ष ब्रह्माचाच श्रुति प्रत्यक्षतः निर्देश करिते–[अयं आत्मा ब्रह्म–] हा आत्मा ब्रह्म आहे. ज्याचे विश्वादिरूपानें चार भेद सांगावयाचे आहेत त्याचाच श्रुति ' अयं–हा' असें म्हणून प्रत्यगात्मत्वानें अभिनय करून–हृदयाला हात लावून निर्देश करीत आहे. [सः अयं आत्मा चतुष्पाद्–] तो ओंकारशब्दवाच्य

—पर-अपरत्वानें—परोक्ष-अपरोक्षत्वानें व्यवस्थित असलेला आत्मा चतुष्पाद् आहे. (रुपया या नाण्याचे व्यवहारसौकर्यासाठी चार पावल्या हे चार पाद जसे कल्पितात तशीच ज्ञानसौकर्यासाठी अखंड ब्रह्माच्या चार पादांची ही कल्पना केली आहे. अर्थात् विश्व, तैजस, प्राज्ञ व तुरीय हे आत्म्याचे गायीच्या चार पायांसारखे वास्तविक पाद नसून काल्पनिक आहेत.) २.—आतां त्याला चतुष्पात्त्व कसें तेंच पुढील चार वाक्यांनी दाखवितात—

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंश-
तिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥ ३

अन्वयार्थ—[जागरितस्थानः—] जागरित हें ज्याचें अभिमानस्थान आहे तो जागरितस्थान, [बहिष्प्रज्ञः—] ज्याची प्रज्ञा जणु काय बाह्यविषया आहे तो बहिष्प्रज्ञ, [सप्तांगः—] द्युलोकादि सात पदार्थ हींच ज्याची अंगें आहेत तो सप्तांग, [एकोनविंशतिमुखः—] ज्ञानेंद्रियादि एकोणीस मुखें—द्वारें ज्याचीं आहेत तो एकोनविंशतिमुख, [स्थूलभुक्—] स्थूल भोग घेणारा, [वैश्वानरः प्रथमः पादः—] वैश्वानर हा आत्म्याचा प्रथम पाद आहे. (द्युलोक हाच मूर्धा, सूर्य हाच चक्षु, वायु हाच प्राण, आकाश हा देहाचा मध्यभाग, उदक ही बस्ति, पृथिवी पाद व आहवनीय अग्नि हें मुख अशी सात अंगें, याचप्रमाणें ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें, प्राण व अन्तःकरणचतुष्टय अशीं एकोणीस मुखें—ज्ञानद्वारें, व शब्दादि विषयांचा श्रोत्रादि इंद्रियांनी भोग हाच स्थूल भोग असें येथें जाणावें.) ३.

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशति-
मुखः प्राविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥ ४

अन्वयार्थ—[स्वप्नस्थानः—] स्वप्न हें ज्या तैजसाचें स्थान—माझें या अभिमानाचें विषयभूत—आहे तो स्वप्नस्थान, [अन्तःप्रज्ञः—] जाग्रत्प्रज्ञा विविध साधनांनीं संपन्न असते. ती बहिर्विषय असल्यासारखी भासते, मनःस्पंदनमात्र प्रजा मनामध्यें तसलेच संस्कार धारण करिते. जाग्रद्वासनेनें वासित झालेलें मन बाह्य साधनांची अपेक्षा न करितां अविद्या-काम-कर्मांनीं प्रेरित होत्सातें चित्रित पटाप्रमाणें जाग्रत्-सारखें भासतें. इंद्रियांच्या अपेक्षेनें मनाला अन्तःस्थत्व आहे व स्वप्नामध्यें त्याची प्रज्ञा मनोवासनारूप असते. म्हणून तो अन्तःप्रज्ञ [सप्तांगः एकोनविंशतिमुखः—] सप्तांगांनीं युक्त, एकोणीस मुखांनीं—ज्ञानद्वारांनीं युक्त

[प्रविविक्तभुक्–] सूक्ष्म–वासनामात्र प्रज्ञाच ज्याची भोग्य आहे तो प्रविविक्त-भुक् असा [तैजसः–] केवल प्रकाशरूप प्रज्ञेमध्यें विषयित्वानें असतो म्हणून स्वप्नाभिमानी आत्मा तैजस होय. असा तैजस हाच [द्वितीयः पादः–] आत्म्याचा दुसरा पाद आहे. ४.

यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् । सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवाऽऽनन्द-मयो ह्यानन्दभुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥ ५

अन्वयार्थ––[यत्र सुप्तः कंचन स्वप्नं न पश्यति कंचन कामं न कामयते तत् सुषुप्तं–] ज्या स्थानी अथवा कालीं सुप्त–निजलेला हा काहीं स्वप्न पहात नाहीं व कोणत्याहि कामाची कामना करीत नाहीं, तें सुषुप्त. [सुषुप्तस्थानः एकीभूतः प्रज्ञानघनः एव०–] सुषुप्त हें ज्याचें स्थान आहे तो सुषुप्तस्थान, एकीभूत, प्रज्ञानघनच, आनन्दमय–आनंदप्रचुर, आनन्दभुक्, चेतोमुख, प्राज्ञ हा तिसरा पाद आहे. (मनाचा लय झाल्यामुळें सुषुप्त आत्मा एकीभूत, प्रज्ञानघन वगैरे होतो. याचा सविस्तर अर्थ भाष्यार्थांत पहा.) ५. प्राज्ञाचा आधिदैविक अन्तर्यामीशी अभेद मानून आणखी त्याची विशेषणें––

एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येष योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ॥ ६

अन्वयार्थ––[एषः–] हाच स्वरूपावस्थ म्ह० उपाधिप्राधान्य टाकून चैतन्यप्राधान्य स्वीकारलेला प्राज्ञ [सर्वेश्वरः–] आधिदैविकासह या सर्व भेदजा-ताचा ईशिता, इतर वाद्यांप्रमाणें तो या प्राज्ञाहून दुसऱ्या जातीचा–तटस्थ–नाही. [एषः सर्वज्ञः–] हाच सर्वाचा सर्वभेदावस्थ ज्ञाता आहे. म्हणून हाच सर्वज्ञ. (व्यास-पराशरादि इतरहि सर्वज्ञ म्हणून जरी प्रसिद्ध असले तरी–) [एषः अन्तर्यामी–] सर्वांच्या अन्तःकरणांत प्रवेश करून सर्व भूतांचा नियन्ताहि हाच आहे. (व्यासादिकांना अन्तर्–आंत अनुप्रवेश करून नियमन करण्याचें सामर्थ्य नाहीं.) [एषः सर्वस्य योनिः–] त्यामुळेंच म्ह० हा सर्वेश्वर, सर्वज्ञ व अन्तर्यामी असल्यामुळेंच हा सर्वांची योनि आहे.(' अहो पण पूर्वोक्त सर्व विशेषणें निमित्तकारणालाहि लागूं शकतात,' अशी आशंका घेऊन सांग-तात–) ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं [प्रभवाप्ययौ हि भूतानां–] ज्यापासून

प्रभव–उद्भव होतो तो प्रभव व ज्यांत लय पावतो तो अप्यय. भूतांचें उत्पत्तिस्थान व लयस्थान–उपादान कारण हाच आहे. उपादानावांचून दुसऱ्या कोठेंहि एकत्र प्रभव व अप्यय होऊं शकत नाहींत. यास्तव–' प्रकृतिश्च प्रतिज्ञादृष्टान्तानुपरोधात्'–सु. ब्र. १. ४. ७. पृ. १२४. पहा.–या ब्रह्ममीमांसान्यायानें हाच उपादान व निमित्त कारणहि आहे, असा भावार्थ. ६. त्या काल्पनिक तीन स्थानांचें निराकरण करून–' नान्तःप्रज्ञं० ' इत्यादि श्रुति तुरीय आत्मा सांगते—

नान्तःप्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतःप्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम्। अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥ ७

अन्वयार्थ—[न अन्तःप्रज्ञ०–] तुरीय अन्तःप्रज्ञ नाही, बहिष्प्रज्ञ नाही, उभयतः–अन्तर्बहिःप्रज्ञ नाही, प्रज्ञानघन नाही, प्रज्ञ नाही व अप्रज्ञ नाही, तर तें अदृष्ट, अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिंत्य, अनिर्देश्य, एकात्मप्रत्ययसारभूत, प्रपंचाचा उपशम, शांत, शिव, अद्वैत असें तुरीय आहे, असें विद्वान् मानतात. तोच आत्मा आहे, त्याला साक्षात् जाणावें. ७.

सोऽयमात्माऽध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्रा मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥ ८

अन्वयार्थ—' अभिधेयप्रधान ओंकार चतुष्पाद् आत्मा आहे, ' असें म्हणून ज्याचें व्याख्यान केलें [सः अयं आत्मा–] तो हा आत्मा [अध्यक्षरं–] अक्षराला विषय करून–नामप्राधान्यानें वर्णन केला जातो म्हणून अध्यक्षर आहे. तें अक्षर कोणतें, तें श्रुति सांगते–[ओंकारः–] 'ओं' हें तें अक्षर आहे. [अधिमात्रं–] तो हा पादशः प्रविभक्त केला जाणारा ओंकार मात्रांना विषय करून राहतो म्हणून अधिमात्र. (आत्म्याचा पादशः विभाग होतो व मात्रा ओंकाराच्या आहेत. तेव्हां पादशः विभाग पावणाऱ्या आत्म्याला अधिमात्रत्व कसें ?)–[पादाः मात्राः मात्राः च पादाः–] आत्म्याचे जे पाद त्याच ओंकाराच्या मात्रा व ज्या मात्रा तेच पाद आहेत. मात्रा कोणत्या ? [अकारः उकारः मकारः इति–] अकार, उकार व मकार अशा त्या मात्रा आहेत ८.ह्या पादांतील अमुक पाद ही अमुक मात्रा, असा त्याविषयीं पुढील चार खंडांत विशेष नियम केला जातो–

जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राऽऽप्तेरादिमत्त्वाद्वा-
ऽऽप्नोति ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ ९

अन्वयार्थ—[जागरितस्थानः वैश्वानरः अकारः प्रथमा मात्रा—] जागरित हें ज्यांचें स्थान आहे तो वैश्वानर ही ओंकाराची अकार ही पहिली मात्रा आहे. कारण [आप्तेः वा आदिमत्त्वात्—] व्याप्ति व आदिमत्त्व—प्रथमत्व हे धर्म वैश्वानर व अकार यांत समान आहे. [यः एवं वेद—] जो अकाराची अशी उपासना करतो [सः सर्वान् कामान् ह वै आप्नोति—] तो सर्व कामांस प्राप्त होतो. [च आदिः भवति—] व प्रथम होतो. ९.

स्वप्नस्थानस्तैजस उकरो द्वितीया मात्रोत्कर्षादुभ-
यत्वाद्वोत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं समानश्च भवति
नास्याब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ १०

अन्वयार्थ—[स्वप्नस्थानः तैजसः उकारः द्वितीया मात्रा—] जो स्वप्नस्थान तैजस तो ओंकाराचा उकार ही दुसरी मात्रा आहे. कोणत्या सादृश्यानें तें श्रुतिच सांगते—[उत्कर्षात्—] उत्कर्षामुळें. ओंकारांतील अकारापासून उकार जणुं काय उत्कृष्टसा आहे. (अर्थात् अकाराहून उकार जणुंकाय उत्कृष्ट—उत्तम आहे. अकारानें सर्व वाक्-ला व्यापलेलें असल्यामुळें त्याचाच वास्तविक उत्कर्ष आहे. तथापि अकाराच्या मागून उकाराचा पाठ असल्यामुळें त्याला उपचारानें त्याहून उत्कृष्ट म्हटलें आहे.) त्याचप्रमाणें तैजस विश्वाहून उत्कृष्ट आहे. स्थूलाभिमान्याहून सूक्ष्माभिमानीचा उत्कर्ष योग्यच आहे. [वा उभयत्वात्—] किंवा उभयत्वामुळें त्यांचें ऐक्य आहे. अकार व मकार यांच्या मध्यें उकार असतो तसाच विश्व व प्राज्ञ यांच्या मध्यें तैजस आहे. म्हणून उभयभाक्त्व हें त्या दोहोंमध्यें सामान्य आहे. आतां अशी उपासना करणारास फल सांगितलें जातें. [उत्कर्षति ह वै ज्ञानसंततिं—] तो विज्ञानाच्या संततीचा उत्कर्ष करतो, वृद्धि करतो, असा भावार्थ—[समानः च भवति—] मित्रपक्षाला जसा, तसाच शत्रुपक्षांनाहि समान—तुल्य अप्रद्वेष्य होतो. [अस्य कुले अब्रह्मविद् न भवति—] याच्या कुलांत अब्रह्मविद्—ब्रह्माला न जाणणारा—अविद्वान् निपजत नाही. (पण हें फल कोणाला मिळतें ?)—[यः एवं वेद—] जो अशी म्हणजे तैजस व उकार यांचें ऐक्य आहे, अशी उपासना करतो त्याला हें फल मिळतें. १०.

सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदꣳ सर्वमपीतिश्च भवति य एवं वेद ॥११

अन्वयार्थ—[सुषुप्तस्थानः प्राज्ञः मकारः तृतीया मात्रा—] जो सुषुप्तस्थान प्राज्ञ तो ओंकाराची मकार ही तिसरी मात्रा आहे. कोणत्या सामान्यानें? असें कोणी म्हणेल म्हणून श्रुति सांगते—हें त्यांत सामान्य आहे—[मितेः—] मिति म्ह० मान, प्रमाण. ज्याप्रमाणें शेरानें जव, भात मापलें जातें त्याप्रमाणें प्रलयसमयीं प्रवेश व उत्पत्तिसमयी त्यांतून निघणें यांच्या योगानें प्राज्ञाकडून विश्व व तैजस हे जणुंकाय मापले जातात. त्याचप्रमाणें ओंकाराचा एकसारखा उच्चार करूं लागलें असतां एक ओंकार संपून दुसरा जेव्हां उच्चारला जाऊं लागतो तेव्हां प्रथम अकार व उकार मकारांत प्रवेश करून जणुंकाय मागून ते त्यांतूनच निघतात. [अपीतेःवा—] अपीति म्ह० अप्यय—लय—एकीभाव. ओंकाराचें उच्चारण केलें असतां अकार व उकार अन्त्य अक्षरांत—मकारांत जणुंकाय एकरूप होतात. त्याचप्रमाणें सुषुप्तिकाली विश्व व तैजस प्राज्ञांत एकीभूत होतात. किंवा या दुसऱ्या सामान्यामुळें प्राज्ञ व मकार यांचें एकत्व आहे. आतां उपासकाचें फल सांगतात—[इदं सर्वं मिनोति ह वै—] या सर्वांचें माप करतो, जगाचें याथात्म्य—यथार्थरूप जाणतो, असा भावार्थ. [अपीतिः च भवति—] व अपीति—लय होतो—जगत्कारणत्वाला प्राप्त होतो असा भावार्थ; कोण? [यः एवं वेद—] जो असें जाणतो त्याला हें अवान्तर फल प्राप्त होतें. ११. —आतां प्रत्यक्चैतन्याचें ब्रह्माशीं ऐक्य विवक्षित असल्यामुळें सोपाधिक चैतन्याच्या उपाधीचा निरास करून ऐक्यबोध—

अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः शिवोऽद्वैत एवमोंकार आत्मैव संविशत्यात्मनाऽऽत्मानं य एवं वेद ॥ १२

इति अथर्ववेदीया मांडूक्योपनिषद् समाप्ता ॥

अन्वयार्थ—[अमात्रः—] ज्याच्या मात्रा नाहींत तो अमात्र—ओंकार [चतुर्थः—] तुरीय आत्माच केवल—अद्वितीय आहे. अभिधानरूप वाक् व अभिधेयरूप मन, यांचा मूल अज्ञानाच्या क्षयानें क्षय झाला असतां तो [अव्यवहार्यः—] अव्यवहार्य आहे. (अहोपण, आत्मा जर अव्यवहार्य—शब्दादिकांनीं व्यवहार न करतां येण्याजोगा असेल तर तो नाहींच; अशी आशंका घेऊन सांगतात)

प्रपंचोपशमः—] प्रपंच म्ह० सर्व विकारजात त्याच्या विनाशाचा तो अवधि—अखेरची सीमा—हद्द असल्यामुळें पराकाष्ठा म्हणून अवशिष्ट राहणारा आत्मा आहेच. [शिवः—] तो सर्व अनर्थाभावानेंच उपलक्षित होणारा आत्मा परमानंदरूप असल्यामुळें शिव आहे. [अद्वैतः—] तो सर्व द्वैतकल्पनांचें अधिष्ठान असल्यामुळें ' अद्वैत ' झालेला आहे. [एवं ओंकारः आत्मा एव—] याप्रमाणें पाद व मात्रा यांचें ऐक्य आहे, असें जाणणाऱ्या उपासकानें ज्याचा प्रयोग केला आहे, असा त्रिमात्र ओंकार त्रिपाद आत्माच आहे. [यः एवं वेद सः आत्मना आत्मानं संविशति—] जो अशी उपासना करतो तो स्वरूपानेंच आपल्या पारमार्थिक स्वरूपांत—आत्म्यामध्यें चांगल्याप्रकारें प्रवेश करतो. परमार्थदर्शी ब्रह्मवेत्ता तिसऱ्या बीजभावास जाळून आत्म्यामध्येंच प्रविष्ट झालेला असतो. त्यामुळें तो पुनः उत्पन्न होत नाहीं. कारण तुरीयाला बीजभाव नाहीं. १२.

मांडूक्योपनिषदाचें सिंहावलोकन.

' ओं ' हें अक्षर पर ब्रह्माचें नांव व अपर ब्रह्माचें प्रतीक आहे. यास्तव त्या ओंकाराच्या निर्णयासाठी हें उपनिषद् प्रवृत झालें आहे. ओंकाराच्या अकार, उकार, मकार अशा तीन मात्रा असून विश्व, तैजस, प्राज्ञ हे आत्म्याचे तीन कल्पित पाद आहेत. त्यांतील ओंकाराच्या अकारमात्रारूप विभु विश्व बहिष्प्रज्ञ आहे. उकारमात्रारूप तैजस अन्तःप्रज्ञ आहे. मकारमात्रारूप प्राज्ञ घनप्रज्ञ आहे. याप्रमाणें एकच आत्मा तीन प्रकारचा सांगितला आहे. विश्व दक्षिण अक्षिमध्यें, तैजस मनामध्यें व प्राज्ञ हृदयांतील आकाशांत; याप्रमाणें एकच आत्मा देहांत तीन प्रकारें व्यवस्थित होतो. सर्वगत आत्म्यानें देहावर ' हा मी ' असा अभिमान ठेवणें हेंच त्याचें त्यांत व्यवस्थितत्व आहे. विश्व नित्य स्थूलभुक् —शब्दादि विषयांचा श्रोत्रादि इंद्रियांनीं भोग घेणारा आहे. तैजस मनोमय सूक्ष्म विषयांचा भोग घेणारा आहे. प्राज्ञ आनंदाचा भोग घेणारा आहे. याप्रमाणें त्याचा तीन प्रकारचा भोग जाणावा. स्थूल विषयभोग विश्वाला तृप्त करितो. सूक्ष्म विषयभोग तैजसाला तृप्त करितो. आनंद प्राज्ञाला तृप्त करितो. अशी तीन प्रकारची तृप्ति जाणावी. जाग्रदादि तीन स्थानांतील स्थूल-सूक्ष्म-आनंदसंज्ञक

भोज्य वस्तुतः एकच असतांना तीन प्रकारचें झालें आहे व विश्व-तैजस-प्राज्ञसंज्ञक भोक्ताहि 'तोच मी' असें प्रतिसंधान होत असल्यामुळें व द्रष्टृत्व हा त्याचा धर्म सर्वत्र समान असल्यामुळें एकच आहे, असें जो जाणतो तो भोग घेत असला तरी लिप्त होत नाहीं. सर्व भोज्य एका भोक्त्याचें आहे. भोक्ता निराळा व भोज्य निराळें. भोज्यामुळें भोक्त्याच्या स्वरूपांत कांहीं फरक पडत नाहीं, असें जाणून भोग घेणारा त्यानें लिप्त होत नाहीं. आपल्या स्वाभाविक अविद्याकृत नाम-रूप-मायास्वरूपानें विद्यमान असलेल्याच विश्व, तैजस, प्राज्ञ या भेदांची उत्पत्ति होते. म्ह० अव्यक्त बीजरूपानें अवस्थित असलेल्याच कार्याची अभिव्यक्ति होते, हा सिद्धान्त होय. प्राण-पुरुष तमःप्रधान जगदुपादानभूत मायेचें ग्रहण करून सर्व अचेतनास उत्पन्न करितो. त्याचप्रमाणें तो चैतन्यप्रधान पुरुष चिदाभासरूप जीवांस पृथक् निर्माण करितो. सृष्टीविषयी चिंतन करणारे ईश्वराची विभूति-ऐश्वर्यविस्तार हीच सृष्टि आहे, असें म्हणतात. दुसऱ्या सृष्टिचिंतकांनीं सृष्टि स्वप्न व माया यांसारखी कल्पिली आहे. कित्येक सृष्टि प्रभूच्या इच्छामात्र आहे, असें म्हणतात. कालचिंतक भूतांची उत्पत्ति कालापासून होते, असें मानतात. ईश्वराच्या भोगासाठीं किंवा क्रीडेसाठीं सृष्टि आहे असें कित्येक म्हणतात. पण हे सर्व पक्ष सदोष आहेत. सृष्टि हा देवाचा स्वभाव आहे. पूर्णकाम पुरुषाला स्पृहा-इच्छा कोठून असणार? असो, तुरीय आत्मा सर्व दुःखांच्या निवृत्तीचा प्रभु आहे. तो अव्यय, अद्वय व विभु आहे. विश्व व तैजस कार्य-फलभाव व कारण-बीजभाव यांनीं बद्ध आहेत. प्राज्ञ केवल कारणबद्ध आहे. पण तुर्यामध्यें ते दोन्ही भाव संभवत नाहींत. प्राज्ञ आपल्याला जाणत नाहीं, दुसऱ्यांना जाणत नाहीं. सत्य जाणत नाहीं, अनृतहि जाणत नाहीं. पण तुर्य सर्वदा सर्वदृक् आहे. प्राज्ञ व तुर्य या दोघांच्या ठिकाणीं द्वैताचें अग्रहण तुल्य आहे. म्हणजे त्या दोघांनाहि द्वैताचा प्रत्यय येत नाहीं. पण प्राज्ञ बीजनिद्रेनें युक्त असतो. तत्त्वाचें अज्ञान हीच निद्रा. ती जाग्रत् व स्वप्न यांतील विशेष ज्ञानाच्या उत्पत्तीचें बीज आहे. प्राज्ञ त्या बीजनिद्रेनें युक्त असतो. पण तुर्य सर्वदा सर्वदृक् आहे. दृक्-प्रकाश-ज्ञान हें त्याचें स्वरूपच असल्यामुळें तो प्राज्ञाप्रमाणें बीजनिद्रायुक्त नाहीं. विश्व व तैजस हे स्वप्न व निद्रा या दोहोंनीं युक्त आहेत. पण प्राज्ञ विपरीत ग्रहणरूप स्वप्नानें रहित

अशा केवल निद्रेनें युक्त आहे. तुर्य आत्म्याविषयीं निश्चित झालेले ब्रह्मवेत्ते तुर्यांत निद्राहि पहात नाहींत व स्वप्नहि पहात नाहींत. अन्यथाग्रहण—विपरीत ग्रहण हेंच स्वप्न. तत्त्वाचें अज्ञान हीच निद्रा. त्या दोहोंचा विपर्यास क्षीण झाला असतां विद्वान् योगी तुरीय पदाचा अनुभव घेतो. अनादि मायेनें निजलेला जीव ज्यावेळीं जागा होतो तेव्हां अज निद्रारहित स्वप्नरहित अद्वैत जाणतो. प्रपंच जर खरोखरच विद्यमान असेल तर निवृत्त होईल, यांत संशय नाहीं. पण वस्तुतः हें सर्व द्वैत मायामात्र आहे व अद्वैतच परमार्थतः आहे. विकल्पाची जर कोणीं कांहीं कारणानें कल्पना केली असेल तर तो बाधित होईल. पण शास्ता-शास्त्र, शास्य-शिष्य हा सर्व वाद तत्त्वोपदेशासाठीं आहे. उपदेशानें ज्ञान झालें म्हणजे मग द्वैत उरत नाहीं. विश्व व अकार यांचें ऐक्य जेव्हां विवक्षित असतें तेव्हां प्रथमत्व व व्याप्ति हें त्यांचें सादृश्य असतें. तैजस व उत्व यांचें ऐक्य जेव्हां विवक्षित असतें तेव्हां उत्कर्ष व उभयत्व हें त्यांचें सादृश्य स्पष्ट प्रतीत होतें. प्राज्ञ व मकार यांच्या ऐक्यकल्पनासमयीं मान—प्रमाण व लय हें साधर्म्य विवक्षित असतें. याप्रमाणें या तीन स्थानांतील पाद व मात्रा यांचें सामान्य जो निश्चितपणें जाणतो तो सर्व भूतांना वंद्य व महामुनि—ब्रह्मवेत्ता होतो. याप्रमाणें आत्म्याचे पाद व ओंकाराच्या मात्रा यांचें ऐक्य जाणून जो ओंकाराख्य ब्रह्माचें ध्यान करितो त्याला अकार मात्रा विश्वाची प्राप्ति करून देते. उकार हिरण्यगर्भाची प्राप्ति करून देतो. मकार प्राज्ञाची प्राप्ति करून देतो. पण अमात्र तुरीय हें आत्म्याचें स्वरूपच असल्यामुळें त्यांत गति नाहीं. स्वरूपामध्यें नेहमीं गतीचा अभाव असतो. एक वस्तु दुसऱ्या—स्वभिन्न वस्तूलाच प्राप्त होऊं शकते. स्वतः स्वतःलाच प्राप्त होऊं शकत नाहीं हें प्रसिद्ध आहे. (सु. प्र. ५ पृ. १२० पहा.)

या प्रमाणें ओंकाराची पादशः उपासना करावी. कारण आत्म्याचे जे पाद त्याच ओंकाराच्या मात्रा आहेत. यास्तव त्यांचें ऐक्य मानून सर्वविभागशून्य ओंकाराचें ब्रह्मबुद्धीनें ध्यान करणारा कृतार्थ होतो. त्यानंतर त्यानें दुसऱ्या कशाचेंहि ध्यान करूं नये. प्रणवामध्येंच चित्त स्थिर—समाहित करावें. कारण प्रणव हेंच निर्भय ब्रह्म आहे. त्यामुळें प्रणवामध्यें नित्यसमाहित असलेल्या उपासकाला कोठेंहि भय नाहीं. प्रणवच अपर व पर ब्रह्म आहे. अमात्र प्रणवच

ब्रह्म असल्यामुळें तो कारण-कार्यशून्य, अबाह्य, अव्यय आहे. त्यामुळें तो उत्पन्न होणाऱ्या सर्वांचा आदि-मध्य-अंत आहे. याप्रमाणें प्रणवाला जाणून विद्वान् तत्क्षणींच ब्रह्मात्मभावास प्राप्त होतो. सर्वांच्या हृदयकमलांत अभिव्यक्त होणाऱ्या परमात्म्याला प्रणव जाणावें. सर्वव्यापी ओंकाराला जाणून परमार्थदर्शी शोक करीत नाहीं. शोकनिवृत्ति हें ज्ञानाचें फल आहे. याप्रमाणें अमात्र, अनन्त, सर्वद्वैताचा उपशम व त्यामुळेंच कल्याणस्वरूप ओंकाराला ज्यानें जाणलें आहे तो परमार्थतत्त्वाचें मनन करणारा मुनि होय. इतर केवल शास्त्रज्ञ मुनि नव्हेत. याप्रमाणें या उपनिषदांत ओंकाराचा निर्णय करून त्याच्या सगुण-निर्गुण उपासनेचें विधान केलें आहे. त्यामुळें हें उपनिषद् महत्त्वाचें आहे. ब्रह्मसूत्रांत याचा प्रत्यक्ष उपयोग केलेला कोठें आढळत नाहीं. तथापि ' अयमात्मा ब्रह्म ' हें अथर्ववेदाचें महावाक्य याच उपनिषदांत आहे. यावर गौडपादाचार्यांच्या दोनशें कारिका आहेत. त्या सार्थ, भाष्य व भाष्यार्थ यांसह मांडूक्योपनिषद्भाष्यार्थांत दिल्या आहेत. म्हणून त्यांचा येथें पुनः संग्रह केला नाहीं. पण त्या कारिका अद्वैत मताचें मूळ असल्यामुळें विशेषवेदान्तजिज्ञासूंनीं त्या अवश्य पहाव्या. प्रश्न, मुंडक, मांडूक्य या तिन्ही अथर्वणवेदीय उपनिषदांत ओंकारोपासना जरी उक्त असली तरी ती यांत अधिक सोपपत्तिक व सविस्तर सांगितली आहे.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहातील
माण्डूक्योपनिषद् समाप्त झाल.

तैत्तिरीयोपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

१ शीक्षाध्यायः।

तैत्तिरीय आरण्यकाच्या शेवटच्या सात, आठ, नऊ व दहा या चार प्रपाठकांना तैत्तिरीय-उपनिषद् म्हणतात. ती सांहिती, वारुणी व याज्ञिकी अशी तीन प्रकारची आहे. सातव्या प्रपाठकांत संहिताध्याय असल्यामुळें ती सांहिती, आठ व नऊ या दोन प्रपाठकांत ब्रह्मविद्या सांगितली असून तिचा प्रवर्तक वरुण असल्यामुळें ती वारुणी व शेवटच्या नारायणसंज्ञक खिलकांडात्मक प्रपाठकांत ब्रह्मविद्या व यज्ञोपयुक्त मंत्रहि ठिकठिकाणी सांगितलेले असल्यामुळें ती याज्ञिकी होय. वारुणी उपनिषदांत ब्रह्मप्राप्तिरूप परम पुरुषार्थाचें साधन ब्रह्मविद्या सांगितली आहे. म्हणून ती उपनिषद् मुख्य. पण तिचा अधिकार प्राप्त होण्यासाठीं सांहिती उपनिषदाचा पाठ करावा लागतो. कर्मानुष्ठानानें ब्रह्मजिज्ञासा—विविदिषा उत्पन्न होते. पण चित्तैकाग्र्य होत नाही. ध्यानाचा अभ्यास केल्यानेंच चित्तैकाग्र्य होतें. ऐकाग्र्यावांचून ब्रह्मसाक्षात्कार होत नाही. त्यासाठींच सांहिती उपनिषद् प्रथम सांगितली आहे. मनुष्याच्या ब्रह्मविद्येला देव विघ्नें करितात. त्यांच्या शांतीसाठीं सांहिती उपनिषदाच्या आद्य अनुवाकांत जप्य मंत्र सांगितला आहे. ब्रह्मविद्येची अरुचि हें पहिलें विघ्न आहे. तें संचित महापापांमुळें उद्भवतें. यज्ञदानादिकांच्या योगानें त्याची निवृत्ति होते व ब्रह्मज्ञानाविषयीं रुचि उत्पन्न होते. तीच पूर्वोक्त विविदिषा होय. विषयवैराग्य हें पापक्षयाचें चिह्न आहे. विरक्त विविदिषूचें चित्त उपासनेनें स्थिर होतें. पण व्याधि, आलस्य इत्यादि विघ्नें उपासनेला प्रतिबंध करितात. यास्तव त्यांची शांति होण्यासाठीं कोणत्या मंत्राचा जप करावा, तेंच अगोदर श्रुति सांगते—

ॐ शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा ।
शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः ॥

अन्वयार्थ—[मित्रः नः शं भवतु—] प्राणवृत्ति व दिवस यांची अभिमानिनी देवता आम्हांला सुखरूप—सुखावह होवो. [वरुणः नः शं भवतु—] अपान वृत्तीची व रात्रीची देवता—वरुण आम्हांला सुखकर होवो. [अर्यमा नः शं भवतु—] चक्षु व सूर्य यांची अभिमानिनी देवता—अर्यमा आम्हांला सुखावह होवो [इन्द्रः बृहस्पतिः च नः शं—] बलाची अभिमानी देवता इंद्र आणि वाक् व बुद्धि यांवर अभिमान ठेवणारी देवता बृहस्पति आम्हांला अनुकूल होवोत. [उरुक्रमः विष्णुः नः शं—] ज्याचा क्रम—पाउल विस्तीर्ण आहे असा पादाभिमानी विष्णु आम्हांला सुखकर होवो. (याप्रमाणें सर्व अध्यात्म म्ह. प्राण व इंद्रियें यांच्या अभिमानिनी देवता आम्हांला सुखकर झाल्या असतां विद्येचें श्रवण, धारण व उपयोग कोणत्याहि प्रकारच्या प्रतिबंधावांचून होऊं शकतात. म्हणून विद्यार्थी त्यांची आपल्याला अनुकूल—सुखकर होण्यासाठीं प्रार्थना करीत आहे.) —ब्रह्मजिज्ञासूकडून ब्रह्मविद्येच्या उपसर्गांची शांति व्हावी म्हणून वायुसंबंधी नमस्कार-वंदनक्रिया केल्या जातात. कारण सर्वकर्मफलें त्याच्या अधीन आहेत—

नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं
ब्रह्मासि । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्म वादिष्यामि ।
ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु ।
तद्वक्तारमवतु । अवतु मां । अवतु वक्तारं ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

इति शीक्षाध्याये प्रथमोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[ब्रह्मणे नमः—] वायुरूप ब्रह्माला नमस्कार असो [वायो ते नमः—] हे वायो, तुला नमस्कार असो. येथील 'ब्रह्म' या परोक्ष व 'वायु' या प्रत्यक्ष शब्दांनीं वायुच सांगितला जातो. [त्वं एव प्रत्यक्षं ब्रह्म असि—] तूंच चक्षुरादिकांच्या अपेक्षेनें बाह्य समीपवर्ती व अव्यवहित—साक्षात् ब्रह्म आहेस. [त्वं एव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि—] त्यामुळें मी तुलाच प्रत्यक्ष ब्रह्म म्हणेन. [ऋतं वदिष्यामि—] मी तुलाच ऋत म्हणेन. ऋत म्ह० बुद्धींत यथाशास्त्र व यथाकर्तव्य अतिशय निश्चित केलेला अर्थ. तें ऋतहि तुझ्याच अधीन असल्यामुळें

मी तुलाच तें ऋत म्हणेन. [सत्यं वदिष्यामि–] वाक् व शरीर यांच्या योगानें संपादन केला जाणारा जो अर्थ तोहि तुझ्या अधीन राहूनच संपादन केला जातो. यास्तव मी तुलाच सत्य म्हणेन. [तत् मां अवतु–] तें सर्वात्मक वायुसंज्ञक ब्रह्म, मजकडून अशाप्रकारें स्तुति केलें गेलेलें असें होत्सातें, मज विद्यार्थ्याचें विद्यासंयोगानें रक्षण करो. [तत् वक्तारं अवतु–] तेंच ब्रह्म वक्ता जो आचार्य त्याला वक्तृत्वसामर्थ्य देऊन त्याचें रक्षण करो, [मां अवतु वक्तारं अवतु–] माझें रक्षण करो, वक्त्याचें रक्षण करो. ही पुनरुक्ति आदरार्थ आहे. [शांतिः–] विद्याप्राप्तीच्या आध्यात्मिक उपसर्गांची शांति होवो. [शांतिः–] आधिभौतिक उपसर्गांची शांति होवो, [शान्तिः–] आधिदैविक उपसर्गांची शांति होवो. १. उपनिषद् अर्थप्रधान असतें. म्हणून त्याच्या ग्रंथपाठाविषयीचा यत्न शिथिल होऊं नये, यासाठी शीक्षाध्यायाचा आरंभ केला जातो—

ॐ शीक्षां व्याख्यास्यामः वर्णः स्वरः मात्रा
बलं साम संतानः । इत्युक्तः शीक्षाध्यायः ॥

इति शीक्षाध्याये द्वितीयोऽनुवाकः ॥

अन्वयार्थ—[शीक्षां–] जिच्या योगानें वर्णादिकांचें उच्चारणरूप शास्त्र शिकविलें जातें ती शिक्षा किंवा जिच्या योगानें वर्णादिक शिकविले जातात ती शिक्षा. तिचाच मुळांत 'शीक्षा' असा जो दीर्घ प्रयोग केला आहे तो छांदस आहे. अशा प्रकारच्या त्या शिक्षेचें [व्याख्यास्यामः–] आम्ही आतां व्याख्यान करितों. व्याख्यान म्ह० अगदी स्पष्टपणें सर्व प्रकारें कथन करितों. [वर्णः स्वरः मात्रा बलं साम संतानः–] अकारादि वर्ण, उदात्त-अनुदात्त-स्वरित हा स्वर, ह्रस्वादि मात्रा, उच्चारणासाठी विशेष प्रकारचा प्रयत्न हेंच बल, वर्णांचें मध्यम वृत्तीनें उच्चारण करणें हें साम व संतति म्ह० संहिता हेंच संतान. हा येथील शिकण्यास योग्य असा अर्थ आहे. [इति शीक्षाध्यायः उक्तः–] अशा प्रकारची शिक्षा ज्या अध्यायांत आहे तो हा शीक्षाध्याय याप्रमाणें सांगितला आहे. २.

सह नौ यशः । सह नौ ब्रह्मवर्चसं ॥

अन्वयार्थ—आतां संहितेसंबंधीं वर्णांची उपासना प्रथम सांगितली जाते. पण तिच्या आरंभीं संहितादि उपासनेच्या परिज्ञानामुळें प्राप्त होणाऱ्या ज्या यशाची प्रार्थना केली जाते तें[यशः नौ सह अस्तु—] यश आम्हां शिष्याचार्यांना एकाच वेळीं प्राप्त होवो. [ब्रह्मवर्चसं नौ सह अस्तु—] त्या निमित्तानें प्राप्त होणारें ब्रह्मवर्चस तेजहि आम्हांला सह—एकदाच प्राप्त होवो. प्रस्तुत आशीर्वाद हें शिष्याचें वचन आहे. कारण शिष्य अकृतार्थ असल्यामुळें त्याचीच ही—अशा प्रकारची प्रार्थना उपपन्न होते. कृतार्थ आचार्याची अशी प्रार्थना संभवत नाहीं. जो कृतार्थ असतो तोच आचार्य होऊं शकतो.

अथातः संहिताया उपनिषदं व्याख्यास्यामः । पञ्चस्वधिकरणेषु ।

अन्वयार्थ—[अथ—] अध्ययनाच्या विधानानंतर [अतः—] ज्याअर्थीं ग्रंथपाठाविषयींच्या भावनेनें अतिशय भावित झालेली बुद्धि—ग्रंथपाठाविषयींच्या वासनेनें वासित झालेली बुद्धि एकाएकीं अर्थज्ञानांत प्रवृत्त होत नाहीं त्याअर्थीं [संहितायाः उपनिषदं व्याख्यास्यामः—] संहितेचें उपनिषद्—संहिताविषयकदर्शन अगदीं स्पष्टपणें सांगतों. कोठें ? [पंचसु अधिकरणेषु—] पांच अधिकरणांमध्यें—आश्रयांमध्यें—ज्ञानविषयांमध्यें असा भावार्थ. (ज्ञानाचे विषय होणारे जे पांच आश्रय त्यांत संहिताविषयक दृष्टि कशी ठेवावी तें सांगतों—) —तींच पांच अधिकरणें—

अधिलोकमधिज्यौतिषमधिविद्यमधिप्रजम-
ध्यात्मम् । ता महासंहिता इत्याचक्षते ॥

अन्वयार्थ—[अधिलोकं०—] लोकांविषयीचें जें दर्शन तें अधिलोकदर्शन. तसेंच ज्योतिःसंबंधी दर्शन, विद्येसंबंधी दर्शन, प्रजेसंबंधीं दर्शन व शरीरसंबंधीं दर्शन. [ताः महासंहिताः इति आचक्षते—] या पांच उपासनांचे विषय लोकादि महावस्तु व संहिता हा असल्यामुळें त्यांना वेदवेत्ते महासंहिता असें म्हणतात. आतां त्यांतील अधिलोकदर्शन सांगतात—

अथाधिलोकम् । पृथिवी पूर्वरूपम् । द्यौरुत्तररूपम् ।
आकाशः संधिः (१) । वायुः संधानम् । इत्यधिलोकम् ॥

अन्वयार्थ—[अथ–] आतां अगोदर [अधिलोकं–] लोकांतील दर्शन सांगितलें जातें. [पूर्वरूपं पृथिवी–] संहिता म्ह० वर्णांचा अतिशय संनिधि. अर्थात् संधि. त्यांतील पूर्वरूप म्ह० पूर्ववर्ण ही पृथिवी आहे. संधींतील पूर्ववर्णाचे ठिकाणीं पृथिवीदृष्टि करावी. [उत्तररूपं द्यौः–] त्याच्या उत्तरवर्णाचे ठिकाणीं द्युलोकाची दृष्टि करावी. [संधिः आकाशः–] पूर्वोत्तरवर्णांच्या मध्य संधीचे ठिकाणी अन्तरिक्षलोकाची दृष्टि करावी. [संधानं वायुः–] ज्याच्या योगानें संधि होतो तें संधान. त्या संधानामध्यें वायुदृष्टि करावी. [इति अधिलोकं–] अशा रीतीनें हें अधिलोकदर्शन सांगितलें.

अथाधिज्यौतिषम् । अग्निः पूर्वरूपम् । आदित्य उत्तररूपम् ।
आपः संधिः । वैद्युतः संधानम् । इत्यधिज्यौतिषम् ॥

अन्वयार्थ—[अथ–] त्यानंतर आतां [अधिज्यौतिषं–] ज्योतींतील दर्शन सांगितलें जातें. [पूर्वरूपं अग्निः–] संहितेच्या पूर्ववर्णाचे ठिकाणीं अग्निदृष्टि करावी. [उत्तररूपं आदित्यः–] संहितेच्या उत्तरवर्णाचे ठिकाणीं आदित्यदृष्टि करावी. [संधिः आपः–] संधीमध्यें आप्-दृष्टि करावी. [संधानं वैद्युतः–] संधानामध्यें विद्युद्-दृष्टि करावी. [इति अधिज्यौतिषं–] हें ज्योतिर्विषयक संहितादर्शन आहे.

अथाधिविद्यम् । आचार्यः पूर्वरूपम् । अन्तेवास्युत्तररूपम् ।
विद्या संधिः । प्रवचनꣳ संधानम् । इत्यधिविद्यम् ॥

अन्वयार्थ—[अथ–] ज्योतिःसंबंधी उपासनावयवांचें व्याख्यान केल्यानंतर [अधिविद्यं–] विद्येसंबंधी ध्यान सांगतात–[पूर्वरूपं आचार्यः–] संहितेच्या पूर्ववर्णाचे ठिकाणीं आचार्यदृष्टि; [उत्तररूपं अन्तेवासी–] उत्तरवर्णाचे ठिकाणीं शिष्यदृष्टि; [संधिः विद्या–] मध्यप्रदेशीं विद्यादृष्टि, व [संधानं प्रवचनं–] संहितारूप संधानाचे ठिकाणीं प्रवचनाची दृष्टि ठेवावी. हें विद्याविषयक संहिताध्यान आहे. (आचार्याला उपदेश करावयास योग्य व शिष्याला पठन करावयास योग्य अशा ग्रंथाला येथें विद्या व ग्रंथाच्या पाठाला प्रवचन म्हटलें आहे.)

अथाधिप्रजम् । माता पूर्वरूपम् । पितोत्तररूपम् ।
प्रजा संधिः । प्रजननꣳ संधानम् । इत्यधिप्रजम् ॥

अन्वयार्थ—[अथ०—] आतां प्रजासंबंधी ध्यानाचें व्याख्यान करितात—पूर्ववर्णाचे ठिकाणी मातृदृष्टि, उत्तरवर्णाचे ठिकाणीं पितृदृष्टि, मध्यप्रदेशीं पुत्रदृष्टि व संहितास्वरूपांत प्रजननदृष्टि ठेवावी असें हें प्रजासंबंधीं संहितादर्शन आहे.

अथाध्यात्मम् । अधरा हनुः पूर्वरूपम् । उत्तराहनुरुत्तर-रूपम् । वाक्संधिः । जिह्वा संधानम् । इत्यध्यात्मम् ॥

अन्वयार्थ—[अथ०—] आतां आत्मसंबंधी उपासनेचे अवयव सांगतात. येथें देह, इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार व साक्षी चैतन्य यांच्या संघातास 'आत्मा' असें ह्मटलें आहे. कारण तो संघातच 'अहं' ह्मणजे मी या अनुभवाचा विषय होत असतो. त्या आत्म्याला उद्देशून प्रवृत्त झालेल्या उपासनेस अध्यात्म उपासना ह्मणतात. त्या उपासनेंत पूर्ववर्णाचे ठिकाणीं खालच्या हनुवटीची दृष्टि ठेवावी. उत्तरवर्णाच्या ठिकाणीं वरच्या हनुवटीची, संधीमध्यें वाग-दृष्टि व संधानामध्यें जिह्वादृष्टि करावी. असें हें अध्यात्मदर्शन आहे.

इतीमा महासंहिताः । य एवमेता महासंहिता व्याख्याता वेद । संधीयते प्रजया पशुभिः । ब्रह्मवर्चसेनान्नाद्येन सुवर्ग्येण लोकेन ॥

इति शीक्षाध्याये तृतीयोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[इति इमाः महासंहिताः—] अशा या महा संहिता आहेत. [यः एवं व्याख्याताः एताः महासंहिताः वेद—] जो कोणी या अशा प्रकारें व्याख्यान केलेल्या महासंहिताना जाणतो—त्यांची उपासना—ध्यान करितो [सः प्रजया पशुभिः ब्रह्मवर्चसेन अन्नाद्येन सुवर्ग्येण लोकेन संधीयते—] तो प्रजा, पशु, ब्रह्मवर्चस तेज, वीहि-यवादि अन्न व स्वर्गलोक यांनीं संयुक्त केला जातो. त्या उपासकाला प्रजादि-स्वर्गान्त फल प्राप्त होतें. ३

आतां मेधा—धारणाशक्ति व श्री—संपत्ति यांची इच्छा करणाराला त्यांच्या प्राप्तीचें साधन असा जप व होम सांगितला जातो—

यच्छन्दसामृषभो विश्वरूपः । छन्दोभ्योऽध्यमृतात्संबभूव । स मेन्द्रो मेधया स्पृणोतु । अमृतस्य देव धारणो भूयासम् ॥

अन्वयार्थ—[यः छन्दसां ऋषभः—] जो वेदांतील ऋषभासारखा आहे. कारण त्याला प्राधान्य आहे; [विश्वरूपः—] सर्वरूप आहे; कारण त्यानें सर्व

वाणीला व्यापलें आहे. याविषयीं 'ज्याप्रमाणें दोंठानें–शिरांनीं सर्व पान व्यापलेलें असतें त्याप्रमाणें अकारानें सर्व वाणी व्यापलेली आहे,' अशा अर्थाची 'तद्यथा शङ्कुना०' इत्यादि दुसरी श्रुति आहे. म्हणूनच ओंकाराला ऋषभत्व आहे. ओंकारच येथें–या प्रकरणांत उपास्य आहे. यास्तव 'ऋषभादि-'शब्दांनीं त्याची स्तुति करणें न्याय्यच आहे. [छन्दोभ्यः अमृतात् अधिसंबभूव–] छंदांपासून म्ह० वेदांपासून; वेदच अमृत आहे. त्या अमृतापासून तो आधिक्यानें प्रादुर्भूत झाला. (लोक, देव, वेद, व व्याहृति यापासून त्यांतील सर्वोत्कृष्ट सार काढून घेण्याची इच्छा करणाऱ्या व तप करणाऱ्या प्रजापतीला ओंकार अत्यंत साररूपानें आमला, असा याचा अर्थ. कारण नित्य ओंकाराची साक्षात् उत्पत्तीच झाली, अशी कल्पना करतां येत नाहीं.)–[सः इन्द्रः मा मेधया स्पृणोतु–] तो अशा प्रकारचा ओंकार, इंद्र–सर्व कामांचा ईश, परमेश्वर मला मेधेनें म्ह० प्रज्ञेनें प्रसन्न करो. किंवा बलयुक्त करो. येथें प्रज्ञाबलाची प्रार्थना केली जात आहे. [हे देव, अमृतस्य धारणः भूयासं-] हे देवा, मीं अमृताचा म्हणजे अमृतत्वाला कारण होणाऱ्या ब्रह्मज्ञानाचा. धारण ब्रह्मज्ञानप्रकरणाचा आरंभ झालेला आहे, 'धारणः' म्ह० धारण करणारा व्हावें. [मे शरीरं विचर्षणं–] तसेंच माझें शरीर विचर्षण म्ह० विचक्षण–योग्य होवो.

जिह्वा मे मधुमत्तमा । कर्णाभ्यां भूरि विश्रुवम् । ब्रह्मणः कोशोऽसि मेधया पिहितः । श्रुतं मे गोपाय । आवहन्ती वितन्वाना (१) । कुर्वाणाऽचीरमात्मनः । वासांसि मम गावश्च । अन्नपाने च सर्वदा । ततो मे श्रियमावह । लोमशां पशुभिः सह स्वाहा । आ मा यन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । विमाऽऽयन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । प्र माऽऽयन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । दमायन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । शमायन्तु ब्रह्मचारिणः स्वाहा । (२) ।

अन्वयार्थ—[मे जिह्वा मधुमत्तमा–] माझी जिह्वा मधुमत्तमा म्ह० अतिशय मधुर भाषण करणारी असो; [कर्णाभ्यां भूरि विश्रुवं–] दोन कानांनां म्ह० श्रोत्रेंद्रियांनी मी पुष्कळ ऐकावें. म्ह० मी श्रोता व्हावें, असा भावार्थ. शरीर व इंद्रियें यांचा संघात (समुदाय) आत्मज्ञानाला योग्य होवो, असा वाक्यार्थ. मेधाहि त्याचसाठीं प्रार्थिली जाते. [ब्रह्मणः कोशः असि–] हे

ओंकारा, तूं ब्रह्माचा—परमात्म्याचा कोश आहेस. कारण तरवारीच्या म्यानाप्रमाणें तूं त्याच्या उपलब्धीचें अधिष्ठान आहेस. तूंच ब्रह्माचें प्रतीक आहेस. तुजमध्यें ब्रह्म उपलब्ध होतें. [मेधया पिहितः—] मेधेनें म्ह० लौकिक प्रज्ञेनें आच्छादित झालेला तो तूं सामान्य बुद्धिमानांना ज्ञाततत्त्व होणारा नाहीस. म्ह० तुझें तत्त्व त्यांना ज्ञात झालेलें नाही. [मे श्रुतं गोपाय—] श्रुत म्हणजे श्रवणपूर्वक आत्मज्ञानादिक. माझ्या श्रुताचें तूं रक्षण कर. त्याची प्राप्ति, अविस्मरण, इत्यादि कर, असा याचा भावार्थ. ज्याला मेधेची इच्छा असते त्याच्या जपासाठीं हे मंत्र आहेत. आतां ज्याला श्रीची इच्छा असते त्याच्या होमाकरितां हे मंत्र सांगितले जातात. [मम वासांसि च गावः च अन्नपाने सर्वदा आवहन्ती वितन्वना आत्मनः अचीरं (अचिरं) कुर्वाणा—] मला वस्त्रें, गायी व अन्नपान हीं सर्वदा सत्त्वर आणून देणारी, त्यांचा विस्तार करणारी व तें सर्व मजपाशीं चिरकाल राहील असें करणारी जी श्री [श्रियं—] त्या श्रीला [ततः मे आवह—] मेधा दिल्यानंतर मजपाशी आण. कारण ज्याला मेधा नाही त्याला प्राप्त झालेली श्री अनर्थालाच कारण होते. आतां ती श्री कशा प्रकारची तें सांगतात— [लोमशां पशुभिः सह स्वाहा—] बकरी, मेंढी इत्यादिकांनीं युक्त; त्याचप्रमाणें अन्य पशूंनी युक्त अशा श्रीला आण. अशा रीतीनें प्रकरणाच्या आरंभावरून येथें ओंकाराचाच संबंध लाविला जातो. 'स्वाहा' असा जो स्वाहाकार आहे तो होमासाठीं असलेल्या मंत्राचा शेवट झाला हें सुचविण्यासाठीं आहे. [ब्रह्मचारिणः मा आयन्तु—] वैदिक—विद्याभ्यासपरायण शिष्य मज संप्रदायप्रवर्तक आचार्याकडे येवोत. मला असले शिष्य मिळोत. [स्वाहा—] या सर्व वाक्यांतील 'स्वाहा-'शब्द होमसूचक आहे. [ब्रह्मचारिणः मा वि-आ-यन्तु—] शिष्य मजपाशीं पशु, स्वर्ग, ब्रह्मलोक, मोक्ष या विविध फलासाठीं येवोत. [ब्रह्मचारिणः मा प्र-आ-यन्तु—] विद्याग्रहणाची उत्कृष्ट प्रज्ञा ज्यांना आहे असे शिष्य येवोत [ब्रह्मचारिणः दं आयन्तु—] बाह्येंद्रियचेष्टारूप बाललीलेपासून निवृत्त झालेले शिष्य येवोत. [ब्रह्मचारिणः शं आयन्तु—] शं—शांति—क्रोधादि चित्तदोषराहित्य त्यानें युक्त असलेले शिष्य येवोत.

यशो जनेऽसानि स्वाहा । श्रेयान्वस्यसोऽसानि स्वाहा । तं त्वा भग प्रविशानि स्वाहा । स मा भग प्रविश स्वाहा । तस्मिन्त्स-

हस्रशाखे । नि भगाहं त्वयि मृजे स्वाहा । यथाऽऽपः प्रवताऽऽयन्ति । यथा मासा अहर्जरम् । एवं मां ब्रह्मचारिणः । धातरायन्तु सर्वतः स्वाहा । प्रतिवेशोऽसि प्र मा भाहि प्र मा पद्यस्व (३)

इति शीक्षाध्याये चतुर्थोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[अहं जने यशः असानि—] मीं जनसमूहात यशस्वी व्हावें. [अहं वस्यसः श्रेयान् असानि—] मी वसुतर किंवा वसुमत्तर यांहून अतिशय प्रशस्य व्हावें. (वसु हा शब्द वस्—राहणें, किंवा आच्छादन करणें या धातूपासून झाला आहे. त्याचा अर्थ क्रमानें वसनशील किंवा पराच्छादनशील असा आहे. वसुतर म्ह० अतिशय वसु व वसुमत्तर म्ह० अतिशय वसुमान्) तसेंच [हे भग तं त्वा प्रविशानि स्वाहा—] हे भगवन्, त्या ब्रह्माच्या कोशभूत अशा तुला—तुजमध्यें मी प्रवेश करावा व प्रवेश करून, अनन्य—एकरूप—त्वद्रूपच व्हावें, असा याचा अर्थ. [हे भग—] भगवन्, पूजावन्, [सः त्वं मा प्राविश—] तो तूंहि मजमध्यें प्रवेश कर. म्हणजे आम्हां उभयतांचें एकत्वच असो. [तस्मिन् सहस्रशाखे त्वयि—] त्या तुज सहस्रशाखायुक्त म्ह० बहु भेदयुक्त प्रणवामध्यें [हे भग अहं निमृजे—] हे भगवन्, मी आपल्या पापाचरणाचें शोधन करतों.[यथा आपः प्रवता यन्ति—]ज्या प्रमाणें व्यवहारांत जल सखल प्रदेशाकडे जातें, किंवा [यथा मासाः अहर्जरं—] जसे महिने अहर्जरास प्राप्त होतात; अहर्जर—दिवसांच्या योगानें परिवर्तमान पावणारा संवत्सर लोकांना जीर्ण करतो; किंवा अहर् म्ह० दिवस त्यांत जिरतात, अन्तर्भूत होतात म्हणून तो अहर्जर होय. त्या अहर्जराला—संवत्सराला मास जसे जातात [एवं मां ब्रह्मचारिणः—] त्याप्रमाणें मजकडे ब्रह्मचारी [हे धातः—] हे धात्या, हे सर्वांच्या विधात्या, [सर्वतः आयन्तु—] सर्व दिशांनी, सर्व बाजूंनीं येवोत. [प्रतिवेशः असि—] प्रतिवेश म्ह० श्रम घालविण्याचें स्थान, शेजारचें घर, असा याचा भावार्थ. तसाच तूं प्रतिवेशासारखा प्रतिवेश आहेस. तुझें परिशीलन करणाऱ्या पुरुषांचें सर्व पाप व दुःख यांच्या निरसनाचें तूं स्थान आहेस. यास्तव [मा प्रभाहि—] मला आपलें स्वरूप प्रकट कर व [मा प्रपद्यस्व—] मला प्राप्त हो. रसायनक्रियेनें—रस करून एकरूप केलेल्या धातूप्रमाणें मला त्वन्मय—त्वद्रूप कर, असा याचा भावार्थ. (या विद्याप्रकरणामध्यें श्रीकामाचें जें कथन केलें

आहे तें धनासाठीं आहे. धन कर्मासाठीं आहे, कर्म संचित पापक्षयार्थ आहे; आणि संचित पापाचा क्षय झाला असतां विद्या प्रकाशमान होते.) ४.

—संहिताविषयक उपासना सांगितली. त्यानंतर मेधा व श्री यांची इच्छा करणाऱ्या पुरुषासाठी जप व होम यांचे मंत्र सांगितले. ते मंत्रहि परंपरेनें विद्योपयोगीच आहेत. त्यानंतर आतां स्वाराज्य हें फल देणाऱ्या व्याहृतिरूप हिरण्यगर्भास्य ब्रह्माचें अन्तरुपासन सांगतों—

भूर्भुवः सुवरिति वा एतास्तिस्रो व्याहृतयः। तासामु ह स्मैतां चतुर्थीम्। माहाचमस्यः प्रवेदयते। मह इति। तद्ब्रह्म। स आत्मा। अङ्गान्यन्या देवताः। भूरिति वा अयं लोकः। भुव इत्यन्तरिक्षम्। सुवरित्यसौ लोकः (१)। मह इत्यादित्यः। आदित्येन वाव सर्वे लोका महीयन्ते। भूरिति वा अग्निः। भुव इति वायुः। सुवरित्यादित्यः। मह इति चन्द्रमाः। चन्द्रमसा वाव सर्वाणि ज्योतींषि महीयन्ते। भूरिति वा ऋचः। भुव इति सामानि। सुवरिति यजूंषि (२)। मह इति ब्रह्म। ब्रह्मणा वाव सर्वे वेदा महीयन्ते। भूरिति वै प्राणः। भुव इत्यपानः। सुवरिति व्यानः। मह इत्यन्नम्। अन्नेन वाव सर्वे प्राणा महीयन्ते। ता वा एताश्चतस्रश्चतुर्था। चतस्रश्चतस्रो व्याहृतयः। ता यो वेद। स वेद ब्रह्म। सर्वेऽस्मै देवा बलिमावहन्ति (३)

अन्वयार्थ—[भूः भुवः सुवः इति वै एताः तिस्रः व्याहृतयः—] भूः भुवः सुवः अशा या तीन व्याहृति आहेत. 'भूः०' इत्यादि तीन प्रसिद्ध व्याहृतींचें स्मरण करून दिलें जातें. [तासा उ ह स्म एता चतुर्थी महः इति—] त्यांतीलच चतुर्थी 'महः' ही व्याहृति आहे. [माहाचमस्यः प्रवेदयते—] महाचमस्याचा पुत्र माहाचमस्य, तो या चवथ्या व्याहृतीला जाणतो. येथील 'उ ह स्म' हे तीन निपात मागील घडलेल्या वर्तमानाचें अनुकथन करण्यासाठी असल्यामुळें माहाचमस्य त्यांना जाणता झाला, पाहता झाला, असा याचा अर्थ जाणावा. 'मह' या चवथ्या व्याहृतीच्या ऋषीचें अनुस्मरण करण्यासाठीं 'माहाचमस्य' या नांवाचें ग्रहण केलें आहे. येथें त्याचा उपदेश केलेला असल्या-

मुळें ऋषीचें स्मरणहि उपासनेचें अंग आहे, असें वाटतें. [तत ब्रह्म–] ही जी 'महः' अशी माहाचमस्यानें पाहिलेली व्याहृति तें ब्रह्म आहे. कारण ब्रह्म महत् आहे व व्याहृति 'महः' आहे. पण तें ब्रह्म काय आहे ? [सः आत्मा–] तोच आत्मा आहे, कारण ' आप् ' हा धातु व्याप्ति हें कार्य या अर्थीं आहे. आत्म्याहून भिन्न असलेल्या व्याहृती, लोक, देव, वेद व प्राण ' महः' या आदित्य, चंद्र, ब्रह्म व अन्नभूत व्याहृत्यात्म्याकडून ज्या अर्थीं व्यापल्या जातात त्या अर्थीं [अन्याः देवताः अंगानि–] इतर देवता अंगें म्ह० अवयव आहेत. येथील देवता हा शब्द लोकादिकांच्या उपलक्षणार्थ आहे. देव, लोक, इत्यादि सर्व ' महः ' या व्याहृत्यात्म्याच्या अवयवभूत आहेत. कारण आदित्यादिकांच्या योगानें लोकादिक वृद्धि पावतात, असें सांगितलें आहे. [भूः इति वै अयं लोकः–] ' भूः ' ही व्याहृति हा लोक आहे. [भुवः इति अन्तरिक्षं–] 'भुवः' हा अन्तरिक्ष लोक आहे. [सुवर् इति असौ लोकः–] ' सुवर् ' हा स्वर्ग लोक आहे. [महः इति आदित्यः–] 'महः' हा आदित्य आहे. [आदित्येन वाव सर्वे लोकाः महीयन्ते–] आदित्याच्या योगानेंच सर्व लोक वृद्धि पावतात. [भूः इति वै अग्निः–] ' भूः ' ही व्याहृति हाच अग्नि आहे. [भुवः इति वायुः–] ' भुवः ' हा वायु आहे. [सुवर् इति आदित्यः–] 'सुवर्' हा आदित्य आहे. [महः इति चंद्रमाः–] ' महः' हा चंद्रमा आहे. [चन्द्रमसा वाव सर्वाणि ज्योतींषि महीयन्ते–] चंद्राच्या योगानें सर्व ज्योति वृद्धि पावतात. [भूः इति वै ऋचः–] ' भूः ' ह्या ऋचा आहेत. [भुवः इति सामानि–] ' भुवः ' हीं सामें आहेत. [' सुवर् ' इति यजूंषि–] ' सुवर् ' हीं यजुर्षें आहेत. [महः इति ब्रह्म–] ' महः ' हा ओंकार आहे. [ब्रह्मणा वाव सर्वे वेदाः महीयन्ते–] ओंकारानेंच सर्व वेद वृद्धि पावतात. (हा शब्दाधिकार–शब्दाचें प्रकरण असल्यामुळें येथें ' ब्रह्म-'शब्दाचा ओंकाराहून दुसरा अर्थ संभवत नाहीं.) [भूः इति वै प्राणः–] ' भूः ' ही व्याहृति हा प्राण आहे. [भुवः इति अपानः–] ' भुवः ' हा अपान आहे. [सुवः इति व्यानः–] ' सुवर् ' हा व्यान आहे. [महः इति अन्नं–] ' महः ' हें अन्न आहे. [अन्नेन वाव सर्वे प्राणाः महीयन्ते–] अन्नाच्या योगानें सर्व प्राण वृद्धि पावतात. [ताः वै एताः चतस्रः चतुर्धा–] त्याच ह्या व्याहृति प्रत्येकीं चार चार

होऊन चार प्रकारच्या होतात. [ताः यः वेदः—] त्या व्याहृतींना जो जाणतो [सः ब्रह्म वेद—] तो ब्रह्माला जाणतो. [सर्वे देवाः अस्मै बलिं आहरन्ति—] सर्व अंगभूत देव या विद्वानाला स्वाराज्यप्राप्ति झाली असता बलि आणतात. ५

'महः' या व्याहृतिरूप ब्रह्माची—भूः, भुवः, सुवर् या स्वरूपाच्या अन्य देवता ही—अंगें आहेत, असें 'अङ्गान्यन्या देवताः' या वाक्यानें सांगितलें. आतां ज्याच्या त्या अंगभूत देवता आहेत त्या ब्रह्माच्या साक्षात् ज्ञानाकरितां व उपासनेकरितां हृदयाकाश हें स्थान सांगितलें जातें. शालग्राम हें जसें विष्णूचें स्थान त्याचप्रमाणें हृदयाकाश हें ब्रह्माच्या ज्ञानादिकांचें स्थान आहे, कारण त्या हृदयाकाशांत मनोमयत्वादि धर्मांनी विशिष्ट असें ब्रह्म उपासना केलें जाऊं लागलें असतां साक्षात् उपलब्ध होतें; तसाच सर्वात्मभाव प्राप्त होण्यासाठीं मार्गहि सांगावा, या उद्देशानें हा पुढील सहावा अनुवाक आरंभिलेला आहे—

म य एषोऽन्तर्हृदय आकाशः । तस्मिन्नयं पुरुषो मनोमयः । अमृतो हिरण्मयः । अन्तरेण तालुके । य एष स्तन इवावलम्बते । सेन्द्रयोनिः । यत्रासौ केशान्तो विवर्तते । व्यपोह्य शीर्षकपाले । भूरित्यग्नौ प्रतितिष्ठति । भुव इति वायौ (१) । सुवरित्यादित्ये । मह इति ब्रह्मणि । आप्नोति स्वाराज्यम् । आप्नोति मनसस्पतिं । वाक्पतिश्चक्षुष्पतिः । श्रोत्रपतिर्विज्ञानपतिः । एतत्ततो भवति । आकाशशरीरं ब्रह्म । सत्यात्म प्राणारामं मनआनन्दम् । शान्तिसमृद्धममृतम् । इति प्राचीनयोग्योपास्स्व (२) ॥

इति शीक्षाध्याये षष्ठोऽनुवाक ।

अन्वयार्थ—[यः एषः अन्तर्हृदये आकाशः—] जो हा हृदयामध्यें—शुभ्रकमलाकार मासपिंडांत आकाश—अवकाश आहे [तस्मिन् सः अयं पुरुषः मनोमयः—] त्यांत तो हा पुरुष विज्ञानमय आहे. कारण विज्ञानाकारानें परिणत झालेल्या मनांतच तो पुरुष उपलब्ध होतो. किंवा जीव ज्याच्या योगानें मनन करितो तें मन म्ह० अन्तःकरण, त्याचा अभिमानी पुरुष तन्मय होय. [अमृतः हिरण्मयः—] तसाच तो पुरुष अमृत—अमरणधर्मा व हिरण्मय म्ह० ज्योतिर्मय आहे. अशा स्वरूपाच्या हृदयाकाशांत साक्षात् जाणलेल्या आत्मभूत विद्वानाला स्वरूपप्राप्तीसाठी मार्ग सांगितला जातो—[अन्तरेण तालुके—

हृदयापासून 'सुषुम्ना-'नांवाची नाडी वर प्रवृत्त झाली आहे. ती दोन्ही तालूंच्या मध्यभागीं शिरली आहे. [यः एषः स्तनः इव अवलंबते—] त्या दोन्ही तालूंच्यामध्यें जो हा स्तनासारखा मांसखंड—पडजीभ लोंबत आहे, त्यांतून ती नाडी वर शिरून [यत्र असौ केशान्तः विवर्तते—] ज्या मूर्धप्रदेशी हा केशान्त—केंसाचें मूळ विभागानें राहिलें आहे, त्या प्रदेशास प्राप्त होऊन तेथून ती बाहेर पडली आहे [व्यपोह्य शीर्षकपाले—] याप्रमाणें मस्तकाच्या कपालांना विदीर्ण करून बाहेर निघालेली जी सुषुम्ना [सा इंद्रयोनिः—] ती इंद्रयोनि आहे, इंद्राची म्ह० ब्रह्माची योनि—मार्ग—स्वरूपप्राप्तीचें द्वार आहे, असा याचा भावार्थ. असें चिंतन करणारा—मनोमय आत्म्याची उपासना करणारा त्या सुषुम्नानाडीनें मस्तकांतून निघून [भूः इति अग्नौ प्रतितिष्ठति—] या लोकाचा अधिष्ठाता, भूःव्याहृतिरूप व महद्ब्रह्माचा अंगभूत असा जो अग्नि त्यामध्यें प्रतिष्ठित होतो. तो अग्निरूपानें या लोकास व्यापतो, असा याचा भावार्थ. तसाच [भुवः इति वायौ—] 'भुवः' या व्याहृतीच्या ध्यानानें वायूमध्यें प्रतिष्ठित होतो. [सुवर् इति आदित्ये—] 'सुवर्' या व्याहृतीच्या ध्यानानें तृतीय व्याहृतिरूप आदित्यांत प्रतिष्ठित होतो. [महः इति ब्रह्मणि—] 'महः' या चतुर्थ व्याहृतीच्या ध्यानानें चतुर्थ व्याहृतिरूप अंगी ब्रह्मामध्यें उपासक प्रतिष्ठित होतो. [स्वाराज्यं आप्नोति—] तो याप्रमाणें ब्रह्मभूत होऊन स्वाराज्यास—स्वराड्भावास प्राप्त होतो. स्वतःच राजा—अधिपति होतो. अंगभूत देवांचें अंगी—ब्रह्म जसें अधिपति आहे त्याप्रमाणें ता अधिपति होतो. सर्व अंगभूत देव जसे ब्रह्माला तसेच त्यालाहि बलि आणून देतात. [मनसस्पतिं आप्नोति—] मनाच्या पतीला प्राप्त होतो. ब्रह्म सर्वात्मक असल्यामुळें तें सर्वांच्या मनांचें अधिपति आहे. सर्व मनांनींच ते ब्रह्म मनन करतें. असें जाणणारा उपासक त्याला प्राप्त होतो. तसेंच [वाक्पतिः०—] तो वाक्पति म्ह० सर्व वाणींचा पति होतो, चक्षूंचा पति होतो, श्रोत्रांचा पति होतो व सर्व विज्ञानांचा पति होतो. तो सर्वात्मक असल्यामुळें सर्व प्राण्याच्या इंद्रियांनीं इंद्रियवान् होतो, असा याचा भावार्थ. फार काय पण [एतत् ततः भवति—] याहूनहि तें अधिक होतें. तें काय म्हणून विचाराल तर सांगतों— [आकाश-शरीरं—] आकाश ज्याचें शरीर आहे किंवा आकाशाप्रमाणें ज्याचें शरीर सूक्ष्म आहे तें आकाशशरीर. पण तें काय? तर [ब्रह्म—] हें प्रकृत ब्रह्म

[सत्यात्म–] सत्य ह्म० मूर्तामूर्त–अमिथ्या स्वरूप हाच ज्याचा आत्मा ह्म० स्वभाव आहे, तें हें सत्यात्म आहे [प्राणारामम्–] प्राणामध्यें ज्याचें आरमण ह्म० आक्रीडा आहे तें प्राणाराम, किंवा ज्यांत प्राणांचा आराम आहे हें प्राणाराम [मन-आनन्दम्–] ज्याचें मन आनन्दभूत ह्म० सुखकरच आहे तें मन-आनन्द. [शान्तिसमृद्धम्–] शांति ह्म० उपशम. शांति तेंच समृद्ध, किंवा शांतीनें समृद्ध ब्रह्म उपलब्ध होतें, ह्मणून शांतिसमृद्ध. [अमृतम्–] अमरणधर्मी. हें सर्वांहून अधिक असलेलें विशेषण त्याच मनोमय इत्यादिकांमध्यें पहावें. [प्राचीनयोग्य इति उपास्स्व–] हे प्राचीनयोग्य शिष्या, अशा रीतीनें मनोमयत्वादि धर्मांनी विशिष्ट असलेल्या यथोक्त ब्रह्माची तूं उपासना कर. ही आचार्यवचनरूप उक्ति आदरार्थ आहे. ६

जें हें व्याहृत्यात्मक ब्रह्म उपास्य म्हणून सांगितलें आहे त्याचेंच आतां पृथिव्यादि पांक्तरूपानें उपासन सांगितलें जातें. पांच या संख्येच्या संबंधानें पंक्तिछंदाची संपत्ति त्यांत आहे. त्यामुळें पृथिव्यादि पुढें सांगितलेल्या सर्वांला पाङ्क्तत्व आहे. यज्ञ पांक्त आहे व पंक्ति पंचपदा आहे. कारण 'पाङ्क्तो यज्ञः' अशी श्रुति आहे. त्यामुळें हा विधि लोकापासून आत्म्यापर्यंत हें सर्व पांक्त आहे, अशी जी कल्पना करवितो, ती तो सर्व यज्ञाचीच परिकल्पना करवितो. त्या परिकल्पित यज्ञानें उपासक पाङ्क्तत्वरूप प्रजापतीला प्राप्त होतो. यास्तव हें सर्व पांक्त कसें, तेंच सांगतात—

पृथिव्यन्तरिक्षं द्यौर्दिशोऽवान्तरदिशाः । अग्निर्वायुरादित्यश्चन्द्रमा नक्षत्राणि । आप ओषधयो वनस्पतय आकाश आत्मा । इत्यधिभूतम् ॥

अन्वयार्थ—[पृथिवी अन्तरिक्षं०–] पृथिवी, अन्तरिक्ष, द्यौः, दिशा व अवान्तरदिशा हें लोकपांक्त; [अग्निः वायुः०–]अग्नि, वायु, आदित्य, चन्द्रमा, व नक्षत्रें, हें देवतापांक्त; [आप ओषधयः०–] आप, ओषधि, वनस्पति, आकाश व आत्मा हें भूतपांक्त; येथें आत्मा म्ह० विराट्. कारण हा भूताधिकार–भूतप्रकरण आहे. [इति अधिभूतं–] असें हें अधिभूत आहे. 'इत्यधिभूतं' हें वाक्य अधिलोक व अधिदैव या दोन पांक्तांच्या उपलक्षणार्थ आहे. कारण येथें लोकपांक्त व देवतापांक्त या दोन्हींचें कथन केलें आहे.

अथाध्यात्मम् । प्राणो व्यानोऽपान उदानः समानः । चक्षुः श्रोत्रं मनो वाक्त्वक् । चर्ममाꣳसꣳस्नावास्थि मज्जा । एतदधिविधाय ऋषिरवोचत् । पाङ्क्तं वा इदं सर्वम् । पाङ्क्तेनैव पाङ्क्तꣳस्पृणोतीति १

इति शीक्षाध्याये सप्तमोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[अथ अध्यात्मं–] आतां यापुढें अध्यात्म पांक्तत्रय सांगितलें जातें. [प्राणः व्यानः अपानः उदानः समानः–] त्यांतील प्राणादि हें वायुपांक्त, [चक्षुः श्रोत्रं मनः वाक् त्वक्-] चक्षुरादि हें इंद्रियपांक्त, व [चर्म मांसं स्नावा अस्थि मज्जा–] चर्मादि हें धातुपांक्त आहे. हें सर्व अध्यात्म एवढेंच आहे व बाह्य पांक्तच आहे, असा भावार्थ. [एतत् अधिविधाय–] अशी परिकल्पना करून [ऋषिः अवोचत्–] ऋषि म्ह० वेद किंवा या दर्शनानें संपन्न असलेला कोणी ऋषि म्हणाला. काय म्हणाला, तें श्रुति सांगते– [इदं सर्वं पांक्तं वै–] हें सर्व पांक्त आहे. [पाक्तेन एव पांक्तं स्पृणोति इति–] या आध्यात्मिक पांक्तानेंच बाह्य पांक्ताला पूर्ण करतो. कारण पांच ही संख्या दोन्ही ठिकाणीं समान आहे. म्ह० बाह्य व अध्यात्म यांना एकरूपानें पाहतो. आध्यात्मिक पांक्तत्रय बाह्य पांक्तरूपानें पाहतो, असा याचा भावार्थ. याप्रमाणें हें सर्व पांक्त आहे, अर्से जो जाणतो तो प्राजापत्यात्माच होतो. ७.

प्रथम व्याहृत्यात्मक ब्रह्माची उपासना सांगितली. त्यानंतर पांक्तरूपानें त्याचेंच उपासन सांगितलें. आतां सर्व उपासनेच्या अंगभूत ओंकाराच्या उपासनेचें विधान केलें जातें. कारण पर ब्रह्म व अपर ब्रह्म यांच्या दृष्टीनें उपासना केला जाणारा ओंकार शब्दमात्र जरी असला तरी पर व अपर ब्रह्माच्या प्राप्तीचें साधन होतो. विष्णूचें प्रतिमा हें जसें आलंबन आहे त्याचप्रमाणें ओंकार पर व अपर ब्रह्माचें आलंबन आहे. कारण याच प्रणवरूप आलंबनानें उपासक अपर व पर यांतील एका ब्रह्माला प्राप्त होतो, अशी श्रुति आहे. सु. प्र ५ पृ. ११९.

ओमिति ब्रह्म । ओमितीदꣳसर्वम् । ओमित्येतदनुकृति ह स्म वा अप्यो श्रावयेत्याश्रावयन्ति । ओमिति सामानि गायन्ति । ओꣳशोमिति शस्त्राणि शꣳसन्ति । ओमित्यध्वर्युः प्रतिगरं प्रतिगृणाति ।

ओमिति ब्रह्मा प्रसौति । ओमित्यग्निहोत्रमनुजानाति । ओमिति ब्राह्मणः प्रवक्ष्यन्नाह । ब्रह्मोपाप्नवानीति । ब्रह्मैवोपाप्नोति (१) ॥

इति शीक्षाध्याये अष्टमोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[ओं इति ब्रह्म–] ओमिति येथील 'इति' हा शब्द स्वरूपाचा परिच्छेद करण्यासाठीं आहे. 'ओं'हें शब्दस्वरूप ब्रह्म आहे, असें मनानें धारण करावें ह्म० उपासना करावी. कारण [ओं इति इदं सर्वं–] हें सर्व 'ओं-'च आहे. शब्दरूप ओंकाराकडून सर्व व्याप्त आहे. 'ज्याप्रमाणें देठानें सर्व पान व्याप्त असतें' अशी याविषयीं दुसरी श्रुति आहे. सर्व अभिधेय ह्म० वाच्य अभिधानतंत्र असतें, अर्थ शब्दाच्या अधीन असतो, असा न्याय आहे. यास्तव हें सर्व ओंकारच आहे, असें ह्मटलें जातें. ओंकाराच्या स्तुतीकरितां यापुढील ग्रंथ आहे. कारण त्याला उपास्यत्व आहे. ह्म० तो उपासनेचा विषय आहे. [ओं इति अनुकृतिः–] 'ओं' ही अनुकृति ह्म० अनुकरण आहे. मी करतों व मी जाईन असें कोणी ह्मटलें असता त्याचें दुसरा 'ओं' असें अनुकरण करतो. ह्मणून ओंकार ही अनुकृति आहे. [ह स्म वै–] हे तीन निपात त्याची प्रसिद्धि व्यक्त करणारे आहेत. ओंकाराचें अनुकृतित्व प्रसिद्ध आहे. तसेंच [ओ श्रावय इति आश्रावयति–]'ओ श्रावय' असें प्रैषपूर्वक प्रतिश्रवण करवितात.(दर्श-पूर्णमासादि यागांत यजुर्वेदोक्त कर्माचें अनुष्ठान करणारे अध्वर्यू जेव्हां आग्नीध्राला उद्देशून 'ओ श्रावय' असा प्रैषमंत्राचा प्रयोग करितात तेव्हा 'ओ श्रावय' असा मंत्र पढतात. ह्मणूनच आपस्तंबानें 'आ श्रावय, ओ श्रावय व ओं श्रावय' असे तीन मंत्र सांगितले आहेत. त्यांतील दुसरा पक्ष येथें श्रुतीनें घेतला आहे. मंत्रांतील 'ओ-'कार आग्नीध्र या नांवाच्या ऋत्विजाच्या संबोधनार्थ आहे 'हे आग्नीध्रा, हवि देण्याचा काल झाला आहे असें देवांना सांग.' असा त्याचा अर्थ आहे. त्यानंतर आग्नीध्र तसेंच प्रतिश्रवण करवितो.) त्याचप्रमाणें सामगाम करणारे [ओं इति सामानि गायन्ति–] 'ओं' असें म्हणून सामें गातात. [ओं शों इति शस्त्राणि शंसन्ति–] यज्ञांत शस्त्रांचें शंसन करणारेहि 'ओं' असें म्हणूनच शस्त्रें म्हणतात (शस्त्रें म्हणजे गीतिरहित ऋचा). तसाच [अध्वर्युः ओं इति प्रतिगरं प्रतिगृणाति–] अध्वर्यु 'ओं' असें म्हणून प्रतिगरास उद्देशून प्रतिगृणन करतो. ह्म० प्रतिशंसन उच्चारतो. [ओं

इति ब्रह्मा प्रसौति–] 'ओं' असें म्हणून ब्रह्मा अनुज्ञा देतो. प्रैषपूर्वक ऐकविती. [ओं इति अग्निहोत्रं अनुजानाति–] 'ओं' असें म्हणून अग्निहोत्रास अनुज्ञा देतो. ह्म० मी हवन करतों असें यजमानानें म्हटलें असतां 'ओं' असें म्हणून अनुज्ञा देतो [प्रवक्ष्यन् ब्राह्मणः ओं इति आह–] प्रवचन करणारा–अध्ययन करणारा ब्राह्मण 'ओं' असेंच म्हणतो. 'ओं' असें म्हणून अध्ययनास आरंभ करतो, असा याचा इत्यर्थ. [ब्रह्म उपाप्नवानि इति–] ब्रह्म ह्म० वेद त्याला मी प्राप्त व्हावें, त्याचें मी ग्रहण करीन, असें म्हणून [ब्रह्म एव उपाप्नोति–] वेद ग्रहण करतोच. किंवा ब्रह्म ह्म० परमात्मा. त्याला मी प्राप्त होतों, असें म्हणून आत्म्याला ब्रह्मापाशी नेऊन पोंचवीत असता 'ओं' असें म्हणतो; आणि तो त्या ओंकारानें ब्रह्माला प्राप्त होतोच. ज्या अर्थी ओंकारपूर्वक आरंभिलेल्या क्रियांना फलवत्त्व असतें ह्म० त्याच क्रिया सफल होतात त्याअर्थी ओंकाराची ब्रह्मरूपानें उपासना करावी, असा भावार्थ. ८.

–विज्ञानानेंच स्वाराज्यप्राप्ति होते, असें सांगितलें असल्यामुळें श्रौत-स्मार्त कर्में व्यर्थ आहेत, अशी शंका येते. ती न यावी म्हणून कर्मांना पुरुषार्थाचें साधनत्व आहे हें प्रदर्शित करण्यासाठी येथें त्यांचा उपन्यास केला आहे—

ऋतं च स्वाध्यायप्रवचने च । सत्यं च स्वाध्यायप्रवचने च । तपश्च स्वाध्यायप्रवचने च । दमश्च स्वाध्यायप्रवचने च शमश्च स्वाध्यायप्रवचने च । अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च । अग्निहोत्रं च स्वाध्यायप्रवचने च । अतिथयश्च स्वाध्यायप्रवचने च । मानुषं च स्वाध्यायप्रवचने च । प्रजा च स्वाध्यायप्रवचने च । प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च । प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च । सत्यमिति सत्यवचा राथीतरः । तप इति तपोनित्यः पौरुशिष्टिः । स्वाध्यायप्रवचने एवेति नाको मौद्गल्यः । तद्धि तपस्तद्धि तपः ॥

इति शीक्षाध्याये नवमोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[ऋतं च स्वाध्यायप्रवचने च–] ऋत म्हणजे काय तें वर –पृष्ठ १८४–सांगितलें आहे. स्वाध्याय म्ह० अध्ययन व प्रवचन म्ह०

अध्यापन किंवा ब्रह्मयज्ञ. या ऋतादिकांचें अनुष्ठान करावें, असा वाक्यशेष लावावा. म्ह० एवढे शब्द वाक्यपूर्तीकरितां अधिक जोडावे. [सत्यं च०—]सत्य भाषण किंवा वर जसें व्याख्यान केलें आहे, तसा त्याचा अर्थ समजावा. तप म्ह० कृच्छ्रादिक. दम म्ह०बाह्य इंद्रियांचा उपशम. शम म्ह० अन्तःकरणाचा उपशम. आधानास योग्य असलेले अग्नी, हवन करण्यास उचित असलेलें अग्निहोत्र; पूज्य अतिथि; मानुष ह्मणजे लौकिक विवाहादि उत्तम व्यवहार; तें मानुष जसें प्राप्त असेल तसेंच त्याचें अनुष्ठान करावें. प्रजा उत्पन्न करावी प्रजन म्ह० ऋतुकालीं भार्यागमन; प्रजाति म्हणजे पुत्रोत्पत्ति. पुत्राचें निवेशन करावें, त्याला विद्या व शील यांनीं संपन्न करून गृहस्थपदी स्थापावें. या सर्व कर्मांनीं युक्त असलेल्या पुरुषालाहि स्वाध्याय व प्रवचन यांचें यत्नपूर्वक अनुष्ठान करावें, असें सांगण्यासाठीं वरील ऋतादि प्रत्येक साधनाबरोबर स्वाध्याय व प्रवचन यांचें ग्रहण केलें आहे. कारण अर्थज्ञान स्वाध्यायाच्या अधीन असतें, परम श्रेय अर्थज्ञानाच्या अधीन असतें आणि प्रवचन त्याचें विस्मरण होऊं नये व धर्माची अतिशय वृद्धि व्हावी, यासाठी आहे. यास्तव स्वाध्याय व प्रवचन यांचा आदर करावा. [सत्यमिति—] म्ह० सत्याचेंच अनुष्ठान करावें, असें [सत्यवचाः राथीतरः—] ज्याचें वचन सत्यच आहे तो किंवा 'सत्यवचाः' हें ज्याचें नांव आहे तो राथीतर आचार्य मानतो. रथीतराचें जें गोत्रापत्य तो राथीतर.गोत्र म्ह० पौत्रापासून पुढील वंश. अर्थात् रथीतरवंशांतील राथीतर आचार्य सत्याचेंच अनुष्ठान करावें, असें समजतो. [तपः इति—] तपच करावें, असें [तपोनित्यः पौरुशिष्टिः—] म्ह० तपामध्यें नित्य तत्पर असलेला तपःपरायण किंवा 'तपोनित्य' या नांवाचा व पुरुशिष्टीचें अपत्य—पौरुशिष्टि आचार्य मानतो. [स्वाध्यायप्रवचने एव इति नाको मौद्गल्यः—] स्वाध्याय व प्रवचन यांचेंच अनुष्ठान करावें, असें 'नाक-'नांवाचा व मुद्गलाचें अपत्य—मौद्गल्य आचार्य मानतो [तत् हि तपः तत् हि तपः—] तेंच तप आहे; तेंच तप आहे ह्म० ज्या अर्थीं स्वाध्याय व प्रवचन हेंच तप आहे त्या अर्थीं त्यांचेंच अनुष्ठान करावें. पूर्वी एकदा सांगितलेल्याहि सत्य, तप, स्वाध्याय व प्रवचन यांचें पुनः ग्रहण आदरार्थ केलें आहे. मुमुक्षूनें त्यांचा अतिशय आदर करावा. ९.

—स्वाध्यायासाठीं पुढील मंत्र सांगितला आहे. विद्योत्पत्तीसाठीं तो स्वाध्याय आहे. कारण प्रकरण विद्येचें आहे. स्वाध्यायानें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे त्याच्या ठिकाणीं विद्योत्पत्ति होते—

अहं वृक्षस्य रेरिवा । कीर्तिः पृष्ठं गिरेरिव । ऊर्ध्वपवित्रो वाजिनीव स्वमृतमस्मि । द्रविणꣳ सवर्चसम् । सुमेधा अमृतोक्षितः । इति त्रिशङ्कोर्वेदानुवचनम् (१) ॥

इति शीक्षाध्याये दशमोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[अहं वृक्षस्य रेरिवा—] मी वृक्षाचा म्ह० उच्छेदरूप संसारवृक्षाचा 'रेरिवा-'अन्तर्यामिरूपानें प्रेरयिता—प्रेरणा करणारा आहें [कीर्तिःगिरेः पृष्ठं इव—] माझी कीर्ति—ख्याति पर्वताच्या पृष्ठाप्रमाणें उंच आहे. [ऊर्ध्वपवित्रः—] मी ऊर्ध्वपवित्र आहें. ज्या मज सर्वात्म्याचें पवित्र—पावन—ज्ञानप्रकाश्य ऊर्ध्व-कारण परम ब्रह्म आहे तो मी ऊर्ध्वपवित्र होय. [वाजिनि इव स्वमृतं अस्मि—] वाज म्ह० अन्न, त्यानें युक्त असलेल्या वाजवानामध्यें—सूर्यामध्यें असा भावार्थ; ज्याप्रमाणें शेंकडों श्रुति-स्मृतीवरून प्रसिद्ध असलेलें विशुद्ध अमृत आत्मतत्त्व सवित्यामध्यें आहे त्याप्रमाणें मीहि स्वमृतं—शोभन विशुद्ध आत्मतत्त्व आहें [सवर्चसं द्रविणम्—]तेंच आत्मतत्त्व—मी दीप्तियुक्त धन आहें,अशी 'अस्मि'या क्रियापदाची अनुवृत्ति होते. अथवा ब्रह्मज्ञान आत्मतत्त्वप्रकाशक असल्यामुळें 'सव-र्चसं'—दीप्तियुक्त आहे.तें धनासारखें आहे. कारण तें मोक्षसुखाचें निमित्त आहे. पण या दुसऱ्या पक्षीं वरील 'अस्मि' या पदाची अनुवृत्ति न करतां तें धनासारखें दीप्तियुक्त आत्मज्ञान मला प्राप्त झालें आहे, असा अध्याहार करावा. [सुमेधाः—] ज्याची शोभना—सर्वज्ञलक्षणा मेधा आहे तो मी ' सुमेधाः' आहें. संसारस्थिति, उत्पत्ति व संहार यांचें कौशल असल्यामुळें मला सुमेधस्त्व आहे, म्हणूनच मी [अमृतः—] म्ह० अमरणधर्मा व [अक्षितः—] म्ह० अक्षीण—अव्यय आहें. किंवा ' उक्षितः ' असें पद तोडावें. म्ह० मी अमृतानें ' उक्षित ' म्ह० सिक्त —सिंचिला गेलेला—आहें. कारण ' अमृतोक्षितोऽहम् ' इत्यादि ब्राह्मण आहे. [इति त्रिशंकोः वेदानुवचनं—] असें हें त्रिशंकुऋषीचें—ब्रह्मभूत ब्रह्मवेत्त्या मुनीचें—वेदानुवचन आहे. वेद म्ह० वेदन, आत्म्याचें एकत्वविज्ञान. त्याच्या प्राप्तीनंतरचें जें वचन, जें वेदानुवचन. आपली कृतकृत्यता प्रकट करण्यासाठी

वामदेवाप्रमाणें त्रिशंकूनें आर्षदर्शनानें—दिव्यदृष्टीनें पाहिलेला हा मन्त्राम्नाय आत्मविद्याप्रकाशक आहे, असा याचा भावार्थ. १०.

—ब्रह्मविज्ञानापूर्वी श्रौत-स्मार्त कर्मे अवश्य करावी, असें सांगण्यासाठीं पुढील कर्तव्योपदेश—

वेदमनूच्याऽऽचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति ।

अन्वयार्थ—[वेदं अनूच्य०—] वेद शिकवून आचार्य शिष्याला अनुशासन करतो. ह्म० ग्रंथग्रहणानंतर उपदेश करतो; त्याच्या अर्थाचें ग्रहण करवितो, असा याचा भावार्थ. यावरून ज्यानें वेदाध्ययन केलेलें आहे त्यानें धर्मजिज्ञासा केल्यावांचून गुरुकुलांतून परत येऊं नये, असें ज्ञात होतें. 'कर्मांचें यथावत् ज्ञान करून घेऊन नंतर त्यांच्या अनुष्ठानास आरंभ करावा,' अशी स्मृतिहि आहे. आता आचार्य कसें अनुशासन करतो तें वेद सांगतो—

सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् (१) ।

अन्वयार्थ—[सत्यं वद—] सत्य भाषण कर. प्रमाणतः जसें अवगत झालें असेल तसेंच जें बोलावयाचें असेल तें बोल. [धर्मं चर—] तसेंच धर्माचें आचरण कर. अनुष्ठान करण्यास उचित असलेल्या सामान्य आचरणाचें 'धर्म' हें नांव आहे. कारण सत्यादि विशेष धर्मांचा पृथक् निर्देश केला आहे. [स्वाध्यायात् मा प्रमदः—] स्वाध्याय ह्म० अध्ययन. त्यापासून प्रमाद पावूं नको. ह्म० त्याविषयीं अनवधान करूं नको [आचार्याय प्रियं धनं आहृत्य प्रजातंतुं मा व्यवच्छेत्सीः—] विद्यानिष्क्रयार्थ आचार्याला इष्ट धन आणून देऊन, आचार्यानें अनुज्ञा दिली असतां अनुरूप भार्येचें पाणिग्रहण करून प्रजातंतूचा —प्रजेच्या संतानाचा—व्यवच्छेद करूं नको. प्रजासंततीचा विच्छेद करूं नये. पुत्र जर उत्पन्न होत नसेल तर पुत्रकाम्यादि कर्मानें त्याला उत्पन्न करण्याविषयीं यत्न करावा, असा याचा अभिप्राय. [सत्यात् न प्रमदितव्यं—] सत्यापासून प्रमादयुक्त होऊं नये. सत्याविषयीं प्रमाद करूं नये. सत्यापासून प्रमदन

ह्मणजे असत्याचा प्रसंग. कारण प्रमाद या शब्दाच्या सामर्थ्यावरूनच तसें ठरतें, कधीं विसरूनहि अनृत भाषण करूं नये, असा याचा भावार्थ. [धर्मात् न प्रमदितव्यं–] धर्मापासून प्रमाद पावूं नये, 'धर्म-'शब्द अनुष्ठेयविषय असल्यामुळें त्याचें अननुष्ठान हाच प्रमाद आहे. पण तो करूं नये. ह्मणजे धर्माचें अनुष्ठान करावेंच, असा याचा भावार्थ. [कुशलात् न प्रमदितव्यं–] त्याचप्रमाणें आत्मरक्षणार्थ जें कुशल कर्म त्यापासून प्रमाद पावूं नये. [भूत्यै न प्रमदितव्यं–] भूति ह्म० विभूति–ऐश्वर्य; त्या भूतीसाठीं असलेलें जें मंगलयुक्त कर्म त्यापासून प्रमाद पावूं नये. [स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यं–] स्वाध्याय ह्म० स्वतः अध्ययन करणें व प्रवचन शुद्ध अध्यापन, यांपासून प्रमाद पावूं नये. तीं दोन्हीं नियमानें करावीं असा याचा भावार्थ.

देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि । तानि सेवितव्यानि । नो इतराणि । यान्यस्माकꣳसुचरितानि । तानि त्वयोपास्यानि (२) । नो इतराणि ।

अन्वयार्थ––[देव-पितृकार्याभ्यां न प्रमदितव्यं–] त्याचप्रमाणें देवकार्य व पितृकार्य यांपासून प्रमाद पावूं नये. ह्म० देवकर्म व पित्र्यकर्म अवश्य करावें. [मातृदेवो भव–] माता हाच ज्याचा देव आहे असा तूं मातृदेव हो. [पितृदेवः०–] तसाच पितृदेव, आचार्यदेव व अतिथिदेव हो. या सर्वांची देवतांप्रमाणें उपासना करावी, असा याचा भावार्थ. [यानि अनवद्यानि कर्माणि–] तशींच जीं अनवद्य व अनिंदित शिष्टाचारलक्षण कर्में [तानि सेवितव्यानि–] तीं सेवावीं. तूं तीं करावींस. [इतराणि नो–] दुसरीं सदोष अकर्तव्यें शिष्टकृत जरी असलीं तरी करूं नये. (शिष्टांचीहि अकार्ये करूं नयेत) [यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वया उपास्यानि–] जीं आम्हां आचार्यांचीं सुचरितें–शोभन आचरणें–शास्त्रादिकांच्या विरुद्ध नसलेलीं कर्में तींच तूं उपासावींस. अदृष्टाकरितां तूं त्यांचेंच अनुष्ठान करावेंस. नियमानें तीं करावींस, असें तात्पर्य. [इतराणि नो–] आचार्यांनीं केलेलींहि इतर ह्म० विपरीत कर्में तूं करूं नयेस.

ये के चास्मच्छ्रेयाꣳसो ब्राह्मणाः । तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम् ॥

अन्वयार्थ—[ये के च अस्मच्छ्रेयांसः ब्राह्मणाः—] जे कोणी आचार्यादि धर्मांनीं विशिष्ट असलेले—आम्हांहून अधिक प्रशस्त व तेहि ब्राह्मण, क्षत्रियादिक नव्हेत; [तेषां आसनेन त्वया प्रश्वसितव्यं—] त्यांना आसनानें ह्म० आसन देणें इत्यादि उपचारांनीं तूं प्रश्वसित करावेंस. प्रश्वसन ह्म० प्रश्वास; श्रमांचा अपनय—श्रमपरिहार; त्यांचा श्रम तूं घालवावास, असा भावार्थ आणि त्यांच्या आसनानंतर ह्म० ते बसल्यावर गोष्टीचें निमित्त उद्भवलें असतां त्यांच्या ठिकाणीं प्रश्वसित होऊं नये म्हणजे प्रश्वासहि करूं नये. श्वास घेण्यासाठीं म्हणूनहि त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करूं नये तर ते जें बोलतील त्याचें सार ग्रहण करणारा, असें तूं व्हावेंस ह्म० त्यांच्या भाषणाकडे थोडेंसुद्धां दुर्लक्ष न करितां त्यांतील सार ग्रहण करावें.

श्रद्धया देयम् । अश्रद्धयाऽदेयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् (२) । ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः । अथाभ्याख्यातेषु । ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः । युक्ता आयुक्ताः । अलूक्षा धर्मकामाः स्युः । यथा ते तेषु वर्तेरन् । तथा तेषु वर्तेथाः ।

अन्वयार्थ—[श्रद्धया देयं—] तसेंच जें कांहीं द्यावयाचें असेल तें श्रद्धेनेंच द्यावें. [अश्रद्धया अदेयं—] अश्रद्धेनें देऊं नये. [श्रिया देयं—] विभूतीनें द्यावें ह्म० ऐश्वर्याला शोभेल असें द्यावें. आपल्या शक्तीप्रमाणें द्यावें. [ह्रिया देयं—] लज्जेनें द्यावें; [भिया देयं—] भीतीनें द्यावें; [संविदा देयं—] संविद् ह्म० मित्रादिकांचें कार्य. त्या कार्याच्या निमित्तानें द्यावें. [अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात्—] अशा रीतीनें सर्व व्यवहार करणाऱ्या तुला जर कदाचित्—एखादे वेळीं—श्रौत किंवा स्मार्त कर्म अथवा आचारलक्षण वृत्त यांविषयीं संशय आला तर [तत्र ये संमर्शिनः ब्राह्मणाः युक्ताः आयुक्ताः—] त्या देशांत किंवा त्या कालीं जे विचार करण्यास समर्थ असे ब्राह्मण त्या कर्मादिकांत 'युक्त' व 'आयुक्त' असतात, युक्त ह्म० कर्म किंवा वृत्त—आचरण—यांत सर्व प्रकारें नियुक्त केलेले व आयुक्त ह्म० दुसऱ्याकडून प्रेरित न झालेले—

स्वतंत्र, [अलूक्षाः—] अरूक्ष, अक्रूरमति—ज्यांची बुद्धि क्रूर नाहीं, [धर्मकामाः स्युः—] अदृष्टाची—पुण्याची इच्छा करणारे, कामानें हत—विवेकरहित न झालेले, असा याचा भावार्थ, [ते तत्र यथा वर्तेरन्—] ते ब्राह्मण त्या कर्मांत, किंवा आचारांत ज्या प्रकारें वागत असतील [तथा तत्र वर्तेथाः—] तसाच तूंहि त्या कर्मादिकांत वाग. [अथ अभ्याख्यातेषु—] त्याचप्रमाणें अभ्याख्यात पुरुषांमध्यें ह्म० ज्यांच्यावर कोणी संदिग्ध दोषारोप केला आहे अशा पुरुषांशीं व्यवहार करावयाचा प्रसंग आला असतां [तत्र ये समर्शिनः युक्ताः आयुक्ताः अलूक्षाः धर्मकामाः ब्राह्मणाः स्युः—] त्या देशांत किंवा त्या समयीं जे विचारी, कर्मप्रधान, स्वतंत्र, अरूक्ष व धर्माची इच्छा करणारे ब्राह्मण असतील [ते तत्र यथा वर्तेरन् तथा तेषु वर्तेथाः—] ते त्यांच्याशीं जसा व्यवहार करतील तसाच तूंहि त्यांच्याशीं वाग.

एष आदेशः । एष उपदेशः । एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमु चैतदुपास्यम् (४)॥

इति शीक्षाध्याये एकादशोऽनुवाकः ।

अन्वयार्थ—[एषः आदेशः—] हा आदेश म्ह० विधि आहे. [एषः उपदेशः—] हा पुत्रादिकांस पित्रादिकांचा उपदेश आहे. [एषा वेदोपनिषद्—] ही वेदोपनिषद् म्ह० वेदरहस्य, वेदार्थ आहे. [एतत् अनुशासनं—] हेंच अनुशासन म्ह० ईश्वरवचन आहे. किंवा आदेशवाक्य असा जो विधि त्याचें कथन वर केलेलें असल्यामुळें हें सर्व प्रमाणभूत उपदेशकांचें अनुशासन आहे, असें याचें तात्पर्य. [एवं उपासितव्यं—] ज्या अर्थीं असें आहे त्या अर्थीं वर जसें सांगितलें आहे तसें सर्व करावें. [एवं उ च एतत् उपास्यं—] असेंच हें करावें आणि तें करावेंच, त्याला कधींहि सोडूं नये; असें आदरार्थ पुनः सांगितलें आहे. ११.

शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा । शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मावादिषम् । ऋतमवादिषम् । सत्यमवादिषम् । तन्मामावीत्

तद्वक्तारमावीत्। आवीन्माम्। आवीद्वक्तारम्।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः (१) ॥

इति शीक्षाध्याये द्वादशोऽनुवाकः ॥

अन्वयार्थ—मागील विद्याप्राप्तीचे उपसर्ग शांत व्हावें, म्हणून 'शं नो मित्रः०' ही शांति येथें पढली आहे. पूर्वी—पृ. १८४—या शांतीचा अर्थ होऊन गेला आहे. पण येथें विद्या संपलेली असल्यामुळें 'अवादिषम्' 'तन्मामावति,' 'तद्वक्तारमावीत,' इत्यादि भूतकाळी प्रयोग केले आहेत. आरंभीच्या शांतींत 'वदिष्यामि' व 'अवतु' असे भविष्यत्काळी व प्रार्थना या अर्थी प्रयोग केले होते. यास्तव येथें 'तुलाच प्रत्यक्ष ब्रह्म ह्मटलें, मी ऋत बोललों, सत्य बोललों, तें माझें रक्षण करतें झालें;' इत्यादि अर्थ करावा. १२.

इति शीक्षाध्यायः समाप्तः।

अथ ब्रह्मवल्ल्यध्यायः।

शं नो मित्रः शं वरुणः.....अवतु वक्तारम् ॥ सह नाववतु
.....मा विद्विषावहै ॥ ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अन्वयार्थ—'शं नो मित्रः०' इत्यादि शांति पूर्वीच्या विद्येच्या प्राप्तीला होणारे जे उपसर्ग त्यांच्या शमनासाठीं पढली. आतां पुढील ब्रह्मविद्याप्राप्तीच्या उपसर्गांचें शमन व्हावें ह्मणून 'शं नो मित्रः०' व 'सहनाववतु०' अशा दोन शांति पढतात. त्यांतील 'शं नो मित्रः०' या शांतीचा अर्थ पृ. १८४ वर व 'सह नौ अवतु०' या शांतीचा अर्थ पृ. ११ वर पहा. कर्मांशीं विरुद्ध नसलेलीं संहितादिविषयक उपासनें शीक्षाध्यायांत आरंभीं सांगितलीं. त्यानंतर हृदयांत सोपाधिक आत्मदर्शन सांगितलें. तें व्याहृतींच्या द्वारा स्वाराज्य हें फल देणारें आहे. पण तेवढ्यानें अशेषतः (म्ह० पूर्णपणें) संसारबीजाचा नाश होत नाहीं. यास्तव सर्व उपद्रवांचें बीज जें अज्ञान त्याच्या निवृत्तीकरितां सर्व प्रकारच्या उपाधींनीं रहित अशा आत्मदर्शनासाठी 'ब्रह्मविदाप्नोति परं०' इत्यादि हें पुढील प्रकरण आरंभिलें जात आहे.—वेद आरंभींच ब्रह्मविद्येचें फल सांगतो—

ॐ ब्रह्मविदाप्नोति परम् ।

अन्वयार्थ—[ब्रह्मविद्–] यांतील ब्रह्म म्हणजे पुढें ज्याचें लक्षण सांगावयाचें आहे तें. अतिशय मोठें असल्यामुळें तें ब्रह्म. तें जो जाणतो तो ब्रह्मविद्. [आप्नोति–] प्राप्त होतो. [परं–] निरतिशयाला, ज्याहून अधिक आणखी कांहीं नाहीं, त्या ब्रह्माला–त्याच निरतिशय ब्रह्माला प्राप्त होतो. (याविषयीं सविस्तर उपपत्ति भाष्यार्थांत पहा.)

–पूर्वोक्त सूत्रभूत वाक्यानें ज्याचा वेद्यत्वानें थोडक्यांत उल्लेख केला आहे त्याच्याच विशेष स्वरूपाचा निश्चय करण्यासाठी पुढील ऋचा उदाहरणार्थ दिली जाते—

तदेषाऽभ्युक्ता । सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नते सर्वान्कामान्सह । ब्रह्मणा विपश्चितेति ॥

अन्वयार्थ—[तत्–] त्याच ब्राह्मणवाक्योक्त अर्थी [एषा अभ्युक्ता–] ही ऋचा म्हटलेली आहे. पुढील वाक्य ब्रह्माच्या लक्षणार्थ आहे. [सत्यं ब्रह्म–] सत्य–अव्यभिचरित–अबाधितस्वरूप ब्रह्म आहे. सत्य हें विशेषण ब्रह्माला विकारापासून निवृत्त करितें. [ज्ञानं ब्रह्म–] तें ज्ञप्ति-बोध–अनुभवरूप आहे. ब्रह्म चेतन आहे. [अनन्तं ब्रह्म–] तें अन्तरहित–परिच्छेदशून्य आहे. (अर्थात् ब्रह्म निर्विकार चेतन व अखंड आहे. तें सत्यं ज्ञानं व अनन्तं या विशेषणांचें विशेष्य आहे. सत्यादि तीन विशेषणें त्याची अनृत, जड व परिच्छिन्न अनात्मपदार्थांपासून व्यावृत्ति करितात.)–[यः परमे व्योमन् (व्योम्नि) गुहायां निहितं वेद–] जो अधिकारी जिज्ञासु तें पूर्वोक्त विशेषणांनीं विशिष्ट असलेलें ब्रह्म हृदयावच्छिन्न आकाशांत जी बुद्धिसंज्ञक गुहा आहे तिच्यामध्यें साक्षिरूपानें अभिव्यक्त झालें आहे, असें जाणतो [सः सर्वान् कामान् विपश्चिता ब्रह्मणा सह अश्नुते–] तो अशा प्रकारें ब्रह्माला जाणणारा ज्ञानी सर्व कामांना–भोगांना एकाच वेळीं–एका क्षणांतच बुद्धीवर आरूढ झालेल्या सर्व भोगांस सर्वज्ञ ब्रह्मानें–ब्रह्मस्वरूपाहून व्यतिरिक्त नसलेल्या व सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें नित्य असलेल्या उपलब्धीनें–ज्ञप्तीनें भोगतो. (त्या उपलब्धीलाच सत्य, ज्ञान व अनन्त असें वर म्हटलें आहे. ' ब्रह्मणा सह ' या वाक्यानें हा अर्थ सांगितला जातो–ब्रह्मभूत विद्वान् ब्रह्मस्वरूपानेंच सर्व कामांचा एकाच वेळीं उपभोग घेतो. म्हणजे ज्याप्रमाणें इतर सर्व

लोक उपाधिकृत स्वरूपानें म्हणजे जलांतील सूर्याच्या प्रतिबिंबाप्रमाणें वगैरे प्रतिबिंबभूत सांसारिक आत्म्याच्या योगानें धर्मादि निमित्तांची व चक्षुरादि इंद्रियांची—साधनांची ज्यांना अपेक्षा आहे अशा कामांना क्रमानें भोगतात त्याप्रमाणें तो धर्मादि-निमित्तापेक्ष व इंद्रियापेक्ष भोग औपाधिक आत्म्याच्या योगानें क्रमानें भोगीत नाहीं. तर तो वर सांगितलेल्या प्रकारच्या सर्वज्ञ, सर्वगत, नित्यब्रह्मात्मस्वरूप अशा सर्वात्मरूपानें ज्यांना धर्मादि निमित्तांची व चक्षुरादि इंद्रियांची अपेक्षा नाहीं अशा सर्व कामांस एकाच वेळीं भोगतो, असा याचा भावार्थ. विपश्चित् म्ह० मेधावी व सर्वज्ञ अशा ब्रह्माच्या योगानें; जें सर्वज्ञत्व तेंच विपश्चित्त्व होय. यास्तव त्या सर्वज्ञस्वरूप ब्रह्मानें पुरुष उपभोग घेतो. मूळ श्रुतींत 'विपश्चिता इति' असा जो 'इति-'शब्द आहे तो मंत्राच्या परिसमाप्त्यर्थ आहे. जे सुखाचे प्रकार हिरण्यगर्भादि उपाधींमध्यें भोग्यत्वानें अभिमत आहेत ते सर्व ब्रह्मानन्दाहून भिन्न नाहींत. त्यामुळें ब्रह्मीभूत विद्वान् सर्व आनंदांचा उपभोग घेतो. म्हणून गौण रीतीनें 'सर्वान् कामान्' असें मुळांत बहुवचन योजलें आहे.) 'ब्रह्मविदाप्नोति परं' या ब्राह्मणवाक्यानें या वल्लीचा सर्वच अर्थ सूत्रित केला व त्या सूत्रित अर्थाचें मंत्रानें संक्षेपतः व्याख्यान केलें. आतां त्याचाच सविस्तर अर्थनिर्णय करावा म्हणून त्याच्याच वृत्तिस्थानीं असलेला पुढील ग्रंथ आरंभिला जातो—

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः। आकाशाद्वायुः। वायोरग्निः। अग्नेरापः। अद्भ्यः पृथिवी। पृथिव्या ओषधयः। औषधीभ्योऽन्नम्। अन्नात्पुरुषः। स वा एष पुरुषोऽन्नरसमयः।

अन्वयार्थ—[तस्मात् वै एतस्मात् आत्मनः—] 'तस्मात' या पदांतील 'तत्' या शब्दानें मूळ वाक्यांत सूत्रित केलेल्या ब्रह्माचा परामर्श केला जातो व त्यानंतर मंत्रवाक्यानें जसें लक्षण सांगितलें आहे तशा ब्रह्माचा 'एतस्मात्'या वाक्यांतील'एतत्'या शब्दानें परामर्श केला आहे. यास्तव जें ब्रह्म आरंभीं ब्राह्मणवाक्यानें सूत्रित केलें आहे व जें ब्रह्म त्यानंतर लागलेंच 'सत्यं ज्ञानं अनन्तं०' अशा रीतीनें लक्षित केलें आहे, त्या ब्रह्मापासून—आत्म्यापासून—आत्मशब्दवाच्य ब्रह्मापासून, कारण ब्रह्म सर्वांचा आत्मा आहे. त्याविषयीं 'तें सत्च सत्य आहे. तो आत्मा आहे,' अशी दुसरी श्रुति आहे. त्यामुळें ब्रह्म

आत्मा आहे. त्या ह्या आत्मस्वरूप ब्रह्मापासून [आकाशः संभूतः—] आकाश उत्पन्न झालें. आकाश म्हणजे शब्द हा ज्याचा गुण आहे व जो मूर्त द्रव्यांना अवकाश देतो तो पदार्थ. [आकाशात् वायुः—] त्या आकाशापासून स्वतःच्या स्पर्शगुणानें व पूर्वीच्या शब्द या कारणगुणानें द्विगुण वायु उत्पन्न झाला. (पहिल्या पर्यायांतील ' संभूतः ' या पदाची सर्वत्र अनुवृत्ति करावी.) [वायोः अग्निः—] वायूपासून स्वतःच्या रूपगुणानें व पूर्वीच्या दोन कारण गुणांनीं युक्त असा त्रिगुण अग्नि झाला. [अग्नेः आपः—] अग्नीपासून स्वतःच्या रसगुणानें व पूर्वीच्या तीन कारण गुणांनी युक्त असें चतुर्गुण आप झालें. [अद्भ्यः पृथिवी—] आपापासून स्वतःच्या गंधगुणानें व पूर्वीच्या चार गुणांनीं युक्त अशी पंचगुणा पृथिवी झाली. [पृथिव्याः ओषधयः—] पृथिवीपासून ओषधी झाल्या. [ओषधीभ्यः अन्नं—] ओषधीपासून अन्न [अन्नात् पुरुषः—] वीर्याच्या रूपानें परिणत झालेल्या अन्नापासून मस्तक, हात, पाय इत्यादि आकृतीनें युक्त असलेला पुरुष झाला. [सः वै एषः पुरुषः अन्नरसमयः—] तो हा प्रसिद्ध पुरुष अन्नरसमय—अन्नरसाचा विकार आहे. पुरुषाच्या आकृतीनें भावित—वासित व सर्व अंगांपासून उत्पन्न झालेलें तेज असें जें रेत तेंच बीज आहे, हें प्रसिद्ध आहे. त्यापासून जो होतो तोहि तसाच—पुरुषाच्य आकाराचाच होतो. कारण सर्व जातींमध्यें उत्पन्न होणाऱ्या देहांची नियमानें जनकाकृतिच असते, असा अनुभव आहे. म्ह० बीजद पिता ज्या जातीच असतो त्याच जातीचें अपत्य होतें, असें दिसतें. पुरुष म्ह० शरीर, हें अन्न कार्य आहे. पण तेथपर्यंत सर्व कार्यांचें उपादान कारण मायाविशिष्ट ब्रह्मच आहे. यास्तव आकाशभावास प्राप्त झालेल्या परमात्म्यापासूनच वायु झाला वायुभावापन्न ब्रह्मापासून तेज झालें इत्यादि जाणावें. सु. ब्र. अ. २ पा. ३ अ. १,४,५,६,७. पृ. १९१—२०४ पहा—अन्नमय कोश म्ह० स्थूल देह त्यावर ' हा मी ' असा अभिमान ठेवणारा अन्नमय पुरुष होय. या दृष्टीनें पश्वादिहि जरी अन्नमय पुरुष असले तरी येथे कर्म-ज्ञानाधिकारी मनुष्य विवक्षित आहे. या ब्रह्मवल्लीमध्यें त्यालाच विद्येच्या योगानें सर्व कोशांच्य आंत—गुहेंत (सु पं.प्र.३.२.पृ.१११) अभिव्यक्त होणाऱ्या ब्रह्माला नेऊ पोंचवावयाचें आहे. पण त्याच्या बाह्य अनात्मभूत विशेष आकारांमध्यें आत्म

दृष्टीनें भावित झालेल्या बुद्धीला म्ह० त्याच्या अनात्म्यामधील आत्मबुद्धीला बाह्य विशेषाचा आश्रय केल्यावांचून एकाएकीं आत्मविषय करितां येत नाहीं. यास्तव शाखाचंद्रन्यायानें देहात्मवादापासून उत्तरोत्तर आंत प्रवेश करवीत वेद म्हणतो—

तस्येदमेव शिरः । अयं दक्षिणः पक्षः । अयमुत्तरः पक्षः ।
अयमात्मा । इदं पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ॥

इति ब्रह्मवल्लयध्याये प्रथमोऽनुवाकः ॥ १

अन्वयार्थ—[तस्य इदं एव शिरः—] त्या ह्या अन्नरसमय पुरुषाचें हें प्रसिद्ध शिर, हेंच शिर आहे. प्राणमयादि पुढील कोशांत वस्तुतः शिर नसलेल्याहि वस्तूंना शिर म्हटलेलें आहे, असें दिसतें. तसाच येथेंहि प्रसंग न यावा म्हणून 'इदं एव शिरः' म्ह० त्याचें प्रत्यक्ष असलेलें हेंच शिर आहे, असें म्हटलें आहे. पक्षादि पुढील अवयवांमध्येंहि अशीच योजना करावी. [अयं दक्षिणः पक्षः—] पूर्वाभिमुख पुरुषाचा हा जो दक्षिण बाहु—दक्षिण दिशेकडील बाहु—तोच त्याचा दक्षिण पक्ष—पंख आहे. [अयं उत्तरः पक्षः—] हा डावा बाहुच उत्तर पक्ष आहे. [अयं आत्मा—] हा मधील देहभाग अंगांचा आत्मा आहे. [इदं पुच्छं प्रतिष्ठा—] नाभीच्या खालीं जें अंग आहे तें पुच्छ प्रतिष्ठा आहे. जिच्या योगानें शरीर प्रतिष्ठित होतें, ती प्रतिष्ठा. खालीं लोंबणें, या समान धर्मामुळें जसें गायीचें पुच्छ त्याप्रमाणें तें पुच्छासारखें आहे. या अन्नमयापासून आरंभ करून पुढील प्राणमयादिकांच्या रूपकत्वाची सिद्धि होते. मुशींत ओतलेल्या तांब्याच्या पातळ रसाची प्रतिमा जशी होते त्याप्रमाणें—अन्नमयादिकांच्या आकाराच्या अनुरोधानें प्राणमयादिकांच्या शिर, दक्षिणोत्तर पक्ष, आत्मा व पुच्छ यांच्या रूपकाची सिद्धि होते. [तद् अपि एषः श्लोकः भवति—] याच ब्राह्मणोक्त अर्थाचा हा अन्नमय आत्म्याचा प्रकाशक श्लोक—मंत्र आहे. १.

अन्नाद्वै प्रजाः प्रजायन्ते । याः काश्च पृथिवीꣳश्रिताः ।
अथो अन्नेनैव जीवन्ति । अथैनदपियन्त्यन्ततः । अन्नꣳ
हि भूतानां ज्येष्ठम् । तस्मात्सर्वौषधमुच्यते ॥

अन्वयार्थ—[अन्नात् वै—] रस-रक्तादि भावानें परिणत झालेल्या अन्नापासून, येथील 'वै' हा निपात स्मरणार्थ आहे. त्याच्या योगानें इतरत्र

सांगितलेल्या अन्नाच्या परिणामाचें स्मरण होतें. [प्रजाः प्रजायन्ते—] स्थावर-जंगमरूप प्रजा उत्पन्न होतात. [याः काः च पृथिवीं श्रिताः—] सामान्यतः ज्या कांहीं प्रजा पृथिवीचा आश्रय करून राहिलेल्या आहेत त्या सर्व अन्नापासूनच उत्पन्न होतात. [अथो अन्नेन एव जीवन्ति—] तशाच अन्नापासून झालेल्या त्या अन्नानेंच जिवंत राहतात; प्राणांना धारण करितात, वाढतात असा याचा भावार्थ. [अथ एनत् अपियन्ति—] तशाच त्या या अन्नांत लीन होतात. ' अपि-यन्ति ' येथील ' अपि-'शब्द 'प्रति' या शब्दाच्या अर्थीं आहे. त्यामुळें त्या प्रजा अन्नांत प्रलीन होतात; असा त्याचा भावार्थ. (पण त्या केव्हां प्रलीन होतात, तर) [अन्ततः—] शेवटीं जीवनलक्षण वृद्धीची परिसमाप्ति झाली असतां अन्नांत लीन होतात [अन्नं हि भूतानां ज्येष्ठं—] कारण अन्नच प्राण्यांचें ज्येष्ठ, त्यांच्या पूर्वी उत्पन्न झालेलें आहे. अन्न अन्नमयादि इतर भूतांचें—भौतिक कार्यांचें कारण आहे; त्यामुळें सर्व प्रजा अन्नापासून उत्पन्न होणाऱ्या, अन्नाच्या योगानें जिवंत राहणाऱ्या व अन्नामध्यें प्रलीन होणाऱ्या आहेत; आणि ज्याअर्थीं असें आहे [तस्मात सर्वौषधं उच्यते—] त्याअर्थीं अन्न सर्वौषध आहे, म्ह० सर्व प्राण्यांच्या देहांतील जाठराग्नीच्या दाहाचें प्रशमन करणारें आहे, असें म्हटलें जातें.—अन्न ब्रह्म आहे, अशी उपासना करणाराला कोणतें फल मिळतें तें सांगतात—

सर्वं वै तेऽन्नमाप्नुवन्ति । येऽन्नं ब्रह्मोपासते । अन्नं हि भूतानां ज्येष्ठम् । तस्मात्सर्वौषधमुच्यते । अन्नाद्भूतानि जायन्ते । जातान्यन्नेन वर्धन्ते । अद्यतेऽत्ति च भूतानि । तस्मादन्नं तदुच्यत इति ॥

अन्वयार्थ—[ते सर्वं वै अन्नं आप्नुवन्ति—] ते त्या समस्त अन्न-जाताला प्राप्त होतात. कोण ? तर [ये अन्नं ब्रह्म उपासते—] जे अन्न वर सांगितलेल्या प्रकारचें ब्रह्म आहे, अशी उपासना करितात त्यांना सर्वान्नप्राप्ति होते. ते उपासना कशी करितात—तर मी अन्नापासून झालेला, अन्नरूप व अन्नांत प्रलय पावणारा आहें. त्यामुळें अन्न ब्रह्म आहे, अशी उपासना करितात. पण ' अन्नच आत्मा—ब्रह्म आहे,' अशी उपासना सर्वान्नप्राप्ति हें फल देणारी आहे, असें कां म्हटलें आहे ? म्हणून विचाराल तर सांगतों—[हि अन्नं भूतानां

ज्येष्ठं–] कारण अन्न भूतांचें ज्येष्ठ–कारण आहे. भूतांच्या पूर्वी निष्पन्न झालेलें असल्यामुळें अन्न ज्याअर्थीं ज्येष्ठ आहे [तस्मात् सर्वौषधं उच्यते–] त्याअर्थीं त्याला सर्वौषध म्हटलें जातें. त्यामुळें सर्वान्नच आत्मा आहे, अशी उपासना करणाराला सर्वान्नप्राप्ति होणें युक्तच आहे. [अन्नात् भूतानि जायन्ते–] अन्नापासून भूतें उत्पन्न होतात. [जातानि अन्नेन वर्धन्ते–] उत्पन्न झालेलीं तीं अन्नानें वाढतात. हें उपसंहारासाठीं पुनर्वचन आहे. आतां अन्नाचें निर्वचन–व्युत्पत्ति सांगतात–[अद्यते भूतानि अत्ति च–] जें भूतांकडून खाल्लें जातें तें अन्न; त्याचप्रमाणें तें अन्न स्वतः भूतांना खातें. [तस्मात् तत् अन्नं उच्यते इति–] भूतांकडून खाल्लें जात असल्यामुळें व भूतांना खाणारें असल्यामुळें त्याला अन्न असें म्हटलें जातें. श्रुतींतील शेवटचा ' इति-'शब्द प्रथम कोशाच्या परिसमाप्तीकरितां आहे. ज्याच्यावर अनेक सालें आहेत अशा भाताला कुटून जसें तुषरहित करितात व त्यांतील तांदुळ बाहेर काढतात त्याप्रमाणें अविद्याकृत पंचकोशांचें अपनयन करून अन्नमयादिकांपासून आनंदमयापर्यंत जे कल्पित आत्मे आहेत त्यांच्या अतिशय आंत असलेलें ब्रह्म विद्येच्या योगानें प्रत्यगात्मरूपानें दाखविण्याची इच्छा करणारें शास्त्र म्हः सर्वान्तर ब्रह्मच प्रत्यगात्मा आहे, असें विद्येच्या योगानें दाखविण्याची इच्छा करणारें शास्त्र 'तस्माद्वा एतस्मादन्नरसमयात्' इत्यादि सांगावयास आरंभ करतें—

तस्माद्वा एतस्मादन्नरसमयात्। अन्योऽन्तर आत्मा प्राणमयः। तेनैष पूर्णः

अन्वयार्थ—[तस्मात् वै एतस्मात् अन्नरसमयात् अन्यः अन्तरात्मा प्राणमयः–] त्या या पूर्वोक्त अन्नरसमय पिंडाहून निराळा, त्यांत असणारा व या स्थूल पिंडाप्रमाणेंच आत्मत्वानें मिथ्या कल्पिलेला आन्तर आत्मा प्राणमय आहे. प्राण म्हः वायु, तन्मय–तत्प्राय म्हः ज्यांत वायूचें बाहुल्य आहे, असा. [तेन एषः पूर्णः–] त्या प्राणमय आत्म्याच्या योगानें हा अन्नमय आत्मा पूर्ण आहे. म्हः वायूच्या योगानें जशी चामड्याची पिशवी–भाता पूर्ण –भरलेला असतो तसा स्थूल पिंड प्राणमयानें पूर्ण आहे.

स वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधताम्। अन्वयं पुरुषविधः। तस्य प्राण एव शिरः। व्यानो दक्षिणः

पक्षः । अपान उत्तरः पक्षः । आकाश आत्मा ।
पृथिवी पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ॥

इति ब्रह्मवल्लयध्याये द्वितीयोऽनुवाकः ॥ २

अन्वयार्थ—[सः वै एषः पुरुषविधः एव–] तो हा प्रसिद्ध प्राणमय आत्मा पुरुषविधच म्ह० पुरुषाकारच आहे. तर मग तो शिर, पक्ष इत्यादि अवयवांनीं स्वतःच युक्त आहे कीं काय? श्रुति म्हणते नाहीं, [तस्य पुरुषविधतां अनु अयं पुरुषविधः–] अन्नरसमय आत्म्याचें पुरुषविधत्व तर प्रसिद्ध आहे. त्या अन्नरसमय पुरुषविधतेच्या–पुरुषाकारतेच्या अनुसार हा प्राणमय पुरुषाकार झाला आहे. मुशींत ओतलेल्या रसाची जशी प्रतिमा होते त्याप्रमाणें तो पुरुषाकार झाला आहे. स्वतः नव्हे. अशा रीतीनें पूर्व पूर्व कोशाच्या पुरुषाकाराच्या अनुसार पुढचा पुढचा कोश पुरुषाकार होतो; व पूर्व पूर्व कोश पुढच्या पुढच्या कोशानें पूर्ण आहे. पण याला पुरुषाकारता कशी आहे, म्हणून विचाराल तर श्रुति सांगते [तस्य प्राणः एव शिरः–] त्या प्राणमय कोशाचें प्राण हेंच शिर आहे, प्राणमय म्ह० वायूचा विकार असा जो कोश त्याचें–मुख व नासिका यांतून बाहेर पडणारी प्राण या नांवाची एक विशेष वृत्ति,–हेंच शिर आहे, अशी या श्रुतिवचनावरून कल्पना केली जाते. केवल येथेंच नव्हे तर पुढच्या सर्व कोशांमध्येंहि श्रुतिवचनावरूनच पक्षादिकांची कल्पना केली आहे. [व्यानः दक्षिणः पक्षः–] व्यान म्हणजे वायूची व्यानवृत्ति. हा प्राणमयाचा दक्षिण पक्ष आहे. [अपानः उत्तरः पक्षः–] अपान उत्तर पक्ष आहे [आकाशः आत्मा–] आकाश हा त्याचा आत्मा आहे म्ह० 'समान' या नांवाची जी एक प्रकारची आकाशस्थ वृत्ति ती जणुकाय त्या प्राणमय कोशाच्या आत्म्यासारखीच आहे. कारण प्राणवृत्तींचें हें प्रकरण आहे. त्यामुळें श्रुतींतील 'आकाश-'शब्दानें आकाशस्थ ' समान-'संज्ञक वृत्ति ध्यावी. त्याचप्रमाणें समान ही वृत्ति इतर आसपासच्या वृत्तींच्या अपेक्षेनें मध्यवर्ती आहे. त्यामुळें ती त्यांचा आत्मा आहे. मध्य प्रदेशीं असलेल्या अंगाचें आत्मत्व ' या अंगांचा मध्य हाच आत्मा आहे,' या श्रुतीवरून प्रसिद्ध आहे. [पृथिवी पुच्छं प्रतिष्ठा–] पृथिवी प्राणमयाचें पुच्छ व प्रतिष्ठा आहे. पृथिवी या शब्दानें पृथिवी देवता ध्यावी. ती आध्यात्मिक म्ह० शरीरांतील प्राणाचें धारण करणारी आहे. कारण ती त्याच्या

स्थितीचें निमित्त आहे.—सु. पं. ३.८ पृ. १०८ पहा—[तदपि एषः श्लोकः भवति—] त्याचअर्थीं म्ह० या प्राणमय आत्म्याविषयीं हा पुढील श्लोक आहे. २

प्राणं देवा अनु प्राणन्ति । मनुष्याः पशवश्च ये । प्राणो हि भूतानामायुः । तस्मात्सर्वायुषमुच्यते । सर्वमेव त आयुर्यन्ति । ये प्राणं ब्रह्मोपासते । प्राणो हि भूतानामायुः तस्मात्सर्वायुषमुच्यत इति । तस्यैष एव शारीर आत्मा । यःपूर्वस्यः ।

अन्वयार्थ—[देवाः प्राणं अनु प्राणन्ति—] अग्न्यादिक देव वायुरूप प्राणनशक्तीनें युक्त असलेल्या प्राणाच्या अनुसार तद्रूप होत्साते प्राणनकर्म करितात. प्राणनक्रियेनें—प्रकृष्ट—अतिशय गति म्ह० बाहेर येणें ह्या क्रियेनें क्रियावान् होतात. किंवा हें अध्यात्मप्रकरण असल्यामुळें 'देवाः' म्ह० इंद्रियें प्राणाच्या अनुसार, मुख्य प्राणाच्या मागून चेष्टा करितात, असा याचा भावार्थ समजावा. त्याचप्रमाणें [ये मनुष्याः च पशवः—] जे मनुष्य व पशु ते प्राणन-कर्मानेंच चेष्टायुक्त होतात. त्यामुळें केवल परिच्छिन्न अन्नमय आत्म्यानेंच प्राणी आत्मवान् नसतात, तर त्यांतील साधारण अशाच सर्व पिंडव्यापी प्राणमयानेंहि मनुष्यादिक आत्मवान् असतात. अशाच प्रकारें—पूर्वपूर्वव्यापी, उत्तरोत्तर सूक्ष्म, व आकाशादि भूतांपासून ज्यांचा आरंभ झाला आहे अशा, अविद्याकृत मनो-मयादि आनन्दमयान्त कोशांच्या योगानें सर्व प्राणी आत्मवान् झाले आहेत; 'देव प्राणाच्या मागून प्राणनक्रिया करितात,' असें वर सांगितलें, पण तें कोणत्या कारणानें, तें सांगतात—[हि प्राणः भूतानां आयुः—] कारण प्राणच भूतांचें—प्राण्यांचें आयु म्ह० जीवन आहे. 'जोंवर या शरीरांत प्राण राहतो तोंवर आयुष्य असतें' अशा अर्थाची दुसरी श्रुति आहे. [तस्मात् सर्वायुषं उच्यते—] त्यामुळें त्याला 'सर्वायुष'असें म्हणतात. सर्वांचें जो आयु तो सर्वायु. सर्वायूलाच येथें 'सर्वायुषं' असें म्हटलें आहे. कारण प्राण निघून गेले असतां मरण येतें, अशी प्रसिद्धि आहे. त्यामुळें व्यवहारांत प्राणाचें 'सर्वायुष्त्व' प्रसिद्ध आहे. यास्तव या बाह्य असाधारण अन्नमय आत्म्यापासून अपक्रमण करून म्ह० त्याच्या ठिका-णची आत्मबुद्धि सोडून [ये प्राणं ब्रह्म उपासते—] जे सर्वेंद्रियसाधारण प्राण-मय आत्म्यालाच ब्रह्मदृष्ट्या उपासितात म्ह० मी तो प्राण—सर्व भूतांचा

आत्मा व जीवनाचें कारण असल्यामुळें 'आयुः' आहें, अशा प्रकारें जे प्राणाची उपासना करितात [ते सर्व एव आयुः यन्ति–] ते या लोकीं सर्वच पूर्ण–शत वर्षात्मक आयुष्याला प्राप्त होतात. प्राप्त आयुष्याच्या पूर्वीं अपमृत्यूनें ते मरत नाहींत, असा याचा इत्यर्थ. प्राणाला सर्वायु समजण्याचें काय कारण ? उत्तर– [हि प्राणः भूतानां आयुः–] प्राणच सर्व भूतांचें आयुष्य आहे. [तस्मात् सर्वायुषं उच्यते इति–] ह्मणून त्याला 'सर्वायुषं' असें म्हटलें आहे. कारण जो ज्या गुणांनीं युक्त असलेल्या ब्रह्माची उपासना करितो तो त्या गुणाला पात्र होतो. [पूर्वस्य तस्य एषः एव शारीरः आत्मा–] त्या पूर्व अन्नमयाचा हाच शरीरांत–अन्नमयांत–होणारा शारीर आत्मा आहे. तो कोण, तर [यः प्राणमयः–] जो हा प्राणमय.

तस्माद्वा एतस्मात्प्राणमयात् । अन्योऽन्तर आत्मा मनोमयः । तेनैष पूर्णः । स वा एष पुरुषविध एव । तस्य पुरुषविधताम् । अन्वयं पुरुषविधः । तस्य यजुरेव शिरः । ऋग्दक्षिणः पक्षः । सामोत्तरः पक्षः । आदेश आत्मा । अथर्वाङ्गिरसः पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ॥

इति ब्रह्मवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः ॥ ३

अन्वयार्थ—[तस्माद्वा एतस्मात्०–] त्या या प्रसिद्ध प्राणमयापासून दुसरा अन्तर आत्मा मनोमय आहे. मन ह्मणजे संकल्पादिरूप अन्तःकरण; तन्मय म्ह० मनोमय. [तेन एषः पूर्णः–] त्याच्या योगानें हा पूर्ण आहे. [सः वै०] तो पुरुषाकारच आहे. [तस्य पुरुष०–] त्याच्या पुरुषाकारतेच्या अनुसार हा पुरुषविध आहे. [तस्य यजुः एव शिरः–] त्याचें यजु हेंच शिर आहे. [ऋक् दक्षिणः पक्षः–] ऋक् हाच दक्षिण पक्ष, [साम उत्तरः पक्षः–] साम उत्तर पक्ष आहे. [आदेशः आत्मा–] आदेश–उपदेश ह्मणजे कर्तव्यविशेष सांगणारें ब्राह्मण हाच मनोमय कोशाचा आत्मा आहे [अथर्वांगिरसः पुच्छं प्रतिष्ठा–] अथर्वांगिरसानें पाहिलेलें मंत्र-ब्राह्मण हेंच पुच्छ प्रतिष्ठा आहे. कारण तो भाग शांतिक-पौष्टिकादि प्रतिष्ठेला कारण होणारें जें कर्म तत्प्रधान आहे. [तत् अपि एषः श्लोकः भवति–] पूर्वप्रमाणेंच त्या अर्थीहि ह्मणजे मनोमय आत्म्याचा प्रकाशक असा हा श्लोक आहे. ३.

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । आनन्दं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कदाचनेति । तस्यैष एव शारीर आत्मा । यः पूर्वस्य । तस्माद्वा एतस्मान्मनोमयात् । अन्योऽन्तर आत्मा विज्ञानमयः । तेनैष पूर्णः । स वा एष पुरुषविध एव । तस्य पुरुषविधताम् । अन्वयं पुरुषविधः । तस्य श्रद्धैव शिरः । ऋतं दक्षिणः पक्षः । सत्यमुत्तरः पक्षः । योग आत्मा । महः पुच्छं प्रतिष्ठा । तदप्येष श्लोको भवति ।

इति ब्रह्मवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः ॥ ४

अन्वयार्थ—[यतः वाचः मनसा सह अप्राप्य निवर्तन्ते–] ज्याच्यापासून वाणी मनासह त्याला प्राप्त न होतां निवृत्त होतात [ब्रह्मणः आनन्दं विद्वान्–] त्या मनोमय ब्रह्माच्या उपासनाफलभूत आनन्दाला जाणणारा पुरुष [कदाचन न बिभेति इति–] गर्भवासादि कोणत्याहि दुःखाला भीत नाहीं. [पूर्वस्य तस्य एषः एव शारीरः आत्मा–] त्या पूर्व प्राणमयाचा हाच शारीर आत्मा आहे. जो प्राणमय-शरीरांत होणारा तो शारीर. तो कोण तर [यः मनोमयः–] जो हा मनोमय. [तस्माद्वा एतस्मात्०–] त्या या मनोमयाहून दुसरा अन्तर आत्मा विज्ञानमय –मनोमयाचा अभ्यंतर विज्ञानमय आहे. मनोमय वेदात्मा–वेदरूप आहे, असें वर सांगितलें आहे. वेदाच्या अर्थाविषयीची निश्चयात्मिका बुद्धि हेंच विज्ञान आहे. तें निश्चयरूप विज्ञान अन्तःकरणाचा धर्म आहे. येथें निश्चयरूप लौकिक ज्ञानहि घ्यावें. तन्मय म्ह० प्रमाणस्वरूप निश्चयविज्ञानांनीं झालेला जो आत्मा तो विज्ञानमय. प्रमाणविज्ञानपूर्वकच म्ह० प्रमाणाचें विज्ञान असलें म्हणजेच यज्ञादिकांचें अनुष्ठान होतें. त्यानें हा पूर्ण आहे. तो पुरुषाकारच आहे. त्याच्या पुरुषाकारतेच्या अनुसार हा पुरुषाकार आहे.[तस्य श्रद्धा एव शिरः–]निश्चयज्ञानवान् पुरुषाचे ठिकाणींच पूर्वीं कर्तव्य विषयांविषयीं श्रद्धा उत्पन्न होते. ती सर्व कर्तव्यांच्या आरंभीं अवश्य लागते त्यामुळें ती जणुकाय 'शिर' आहे. [ऋतं दक्षिणः पक्षः०–] ऋत व सत्य यांचा अर्थ पूर्वीं जसा सांगितला आहे तसाच जाणावा. ऋत दक्षिण भाग, सत्य उत्तरभाग, योग म्ह० युक्ति–समाधान. तोच जणुकाय आत्मा आहे. आत्मवान् योग्याचीं श्रद्धादिक जणुंकाय अंगें असून तीं यथार्थ ज्ञानाला समर्थ होतात. यास्तव समाधान म्हणजे योग, हा विज्ञान-

मयाचा आत्मा आहे. [महः पुच्छं प्रतिष्ठा–] 'महः' हें त्याचें पुच्छ प्रतिष्ठा आहे. ' महः ' या शब्दानें प्रथमज महत्तत्त्व घ्यावें. तें प्रतिष्ठेचें कारण असल्यामुळें पुच्छ होय. कोणतेंहि कारणच कार्याची प्रतिष्ठा असतें. जशी वृक्ष, वेली इत्यादिकांची प्रतिष्ठा पृथिवी आहे. सर्व बुद्धिविज्ञानांचें कारण महत्तत्त्व आहे. त्यामुळें तें विज्ञानमय आत्म्यांची प्रतिष्ठा आहे. [तद् अपि एषः श्लोकः भवति–] पूर्वी प्रमाणेंच त्या अर्थीहि हा श्लोक आहे. म्ह० ज्याप्रमाणें ब्राह्मणोक्त अन्नमयादिकांचे प्रकाशक श्लोक वर आहेत त्याचप्रमाणें विज्ञानमयाचाहि प्रकाशक हा श्लोक–मंत्र आहे. ४.

विज्ञानं यज्ञं तनुते । कर्माणि तनुतेऽपि च । विज्ञानं देवाः सर्वे । ब्रह्म ज्येष्ठमुपासते । विज्ञानं ब्रह्म चेद्वेद । तस्माच्चेन्न प्रमाद्यति । शरीरे पाप्मनो हित्वा । सर्वान्कामान्त्समश्नुत इति ।

अन्वयार्थ—[विज्ञानं यज्ञं तनुते–] विज्ञानच यज्ञ करतें. विज्ञानवान् पुरुषच श्रद्धादिपूर्वक यज्ञाचा विस्तार करतो. यास्तव विद्वानाला कर्तृत्व आहे.[कर्माणि तनुते अपि च–] कर्मांचाहि तें विस्तार करतें. ज्या अर्थी सर्व विज्ञानकर्तृक आहे त्या अर्थी विज्ञानमय आत्मा ब्रह्म आहे, असें म्हणणें युक्त आहे. तसेंच, [सर्वे देवाः विज्ञानं ब्रह्म ज्येष्ठं उपासते–] इंद्रादि सर्व देव प्रथम उत्पन्न झालेलें असल्यामुळें ज्येष्ठ किंवा सर्व प्रवृत्ति तत्पूर्वक असल्यामुळें प्रथमज जें विज्ञान ब्रह्म त्याला उपासितात, त्याचें ध्यान करितात. त्या विज्ञानमय ब्रह्माचे ठिकाणीं अभिमान धरून–तेंच मी आहें, अशी उपासना करितात, असा याचा भावार्थ. त्यामुळें–त्या महत् ब्रह्माची उपासना केल्यामुळें ते देवादिक ज्ञानैश्वर्यवान् होतात. [विज्ञानं ब्रह्म वेद चेत्–] तें विज्ञान ब्रह्म आहे, असें जर साधक जाणूं लागला; केवल जाणूं लागला इतकेंच नव्हे तर [तस्मात् न प्रमाद्यति चेत्–] तो त्या ब्रह्मापासून जर प्रमाद न पावला; बाह्य अनात्म्यांच्या ठिकाणीं आत्म्याची भावना केल्यामुळें विज्ञानमय ब्रह्मविषयीच्या आत्मभावनेपासून प्रमाद पावणें प्राप्त आहे म्ह० विज्ञानमय ब्रह्म आत्मा आहे, या भावनेपासून च्युत होणें सर्वथा प्राप्तच आहे. यास्तव त्या प्रमादाची निवृत्ति करण्यासाठीं 'तस्माच्चेन्न प्रमाद्यति ' असें म्हटलें आहे. अर्थात् अन्नमयादिकांविषयींची आत्मभावना

सोडून केवल विज्ञानमय ब्रह्माचे ठिकाणीं आत्मत्वाची भावना करीतच जर राहिला, असा याचा भावार्थ. तर मग काय होतें, तें हा मंत्र सांगतो–[शरीरे पाप्मनः हित्वा–] शरीरांत पापें सोडून, कारण शरीराभिमान या निमित्तामुळेंच सर्व पापें लागतात. पण विज्ञानमय ब्रह्मामध्यें आत्माभिमान धरल्यामुळें निमित्ताचाच अभाव झाला असतां त्या पापांचा त्याग करणें युक्त होतें. म्हणजे छत्रीचा अभाव झाला असतां जसा छायेचा अभाव होतो, त्याचप्रमाणें शरीरच आत्मा आहे, अशा प्रकारचा अभिमान सोडला असतां त्या निमित्तामुळेंच लागणारीं सर्व पापें क्षीण होतात. तस्मात् शरीराभिमान हेंच ज्यांचें निमित्त आहे, अशा शरीरापासून उद्भवलेल्या सर्व पापांना शरीरामध्येंच सोडून विज्ञानमय ब्रह्मस्वरूपास प्राप्त झालेला साधक [सर्वान् कामान् समश्नुते इति–] सर्व कामांस–भोगांस विज्ञानमय आत्म्यानेंच चांगल्या प्रकारें भोगतो, असा याचा भावार्थ. 'इति-'शब्द मंत्रसमाप्त्यर्थ आहे.

तस्यैष एव शारीर आत्मा। यः पूर्वस्य। तस्माद्वा एतस्माद्विज्ञानमयात्। अन्योऽन्तर आत्माऽऽनन्दमयः। तेनैष पूर्णः। स वा एष पुरुषविध एव। तस्य पुरुषविधताम्। अन्वयं पुरुषविधः।

अन्वयार्थ—[तस्य पूर्वस्य एषः एव शारीरः आत्मा–] त्या पूर्वीच्या मनोमयाचा हाच मनोमयशरीरांत झालेला शारीर आत्मा आहे. हा कोण ? तर [यः विज्ञानमयः–] जो हा विज्ञानमय. [तस्माद्वा०–] त्या या विज्ञानमयापासून दुसरा आनंदमय अंतरात्मा आहे. त्याच्या योगानें हा पूर्ण आहे. तो हा पुरुषाकारच आहे. त्याच्या पुरुषाकारतेच्या अनुसार हा पुरुषाकारच आहे. येथील 'आनन्दमय' या शब्दानें कार्यात्म्याची प्रतीति होते. कारण हा अधिकार–आरंभ–प्रकरण–कार्यात्म्यांचें आहे व 'मयट्'–मय हा शब्द –प्रत्यय आनंदाला लाविला आहे. या अध्यायांत अन्नमयादि भौतिक कार्यात्म्यांचा आरंभ केलेला आहे. त्या अधिकारांतच हा आनंदमय पडला आहे. जसा ' अन्नमयः ' इत्यादि स्थानीं त्याचप्रमाणें 'आनन्दमय' या शब्दांतीलहि मयट् विकार या अर्थी असल्याचें दिसतें. यास्तव आनन्दमय हा कार्यात्मा आहे, असें जाणावें. श्रुति ' आनन्दमय आत्म्याशीं उपसंक्रान्त होतो, ' असें पुढें

सांगणार आहे. त्यावरून हेंच ठरतें.–सु. ब्र. १. १. ६. पृ. २४ पहा. आतां आनन्दमयाचे शिरःप्रभृति अवयव सांगतात—

तस्य प्रियमेव शिरः। मोदो दक्षिणः पक्षः। प्रमोद उत्तरः पक्षः। आनन्द आत्मा। ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा। तदप्येष श्लोको भवति।

इति ब्रह्मवल्लयध्याये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५ ॥

अन्वयार्थ—[तस्य प्रियं एव शिरः–] त्या आनंदमय आत्म्याचें इष्ट पुत्रादिकांच्या दर्शनामुळें होणारें जें प्रिय या नांवाचें सुख तेंच शिर आहे. खरोखर शिर नव्हे; तर शिरासारखें शिर. कारण त्या प्रियाला प्राधान्य आहे. [मोदः दक्षिणः पक्षः–] मोद म्हणजे प्रिय वस्तूचा लाभ झाला असतां त्या निमित्तानें होणारा हर्ष. तो याचा दक्षिण पक्ष आहे. [प्रमोदः उत्तरः पक्षः–] तोच हर्ष प्रकृष्ट ह्म० अतिशय झाला असतां प्रमोद होतो.–इष्ट वस्तूचा लाभ होऊन त्याचा उपभोग घेत असतांना प्रकृष्ट हर्ष होतो, हें प्रसिद्ध आहे. [आनन्दः आत्मा–] आनंद म्हणजे सामान्य सुख. तोच प्रियादि सुखावयवांचा आत्मा आहे. कारण तो त्यांमध्यें अनुस्यूत–ओतप्रोत भरलेला असतो. आनंद ह्म० पर ब्रह्म. [ब्रह्म पुच्छं प्रतिष्ठा–] जें सत्य-ज्ञानानन्तलक्षण प्रकृत ब्रह्म, ज्याच्या ज्ञानाकरितां अन्नादिमय पांच कोशांचा उपन्यास केला आहे, जें त्यांच्याहून अभ्यंतर–आंत आहे, आणि ज्याच्या योगानें अन्नमयादि सर्व कोश आत्मवान् आहेत तें ब्रह्म पुच्छ व प्रतिष्ठा आहे. तेंच सर्व अविद्याकल्पित द्वैताचें अवसानभूत अद्वैत ब्रह्म आनन्दमयाची प्रतिष्ठा आहे. कारण त्याचें एकत्वामध्यें पर्यवसान होतें. तें एक अविद्याकल्पित द्वैताचें अवसानभूत अद्वैत ब्रह्म प्रतिष्ठा व पुच्छ आहे. [तत् अपि एषः श्लोकः भवति–] या अर्थीहि हा पुढील श्लोक आहे. ५.

असन्नेव स भवति। असद्ब्रह्मेति वेद चेत्। अस्ति ब्रह्मेति चेद्वेद। सन्तमेनं ततो विदुरिति ॥

अन्वयार्थ—[असन् एव सः भवति–] असत्-च, असत्-सारखाच ज्याप्रमाणें असत् म्ह० अविद्यमान पदार्थ पुरुषार्थाशीं संबंध ठेवणारा नसतो त्याप्रमाणें तोहि अपुरुषार्थसंबंधी होतो. तो कोण? तर [असत् ब्रह्म इति वेद चेत्–]

जो असत् म्ह० अविद्यमान ब्रह्म आहे, असें जाणतो; त्यानें जर ब्रह्म असत् आहे असें जाणलें तर तो स्वतःच असत्सारखा होतो. पण त्याच्या उलट [ब्रह्म अस्ति इति वेद चेत्–] सर्व विकल्पांचें अधिष्ठान, सर्व प्रवृत्तींचें बीज, सर्व विशेषशून्य असेंहि जें तत्त्व आहे, तें ब्रह्म आहे, असें जर त्यानें जाणलें [ततः एनं सन्तं विदुः इति–] तर त्याला सन्त समजतात. (ब्रह्म असत्–अविद्यमान आहे, असें जाणणारा स्वतः असत्–जणुकाय स्वतः नसल्यासारखाच होतो. पण याच्या उलट ब्रह्म आहे असें जाणणाराला त्या अस्तित्वज्ञानामुळेंच तत्त्ववेत्ते सन्त समजतात. विद्यमान ब्रह्मस्वरूपानें परमार्थसदात्म्यास प्राप्त झालेल्या या असें जाणणाराला ब्रह्मवेत्ते सन्त समजतात. कारण तो त्याचें अस्तित्व मानतो. त्यामुळें तो ब्रह्मवेत्ता इतरांना विज्ञेय–विशेषतःच जाणण्यास योग्य होतो, असा याचा भावार्थ. किंवा जो ब्रह्म नाहीं, असें मानतो तो सर्व वर्णाश्रमादिव्यवस्थालक्षण सन्मार्गाचें अश्रद्धालुत्वामुळें नास्तित्व जाणतो. कारण ' ब्रह्म नाही ' या त्याच्या समजुतीमुळें सन्मार्ग ब्रह्मप्राप्त्यर्थ आहे, असें त्याला ह्मणतांच येत नाही. त्यामुळें तो सन्मार्ग ब्रह्मप्राप्त्यर्थ नाहीं, असें होतें. अर्थात् व्यवहारांत तो नास्तिक–असन्–असाधु ह्मटला जातो. सन्मार्ग कांहीं कामाचा नाहीं, असें जाणणाऱ्या नास्तिकाला लोक असाधु–असत्पुरुष असें ह्मणतात. त्यामुळें ' ब्रह्म नाहीं ' असें म्हणणारा पुरुष असत् ठरतो; पण त्याच्या अगदीं उलट असलेला जो ' ब्रह्म आहे,' असें जाणतो तो सत् होय. ज्याअर्थीं तो त्या ब्रह्माच्या प्राप्तीला कारण होणाऱ्या वर्णाश्रमादि व्यवस्थालक्षण सन्मार्गाला श्रद्धालुत्वामुळें यथावत् जाणतो त्याअर्थीं त्याला दुसरे साधुलोक शिष्ट सन्त ह्म० साधुमार्गस्थ (शिष्टांच्या मार्गानें चालणारा) समजतात. यास्तव ब्रह्म आहे, असेंच जाणावें, हा वाक्यार्थ होय.)

तस्यैष एव शारीर आत्मा । यः पूर्वस्य । अथातोऽनुप्रश्नाः ।

अन्वयार्थ—[तस्य पूर्वस्य एषः एव शारीरः आत्मा–] त्या पूर्व विज्ञानमयाचा हाच विज्ञानमय-शरीरांत होणारा शारीर आत्मा आहे. तो कोण ? तर [यः आनंदमयः–] जो हा आनन्दमय. (कित्येक वरील मंत्र आनन्दमयाचा प्रकाशक आहे असें समजतात. यास्तव त्यांचे निराकरण करितात–) त्याच्या नास्तित्वाविषयीं तर मुळीं शंकाच नाहीं. कारण आनन्दमय सविशेष

असल्यामुळें प्रत्यक्ष आहे. पण ब्रह्म सर्वविशेषशून्य असल्यामुळें त्याच्या नास्तित्वाविषयीं शंका येणें योग्य आहे. तसेंच ब्रह्म सर्वांना समान असल्यामुळें त्याचा सर्वांना व्यवहार करतां येणें अवश्य आहे; पण तसा अनुभव मात्र कोठेंहि नाहीं. त्यामुळेंहि 'तें नाहीं' अशी त्याच्या नास्तित्वाची शंका येते; [अतः अथ अनुप्रश्नाः—] आणि ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं आतां यानंतर श्रोत्या शिष्याचे हे अनुप्रश्न—आचार्यांच्या उक्तीनंतर हे प्रश्न आहेत—

उताविद्वानमुं लोकं प्रेत्य । कश्चन गच्छती ३ ।
आहो विद्वानमुं लोकं प्रेत्य । कश्चित्समश्नुता३ उ ।

अन्वयार्थ—[कश्चन अविद्वान् उत अमुं लोकं प्रेत्य गच्छति—] कोणीहि अविद्वान् सुद्धां या लोकाहून—या शरीरांतून निघून जाऊन परमात्म्याला पोंचतो—प्राप्त होतो की नाही ? [उत आहो कश्चित्—विद्वान् अमुं लोकं प्रेत्य समश्नुते उ—] की कोणी विद्वान्—ब्रह्मवेत्ताहि या लोकाहून—या शरीरांतून निघून जाऊन त्या लोकास—परमात्म्याला प्राप्त होतो ? कीं नाही (ब्रह्म आकाशादि सर्व भूतविशिष्ट जीवांचें कारण असल्यामुळें अविद्वान्हि मरणोत्तर त्याला प्राप्त होतो का ? की नाही ? तसाच विद्वान् त्याला प्राप्त होतो का, कीं नाहीं, असे चार प्रश्न येथें केले आहेत. यासंबंधी अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. आतां श्रुति त्यांचें उत्तर सांगते—

सोऽकामयत बहु स्यां प्रजायेयेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ।
इदꣳ सर्वमसृजत । यदिदं किंच । तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् ॥

अन्वयार्थ—[सः अकामयत—] ज्याच्यापासून आकाश हा पदार्थ उत्पन्न झाला तो आत्मा कामना करता झाला. ती कशी ? [बहु स्याम् प्रजायेय इति—] मीं बहु—पुष्कळ व्हावें, अशी. पण एकाला दुसऱ्या पदार्थांत प्रवेश केल्यावांचून बहुत्व कसें संभवेल अशी शंका येते, म्हणून 'प्रजायेय' असें म्हटलें आहे. 'प्रजायेय' म्हणजे उत्पन्न होतों. ब्रह्माचें हें बहुभवन—पुष्कळ होणें पुत्रोत्पत्तीप्रमाणें भिन्न पदार्थविषयक नाहीं; तर काय ? आत्म्यामध्येंच स्थित असलेल्या अव्यक्त नामरूपांना व्यक्त करून बहु होणें आहे. जेव्हां आत्मस्थ अव्यक्त नामरूपें व्यक्त केलीं जातात तेव्हां तीं नामरूपें सर्व अवस्थांमध्यें आत्मस्वरूपाचा परित्याग न करतांच—ज्यांचा देश व काल ब्रह्माहून पृथक्

नाहीं, अशींच व्यक्त केली जातात. त्यामुळें तें नामरूपव्याकरण म्ह० नाम-रूपाला व्यक्त करणें हेंच ब्रह्माचें बहुभवन आहे. त्यावांचून निरवयव ब्रह्माची बहुत्वापत्ति (म्ह० बहु होणें) किंवा अल्पत्व उपपन्न होत नाहीं. जसें—आकाशाचें अल्पत्व किंवा बहुत्व दुसऱ्या वस्तूंमुळेंच संभवतें त्याप्रमाणें ब्रह्माचेंहि अल्पत्व व बहुत्व नामरूप-उपाधीमुळेंच संभवनीय आहे. यास्तव त्यांच्या द्वाराच आत्मा पुष्कळ होतो. [सः तपः अतप्यत—] तो आत्मा अशा कामनेनें युक्त होत्साता तप करता झाला. ' तप ' या पदानें ज्ञान सांगितलें जातें. कारण ' ज्याचें तप ज्ञानमय आहे ' अशी दुसरी श्रुति आहे. त्याचप्रमाणें ब्रह्म आप्तकाम असल्यामुळें त्याच्या इतर तपाचा असंभव आहे. तें ब्रह्म तप करतें झालें, म्ह० आत्मा उत्पन्न केल्या जाणाऱ्या जगाच्या रचनादिकांविषयीं आलोचन—विचार करता झाला, असा याचा भावार्थ. [सः तपः तप्त्वा इदं सर्वं असृजत्—] तो असें आलोचन करून—तप करून प्राण्यांच्या कर्मादि निमित्तानुसार हें सर्व जगत देशतः, कालतः, नामतः व रूपतः अनुभवानुसार—सर्व अवस्थांतील सर्व प्राण्यांकडून जसें अनुभविलें जात आहे तसें उत्पन्न करता झाला. [यत इदं किंच—] हें जें कांहीं सर्वसाधारण जगत् आहे [तत् सृष्ट्वा—] तें हें जगत् उत्पन्न करून त्यानें काय केलें, तें सांगतात—[तत् एव अनुप्राविशत्—] त्याच उत्पन्न केलेल्या जगांत मागून तें प्रवेश करतें झालें (तें कसें प्रवेश करतें झालें, या गोष्टीचा विचार भाष्यार्थांत सविस्तर केला आहे तो अवश्य पहावा.)

तदनुप्रविश्य । सच्च त्यच्चाभवत् । निरुक्तं चानिरुक्तं च । निलयनं चानिलयनं च । विज्ञानं चाविज्ञानं च । सत्यं चानृतं च सत्यमभवत् । यदिदं किंच । तत्सत्यमित्याचक्षते । तदप्येष श्लोको भवति ॥

इति ब्रह्मवल्ल्यध्याये षष्ठोऽनुवाकः ॥ ६

अन्वयार्थ—[तत् अनुप्रविश्य—] याप्रमाणें तें आकाशादिकांचें कारण कार्याला उत्पन्न करून त्यांत मागून जणुंकाय प्रविष्टसें होऊन गुहा या नांवाच्या बुद्धींत पाहणारें, ऐकणारें, मनन करणारें, जाणणारें, अशाप्रकारें सविशेष असल्याप्रमाणें उपलब्ध होतें, तोच त्याचा प्रवेश आहे. यास्तव तें कारण ब्रह्म आहे. अर्थात् त्याच्या अस्तित्वामुळें तें आहे, असेंच जाणावें. असो; त्या कार्यांत अनु-

प्रवेश करून मग काय ? मग तें [सत् च त्यत् च अभवत्–] सत् म्ह० मूर्त व त्यत् म्ह० अमूर्त झालें. ज्यांचें नाम-रूप अव्यक्त आहे अशा आत्मस्वरूपांत स्थित असलेल्या मूर्तामूर्तांना त्यानें व्यक्त केलें. पण मूर्त व अमूर्त या नांवाचीं जीं व्यक्त नाम-रूपें त्यांचा देश व काल आत्म्याच्या देश-कालाहून पृथक् नसतो. त्यामुळें आत्माच मूर्तामूर्त नाम-रूप झाला, असें येथें म्हटलें जातें. तसाच तो [निरुक्तं च अनिरुक्तं च–] निरुक्त म्ह० समान व असमान जातीच्या पदार्थांपासून निराळें करून देश-कालविशिष्टतेनें ' हें तें ' असें सांगितलेलें; व अनिरुक्त म्ह० तसें–सजातीय व विजातीय पदार्थांपासून पृथक् करून देशकालविशिष्ट, या रूपानें–न सांगितलेलें. ज्याप्रमाणें सत् व त्यत् म्हणजे प्रत्यक्ष व परोक्ष त्याचप्रमाणें, निरुक्त व अनिरुक्त हीं सुद्धां मूर्त व अमूर्त यांचींच विशेषणें आहेत. [निलयनं च अनिलयनं च–] निलयन म्ह० नीड आश्रय. तो मूर्ताचाच धर्म आहे व अनिलयन म्ह० त्याच्या उलट–अनाश्रय. तो अमूर्ताचा धर्म आहे. त्यत्, अनिरुक्त व अनिलयन हे अमूर्ताचे जरी धर्म असले तरी तीं व्याकृताचीं विशेषणें आहेत. कारण सृष्टीच्या उत्तरकालीं त्यांचा भाव–अस्तित्व सांगितलेलें आहे. त्यत् म्ह० आकाररहित, रूपरहित प्राणादि, तेंच अनिरुक्त व अनिलयन आहे. यास्तव अमूर्ताचीं हीं विशेषणें व्याकृतविषयकच आहेत. [विज्ञानं च–] चेतन व [अविज्ञानं च–] चेतनरहित–अचेतन पाषाणादिक. [सत्यं च–] व्यवहारांतील अबाधित वस्तु म्ह० व्यवहारसमयीं बाधित न होणारें. परमार्थ सत्य नव्हे. कारण परमार्थ सत्य एक ब्रह्मच आहे. यास्तव येथें व्यवहारविषयक आपेक्षिक सत्य हाच 'सत्य-'शब्दाचा अर्थ आहे. मृगजलादि असत्य–मिथ्या पदार्थांच्या अपेक्षेनें उदकादिक सत्य म्हटलें जातें. [अनृतं च–] अशा व्यावहारिक सत्याच्या उलट–अनृत. हें सर्व कोण झालें? [सत्यं यत् इदं किंच अभवत्–] परमार्थ सत्य हें सर्व झालें. परमार्थ सत्य काय ? तर ब्रह्म. कारण 'सत्यं, ज्ञानं, अनन्तं ब्रह्म' अशा रीतीनें तें प्रकृत आहे. [तत् सत्यं इति आचक्षते–] ज्याअर्थीं हें सत्यादि मूर्तामूर्त धर्मजात एकच सत्-शब्दवाच्य ब्रह्म झालें आहे व त्यावांचून नामरूपविकारांचा अभाव आहे, म्ह० नामरूपविकार त्याहून पृथक् पदार्थ नाहींत त्याअर्थीं तें ब्रह्म सत्य आहे, असें ब्रह्मवेत्ते म्हणतात. [तद् अपि एषः श्लोकः भवति–] या ब्राह्मणोक्त

अर्थाविषयीं हा श्लोक–मंत्र आहे. ज्याप्रमाणें पूर्वीच्या पांच पर्यायांत अन्नमयादिरूप आत्म्यांचे प्रकाशक श्लोक आहेत, त्याप्रमाणें सर्वांच्या अगदीं आंत असलेल्या आत्म्याचें अस्तित्व कार्याच्या द्वारा प्रकाशित करणारा हा पुढील मंत्र आहे. ६.

असद्वा इदमग्र आसीत् । ततो वै सदजायत ।
तदात्मानꣳस्वयमकुरुत । तस्मात्तत्सुकृतमुच्यत इति ॥

अन्वयार्थ––[असत् वा इदं अग्रे आसीत्–] हें पूर्वीं असत् होतें ('असत्' या शब्दानें ज्याचें स्वरूप व्यक्त नाम व रूप या विशेषांच्या विपरीत आणि अविकृत आहे, असें ब्रह्म सांगितलें जातें. त्या शब्दानें तें वंध्यापुत्राप्रमाणें अत्यंत असत्–शून्य होतें, असें सांगितलें जात नाहीं. कारण असत्-पासून–शून्यापासून सत्-वस्तूचा जन्म संभवत नाहीं. 'इदं' म्ह० नामरूपविशेषांनीं युक्त, व्याकृत–व्यक्त जगत्; 'अग्रे' म्ह० पूर्वी–उत्पत्तीच्या अगोदर 'असत्-'शब्दवाच्य ब्रह्मच होतें. [ततः वै सत् अजायत–] त्या असत्-पासून सत् ह्म० ज्याचे नाम-रूपविशेष अगदीं विभक्त आहेत असें जगत् उत्पन्न झालें. तर मग काय पित्यापासून जसा पुत्र अगदीं पृथक् असतो त्याप्रमाणें कार्य त्या ब्रह्माहून अगदीं भिन्न आहे ? नाहीं, असें श्रुति सांगते– [तत् आत्मानं स्वयं अकुरुत–] तें असत्-शब्दवाच्य ब्रह्म आपल्यालाच तें जगत् करतें झालें. [तस्मात् तत् सुकृतं उच्यते इति–] ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं स्वतः ब्रह्मच सुकृत म्ह० स्वयंकर्तृ म्हटलें जातें. सर्वांचें कारण असल्यामुळें ब्रह्म स्वयंकर्तृ आहे, असें लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. किंवा ज्याअर्थीं त्यानें स्वतः सर्वरूपानें सर्व केलें त्याअर्थीं पुण्यरूपानेंहि तेंच कारण ब्रह्म 'सुकृत' असें म्हटलें जातें. सारांश कसेंहि जरी समजलें तरी फलसंबंधादिकांचें कारण 'सुकृत' या शब्दाचें वाच्य आहे, हें लोकांत प्रसिद्ध आहे. मग तें जरी पुण्य असलें किंवा आणखी कांहीं असलें तरी ती प्रसिद्धि नित्य व चेतनयुक्त कारण असलें तरच उपपन्न होते. तस्मात् सुकृतप्रसिद्धीवरून तें ब्रह्म आहे, असें ठरतें. आणखीहि एका कारणानें तें आहे. कोणत्या ? तर त्याला रसत्व

आहे, या. पण ब्रह्माच्या रसत्वाची प्रसिद्धि कोणत्या निमित्तानें होते, असें कोणी विचारील ह्मणून श्रुति सांगते—

यद्वै तत्सुकृतम्। रसो वै सः। रसꣳह्येवायं लब्धाऽऽनन्दी भवति। को ह्येवान्यात्कः प्राण्यात्। यदेष आकाश आनन्दो न स्यात्। एष ह्येवाऽऽनन्दयाति।

अन्वयार्थ—[यत् वै तत् सुकृतं रसः वै सः—] तें जें सुकृत तोच प्रसिद्ध रस आहे. तृप्तीला कारण होणारा व आनंद देणारा असा मधुर, अम्ल इत्यादि हा 'रस' ह्मणून लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. [अयं रसं हि एव लब्ध्वा आनन्दी भवति—] हा पुरुष रसालाच प्राप्त होऊन आनन्दी—सुखी होतो. असत्—अविद्यमान वस्तु आनन्दाचें कारण होते, असें व्यवहारांत आढळत नाहीं. बाह्य आनंदाच्या साधनानें रहित असलेले, प्रयत्नशून्य व निरिच्छ विद्वान् ब्राह्मण मधुरादि बाह्य रसाच्या लाभानें जसे तसेच ह्म० बाह्य रसाचा लाभ झाल्याप्रमाणेंच आनन्दयुक्त झालेले दिसतात. खरोखर ब्रह्मच त्यांचा रस आहे. तस्मात् त्यांच्या आनंदाचें कारण असें तें रसवत् ब्रह्म आहे. आणखीहि एका कारणानें तें आहे. श्रुति आतां तेंच सांगते—[यद् एषः आनन्दः आकाशः न स्यात् कः हि एव अन्यात् कः प्राण्यात्—] जर हा आकाशांत—परम आकाशांतील गुहेंत—स्थित असलेला आनंद नसता तर लोकांत अपानक्रिया कोणीं केली असती? अपानाचा अधोनयन हा व्यापार करण्यास कोण समर्थ झाला असता? असा भावार्थ. किंवा प्राणन तरी कोणीं केलें असतें? या आनंदाच्या अभावीं कोणालाहि कांहीं करतां आलें नसतें. तस्मात् तें ब्रह्म आहे; आणि ज्याच्यामुळें शरीरेंद्रियांच्या प्राणनादि चेष्टा होतात त्याच्यामुळेंच लोकांना आनंद होतो. [हि एषः एव आनन्दयाति—] कारण हाच पर आत्मा लोकाला धर्मानुरूप सुख देतो. म्हणजे अविद्येमुळें परिच्छिन्न झालेला तोच आनंदरूप आत्मा प्राण्यांना प्रतीत होतो. विद्वान् व अविद्वान् यांच्या क्रमानें अभयाला व भयाला कारण होत असल्यामुळेंहि तें ब्रह्म आहे. कारण सद्वस्तूचा आश्रय केल्यानेंच अभय होतें, हें प्रसिद्ध आहे. असत् वस्तूच्या आश्रयानें भयाची निवृत्ति होऊं शकत नाहीं. आतां त्याला अभयहेतुत्व कसें तें सांगतात—

यदा ह्येवैष एतस्मिन्नदृश्येऽनात्म्येऽनिरुक्तेऽनिलयनेऽभयं प्रतिष्ठां विन्दते। अथ सोऽभयं गतो भवति। यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते। अथ तस्य भयं भवति। तत्त्वेव भयं विदुषोऽमन्वानस्य। तदप्येष श्लोको भवति॥

इति ब्रह्मवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः॥ ७॥

अन्वयार्थ—[हि यदा एव एषः एतस्मिन् अदृश्ये—] कारण ज्या वेळीं हा साधक या ब्रह्मामध्यें, कशा प्रकारच्या ब्रह्मामध्यें—अदृश्य ब्रह्मामध्यें, दृश्य म्ह० द्रष्टव्य. पाहण्यास योग्य विकार. कारण विकाराला दर्शनार्थत्व आहे. म्ह० विकार दर्शनाकरितांच आहे. कोणताहि विकार उपादान कारण विशेष आकारानें दिसावें, ह्मणूनच होतो. जें दृश्य नव्हे तें अदृश्य. म्ह० अविकार असा भावार्थ. या अदृश्य—अविकार—अविषयभूत, [अनात्म्ये०—] अशरीर, ज्याअर्थीं अदृश्य त्याअर्थीं अनात्म्य; आणि ज्याअर्थीं अनात्म्य त्याअर्थीं अनिरुक्त; कारण विशेषच सांगितला जातो व विशेष विकार असतो. ब्रह्म अविकार आहे. कारण तें सर्व विकारांचा हेतु आहे. म्हणून तें अनिरुक्त. ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं अनिलयन. निलयन म्हणजे नीड, आश्रय. जें निलयन नव्हे तें अनिलयन; अनाधार. त्या ह्या अदृश्य, अनात्म्य, अनिरुक्त, अनिलयन व सर्व कार्यधर्मांहून विलक्षण अशा ब्रह्मामध्यें, असा याचा भावार्थ. [अभयं प्रतिष्ठां विन्दते—] 'अभयं' हें क्रियाविशेषण आहे. किंवा 'अभयां' असा त्याचा लिंगविपरिणाम करावा. ह्म० अभयं असें जें नपुंसक लिंग आहे त्याचें 'अभयां' असें स्त्रीलिंग करून ध्यावें. ह्मणजे तें 'प्रतिष्ठां' या पदाचें विशेषण होईल. प्रतिष्ठेस—स्थितीस—आत्मभावास प्राप्त होतो, जेव्हां हा साधक या अविकार, अशरीर अनिर्वाच्य व अनाधार ब्रह्मामध्यें निर्भयपणें अथवा भयरहित स्थितीस प्राप्त होतो [अथ सः अभयं गतः भवति—] तेव्हां तो त्याच्यामध्यें अविद्याकृत नानात्व या भयहेतूच्या अदर्शनामुळें अभयाला प्राप्त झालेला असा होतो. जेव्हां तो स्वरूपामध्यें प्रतिष्ठित होतो तेव्हां दुसरें कांहीं पहात नाहीं; दुसरें कांहीं ऐकत नाहीं; व दुसरें कांही जाणत नाहीं. कारण स्वतः भिन्न असलेल्या एकाला दुसऱ्यापासून भय होतें. आपल्यालाच आपलें भय असणें, युक्त नव्हे. यास्तव आत्माच आत्म्याच्या अभयाचें कारण आहे. भयाचीं कारणें असतांना सुद्धां

ब्राह्मण सर्वतः निर्भय दिसतात. परंतु भयापासून रक्षण करणारें ब्रह्म जर नसतें तर ब्राह्मणांनीं निर्भय होणें अशक्य होतें. तस्मात् ब्र० तें अभय असल्याचें प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें त्यांच्या अभयाचें कारण ब्रह्म आहे. हा साधक अभयास पोंचला आहे असें केव्हां होतें? जेव्हां दुसरें कांहीं—भेद पहात नाहीं; जेव्हां तो आत्म्यामध्यें अंतर—भेद करीत नाहीं तेव्हां अभयास पोंचला आहे, असें होतें; हा अभिप्राय. [यदा हि एव एषः एतस्मिन् उत् अरं अंतरं कुरुते—] पण जेव्हां हा अविद्यावस्थेंत अविद्येनें पुढें उभ्या केलेल्या वस्तूला, तिमिररोग झालेल्या पुरुषाला दिसणाऱ्या दुसऱ्या चंद्राप्रमाणें, पहातो व आत्म्यामध्यें—ब्रह्मामध्यें थोडेसेंहि अंतर, छिद्र, भेददर्शन करतो; भेद पाहणें हेंच अंतर करणें आहे; अल्पहि भेद पाहतो, [अथ तस्य भयं भवति—] तेव्हां त्या भेददर्शनामुळेंच त्या भेद पाहणाऱ्या आत्म्याला भय होतें. तस्मात् अविद्वान् आत्म्याच्या भयाचें कारण आत्माच आहे. तेंच आतां सांगतात—[तत् तु एव भयं अमन्वानस्य विदुषः—] तें ब्रह्मच भेददर्शी विद्वानाचें भय आहे. मजहून ईश्वर निराळा व मी संसारी ईश्वराहून निराळा असें जाणणाऱ्या, थोडेसेंहि अंतर करणाऱ्या व एकत्वानें त्याला न मानणाऱ्या पुरुषाला तेंच भेदानें पाहिलेलें ईश्वरसंज्ञक ब्रह्म भय होतें. तस्मात् जो हा एक अभिन्न आत्मतत्त्व पहात नाहीं तो विद्वान् असला तरी अविद्वान्च होय. [तत् अपि एषः श्लोकः भवति—] याच अर्थी हा पुढील श्लोक आहे. ७.

भीषाऽस्माद्वातः पवते । भीषोदेति सूर्यः । भीषाऽस्मादग्निश्चेन्द्रश्च । मृत्युर्धावति पञ्चम इति ॥

अन्वयार्थ—[अस्मात् भीषा वातः पवते—] याच्या भयानें वायु वाहतो. [भीषा सूर्यः उदेति—] याच्या भयानें सूर्य उदय पावतो. [अस्मात् भीषा अग्निः च इन्द्रः च पंचमः मृत्युः धावति—] याच्या भयानें अग्नि, इंद्र व पांचवा मृत्यु धावतो. वायुप्रभृति महापूज्य व स्वतः ईश्वर असूनहि ज्यांत पुष्कळ आयास आहेत, अशा वाहणें, उगवणें इत्यादि कार्यांमध्यें नियमानें प्रवृत्त होतात. त्यांचा दुसरा प्रशास्ता जर असेल तरच त्यांचें हें नियमानें प्रवृत्त होणें उपपन्न होईल. यास्तव त्यांच्या भयाचें कारण त्यांचें प्रशासन करणारें ब्रह्म आहे.

ते राजाच्या भृत्यांप्रमाणें ज्या ब्रह्माच्या भयानें प्रवृत्त होतात, तें भयाचें कारण आनंद ब्रह्म आहे.

सैषानन्दस्य मीमांसा भवति ।

अन्वयार्थ—[आनन्दस्य सा एषा मीमांसा भवति–] ब्रह्माच्या आनंदाची ही मीमांसा–विचारणा आहे. पण आनंदामध्यें मीमांसा करण्यासारखें काय आहे ? म्हणून कोणी विचारील, यास्तव श्रुति सांगते–हा आनंद लौकिक आनंदाप्रमाणें विषय व विषयी यांच्या संबंधापासून उत्पन्न झालेला आहे कीं, स्वाभाविक आहे, अशी ही आनंदाची मीमांसा–विचारणा पुढें केली जाते. आब्रह्मस्तंभपर्यंत जीवांना होणारें विषयसुख हा मुख्य ब्रह्मानंदाचाच लेश आहे. तो बाह्य व आध्यात्मिक सुखसाधनांच्या अधीन असतो, त्यामुळेंच अस्थिर व सामग्रीच्या योग्यतेप्रमाणें न्यूनाधिक असतो. पण निष्काम विद्वानाचा आनंद स्थिर व साधननिरपेक्ष असतो. मनुष्यापासून अपर ब्रह्मापर्यंत–हिरण्यगर्भापर्यंत अविद्या-काम कर्मांचा उत्तरोत्तर जसा जसा अपकर्ष होत जातो, विद्येच्या योगानें अविद्यादि जसे जसे कमी होऊं लागतात तसा तसा आनंदाचा उत्कर्ष होत जातो. श्रुति आतां त्याचेंच वर्णन करिते—

युवा स्यात्साधुयुवाऽध्यायकः । आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः । तस्येयं पृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात् । स एको मानुष आनन्दः । ते ये शतं मानुषा आनन्दाः (१) । स एको मनुष्यगन्धर्वाणामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—[युवा साधुयुवा स्यात–] पूर्ववयस्क साधु व तोच युवा, असें साधु हें तरुणाचें विशेषण. तरुणहि असाधु असतो व साधुहि अतरुण असतो; यास्तव ' युवा व साधुयुवा ' असें विशेषण दिलें आहे. [अध्यायकः–] अधीतवेद, ज्यानें वेदाध्ययन केलें आहे; [आशिष्ठः दृढिष्ठः बलिष्ठः–] अतिशय आशा करणारा, अतिशय दृढ, अतिशय बलवान्; याप्रमाणें आध्यात्मिक साधनांनीं संपन्न; [तस्य इयं सर्वा पृथिवी वित्तस्य पूर्णा स्यात्–] त्याचीच ही सर्व पृथिवी वित्तानें म्ह० उपभोगसाधनांनीं दृष्टार्थ व अदृष्टार्थ अशा कर्मसाधनानें संपन्न–पूर्ण असावी ह्मणजे तो पृथिवीपति राजा असावा, हा भावार्थ. [सः एकः मानुषः आनन्दः–] त्याचा जो आनन्द तो एक मानुष–मनुष्यांचा

सर्वोत्कृष्ट एक—आनंद आहे. [ते ये शतं मानुषाः आनन्दाः सः एकः मनुष्यगंधर्वाणां आनन्दः—] असे जे शंभर मानुष आनंद तो एक मनुष्यगंधर्वांचा आनंद आहे. मानुषानन्दाहून मनुष्यगंधर्वांचा आनंद शतपट उत्कृष्ट असतो. प्रथम मनुष्य असून विशेष प्रकारचें कर्म व उपासना यांच्या योगानें जे गंधर्वत्वास प्राप्त झालेले असतात ते मनुष्यगंधर्व होत. ते अन्तर्धानादिशक्तींनीं संपन्न असतात व त्यांचीं देहेंद्रियें सूक्ष्म असतात. त्यामुळें त्यांना शीतोष्णादिकांचा उपसर्ग थोडा होतो, व त्या द्वंद्वांना प्रतिघात करण्याचें सामर्थ्य व साधनें यांनीं ते संपन्न असतात. त्यामुळें ज्याला शीतोष्णादिकांचा उपसर्गच होत नाहीं व तो झाला तरी त्याला प्रतीकार करण्याचें सामर्थ्य ज्याला असतें त्या मनुष्यगंधर्वाच्या चित्तामध्यें प्रसाद असतो; आणि त्या विशेषप्रकारच्या चित्तप्रसादामुळें विशेषप्रकारच्या सुखाची अभिव्यक्ति होते. याच न्यायानें पूर्व पूर्व भूमीपेक्षां उत्तर उत्तर भूमीमध्यें प्रसादविशेषामुळें शतपट आनंदोत्कर्ष उपपन्न होतो. [च अकामहतस्य श्रोत्रियस्य—] व अकामहत—निष्काम श्रोत्रियाचा आनंदहि मानुषानंदाहून शतपट आहे. पहिल्या मानुषानंदाच्या पर्यायांत 'श्रोत्रियस्य चाकामहतस्य' हें पुढील सर्व पर्यायांत असलेलें वाक्य नाहीं. त्याचें कारण मनुष्यांच्या विषयभोगाविषयीच्या कामनेनें व्याकुल न झालेल्या श्रोत्रियाचा आनंदोत्कर्ष मानुष आनंदाहून शतपट अधिक म्हणजेच मनुष्यगंधर्वाच्या आनंदाइतका असतो, हें सांगावें, हें आहे. ह्म० निष्काम श्रोत्रियाचा आनंद मानुषानंदाहून शतपट अधिक म्हणजेच मनुष्यगंधर्वाच्या आनंदासारखा असतो, हें सांगण्यासाठीं, मानुषानंदाच्या पर्यायांत श्रोत्रियाच्या आनंदाचा उल्लेख केला नाहीं, असा याचा भावार्थ. श्रुतींत 'साधुयुवा' व 'अध्यायकः' अशीं जीं दोन विशेषणें आहेत त्यांवरून त्या सार्वभौम राजाच्या ठिकाणींहि श्रोत्रियत्व व निष्पापत्व असलें पाहिजे, असें होतें. अर्थात् 'अध्यायक' हें श्रोत्रियत्वाचें व 'साधु युवा' यांतील 'साधु' हें पद विहितानुष्ठानाचें द्योतक आहे. त्यामुळें सद्विद्या व सच्छील यांनी संपन्न असलेल्या तरुण, सुदृढ, सार्वभौम राजाचा आनंद हा एक मानुषानंद आहे. श्रोत्रियत्व व निष्पापत्व हे दोन धर्म पुढील सर्व पर्यायांत एक सारखेच समजावे. पण 'अकामहतत्वा-' बरोबर श्रोत्रियत्वाचा जो उल्लेख केला आहे म्हणजे अकामहतत्व या विशेषणाचा

जो उपयोग केला आहे तो विषयांचा उत्कर्ष व अपकर्ष यांच्या अनुरोधानें सुखाचा उत्कर्ष व अपकर्ष होतो, हें सुचविण्यासाठीं आहे. अकामहतत्व या विशेषामुळें शतगुण सुखोत्कर्ष अनुभवास येतो. यास्तव आकामहतत्व हें परमानन्दप्राप्तीचें साधन आहे, असें विधान करण्यासाठीं 'अकामहत' या विशेषणाचें ग्रहण केलें आहे.

ते ये शतं मनुष्यगन्धर्वाणामानन्दाः । स एको देवगन्धर्वाणामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ— ते जे मनुष्यगंधर्वांचे शंभर आनन्द त्यांचा समूह हाच देवगंधर्वांचा एक आनन्द आहे. सृष्टीच्या आरंभीं देवलोकीं उत्पन्न झालेल्या गायकांना देवगंधर्व ह्मणतात आणि अकामहत श्रोत्रियाचाहि तो एक आनंद आहे. (आतां वेद भगवान् चवथा पर्याय सांगतात—)

ते ये शतं देवगन्धर्वाणामानन्दाः । स एकः पितृणां चिरलोकलोकानामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे देवगन्धर्वांचे शंभर आनन्द तो चिरकाल राहणाऱ्या लोकांचा अनुभव घेणाऱ्या पितरांचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. आतां आनन्दाचा पांचवा पर्याय सांगतात—

ते ये शतं पितृणां चिरलोकलोकानामानन्दाः । स एक आजानजानां देवानामानन्दः। श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे चिरकाल राहणाऱ्या लोकांचा अनुभव घेणाऱ्या पितरांचे शंभर आनंद तो आजानजान देवांचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनंद आहे. पितृ-लोकावर 'आजान' या नांवाचा कोणी एक देवलोक आहे. त्यांत उत्पन्न झालेल्या देवांना 'आजानज देव' म्हणतात. आतां सहावा पर्याय सांगतात—

ते ये शतमाजानजानां देवानामानन्दाः । स एकः कर्मदेवानां देवानामानन्दः । ये कर्मणा देवानपियन्ति । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे आजानज देवांचे शंभर आनन्द तो कर्मदेवांचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. [ये कर्मणा देवान्अपियन्ति—] आजानज देवांच्या भोगाहूनहि उत्तम भोग संपादन करावयासाठी जे केवल वैदिक अग्नि-

होत्रादि कर्मांचें अनुष्ठान करितात व देवांस प्राप्त होतात ते कर्मदेव होत. स्वतः श्रुतीनेंच ही कर्मदेवांची व्याख्या सांगितली आहे. आतां श्रुति सातवा पर्याय सांगते—

ते ये शतं कर्मदेवानां देवानामानन्दाः । स एको
देवानामानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे कर्मदेव-देवांचे शंभर आनन्द तो देवांचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. येथील देवशब्दानें हविर्भाग घेणाऱ्या तेहतीस देवांचें ग्रहण करावें. आतां श्रुति आठवा पर्याय सांगते—

ते ये शतं देवानामानन्दाः । स एक इन्द्र-
स्यानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे देवांचे शंभर आनन्द तो इंद्राचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. आतां श्रुति नववा पर्याय सांगते—

ते ये शतमिन्द्रस्यानन्दाः । स एको बृह-
स्पतेरानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे इंद्राचे शंभर आनन्द तो बृहस्पतीचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. बृहस्पति म्हणजे इंद्राचा आचार्य. आतां वेद दहावा पर्याय सांगतो—

ते ये शतं बृहस्पतेरानन्दाः । स एकः प्रजा-
पतेरानन्दः । श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे बृहस्पतीचे शंभर आनन्द तो प्रजापतीचा ह्म० विराट् पुरुषाचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. त्रैलोक्य हेंच ज्यांचें शरीर आहे असा समष्टि-व्यष्टिरूप संसारमंडलव्यापी ब्रह्मदेव हाच येथील प्रजापति आहे. आतां श्रुति आनन्दाचा शेवटचा अकरावा पर्याय सांगते—

ते ये शतं प्रजापतेरानन्दाः । स एको
ब्रह्मण आनन्दः ।श्रोत्रियस्य चाकामहतस्य ॥

अन्वयार्थ—ते जे प्रजापतीचे शंभर आनन्द तो ब्रह्माचा व निष्काम श्रोत्रियाचा एक आनन्द आहे. निष्कामत्वाच्या आधिक्यामुळें अनुभविला जाणारा व श्रोत्रियालाच प्रत्यक्ष ज्ञात होणारा जो हिरण्यगर्भाचा आनंद तो ज्या

परमानन्दाची मात्रा—एकदेश—अंश आहे; कारण 'अन्य सर्व भूतें याच आनंदाच्या अंशावर आपला निर्वाह करितात' अशी दुसरी श्रुति आहे, तो हा हिरण्यगर्भाचा आनन्द ज्याची मात्रा—लेश आहे व अगदीं पृथक् असलेल्या समुद्रजलाच्या थेंबाप्रमाणें इतर सर्व लेशभूत आनंद ज्यामध्यें एकत्वास प्राप्त झाले आहेत तो हा परमानन्द स्वाभाविक आहे. कारण त्याला अद्वैतत्व आहे ब्र० तो एकरूप झालेला आहे. यांत आनन्द व आनन्दी—ज्याला आनंद आहे तो चेतन, यांचा अविभाग ब्र० ऐक्य आहे. भेद नाहीं. त्या आनंदाला विषयविषयिभाव असतो, या अभिप्रायानें वर 'प्रत्यक्ष' म्हटलेलें नाहीं तर अज्ञान, संशय इत्यादि आवरणें त्यावर नसतात, या आशयानें प्रत्यक्ष म्हटलें आहे. असो; आतां या मीमांसेच्या फलाचा उपसंहार करितात—

स यश्चायं पुरुषे । यश्चासावादित्ये । स एकः ।

अन्वयार्थ—[सः यः च अयं पुरुषे—] जो परम आकाशांतील गुहेंत स्थित असलेला व आकाशादि-अन्नमयान्त कार्य उत्पन्न करून त्यांतच मागून प्रविष्ट झालेला त्याचाच येथें 'स यः' या पदांनीं निर्देश केला जात आहे. तो कोण, तर जो हा या पुरुषांत आहे [च यः असौ आदित्ये—] आणि जो हा आदित्यामध्यें आहे, जो परमानन्द 'श्रोत्रियप्रत्यक्ष' म्हणून म्हटलेला आहे, ज्याच्या एकदेशावर सुखाला पात्र असलेलीं ब्रह्मादि-स्थावरान्त भूतें आपली उपजीविका करितात त्याचाच 'यश्चासावादित्ये०' या वाक्यानें निर्देश केला जात आहे. [सः एकः—] तो एक आहे. कसा? भिन्नप्रदेशीं असलेल्या अनेक घटांतील आकाश व महाकाश यांच्या एकत्वाप्रमाणें. ब्रह्म आहे. कीं नाहीं, या अनुप्रश्नाचें व्याख्यान केलें. कार्यरूप रसाचा लाभ, प्राणन क्रिया, अभयप्रतिष्ठा व अभयदर्शन या उपपत्तींवरून तें आकाशादिकांचें कारण ब्रह्म आहेच, असें सिद्ध करून एका अनुप्रश्नाचें निराकरण केलें. आतां विद्वान् व अविद्वान् यांना ब्रह्मप्राप्ति होते की होत नाहीं, याविषयीचे दोन अनुप्रश्न राहिले. त्यांतील 'विद्वान् ब्रह्मभावास प्राप्त होतो कीं होत नाहीं,' हा शेवटचा अनुप्रश्न आहे. त्याचें अपाकरण करण्यासाठीं पुढील वाक्य आहे. मधला अनुप्रश्न शेवटच्या अनुप्रश्नाचें अपाकरण—निराकरण केल्यानेंच निराकृत होणार आहे. यास्तव त्याच्या निरसनार्थ श्रुतीकडून निराळा यत्न केला जात नाहीं.—

स य एवंवित् । अस्माल्लोकात्प्रेत्य । एतमन्नमयमात्मानमुपसंक्रामति । एतं प्राणमयमात्मानमुपसंक्रामति । एतं मनोमयमात्मानमुपसंक्रामति । एतं विज्ञानमयमात्मानमुपसंक्रामति । एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रामति । तदप्येषः श्लोको भवति ॥

इति ब्रह्मवल्लयध्याये अष्टमोऽनुवाकः ॥ ८ ॥

अन्वयार्थ—[सः यः एवंविद्–] तो जो कोणी अशाप्रकारें उत्कर्ष व अपकर्ष यांस सोडून वर सांगितलेल्या प्रकारचें ज्ञान व अनन्त ब्रह्म मी आहें, असें जाणतो तो ' एवंविद् ' काय करतो, तर [अस्मात् लोकात् प्रेत्य–] तो या लोकांतून निघून जाऊन; दृष्ट व अदृष्ट इष्ट विषयांचा समुदाय हाच हा लोक आहे, त्या या लोकापासून प्रेत्य–प्रत्यावर्तन करून, त्याविषयीं निरपेक्ष होऊन [एतं अन्नमयं आत्मानं उपसंक्रामति–] या–वर व्याख्यान केलेल्या प्रकारच्या अन्नमय आत्म्यास प्राप्त होतो. ह्म० सर्व विषयजात अन्नमय पिंडात्म्याहून व्यतिरिक्त (भिन्न) पहात नाहीं. सर्व स्थूल भूतवर्ग हा अन्नमय आत्मा आहे, असें पाहतो, असा याचा इत्यर्थ. [एतं प्राणमयं आत्मानं उपसंक्रामति–] त्याहून अभ्यंतर अशा या प्राणमय आत्म्यास सर्व अन्नमय आत्म्यामध्यें स्थित व अविभक्त पाहतो. नंतर [एतं मनोमयं०–] या मनोमय आत्म्यास, विज्ञानमय आत्म्यास व आनंदमय आत्म्यास प्राप्त होतो. म्ह० क्रमानें सर्व विषयजात तन्मय आहे, असें पाहतो. या उपसंक्रमणादिकांविषयीं सविस्तर व सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. [तदपि एषः श्लोकः भवति–] त्या अर्थीं हा श्लोक–मंत्र आहे. ८.

यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसा सह । आनन्दं ब्रह्मणो विद्वान् । न बिभेति कुतश्चनेति ॥

अन्वयार्थ—[यतः–] ज्या उक्तरूप निर्विकल्पापासून, अद्वयानंद आत्म्यापासून [वाचः–] नांवें–द्रव्यादि सविकल्पवस्तुविषयक शब्द; इतर वस्तूंप्रमाणें यालाहि वस्तुत्व आहे, असें समजून निर्विकल्प व अद्वय अशाहि ब्रह्माचे ठिकाणीं शब्दप्रयोग करणाऱ्या लोकांकडून त्या ब्रह्माचें प्रकाशन करण्यासाठीं योजले जाणारे शब्द त्या ब्रह्माला [अप्राप्य–] प्रकाशित न करतांच [निवर्तन्ते–] निवृत्त

होतात म्हणजे आपल्या अर्थप्रकाशन-सामर्थ्यापासून भ्रष्ट होतात; [मनसा सह–] यांतील मन ह्म० प्रत्यय, विज्ञान; तें ज्या अतींद्रिय पदार्थांमध्येंहि अभिधान–शब्द–वाणी प्रवृत्त होते तेथेंच त्याला प्रकाशित करावयासाठीं प्रवृत्त होतें आणि जेथें विज्ञान प्रवृत्त होतें तेथें वाणीची प्रवृत्ति होते. यास्तव वाक् व मन म्ह० अभिधान–शब्द–नांव–वाचक व प्रत्यय–विज्ञान यांची सर्व विषयांचे ठिकाणीं सहवर्तमानच (बरोबरच) प्रवृत्ति होते. तस्मात् ब्रह्म कसेंहि असलें तरी शब्दप्रयोग करणारांकडून त्याच्या प्रकाशनासाठीं योजले जाणारेहि शब्द कोणत्याहि प्रत्ययाचा विषय नसलेल्या, शब्दांचा विषय न होणाऱ्या व अदृश्यादि विशेषणांनीं युक्त असलेल्या अशा ज्याच्यापासून मनासह ह्म० सर्वप्रकाशनसमर्थ विज्ञानासह निवृत्त होतात [ब्रह्मणः आनन्दं विद्वान्–] त्या ब्रह्माच्या आनंदाला–निष्पाप व अकामहत–सर्व एषणारहित श्रोत्रियाच्या आत्मभूत, विषयविषयिसंबंधशून्य, स्वाभाविक, नित्य व अविभक्त–अखंड ब्रह्माच्या परमानंदाला, वर सांगितलेल्या प्रकारानें जाणणारा [कुतश्चन न बिभेति इति–] कोणत्याहि कारणानें भीत नाहीं. कारण त्याच्या भयाला कांहीं निमित्तच नसतें. त्या विद्वानाहून निराळी वस्तुच नाही, की जिला तो भिईल. पण अविद्येमुळें जेव्हां तो थोडेसेंहि अंतर–भेद करतो तेव्हां लागलेंच त्याला भय होतें, असें वर सांगितलेंच आहे. मनोमयाच्या पर्यायांतहि हाच मंत्र उदाहरणार्थ दिला आहे. कारण मन ब्रह्मविज्ञानाचें साधन आहे. त्यामुळें त्या मनाचे ठिकाणीं ब्रह्मत्वाचा आरोप करून त्याच्या स्तुतीकरितां ' न बिभेति कदाचन ' असें ह्मणून नुस्त्या भयाचा निषेध केला आहे. पण येथें–या अद्वैतविषयामध्यें ' न बिभेति कुतश्चन ' असें म्हणून भयाच्या निमित्ताचाच निषेध केला आहे. ' अहोपण, सदाचरण न करणें व पापाचें आचरण करणें असें दोन प्रकारचें भयाचें निमित्त आहे. ' असें कोणी म्हणेल म्हणून श्रुति सांगते—

एतꣳ ह वाव न तपति । किमहꣳ साधु
नाकरवम् । किमहं पापमकरवमिति ॥

अन्वयार्थ—[एतं–] या पूर्वोक्त एवंवेत्त्याला [ह वाव–] हे निपात निश्चयार्थ आहेत. [न तपति–] उद्विग्न करीत नाहीं. संतापयुक्त करीत नाहीं. ' अहोपण, सत्कार्य न करणें व पाप कर्म, हीं त्याला उद्विग्न कशीं करीत नाहींत ?'

उत्तर—[किं—] कोणत्या कारणानें [साधु—] शुभ कर्म [अहं न अकरवम्—] मीं केलें नाहीं ? असा मरणकाल समीप आला असतां मागून संताप होतो. त्याचप्रमाणें [किं अहं पापं अकरवं इति—] मीं पाप—निषिद्ध कर्म कोणत्या कारणानें केलें आहे, असा नरकपतनादि दुःखाच्या भीतीनें ताप होतो. तीं हीं दोन्हीं—शुभकर्माचें अकरण व पापकरण अशा रीतीनें पूर्वोक्त विद्वानाला ताप देत नाहींत. तीं जशीं अविद्वानाला ताप देतात तशीं विद्वानाला ताप देत नाहींत. कोणत्या बरें कारणानें तीं विद्वानाला ताप देत नाहीत,तेंच आतां सांगितलें जात आहे.

स य एवं विद्वानेते आत्मानꣳस्पृणुते । उभे ह्येवैष
एते आत्मानꣳस्पृणुते । य एवं वेद । इत्युपनिषत् ॥

इति ब्रह्मवल्ल्यध्याये नवमोऽनुवाकः ॥ ९

अन्वयार्थ—[सः यः एवं विद्वान्—] तो जो असें जाणणारा [एते—] पाप व पुण्य हीं संतापाची कारणें आहेत, असें समजून [आत्मानं स्पृणुते—] आत्म्याला प्रसन्न करतो किंवा बलवान् करतो ह्म० ती दोन्हीं परमात्मभावानें पाहतो, असा याचा भावार्थ. [हि एषः उभे एव एते आत्मानं स्पृणुते—]ज्याअर्थीं अशाप्रकारें हा विद्वान् पुण्य व पाप ही दोन्ही आत्मरूपच आहेत, त्यामुळें स्वतःच्या विशेषरूपानें त्यांना शून्य करून आत्म्यालाच पाहतो, तो कोण, तर [यः एवं वेद—] जो असें जाणतो; पूर्वोक्त अद्वैत आनंदाला ब्रह्म जाणतो त्याचीं आत्मभावानें—आत्मस्वरूपानें पाहिलेलीं पुण्यपापें निर्वीर्य, अतापक होतात. तीं दुसऱ्या जन्माचीं आरंभक होत नाहींत. [इति उपनिषद्—] अशी—या वल्लींत वर जशी सांगितली आहे तशी ही ब्रह्मविद्या—उपनिषद् आहे म्ह० सर्व विद्यांहून परमरहस्य येथें दाखविलें, असा याचा भावार्थ. या विद्येंत परम श्रेय स्थित आहे. ९.

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै । शांतिः० ॥

इति ब्रह्मवल्ल्यध्यायः समाप्तः ॥ २

अथ तृतीयो भृगुवल्ल्यध्यायः ।

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

ज्याअर्थीं सत्य, ज्ञान व अनन्त ब्रह्म आकाशादि-अन्नमयान्त कार्य उत्पन्न करून त्यांतच मागून प्रविष्ट होऊन जणुंकाय सर्व विशेषयुक्त असल्यासारखें उपलब्ध होतें त्याअर्थीं सर्व कार्यांहून विलक्षण अदृश्यादि-धर्मक व आनन्द असें तेंच मी आहें, असें जाणावें. कारण त्याचा अनुप्रवेश त्यासाठींच—तसें जाणण्यासाठीच आहे. असें जाणणाऱ्या पुरुषांची शुभाशुभ कर्में दुसऱ्या जन्माची आरंभक होत नाहीत, असा हा आनन्दवल्लीतील विवक्षित अर्थ आहे. ब्रह्मविद्या त्या वल्लीत परिसमाप्त झाली. आतां यापुढें ब्रह्मविद्येचें साधन—तप सांगावें आणि त्याचप्रमाणें मार्गे न सांगितलेलीं अन्नादि-विषयक उपासनें सांगावीं म्हणून हें प्रकरण आरंभिलें जातें. येथील आख्यायिका विद्येच्या स्तुतीकरितां आहे.

भृगुर्वै वारुणिः । वरुणं पितरमुपससार । अधीहि भगवो ब्रह्मेति । तस्मा एतत्प्रोवाच । अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनो वाचमिति । तꣳहोवाच । यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ॥

इति भृगुवल्ल्यध्याये प्रथमोऽनुवाकः ॥१

अन्वयार्थ—[भृगुः वै वारुणिः—] येथील 'वै' शब्द प्रसिद्ध पुरुषाची आठवण करविणारा आहे. 'भृगु' अशा या नांवाचा प्रसिद्ध ऋषि अनुस्मरला जातो. 'वै-'शब्दानें त्याची मागून आठवण होते. वरुणाचें अपत्य तो वारुणि [वरुणं पितरं उपससार—] वरुण पित्यापाशीं ब्रह्मजिज्ञासु होऊन

गेला. [अधीहि भगवः ब्रह्म इति–] हे भगवन्, मला ब्रह्म शिकीव. मला त्याची आठवण करून दे, या मंत्रानें त्यानें गुरूपसदन केलें. [तस्मै एतत् प्रोवाच–] तो पिता यथाविधि समीप आलेल्या त्या पुत्राला असें बोलला. [अन्नं प्राणं चक्षुः श्रोत्रं मनः वाचं इति–] अन्न म्ह० शरीर, त्याच्या आंत असलेला प्राण–अत्ता–अन्न-भक्षक, चक्षु, श्रोत्र, मन व वाक् हीं उपलब्धीचीं साधनें आहेत.वरुणानें हीं ब्रह्माच्या उपलब्धीचीं द्वारें सांगितलीं आणि द्वारभूत अशीं हीं अन्नादिक सांगून [तं ह उवाच–] तो त्या भृगूला ब्रह्माचें लक्षण सांगता झाला. तें कोणतें, तर [यतः वा इमानि भूतानि जायन्ते–] ज्याच्यापासून हीं ब्रह्मादि-स्तंबपर्यंत भूतें उत्पन्न होतात; [येन जातानि जीवन्ति–] ज्याच्या योगानें तीं उत्पन्न झालेलीं भूतें जिवंत राहतात म्ह० प्राणांना धारण करतात, वाढतात आणि [प्रयन्ति यत् अभिसंविशन्ति इति–] विनाशसमयीं ज्या ब्रह्माप्रत जाणारीं तीं त्यांतच प्रवेश करितात–तादात्म्यास प्राप्त होतात; तात्पर्य–उत्पत्ति-स्थिति-लयसमयीं भूतें ज्याच्या स्वरूपास सोडीत नाहींत [तत् ब्रह्म इति–] तें ब्रह्म आहे, असें म्हणाला. हें ब्रह्माचें तटस्थ लक्षण आहे. [तत् विजिज्ञासस्व तत् ब्रह्म इति–] त्या ब्रह्माला विशेषतः जाणण्याची इच्छा कर. तें ब्रह्म आहे. जें अशा लक्षणाचें ब्रह्म आहे त्याला अन्नादिकांच्या द्वारा जाण, असा याचा भावार्थ. [सः तपः अतप्यत–] तो भृगु पित्यापासून ब्रह्माच्या उपलब्धीचीं द्वारें व ब्रह्माचें लक्षण ऐकून त्याच्या साक्षात्काराचें साधन, या रूपानें तप करता झाला. पण ज्याचा उपदेश केलेला नाहीं, असें तप ब्रह्मज्ञानाचें साधन आहे, हें ज्ञान भृगूला कोठून झालें? पित्यानें त्याला सावशेष वचन सांगितलें व त्यावरून त्याला तपाचें ज्ञान झालें. ह्म० वरुण ब्रह्माच्या ज्ञानाचें द्वार–' अन्नादि ' व लक्षण–' यतो वा इमानि० ' ह्म० ज्याच्यापासून भूतें उत्पन्न होतात, इत्यादि त्याला सांगता झाला. पण साक्षात् ब्रह्माचा निर्देश केलेला नसल्यामुळें तें वाक्य सावशेष आहे. (ह्म० तें वाक्य पूर्ण नाहीं. त्याचा कांहीं अवशेष राहिला आहे.) नाहींतर जिज्ञासुपुत्राला हें अशा तऱ्हेचें ब्रह्म आहे, असा ब्रह्माचा स्वरूपानेंच निर्देश करून सांगणें उचित होतें. पण त्यानें तसा निर्देश केला नाहीं. तर सावशेषच उपदेश केला. त्यावरून पिता ब्रह्मविज्ञानासाठी दुसऱ्या साधनाचीहि अपेक्षा करीत आहे, हें भृगूला कळणें साहजिक आहे. पण अनेक साधनांतील तप या विशेष साधनाचीच त्याला जी

प्रतिपत्ति झाली ती तप हें सर्व साध्यांचें अतिशय साधक आहे, म्हणून होय. कारण ज्याचे साध्यविषय नियत आहेत अशा सर्व साधनांतील तप हेंच अतिशय साधक साधन आहे, हें लोकांत प्रसिद्ध आहे. त्यामळें पित्यानें जरी सांगितलेलें नव्हतें तरी भृगु तप ब्रह्मविज्ञानाचें साधन आहे, असें जाणता झाला. तें तप ह्म० बाह्य व आंतर इंद्रियांचें समाधान हेंच आहे. कारण ब्रह्मज्ञानाचें तें द्वार आहे. 'मन व इंद्रियें यांचें ऐकाग्र्य हेंच परम तप आहे. तें सर्व धर्मांहून श्रेष्ठ आहे व तोच श्रेष्ठ धर्म आहे असेंहि म्हणतात,' अशी स्मृति आहे. असो; [सः तपः तप्त्वा–] तो भृगु तप करून (अन्न ब्रह्म आहे, असें जाणता झाला, असा पुढील अनुवाकाशी संबंध) १

अन्नं ब्रह्मेति व्यजानात्। अन्नाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। अन्नेन जातानि जीवन्ति। अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तꣳहोवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा॥

इति भृगुवल्ल्यध्याये द्वितीयोऽनुवाक. ॥ २

अन्वयार्थ—[अन्नं ब्रह्म इति व्यजानात्–] वर सांगितल्याप्रमाणें तो तप करून अन्न ब्रह्म आहे, असें जाणता झाला. कारण तेंच वर सांगितलेल्या प्रकारच्या लक्षणानें युक्त आहे. तें कसें? तर [अन्नात् हि एव खलु इमानि भूतानि जायन्ते–] अन्नापासूनच हीं भूतें होतात. [जातानि अन्नेन जीवन्ति–] उत्पन्न झालेलीं तीं अन्नानेंच जिवंत राहतात व [प्रयन्ति अन्नं अभिसंविशन्ति इति–] प्रलय पावणारी तीं अन्नामध्यें प्रवेश करितात. यास्तव अन्नाला ब्रह्मत्व युक्तच आहे, असा अभिप्राय. [तत् विज्ञाय–] भृगु याप्रमाणें तप करून व अन्न ब्रह्म आहे, असें लक्षण व उपपत्ति यांच्या योगानें जाणून [पुनः एव वरुणं पितरं 'अधीहि भगवः ब्रह्म' इति उपससार–] पुनरपि संशय आला असतां वरुण पित्यापाशीं 'अधीहि भगवो ब्रह्म' हाच मंत्र म्हणत गेला. पण त्याच्या संशयाचें कारण काय? असें कोणी विचारील तर सांगतों.—अन्नाची उत्पत्ति होत असल्याचें दिसतें. त्यामुळें उत्पन्न होणारें अन्न ब्रह्म कसें, अशी शंका येणें साहाजिक आहे. असो; [तं ह उवाच–] त्याला पिता म्हणाला—

[तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व–] तपानें ब्रह्माला जाणण्याची इच्छा कर. [तपः ब्रह्म इति–] कारण तप ब्रह्म आहे. [सः तपः अतप्यत–] तो तप करिता झाला. [सः तपः तप्त्वा–] तो तप करून प्राण ब्रह्म आहे असें समजला, असा पुढें संबंध. या प्रकरणांत ' तपानें ब्रह्माला जाणण्याची इच्छा कर, तप ब्रह्म आहे,' असा जो वारंवार उपदेश केला आहे तो तपाला साधनातिशयत्व आहे, असा निश्चय करण्यासाठीं आहे. म्ह० जोंवर ब्रह्माचें लक्षण निरतिशय झालेलें नाहीं व जोंवर जिज्ञासा निवृत्त झालेली नाहीं; तोंवर तप हेंच तुला साधन आहे. म्ह० तपानेंच ब्रह्माला विशेषेंकरून जाणण्याची इच्छा कर; असा याचा भावार्थ. २.

प्राणो ब्रह्मेति व्यजानात्। प्राणाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। प्राणेन जातानि जीवन्ति। प्राणं प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार। अधीहि भगवो ब्रह्मेति। तꣳ होवाच। तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व। तपो ब्रह्मेति। स तपोऽतप्यत। स तपस्तप्त्वा॥

इति भृगुवल्ल्यध्याये तृतीयोऽनुवाकः॥ ३

अन्वयार्थ—प्राणच ब्रह्म आहे, असें तो जाणता झाला. कारण प्राणापासूनच हीं भूतें होतात. उत्पन्न झालेलीं ती प्राणाच्या योगानेंच जिवंत राहतात व लय पावतांना प्राणांत लीन होतात, असें जाणून जड प्राण ब्रह्म कसा, असा संशय आल्यामुळें तो पुनरपि वरुण-पित्यापाशीं ' अधीहि भगवो ब्रह्म ' असें म्हणत गेला. त्याला पिता म्हणाला तपानें ब्रह्माला जाणण्याची इच्छा कर. तप ब्रह्म आहे. तेव्हां त्यानें तप केलें व तो तप करून (मन ब्रह्म आहे, असें समजला) ३.

मनो ब्रह्मेति व्यजानात्। मनसो ह्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। मनसा जातानि जीवन्ति। मनः प्रयन्त्यभिसंविशन्तीति। तद्विज्ञाय। पुनरेव वरुणं पितरमुपससार।

अधीहि भगवो ब्रह्मेति । तꣳ होवाच । तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व । तपो ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ॥

इति भृगुवल्ल्यध्याये चतुर्थोऽनुवाकः ॥ ४

अन्वयार्थ—वर सांगितल्याप्रमाणें आपल्या पाशींच विचाररूप तप करून तो 'मन ब्रह्म आहे' अर्से जाणता झाला. कारण मनापासूनच हीं सर्व भूतें उत्पन्न होतात. मनाच्या योगानेंच उत्पन्न झालेलीं तीं जिवंत राहतात. लीन होत असतांना मनांतच लय पावतात. (यास्तव मनच ब्रह्म आहे, असा तो निश्चय करता झाला. पण त्यामुळें त्याच्या मनाला समाधान वाटेना. कारण मन चक्षुरादि इतर इंद्रियांप्रमाणें करण असल्यामुळें तें कर्त्याच्या अधीन असतें. त्यामुळें त्याला ब्रह्मत्व संभवत नाहीं, असें वाटून) तो पुनः पित्याकडे पूर्वोक्त मंत्र म्हणत गेला. पित्यानेंहि त्याला पूर्वीप्रमाणेंच तप करावयास सांगितलें. तेव्हां तो तप करून विज्ञान ब्रह्म आहे, असें जाणता झाला. ४

विज्ञानं ब्रह्मेति व्यजानात् । विज्ञानाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते । विज्ञानेन जातानि जीवन्ति । विज्ञानं प्रयन्त्यभिसंविशन्तीति । तद्विज्ञाय । पुनरेव वरुणं पितरमुपससार । अधीहि भगवो ब्रह्मेति । तꣳ होवाच । तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व । तपो ब्रह्मेति । स तपोऽतप्यत । स तपस्तप्त्वा ॥

इति भृगुवल्ल्यध्याये पञ्चमोऽनुवाकः ॥ ५

अन्वयार्थ—विज्ञान ब्रह्म आहे, असें तो समजला. कारण विज्ञानापासूनच खरोखर हीं सर्व भूतें उत्पन्न होतात, उत्पन्न झालेली तीं विज्ञानाच्या योगानेंच जिवंत राहतात आणि आपला कार्यभाव सोडतांना विज्ञानांतच प्रवेश करितात, यास्तव विज्ञानच ब्रह्म आहे, असा त्यानें निश्चय केला. (पण कर्तृत्व क्लेशाला कारण होतें. यास्तव विज्ञान ब्रह्म नव्हे. शिवाय अन्नापासून विज्ञानापर्यंत जे चार पदार्थ वर सांगितले आहेत ते सर्व भूतांचे हेतू—कारण आहेत, असें ह्मणतां येत नाहीं. कारण आकाशादि भूतें अन्नादि भौतिक पदार्थांपासून होण्याचा संभव नाहीं, असा संशय आल्यामुळें) तो पुनरपि आपल्या पित्यापाशीं 'अधीहि भगवो०' इत्यादि मंत्र ह्मणत गेला. पण पिता त्याला ह्मणाला, "तपाच्या योगानें तूंच

ब्रह्मालो जाणें. कारण विचाररूप तप हच ब्रह्मप्रापक असल्यामुळें ब्रह्म आहे." तेव्हां त्यानें तप केलें आणि विचार करून (असा निश्चय केला) कीं,

आनन्दो ब्रह्मेति व्यजानात् । आनन्दाद्ध्येव
खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि
जीवन्ति । आनन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति ।

अन्वयार्थ—अशा रीतीनें तपाच्या योगानें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे, तो भृगु प्राणादिकांमध्यें ब्रह्माचें लक्षण संपूर्णपणें न पाहिल्यामुळें हळू हळू त्यांना सोडून त्यांच्या आंत प्रवेश करून सर्वांच्या आंत असलेल्या आनंदापासूनच हीं सर्व भूतें उत्पन्न होतात, उत्पन्न झालेलीं तीं आनंदानें जिवंत राहतात, प्रलयसमयीं आनंदात लीन होतात म्हणून आनंद ब्रह्म आहे, असें तप या साधनानेंच जाणता झाला. यास्तव ब्रह्मजिज्ञासूनें बाह्य इंद्रियें व अंतःकरण यांचें समाधान हेंच परम तपःसाधन अनुष्ठावें, त्या समाधानलक्षण तपाचेंच अनुष्ठान करावें, असा भावार्थ. आतां आख्यायिकेपासून निवृत्त होऊन श्रुति आपल्या वचनानें आख्यायिकेवरून निष्पन्न झालेला अर्थ सांगते—

सैषा भार्गवी वारुणी विद्या । परमे व्योमन्प्र-
तिष्ठिता । स य एवं वेद प्रतितिष्ठति ।

अन्वयार्थ—[सा एषा भार्गवी वारुणी विद्या—] ती ही भार्गवी म्ह० भृगूनें जाणलेली व वरुणानें सांगितलेली म्हणून वारुणी विद्या [परमे व्योमन् प्रतिष्ठिता—] परम आकाशांत म्ह० हृदयाकाश-गुहेंतील परम अद्वैत आनंदांत प्रतिष्ठित झालेली आहे. म्ह० अन्नमय आत्म्यापासून आधिक्यानें प्रवृत्त झालेली ती आनंदांत परिसमाप्त झाली आहे. [सः यः एवं वेद प्रतितिष्ठति—] अशा प्रकारें जो कोणी दुसराहि तप या साधनानें याच क्रमानें अनुप्रवेश करून आनंद ब्रह्म आहे, असें जाणतो तो अशा प्रकारें—विद्याप्रतिष्ठानामुळें स्वतः आनन्द परम ब्रह्मामध्यें प्रतिष्ठित होतो. तो ब्रह्मच होतो, असा याचा भावार्थ. पुढील वाक्यानें श्रुति त्याचें दृष्ट फल सांगते—

अन्नवानन्नादो भवति । महान्भवति ।
प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ।

इति भृगुवल्ल्यध्याये षष्ठोऽनुवाकः ॥ ६

अन्वयार्थ—[अन्नवान्–] पुष्कळ अन्न ज्याच्यापाशीं असतें तो अन्नवान्; कारण नुस्तें परिमित अन्न असणें, एवढ्या वरून सर्वच प्राणी अन्नवान् होतो, त्यामुळें नुस्तें अन्न असणें यांत विद्येपासून प्राप्त होणारा विशेष कांहींच नाही. त्याचप्रमाणें [अन्नादः भवति–] अन्न खातो तो अन्नाद, म्हणजे तो विद्यावान् दीप्ताग्नि होतो–ज्याचा अग्नि अतिशय दीप्त झाला आहे, असा तो होतो [महान् भवति–] तसाच तो महान् होतो. कोणत्या कारणानें त्याला महत्त्व येतें, तें वेद सांगतो–[प्रजया पशुभिः ब्रह्मवर्चसेन–] पुत्रादि प्रजेच्या योगानें, गाय, घोडे इत्यादि पशूंच्या योगानें व ब्रह्मवर्चसानें म्ह० शम-दम-ज्ञानादिनिमित्त तेजानें, तो महान् होतो. [महान् कीर्त्या–] तसाच तो शुभप्रचारनिमित्तक ख्यातीनें महान् होतो. ६.

अन्नं न निन्द्यात् । तद्व्रतम् । प्राणो वा अन्नम् । शरीरमन्नादम् । प्राणे शरीरं प्रतिष्ठितम् । शरीरे प्राणः प्रतिष्ठितः । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् ।

अन्वयार्थ—तसेंच [अन्नं न निंद्यात्–] ज्याअर्थीं द्वारभूत अन्नाच्या योगानें ब्रह्म विशेषेंकरून ज्ञात झालें आहे त्याअर्थीं गुरूप्रमाणेंच अन्नाची निंदा करूं नये. [तत् व्रतं–] ब्रह्माला जाणणाऱ्या याला अशा प्रकारें त्या व्रताचा उपदेश केला जातो. व्रताचा उपदेश अन्नाच्या स्तुतीकरितां आहे. अन्न ब्रह्माच्या उपलब्धीचा उपाय आहे, त्यामुळें तें स्तुतीला योग्य आहे. [प्राणः वै अन्नं शरीरं अन्नादं–] प्राणच अन्न आहे. कारण प्राणाचा शरीरांत अन्तर्भाव होतो. प्राण शरीरांत असतात. जें ज्याच्या आंत प्रतिष्ठित असतें तें त्याचें अन्न असतें. शरीरांत प्राण प्रतिष्ठित होतो. तस्मात् प्राण अन्न व शरीर अन्नाद आहे. त्याचप्रमाणें शरीरहि अन्न व प्राण अन्नाद आहे. कारण [प्राणे शरीरं प्रतिष्ठितं शरीरे प्राणः प्रतिष्ठितः–] प्राणांत शरीर प्रतिष्ठित आहे. कारण शरीराची स्थिति प्राण–अन्ननिमित्तक आहे. तस्मात् शरीर व प्राण हीं दोन्हीं अन्न व अन्नादहि आहेत. [तत् एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं–] ज्यामुळें तीं एकमेकांत प्रतिष्ठित आहेत त्यामुळें अन्न आणि ज्यामुळें तीं एकमेकांचीं प्रतिष्ठा

भूत आहेत त्यामुळें अन्नाद आहेत. यास्तव प्राण व शरीर हीं दोन्हीं अन्न व अन्नाद आहेत.

स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

इति भृगुवल्ल्यध्याये सप्तमोऽनुवाकः ॥ ७

अन्वयार्थ—[सः यः एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति–] तो जो अशा रीतीनें हें अन्न अन्नांत प्रतिष्ठित आहे, असें जाणतो तो अन्न व अन्नाद या रूपानेंच प्रतिष्ठित होतो. तसेंच [अन्नवान् अन्नादः भवति०–] अन्नवान् अन्नाद–दीप्ताग्नि होतो. प्रजा, पशु व ब्रह्मवर्चस यांच्या योगानें महान् होतो. कीर्तीनें महान् होतो. ७.

अन्नं न परिचक्षीत । तद्व्रतम् । आपो वा अन्नम् । ज्योतिरन्नादः । अप्सु ज्योतिः प्रतिष्ठितम् । ज्योतिष्यापः प्रतिष्ठिताः । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

इति भृगुवल्ल्यध्यायेऽष्टमोऽनुवाकः ॥ ८

अन्वयार्थ—[अन्नं न परिचक्षीत -] अन्नाचा परिहार करूं नये. [तत् व्रतं–] तें व्रत आहे. हें पूर्वीप्रमाणेंच स्तुतीकरितां सांगितलें आहे. [आपः वा अन्नं–] आप हेंच अन्न आहे व [ज्योतिः अन्नादः–] ज्योति अन्नाद आहे. प्यालेल्या जलाला उदरस्थ अग्नि शोषून टाकीत असतो. म्हणून तें अन्न व अग्नि अन्नाद–त्याला खाणारा. [अप्सु ज्योतिः प्रतिष्ठितं–] जलांत ज्योति प्रतिष्ठित आहे व [ज्योतिषि आपः प्रतिष्ठिताः–] ज्योतींत आप–जल प्रतिष्ठित आहे. (वृष्टीच्या जलांत विद्युत् दिसते व देह संतप्त झाला असतां स्वेद दिसतो. त्यामुळें तीं दोन्ही परस्परांच्या आधारानें राहतात, असें दिसतें. म्हणून तीं परस्परांचीं अन्नेंहि होतात. [तत् एतत् अन्न अन्ने प्रतिष्ठितं–] याप्रमाणें हें एक अन्न दुसऱ्या अन्नांत प्रतिष्ठित आहे. येणेंप्रमाणें उपास्य दाखवून श्रुति उपासनेचें विधान करते–[सः यः एतत् अन्नं अन्ने प्रतिष्ठितं वेद–] तो जो उपासक हें अन्न अन्नांत प्रतिष्ठित आहे, असें जाणतो, उपासना करतो तो [प्रति-

प्रतिष्ठति—] प्रतिष्ठित होतो. [अन्नवान् अन्नादः भवति—] तो अन्नवान् व अन्नाद होतो. [महान् भवति०—] विद्वत्तर होतो; प्रजा, पशु, ब्रह्मवर्चस्तेज व तज्जन्य कीर्ति यांच्या योगानें मोठा होतो. ८.

अन्नं बहु कुर्वीत । तद्व्रतम् । पृथिवी वा अन्नम् । आकाशोऽन्नादः । पृथिव्यामाकाशः प्रतिष्ठितः । आकाशे पृथिवी प्रतिष्ठिता । तदेतदन्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादो भवति । महान्भवति प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेन । महान्कीर्त्या ॥

इति ब्रह्मवल्ल्यध्याये नवमोऽनुवाकः ॥ ९

अन्वयार्थ—(आठव्या अनुवाकाच्या आरंभीं भोजनसमयीं प्राप्त झालेलें अन्न चांगलें नाही, अशा बुद्धीनें त्याचा परिहार करूं नये, असें सांगितलें. आतां येथें अतिथींना देण्यासाठीं—)[अन्नं बहु कुर्वीत—] पुष्कळ अन्न संपादन करावें. [तत् व्रतं—] कारण प्रस्तुत अन्नोपासकाचें तें व्रत आहे, (असें सांगितलें आहे. श्रुति या अनुवाकांत आणखी एक उपास्य सांगते—) [पृथिवी वै अन्नं—] सर्भोवार पसरलेल्या आकाशाच्या मध्यभागीं असलेली पृथ्वी हेंच अन्न व [आकाशः अन्नादः—] त्याला आपल्या उदरांत सांठविणाऱ्या आकाशाला अन्नाद म्हटलें आहे. [पृथिव्यां आकाशः प्रतिष्ठितः—] अशास्वरूपाला आकाश पृथ्वीच्या आधारानें राहिलें आहे, असें वाटतें. म्हणून पृथ्वीमध्यें आकाश प्रतिष्ठित आहे व [आकाशे पृथिवी प्रतिष्ठिता—] आकाशांत पृथ्वी प्रतिष्ठित आहे, असें भासतें. पण विचारदृष्ट्या पाहिल्यास आकाशच पृथ्वीचा आधार आहे. त्या दोघांना परस्पर अन्नत्व आहे, असें चिंतन करण्याविषयीं श्रुति सांगते—[तत् एतत्०—] तें हें अन्न अन्नांत प्रतिष्ठित आहे, एक दुसऱ्याच्या आधारानें राहिलें आहे. [सः यः एतत् अन्नं०—] तो जो याप्रमाणें अन्न अन्नांत प्रतिष्ठित आहे, अशी उपासना करतो तो प्रतिष्ठित होतो, अन्नवान् व अन्नाद होतो. प्रजा, पशु व ब्रह्मवर्चस यांच्या योगानें मोठा होतो. कीर्तीनेंहि मोठा होतो. ९

न कंचन वसतौ प्रत्याचक्षीत । तद्व्रतम् । तस्माद्यया कया च विधया बह्वन्नं प्राप्नुयात् । अराध्यस्मा अन्नमित्याचक्षते ।

अन्वयार्थ—[कंचन वसतौ न प्रत्याचक्षीत—] त्याचप्रमाणें पृथिवी व आकाश यांच्या उपासकाच्या वसतीविषयीं म्ह० वसतीच्या निमित्तानें कोणाचाहि निषेध करूं नये. वसतीकरितां आलेल्या कोणतेंहि पृथिव्याकाशोपासकानें निवारण करूं नये, असा याचा भावार्थ. [तत् व्रतं—] तें त्याचें व्रत आहे. वास—रहावयास जागा दिली असतां भोजन देणेंहि उचित आहे. [तस्मात् यया कया च विधया बहु-अन्नं प्राप्नुयात्—] यास्तव कोणत्याहि विधीनें—कोणत्याहि प्रकारानें पुष्कळ अन्न प्राप्त करून घ्यावें, पुष्कळ अन्नाचा संग्रह करावा, असा याचा भावार्थ. [अराधि अन्नं अस्मै इति आचक्षते—] ज्याअर्थी अन्नवन्त विद्वान् अन्नाची इच्छा करणाऱ्या अभ्यागताला त्याच्याकरितां अन्न अगदीं सिद्ध आहे, असें सांगतात. 'नाही,' असें म्हणून प्रत्याख्यान—निषेध कधीं करीत नाहींत, त्या कारणानेंहि बहु अन्नाचा संग्रह करावा, असा पूर्व वाक्याशीं संबंध. शिवाय अन्नदानाचें माहात्म्य सांगितलें जातें. जसें ज्या वेळीं अन्न देतो तसें त्याच वेळीं तें त्याला उलट नम्र होऊन परत मिळतें. तें कसें तेंच सांगतात—

एतद्वै मुखतोऽन्नꣳ राद्धम् । मुखतोऽस्मा अन्नꣳ राध्यते । एतद्वै मध्यतोऽन्नꣳ राद्धम् । मध्यतोऽस्मा अन्नꣳ राध्यते । एतद्वा अन्ततोऽन्नꣳ राद्धम् । अन्ततोऽस्मा अन्नꣳ राध्यते (१) । य एवं वेद ।

अन्वयार्थ—[एतत् राद्धं अन्नं वै मुखतः प्रयच्छति—] हें सिद्ध केलेलें अन्न मुखतः—प्रथम वयांत किंवा मुख्य वृत्तीनें पूजापुरःसर अन्नाची इच्छा करणाऱ्या अभ्यागताला देतो; (येथें 'देतो' अशा अर्थाचें 'प्रयच्छति' हें क्रियापद बाहेरून घ्यावें) त्याला कोणतें फल मिळतें तें श्रुति सांगते—[मुखतः—] म्ह० पूर्व वयांत किंवा मुख्य वृत्तीनें [अस्मै—] त्या अन्न देणाराला [अन्नं राध्यते—] अन्न सिद्ध करून दिलें जातें म्ह० त्यानें तें जसें दिलें असेल तसेंच उलट उपस्थित होतें, असा याचा भावार्थ. त्याचप्रमाणें [मध्यतः०—] मध्यम वयांत किंवा मध्यम उपचारानें दिलेलें अन्न त्याला तसेंच सिद्ध करून दिलें जातें. [अन्ततः०—] म्ह० अन्त्य वयांत किंवा हीन उपचारानें—तिरस्कारानें जें अन्न दिलें जातें तें

अन्न त्याला तसेंच सिद्ध होतें. [यः एवं वेद–] जो अशा रीतीनें–वर सांगितल्याप्रमाणें अन्नाचे माहात्म्य जाणतो त्याला अन्नदानाचें वर सांगितल्याप्रमाणें फल प्राप्त होतें. आतां ब्रह्माच्या उपासनेचा प्रकार सांगतात—

क्षेम इति वाचि । योगक्षेम इति प्राणापानयोः । कर्मेति हस्तयोः । गतिरिति पादयोः । विमुक्तिरिति पायौ । इति मानुषीः समाज्ञाः ।

अन्वयार्थ—[क्षेम इति वाचि–] क्षेम ह्म० प्राप्त वस्तूचें परिरक्षण. ब्रह्म वाणीमध्यें क्षेमरूपानें प्रतिष्ठित आहे, असें जाणून उपासना करण्यास योग्य आहे. जें प्राप्त नसेल त्याचें संपादन करणें, हा योग. [योगक्षेम इति प्राणापानयोः–] योग व क्षेम हे दोन्ही प्राण व अपान असले तरच होणार हें जरी खरें आहे, तरी ते प्राण व अपान यांच्याच निमित्तानें होणारे नाहींत. तर ते ब्रह्मनिमित्त आहेत. तस्मात् ब्रह्म योग व क्षेम यांच्या रूपानें प्राण व अपान यांमध्यें स्थित आहे, असें समजून तें उपासना करण्यास योग्य आहे. पुढील दुसऱ्या सर्व पर्यायांताहे तसेंच त्या त्या रूपानें ब्रह्मच उपास्य आहे. [कर्म इति हस्तयोः–] कर्म ब्रह्माकडूनच केलें जाणारें असल्यामुळें दोन्ही हातांच्या ठिकाणीं ब्रह्म कर्मरूपानें प्रतिष्ठित आहे, असें समजून तें उपास्य आहे. [गतिः इति पादयोः–] दोन्ही पायांचे ठिकाणीं तें गतिरूपानें, व [विमुक्तिः इति पायौ–] पायु या इंद्रियामध्यें त्याग या रूपानें तें आहे, असें जाणून त्याची उपासना करावी. [इति मानुषीः समाज्ञाः–]अशा या मानुषी ह्म० मनुष्यामध्यें होणाऱ्या मानुष्य समाज्ञा ह्म० आध्यात्मिक समाज्ञा–ज्ञानें–विज्ञानें–उपासनें आहेत, असा याचा भावार्थ.

अथ दैवीः । तृप्तिरिति वृष्टौ । बलमिति विद्युति । यश इति पशुषु । ज्योतिरिति नक्षत्रेषु । प्रजातिरमृतमानन्द इत्युपस्थे । सर्वमित्याकाशे । तत्प्रतिष्ठेत्युपासीत । प्रतिष्ठावान्भवति ।

अन्वयार्थ—[अथ दैवीः–] त्यानंतर आतां दैवी म्ह० देवांमध्यें झालेल्या समाज्ञा सांगितल्या जातात. [तृप्तिः इति वृष्टौ–] तृप्ति या भावनेनें वृष्टीमध्यें ब्रह्माची उपासना करावी. ह्म० वृष्टि अन्नादिकांच्या द्वारा तृप्तीला कारण होणारी असल्यामुळें ब्रह्मच तृप्तिरूपानें वृष्टींत व्यवस्थित आहे, अशा भावनेनें ब्रह्म उपासना करण्यास योग्य आहे. त्याचप्रमाणें अन्य पदार्थांमध्येंहि त्या त्या रूपानें

ब्रह्माचीच उपासना करावी. कशी ती पहा–[बलं इति विद्युति–] बलरूपानें विद्युत्-मध्यें; [यशः इति पशुषु–] यशोरूपानें पशूंमध्यें; [ज्योतिः इति नक्षत्रेषु–] ज्योतीरूपानें नक्षत्रामध्यें, [प्रजातिः अमृतं आनन्दः इति उपस्थे–]'प्रजाति' –पुत्रादि प्रजा, 'अमृत'–पुत्राच्या योगानें ऋणांतून सर्वथा मुक्त होणें इत्यादिकांच्या द्वारा अमृतत्वप्राप्ति व 'आनन्द'–सुख–उपस्थेंद्रियनिमित्तक सर्व सुख, असा याचा भावार्थ. ब्रह्मच या रूपानें उपस्थामध्यें प्रतिष्ठित आहे, अशी त्याची उपासना करावी. [सर्वं इति आकाशे–] सर्व वस्तुजात आकाशामध्यें प्रतिष्ठित आहे, हें प्रसिद्ध आहे. यास्तव जें सर्व आकाशांत आहे तें ब्रह्मच आहे, अशी उपासना करावी. शिवाय [तत् प्रतिष्ठा इति उपासीत–] तें आकाश ब्रह्मच आहे, यास्तव तें सर्वांची प्रतिष्ठा आहे, अशी उपासना करावी. [प्रतिष्ठावान् भवति–] प्रतिष्ठा या गुणाची उपासना केल्यामुळें उपासक प्रतिष्ठावान् होतो. याच न्यायानें पूर्वीच्या पर्यायांतहि जें जें ब्रह्माच्या अधीन असलेलें फल सांगितलें आहे तें ब्रह्मच आहे. त्याच्या उपासनेनें पुरुष तद्वान् होतो, असें जाणावें. ' त्याची जशी जशी (ज्या भावानें) उपासना करतो तेंच तो होतो ' अशी दुसरी श्रुति आहे. (कोणत्याहि विशेष फलाची इच्छा न धरतां केलेली उपासना बुद्धिशुद्धीच्या द्वारा ब्रह्मज्ञानाला उपकारक होते. पण तीच मुख्य अधिकाऱ्याच्या अपवादाला म्ह० हें सर्व जगत् नसून ब्रह्मच आहे, अशा ज्ञानाला कारण होते.)

तन्मह इत्युपासीत । महान्भवति । तन्मन इत्युपासीत । मानवान्भवति (३) तन्नम इत्युपासीत । नम्यन्तेऽस्मै कामाः । तद्ब्रह्मेत्युपासीत । ब्रह्मवान्भवति । तद्ब्रह्मणः परिमर इत्युपासीत । पर्येणं म्रियन्ते द्विषन्तः सपत्नाः । परि येऽप्रिया भ्रातृव्याः ।

अन्वयार्थ––[तत् महः इति उपासीत–] तें मह या रूपानें उपासावें. तें महत्त्वगुणयुक्त आहे, अशा भावनेनें त्याची उपासना करावी. म्हणजे तो उपासक [महान् भवति–] महान् होतो. [तत् मनः इति०–] तें मन असें उपासावें, मनन हेंच मन होय. ह्म० तो मानवान् होतो; मनन करावयास समर्थ होतो. [तत् नम०–]तें नम असें उपासावें. नमन हेंच नम आहे. अर्थात् तें नमन या गुणानें युक्त आहे, अशा रीतीनें त्याची उपासना करावी. [अस्मै

कामाः नर्म्यन्ते–] या उपासकाला–उपासकापुढें सर्व काम नमतात. ज्यांची कामना केली जाते ते काम ह्म० भोग्य विषय असा याचा भावार्थ. [तत् ब्रह्म इति उपासीत–] तें ब्रह्म असें उपासावें. ब्रह्म ह्म० सर्व प्रकारें अतिशय वाढलेलें, अशा गुणानें त्याची उपासना करावी. म्हणजे [ब्रह्मवान् भवति–] उपासक ब्रह्मवान्–त्या गुणानें युक्त होतो. [तत् ब्रह्मणः परिमरः इति उपासीत–] तें ब्रह्माचा परिमर असें उपासावें. ब्रह्माचा परिमर ह्म० त्यांत विद्युत्, वृष्टि, चंद्रमा, आदित्य व अग्नि अशा या पांच देवता सर्वतः मरतात–लीन होतात. यास्तव वायु हा परिमर आहे. दुसऱ्या श्रुतींत तशी प्रसिद्धिहि आहे. (' य एवमेताः पंच देवताः०.... वायुर्वाव संवर्गः ' इत्यादि छान्दोग्य(अ०५) श्रुति आहे. त्या श्रुतीवरून ब्रह्माचें संहारकर्तृत्व वायुद्वारक आहे. म्ह० ब्रह्म वायूच्या द्वारा संहार करणारें होतें, असें ठरतें. ह्मणून वायु ब्रह्माचा परिमर ह्म० संहाराचें साधन आहे,) तोच हा वायु आकाशाशीं अनन्य (अभिन्न)आहे. ह्मणून आकाश हा ब्रह्माचा परिमर आहे. त्या वायुरूप आकाशाला ब्रह्माचा परिमर या दृष्टीनें उपसावें. [एनं–] असें जाणणाऱ्या, अशी उपासना करणाऱ्या उपासकाचे [द्विषन्तः सपत्नाः–] जे द्वेष करणारे प्रतिस्पर्धी (कांहीं सपत्न द्वेष न करणारेहि असतात. ह्मणून ' द्विषन्तः सपत्नाः ' असें सपत्नांना ' द्विषन्तः ' हें विशेषण दिलें जातें.) जे त्याचा द्वेष करणारे सपत्न–प्रतिस्पर्धी असतात ते [परिम्रियन्ते–] प्राणांना सोडतात. [ये अप्रियाः भ्रातृव्याः ते परिम्रियन्ते–] तसेच जे याचे अप्रिय भ्रातृव्य द्वेष न करणारे असेहि असतात तेहि मरतात. (येणेंप्रमाणें अज्ञानदशेत मन्द अधिकाऱ्यांच्या उपयोगी असलेल्या सर्व उपासना सांगून आतां अपवाददृष्टीचा आश्रय करून श्रुति आत्म्याचें एकत्व सांगते–)

स यश्चायं पुरुषे । यश्चासावादित्ये । स एकः (४) । स य एवंवित् । अस्माल्लोकात्प्रेत्य । एतमन्नमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं प्राणमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं मनोमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं विज्ञानमयमात्मानमुपसंक्रम्य । एतमानन्दमयमात्मानमुपसंक्रम्य । इमाल्लँलोकान्कामान्नी कामरूप्यनुसंचरन् । एतत्साम गायन्नास्ते ।

अन्वयार्थ—[सः यः च अयं पुरुषे–] तो जो हा या पुरुषांत आहे; [यः च असौ आदित्ये–] आणि हा जो आदित्यामध्यें आहे [सः एकः–] तो एक आहे; [सः यः एवंविद्–] जो अशी उपासना करतो तो [अस्मात् लोकात् प्रेत्य–] या बाह्य पुत्रादि लोकांपासून निवृत्त होऊन, [एतं अन्नमयं आत्मानं उपसंक्रम्य–] या शरीररूपी अन्नमय आत्म्याशीं तादात्म्य पावून, [एतं प्राणमयं०–] या प्राणमय आत्म्याशी तादात्म्य पावून, [एतं मनोमय०–] या मनोमय आत्म्याशीं तादात्म्य पावून, [एतं विज्ञानमय०–] या विज्ञानमय आत्म्याशीं तादात्म्य पावून [एतं आनन्दमय०–] आणि या आनन्दमय आत्म्याशीं तादात्म्य पावून अन्नमयादि अविद्याकल्पित आत्म्यांचें क्रमानें संक्रमण करून सत्य, ज्ञान, अनन्त, अदृश्यादिधर्मक, स्वाभाविक आनन्द, अज, अमृत, अभय, अद्वैत व फलभूत, अशा ब्रह्माला प्राप्त झालेला तो [इमान् लोकान् अनुसंचरन् आस्ते–] ह्या भूः, भुवः इत्यादि लोकांतून अनुसंचार करीत रहातो, पण तो कसा अनुसंचार करतो? तर [कामान्नी–] इच्छेच्या अनुसार ज्याला अन्न प्राप्त होतें तो कामान्नी, त्याचप्रमाणें [कामरूपी–] ज्याला इच्छे-प्रमाणें रूपें प्राप्त होतात तो कामरूपी, अशा रीतीनें अनुसंचार करणारा म्ह० सर्वात्मरूपानें–आत्मस्वरूपानें या लोकांचाहि अनुभव घेणारा तो; काय करतो? तर [एतत् साम गायन् आस्ते–] हें साम गात रहातो. ब्रह्म सर्वत्र सम असल्यामुळें तेंच साम (ह्म० सर्वांशी अनन्यरूप आसणारें); तें गात, सामाचा उच्चार करीत, आत्म्याचें एकत्व प्रकट करीत व लोकांवर अनुग्रह करण्यासाठी एकत्वविज्ञानाचें फलहि प्रकट करीत, आपलें अत्यंत कृतार्थत्व गात रहातो. तें कसें तर–

हा३वु हा३वु हा३वु (५) । अहमन्नमहमन्नमहमन्नम् । अहमन्नादोऽ३हमन्नादोऽ३हमन्नादः । अहꣳ श्लोककृदहꣳ श्लोककृदहꣳ श्लोककृत् । अहमस्मि प्रथमजा ऋता-३ स्य । पूर्वं देवेभ्यो अमृतस्य ना३भायि ।

अन्वयार्थ—[हा३वु हा३वु हा३वु–] हे तीन शब्द 'अहो' या अर्थीं अत्यंत विस्मय प्रकट करण्यासाठीं आहेत. पण तो विस्मय कोणता, तेंच सांगितलें जातें–[अहं अन्नं अहं अन्नं अहं अन्नं अहं अन्नादः०–] अद्वैत आत्मा निरंजन असूनहि मीच अन्न व अन्नाद आहें. [अहं श्लोककृत्०–]

त्याचप्रमाणें मी श्लोककर्ता आहें. श्लोक ह्मणजे अन्न व अन्नाद यांचा संघात. त्याचा कर्ता–चेतनावान्. अथवा परार्थ म्ह० अन्नादासाठीं असलेल्या अनेकात्मक अन्नाचाच परार्थत्व म्ह० दुसऱ्या करितां असणें, या निमित्तानें संघात करणारा. 'श्लोककृत्' या शब्दाचा तीनदा जो उच्चार केला आहे तो विस्मयत्व प्रकट करण्यासाठीं आहे. [अहं प्रथमजाः अस्य ऋतस्य–] मी 'प्रथमजः' प्रथम उत्पन्न झालेला; मी या ऋत म्ह० सत्य अशा मूर्त व अमूर्त जगाचा प्रथमज हिरण्यगर्भहि आहें. [देवेभ्यः पूर्वं–] त्याचप्रमाणें देवांच्याहि पूर्वी असणारा विराड्रूप आहें. [अमृतस्य नाभि–] अमृतत्वाची नाभि म्ह० मध्य आहे. प्राण्यांचें अमृतत्व मजमध्यें उत्तमप्रकारें स्थित आहे, असा याचा भावार्थ.

यो मा ददाति स इदेव मा३ऽऽवाः । अहमन्नमन्न-
मदन्तम ३द्मि । अहं विश्वं भुवनमभ्यभवा३म् ।

अन्वयार्थ—[यः मा ददाति–] जो कोणी मज अन्नाला अन्नार्थी लोकांस देतो; म्ह० मला अन्नरूपानें सांगतो[सः इत् एव मा आवाः–] तो अशाप्रकारें, अशा तऱ्हेनें विनष्ट न झालेल्या यथाभूत अन्नाचें रक्षण करतो, असा याचा भावार्थ. पण याच्या उलट [अहं अन्नं अन्नं अदन्तं अद्मि–] जो दुसरा काल प्राप्त झाला असतां अन्नरूप मला याचकांना न देतां स्वतःच खातो त्या अन्न खाणाऱ्या, अन्नभक्षण करणाऱ्या पुरुषाला मी आतां अन्नरूपानेंच खातों. [अहं विश्वं भुवनं अभ्यभवाम्–] मी समस्त ब्रह्मादि भूतांकडून संविभाग करण्यास योग्य असलेलें अथवा त्यांत भूतें होतात, ह्मणून भुवन, मी सर्व भुवनाला पराभूत करतों म्ह० श्रेष्ठ ईश्वरस्वरूपानें या समस्त भुवनाचा उपसंहार करतों. (अर्थात् ईश्वराशीं आपलें तादात्म्य आहे, असें ज्ञान झालें असतां 'मी' या वृत्तीचा बाध होतो. अद्वैत सिद्ध होतें. त्यामुळें भयाचें कारणच उरत नाहीं, असा भावार्थ.)

सुवर्न ज्योतीः । य एवं वेद । इत्युपनिषत् ॥

इति भृगुवल्ल्यध्याये दशमोऽनुवाकः ॥ १०

अन्वयार्थ—[सुवर् न ज्योतीः—] यांतील 'सुवर्' म्ह० आदित्य; व नकार उपमा (इव) या अर्थी आहे. आदित्याप्रमाणें 'सुकृत् विभातं'—नित्य प्रकाश पावणारी 'ज्योति'—प्रकाश. आमची ज्योति—प्रकाश सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें नित्य प्रकाशमय आहे. [यः एवं वेद—] त्या या वर सांगितलेल्या प्रकारच्या उपनिषदाला—परमात्मज्ञानाला शान्त, दान्त, उपरत, तितिक्षु व समाहित होऊन भृगूप्रमाणें मोठें तप करून जो असें जाणतो त्याला वर सांगितलेल्या प्रकारचें फल प्राप्त होतें. १०

सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विशावहै ॥

ॐ शान्तिः । शान्तिः । शान्तिः ॥

इति कृष्णयजुर्वेदीयतैत्तिरीयोपनिषदि तृतीयो भृगवल्ल्यध्यायः समाप्तः ॥ ३

तैत्तिरीयोपनिषदाचें सिंहावलोकन.

या उपनिषदाचे तीन अध्याय आहेत. पहिला शीक्षाध्याय. त्यांत संहितेची निरनिराळ्या दृष्टीनें उपासना सांगितली आहे. चित्ताचें ऐकाग्र्य हें उपासनेचें फल आहे. पण उपासनेला व्याधि, आलस्य इत्यादि अनेक विघ्नें येतात. त्यांच्या शमनासाठीं आरंभी शांतिमंत्र सांगितला आहे. त्यांत शिष्य सूर्यादि देवता आम्हां गुरु-शिष्यांना सुखावह होवोत, असें म्हणून वायुरूप ब्रह्माला नमस्कार करून आपल्या व वक्त्याच्या रक्षणासाठी त्याची स्तुतिपूर्वक प्रार्थना करितो. उपनिषद् अर्थप्रधान जरी असलें तरी त्याच्या पाठाविषयींचा प्रयत्न शिथिल होऊं नये म्हणून वर्ण-स्वरादि यथाशास्त्र उच्चारावें असें शीक्षाध्यायांत सांगितलें आहे. उपासनेमुळें प्राप्त होणारें यश गुरु-शिष्यांना एकाच वेळी प्राप्त व्हावें अशी पुनः प्रार्थना केल्यावर संहितेच्या उपनिषदाचें—उपासनेचें व्याख्यान आरंभिलें आहे. लोक, ज्योति, विद्या, प्रजा व आत्मा—शरीरेंद्रियसमूह या पांच अधिकरणांत संहितोपासना सांगितली आहे. संहिता म्हणजे अक्षरांचा संधि. जसें 'यतेन्द्रिय-मनोबुद्धिः' यांत यत + इंद्रिय = यांचा 'यतेंद्रिय' असा संधि झाला आहे.

त्यांतील 'त'मधील 'अ' हें पूर्वरूप 'इ' हें उत्तररूप त्यांचा मध्यभाग हा संधि 'अ व इ' मिळून 'ए' असें जें होतें तें संधान. यांतील प्रत्येकांत पृथिवी, द्यौ इत्यादि लोकदृष्टि, अग्नि, आदित्य इत्यादि ज्योतिर्दृष्टि, आचार्य-शिष्य इत्यादि विद्यादृष्टि, माता-पिता इत्यादि प्रजादृष्टि व अधरा हनु इत्यादि अध्यात्मदृष्टि ठेवावी. म्हणजे संहितेच्या त्या त्या भागाचें त्या त्या दृष्टीनें चिंतन करावें. या चिंतनाचें प्रजा, पशु, ब्रह्मवर्चस, अन्न, स्वर्गलोक इत्यादि फल मिळतें.

याप्रमाणें संहितोपासना सांगितल्यावर शीक्षाध्यायाच्या चवथ्या अनुवाकांत धारणाशक्ति व वित्त यांच्या प्राप्तीचें साधन असा मंत्र, जप व होम सांगितला आहे. पांचव्या अनुवाकात स्वाराज्य हें फल देणाऱ्या व्याहृतिरूप हिरण्य-गर्भाची उपासना सांगितली आहे. सहाव्या अनुवाकांत ब्रह्माच्या साक्षात्काराचें व उपासनेचें हृदयाकाश हें स्थान व आत्मभावप्राप्तीचा मार्ग सांगितला आहे. सातव्या अनुवाकांत व्याहृत्यात्मक उपास्य ब्रह्माचें पृथिव्यादि पांक्तरूपानें उपासन सांगितलें जातें. अनुष्टुप्, गायत्री, जगती या छंदांप्रमाणेंच 'पंक्ति' या नांवाचा एक छंद आहे. त्यात पांच या संख्येचा संबंध आहे. त्यामुळें पंचावयवयुक्त उपासनेला पांक्त उपासना म्हटलें आहे. पृथिव्यादि पांच पांच अवयवयुक्त उपासना मुळात सांगितल्या आहेत, हे मूळ अनुवाक पाहिल्यानें कोणाच्याहि ध्यानात येईल असो; आठव्या अनुवाकात सर्व उपासनांच्या अंगभूत ओंकारोपासनेचें विधान केलें आहे. प्रश्न-मुंडक इत्यादि दुसऱ्या अनेक उपनिषदांतहि ओंकारोपासना विस्तर सांगितली आहे. त्यावरून सर्व उपासनांमध्यें ओंकारोपासनेचें महत्त्व फार आहे, असें दिसतें. ब्रह्माचें नांव किंवा मूर्ती-प्रमाणें प्रतीक, या दृष्टीनें ओंकाराचें सतत चिंतन केलें असतां उपासकाला पर-अपर-ब्रह्मप्राप्ति हें फल मिळतें. नवव्या अनुवाकात—विज्ञानानेंच स्वाराज्यप्राप्ति होते, हें खरें आहे; तरी श्रौत-स्मार्त कर्महि व्यर्थ नाहीत, त्यांनाहि पुरुषार्थ-साधनत्व आहे, हें प्रदर्शित करण्यासाठी—कर्मांचा उपन्यास केला आहे. दहाव्या अनुवाकांत चित्तशुद्धीसाठी स्वाध्यायमंत्र सांगितला आहे. त्याच्या आवृत्तीनें चित्त शुद्ध होऊन ज्ञानोत्पत्तीची योग्यता प्राप्त होते. अकराव्या अनुवाकांत ब्रह्मज्ञानापूर्वी अवश्य कर्तव्य असलेल्या श्रौत-स्मार्त कर्मांचा व कर्तव्याचा सुंदर उपदेश केला आहे. बाराव्या अनुवाकांत पूर्वोक्त शांतीचाच थोड्या फरकानें

अनुवाद केला आहे. याप्रमाणें हा शीक्षाध्याय साक्षात् ब्रह्मज्ञानोपयोगी जरी नसला तरी चित्तैकाग्र्याच्या अत्यंत उपयोगी अशा उपासनांचें विधान करणारा आहे. उपासना हें विद्येचें अन्तरंग साधन आहे. त्यामुळें याचें फार महत्त्व आहे.

दुसऱ्या ब्रह्मवल्ल्यध्यायांत आरंभींच 'ब्रह्मसाक्षात्कारवान् ब्रह्म होतो' असें ब्रह्मविद्येचें फल सांगून लागलाच ब्रह्माचें स्वरूपलक्षण सांगणाऱ्या 'सत्यं ज्ञानं अनन्तं०' इत्यादि ऋचेचा अनुवाद केला आहे. पुढें त्या आत्म्यापासून आकाशादि-शरीरान्त सर्व सृष्टि उत्पन्न झाली असें सांगून त्यांतील पहिल्या स्थूल अन्नमयाचें वर्णन केलें आहे. दुसऱ्या अनुवाकांत अन्नापासूनच सर्व शरीरें उत्पन्न होतात, अन्नानेंच वाढतात व अन्नांतच ती लीन होतात, त्यामुळें सर्व शरीरांहून अन्न ज्येष्ठ आहे, इत्यादि अन्नाचेंच महत्त्व, उपासना व फल सांगितलें आहे. या स्थूलशरीररूप अन्नमय-आत्म्याच्या आंत दुसरा प्राणमय आत्मा आहे. त्याचेहि शिरःप्रभृति पंचावयव आहेत. अन्नमयांत प्राणमय लोहाराच्या भात्यांतील वायूप्रमाणें भरलेला आहे. तिसऱ्या अनुवाकांत प्राणमयाचेंच महत्त्व एका मंत्राच्या आधारानें दाखवून प्राणाची उपासना व फल सांगितलें. प्राणमयाचा अन्तर आत्मा मनोमय आहे. प्राणमय जसा शरीराकार होतो त्याचप्रमाणें मनोमय प्राणमयाकार होतो. अन्नमय शरीर प्राणमयानें जसें पूर्ण आहे तसाच प्राणमय मनोमयानें पूर्ण आहे. मनोमयाचीहि शिरःप्रभृति कल्पित अंगें आहेत. चवथ्या अनुवाकांत या मनोमय आत्म्याच्या उपासनेचें अभयत्व हें फल सांगून त्याचा अन्तर आत्मा जो विज्ञानमय त्याचा मनोमयाकार व कल्पित शिरःप्रभृति अवयव सांगितले आहेत. पांचव्या अनुवाकांत विज्ञानमय आत्म्याचें महत्त्व, त्याची उपासना व फल सांगून विज्ञानमयाचा अन्तर आत्मा आनंदमय आहे, विज्ञानमय आनंदमय-आत्म्यानें परिपूर्ण आहे, इत्यादि वर्णन केल्यावर त्याचे कल्पित शिरःप्रभृति अवयव सांगितले आहेत. त्यांत आनंद हा आत्मा, ब्रह्म पुच्छ-प्रतिष्ठा इत्यादि वर्णन असून तें ब्रह्ममीमांसेच्या एका अधिकरणाचा महत्त्वाचा विषय होऊन राहिलें आहे. सहाव्या अनुवाकांत 'ब्रह्म असत् आहे—तें नाही,' असें मानणाऱ्या नास्तिकाची कोणती हानि होते व 'तें आहे' असें म्हणणारास कोणता मोठा लाभ होतो, तें सांगून आनंदमयच विज्ञानमयाचा शारीर आत्मा आहे, असें म्हटलें आहे. त्यानंतर शिष्यानें

आचार्याला 'अविद्वान् त्याला—ब्रह्माला प्राप्त होतो कीं नाहीं?' व तसाच 'विद्वान् त्याला प्राप्त होतो कीं नाहीं?' असे प्रश्न केले. त्यांचें उत्तर देण्यासाठीं—त्या आत्म्यानें 'मी प्रजारूपानें बहु व्हावें' अशी कामना केली,—असा आरंभ करून सृष्टीचें वर्णन केलें. सातव्या अनुवाकांत 'पूर्वी सृष्टि अव्यक्त होती तीच पुढें व्यक्त झाली. स्वतः आत्म्यानेंच आत्म्याला सृष्टिरूप केलें. म्हणून त्याला सुकृत—स्वयंकर्तृ म्हणतात,' असें अगोदर सांगून त्यावरून त्याचें अस्तित्व सिद्ध केलें आहे. नंतर तें स्वयंकर्तृ ब्रह्म रस आहे. त्याला प्राप्त होऊन प्राणी आनंदी होतो. या रसात्मक ब्रह्माच्या अस्तित्वामुळेंच प्राणाची प्राणन क्रिया व अपानाची अपानक्रिया होते. तो रस—आत्माच सर्वांना त्यांच्या धर्मानुरूप सुख देतो. याप्रमाणें विद्वानाच्या अभयाला व अविद्वानाच्या भयाला कारण होणारें ब्रह्म आहे. ज्यावेळी विद्वान् एक अद्वितीय सद्ब्रह्मामध्ये निर्भयपणें प्रतिष्ठेला प्राप्त होतो तेव्हां तो सर्वभयशून्य होतो. पण जेव्हां अविद्वान् त्याच्या स्वरूपांत यत्किंचित्हि भेददृष्टि—द्वैतदृष्टि ठेवतो तेव्हां त्याला मोठें भय प्राप्त होतें. भेददृष्टि विद्वानाचें तें ब्रह्मच भय आहे. अर्थात् अभिन्न आत्मतत्त्व न पाहणारा विद्वान् जरी असला तरी अविद्वान् आहे. आठव्या अनुवाकाच्या आरंभीच—भेददृष्टि वायु, सूर्य, अग्नि, इंद्र व मृत्यु हे पांची देव मोठे समर्थ व ईश्वर असूनहि द्वैतदृष्टीमुळें वाहणें, उदय पावणें, इत्यादि आयासप्रचुर कार्यांत मोठ्या भीतीनें प्रवृत्त होतात. त्यावरूनच त्यांच्या शास्त्याची कल्पना होते,—असें एका मंत्राच्या आधारानें सांगून नंतर त्याच सर्वकारणात्मक आनंदाची मीमांसा केली आहे. ती अशी—विद्वान्, श्रोत्रिय, तरुण, सदाचरणशील, सर्व सुखसाधनांनी संपन्न, अतिशय आशावान्, बलवान्, सुदृढ अशा सार्वभौम राजाचा जो आनंद तो एक मानुषानन्द होय. मनुष्यगंधर्वांचा आनंद त्याच्या शतपट अधिक असतो. निष्काम श्रोत्रियालाहि तितकाच आनंद होतो. जे मनुष्य विशिष्ट कर्म व उपासना यांच्या योगानें गंधर्वत्वास प्राप्त होतात ते मनुष्यगंधर्व. जन्मतःच देवगंधर्व झालेल्यांचा आनंद त्यांच्या आनंदाहून शतपट अधिक असतो. चिरलोकी राहणाऱ्या पितरांचा आनंद त्यांहून शतपट अधिक असतो. आजानज देवांचा आनंद त्याहून शतपट अधिक असतो. पितृलोकावर असलेल्या आजान संज्ञक देवलोकी उत्पन्न झालेल्या देवांना 'आजानज देव' म्हणतात. वैदिक कर्मांच्या योगानें देव झालेल्या कर्मदेवांचा

आनंद त्याहून शतपट अधिक आहे. त्या कर्मदेवांच्या आनंदाहून हविर्भाग ग्रहण करणाऱ्या तेहतीस देवांचा आनंद शतपट अधिक आहे. त्याहून इंद्राचा, इंद्राच्या आनंदाहून बृहस्पतीचा, बृहस्पतीहून प्रजापतीचा आनंद उत्तरोत्तर शतपट अधिक आहेत. निष्काम श्रोत्रियाचा आनंद त्या सर्वांच्या आनंदा-इतकाच असतो. अपर ब्रह्माचा आनंद प्रजापतीच्या आनंदाहूनहि शतपट अधिक आहे. पण निष्काम श्रोत्रियाला त्याचाहि अनुभव येतो. कारण गंधर्वादि सर्व आपापल्या प्राप्त अवस्थेंत तृप्त असतात. ते त्या परम पदाची इच्छा करीत नाहींत व निष्काम श्रोत्रियानें दोषदृष्टीनें त्या सर्व अवस्थाचा त्याग केलेला असतो. त्याचा आनंद पूर्ण परमानंदाचा एक लेश आहे. या पुरुषांतील व आदित्यांतील तो आनंद एक आहे. याप्रमाणें 'ब्रह्म आहे की नाहीं?' या अनुप्रश्नाचें व्याख्यान केलें. रसलाभ, प्राणनक्रिया, अभयप्रतिष्ठा, अभयदर्शन यांवरून तें आकाशादिकांचें कारण ब्रह्म आहे, असें सिद्ध झालें. आतां 'विद्वान् ब्रह्मभावास प्राप्त होतो कीं नाहीं?' या अनुप्रश्नाचें उत्तर असें—ब्रह्मानन्द अखंड एकरसरूप आहे, असें जाणणारा विद्वान् स्वपुत्रादिकोशषट्कापासून व्युत्थान पावून, त्या सर्वांविषयीं निरपेक्ष होऊन, अखंड एकरस स्वानन्दामध्यें प्रतिष्ठित होतो. सार्वभौमादिकांचे आनन्द उत्तरोत्तर शतपट अधिक जरी असले तरी समुद्रांतील एका जलबिंदूप्रमाणें ते त्याचे लेश आहेत. त्यामुळें त्या परानंदाची इयत्ता कळणें शक्य नाहीं. फार काय, पण त्याची नुस्ती कल्पना करितां येणेंहि शक्य नाहीं. याप्रमाणें आनंदाची मीमांसा केल्यावर नवव्या अनुवाकांत 'त्या आनंदाला जाणणारा विद्वान् कोणत्याहि जन्मनिमित्ताला भीत नाहीं,' असें सांगून श्रुति म्हणते—'मी जन्मभर पुण्य कां बरें केलें नाहीं आणि पापच कां केलें?' ही चिंता विद्वानाला शेवटीं ताप देत नाहीं. पण अविद्वानाला—अनात्मज्ञाला ती अंतकाल जसा जसा समीप येत जातो तशी तशी अग्निप्रमाणें जाळूं लागते. पुण्य व पाप हीं दोन्ही आत्मरूप आहेत असें जाणून विद्वान् आपली बुद्धि आत्म्यामध्येंच स्थिर करितो. दृढ बोधानें तो तृप्त होतो. सर्वत्र आत्मदृष्टि ठेवतो आणि आपली सर्वात्मता मोठ्या आनंदानें गातो. अशा सर्वात्मदर्शी तृप्त पुरुषालाच जीवन्मुक्त म्हणतात.

तिसऱ्या भृगुवल्ल्यध्यायांत ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठीं आख्यायिका आरंभिली आहे. वरुणपुत्र भृगु आपल्या वरुणपित्यापाशीं 'मला ब्रह्माचें स्मरण करून द्या' असें म्हणून शिष्यभावानें गेला. तेव्हां पित्यानें त्याला अन्नादि आत्मो-

पलब्धीचीं स्थानें सांगून ब्रह्माचें 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते०' इत्यादि तटस्थ लक्षण सांगितलें. तें ऐकून भृगूनें एकान्तांत बसून विचाररूप तप केलें, (१) व 'अन्न ब्रह्म आहे' असा निश्चय केला. कारण अन्नापासूनच उत्पन्न होणें, अन्नामुळेंच जिवंत राहणें व प्रलयसमयी पृथिवीरूप अन्नांत लय पावणें, हें ब्रह्मलक्षण अन्नामध्यें उपलब्ध होतें. पण त्याचा तो निश्चय फार वेळ टिकला नाही. कारण अन्न उत्पन्न होतें. तेव्हां उत्पन्न होणारें अन्न अज-अव्यय ब्रह्म कसें असेल ? अशी शंका आल्यामुळें भृगु पुनः वरुणपित्यापाशी गेला. पण त्यानें 'विचाररूप तपानेंच त्याला जाण' असें सांगितलें. तेव्हां तो पुनः एकान्तांत बसून विचार करूं लागला. (२). त्यामुळें प्राणापासून भूतांची उत्पति व स्थिति आणि प्राणांतच लय होत असल्यामुळें प्राणच ब्रह्म आहे, असें तो समजला. पण लागलाच त्याला 'जड व परतंत्र असलेला प्राण ब्रह्म कसा,' असा संशय आला. म्हणून तो पुनः पूर्ववत् पित्यापाशी गेला. पण वरुणानें त्याला 'विचाररूप तप कर' असें सांगितलें. त्यामुळें तो पुनः एकान्तांत बसून तप करूं लागला. (३) तेव्हां त्याला 'मन ब्रह्म आहे' असें ज्ञान झालें. मनापासून भूतांची उत्पत्ति, मनामुळेंच स्थिति व मनामध्येंच लय, हें ब्रह्मलक्षण मनामध्यें आहे, असें त्याला प्रथम वाटलें. पण आणखी थोडा विचार केल्यावर 'मन चक्षुरादि इतर इंद्रियांप्रमाणें करण—साधन आहे. त्यामुळें तेंच ब्रह्म आहे, असें म्हणतां येत नाहीं, असा संशय आल्यामुळें तो पुनः पित्यापाशी गेला व ब्रह्मज्ञानासाठीं प्रार्थना करूं लागला. तेव्हां पित्यानें पूर्वीप्रमाणेंच 'तप कर. विचाररूप तपच ब्रह्मज्ञानाचें साधन असल्यामुळें ब्रह्म आहे,' असें त्याला सांगितलें. तेव्हां त्यानें तप केलें व एकांतांत बसून विचार केल्यावर (४) 'विज्ञान ब्रह्म आहे. कारण भूतांच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचें कारण विज्ञान आहे' असें त्याला प्रथम वाटलें. पण विज्ञान म्ह० कर्तृत्व, तें क्लेशाला कारण होतें. त्यामुळें विज्ञान ब्रह्म नव्हे, असेंहि वाटल्यामुळें तो पुनरपि पूर्वीप्रमाणेंच पित्याजवळ गेला. वरुणानेंहि पूर्ववत् 'विचारानें ब्रह्माला जाण' इत्यादि सांगितलें. तेव्हां त्यानें पुनः तप केलें आणि तप करून (५) ज्याअर्थीं सर्व भूतांची उत्पत्ति, स्थिति व लय यांचें निमित्त आनंद आहे त्याअर्थीं आनंदच ब्रह्म आहे, असें साक्षात् जाणलें. भृगूनें जाणलेली व वरुणानें सांगितलेली अशी ही भार्गवी वारुणी विद्या हृदयाकाशरूप गुहेंतील परमानंदामध्यें परिसमाप्त झाली आहे. दुसराहि जो

कोणी विचारात्मक तपःसाधनानें आनंदामध्यें प्रवेश करून त्याला ब्रह्म जाणतो तोहि असाच परमानंदस्वरूप ब्रह्मामध्यें प्रतिष्ठित होतो. हें ब्रह्मविद्येचें अलौकिक फल आहे. तिचें दृष्ट फल असें—तो विद्वान् अन्नवान् होतो. केवल अन्नवान्च नाहीं तर अन्नादहि होतो. म्हणजे त्याचा अग्नि प्रदीप्त होतो. तो प्रजादिकांच्या योगानें महान्—मोठा होतो. (६) अन्न ब्रह्मज्ञानाचें द्वार असल्यामुळें गुरूप्रमाणेंच त्याची निंदा करूं नये, हें व्रत आहे. प्राण अन्न आहे व शरीर अन्नाद आहे. प्राण व शरीर हीं परस्परांच्या आधारानें राहतात, अशी जो त्यांची उपासना करितो तो प्रतिष्ठित वगैरे होतो. (७) अन्नाचा परिहार करूं नये. तें व्रत आहे. आप् अन्न आहे व ज्योति अन्नाद आहे. आपामध्यें ज्योति प्रतिष्ठित आहे व ज्योतींत आप प्रतिष्ठित आहे. अशी जो उपासना करितो तोहि प्रतिष्ठित वगैरे होतो .(८) पुष्कळ अन्न सांठवून ठेवावें. तें व्रत आहे. पृथिवी अन्न व आकाश अन्नाद आहे. याप्रमाणें तीं दोन्ही परस्परांमध्यें प्रतिष्ठित आहेत, असें जो जाणतो तो अन्नवान् वगैरे होतो९. जो कोणी जसें उत्तमादि प्रकारानें अन्न देतो तसेंच तें त्याला प्राप्त होतें. ब्रह्म वाक्मध्यें क्षेमरूपानें प्रतिष्ठित आहे, असें ध्यान करावें. ब्रह्म योग-क्षेमरूपानें प्राणापानामध्यें प्रतिष्ठित आहे, असें चिंतन करावें. तें कर्मरूपानें दोन्ही हातांत, गतिरूपानें दोन पायांत स्थित आहे, इत्यादि त्याची उपासना करावी. या मानुषी समाज्ञा—उपासना आहेत. तशाच ' ब्रह्म तृप्तिरूपानें वृष्टींत स्थित आहे० ' इत्यादि दैवी उपासना सांगून त्यांचें प्रतिष्ठावान् होणें, महान् होणें, इत्यादि फलहि सांगितलें आहे. ह्या उपासना करणारा ब्रह्मवल्लीमध्यें सांगितल्याप्रमाणें अन्नमयादिआनन्दमयान्त सर्व आनंदरूप आहे असें जाणून सुखानें संचार करितो. त्याला इच्छेप्रमाणें फल व स्वरूप प्राप्त होतें. परमानंदाच्या साक्षात्कारानें तो तृप्त होतो व आपला सर्वात्मभाव मोठ्या आनंदानें गात राहतो. (१०).

हें उपनिषद् अतिशय महत्त्वाचें आहे. यांत चित्तैकाग्र्यासाठीं अनेक उत्तरोत्तर श्रेष्ठ उपासना सांगितल्या आहेत. शीक्षाध्यायांतील शेवटचा आदेश—उपदेश फारच महत्त्वाचा आहे. ब्रह्मवल्लींत ब्रह्माचें प्रसिद्ध स्वरूपलक्षण व भृगुवल्लींत तटस्थ लक्षण सांगितलें आहे. आकाशादि पंच भूतांची उत्पत्ति, अन्नमयादि पंच कोशांचें वर्णन यांतच विशेषेंकरून दिसतें. ब्रह्ममीमांसेच्या अनेक अधिकरणांत यांतील भिन्न भिन्न वाक्यांची मीमांसा केली आहे. सु. ब्र. पृ. १२, २४—३१, ११६, १२५, १९०—२०६, ३१४—१५, ३३०. इ. पहा.

अथ ऐतरेयोपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

प्रथमः खंडः ।

वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता मनो मे वाचि प्रतिष्ठितमा-
विरावीर्म एधि । वेदस्य म आणी स्थः श्रुतं मे मा
प्रहासीरनेनाधीतेनाऽहोरात्रान्त्संदधाम्यृतं वदिष्यामि ।
सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवत्ववतु
मामवतु वक्तारमवतु वक्तारम् ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अन्वयार्थ—[मे -] माझी तत्त्वविद्याप्रतिपादक ग्रंथाच्या पाठांत प्रवृत्त झालेली [वाक्—] वाणी [मनसि—] मनामध्यें [प्रतिष्ठिता—] प्रतिष्ठित झाली आहे. म्हणजे मनाला जो जो शब्द बोलावा असें वाटतें तो तोच ती उच्चारते. [मे—] माझें [मनः—] मन [वाचि—] वाणीमध्यें [प्रतिष्ठितं—] प्रतिष्ठित झालें आहे. म्हणजे विद्याप्रतिपादक, या हेतूनें उच्चारण्यास योग्य असलेले जेवढे म्हणून शब्द आहेत तेच उच्चारण्याची इच्छा मन करतें. याप्रमाणें परस्परांकडून अनुगृहीत झालेली वाणी व मन आत्मज्ञानोपयोगी ग्रंथाचा पूर्णपणें निश्चय करण्यास समर्थ होतात. कारण मन सावधान नसलें तर पुरुष निजलेल्या किंवा वेड्या मनुष्याच्या बरळण्याप्रमाणें कांहीं तरी असंगत बोलेल; त्याचप्रमाणें वाणी पटु नसल्यास स्खलन पावणाऱ्या तिला सर्व विवक्षित अर्थ पूर्णपणें उच्चारतां येणार नाहीं. यास्तव त्या दोहोंचें अन्योन्य आनुकूल्य असो, अशी येथें प्रार्थना केली जात आहे. ' आविः ' या शब्दानें स्वप्रकाशब्रह्मचैतन्य सांगितलें जातें. 'प्रज्ञान' या शब्दानें त्याचा या उपनिषदांत व्यवहार केलेला असल्यामुळें त्याला आविर्भूतरूपत्व आहे. अशा प्रकारच्या हे ' आविः '—प्रकाश-

रूप आत्मन्, [मे–] मजकरितां [आविः एधि–] प्रकट हो. अविद्येचें आवरण दूर सारून प्रकट हो. हे वाणि व हे मना, [मे–] मजसाठीं [वेदस्य–] तत्त्वप्रतिपादक ग्रंथाला [आणी स्थः–] आणण्यास समर्थ व्हा. वेदोक्त तत्त्वज्ञानाला मजपाशीं आणण्यास, मला तें कळेल असें करण्यास समर्थ व्हा. [मे श्रुतं–] मीं श्रोत्रानें ऐकलेला ग्रंथ व जाणलेला त्याचा अर्थ [मा प्रहासीः–] माझा त्याग न करो. मला त्याचें विस्मरण न होवो. [अनेन अधीतेन–] या अध्ययन केलेल्या विस्मरणरहित ग्रंथानें [अहोरात्रान्–] रात्र व दिवस, यांस [संदधामि–] संयुक्त करीन. म्हणजे मी आळस सोडून अहोरात्र त्याचा पाठ करीन आणि ह्या ग्रंथाचा पाठ केला असतां [ऋतं वदिष्यामि–] परमार्थभूत वस्तु बोलेन. म्हणजे माझ्या तोंडून विपरीत अर्थाचा उच्चार कधीहि न होवो. तसेंच [सत्यं वदिष्यामि–] सत्य बोलेन. ऋत म्हणजे मानस सत्य व सत्य म्हणजे वाचिक सत्य. मनानें परमार्थतत्त्वाचा विचार करून वाणीनें त्याचाच उच्चार करीन. [तत् मां अवतु–] तें मजकडून बोलले जाणारें ब्रह्मतत्त्व मज शिष्याचें यथार्थ बोधानें पालन करो. [तत् वक्तारं अवतु–] तसेंच तें ब्रह्मतत्त्व वक्त्याचें –आचार्याचें रक्षण करो. आचार्याला बोध करण्याचें सामर्थ्य देऊन त्याचें पालन करो. [अवतु मां–] माझें अवन–रक्षण करो. [अवतु वक्तारं–] वक्त्याचें रक्षण करो. ही पुनरुक्ति फलाविषयीं आहे. म्हणजे पूर्वी साधनकालीं शिष्य व आचार्य यांच्या पालनाविषयीं प्रार्थना केली, आतां फलकालींहि त्याविषयींच प्रार्थना केली जात आहे. त्यांतील शिष्याचें अविद्याकार्यनिवृत्ति हें फल आहे व आचार्याचें तशा प्रकारच्या उत्तम शिष्याला पाहून विद्यासंप्रदायाची प्रवृत्ति झाल्यामुळें होणारा संतोष, हें फल आहे. [अवतु वक्तारं–] या पदांचा अभ्यास (आवृत्ति) सातव्या अध्यायाच्या व दुसऱ्या आरण्यकाच्या समाप्तीकरितां केला आहे. या मंत्राच्या पाठानें विद्या उत्पन्न होण्यापूर्वी विद्येला प्रतिबंध करणाऱ्या विघ्नांचा परिहार केला जातो व विद्योत्पत्तीनंतर तत्त्वाविषयीं विपरीत भावना, असंभावना इत्यादिकांस उत्पन्न करणाऱ्या विघ्नांचा परिहार केला जातो. 'शांतिः शांतिः शांतिः' असा त्रिवार उच्चार आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक तापांची शांति व्हावी म्हणून केला आहे.

ऐतरेय आरण्यकांडाच्या दुसऱ्या आरण्यकाच्या ४, ५, ६ व ७, अशा चार अध्यायांस 'ऐतरेय उपनिषद्' हें नांव आहे. त्यालाच आत्मषट्क असेंहि म्हणतात. त्यांत केवल आत्मविद्येचें प्रतिपादन केलें आहे. या पूर्वीच्या भागांत हिरण्यगर्भाच्या उपासनेसह कर्म परिसमाप्त झालें. उपासनेच्या योगानें चित्तशुद्धि होऊन ज्ञानाधिकारी बनलेल्या विरक्त पुरुषाला आतां असा आत्मोपदेश केला जातो—

ॐ आत्मा वा इदमक एवाग्र आसीन्नान्यत्किंचन मिषत् ॥

अन्वयार्थ—[आत्मा–] व्यापीत असल्यामुळें, उपभोग घेत असल्यामुळें व संततभावामुळें 'आत्मा' या शब्दानें सर्वज्ञ, सर्वशक्ति, क्षुधा, तृषा इत्यादि सर्वसंसारधर्मरहित नित्यशुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव, अज, अजर, अमर, अमृत व अद्वय परमात्मा सांगितला जातो. [वै–] हा निपात निश्चय या अर्थी आहे. म्ह० पूर्वोक्त आत्माच [एकः एव–] व तोहि एकटाच [इदं अग्रे आसीत्–] हें सर्व नाम-रूप-कर्मभेदामुळें भिन्न झालेलें–विचित्र जगत् सृष्टीच्या पूर्वी होता. (हें जें पूर्वी प्राणसंज्ञक प्रजापतीच्या रूपानें सांगितलेलें व निरनिराळीं नांवें, रूपें व कर्में यांच्या योगानें अनेक प्रकारचें झालेलें जगत् तें उत्पत्तीच्या पूर्वी एक आत्माच होतें. असो; याप्रमाणें 'एक' व 'एव' या दोन पदांनीं क्रमानें सजातीय व स्वगत भेदाचें निराकरण केलें. आतां विजातीयभेदाचें निराकरण करण्यासाठीं 'नान्यत्किंचन०' या श्रुतींतील पदांचें व्याख्यान असें–) [अन्यत्किंचन न–] दुसरें कांहींहि नव्हतें. (अखंड एकरस आत्म्यावांचून दुसरें कांहींएक नव्हतें. 'अहोपण, या जडप्रपंचाचें कारण, अशी जी जड माया ती त्यावेळींहि असतेच. तेव्हां सृष्टीच्या पूर्वी असलेला आत्मा विजातीय भेदानेंहि रहित आहे, असें कसें ह्मणतां,' अशी कोणी शंका घेईल, ह्मणून श्रुति म्हणते–[मिषत्–] निमिष करणारें, हालणारें, व्यापारयुक्त, चेष्टायुक्त, कोणत्याहि प्रकारचा व्यापार–चेष्टा–हालचाल करणारें नव्हतें. वास्तव दुसऱ्या व्यापारयुक्त पदार्थाचा निषेध संभवतो. व्यापाररहित असेंहि दुसरें कांहीं नव्हतें. येणेंप्रमाणें संक्षेपतः सांगितलेल्या आत्म्याच्या अखंडैकरसत्वाची सिद्धि करण्यासाठीं वर प्रपंचाच्या मिथ्यात्वाचा उल्लेख केला. आतां त्यालाच अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें दृढ करण्यासाठीं यापुढील सर्व अध्याय आहे. त्यांतील

' स जातो भूतान्यभिव्यैख्यत् ' येथपर्यंतचा भाग अध्यारोपाकरितां व त्यापुढील अध्यायसमाप्तीपर्यंतचा भाग अपवादाकरितां आहे. त्यांतहि वाचारंभणन्यायानें म्हणजे कोणताहि विकार आपल्या कारणाहून शब्दमात्र पृथक् असतो, वस्तुतः नाहीं; या न्यायानें आत्म्याहून निराळें असलेलें सर्व विकाररूप असल्यामुळें मिथ्या आहे, असें सांगण्यासाठीं हें पुढील सृष्टिवाक्य आहे. सृष्टिवाक्य म्हणजे उत्पत्तीविषयीं वाक्य; त्यांत आरंभींच स्रष्ट्या आत्म्याचें संभवनीय म्हणून वाटणारें चेतनत्व दृढ करण्यासाठी ' स ईक्षत लोकान्नु सृजा इति ' या वाक्यानें ईक्षण सांगतात—

स ईक्षत लोकान्नु सृजा इति स इमाल्ँलोकानसृजत ॥

अन्वयार्थ—[सः—] तो आत्मा एक असूनहि सर्वज्ञस्वभावतेमुळें [लोकान् नु सृजै इति—] मी लोकांना उत्पन्न करतों, असें [ईक्षत—] ईक्षण करता झाला. ' पण त्या एक व अखंड आत्म्याचें ईक्षण कसें संभवतें ? कारण त्याच्यापाशी त्यावेळीं विचाराचें साधन कांहीं नव्हतें,' अशी कोणी शंका घेईल; पण त्याला साधनाची अपेक्षा नाहीं. तो सर्वज्ञस्वभावत्वामुळें लौकिक साधनावांचूनच ईक्षण—आलोचन—संकल्प करिता झाला. आतां ' स इमान्० ' या वाक्यांशाचें व्याख्यान—[सः इमान् लोकान् असृजत—] या प्रमाणें अगोदर आलोचन—ईक्षण करून नंतर तो आत्मा या लोकांस उत्पन्न करता झाला. ' ईक्षणपूर्वक सृष्टि केली ' या वचनावरूनच जगत्स्रष्टा चेतन आहे, हें सिद्ध झालें. सु. ब्र. १. १. ५ पृ. २० पहा. आत्म्यानें कोणत्या क्रमानें लोकांना उत्पन्न केलें ? उत्तर—

अम्भो मरीचीर्मरमापः । अदोऽम्भः परेण दिवं द्यौः प्रतिष्ठा
अन्तरिक्षं मरीचयः पृथिवी मरो या अधस्तात्ता आपः ॥

अन्वयार्थ—[अंभः मरीचीः मरं आपः—] अंभ, मरीची, मर व आप यांस उत्पन्न केलें. आकाशादि क्रमानें ब्रह्मांड उत्पन्न करून ' अंभः-'प्रभृति लोकांस तो उत्पन्न करिता झाला. त्यांतील 'अंभः-'प्रभृति लोकांचें व्याख्यान स्वतःच श्रुति करते. [अदः अम्भः—] त्यांतील जो 'अंभः-'संज्ञक लोक आहे तो [परेण दिवं—] द्युलोकाच्या पलीकडे आहे. मेघ जलरूपानें त्यांत भरत असल्यामुळें तो जलवाचक 'अंभः-'शब्दाचा वाच्य होतो. [द्यौः प्रतिष्ठाः—] त्या अंभोलोकाची प्रतिष्ठा

—आधार द्युलोक आहे. द्युलोक ह्मणजे स्वर्लोक—स्वर्ग. [यत् द्युलोकात् अधस्तात् अन्तरिक्षं—] जें द्युलोकाच्या खालीं अंतरिक्ष आहे [तन्मरीचयः—] तो मरीचिलोक होय.तो जरी एक असला तरी त्यांत अनेक स्थानभेद असल्यामुळें ' मरीचयः ' अशा बहुवचनाला पात्र होतो. [पृथिवी मरः—] पृथिवी हा ' मर ' लोक आहे. कारण त्यांतील लोक मरतात. (ह्मणूनच त्याला मर्त्य असेंहि ह्मणतात.)[याः पृथिव्याः अधस्तात् ताः आपः लोकाः उच्यन्ते—] ज्या आप—जल पृथिवीच्या खालीं आहेत त्यांना आप—लोक म्हणतात. कारण अधोलोकीं निवास करणाऱ्या प्राण्यांकडून ते लोक प्राप्त केले जातात. (म्हणजे ' आप ' या नांवांत ' आप् ' ह्मणजे प्राप्त करणें या धातूच्या अर्थाचा संबंध आहे.) या चार लोकांच्या नांवांविषयींची उपपत्ति भाष्यार्थांत पहा. जन्म-मरण-सुख-दुःखप्राप्ति हाच संसार आहे. त्याचे आधारभूत लोक, उपाधिभूत लिंगशरीर, त्याचे अभिमानी देव, लिंगशरीराचें अधिष्ठान स्थूल शरीर, क्षुधा-तृषा इत्यादि ऊर्मि व त्या माझाच धर्म आहे, असा अभिमान बाळगणारा भोक्ता, ही सर्व त्या संसाराची सामग्री आहे. यास्तव त्या सर्वांची उत्पत्ति क्रमानें सांगण्याच्या इच्छेनें श्रुति संसाराधिष्ठानभूत लोकांची उत्पत्ति सांगून आतां त्या लोकांच्या पालक देवांची सृष्टि सांगण्याच्या मिषानें समष्टि स्थूलशरीर, समष्टि लिंगशरीर, त्यांचे अभिमानी देव, यांची सृष्टि सांगण्यास आरंभ करिते—

स ईक्षतेमे नु लोका लोकपालान्नु सृजा इति
सोऽद्भ्य एव पुरुषं समुद्धृत्यामूर्छयत् ॥

अन्वयार्थ—[सः—] सर्व प्राण्यांच्या अनुष्ठित कर्मांचें फल व त्याचें उपादान—साधन, यांच्या अधिष्ठानभूत—आधारभूत अंभःप्रभृति चार लोकांस उत्पन्न करून तो ईश्वर [ईक्षत—] पुनरपि असें ईक्षण करिता झाला. [इमे नु लोकाः—] मीं उत्पन्न केलेले हे अंभःप्रभृति लोक परिपालकांवांचून राहिल्यास नाश पावतील. यास्तव [लोकपालान् नु—] यांच्या रक्षणासाठीं लोकपालांस—लोकांच्या पालकांस [अहं सृजै—] मी उत्पन्न करितों, [इति—] असें (त्यानें ईक्षण केलें, असा संबंध. समष्टि लिंगशरीर व त्यावर अभिमान ठेवणाऱ्या देवता यांची उत्पत्ति विराटाच्या अवयवांपासून होणारी असल्यामुळें तिच्याकरितां विराट्सृष्टि सांगतात—) [सः—] याप्रमाणें ईक्षण करून तो

[अद्भ्यः एव–] जलांपासूनच–ज्यांमध्ये जल प्रधान आहे अशा पंचभूतांपासूनच म्हणजे ज्यांच्या पासून अंभःप्रभृति लोकांना त्यानें उत्पन्न केलें त्यांच्याचपासून, असा भावार्थ, [पुरुषं–] पुरुषास–मस्तक, हात-पाय इत्यादिकांनीं युक्त असलेल्या पुरुषाकारास [समृद्धृत्य–] वर काढून कुंभार पृथ्वीपासून मातीचा गोळा जसा काढून घेतो त्याप्रमाणें जलापासून पुरुषास काढून घेऊन [अमूर्छयत्–] साकार–सावयव करता झाला. त्याच्या अवयवांची चांगली योजना करून घट्ट करता झाला.

तमभ्यतपत्तस्याभितप्तस्य मुखं निरभिद्यत यथाण्डम् । मुखाद्वाग्वाचोऽग्निर्नासिके निरभिद्येतां नासिकाभ्यां प्राणः प्राणाद्वायुरक्षिणी निरभिद्येतां । अक्षीभ्यां चक्षुश्चक्षुष आदित्यः कर्णौ निरभिद्येतां कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्राद्दिशस्त्वङ्निरभिद्यत त्वचो लोमानि लोमभ्य ओषधिवनस्पतयो हृदयं निरभिद्यत हृदयान्मनो मनसश्चन्द्रमा नाभिर्निरभिद्यत नाभ्या अपानोऽपानान्मृत्युः शिश्नं निरभिद्यत शिश्नाद्रेतो रेतस आपः ॥

इत्यैतरेयोपनिषद्यात्मषट्के प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ––[तं–] त्या विराट्-पुरुषास उद्देशून [अभ्यतपत्–] त्यांतील छिद्रें, त्या छिद्रांतील इंद्रियें, त्यांच्या अभिमानी देवता इत्यादिकांच्या सृष्ट्यर्थ तो परमेश्वर पर्यालोचन करूं लागला. त्याचें पर्यालोचन हेंच तप आहे, असें उपनिषदांत सांगितलेंच आहे. [तस्य अभितप्तस्य–] ज्याच्याविषयीं सर्वप्रकारें पर्यालोचन केलें आहे अशा त्या विराट्-पिंडाचें [मुखं–] मुख हें छिद्र [निरभिद्यत–] झालें, मुखछिद्र विदारित झालें. उत्पन्न झालें. तें कसें झालें, हें सुचविण्यासाठीं [यथा अण्डं–] असा दृष्टान्त दिला आहे. म्हणजे पक्षी, सर्प इत्यादिकांचें परिपक्व झालेलें अंडें जसें आपोआप उकलतें त्याप्रमाणें तें मुखच्छिद्र झालें. [मुखात् वाक्–] त्या मुखच्छिद्रापासून वाक् हें इंद्रिय निष्पन्न –अभिव्यक्त झालें. [वाचः अग्निः–] वाक्-पासून अग्निदेवता उत्पन्न–व्यक्त झाली, त्याचप्रमाणें [नासिके–] नाकाचीं दोन छिद्रें [निरभिद्येतां–] फुटलीं. [नासिकाभ्यां–] त्या नाकाच्या छिद्रांपासून [प्राणः–] घ्राणेंद्रिय व [प्राणात्–] प्राणापासून [वायुः–] वायुदेवता व्यक्त झाली. [अक्षिणी निरभिद्येतां–] नेत्रांचीं छिद्रें झालीं. [अक्षीभ्यां–] त्या दोन नेत्रांपासून [चक्षुः–] चक्षुरिंद्रिय व

[चक्षुषः—] चक्षूपासून [आदित्यः—] सूर्य उत्पन्न झाला. [कर्णौ—] कानांचीं दोन छिद्रें [निरभिद्येतां—] झालीं. [कर्णाभ्यां—] दोन्ही कर्णांपासून [श्रोत्रं—] श्रोत्रेंद्रिय व [श्रोत्रात् दिशः—] श्रोत्रापासून दिशा झाल्या. [त्वक् निरभिद्यत—] त्वक्-इंद्रिय निष्पन्न झालें. [त्वचो लोमानि—] त्वचेपासून लोम उत्पन्न झाले. येथें 'लोम-'शब्दानें लोमाधारभूत व त्वचेंत असणारें स्पर्शनेंद्रिय घ्यावें. [लोमभ्यः ओषधिवनस्पतयः—] स्पर्शनेंद्रियापासून औषधी व वनस्पती झाल्या. [हृदयं निरभिद्यत—] हृदय निर्माण झालें. [हृदयात् मनः—] हृदयकमलापासून मन —अन्तःकरण झालें. [मनसः चन्द्रमाः—] मनापासून चन्द्रमा झाला. [नाभिः निरभिद्यत—] नाभि—सर्व प्राणांचें बंधनस्थान हें छिद्र झालें. [नाभ्याः अपानः—] नाभीपासून अपान झाला. [अपानात् मृत्युः—] अपानापासून मृत्यु झाला. [शिश्नं निरभिद्यत—] शिश्न हें छिद्र झालें. [शिश्नात्—] त्या छिद्रापासून [रेतः—] गुह्येंद्रिय झालें आणि [रेतसः आपः—] गुह्येंद्रियापासून आप—प्रजापति झाला. १.

ता एता देवताः सृष्टा अस्मिन् महत्यर्णवे प्रापतंस्तमशनापिपासाभ्यामन्ववार्जत् । ता एनमब्रुवन्नायतनं नः प्रजानीहि । यस्मिन् प्रतिष्ठिता अन्नमदामेति । ताभ्यो गामानयत्ता अब्रुवन्न वै नोऽयमलमिति । ताभ्योऽश्वमानयत्ता अब्रुवन्न वै नोऽयमलमिति । ताभ्यः पुरुषमानयत्ता अब्रुवन्सुकृतं बतेति पुरुषो वाव सुकृतम् ॥ ता अब्रवीद्यथायतनं प्रविशतेति ॥

अन्वयार्थ—[सृष्टाः ताः एताः देवताः—] ईश्वरानें संकल्पानें उत्पन्न केलेल्या त्या ह्या इंद्रियाभिमानिनी देवता [अस्मिन् महति अर्णवे—] या मोठ्या संसारसागरांत [प्रापतन्—] पडल्या. तेव्हां परमेश्वरानें [तं—] सर्व इंद्रियें व त्यांच्या देवता यांच्या अधिष्ठानभूत अशा त्या विराड्देहास [अशनापिपासाभ्यां—] क्षुधा व पिपासा (तहान) यांच्या योगानें [अन्ववार्जत्—] संयुक्त केलें. (आतां ही श्रुति अल्पदेहांची उत्पत्ति सांगते—) [ताः—] तेव्हां त्या इंद्रियाभिमानी देवता [एनं—] त्या सृष्ट्या परमेश्वरास [अब्रुवन्—] म्हणाल्या—हे परमेश्वरा! हा विराड्देह आमच्या भोगास योग्य नाहीं. कारण तो फारच विस्तृत आहे. यास्तव त्याला नखशिखान्त व्यापून त्यांत प्रतिष्ठित होण्यास

आम्ही असमर्थ आहों. त्याचप्रमाणें या एवढ्या देहाला पुरेल इतकें अन्न संपादन करण्यासहि आम्ही असमर्थ आहों. यास्तव [यस्मिन् प्रतिष्ठिताः (सत्यः) अन्नं अदाम–] ज्या अल्पदेहांत प्रतिष्ठित होऊन आम्ही अन्न खाऊं शकूं म्हणजे त्या अल्प देहास पुरेल इतकें अन्न खाण्यास समर्थ होऊं, असें [आयतनं नः प्रजानीहि–] शरीर–स्थान–आम्हांकरितां संपादन कर. (असें स्थान कोणतें, याचा विचार कर.) [इति–] असें त्या बोलल्या. तेव्हां परमेश्वर [ताभ्यः–] त्या देवतांच्या भोगाकरितां [गां आनयत्–] गायीचा देह आणता झाला. [ताः अब्रुवन्–] तेव्हां त्या देवता ह्मणाल्या, [नः अयं न वै अलं–] आह्मांला हा देह पुरेसा नाहींच, (आह्मांला जसा पाहिजे तसा हा नाहीं. या शरीराला वरचे दांत नाहींत. त्यामुळें त्याला दूर्वादि मुळें उपटतां येणें शक्य नाहीं. तस्मात् त्या विराड्देहाप्रमाणें हाहि गायीचा देह राहूं दे. ज्याला दोन्ही बाजूंस दांत आहेत, असा दुसराच देह निर्माण कर.) [इति–] असें त्या बोलल्या. त्यानंतर परमेश्वर [ताभ्यः–] त्यांच्याकरितां [अश्वं आनयत्–] अश्व आणता झाला. पण [ताः अब्रुवन्–] त्या ह्मणाल्या– [नः अयं न वै अलं इति–] हा अश्वदेहहि विवेकज्ञानशून्य असल्यामुळें आह्मांला पुरेसा नाहीं. तेव्हां परमेश्वर [ताभ्यः–] त्यांच्यासाठीं [पुरुषं आनयत्–] विवेकसंपन्न विराड्-देहाकार पुरुषदेह आणता झाला. [ताः अब्रुवन्–] तेव्हां त्या स्वयोनिभूत–विराड्देहसजातीय देहास पाहून तेवढ्यानें संतुष्ट झालेल्या त्या देवता म्हणाल्या–[सुकृतं बत–] अहाहा परमेश्वरानें हें फार चांगलें केलें, येथें ' बत ' या आश्चर्यवाचकशब्दानें आपला संतोष सुचविणाऱ्या त्या ' सुकृतं-' चांगलें केलें [इति–] असें बोलल्या. यास्तव [पुरुषः वाव सुकृतं–] मनुष्यदेहच ' सुकृतं ' या संतोषद्योतकशब्दानें सांगतां येण्यासारखा आहे. (याविषयीं याच आरण्यकांत मागें ' मनुष्यदेहांतच आत्मा अधिक प्रकट झाला आहे. कारण तो प्रज्ञानानें अतिशय संपन्न आहे. तो आपल्याला कळलेलें बोलूं शकतो. कळलेली वस्तु पाहूं शकतो. कालची गोष्ट त्याला आज आठवते. त्याला प्रकाश व अप्रकाश यांचें ज्ञान असतें. तो या मर्त्यशरीराच्या योगानें अमृताच्या (अमरणाच्या) प्राप्तीची इच्छा करतो, इत्यादि योग्यतेनें तो संपन्न आहे ' असें म्हटलें आहे. आतां ईश्वरानें निर्माण केलेल्या भोग-

योग्य शरीरांत त्या देवतांचा प्रवेश व्हावा म्हणून श्रुति ईश्वराची प्रेरणा दाखविते–) तो ईश्वर [ताः यथायतनं प्रविशत इति अब्रवीत्–] त्या देवतांना 'अहो देवतांनो, आपापल्या यथोचित आयतनांत–स्थानांत प्रवेश करा,' असें बोलला. (म्हणजे विराड्देहाच्या ज्या छिद्रांत जें इंद्रिय उत्पन्न झालें व त्यांत जी देवता उत्पन्न झाली, त्यांच्याच अनुरोधानें, त्यांच्या स्थानादिकांचें उल्लंघन न करितां प्रवेश करा, अशी आज्ञा ईश्वरानें केली.) तेव्हां–

अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशद्वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशदादित्यश्चक्षुर्भूत्वाऽक्षिणी प्राविशद्दिशः श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशन्नोषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशंश्चन्द्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशन्मृत्युरपानो भूत्वा नाभिं प्राविशदापो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशन् ॥

अन्वयार्थ––[अग्निः–] ईश्वराची अशी आज्ञा होतांच वागिंद्रियाचा अभिमानी देव अग्नि [वाग् भूत्वा–] वाणी होऊन, वाणीत अंतर्भूत होऊन [मुखं प्राविशत्–] मुखछिद्रांत प्रवेश करिता झाला. [वायुः प्राणः भूत्वा–] वायु प्राण –घ्राणेंद्रिय होऊन [नासिके प्राविशत्–] नाकाच्या दोन्ही छिद्रांत प्रवेश करता झाला. [आदित्यः चक्षुः भूत्वा–] सूर्य चक्षुरिंद्रिय होऊन [अक्षिणी प्राविशत्–] नेत्रछिद्रांत प्रवेश करता झाला. [दिशः श्रोत्रं भूत्वा–] दिशा श्रोत्रेंद्रिय होऊन [कर्णौ प्राविशन्–] दोन्ही कानांच्या छिद्रांत प्रवेश करत्या झाल्या. [ओषधिवनस्पतयः–] ओषधि व वनस्पती [लोमानि भूत्वा–] लोम होऊन [त्वचं प्राविशन्–] त्वचेमध्यें प्रवेश करत्या झाल्या. [चन्द्रमाः मनः भूत्वा–] चन्द्र मन होऊन [हृदयं प्राविशत्–] हृदयांत प्रवेश करता झाला. [मृत्युः अपानः भूत्वा नाभिं प्राविशत्–] मृत्यु अपान होऊन नाभींत प्रवेश करता झाला. [आपः रेतः भूत्वा–] आप रेत होऊन [शिश्नं प्राविशन्–] शिश्नांत प्रवेश करत्या झाल्या. (येथें सांगितलेल्या वाक्, चक्षु इत्यादि इंद्रियांमध्यें अग्न्यादि देवता प्रत्यक्ष दिसत नाहींत. तथापि देवतांनीं प्रेरणा केल्यावांचून इंद्रियांच्या ठिकाणीं आपापल्या विषयास ग्रहण करण्याचें सामर्थ्यहि येत नाहीं. सु. ब्र. २.४.७. पृ. २४७ पहा. पण त्या विराड्देहामध्यें क्षुधा व पिपासा

यांचें नियत स्थान वर कोठें सांगितलें नाहीं. ह्मणून त्यांचा सर्व शरीरांत प्रवेश झाल्याचें श्रुति दाखविते–)

तमशनापिपासे अब्रूतामावाभ्यामभिप्रजानीहीति। ते अब्रवीदेतास्वेव वां देवतास्वाभजाम्येतासु भागिन्यौ करोमीति। तस्माद्यस्यै कस्यै च देवतायै हविर्गृह्यते भागिन्यावेवास्यामशनापिपासे भवतः॥

इत्यैतरेयोपनिषदि द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—याप्रमाणें देवतांना अधिष्ठानाची प्राप्ति झाली असतां ज्यांना शरीरांत अधिष्ठानच राहिलेलें नाहीं अशा [अशनापिपासे–] क्षुत्पिपासा [तं–] त्या परमेश्वरास [आवाभ्यां अभिप्रजानीहि–] आह्मां दोघीजणींकरितां विशेष स्थानाची योजना कर, आह्मांला विशेष स्थान देण्याचा अनुग्रह कर, [इति अब्रूताम्–] असें ह्मणाल्या. पण ईश्वर या शरीरांत त्यांच्याकरितां कांही स्थान नाहीं, असें पाहून [ते अब्रवीत–] त्या दोघीजणीस ह्मणाला [वां–] तुह्मां दोघीजणींना [एतासु एव देवतासु–] या अग्न्यादि देवतांमध्येंच [आभजामि–] मी सर्व प्रकारें विभागून देतों [एतासु भागिन्यौ करोमि–] या देवतांमध्यें विषयांच्या भागानें युक्त–भागीदार करतों, [इति–] असें तो ह्मणाला आणि ज्याअर्थीं तो असें ह्मणाला [तस्मात्–] त्याअर्थीं यालोकीं [यस्यै कस्यै च देवतायै हविः गृह्यते–] ज्या कोणत्याहि देवतेला उद्देशून हवि–भोग्य वस्तु अर्पण केली जाते [अस्यां अशनापिपासे भागिन्यौ एव भवतः–] त्या अग्न्यादिदेवतेमध्यें या क्षुत्पिपासा भागयुक्तच होतात. (अग्नि, वायु इत्यादि देवतांच्या शरीरांतहि आहाराचा स्वीकार केला असतां त्याच्या योगानें क्षुधा व तृषा यांचीच तृप्ति होते, त्याच न्यायानें मनुष्यादि इतर शरीरांतहि चक्षुःप्रभृति इंद्रियांच्या द्वारा विषयांचें ग्रहण करतांच क्षुधा व पिपासा यांची शांति होते. ताटांत वाढलेलें अन्न खाण्याची इच्छा करणारा पुरुष जेव्हां त्याच्याकडे आदरानें पाहतो तेव्हां भोग्य समीप आलें आहे, या संतोषानें त्याच्या मनांतील त्याविषयींची तृष्णा शांत होतें. ती त्याला पूर्वीप्रमाणें पीडा देत नाहीं. त्याचप्रमाणें अत्यंत प्रिय अन्नाची वार्ता ऐकणें, त्याला स्पर्श करणें इत्यादि प्रसंगींहि थोडीशी तृप्ति होते, असा अनुभव येतो. यास्तव सर्व देवतांमध्यें क्षुधा व पिपासा यांचा भाग असतो.) २.

स ईक्षतेमे नु लोकाश्च लोकपालाश्चान्नमेभ्यः सृजा इति ॥

अन्वयार्थ—[सः—] तो परमेश्वर [ईक्षत—] पुनरपि असा विचार करता झाला. [लोकाः च लोकपालाः च इमे नु—] पृथिव्यादि लोक व सर्व इंद्रियें, हींच ज्यांचीं शरीरें आहेत असे अग्न्यादि लोकपाल, हे मीं उत्पन्न केले व त्यांना अशनाया-पिपासेनें—क्षुधा व तृषा या ऊर्मींनीं युक्त केलें. त्यामुळें आतां अन्नावांचून यांचें जीवन होणें, शक्य नाहीं. यास्तव [एभ्यः अन्नं—] यांच्या करितां मी अन्न, [सृजै—] उत्पन्न करितों. [इति—] असा त्या ईश्वरानें विचार केला.

सोऽपोऽभ्यतपत्ताभ्योऽभितप्ताभ्यो मूर्तिरजायत ।
या वै सा मूर्तिरजायतान्नं वै तत् ॥

अन्वयार्थ—[सः—] तो [अपः—] अन्नाच्या कारणभूत जलाचें ज्यांत प्राधान्य आहे अशा पंचभूतांस उद्देशून [अभ्यतपत्—] सर्व प्रकारें पर्यालोचन करता झाला. (अशा अशा प्रकारच्या जलयुक्त क्षेत्रापासून—शेतांतून—व्रीहि, यव, इत्यादि धान्य उत्पन्न होवो. मार्जारादिकांचें अन्न, अशीं मूषकादिशरीरें निर्माण होवोत, अशा प्रकारचा संकल्प त्यानें केला.) [अभितप्ताभ्यः ताभ्यः—]याप्रमाणें ज्यांच्याविषयीं संकल्प केला आहे अशा त्या जलप्रधान पंचभूतांपासून [मूर्तिः अजायत—] व्रीहि-यवादिरूप व मूषकादिरूप मूर्ति झाली. [या वै सा मूर्तिः—] ती जी मूर्ति [अजायत—] झाली [तत् अन्नं वै—] तेंच अन्न होय. (त्यांतील पहिल्या प्रकारची मूर्ति हें मनुष्यादिकांचें अन्न व दुसऱ्या प्रकारची मूर्ति हें मार्जारादिकांचें अन्न.)

तदेनत्सृष्टं पराङत्यजिघांसत्तद्वाचाऽजिघृ-
क्षत्तन्नाशक्नोद्वाचा ग्रहीतुम् । स यद्धैन-
द्वाचाऽग्रहैष्यदभिव्याहृत्य हैवान्नमत्रप्स्यत् ॥

अन्वयार्थ—(उत्पन्न केलेल्या दोन प्रकारच्या अन्नांतील पहिलें अन्न जड आहे. त्यामुळें आपला भोक्ता, हा आपला हिंसक आहे, हें ज्ञान त्याला नसतें व जड असल्यामुळेंच तें इतस्ततः जाण्यासहि समर्थ नसतें. पण—) [सृष्टं तत् एनत्—] उत्पन्न केलेलें तें दुसऱ्या प्रकारचें हें मूषकादि अन्न, मार्जारादि आपल्याला खाणारें आहे, आपल्या मरणाचें कारण आहे, असा

निश्चय करून [पराङ्–] त्याच्यापासून पराङ्मुख होऊन (परतून) [अत्यजिघांसत्–] अतिशय वेगानें पळून जाण्याची इच्छा करूं लागलें. म्हणजे त्या आपल्या मृत्यूपासून दूर पळून जाण्यास आरंभ करतें झालें.] पण तें पळून जाण्यास उद्युक्त झालें आहे, असें पाहून मार्जारादि भोक्तृवर्ग [तत् वाचा अजिघृक्षत्–] त्याला वागिंद्रियानें ग्रहण करण्याची इच्छा करता झाला. पण [तत् वाचा ग्रहीतुं न अशक्नोत्–] अंगांत जेवढें बल होतें तेवढें सर्व उपयोगांत आणून जरी त्यानें–भोक्तृवर्गानें त्याला–भोग्यवर्गाला–ग्रहण करण्यासाठीं यत्न केला तरी तो त्याला वागिंद्रियाच्या द्वारा–वदनक्रियेनें ग्रहण करण्यास समर्थ झाला नाही (हल्लींच्या प्रत्यक्ष उदाहरणानें सृष्टिकालची त्याची अशक्ति श्रुति स्पष्ट करते–) [सः–] तो भोक्तृवर्ग आदिसृष्टिसमयीं [यत् ह–] जर [एनत्–] या मूषकादिरूप अन्नास [वाचा–] वाणीनें [अग्रहैष्यत्–] ग्रहण करण्यास समर्थ झाला असता तर आतां–यावेळीहि [अन्नं अभिव्याहृत्य एव ह अत्रप्स्यत्–] भोक्ता त्या अन्नाच्या नांवाचा उच्चार करूनच तृप्त झाला असता. (कारण वागिंद्रियामध्यें शब्दोच्चारावांचून दुसरें कोणत्याहि प्रकारचें आकर्षणसामर्थ्य नसतें. पण केवल अन्नवाचक शब्दाच्या उच्चारानेंच कोणाचीहि तृप्ति होत नाहीं. यास्तव सृष्टिकालींहि वाणीमध्यें अन्नस्वीकाराचें सामर्थ्य नव्हतें, असें अनुमान होतें.)

तत्प्राणेनाजिघृक्षत्तन्नाशक्नोत्प्राणेन ग्रहीतुं स यद्धैनत्प्राणेनाग्रहैष्यदभिप्राप्य हैवान्नमत्रप्स्यत् । तच्चक्षुषाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्चक्षुषा ग्रहीतुं स यद्धैनच्चक्षुषाग्रहैष्यत् दृष्ट्वा हैवान्नमत्रप्स्यत् । तच्छ्रोत्रेणाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्छ्रोत्रेण ग्रहीतुं स यद्धैनच्छ्रोत्रेणाग्रहैष्यच्छ्रुत्वा हैवान्नमत्रप्स्यत् । तत्त्वचाजिघृक्षत्तन्नाशक्नोत्त्वचा ग्रहीतुं स यद्धैनत्त्वचाग्रहैष्यत्स्पृष्ट्वा हैवान्नमत्रप्स्यत् । तन्मनसाजिघृक्षत्तन्नाशक्नोन्मनसा ग्रहीतुं स यद्धैनन्मनसाग्रहैष्यद्ध्यात्वाहैवान्नमत्रप्स्यत् । तच्छिश्नेनाजिघृक्षत्तन्नाशक्नोच्छिश्नेन ग्रहीतुं स यद्धैनच्छिश्नेनाग्रहैष्यद्विसृज्य हैवान्नमत्रप्स्यत् । तदपानेनाजिघृक्षत्तदावयत् सैषोऽन्नस्य ग्रहो यद्वायुरन्नायुर्वा एष यद्वायुः॥

अन्वयार्थ—या पुढील वाक्यांतील शब्दांचा अर्थहि असाच–वर सांगितल्याप्रमाणेंच समजावा. म्हणजे भोक्त्यानें त्या अन्नाचें प्राणाच्या योगानें म्हणजे घ्राणेंद्रियानें ग्रहण करण्याची इच्छा केली. पण तो प्राणानें त्याचें ग्रहण करण्यास समर्थ झाला नाहीं. कारण, सृष्टीच्या आरंभीं प्रथम उत्पन्न झालेल्या शरीरीनें घ्राणानें जर त्याचें ग्रहण केलें असतें तर आतांहि तो भोक्ता त्या अन्नाचा वास घेऊनच तृप्त झाला असता! चक्षु, श्रोत्र, त्वक्, मन व शिश्न या इंद्रियांच्या द्वारा क्रमानें त्यानें त्याचें ग्रहण करण्याची इच्छा केली, पण त्यांच्या योगानें त्याला त्याचें ग्रहण करतां आलें नाहीं. कारण तसें जर झालें असतें, तर आतांहि त्या त्या इंद्रियाच्या अन्नविषयक व्यापारानें भोक्ता तृप्त झाला असता, पण तसें होत नाहीं. यास्तव त्यानें त्यावेळीं त्यांतील कोणत्याहि साधनानें अन्नाचें ग्रहण केलें नाहीं, असें ठरतें. शेवटीं भोक्तृवर्ग [तत्–] तें अन्न [अपानेन अजिघृक्षत्–] अपानवायूच्या योगानें मुखछिद्रानें ग्रहण करण्याची इच्छा करता झाला. येथें 'अपान-'शब्दानें अन्नाला मुखछिद्रांतून आंत प्रवेश करावयास लावणारा अन्तर्मुख वायु घ्यावा. असो; तेव्हां तो [तत् आवयत्–] त्या अन्नाला ग्रहण करण्यास समर्थ झाला. म्हणजे अपानाच्या योगानें भोक्तृवर्गानें अन्न खालें. (याप्रमाणें अन्वय-व्यतिरेकन्यायानें वायुच अन्नग्रहणाचें साधन आहे, असा निश्चय करून आतां तीच गोष्ट दृढ करण्याकरितां वायूची प्रशंसा करितात–) [यद् वायुः–] मुखछिद्राच्या आंत संचार करणारा जो हा वायु आहे [सः एषः–] तो हा [अन्नस्य ग्रहः–] अन्नाचा ग्राहक आहे व ही गोष्ट आमच्या अनुभवानें सिद्ध आहे. शिवाय, [एषः यद् वायुः–] हा जो वायु [सः अन्नायुः वै–] तो अन्नाच्या द्वारा आयुष्याचें निमित्त आहे. अन्नरसाच्या योगानें, अन्नरसाकडून प्राण देहांत बांधला जातो. बृ.२.२.१.पहा.

स ईक्षत कथं न्विदं मदृते स्यादिति स ईक्षत कतरेण प्रपद्या इति। स ईक्षत यदि वाचाभिव्याहृतं यदि प्राणेनाभिप्राणितं यदि चक्षुषा दृष्टं यदि श्रोत्रेण श्रुतं यदि त्वचा स्पृष्टं यदि मनसा ध्यातं यद्यपानेनाभ्यपानितं यदि शिश्नेन विसृष्टमथ कोऽहमिति ॥

अन्वयार्थ—[सः ईक्षत–] तो परमेश्वर विचार करता झाला. देह, इंद्रियें, त्यांच्या अभिमानिनी देवता, अन्न, त्याचा स्वीकार इत्यादि जो हा सर्व व्यवहार आहे [इदं–] तें हें सर्व [मद्दते–] मज जीवरूपी भोगस्वामीवांचून [कथं नु स्यात्–] कसें बरें असूं शकेल ? (जीवावांचून तें सर्व असणें कधींहि संभवत नाहीं. कारण नगराचा स्वामी जो राजा त्याच्यावांचून नगर किंवा त्यांतील लोक यांची रचना शोभत नाहीं. यास्तव भोगाचा स्वामी अशा मला जीवरूपानें देहांत प्रवेश करणें उचित आहे. पण इतकें ठरतांच त्याला प्रवेशाच्या द्वाराचा विचार पडला. तो असा–) [सः ईक्षत कतरेण प्रपद्यै इति] तो विचार करूं लागला कीं, मीं कोणत्या मार्गानें यांत प्रवेश करावा ? (या शरीरांत दोन मार्ग दिसतात. एक पादाग्र व दुसरें मस्तकावरील ब्रह्मरंध्र. त्यांतील कोणत्या मार्गानें प्रवेश करावा ? [सः–] तो परमेश्वर [ईक्षत–] विचार करता झाला–[यदि०–] जर वाणीनेंच संभाषणव्यवहार केला, प्राणानेंच अभिप्राणन केलें, चक्षुरिंद्रियानेंच पाहिलें, श्रोत्रानें ऐकिलें, त्वचेनें स्पर्श केला, मनानें ध्यान केलें, अपानानें अन्नादि ग्रहण केलें, व शिश्नानें विसर्ग केला [अथ अहं कः–] तर मग मी कोण ? वागादिकांचें भाषणादिकार्य भोक्त्याकरितांच आहे. स्वतः वागादिकांकरितां नाहीं. तेव्हां या शरीरेंद्रियसंघातांत मीं जर प्रवेश केला नाहीं तर तें त्यांचें भाषणादि सर्व व्यर्थ होईल ! यास्तव या वागादि इंद्रियांहून निराळा स्वामी–अर्थी, वागादिकांच्या भाषणादिव्यवहारामुळें होणाऱ्या उपकारास पात्र होणारा अधिष्ठाता, केलेलें व न केलेलें कर्म आणि त्याचें फल यांचा साक्षिभूत व भोक्ता, अशा प्रकारचा मीं पुराच्या–नगराच्या स्वामी–राजाप्रमाणें असलें पाहिजे, असा विचार करून व ' तर मग मी आतां या शरीरेंद्रियसंघातांत कोणत्या मार्गानें बरें प्रवेश करूं ' असें म्हणून—

स एतमेव सीमानं विदार्यैतया द्वारा प्रापद्यत । सैषा विदृतिर्नाम द्वास्तदेतन्नान्दनं । तस्य त्रय आवसथास्त्रयः स्वप्नाः । अयमावसथोऽयमावसथोऽयमावसथ इति ॥

अन्वयार्थ—[सः–] परमेश्वर [एतमेव–]या मस्तकाच्या मध्यभागासच म्हणजे जेथें मस्तकांतील कवट्यांचा संधि आहे, जेथें त्या कवट्या एकमेकींशीं जुळल्या आहेत, त्याच [सीमानं–] एका विशेष स्थानास [विदार्य–] विदीर्ण

करून–फाडून–छिद्र करून [एतया द्वारा–] त्या छिद्ररूप द्वारानें [प्रापद्यत–] ज्ञानशक्तियुक्त असलेला तो देहांत प्रविष्ट झाला. (ज्ञानोपाधीनें युक्त असलेला तो मस्तकांत प्रविष्ट झालेला असल्यामुळेंच मस्तकांत ज्ञानेंद्रियांचें आधिक्य दिसतें. त्याचप्रमाणें क्रियाशक्तिरूप उपाधीनें युक्त असलेल्या त्यानें पादाग्रांतून प्रवेश केल्यामुळें कंठाच्या खालींच कर्मेंद्रियांचें बाहुल्य आढळतें. आतां श्रुति त्या मस्तकांतील प्रवेशाच्या द्वाराची स्तुति करते–) [सा एषा द्वाः विदृतिः नाम–] त्या ह्या द्वाराला विदृति असें नांव प्राप्त झालें आहे. (कारण आत्म्याच्या भृत्यांप्रमाणें असलेल्या चक्षुरादि इंद्रियांनीं अक्षि, श्रोत्र इत्यादि गोलकांत प्रवेश व निवास केल्यामुळेंच त्यांच्या स्वामीला स्वतःच्या प्रवेशाकरितां निराळें द्वार हवें, असें वाटलें व आपल्याला शोभेल असें स्वतंत्र द्वार पाहिजे, या अभिप्रायानें त्यानें मोठ्या प्रेमानें तें केलें. त्याचा उत्कर्ष प्रकट करण्यासाठींच त्याला ' विदृति ' हें नांव प्राप्त झालें. त्याचप्रमाणें शरीर सोडून त्या द्वारानें निघालेल्या पुरुषाला ब्रह्मलोकाची प्राप्ति होऊन क्रमानें तो मुक्त होत असल्यामुळें तें द्वार आनंदाचें निमित्त आहे.) [तत् एतत् नान्दनम्–] तें हें द्वार नांदन म्हणजे आनंद देणारें आहे. पुरुष या द्वारानें जाऊन पर ब्रह्मांत आनंदित होतो, म्हणून तें नंदन. ' नांदन ' हा दीर्घ पाठ छांदस आहे. [आतां शरीरांत प्रवेश केलेल्या त्याच्या संचाराचीं स्थानें व त्या स्थानांतील संचारामुळें होणाऱ्या अवस्था ' तस्य त्रयः०–' इत्यादि पुढील वाक्य दाखवितें–) ज्याप्रमाणें महाराजाच्या क्रीडेकरितां त्याच्या प्रासादास एकावर एक असे अनेक मजले केले जातात, त्याचप्रमाणें [तस्य–] शरीरांत जीवरूपानें प्रविष्ट झालेल्या आत्म्याच्या क्रीडेकरितां [त्रयः आवसथाः–] तीन स्थानें केलेलीं आहेत. त्या तीन स्थानीं आत्मा [त्रयः स्वप्नाः–] तीन स्वप्नें पाहतो. आतां तीं तीन स्थानें कोणतीं, असा संशय राहूं नये ह्मणून श्रुति बोट पुढें करून–[अयं आवसथः–] नेत्र हें एक क्रीडास्थान, [अयं आवसथः–] कंठ हें दुसरें व [अयं आवसथः–] हृदय हें तिसरें स्थान आहे, असें दाखविते. (जागरित व सुषुप्त, यांनाहि येथें स्वप्न असें म्हटलें आहे. कारण ' विद्यमानवस्तुतत्त्वाला आच्छादित करून विपरीत भास करविणें ' हें स्वप्नाचें लक्षण त्यांतहि आहे. कारण त्या दोन्ही अवस्थांमध्यें विद्यमान ब्रह्मतत्त्वाला आच्छादित करून तद्विपरीत जीवतत्त्वाचा

अवभास होतो ' तीन आवसथ ' या पदांनीं पितृशरीर, मातृशरीर व स्वशरीर या स्थानांचाहि निर्देश करण्याचा श्रुतीचा उद्देश दिसतो. त्याचाच अधिक विस्तार पुढच्या खंडांत केला आहे. संसार दोन प्रकारचा आहे. एक प्रत्यहीं होणारा व्यवहार व दुसरा दुसऱ्या जन्माचा स्वीकार. त्यांतील पहिल्या प्रकारच्या संसाराचीं नेत्र, कंठ व हृदय हीं तीन स्थानें आहेत व दुसऱ्या प्रकारच्या संसाराचीं पित्याचें शरीर, मातेचा गर्भाशय व स्वशरीर, हीं तीन आहेत. या वाक्याच्या शेवटीं ' इति ' असा जो शब्द आहे, तो संसाररूप अध्यारोपप्रकरणाच्या समाप्तीकरितां आहे. 'माझ्या सर्व प्रयोजनांचा अधिकारी, माझा भृत्य—चाकर असा जो प्राण—क्रियाशक्ति तो पावलांच्या अग्रांतून या शरीरेंद्रियसंघातांत प्रविष्ट झाला आहे. यास्तव मी—स्वामीनेंहि त्याच मार्गानें त्यांत प्रवेश करणें उचित नव्हे,' असा विचार करून तो स्रष्टा मस्तकावर जेथून भांग काढितात त्या भागास विदीर्ण करून त्या द्वारानें त्यांत शिरला. लहान मुलांच्या मस्तकावरील मऊभाग—जिला व्यवहारांत ' ताळु ' असें म्हणतात तेंच त्याचें द्वार आहे. याप्रमाणें शरीररूप पुर निर्माण करून त्यांत जीवरूपानें प्रविष्ट झालेल्या त्याचीं राजाच्या क्रीडा-स्थानांप्रमाणें, एखाद्या मोठ्या प्रासादाला जसे तीन मजले असतात तशी एका-वर एक अशीं तीन क्रीडास्थानें आहेत. जागरितांत इंद्रियांचें अधिकरण—नेत्र, स्वप्नांत मनाचें अधिकरण कंठस्थान व सुषुप्तीत हृदयाकाश, हीं तीन स्थानें किंवा पित्याचें शरीर, मातृगर्भाशय व स्वशरीर हे तीन आवसथ समजावे. कारण श्रुतीनें पुढें त्यांचा निर्देश केला आहे. त्याचीं तीन स्वप्नें आहेत. जाग्र-दादि तीन अवस्था हींच तीन स्वप्नें. परमार्थ सत्य जो आत्मा त्याचा प्रबोध त्यावेळीं नसतो व त्या सर्व अवस्थांमध्यें स्वप्नाप्रमाणेंच असद्वस्तूंचें दर्शन होतें. म्हणून तीं तिन्ही स्वप्नेंच होत.)

स जातो भूतान्यभिव्यैख्यत् किमिहान्यं वावदिषादिति । स एतमेव पुरुषं ब्रह्म ततममपश्यत् । इदमदर्शमिति ३ ॥ तस्मा-दिदन्द्रो नामेदन्द्रो ह वै नाम तमिदन्द्रं संतमिन्द्रमित्याचक्षते परोक्षेण । परोक्षप्रिया इव हि देवाः परोक्षप्रिया इव हि देवाः ॥

इति तृतीयः खण्डः ॥ ३

ऐतरेयोपनिषदि प्रथमोऽध्यायः । द्वितीयारण्यके चतुर्थोऽध्यायः ॥

अन्वयार्थ—[सः जातः—] तो झालेला ह्मणजे जीवरूपानें शरीरांत प्रविष्ट झालेला ईश्वर [भूतानि अभिव्यैख्यत्—] भूतांनाच अभि—आभिमुख्यानें—तादात्म्यानें ' व्यैख्यत्'—व्यक्त जाणता झाला (व भूतांनाच तादात्म्यानें बोलला. ह्मणजे मी मनुष्य आहें, काणा आहें, सुखी आहें, इत्यादि प्रकारें देह, इंद्रियें व अन्तःकरण यांच्या मनुष्यत्व, काणत्व व सुखित्व या धर्मांचा आपल्यावर तादात्म्याध्यास करून बोलला, याविषयीं ' या जीवात्मरूपानें प्रवेश करून मी नाम व रूप यांस व्यक्त करतों ' अशी छांदोग्य श्रुतिहि आहे. अहोपण, आत्मा शरीरेंद्रियसमूहाहून पृथक् आहे, असें ज्ञान झाल्यावर, वर सांगितलेल्या प्रकारचा तादात्म्यभ्रम कोठून होणार ? अशी आशंका घेऊन श्रुति ह्मणते—) [इह—] या शरीरांत [अन्यं—] व्यतिरिक्त—पृथक् आत्म्याला [वावदिषत् किम्—] बोलला काय ? नाहीं; तो जीव तसें बोलला नाहीं. इतकेंच नव्हे तर आत्मा शरीराहून अन्य आहे, व्यतिरिक्त आहे, हें त्याला कळलेंहि नाहीं. ' वावदिषदिति ' येथील ' इति-'शब्द ' यस्मात् ' याअर्थीं ह्मणजे हेत्वर्थीं आहे. यास्तव त्याची योजना अशी करावी " ज्याअर्थीं त्याला तें समजलें नाही त्याअर्थीं " तो भूतांना तादात्म्यानें स्पष्ट जाणता व बोलता झाला. किंवा तो 'इति-'शब्द येथें अध्यारोपप्रकरण संपलें, असें दाखविण्यासाठी आहे. नंतर [सः—] तो जीव आचार्योपदेशरूप दुंदुभीचा मोठा ध्वनि कानावर आला असतां [एतं एव पुरुषं—] याच पुरुषाला—शरीरपुरींत राहणाऱ्या सृष्टिकर्त्या आत्म्याला [ब्रह्म ततमं—ततततमं अपश्यत्—] फार मोठें अतिशय व्याप्त—आकाशाप्रमाणें परिपूर्ण ब्रह्म पाहता झाला. आत्मा आकाशासारखा पूर्ण आहे, असें त्यानें जाणलें. [इदं अदर्शम् इती ३—] अहो हें ब्रह्म—बृहत् तत्त्व माझें—आत्म्याचें स्वरूप आहे, असें मीं पाहिलें आहे. [तस्मात्—] ज्याअर्थीं, जें साक्षात् अपरोक्ष व सर्वांच्या अन्तःकरणांत असणारें ब्रह्म तें ' हें ' अशा प्रकारें तो अपरोक्षपणें पाहता झाला, त्याअर्थीं [इदंद्रः नाम—] ' इदं पश्यति ' ह्मणून 'इदंद्र' या नांवाचा परमात्मा. ह्मणजे साक्षात् ज्ञानाचा विषय होतो ह्मणून तो इदंद्र. सर्वान्तर ब्रह्म ' इदं—हें ' अशा रीतीनें नित्य अपरोक्ष असलेला प्रत्यगात्मा आहे, असें तो जीव विचारानंतर पाहता झाला, असा भावार्थ. [इदंद्रः ह वै नाम—] लोकांमध्यें ईश्वर 'इदंद्र' या नांवानेंच प्रसिद्ध आहे. (अहोपण, 'इंद्रो मायाभिः पुरुरूपं०'

इत्यादि श्रुतींत ईश्वर 'इन्द्र-' या नांवानें प्रसिद्ध आहे, 'इदंद्र' या नांवानें तो कोठेंच प्रसिद्ध नाहीं, असें कोणी विचारील ह्मणून श्रुति सांगते-)[तं इदंद्रं सन्तं-] याप्रमाणें 'इदंद्र' असलेल्या त्याला ब्रह्मवेत्ते [परोक्षेण इन्द्रं इति आचक्षते-] परोक्षत्वानें-परोक्ष नांवानें 'इन्द्र' असें चांगल्या व्यवहारासाठीं ह्मणतात. (वस्तुतः इदन्द्रच पण त्याच्या परोक्षत्वाकरितां त्यांतील 'द' या अक्षराचा लोप करून 'इन्द्र' असें म्हणतात, असा भावार्थ. आतां तसें करण्याचें प्रयोजन सांगतात -) तो पूज्यतम -अतिशय पूज्य असल्यामुळें त्याचें प्रत्यक्ष नांव घेतल्याचा दोष घडेल, या भयानें ते परोक्ष नांव घेतात. पूज्याचें नांव परोक्षच ध्यावें, याविषयीं श्रुति येथें प्रमाण सांगते-) [हि परोक्षप्रियाः इव देवाः-] कारण देव-पूज्य परोक्षप्रिय आहेत. म्हणजे परोक्ष नांव घेणेंच त्यांना आवडतें, (पूजकांनीं आपलें प्रत्यक्ष नांव न घेतां परोक्ष ध्यावें, असें पूज्यांना वाटतें. त्यांना ही गोष्ट प्रिय असते. म्हणूनच आचार्य, उपाध्याय इत्यादि नांवें लोकांना आवडतात. त्यांना लौकिक नांवें आवडत नाहींत. 'परोक्षप्रियाः०' या शेवटच्या वाक्याची द्विरुक्ति अध्यायपरिसमाप्त्यर्थ आहे.(३)

-वर वर्णन केल्याप्रमाणें मूर्धविदारण करून व त्यांत प्रवेश करून स्थित असलेला तो हाच अविद्या, काम, कर्म व हें शरीरच मी आहें असा अभिमान, यांनीं युक्त असलेला जीव यज्ञादि कर्म करून या लोकांतून धूम, रात्रि, कृष्णपक्ष इत्यादि आतिवाहिक देवतांनीं युक्त असलेल्या दक्षिणायन मार्गानें क्रमानें चन्द्रमसलोकास प्राप्त होऊन, तेथील सुखाचा उपभोग घेतल्यामुळें ज्याचें कर्म क्षीण झालें आहे, असा तो भोक्ता जीव पुनः मेघ, वृष्टि, पृथ्वी इत्यादिकांच्या द्वारा या भूलोकास प्राप्त होतो व अन्नरूप होत्साता पुरुषाग्नीमध्यें होम केला जातो. म्ह० पुरुष त्या अन्नसंश्लिष्ट अनुशयी जीवाचें अन्नाबरोबर भक्षण करितो. त्यामुळें-

पुरुषे ह वा अयमादितो गर्भो भवति यदेतद्रेतः तदेतत्सर्वेभ्योऽङ्गेभ्यस्तेजः संभूतमात्मन्येवात्मानं बिभर्ति ।
तद्यदा स्त्रियां सिञ्चत्यथैनज्जनयति तदस्य प्रथमं जन्म ॥

अन्वयार्थ—[पुरुषे ह वै अयं-] ज्या पुरुषानें त्या अन्नसंश्लिष्ट अनुशयवानाचें भक्षण केलेलें असतें त्याच्यामध्यें हा संसारी [आदितः-] स्त्रीगर्भा-

शयांत प्रवेश करण्याच्या पूर्वी [गर्भः भवति–] गर्भ होतो. (पण स्त्रीमध्ये जसा, तसा पुरुषामध्ये तो गर्भ दिसत नाही, असें कोणी म्हणेल, तर ' भक्षण केलेल्या अन्नाचा रसादिक्रमानें रेतोरूपानें परिणाम झाला असतां व अन्नसंश्लिष्ट जीवाचाहि तसाच रेतः-संश्लेषानें–रेतःसंबंधानें रेतोभाव झाला असतां त्या रूपानें पुरुषाच्या शरीरांत असणारा तोच त्या पुरुषाचा गर्भ होय, ' असें श्रुति सांगते–) [यत् एतत् रेतः–] रस, रक्त, मांस इत्यादि क्रमानें पुरुषामध्ये जें हें रेत होतें त्याच्या रूपानें गर्भ होतो, असें हें श्रुतिवाक्य सांगतें. ('अहोपण त्याला गर्भ असें कोणी म्हणत नाहींत, ' अशी आशंका घेऊन ' स्त्रीप्रमाणेंच पुरुष त्याला आपल्या शरीरांत धारण करीत असल्यामुळें गौणवृत्तीनें गर्भत्व आहे, ' असें सांगण्यासाठीं या श्रुतींतील ' तदेतत्सर्वेभ्योऽगेभ्यः०'इत्यादिवाक्य आहे. त्याचा अर्थ–[तत् एतत् सर्वेभ्यः अंगेभ्यः तेजः संभूतं–] आणि तें हें रेत अन्नमय–अन्नाचा विकार अशा या पिंडाच्या रसादिरूप सर्व अंगांपासून –अवयवांपासून शरीरसाररूप तेज निष्पन्न झालें आहे (शरीर रसादि धातूंच्या समुदायरूप आहे. म्हणून रसादिक हे त्याचे अवयव आहेत आणि रेत हा चरम–शेवटचा धातु आहे. म्हणून तें शरीराचें सार आहे.) तें रेत पुरुषाच्या आत्मभूत असल्यामुळें–' हा मी ' अशा अभिमानाचा विषय होणारें जें शरीर तद्रूप असल्यामळें आत्मा आहे. त्यामुळें–[आत्मानं आत्मनि एव बिभर्ति–] रेतोरूपानें गर्भ झालेल्या त्या आत्म्याला पुरुष आत्म्यामध्येंच म्ह० स्वशरीरांतच धारण करितो. [तत् तदा स्त्रियां सिंचति–] तें रेत जेव्हां–भार्या ऋतुमती असतांना तिच्या ठिकाणीं शिंपतो–रेतःसेक करितो [अथ एनत् जनयति–] तेव्हां पिता त्या आपल्या रेतोरूप गर्भाला जन्म देतो. [तत् अस्य प्रथमं जन्म–] तें या संसारी जीवाचें प्रथम आहे. म्ह० ती प्रथमावस्थेची अभिव्यक्ति आहे. पण स्त्रीशरीरांत प्रविष्ट झालेलें तें दुसऱ्या शरीरांतील रेत तिला शल्यादिकांप्रमाणें उपद्रव करील, अशी शंका येऊं नये, म्हणून श्रुति म्हणते—

तत्स्त्रिया आत्मभूयं गच्छति यथा स्वमङ्गं तथा ।
तस्मादेनां न हिनस्ति सास्यैतमात्मानमत्रगतं भावयति ॥

अन्वयार्थ—[तत्–] तें रेत [स्त्रियाः–] त्या स्त्रीच्या [आत्मभूयं–] स्वशरीरभावास [गच्छति–] प्राप्त होतें. [यथा स्वं अङ्गं तथा–] जसें आपलें

हस्तादि अंग शरीराहून पृथक् नसतें तसें. [तस्मात्–] तिच्या शरीराशीं एकता पावल्यामुळें [एनां–] त्या स्त्रीला तें [न हिनस्ति–] मारीत नाहीं. पोटांत शिरलेल्या बाणादिकांच्या शल्याप्रमाणें तें तिला मारीत नाहीं. [सा–] ती गर्भधारण करणारी स्त्री [अत्रगतं–] स्वशरीरांत प्रविष्ट झालेल्या [अस्य–] या पुरुषाच्या [एतं आत्मानं–] या पुत्ररूप आत्म्याचें [भावयति–] पालन करिते. त्या गर्भाला प्रतिकूल असलेल्या आहारादिकांचा त्याग करून अनुकूल आहार-विहारादिकांच्या योगानें पुष्ट करते (पूर्वी पितृशरीरांत तद्रूप होऊन जसें तें राहिलें होतें त्याप्रमाणें स्त्रीशरीरांत शिंचिलेलेंहि तें बीज तिच्या शरीररूपतेस प्राप्त होतें. तिच्या स्तनादि इतर अंगांप्रमाणेंच तें तिचें अंग होतें. त्यामुळें तो गर्भ मातेला गुल्मादि ग्रंथीप्रमाणें मारीत नाहीं. ती भार्या आपल्या पतीचा हा आत्माच माझ्या शरीरांत प्रविष्ट झाला आहे, असें जाणून त्याला वाढविते. अनिष्ट आहार-विहारादिकांच्या योगानें ती त्याचें अहित करीत नाहीं.)

सा भावयित्री भावयितव्या भवति। तं स्त्री गर्भं बिभर्ति। सोऽग्र एव कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयति स यत्कुमारं जन्मनोऽग्रेऽधिभावयत्यात्मानमेव तद्भावयत्येषां लोकानां संतत्या एवं संतता हीमे लोकास्तदस्य द्वितीयं जन्म ॥

अन्वयार्थ—[सा भावयित्री–] ती गर्भाच्या पालनानें पुरुषाचेंच अप्रत्यक्षपणें पालन करणारी होते. यास्तव [भावयितव्या भवति–] पुरुषाकडून इष्ट अन्न-वस्त्र-भूषणादिकांच्या योगानें ती पालन केली जाण्यास योग्य होते. [तं गर्भं–] त्या पुत्ररूप गर्भास [स्त्री–] माता [अग्रे–] जन्माच्या पूर्वी नऊ महिने अतिशय कष्ट सोसून [बिभर्ति–] आपल्या उदरांत धारण करते [सः–] तो पिता [अग्रे एव–] प्रसूतीनंतर नुकत्याच जन्मास आलेल्या त्या [कुमारं–] कुमाराला [अधिभावयति–] शास्त्रीय जातकर्मादि संस्कारांच्या योगानें अधिक संस्कृत करतो. [सः–] पिता [अस्य जन्मनः अग्रे कुमारं अधिभावयति इति यत्–] जन्म होतांच पुत्राचें संस्कारांच्या योगानें जें पोषण करतो [तत् आत्मानं एव भावयति–]तें तो आपलेंच अधिभावन–अधिक संस्करण करतो. कशाकरितां? [एषां लोकानां संतत्यै–] या पुत्र-पौत्रादिक लोकांच्या अविच्छेदाकरितां –पुत्रपौत्रादिपरंपरा तुटूं नये म्हणून, [एवं हि–] अशा रीतीनेंच म्हणजे पुत्रो-

त्पादनादि कर्माच्या अविच्छेदानेंच [इमे लोकाः संतताः—] हे लोक अविछिन्न होतात. [तत् अस्य द्वितीयं जन्म—] तें याचें दुसरें जन्म आहे. आईच्या उदरांतून बाहेर येणें, हा संसारी जीवाचा दुसरा जन्म आहे. (आपल्या गर्भभूत आत्म्याचें रक्षण करणाऱ्या त्या पत्नीचें रक्षण करणें हें पतीचें कर्तव्य आहे. कारण उपकार व प्रत्युपकार यांवाचून जगांत कोणाचा कोणाशींच संबंध संभवत नाहीं. ती स्त्री पूर्वोक्त गर्भधारणाविधानानें त्या गर्भाला जन्म होईपर्यंत धारण करिते. पण पुत्रजन्म होतांच पिता त्याला जातकर्मादि संस्कारांनीं वाढवितो. वस्तुतः तो स्वतःलाच वाढवितो. या पुत्र-पौत्रादिरूप लोकांचा विच्छेद होऊं नये ह्मणून तो आपल्यालाच पुत्ररूपानें उत्पन्न करून लहानाचा मोठा करतो. त्यामुळेंच हे लोक प्रवाहरूपानें संतत राहतात. यास्तव हें पुत्रोत्पादनादि कर्म लोकांच्या अविच्छेदासाठीं करावें, मोक्षासाठीं नव्हें. याप्रमाणें या संसारी जीवाचा कुमाररूपानें मातेच्या उदरांतून जन्म होणें, हा पूर्वोक्त रेतोरूप पहिल्या जन्माच्या अपेक्षेनें दुसरा जन्म आहे. ही दुसऱ्या अवस्थेची अभिव्यक्ति आहे.)

सोऽस्यायमात्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते । अथास्यायमितर आत्मा कृतकृत्यो वयोगतः प्रैति । स इतः प्रयन्नेव पुनर्जायते तदस्य तृतीयं जन्म ॥

अन्वयार्थ—[अस्य—] या पित्याचा [सः अयं आत्मा—] तो हा पुत्ररूप आत्मा—देह [पुण्येभ्यः कर्मभ्यः—] शास्त्रोक्त पुण्य कर्में करण्याकरितां [प्रतिधीयते—] आपला प्रतिनिधि, या रूपानें गृहांत—गृहस्थाश्रमांत स्थापिला जातो. —बृ. १.५.१७ पहा.—पिता त्या आपल्या देहाला शास्त्रोक्त स्वकर्तव्य कर्मांचें अनुष्ठान करण्याकरितां गृहस्थाश्रमांत स्थापून [अथ—]त्यानंतर पुत्रावर आपल्या कर्तव्याचा सर्व भार टाकून [अस्य अयं इतरः आत्मा—] या पित्याचा हा दुसरा वृद्ध देह [कृतकृत्यः—] कृतकृत्य होत्साता म्हणजे या जन्मांत जेवढीं म्हणून कार्यें करावयाचीं होतीं तीं सर्व करून [वयोगतः—] पूर्व कर्मानें संपादन केलेल्या आयुष्यानें हीन—जीर्ण झालेला तो [प्रैति—] मरतो. [सः—] तो वृद्ध पिता [इतः प्रयन् एव—] या जरठ देहांतून निघत असतांनाच स्वकर्मानुसार स्वर्गांत, नरकांत किंवा मनुष्यलोकांत [पुनः जायते—] पुनरपि जन्म घेतो. भावनारूपानें पुढच्या शरीराचा स्वीकार करूनच तो हें शरीर सोडतो.

[तत् अस्य तृतीयं जन्म–] तेंच या संसारी आत्म्याचें तिसरें जन्म आहे. अत्यंत अशुद्ध पितृशरीरांत अत्यंत अशुद्ध रेतोरूपानें राहणें, तेथून बाहेर पडून मातेच्या अत्यंत अशुद्ध गर्भाशयांत विष्ठाकृमीप्रमाणें–जंताप्रमाणें निवास करणें, त्यांतूनहि योनिद्वारा मोठ्या क्लेशानें बाहेर पडणें, बाल्यावस्थेंतील पारतंत्र्यामुळें होणारीं दुःखें सहन करणें, पुढें पित्यानें शास्त्रोक्त स्वकर्तव्याचा भार टाकल्यामुळें त्याचा प्रतिनिधि होऊन तें करणें, इत्यादि सर्व संसार क्लेशकर आहे. पिता पुत्ररूप आत्म्यावर स्वकर्तव्याचा भार टाकून कृतकृत्य म्ह० ऋणत्रयापासून मुक्त होतो व जीर्ण होऊन मरतो. तो हें शरीर सोडतांनाच तृणजलूकेप्रमाणें–बृ. ४.४.३पहा. आपल्या कर्मप्राप्त दुसऱ्या देहाचें ग्रहण करितो. मरून प्राप्त होणारा जो जन्म तोच त्याचा तिसरा जन्म आहे. यासंबंधीं अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा.) या निंद्य संसाराची निवृत्ति ज्ञानावांचून होत नाहीं, याविषयी श्रुति एका मंत्राचा उल्लेख करिते—

तदुक्तमृषिणा–गर्भे नु सन्नन्वेषामवेदमहं देवानां जनिमानि विश्वा । शतं मा पुर आयसीररक्षन्नधः श्येनो जवसा निरदीयमिति । गर्भ एवैतच्छयानो वामदेव एवमुवाच ॥

अन्वयार्थ—वरील चार वाक्यांत संसाराचें कष्टत्व वर्णिलें आहे व यापुढें तत्त्वज्ञानानेंच त्याची निवृत्ति होते असें सांगावयाचें आहे. यास्तव [तत्–] तें दोन्ही अर्थजात [ऋषिणा–] एका मंत्रानें [उक्तं–] सांगितलें आहे. [अहं–] मी वामदेव नांवाचा मुनि [गर्भे नु सन्–] मातेच्या गर्भांत स्थित होत्साता [एषां देवानां–] या अग्नि-वायु-आदित्यादि देवतांचे [विश्वा जनिमानि–] सर्व जन्म [अनु-अवेदम्–] अनुक्रमानें जाणता झालों. म्हणजे मुखापासून वाणी झाली, वाणीपासून अग्नि झाला, इत्यादि श्रुतींत वर्णिलेले व परमात्म्यानें संपादन केलेले देवांचे जन्म मीं यथार्थतः जाणले. उपनिषदांत सांगितल्याप्रमाणें मला आत्मज्ञान झालें, असा याचा भावार्थ. [अधः–] हें ज्ञान झाल्यानंतर त्यापूर्वीं [मा–] मज वामदेवाला [आयसीः–] लोखंडाच्या शृंखलांसारखीं [शतं पुरः–] शेकडों शरीररूपी नगरें [अरक्षन्–] राखीत होतीं, म्हणजे कारागारांत टाकलेल्या एखाद्या प्रबल चोराला त्याच्या हाता-पायांतील शृंखला जशा पळून जाऊं देत नाहींत, त्याचें पलायनापासून निवारण करितात, त्याप्रमाणें शतसंख्येनें उप-

लक्षित होणारीं अनंत शरीरें मीं मुक्त न व्हावें म्हणून माझें रक्षण करीत होतीं; [श्येनः जवसा निरदीयम्–] पण आतां गुरु-शास्त्रादिकांच्या प्रसादानें प्राप्त झालेल्या तत्त्वज्ञानाच्या योगानें मी अविद्यामय संसारांतून, श्येन पक्षी जसा जाळें तोडून वेगानें त्यांतून जातो त्याप्रमाणें वेगानें निघालों आहें. ' इति-' हा शेवटचा शब्द मंत्र समाप्त झाला, हें सुचविण्यासाठीं आहे. मंत्रांत ' अहं ' असा ज्याचा उल्लेख केला आहे तो [वामदेवः–] वामदेव [गर्भे एव शयानः सन्–] मातेच्या गर्भांत शयन करीत असतांनाच [एतद् एवं उवाच–] हें असें बोलला.

स एवं विद्वानस्माच्छरीरभेदादूर्ध्व उत्क्रम्यामुष्मिन्त्स्वर्गे लोके सर्वान्कामानाप्त्वाऽमृतः समभवत्समभवत् ॥

इत्यात्मषट्के चतुर्थः खण्डः ॥

इत्यैतरेयोपनिषदि द्वितीयोऽध्यायः ॥ ऐतरेयारण्यके पंचमोऽध्यायः ॥

अन्वयार्थ—[एवं विद्वान् सः–] याप्रमाणें आत्मतत्त्वास जाणणारा तो वामदेवऋषि प्रारब्ध कर्म क्षीण झालें असतां [अस्मात् शरीरभेदात्–] या शरीराचा विनाश झाल्यामुळें [ऊर्ध्वः–] परमात्मभूत होऊन [उत्क्रम्य–] या अधोभावापासून–संसारापासून वर निघून–ज्ञानप्रकाशित शुद्ध सर्वात्मभावास प्राप्त होऊन [अमुष्मिन् स्वर्गे लोके–] वर सांगितलेल्या प्रकारच्या अजर, अमर, अमृत, अभय, सर्वज्ञ, अपूर्व, अनपर, अनन्त, अबाह्य, केवल प्रज्ञानामृतरसरूप–अशा स्वर्गलोकांत म्हणजे स्वात्म्यामध्यें–स्वरूपांत प्रदीपाप्रमाणें निर्वाण पावला. [आत्मज्ञानेन अमृतः समभवत्–] आत्मज्ञानानें अमृत झाला. पण अमृत होण्यापूर्वीच [सर्वान् कामान् आप्त्वा–] सर्व कामना, सर्व इष्ट भोग ज्याला प्राप्त झाले आहेत, असा झाल्यामुळें जिवंत असतांनाच तो सर्व उपभोगांस प्राप्त होऊन, अमृत झाला असा याचा भावार्थ. मूळ श्रुतींत शेवटीं 'समभवत् समभवत् ' असें जें दोनदा म्हटलें आहे तें सफल व सोदाहरण आत्मज्ञानाची परिसमाप्ति झाली, हें दाखविण्यासाठीं आहे. (४)

श्रुतीनें वामदेवादि आचार्यांच्या परंपरेनें जिचें प्रकाशन केलें आहे व ब्रह्मवेत्त्यांच्या परिषदेंत जी अत्यंत प्रसिद्ध आहे अशा ब्रह्मविद्या या साधनानें प्राप्त

होणाऱ्या सर्वात्मभावरूप फलप्राप्तीचें ज्ञान झालेले ब्रह्मजिज्ञासु संसारनिवृत्तीच्या इच्छेनें विचार करीत होत्साते एकमेकांस म्हणतात—

कोऽयमात्मेति वयमुपास्महे कतरः स आत्मा । येन वा पश्यति येन वा शृणोति येन वा गन्धानाजिघ्रति येन वा वाचं व्याकरोति येन वा स्वादु चास्वादु च विजानाति । यदेतद्धृदयं मनश्चैतत् ॥

अन्वयार्थ—[वयं यं 'अयं आत्मा' इति उपास्महे कः सः—] आम्ही ज्या आत्म्याची 'हा आत्मा' अशी साक्षात् उपासना करण्यास प्रवृत्त झालों आहों तो आत्मा कोण, असें ते परस्पर विचारूं लागले. (अहो पण 'हा आत्मा' असा त्याचा विशेषतः निश्चय झाला असतां 'सः कः' म्हणजे तो कोण, असा प्रश्न उपपन्न होत नाहीं. तसेंच, त्याच्या विचाराचें कांहीं फलहि नाहीं, अशी आशंका घेऊन आत्म्याला अधिक स्पष्ट करितात—) आणि ज्या आत्म्याची 'हा आत्मा' अशा रीतीनें साक्षात् उपासना करणारा वामदेव अमृत झाला, त्याच आत्म्याची आम्हीहि उपासना करण्यास प्रवृत्त झालों आहों. पण कोण बरें खरोखर तो आत्मा आहे ? याप्रमाणें जिज्ञासापूर्वक विचार करणाऱ्या त्यांना देहांत प्रविष्ट झालेला आत्मा व प्राण या दोहोंचें पूर्वोक्त श्रुतीपासून उद्भवलेल्या अनुभवजन्य संस्कारांच्या योगानें स्मरण झालें. ह्म० या शरीरांत पादाग्राच्या द्वारा अपर ब्रह्मरूप प्राण प्रविष्ट झाला व केशविभागस्थानास विदीर्ण करून परब्रह्म प्रविष्ट झालें. त्यांतील एकाच्याहि अभावीं शरीराची स्थिति संभवत नाहीं. ह्मणून त्या दोघांनाहि लोक आत्मा समजतात. पण 'आत्मा वा इदमेक एव' या पहिल्याच वाक्यांत एक आत्मा ज्ञेय ह्मणून सांगितलेला आहे. त्यामुळें ते दोघेहि उपास्य होऊं शकत नाहींत. यास्तव ते ह्मणाले—[कतरः सः आत्मा—] त्या दोन आत्म्यांतील मुख्य उपास्य आत्मा कोणता ? असा विचार करणाऱ्या त्यांना अनेकरूप प्राण हें करण आहे; त्यामुळें ज्याच्या योगानें विषयज्ञान होतें तो आत्मा नव्हे. तर ज्याला तें होतें तो नित्य सत्तास्वरूप आत्मा आहे, असें वाटलें. ह्मणून ते ह्मणतात —[येन वा पश्यति—] ज्या चक्षुर्भूत करणानें आत्मा रूपाला पाहतो, [येन वा शृणोति—] ज्या श्रोत्रानें शब्द ऐकतो, [येन वा गंधान् आजिघ्रति—] ज्या घ्राणभूत इंद्रियानें सुगंधांना जाणतो, [येन वा वाचं व्याकरोति—] ज्या वाक्-

इंद्रियभूत साधनानें नामात्मक शब्दरूप वाणीला व्यक्त करितो [येन वा स्वादु चास्वादु च विजानाति–] ज्या रसनेंद्रियानें स्वादु–गोड–मधुर व अस्वादु–अमधुर इत्यादि रस जाणतो. (जें अनेक प्रकारें भेद पावून करण–इंद्रिय झालें आहे तें काय परें आहे ? उत्तर–) [यत् एतत् हृदयं च एतत् मनः–] 'प्रजांचें रेत इ० सारभूत कार्य हृदय आहे. हृदयाचें रेत मन आहे. मनापासून आप व वरुण उत्पन्न केले गेले. हृदयापासून मन, मनापासून चंद्रमा' इत्यादि श्रुतींत सांगितलेलें जें हृदय व मन तेंच आरंभीं विचारलेलें करण आहे. तें एक असतांना चक्षुरादि भेदांनीं अनेकधा झालें आहे. ज्ञाता या एका चक्षुर्भूत अंतःकरणानें रूप पाहतो, श्रोत्रभूत हृदयानें ऐकतो, घ्राणरूप अंतःकरणानें वास घेतो, वाक्-रूप अंतःकरणानें बोलतो, जिह्वारूप अंतःकरणानें रस चाखतो, आपल्या विकल्पनारूप मनानें विकल्प करतो व हृदयरूपानें निश्चय करतो. तस्मात् सर्व करणें व विषय हे ज्याचे व्यापार आहेत असें हें हृदय ज्ञात्याच्या सर्व ज्ञानाकरितां एक करण–साधन आहे. पूर्व वाक्यांतील 'येन वा पश्यति०' येथपासून 'मनश्चैतत्' येथवरचा श्रुत्यंश 'प्राण उपकरण असल्यामुळें अनात्मा आहे' असें सांगण्यासाठीं आहे, आतां 'संज्ञानं....वशः इति' या श्रुत्यंशानें अन्तःकरणोपाधिस्थ प्रज्ञानरूप उपलब्ध्या–ज्ञात्या ब्रह्माच्या उपलब्धीसाठीं ज्या बाह्य व आंतर विषयसंबंधी अन्तःकरणवृत्ति आहेत त्या सांगितल्या जातात—

संज्ञानमाज्ञानं विज्ञानं प्रज्ञानं मेधा दृष्टिर्धृतिर्मतिर्मनीषा
जूतिः स्मृतिः संकल्पः क्रतुरसुः कामो वश इति
सर्वाण्येवैतानि प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति ॥

अन्वयार्थ—[संज्ञानं–] संज्ञप्ति–चेतनाभाव ज्या वृत्तीच्या योगानें प्राणी 'चेतन' म्हटला जातो ती सर्वदा सर्व शरीराला व्यापणारी वृत्ति, [आज्ञानं–] आज्ञप्ति, ईश्वरभाव, [विज्ञानं–] कलादिकांचें परिज्ञान–सर्व प्रकारचें ज्ञान, चवसष्ट कलादिकांचें लौकिक ज्ञान, [प्रज्ञानं–] प्रज्ञप्ति, प्रज्ञता, तात्कालिक प्रतिभा, [मेधा–] ग्रन्थधारणसामर्थ्य, [दृष्टिः–] इंद्रियांच्या द्वारा सर्व विषयांची उपलब्धि, [धृतिः–] धारण, जिच्या योगानें थकलेल्या, निर्बल झालेल्या शरीरेंद्रियांचें उत्तम्भन होतें, तीं सोत्साह व सबल होतात ती वृत्ति धृति.

[मतिः—] मनन, [मनीषा—] मननाविषयीं स्वातंत्र्य, [जूतिः—] चित्ताला रोगादिकांमुळें उद्भवणाऱ्या दुःखित्वाची प्राप्ति, [स्मृतिः—] स्मरण, [संकल्पः—] सामान्यतः ज्ञात झालेल्या रूपादिकांचा शुभ्र, काळें इत्यादि प्रकारें संकल्प करणें, [क्रतुः—] निश्चय, [असुः—] प्राणनादि जीवनप्रयत्नाला निमित्त होणारी वृत्ति, [कामः—] समीप नसलेल्या विषयांविषयींची आकांक्षा, तृष्णा व [वशः—] स्त्रीसंपर्कादिकांविषयींचा अभिलाष [इति—] या व अशाच दुसऱ्याहि अन्तःकरणाच्या वृत्ति केवल प्रज्ञप्तिरूप जो उपलब्धा—ज्ञाता, साक्षी त्याच्या उपलब्धीकरितां—ज्ञानाकरितां, अनुभवाकरितां असल्याकारणानें त्या शुद्ध प्रज्ञानरूप ब्रह्माच्या उपाधिभूत आहेत. यास्तव संज्ञान, आज्ञान इत्यादि वृत्तिरूप उपाधींमुळें उत्पन्न झालेला, त्या वृत्तीच्या योगानें उपलक्षित होणें, हा जो गुण त्याचीं तीं नांवें आहेत. [एतानि सर्वाणि एव प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति—] संज्ञानादि या सर्व अन्तःकरणवृत्ति हीं सर्वच प्रज्ञानाचीं—शुद्ध चैतन्याचीं नांवें आहेत. पण तीं त्याचीं स्वतः—स्वाभाविक साक्षात् नांवें नव्हेत. तर औपाधिक आहेत. आतां शोधित त्वंपदार्थ व तत्पदार्थ यांचें ऐक्य—अखंड एकरसत्व श्रुति दाखविते—

एष ब्रह्मैष इंद्र एष प्रजापतिरेते सर्वे देवा इमानि च पंच महाभूतानि पृथिवी वायुराकाश आपो ज्योतींषीत्येतानीमानि च क्षुद्रमिश्राणीव बीजानीतराणि चेतराणि चाण्डजानि च जारुजानि च स्वेदजानि चोद्भिजानि चाश्वा गावः पुरुषा हस्तिनो यत्किंचेदं प्राणि जङ्गमं च पतत्रि च यच्च स्थावरं सर्वं तत्प्रज्ञानेत्रम् । प्रज्ञाने प्रतिष्ठितं प्रज्ञानेत्रो लोकः प्रजा प्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ॥

अन्वयार्थ—[एषः ब्रह्म—] हा प्रज्ञानरूप आत्मा शरीरांत मूर्धद्वारानें प्रविष्ट झालेलें अपर ब्रह्म आहे. [एषः इंद्रः—] हाच पूर्वोक्त इंद्र आहे. (वर पृ. २७३.पहा) किंवा देवराज आहे. [एषः प्रजापतिः—] हा प्रजापति—प्रथम उत्पन्न झालेला शरीरी—विराट् आहे. याच्याच मुखादिकांपासून अग्न्यादि सर्व देव झाले. [एते सर्वे देवाः—] हे सर्व इंद्रादि देव [इमानि च पंच महाभूतानि—पृथिवी वायुः आकाशः आपः ज्योतींषि इति एतानि—] आणि हीं सर्व शरीरांचीं

उपादानकारणभूत पृथिव्यादि पंचमहाभूतें–पृथिवी, आप्, तेज, वायु व आकाश अशीं हीं अन्न-अन्नादरूप भूतें हा प्रज्ञानात्माच आहे. [इमानि च क्षुद्रमिश्राणि इव–] शिवाय हीं डांस-मशक इत्यादि क्षुद्रांशीं–अल्पांशीं मिश्र झालेलीं, येथील ' इव-'शब्द अर्थरहित आहे, [बीजानि–] सर्पादि दुसरीं बीजें–कारणें [इतराणि च इतराणि च–] तशींच दुसरीं स्थावर व जंगम अशा दोन राशींनीं निर्देश केलीं जाणारी (सर्पादिकांना केवल क्षुद्रमिश्रत्वच आहे, असें नाहीं तर दुसऱ्या सर्पादिकांचें बीजत्वहि आहे. असो; तीं कोणतीं ? उत्तर–) [अंडजानि जारुजानि०–] पक्षि-सर्पादि अंडज, मनुष्यादि जरायुज, उवा-पिसा इत्यादि स्वेदज, वृक्षादि उद्भिज्ज, [अश्वाः०–] घोडे, गायी, पुरुष, हत्ती, [यत् किंच इदं प्राणि जंगमं च पतत्रि च यत् च स्थावरं–] तसेंच हें जें सर्व प्राणिजात आहे, कोणतें ? जंगम प्राणिजात–पायांनीं भूमीवर संचार करणारें, पंखांनी आकाशांत उडण्याचें ज्याचें शील आहे तें पतत्रि आणि जें स्थावर –अचल–एकत्र स्थित असणारें वृक्षादिक [तत् सर्वं प्रज्ञानेत्रं–] तें सर्व प्रज्ञानेत्र आहे. प्रज्ञप्ति–प्रज्ञा तेंच ब्रह्म व ब्रह्म सर्वांचें नेत्र–नेणारें आहे. प्रज्ञानानें हें सर्व सत्तायुक्त होतें, ह्मणून प्रज्ञानेत्र आहे. [प्रज्ञाने प्रतिष्ठितं–] उत्पत्ति-स्थिति-लयकालीं तें सर्व प्रज्ञानांत ब्रह्मांत स्थित–प्रतिष्ठित आहे. तें प्रज्ञाश्रय आहे. (तें प्रज्ञानसत्तेनें सत्तावान् होतें, इतकेंच नव्हे तर त्याची प्रवृत्तिहि प्रज्ञानामुळेंच होते, असें श्रुति सांगते–) [लोकः प्रज्ञानेत्रः–] सर्व लोक–जगत् प्रज्ञानेत्र–प्रज्ञाच त्याचें प्रवर्तक आहे, किंवा प्रज्ञाचक्षु आहे. [प्रज्ञा प्रतिष्ठा–] प्रज्ञा सर्व जगाची प्रतिष्ठा–आधार आहे. (कल्पित सर्पादिकांची पर्यवसानभूमि जशी रज्जु, त्याप्रमाणें जगाची पर्यवसानभूमि प्रज्ञा आहे. त्यामुळें जगाचा बाध झाल्यावर एक प्रज्ञानच अवशिष्ट रहात असल्यामुळें तेंच परमार्थ सत्य आहे. यास्तव–) [प्रज्ञानं ब्रह्म–] प्रज्ञान ब्रह्म आहे. तें हें ब्रह्म सर्व उपाधिभेद–उपाधीमुळें प्राप्त झालेले कर्तृत्व, भोक्तृत्व, दुःखित्व इत्यादि विशेष, अगदीं अस्त पावले आहेत असें सत्, निरंजन, निर्मल, निष्क्रिय, शांत ह्मणजे परितृप्त, परमानन्दरूप, एक, अद्वय, ' नेति नेति ' इत्यादि सर्वविशेषांच्या निरासानेंच साक्षात् ज्ञात होणारें व सर्व शब्द-प्रत्ययांचा विषय न होणारें आहे.

स एतेन प्रज्ञेनात्मनास्माल्लोकादुत्क्रम्यामुष्मिन्त्स्वर्गे लोके सर्वान् कामानाप्त्वाऽमृतः समभवत्समभवत् ॥

इति आत्मषट्के पंचमः खण्डः ॥ ५

इत्यैतरेयोपनिषदि तृतीयोऽध्यायः । ऐतरेयारण्यके षष्ठोऽध्यायः ।

अन्वयार्थ—[सः—] तो पूर्वोक्त वामदेव किंवा जो दुसराहि कोणी पूर्वोक्त ब्रह्माला जाणतो—प्रज्ञानरूप ब्रह्माला प्रज्ञानात्मत्वानें जाणतो तो [एतेन प्रज्ञेन आत्मना—] ज्या प्रज्ञात्म्यानेंच ब्रह्माला जाणणारे पूर्वीचे विद्वान् अमृत झाले त्या याच प्रज्ञात्म्यानें ब्रह्माला साक्षात् जाणून, त्या प्रज्ञात्म्याच्या योगानें [अस्मात् लोकात् उत्क्रम्य—] या लोकापासून उत्क्रमण करून [अमुष्मिन् स्वर्गे लोके—] इंद्रियांचा विषय न होणाऱ्या आत्मरूप लोकांत [सर्वान् कामान् आप्त्वा—] सर्व भोगांस प्राप्त होऊन [अमृतः समभवत्—] अमृत झाला आहे (एखादा पक्षी जसा आपल्या घरट्यांतून वर उडून जातो, त्याप्रमाणें येथें उत्क्रमण संभवत नाहीं. यास्तव 'देहात्मभाव सोडून प्रज्ञानात्मभाव धारण करणें,' हेंच येथील उत्क्रमण आहे, प्रज्ञान ब्रह्म आहे असें जो जाणतो तो मरणधर्मशून्य होतो; असा याचा भावार्थ. 'समभवत्' या पदाची द्विरुक्ति अध्यायसमाप्तिसूचक आहे. (५)

वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता मनो मे वाचि प्रतिष्ठितमाविरावीर्म एधि । वेदस्य म आणी स्थः श्रुतं मे मा प्रहासीरनेनाधीतेनाऽहोरात्रान्त्संदधाम्यृतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवत्ववतु मामवतु वक्तारमवतु वक्तारम् ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

इति आत्मषट्के षष्ठः खण्डः ॥ ६

इत्यैतरेयोपनिषदि चतुर्थोऽध्यायः । ऐतरेयारण्यके सप्तमोऽध्यायः ।

या शांतीचा अर्थ आरंभीं शब्दशः सविस्तर केला आहे. पृ २५८ पहा.(६)

ऐतरेयोपनिषदाचें सिंहावलोकन.

हें ऋग्वेदाचें उपनिषद् आहे. त्याचे सहा खंड आहेत. शेवटचा खंड शांतिरूप असून पांच खंडांत ब्रह्मविद्या प्रकाशित केली आहे. ऐतरेय ऋषीनें सांगितल्यामुळें तिला ऐतरेय उपनिषद् म्हणतात. ऐतरेय आरण्यकाच्या दुसऱ्या आरण्यकाचे ४, ५, ६ व ७ हे अध्याय यांत आहेत. त्यांतील चवथ्या अध्यायाचे तीन खंड व पुढील तिन्ही अध्यायांचा एकेक खंड आहे. मिळून याचे एकंदर सहा खंड होतात. ह्मणून या सर्व ग्रंथाला आत्मषट्क म्हणतात. शेवटचा सातवा अध्याय म्ह० या उपनिषदाचा सहावा खंड शांतिरूप असल्यामुळें तो आम्हीं यांत आरंभीं अन्वयार्थासह दिला आहे. 'वाङ्मे मनसि०' या शांतीच्या जागीं 'भूमिमुपस्पृशेदग्न इळा०' इत्यादि शांति म्हणण्याचाहि क्वचित् परिपाठ आहे. असो; सृष्टीच्या पूर्वीं एक—नाम-रूपरहित आत्माच होता. दुसरें कांहीं नव्हतें. माया ही प्रकृति व मायावान् हा महेश्वर आहे, असें जरी श्वेताश्वतरांत सांगितलें आहे, तरी त्या मायेला पृथक् सत्ता नाहीं. सु. पं. प्र.२.५० पृ. ७३ पहा. सुषुप्त्यवस्थेंत जसा, तसाच तो अद्वय-आनंदरूपात्मा सृष्टीच्या पूर्वीं होता. निद्रा जशी स्वप्नाला उत्पन्न करिते त्याप्रमाणें माया जगद्भ्रांतीला उत्पन्न करिते. आत्मा जरी निर्विकार आहे तरी त्यानें मायावृत्तीनें ईक्षण—आलोचन केलें. विचारपूर्वक सर्व लोकांना उत्पन्न केलें. त्यांच्या पालकांना उत्पन्न करण्यासाठीं त्याच भूतांपासून विराड्देह उत्पन्न केला.त्याच्या कर्णादिगोलकांत देवता केल्या(१)

त्या उत्पन्न केलेल्या देवता विराड्देहरूप महा संसारसागरांत पडल्या. प्रभूनें त्या देहाला क्षुधा व तृषा यांनीं युक्त केलें. नंतर अन्नभोगासाठीं जरायुजादि चार प्रकारचीं असंख्य शरीरें उत्पन्न करून त्यांत त्या विराड्देहांतील देवतांना यथायोग्य स्थानीं प्रवेश करावयास सांगितलें. क्षुधा व तृषा यांना त्या मूळ विराट्शरीरांतच स्वतंत्र स्थान नव्हतें. म्हणून ईश्वरानें त्यांना त्या देवतांमध्येंच भागीदार केलें. त्यामुळें देवतांच्या विषयभोगानें त्या तृप्त होऊं लागल्या.(२)

त्यानंतर ईश्वरानें पुनः 'लोक व लोकपाल यांसाठीं मी अन्न उत्पन्न करितों,' असें ईक्षण केलें व जलप्रधान पंचभूतांपासूनच संकल्पानें मूर्ति—व्रीहि-यवादि व मूषकादि अन्न उत्पन्न केलें. त्यांतील मूषकादि जंगम मूर्ति आपल्या मार्जारादि भक्षकाला पाहून पळून जाऊं लागली. म्हणून तो शरीरेंद्रियसंघात त्या आपल्या अन्नाचें वागादि इंद्रियांनीं ग्रहण करण्याचा यत्न करूं लागला. पण त्याला कोणत्याच इंद्रियानें त्याचें ग्रहण करितां आलें नाहीं. शेवटीं अपान वायूनें त्यानें त्याचें ग्रहण केलें. अपानवायुच अन्नाचा ग्राहक आहे. तो अन्नाच्या द्वारा आयुष्याचें निमित्त आहे. त्यानंतर ईश्वरानें पुनः असें आलोचन केलें.—वाक्, प्राण, चक्षु इत्यादिकांनीं जरी आपापला संभाषणादि व्यवहार केला तरी त्याच्या व्यापारांचा स्वामी असा जो मी ज्ञाता—भोक्ता तो जर यांत नसेन तर त्यांचा व त्यांच्या त्या सर्व व्यापाराचा काय उपयोग? हा सर्व शरीरेंद्रियसंघात मजवांचून कसा राहूं शकेल! यास्तव मला यांत प्रवेश केला पाहिजे. पण मी कोणत्या मार्गानें यांत शिरूं? माझ्या प्राणवायुरूप भृत्यानें यांत पायांतून प्रवेश केला आहे. तेव्हां त्याच मार्गानें मला जाणें योग्य नाहीं, असा विचार करून त्यानें मस्तकाच्या मध्यभागांतून प्रवेश केला. तोच प्राणधारक जीव झाला. त्यालाच चेतन, कर्ता, विज्ञानमय वगैरे म्हणतात. नख-शिखान्त शरीराला व्यापणारा अहंकार चिदाभासानें युक्त असल्यामुळें तोच हा चेतन आहे. वृक्षाचें मूळ व अग्र यांप्रमाणें अन्तःकरणाचे अहंकार व मन असे दोन भाग आहेत. हृदयस्थ मन हें त्याचें उपकरण आहे. तें हृदय, कंठ व नेत्र यांत क्रमानें संचार करितें. त्यामुळें सुषुप्ति, स्वप्न व जागर या तीन अवस्था होतात. हाच शरीरस्थ जीवाचा संसार आहे. त्याचीं हीं तीन क्रीडास्थानें आहेत. किंवा पुढें तीन जन्मांसाठीं सांगितलेलीं मातृशरीर, पितृशरीर व स्वशरीर हीं तीन त्याचीं स्थानें आहेत. त्यांतून हा आपला जन्म-मरणादिरूप संसार करितो. या तीन अवस्था म्हणजे तीन स्वप्नेंच आहेत. कारण स्वप्नकालींच स्वप्न असतें. इतर कालीं तें नसतें. सुषुप्ति व जागर यांनाहि तोच न्याय लागू आहे. शिवाय विपरीत दर्शन हेंहि स्वप्नाचें लक्षण त्यांत आहे. म्हणून तीं तीन स्वप्नेंच आहेत. परमेश्वर ज्या मूर्धप्रदेशाचें विदारण करून शरीरांत जीवरूपानें शिरला त्या द्वाराला विदृति हें नांव आहे. तो जीवरूप ईश्वरांश त्याच प्रवेशद्वारानें शरीरां-

तून बाहेर पडून जेव्हां जातो तेव्हां परब्रह्माला प्राप्त होतो व स्वरूपानंदाचा अनुभव घेतो. म्हणून त्या द्वाराला नांदन–नंदन–आनंद देणारें असें म्हटलें आहे. असो; याप्रमाणें शरीरांत प्रवेश करून व मायेच्या स्वाभाविक मोह-शक्तीमुळें स्वरूपाला विसरून तो ईश्वरच जीव झाला व जन्म-मरण-सुख-दुःखप्राप्तिरूप संसाराचा अनुभव घेऊं लागला. पुढें दीर्घकालानें अनेक जन्मां-मध्यें आचरिलेल्या पुण्यकर्मामुळें–निष्काम कर्म-उपासना यांच्या योगानें त्याच्या मनांत 'मी कोण' हें जाणण्याची इच्छा होते. तो पृथिव्यादि भूतांविषयीं विचार करितो. हीं सर्व भूतें व भौतिक पदार्थ परमात्म्यापासून झालीं आहेत. त्यामुळें मृत्तिकेचे विकार मृद्वस्तूहून जसे पृथक् नाहीत, तसेच ते परमात्म्याहून पृथक् नाहींत. नाम व रूप हा विकार आहे. विकार मिथ्या असतो. कारण त्याला पृथक्–स्वतंत्र सत्ता नसते. त्याचें उपादान कारण मात्र सत्य असतें. या न्यायानें नाम-रूपात्मक जगत् मिथ्या असून एक चिदात्माच सत्य आहे. तोच सर्व जगद्रूप आहे. या विचित्र जगाचें तत्त्व–अविनाशी स्वरूप आत्मा आहे. असा विचार करून त्यानें आत्म्यालाच–स्वरूपाला सर्वव्यापक ब्रह्म जाणलें. शम-दमादिकांनीं संपन्न असलेल्या जीवानें याप्रमाणें यथाशास्त्र विचार करून आपलें ब्रह्मत्व साक्षात् जाणलें. 'इदं'–हें ब्रह्म माझें स्वरूप आहे असें 'अदर्शम्' मीं साक्षात् पाहिलें, असें त्यानें म्हटलें. त्यामुळें तो 'इदंद्र' या नांवास पात्र झाला. तथापि पूज्यांना प्रत्यक्ष नांव घेतलेलें आवडत नसल्या-मुळें परमात्म्याच्या नांवाचें परोक्षत्व सिद्ध होण्यासाठीं त्याला 'इंद्र' असें म्हणूं लागले. तो संसारी झाला–संसाराचा अनुभव घेऊं लागला. येथपर्यंत जो या अध्यायाचा भाग आहे तो अध्यारोपरूप आहे व त्यानंतर 'जिज्ञासापूर्वक त्यानें विचार केला,' वगैरे जें सांगितलें आहे तो अपवाद भाग आहे. उत्तम अधि-कारी पुरुषाला त्यांच्या योगानेंच ब्रह्मज्ञान होतें. येथें ही ब्रह्मविद्या संपली. (२).

पण हा आत्मबोध विरक्त पुरुषालाच होतो. विषयदोषदर्शनानें वैराग्य उद्भ-वतें. जन्म हाच या संसारांतील पहिला दोष आहे. म्हणून प्रथम त्याचें दिग्-दर्शन केलें जातें–स्वर्गांतून किंवा नरकांतून येऊन जीव वृष्टिद्वारा अन्न होतो. पिता तें अन्न खातो. त्याचा रस-रक्तादिक्रमानें रेतामध्यें परिणाम होतो. पितृ-देहांतील तें रेत हें त्याच्या सर्वांगांपासून उत्पन्न झालेलें तेज आहे. याप्रमाणें पुरुषा-

मध्यें तो अगोदर गर्भ बनतो. पुरुष ऋतुमति भार्येच्या ठिकाणीं त्याचें आधान करितो. पित्याचा तो पहिला पुत्ररूप जन्म होय. स्त्रीगर्भाशयांत त्याचा शरीराकार व्यक्त होतो. स्त्रीवीर्यानें तो पुष्ट होतो. इतर अंगांप्रमाणेंच तो तिच्या शरीराशीं एकरूप होतो. त्यामुळें तो गर्भ गुल्मादिकांप्रमाणें तिला मारीत नाहीं. ती मोठ्या प्रीतीनें स्वशरीरावयवाप्रमाणेंच त्याचें रक्षण करिते. ती आपल्या पतीच्या त्या गर्भरूप शरीराचेंच रक्षण करीत असते. ह्मणून पतीनेंहि तिचें इष्ट अन्नादिकांच्या योगानें रक्षण करावें, तिला संतुष्ट ठेवावें, हा पतिधर्म आहे. असो; याप्रमाणें तो गर्भ मातेच्या अत्यंत अशुद्ध शरीरप्रदेशांत नऊ महिने जंताप्रमाणें राहून दहाव्या महिन्यांत मोठ्या क्लेशानें बाहेर पडतो. पिता उत्पन्न झालेल्या त्या पुत्राचे आत्मबुद्धीनें जातकर्मादि संस्कार करितो. नंतर वृद्ध व मरणोन्मुख झालेला तो पिता आपलें सर्व लौकिक व वैदिक कर्तव्य पुत्राला करावयास सांगून म्ह० आपल्या जागीं पुत्राला प्रतिनिधि नेमून स्वतः मरतो आणि दुसरा देह धारण करण्यासाठीं वर वर्णन केल्याप्रमाणेंच दुसऱ्या माता-पितरांच्या उदरांत प्रवेश करितो. पूर्वी पुत्ररूपानें याचे जे दोन जन्म सांगितले त्यांच्या अपेक्षेनें हा त्याचा तिसरा जन्म आहे. याप्रमाणें प्रत्येक प्राण्याच्या जन्मासाठीं आपलें उदर, पत्नीचा गर्भाशय व दुसऱ्या जन्मांतील माता-पितरांचें उदर अशीं तीन स्थानें आहेत. याप्रमाणें प्रत्येक जीव असंख्य योनींमध्यें लक्षावधि उत्तमाधम जन्म वारंवार घेतो. पुनः पुनः उत्पन्न होऊन पुनः पुनः मरणें, यांत तर अत्यंत असह्य क्लेश आहेतच, पण जन्मानंतर मरेपर्यंतहि विविध रोग, काम, क्रोध, चिंता इत्यादि आधि-व्याधीमुळें जीवाला भयंकर यातना भोगाव्या लागतात. या गोष्टीचा चांगला विचार करून संसाराविषयीं व त्यांतील मिथ्या विषयांविषयीं विरक्त झालेला पुरुष आत्मतत्त्वविचारानें ज्ञानी होऊन वामदेवाप्रमाणेंच मुक्त होतो. गर्भामध्यें असलेल्याच वामदेवाला प्रतिबंधाचा क्षय होतांच पूर्वजन्मांतील ज्ञानाभ्यासानें मुक्ति मिळाली असें स्वतः त्यानेंच एका ऋचेनें सांगितलें आहे. वामदेवानें पूर्वजन्मीं वेदान्तश्रवणादि केलें, पण आणखी एका गर्भवासाला कारण होणाऱ्या प्रबल कर्मानें प्रतिबंध केल्यामुळें त्याला मुक्ति मिळाली नाहीं. पुनः गर्भांत प्रवेश करितांच त्याचें तें ज्ञानप्रतिबंधक कर्म क्षय पावलें व त्याला पूर्वजन्मांतील श्रवणादि ब्रह्माभ्यासाचें स्मरण होऊन तें

गर्भांतच ज्ञानी झाला. तो विद्वान होऊन जन्माला आला व तेव्हांपासूनच जीवन्मुक्त झाला. तो म्हणाला " मी इतके दिवस भ्रमानें देहांत निमग्न झालों होतों. पण आतां ज्ञानानें त्या देहांपासून पृथक् होऊन व जीवत्वाचा त्याग करून उत्कृष्ट—परमात्मा झालों आहें. मला सर्व आनन्द साक्षात् व एकाच वेळीं प्राप्त झाले आहेत." याप्रमाणें समस्त आनंदांस प्राप्त होऊन वामदेव आत्म्यामध्यें अमृत झाला. देह व प्राण यांचा वियोग हेंच मरण, तें चिदात्म्याला नाहीं. (४)

याप्रमाणें संसाराचें अनर्थावहत्व व ज्ञानाचें पुरुषार्थत्व ऐकून विरक्त मुमुक्षु आपापसांत असा विचार करूं लागले—' मी पाहतों, मी बोलतों, मी ऐकतों, मी सुखी दुःखी ' इत्यादि प्रकारें आह्मी ज्याची उपासना करितों तो आत्मा कोण ? अपर ब्रह्मरूप क्रियाशक्ति प्राणानें या शरीरांत पावलांतून प्रवेश केला आहे व ईक्षणपूर्वक लोक-लोकपालादिकांना उत्पन्न करणाऱ्या ज्ञानशक्ति ईश्वरानें मूर्धसीमद्वारानें प्रवेश केला आहे. त्या दोन आत्म्यांतील मुख्य आत्मा कोण ? ज्याच्या योगानें पुरुष पाहतो, ऐकतो, वास घेतो वगैरे तें सर्व हृदय—मन आहे. संज्ञान-विज्ञान-आज्ञान इत्यादि या सर्व त्याच्या वृत्ति आहेत. तीं सर्व ज्ञात्या आत्म्याचीं करणें—ज्ञान-क्रियासाधनें आहेत. त्या सर्वांमध्यें चैतन्य उपलब्ध होतें. तें प्रत्येक करणांत निरनिराळें जरी भासत असलें तरी सर्वत्र एक आहे. चैतन्यालाच प्रज्ञान ह्मणतात. अहंकार, मन, ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व प्राण, एतद्रूप लिंगशरीर आणि 'अन्नमय-'संज्ञक स्थूल शरीर या त्याच्या उपाधि आहेत. त्यांतील प्रज्ञान मुख्य नसून तें अमुख्य आहे. त्याला चिदाभास म्हणतात. शरीरादिकांचें आत्मत्वहि मुख्य नव्हे. सुषुप्तींत प्राणावांचून बाकी सर्व लिंगशरीराचा लोप होतो. त्यावरून त्याचें अनात्मत्व सिद्ध होतें. निरुपाधिक प्रज्ञान नित्य आहे. तें उपाधीचा लोप झालेला पाहतें. त्यामुळें त्यालाच मुख्य आत्मत्व आहे. अर्थात् इंद्रियादि सर्व हीं त्या प्रज्ञानाचींच नांवें आहेत. त्यांवरून आत्मा उपलक्षित होतो. एकाच पुरुषाला भिन्न भिन्न संबंधामुळें पिता-भ्राता-बंधु पति इत्यादि अनेक नांवें जशीं प्राप्त होतात त्याचप्रमाणें प्रज्ञानाला चक्षुः, श्रोत्र, मन, कर्ता, भोक्ता इत्यादि नांवें प्राप्त होतात. त्यांवरून कर्तृ-देहादिकांचें साक्षिभूत प्रज्ञान उपलक्षित होतें. तेंच जीवाचें वास्तव रूप आहे. आपल्या शरीरांत प्रज्ञान आहे. तसेंच तें आब्रह्मस्तंबपर्यंत सर्व शरीरांत आहे.

तेंच परमात्मा होय. प्रज्ञानाला प्राणधारण करणें, या उपाधीमुळें जसें जीवत्व येतें तसेंच जगदुत्पत्त्यादिकांचें निमित्त होणें, या उपाधीमुळें त्याला ब्रह्मत्व आहे. सर्व स्थावर-जंगम हेंच जगत् आहे. त्याचें प्रेरक प्रज्ञान आहे. सृष्टीच्या पूर्वी जें शुद्ध प्रज्ञान होतें त्यांतच मायेनें उत्पन्न केलेलें सर्व जगत् प्रतिष्ठित आहे. उत्पत्ति-स्थिति-लयसमयी हा सर्व लोक प्रज्ञानानेंच–प्रज्ञानाकडूनच व्यवहारांत प्रवृत्त केला जाणारा आहे. लयसमयी प्रज्ञाच त्याची प्रतिष्ठा आहे. स्वप्नाची उत्पत्ति, स्थिति व लय हे जसे जीवचैतन्यसाक्षिक असतात त्याप्रमाणें जगाचे सृष्टि-स्थिति-लय प्रज्ञानसाक्षिक आहेत. याप्रमाणें जें सर्वाधिष्ठान शुद्ध अद्वय चैतन्य तेंच परमात्मस्वरूप आहे, असा निर्णय करावा व जें आत्मस्वरूप प्रज्ञान तेंच ब्रह्म आहे, असें जाणावें. प्रज्ञान ब्रह्म आहे, असें जाणून सदा प्रज्ञारूप व्हावें. म्हणजे वामदेवाप्रमाणेंच कोणीहि मुक्त होतो. त्यानंतर त्याचें शरीर कोणत्याहि शुभाशुभ अवस्थेंत मृत होवो. तो पुनः जन्म घेत नाहीं.

'प्रज्ञानं ब्रह्म' हें या उपनिषदांतील महावाक्य आहे. या सर्व विवेचनावरून या उपनिषदाचें महत्त्व कोणाच्याहि लक्षांत येईल. यांत आत्मविद्या थोडक्यांत पण फारच चांगल्या रीतीनें प्रतिपादिली आहे. ब्रह्ममीमांसेंतहि त्यांतील बऱ्याच वाक्यांचा विचार केला आहे. सु.ब्र. पृ. ५४,५८,३१९ इ. पहा.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्समूहातील
ऐतरेयोपनिषद् समाप्त झाले.

अथ छान्दोग्योपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

प्रथमोऽध्यायः ।

ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माऽहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मेऽस्तु तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

अन्वयार्थ—माझीं हात, पाय इत्यादि अंगें आप्यायित होवोत—वृद्धि पावोत, पुष्ट होवोत. (ब्रह्मविद्येच्या अभ्यासाला समर्थ होवोत) वाक्, प्राण, चक्षु, श्रोत्र हीं पुष्ट होवोत सर्व इंद्रियांत बल येवो. जें सर्व उपनिषत्प्रतिपादित तें ब्रह्म आहे. मी ब्रह्माचें निराकरण न करावें व ब्रह्मानें माझें निराकरण न करावें. माझें अनिराकरण असो, अनिराकरण असो. उपनिषदांत सांगितलेले जे धर्म ते आत्म्यामध्यें निरत असलेल्या माझ्या ठिकाणीं असोत, ते माझ्यामध्यें येवोत. " शांतिः शांतिः शांतिः " (त्रिविध तापांची शांति होवो. वरील दोन्ही द्विरुक्ति आदरार्थ आहेत. मागें पृ. २१ पहा.) —पूर्व कांडांत समस्त म्ह० विहित व निषिद्ध कर्म ज्ञात झालें—कळलें. त्यांतील विहित कर्म प्राण, अग्नि इत्यादि देवतांच्या उपासनेसह अनुष्ठिलें असतां म्ह० विहित कर्म व ज्ञान—उपासना यांचें समुच्चयानें अनुष्ठान केलें असतां तें अर्चिरादि म्ह० देवयानमार्गानें कार्यब्रह्माच्या प्राप्तीचें कारण होतें. तें मुख्य ब्रह्माच्या प्राप्तीचें कारण होत नाही. कारण मुख्य ब्रह्म गतीचा विषय—गतिप्राप्य-नाहीं. कार्यब्रह्मच गतीचा विषय आहे, असें शारीरकांत बादर्यधिकरणांत—सु. ब्र. पृ. ४८४ सिद्ध केलें आहे. त्यामुळें समुचित विहित कर्म परम पुरुषार्थाचें

साधन नव्हे. केवल म्ह० असमुच्चित विहित कर्म धूमादि-पितृयाण मार्गानें चन्द्रलोकप्राप्तीचें कारण—साधन होतें. आतां निषिद्ध कर्मांचें फल—स्वभावानें प्रवृत्त होणारांची म्ह० शास्त्राची अपेक्षा न करितां प्रकृतिवशात् यथेष्ट चेष्टा करणारांची व त्यामुळेंच वरील दोन्ही मार्गांपासून भ्रष्ट झालेल्यांची कष्टकर अधोगति—तिर्यक्-अवस्था—क्षुद्रजीवरूप गति सांगितली आहे. पण शुक्ल व कृष्ण या दोन मार्गांतील एकाहि मार्गांत आत्यन्तिकी—नित्य पुरुषार्थसिद्धि नाहीं, यास्तव कर्माची अपेक्षा नसलेलें—कर्मनिरपेक्ष अद्वैत-आत्मविज्ञान, संसारसंबंधी तीन गतींचा हेतु असें जें कर्म त्याच्या निराकरणानें सांगावें, ह्मणून हें उपनिषद् आरंभिलें जातें. तथापि या विद्याप्रकरणांत अभ्युदयसाधनभूत उपासनाहि सांगितल्या जातात. ज्यांचें फल कैवल्याच्या अगदी समीप ह्म० क्रममुक्ति हें आहे अशीं किंचित् विकृतब्रह्मविषयक ' मनोमयः प्राणशरीरः ' इत्यादि व कर्मसमृद्धि हें फल देणारीं कर्मांगसंबंधी उपासनें सांगितली जातात. कारण रहस्य व मनोवृत्ति हें साधर्म्य अद्वैतज्ञान व उपासना यांमध्यें आहे. तर मग अद्वैतज्ञान व उपासनें यांत विशेष कोणता ? सांगतों—अद्वैत ज्ञान निष्क्रिय आत्म्यामध्यें अध्यारोपित असें जें—स्वाभाविक कर्ता-भोक्ता इत्यादि कारक-क्रिया-फल यांचें—भेदविज्ञान त्याचें निवर्तक आहे. प्रकाशाच्या निमित्तानें होणारा जो रज्ज्वादिकांच्या स्वरूपाचा निश्चय तो रज्ज्वादिकांच्या ठिकाणीं अध्यारोपित सर्पादिज्ञानाचा निवर्तक जसा होतो त्याप्रमाणें आत्मज्ञान भेदज्ञानाचें निवर्तक आहे. पण ' मनो ब्रह्मेत्युपासीत ' इत्यादि शास्त्रान असें गर्भपिलें असेल तसें मन, प्राण इत्यादि कांहीं आलंबन—आधार घेऊन त्याच्या ठिकाणीं त्याहून विलक्षण—भिन्न प्रत्ययानें अन्तरित न होईल अशा रीतीनें समान चित्तवृत्तिप्रवाह—अविच्छिन्न प्रत्यय—ठेवणें हें उपासन आहे. असा त्या दोहोंमध्यें विशेष—भेद—फरक आहे.(असें जरी असलें तरी या उपनिषदांत प्रथम आत्मज्ञान—विद्याच न सांगतां उपासनें कां सांगितलीं आहेत ? उत्तर—)तीं ही उपासनें कर्माप्रमाणें चित्तशुद्धि करणारी आहेत, त्यामुळें चित्तशुद्धीच्या द्वारा तीं वस्तुतत्त्वाचीं प्रकाशक असल्याकारणानें अद्वैतज्ञानोपकारक आहेत. शिवाय साकार वस्तु हा त्यांचा विषय असल्यामुळें तीं सुसाध्य आहेत. मंद अधिकाऱ्यांची त्यांत सहज प्रवृत्ति होऊं शकते. म्हणून त्यांचा—उपासनांचा पूर्वीं उपन्यास

केला जातो. (असें जरी असलें तरी अनेक प्रकारच्या उपासनांतील कर्मांगांशीं संबद्ध असलेलीच उपासना प्रथम कां सांगितली जाते ? उत्तर—) प्राकृत पुरुषामध्यें कर्मांचा अभ्यास अनादिवासनेनें दृढ झालेला असतो. त्यामुळें त्या परिचित कर्मांचा त्याग करून तत्संबंधी केवल उपासनेंतच चित्तार्चे समर्पण करणें फार कठिण आहे. म्हणून अगोदर कर्मांगसंबद्ध उपासनेचा उपन्यास केला जातो. त्यानंतर क्रमानें दुसऱ्या उपासनांचाहि उपदेश पुढें करावयाचाआहे.

ॐमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत । ओमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम् १

अन्वयार्थ—[उद्गीथं ' ओं ' इति एतत् अक्षरं उपासीत—] ' उद्गीथ-' शब्दवाच्य—उद्गीथसंज्ञक जें ' ओं ' असें हें अक्षर त्याची उपासना करावी, त्याच्या ठिकाणी चित्तार्चे ऐकाग्र्य करावें. [ॐ इति हि उद्गायति—] ॐ असा आरंभ करूनच उद्गाता यज्ञांत उद्गान—मोठ्यानें सामगान करतो. [तस्य उपव्याख्यानं—] त्याचें उपव्याख्यान—त्याचें असें उपासन करावें, अशी विभूति आहे, असें फल आहे, इत्यादि कथन प्रवृत्त होत आहे. १. (ओंकाराच्या रसतमत्व या गुणार्चे विधान करण्यासाठी भूमिका करितात—)

एषां भूतानां पृथिवी रसः पृथिव्या आपो रसः । अपामोषधयो रस ओषधीनां पुरुषो रसः पुरुषस्य वाग्रसो वाच ऋग्रस ऋचः साम रसः साम्न उद्गीथो रसः ॥ २

अन्वयार्थ—[एषां भूतानां०—] या चराचर भूतांचा पृथिवी हा रस—उत्पत्ति-स्थिति-लयकारण आहे. पृथिवीचा आप हा रस आहे. आपांचा ओषधी हा रस आहे. ओषधींचा पुरुष हा रस आहे. पुरुषाचा वाक् हा रस आहे. वाक्‌चा ऋक् हा रस आहे. ऋचेचा साम हा रस आहे व सामाचा उद्गीथ रस आहे.

स एष रसानाꣳ रसतमः परमः परार्ध्योऽष्टमो यदुद्गीथः ॥ ३

अन्वयार्थ—[स एषः०—] तो हा ओंकार रसांतील अतिशय रस आहे, परम आहे, [परार्ध्यः—] परमात्मस्थानास योग्य आहे, जो उद्गीथ वरील रसांतील आठवा रस तो हा ओंकार (असा वरच्या 'स एषः' याशीं संबंध.) ३.

कतमा कतमर्कतमत्कतमत्साम कतमः कतम उद्गीथ इति विमृष्टं भवति ॥ ४

अन्वयार्थ—[कतमा०—] कोणती कोणती ती ऋचा, कोणतें कोणतें तें साम, कोणता कोणता तो उद्गीथ, याचा विचार केला जातो.४.(शिष्यभूत श्रुतीनें अशी विचारणा केली असतां उत्तर—)

वागेवर्क्प्राणः सामोमित्येतदक्षरमुद्गीथः। तद्वा एतन्मिथुनं यद्वाक्च प्राणश्चर्क्च साम च ॥ ५

अन्वयार्थ—[वाक् एव ऋक्०—] वाक् हीच ऋक्, प्राण साम, ओं हें अक्षर उद्गीथ. तेंच हें मिथुन—जोडपें आहे. जें ऋक्-चें कारण वाक् व सामाचें कारण प्राण तें मिथुन आहे. ५.

तदेतन्मिथुनमोमित्येतस्मिन्नक्षरे सꣳसृज्यते यदा वै मिथुनौ समागच्छत आपयतो वै तावन्योन्यस्य कामम् ॥ ६

अन्वयार्थ—[तत् एतत् मिथुनं०—] तें हें मिथुन 'ओं' या अक्षरांत संसृष्ट होतें—त्याच्याशी संसर्ग पावतें—त्यांत मिळतें. [यदा वै०—] जेव्हां व्यवहारांत मिथुनाचे अवयव परस्पर संयुक्त होतात तेव्हां ते दोघे परस्परांचा काम प्राप्त करून देणारे होतात. ६.

अपायता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्ते ७

अन्वयार्थ—[यः विद्वान्—] जो उपासक [एवं एतद् अक्षरं उद्गीथं उपास्ते—] आप्तिगुणयुक्त अशा या उद्गीथनांवाच्या अक्षराची उपासना करतो [आपयता ह वै कामानां भवति—] तो कामांचा प्राप्त करविणारा होतो. ७. 'ओं' समृद्धिगुणवान्हि आहे, तो कसा? उत्तर—

तद्वा एतदनुज्ञाक्षरं यद्धि किंचानुजानात्योमित्येव तदाहैषो एव समृद्धिर्यदनुज्ञा समर्धयिता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्ते ॥ ८

अवन्यार्थ—[तद्वा एतत्—] तेंच हें प्रकृत ओंकाराक्षर [अनुज्ञाक्षरं—] अनुज्ञारूप अक्षर आहे. अनुज्ञा म्ह० अनुमति—अनुमोदन. ओंकार अनुमति आहे, असा भावार्थ. ओंकार अनुमति कशी, तें श्रुतिच सांगते—[यद्धि किं च०—] व्यवहारांत एखादा विद्वान् किंवा धनी जें कांहीं ज्ञान किंवा धन यांस अनुज्ञा देतो [तदा ओं इत्येव आह—] त्या वेळीं—अनुज्ञा करतांना तो 'ओं' असेंच ह्मणतो. [एषा उ एव समृद्धिः यत् अनुज्ञा—] अशी अनुज्ञा देणें हीच

समृद्धि आहे. [यः एवं विद्वान् एतत अक्षरं उद्गीथं उपास्ते–] जो असें जाणणारा या उद्गीथ अक्षराची उपासना करितो [कामानां समर्धयिता ह वै भवति–] तो यजमानाच्या कामांस समृद्ध करणारा होतो. ८.

तेनेयं त्रयी विद्या वर्तत ओमित्याश्रावयत्योमिति शंस-त्योमित्युद्गायत्येतस्यैवाक्षरस्यापचित्यै महिम्ना रसेन ॥ ९

अन्वयार्थ––[तेन–] त्या अक्षरानें [इयं त्रयी विद्या–] ही ऋग्वेदादि-रूप वेदविद्या–वेदविहित कर्म [वर्तते–] प्रवृत्त होतें. [ओमिति आश्रावयति०–] ओं असा आरंभ करूनच अध्वर्यु आश्रवण–कर्म करतो [ओं०–] ओं असा आरंभ करूनच होता शंसन–कर्म करतो व [ओं०–] ओं असा आरंभ करूनच उद्गाता उद्गान करतो. [एतस्य एव अक्षरस्य अपचित्यै–] याच अक्षराच्या परमात्म्याच्या अपचितीकरितां–पूजनाकरितां सर्व वैदिक कर्म आहे. [महिम्ना–] याच अक्षराच्या महत्त्वानें व [रसेन–] व्रीहि-यवादिरूप हवीनें कर्म प्रवृत्त होतें.

तेनोभौ कुरुतो यश्चैतदेवं वेद यश्च न वेद। नाना तु विद्या चाविद्या च यदेव विद्यया करोति श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवतीति खल्वेतस्यैवाक्षरस्योपव्याख्यानं भवति ॥१०

इति प्रथमाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ––[तेन–] त्या अक्षरानें [उभौ कुरुतः–] दोघेहि करितात. (कोण ?) [यः च एतत् एवं वेद–] जो हें अक्षर असें जाणतो [यः च न वेद–] व जो जाणत नाही, (ते दोघेहि कर्म करतात.) [नाना तु विद्या च अविद्याच–] पण विद्या व अविद्या नाना–भिन्न आहेत. [यदेव विद्यया करोति–] विज्ञानानें युक्त होऊनच जें कर्म करितो [श्रद्धया–] श्रद्धेनें [उपनिषदा–] योगानें युक्त होऊन–देवताविषय उपासनेनें युक्त होऊन कर्म करितो [तत् एव वीर्यवत्तरं भवति–] तेंच अधिक वीर्यवत्–अधिक फल देणारें होतें [इति खलु एतस्य एव अक्षरस्य उपव्याख्यानं भवति–] हें खरोखर या प्रकृत अक्ष-राचेंच उपव्याख्यान आहे. सु. ब्र. पृ. ३६२,४५० पहा. १० (१)

देवासुरा ह वै यत्र संयेतिर उभये प्राजापत्यास्तद्ध देवा उद्गीथमाजह्रुरनेनैनानभिभविष्याम इति ॥ १

अन्वयार्थ—[देवासुराः—] देव व असुर म्ह० शास्त्रीय वृत्ति व स्वाभाविक इंद्रियवृत्ति [उभये प्राजापत्याः—] दोन्हीं प्रजापतीचीं अपत्येंच. [ह वै—] पूर्वी [यत्र—] ज्या परस्पर विषयांचा अपहार करणें, या कारणानें [संयेतिरे—] संग्राम करते झाले. [तत् ह—] त्या निमित्तानें [देवाः—] देव [उद्गीथं आजह्रुः—] उद्गात्र्याचें कर्म करते झाले. (कशासाठीं ?) [अनेन—] या कर्मानें [एनान्—] या असुरांस [अभिभविष्यामः—] आम्ही पराभूत करूं, अशा अभिप्रायानें औद्गात्र करते झाले. १.—मुख्य प्राणालाच उपास्यत्व आहे, हें दृढ करण्यासाठीं श्रुति त्याचें विशुद्धत्व प्रकट करिते—

ते ह नासिक्यं प्राणमुद्गीथमुपासांचक्रिरे तꣳहासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तेनोभयं जिघ्रति सुरभि च दुर्गन्धि च पाप्मना ह्येष विद्धः ॥ २

अन्वयार्थ—[ते ह नासिक्यं०—] ते देव नासिकेंतील घ्राणसंज्ञक प्राणाच्या दृष्टीनें उद्गीथाची उपासना करते झाले. [तं ह—] त्या घ्राणाख्य प्राणाला [असुराः—] स्वाभाविक तमोरूप असुर [पाप्मना—] अधर्माविषयींची आसक्ति एतद्रूप पापानें [विविधुः—] वेध करते झाले. घ्राणाला अधर्मासक्तीनें संयुक्त करते झाले. [तस्मात्—] याप्रमाणें आसुर पापानें विद्ध झाल्यामुळें [तेन—] त्या पापानें प्रेरित झालेला घ्राणाख्य प्राण [उभयं जिघ्रति सुरभि च दुर्गन्धि च—] दोन्ही हुंगतो, सुगंध व दुर्गंध [हि पाप्मना एषः विद्धः—] कारण तो पापानें विद्ध आहे. २.

अथ ह वाचमुद्गीथमुपासांचक्रिरे तामꣳहासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तयोभयं वदति सत्यं चानृतं च पाप्मना ह्येषा विद्धा ॥ ३

अन्वयार्थ—[अथ ह०—] नंतर देव वाक्-दृष्ट्या उद्गीथाख्य ओंकाराची उपासना करते झाले. त्या वाक्-ला असुर आसक्तिरूप पापानें वेध करते झाले. ज्याअर्थी वाक् पापानें विद्ध आहे त्याअर्थी त्या वाक्-नें लोक दोन्ही बोलतो. सत्य व अनृत्य. ३.

अथ ह चक्षुरुद्गीथमुपासांचक्रिरे तद्धासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तनोभयं पश्यति दर्शनीयं चादर्शनीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ॥ ४

अन्वयार्थ—[अथ ह चक्षुः०—] त्यानंतर देव चक्षुर्दृष्ट्या उद्गीथाची उपासना करते झाले. त्याला असुरांनीं आसक्तिरूप पापानें वेध केला. ज्याअर्थीं चक्षु पापानें विद्ध आहे त्याअर्थीं लोक त्यानें दोन्ही पाहतात. दर्शनीय व अदर्शनीय.४.

अथ ह श्रोत्रमुद्गीथमुपासांचक्रिरे तद्वासुराः पाप्मना विविधुस्तस्मात्तेनोभय ꣳ शृणोति श्रवणीयं चाश्रवणीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ५

अन्वयार्थ- [अथ ह श्रोत्रं०—] त्यानंतर देव श्रोत्रदृष्ट्या उद्गीथाची उपासना करते झाले त्याला असुरांनी पापानें वेध केला ज्याअर्थीं श्रोत्र पापानें विद्ध आहे त्याअर्थीं लोक श्रोत्रानें दोन्ही ऐकतात. श्रवणीय व अश्रवणीय. ५.

अथ ह मन उद्गीथमुपासांचक्रिरे तद्वासुराः पाप्मनाविविधुस्तस्मात्तेनोभय ꣳ संकल्पयते संकल्पनीयं चासंकल्पनीयं च पाप्मना ह्येतद्विद्धम् ॥६

अन्वयार्थ—[अथ ह मनः—] त्यानंतर देव मनाच्या दृष्टीनें उद्गीथाची उपासना करते झाले. (वागादिकांना उद्गाते या रूपानें वरते झाले, असें येथें सर्वत्र जाणावें) पण त्याला असुरांनी पापाचा वेध केला. ज्याअर्थीं मन पापानें विद्ध आहे त्याअर्थीं लोक त्यानें दोन्हीचा संकल्प करितात. संकल्पनीय व असंकल्पनीय. ६—आसुर पापानें वेध केलेला असल्यामुळें घ्राणादि देवतांचा अपवाद करून—

अथ ह य एवायं मुख्यः प्राणस्तमुद्गीथमुपासांचक्रिरे त ꣳ हासुरा ऋत्वा विदध्वꣳसुर्यथाऽश्मानमाखनमृत्वा विध्वꣳसेत ॥ ७

अन्वयार्थ—[अथ ह यः एव अयं०—] नंतर हा जो मुख्य प्राण त्याच्या दृष्टीनें देव उद्गीथाची उपासना करते झाले [तं ह ऋत्वा असुराः—] त्या प्राणाला प्राप्त होऊन असुर [विदध्वंसुः—] विध्वंस पावले. (ते कसे?) [यथा आखणं अश्मानं ऋत्वा विध्वंसेत—] ज्याप्रमाणें फोडतां न येण्यासारख्या अति कठिण पाषाणास प्राप्त होऊन मातीचें ढेंकूळ विनाश पावतें त्याप्रमाणें. ७.

एवं यथाऽश्मानमाखणमृत्वा विध्वꣳसत एवꣳहैव स विध्वꣳसते य एवंविदि पापं कामयते यश्चैनमभिदासति स एषोऽश्माखणः ॥ ८

अन्वयार्थ—[एवं यथा आखणं अश्मानं ऋत्वा विध्वंसते—] याचप्रमाणें 'आखण'—फोडण्यास अशक्य अशा पाषाणास प्राप्त होऊन मातीचें ढेंकूळ जसें विनाश पावतें [एवं ह एव०] त्याप्रमाणेंच तो विनाश पावतो. [यः एवंविदि

पापं कामयते–] जो अशा प्रकारच्या प्राणाला जाणणाऱ्या–प्राणोपासकाला उद्देशून अयोग्य वर्तन–पाप करितो, त्याच्याशी अयोग्य वर्तन करण्याची इच्छा करतो, [यः च एनं अभिदासति–] आणि जो त्या प्राणोपासकाला शिव्या-गाळी देतो व ताडन करतो (ते दोघेहि विनाश पावतात) कारण [सः एषः–] तो हा प्राणोपासक [अश्मा आखणः–] न फोडण्यासारखा जणुं काय पाषाण च आहे. ८.–ज्याअर्थी मुख्य प्राण असुरांकडून विद्ध झाला नाहीं, त्याअर्थी–

नैवैतेन सुरभि न दुर्गन्धि विजानात्यपहतपाप्मा ह्येष तेन यदश्नाति यत्पिबति तेनेतरान्प्राणानवति । एतमु एवान्ततोऽविच्योत्क्रामति व्याददात्येवान्तत इति ॥ ९

अन्वयार्थ—[एतेन–] लोक या मुख्य प्राणाच्या योगानें [न एव सुरभि न दुर्गन्धि विजानाति–] सुरभि–सुगंध जाणत नाही व दुर्गंध जाणत नाहीं. [एषः हि अपहतपाप्मा–] हा अपहतपाप्मा–निष्पाप आहे यास्तव लोक [तेन–] त्या मुख्य प्राणानें [यत् अश्नाति यत् पिबति–] जें खातो व जें पितो [तेन–] त्या खाण्यानें व पिण्यानें [इतरान् प्राणान्–] इतर घ्राणादि प्राणांस [अवति–] पाळतो. [एतं उ एव अन्ततो अविच्त्वा–] या मुख्य प्राणासच–त्याच्या वृत्तींस–अन्नपानांस मरणकालीं न प्राप्त होऊन इतर प्राणांचा समुदाय शरीराला सोडून जातो. म्हणूनच [अन्तत –] मरणसमयीं [व्याददाति एव–] मुख-विदारणच करतो. ९.

तꣳ हाङ्गिरा उद्गीथमुपासांचक्र एतमु एवाऽऽङ्गिरसं मन्यन्तेऽङ्गानां यद्रसः ॥ १०

अन्वयार्थ—[तं ह अंगिराः०–] अंगिरा या नांवाचा ऋषि त्या प्राणास –प्राणदृष्ट्या उद्गीथाची उपासना करता झाला. [यत् अंगानां रसः तेन एतं उ एव आंगिरसं मन्यन्ते–] ज्याअर्थी तो प्राण अंगांचा रस आहे त्याअर्थी या प्राणालाच आंगिरस असें मानतात. १०.

तेन तꣳ ह बृहस्पतिरुद्गीथमुपासांचक्र एतमु एव बृहस्पतिं मन्यन्ते वाग्घि बृहती तस्या एष पतिः ॥ ११

तेन तꣳ हाऽऽस्यास्य उद्गीथमुपासांचक्र एतमु एवाऽऽस्यास्यं मन्यन्त आस्याद्यदयते ॥ १२

अन्वयार्थ—[तेन तं ह०—] त्या कारणानें बृहस्पतिऋषि त्या बृहस्पतिसंज्ञक प्राणाची—उद्गीथाची उपासना करिता झाला. [एतं उ एव०—] या प्राणालाच बृहस्पति मानतात. [हि—] कारण [वाक् बृहती—] वाक् बृहती आहे. [तस्याः एषः पतिः—] तिचा हा पति. ११. [तेन—] त्या कारणानें [आयास्यः तं ह उद्गीथं उपासांचक्रे—] आयास्यऋषि आयास्यसंज्ञक प्राणाच्या दृष्टीनें उद्गीथाची उपासना करता झाला. [एतमु०—] यालाच आयास्य मानतात. [यत्—]कारण हा [आस्यात्—] मुखापासून [अयते—] बाहेर पडतो. १२.—केवल आंगिरसादिकांनींच नव्हे तर—

तेन तꣳह बको दाल्भ्यो विदांचकार । स ह नैमिशीयानामुद्गाता बभूव स ह स्मैभ्यः कामानागायति ॥ १३

अन्वयार्थ—[तेन—] त्या कारणानें [तं—] त्या प्राणाला [बकः दाल्भ्यः—] बक या नांवाचा दल्भ्याचें अपत्य—दाल्भ्य [विदांचकार—] उपासना करता झाला. [सः ह नैमिशी०—] तो नैमिशारण्यांतील सत्र करणारांचा उद्गाता झाला. [सः ह स्म एभ्यः०—] तो प्राणविज्ञानसामर्थ्यामुळें नैमिशीयांच्या कामांचें आगान करता झाला. तसाच दुसराहि उद्गाता यजमानाचे काम संपादनकरूं शकतो. १३.

आगाता ह वै कामानां भवति य एतदेवं विद्वानक्षरमुद्गीथमुपास्त इत्यध्यात्मम् ॥ १४

इति प्रथमाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—[आगाता०—] तो कामांचें आगान—संपादन करणारा होतो. (तो कोण ?) [यः एतत् एवं विद्वान्०—] जो असें जाणणारा वर सांगितलेल्या आंगिरसादि गुणांनी विशिष्ट अशा प्राणास—उद्गीथसंज्ञक ' ओं ' या अक्षरास उपासितो—त्याची उपासना करितो तो. असें हें अध्यात्म—आत्मविषयक उद्गीथोपासन आहे. १४. (२).

अथाधिदैवतं य एवासौ तपति तमुद्गीथमुपासीतोद्यन्वा एष प्रजाभ्य उद्गायति । उद्यꣳस्तमोभयमपहन्त्यपहन्ता ह वै भयस्य तमसो भवति य एवं वेद ॥ १

अन्वयार्थ—[अथ–] त्यानंतर–आतां [अधिदैवतं–] देवताविषय उद्गीथोपासन–[यः एव असौ तपति–] जो हा तापतो [तं उद्गीथं उपासीत–] त्याच्या दृष्टीनें उद्गीथाची उपासना करावी. [उद्यन् वै एषः–] वर जाणारा असाच हा आदित्य [प्रजाभ्यः–] प्रजांकरितां [उद्गायति–] उद्गान करतो. [उद्यन्–] तसाच उदय पावणारा [तमोभयं अपहन्ति–] रात्रीचा अंधकार व त्यामुळें प्रजांना वाटणारें भय यांचा नाश करतो. [यः एवं वेद–] जो एवंगुणविशिष्ट सवित्याला जाणतो–त्याची उपासना करतो तो [अपहन्ता वै भयस्य तमसो भवति–] संसारभय व त्याचें कारण अविद्याख्य तम यांचा नाश करणारा होतो. १. (अध्यात्म व अधिदैव या स्थानभेदामुळें प्राण व आदित्य हे भिन्न असल्याप्रमाणें जरी दिसले तरी त्यांचें तत्त्व अभिन्न आहे. त्यांचा तत्त्वतः भेद नाहीं. तो कसा ? उत्तर–)

समान उ एवायं चासौ चोष्णोऽयमुष्णोऽसौ स्वर इतीममाचक्षते स्वर इति प्रत्यास्वर इत्यमुं तस्माद्वा एतमिममुं चोद्गीथमुपासीत २

अन्वयार्थ—[अयं च असौ च समानः उ एव–] हा प्राण आदित्याशीं समानच आहे व आदित्य प्राणाशीं गुणतः तुल्य आहे. [अयं उष्णः असौ उष्णः–] कारण हा प्राण उष्ण आहे व आदित्य उष्ण आहे. [इमं स्वरः इति आचक्षते–] या प्राणाला स्वर असें म्हणतात व [अमुं स्वरः इति प्रत्यास्वरः इति–] त्या आदित्याला स्वर असें व प्रत्यास्वर असें म्हणतात. [तस्मात् एतं इमं अमुं च उद्गीथं उपासीत–] यास्तव या प्राणाच्या व त्या आदित्याच्या रूपानें उद्गीथाची उपासना करावी. (प्राण नुस्ता जातोच. शरीर सोडून गेलेला तो पुनः त्या शरीरांत परत येत नाहीं. म्हणून तो स्वर व आदित्य प्रत्यहीं अस्त पावून दुसऱ्या दिवशीं उदय पावतो. म्हणून तो स्वर व प्रत्यास्वर.) २

–आतां दुसऱ्या प्रकारें उद्गीथोपासन—

अथ खलु व्यानमेवोद्गीथमुपासीत यद्वै प्राणिति स प्राणो यदपानिति सोऽपानः । अथ यः प्राणापानयोः संधिः स व्यानो यो व्यानः सा वाक् । तस्मादप्राणन्नपानन्वाचमभिव्याहरति ॥ ३

अन्वयार्थ—[अथ खलु–] त्यानंतर दुसऱ्या प्रकारें अध्यात्म उपासन सांगितलें जातें–[व्यानमेव उद्गीथं उपासीत–] व्यानाच्याच दृष्टीनें उद्गीथाची

उपासना करावी. [यत् वै प्राणिति–] पुरुष तोंड व नाक यांच्या द्वारा ज्या वायूला बाहेर सोडतो [सः प्राणः–] तो प्राण; [यत् अपानिति–] मुख व नासिका यांच्या द्वाराच तो ज्या वायूला आंत ओढून घेतो [सः अपानः–] तो अपान. [अथ यः प्राणापानयोः संधिः–] आतां प्राण व अपान यांचा जो संधि [सः व्यानः–] तो व्यान [यः व्यानः सा वाक्–] जो व्यान ती वाक् [तस्मात् अप्राणन् अनपानन् वाचं अभिव्याहरति–] तस्मात् पुरुष प्राणाचा व अपानाचा व्यापार न करितां शब्दाचा उच्चार करतो. ३.

या वाक्सर्क्तस्मादप्राणन्ननपानन्नृचमभिव्याहरति
यर्क्तत्साम तस्मादप्राणन्ननपानन्साम गायति
यत्साम स उद्गीथस्तस्मादप्राणन्ननपानन्नुद्गायति ॥ ४

अन्वयार्थ—[या वाक्–] जी वाक् [सा ऋक्–] ती ऋक् [तस्मात्०–] म्हणून प्राणव्यापार व अपानव्यापार न करितां पुरुष ऋक् उच्चारतो. [या ऋक्०–] जी ऋक् तें साम [तस्मात्०–] म्हणून प्राणापानांचा व्यापार न करितां पुरुष साम गातो. [यत् साम०–] जें साम तो उद्गीथ. [तस्मात्०–] म्हणून प्राणापानांचा व्यापार न करितां पुरुष उद्गान–उद्गात्याचें कर्म करितो. ४. –पुरुष व्यानाच्या योगानें केवल वागादि-उच्चारणच करतो असें नाही, तर—

अतो यान्यन्यानि वीर्यवन्ति कर्माणि यथाऽग्नेर्म-
न्थनमाजेः सरणं दृढस्य धनुष आयमनमप्राणन्ननपान-
स्तानि करोत्येतस्य हेतोर्व्यानमेवोद्गीथमुपासीत ॥ ५

अन्वयार्थ—[अतः–] याहून [अन्यानि०–] दुसरीं जीं वीर्ययुक्त कर्में [यथा अग्नेः मंथनं–] जसें अग्नीचें अरणीतून मंथन करणें–अरणीचें मंथन करून अग्नीला उत्पन्न करणें, [आजेः सरणं–] ठरलेल्या मर्यादेपर्यंत धावणें, [दृढस्य धनुषः आयमनं–]दृढ धनुष्याचें आकर्षण इत्यादि वीर्ययुक्त कर्में तीं मनुष्य [अप्राणन्०–] प्राणापानांचे व्यापार न करितां–ते बंद ठेवून करतो. ('अतः'–त्यामुळें–प्राणादिकांहून व्यान विशिष्ट असल्यामुळें,) [एतस्य हेतोः–] या हेतूस्तव [व्यानं एव उद्गीथं उपासीत–] व्यानदृष्ट्याच उद्गीथाची उपासना करावी. ५.–उद्गीथोपासनप्रसंगानें उद्गीथाच्या अक्षरांच्या उपासनेचा प्रस्ताव–

अथ खलूद्गीथाक्षराण्युपासीतोद्गीथ इति प्राण एवोत्प्राणेन ह्युत्तिष्ठति वाग्गीर्वाचो ह गिर इत्याचक्षतेऽन्नं थमन्ने हीदꣳसर्वꣳस्थितम्

अन्वयार्थ—[अथ खलु०—] त्यानंतर खरोखर उद्गीथाक्षरांची उपासना करावी. ' उद्-गी-थ ' या अक्षरांची. ' प्राणच उत् ' आहे [हि०—] कारण सर्व प्राणानेंच वर उठतो. ' वाक्-च गी ' आहे. कारण वाक्-लाच ' गिरः ' असें ह्मणतात. ' अन्न ' हें ' थ ' आहे. कारण अन्नांतच हें सर्व स्थित आहे.६. —वर प्राण, वाक् व अन्न आणि उत्, गी व थ यांचें सामान्य सांगितलें, आतां त्याच्याच अनुसार इतरांचेंहि सामान्य जाणावें—

द्यौरेवोदन्तरिक्षं गीः पृथिवी थमादित्य एवोद्वायुर्गीरग्निस्थ सामवेद एवोद्यजुर्वेदो गीर्ऋग्वेदस्थं दुग्धेऽस्मै वाग्दोहं यो वाचो दोहोऽन्नवानन्नादो भवति य एतान्येव विद्वानुद्गीथाक्षराण्युपास्त उद्गीथ इति ॥ ७

अन्वयार्थ—द्युलोक—स्वर्ग हेंच ' उत् ' अन्तरिक्ष हें ' गीः ' व पृथिवी ' थं ' आदित्यच ' उत् ' वायु ' गीः ' अग्नि ' थं ' सामवेदच ' उत् ' यजुर्वेद ' गीः ' व ऋग्वेद ' थ ' वाक् त्या साधकाला फल देते. जो वाणीचा दोह—ऋग्वेदादिशब्दसाध्य फल, तें वाक् देते. [यः एवं०—] जो अशीं हीं अक्षरें जाणणारा ' उद्-गी-थ ' अशी उद्गीथाक्षरें उपासतो तो अन्नवान् व अन्नाद—दीप्ताग्नि होतो. ७

अथ खल्वाशीःसमृद्धिरुपसरणानीत्युपासीत येन साम्ना स्तोष्यन्स्यात्तत्सामोपधावेत् ॥ ८

अन्वयार्थ—[अथ खलु—] आतां [आशीःसमृद्धिः—] कामाची—फलाची समृद्धि कशी होईल तें सांगितलें जातें, असा येथें वाक्यशेष लावावा. [उपसरणानि उपासीत—] उपसरणें ह्म० उपसर्तव्यें, उपगंतव्यें, ध्येयें, असा भावार्थ. त्यांचें उपासन करावें. तें कसें बरें उपासन करावें ? [इति—] असें त्यांचें उपासन करावें—तें कसें उपासावें तें श्रुति सांगते—[येन०—] ज्या विशेष सामानें [स्तोष्यन्०—] उद्गाता स्तुति करीत असेल [तत्साम उपधावेत्—] त्या सामाचें उपसरण करावें. त्याचें उत्पत्त्यादिकांनीं चिंतन करावें. ८.

यस्यामृचि तामृचं यदार्षेयं तमृषिं यां देव-
तामभिष्टोष्यन्स्यात्तां देवतामुपधावेत् ॥ ९

अन्वयार्थ—[यस्यां ऋचि–] ज्या ऋचेमध्यें तें साम असेल [तां ऋचं–] त्या ऋचेचें [उपधावेत्–] चिंतन करावें [यदार्षेयं तं ऋषिं–] त्या सामाचा जो ऋषि असेल त्या ऋषीचें ध्यान करावें. [यां देवतां अभिष्टोष्यन् स्यात्–] ज्या देवतेची अभिस्तुति करीत असेल [तां देवतां उपधावेत्–] त्या देवतेचें चिंतन करावें. ९.

येन छन्दसा स्तोष्यन्स्यात्तच्छन्द उपधावेद्येन
स्तोमेन स्तोष्यमाणः स्यात्तꣳस्तोममुपधावेत् ॥ १०

अन्वयार्थ—ज्या छन्दानें स्तुति करीत असेल त्या छन्दाचें ध्यान करावें. ज्या स्तोमानें स्तुति करीत असेल त्या स्तोमाचें चिंतन करावें. १०.

यां दिशमभिष्टोष्यन्स्यात्तां दिशमुपधावेत् ॥ ११

अन्वयार्थ—ज्या दिशेची स्तुति करणार असेल त्या दिशेचें चिंतन करावें. ११

आत्मानमन्त उपसृत्य स्तुवीत कामं ध्यायन्न-
प्रमत्तोऽभ्याशो ह यदस्मै स कामः समृध्येत
यत्कामः स्तुवीतेति यत्कामः स्तुवीतेति ॥१२

इति प्रथमाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—[अन्ते–] शेवटीं [आत्मानं०–] आपल्या रूपाचें गोत्र-वर्ण-आश्रम इत्यादिकांसह चिंतन करून उद्गात्यानें स्तुति करावी. [कामं०–] फलाचें चिंतन करीत व स्वरोच्चारादिकांमध्यें प्रमाद न करतां स्तुति करावी. [यत्कामः स्तुवीत०–] ज्या फलेच्छेनें युक्त होऊन उद्गाता स्तुति करील [अस्मै सः कामः अभ्याशः ह यत् समृध्येत–] त्याला तो काम सत्वर समृद्ध होईल.

ॐमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीतोमिति ह्युद्गायति तस्योपव्याख्यानम्॥१

अर्थ—(श्रुति प्रासंगिक उपासना सोडून प्रकृत विषयाचें अनुसंधान करते–) ॐ अशा या उद्गीथाख्य अक्षराची उपासना करावी. 'ओं' असा आरंभ करूनच उद्गाता उद्गान करतो. त्याचें उपव्याख्यान केलें जातें. १

**देवा वै मृत्योर्बिभ्यतस्त्रयीं विद्यां प्राविशꣳस्ते छन्दोभि-
रच्छादयन्यदेभिरच्छादयꣳस्तच्छन्दसां छन्दस्त्वम् ॥२**

अन्वयार्थ—[मृत्योः बिभ्यतः देवाः वै–] मृत्यूला भिणारे प्रसिद्ध देव [त्रयीं विद्यां प्राविशन्–]त्रयी विद्येमध्यें प्रवेश करते झाले. [ते छन्दोभिः अच्छादयन्–] ते छंदांनीं आपल्याला आच्छादित करते झाले. [यत्–] ज्याअर्थीं त्यांनीं [एभिः–] मंत्रांनीं [अच्छादयन्–] आपल्याला आच्छादित केलें [तत्–] त्या कारणानें [छन्दसां छन्दस्त्वं–] मंत्रांना छन्दस्त्व आहे. २.—पण त्यामुळें कर्मानुष्ठान करणाऱ्या देवांची मृत्युवश्यता निवृत्त झाली नाहीं, असें सांगतात—

**तानु तत्र मृत्युर्यथा मत्स्यमुदके परिपश्येदेवं पर्यपश्यदृचि साम्नि
यजुषि । ते नु विज्ञोर्ध्वा ऋचः साम्नो यजुषः स्वरमेव प्राविशन् ॥३**

अन्वयार्थ—[तान् उ–] त्यांनाहि [तत्र–] वैदिक कर्माला आरंभ केला असतां [ऋचि साम्नि यजुषि–] ऋक्संबंधी, सामसंबंधी व यजुःसंबंधी कर्मामध्यें [मृत्युः पर्यपश्यत्–] मृत्यु सर्वतः पाहता झाला. [यथा मत्स्यं उदके परिपश्येत् एवं–] ज्याप्रमाणें कोळी माशाला उदकांत सर्वतः पाहतो त्याप्रमाणें. [ते नु देवाः–] तेव्हां ते देव [विज्ञा–] मृत्यूचा आशय जाणून [ऋचः साम्नः यजुषः ऊर्ध्वाः–] ऋक्-यजुः-सामसंबंधी कर्मापासून व्यावृत्त होऊन [स्वरं–] स्वरामध्यें [प्राविशन् एव–] प्रविष्ट झाले. तें कर्म सोडून ओंकारोपासना करूं लागले. (गळ पाण्यांत टाकणें, या उपायानें हा आपल्याला मिळेल, असें समजणारा मत्स्यघातक कोळी मत्स्याला अतिशय गंभीर नसलेल्या पाण्यांत जसें पाहतो त्याप्रमाणें देवांनीं वैदिक कर्माला आरंभ केला असतां त्यांत निमग्न होऊन गेलेल्या देवांस मृत्यु सर्वतः पाहता झाला. ऋग्यजुःसामसंबंधी कर्ममध्यें त्यानें त्यांना पाहिलें. कर्माचा क्षय होणें, या उपायानें देव आपल्याला साध्य होण्यासारखे आहेत, असें तो समजला. कर्म कृतक असल्यामुळें तें फलतः व स्वरूपतःहि क्षय पावणारें आहे, असा याचा भावार्थ. वैदिककर्मानें शुद्धचित्त झालेल्या देवांना मृत्यूचा तो आशय कळला. त्याबरोबर ते ऋगादिसंबंधी कर्मांपासून निवृत्त झाले. कारण कर्माच्या योगानें मृत्यूचें भय टळेल, ही आशा त्यांना राहिली नाहीं. त्यांनीं अमृत व अभय या गुणांनीं युक्त अस-

लेल्या 'स्वर-'संज्ञक अक्षरांत प्रवेश केला. ते कर्म सोडून ओंकारोपासनेंतच तत्पर झाले, असा याचा भावार्थ.)३. 'ॐ' या अक्षराला स्वर ह्मणण्याचें कारण—

यदा वा ऋचमाप्नोत्योमित्येवातिस्वरत्येवꣳसामैवं यजुरेष उ स्वरो यदेतदक्षरमेतदमृतमभयं तत्प्रविश्य देवा अमृता अभया अभवन् ॥

अन्वयार्थ—[यदा वै—] जेव्हां [ऋचं आप्नोति—] अध्ययनानें ऋचेला स्वाधीन करून घेतो तेव्हां [ओं इत्येव अतिस्वरति—] ओं असेंच मोठ्या आदरानें उच्चारण करतो. [एवं साम एवं यजुः—] असेंच साम व तसेंच यजु [एषः उ स्वरः—] हा इतर स्वरांप्रमाणें स्वर आहे. (हा कोण ?) [यदेतदक्षरं—] जें हें अक्षर [एतदमृतं अभयं—] हें अमृत व अभय आहे. [तत् प्रविश्य देवाः अमृताः अभयाः अभवन्—] त्यांत प्रवेश करून—ब्रह्मबुद्धीनें त्याचें ध्यान करून देव उपास्य गुणाच्या अनुसार अमृत व अभय झाले. ४. —केवल देवच अभय व अमृत होतात, असें नाही तर—

स य एतदेवं विद्वानक्षरं प्रणौत्येतदेवाक्षरꣳ स्वरममृतमभयं प्राविशति तत्प्रविश्य यदमृता देवास्तदमृतो भवति ॥५

इति प्रथमाध्यायस्य चतुर्थः खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—[सः यः—] तो जो कोणी दुसराहि देवाप्रमाणेंच [एवं—]अमृत-अभयगुणविशिष्ट अक्षरास [विद्वान्—] जाणणारा त्याची [प्रणौति—] उपासनारूप स्तुति करतो [एतदेवाक्षरं०—] तो याच अमृत अभय अक्षरांत—स्वरांत [प्राविशति—] प्रवेश करतो. [तत्प्रविश्य०—] त्यांत प्रवेश करून देव ज्या अमृतत्वानें युक्त—अमृत झाले [तदमृतः भवति—] त्या अमृतानें युक्त होतो. ५(४)

—प्राण-आदित्यदृष्टिविशिष्ट उपासना सांगितली. तिचा अनुवाद करून प्रणव व उद्गीथ यांचें एकत्व करून त्याच्या ठिकाणीं प्राण-रश्मिभेदगुणविशिष्टदृष्टीनें अक्षराचें अनेक पुत्र हें फल देणारें उपासन सांगावें, म्हणून आरंभ केला जातो—

अथ खलु य उद्गीथः स प्रणवो यः प्रणवः स उद्गीथ इत्यसौ वा आदित्य उद्गीथ एष प्रणव ॐमिति ह्येष स्वरन्नेति ॥ १

अन्वयार्थ—[अथ—] त्यानंतर [खलु—] खरोखर, [यः उद्गीथः०—] जो उद्गीथ तो प्रणव. जो प्रणव तो उद्गीथ [असौ वा आदित्यः०—] हाच आदित्य

उद्गीथ, हाच प्रणव. [ॐ इति हि एषः स्वरन् एति–] ओं असें हें अक्षर ज्याअर्थी हा उच्चार करीत जातो त्याअर्थी सविता उद्गीथ आहे. १

एतमु एवाहमभ्यगासिषं तस्मान्मम त्वमेकोऽसीति ह कौषीतकिः पुत्रमुवाच रश्मींस्त्वं पर्यावर्तयाद्बहवो वै ते भविष्यन्तीत्यधिदैवतम् २

अन्वयार्थ—[एतं उ–] यालाच [अहं–] मी [अभ्यगासिषं–] अभिमुख होऊन गान केलें आहे. त्याचें मी अभेदानें ध्यान केलें. [तस्मात्०–] त्यामुळें तूं मला एकच पुत्र आहेस, [इति ह कौषीतकिः०–] असें कोषीतकि आपल्या पुत्रास म्हणाला. [रश्मींस्त्वं०–] यास्तव तूं किरण व आदित्य यांचें भेदानें उपासन कर. [बहवो वै०–] म्हणजे तुला पुष्कळ पुत्र होतील, [इति अधिदैवतं–] असें देवताविषय दर्शन आहे. सु. ब्र. ४२९ पहा. २

अथाध्यात्मं य एवायं मुख्यः प्राणस्तमुद्गीथमुपासीतोमिति ह्येष स्वरन्नेति॥

अन्वयार्थ—[अथ–] त्यानंतर आतां अध्यात्म उपासन–[यः एवायं०–] हा जो मुख्य प्राण त्याच्या दृष्टीनें उद्गीथाची उपासना करावी. कारण हा प्राणहि 'ओं' अशीच वागादिकांना प्रवृत्तीची अनुज्ञाचशी देत जातो. ३

एतमु एवाहमभ्यगासिषं तस्मान्मम त्वमेकोऽसीति ह कौषीतकिः पुत्रमुवाच प्राणांस्त्वं भूमानमभिगायताद्बहवो वै मे भविष्यन्तीति४

अन्वयार्थ—यालाच मी अभिमुख होऊन गान केलें, ह्मणून तूं मला एक पुत्र आहेस, असें कौषीतकि पुत्रास ह्मणाला. तूं प्राणांस [भूमानं–] बहुत्वयुक्त–अशा भेदगुणविशिष्ट उद्गीथास उद्देशून [बहवः वै मे०–] मला बहुत पुत्र होतील, अशा अभिप्रायानें त्याचें अभिगान कर.४–प्रणव व उद्गीथ यांच्या एकत्वदर्शनाचें फल—

अथ खलु य उद्गीथः स प्रणवो य प्रणवः स उद्गीथ इति होतृषदनाद्वैवापि दुरुद्गीतमनुसमाहरतीत्यनुसमाहरतीति ॥ ५

इति प्रथमाध्यायस्य पञ्चमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[अथ खलु–] त्यानंतर खरोखर [यः उद्गीथः०–] जो उद्गीथ तो प्रणव जो प्रणव तो उद्गीथ होय, असें जाणतो (प्रणव व उद्गीथ यांच्या या एकत्वदर्शनाचें फल–) तो [होतृषदनात्०–] होत्याच्या हौत्रकर्मापासून

उद्गात्यानें आपल्या कर्मांत केलेल्या क्षतांचेंहि [अनुसमाहरति ह एव–] अनुसंधान करतो. त्याच्या दोषांचें निवारण करतो. सु. ब्र.पृ. ३८४ पहा. ५(५)

–पुत्रादि ऐश्वर्यैकदेशविषयक उपासन सांगून समग्र ऐश्वर्य हें फल प्राप्त व्हावें, म्हणून उद्गीथाच्याच दुसऱ्या उपासनेचें विधान–

इयमेवर्गग्निः साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्यध्यूढꣳसाम गीयत इयमेव साऽग्निरमस्तत्साम ॥ १

अन्वयार्थ––[इयं एव ऋक्–] ही पृथिवीच ऋक् [अग्निः साम–] अग्नि साम आहे. [तदेतत् साम एतस्यां ऋचि अध्यूढं–] तें हें अग्न्याख्य साम या ऋक्-मध्यें अध्यूढं–अधिगत–उपरिभावानें स्थित आहे. [तस्मात्–] ह्मणून [ऋचि अध्यूढं साम गीयते–] ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलेंच साम आतांहि गायलें जातें. [इयं एव सा०–] ही पृथिवीच ' सा ' व अग्नि ' अम ' असें तें पृथिवी-अग्नि-रूप साम आहे. १

अन्तरिक्षमेवर्ग्वायुःसाम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳ साम तस्मादृच्यध्यूढꣳसाम गीयतेऽन्तरिक्षमेव सा वायुरमस्तत्साम ॥ २
द्यौरेवर्गादित्यः साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्यध्यूढꣳसाम गीयते द्यौरेव साऽऽदित्योऽमस्तत्साम ॥ ३

अन्वयार्थ––अन्तरिक्षच ऋक् व वायु साम आहे. तें हें वायुसंज्ञक साम ऋक्मध्यें उपरिभावानें स्थित आहे. म्हणून आतांहि ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें साम सामगांकडून गायलें जातें. अन्तरिक्षच ' सा ' व वायु ' अम 'असें तें अन्तरिक्ष-वायुरूप साम आहे. २ द्युलोक हीच ऋक् व आदित्य साम आहे. तें हें आदित्याख्य साम ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. म्हणून ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें साम गायलें जातें. द्युलोकच ' सा ' व आदित्य ' अम ' असें तें द्यु-आदित्यरूप साम आहे. ३

नक्षत्राण्येवर्क्चन्द्रमाः साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳ साम तस्मादृच्यध्यूढꣳ साम गीयते नक्षत्राण्येव सा चन्द्रमा अमस्तत्साम ॥४

अन्वयार्थ—नक्षत्रेंच ऋक् व चन्द्रमा साम. तें हें चंद्रसंज्ञक साम या ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. म्हणून ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें साम गायलें जातें. नक्षत्रेंच 'सा' आहे व चंद्रमा 'अम' असें तें साम आहे. ४

अथ यदेतदादित्यस्य शुक्लं भाः सैवर्गथ यन्नीलं परः कृष्णं तत्साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्यध्यूढꣳ साम गीयते ॥ ५

अन्वयार्थ—[अथ आदित्यस्य–] आतां मंडलात्मक आदित्याचें [यत् एतत् शुक्लं–] जें हें शुक्लरूप [भाः–] दीप्ति दिसते तिची दृष्टि ऋक्-मध्यें करावी. [अथ यन्नीलं–] नंतर, जें नील रूप [परः कृष्णं–] अतिशय कृष्णत्व दिसतें. [तत्साम–] त्याची दृष्टि सामामध्यें करावी. [तदेतत्०–] तें हें नीलाख्य साम या ऋक्-मध्यें अध्यूढ आहे [तस्मात्०–] म्हणून ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें साम आतांहि गायलें जातें. ५.

अथ यदेवैतदादित्स्य शुक्लं भाः सैव साऽथ यन्नीलं परः कृष्णं तदमस्तत्सामाथ य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते हिरण्यश्मश्रुर्हिरण्यकेश आप्रणखात्सर्व एव सुवर्णः ॥ ६

अन्वयार्थ—आतां जें आदित्याचें शुक्ल रूप [भाः–] शुभ्र दीप्ति तींच 'सा' व जें नील रूप अतिशय कृष्णरूप तो 'अम' असें तें साम आहे. (अशीं अंगोपासनें सांगून झाल्यावर) आतां–[यः एषः अन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषः०–] हा जो आदित्यामध्यें हिरण्मयसा पुरुष दिसतो ज्याची श्मश्रु व केंस हिरण्मयसेच आहेत, नखाग्रांपर्यंत जो सर्व सुवर्णमयसाच आहे. ६. सु. ब्र. पृ. १. १. ७. पृ. ३१-३३, ५३, २९४, पहा.

तस्य यथा कप्यासं पुण्डरीकमेवमक्षिणी तस्योदिति नाम स एष सर्वेभ्यः पाप्मभ्य उदित उदेति ह वै सर्वेभ्यः पाप्मभ्यो य एवं वेद ७

अन्वयार्थ—[तस्य–] त्याचे [यथा कप्यासं पुंडरीकं–] माकडाच्या बसण्याच्या पृष्ठभागासारखें असलेलें जें पुंडरीक कमल [एवं अक्षिणी–] तसे दोन्ही डोळे [तस्य–] त्या एवंगुणविशिष्ट पुरुषाचें 'उत्' असें नांव आहे. [सः एषः सर्वेभ्यः पाप्मभ्यः–] तो हा सर्व पापांपासून [उदितः–] वर गेलेला आहे. [यः एवं वेद–] जो असें जाणतो [उदेति०–] तोहि सर्व पापांपासून वर जातोच.

—ज्याप्रमाणें आदित्यादिकांचें उद्गीथामध्यें संपादन करून उपासन येथें विवक्षित आहे त्याप्रमाणें त्या देवांचेंहि उद्गीथत्व विवक्षित असल्यामुळें श्रुति सांगते—

तस्यर्क्च साम च गेष्णौ तस्मादुद्गीथस्तस्मात्त्वे-
वोद्गातैतस्य हि गाता स एष ये चामुष्मात्पराञ्चो
लोकास्तेषां चेष्टे देवकामानां चेत्यधिदैवतम् ॥८

इति प्रथमाध्यायस्य षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

अन्वयार्थ—[तस्य—] त्या देवाचे [ऋक् च साम च—] ऋक् व साम हे [गेष्णौ—] बोटाचीं पेरें आहेत. कारण तो देव सर्वात्मा आहे व त्याला परापर लोकांतील कामांचें ईशितृत्व आहे. [तस्मात् उद्गीथः—] म्हणून तो उद्गीथ आणि त्यामुळेंच उद्गाता—उद्गीथ गाणारा. [एतस्य हि गाता—] कारण तो या उद्-संज्ञक देवाचा गाता—गाणारा आहे. [सः एषः०—] तो हा उन्नामक देव जे आदित्याहून ऊर्ध्वलोक आहेत त्यांचें ईशन व धारण करतो व त्यांतील देवांच्या इष्ट फलांचेंहि ईशन करतो; असें हें अधिदैवत स्वरूप आहे. ८ (६)

अथाध्यात्मं वागेवर्क्प्राणः साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम
तस्मादृच्यध्यूढꣳसाम गीयते। वागेव सा प्राणोऽमस्तत्साम ॥१

अन्वयार्थ—[अथ०—] आतां अध्यात्म उपासन सांगितलें जातें—वाक्-च ऋक्, प्राण साम. तें हें प्राणाख्य साम या ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. तस्मात् ऋक्-मध्यें उपरिभावानें स्थित असलेलें साम सामगांकडून गायलें जातें. वाक्-च ' सा ' व प्राण ' अम ' आहे, असें तें साम आहे. १

चक्षुरेवर्गात्मा साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्य-
ध्यूढꣳसाम गीयते । चक्षुरेव साऽऽत्माऽमस्तत्साम ॥ २

अन्वयार्थ—चक्षुच ऋक् आहे व त्यांतील छायात्मा साम आहे. तें हें साम ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. म्हणून ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलेंच साम गायलें जातें. चक्षुच ' सा ' व आत्मा ' अम ' आहे, असें तें साम आहे. २

श्रोत्रमेवर्म्मनः साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्य-
ध्यूढꣳसाम गीयते । श्रोत्रमेव सा मनोऽमस्तत्साम ॥ ३

अन्वयार्थ—श्रोत्रच ऋक् व मन साम आहे. तें हें साम या ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. तस्मात् ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें सामच गायलें जातें. श्रोत्रच 'सा' व मन 'अम' आहे, असें तें साम आहे. ३

अथ यदेतदक्ष्णः शुक्लं भाः सैवर्गथ यन्नीलं परः कृष्णं तत्साम तदेतदेतस्यामृच्यध्यूढꣳसाम तस्मादृच्यध्यूढꣳ साम गीयते। अथ यदेवैतदक्ष्णः शुक्लं भाः सैव साऽथ यन्नीलं परः कृष्णं तदमस्तत्साम ॥ ४

अन्वयार्थ—[अथ–] कांहीं आध्यात्मिक अंगोपासनें सांगून आतां त्यानंतर दुसऱ्या प्रकारें कांही अंगोपासनच श्रुति सांगते–[यदेतदक्ष्णः०–] जें हें नेत्राचें शुक्ल रूप–शुक्ल दीप्ति [सा एव ऋक्–] तीच ऋक् आहे. [यन्नीलं परःकृष्णं०–] जें नीलवर्ण अतिशय काळें ते साम. तें हें साम या ऋक्-मध्यें अध्यूढ आहे. म्हणून ऋक्-मध्यें अध्यूढ असलेलें सामच गायलें जातें. [अथ–०] आतां जें हें चक्षूमध्यें शुक्ल रूप–शुक्ल दीप्ति तीच 'सा' व जें नील अतिशय काष्ण्यं तें 'अम' असें हें साम आहे.४–आध्यात्मिक प्रधानोपासनेच्या अंगत्वानें अंगोपासनें सांगून आतां प्रधानोपासनेचा विषय दाखवितात—

अथ य एषोऽन्तरक्षिणि पुरुषो दृश्यते सैवर्क्तत्साम तदुक्थं तद्यजुस्तद्ब्रह्म तस्यैतस्य तदेव रूपं यदमुष्य रूपं यावमुष्य गष्णौ तौ गेष्णौ यन्नाम तन्नाम ॥ ५

अन्वयार्थ—आतां जो हा [अन्तराक्षिणि–] नेत्रामध्यें पुरुष दिसतो तीच ऋक्, तेंच साम, तेंच उक्थ, तें यजु, तें ब्रह्म. त्या या चाक्षुष पुरुषाचें तेंच रूप [यदमुष्य०–] कीं जें आदित्य पुरुषाचें रूप. [यौ अमुष्य गेष्णौ–] जीं आदित्य पुरुषाचीं पेरें तींच याची पेरें, जें त्याचें नांव तेंच याचें. (याचा सोपपत्तिक सविस्तर अर्थ भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. २९४) ५

स एष ये चैतस्मादर्वाञ्चो लोकास्तेषां चेष्टे मनुष्यकामानां चेति तद्य इमे वीणायां गायन्त्येतं ते गायन्ति तस्मात्ते धनसनयः ॥ ६

अन्वयार्थ—[सः एषः–] तो हा चाक्षुष पुरुष [ये च एतस्मात् अर्वाञ्चः लोकाः–] जे या अध्यात्म आत्म्याहून अलीकडचे लोक [तेषां चेष्टे–] त्यांचें ईशन करतो व मनुष्यांच्या इष्ट फलांचेंहि ईशन करतो–त्यांस प्राप्त होतो.

[तत्–] तस्मात् [ये इमे वीणायां गायन्ति–] जे हे वीणेवर गातात. [एतं ते गायन्ति–] ते यालाच गातात. [तस्मात् ते धनसनयः–] ईश्वरालाच गात असल्यामुळें ते धनलाभयुक्त होतात. ६.

अथ य एतदेवं विद्वान्साम गायत्युभौ स गायति सोऽमुनैव स एष ये चामुष्मात्पराञ्चो लोकास्तांश्चाऽऽप्नोति देवकामांश्च ॥ ७

अन्वयार्थ—आतां जो [एवं विद्वान्–] पूर्वोक्त देवास जाणणारा [एतत्साम०–] हें साम गातो [सः उभौ गायति–] तो आदित्य व चाक्षुष या दोघांनाहि गातो. [सः अमुना एव–] तो या आदित्य पुरुषानेंच–स्वतः आदित्यमंडलान्तर्गत पुरुष होऊनच [सः एषः–] तो हा उपासक [ये चामुष्यात्०–] जे त्याच्याहून ऊर्ध्व लोक त्यांना प्राप्त होतो व देवकामांस प्राप्त होतो. ७

अथानेनैव ये चैतस्मादर्वाञ्चो लोकास्तांश्चाऽऽप्नोति मनुष्यकामांश्च तस्मादु हैवंविदुद्गाता ब्रूयात् ॥ ८॥ कं ते काममागायानीत्येष ह्येव कामगानस्येष्टे य एवं विद्वान्साम गायति साम गायति ॥ ९

इति प्रथमाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—[अथ–] त्याचप्रमाणें [अनेन एव–] या चाक्षुष पुरुषानेंच [ये चैत०–] जे याहून अलीकडील लोक त्यांना प्राप्त होतो व मनुष्यकामांना प्राप्त होतो. [तस्मात्०–] यास्तव असें जाणणारा उद्गाता यजमानास 'मी तुझ्या कोणत्या इष्ट कामाचें आगान करूं,' असें म्हणतो–त्यानें असें विचारावें. [एष हि एव०–] कारण हा उद्गाता [कामगानस्य ईष्टे–] कामांचें आगान करण्यास समर्थ आहे. (हा कोण ?) [य एवं०–] जो असें जाणणारा सामगान करतो (तो कामाचें आगान करण्यास समर्थ आहे.) ८-९ (७)

—उद्गीथाख्य-अक्षर अनेक प्रकारें उपास्य असल्यामुळें परोवरीयस्त्वप्राप्ति हें फल देणारें परोवरीयस्त्वगुणविशिष्ट परमात्मदृष्टीनें दुसरें उद्गीथोपासन वेदानें येथें आणलें आहे. आरंभीं पूर्ववृत्तरूप आख्यायिका अनायासानें बोध होण्यासाठीं आहे–

त्रयो होद्गीथे कुशला बभूवुः शिलकः शालावत्यश्चैकितायनो दाल्भ्यः प्रवाहणो जैवलिरिति ते होचुरुद्गीथे वै कुशलाः स्मो हन्तोद्गीथे कथां वदाम इति ॥ १

अन्वयार्थ—[त्रयः ह०—] असें सांगतात कीं, तिघे उद्गीथांत कुशल होते. [शालावत्यः शिलकः—] शलावताचा पुत्र शालावत्य शिलक [चैकितायनः दाल्भ्यः—] चिकितायनाचा पुत्र दाल्भ्य व [जैवलिः प्रवाहणः—] जीवलाचा पुत्र प्रवाहण, [इति ते०—] असे ते तिघे आपापसांत म्हणाले [उद्गीथे वै कुशलाः स्मः—] 'आम्ही उद्गीथांत कुशल आहों, [हन्त०—] यास्तव तुमची जर अनुमति असेल तर आपण उद्गीथाविषयीं विचार करूं.' १.

तथेति ह समुपविविशुः स ह प्रवाहणो जैवलिरुवाच भगवन्तावग्रे वदतां ब्राह्मणयोर्वदतोर्वाचꣳ श्रोष्यामीति ॥ २

अन्वयार्थ—[तथेति०—] तेव्हां ठीक आहे, असें म्हणून ते बसले. [सः ह०—] तो प्रवाहण जैवलि म्हणाला "आपण दोघे पूज्यच अगोदर बोला. मी तुम्हां बोलणाऱ्या दोघां ब्राह्मणांची वाणी ऐकेन" २.

स ह शिलकः शालावत्यश्चैकितायनं दाल्भ्यमुवाच हन्त त्वा पृच्छानीति पृच्छेति होवाच ॥ ३

अन्वयार्थ—[सः ह०—] तेव्हां तो शिलक शालावत्य चैकितायन दाल्भ्यास म्हणाला [हन्त०—] जर तुझी अनुमति असेल तर मी तुला विचारतों. तेव्हां तो 'विचार' असें म्हणाला. ३

का साम्नो गतिरिति स्वर इति होवाच स्वरस्य का गतिरिति प्राण इति होवाच प्राणस्य का गतिरित्यन्नमिति होवाचान्नस्य का गतिरित्याप इति होवाच ॥ ४

अन्वयार्थ—[साम्नः का गतिः०—] सामाची—उद्गीथाची काय गति—आश्रय—परायण आहे? 'स्वर' असें दुसरा म्हणाला 'स्वराची काय गति आहे?' 'प्राण' असें तो म्हणाला. 'प्राणाची काय गति आहे?' 'अन्न' असें तो म्हणाला. 'अन्नाची काय गति आहे?' 'आप-' असें दाल्भ्य म्हणाला. (याची उपपत्ति भाष्यार्थांत पहा.) ४.

अपां का गतिरित्यसौ लोक इति होवाचामुष्य लोकस्य का गतिरिति न स्वर्गं लोकमतिनयेदिति होवाच स्वर्गं वयं लोकꣳसामाभिसंस्थापयामः स्वर्गसꣳस्तावꣳ हि सामेति ॥ ५

अन्वयार्थ—[अपां०—] आपांची काय गति आहे ? [असौ लोकः०—] 'तो लोक,' असें तो म्हणाला. [अमुष्य लोकस्य०—] त्या लोकाची काय गति आहे ? [न स्वर्गं०—] 'त्या स्वर्ग लोकाचें अतिक्रमण करून सामाला दुसऱ्या आश्रयास नेऊं नये,' असें तो म्हणाला. [वयं साम स्वर्गं लोकं अभिसंस्थापयामः—] आम्ही साम स्वर्गलोकांत प्रतिष्ठित आहे असें मानतों. [स्वर्गसंस्तावं हि साम इति—] कारण सामाची स्वर्गत्वानें संस्तुति केली आहे. ५

तꣳह शिलकः शालावत्यश्चैकितायनं दाल्भ्यमुवाचा-
प्रतिष्ठितं वै किल ते दाल्भ्य साम यस्त्वेतर्हि ब्रूया-
न्मूर्धा ते विपतिष्यतीति मूर्धा ते विपतेदिति ॥ ६

अन्वयार्थ—शिलक शालावत्य त्या चैकितायन दाल्भ्यास ह्मणाला, [हे दाल्भ्य, ते साम अप्रतिष्ठितं किल—] हे दाल्भ्या, तुझें साम खरोखर अप्रतिष्ठित आहे. [यः तु एतर्हि०—] जर कोणी सामवेत्ता या कालीं 'तुझा मूर्धा—मस्तक विशेषतः भूमीवर पडेल' असें ह्मणेल तर त्याप्रमाणें खरोखर तुझा शिरःपात होईल. ६

हन्ताहमेतद्भगवतो वेदानीति विद्धीति होवाचामुष्य लोकस्य
का गतिरित्ययं लोक इति होवाचास्य लोकस्य का गति-
रिति न प्रतिष्ठां लोकमतिनयेदिति होवाच प्रतिष्ठां वयं
लोकꣳसामाभिसꣳस्थापयामः प्रतिष्ठासꣳस्तावꣳहि सामेति ॥ ७

अन्वयार्थ—[हन्त०—] असें बोलला गेलेला दाल्भ्य ह्मणाला—'मी हें—सामाची प्रतिष्ठा काय आहे हें—आपल्यापासून समजून घेतों.' त्यावर 'बरें आहें [विद्धि—] समजून घे,' असें शिलक ह्मणाला. (दाल्भ्य—)'त्या लोकाची काय गति आहे ?' (शिलक—) 'हा लोक,' असें ह्मणाला. (दाल्भ्य—) 'या लोकाची गति काय आहे ?' (शिलक—) [न प्रतिष्ठां लोकं अतिनयेत्—] प्रतिष्ठाभूत अशा या लोकाचें उल्लंघन करून सामाला नेऊं नये. [वयं—] आम्ही [प्रतिष्ठां लोकं साम अभिसंस्थापयामः—] या प्रतिष्ठाभूत लोकांत सामाची सर्वप्रकारें संस्थापना करतों. ह्म० या सामाची हा भूलोकच प्रतिष्ठा आहे, असें आम्ही जाणतों [प्रतिष्ठासंस्तावं हि साम इति—] कारण साम प्रतिष्ठात्वानें संस्तुत आहे. ७.

तꣳ ह प्रवाहणो जैवलिरुवाचान्तवद्वै किल ते शालावत्य साम यस्त्वेतर्हि ब्रूयान्मूर्धा ते विपतिष्यतीति मूर्धा ते विपतेदिति हन्ताहमेतद्भगवतो वेदानीति विद्धीति होवाच ॥ ८

इति प्रथमाध्यायस्याष्टमः खण्डः ॥ ८

अन्वयार्थ—[तं०—] त्या दालभ्याला प्रवाहण जैवलि ह्मणाला, "शालावत्या [ते साम अन्तवत् वै किल—] तुझें साम खरोखर विनाशी आहे. तुझा मूर्धा पडेल असें जर कोणी यावेळीं ह्मणेल तर खरोखर तुझा मूर्धा खालीं पडेल." (शिलक—) तर मग [हन्त०—] तुझी अनुज्ञा असेल तर मी सामाची प्रतिष्ठा तुझ्यापासून समजून घेईन. (जैवलि—) बरें समजून घे, असें ह्मणाला. ८.(८)

अस्य लोकस्य का गतिरित्याकाश इति होवाच सर्वाणि ह वा इमानि भूतान्याकाशादेव समुत्पद्यन्त आकाशं प्रत्यस्तं यन्त्याकाशो ह्येवैभ्यो ज्यायानाकाशः परायणम् ॥ १

अन्वयार्थ—[अस्य०—] या लोकाची काय गति—परायण आहे ? (जैवलि—) 'आकाश—परमात्मा' असें ह्मणाला. 'हीं सर्व भूतें आकाशापासूनच समुत्पन्न होतात, आकाशाप्रतच अस्त पावतात, आकाशच या सर्व भूतांहून अधिक मोठा आहे. म्हणून आकाशच परायण—प्रतिष्ठा आहे.' सु. ब्र. १.१.८ पृ. ३३.१

स एष परोवरीयानुद्गीथः स एषोऽनन्तः परोवरीयो हास्य भवति परोवरीयसो ह लोकाञ्जयति य एतदेवं विद्वान्परोवरीयाꣳसमुद्गीथमुपास्ते ॥ २

अन्वयार्थ—[सः एषः०—] तो हा श्रेष्ठ व वरिष्ठ उद्गीथ तो हा अनन्त आहे. [यः एतत् एवं विद्वान्०—] जो परोवरीय अनन्त परमात्मभूत उद्गीथाला जाणणारा परोवरीय उद्गीथाला उपासितो [अस्य परोवरीयः ह भवति—] याचें अत्यंत विशिष्ट जीवन होतें, (हें दृष्ट फल व) [परोवरीयसः ह लोकान् जयति—] तो उत्तरोत्तर वरिष्ठ लोकांस जिंकतो. २—आतां विधीचा शेष अर्थवाद—

तꣳ हैतमतिधन्वा शौनक उदरशाण्डिल्यायोक्त्वोवाच यावत्त एनं प्रजायामुद्गीथं वेदिष्यन्ते परोवरीयो हैभ्यस्तावदस्मिँल्लोके जीवनं भविष्यति ॥ ३

अन्वयार्थ—[तं एतं०—] त्या या उद्गीथाला जाणणारा ' अतिधन्वा ' या नांवाचा शुनकपुत्र ' उदरशांडिल्य ' या नांवाच्या शिष्याला हें उद्गीथदर्शन सांगून म्हणाला [यावत् ते प्रजायां एनं उद्गीथं वेदिष्यन्ते—] जोंवर तुझ्या संततीमध्यें या उद्गीथाला जाणतील [तावत् अस्मिन् लोके ह एभ्यः परोवरीयः जीवनं भविष्यति—] तोंवर त्यांचें या लोकी या प्रसिद्ध लोकजीवनाहून उत्तरोत्तर विशिष्टतर जीवन होईल. ३

तथाऽमुष्मिँल्लोके लोक इति स य एतदेवं विद्वानुपास्ते परोवरीय एव हास्यास्मिँल्लोके जीवनं भवति तथामुष्मिँल्लोके लोक इति लोके लोक इति ॥ ४

इति प्रथमाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—[तथा—] येथील विशिष्टतर जीवनाप्रमाणें [अमुष्मिन् लोके—] पर लोकीं त्यांना [लोकः—] परोवरीय—श्रेष्ठांत श्रेष्ठ लोक प्राप्त होईल [यः एतत् एवं०—] जो कोणी हें याप्रमाणें जाणणारा उद्गीथाची उपासना करतो [अस्य अस्मिन् लोके परोवरीयः एव जीवनं भवति—] त्याचें या लोकीं परोवरीयच जीवन होतें. [तथा अमुष्मिन् लोके लोकः इति—] त्याचप्रमाणें परलोकीं परोवरीय लोक मिळतो. 'लोके लोक इति' ही द्विरुक्ति उद्गीथोपासनेच्या समाप्तीसाठीं आहे ४ (९)

—उद्गीथोपासनेच्या प्रसंगानें प्रस्ताव-प्रतिहारविषयक उपासनहि करावें, म्हणून या पुढील खंडाचा आरंभ केला जात आहे आख्यायिका पूर्वीप्रमाणेंच सुखावबोधार्थ आहे—

मटचीहतेषु कुरुष्वाटिक्या सह जाययोषस्तिर्ह चाक्रायण इभ्यग्रामे प्रद्राणक उवास ॥ १

अन्वयार्थ—[मटचीहतेषु कुरुषु—] कुरुदेशांतील धान्याचीं शेतें मटची म्ह० अशनि—विजा किंवा शेतांच्या नाशाला कारण होणाऱ्या पाषाणांच्या वृष्टि, त्यांच्या योगानें नाश पावलीं असतां [आटिक्या सह जाययां—] जिच्या ठिकाणीं स्तनादि स्त्रीचिह्नें उत्पन्न झालेलीं नाहींत अशा भार्येसह [उषस्तिः०—] उषस्ति या नांवाचा चक्राचा पुत्र चाक्रायण [इभ्यग्रामे—] हत्तीला योग्य अस-

लेल्या ईश्वराच्या किंवा महाताच्या गांवांत [प्रद्राणकः–] अत्यंत कुत्सित –अन्त्य अवस्थेस प्राप्त होत्साता [उवास–] राहिला होता. १

स हेभ्यं कुल्माषान्खादन्तं बिभिक्षे तꣳ होवाच । नेतो-
ऽन्ये विद्यन्ते यच्च ये म इम उपनिहिता हति ॥ २

अन्वयार्थ—[सः ह कुल्माषान् खादन्तं इभ्यं बिभिक्षे–] तो चाक्रायण कुत्सित माषांस–अर्धे शिजलेलें यवादि धान्य खात असलेल्या इभ्यापाशीं त्यांची याचना करता झाला [तं होवाच–] तेव्हां तो इभ्य त्याला ह्मणाला, [न इतः अन्ये विद्यन्ते–] यांहून निराळे–दुसरे कुल्माष नाहींत. [यच्च ये मे इमे उपनिहिताः इति–] आणि जे माझ्या पाशी होते ते हे मी या पात्रांत वाढून घेतले आहेत २

एतेषां मे देहीति होवाच तानस्मै प्रददौ हन्तानुपान-
मित्युच्छिष्टं वै मे पीतꣳस्यादिति होवाच ॥ ३

अन्वयार्थ—[एतेषां०–] तेच मला दे, असें उषस्ति बोलला. [तान् अस्मै प्रददौ–] तेव्हां इभ्यानें ते त्यास दिले, आणि [हन्त–] तूं जर कुल्माष खाल्ले आहेस तर हें [अनुपानं इति–] त्यांच्या मागून पिण्यास पाणी घे, असें तो ह्मणाला. तेव्हां उषस्ति ' [उच्छिष्टं मे वै पीतं स्यात् इति ह उवाच–] हें पाणी प्याल्यास मीं उष्टें पाणी प्यालें असें होईल,' असें ह्मणाला. ३

न स्विदेतेऽप्युच्छिष्टा इति न वा अजीविष्यमिमान-
खादन्निति होवाच कामो म उदकपानमिति ॥ ४

अन्वयार्थ—[न स्विद् एते अपि उच्छिष्टाः इति–] ' हे कुल्माषहि उच्छिष्ट नाहींत का ?' असें तो इभ्य बोलला असतां उषस्ति ह्मणाला–[न वा अजीविष्यं०–] मी हे कुल्माष जर खाल्ले नसते तर जिवंत राहिलों नसतों. [मे उदकपानं कामः इति–] मला जलपान वाटेल तितकें मिळतें, असें तो बोलला. (विद्वान् चाक्रायणानेंहि अभक्ष्यभक्षण केल्याचें दिसत असल्यामुळें या अवस्थेस ह्म० जीवितसंदेहास प्राप्त झालेल्या, विद्या व धर्म यांच्या योगानें ज्याची मोठी प्रख्याति झाली आहे व स्वात्मोपकार आणि परोपकार ह्म० निग्रह व अनुग्रह करण्यास समर्थ अशा असलेंहि निंद्य कर्म करणाऱ्या चाक्रायणाला दोषाचा स्पर्श झाला नाहीं, असा ऋषीनें ' उच्छिष्ट कुल्माष खाल्ले ' असें सांग-

णाऱ्या श्रुतीचा अभिप्राय आहे. तसच, त्याच्याहि जीवनाला दुसरा अनिंद्य उपाय असतांना हें अभक्ष्यभक्षणरूप निंद्य कर्म करणें, दोषालाच कारण होतें, मी ज्ञानी आहें, अशा गर्वानें निंद्य कर्म करणाराचा नरकांतच पात होतो, असा उच्छिष्ट उदकपानाचा निषेध करणाऱ्या श्रुतीचा अभिप्राय आहे. कारण वर 'प्रद्राणक'–अंत्यावस्थेस प्राप्त झालेला, हा शब्द योजलेला आहे. सु. ब्र. ३. ४. ७ पृ. ४०६ पहा.) ४.

स ह खादित्वाऽतिशेषाञ्जायाया आजहार साऽग्र
एव सुभिक्षा बभूव तान्प्रतिगृह्य निदधौ ॥ ५

अन्वयार्थ—[स ह०–] तो स्वतः ते कुल्माष खाऊन राहिलेले भार्येसाठीं घेऊन आला. [सा अग्रे एव०–] पूर्ण ती अगोदरच 'सुभिक्षा'–जिला चांगली भिक्षा मिळाली आहे अशी [बभूव–] झाली होती. म्हणून [तान् प्रतिगृह्य०–] त्या कुल्माषांस पतीपासून घेऊन [निदधौ–] ठेवून देती झाली. ५.

स ह प्रातः संजिहान उवाच यद्वतान्नस्य लभेमहि लभेमहि
धनमात्राꣳ राजाऽसौ यक्ष्यते स मा सर्वैरार्त्विज्यैर्वृणीतेति ॥ ६

अन्वयार्थ—[सः ह–] तो उषस्ति [प्रातः–] उषःकालीं–पहाटे [संजिहानः–] निजून उठतांच [उवाच–] ह्मणाला. [बत यत् अन्नस्य लभेमहि०–] काय करावें ? आह्मांला जर थोडें अन्न मिळेल तर थोडेसें धनहि मिळेल. [राजा०–] कारण हा राजा स्वतःकरितां यज्ञ करीत आहे [सः मा०–] तो मला सर्व ऋत्विक्-कर्मासाठीं वरील ६.

तं जायोवाच हन्त पत इम एव कुल्माषा
इति तान्खादित्वाऽमुं यज्ञं विततमेयाय ॥ ७

अन्वयार्थ—[तं०–] त्याला जाया ह्मणाली–[हन्त०–] असें जर असेल तर हे पते, हेच (कालचे) कुल्माष आहेत. [तान् खादित्वा–] ते खाऊन [अमुं विततं यज्ञं एयाय–] त्या चाललेल्या यज्ञास तो गेला. ७

तत्रोद्गातृनास्तावे स्तोष्यमाणानुपोपविवेश स ह प्रस्तोतारमुवाच ॥ ८

अन्वयार्थ—[तत्र–] तेथें जाऊन [आस्तावे स्तोष्यमाणान् उद्गातॄन्–] ज्यांत स्तुति करितात तो आस्ताव, त्यांत स्तुति करणाऱ्या उद्गात्यांच्या [उपोपविवेश–] समीप बसला. [सः ह प्रस्तोतारं उवाच–] तो प्रस्तोत्यास ह्मणाला.८

प्रस्तोतर्यो देवता प्रस्तावमन्वायत्ता तां चेद-
विद्वान्प्रस्तोष्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति ॥ ९

अन्वयार्थ—हे प्रस्तोतः, जी देवता प्रस्तावभक्तीमध्ये अनुगत आहे त्या देवतेला 'अविद्वान्'—न जाणतां जर तूं प्रस्तवन करशील तर [ते मूर्धा—] तुझा मूर्धा [विपतिष्यति—] अगदी स्पष्टपणें पडेल; असें म्हणाला. ९

एवमेवोद्गातारमुवाचोद्गातर्यो देवतोद्गीथमन्वायत्ता
तां चेदविद्वानुद्गास्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति ॥ १०
एवमेव प्रतिहर्तारमुवाच प्रतिहर्तर्यो देवता प्रतिहारमन्वा-
यत्ता तां चेदविद्वान्प्रतिहरिष्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति
ते ह समारतास्तुष्णीमासांचक्रिरे ॥ ११

इति प्रथमाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—असेंच उद्गात्यास म्हणाला. हे उद्गात्या, उद्गीथाप्रत जी देवता अन्वायत्त—अनुगत आहे तिला न जाणतां जर तूं उद्गान करशील तर-तुझा मूर्धा पडेल. १०. असेंच प्रतिहर्त्यास म्हणाला 'हे प्रतिहर्त्या, जी देवता प्रतिहाराप्रत अन्वायत्त—अनुगत आहे तिला न जाणणारा असा तूं जर प्रतिहरण करशील तर तुझा मूर्धा—शिर पडेल.' [ते ह समारताः०—] ते प्रस्तोत्रादिक कर्मापासून उपरत—शांत होत्साते देवताज्ञानाच्या इच्छेनें मुकाट्यानें बसले. ११ (१०)

अथ हैनं यजमान उवाच भगवन्तं वा अहं विवि-
दिषाणीत्युषास्तिरस्मि चाक्रायण इति होवाच ॥ १

अन्तयार्थ—[अथ—] प्रस्तोतृप्रभृति मुकाट्यानें बसले असतां त्यानंतर [ह एनं—] उषस्तीस [यजमानः०—] राजा बोलला. [भगवन्तं वै—] पूजावान्—पूज्य अशा आपणांस [अहं विविदिषाणि—] मी जाणण्याची इच्छा करतों. असें बोलला गेलेला तो 'मी उषस्ति आहें चाक्रायण, तुझ्याहि जर कानांवर आलों असेन तर (मी उषस्ति आहें.)' असें तो बोलला १.

स होवाच भगवन्तं वा अहमेभिः सर्वैरार्विज्यैः
पर्यैषिषं भगवतो वा अहमविद्यान्यानवृषि ॥ २

अन्वयार्थ—[सः ह०–] तो यजमान म्हणाला [भगवन्तं वै–] आपलाच मीं [एभिः सर्वैः आर्त्विज्यैः–] या सर्व ऋत्विक्कर्मांनीं–या सर्व कर्मांसाठीं [पर्यैषिषं–] पर्येषण–शोध केला. पण [भगवतः वै अवित्त्या–] आपला मला लाभ न झाल्यामुळें [अन्यान्–] अन्य ऋत्विजांस [अहं अवृषि–] मीं वरलें. २

भगवाꣳस्त्वेव मे सर्वैरार्त्विज्यैरिति तथेत्यथ तर्ह्येत एव समतिसृष्टाः स्तुवतां यावत्त्वेभ्यो धनं दद्यास्तावन्मम दद्या इति तथेति ह यजमान उवाच ॥ ३

अन्वयार्थ—[भगवान् तु एव–] आपणच [मे–] माझ्या [सर्वैः आर्त्विज्यैः–] सर्व ऋत्विक्-कर्मांसाठीं असावें. [इति–] असें राजाकडून बोलला गेलेला तो उषस्ति [तथा इति०–] ठीक आहे, असें म्हणाला. पण आतां तर मग [एते एव–] हेच [समतिसृष्टाः–] मी ज्यांना संतोषानें अनुज्ञा दिली आहे, असे हेच [स्तुवतां–] स्तुति करोत. [यावत् तु एभ्यः धनं दद्याः०–] पण तूं यांना जितकें धन देशील तितकें मला दे; असें तो बोलला. [तथा इति ह०–] तेव्हां ठीक आहे, असें यजमान म्हणाला. ३

अथ हैनं प्रस्तोतोपससाद प्रस्तोतर्या देवता प्रस्तावमन्वायत्ता तां चेदविद्वान्प्रस्तोष्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति मा भगवानवोचत्कतमा सा देवतेति ॥ ४

अन्वयार्थ—त्यानंतर त्या उषस्तीस प्रस्तोता उपसन्न झाला–शिष्यत्वानें त्याच्या समीप गेला. 'हे प्रस्तोत्या, प्रस्तावभक्तीप्रत जी देवता अनुगत आहे, तिला न जाणतां जर तूं प्रस्तुति करशील तर तुझा मूर्धा पडेल,' असें तूं मला पूर्वी म्हटलेंस. पण ती देवता कोणती ? असें तो बोलला ४.

प्राण इति होवाच सर्वाणि ह वा इमानि भूतानि प्राणमेवाभिसंविशन्ति प्राणमभ्युज्जिहते सैषा देवता प्रस्तावमन्वायत्ता तां चेदविद्वान्प्रास्तोष्यो मूर्धा ते व्यपतिष्यत्तथोक्तस्य मयेति॥ ५

अन्वयार्थ—असें विचारला गेलेला उषस्ति 'प्राण' असें म्हणाला. [सर्वाणि ह वा इमानि०–] हीं सर्व भूतें प्राणाला अभिलक्षित करूनच–प्राणरूपानेंच लीन होतात उत्पत्तिकालीं [प्राणं अभ्युज्जिहते–] प्राणापासूनच उद्भवतात. [सा एषा देवता०–] ती ही देवता प्रस्तावाप्रत अनुगत आहे.

त्या देवतेला न जाणतां जर तूं प्रस्तोत्याचें कर्म केलें असतेंस तर मीं 'मूर्धा पडेल' असें ह्मटलेल्या तुझा मूर्धा पडला असता. सु. ब्र.१.१.९. पृ. ३६.५.

अथ हैनमुद्गातोपससादोद्गातर्यां देवतोद्गीथमन्वा-
यत्ता तां चेदविद्वानुद्गास्यसि मूर्धा ते विपतिष्य-
तीति मा भगवानवोचत्कतमा सा देवतेति ॥ ६

अन्वयार्थ—त्यानंतर उषस्तीपाशीं उद्गाता शिष्यभावानें गेला व ह्मणाला "हे उद्गात्या, जी देवता उद्गीथांत अनुगत आहे तिला न जाणतां जर तूं उद्गान करशील तर तुझा मूर्धा पडेल," असें तूं मला ह्मणालास. यास्तव ती देवता कोणती तें मला सांग. ६.

आदित्य इति होवाच सर्वाणि ह वा इमानि भूतान्यादि-
त्यमुच्चैः सन्तं गायन्ति सैषा देवतोद्गीथमन्वायत्ता तां
चेदविद्वानुदगास्यो मूर्धा ते व्यपतिष्यत्तथोक्तस्य मयेति ॥ ७

अन्वयार्थ—[आदित्य०—] असें तो ह्मणाला. 'ही सर्व भूतें उच्च असलेल्या आदित्यास गातात. ती ही देवता उद्गीथांत अनुगत आहे. त्या देवतेला न जाणतां जर तूं उद्गान केलें असतेंस तर मीं 'तुझा मूर्धा पडेल' असें बोललेल्या तुझा मूर्धा पडला असता.' ७.

अथ हैनं प्रतिहर्तोपससाद प्रतिहर्तर्यां देवता प्रतिहारम-
न्वायत्ता तां चेदविद्वान्प्रतिहरिष्यसि मूर्धा ते विपतिष्य-
तीति मा भगवानवोचत्कतमा सा देवतेति ॥ ८

अन्वयार्थ—त्यानंतर त्याच्यापाशी प्रतिहर्ता शिष्यभावानें गेला व ह्मणाला 'हे प्रतिहर्त्या, जी देवता प्रतिहारांत अनुगत आहे तिला न जाणतां जर प्रतिहरण करशील तर तुझा मूर्धा पडेल' असें मला आपण ह्मटलेंत तर ती देवता कोणती? ८.

अन्नमिति होवाच सर्वाणि ह वा इमानि भूतान्यन्नमेव प्रतिहरमा-
णानि जीवन्ति सैषा देवता प्रतिहारमन्वायत्ता तां चेदविद्वान्प्रत्यह-
रिष्यो मूर्धा ते व्यपतिष्यत्तथोक्तस्य मयेति तथोक्तस्य मयेति ॥९

इति प्रथमाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—उषस्ति 'अन्न' असें ह्मणाला [सर्वाणि ह वै इमानि०—] हीं सर्व भूतें अन्नाचेंच आत्म्याकडे प्रतिहरण करणारीं अशीं होत्सातीं जिवंत राहतात. [सा एषा०—] ती ही देवता प्रतिहारामध्यें अनुगत आहे. [तां चेत् अविद्वान्०—] तिला न जाणणाऱ्या अशा तूं जर प्रतिहरण केलें असतेंस तर [मूर्धा ते०—] 'तुझा मूर्धा पडेल' असें मीं म्हटलेल्या तुझा मूर्धा पडला असता. ९ (११)

—पूर्व खंडांत अन्न न मिळणें, या निमित्तानें प्राप्त झालेली कष्टावस्था —पहिल्या दिवशीं इभ्याचें उच्छिष्ट खाणें व दुसऱ्या दिवशीं त्याचें व आपलेंहि उच्छिष्ट व शिळें खाणें या स्वरूपाची कष्टावस्था सांगितली. पण तशी कष्टावस्था प्राप्त होऊं नये म्हणून अन्नलाभासाठीं—

अथातः शौव उद्गीथस्तद्ध बको दाल्भ्यो
ग्लावो वा मैत्रेयः स्वाध्यायमुद्व्राज ॥ १

अन्वयार्थ—[अथ०—] त्यानंतर अन्नाचा लाभ अपेक्षित असल्यामुळें शौव उद्गीथ आरंभिला जातो. [तत्—] त्यांत [ह०—] पूर्वीं बक दाल्भ्य ग्लाव या नांवाचा मैत्रेय स्वाध्यायासाठीं [उद्व्राज—] गांवाबाहेर गेला. १.

तस्मै श्वा श्वेतः प्रादुर्बभूव तमन्ये श्वान उपस-
मेत्योचुरन्नं नो भगवानागायत्वशनायाम वा इति ॥ २

अन्वयार्थ—[तस्मै—] त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठीं [श्वेतः श्वा—] श्वेतवर्ण श्वा—कुत्रा प्रादुर्भूत झाला. [तं अन्ये०—] त्याच्या समीप दुसरे श्वान येऊन म्हणाले [भगवान् नो अन्नं आगायतु—] भगवान् आमच्यासाठीं अन्न आगानानें संपादन करो. [अशनायाम वै—] आम्ही बुभुक्षित—क्षुधित आहों [इति—] असें ह्मणाले. २.—त्या क्षुद्र श्वानांनीं असें ह्मटलें असतां—

तान्होवाचेहैव मा प्रातरुपसमीयातेति तद्ध बको
दाल्भ्यो ग्लावो वा मैत्रेयः प्रतिपालयांचकार ॥ ३

अन्वयार्थ—[तान्०—] त्या क्षुद्र श्वानास शुक्ल श्वान ह्मणाला—[इह एव मा प्रातः उपसमीयात इति—] प्रातःकालीं याच प्रदेशीं मजपाशीं तुम्ही या.

[तत् ह–] तेथेंच [बको दाल्भ्यः०–] बक दाल्भ्य ग्लाव मैत्रेय [प्रतिपालयांचकार–] त्यांची प्रतीक्षा करता झाला. ३

ते ह यथैवेह बहिष्पवमानेन स्तोष्यमाणाः संरब्धाः
सर्पन्तीत्येवमाससृपुस्ते ह समुपविश्य हिंचक्रुः ॥ ४

अन्वयार्थ—[ते–] ते श्वान [यथा एव इह–] ज्याप्रमाणें कर्मामध्यें बहिष्पवमान स्तोत्रानें प्रस्तवन करणारे उद्गातृपुरुष [संरब्धाः–] एकमेकांशीं संलग्न होऊन [सर्पन्ति–] परिभ्रमण करितात [एवं–] त्याप्रमाणें [ते ह–] ते श्वान [आससृपुः–] परिभ्रमण करते झाले. नंतर [समुपविश्य–] खालीं बसून [हिंचक्रुः–] हिंकार करते झाले. ४.–श्रुति हिंकाराचें स्वरूप सांगते—

ॐ ३ मदा ३ मों ३ पिबा ३ मों ३ देवो वरुणः प्रजापतिः
सविता२ऽन्नमिहा२ऽऽहरदन्नपते३ऽन्नमिहा२ऽऽहरा२ऽऽहरो३मिति॥५

इति प्रथमाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—[ओं अदाम ओं पिबाम ओं देवः वरुणः०–] आम्ही भोजन करतों, पान करतों, (येथें गायनासाठीं ओंकार तीनदा उच्चारला आहे.) द्योतनामुळें देव, जगाच्या वर्षणामुळें वरुण, प्रजांच्या पालनामुळें प्रजापति, व सर्वांचें प्रसवितृत्व असल्यामुळें–सर्वांना प्रसवणारा असल्यामुळें आदित्य सविता म्हटला जातो. या पर्यायांनीं युक्त असलेला तो आदित्य आम्हांसाठीं [अन्नं इह आहरत्–] अन्न येथें आहरण करो. ते श्वान याप्रमाणें हिंकार करून पुनरपि म्हणाले–तो तूं हे अन्नपते, (तोच सर्व अन्नाच्या प्रसवितृत्वामुळें अन्नाचा पति आहे. कारण त्याच्या पाकावांचून प्रसूत झालेलें प्राण्यांचें अन्न अणुमात्रहि प्रादुर्भूत होत नाहीं. म्हणून तो अन्नपति. हे अन्नपते,) [अन्नं०–] आम्हांसाठीं या प्रकृत स्थानीं अन्न घेऊन ये. ' आहर ' या शब्दाची आदरार्थ आवृत्ति केली आहे. शेवटचा ' ओं ' हा शब्द सूर्याच्या प्रार्थनेचा मंत्र समाप्त झाला, हें सुचवितो व ' इति ' हा शब्द भक्तिविषय उपासना समाप्त झाली, हें सुचवितो ५(१२).

भक्तिविषयक उपासन सामावयवाशीं संबद्ध आहे. म्हणून त्या प्रसंगानें सामाचा एक अवयव अशा स्तोभाच्या अक्षरांशीं संबद्ध अशीं दुसरीं संहत–

समूहरूप उपासनें याच्या पुढें सांगितली जातात. कारण सामाच्या अवयवाशीं संबद्ध असणें, हें सादृश्य यांत आहे.

अयं वाव लोको हाउकारो वायुर्हाइकारश्चन्द्रमा अथकारः । आत्मेहकारोऽग्निरीकारः ॥ १

अन्वयार्थ—[अयं वाव लोकः०—] हाच लोक हाउकार आहे, वायु हाइकार आहे, चंद्रमा अथकार आहे, आत्मा इहकार आहे व अग्नि ईकार आहे. १

आदित्यो ऊकारो निहव एकारो विश्वे देवा औहोयिकारः प्रजापतिर्हिंकारः प्राणः स्वरोऽन्नं या वाग्विराट् ॥ २

अन्वयार्थ—आदित्य ऊकार, निहव एकार, विश्वे देव औहोयिकार, प्रजापति हिंकार, प्राण स्वर, अन्न या व विराट् वाक् आहे म्ह० आदित्यादिदृष्ट्या ऊकारादि स्तोभाक्षरांची उपासना करावी. २

अनिरुक्तस्त्रयोदशः स्तोभः संचरो हुंकारः ॥ ३

अन्वयार्थ—अनिरुक्त—कारणात्मा, [संचरः—] कार्यरूपानें अनेकप्रकारें संचार करणारा तेरावा स्तोभ हुंकार कारणदृष्ट्या उपास्य आहे. ३—स्तोभाक्षरांच्या उपासनेचें फल—

दुग्धेऽस्मै वाग्दोहं यो वाचो दोहोऽन्नवानन्नादो भवति य एतामेवꣳ साम्नामुपनिषदं वेदोपनिषदं वेद ॥ ४

इति प्रथमाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

इति छान्दोग्योपनिषद्ब्राह्मणे प्रथमोऽध्यायः समाप्तः ॥ १

अन्वयार्थ—[दुग्धे अस्मै वाक् दोहं०—] या उपासकाला वाक् दोह—फल देते, जो वाक्-चा दोह—ऋग्वेदादिशब्दसाध्य फल तें देते. [यः एवं एतां साम्नां उपनिषदं वेद—] जो याप्रमाणें या सामांच्या उपनिषदाला जाणतो [अन्नवान् अन्नादः भवति—] तो अन्नवान् व अन्नाद—दीप्ताग्नि होतो. ४ (१३)१.

अथ द्वितीयोऽध्यायः ।

'ओमित्येतदक्षरं०' इत्यादि पहिल्या प्रपाठकानें सामाच्या अवयवांचें अनेक फळें देणारें उपासन सांगितलें; तें सांगून झाल्यावर पहिल्या अध्यायाच्या तेराव्या खंडांत स्तोभाक्षराचें उपासन सांगितलें. तें उपासन सामावयवसंबद्ध असो कीं स्तोभाक्षरसंबद्ध असो, तें कसेंहि जरी असलें तरी सामाच्या एकदेशाशीं संबद्ध आहे. याप्रमाणें एकदेशोपासनेचें व्याख्यान झाल्यानंतर आतां समस्तसामविषयक उपासनें मी सांगतें, असें ह्मणून श्रुति आरंभ करिते——

ॐ समस्तस्य खलु साम्न उपासनꣳसाधु यत्खलु साधु तत्सामेत्याचक्षते यदसाधु तदसामेति ॥ १

अन्वयार्थ——[समस्तस्य०—] समस्त—सर्वावयवविशिष्ट पांचभक्तिक व सप्त भक्तिक सामाचें उपासन साधु आहे. [यत् खलु०—] व्यवहारांत जें साधु असतें त्याला साम असें म्हणतात व जें असाधु असतें त्याला असाम असें ह्मणतात.

तदुताप्याहुः साम्नैनमुपागादिति साधुनैनमुपागादित्येव तदाहुरसाम्नैनमुपागादित्यसाधुनैनमुपागादित्येव तदाहुः ॥ २

अन्वयार्थ——[' तत् उत अपि आहुः—] साधु व असाधु असा विवेक करण्याचें कारणहि सांगतात—[साम्ना एनं उपागात्—] सामानें या राजाला किंवा सामन्ताला प्राप्त झाला—त्याच्या समीप गेला. [साधुना—] शोभन अभिप्रायानें [एनं उपागात्—] याच्यापाशीं गेला. [इत्येव०—] असेंच त्याच्याविषयीं लोक ह्मणतात. तसेंच [असाम्ना०—] असामानें याच्यापाशीं गेला, असाधु आशयानें त्याच्या समीप गेला, असेंच त्याच्याविषयीं ह्मणतात २.

अथोताप्याहुः साम नो बतेति यत्साधु भवति साधु बतेत्येव तदाहुरसाम नो बतेति यदसाधु भवत्यसाधु बतेत्येव तदाहुः ॥ ३

अन्वयार्थ——[अथ०—] नंतर अहाहा आमचें साम—चांगलें झालें, असेंहि ह्मणतात. जें साधु होतें, तें 'अहाहा चांगलें,' असेंच ह्मणतात व ' अरेरे आमचें असाम—वाईट झालें,' असें ह्मणतात. जें असाधु असतें त्याला 'अरेरे असाधु—वाईट' असेंच ह्मणतात ३.

स य एतदेवं विद्वान्साधु सामेत्युपास्तेऽभ्याशो ह यदेनꣳसाधवो धर्मा आ च गच्छेयुरुप च नमेयुः ॥ ४

इति द्वितीयाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—ह्मणून [सः यः—] तो जो कोणी [एतदेवं०—] हें असें जाणणारा 'साधु साम अशी उपासना करतो' त्याच्यापाशीं [अभ्याशो ह—] सत्वर साधु—शोभन—श्रुति-स्मृतींशीं अविरुद्ध धर्म येतात व त्याच्यापाशीं भोग्य-रूपानें उपस्थित—नम्र होतात. ४ (१)

—साधुदृष्टिविशिष्ट अशीं कोणतीं बरें तीं समस्त सामें उपास्य आहेत? उत्तर—

लोकेषु पञ्चविधꣳसामोपासीत पृथिवी हिंकारः । अग्निः प्रस्तावोऽन्तरिक्षमुद्गीथ आदित्यः प्रतिहारो द्यौर्निधनमित्यूर्ध्वेषु ॥ १

अन्वयार्थ—[लोकेषु०—] लोकदृष्ट्या पंचविध सामाची उपासना करावी. पृथिवी हिंकार, अग्नि प्रस्ताव, अन्तरिक्ष उद्गीथ, आदित्य प्रतिहार व द्यौः निधन, अशी [ऊर्ध्वेषु—] ऊर्ध्वगत लोकदृष्ट्या सामोपासना करावी. १

अथाऽऽवृत्तेषु द्यौर्हिंकार आदित्यः प्रस्तावोऽन्तरिक्ष-मुद्गीथोऽग्निः प्रतिहारः पृथिवी निधनम् ॥ २

अन्वयार्थ—[अथ—] पृथिवीपासून द्युलोकापर्यंत पांच ऊर्ध्वमुख लोकांच्या दृष्टीनें पंचविध सामाची उपासना सांगितल्यानंतर [आवृत्तेषु०—] अवाङ्मुख—अधोमुख लोकांमध्यें पंचविध सामाचें उपासन सांगितलें जातें. द्युलोकदृष्ट्या हिंकाराची, आदित्यदृष्ट्या प्रस्तावाची, अन्तरिक्षदृष्ट्या उद्गीथाची, अग्निदृष्ट्या प्रतिहाराची व पृथिवीदृष्ट्या निधनाची उपासना करावी. २—या उपासनेचें फल—

कल्पन्ते हास्मै लोका ऊर्ध्वाश्चाऽऽवृत्ताश्च य एतदेवं विद्वाꣳल्लोकेषु पञ्चविधं सामोपास्ते ॥ ३

इति द्वितीयाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—[अस्मै—] या उपासकाला 'ऊर्ध्व व आवृत्त लोक' [कल्पन्ते—] समर्थ होतात. (कोणाला ?) [यः एतत् एवं विद्वान्—] जो हें असें जाणणारा [लोकेषु०—] लोकांमध्यें पंचविध सामाचें उपासन करतो ३. (२)

वृष्टौ पंचविधꣳसामोपासीत पुरोवातो हिंकारो मेघो जायते स प्रस्तावो वर्षति स उद्गीथो विद्योतते स्तनयति स प्रतिहारः ॥ १

अन्वयार्थ—[वृष्टौ०—] वृष्टीमध्यें—वृष्टिदृष्ट्या पंचविध सामाची उपासना करावी. पुरोवातदृष्ट्या हिंकाराची, मेघ उत्पन्न होतो, त्याच्या दृष्टीनें प्रस्तावाची, तो वृष्टि करतो, त्याच्या दृष्टीनें उद्गीथाची, चमकतें व गर्जना होते, त्या दृष्टीनें प्रतिहाराची उपासना करावी. १

उद्गृह्णाति तन्निधनं वर्षति हास्मै वर्षयति ह य एतदेवं विद्वान्वृष्टौ पंचविधꣳसामोपास्ते ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—[उद्गृह्णाति०—] उद्ग्रहणाच्या दृष्टीनें निधनाची उपासना करावी. [यः एतत् एवं विद्वान् वृष्टौ पंचविधं साम उपास्ते अस्मै वर्षति वर्षयति ह—] जो हें असें जाणणारा वृष्टीमध्यें पंचविध सामाची उपासना करतो त्याच्या इच्छेप्रमाणें वृष्टि होते, किंबहुना तो मेघाकडून वृष्टि करवितो. २ (३)

सर्वास्वप्सु पञ्चविधꣳ सामापासीत मेघो यत्संप्लवते स हिंकारो यद्वर्षति स प्रस्तावो याः प्राच्यः स्यन्दन्ते स उद्गीथो या प्रतीच्यः स प्रतिहारः समुद्रो निधनम् ॥ १

अन्वयार्थ—सर्व आपांमध्यें पंचविध सामाची उपासना करावी. मेघ जो एकरूप होतो त्या दृष्टीनें हिंकाराची, तो जी वृष्टि करतो त्या दृष्टीनें प्रस्तावाची, ज्या पूर्वेकडील नद्या वाहतात त्यांच्या दृष्टीनें उद्गीथाची, ज्या पश्चिमेकडे नद्या वाहतात त्यांच्या दृष्टीनें प्रतिहाराची व समुद्राच्या दृष्टीनें निधनाची उपासना करावी. १.

न हाप्सु प्रैत्यप्सुमान्भवति य एतदेवं विद्वान्सर्वास्वप्सु पञ्चविधꣳसामोपास्ते

इति द्वितीयाध्यायस्य चतुर्थः खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—[यः एतत् एवं०—] जो हें असें जाणणारा सर्व आपांमध्यें पंचविध सामाची उपासना करतो तो [न ह अप्सु प्रैति—] जलांमध्यें मरत नाहीं व तो ' अप्सुमान् '—उदकवान् होतो. २ (४)

ऋतुषु पञ्चविधꣳसामोपासीत वसन्तो हिंकारो ग्रीष्मः प्रस्तावो वर्षा उद्गीथः शरत्प्रतिहारो हेमन्तो निधनम् ॥ १

अन्वयार्थ—ऋतुदृष्ट्या पंचविध सामाची उपासना करावी. वसन्तदृष्ट्या हिंकाराची, ग्रीष्मदृष्ट्या प्रस्तावाची, वर्षादृष्ट्या उद्गीथाची, शरद्दृष्ट्या प्रतिहाराची व हेमन्तदृष्ट्या निधनाची उपासना करावी १.

कल्पन्ते हास्मा ऋतव ऋतुमान्भवति य एतदेवं विद्वानृतुषु पञ्चविधꣳसामोपास्ते ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य पञ्चमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[यः एतदेवं०—] जो हें असें जाणणारा ऋतूंमध्यें पंचविध सामाचें उपासन करतो त्याला ऋतू स्वानुरूप भोग देतात व तो [ऋतुमान् भवति—] ऋतुसंबंधी भोगांनीं संपन्न होतो. २ (५)

पशुषु पंचविधꣳसामोपासीताजा हिंकारोऽवयः प्रस्तावो गाव उद्गीथोऽश्वाः प्रतिहारः पुरुषो निधनम् ॥ १

अन्वयार्थ—पशुदृष्ट्या पंचविध सामाची उपासना करावी. अजा हिंकार, अवी प्रस्ताव, गायी उद्गीथ, अश्व प्रतिहार व पुरुष निधन अशा दृष्टीनें उपासना करावी. १

भवन्ति हास्य पशवः पशुमान्भवति य एतदेवं विद्वान्पशुषु पञ्चविधꣳसामोपास्ते ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य षष्ठः खण्डः ॥ ६

अन्वथार्थ—[यः एतदेवं०—] जो हें असें जाणणारा पशूंमध्यें पंचविध सामाची उपासना करतो त्याला पशू प्राप्त होतात व तो पशुमान् होतो.२.(६)

प्राणेषु पञ्चविधं परोवरीयः सामोपासीत प्राणो हिंकारो वाक्प्रस्तावश्चक्षुरुद्गीथः श्रोत्रं प्रतिहारो मनो निधनं परोवरीयाꣳसि वा एतानि ॥ १

अन्वयार्थ—प्राणदृष्ट्या पंचविध परोवरीय सामाची उपासना करावी. प्राण हिंकार, वाक् प्रस्ताव, चक्षु उद्गीथ, श्रोत्र प्रतिहार व मन निधन, हीं उपासनें उत्तरोत्तर श्रेष्ठ आहेत. १

परोवरीयो हास्य भवति परोवरीयसो ह लोकाञ्जयति य एतदेवं विद्वान्प्राणेषु पञ्चविधं परोवरीयः सामोपास्त इति तु पञ्चविधस्य ॥२

इति द्वितीयाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—[यः एतदेवं०—] जो हें याप्रमाणें जाणणारा प्राणदृष्ट्या पंचविध परोवरीय सामाची उपासना करतो [अस्य परोवरीयः०—] याचें जीवन परोवरीय होतें व उत्तरोत्तर श्रेष्ठ लोकांस तो जिंकतो. [इति तु पंचविधस्य—] असें हें पंचविध सामाचें उपासन सांगितलें. २ (७)

अथ सप्तविधस्य वाचि सप्तविधꣳ सामोपासीत यत्किंच वाचो हुमिति स हिंकारो यत्प्रेति स प्रस्तावो यदेति स आदिः ॥ १

अन्वयार्थ—[अथ०—] आतां सप्तविध समस्त सामाचें उपासन [वाचि सप्तविधं०—] वाक्-दृष्टिविशिष्ट सप्तविध समाची उपासना करावी. जें कांहीं वाक्-चें 'हुं' असें स्वरूप तो हिंकार, जें 'प्र' असें तो प्रस्ताव, जें 'आ' असें तो आदि; १.

यदुदिति स उद्गीथो यत्प्रतीति स प्रतिहारो यदुपेति स उपद्रवो यन्नीति तन्निधनम् ॥ २

अन्वयार्थ—जें 'उत्' असें शब्दरूप तो उद्गीथ, जें 'प्रति' असें तो प्रतिहार, जें 'उप' असें तो उपद्रव, व जें 'नि' असें तें निधन. २

दुग्धेऽस्मै वाग्दोहं यो वाचो दोहोऽन्नवानन्नादो भवति य एतदेवं विद्वान्वाचि सप्तविधꣳ सामोपास्ते ॥ ३

इति द्वितीयाध्यायस्याष्टमः खण्डः ॥ ८ ॥

अन्वयार्थ—[यः एतदेवं०—] जो हें असें जाणणारा वाग्दृष्ट्या सप्तविध-सामाची उपासना करतो [दुग्धेऽस्मै०—] त्याला वाक् दोह देते, [यः वाचः दोहः—] जो वाक्-चा दोह; उपासक अन्नवान् व दीप्ताग्नि होतो. ३ (८).

अथ खल्वमुमादित्यꣳ सप्तविधꣳ सामोपासीत सर्वदा समस्तेन साम मां प्रति मां प्रतीति सर्वेण समस्तेन साम ॥ १

अन्वयार्थ—आतां खरोखर या आदित्याच्या दृष्टीनें सप्तविध सामाची उपासना करावी. कारण आदित्य सर्वदा सम आहे. त्या कारणानें तो साम. मजप्रत मजप्रत, अशी तो समान बुद्धि उत्पन्न करतो, ह्मणून तो सर्वांशीं सम. त्यामुळें साम. १

तस्मिन्निमानि सर्वाणि भूतान्यन्वायत्तानीति विद्या-
त्तस्य यत्पुरोदयात्स हिंकारस्तदस्य पशवोऽन्वायत्ता-
स्तस्मात्ते हिंकुर्वंति हिंकारभाजिनो ह्येतस्य साम्नः ॥२

अन्वयार्थ—[तस्मिन्–] त्या आदित्यांत [इमानि०–] हीं सर्व भूतें अन्वायत्त–अनुगत आहेत, असें जाणावें. [तस्य यत् पुरोदयात्–] त्या आदित्याचें उदयाच्या पूर्वीचें जें धर्मस्वरूप [सः हिंकारः–] तो हिंकार. [तत् अस्य–] तें या आदित्याचें हिंकाररूप, [पशवः अन्वायत्ताः–] त्या हिंकाररूपाला पशु अनुगत आहेत. [तस्मात्०–] त्यामुळें ते पशु ' हिं ' करितात. कारण ते [एतस्य साम्नः०–] या आदित्याख्य सामाचे हिंकारभाक् आहेत. २

अथ यत्प्रथमोदिते स प्रस्तावस्तदस्य मनुष्या अन्वायत्तास्तस्मात्ते
प्रस्तुतिकामाः प्रशंसाकामाः प्रस्तावभाजिनो ह्येतस्य साम्नः ॥ ३

अन्वयार्थ—[अथ–] नंतर [यत् प्रथमोदिते०–] जें प्रथम उदय झाला असतां आदित्याचें रूप तो प्रस्ताव. [तदस्य०–] याच्या त्या रूपास मनुष्य अन्वायत्त आहेत. म्हणून ते प्रस्तुति व प्रशंसा यांची इच्छा करणारे असतात. ज्याअर्थीं या सामाच्या प्रस्तावाचें भजन करण्याचें त्यांचें शील असतें (त्याअर्थीं ते प्रस्तुतिकाम व प्रशंसाकाम असतात, असा संबंध.) ३

अथ यत्संगववेलायां स आदिस्तदस्य वयांस्य-
न्वायत्तानि तस्मात्तान्यन्तरिक्षेऽनारम्बणान्यादायाऽऽ-
त्मानं परिपतन्त्यादिभाजीनि ह्येतस्य साम्नः ॥ ४

अन्वयार्थ—सूर्यकिरणांचा जगन्मंडलाशीं किंवा वत्सांचा गायींशीं संगम होण्याचा जो काल तो संगवकाल; त्यावेळीं जें सवित्याचें रूप तो आदि. याच्या त्या रूपास पक्षी अन्वायत्त आहेत. [आदिभाजीनि०–] ज्याअर्थीं या सामाच्या आदीचें भजन करणारे ते आहेत [तस्मात्०–] त्याअर्थीं ते पक्षी अन्तरिक्षांत स्वतःला अनालंबन–निराधार अशा रीतीनें घेऊन जातात. ४.

अथ यत्संप्रति मध्यंदिने स उद्गीथस्तदस्य देवा अन्वायत्तास्तस्मात्ते सत्तमाः प्राजापत्यानामुद्गीथभाजिनो ह्येतस्य साम्नः ॥ ५

अन्वयार्थ—नंतर जें [संप्रति मध्यंदिने–] सरळ मध्यंदिनी आदित्याचें रूप तो उद्गीथ. याच्या त्या रूपास देव अन्वागत आहेत. [तस्मात्०–] म्हणून ते प्रजापतीच्या अपत्यांमध्यें सत्तम–अत्यंत विशिष्ट आहेत. कारण ते या सामाच्या उद्गीथाचें भजन करण्याचें ज्यांचें शील आहे, असे आहेत. ५

अथ यदूर्ध्वं मध्यंदिनात्प्रागपराह्णात्स प्रातिहारस्तदस्य गर्भा अन्वायत्तास्तस्मात्ते प्रतिहृता नावपद्यन्ते प्रतिहारभाजिनो ह्येतस्य साम्नः ६

अन्वयार्थ—नंतर [यदूर्ध्वं०–] जें मध्यंदिनाच्या नंतर व अपराह्णाच्या पूर्वी सूर्याचें रूप तो प्रतिहार (त्यांत 'प्रति' या शब्दाचें सादृश्य आहे.) या त्याच्या रूपास गर्भ अनुगत आहेत. ह्मणून ते वर नेलेले असे होत्साते खाली पडतें नाहींत. कारण गर्भ या सामाच्या प्रतिहाराचें भजन करणारे आहेत.

अथ यदूर्ध्वमपराह्णात्प्रागस्तमयात्स उपद्रवस्तदस्याऽऽरण्या अन्वायत्तास्तस्मात्ते पुरुषं दृष्ट्वा कक्षꣳ श्वभ्रमित्युपद्रवन्त्युपद्रवभाजिनो ह्येतस्य साम्नः ॥ ७

अन्वयार्थ—नंतर जें अपराह्णाच्या नंतर व अस्तमयाच्या पूर्वी आदित्याचें रूप तो उपद्रव. त्या रूपाच्या दृष्टीनें उपद्रवाची उपासना करावी. (कारण तें त्या वेळीं अस्ताचलाप्रत जातें) याच्या त्या रूपास अरण्यांतील पशु अनुगत आहेत. ह्मणून ते पुरुषास पाहून अरण्यांत किंवा गुहेंत पळून जातात. कारण ते या सामाच्या उपद्रवभक्तीचें भजन करणारे आहेत. ७

अथ यत्प्रथमास्तमिते तन्निधनं तदस्य पितरोऽन्वायत्तास्तस्मात्तन्निदधाति निधनभाजिनो ह्येतस्य साम्न एवं खल्वमुमादित्यꣳ सप्तविधꣳ सामोपास्ते ॥ ८

इति द्वितीयाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—नंतर जें प्रथम अस्तमितसमयीं आदित्याचें रूप तें निधन. (त्या रूपाच्या दृष्टीनें निधानाची उपासना करावी. समाप्ति हें त्या दोहोंमध्यें सामान्य आहे.) त्या रूपास पितर अन्वागत आहेत. म्हणून त्यांस–पिंडरूप पितरांस–दर्भावर स्थापितात. पितर या सामाच्या निधनाचें भजन करणारे

आहेत. [एवं०—] याप्रमाणें या आदित्याच्या दृष्टीनें सप्तविध सामाची जो उपासना करतो त्याला आदित्याची प्राप्ति हें फल मिळतें, असा या वाक्याला शेष लावावा. ८ (९)

—आदित्य मृत्यु आहे. कारण तो अहोरात्रादि कालानें जगाचा क्षय करणारा आहे. यास्तव त्याच्या उल्लंघनासाठीं हें सामोपासन सांगितलें जातें—

अथ खल्वात्मसंमितमतिमृत्यु सप्तविधꣳ सामोपासीत
हिंकार इति त्र्यक्षरं प्रस्ताव इति त्र्यक्षरं तत्सममꣳ ॥१

अन्वयार्थ—[अथ खलु०—] त्यानंतर आत्मसंमित—सामावयवांच्या तुल्य, अतिमृत्यु, सप्तविध सामाची उपासना करावी. हिंकार हें [त्र्यक्षरं—] तीन अक्षरांचें नांव आहे. प्रस्ताव हेंहि त्र्यक्षर नांव आहे. तें पूर्व नांवाशीं सम आहे. १

आदिरिति द्व्यक्षरं प्रतिहार इति चतुरक्षरं तत इहैकं तत्सममꣳ ॥२

अन्वयार्थ—' आदि ' असें द्व्यक्षर—दोन अक्षरांचें नांव व ' प्रतिहार ' हें चतुरक्षर—चार अक्षरांचें. त्यांतून एक अक्षर काढून ' आदि ' यांत मिळविलें असतां तीं दोन्ही सम होतात. २

उद्गीथ इति त्र्यक्षरमुपद्रव इति चतुरक्षरं त्रिभिस्त्रिभिः
समं भवत्यक्षरमतिशिष्यते त्र्यक्षरं तत्सममꣳ ॥ ३

अन्वयार्थ—' उद्गीथ ' असें त्र्यक्षर नांव व ' उपद्रव ' हें चार अक्षरांचें नांव. तीन तीन अक्षरांनीं तीं दोन्ही नांवें समान होतात; व एक अक्षर अवशिष्ट राहतें. पण तेंहि ' अक्षर ' असें त्र्यक्षरच आहे. त्यामुळें तेंहि पूर्वीच्याशीं समान आहे. ३

निधनमिति त्र्यक्षरं तत्सममेव भवति तानि
ह वा एतानि द्वाविꣳशतिरक्षराणि ॥ ४

अन्वयार्थ—'निधन' असें त्र्यक्षर नांव आहे. तें पूर्वनांवाशीं समच आहे. तीं हीं अशीं एकंदर बावीस अक्षरें आहेत. ४

एकविꣳशत्यादित्यमाप्नोत्येकविꣳशो वा इतोऽसावादित्यो
द्वाविꣳशेन परमादित्याज्जयति तन्नाकं तद्विशोकम् ॥ ५

अन्वयार्थ—[एकविंशत्या०—] एकवीस या अक्षरसंख्येनें आदित्यास प्राप्त होतो. [एकविंशः०—] या लोकाहून आदित्य एकविसावा आहे. [द्वाविंशेन०—] बाविसाव्या अक्षरानें आदित्याहून पर अशा स्थानास जिंकतो. तें स्थान [नाकं—] सुखाचा अभाव नव्हे. तर [तत् विशोकं—] तें शोकरहित आहे. ५

आप्नोति हाऽऽदित्यस्य जयं परो हास्याऽऽदित्य-
जयाज्जयो भवति य एतदेवं विद्वानात्मसंमितम-
तिमृत्यु सप्तविधꣳसामोपास्ते सामोपास्ते ॥ ६

इति द्वितीयाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—[आदित्यस्य जयं आप्नोति—] आदित्याच्या जयास प्राप्त होतो. [आदित्यजयात् अस्य परः जयः भवति—] आदित्याच्या जयाहून याचा मोठाच जय होतो. (कोणाचा ?) जो हें असें जाणणारा आत्मसंमित, अतिमृत्यु, सप्तविध सामाची उपासना करतो, (त्याचा जय होतो) ' सामोपास्ते ' या वाक्याची आवृत्ति सप्तविध सामोपासनेच्या समाप्त्यर्थ आहे. ६ (१०)

नांव घेतल्यावांचून पंचविध व सप्तविध सामाचें उपासन सांगितलें. आतां या पुढें गायत्र, रथंतर इत्यादि नामग्रहणपूर्वक—नामग्रहणानें विशिष्ट व विशिष्ट फल देणारीं दुसरीं सामोपासनें सांगितलीं जातात. कर्मामध्यें गायत्रादिकांचा ज्या क्रमानें उपयोग करितात त्याच क्रमाचा आश्रय करून त्याची उपासना सांगितली आहे—

मनो हिंकारो वाक्प्रस्तावश्चक्षुरुद्गीथः श्रोत्रं प्रति-
हारः प्राणो निधनमेतद्गायत्रं प्राणेषु प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—मन हिंकार, वाक् प्रस्ताव, चक्षु उद्गीथ, श्रोत्र प्रतिहार, प्राण निधन हें गायत्र साम आहे. तें प्राणांमध्यें प्रोत—प्रतिष्ठित आहे. १

स य एवमेतद्गायत्रं प्राणेषु प्रोतं वेद प्राणी भवति
सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभि-
र्भवति महान्कीर्त्या महामनाः स्याच्चदव्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—[सः यः एवं०—] तो जो अशाप्रकारें गायत्र साम प्राणांत प्रतिष्ठित आहे, असें जाणतो तो [प्राणी—] प्राणवान् होतो. [सर्वं आयुः एति—] सर्व आयुष्यास प्राप्त होतो. [ज्योक् जीवति—] उज्ज्वल जीवन जगतो. [प्रजया पशुभिः महान् भवति—] प्रजा व पशु यांनीं महान् होतो; [कीर्त्या महान्—] कीर्तीनें महान होतो. [महामनाः स्यात्—] अक्षुद्रचित्त व्हावें, [तत् व्रतं—] हें गायत्रोपासकाचें व्रत आहे. २ (११)

अभिमन्थति स हिंकारो धूमो जायते स प्रस्तावो ज्वलति स उद्गीथोऽङ्गारा भवन्ति स प्रतिहार उपशाम्यति तन्निधनꣳसꣳशाम्यति तन्निधनमेतद्रथंतरमग्नौ प्रोतम् ॥१

अन्वयार्थ—अभिमंथन करतो तो हिंकार, धूम उद्भवतो तो प्रस्ताव, दीप्त होतो तो उद्गीथ, कोळसे—निखारे पडतात तो प्रतिहार, विझूं लागतो तें निधन, अगदीं शांत होतो तें निधन, हें रथंतर साम अग्नींत प्रतिष्ठित आहे. १

स य एवमेतद्रथंतरमग्नौ प्रोतं वेद ब्रह्मवर्चस्यन्नादो भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्या न प्रत्यङ्ङग्निमाचामेन्न निष्ठीवेत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—[सः यः०—] तो जो असें हें रथंतर अग्नींत प्रतिष्ठित आहे, हें जाणतो तो ब्रह्मवर्चसी दीप्ताग्नि होतो. पूर्ण आयुष्य जगतो, उज्ज्वलपणें जिवंत राहतो. प्रजा व पशु यांनीं महान् होतो. कीर्तीनें महान् होतो. [अग्निं प्रत्यङ् न आचामेत् न निष्ठीवेत्—] अग्नीकडे तोंड करून कांहीं खाऊं नये व त्याच्याकडे तोंड करून थुंकूं नये. [तत् व्रतं—] हें व्रत आहे. २ (१२)

—अवाच्य पशुकर्मामध्यें प्रवृत्त झालेल्या स्त्री-पुरुषांना खालची अरणी व वरची अरणी यांचें स्थानीयत्व आहे,—तीं दोघें अरणींच्या स्थानीं असतात. त्यामुळें मंथनकर्माच्या सादृश्यामुळें मंथनादिदृष्टीनंतर मैथुनदृष्टीचें विधान श्रुति करते—

उपमन्त्रयते स हिंकारो ज्ञपयते स प्रस्तावः स्त्रिया सह शेते स उद्गीथः प्रतिस्त्रीं सह शेते स प्रतिहारः कालं गच्छति तन्निधनं पारं गच्छति तन्निधनमेतद्वामदेव्यं मिथुने प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—[उपमन्त्रयते०—] संकेत करतो, तो प्राथम्यामुळें हिंकार आहे, [ज्ञपयते०—] पुरुष पशुकर्मासाठीं स्त्रीला वस्त्रदानादिकांच्या योगानें संतुष्ट करतो तो प्रस्ताव. कारण प्रारंभ हें त्यांत सादृश्य आहे. [स्त्रिया सह शेते०—]स्त्रीसह शयन करणें म्ह० एका पर्यंकावर जाणें, तो उद्गीथ. कारण त्याला श्रेष्ठत्व आहे. [प्रतिस्त्री०—] स्त्रीच्या अभिमुख होणें, तिच्याकडे तोंड करणें, तो प्रतिहार, [कालं०—] कालास प्राप्त होतो, मैथुनानें [पारं०—] समाप्तीस प्राप्त होतो तें निधन. हें वामदेव्य साम मिथुनांत प्रतिष्ठित आहे. कारण वायु व जल यांचा मिथुनत्वानें संबंध होऊन त्यापासून वामदेव्य सामाची उत्पत्ति सांगितली आहे. (त्यामुळें तें मिथुनांत प्रतिष्ठित असणें योग्यच आहे.) १.

स य एवमेतद्वामदेव्यं मिथुने प्रोतं वेद मिथुनीभवति मिथुनान्मिथुनात्प्रजायते सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्या न कांचन परिहरेत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ—[सः यः०—] तो जो असें हें वामदेव्य साम मिथुनांत प्रतिष्ठित आहे, असें जाणतो तो मिथुनरूप—अविधुर होतो. प्रत्येक मिथुनापासून तो उत्पन्न होतो. पूर्ण आयुष्य वांचतो, उज्ज्वल जीवन जगतो. प्रजेनें व पशूंनीं तो महान् होतो. कीर्तीनें महान् होतो. [कांचन न परिहरेत्—] समागमाच्या इच्छेनें आलेल्या कोणत्याहि स्त्रीचा परिहार करूं नये. तें व्रत आहे. वचनप्रामाण्यावरून धर्माचें ज्ञान होत असल्यामुळें प्रतिषेधशास्त्राशीं याचा विरोध नाहीं. (वामदेव्य सामोपासकालाच ब्रह्मचर्याचा नियम नाहीं, इतरांना तो आहे. त्यामुळें—' परांगनां नोपगच्छेत् '—या स्मृतीनें केलेल्या प्रतिषेधाशीं याचा विरोध येत नाहीं, असा भावार्थ.) २ (१३)

आदित्य प्रजोत्पत्तीचा हेतु आहे. यास्तव प्रजोत्पत्तीचें कारण असें जें मैथुन त्याच्या दृष्टीनंतर श्रुति आदित्यदृष्टि उत्थापित करते—

उद्यन्हिंकार उदितः प्रस्तावो मध्यंदिनं उद्गीथोऽ-
पराह्णः प्रतिहारोऽस्तं यन्निधनमेतद्बृहदादित्ये प्रोतम् ॥१

अन्वयार्थ—उदय पावणारा सविता हा हिंकार, उदय पावलेला सविता प्रस्ताव, मध्यंदिन सविता हा उद्गीथ, अपराह्ण प्रतिहार व अस्तास जाणारा हें निधन, हें बृहत्साम आदित्यांत प्रतिष्ठित आहे. १

स य एवमेतद्बृहदादित्ये प्रोतं वेद तेजस्व्यन्नादो
भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया
पशुभिर्भवति महान्कीर्त्या तपन्तं न निन्देत्तद्व्रतम् ॥२

इति द्वितीयाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—तो जो असें हें बृहत्साम आदित्यांत प्रतिष्ठित आहे, असें जाणतो तो तेजस्वी, दीप्ताग्नि होतो. पूर्ण आयुष्यास प्राप्त होतो, उज्ज्वलपणें जिवंत राहतो, प्रजेनें व पशूंनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो, तापणाऱ्या त्याची निंदा करूं नये, तें व्रत आहे. २ (१४).

—' आदित्यात् जायते वृष्टिः-' आदित्यापासून वृष्टि होते, अशी स्मृति असल्यामुळें पर्जन्य हें आदित्याचें कार्य आहे. म्हणून श्रुति आदित्यदृष्टी-नंतर पर्जन्यदृष्टि दाखविते—

अभ्राणि संप्लवन्ते स हिंकारो मेघो जायते स
प्रस्तावो वर्षति स उद्गीथो विद्योतते स्तनयति स
प्रतिहार उद्यृह्णाति तन्निधनमेतद्वैरूपं पर्जन्ये प्रोतम् ॥१

अन्वयार्थ—अभ्रें संप्लुत होतात—अनेक ढग एकत्र होतात तो हिंकार, मेघ उत्पन्न होतो तो प्रस्ताव, वर्षाव करतो तो उद्गीथ, विज चमकते व गडगडाट होतो तो प्रतिहार, वृष्टीचा उपसंहार करतो तें निधन, हें वैरूप साम पर्जन्यांत प्रतिष्ठित आहे. (जल भरत असल्यामुळें—अप्-भरणात्—अभ्र व उदकाचा सेक करणें, यामुळें मेघ.) १.

स य एवमेतद्वैरूपं पर्जन्ये प्रोतं वेद विरूपाश्च सुरूपाश्च
पशूनवरुन्धे सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशु-
भिर्भवति महान्कीर्त्या वर्षन्तं न निन्देत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य पञ्चदशः खण्डः ॥१५

अन्वयार्थ—तो जो असें हें वैरूप साम पर्जन्यांत प्रगत आहे, असें जाणतो तो विरूप व सरूप पशूंस प्राप्त होतो. पूर्ण आयुष्य जगतो, उज्ज्वलपणें जगतो, प्रजा व पशु यांनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो, वृष्टि करणाऱ्या पर्जन्याची निंदा करूं नये, तें व्रत आहे. २ (१५)

वसन्तो हिंकारो ग्रीष्मः प्रस्तावो वर्षा उद्गीथः शरत्
प्रतिहारो हेमन्तो निधनमेतद्वैराजमृतुषु प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—वसन्त हिंकार, ग्रीष्म प्रस्ताव, वर्षा उद्गीथ, शरत् प्रतिहार, हेमन्त निधन, हें वैराज साम ऋतूंत प्रोत आहे. १—ऋतु स्वधर्मांनीं विराजमान होत असल्यामुळें वैराज साम ऋतूंत प्रोत असणें योग्यच आहे, असें श्रुति सांगते—

स य एवमेतद्वैराजमृतुषु प्रोतं वेद विराजति प्रजया
पशुभिर्ब्रह्मवर्चसेन सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्
प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्यर्तून्न निन्देत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य षोडशः खण्डः ॥ १६

अन्वयार्थ—तो जो असें हें वैराज ऋतूंत प्रोत आहे, असें जाणतो तो प्रजा, पशु व ब्रह्मवर्चस यांनीं विराजमान होतो. सर्व आयुष्यास प्राप्त होतो, उज्ज्वल जगतो, प्रजा व पशु यांनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो, ऋतूंची निंदा करूं नये, तें व्रत आहे. २ (१६)

—ऋतु चांगल्याप्रकारें झाले असतां लोकस्थिति होते, हें प्रसिद्ध आहे, म्हणून श्रुति ऋतुदृष्टीनंतर लोकदृष्टि सांगत आहे—

पृथिवी हिंकारोऽन्तरिक्षं प्रस्तावो द्यौरुद्गीथो दिशः
प्रतिहारः समुद्रो निधनमेताः शक्वर्यो लोकेषु प्रोताः ॥१

अन्वयार्थ—पृथिवी हिंकार, अन्तरिक्ष प्रस्ताव, द्यौ उद्गीथ, दिशा प्रतिहार व समुद्र निधन, या शक्वरी लोकांत प्रोत आहेत. १

स य एवमेताः शक्वर्यो लोकेषु प्रोता वेद लोकी-
भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशु-
भिर्भवति महान्कीर्त्या लोकान्न निन्देत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य सप्तदशः खण्डः ॥ १७

अन्वयार्थ—तो जो याप्रमाणें या 'शक्करी' लोकांत प्रोत आहेत, असें जाणतो तो लोकवान् होतो, सर्व आयुष्य भोगतो, उज्ज्वल जगतो, प्रजा व पशु यांनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो, लोकांची निन्दा करूं नये. हें व्रत आहे. २ (१७)

—पशु हें लोकांचें कार्य असल्यामुळें श्रुति लोकदृष्टीनंतर पशुदृष्टीचा उपन्यास करिते—

अजा हिंकारोऽवयः प्रस्तावो गाव उद्गीथोऽश्वाः
प्रतिहारः पुरुषो निधनमेता रेवत्यः पशुषु प्रोताः ॥१

अन्वयार्थ—अजा—बकऱ्या हिंकार, अवी—मेंढ्या प्रस्ताव, गायी उद्गीथ, अश्व प्रतिहार व पुरुष निधन, या 'रेवती' (या नांवाचें साम) पशूंमध्यें प्रोत आहेत. १

स य एवमेता रेवत्यः पशुषु प्रोता वेद पशुमान्
भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशु-
भिर्भवति महान्कीर्त्या पशून्न निन्देत्तद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य अष्टादशः खण्डः ॥ १८

अन्वयार्थ—तो जो याप्रमाणें या रेवती पशूंमध्यें प्रोत जाणतो तो पशु-मान् होतो, पूर्ण आयुष्य उपभोगितो, उज्ज्वल जगतो, प्रजा व पशु यांनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो, पशूंची निंदा करूं नये, तें व्रत आहे. २ (१८)

—पशूंचा विकार असें जें दूध, दहीं इत्यादि त्यांच्या योगानें अंगांची पुष्टि होते, म्हणून श्रुति पशुदृष्टीनंतर अंगदृष्टि सांगते—

लोम हिंकारस्त्वक्प्रस्तावो मांसमुद्गीथोऽस्थि
प्रतिहारो मज्जानिधनमेतद्यज्ञायज्ञीयमङ्गेषु प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—लोम हिंकार, त्वक् प्रस्ताव, मांस उद्गीथ, अस्थि प्रतिहार, मज्जा निधन, हें यज्ञायज्ञीय साम अंगांमध्यें प्रोत आहे. १—' रसो वै यज्ञायज्ञीयं-' अशी श्रुति असल्यामुळें अन्नरसविकाराशी लोमादिकांचा संबंध आहे, म्हणून यज्ञायज्ञीय साम अंगांत प्रतिष्ठित आहे, असें वर सांगितलें. आतां श्रुति त्या उपासनेचें फल सांगते—

स य एवमेतद्यज्ञायज्ञीयमङ्गेषु प्रोतं वेदाङ्गीभवति नाङ्गेन विहूर्च्छति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान्कीर्त्या संवत्सरं मज्ञो नाश्नीयाच्चद्व्रतं मज्ञो नाश्नीयादिति वा ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य एकोनविंशः खण्डः ॥ १९

अन्वयार्थ—तो जो असें हें यज्ञायज्ञीय अंगांत प्रोत असलेलें जाणतो तो अंगवान् होतो, [अंगेन न विहूर्च्छति—] तो अंगानें कुटिल होत नाहीं. पूर्ण आयुष्य उपभोगितो. उज्ज्वलपणें जिवंत राहतो. प्रजा व पशु यांनीं महान् होतो. कीर्तीनें मोठा होतो. एक वर्षभर मांस खाऊं नये. तें व्रत आहे. किंवा मांस केव्हांच खाऊं नये, हें व्रत आहे. २ (१९)

—अग्न्यादिक अंगांमध्यें प्रतिष्ठित असल्यामुळें श्रुति अंगदृष्टीनंतर अग्न्यादिदृष्टि उत्थापित करते—

अग्निर्हिंकारो वायुः प्रस्ताव आदित्य उद्गीथो नक्षत्राणि प्रतिहारश्चन्द्रमा निधनमेतद्राजनं देवतासु प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—अग्नि हिंकार, वायु प्रस्ताव, आदित्य उद्गीथ, नक्षत्रें प्रतिहार, चंद्रमा निधन हें राजन साम देवतांमध्यें प्रतिष्ठित आहे. १—विद्वानाचें फल सांगितलें जातें—

स य एवमेतद्राजनं देवतासु प्रोतं वेदैतासामेव देवतानाꣳ सलोकताꣳ सार्ष्टिताꣳ सायुज्यं गच्छति सर्वमायुरेति ज्योग्जीवति महान्प्रजया पशुभिर्भवति महान् कीर्त्या ब्राह्मणान्न निन्देच्चद्व्रतम् ॥ २

इति द्वितीयाध्यायस्य विंशः खण्डः ॥ २०

अन्वयार्थ—तो जो अस हें राजन देवतांमध्यें प्रतिष्ठित असलेलें जाणतो तो याच देवतांच्या सलोकतेस, सार्ष्टितेस—समान ऐश्वर्यास व सायुज्यास प्राप्त होतो. पूर्ण आयुष्याचा उपभोग घेतो, उज्ज्वल जीवन जगतो, प्रजा व पशु यांनीं महान् होतो, कीर्तीनें महान् होतो. ब्राह्मणांची निंदा करूं नये, तें व्रत आहे. २(२०)

त्रयी विद्या हिंकारस्त्रय इमे लोकाः प्रस्तावोऽग्निर्वायुरादित्यः स उद्गीथो नक्षत्राणि वयाꣳसि मरीचयः स प्रतिहारः सर्पा गन्धर्वाः पितरस्तन्निधनमेतत्साम सर्वस्मिन्प्रोतम् ॥ १

अन्वयार्थ—त्रयी विद्या हा हिंकार; हे तीन लोक हा प्रस्ताव; अग्नि, वायु, आदित्य हा उद्गीथ; नक्षत्रें, पक्षी व किरण हा प्रतिहार; सर्प, गंधर्व व पितर हें निधन, हें साम सर्वांमध्यें 'प्रोत'—प्रतिष्ठित आहे. १—सर्वविषयक सामोपासकाचें फल सांगितलें जातें—

स य एवमेतत्साम सर्वस्मिन्प्रोतं वेद सर्वꣳ ह भवति ॥ २

अन्वयार्थ—तो जो असें हें साम सर्वांमध्यें प्रतिष्ठित आहे, असें जाणतो तो सर्व—सर्वेश्वर होतो. २—याविषयीं मंत्राचें आनुकूल्य—

तदेष श्लोको यानि पञ्चधा त्रीणि त्रीणि तेभ्यो न ज्यायः परमन्यदस्ति ३

अन्वयार्थ—या अर्थीं हा मंत्र आहे. जीं पांच प्रकारें तीन तीन त्रिकें सांगितलीं त्यांहून श्रेष्ठ व त्यांहून व्यतिरिक्त दुसरें कांहीं नाहीं. ३

यस्तद्वेद स वेद सर्वꣳसर्वा दिशो बलिमस्मै हरन्ति सर्वमस्मीत्युपासीत तद्व्रतं तद्व्रतम् ॥ ४

इति द्वितीयाध्यायस्यैकविंशः खण्डः ॥ २१

अन्वयार्थ—[यः तत् वेद—] जो तें जसें वर सांगितलें आहे तसें सर्वात्मक साम जाणतो [सः सर्वं वेद—] तो सर्व जाणतो. [सर्वाः दिशः—] सर्व दिशा—दिशांतील लोक [अस्मै बलिं हरन्ति—] याला बलि—भोग पोंचवितात. [सर्वं अस्मि०—] मी सर्व आहें, असें उपासन करावें. तें व्रत आहे. ४ (२१)

—सामोपासनप्रसंगानें उद्गात्याची गानविशेष—स्वर इत्यादि संपत्ति सांगितली जाते. मृत्युपरिहारादि हें तिचें फल आहे. त्यासाठीं उद्गात्यानें ही उपासना करावी.

विनर्दि साम्नो वृणे पशव्यामित्यग्नेरुद्गीथोऽनिरुक्तः प्रजापतेर्निरुक्तः सोमस्य मृदु श्लक्ष्णं वायोः श्लक्ष्णं बलवदिन्द्रस्य क्रौञ्चं बृहस्पतेरपध्वान्तं वरुणस्य तान्सर्वानेवोपसेवेत वारुणं त्वेव वर्जयेत् ॥ १

अन्वयार्थ—[विनर्दि–] म्ह० विशेष नर्द–बैलाच्या डुरकण्यासारखा विशेष स्वर ज्याला आहे तें विनर्दि गान असा वाक्यशेष लावावा. तें विनर्दि गान [साम्नः–] सामसंबंधी आहे, [पशव्यं–] पशूंना हितावह [अग्नेः–] अग्निदैवत्य [उद्गीथः–] उद्गान; [वृणे–] तें अशा विशेषणांनीं विशिष्ट उद्गान मी प्रार्थितों, [इति–] असें कोणी–यजमान किंवा उद्गाता मानतो. [अनिरुक्तः–] ' अमक्या सारखा हा ' असा भिन्नत्वानें ज्ञात होत नाहीं, (कोण ?) [प्रजापतेः–] प्रजापति ज्याची देवता आहे तो प्राजापत्य गानविशेष; कारण प्रजापति नील-पीतादिकांनीं निश्चय करून सांगतां येत नाहीं. [सोमस्य निरुक्तः–] ज्याची देवता सोम आहे तो उद्गीथ निरुक्त, स्पष्ट आहे असा भावार्थ. मृदु व श्लक्ष्ण–सुंदर जें गान तें [वायोः–] वायुदैवत्य; श्लक्ष्ण व [बलवत्–] अधिक प्रयत्नानें युक्त जें गान तें [ऐंद्रं–] इंद्रदैवत्य; जें [क्रौञ्चं–] क्रौंच पक्ष्याच्या स्वरासारखें गान तें [बृहस्पतेः–] बृहस्पतिदैवत्य. जें [अपध्वान्तं–] फुटलेल्या कांशाच्या भांड्याच्या स्वरासारखें गान तें [वरुणस्य–] वरुणदैवत्य गान. [तान् सर्वान्०–] त्या सर्वांचाच प्रयोग–उपसेवन करावें. [वारुणं तु एव वर्जयेत्–] पण केवल एका वारुणास मात्र वर्ज करावें. १–उद्गानसमयीं स्वरविशेषज्ञानपूर्वक कशाचें ध्यान करावें, तें सांगतात––

अमृतत्वं देवेभ्य आगायानीत्यागायेत्स्वधां पितृभ्य आशां मनुष्येभ्यस्तृणोदकं पशुभ्यः स्वर्गं लोकं यजमानायान्नमात्मन आगायानीत्येतानि मनसा ध्यायन्नप्रमत्तः स्तुवीत ॥२

अन्वयार्थ—मी देवांसाठीं अमृतत्व [आगायानि०–] साधतों, असें म्हणून आगान करावें, पितरांसाठीं स्वधा, मनुष्यांसाठीं [आशां–] त्यांचें इष्ट, पशूंसाठीं तृणोदक, यजमानासाठीं स्वर्गलोक व स्वतःसाठीं अन्न मी साधीन, अशा प्रकारें यांचें मनानें ध्यान करीत होत्साता सावधानपणें स्तुति करावी. १

सर्वे स्वरा इन्द्रस्याऽऽत्मानः सर्व ऊष्माणः प्रजापतेरात्मानः सर्वे स्पर्शा मृत्योरात्मानस्तं यदि स्वरेषूपालभेतेन्द्रꣳशरणं प्रपन्नोऽभूवं स त्वा प्रति वक्ष्यतीत्येनं ब्रूयात् ॥ ३

अन्वयार्थ—सर्व अकारादि स्वर [इंद्रस्य—] बल देणें हें ज्याचें कर्म आहे अशा प्राणाचे आत्मे—देहावयवस्थानीय आहेत. सर्व ऊष्मे म्ह० श ष स व ह हे वर्ण व त्यांचे अवांतर भेद [प्रजापतेः—] विराटाचे अथवा कश्यपाचे आत्मे—देहावयवस्थानीय आहेत, सर्व स्पर्श म्ह० ' क-'पासून ' म-'पर्यंत व्यंजनें मृत्यूचे आत्मे आहेत, पण असें जाणणाऱ्या त्या उद्गात्याला जर कोणी स्वरांविषयीं दोष देईल,—तूं दुष्ट स्वर योजलास असें ह्मणून त्याची निंदा करील—त्यावर आक्षेप करील तर [इंद्रं—] मी इंद्राला—प्राणाला—ईश्वराला शरण—आश्रय प्रपन्न—प्राप्त झालेलों आहें. स्वरांचा प्रयोग करणाऱ्या मीं ईश्वराचा आश्रय केला आहे [सः त्वा प्रति वक्ष्यति—] तो इंद्र तुला जें कांहीं सांगावयाचें तें सांगेल—तोच देव उत्तर देईल, असें त्यास सांगावें. ३

अथ यद्येनमूष्मसूपालभेत प्रजापतिꣳशरणं प्रपन्नोऽभूवं स त्वा प्रति पेक्ष्यतीत्येनं ब्रूयादथ यद्येनꣳस्पर्शेषूपालभेत मृत्युꣳशरणं प्रपन्नोऽभूवं स त्वा प्रति धक्ष्यतीत्येनं ब्रूयात् ॥ ४

अन्वयार्थ—आतां त्याला जर कोणी ऊष्मवर्णांविषयीं दोष देईल, तर मीं प्रजापतीचा आश्रय केला आहे तो तुजप्रत [पेक्ष्यति—] संचूर्ण करील—तुझा चुराडा उडवील, असें त्यास म्हणावें. नंतर त्याला जर कोणी स्पर्शांविषयीं दोष देईल तर मी मृत्यूला शरण झालेलों आहें. तो तुला [धक्ष्यति०—] जाळील, असें त्यास म्हणावें. ४

सर्वे स्वरा घोषवन्तो बलवन्तो वक्तव्या इन्द्रे बलं ददानीति सर्व ऊष्माणोऽग्रस्ता अनिरस्ता विवृता वक्तव्याः प्रजापतेरात्मानं परिददानीति सर्वे स्पर्शा लेशेनानभिनिहिता वक्तव्या मृत्योरात्मानं परिहराणीति ५

इति द्वितीयाध्यायस्य द्वाविंशः खण्डः ॥ २२

अन्वयार्थ—[सर्वे स्वराः०—] सर्व स्वर घोषयुक्त व बलयुक्त असे ह्मणावे; व त्या वेळीं मी इंद्रामध्यें बलाचें आधान करतों, असें चिंतन करावें.

[सर्वे ऊष्माणः—] सर्व ऊष्म वर्ण [अग्रस्ताः—] तोंडांतल्या तोंडांत न खाल्लेले, [अनिरस्ताः—] बाहेर न टाकलेले व [विवृताः—] विवार या प्रयत्नानें युक्त असे [वक्तव्याः—] ह्मणावे; व ते ह्मणत असतांना प्रजापतीला आत्मा देतों, असें चिंतन करावें. [सर्वे स्पर्शाः—] सर्व स्पर्श त्वरित उच्चारानें एकमेकांत थोडे-सुद्धां मिसळणार नाहींत असे उच्चारावे, व त्या वेळीं मृत्यूपासून मी आपलें परिहरण करतों, असें चिंतन करावें. ५ (२२).

ओंकाराचें उपासन सांगण्यासाठी ' त्रयो धर्मस्कन्धाः० ' इत्यादि खंड आरंभिला जातो—(अंगावबद्ध उपासनांच्या प्रकरणांत स्वतंत्र ओंकारोपासनेचें विधान करण्यांत श्रुतीचा कोणता आशय आहे, ? उत्तर—) सामावयवभूत उद्गीथादिलक्षण ओंकाराच्या उपासनेपासूनच फल प्राप्त होतें, असें समजूं नये; तर काय ? जें सर्वहि सामोपासनांनीं व कर्मांनीं अप्राप्य—प्राप्त न होणारें तें अमृतत्व हें फल ओंकाराच्या उपासनेनें प्राप्त होतें, असें समजावें. त्याच्या स्तुतीकरितां सामप्रकरणांत त्याचा उपन्यास केला आहे—

त्रयो धर्मस्कन्धा यज्ञोऽध्ययनं दानमिति प्रथमस्तप एव द्वितीयो ब्रह्मचार्याचार्यकुलवासी तृतीयोऽत्यन्तमात्मानमाचार्यकुलेऽवसादयन्सर्व एते पुण्यलोका भवन्ति ब्रह्मसंस्थोऽमृतत्वमेति ॥ १

अन्वयार्थ—[त्रयः—] त्रिसंख्याक—तीन [धर्मस्कन्धाः—] धर्माचे स्कंध—धर्माचे प्रविभाग आहेत, असा भावार्थ.ते कोणते, तें श्रुति सांगते—[यज्ञः—] अग्निहोत्रादिक, [अध्ययनं—] प्राङ्मुखत्वादि-नियमयुक्त पुरुषांचा ऋग्वेदादिकांचा अभ्यास, [दानं—] वेदीच्या बाहेर भिक्षा मागणाऱ्यांस यथाशक्ति द्रव्याचा विभाग करून देणें. [इति प्रथमः—] असा हा एक धर्मस्कंध आहे. हे धर्म गृहस्थसमवेत—गृहस्थसंबद्ध असल्यामुळें त्यांचा ते करणाऱ्या गृहस्थाच्या रूपानें निर्देश केला जातो. प्रथम हा शब्द ' पहिला ' या अर्थीं नाहीं, तर ' एक ' या अर्थीं आहे. कारण द्वितीय-तृतीयशब्दांचें त्यापुढें श्रवण आहे. त्यामुळें तो प्रथम शब्द ' आद्य ' या अर्थीं नाहीं (अर्थात् ' ब्रह्मचारी हा प्रथम आश्रम असतांना गृहस्थाला प्रथम कसें ह्मटलें ? ' ही आशंका उरत नाहीं. [तपः एव द्वितीयः—] तपच दुसरा आश्रम. तप म्हणजे कृच्छ्र-चांद्राय-

णादिक, त्यानें युक्त असा तापस किंवा परिव्राट्, ब्रह्मसंस्थ नव्हे, तर केवल आश्रमसंस्थ. कारण ब्रह्मनिष्ठाला अमृतत्व हें फल सांगितलें आहे. अर्थात् तापस किंवा नुस्ता आश्रममात्रसंस्थ संन्यासी हा दुसरा धर्मस्कंध–धर्मप्रविभाग. [ब्रह्मचारी आचार्यकुलवासी–] ब्रह्मचारी–आचार्यकुलांत वास करण्याचें ज्याचें शील आहे तो असा आचार्यकुलवासी [अत्यन्तं–] यावज्जीव [आत्मानं–] देहाला [आचार्यकुले–] आचार्यकुलांत राहून नियमांनीं [अवसायदन्–] क्षीण करणारा हा [तृतीयः–] तिसरा धर्मस्कंध. 'अत्यंत ' इत्यादि विशेषणांवरून नैष्ठिक ब्रह्मचारी येथें ज्ञात होतो. उपकुर्वाणाचें ब्रह्मचर्य स्वाध्यायग्रहणार्थ असल्यामुळें त्याच्या ब्रह्मचर्यानें पुण्यलोकत्व हें फल मिळत नाहीं. [सर्वे एते पुण्यलोकाः भवन्ति–] हे तिघेहि आश्रमी पूर्वोक्त यज्ञादि धर्मांनीं पुण्यलोक होतात. म्हणजे ज्यांचें पुण्यलोक हें फल आहे ते हे आश्रमी पुण्यलोक होतात. पण या तिघांत न सांगितलेला जो अवशिष्ट परिव्राड् तो–[ब्रह्मसंस्थः अमृतत्वं एति–] ब्रह्मामध्यें चांगल्याप्रकारें स्थित असलेला तो अमृतत्वास–पुण्यलोकाहून विलक्षण अशा अमरभावास–नित्य अमृतत्वास, देवादिकांच्या अमृतत्वाप्रमाणें आपेक्षिक अमृतत्वास नव्हे, प्राप्त होतो. (ब्रह्मनिष्ठ परिव्राजकाचें अमृतत्व आपेक्षिक कां नव्हे तें सांगतात–) कारण ब्रह्मसंस्थाला प्राप्त होणाऱ्या अमृतत्वाचा पुण्यलोकापासून विभाग केला आहे. त्यामुळें तें अमृतत्व पुण्यलोकाहून निराळें आहे, असें ठरतें आणि निराळें असल्यामुळेंच तें पुण्यलोकाप्रमाणें क्षयी नसून आत्यंतिक–नित्य–अक्षय आहे, असें सिद्ध होतें. याविषयीं अधिक सोपपत्तिक व सविस्तर विवेचन भाष्यार्थांत पहावें.सु.ब्र.पृ.२०१-९५पहा.१.–ज्यांत संस्थित झालेला अमृतत्वास प्राप्त होतो त्याचें निरूपण करण्यासाठीं श्रुति म्हणते—

प्रजापतिर्लोकानभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्यस्त्रयी विद्या संप्रास्रवत्तामभ्यतपत्तस्या अभितप्ताया एतान्यक्षराणि संप्रास्रवन्त भूर्भुवः स्वरिति ॥२

अन्वयार्थ—[प्रजापतिः०–] प्रजापति लोकांना उद्देशून [अभ्यतपत्–] ध्यानरूप तप करता झाला, [तेभ्यः०–] त्या अभितप्त लोकांपासून त्रयी विद्या [संप्रास्रवत्–] प्रजापतीच्या मनांत प्रादुर्भूत झाली. [तां अभ्यतपत्–] त्या विद्येला उद्देशून तो ध्यानरूप तप करता झाला. [तस्याः०–] त्या अभितप्त विद्येपासून ' भूः भुवः स्वः ' हीं अक्षरें [संप्रास्रवन्त–] प्रादुर्भूत झालीं.

तान्यभ्यतपत्तेभ्योऽभितप्तेभ्य ॐकारः संप्रास्रवत्तद्यथा शङ्कुना सर्वाणि पर्णानि संतृण्णान्येवमोंकारेण सर्वा वाक्संतृण्णोंकार एवेदꣳ सर्वमोंकार एवेदꣳ सर्वम् ॥ ३

इति द्वितीयाध्यायस्य त्रयोविंशः खण्डः ॥ २३

अन्वयार्थ—[तानि०—] त्या अक्षरांचें आलोचन केलें. त्या आलोचित व्याहृतींपासून ' ओंकार ' साररूपानें प्रकट झाला. [तत् यथा०—] व्यवहारांत पानाच्या देठानें सर्व पानें—पानांचें सर्व अवयव जसे व्याप्त असतात [एवं ओंकारेण०—] त्याप्रमाणें ओंकारानें सर्व वाक् व्याप्त आहे. [ओंकारः एव०—] ओंकारच हें सर्व आहे. ३ (२३)

—पंचविध व सप्तविध यज्ञांगभूत सामाच्या उपासनप्रसंगानें सामगुणयुक्त ओंकाराला कर्मगुणत्व प्राप्त झालें असतां त्यापासून त्याला निवृत्त करून तो परमात्म्याचें प्रतीक असल्यामुळें अमृतत्वाचें साधन—हेतु—या रूपानें त्यालाच मोठा—महत्त्ववान्—करून प्रकृत यज्ञाच्याच अंगभूत साम, होम, मंत्र व उत्थान यांचा उपदेश करणारा वेद म्हणतो—

पुरा प्रातरनुवाकस्योपाकरणाज्जघनेन गार्हपत्यस्यो-दङ्मुख उपविश्य स वासवꣳसामाभिगायति ॥ ३

अन्वयार्थ—[प्रातरनुवाकस्य उपाकरणात्पुरा—] प्रातरनुवाकाच्या प्रारंभाच्या पूर्वी [गार्हपत्यस्य जघनेन—] गार्हपत्याच्या पश्चाद्भागीं [उदङ्मुखः उपविश्य—] उत्तरेकडे तोंड करून बसून [सः वासवं साम अभिगायति—] तो वसुदैवत्य साम गातो. ३

लो३कद्वारमपावा३र्णू ३३ पश्येम त्वा वयꣳरा ३३३३३ हुं ३ आ ३३ ज्या ३ यो ३ आ ३२१११ इति ॥ ४

अन्वयार्थ— पृथिवीलोकाच्या प्राप्तीसाठीं [लोकद्वारं—] या लोकाचें द्वार [अपावृणु—] उघड [पश्येम त्वा—] आम्ही तुला पाहतों. कशासाठीं? [राज्याय—] पृथिवीनें दिलेल्या भोगासाठीं. (तुझ्या दर्शनानें व अनुज्ञेनें पृथिवीप्रयुक्त विषयभोगासाठीं हे अग्ने, मी तुला पाहतों.) ४.

अथ जुहोति नमोऽग्ये पृथिवीक्षिते लोकक्षिते लोकं मे यजमानाय विन्दैष वै यजमानस्य लोक एतास्मि ॥ ५

अन्वयार्थ—[अथ–] त्यानंतर 'नमोऽग्नये०' इत्यादि मंत्रानें [जुहोति–] हवन करतो. [नमो०–] अग्नीला आम्ही नमस्कार करतों. अग्नि कसा ? उत्तर– [पृथिवीक्षिते–] पृथिवीमध्यें राहणाऱ्या अग्नीला, [लोकक्षिते–] पृथिवी-लोकांत निवास करणाऱ्या तुला (नमस्कार करतों.) [मे यजमानाय लोकं विन्द–] मज यजमानासाठी लोकास प्राप्त हो. (मीं पृथिवीलोक मिळविला असतां तुझें काय होईल ? अशी आशंका घेऊन सांगतो–) [एष वै०–] हा यजमानाचा लोक आहे. [एतास्मि–] त्याला मी जाणार आहें. ५.

अत्र यजमानः परस्तादायुषः स्वाहाऽपजहि परिघमित्यु-
क्त्वोत्तिष्ठति तस्मै वसवः प्रातःसवनꣳसंप्रयच्छन्ति ॥ ६

अन्वयार्थ—[अत्र–] या लोकीं [यजमानः–] मी यजमान [आयुषः परस्तात्–] आयुष्य संपल्यावर (मरून जाणार आहें, असा वरच्या कंडिकेशीं संबंध.) 'स्वाहा' असें म्हणून होम करतो. [अपजहि परिघं–] द्वाराचा परिघ–अर्गला–आडणा दूर कर–काढ. [इति उक्त्वा उत्तिष्ठति–] असा मंत्र म्हणून उठतो. [तस्मै वसवः०–] त्याला वसु प्रातःसवन देतात. ६

पुरा माध्यंदिनस्य सवनस्योपाकरणाज्जघनेनाऽऽग्नीध्री-
यस्योदङ्मुख उपविश्य स रौद्रꣳसामाभिगायति ॥७॥
लो३कद्वारमपावा३र्णू३३ पश्येम त्वा वयं वैरा३३३३३
हुं३आ ३३ ज्या ३ यो ३ आ ३२१११ इति ॥ ८

अन्वयार्थ—माध्यंदिनसवनाच्या प्रारंभाच्या पूर्वीं [आग्नीध्रीयस्य०–] दक्षिणाग्नीच्या पश्चात् उदङ्मुख बसून यजमान रुद्रदैवत्य साम गातो. ७. हे वायो, अंतरिक्षलोकाचें द्वार उघड. आम्ही तुला वैराज्यासाठीं पाहतों. ८

अथ जुहोति नमो वायवेऽन्तरिक्षक्षिते लोकक्षिते लोकं मे
यजमानाय विन्दैष वै यजमानस्य लोक एताऽस्मि ॥९॥
अत्र यजमानः परस्तादायुषः स्वाहाऽपजहि परिघमि-
त्युक्त्वोत्तिष्ठति तस्मै रुद्रा माध्यंदिनꣳसवनꣳसंप्रयच्छन्ति ॥ १०

अन्वयार्थ—त्यानंतर या मंत्रानें हवन करतो–आम्ही अंतरिक्षांत राहणाऱ्या, अंतरिक्ष लोकांत राहणाऱ्या वायूला नमस्कार करतों. मज यजमानासाठीं

लोकास प्राप्त हो. हा यजमानाचा लोक आहे. या लोकीं मी यजमान आयुष्य संपल्यावर मरून [एतास्मि–] जाणार आहें स्वाहा. परिघास–द्वाराच्या अर्गलेस काढ. हा मंत्र म्हणून उठतो. त्याला रुद्र माध्यंदिनसवन देतात. ९-१०.

पुरा तृतीयसवनस्योपाकरणाज्जघनेनाऽऽहवनीयस्योदङ्मुख उपविश्य स आदित्यꣳ स वैश्वदेवꣳसामाभिगायति ॥११॥ लो३कद्वारमपावा३र्णू ३३ पश्येम त्वा वयꣳस्वारा-३३३३३हुं३आ३३ज्या३यो ३ आ३२१११इति ॥१२॥ आदित्यमथ वैश्वदेवं लो३कद्वारमपावा३र्णू३३पश्येम त्वा वयꣳसाम्रा३३३३३हुं३आ३३ज्या३यो३आ३२१११इति ॥ १३

अन्वयार्थ—तृतीयसवनाला प्रारंभ करण्याच्या पूर्वी आहवनीय अग्नीच्या पश्चाद्भागीं उदङ्मुख बसून यजमान आदित्यदैवत्य व वैश्वदेवदैवत्य साम गातो. ११ स्वर्गलोकाचें द्वार उघड. आम्ही तुला स्वाराज्यासाठीं पाहतों १२ आदित्यसंबंधी व विश्वेदेवसंबंधी लोकद्वारास उघड. आम्ही तुला साम्राज्यासाठीं पाहतों. १३.

अथ जुहोति नम आदित्येभ्यश्च विश्वेभ्यश्च देवेभ्यो दिविक्षिद्भ्यो लोकक्षिद्भ्यो लोकं मे यजमानाय विन्दत १४ एष वै यजमानस्य लोक एताऽस्म्यत्र यजमानः परस्तादायुषः स्वाहाऽपहत परिघमित्युक्त्वोत्तिष्ठति ॥१५॥ तस्मा आदित्याश्च विश्वे च देवास्तृतीयसवनꣳसंप्रयच्छन्त्येष ह वै यज्ञस्य मात्रां वेद य एवं वेद य एवं वेद ॥ १६

इति द्वितीयाध्यायस्य चतुर्विंशः खण्डः ॥२४

इति छान्दोग्योपनिषद्ब्राह्मणे द्वितीयोऽध्यायः समाप्तः ॥२

अन्वयार्थ—त्यानंतर 'नमः०' इत्यादि मंत्रानें हवन करतो. स्वर्गांत राहणाऱ्या, द्युलोकांत निवास करणाऱ्या आदित्यांस व विश्वेदेवांस आम्ही नमस्कार करतों. मज यजमानासाठीं या लोकास प्राप्त व्हा. १४ हा यजमानाचा लोक आहे. आयुष्य संपल्यावर मी यजमान या लोकीं जाणार आहें; स्वाहा. 'त्या लोकद्वाराचा परिघ–आडणा काढ.' असा मंत्र म्हणून उठतो. १५त्याला आदित्य व विश्वेदेव तृतीयसवनसंबद्ध लोक देतात. पूर्वोक्त सामादिकांना जो असें जाणतो तो सामादिकांचा ज्ञाता यज्ञाचें 'मात्रां'–यथार्थ स्वरूप जाणतो. २४ (१२)

अथ तृतीयोऽध्यायः ।

कर्मांगावबद्ध उपासना संपवून कर्मफलरूप आदित्याच्या स्वतंत्र उपासनेचें विधान करण्यासाठीं हा तिसरा अध्याय आरंभिला जातो—

ॐ । असौ वा आदित्यो देवमधु तस्य द्यौरेव तिरश्चीन-
वꣳशोऽन्तरिक्षमपूपो मरीचयः पुत्राः ॥ १

अन्वयार्थ—[असौ वै०—] हाच आदित्य देवमधु—देवांचा मध आहे. [द्यौः एव तस्य तिरश्चीनवंशः—] द्युलोक हाच त्याचा तिरकस वंश—काठी आहे. [अंतरिक्षं अपूपः—] अंतरिक्ष हेंच पोळें व [मरीचयः पुत्राः—] किरण पुत्र आहेत.

तस्य ये प्राञ्चो रश्मयस्ता एवास्य प्राच्यो मधुनाड्यः । ऋच एव
मधुकृत ऋग्वेद एव पुष्पं ता अमृता आपस्ता वा एता ऋचः ॥ २

अन्वयार्थ—[तस्य—] त्या सवित्याचे [ये प्राञ्चः०—] जे पूर्व दिशेंतील रश्मी [ताः एव०—] त्याच याच्या पूर्वेकडील मधुनाड्या—मधाचीं छिद्रें आहेत. [ऋचः०—] ऋचा हेच मध करणारे भ्रमर, [ऋग्वेदः०—] ऋग्वेदच पुष्प, [ताः०—] त्या सोमादि अमृत आप् आहेत. [ताः वै एताः ऋचः—] त्या ह्या ऋचा, (याचा संबंध पुढील ' अभ्यतपन् ' या क्रियापदाशीं आहे.) २

एतमृग्वेदमभ्यतपꣳस्तस्याभितप्तस्य यशस्तेज
इंद्रियं वीर्यमन्नाद्यꣳ रसोऽजायत ॥ ३

अन्वयार्थ—(त्या ऋचा) [एतं०—] ऋग्वेदविहित कर्मांस अभिताप करत्या झाल्या. [तस्य०—] त्या अभितप्त ऋग्वेदाचा यश, तेज, इंद्रिय, वीर्य व अन्नाद्य हा रस उत्पन्न झाला. ३.

तव्यक्षरत्तदादित्यमभितोऽश्रयत्तद्वा एतद्यदेतदादितस्य रोहितꣳरूपम् ॥

इति तृतीयाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—तें यशादि [व्यक्षरत्—] विशेषतः गेलें. [तत् आदित्यं०—] तें जाऊन आदित्याच्या पूर्वभागाचा आश्रय करतें झालें. [तत्०—] तेंच हें आहे. [यत् एतत्०—] जें हें आदित्याचें रोहित—लाल रूप. ४ (१)

अथ येऽस्य दक्षिणा रश्मयस्ता एवास्य दक्षिणा मधुनाड्यो यजूꣳष्येव मधुकृतो यजुर्वेद एव पुष्पं ता अमृता आपः ॥ १

अन्वयार्थ—[अथ०—] नंतर जे याचे दक्षिणेकडील रश्मी त्याच त्याच्या दक्षिणेकडील मधुनाड्या. [यजूंषि एव०—] यजुर्षे हेच भ्रमर, यजुर्वेदच पुष्प, त्याच अमृत आप् आहेत. १.

तानि वा एतानि यजूꣳष्येतं यजुर्वेदमभ्यतपꣳस्तस्याभितप्तस्य यशस्तेज इन्द्रियं वीर्यमन्नाद्यꣳ रसोऽजायत॥२॥तद्व्यक्षरत्त-दादित्यमभितोऽश्रयत्तद्वा एतद्यदेतदादित्यस्य शुक्लꣳरूपम् ॥३

इति तृतीयाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—[तानि वै एतानि०—] तींच हीं यजुर्षे—यजुर्मंत्र या यजुर्वेदास अभितप्त करिते झाले. त्या अभितप्त यजुर्वेदाचा यश, तेज, इंद्रिय, बल व अन्नाद्य हा रस उत्पन्न झाला २. [तत् व्यक्षरत्०—] तें यशःप्रभृति रसजात विशेषतः गेलें. तें आदित्याचा दक्षिणतः आश्रय करतें झालें. तेंच हें होय. (हें काय ?) जें हें आदित्याचें शुक्ल रूप. ३ (२)

अथ येऽस्य प्रत्यञ्चो रश्मयस्ता एवास्य प्रतीच्यो मधुनाड्यः सामान्येव मधुकृतः सामवेद एव पुष्पं ता अमृता आपः ॥ १ ॥ तानि वा एतानि सामान्येतꣳ सामवेद-मभ्यतपꣳ स्तस्याभितप्तस्य यशस्तेज इन्द्रियं वीर्यमन्ना-द्यꣳ रसोऽजायत ॥ २ ॥ तद्व्यक्षरत्तदादित्यमभितोऽ-श्रयत्तद्वा एतद्यदेतदादितस्य कृष्णꣳ रूपम् ॥ ३

इति तृतीयाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—नंतर जे याचे पश्चिमेकडील रश्मी तीं पश्चिमेकडील मधुछिद्रें आहेत. सामवेदविहित कर्मांमध्यें प्रयुक्त सामें हेच मध करणारे भ्रमर, सामवेदविहित कर्म हेंच पुष्प व ते सोमादि याच अमृत आप आहेत. १. तीं हीं सामें सामवेदास अभितप्त करतीं झालीं. त्या अभितप्त सामवेदाचा यश, तेज, इंद्रिय, वीर्य व अन्नाद्य हा रस उत्पन्न झाला. २. तें यशादि गेलें व त्यानें आदित्याचा अभितः आश्रय केला. तेंच हें कीं जें हें आदित्याचें कृष्ण रूप. १-३ (३)

अथ येऽस्योदञ्चो रश्मयस्ता एवास्योदीच्यो मधुनाड्योऽथर्वाङ्गिरस एव मधुकृत इतिहासपुराणं पुष्पं ता अमृता आपः ॥ १ ॥ ते वा एतेऽथर्वाङ्गिरस एतदितिहासपुराणमभ्यतपꣳस्तस्याभितप्तस्य यशस्तेज इंद्रियं वीर्यमन्नाद्यꣳरसोऽजायत ॥ २ ॥ तद्व्यक्षरत्तदादित्यमभितोऽश्रयत्तद्वा एतद्यदेतदादितस्य परं कृष्णꣳ रूपम् ॥ ३

इति तृतीयाध्यायस्य चतुर्थः खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—नंतर जे या आदित्य मधूचे उत्तरेकडील किरण त्याच याच्या उत्तरेकडील मधुनाड्या—मधाचीं छिद्रें. अथर्वा व अंगिरा यांनीं पाहिलेले व कर्मामध्यें प्रयुक्त असे मंत्र हेच भ्रमर, इतिहास-पुराण हेंच पुष्प व त्या सोमादिरूप आप. १. तेच हे अथर्वांगिरस—मंत्र या इतिहासपुराणांस अभितप्त करते झाले. त्या अभितप्त इतिहासपुराणांपासून यश, तेज, इंद्रिय, वीर्य व अन्नाद्य हा रस उत्पन्न झाला २. तें यशादिक गेलें, तें आदित्याचा अभितः आश्रय करतें झालें. हेंच तें मधु कीं जें आदित्याचें अत्यंत कृष्ण रूप ३ (४).

अथ येऽस्योर्ध्वा रश्मयस्ता एवास्योर्ध्वा मधुनाड्यो गुह्याऽऽदेशा मधुकृतो ब्रह्मैव पुष्पं ता अमृता आपः ॥ १ ॥ ते वा एते गुह्या आदेशा एतद्ब्रह्माभ्यतपꣳस्तस्याभितप्तस्य यशस्तेज इन्द्रियं वीर्यमन्नाद्यꣳरसोऽजायत ॥ २ ॥ तद्व्यक्षरत्तदादित्यमभितोऽश्रयत्तद्वा एतद्यदेतदादितस्य मध्ये क्षोभत इव ॥ ३

अन्वयार्थ—आतां जे याचे ऊर्ध्व रश्मी त्याच या मधूच्या ऊर्ध्व—वरील मधुनाड्या—मधाचीं छिद्रें होत. गुह्य आदेश याच मधमाशा होत. प्रणवसंज्ञक ब्रह्म हेंच पुष्प व त्या सोमादिक अमृत आप आहेत १. तेच हे गुह्य आदेश प्रणवाख्य पुष्पाला अभितप्त करते झाले. या अभितप्त ब्रह्माचा यश, तेज, इंद्रिय, वीर्य व अन्नाद्य हा रस उत्पन्न झाला २. तें यशादिक विशेषतः गेलें, तें आदित्याचा सर्वतः आश्रय करतें झालें. तेंच हें मधु होय कीं जें आदित्या-

मध्यें जणुं काय क्षुब्ध होतें. संचलन पावतें. ३–याप्रमाणें पांच मधूंचें व्याख्यान करून त्या सर्वांचें ध्येयत्व सिद्ध होण्यासाठीं श्रुति स्तुति करिते—

ते वा एते रसनाꣳरसा वेदा हि रसास्तेषामेते रसास्तानि वा एतान्यमृतानाममृतानि वेदा ह्यमृतास्तेषामेतान्यमृतानि ॥ ४

इति तृतीयाध्यायस्य पंचमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[ते वै०–] ते हे रसांचे रस आहेत. [वेदाः हि रसाः–] वेदच रस आहेत. [तेषां०–] त्यांचे हे रस आहेत. [तानि वै एतानि०–] तीं हीं अमृतांचीं अमृतें आहेत. [वेदाः०–] वेद अमृत आहेत. [तेषां०–] त्यांचीं हीं अमृतें ४ (५)

–ध्यानास योग्य अशीं अमृतें सांगून त्यांवर उपजीविका करणारे जे देव अनुचिंतनीय आहेत त्यांचा श्रुति उपदेश करते—

तद्यत्प्रथममृतं तद्वसव उपजीवन्त्यग्निना मुखेन न वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥ १

अन्वयार्थ—[तत्०–] तें जें प्रथम अमृत त्यावर वसू [अग्निना मुखेन–] अग्निमुखानें–अग्निप्रधान होत्साते [उपजीवन्ति–] उपजीविका करितात. [देवाः न अश्नन्ति न पिबन्ति–] देव खात नाहींत व पीत नाहींत. [एतत् एव अमृतं०–] हेंच रोहित रूप पाहून–त्याच्या ज्ञानानें तृप्त होतात. १. –ते देव उद्यम न करितांच अमृतावर उपजीविका करितात काय ? उत्तर—

त एतदेव रूपमभिसंविशन्त्येतस्माद्रूपादुद्यन्ति ॥ २

अन्वयार्थ—ते देव याच रूपाला अभिलक्षून त्यांत प्रवेश करितात व त्याच रूपापासून भोगकालीं उद्यत–उत्साहवान् होतात. २

स य एतदेवममृतं वेद वसूनामेवैको भूत्वाग्निनैव मुखेनैतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यति एतदेव रूपमभिसंविशत्येतस्माद्रूपादुदेति ॥ ३

अन्वयार्थ—तो जो हें असें अमृत जाणतो तो वसूंतीलच एक होऊन अग्नीच्या प्राधान्यानें हेंच अमृत पाहून तृप्त होतो. तो याच रूपांत अभितः संप्रवेश करतो व या रूपापासूनच उदय पावतो. ३.–विद्वान् केवढा वेळ त्या अमृतावर निर्वाह करितो ? उत्तर—

स यावदादित्यः पुरस्तादुदेता पश्चादस्तमेता वसूना-
मेव तावदाधिपत्यꣳस्वाराज्यं पर्येता ॥ ४

इति तृतीयाध्यायस्य षष्ठः खण्डः ॥ ६

अन्वयार्थ—तो जोंवर आदित्य पूर्वेकडे उदय पावेल व पश्चिमदिशेस अस्त पावेल तोंवर वसूंच्याच आधिपत्यास स्वाराज्यास प्राप्त होतो ४ (६)

अथ यद्द्वितीयममृतं तद्रुद्रा उपजीवन्तीन्द्रेण मुखेन न
वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥ २

अन्वयार्थ—नंतर जें दुसरें अमृत त्यावर रुद्र उपजीविका करितात. इंद्राच्या प्राधान्यानें. देव खात नाहींत व पीत नाहीत. हेंच अमृत पाहून तृप्त होतात.१

त एतदेव रूपमभिसंविशन्त्येतस्माद्रूपादुद्यन्ति ॥ २

अन्वयार्थ—ते याच रूपांत आभिमुख्यानें सवेशन करितात व त्याच रूपापासून उद्गमन करितात. २

स य एतदेवममृतं वेद रुद्राणामेवैको भूत्वेन्द्रेणैव मुखेनैतदेवामृतं
दृष्ट्वा तृप्यति स एतदेव रूपमभिसंविशत्येतस्माद्रूपादुदेति ॥३

अन्वयार्थ—तो जो हें असें अमृत जाणतो तो रुद्रांतील एक रुद्र होऊन इंद्राच्याच प्राधान्यानें हेंच अमृत पाहून तृप्त होतो. तो याच रूपांत अभितः संवेशन करतो व त्याच रूपापासून उदय पावतो ३.

स यावदादित्यः पुरस्तादुदेता पश्चादस्तमेता द्विस्तावद्दक्षिणत
उदेतोत्तरतोऽस्तमेता रुद्राणामेव तावदाधिपत्यꣳस्वाराज्यं पर्येता ॥

इति तृतीयाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—तो जोंवर आदित्य पूर्वेस उदय पावतो व पश्चिमेस अस्त पावतो त्याच्या द्विगुण काल दक्षिणतः उदय पावणारा व उत्तरतः अस्त पावणारा असा होतो. तोंवर तो रुद्रांचेंच आधिपत्य व स्वाराज्य यांस परितः प्राप्त होतो.४(७)

अथ यत्तृतीयममृतं तदादित्या उपजीवन्ति वरुणेन मुखेन न
वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥ १

अन्वयार्थ—नंतर जें तृतीय अमृत त्यावर आदित्य उपजीविका करितात. वरुणाच्या मुखानें. देव खात नाहींत व पीत नाहींत, तर हेंच अमृत पाहून तृप्त होतात. १.

त एतदेव रूपमभिसंविशन्त्येतस्माद्रूपादुद्यन्ति ॥ २

अन्वयार्थ—ते उपासक याच रूपांत अभितः संवेशन करितात व याच रूपापासून उदय पावतात २.

स य एतदेवममृतं वेदाऽऽदित्यानामेवैको भूत्वा वरुणेनैव मुखेनैतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति स एतदेव रूपमभिसंविशत्येतस्माद्रूपादुदेति ॥३

अन्वयार्थ—तो जो हें असें अमृत जाणतो तो आदित्यांतील एक होऊन वरुणाच्याच मुखानें हेंच अमृत पाहून तृप्त होतो, तो याच रूपांत अभितः संवेशन—प्रवेश करतो व त्याच रूपापासून उदय पावतो. ३.

स यावदादित्यो दक्षिणत उदेतोत्तरतोऽस्तमेता द्विस्तावत्पश्चादुदेता पुरस्तादस्तमेताऽऽदित्यानामेव तावदाधिपत्यꣳस्वाराज्यं पर्येता ॥ ४

इति तृतीयाध्यायस्याष्टम. खण्ड. ॥ ८ ॥

अन्वयार्थ—तो जोंवर आदित्य दक्षिणतः उदय पावतो व उत्तरेस अस्त पावतो त्याच्या दुप्पट काल पश्चिमेंत उदय पावतो व पूर्वेंत अस्त पावतो. तो तोंवर आदित्यांच्याच आधिपत्यास व स्वाराज्यास प्राप्त होतो. ४. (८)

अथ यच्चतुर्थममृतं तन्मरुत उपजीवन्ति सोमेन मुखेन न वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यन्ति ॥ १

अन्वयार्थ—नंतर जें चतुर्थ अमृत त्यावर मरुत उपजीविका करितात. सोमाच्या प्राधान्यानें. देव खात नाहीत व पीत नाहींत, तर हेंच अमृत पाहून तृप्त होतात. १.

त एतदेव रूपमभिसंविशन्त्येतस्माद्रूपादुद्यन्ति ॥ २

अन्वयार्थ—ते याच रूपांत प्रवेश करितात व त्या रूपापासूनच उदय पावतात. २.

स य एतदेवममृतं वेद मरुतामेवैको भूत्वा सोमेनैव मुखेनैतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यति स एतदेव रूपमभिसंविशत्येतस्माद्रूपादुदेति ॥ ३

अन्वयार्थ—तो जो हें असें अमृत जाणतो तो मरुतांतील एक होऊन—मरुद्भावास प्राप्त होऊन सोम याच मुखानें—सोमाच्या प्राधान्यानें हेंच अमृत पाहून तृप्त होतो. तो याच रूपांत अभिसंवेशन करतो. या रूपापासून उदय पावतो.

स यावदादित्यः पश्चादुदेता पुरस्तादस्तमेता द्वित्तावदुत्तरत उदेता दक्षिणतोऽस्तमेता मरुतामेव तावदाधिपत्यꣳस्वाराज्यं पर्येता ॥ ४

इति तृतीयाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—तो आदित्य जोंवर पश्चिमेंत उदय पावेल व पूर्वेंत अस्त पावेल त्याच्या दुप्पट कालपर्यंत उत्तरतः उदय पावेल व दक्षिणतः अस्त पावेल. तो तोंवर मरुतांच्याच आधिपत्यास स्वाराज्यास प्राप्त होईल. ४. (९)

अथ यत्पञ्चममृतं तत्साध्या उपजीवन्ति ब्रह्मणा मुखेन न वै देवा अश्नन्ति न पिबन्त्येतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यति ॥ १

अर्थ—नंतर जें पांचवें अमृत त्यावर साध्य उपजीविका करितात. ब्रह्माच्या प्राधान्यानें. देव खात नाहीत व पीत नाहींत. हेंच अमृत पाहून तृप्त होतात.१.

त एतमेव रूपमभिसंविशन्त्येतस्माद्रूपादुद्यन्ति ॥ २

अर्थ—ते याच रूपांत अभिसंवेशन करितात व याच रूपापासून उदय पावतात.

स य एतदेवममृतं वेद साध्यानामेवैको भूत्वा ब्रह्मणैव मुखेनैतदेवामृतं दृष्ट्वा तृप्यति स एतदेव रूपमभिसंविशत्येतस्माद्रूपादुदेति ३

अन्वयार्थ—तो जो हें असें अमृत जाणतो तो साध्यांतील एक होऊन ब्रह्ममुखानें हेंच अमृत पाहून तृप्त होतो. याच रूपांत तो अभिसंवेशन करतो व यां रूपापासून उदय पावतो. ३.

स यावदादित्य उत्तरत उदेता दक्षिणतोऽस्तमेता द्वित्तावदूर्ध्व उदेताऽर्वाङस्तमेता साध्यानामेव तावदाधिपत्यꣳ स्वाराज्यं पर्येता ॥ ४

इति तृतीयाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—तो जोंवर आदित्य उत्तरतः उदय पावेल व दक्षिणतः अस्त पावेल त्याच्या दुप्पट कालपर्यंत ऊर्ध्व उदय पावेल व अर्वाक्—खालीं अस्त पावेल. तोंपर्यंत तो उपासक साध्यांचेंच आधिपत्य व स्वाराज्य भोगील. ४(१०)

अथ तत ऊर्ध्व उदेत्य नैवोदेता नास्तमे-
तैकल एव मध्ये स्थाता तदेष श्लोकः ॥ १

अन्वयार्थ—[अथ ततः–] नंतर प्राप्यावर अनुग्रह करण्याचा जो काल त्यानंतर [ऊर्ध्वः–] ब्रह्मीभूत होऊन राहणारा [उदेत्य०–] स्वात्मस्वरूपांतच प्रकाश पावून प्राप्यासाठी उदय पावणार नाही व अस्त पावणार नाहीं. तर एकाकीच [मध्ये०–] स्वरूपांत स्थित होईल. त्याअर्थीं हा श्लोक आहे १.

न वै तत्र न निम्लोच नोदियाय कदाचन देवा-
स्तेनाहꣳसत्येन मा विराधिषि ब्रह्मणेति ॥ २

अन्वयार्थ—[न वै तत्र–] त्या ब्रह्मलोकांत हें नाहीं. हें काय? उत्तर– [न निम्लोच–] सविता अस्त पावला नाही, [नोदियाय कथंचन–] व केव्हांहि उदय पावला नाहीं. [हे देवाः०–] हे देवहो, त्या सत्य ब्रह्मस्वरूपाशीं मी विरुद्ध होणार नाहीं. २.

न ह वा अस्मा उदेति न निम्लोचति सकृद्दिवा
हैवास्मै भवति य एतामेवं ब्रह्मोपनिषदं वेद ॥ ३

अन्वयार्थ—[न ह वा०–] त्या ब्रह्मवेत्त्याला सवित्याचा उदय होत नाहीं व अस्त होत नाही. [सकृत् दिवा०–] त्याला सतत दिवसच असतो. (कोणाला ?) [यः एतां एवं०–] जो याप्रमाणें त्या ब्रह्मोपदेशाला–वेद-रहस्याला जाणतो. ३.

तद्धैतद्ब्रह्मा प्रजापतय उवाच प्रजापतिर्मनवे मनुः प्रजाभ्यस्त-
द्धैतदुद्दालकायारुणये ज्येष्ठाय पुत्राय पिता ब्रह्म प्रोवाच ॥ ४

अन्वयार्थ—तें हें मधुज्ञान ब्रह्मा–हिरण्यगर्भ प्रजापतीला सांगता झाला. तोहि मनूला सांगता झाला. मनु प्रजांना सांगता झाला. तें हें मधुविज्ञान म्ह० ब्रह्म उद्दालक-अरुणपुत्राला म्ह० ज्येष्ठ पुत्राला त्याचा पिता सांगता झाला. ४.

इदं वाव तज्ज्येष्ठाय पुत्राय पिता ब्रह्म प्रब्रूयात्प्राणाय्याय वाऽन्तेवासिने॥

अर्थ—हेंच तें ब्रह्मविज्ञान पिता ज्येष्ठ पुत्राला किंवा योग्य शिष्याला सांगो.५

नान्यस्मै कस्मैचन यद्यप्यस्मा इमामद्भिः परिगृहीतां धनस्य
पूर्णां दद्यादेतदेव ततो भूय इत्येतदेव ततो भूय इति ॥ ६

इति तृतीयाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—[अन्यस्मै कस्मै०—] दुसऱ्या कोणालाहि तें सांगूं नये. [यद्यपि अस्मै०—] जरी या आचार्याला कोणी ही समुद्रपरिवेष्टित व धनानें पूर्ण अशी पृथिवी दिली तरी त्या दुसऱ्याला हें सांगूं नये. कारण [ततः एतत् एव भूयः०—] त्याहून हेंच अधिक आहे. हेंच त्याहून अधिक आहे, ह्मणून. ६(११)

ज्याअर्थीं ही ब्रह्मविद्या वर सांगितल्याप्रमाणें अतिशय फल देणारी आहे त्याअर्थीं ती दुसऱ्या प्रकारानेंहि सांगावी, ह्मणून ' गायत्री वा०-' इत्यादि खंडाचा आरंभ केला जातो—

गायत्री वा इद् सर्वं भूतं यदिदं किंच वाग्वै गायत्री
वाग्वा इदꣳसर्वं भूतं गायति च त्रायते च ॥ १

अन्वयार्थ—गायत्रीच हें सर्व भूत—प्राणिजात आहे. जें हें कांहीं स्थावर-जंगमभूतजात आहे तें गायत्रीच. वाक्-च गायत्री, वाक्-च हें सर्व भूतजात. ती गाते व रक्षण करते. सु ब्र. पृ. ३७ पहा. याचा सोपपत्तिक अर्थ भाष्यार्थांत पहा. १.

या वै सा गायत्रीयं वाव सा येयं पृथिव्यस्याꣳ
हीदꣳसर्वं भूतं प्रतिष्ठितमेतामेव नातिशीयते ॥ २

अन्वयार्थ—[या वै सा गायत्री—] ती जी गायत्री [इयं वाव सा—] ती हीच होय, कीं [या इयं पृथिवी—] जी ही पृथिवी [अस्यां हि०—] हिच्या-मध्येंच हें सर्व भूतजात प्रतिष्ठित आहे. [एतां एव न अतिशीयते—] तिलाच सोडून भूतजात राहूं शकत नाहीं. २.

या वै सा पृथिवीयं वाव सा यदिदमस्मिन्पुरुषे शरीर-
मस्मिन्हीमे प्राणाः प्रतिष्ठिता एतदेव नातिशीयन्ते ॥ ३

अन्वयार्थ—तीच जी पृथिवी ती हीच होय, कीं जें हें या पुरुषांत—जिवंत कार्य-करणसंघातांत शरीर आहे. कारण या शरीरांतच हे प्राण प्रतिष्ठित आहेत व प्राण याच शरीराला सोडून रहात नाहींत. ३.

यद्वै तत्पुरुषे शरीरमिदं वाव तद्यदिदमस्मिन्नन्तःपुरुषे
हृदयमस्मिन्हीमे प्राणाः प्रतिष्ठिता एतदेव नातिशीयन्ते ॥४

अन्वयार्थ—तेंच जें पुरुषांतील शरीर तें हेंच होय. जें हें या अंतःपुरुषांत

हृदय आहे. यांतच हे सर्व प्राण प्रतिष्ठित आहेत. ते या हृदयाचेंच उल्लंघन करून रहात नाहींत. ४.

सैषा चतुष्पदा षड्विधा गायत्री तदेतदृचाऽभ्यनूक्तम् ॥ ५

अन्वयार्थ—ती ही चतुष्पदा–जिला चार पाद आहेत अशी व षड्विधा –सहा प्रकारची गायत्री [तत् एतत्०–] तें हें गायत्र्याख्य ब्रह्म [ऋचा–] मंत्रानेंहि प्रकाशित केलेलें आहे. ५.

तावानस्य महिमा ततो ज्यायाꣳश्च पुरुषः पादोऽस्य सर्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवीति ॥ ६

अन्वयार्थ—या गायत्र्याख्य ब्रह्माचा तेवढा महिमा–विभूतिविस्तार आहे. त्याहून सर्वव्यापी निर्विकार पुरुष ज्यायान्–अधिक मोठा आहे सर्व भूतें हा याचा एक पाद आहे व याचें त्रिपाद् अमृत 'दिवि'–स्वात्म्यामध्यें अवस्थित आहे. सु. ब्र. पृ. १५१ पहा. ६.

यद्वै तद्ब्रह्मेतीदं वाव तद्योऽयं बहिर्धा पुरुषादाकाशो यो वै स बहिर्धा पुरुषादाकाशः ॥ ७ ॥ अयं वाव स योऽयमन्तःपुरुष आकाशो यो वै सोऽन्तःपुरुष आकाशः ८ अयं वाव स योऽयमन्तर्हृदय आकाशस्तदेतत्पूर्णमप्रवर्ति पूर्णामप्रवर्तिनीꣳश्रियं लभते य एवं वेद ॥ ९

इति तृतीयाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—[यद्वै०–] तेंच जें त्रिपाद् अमृतरूप ब्रह्म तें हेंच होय. (हें कोणतें?) [यः अयं०–] जो हा पुरुषाहून बाहेरील भूताकाश; आणि जो हा पुरुषाहून बाहेरील आकाश ७, तो हाच होय कीं जो हा पुरुषाच्या आंत आकाश आहे. तो जो अन्तःपुरुषांतील आकाश ८ तो हाच होय कीं जो हा हृदयांतील आकाश आहे. तें हें पूर्ण व कोठेंहि प्रवृत्त न होणारें आहे. जो असें जाणतो तो पूर्ण व 'अप्रवर्तिनी'–नाश न पावणाऱ्या श्रीस प्राप्त होतो. ९(१२)

'तस्य ह वा०' इत्यादि खंडानें गायत्रीसंज्ञक ब्रह्माच्या उपासनांगत्वानें द्वारपालादि गुणांचें विधान करण्यासाठीं आरंभ केला जातो. ज्याप्रमाणें व्यवहारांत उपासनेनें वश करून घेतलेले राजाचे द्वारपाल राजाच्या दर्शनादिकाला

कारण होतात त्याप्रमाणें या द्वारपालांना वश करून घेतल्यास ते ब्रह्मदर्शनाला कारण होतात—

तस्य ह वा एतस्य हृदयस्य पञ्च देवसुषयः स योऽस्य प्राङ् सुषिः स प्राणस्तच्चक्षुः स आदित्यस्तदेतत्तेजोऽन्नाद्यमित्युपासीत तेजस्व्यन्नादो भवति य एवं वेद ॥ १

अन्वयार्थ—[तस्य०–] त्याच या हृदयाच्या पांच देवसुषी आहेत. (सुषी म्ह० स्वर्गलोकप्राप्तीचीं द्वारभूत छिद्रें) [अस्य यः प्राङ् सुषिः०–] त्याचा जो पूर्वेकडील सुषि तो प्राण, तो चक्षु व तो आदित्य; त्या या प्राणाख्य ब्रह्माची तेज व अनाद्य या गुणांनीं विशिष्ट अशी उपासना करावी. जो असें जाणतो म्ह० अशी उपासना करतो तो तेजस्वी व अन्नाद–दीप्ताग्नि होतो १.

अथ योऽस्य दक्षिणः सुषिः स व्यानस्तच्छ्रोत्रꣳस चन्द्रमास्तदेतच्छ्रीश्च यशश्चेत्युपासीत श्रीमान्यशस्वी भवति य एवं वेद ॥ २

अन्वयार्थ—आतां जो या हृदयाचा दक्षिण सुषि, तो व्यान, तें श्रोत्र, तो चंद्रमा. त्या याची श्री–विभूति व यश या गुणांनीं विशिष्ट अशी उपासना करावी. जो असें जाणतो तो श्रीमान् व यशस्वी होतो. २

अथ योऽस्य प्रत्यङ् सुषिः सोऽपानः सा वाक्सोऽग्निस्तदेतद्ब्रह्मवर्चसमन्नाद्यमित्युपासीत ब्रह्मवर्चस्यन्नादो भवति य एवं वेद ॥ ३

अन्वयार्थ—नंतर या हृदयाचा जो पश्चिमेकडील सुषि–छिद्र त्यांतील वायुविशेष हा अपान, ती वाक्, तो अग्नि. त्या या अपानाख्य ब्रह्माची ब्रह्मवर्चस व अन्नाद्य यांनीं विशिष्ट अशी उपासना करावी. जो असें जाणतो तो ब्रह्मवर्चसी व दीप्ताग्नि होतो ३.

अथ योऽस्योदङ् सुषिः स समानस्तन्मनः स पर्जन्यस्तदेतत्कीर्तिश्च व्युष्टिश्चेत्युपासीत कीर्तिमान्व्युष्टिमान्भवति य एवं वेद ॥ ४

अन्वयार्थ—नंतर या हृदयाचा जो हा उत्तरेकडील सुषि तो समान, तें मन व तो पर्जन्य. तें समानाख्य ब्रह्म कीर्ति व व्युष्टि–देहांतील लावण्य या गुणांनीं युक्त असें उपासावें. जो असें जाणतो तो कीर्तिमान् व कांतिमान् होतो. ४.

अथ योऽस्योर्ध्वः सुषिः स उदानः स वायुः स आकाशस्तदेतदोजश्च महश्चेत्युपासीतौजस्वी महस्वान्भवति य एवं वेद ॥ ५

अन्वयार्थ—आतां जो या हृदयाचा ऊर्ध्व सुषि तो उदान, तो वायु, तो आकाश, त्या या उदानाख्य ब्रह्माची 'ओज' व 'महः' या गुणांनीं विशिष्ट अशी उपासना करावी. जो असें जाणतो तो ओजस्वी व महस्वान् होतो ५.

ते वा एते पञ्च ब्रह्मपुरुषाः स्वर्गस्य लोकस्य द्वारपाः स य एतानेवं पञ्च ब्रह्मपुरुषान्स्वर्गस्य लोकस्य द्वारपान्वेदास्य कुले वीरो जायते प्रतिपद्यते स्वर्गं लोकं य एतानेवं पञ्च ब्रह्मपुरुषान्स्वर्गस्य लोकस्य द्वारपान्वेद ॥ ६

अन्वयार्थ—तेच हे पांच ब्रह्मपुरुष आहेत. स्वर्ग लोकाचे द्वारपाल. तो जो कोणी अशा रीतीनें या पांच ब्रह्मपुरुषांस स्वर्गलोकाच्या द्वारपालांस जाणतो त्याच्या कुलांत वीर—पुत्र उत्पन्न होतो. जो या पांच ब्रह्मपुरुषांस स्वर्गलोकाच्या द्वारपालांस जाणतो तो स्वर्गलोकास प्राप्त होतो. ६.—आतां श्रुति दुसऱ्या उपासनेचा उपक्रम करिते—

अथ यदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते विश्वतः पृष्ठेषु सर्वतः पृष्ठेष्वनुत्तमेषूत्तमेषु लोकेष्विदं वाव तद्यदिदमस्मिन्नन्तःपुरुषे ज्योतिस्तस्यैषा दृष्टिर्यत्रैतदस्मिञ्छरीरे सꣳस्पर्शेनोष्णिमानं विजानाति तस्यैषा श्रुतिर्यत्रैतत्कर्णावपिगृह्य निनदमिव नदथुरिवाग्नेरिव ज्वलत उपशृणोति तदेतद्दृष्टं च श्रुतं चेत्युपासीत चक्षुष्यः श्रुतो भवति य एवं वेद य एवं वेद ॥ ७

इति तृतीयाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ—[अथ—] आतां दुसरी उपासना—[यत्—] जी [अतः दिवः परः—] या द्युलोकाच्या पलीकडे ज्योति [दीप्यते—] दीप्त होते, [विश्वतः०—] विश्वाच्या पृष्ठांवर म्ह० सर्वांच्या पृष्ठावर—ज्याच्यापेक्षां उत्तम लोक नाहींत अशा उत्तम लोकांमध्यें जी ज्योति दीप्त होते [इदं वाव तत्—] ती ज्योति हीच आहे. (ही कोणती ?) जी ही या अन्तःपुरुषांत ज्योति आहे, [तस्य०—] त्या ज्योतीची ही दृष्टि—[यत्र०—] ज्यावेळीं या शरीरांत संस्पर्शानें उष्णत्वास जाणतो ती दृष्टि व त्याची ही श्रुति—ज्यावेळीं दोन्ही कान झांकून रथाच्या घोषासारखा घोष, बैलाच्या डुकरण्यासारखा शब्द किंवा बाहेर जळणाऱ्या अग्नीच्या ध्वनीसारखा ध्वनि ऐकतो, ती श्रुति आहे. ती ही ज्योति दृष्ट व श्रुत या

गुणांनीं विशिष्ट अशी उपासावी. जो अशी तिची उपासना करतो तो [चक्षुष्यः–] दर्शनीय व [श्रुतः–] विश्रुत–प्रख्यात होतो. यासंबंधीं अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. ३७ पहा. ७ (१३)

–पुनरपि त्याच त्रिपाद अमृत अनंत गुणवान्, अनन्तशक्ति व अनेक भेदांनीं उपास्य अशा ब्रह्माचें विशिष्ट गुण व शक्ति यांनीं युक्त असें उपासन सांगण्याची इच्छा करणारा वेद म्हणतो—

सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत ।
अथ खलु क्रतुमयः पुरुषो यथाक्रतुरस्मिँल्लोके पुरुषो
भवति तथेतः प्रेत्य भवति स क्रतुं कुर्वीत ॥ १

अन्वयार्थ—[सर्वं–] समस्त [खलु–] हा निपात वाक्याला शोभा यावी म्हणून आहे [इदं–] हें नाम-रूपानें विकार पावलेलें जगत् [ब्रह्म–] कारण–अत्यंत वृद्ध आहे. कारण तें [तज्जलान्–] ब्रह्मापासून झालेलें, त्यांतच लीन होणारें व स्थितिकालीं त्यांतच चेष्टा करणारें आहे. [इति–] यास्तव [शान्तः उपासीत–] राग-द्वेषादिरहित होऊन उपासना करावी. [अथ खलु–] कारण खरोखर [पुरुषः क्रतुमयः–] पुरुष क्रतुमय–निश्चयात्मक आहे. [अस्मिन् लोके–] या लोकीं पुरुष [यथाक्रतुः–] ज्याचा जसा निश्चय असतो तो यथाक्रतु, पुरुषाचा येथें जसा निश्चय असतो [तथा०–] तसा तो येथून मरून गेल्यावर होतो. [सः–] तो असें जाणणारा विद्वान् [क्रतुं कुर्वीत–] निश्चय करो. सु. ब्र. १. २. १. पृ. ४४. पहा. १.–आतां तो क्रतु–निश्चय कसा करावा, तें श्रुति सांगते–

मनोमयः प्राणशरीरो भारूपः सत्यसंकल्प आकाशात्मा सर्वकर्मा
सर्वकामः सर्वगन्धः सर्वरसः सर्वमिदमभ्यात्तोऽवाक्यनादरः ॥ २

अन्वयार्थ—मनोमय, लिंगात्मा हेंच ज्याचें शरीर आहे, चैतन्य प्रकाश-रूप, ज्याचे संकल्प सत्य आहेत तो सत्यसंकल्प, आकाशासारखें ज्याचें स्वरूप आहे, सर्व म्ह० विश्व हें ज्याचें कर्म आहे तो सर्वकर्मा–सर्वकर्ता, ज्याचे काम सर्व दोषरहित आहेत तो सर्वकाम, ज्याचे सर्व सुखकर गंध व रस आहेत तो सर्वगंध, सर्वरस, [सर्वं इदं अभ्यात्तः–] ज्यानें हें सर्व

जगत् व्यापलें आहे तो [अवाकी अनादरः—] वाक्‌रहित व संभ्रमशून्य आहे, असा निश्चय करावा. सु. ब्र. पृ. १५४ व २८४ पहा. ३.

एष म आत्माऽन्तर्हृदयेऽणीयान्व्रीहेर्वा यवाद्वा सर्षपाद्वा श्यामाकाद्वा श्यामाकतण्डुलाद्वैष म आत्माऽन्तर्हृदये ज्यायान्पृथिव्या ज्यायानन्तरिक्षाज्ज्यायान्दिवो ज्यायानेभ्यो लोकेभ्यः ॥ ३

अन्वयार्थ—[एषः मे आत्मा—] हा माझा आत्मा [अन्तर्हृदये—] हृदयकमलामध्यें [अणीयान्—] अत्यंत सूक्ष्म [व्रीहेः वा०—] व्रीहीहून-भाताच्या गोट्याहून, यवाहून, मोहरीहून, साव्याहून, साव्याच्या तादुळाहून अत्यंत अणु—सूक्ष्म आहे. [एषः मे०—] हा माझा आत्मा हृदयकमलांत पृथिवीहून मोठा, अन्तरिक्षाहून मोठा, द्युलोकाहून मोठा व या लोकांहून मोठा आहे. सु. ब्र. पृ. ३५ पहा. ३.

सर्वकर्मा सर्वकामः सर्वगन्धः सर्वरसः सर्वमिदमभ्यात्तोऽवाक्यनादर एष म आत्माऽन्तर्हृदय एतद्ब्रह्मैतमितः प्रेत्याभिसंभवितास्मीति यस्य स्याद्धा न विचिकित्साऽस्तीति ह स्माऽऽह शाण्डिल्यः शाण्डिल्यः॥ ४

इति तृतीयाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—सर्वकर्ता, ज्याचे सर्व निर्दोष काम आहेत, ज्याचे सर्व पुण्य गंध आहेत, ज्याचे सर्व पुण्य रस आहेत, हें सर्व व्यापलेला, वाक्-रहित, संभ्रमशून्य असा हा माझा आत्मा हृदयकमलामध्यें आहे. हें ब्रह्म आहे. या शरीरापासून मरून जाऊन मी त्या ब्रह्मालाच प्राप्त होणार आहें, [यस्य०—] ज्याचा असा निश्चय असेल व ज्याला त्याविषयीं संशय नसेल त्याला ईश्वरभावच प्राप्त होतो, असें शांडिल्य म्हणाला. शांडिल्यशब्दाची द्विरुक्ति आदरार्थ आहे. सु. ब्र. पृ. ४५ पहा. ४ (१४)

याच्या कुलांत वीर होतो असें वर सांगितलें. पण केवल पुत्रजन्म पित्याच्या रक्षणास समर्थ नाहीं. तर अनुशिष्ट पुत्रच पितृरक्षणास समर्थ होतो. यास्तव पुत्राच्या दीर्घायुष्ट्वादिकांसाठीं कोशविज्ञानाचा आरंभ केला जात आहे—

अन्तरिक्षोदरः कोशो भूमिबुध्नो न जीर्यति दिशो ह्यस्य स्रक्तयो द्यौरस्योत्तरं बिलꣳस एष कोशो वसुधानस्तस्मिन्विश्वमिदꣳश्रितम्॥ १

अन्वयार्थ—[अन्तरिक्षो०—] अन्तरिक्ष हें ज्याचें उदर—आंतील छिद्र आहे तो हा अन्तरिक्षोदर कोश भूमिबुध्न आहे. म्ह० भूमि हें त्याचें बुध्न—मूळ आहे. [न जीर्यति—] तो जीर्ण होत नाहीं. [दिशः०—] सर्व दिशा हेच त्याचे [स्रक्तयः—] कोण—कोपरे आहेत. [द्यौः०—] द्युलोक हेंच याचें वरील बिळ आहे. [सः एषः०—] तो हा कोश वसुधान आहे. [तस्मिन्०—] त्यांत हें सर्व विश्व स्थित आहे १.

तस्य प्राची दिग्जुहूर्नाम सहमाना नाम दक्षिणा राज्ञी नाम प्रतीची सुभूता नामोदीची तासां वायुर्वत्सः स य एतमेवं वायुं दिशां वत्सं वेद न पुत्ररोदꣳरोदिति सोऽहमेतमेवं वायुं दिशां वत्सं वेद मा पुत्ररोदꣳरुदम् ॥ २

अन्वयार्थ—त्या कोशाची पूर्वदिशा ' जुहू ' या नांवाची, दक्षिणा ' सहमाना ' नांवाची, प्रतीची 'राज्ञी' या नांवाची व उदीची 'सुभूता' नांवाची आहे. त्या दिशांचा वायु हा वत्स आहे. तो जो या वायूला अशा प्रकारें दिशांचा वत्स जाणतो तो पुत्रनिमित्तानें रोदन करीत नाहीं. तो मी या वायूला अशा प्रकारें दिशांचा वत्स जाणतों. मला पुत्रमरणाच्या निमित्तानें रडण्याचा प्रसंग न येवो.२

अरिष्टं कोशं प्रपद्येऽमुनाऽमुनाऽमुना प्राणं प्रपद्येऽमुनाऽमुनाऽमुना भूः प्रपद्येऽमुनाऽमुनाऽमुना भुवः प्रपद्येऽमुनाऽमुनाऽमुना स्वः प्रपद्येऽमुनाऽमुनाऽमुना ॥ ३

अन्वयार्थ—मी अरिष्ट—अविनाशी कोशास शरण आहें [अमुना०—] पुत्राचें तीनदा नांव घेतो. तसाच प्राणास शरण आहें. यानें, यानें, यानें. भूला शरण आहें, भुवः-ला शरण आहें व स्वःला शरण आहें. (प्रत्येकाच्या शेवटीं यानें, यानें, यानें, असें पुत्राचें तृतीयान्त नांव तीनदा घ्यावें.) ३

स यदवोचं प्राणं प्रपद्य इति प्राणो वा इदꣳ सर्वं भूतं यदिदं किंच तमेव तत्प्रापत्सि ॥ ४ अथ यदवोचं भूः प्रपद्य इति पृथिवीं प्रपद्येऽन्तरिक्षं प्रपद्ये दिवं प्रपद्य इत्येव तदवोचम् ॥ ५ अथ यदवोचं भुवः प्रपद्य इत्यग्निं प्रपद्ये वायुं प्रपद्य आदित्यं प्रपद्य इत्येव तदवोचम् ॥ ६

अथ यदवोचꣳस्वः प्रपद्य इत्यृग्वेदं प्रपद्ये यजुर्वेदं प्रपद्ये सामवेदं प्रपद्य इत्येव तदवोचं तदवोचम् ॥ ७

इति तृतीयाध्यायस्य पञ्चदशः खण्डः ॥ १५

अन्वयार्थ—तो वक्ता—मी 'प्राणास शरण आहें,' असें जें म्हणालों (त्याचें व्याख्यान—) प्राणच हें सर्व भूत—जें हें जगत्—तें सर्व आहे. यास्तव त्या सर्वास मी प्रपन्न—शरणागत आहें. ४. नंतर 'मी भूला प्रपन्न आहें,' असें जें मी म्हणालों तें पृथिवीला मी शरण आहें, अंतरिक्षाला मी शरण आहें, द्युलोकाला मी शरण आहें, असेंच तें मी म्हणालों. ५ नंतर 'मी भुवःला शरण होतों,' असें जें मी म्हटलें तें मी अग्नीला शरण जातों, वायूला शरण जातों व आदित्याला शरण जातों, असेंच तें मीं म्हटलें ६ नंतर मीं 'सुवःला शरण आहें,' असें जें म्हटलें तें ऋग्वेदास शरण आहें, यजुर्वेदास शरण आहें व सामवेदास शरण आहें, असेंच म्हटलें. ७. (१५)

पुत्राच्या आयुष्यासाठीं उपासना व जप सांगितला. त्यानंतर आतां स्वतःच्या दीर्घ जीवनासाठीं या पुढील उपासनेचें व जपाचें विधान करणारा वेद म्हणतो—कारण स्वतः जिवंत असला तर तो पुत्रादिफलानें युक्त होणार, त्यावांचून नाहीं, ह्मणून स्वतःच्या दीर्घ जीवनाचीहि इच्छा केली जाते. यास्तव पुरुष आपल्यालाच यज्ञ संपादन करतो. स्वशरीरांतच यज्ञाची कल्पना करतो—

पुरुषो वाव यज्ञस्तस्य यानि चतुर्विꣳशतिवर्षाणि तत्प्रातःसवनं चतुर्विꣳशत्यक्षरा गायत्री गायत्रं प्रातःसवनं तदस्य वसवोऽन्वायत्ताः प्राणा वाव वसव एते हीदꣳ सर्वं वासयन्ति ॥ १

अन्वयार्थ—पुरुषच यज्ञ आहे. [तस्य यानि०—] त्याच्या आयुष्याचीं जीं पहिलीं चोवीस वर्षें तें प्रातःसवन. [चतुर्वि०—] गायत्रीचीं चोवीस अक्षरें असतात. [गायत्रं प्रातःसवनं—] प्रातःसवन गायत्र आहे. [अस्य०—] या पुरुषाच्या प्रातःसवनास वसु अनुगत आहेत. [प्राणाः वाव०—] प्राणच वसु आहेत. [हि एते इदं सर्वं वासयन्ति—] कारण तेच या सर्वाला वसवितात. १.

तं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा वसव इदं मे प्रातःसवनं माध्यंदिनꣳसवनमनुसंततनुतेति माऽहं प्राणानां वसूनां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो ह भवति ॥ २

अन्वयार्थ—त्या यज्ञ संपादन करणाऱ्याला त्या प्रातःसवनसंपन्न वयांत जर कांहीं व्याध्यादि ताप देईल तर त्यावेळी त्या यज्ञसंपादकानें 'प्राणा वसवः० ' इत्यादि मंत्राचा जप करावा. (मंत्राचा अर्थ–) [प्राणाः वसवः०–] 'हे प्राणहो, वसुहो, हें मज यज्ञाचें प्रातःसवन आहे. तें माध्यंदिनसवनाशीं एकभूत–एकरूप करा.' [प्राणानां वसूनां मध्ये अहं यज्ञं मा विलोप्सीय–] 'तुम्हां प्राणांच्या म्ह० वसूंच्या मध्यें मी यज्ञाचा विच्छेद न करावा.' या मंत्राच्या जपानें [ततः–] त्यापासून [उदेति–] उद्गत–विमुक्त होतो. [अगदः०–] उपतापरहित होतो. २

अथ यानि चतुश्चत्वारिꣳशद्वर्षाणि तन्माध्यंदिनꣳसवनं चतुश्चत्वारिꣳशदक्षरा त्रिष्टुप्त्रैष्टुभं माध्यंदिनꣳसवनं तदस्य रुद्रा अन्वायत्ताः प्राणा वाव रुद्रा एते हीदꣳ सर्वꣳरोदयन्ति ॥ ३ ॥ तं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा रुद्रा इदं मे माध्यंदिनꣳसवनं तृतीय सवनमनुसन्ततनुतेति माऽहं प्राणानाꣳरुद्राणां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो ह भवति ॥ ४

अन्वयार्थ—नंतर जीं चव्वेचाळीस वर्षें तें माध्यंदिन सवन. त्रिष्टुभ् छंद चव्वेचाळीस अक्षरांचा आहे. माध्यंदिन सवन त्रैष्टुभ्–त्रिष्टुप्छंदस्क आहे. याच्या त्या माध्यंदिन सवनास रुद्र अनुगत आहेत. प्राणच रुद्र आहेत. कारण प्राण या प्राणिजातास रडवितात. ३ त्या यज्ञसंपादकाला माध्यंदिनसवनसंपन्न कालीं जर कांहीं व्याध्यादि उपताप देईल तर त्यानें 'प्राणा रुद्रा इदं मे० ' या मंत्राचा जप करावा. (त्याचा अर्थ–) हे प्राणांनो, रुद्रांनो, मज यज्ञाचें हें माध्यंदिन सवन चालू आहे. त्याला तृतीयसवनाशीं अनुसंतत करा. मीं तुम्हां प्राणांच्या–रुद्रांच्या मध्यें यज्ञाचा लोप न करावा. या मंत्रजपानें तो त्या उपतापापासून [उदेति–] उद्गत होतो. तो व्याधिरहितच होतो. ४.

अथ यान्यष्टाचत्वारिꣳशद्वर्षाणि तत्तृतीयसवनमष्टाचत्वारिꣳशदक्षरा जगती जागतं तृतीयसवनं तदस्याऽऽदित्या अन्वायत्ताः प्राणा वावाऽऽदित्या एते हीदꣳसर्वमाददतेऽतं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत्स ब्रूयात्प्राणा आदित्या इदं मे तृतीयसवनमायुरनुसंतनुतेति माऽहं प्राणानामादित्यानां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो हैव भवति ॥६

अन्वयार्थ—नंतर याचीं जी अठ्ठेचाळीस वर्षें तें तृतीयसवन. जगती छंद अठ्ठेचाळीस अक्षरांचा आहे. तृतीयसवन जागत—जगतीछंदस्क आहे. याच्या त्या तृतीयसवनास आदित्य अनुगत आहेत. प्राणच आदित्य आहेत. कारण ते हें सर्व शब्दादिविषयजात ग्रहण करितात. ५ त्या उपासकाला या वयांत जर कांहीं दुःख देईल तर त्यानें 'प्राणा आदित्याः०' या मंत्राचा जप करावा. 'हे प्राणहो, अहो आदित्यांनो, हें माझें तृतीयसवन आहे. त्याला आयुष्याशीं एकीभूत करा. मी प्राणांच्या—आदित्यांच्या मध्यें यज्ञाचा विच्छेद न करावा?' या मंत्रजपानें पुरुष त्या तापापासून उद्धत होतो व उपतापरहितच होतो. ६.

एतद्ध स्म वै तद्विद्वानाह महिदास ऐतरेयः स किं म एतदुपतपसि योऽहमनेन न प्रेष्यामीति स ह षोडशं वर्षशतमजीवत्प्र ह षोडशं वर्षशतं जीवति य एवं वेद ॥७

इति तृतीयाध्यायस्य षोडशः खण्डः ॥ १६

अन्वयार्थ—[ह वै—] खरोखर [एतत् तद्विद्वान् महिदासः ऐतरेयः आह स्म—] तें हें यज्ञदर्शन जाणणारा महिदासनामक इतरेचा पुत्र म्हणाला—[किं मे एतत उपतपसि—] हे रोगा, तूं मला हा उपताप कां देत आहेस? [यः अहं०—] जो यज्ञ तोच मी यानें मरणार नाहीं, असें म्हणाला. [सः ह०—] तो एकशें सोळा वर्षें जिवंत राहिला. [प्र ह०—] जो असें जाणतो तोहि एकशें सोळा वर्षें जिवंत राहतो. ७ (१६)

स यदशिशिषति यत्पिपासति यन्न रमते ता अस्य दीक्षाः ॥ १

अन्वयार्थ—[यदशिशिषति—] जी खाण्याची इच्छा करतो, त्याचप्रमाणें

[यत् पिपासति–] जी पिण्याची इच्छा करतो [यत् न रमते–] इष्ट वस्तूची प्राप्ति न होणें, या कारणानें त्याचें चित्त जें रममाण होत नाहीं, सारांश तो अशा प्रकारचें दुःख जें अनुभवितो त्या याच्या दीक्षा. (अशिशिषा, पिपासा व अरमण –अरति यांच्या ठिकाणीं दीक्षादृष्टि करण्याचें कारण–) दुःखाच्या सादृश्यामुळें विधियज्ञाच्या दीक्षेप्रमाणें त्या दीक्षा होत. १.

अथ यदश्नाति यत्पिबति यद्रमते तदुपसदैरेति ॥ २

अन्वयार्थ—[अथ०–] नंतर जें खातो, जें पितो व जो रतीचा अनुभव घेतो तें सर्व उपसदांच्या तुल्यतेस प्राप्त होतें. २.

अथ यद्धसति यज्जक्षति यन्मैथुनं चरति स्तुतशस्त्रैरेव तदेति ॥ ३

अन्वयार्थ—तो जें हसतो, जें भक्षण करतो व जें मैथुन करतो तें सर्व स्तुतशस्त्रांशीं सादृश्य पावतें. ३

अथ यत्तपो दानमार्जवमहिꣳसा सत्यवचनमिति ता अस्य दक्षिणाः॥

अन्वयार्थ—नंतर जें तप, दान, ऋजुत्व, अहिंसा व सत्यवचन त्या याच्या दक्षिणा. धर्माची पुष्टि हें दक्षिणा व तपो-दानादिक यांत सादृश्य आहे.

तस्मादाहुः सोष्यत्यसोष्टेति पुनरुत्पादनमेवास्य तन्मरणमेवावभृथः॥ ५

अन्वयार्थ—[तस्मात् आहुः–] म्हणून म्हणतात कीं त्याची माता [सोष्यति–] प्रसवेल. [असोष्ट–] ती प्रसूत झाली. [अस्य पुनरुत्पादनं एव–] तें याचें पुनरुत्पादनच होय. [मरणं एव अवभृथः–] मरणच याचा अवभृथ५.

तद्धैतद् घोर आङ्गिरसः कृष्णाय देवकीपुत्रायोक्त्वोवाचापिपास एव स बभूव सोऽन्तवेलायामेतत्त्रयं प्रतिपद्येताक्षितमस्यच्युतमसि प्राणसꣳशितमसीति तत्रैते द्वे ऋचौ भवतः॥ ६

अन्वयार्थ—तें हें यज्ञदर्शन घोर या नांवाचा आंगिरस गोत्री (घोर) देवकीपुत्र कृष्णाला सांगून हें त्रय सांगता झाला. तो [अपिपासः एव बभूव–] अन्य विद्यांविषयीं तृष्णारहितच झाला. तो अन्तसमयीं या मंत्रत्रयाचा जप करो. १ ' अक्षितं-' अक्षीण–अक्षत आहेस. २ ' अच्युत ' आहेस व ३ ' प्राणसंशितमसि-' अति सूक्ष्म प्राण आहेस. या अर्थीं या दोन ऋचा आहेत.६.

आदित्प्रत्नस्य रेतसः । उद्वयं तमसस्परि ज्योतिः पश्यन्त उत्तरं स्वः पश्यन्त उत्तरं देवं देवत्रा

सूर्यमगन्म ज्योतिरुत्तममिति ज्योतिरुत्तममिति ॥ ७

इति तृतीयाध्यायस्य सप्तदशः खण्डः ॥ १७

अन्वयार्थ—(' आदित्यप्रत्नस्य रेतसः० ' हा एक मंत्र व ' उद्वयं तमसस्परि० ' हा दुसरा, त्यांतील पहिला मंत्र 'आदित्यप्रत्नस्य रेतसो ज्योतिः पश्यन्ति वासरं । परो यदिध्यते दिवि ' असा आहे. त्याचा अर्थ–) [प्रत्नस्य रेतसः–] पुराण कारणाच्या [ज्योतिः–] प्रकाशास [आपश्यन्ति–] पाहतात. [वासरं–] सर्वतः व्याप्त प्रकाशास [दिवि परः–] प्रकाशयुक्त पर ब्रह्मांत असणारें जे पर ज्योति-तेज–दीप्त होतें त्यास, १ [वयं–] आम्ही [तमसः–] अज्ञानरूप तमाच्या पलीकडे असलेलें [उत्तरं ज्योतिः–] आदित्यस्थ ज्योति [परिपश्यतः–] पहात होत्साते [स्वः–] ती आत्मीय [उत्तरं–] उत्कृष्ट ज्योति [पश्यन्तः–] पाहणारे असे, [देवत्रा देवं–] सर्व देवतांमध्यें जो प्रकाशवान् सूर्य त्याच्याकडे [उत् अगन्म–] वर गेलों. सूर्य ही सर्व ज्योतींहून उत्तम ज्योति आहे. ७ (१७)

ईश्वर मनोमय सांगितला व ईश्वर ' आकाशात्मा ' आहे, असेंहि सांगितलें. ब्रह्माच्या गुणांच्या एकदेशत्वानें मन सांगितलें व आकाश सांगितलें. नंतर आतां मन व आकाश यांच्या ठिकाणी समस्त ब्रह्मदृष्टीचें विधान करण्यासाठीं ' मनो ब्रह्म० ' इत्यादि खंडाचा आरंभ आहे.

मनो ब्रह्मेत्युपासीतेत्यध्यात्ममथाधिदैवतमाकाशो ब्रह्मेत्युभयमादिष्टं भवत्यध्यात्मं चाधिदैवतं च ॥ १

अन्वयार्थ—[मनः०–] अन्तःकरण पर ब्रह्म आहे, अशी उपासना करावी. [इति अध्यात्मं–] असें हें आत्मविषय दर्शन आहे. [अथाधि०–] आतां देवताविषय–'आकाश ब्रह्म' अशी उपासना करावी. अशारीतीनें अध्यात्म व अधिदैव या दोघांचाहि उपदेश केला असें होतें. १

तदेतच्चतुष्पाद्ब्रह्म वाक्पादः प्राणः पादश्चक्षुः पादः श्रोत्रं पाद इत्यध्यात्ममथाधिदैवतमग्निः पादो वायुः पाद आदित्यः पादो दिशः पाद इत्युभयमेवाऽऽदिष्टं भवत्यध्यात्मं चैवाधिदैवतं च ॥ २

अन्वयार्थ—तें हें मनःसंज्ञक ब्रह्म चतुष्पाद आहे. वाक् हा पाद आहे, प्राण पाद आहे, चक्षुः पाद आहे, श्रोत्र पाद आहे, असें हें अध्यात्म. आतां

अधिदैवत—अग्नि हा पाद, वायु पाद, आदित्य पाद व दिशा पाद. अशा प्रकारें अध्यात्म व अधिदैवत असें दोन्ही सांगितलेलें असें होतें. २.

वागेव ब्रह्मणश्चतुर्थः पादः सोऽग्निना ज्योतिषा भाति च तपति च भाति च तपति च कीर्त्या यशसा ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥ ३

अन्वयार्थ—वाक्-च ब्रह्माचा चवथा पाद आहे. ती वाक् अग्नि या ज्योतीनें दीप्त होते व संताप करते. जो अशी उपासना करतो तो कीर्ति, यश व ब्रह्मवर्चस यांनीं दीप्त होतो व इतरांस संताप देतो. (आकाशाख्य ब्रह्माचे अग्नि, वायु, आदित्य व दिशा हे चार पाद आहेत.) ३.

प्राण एव ब्रह्मणश्चतुर्थः पादः स वायुना ज्योतिषा भाति च तपति च भाति च तपति च कीर्त्या यशसा ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥४॥ चक्षुरेव ब्रह्मणश्चतुर्थः पादः स आदित्येन ज्योतिषा भाति च तपति च भाति च तपति च कीर्त्या यशसा ब्रह्मवर्चसेन य एवं वेद ॥ ५ ॥ श्रोत्रमेव ब्रह्मणश्चतुर्थः पादः स दिग्भिर्ज्योतिषा भाति च तपति च भाति च तपति च कीर्त्या यशसा ब्रह्मवर्चसेन य एवं वेद य एवं वेद ॥ ६

इति तृतीयाध्यायस्याष्टादशः खण्डः ॥ १८

अन्वयार्थ—प्राणाख्य प्राणच मनःसंज्ञक ब्रह्माचा चवथा पाद आहे. तो वायु या ज्योतीनें दीप्त होतो व संताप करतो. जो असें जाणतो तो कीर्तीनें, यशानें व ब्रह्मवर्चसानें दीप्त होतो व संताप देतो. ४. चक्षुच मनोमय ब्रह्माचा चवथा पाद. तो आदित्य या ज्योतीनें दीप्त होतो व संताप करितो. जो असें जाणतो तो कीर्ति, यश व ब्रह्मवर्चस यांनीं दीप्त होतो व संताप देतो ५. श्रोत्रच ब्रह्माचा चवथा पाद आहे. तो दिशा या ज्योतीनें दीप्त होतो व संताप करतो. जो असें जाणतो तो कीर्तीनें, यशानें व ब्रह्मवर्चसानें दीप्त होतो व संताप देतो. सु. ब्र. पृ. २४० पहा ६. (१८)

—आदित्य हा ब्रह्माचा पाद आहे, असें सांगितलें. यास्तव त्या आदित्यामध्यें सकल ब्रह्माची दृष्टि करण्यासाठीं हें आरंभिलें जातें—

आदित्यो ब्रह्मेत्यादेशस्तस्योपव्याख्यानमसदेवेदमग्र आसीत्। तत्सदासीत्तत्समभवत्तदाण्डं निरवर्तत तत्संवत्सरस्य मात्रामशयत तन्निरभिद्यत ते आण्डकपाले रजतं च सुवर्णं चाभवताम् ॥ १

अन्वयार्थ—आदित्य ब्रह्म आहे, असा उपदेश आहे. त्याचें उपव्याख्यान केलें जातें.–[अग्रे–] पूर्वीं हें 'असत्-'च होतें. [तत् सत्०–] तें सत्–कार्याभिमुख झालें. तें अंकुरितसें झालें, तें आपांपासून अंडें झालें. तें संवत्सर-परिमाण–वर्षभर [अशयत–] तसेंच स्थित झालें. [तत्–] त्यानंतर तें अंडें फुटलें. त्याचीं दोन कपालें सुवर्ण व रजत झालीं. सु. ब्र. १.४.४पृ. ११८. पहा.

तद्यद्रजतꣳसेयं पृथिवी यत्सुवर्णꣳसा द्यौर्यज्जरायु ते पर्वता यदुल्बꣳसमेघो नीहारो या धमनयस्ता नद्यो यद्वास्तेयमुदकꣳस समुद्रः ॥२

अन्वयार्थ—त्यांतील जें रजत ती ही पृथिवी व जें सुवर्ण ती 'द्यौः'–द्युलोक. त्याचें जें जरायु–स्थूल गर्भवेष्टन ते पर्वत, जें उल्ब–सूक्ष्म गर्भवेष्टन तो मेघांसह नीहार–दंव, ज्या उत्पन्न झालेल्या गर्भाच्या धमन्या त्या नद्या, त्याच्या बस्तींतील जें उदक तो समुद्र. २

अथ यत्तदजायत सोऽसावादित्यस्तं जायमानं घोषा उलूलवोऽनूदतिष्ठन्त्सर्वाणि च भूतानि सर्वे च कामास्तस्मात्तस्योदयं प्रति प्रत्यायनं प्रति घोषा उलूलवोऽनूत्तिष्ठन्ति सर्वाणि च भूतानि सर्वे च कामाः ॥ ३

अन्वयार्थ—[अथ यत्०–] आतां तें जें त्यांत उत्पन्न झालें तो हा आदित्य. तो उत्पन्न होतांच–उत्पन्न होत असतांना [घोषाः उलूलवः–] दीर्घ शब्दयुक्त घोष मागोमाग उत्पन्न झाले. सर्व भूतें व सर्व काम झाले. ज्याअर्थीं सर्व भूतोत्पत्ति व सर्व कामोत्पत्ति आदित्यनिमित्तक आहे त्याअर्थीं आतांहि आदित्याच्या प्रत्येक उदयाच्या व अस्ताच्या वेळीं दीर्घशब्दयुक्त घोष, सर्व भूतें व सर्व काम मागोमाग उठतात. ३

स य एतमेवं विद्वानादित्यं ब्रह्मेत्युपास्तेऽभ्याशो ह यदेनꣳसाधवो घोषा आ च गच्छेयुरुप च निम्रेडेरन् ४(१९. ३)

अन्वयार्थ—तो जो पूर्वोक्त महिम्यास जाणणारा या आदित्यास ब्रह्मदृष्ट्या उपासितो त्याच्यापाशीं सत्वर साधु घोष येतात व त्याला सुख देतात.४ (१९.३)

अथ चतुर्थोऽध्यायः ।

सूत्रात्मभूत वायु व प्राण यांच्या ठिकाणीं ब्रह्माच्या पादांच्या दृष्टीचा अध्यास तिसऱ्या अध्यायांत वर्णिला. त्यानंतर आतां त्या दोघांना साक्षात्-पादकल्पनेवांचून ब्रह्मकार्यरूपानें उपास्यत्व आहे, असें सांगण्यासाठीं पुढील ग्रंथ आरंभिला जातो. येथील आख्यायिका सुखानें—अनायासानें बोध व्हावा म्हणून आणि विद्येचें दान व ग्रहण यांच्या विधीच्या प्रदर्शनार्थ आहे. आख्यायिकेनें श्रद्धा, अन्नदान, अनुद्धतत्व इत्यादिकांना विद्याप्राप्तिसाधनत्व आहे असें प्रदर्शित केलें जातें—

ॐ ॥ जानश्रुतिर्ह पौत्रायणः श्रद्धादेयो बहुदायी बहुपाक्य आस स ह सर्वत आवसथान्मापयांचक्रे सर्वत एव मेऽत्स्यन्तीति ॥ १

अन्वयार्थ—[जानश्रुतिः—] जनश्रुताचें अपत्य जानश्रुति [पौत्रायणः—] पुत्राचा पौत्र—नातु [श्रद्धादेयः०—] ज्याचें देय श्रद्धापुरःसरच असतें, बहु देण्याचें ज्याचें शील आहे असा व ज्याचा पाक बहुत आहे—ज्याच्या येथे प्रत्यहीं पुष्कळ पाक होतो, असा कोणी एकजण होता. [स ह०—] तो सर्वत्र—सर्व दिशांतील ग्रामांत व नगरांत आवसथें—गृहें—धर्मशाळा—अन्नसत्रें करविता झाला. [सर्वतः एव०—] सर्व लोक सर्वत्र माझेंच अन्न खातील, अशा आशयानें अन्नसत्रें करविता झाला. येथील दोन्ही 'ह' ऐतिह्य—असें झालें, या अर्थीं आहेत. १.

अथ ह हꣳसा निशायामतिपेतुस्तद्वैवꣳहꣳसो हꣳसमभ्युवाद हो होऽयि भल्लाक्ष भल्लाक्ष जानश्रुतेः पौत्रायणस्य समं दिवा ज्योतिराततं तन्मा प्रसाङ्क्षीस्तत्त्वा मा प्रधाक्षीरिति ॥ २

अन्वयार्थ—[अथ ह०—] नंतर एकदा ग्रीष्मऋतूंतील रात्रीं हंस त्याच्या समोरून उडून जात होते. [तत्०—] त्यावेळीं एक हंस दुसऱ्या हंसास असें म्हणाला—[हो हो अयि०—] अरे अरे हे भल्लाक्षा—मंददृष्टे, जानश्रुति पौत्रायणाची ज्योति द्युलोकाच्या समान पसरलेली आहे. [तत् मा प्रसांक्षीः—] तिला

स्पर्श करूं नको. [तत् त्वा मा प्रधाक्षीः इति–] कारण तिला स्पर्श केल्यानें ती तुला न जाळो. (राजाचें अन्नदान व गुण यांनीं संतुष्ट झालेले कोणी ऋषी किंवा देवता त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठींच हंसरूपानें आले. ' समं दिवा ज्योतिराततं '–या जानश्रुतीचें अन्नदानादि-प्रभावजन्य तेज स्वर्गलोकापर्यंत समंततः पसरलें आहे. किंवा ' समं दिवा '–दिवसासारखें तेज पसरलें आहे. त्याला स्पर्श करूं नको. तें तुला जाळील, असा याचा भावार्थ.) २.

तमु ह परः प्रत्युवाच कम्वर एनमेतत्सन्तꣳसयुग्वानमिव रैक्कमात्थेति यो नु कथꣳ सयुग्वा रैक इति ॥ ३

अन्वयार्थ––[तं–] त्या मागील हंसाला [परः–] पुढें जाणारा हंस [प्रत्युवाच–] उलट बोलला [अरे–] अरे वेड्या, [कं उ एनं सन्तं–] कोणत्या माहात्म्यानें युक्त असलेल्या याला–याच्याविषयीं [एवं एतत्–] अशा बहुमानानें तूं असें बोलतोस ? (कोणाप्रमाणें ?) [सयुग्वानं रैक्कं इव आत्थ–] शकटासह असणाऱ्या रैक्काप्रमाणें हें असें बहुमानानें बोलतोस ? (मागील हंस विचारतो–) [यः नु सयुग्वा रैक्क. कथं इति–] जो सयुग्वा रैक्क तो कसा आहे ? ३. त्यावर भल्लाक्ष म्हणतो––

यथा कृतायविजितायाधरेयाः संयन्त्येवमेनꣳ सर्वं तदभिसमेति यत्किंच प्रजाः साधु कुर्वन्ति यस्तद्वेद यत्स वेद स मयैतदुक्त इति ॥४

अन्वयार्थ––[यथा–] ज्याप्रमाणें व्यवहारांत [कृतायविजिताय–] कृत या नांवाचा फांसा ज्यानें जिंकला आहे त्याच्या त्या ' कृत-'नांवाच्या फांशांत [अधरेयाः–] त्याच्या खालचे फांसे [संयन्ति एवं–] अन्तर्भूत होतात त्याप्रमाणें [एनं–] या रैक्काला–रैक्कांत [तत् सर्वं–] तें सर्व [अभिसमेति–] अन्तर्भूत होतें. (तें काय ?)[यत्किंच प्रजाः साधु कुर्वन्ति–] प्रजा जें कांहीं शुभ आचरण करितात (तें याच्या धर्मामध्यें अन्तर्भूत होतें.) [यत् सः वेद–] जें तो रैक्क जाणतो [तत् यः वेद–] तें जो जाणतो [सः०–] तो मीं असें सांगितलेला विद्वान् होय. (द्यूतसमयामध्यें कृत या नांवाचा फांसा प्रसिद्ध आहे. त्या ' कृत-'नांवाच्या फांशावर चार चिह्नें असतात. द्यूतांत प्रवृत्त झालेल्या लोकांतील कोणी एखादा जेव्हां त्या कृतायाला जिंकतो तेव्हां तो विजयी त्या जिंकलेल्या कृतायास–त्याच्यासाठीं तीन, दोन व एक हीं चिह्नें ज्यांच्यावर आहेत असे इतर–त्याच्या खालचे

त्रेता, द्वापर व कलि या नांवाचे फासे 'संयन्ति-' संगत होतात–त्यांत अन्तर्भूत होतात. कारण चतुरंकविशिष्ट फासे 'कृत-'नांवाच्या फांशांत तीन, दोन व एक अंक विद्यमान असल्यामुळें अन्तर्भूत होतात असा याचा भावार्थ. या दृष्टान्ताप्रमाणें रैक्याच्या धर्मांत सर्वांचा धर्म अन्तर्भूत होतो)४.

तदु ह जानश्रुतिः पौत्रायण उपशुश्राव स ह संजिहान एव क्षत्तारमुवाचाङ्गारे ह सयुग्वानमिव रैक्कमात्थेति यो कथं सयुग्वा रैक्व इति ॥ ५ ॥ यथा कृतायविजिताया-धरेयाः सयन्त्येवमेनꣳ सर्वं तदभिसमेति यत्किंच प्रजाः साधु कुर्वन्ति यस्तद्वेद यत्स वेद स मयैतदुक्त इति ॥ ६

अन्वयार्थ—[तत् उ ह०–] तें हें हंसवाक्य जानश्रुति पौत्रायण ऐकता झाला. [सः संजिहानः एव०–] तो शयन किंवा निद्रा यांचा परित्याग करतांच क्षत्त्यास ह्मणाला–[अंग अरे०–] 'अरे वत्सा, तूं मला सयुग्वा रैक्याप्रमाणें कां स्तवीत आहेस ?' तेव्हां तो क्षत्ता ह्मणतो 'जो सयुग्वा रैक्य तो कसा आहे ?' ५ त्यावर राजा ह्मणतो–[यथा०–] कृतनांवाच्या फांशाला ज्यानें जिंकलें आहे त्याच्यामध्यें त्याच्या खालच्या फांशांचा जसा अन्तर्भाव होतो त्याप्रमाणें प्रजा जें कांहीं शुभ कर्म करतात तें सर्व त्या रैक्याच्या धर्मफलांत अन्तर्भूत होतें. रैक्य जें जाणतो तें जो जाणतो तो रैक्यासारखा विद्वान् मीं सांगितला आहे ६.

स ह क्षत्ताऽन्विष्य नाविदमिति प्रत्येयाय तꣳहोवाच यत्रारे ब्राह्मणस्यान्वेषणा तदेनमर्छेति ॥ ७

अन्वयार्थ—[सः ह क्षत्ता०–] तो क्षत्ता त्याला शोधून [न अविदम्०–] 'मला कांहीं त्याचा शोध लागला नाहीं,' असें ह्मणत परत आला. [तं होवाच०–] त्याला राजा म्हणाला [अरे यत्र ब्राह्मणस्य अन्वेषणा–] अरे, जेथें ब्राह्मणाचा–ब्रह्मवेत्त्याचा शोध लागतो [तत् एनं ऋच्छ इति–] तेथें जाऊन त्याचा शोध कर. ७.

सोऽधस्ताच्छकटस्य पामानं कषमाणमुपोपविवेश तꣳ हाभ्युवाद त्वं नु भगवः सयुग्वा रैक्व इत्यहꣳह्यरा ३ इति ह प्रतिजज्ञे स क्षत्ताऽविदमिति प्रत्येयाय ॥ ८

इति चतुर्थाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—[सः अधस्तात् शकटस्य–] असें बोलला गेलेला क्षत्ता त्याला निर्जन प्रदेशांत शोधून शकटाच्या–गाडीच्या खालीं [पामानं कषमाणं–] खरजेल खाजवीत असलेल्या त्याला पाहून ' खचित हाच सयुग्वा रैक्व आहे ' असें ओळखून [उप–] त्याच्या समीप [उपविवेश–] विनयानें बसला आणि [तं–] त्या रैक्वास [अभ्युवाद–] म्हणाला–[त्वं नु भगवः सयुग्वा रैक्वः इति–] ' हे भगवन् सयुग्वा रैक्व तुम्हीच का ? ' याप्रमाणें विचारला गेलेला तो [अहं अस्मि हि अरे इति–] अरे, मीच तो आहें असें बोलून त्याचा अनादरच [प्रतिजज्ञे–] प्रतिज्ञात–व्यक्त करता झाला. अशा रीतीनें तो क्षत्ता त्यास जाणून [अविदं इति–] मीं जाणलें, असें म्हणून [प्रत्येयाय–] परत आला, असा भावार्थ. (क्षत्त्यानें त्याच्या त्या अनादरावरूनच याला गृहस्थाश्रम करण्याची व त्यासाठीं धनादिकांची अपेक्षा आहे, असें जाणलें.) ८. (१)

तदु ह जानश्रुतिः पौत्रायणः षट् शतानि गवां निष्कमश्वतरीरथं तदादाय प्रतिचक्रमे त ꣳ हाभ्युवाद ॥ १

अन्वयार्थ—[तत्–] त्या क्षत्त्याचें वचन ऐकल्यावर ऋषीचा गृहस्थाश्रमाविषयींचा आशय व धनेच्छा जाणून [उ ह०–] लागलाच जानश्रुति पौत्रायण [गवां षट् शतानि–] सहाशें गायी, [निष्कं–] कंठहार, [अश्वतरीरथं–] दोन घोड्यांनीं युक्त असा रथ, [तदादाय–] हें धन घेऊन [प्रतिचक्रमे–] रैक्वाप्रत गेला, आणि [तं अभ्युवाद ह–] त्याच्याकडे जाऊन त्याला बोलला. १.

रैक्वेमानि षट् शतानि गवामयं निष्कोऽयमश्वतरीरथो नु म एतां भगवो देवताꣳशाधि यां देवतामुपास्स इति ॥ २

अन्वयार्थ—[रैक्व इमानि गवां षट् शतानि–] हे रैक्व, या सहाशें गायी, [अयं निष्कः०–] हा निष्क, हा अश्वतरीरथ आहे. (हें धन घेऊन) [नु भगवः यां देवतां उपास्से एतां मे शाधि इति–] हे भगवन्, ज्या देवतेची तूं उपासना करतोस ती देवता मला सांग. तिचा मला उपदेश कर. २.

तमु ह परः प्रत्युवाचाह हारेत्वा शूद्र तवैव सह गोभिरस्त्विति तदु ह पुनरेव जानश्रुतिः पौत्रायणः सहस्रं गवां निष्कमश्वतरीरथं दुहितरं तदादाय प्रतिचक्रमे ॥ ३

अन्वयार्थ—[तं उ–] त्या राजाला [परः–] रैक्व [प्रत्युवाच–] उलट बोलला. [अह शूद्र हारेत्वा–हार-इत्वा गोभिः सह तव एव अस्तु–] हे शूद्र, हार व गाडी गायींसह तुझ्यापाशींच असो. [तदुह–] तें ऋषींचें मत–आशय जाणून [पुनरेव०–] पुनरपि जानश्रुति पौत्रायण सहस्र गायी, निष्क, अश्वतरीरथ व कन्या, असें हें धन घेऊन त्याच्याकडे गेला. सु. ब्र. १.३.९ पृ. ९२-९३, पहा. 'शूद्र-'शब्दाच्या अर्थासाठीं भाष्यार्थ पहा. ३.

तꣳहाभ्युवाद रैक्वेदꣳ सहस्रं गवामयं निष्कोऽयमश्वतरी-रथ इयं जायाऽयं ग्रामो यस्मिन्नास्सेऽन्वेव मा भगवः शाधीति ॥ ४ ॥ तस्या ह मुखमुपोद्गृह्यन्नुवाचाऽऽज-हारेमाः शूद्रानेनैव मुखेनाऽऽलापयिष्यथा इति ते हैते रैक्वपर्णा नाम महावृषेषु यत्रास्मा उवास तस्मै होवाच॥५

इति चतुर्थाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—त्याला राजा म्हणाला–हे रैक्व, हें गायींचें सहस्र, हा निष्क, हा अश्वतरीसह रथ, ही जाया, ज्यांत तूं आहेस हा ग्राम, हे भगवन्, मला आतां अनुशासन करच. ४. [तस्याः ह मुखं उपोद्गृह्यन् उवाच–] त्या राजाची कन्या हेंच विद्यादानाचें द्वार–तीर्थ आहे, असें जाणणारा रैक्व ह्मणाला–[शूद्र इमाः आजहार–] हे शूद्र, तूं ह्या गायी व इतर धन आणलें आहेस तें चांगलें आहे, आण. [अनेन एव मुखेन०–] याच विद्याग्रहणतीर्थानें तूं मला बोलावयास लावीत आहेस. [ते ह एते०–] ज्यांत रैक्व–रहात होता, ते हे रैक्वपर्णनांवाचें महावृष देशांतील ग्राम प्रसिद्ध आहेत, [तस्मै ह उवाच–] रैक्व राजाला विद्या सांगता झाला. (ब्रह्मचारी, धन देणारा, मेधावी, श्रोत्रिय, प्रिय व जो एक विद्या शिकून दुसरी सांगतो, तो अशीं ही माझीं सहा तीर्थें आहेत, असें विद्यावचन आहे.) ४, ५, (२).

वायुर्वाव संवर्गो यदा वा अग्निरुद्वायति वायुमेवाप्येति यदा सूर्योऽस्तमेति वायुमेवाप्येति यदा चन्द्रोऽस्तमेति वायुमेवाप्येति ॥ १

अन्वयार्थ—वायुच संवर्ग आहे. जेव्हां अग्नि विझतो तेव्हां तो वायूमध्येंच लीन होतो. जेव्हां सूर्य अस्त पावतो, तेव्हां वायूंतच लीन होतो. जेव्हां चंद्र अस्त पावतो, तेव्हां तो वायूंतच लीन होतो. १

यदाऽऽप उच्छुष्यन्ति वायुमेवापियन्ति वायु-
र्ह्येवैतान्सर्वान्संवृङ्क्त इत्यधिदैवतम् ॥ २

अन्वयार्थ—जेव्हां आप सुकतात तेव्हां त्या वायूंतच लय पावतात. वायूच या सर्वांस पूर्णपणें ग्रासतो. यास्तव संवर्ग—संग्रहगुणविशिष्ट वायूचें ध्यान करावें. असें हें अधिदैवत उपासन आहे. २

अथाध्यात्मं प्राणो वाव संवर्गः स यदा स्वपिति
प्राणमेव वागप्येति प्राणं चक्षुः प्राणꣳ श्रोत्रं
प्राणं मनः प्राणो ह्येवैतान्सर्वान्संवृङ्क्त इति ॥ ३

अन्वयार्थ—आतां अध्यात्म—आत्मविषयक संवर्गदर्शन. प्राणच संवर्ग आहे, पुरुष जेव्हां निजतो तेव्हां प्राणालाच वाक् प्राप्त होते, प्राणालाच चक्षु, प्राणालाच श्रोत्र, प्राणालाच मन, प्राणच या सर्वांचा आपल्यामध्यें संग्रह करतो. ३

तौ वा एतौ द्वौ संवर्गौ वायुरेव देवेषु प्राणः प्राणेषु ॥ ४

अन्वयार्थ—ते हे दोन संवर्ग आहेत. वायूच देवांमध्यें व प्राण प्राणांमध्यें. ४—त्यानंतर वायु व प्राण या दोघांच्या स्तुतीसाठीं ही आख्यायिका आरंभिली जाते—

अथ ह शौनकं च कापेयमभिप्रतारिणं च काक्षसेनिं परि-
विष्यमाणौ ब्रह्मचारी बिभिक्षे तस्मा उ ह न ददतुः ॥ ५

अन्वयार्थ—त्यानंतर एकदा कपिगोत्रज शौनक व अभिप्रतारी या नांवाचा कक्षसेनपुत्र यांस सूपकार अन्न वाढीत होते (व ते दोघे जेवीत होते.) त्यांच्यापाशीं ब्रह्मचारी—आपल्याला ब्रह्मज्ञ मानणारा भिक्षा मागूं लागला. पण त्याला त्यांनीं भिक्षा दिली नाहीं. ५

स होवाच महात्मनश्चतुरो देव एकः कः स जगार भुवनस्य
गोपास्तं कापेय नाभिपश्यन्ति मर्त्या अभिप्रतारिन्बहुधा
वसन्तं यस्मै वा एतदन्नं तस्मा एतन्न दत्तमिति ॥ ६

अन्वयार्थ—[सः०—] तो म्हणाला—[चतुरः महात्मनः—] चार महात्म्यांस [सः एकः कः देवः जगार—] तो एक प्रजापति देव ग्रासता झाला, व तो [भुवनस्य गोपाः—] भुवनाचा रक्षक आहे. [कापेय तं०—] हे कापेय, मर्त्य त्याला पहात नाहींत. हे अभिप्रतारिन्, [बहुधा वसन्तं०—] बहु प्रकारांनीं राहणाऱ्या त्याला कोणी पहात नाहींत. [यस्मै०—] ज्याला हें अन्न दिलें जातें—ज्याच्यासाठीं प्रत्यहीं अन्न संपादन केलें जातें त्यालाच तें दिलें नाहीं, म्हणून मर्त्य त्याला पहात नाहीत. ६.

तदु ह शौनकः कापेयः प्रतिमन्वानः प्रत्येयायाऽऽत्मा देवानां जनिता प्रजानाꣳ हिरण्यदꣳष्ट्रो बभसोऽनसूरिर्महान्तमस्य महिमानमाहुरनद्यमानो यदनन्नमत्तीति वै वयं ब्रह्मचारिन्नेदमुपास्महे दत्तास्मै भिक्षामिति ॥ ७

अन्वयार्थ—[तदु ह०—] तें ब्रह्मचाऱ्याचें वचन शौनक कापेय [प्रतिमन्वानः—] मनानें आलोचन करणारा—ब्रह्मचाऱ्याच्या वचनाचा विचार करणारा कापेय शौनक [प्रत्येयाय—] त्याच्यापाशी आला [आत्मा०—] देवांचा आत्मा व प्रजांचा उत्पादक हिरण्यदंष्ट्र, भक्षणशील, महा मेधावी, असा तो आहे. या प्रजापतीचा महिमा फार मोठा सांगतात. स्वतः दुसऱ्याकडून भक्षण न केला जाणारा तो जें अन्न नव्हे तें अनन्नहि खातो, हे ब्रह्मचारिन्, [वयं एतत् उपास्महे—] आम्ही हें ब्रह्म उपासितों. [अस्मै भिक्षां दत्त इति—] आतां हे भृत्यहो, याला भिक्षा द्या. (दुसरें व्याख्यान—) अग्नि वागादि देवांचा आत्मा व स्थावर-जंगम प्रजांचा उत्पादक, [हिरण्यदंष्ट्रः—] अमृतदंष्ट्र—अभग्नदंष्ट्र—सर्वांचा संहार करणारा असूनहि त्याला त्यामुळें ग्लानि येत नाहीं. [बभसः—]भक्षणशील, [अनसूरिः—] सूरि म्ह० मेधावी, जो सूरि नव्हे तो असूरि, त्याचा प्रतिषेध अनसूरि म्ह० सूरिच असा याचा भावार्थ. [महान्तं—] प्रमाणाचें अतिक्रमण करून असलेला—अप्रमेय, या प्रजापतीचा महिमा—विभूति अप्रमेय आहे, असें ब्रह्मवेत्ते ह्मणतात. (प्रजापतीच्या महिम्याचें अतिप्रमाणत्वच प्रकट करितात—) ज्याअर्थीं स्वतः दुसऱ्याकडून [अनद्यमानः०—] न भक्षण केला जाणारा व जें अनन्न—अग्नि-वागादिदेवतारूप अन्न नसलेलेंहि तो खातो, असें त्याच्याविषयीं ह्मटलेलें आहे, त्याअर्थीं प्रजापतीचा महिमा अतिप्रमाण

आहे, असें ब्रह्मवेत्ते सांगतात. येथील 'वै' अर्थरहित आहे. हे ब्रह्मचारिन्, आम्ही [इदं–] हें अशा लक्षणाचें ब्रह्म [आ-उपास्महे–] उपासितों. 'वयं' याचा 'उपास्महे' याच्याशीं व्यवहित–दूर संबंध आहे. ७.

तस्मा उ ह ददुस्ते वा एते पञ्चान्ये पञ्चान्ये दश सन्त-
स्तत्कृतं तस्मात्सर्वासु दिक्ष्वन्नमेव दश कृतꣳसैषा
विराडन्नादी तयेदꣳसर्वं दृष्टꣳसर्वमस्येदं दृष्टं भवत्य-
न्नादो भवति य एवं वेद य एवं वेद ॥ ८

इति चतुर्थाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ––तेव्हां त्याला त्यांनीं भिक्षा दिली. [ते वा०–] ते अग्न्यादिक व वायु हे पांच वागादिकांहून अन्य आहेत. तसेंच, वागादिक व प्राण हे पांच अग्न्यादिकांहून अन्य आहेत. असे ते दहा होतात. ते दहा तें कृत–द्यूत होतात. ह्मणून सर्व दिशांमध्यें तें दश अन्नच आहे. कृत दश आहे. ती ही विराट् अन्नादी आहे. तिनें हें सर्व दृष्ट–पाहिलेलें आहे. जो अशी उपासना करतो त्याला हें सर्व दृष्ट होतें व तो दीप्ताग्नि होतो. याचा विस्तार भाष्यार्थांत पहा.८.(३)

सत्यकामो ह जाबालो जबलां मातरमामन्त्रयांचक्रे
ब्रह्मचर्यं भवति विवत्स्यामि किंगोत्रो न्वहमस्मीति ॥ १

अन्वयार्थ––सत्यकाम या नांवाचा जबालेचा पुत्र आपल्या जबाला मातेला आज्ञा मागता झाला. [भवति०–] आई, मी आचार्यकुलांत ब्रह्मचर्यवास करण्याची इच्छा करतों. मी कोणत्या गोत्राचा आहें बरें ? १.

सा हैनमुवाच नाहमेतद्वेद तात यद्गोत्रस्त्वमसि बह्वहं
चरन्ती परिचारिणी यौवने त्वामलभे साऽहमेतन्न वेद
यद्गोत्रस्त्वमसि जबाला तु नामाहमस्मि सत्यकामो नाम
त्वमसि स सत्यकाम एव जाबालो ब्रुवीथा इति ॥ २

अन्वयार्थ––ती त्याला म्हणाली "बाबा, तूं कोणत्या गोत्राचा आहेस, हें मी जाणत नाहीं. मी बहुत परिचर्याजात करणारी–परिचरणशील अशी होत्साती तारुण्यांत तुला प्राप्त झालें. (लागलाच तुझा पिता मृत झाला.) त्यामुळें तूं कोणत्या गोत्राचा आहेस हें मी जाणत नाहीं. जबाला या नांवाची मी

आहें व सत्यकाम या नांवाचा तूं आहेस. यास्तव तूं 'मी सत्यकाम जाबाल आहें' असेंच सांग." २.

स ह हारिद्रुमतं गौतममेत्योवाच ब्रह्मचर्यं भगवति वत्स्याम्युपेयां भगवन्तमिति ॥३॥ तꣳहोवाच किंगोत्रो नु सोम्यासीति स होवाच नाहमेतद्वेद भो यद्गोत्रोऽहमस्म्यपृच्छं मातरꣳसा मा प्रत्यब्रवीद्बह्वहं चरन्ती परिचारिणी यौवने त्वामलभे साऽहमेतन्न वेद यद्गोत्रस्त्वमसि जबाला तु नामाहास्मि सत्यकामो नाम त्वमसीति सोहꣳसत्यकामो जाबालोऽस्मि भो इति॥४

अन्वयार्थ—[स ह०—] तो सत्यकाम हारिद्रुमत गौतमापाशीं जाऊन म्हणाला "मी आपल्यापाशीं ब्रह्मचर्यवास करण्याची इच्छा करतों. [उपेयां भगवन्तं—] आपल्याकडे मी शिष्यभावानें येतों." ३ त्याला हारिद्रुमत म्हणाला "हे प्रियदर्शन, तुझें गोत्र काय आहे?" तेव्हां सत्यकाम म्हणाला—"अहो, मी कोणत्या गोत्राचा आहें तें मी जाणत नाहीं. आईला विचारलें. पण ती मला म्हणाली—'भर्तृगृहीं अतिथि-अभ्यागतादिकांची बहु परिचर्या करीत असतां परिचरणशील अशा मला तूं तारुण्यांत झालास (पुढें तुझा पिता वारला) त्यामुळें अनाथ झालेली मी तूं कोणत्या गोत्राचा आहेस हें जाणत नाहीं. मी 'जबाला-'नांवाची आहें व तूं सत्यकाम आहेस.' अहो, तो मी सत्यकाम जाबाल आहें." असें बोलला. ४

तꣳहोवाच नैतदब्राह्मणो विवक्तुमर्हति समिधꣳ सोम्याऽऽहरोप त्वा नेष्ये न सत्यादगा इति तमुपनीय कृशानामबलानां चतुःशता गा निराकृत्योवाचेमाः सोम्यानुसंव्रजेति ता अभिप्रस्थापयन्नुवाच नासहस्रेणाऽऽवर्तयेति स ह वर्षगणं प्रोवास ता यदा सहस्रꣳ संपेदुः ॥ ५

इति चतुर्थाध्यायस्य चतुर्थः खण्डः॥ ४

अन्वयार्थ—[तं ह०—] त्याला गौतम म्हणाला—[एतत् अब्राह्मणः विवक्तुं न अर्हति—] "असें हें सरळ भाषण दुसरा कोणी अब्राह्मण विशेषतः बोलण्यास समर्थ नाहीं. हे सोम्य [आहर—] समिधा आण [त्वा उपनेष्ये—] मी तुझें उपनयन करितों. [सत्यात् न अगाः इति—] कारण तूं सत्यापासून ढळला नाहींस." असें

म्हणून [तं उपनीय–] त्याचें उपनयन करून [कृशानां अबलानां चतुःशताः गाः निराकृत्य उवाच–] अत्यंत कृश व निर्बल अशा चारशें गायी निराळ्या काढून त्यास म्हणाला, 'हे सोम्य, [इमाः अनुसंव्रज इति–] या गायींच्या मागून गमन कर. ' [ताः अभिप्रस्थापयन् उवाच–] त्यांना अरण्यास प्रस्थापित करतांना तो म्हणाला [असहस्रेण न आवर्तेय इति–] " मी या एकसहस्र गायी होत तों परत येणार नाहीं. " [सः ह वर्षगणं प्रोवास–] नंतर तो अनेक वर्षें अरण्यांत राहिला आणि [यदा ताः सहस्रं संपेदुः–] जेव्हां त्या सहस्र गायी झाल्या, (पुष्कळ वर्षांनीं त्या एक सहस्र झाल्या,) ५(४)

अथ हैनमृषभोऽभ्युवाद सत्यकाम ३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव प्राप्ताः सोम्य सहस्रꣳस्मः प्रापय न आचार्यकुलम् १

अन्वयार्थ—[अथ ह एनं ऋषभः–] तेव्हां श्रद्धा व तप यांनीं सिद्ध झालेल्या सत्यकामाला वृषभ–' हे सत्यकाम ' असें ह्मणाला. तेव्हां 'भगवन्' असें त्यानें प्रत्युत्तर दिलें, ' हे सोम्य, [सहस्रं प्राप्ताः स्मः–] आम्ही आतां एक सहस्र झालों आहों. [नः आचार्यकुलं प्रापय–] आह्मांला आतां आचार्यकुलास घेऊन चल. ' (दिक्संबंधी वायुदेवता संतुष्ट होऊन वृषभामध्यें–बैलाच्या शरीरांत प्रविष्ट झाली व त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठीं असें बोलली.) १.

ब्रह्मणश्च ते पादं ब्रवाणीति ब्रवीतु मे भगवानिति तस्मै होवाच प्राची दिक्कला प्रतीची दिक्कला दक्षिणा दिक्कलोदीची दिक्कलैष वै सोम्य चतुष्कलः पादो ब्रह्मणः प्रकाशवान्नाम ॥२

अन्वयार्थ—[च ते ब्रह्मणः पादं ब्रवाणि इति–] शिवाय मी तुला ब्रह्माचा पाद सांगतों, असें तो वृषभ ह्मणाला. तेव्हां ' बरें आहे, आपण मला सांगा,' असें सत्यकाम बोलला. तेव्हां त्याला वृषभ ह्मणाला–' पूर्व दिशा ही कला, पश्चिम दिशा ही कला, दक्षिण दिशा ही कला, उत्तर दिशा ही कला, हे सोम्य, हा ब्रह्माचा चतुष्कल–चार कलांचा प्रकाशवान् या नांवाचा पाद आहे.'२

स य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणः प्रकाशवानित्युपास्ते प्रकाशवानस्मिँल्लोके भवति प्रकाशवतो ह लोकाञ्जयति य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणः प्रकाशवानित्युपास्ते ॥ ३

इति चतुर्थाध्यायस्य पंचमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—तो जो कोणी [एवं–] वर सांगितल्याप्रमाणें [एतं ब्रह्मणः चतुष्कलं पादं विद्वान्–] ब्रह्माच्या या चतुष्कल पादास जाणणारा 'प्रकाशवान्' या गुणानें विशिष्ट अशी उपासना करतो, तो या लोकीं प्रकाशवान् होतो व प्रकाशवान् लोकांस जिंकतो. जो ब्रह्माच्या या चतुष्कल पादास जाणणारा प्रकाशवान् अशी त्याची उपासना करतो. ३ (५)

अग्निष्टे पादं वक्तेति स ह श्वोभूते गा अभिप्रस्थापयांचकार ता यत्राभि सायं बभूवुस्तत्राग्निमुपसमाधाय गा उपरुध्य समिधमाधाय पश्चादग्नेः प्राङुपोपविवेश ॥ १

अन्वयार्थ—[अग्निः०–] अग्नि तुला पाद सांगेल, असें बोलून वृषभ शांत झाला. [स ह०–] तो सत्यकाम दुसऱ्या दिवशीं गायींना आचार्यकुलाप्रत प्रस्थापित करता झाला. [ताः यत्र०–] त्या स्वेच्छेनें निघाल्या असतां जेथें व जेव्हां सायंकाळीं एकत्र जमल्या [तत्र०–] तेथें अग्नीचें उपसमाधान करून, गायींना उपरोध करून, समिध् अग्नींत देऊन अग्नीच्या पश्चाद्भागीं पूर्वाभिमुख बसला. १

तमग्निरभ्युवाद सत्यकाम ३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव ॥ २

अन्वयार्थ—त्याला अग्नि म्हणाला, " हे सत्यकाम " त्यावर 'भगवन्' असें सत्यकाम प्रतिवचन देता झाला. २

ब्रह्मणः सोम्य ते पादं ब्रवाणीति ब्रवीतु मे भगवानिति तस्मै होवाच पृथिवी कलाऽन्तरिक्षं कला द्यौः कला समुद्रः कलैष वै सोम्य चतुष्कलः पादो ब्रह्मणोऽनन्तवान्नाम ॥ ३

अन्वयार्थ—हे सोम्य, मी तुला ब्रह्माचा पाद सांगतों, (असें अग्नि ह्मणाला, असा वरील कंडिकेशीं संबंध.) आपण पूज्य मला सांगा, असें त्याला सत्यकाम बोलला. तेव्हां तो त्याला ह्मणाला–पृथिवी कला, अन्तरिक्ष कला, द्यौः कला व समुद्र कला.हा ब्रह्माचा चतुष्कल पाद अनन्तवान् या नांवाचा आहे.३

स य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणोऽनन्तवानित्युपास्तेऽनन्तवानस्मिँल्लोके भवत्यनन्तवतो ह लोकाञ्जयति य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणोऽनन्तवानित्युपास्ते ॥ ४

इति चतुर्थोऽध्यायस्य षष्ठः खण्डः ॥ ६

अन्वयार्थ—तो जो वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्माच्या या चतुष्कल पादास जाणणारा अनन्तवान् या गुणानें विशिष्ट अशा त्याची उपासना करतो तो या लोकीं अनन्तवान् होतो. जो ब्रह्माच्या या चतुष्कल पादास असें जाणणारा त्याची अनन्तवान् अशी उपासना करतो तो अनन्तवान् लोकांस जिंकतो. ४ (६)

हꣳसस्ते पादं वक्तेति स ह श्वोभूते गा अभिप्रस्थापयांचकार ता यत्राभि सायं बभूवुस्तत्राग्निमुपसमाधाय गा उपरुध्य समिधमाधाय पश्चादग्नेः प्राङुपोपविवेश ॥ १ ॥ तꣳ हꣳस उपनिपत्याभ्युवाद सत्यकाम३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव ॥ २

अन्वयार्थ—तुला हंस पाद सांगेल, असें सांगून अग्नि उपरत झाला. सत्यकाम दुसऱ्या दिवशी गायींना आचार्यकुलाभिमुख प्रस्थापित करता झाला. त्या सायंकालीं जेथें एकत्र जमल्या तेथें अग्नीचें उपसमाधान करून, गायींचा उपरोध करून, समिध् अग्नींत देऊन अग्नीच्या पश्चाद्भागीं प्राङ्मुख बसला. १ त्याच्यापाशीं हंस येऊन ' सत्यकाम ' असें ह्मणाला. ' भगवन् ' असें तो प्रतिवचन देता झाला २

ब्रह्मणः सोम्य ते पादं ब्रवाणीति ब्रतीतु मे भगवानिति तस्मै होवाचाग्निः कला सूर्यः कला चन्द्रः कला विद्युत्कलैष वै सोम्य चतुष्कलः पादो ब्रह्मणो ज्योतिष्मान्नाम ॥ ३ ॥ स य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणो ज्योतिष्मानित्युपास्ते ज्योतिष्मानस्मिल्लोके भवति ज्योतिष्मतो ह लोकाञ्जयति य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मणो ज्योतिष्मानित्युपास्ते ॥ ४

इति चतुर्थाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—हे प्रियदर्शन, मी तुला ब्रह्माचा पाद सांगतों—तेव्हां 'भगवान् मला सांगोत,' असें सत्यकाम बोलला. त्यावर हंस त्यास ह्मणाला—' अग्नि कला, सूर्य कला, चंद्र कला, विद्युत् कला. हे सोम्य, हा ब्रह्माचा चतुष्कल पाद ज्योतिष्मान् या नांवाचा आहे. ३. तो जो या ब्रह्माच्या चतुष्कल पादास असें जाणणारा ज्योतिष्मान् अशी त्याची उपासना करतो तो या लोकीं ज्योतिष्मान् होतो व जो असें जाणणारा ब्रह्माच्या या चतुष्कल पादाची ज्योतिष्मान् अशी उपासना करतो तो ज्योतिष्मान् लोकांस जिंकतो.' ४ (७)

मद्गुष्टे पादं वक्तेति स ह श्वोभूते गा अभिप्रस्थापयांचकार ता यत्राभि सायं बभूवुस्तत्राग्निमुपसमाधाय गा उपरुध्य समिधमाधाय पश्चादग्नेः प्राङुपोपविवेश ॥ १

अन्वयार्थ—मद्गु तुला पाद सांगेल, असें बोलून हंस उपरत झाला. तो सत्यकाम दुसऱ्या दिवशीं गायींना आचार्यकुलाच्या अभिमुख प्रस्थापित करता झाला. त्या संध्याकाळीं जेथें एकत्र झाल्या तेथें अग्नीचें उपसमाधान करून, गायींचा उपरोध करून अग्नीत समिधा देऊन अग्नीच्या मागें पूर्वाभिमुख बसला.

तं मद्गुरुपानपित्याभ्युवाद सत्यकाम ३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव ॥ २ ॥ ब्रह्मणः सोम्य ते पादं ब्रवाणीति ब्रवीतु मे भगवानिति तस्मै होवाच प्राणः कला चक्षुः कला श्रोत्रं कला मनः कलैष वै सोम्य चतुष्कलः पादो ब्रह्मण आयतनवान्नाम ॥ ३

अन्वयार्थ—त्याला मद्गु जवळ उडी मारून येऊन 'हे सत्यकाम,' असें म्हणाला. तेव्हां 'भगवन्' असें सत्यकामानें प्रतिवचन दिलें २. 'हे सोम्य, मी तुला ब्रह्माचा पाद सांगतों.' 'मला भगवान् सांगो,' असें त्याला सत्यकाम बोलला. तेव्हां त्याला मद्गु म्हणाला "प्राण कला आहे, चक्षु कला आहे, श्रोत्र कला आहे व मन कला आहे. हे सोम्य, हा ब्रह्माचा चतुष्कल पाद आयतनवान् या नांवाचा आहे." ३

स य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मण आयतनवानित्युपास्त आयतनवानस्मिँल्लोके भवत्यायतनवतो ह लोकाञ्जयति य एतमेवं विद्वाꣳश्चतुष्कलं पादं ब्रह्मण आयतनवानित्युपास्ते ॥ ४

इति चतुर्थाध्यायस्याष्टमः खण्डः ॥ ८

अन्वयार्थ—तो जो वर सांगितलेल्या ब्रह्माच्या या चतुष्कल पादास जाणणारा त्याची आयतनवान् अशी उपासना करतो तो या लोकीं आयतनवान् होतो. जो हें असें जाणणारा ब्रह्माच्या या चतुष्कल पादास आयतनगुणविशिष्ट उपसितो तो आयतनवान् लोकांस जिंकतो. ४ (८)

प्राप हाऽऽचार्यकुलं तमाचार्योऽभ्युवाद सत्यकाम ३ इति भगव इति ह प्रतिशुश्राव ॥ १

अन्वयार्थ—[आचार्यकुलं प्राप ह—] तो आचार्यकुलास प्राप्त झाला. [तं आचार्यः अभ्युवाद०—] त्याला आचार्य ' हे सत्यकाम ' असें म्हणाला, त्यावर ' भगवन् ' असें त्यानें प्रतिवचन दिलें. १

ब्रह्मविदिव वै सोम्य भासि को नु त्वाऽनुशशासेत्यन्ये मनुष्येभ्य इति ह प्रतिजज्ञे भगवाꣳस्त्वेव मे कामे ब्रूयात् ॥ २

अन्वयार्थ—[सोम्य ब्रह्मविद् इव भासि—] हे प्रियदर्शन, ब्रह्मवेत्त्यासारखा भासतोस ! [त्वा कः नु अनुशशास इति—] तुला कोणी बरें उपदेश केला ? असें आचार्यांनीं विचारलें असतां तो म्हणाला [अन्ये मनुष्येभ्यः०—] मनुष्यांहून अन्य—देवता उपदेश करत्या झाल्या, अशी त्यानें प्रतिज्ञा केली. [भगवान् तु०—] माझ्या इच्छेच्या अनुसार—माझी इच्छा असल्यामुळें आपण पूज्यच मला विद्या सांगा. २.

श्रुतꣳह्येव मे भगवद्दृशेभ्य आचार्याद्धैव विद्या विदिता साधिष्ठं प्रापतीति तस्मै हैतदेवोवाचात्र ह न किंचन वीयायेति वीयायेति ३

इति चतुर्थाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—[भगवद्दृशेभ्यः श्रुतं हि एव—] आपल्यासारख्यांपासून मीं ऐकलेंच आहे की [आचार्यात् ह एव०—] आचार्यापासूनच प्राप्त झालेली विद्या [साधिष्ठं—] अतिशय साधुत्वास प्राप्त होते. [तस्मै ह०—] तेव्हां आचार्य त्याला तेंच—देवतांनीं सांगितलेली विद्याच सांगता झाला. [अत्र०—] या विद्येंत कांहींहि न्यून नव्हतें. ३ (९)

उपकोसलो ह वै कामलायनः सत्यकामे जाबाले ब्रह्मचर्यमुवास तस्य ह द्वादशवर्षाण्यग्नीन्परिचचार स ह स्मान्यानन्तेवासिनः समावर्तयꣳस्तꣳह स्मैव न समावर्तयति ॥ १

अन्वयार्थ—उपकोसल या नांवाचा कमलाचें अपत्य—कामलायन सत्यकाम जाबालाचे ठिकाणीं ब्रह्मचर्यवास करता झाला. [तस्य—] त्या आचार्याच्या [अग्नीन्—] अग्नींस (अग्नींची) [द्वादश वर्षाणि—] बारा वर्षें [परिचचार—] परिचर्या करता झाला. [सः ह स्म—] तो आचार्य [अन्यान्०—] अन्य शिष्यांस (त्यांचें) [समावर्तयन्—] समावर्तन करणारा झाला. (गृहस्थाश्र-

माचा स्वीकार करण्यासाठीं त्यांचें समावर्तन करून त्यांस स्वगृहीं पाठविता झाला.) [तं ह न एव समावर्तयति स्म–] पण एकट्या त्यासच त्यानें समावृत्त केलें नाहीं. सु. ब्र. १.२.४ पृ. ५२-५५ पहा. १.

तं जायोवाच तप्तो ब्रह्मचारी कुशलमग्नीन्परिचचारीन्मा त्वाऽग्नयः परिप्रवोचन्प्रब्रूह्यस्मा इति तस्मै हाप्रोच्यैव प्रवासांचक्रे ॥ २

अन्वयार्थ—[तं जाया उवाच-] त्या आचार्यास त्याची भार्या म्हणाली– [तप्तः ब्रह्मचारी–] हा ब्रह्मचारी फार तप्त झाला आहे. [कुशलं अग्नीन् परिचचारीत्–] त्यानें अग्नींची परिचर्या फार चांगल्या प्रकारें केली आहे. [मा त्वा अग्नयः परिप्रवोचन्–] अग्नि तुझी निंदा न करोत. [प्रब्रूहि अस्मै–]याला विद्या सांग. [तस्मै ह०–] पण त्याला विद्या न सांगतांच आचार्य प्रवासास गेला.२

स ह व्याधिनाऽनशितुं दध्रे तमाचार्यजायोवाच ब्रह्मचारिन्नशान किं नु नाश्नासीति स होवाच बहव इमेऽस्मिन्पुरुषे कामा नानात्यया व्याधिभिः प्रतिपूर्णोऽस्मि नाशिष्यामीति ॥ ३

अन्वयार्थ—[सः ह–] तो उपकोसल [व्याधिना–] मानस दुःखानें [अनशितुं दध्रे–] अनशन–उपवास करण्याचा निश्चय करता झाला. [तं०–] त्याला आचार्यजाया म्हणाली. हे ब्रह्मचारिन्,[अशान्–] खा–भक्षण कर. [किं नु नाश्नासि–] तूं खात कां बरें नाहींस ? [सः होवाच–] तेव्हां तो म्हणाला [बहवः अस्मिन्०–] या प्राकृत पुरुषामध्यें बहुत काम आहेत [नानात्ययाः–] ज्यांचें नाना अतिगमन–वस्तुरूप सोडून विषयांमध्यें प्रवेश करण्याचें शील आहे असे काम आहेत. मी व्याधींनीं परिपूर्ण आहें. यास्तव मी त्यांस नाशीन ३

अथ हाग्नयः समूदिरे तप्तो ब्रह्मचारी कुशलं नः पर्यचारीद्धन्तास्मै प्रब्रवामेति तस्मै होचुः ॥ ४

अन्वयार्थ—[अथ०–] त्यानंतर अग्नि जमून म्हणाले–[ब्रह्मचारी तप्तः–] हा ब्रह्मचारी तप्त आहे. [नः कुशलं पर्यचारीत्०–] त्यानें आमची फार चांगली परिचर्या केली आहे. [हन्त०–] आतां आम्ही याला विद्या सांगूं या, असा निश्चय करून [तस्मै ह ऊचुः–] त्याला ते अग्नि सांगते झाले. ४

प्राणो ब्रह्म कं ब्रह्म खं ब्रह्मेति स होवाच विजानाम्यहं यत्प्राणो ब्रह्म कं च तु खं च न विजानामीति ते होचुर्यद्वाव कं तदेव खं यदेव खं तदेव कमिति प्राणं च हास्मै तदाकाशं चोचुः ॥ ५

इति चतुर्थाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—[प्राणः ब्रह्म०—] प्राण ब्रह्म, कं ब्रह्म, खं ब्रह्म, असें म्हणाले. [सः ह उवाच०—] तेव्हा तो ब्रह्मचारी म्हणाला—प्राण ब्रह्म आहे, असें जें तुम्हीं म्हटलेत तें मी जाणतों. [तु कं च०—] पण 'कं ब्रह्म व खं ब्रह्म' हें मी जाणत नाहीं, असें (म्हणाला.) ते अग्नि म्हणाले—जें आम्ही 'कं' ह्मणून सांगितलें तेंच 'खं' आहे व जें 'खं' तेंच 'कं' आहे. (तात्पर्य) अग्नींनीं त्याला प्राण व त्याचें आश्रयभूत आकाश सांगितलें. सु. ब्र. पृ.५३. याचें सविस्तर विवेचन भाष्यार्थांत पहा. ५ (१०)

अथ हैनं गार्हपत्योऽनुशशास पृथिव्यग्निरन्नमादित्य इति य एष आदित्ये पुरुषो दृश्यते सोऽहमस्मि स एवाहमस्मीति ॥ १

अन्वयार्थ—[अथ०—] त्यानंतर त्या उपकोसलाला गार्हपत्य अग्नि 'पृथिवी, अग्नि, अन्न व आदित्य' असें अनुशासन करता झाला. जो हा आदित्यांत पुरुष दिसतो तो मी आहें व तोच मी आदित्यात आहें. १

स य एतमेवं विद्वानुपास्तेऽपहते पापकृत्यां लोकी भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति नास्यावरपुरुषाः क्षीयन्त उप वयं तं भुञ्जामोऽस्मिंश्च लोकेऽमुष्मिंश्च य एतमेवं विद्वानुपास्ते ॥ २

इति चतुर्थाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—[सः यः०—] तो जो कोणी वर सांगितल्याप्रमाणें जाणणारा या गार्हपत्याची उपासना करतो तो पापकर्माचा विनाश करतो, अग्निलोकवान् होतो, पूर्ण आयुष्य जिवंत राहतो. उज्ज्वल जगतो. [अस्य अवरपुरुषाः न क्षीयन्ते—] याच्या मागून झालेले पुरुष क्षय पावत नाहींत. [वयं तं उपभुंजामः०—] आम्ही त्याचें या लोकीं व पर लोकीं पालन करतों. जो असें जाणणारा याची उपासना करतो त्याचें हें फल आहे. २. (११)

अथ हैनमन्वाहार्यपचनोऽनुशशासाऽऽपो दिशो नक्षत्राणि चन्द्रमा इति य एष चन्द्रमसि पुरुषो दृश्यते सोऽहमस्मि स एवाहमस्मीति ॥ १ ॥ स य एतमेवं विद्वानुपास्तेऽपहते पापकृत्यां लोकी भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति नास्यावरपुरुषाः क्षीयन्त उप वयं तं भुञ्जामोऽस्मिꣳश्च लोकेऽमुष्मिꣳश्च य एतमेवं विद्वानुपास्ते ॥ २ ॥

इति चतुर्थाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ––नंतर त्याला अन्वाहार्यपचन–दक्षिणाग्नि अनुशासन करता झाला. आप, दिशा, नक्षत्रें व चन्द्रमा, या माझ्या विभूति. जो हा चंद्रामध्यें पुरुष दिसतो तो मी आहें, तोच मी चंद्रांतील पुरुष आहे. १. तो जो कोणी असें जाणणारा दक्षिणाग्नीची उपासना करतो तो पापकर्म नाहींसें करतो, लोकवान् होतो, सर्व आयुष्य उपभोगितो, उज्ज्वल जगतो. याचे अवर पुरुष क्षीण होत नाहीत. आम्ही त्याचें या लोकीं व परलोकी रक्षण करतों. जो असें जाणणारा अग्नीची उपासना करतो त्याचें हें फल आहे. २ (१२)

अथ हैनमाहवनीयोऽनुशशास प्राण आकाशो द्यौर्विद्युदिति य एष विद्युति पुरुषो दृश्यते सोऽहमस्मि स एवाहमस्मीति ॥ १ ॥ स य एतमेवं विद्वानुपास्तेऽपहते पापकृत्यां लोकी भवति सर्वमायुरेति ज्योग्जीवति नास्यावरपुरुषाः क्षीयन्त उप वयं तं भुञ्जामोऽस्मिꣳश्च लोकेऽमुष्मिꣳश्च य एतमेवं विद्वानुपास्ते२

इति चतुर्थाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ––नंतर त्याला आहवनीय अग्नि अनुशासन करता झाला. प्राण, आकाश, द्यौः व विद्युत्, या माझ्या तनू आहेत. जो हा विद्युत्-मध्यें पुरुष दिसतो तो मी आहें व तो मीच विद्युत्पुरुष आहे. १. तो जो कोणी असें जाणणारा या अग्नीची उपासना करतो तो पापकर्माचा नाश करतो. लोकवान् होतो, शतवर्षप्रमाण आयुष्यास प्राप्त होतो, उज्ज्वलपणें जिवंत राहतो. याचे अवर पुरुष–संततींतील पुत्रादिपुरुष क्षीण होत नाहींत. आम्ही त्याचें या लोकीं

व परलोकीं परिपालन करतों. जो असें जाणणारा याची उपासना करतो त्याचें हें फल आहे. २ (१३)

ते होचुरुपकोसलैषा सोम्य तेऽस्मद्विद्याऽऽत्मविद्या चाऽऽचार्यस्तु ते गतिं वक्तेत्याजगाम हास्यऽऽचार्यस्तमाचार्योऽऽभ्युवादोपकोसल ३ इति ॥ ५

अन्वयार्थ—पुनरपि ते तिन्ही अग्नि मिळून म्हणाले—हे सोम्य उपकोसला, ही तुला सांगितलेली [अस्मद्विद्या—] अग्निविद्या आहे, असा भावार्थ; आत्मविद्या पूर्वी ' प्राणो ब्रह्म, कं ब्रह्म, खं ब्रह्म ' अशी सांगितली आहे. (अहोपण, आचार्योपदेशावांचून तुमच्याच उपदेशानें मला ती फलवती कशी होईल ? कारण ' आचार्यापासून संपादन केलेली विद्याच अतिशय फलवती होते,' असें वर म्हटलें आहे ? उत्तर—) पण आचार्य विद्याफलप्राप्तीसाठीं तुला गति सांगेल, असें बोलून ते अग्नि उपरत—शांत झाले. कांहीं कालानें त्याचा आचार्य आला, आणि त्या उपकोसल शिष्यास 'हे उपकोसला ' अशी हाक मारता झाला. १

भगव इति ह प्रतिशुश्राव ब्रह्मविद इव सोम्य ते मुखं भाति को नु त्वाऽनुशशासेति को नु माऽनुशिष्याद्धो इतीहापेव निह्नुत इमे नूनमीदृशा अन्यादृशा इतीहाग्नीनभ्यूदे किं नु सोम्य किल तेऽवोचन्निति ॥२॥ इदमिति ह प्रतिजज्ञे लोकान्वाव किल सोम्य तेऽवोचन्नहं तु ते तद्वक्ष्यामि यथा पुष्करपलाश आपो न श्लिष्यन्त एवमेवंविदि पापं कर्म न श्लिष्यत इति ब्रवीतु मे भगवानिति तस्मै होवाच ३

इति चतुर्थोऽध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—'भगवन्' असें त्यानें प्रतिवचन दिलें (आचार्य म्हणतो—) हे सोम्य, तुझें मुख ब्रह्मवेत्त्याच्या मुखासारखें प्रसन्न दिसतें. तुला कोणीं अनुशासन —उपदेश केला ? असें (तो विचारूं लागला) तेव्हां [भो कः नु मा अनुशिष्यात्—] ' अहो आचार्य, मला कोण अनुशासन करणार ' असें ह्मणून तो जणुं काय अपह्नवसा करूं लागला. [इमे नूनं—] खरोखर हे अग्निच माझे उपदेशक आहेत. कारण हे पूर्वी [अन्यादृशाः—] असे कांपणारे नसतांना आतां [ईदृशाः—] कांपत असलेलेसे दिसतात. असें बोलून त्यानें अस्पष्टपणें अग्नींचें नांव सांगितलें, त्यावर आचार्य 'हे सोम्य, ते तुला काय सांगते झाले?'

असें विचारूं लागला. २. तेव्हां [इदं इति ह प्रतिजज्ञे–] 'हें' असें म्हणून त्यानें त्यांच्या उपदेशाची एकदेशतः प्रतिज्ञा केली. त्यावर आचार्य म्हणतो, [लोकान् वाव०–] 'हे सोम्य, त्यांनीं तुला फक्त लोक सांगितले. [अहं तु ते०–] मी तर तुला तें ब्रह्म सांगतों. [यथा पुष्करपलाशे०–] 'ज्याप्रमाणें कमलपत्रावर जल चिकटून राहत नाहीं त्याप्रमाणें ब्रह्मवेत्त्यामध्यें पाप-कर्म संबद्ध होत नाहीं,' असें तो बोलला. त्यावर [ब्रवीतु मे०–] 'भगवान् मला तें सांगोत,' असें तो म्हणाला. तेव्हां त्याला आचार्य म्हणाला. मु. ब्र. पृ. ४४२ पहा. ३. (१४)

य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यत एष आत्मेति होवाचैतदमृतमभयमे-
तद्ब्रह्मेति तद्यद्यप्यस्मिन्सर्पिर्वोदकं वा सिञ्चति वर्त्मनी एव गच्छति॥१

अन्वयार्थ–[यः एषः०–] ब्रह्मचर्यादि साधनसंपन्न शांत विवेक्यांकडून जो हा अक्षींत–नेत्रांत पुरुष पाहिला जातो तो आत्मा, असें तो म्हणाला. तेंच आत्मतत्त्व अमृत अभय आहे, हें ब्रह्म आहे. त्या पुरुषाच्या स्थानांत–अक्षींत तूप किंवा उदक जर शिंपडलें तर तें पापण्यांवरच जातें. मु. ब्र. पृ. ५४. पहा. १

एतꣳसंयद्वाम इत्याचक्षत एतꣳहि सर्वाणि वामान्यभि-
संयन्ति सर्वाण्येनं वामान्यभिसंयन्ति य एवं वेद ॥ २

अन्वयार्थ––[एतं०–] यालाच संयद्वाम असें म्हणतात. [हि एतं सर्वाणि०–] कारण यालाच सर्व संसेवनीय वस्तु अभितः संगत होतात. [यः एवं वेद एनं सर्वाणि वामानि अभिसंयन्ति–] जो अशी उपासना करतो त्याला सर्व संसेवनीय पदार्थ अभितः संगत होतात २.

एष उ एव वामनीरेष हि सर्वाणि वामानि
नयति सर्वाणि वामानि नयति य एवं वेद ॥ ३

अन्वयार्थ––हाच वामनी आहे. कारण हा सर्व वामांस–पुण्यकर्मफलांस प्राप्त करवितो. जो असें जाणतो तो सर्व वामांस–शोभन फलांस प्राप्त होतो३.

एष उ एव भामनीरेष हि सर्वेषु लोकेषु
भाति सर्वेषु लोकेषु भाति य एवं वेद ॥ ४

अन्वयार्थ––हाच भामनी आहे. कारण हाच सर्व लोकांमध्यें भासमान–

दीप्त होतो. जो असें जाणतो तो सर्व लोकांमध्यें दीप्त होतो ४.—आतां वर सांगितलेल्या प्रकारच्या ब्रह्मवेत्त्याची गति सांगितली जाते—

अथ यदु चैवास्मिञ्छव्यं कुर्वन्ति यदि च नार्चिषमेवाभिसंभवन्त्यर्चिषोऽहरह्न आपूर्यमाणपक्षमापूर्यमाणपक्षाद्यान्षडुदङ्डेति मासास्तान्मासेभ्यः संवत्सरꣳसंवत्सरादादित्यमादित्याच्चन्द्रमसं चन्द्रमसो विद्युतं तत्पुरुषोऽमानवः स एनान्ब्रह्म गमयत्येष देवपथो ब्रह्मपथ एतेन प्रतिपद्यमाना इमं मानवमावर्तं नावर्तन्ते नावर्तन्ते ॥ ५

इति चतुर्थाध्यायस्य पञ्चदशः खण्डः ॥ १५ ॥

अन्वयार्थ—[अथ–] आतां [यत्–] जर [अस्मिन्–] या अशी उपासना करणाऱ्यामध्यें (त्याचें) [शव्यं–] शवकर्म–प्रेतक्रिया केली किंवा न केली तरी [ते अर्चिषं एव०–] ते अर्चिरभिमानिनी देवतेसच प्राप्त होतात. अर्चीपासून अहरभिमानिनी देवतेस, त्या देवतेपासून शुक्लपक्षाभिमानिनी देवतेस, तिच्यापासून ज्या सहा मासांत आदित्य उत्तरेस जातो त्या मासांस, मासाभिमानिनी देवतांपासून संवत्सराभिमानिनी देवतेस, संवत्सरापासून आदित्यास, आदित्यापासून चंद्रमास, चंद्रमापासून विद्युत्-अभिमानिनी देवतेस प्राप्त होतो. तेथील अमानव पुरुष त्याला सत्यलोकस्थ ब्रह्मास पोंचवितो. हा देवपथ आहे, ब्रह्मपथ आहे. या मार्गानें जाणारे या मनुसंबंधी आवर्तांत आवृत्त होत नाहींत. (या मन्वंतरांत परत येत नाहींत.) सु. ब्र. ४-३.२. पृ. ४७८-८४ व भाष्यार्थ पहा. ५. (१५)

यज्ञांत जर कांहीं क्षत उत्पन्न झालें तर प्रायश्चित्तार्थ व्याहृतींचा उपदेश करावा, व्याहृतींचें विधान करावें, ह्मणून पुढील ग्रंथाची प्रवृत्ति आहे—

एष ह वै यज्ञो योऽयं पवत एष ह यन्निदꣳसर्वं पुनाति यदेष यन्निदꣳसर्वं पुनाति तस्मादेष एव यज्ञस्तस्य मनश्च वाक्च वर्तनी ॥ १

अन्वयार्थ—[एषः०–] जो हा वाहतो तोच हा यज्ञ आहे. [एषः ह यन् इदं सर्वं पुनाति–] हा जाणारा–चलन करणारा असा होत्साता हें सर्व जगत् पावन करतो. [यत् एषः०–] ज्याअर्थीं हा जाणारा असा होत्साता हें सर्व

पवित्र करतो [तस्मात् एषः०—] त्याअर्थी हाच यज्ञ आहे. [तस्मै वाक् च मनः च वर्तनी—] त्या यज्ञाचे वाक् व मन हे दोन मार्ग आहेत. १.

तयोरन्यतरां मनसा सꣳस्करोति ब्रह्मा वाचा होताऽध्वर्युरुद्गाताऽन्यतराꣳस यत्रोपाकृते प्रातरनुवाके पुरा परिधानीयाया ब्रह्मा व्यववदति ॥२॥ अन्यतरामेव वर्तनीꣳ सꣳस्करोति हीयतेऽन्यतरा स यथैकपाद्व्रजन्रथो वैकेन चक्रेण वर्तमानो रिष्यत्येवमस्य यज्ञो रिष्यति यज्ञꣳ रिष्यन्तं यजमानोऽनुरिष्यति स इष्ट्वा पापीयान्भवति ॥ ३

अन्वयार्थ—[तयोः अन्यतरां ब्रह्मा मनसा संस्करोति—] त्या दोन वर्तनींतील एका वर्तनीला ब्रह्मा मनानें संस्कार करतो [अन्यतरां होता अध्वर्युः उद्गाता वाचा—] व दुसरीला होता, अध्वर्यु व उद्गाता वाक्-नें संस्कार करितात. [सः ब्रह्मा यत्र उपाकृते०—] तो ब्रह्मा ज्यावेळीं प्रातरनुवाकाला आरंभ केला असतां तेथून परिधानीया ऋचेच्या पूर्वी म्ह० या एवढ्या अंतरांत बोलतो—(जर त्यानें त्या अवधींत मौन सोडलें तर) [अन्यतरां एव०—] एकाच वर्तनीला संस्कार करतो व दुसरी हीन होते. [सः यथा०—] जसा एकपाद् पुरुष जाऊं लागला असतां [रथः वा०—] अथवा रथ एका चक्रानें चालूं लागला असतां विनाश पावतो [एवं अस्य०—] त्याप्रमाणें याचा यज्ञ नाश पावतो.[यज्ञं रिष्यतं०—] यज्ञ नाश पावूं लागला असतां त्याच्या मागोमाग यजमान नाश पावतो. [सः इष्ट्वा पापीयान् भवति—] तो तसा यज्ञ करून अधिक पापी होतो २, ३.

अथ यत्रोपाकृते प्रातरनुवाके न पुरा परिधानीयाया ब्रह्मा व्यववदत्युभे एव वर्तनी सꣳस्कुर्वन्ति न हीयतेऽन्यतरा ॥ ४ ॥ स यथोभयपाद्व्रजन्रथो वोभाभ्यां चक्राभ्यां वर्तमानः प्रतितिष्ठत्येवमस्य यज्ञः प्रतितिष्ठति यज्ञं प्रतितिष्ठन्तं यजमानोऽनुप्रतितिष्ठति स इष्ट्वा श्रेयान्भवति ॥ ५

इति द्वितीयाध्यायस्य षोडशः खण्डः ॥ १६

अन्वयार्थ—[अथ यत्र०—] पण ज्यावेळीं प्रातरनुवाकाला आरंभ केल्यानंतर परिधानीय ऋचेच्या पूर्वीपर्यंत ब्रह्मा विशेषतः भाषण करीत नाहीं व दुसरे ऋत्विक्हि भाषण करीत नाहींत तेव्हां ते दोन्हीं वर्तनींना संस्कार करितात.

त्यांतील एक वर्तनी विनाश पावत नाहीं ४. [यथा उभयपाद्०—] जसा दोन्ही पायांनीं युक्त असलेला पुरुष जात असतां [वा उभाभ्यां चक्राभ्यां—] अथवा दोन्ही चाकांनीं चालणारा रथ चालत असतां प्रतिष्ठित होतो—विनाश पावत नाहीं [एवं अस्य यज्ञः०—] त्याप्रमाणें याचा यज्ञ प्रतिष्ठित होतो [यज्ञं प्रतितिष्ठन्तं—] यज्ञ प्रतिष्ठित झाला असतां त्याच्या मागून यजमान प्रतिष्ठित होतो. [सः इष्ट्वा श्रेयान् भवति—] तो यज्ञ करून श्रेष्ठ होतो. ५ (१६)

प्रजापतिर्लोकानभ्यतपत्तेषां तप्यमानानाꣳरसान्प्रावृ-
हदग्निं पृथिव्या वायुमन्तरिक्षादादित्यं दिवः ॥ १

अन्वयार्थ—[प्रजापतिः०] प्रजापति लोकांतील सार ग्रहण करण्याच्या इच्छेनें ध्यानरूप तप करता झाला. [तेषां तप्यमानाना०—] त्या ध्यान केल्या जाणाऱ्या लोकांतील साररूप रसांचें तो ग्रहण करता झाला. [पृथिव्याः अग्निं०—] पृथिवीपासून अग्नि या रसास, अन्तरिक्षापासून वायूस व द्युलोकापासून आदित्यास

स एतास्तिस्रो देवता अभ्यतपत्तासां तप्यमानानाꣳरसा-
न्प्रावृहदग्नेर्ऋचो वायोर्यजूꣳषि सामान्यादित्यात् ॥ २

अन्वयार्थ - [सः एताः तिस्रः०—] तो या तीन देवतांना उद्देशून ध्यान करता झाला.[तासां तप्यमानानां०—] त्या तप्यमान देवतांचे रस उद्धृत केले[अग्नेः ऋचः०—] अग्नीपासून ऋक्-मंत्र, वायूपासून यजुर्मंत्र व आदित्यापासून सामें. २.

स एतां त्रयीं विद्यामभ्यतपत्तस्यास्तप्यमानाया रसान्
प्रावृहद्भूरित्यृग्भ्यो भुवरिति यजुर्भ्यः स्वरिति सामभ्यः
॥ ३ ॥ तद्यद्यृक्तो रिष्येद्भूः स्वाहेति गार्हपत्ये जुहुयाद्-
ऋचामेव तद्रसेनर्चां वीर्येणर्चां यज्ञस्य विरिष्टꣳसंदधाति ॥ ४

अन्वयार्थ—[सः एतां०—] तो या त्रयी विद्येला उद्देशून ध्यान करता झाला. [तस्याः तप्यमानायाः०—] ध्यान केल्या जाणाऱ्या त्या त्रयी विद्येपासून रसांचें ग्रहण करता झाला. ' भूः ' हा रस ऋक्पासून, ' भुवः ' हा यजुःपासून व ' स्वर् ' हा रस सामापासून ३. [तत्०—] त्या यज्ञांत ऋक्च्या संबंधानें जर क्षत होईल तर ' भूः स्वाहा ' असें गार्हपत्यांत हवन करावें. ऋचांच्याच रसानें, ऋचांच्या वीर्यानें ऋक्-संबंधी यज्ञाच्या क्षताचें प्रतिसंधान करतो. ४.

अथ यदि यजुष्टो रिष्येद्भुवः स्वाहेति दक्षिणाग्नौ जुहुयाद्यजुषामेव तद्रसेन यजुषां वीर्येण यजुषां यज्ञस्य विरिष्टꣳ संदधाति ॥ ५ ॥ अथ यदि सामतो रिष्येत्स्वः स्वाहेत्याहवनीये जुहुयात्साम्नामेव तद्रसेन साम्नां वीर्येण साम्नां यज्ञस्य विरिष्टꣳ संदधाति ॥ ६ ॥

अन्वयार्थ—आतां जर यजुर्निमित्त क्षत होईल तर 'भुवः स्वाहा' या मंत्रानें दक्षिणाग्नींत हवन करावें. यजूंच्याच रसानें व वीर्यानें यजुःसंबंधी यज्ञाचें क्षत भरून काढतो. आता जर सामतः क्षत होईल तर 'स्वः स्वाहा' या मंत्रानें आहवनीयांत हवन करावें. सामांच्याच रसानें व वीर्यानें सामसंबंधी यज्ञाच्या क्षताचें प्रतिसंधान करतो. (क्षत भरून काढतो.) ५. ६.

तद्यथा लवणेन सुवर्णꣳ संदध्यात्सुवर्णेन रजतꣳ रजतेन त्रपु त्रपुणा सीसं सीसेन लोहं लोहेन दारु दारु चर्मणा ॥७॥ एवमेषां लोकानामासां देवतानामस्या विद्याया वीर्येण यज्ञस्य विरिष्टꣳ संदधाति भेषजकृतो ह वा एष यज्ञो यत्रैवंविद्ब्रह्मा भवति ८

अन्वयार्थ— त्याविषयीं दृष्टान्त—ज्याप्रमाणें टांकणखारादि खारानें सुवर्णाचें प्रतिसंधान केलें जातें, सुवर्णानें रजत, रजतानें कथील, कथिलानें शिसें, शिशानें लोखंड, लोखंडानें काष्ठ व चर्मानें काष्ठ जोडलें जातें, ७ याप्रमाणें या लोकांच्या, या देवतांच्या, या त्रयी विद्येच्या वीर्यानें यज्ञाच्या क्षताचें प्रतिसंधान करतो. [यत्र एवंविद् ब्रह्मा भवति—] ज्या यज्ञांत असें जाणणारा ब्रह्मा असतो [एषः यज्ञः भेषजकृतः ह वै—] तो यज्ञ जणुं काय सुशिक्षित वैद्यानें सुसंस्कृत केलेल्या रोगार्ताप्रमाणें सुसंस्कृत असतो. ८.

एष ह वा उदक्प्रणवो यज्ञो यत्रैवंविद्ब्रह्मा भवत्येवंविदꣳ ह वा एषा ब्रह्माणमनुगाथा यतो यत आवर्तते तत्तद्गच्छति ॥ ९ ॥ मानवो ब्रह्मैवैक ऋत्विक्कुरूनश्वाऽभिरक्षत्येवंविद्ध वै ब्रह्मा यज्ञं यजमानꣳ सर्वाꣳश्चर्त्विजोऽभिरक्षति तस्मादेवंविदमेव ब्रह्माणं कुर्वीत नानेवंविदं नानेवंविदं १०

इति चतुर्थाध्यायस्य सप्तदशः खण्डः ॥ १७

इति छान्दोग्योपनिषद्ब्राह्मणे द्वितीयोऽध्यायः समाप्तः॥२

अन्वयार्थ—[एषः ह वै०—] हाच उदक्प्रवण—उत्तरेकडे उतरता यज्ञ आहे, कीं ज्यांत असें जाणणारा ब्रह्मा असतो. [एवंविदं०—] असें जाणणाऱ्या ब्रह्मा या ऋत्विजाला उद्देशून ही अनुगाथा आहे. [यतः यतः आवर्तते०—] ज्या ज्या प्रदेशापासून कर्म आवृत्त होतें त्याचें त्याचें क्षत प्रायश्चित्तानें भरून काढणारा मानव—विद्वान् ब्रह्मा हाच एक ऋत्विक् कर्त्याचें परिपालन करितो. [कुरून् अश्वा०—] युद्ध करणाऱ्या अश्वारूढ वीरांना अश्वा—घोडी जशी रक्षिते [एवंविद् ह०—] त्याप्रमाणें एवंवेत्ता ब्रह्मा यज्ञास, यजमानास व सर्व ऋत्विजांस सर्वतः रक्षितो. [तस्मात् एवंविद०—] तस्मात् एवंवेत्त्यासच ब्रह्मा करावें. [न अनेवंविदं—] व्याहृत्यादिकांना न जाणणाऱ्यास ब्रह्मा करूं नये. सु. ब्र. पृ. ३८५ पहा. ९. १०. (१७)

अथ पंचमोऽध्यायः ।

सगुण ब्रह्मविद्येची उत्तर गति सांगितली. आतां पांचव्या अध्यायांत पंचाग्निवेत्त्या गृहस्थाच्या, श्रद्धालु ऊर्ध्वरेत्यांच्या व पंचाग्निविद्यातिरिक्त सगुणविद्येचें परिशीलन करणारांच्या—तन्निष्ठांच्या त्याच गतीचा अनुवाद करून दुसरी दक्षिणदिशेशीं संबंध ठेवणारी केवल कर्म्यांची धूमादिलक्षण पुनरावृत्तिरूप गति सांगावी व तिच्याहून अतिशय कष्टकर अशी तिसरी संसारगति, संसाराविषयीं वैराग्य उत्पन्न व्हावें, म्हणून सांगावी या आशयानें हा आरंभ केला जातो—

यो ह वै ज्येष्ठं च श्रेष्ठं च वेद ज्येष्ठश्च ह वै श्रेष्ठश्च भवति प्राणो वाव ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च ॥ १

अन्वयार्थ—जो ज्येष्ठाला व श्रेष्ठाला जाणतो तो ज्येष्ठ व श्रेष्ठ होतो. प्राणच ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे. सु. ब्र. अ. ३.३.१. पृ. ३०१ पहा. १.

यो ह वै वसिष्ठं वेद वसिष्ठो ह स्वानां भवति वाग्वाव वसिष्ठः ॥२

अन्वयार्थ—[यः ह वै—] जो [वसिष्ठं—] अतिशय वसविणाऱ्यास, अतिशय आच्छादित करविणाऱ्यास किंवा अतिशय धनवानास [वेद—] जाणतो —त्याची उपासना करतो तो त्या उपासनेच्या अनुसार [स्वानां०—] स्वजातीयां-

मध्यें वसिष्ठ–वसविणारा होतो. तर मग तो वसिष्ठ कोण, तें श्रुति सांगते– वाक्-च वसिष्ठ आहे. कारण वक्ते पुरुषच इतरांचा अभिभव करितात व अतिशय धनवान् होतात, त्यामुळें इतरांस वसविते म्हणून वाक् वसिष्ठ आहे. २.

यो ह वै प्रतिष्ठां वेद प्रति ह तिष्ठत्यस्मिꣳश्च लोकेऽमुष्मिꣳश्च चक्षुर्वाव प्रतिष्ठा ॥ ३

अन्वयार्थ—जो प्रतिष्ठेला जाणतो तो या लोकी व परलोकी प्रतिष्ठित होतो. चक्षुच प्रतिष्ठा आहे. ३

यो ह वै संपदं वेद सꣳहास्मै कामाः पद्यन्ते दैवाश्च मानुषाश्च श्रोत्रं वाव संपत् ॥ ४

अन्वयार्थ— जो संपत्तीला जाणतो त्याला देवांचे व मनुष्यांचे काम प्राप्त होतात. श्रोत्रच संपद् आहे. ४

यो ह वा आयतनं वेदाऽऽयतनꣳ ह स्वानां भवति मनो ह वा आयतनम् ॥ ५

अन्वयार्थ—जो आयतनास जाणतो–त्याची उपासना करतो तो स्वजातीयांचें आयतन–आश्रय होतो. मनच आयतन आहे. ५–वरील श्रेष्ठत्वादि सर्व गुण मुख्य प्राणगामी आहेत, त्यामुळें वस्तुतः ते वागादि प्रत्येक इंद्रियांत नाहींत, हें सांगण्यासाठी आख्यायिका—

अथ ह प्राणा अहꣳश्रेयसि व्यूदिरेऽहꣳश्रेयानस्म्यहꣳश्रेयानस्मीति ॥ ६

अन्वयार्थ—नंतर वागादि प्राण 'मी श्रेष्ठ आहे,' 'मी श्रेष्ठ आहें' असें स्वतःच्या श्रेष्ठत्वाविषयी परस्पर विरुद्ध बोलले. ६

ते ह प्राणाः प्रजापतिं पितरमेत्योचुर्भगवन्को नः श्रेष्ठ इति तान्होवाच यस्मिन्व उत्क्रान्ते शरीरं पापिष्ठतरमिव दृश्येत स वः श्रेष्ठ इति

अन्वयार्थ—[ते ह०—] ते प्राण प्रजापति-पित्याकडे जाऊन म्हणाले– 'भगवन्, आम्हांमध्यें श्रेष्ठ कोण?' (असें विचारते झाले.) [तान् ह०—] त्यांना पिता म्हणाला "तुम्हांपैकीं जो उत्क्रान्त झाला असतां शरीर अतिशय पापिष्ठसें दिसेल तो तुम्हांमध्यें श्रेष्ठ आहे" असें (पिता बोलला.) ७.

सा ह वागुच्चक्राम सा संवत्सरं प्रोष्य पर्येत्योवाच कथमशकतर्ते मज्जीवितुमिति यथा कला अवदन्तः प्राणन्तः प्राणेन पश्यन्तश्चक्षुषा शृण्वन्तः श्रोत्रेण ध्यायन्तो मनसैवमिति प्रविवेश ह वाक् ॥ ८

अन्वयार्थ—[सा ह वाक्०—] ती वाक् शरीरांतून उत्क्रान्त होऊन गेली [सा संवत्सरं०—] ती एक संवत्सर प्रवास करून व [पर्येत्य उवाच—] परत येऊन म्हणाली, [मत् ऋते जीवितुं कथं अशकत—] " माझ्यावांचून तुम्ही जिवंत राहूं कसे शकलां ? " इतर प्राण म्हणाले [यथा कलाः०—] " जसे मुके—न बोलणारे जिवंत राहतात तसे आम्ही प्राणानें प्राणनक्रिया करणारे, चक्षूनें पाहणारे, श्रोत्रानें ऐकणारे, मनानें चिंतन करणारे असे होत्साते जिवंत राहिलों " असें ते बोलले असता वाक् शरीरांत प्रवेश करती झाली. ८

चक्षुर्होच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्य पर्येत्योवाच कथमशकतर्ते मज्जीवितुमिति यथान्धा अपश्यन्तः प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा शृण्वन्तः श्रोत्रेण ध्यायन्तो मनसैवमिति प्रविवेश ह चक्षुः ॥

अन्वयार्थ—त्यानंतर चक्षु उत्क्रान्त झालें. तें एक वर्षभर प्रवास करून व परत येऊन म्हणालें—" तुम्ही मजवांचून जिवंत कसे राहूं शकलां ? " त्यावर इतर प्राण म्हणाले—" अंध—चक्षूनें न पाहणारे, जसे जिवंत राहतात म्हणजे प्राणानें प्राणव्यापार करणारे, वाक्-नें बोलणारे, श्रोत्रानें ऐकणारे व मनानें ध्यान करणारे असे जिवंत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलों. " तेव्हां चक्षु शरीरांत प्रविष्ट झालें. ९

श्रोत्रꣳहोच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्य पर्येत्योवाच कथमशकतर्ते मज्जीवितुमिति यथा बधिरा अशृण्वन्तः प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा पश्यन्तश्चक्षुषा ध्यायन्तो मनसैवमिति प्रविवेश ह श्रोत्रम्॥१०

अन्वयार्थ—श्रोत्र उत्क्रान्त झालें. तें एक संवत्सर प्रवास करून व परत येऊन म्हणालें " माझ्यावांचून तुम्ही जिवत कसे राहूं शकलां ?" ते म्हणाले—" जसे बहिरे—न ऐकणारे, प्राणानें प्राणव्यापार करणारे, वाक्नें बोलणारे, चक्षूनें पाहणारे व मनानें ध्यान करणारे असे जिवंत राहतात तसे आम्ही जिवंत राहिलों. " तें ऐकून श्रोत्र प्रविष्ट झालें. १०.

मनो होच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्य पर्येत्योवाच कथमशकतर्ते मज्जीवितुमिति यथा बाला अमनसः प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा पश्यन्तश्चक्षुषा शृण्वन्तः श्रोत्रेणैवमिति प्रविवेश ह मनः ॥११

अन्वयार्थ—मन उत्क्रान्त झालें. तें एक संवत्सर बाहेर राहून व परत येऊन म्हणालें—" तुम्ही मजवांचून कसे राहूं शकलां ? " यावर इतर प्राण म्हणाले—" ज्याप्रमाणें बाल ' अमनसः-' ज्यांचें मन प्ररूढ झालेलें नाहीं, असे होत्साते प्राणानें प्राणव्यापार करणारे, वाक्-नें बोलणारे, चक्षूनें पाहणारे, व श्रोत्रानें ऐकणारे असे जिवंत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलों. " हें ऐकतांच मन प्रविष्ट झालें ११—याप्रमाणें वागादिकांचें परीक्षण होऊन तीं श्रेष्ठ नाहींत असा निश्चय झाला असतां—

अथ ह प्राण उच्चिक्रमिषन्स यथा सुहयः पड्वीशशङ्कून्संखिदेदेवमितरान्प्राणान्समखिदत्तꣳ हाभिसमेत्योचुर्भगवन्नेधि त्वं नः श्रेष्ठोऽसि मोत्क्रमीरिति ॥ १२

अन्वयार्थ—[अथ ह उच्चिक्रमिषन् प्राणः—] त्यानंतर शरीरांतून उत्क्रमण करण्याची इच्छा करणारा प्राण, [यथा सुहयः पड्वीशशंकून् संखिदेत्—] जसा उत्तम घोडा पादबंधनाच्या मेखांस उपटून टाकतो [एवं इतरान् प्राणान् समखिदत्—] त्याप्रमाणें, इतर प्राणांस मुळापासून उपटता झाला. [तं ह अभिसमेत्य ऊचुः—] तेव्हां इतर प्राण त्याच्या सन्मुख येऊन म्हणाले, [भगवन् एधि त्वं नः श्रेष्ठः असि—] 'भगवन् तूंच आमचा स्वामी हो. तूंच आह्मांमध्यें श्रेष्ठ आहेस, [मा उत्क्रमीः इति--] उत्क्रमण करूं नकोस. ' असें बोलले. १२.

अथ हैनं वागुवाच यदहं वासिष्ठोऽस्मि त्वं तद्वसिष्ठोऽसीत्यथ हैनं चक्षुरुवाच यदहं प्रतिष्ठाऽस्मि त्वं तत्प्रतिष्ठाऽसीति ॥१३॥ अथ हैनꣳ श्रोत्रमुवाच यदहꣳ संपदस्मि त्वं तत्संपदसीत्यथ हैनं मन उवाच यदहमायतनमस्मि त्वं तदायतनमसीति ॥ १४

अन्वयार्थ—[अथ ह एनं वाक्०—] त्यानंतर त्यास वाक् म्हणाली, 'मी जी वसिष्ठ आहें तो तूंच वसिष्ठ आहेस.' [अथ ह एनं चक्षुः०—] नंतर त्यास चक्षु म्हणालें, ' मी जी प्रतिष्ठा आहें तूंच ती प्रतिष्ठा आहेस. ' १३ [अथ

श्रोत्रं०—] नंतर त्याला श्रोत्र म्हणालें, 'जी मी संपद् आहें तूंच ती संपद् आहेस.' [अथ....मनः०—] नंतर त्याला मन म्हणालें, 'मी जें आयतन आहें तें तूच आयतन आहेस. १४—आतां श्रुति म्हणते—वागादिकांचें हें म्हणणें युक्तच आहे.

न वै वाचो न चक्षूंषि न श्रोत्राणि न मनाꣳसीत्याचक्षते प्राणा इत्येवाऽऽचक्षते प्राणो ह्येवैतानि सर्वाणि भवति ॥ १५

इति पञ्चमाध्याये प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—[न वै०—] सर्व इंद्रियांना वाक्, चक्षु, श्रोत्र व मन असें म्हणत नाहींत, [प्राणाः०—] तर प्राण असेंच ह्मणतात. [प्राणः हि०—] प्राणच हीं सर्व होतो. याविषयीं सविस्तर विवेचन भाष्यार्थांत पहा. १५ (१)

स होवाच किं मेऽन्नं भविष्यतीति यत्किंचिदिदमाश्वभ्य आशकुनिभ्य इति होचुस्तद्वा एतदनस्यान्नमनो ह वै नाम प्रत्यक्षं न ह वा एवंविदि किंचनानन्नं भवतीति ॥ १

अन्वयार्थ—[सः ह उवाच०—] तो ह्मणाला—माझें अन्न काय होईल? त्यावर वागादिक प्राण म्हणाले—[यत् किंचित् इदं०—] हें जें या लोकीं कुत्र्यांपर्यंत व पक्ष्यांपर्यंत अन्न आहे—कुत्रीं, पक्षी यांसहवर्तमान सर्व प्राण्यांचें जें अन्न आहे तें हें सर्व प्राण्यांकडून खालें जाणारें जें अन्न तें अनाचें—प्राणाचें अन्न आहे. [अनः ह वै०—] 'अन' हें प्राणाचें प्रत्यक्ष नांव आहे. [एवंविदि किंचन अनन्नं न भवति—] अशी उपासना करणाऱ्यामध्यें कांहीहि अनन्न होत नाहीं. सु ब्र. पृ. ४०७ व भाष्यार्थ पहा. १

स होवाच किं मे वासो भविष्यतीत्याप इति होचुस्तस्माद्वा एतदशिष्यन्तः पुरस्ताच्चोपरिष्टाच्चाद्भिः परिदधति लम्भुको ह वासो भवत्यनग्नो ह भवति ॥ २

अन्वयार्थ—[सः ह उवाच०—] तो प्राण ह्मणाला—"माझें वस्त्र काय होईल?" [आपः इति०—] 'आप' असें वागादिक प्राण म्हणाले. [तस्मात् वै०—] ह्मणूनच हे भोजन करणारे भोजनापूर्वीं व नंतर आपांनीं परिधान करि-

तात. [लंभुकः०–] तो वस्त्राला प्राप्त होतो. तो अनग्न होतो. सु. ब्र. पृ. ३२३ पहा. सविस्तर उपपादन भाष्यार्थांत पहा. २–या प्राणदर्शनाची स्तुति–

तद्धैतत्सत्यकामो जाबालो गोश्रुतये वैयाघ्रपद्यायो-
क्त्वोवाच यद्यप्येतच्छुष्काय स्थाणवे ब्रूयाज्जाये-
रन्नेवास्मिञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ॥ ३

अन्वयार्थ—[तत् ह०–] तें हें प्राणदर्शन सत्यकाम जाबाल वैयाघ्रपद्य गोश्रुतीला सांगून ह्मणाला–[यद्यपि०–] " एखाद्या प्राणोपासकानें हें प्राणदर्शन शुष्क स्थाणूला जरी सांगितलें तरी त्याला शाखा फुटतील व त्याला पालवी येईल. " ३–पूर्वोक्त प्राणदर्शनवेत्त्याचें मंथाख्य कर्म–

अथ यदि महज्जिगमिषेदमावास्यायां दीक्षित्वा पौर्णमास्यां
रात्रौ सर्वौषधस्य मन्थं दधिमधुनोरुपमथ्य ज्येष्ठाय श्रेष्ठाय
स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेत् ॥ ४

अन्वयार्थ—[अथ यदि–] नंतर जर तो प्राणोपासक [महत् जिगमिषेत्–] महत्त्वास प्राप्त होण्याची इच्छा करीत असेल तर त्यानें [अमावास्यायां दीक्षित्वा–] अमावास्येस दीक्षा घेऊन [पौर्णमास्यां रात्रौ सर्वौषधस्य मन्थं०–] पौर्णिमेच्या रात्री सर्व औषधींचें पीठ दही व मध यांत घालून त्याचें उपमंथन करून ' ज्येष्ठाय श्रेष्ठाय स्वाहा ' असें ह्मणून–या मंत्रानें [अग्नौ आज्यस्य हुत्वा–] अग्नींत घृतांचें हवन करून [मन्थे संपातं अवनयेत्–] मन्थावर त्या घृताचा अवशेष पाडवावा. ४.

वसिष्ठाय स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेत्प्र-
तिष्ठायै स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेत्सं-
पदे स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेदायतनाय
स्वाहेत्यग्नावाज्यस्य हुत्वा मन्थे संपातमवनयेत् ॥ ५

अन्वयार्थ—' वसिष्ठाय स्वाहा ' या मंत्रानें अग्नींत घृताची आहुति देऊन मंथामध्यें घृतसंपात पाडवावा. ' प्रतिष्ठायै स्वाहा ' या मंत्रानें अग्नींत घृताचा होम करून मंथामध्यें अवशिष्ट घृत पाडवावें. ' संपदे स्वाहा ' या मंत्रानें अग्नींत घृताचें हवन करून मंथांत संपात पाडवावा. ' आतनाय स्वाहा ' या मंत्रानें अग्नींत घृताचें हवन करून मंथांत संपात पाडवावा. ५

अथ प्रतिसृप्याञ्जलौ मन्थमाधाय जपत्यमोनामास्यमा हि ते सर्वमिदꣳस हि ज्येष्ठः श्रेष्ठो राजाऽधिपतिः स मा ज्यैष्ठ्यꣳ श्रैष्ठ्यꣳ राज्यमाधिपत्यं गमयत्वहमेवेदꣳ सर्वमसानीति ॥ ६

अन्वयार्थ—[अथ प्रतिसृप्य—] त्यानंतर अग्नीपासून किंचित् दूर सरून [अंजलौ मंथं आधाय—] ओंजळीत मंथाला ठेवून [जपति—]' अमो नामासि० ' इत्यादि मंत्राचा जप करतो. (त्या मंत्राचा अर्थ—) हे मन्था, [अमः नाम असि—] तूं ' अमः ' या नांवाचा आहेस. [हि सर्वं इदं (जगत्) ते अमा—] कारण हें सर्व जगत् तुझ्यासह आहे. [सः हि ज्येष्ठः०—] तो तू प्राणभूत मन्थ ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेस. [राजा०—] राजा—दीप्तिमान् व अधिपति आहेस. [सः मा०—] तो मथ मला ज्यैष्ठ्य, श्रैष्ठ्य, राज्य व आधिपत्य देवो. [अहं एव इदं सर्वं असानि इति—] मीच हें सर्व असावें. ६

अथ खल्वेतयर्चा पञ्च आचामति सत्सवितुर्वृणीमह इत्याचामति वयं देवस्य भोजनमित्याचामति श्रेष्ठꣳसर्वधातममित्याचामति तुरं भगस्य धीमहीति सर्वं पिबति निर्णिज्य कꣳसं चमसं वा पश्चादग्नेः संविशति चर्मणि वा स्थण्डिले वा वाचंयमोऽप्रसाहः स यदि स्त्रियं पश्येत्समृद्धं कर्मेति विद्यात् ॥ ७

अन्वयार्थ—[अथ खलु०—] नंतर या पुढील ऋचेने पादशः तो मंथ भक्षण करतो. ' तत्सवितुर्वृणीमहे ' असें म्हणून [आचामति—] भक्षण करतो ' वयं देवस्य भोजनं ' असें म्हणून भक्षण करतो. ' श्रेष्ठं सर्वधातमं ' असें म्हणून भक्षण करतो. ' तुरं भगस्य धीमहि ' [इति कंसं चमसं वा निर्णिज्य सर्वं पिबति—] असें म्हणून कंसपात्र किंवा चमसाकार औदुंबर पात्र धुऊन सर्व मन्थशेष पितो. [चर्मणि वा स्थंडिले वा अग्नेः पश्चात् वाचंयमः अप्रसाहः संविशति—] नंतर अजिनावर किंवा तुस्त्या स्थंडिलावर अग्नीच्या पश्चाद्भागी वाक्-चा संयम करून—अनिष्ट स्वप्नदर्शनानें अभिभूत न होईल, अशा रीतीनें यतचित्त होऊन निजतो. [सः यदि स्त्रियं पश्येत् समृद्धं कर्म इति विद्यात्—] तो जर स्वप्नांत स्त्रीला पाहील तर कर्म समृद्ध झालें असें जाणावें. (मंत्राचा अर्थ)—[वयं सवितुः देवस्य तत् भोजनं वृणीमहे—] आम्ही सर्वांला प्रसवणाऱ्या आदित्य देवाच्या त्या मंथरूप भोजनाची प्रार्थना करितों. भोजना-

चींच दोन विशेषणें–[श्रेष्ठं सर्वधातमं–] तें भोजन सर्व अन्नांहून अतिशय प्रशंसनीय व सर्व जगाचें अतिशय धारण करविणारें–स्थितिकारण आहे. किंवा 'सर्वधातमं'–सर्व जगाचें अतिशय विधातृ–जनक–उत्पादक आहे. अशा मंथरूप भोजनाची प्रार्थना करितें. ७

तदेष श्लोको यदा कर्मसु काम्येषु स्त्रियꣳ स्वप्नेषु पश्यति समृद्धिं तत्र जानीयात्तस्मिन्स्वप्ननिदर्शने तस्मिन्स्वप्ननिदर्शने ॥ ८

इति पंचमाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ––[तत् एषः श्लोकः–] त्या अर्थी हा मंत्र आहे. [यदा काम्येषु कर्मसु–] जेव्हां काम्य कर्मांमध्यें [स्वप्नेषु स्त्रियं पश्यति–] स्वप्नांत स्त्रीला पाहतो [तत्र तस्मिन् स्वप्ननिदर्शने समृद्धिं विजानीयात्–] तेव्हां त्या स्वप्नाचें निदर्शन–उत्तम दर्शन झालें असतां कर्माची समृद्धि जाणावी. ८ (२)

ब्रह्मादिस्तंबपर्यंत संसारगति मुमुक्षूंच्या वैराग्यासाठी सांगाव्या, यासाठीं आख्यायिका आरंभिली जाते––

श्वेतकेतुर्हाऽऽरुणेयः पञ्चालानाꣳसमितिमेयाय तꣳह प्रवाहणो जैवलिरुवाच कुमारानु त्वाऽशिषत्पितेत्यनु हि भगव इति ॥ १

अन्वयार्थ––[आरुणेयः श्वेतकेतुः–] अरुणाचा पुत्र श्वेतकेतु [पंचालानां समितिं एयाय–] पंचाल देशांतील लोकांच्या सभेस आला [तं प्रवाहणः जैवलिः उवाच–] त्याला प्रवाहण जैवलि ह्मणाला–[कुमार त्वा पिता अनुअशिषत् इति–] 'हे मुला, तुला पित्यानें शिकविलें आहे का ?' [अनु हि भगवः इति–] 'होय भगवन्' असें श्वेतकेतु त्यावर ह्मणाला. १–राजा ह्मणाला, 'जर तूं पित्याकडून शिक्षित आहेस तर'––

वेत्थ यदितोऽधि प्रजाः प्रयन्तीति न भगव इति वेत्थ यथा पुनरावर्तन्त इति न भगव इति वेत्थ पथोर्देवयानस्य पितृयाणस्य च व्यावर्तना ꣳ न भगव इति ॥ २

अन्वयार्थ––[इतः प्रजाः अधि यत् प्रयन्ति तत् वेत्थ–] 'या लोकाहून वर जाणाऱ्या प्रजा कोठें जातात तें तूं जाणतोस का ?' श्वेतकेतु–[न भगवः इति–] 'नाहीं भगवन्.' [यथा पुनः आवर्तन्ते इति वेत्थ–]

'त्या पुनः या लोकीं परत कशा येतात तें तूं जाणतोस का?' [न०—] 'नाहीं भगवन्.' [देवयानस्य पितृयाणस्य पथोः व्यावर्तना वेत्थ—] 'देवयान व पितृयाण या दोन मार्गांतील प्रत्येक मार्गाची व्यावर्तना—व्यावृत्ति कोठें होते तें जाणतोस का?' [न०—] 'नाहीं भगवन्' असें तो ह्मणाला. २.

वेत्थ यथाऽसौ लोको न संपूर्यत३ इति न भगव इति वेत्थ यथा पञ्चम्यामाहुतावापः पुरुषवचसो भवन्तीति नैव भगव इति ॥ ३

अन्वयार्थ—[यथा असौ लोकः न संपूर्यते इति वेत्थ—] 'तो पितृलोक कोणत्या प्रकारें भरून जात नाही तें तूं जाणतोस का?' [न०—] 'नाहीं भगवन्' असें म्हणाला. [पंचम्यां आहुतौ आपः पुरुषवचसः यथा भवन्ति इति वेत्थ—] 'पांचव्या आहुतीत आप पुरुष या संज्ञेस कशा प्राप्त होतात तें जाणतोस का?' [न०—] 'नाहीं भगवन्' असेंच तो म्हणाला.—सु. ब्र. पृ. २३३ पहा. ३.

अथानु किमनुशिष्टोऽवोचथा यो हीमानि न विद्यात्कथꣳ सोऽनुशिष्टो ब्रुवीतेति स हाऽऽयस्तः पितुरर्धमेयाय तꣳ होवाचाननुशिष्य वाव किल मा भगवानब्रवीदनु त्वाऽशिषमिति ॥४

अन्वयार्थ—[अथ०—] मग असें असतांना तूं 'मी अनुशिष्ट आहें' असें कां सांगितलेंस? [यः हि इमानि न विद्यात् कथं सः अनुशिष्टः ब्रुवीत—] जो या प्रश्नांचीं उत्तरें जाणत नाही, त्यानें 'मी अनुशिष्ट आहें' असें कसें म्हणावें? याप्रमाणें राजाकडून [आयस्तः सः ह पितुः अर्धं एयाय—] पीडला गेलेला श्वेतकेतु पित्याच्या स्थानास आला, आणि [तं ह उवाच—] पित्यास ह्मणाला, [अननुशिष्य वाव किल 'त्वा अनु-अशिषं' इति भगवान् अब्रवीत्—] 'मला न शिकवितांच 'मी तुला शिकविलें आहे' असें आपण मला म्हटलेंत' ४.

पञ्च मा राजन्यबन्धुः प्रश्नानप्राक्षीत्तेषां नैकंचनाशकं विवक्तुमिति स होवाच यथा मा त्वं तदैतानवदो यथाऽऽहमेषां नैकंचन वेद यद्यहमिमानवेदिष्यं कथं ते नावक्ष्यमिति ॥ ५ ॥ स ह गौतमो राज्ञोऽर्धमेयाय तस्मै ह प्राप्तायार्हांचकार स ह प्रातः समाग उदेयाय तꣳ होवाच मानुषस्य भगवन्गौतम वित्तस्य वरं

वृणीथा इति स होवाच तवैव राजन्मानुषं वित्तं यामेव कुमारस्यान्ते वाचमभाषथास्तामेव मे ब्रूहीति स ह कृच्छ्री बभूव ॥ ६

अन्वयार्थ—[राजन्यबन्धुः मा पंच प्रश्नान् अप्राक्षीत्—] मला तो क्षत्रियबंधु पांच प्रश्न विचारता झाला. [तेषां एकंचन विवक्तुं न अशकम्—] पण त्यांतील एकाचेंहि उत्तर देण्यास मी समर्थ झालों नाहीं. [सः ह उवाच—] त्यावर पिता ह्मणाला. [त्वं मा यथा तत् एतान् अवदः—] ' तूं मला जसे हे प्रश्न सांगितलेस व ' त्यातील एकहि मी सागूं शकलों नाहीं, ' ह्मणून ह्मटलेंस [यथा अहं एषा एकंचन न वेद—] तसाच मीहि त्यांतील एकहि जाणत नाही. [यदि अहं इमान्०—] मी जर त्यांस जाणत असतों तर [ते कथं न अवक्ष्यं इति—] तुला ते कसे सागितले नसते ? ' ५. [सः ह०—] तो गौतम राजाच्या स्थानास आला. [प्राप्ताय तस्मै अर्हांचकार—] राजानें आलेल्या त्याची पूजा केली. [सः ह०—] तो दुसऱ्या दिवशी प्रातःकाली इतरांकडून पूजला जाणारा गौतम [सभागे उदेयाय—] सभास्थ राजाकडे उठून गेला. [तं ह उवाच—] तेव्हां त्यास राजा म्हणाला—'हे भगवन् गौतम, [मानुषस्य वित्तस्य वरं वृणीथाः—] मानुष वित्ताचा वर माग ? ' त्यावर गौतम ह्मणाला, [राजन् तव एव मानुषं वित्तं—] ' हे राजन्, मानुष वित्त तुजपाशीच राहो. [कुमारस्य अन्ते यां एव वाचं अभाषथाः तां एव मे ब्रूहि—] कुमारापाशीं जी प्रश्नरूप भाषा बोललास तीच मला सांग. ' तेव्हां [सः ह कृच्छ्री बभूव—] राजा संकटांत पडला. ६—पण अशा संकटांत पडलेला तो 'ब्राह्मणाला मी विद्या सांगत नाहीं ' असें म्हणणें अयोग्य आहे, असें जाणून न्यायानेंच ती सागावी, अशा आशयानें—

तꣳह चिरं वसेत्याज्ञापयांचकार तꣳहोवाच यथा मा त्वं गौतमावदो यथेयं न प्राक् त्वत्तः पुरा विद्या ब्राह्मणान्गच्छति तस्मादु सर्वेषु लोकेषु क्षत्रस्यैव प्रशासनमभूदिति तस्मै होवाच ॥ ७

इति पचमाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—[तं ह चिरं वस इति आज्ञापयाचकार—] तेव्हां त्याला एक वर्षभर ब्रह्मचर्यवास कर, अशी तो आज्ञा करता झाला. [तं ह उवाच—] राजा त्याला ह्मणाला. [गौतम यथा मा त्वं अवदः—] हे गौतमा, ज्या प्रकारानें तू मला ' विद्या सांग ' असें म्हणालास, त्यावरून तूं असें समज. [यथा इयं

प्राक् त्वत्तः०–] ही विद्या तुझ्यापूर्वी ब्राह्मणांकडे ज्या प्रकारें गेलेली नाहीं तो प्रकार प्रसिद्ध आहे, [तस्मात् उ०–] त्यामुळेंच पूर्वीं सर्व लोकांमध्यें क्षत्राचेंच–क्षत्रियाचेंच प्रशासन होतें, [इति तस्मै ह उवाच–] असें बोलून त्यानें गौतमास विद्या सांगितली. ७ (३)

–'पांचव्या आहुतींत आप पुरुषसंज्ञक कशा होतात तें तूं जाणतोस का ?' असा जो राजाचा पांचवा प्रश्न त्याचेंच उत्तर प्रथम दिलें जातें—

असौ वाव लोको गौतमाग्निस्तस्याऽऽदित्य एव समिद्रश्मयो धूमोऽहरर्चिश्चन्द्रमा अङ्गारा नक्षत्राणि विस्फुलिङ्गाः ॥ १

अन्वयार्थ—[गौतम असौ वाव लोकः अग्निः–] हे गौतमा, द्युलोक हाच अग्नि आहे. [तस्य आदित्यः०–] त्याची आदित्य हीच समिधा, रश्मी–किरण हा धूम, दिवस ही ज्वाला, चंद्रमा हे निखारे व नक्षत्रें हे विस्फुलिंग–किटाळें. १.

तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः श्रद्धां जुह्वति तस्या आहुतेः सोमो राजा संभवति २

इति पचमाध्यायस्य चतुर्थ खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—[तस्मिन्०–] त्या या अग्नीत देव श्रद्धेचें हवन करितात. [तस्याः आहुतेः०–] त्या आहुतीपासून सोम राजा उत्पन्न होतो. २. (४)

–दुसऱ्या होमपर्यायासाठीं राजा म्हणतो—

पर्जन्यो वाव गौतमाग्निस्तस्य वायुरेव समिदभ्रं धूमो विद्युदर्चिरशनिरङ्गारा ह्रादनयो विस्फुलिङ्गाः ॥ १

अन्वयार्थ—[पर्जन्यः०–] हे गौतम, पर्जन्य हाच अग्नि आहे. त्याची वायु हीच समिध्, अभ्र हा धूम, विद्युत् ही अर्चि, अशनि हे निखारे व मेघाचें गडगडणें हे विस्फुलिंग. १.

तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः सोमꣳ राजानं जुह्वति तस्या आहुतेर्वर्षꣳ संभवति ॥ २

इति पचमाध्यायस्य पचमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—त्या या अग्नींत देव सोम राजाचें हवन करितात. त्या आहुतीपासून वृष्टि संभवते. २ (५)

पृथिवी वाव गौतमाग्निस्तस्याः संवत्सर एव समिदाकाशो धूमो रात्रिरर्चिर्दिशोऽङ्गारा अवान्तरदिशो विस्फुलिङ्गाः ॥ १

अन्वयार्थ—हे गौतमा, पृथिवीच अग्नि आहे. त्याची संवत्सर हीच समिध्, आकाश धूम, रात्रि ही अर्चि, दिशा हे अंगार व अवान्तर दिशा हे विस्फुलिंग आहेत. १

तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा वर्षं जुह्वति तस्या आहुतेरन्नꣳ संभवति ॥ २

इति पञ्चमाध्यायस्य षष्ठ खण्डः ॥ ६

अन्वयार्थ—त्या या अग्नीत देव वृष्टीचें हवन करितात. त्या आहुतीपासून अन्न संभवतें. २ (६)

पुरुषो वाव गौतमाग्निस्तस्य वागेव समित्प्राणो धूमो जिह्वाऽर्चिश्चक्षुरङ्गाराः श्रोत्रं विस्फुलिङ्गाः ॥ १

अन्वयार्थ—हे गौतमा, पुरुष हाच अग्नि, त्याची वाक् हीच समिध्, प्राण धूम, जिह्वा अर्चि, चक्षु अंगार व श्रोत्र विस्फुलिंग १.

तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा अन्नं जुह्वति तस्या आहुते रेतः संभवति ॥ २

इति पचमाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—त्या या अग्नींत देव अन्नाचें हवन करितात. त्या आहुतीपासून रेत संभवतें. २ (७)

योषा वाव गौतमाग्निस्तस्या उपस्थ एव समिद्यदुपमन्त्रयते स धूमो योनिरर्चिर्यदन्तःकरोति तेऽङ्गारा अभिनन्दा विस्फुलिंगाः ॥१

अन्वयार्थ—हे गौतमा, स्त्री हाच अग्नि आहे. तिचा उपस्थ हीच समिध्, जें उपमंत्रण–संकेत ती करते तो धूम, योनि ही अर्चि, अन्तःकरण हे अंगार व अभिनंद हे विस्फुलिंग. १

तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा रेतो जुह्वति तस्या आहुतेर्गर्भः संभवति ॥२

इति पचमाध्यायस्याष्टमः खण्ड. ॥ ८

अन्वयार्थ—त्या या अग्नींत देव रेत होमितात. त्या आहुतीपासून गर्भ संभवतो. २ (८)

इति तु पञ्चम्यामाहुतावापः पुरुषवचसो भवन्तीति स उल्बावृतो गर्भो दश वा नव वा मासानन्तः शयित्वा यावद्वाऽथ जायते ॥ १

अन्वयार्थ—[इति तु०—] याप्रमाणें पांचवी आहुती दिली असतां आप पुरुषसंज्ञक होतात. असा एका प्रश्नाचा निर्णय सांगितला. [सः उल्बावृतः०—] तो जरायूनें आच्छादित झालेला गर्भ दहा किंवा नऊ महिने [यावत् वा—] किंवा प्राणी पूर्णांग होईपर्यंत [अन्तः०—] मातेच्या कुक्षींत शयन करून [अथ जायते—] नंतर उत्पन्न होतो. सु. ब्र. पृ. २५३ पहा. १

स जातो यावदायुषं जीवति तं प्रेतं दिष्टमितोऽग्नय
एव हरन्ति यत एवेतो यतः संभूतो भवति ॥ २

इति चतुर्थाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—[सः जातः—] तो याप्रमाणें उत्पन्न झालेला [यावत् आयुषं जीवति—] आयुष्य संपेपर्यंत जिवंत राहतो. [तं प्रेतं दिष्टं—] त्या मेलेल्या, कर्मानें परलोकास पाठविलेल्या जन्तूस [इतः अग्नये एव हरन्ति—] येथून अग्नीसाठी—दाहार्थ नेतात. [यतः एव इतः यतः संभूतः भवति—]ज्या अग्नीपासून तो आलेला व ज्यापासून उत्पन्न झालेला असा तो असतो त्या अग्नीसाठीं नेतात २ (९)

—' प्रजा या लोकांतून वर कोणत्या स्थानास जातात तें तूं जाणतोस का ? ' या प्रश्नाचें उत्तर—

तद्य इत्थं विदुर्ये चेमेऽरण्ये श्रद्धा तप इत्युपासते तेऽर्चिषम-
भिसंभवन्त्यर्चिषोऽहरह्न आपूर्यमाणपक्षमापूर्यमाणपक्षाद्या-
न्षडुदङ्ङेति मासाꣳस्तान्॥१॥मासेभ्यः संवत्सरꣳसंवत्स-
रादादित्यमादित्याच्चन्द्रमसं चन्द्रमसो विद्युतं तत्पुरुषोऽ-
मानवः स एनान्ब्रह्म गमयत्येष देवयानः पन्था इति ॥ २

अन्वयार्थ—[तत् ये इत्थं विदुः—] गृहस्थांतील जे असें—वर वर्णन केल्याप्रमाणें पंचाग्निदर्शन जाणतात—पंचाग्नींचें उपासन करितात व [ये च इमे अरण्ये श्रद्धा तपः इति उपासते—] जे हे अरण्यांत श्रद्धा, तप इत्यादिकांची उपासना करितात [ते अर्चिषं अभिसंभवन्ति—] ते अर्चिरभिमानिनी देवतेस प्राप्त होतात [अर्चिषः अहः—] अर्चीपासून अहरभिमानीनि देवतेस, [अह्नः आपूर्यमाणपक्षं—] 'अहः-'पासून शुक्लपक्षाभिमानिनी देवतेस, [आपूर्यमाणपक्षात्—] शुक्लपक्षापासून [यान् षट् मासान् उदङ् एति तान्—] ज्या सहा

महिन्यांत आदित्य उत्तरेस जातो त्या सहा मासांस १. [मासेभ्यः संवत्सरं–] त्या मासांपासून संवत्सरास [संवत्सरात् आदित्यं–] संवत्सरापासून आदित्यास [आदित्यात् चंद्रमसं–] आदित्यापासून चंद्रास, [चन्द्रमसः विद्युतं–] चन्द्रापासून विद्युत्ला प्राप्त होतात. [तत् पुरुषः अमानवः–] तेथें अमानव पुरुष असतो, [सः एनान् ब्रह्म गमयति–] तो यांस कार्यब्रह्मास पोंचवितो. [एषः देवयानः पन्थाः इति–] हा देवयान मार्ग आहे. याविषयीं सविस्तर शास्त्रार्थ भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. ३४४-४७६ पहा. २

अथ य इमे ग्राम इष्टापूर्ते दत्तमित्युपासते ते धूममभिसंभवन्ति धूमाद्रात्रिꣳरात्रेरपरपक्षमपरपक्षाद्यान्षड् दक्षिणैति मासाꣳस्तान्नैते संवत्सरमभिप्राप्नुवन्ति ॥ ३

अन्वयार्थ—[अथ ये इमे ग्रामे–]नंतर जे हे गृहस्थ ग्रामांत[इष्टापूर्ते दत्तं इति उपासते–] इष्टापूर्त, दत्त, अशी उपासना करितात, त्यांचें अनुष्ठान करितात [ते धूमं अभिसंभवन्ति–] ते धूमास प्राप्त होतात [धूमात् रात्रिं–] धूमापासून रात्रीस, [रात्रेः अपरपक्षं–] रात्रीपासून कृष्णपक्षास,[अपरपक्षात् यान् षट् मासान् दक्षिणा एति तान्–] कृष्णपक्षापासून ज्या सहा महिन्यांत सूर्य दक्षिणेस जातो त्या मासांस [एते संवत्सरं न अभिप्राप्नुवन्ति–] हे कर्मी संवत्सराभिमानिनी देवतेस प्राप्त होत नाहीत. सु. ब्र. पृ. २५४ पहा. ३.

मासेभ्यः पितृलोकं पितृलोकादाकाशमाकाशाच्चन्द्रमसमेष सोमो राजा तद्देवानामन्नं तं देवा भक्षयन्ति ॥ ४

अन्वयार्थ—[मासेभ्यः पितृलोकं–] मासांपासून पितृलोकास, [पितृलोकात् आकाशं–] पितृलोकापासून आकाशास, [आकाशात् चंद्रमसं–] आकाशापासून चंद्रास प्राप्त होतात. [एषः सोमः राजा–] हा चंद्र सोमराजा आहे [तत् देवानां अन्नं–] तें देवांचें अन्न आहे. [तं देवाः भक्षयन्ति–] त्यास देव भक्षितात. सु. ब्र. पृ. २५४ पहा. ४

तस्मिन्यावत्संपातमुषित्वाऽथैतमेवाध्वानं पुनर्निवर्तन्ते यथेतमाकाशमाकाशाद्वायुं वायुर्भूत्वा धूमो भवति धूमो भूत्वाऽभ्रं भवति ५

अन्वयार्थ—[तस्मिन् यावत्संपातं उषित्वा–] त्या चंद्रमंडलांत कर्माचा क्षय होईपर्यंत राहून [अथ एतं एव अध्वानं पुनर् निवर्तन्ते–] नंतर याच

पुढील मार्गास पुनः निवृत्त होतात, [यथा इतं–] जसे गेले होते तसे निवृत्त होतात. [आकाशं–] आकाशास प्राप्त होतात. [आकाशात् वायुं–] आकाशापासून वायूस, [वायुः भूत्वा धूमः भवति–] वायु होऊन धूम होतो, [धूमः भूत्वा अभ्रं भवति–] धूम होऊन अभ्र होतो. (यावरील भाष्यार्थ अवश्य पहा. सु. ब्र. पृ. २५७-२६४ पहा. ५.

अभ्रं भूत्वा मेघो भवति मेघो भूत्वा प्रवर्षति त इह व्रीहियवा ओषधिवनस्पतयस्तिलमाषा इति जायन्तेऽतो वै खलु दुर्निष्प्रपतरं यो यो ह्यन्नमत्ति यो रेतः सिञ्चति तद्भूय एव भवति ॥ ६

अन्वयार्थ—[अभ्रं भूत्वा मेघः भवति–] अभ्र होऊन मेघ होतो. [मेघः भूत्वा प्रवर्षति–] मेघ होऊन वृष्टि करतो. [ते इह व्रीहियवाः ओषधिवनस्पतयः तिलमाषाः इति जायन्ते–] ते अनुशयी जीव येथें व्रीहि, यव, ओषधि, वनस्पति, तिल, माष इत्यादि प्रकारचे उत्पन्न होतात. [अतः वै खलु दुर्निष्प्रपतरं–] यास्तव खरोखर त्यांतून बाहेर पडणें अतिशय दुःखकर आहे. [यः यः हि अन्नं अत्ति–] जो जो अन्न खातो व [यः सिंचति–] जो रेतःसेक करतो [तद्भूयः एव भवति–] तद्भूयच–प्रायः तदाकृतिच अनुशयी होतो. सु. ब्र. पृ. २६४-६६-६७-६८ पहा. ६

तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन्ब्राह्मणयोनिं वा क्षत्रियजयोनिं वा वैश्ययोनिं वाथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरञ्श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चण्डालयोनिं वा ॥ ७

अन्वयार्थ—[तत् ये इह रमणीयचरणाः ते अभ्याशः ह यत् रमणीयां योनिं आपद्येरन्–] त्या अनुशयीमध्यें जे या लोकीं रमणीयचरण–ज्यांचें शील उत्तम असतें असे असतात ते सत्वरच रमणीय योनीस प्राप्त होतात. [ब्राह्मणयोनिं वा०–] ब्राह्मणयोनीस, किंवा क्षत्रिययोनीस, किंवा वैश्ययोनीस प्राप्त होतात. [अथ ये इह कपूयचरणाः०–] पण जे येथें अशुभ आचरण करणारे असतात ते सत्वरच अशुभ योनीस प्राप्त होतात. श्वयोनीस, सूकरयोनीस, किंवा चांडालयोनीस. सु. ब्र. पृ. २५७. पहा. ७.

अथैतयोः पथोर्न कतरेणचन तानीमानि क्षुद्राण्यसकृदावर्तीनि भूतानि भवन्ति जायस्व म्रियस्वेत्येतत्तृतीयꣳस्थानं तेनासौ लोको न संपूर्यते तस्माज्जुगुप्सेत तदेष श्लोकः ॥ ८

अन्वयार्थ—[अथ–]पण जे कर्म व उपासना यांतील कांहीच करीत नाहींत ते [एतयोः पथोः न कतरेणचन–] या दोन मार्गांतील कोणत्याच मार्गानें जात नाहींत. ते [तानि इमानि क्षुद्राणि असकृत् आवर्तीनि भूतानि भवन्ति–] तीं हीं क्षुद्र वारंवार आवृत्त होणारी–पुनः पुनः जन्म घेऊन मरणारीं भूतें होतात. [जायस्व म्रियस्व इति एतत् तृतीयं स्थानं–] वारंवार उत्पन्न हो व मर एवढाच त्यांना उद्योग असतो. हें तृतीयस्थान आहे. [तेन असौ लोकः न संपूर्यते–] त्यामुळें परलोक संपूर्ण होत नाहीं. [तस्मात् जुगुप्सेत–] यास्तव त्या संसारगतीची निंदा करावी. [तत् एषः श्लोकः–] या अर्थीं हा श्लोक आहे. सु. ब्र. पृ. २६१ पहा. ८.

स्तेनो हिरण्यस्य सुरां पिबꣳश्च गुरोस्तल्पमावसन्ब्रह्महा चैते पतन्ति चत्वारः पञ्चमश्चाऽऽचरꣳस्तैरिति ॥ ९

अन्वयार्थ—[हिरण्यस्य स्तेनः–] सोन्याचा चोर, [सुरां पिबन्–] सुरा पिणारा, [गुरोः तल्पं आवसन्–] गुरुस्त्रीगमन करणारा [च ब्रह्महा–] व ब्रह्महत्या करणारा [एते चत्वारः पतन्ति–] हे चार पतित होतात. [च पंचमः तैः आचरन् इति–] व पांचवा त्यांच्याशी संसर्ग करणारा. ९.

अथ ह य एतानेवं पञ्चाग्नीन्वेद न सह तैरप्याचरन्पाप्मना लिप्यते शुद्धः पूतः पुण्यलोको भवति य एवं वेद य एवं वेद ॥ १०

इति पञ्चमाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—[अथ ह यः एतान् एव पञ्चाग्नीन् वेद–] पण जो याप्रमाणें याच पंचाग्नींस जाणतो तो [तैः सह अपि आचरन् पाप्मना न लिप्यते–] त्या पाप्यांशीं व्यवहार जरी करीत असला तरी पापानें लिप्त होत नाहीं. [शुद्धः पूतः पुण्यलोकः भवति–] तर शुद्ध, पावन व पुण्यलोक होतो. [यः एवं वेद–] जो असें जाणतो, जो असें जाणतो. १० (१०).

दक्षिण मार्गानें जाणारांचा अन्नभाव 'तद्देवानां अन्नं तं देवा भक्षयन्ति'—तें देवांचें अन्न आहे, त्याला देव भक्षण करितात—पृ.४०६—असा सांगितला व क्षुद्रजन्तुरूप कष्टकर संसारगति सांगितली. त्या दोन्ही दोषांचा परिहार करण्याच्या इच्छेनें वैश्वानराख्य अत्तृभाव प्राप्त होण्यासाठीं पुढील ग्रंथ आरंभिला जातो. 'अन्न खाशील, प्रिय पाहशील' इत्यादि लिंगांवरून पुढील ग्रंथ वैश्वानराख्य अत्तृत्वप्राप्तीसाठींच आहे हें सिद्ध होतें. पण आख्यायिका जी सांगितली आहे ती सुखानें अवबोध—ज्ञान व्हावें, म्हणून आहे व विद्येचें संप्रदान जो शिष्य त्याचा न्याय म्ह० विनयादिसंपत्ति प्रदर्शित करण्यासाठीहि आहे.

प्राचीनशाल औपमन्यवः सत्ययज्ञः पौलुषिरिन्द्रद्युम्नो भाल्लवेयो जनः शार्कराक्ष्यो बुडिल आश्वतराश्विस्ते हैते महाशाला महाश्रोत्रियाः समेत्य मीमांसां चक्रुः को न आत्मा किं ब्रह्मेति ॥ १

अन्वयार्थ—उपमन्यूचें अपत्य प्राचीनशाल, पुलुषाचा पुत्र सत्ययज्ञ, भल्लवीचा पुत्र भाल्लवि व त्याचा पुत्र भाल्लवेय इंद्रद्युम्न, शर्कराक्षाचा पुत्र जन, अश्वतराश्वाचा पुत्र बुडिल, ते हे महागृहस्थ महाश्रोत्रिय एकत्र जमून मीमांसा—विचार करते झाले. आमचा आत्मा कोण? ब्रह्म काय आहे? अशी मीमांसा त्यांनीं केली. सु. ब्र. सू. पृ. ३७६ पहा. १.—पण विचार करूनहि त्यांना आत्म्याविषयीं निश्चय करितां आला नाहीं म्हणून—

ते ह संपादयांचक्रुरुद्दालको वै भगवन्तोऽयमारुणिः संप्रतीममात्मानं वैश्वानरमध्येति तꣳहन्ताभ्यागच्छामेति तꣳहाभ्याजग्मुः ॥२

अन्वयार्थ—[ते ह भगवन्तः—] ते पांचीजण पूजावान् असून [संपादयांचक्रुः—] आपल्या उपदेष्ट्यास संपादन करते झाले. [अयं आरुणिः उद्दालकः संप्रति इमं आत्मानं वैश्वानरं अध्येति—] हा अरुणाचा पुत्र उद्दालक या वैश्वानर आत्म्यास चांगलें स्मरतो. [हन्त तं अभ्यागच्छामः—] आतां आम्ही त्याप्रत जाऊं या, [इति तं ह अभ्याजग्मुः—] असा निश्चय करून ते त्याच्याकडे आले २.—त्यांस पाहूनच त्यांच्या आगमाचें निमित्त जाणून—

स ह संपादयांचकार प्रक्ष्यन्ति मामिमे महाशाला महाश्रोत्रियास्तेभ्यो न सर्वमिव प्रतिपत्स्ये हन्ताहमन्यमभ्यनुशासानीति ॥ ३

अन्वयार्थ—[सः ह संपादयांचकार—] तो आपल्या मनांत असें संपादन

करता झाला. [इमे महाशालाः महाश्रोत्रियाः मां प्रक्ष्यन्ति—] हे महागृहस्थ, महाश्रोत्रिय मला विचारतील. [तेभ्यः सर्वं इव न प्रतिपत्स्ये—] पण त्यांनीं विचारलेलें सर्व सांगण्याची माझी इच्छा नाहीं. [हन्त अहं अन्यं अभ्यनुशासानि इति—] यास्तव मी आतां यांना दुसराच उपदेष्टा सांगेन. (दुसऱ्याच उपदेष्ट्याचें नांव सांगतों.) ३.—असें मनांत म्हणून—

तान्होवाचाश्वपतिर्वै भगवन्तोऽयं कैकेयः संप्रतीममात्मानं वैश्वानरमध्येति तꣳहन्ताभ्यागच्छामेति तꣳहाभ्याजग्मुः ॥ ४

अन्वयार्थ—[तान् ह उवाच—] उद्दालक त्यांस म्हणाला—[भगवंतः अयं कैकेयः अश्वपतिः वै संप्रति इमं आत्मानं वैश्वानरं अध्येति—]—अहो पूज्य ब्राह्मणहो, हा केकयपुत्र अश्वपति ' संप्रति '—चांगल्या प्रकारें या वैश्वानर आत्म्यास स्मरतो. [तं हन्त अभ्यागच्छाम—] त्याच्याकडे आतां आपण सर्व जाऊं या [इति तं ह अभ्याजग्मुः—] असें म्हणून ते सर्व त्याजकडे गेले. ४.

तेभ्यो ह प्राप्तेभ्यः पृथगर्हाणि कारयांचकार स ह प्रातः संजिहान उवाच न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपो नानाहिताग्निर्नाविद्वान्न स्वैरी स्वैरिणी कुतो यक्ष्यमाणो वै भगवन्तोऽहमस्मि यावदेकैकस्मा ऋत्विजे धनं दास्यामि तावद्भगवद्भ्यो दास्यामि वसन्तु भगवन्त इति ॥ ५ ॥ ते होचुर्येन हैवार्थेन पुरुषश्चरेत्तꣳहैव वदेदात्मानमेवेमं वैश्वानरꣳसंप्रत्यध्येषि तमेव नो ब्रूहीति ॥६॥ तान्होवाच प्रातर्वः प्रतिवक्तास्मीति ते ह समित्पाणयः पूर्वाह्णे प्रतिचक्रमिरे तान्हानुपनीयैवैतदुवाच ॥ ७

इति पचमाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—[तेभ्यो ह०—] प्राप्त झालेल्या त्यांची तो राजा [पृथक् अर्हाणि कारयांचकार—] पृथक् पृथक् पूजा करविता झाला. [सः ह प्रातः संजिहानः उवाच—] तो दुसऱ्या दिवशीं शयन सोडून उठतांच त्यांस म्हणाला—[मे जनपदे न स्तेनः न कदर्यः०—] " माझ्या देशांत चोर नाहीं. अदाता नाहीं. मद्यपान करणारा नाहीं. अनाहिताग्नि नाहीं. अविद्वान् नाहीं. परस्त्रीगामी नाहीं. मग स्वैरिणी स्त्रीच कोठून संभवणार ? [भगवन्तः अहं यक्ष्य-

माणः वै अस्मि–] अहो पूज्यहो, मी यज्ञ करणार आहें. [यावत् एकैकस्मै ऋत्विजे धनं दास्यामि तावत् भगवद्भ्यः दास्यामि–] मी एकेका ऋत्विजाला जितकें धन देईन तितकें तुम्हांस देईन. [वसन्तु भवन्तः इति–] आपण रहावें " असें बोलला. ५. [ते ह ऊचुः–] तेव्हां ते म्हणाले–[येन ह एव अर्थेन पुरुषः चरेत् तं ह एव वदेत्–] " ज्या अर्थानें–प्रयोजनानें–उद्देशानें पुरुष आला असेल त्याला तोच अर्थ सांगावा. [इमं वैश्वानरं आत्मानं एव संप्रति अध्येषि–] तूं या वैश्वानर आत्म्यासच चांगल्या प्रकारें स्मरतोस. [तं एव नः ब्रूहि इति–] तोच आम्हांस सांग " असें बोलले ६. [तान् ह उवाच–] त्यांस तो राजा ह्मणाला–[प्रातः वः प्रतिवक्ताऽस्मि इति–] ' मी तुम्हांस प्रातः-कालीं सांगेन. ' [ते ह समित्पाणयः पूर्वाह्णे प्रतिचक्रमिरे–] तेव्हां दुसऱ्या दिवशीं पूर्वाह्णीं ते हातांत समिधा घेऊन राजाकडे गेले. [तान् ह अनुपनीय एव एतत् उवाच–] पण राजा त्यांचें उपनयन न करितांच त्यांस वैश्वानर विद्या सांगता झाला. ७ (११)

औपमन्यव कं त्वमात्मानमुपास्स इति दिवमेव भगवो राजन्निति होवाचैष वै सुतेजा आत्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्तव सुतं प्रसुतमासुतं कुले दृश्यते ॥ १

अन्वयार्थ— (कैकेय–) हे औपमन्यवा, [त्वं कं आत्मानं उपास्से इति–] तूं कोणत्या आत्म्याची उपासना करतोस ? (औपमन्यव–) हे पूज्य राजन्, [दिवं एव–] द्युलोकासच मी उपासितों, असें ह्मणाला. (कैकेय–) [त्वं यं आत्मानं उपास्से एषः वै सुतेजाः आत्मा वैश्वानरः–] ज्याला तूं उपासितोस तो सुतेजा म्हणून प्रसिद्ध असलेला वैश्वानर आत्मा आहे. [तस्मात् तव कुले सुतं प्रसुतं आसुतं दृश्यते–] त्यामुळें तुझ्या कुलांत सोमरूप सुत, कर्मांत प्रसुत व अहर्गणादिकांत आसुत दिसतात म्ह० तुझ्या कुलांतील लोक अतिशय कर्मठ आहेत. या सर्व उपासनेचा शास्त्रार्थ सु. ब्र. पृ. ३७६ वर पहा. १.

अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्स्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते मूर्धा त्वेष आत्मन इति होवाच मूर्धा ते व्यपतिष्यद्यन्मां नाऽऽगमिष्य इति ॥ २

इति पंचमाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—[अन्नं अत्सि–] 'तूं अन्न खातोस,[प्रियं पश्यसि–] पुत्रादि प्रियास पाहतोस, [यः एतं एवं वैश्वानरं आत्मानं उपास्ते सः अन्नं अत्ति प्रियं पश्यति अस्य कुले ब्रह्मवर्चसं भवति–] जो दुसराहि कोणी याप्रमाणें या वैश्वानर आत्म्याला उपासितो, तो अन्न खातो, इष्ट पाहतो, याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें; [तु एषः आत्मनः मूर्धा इति–] पण हा वैश्वानर आत्म्याचा मूर्धा आहे,' असें तो ह्मणाला. [यत् मां न आगमिष्यः ते मूर्धा व्यपतिष्यत्–] 'तूं माझ्याकडे जर आला नसतास तर तुझा मूर्धा पडला असता,' [इति–] असें ह्मणाला. २ (१२).

अथ होवाच सत्ययज्ञं पौलुषिं प्राचीनयोग्य कं त्वमात्मानमुपास्स इत्यादित्यमेव भगवो राजन्निति होवाचैष वै विश्वरूपं आत्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्तव बहु विश्वरूपं कुले दृश्यते ॥ १

अन्वयार्थ—[अथ०–] नंतर राजा सत्ययज्ञ पौलुषीस ह्मणाला–'हे प्राचीनयोग्य, तूं कोणत्या आत्म्याला उपासितोस?' असें ह्मणाला. 'हे पूज्य राजन्, आदित्य याच आत्म्यास मी उपासितों;' असें सत्ययज्ञ ह्मणाला. (त्यावर राजा म्हणतो–) [एषः वै विश्वरूपं आत्मा०–] हा विश्वरूप आत्मा वैश्वानर आहे, कीं ज्या आत्म्याला तूं उपासितोस. [तस्मात् तव कुले बहु विश्वरूपं दृश्यते–] त्यामुळें तुझ्या कुलांत पुष्कळ विश्वरूप–ऐहिक-पारलौकिक उपकरणजात दिसतें.

प्रवृत्तोऽश्वतरीरथो दासीनिष्कोऽत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते चक्षुष्ट्वेतदात्मन इति होवाचान्धोऽभविष्यो यन्मां नाऽऽगमिष्य इति ॥ २

इति पंचमाध्यायस्य त्रयोदश. खण्ड. ॥ १३

अन्वयार्थ—[प्रवृत्तः अश्वतरीरथः–] 'तुझ्या मागून प्रवृत्त झालेला अश्वतरीयुक्त रथ, दासीसह हार दिसतो. तूं अन्न खातोस, प्रिय पाहतोस. जो या वैश्वानर आत्म्याची अशी उपासना करतो तोहि अन्न खातो, प्रिय पाहतो, याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें. [तु एतत् आत्मनः चक्षुः–] पण आत्म्याचा

हा चक्षु आहे,' असें तो बोलला. [यत् मां न आगमिष्यः अन्धः अभविष्यः—] 'मजकडे आला नसतास तर तू अंध झाला असतास.' २ (१३)

अथ होवाचेन्द्रद्युम्नं भाल्लवेयं वैयाघ्रपद्य कं त्वमात्मान-मुपास्स इति वायुमेव भगवो राजन्निति होवाचैष वै पृथग्वर्त्माऽऽत्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्त्वां पृथग्बलय आयन्ति पृथग्रथश्रेणयोऽनुयन्ति ॥ १

अन्वयार्थ—त्यानंतर राजा इद्रद्युम्न भाल्लवेयास ह्मणाला—'हे वैयाघ्रपद्य, तूं कोणत्या आत्म्यास उपासितोस?' 'हे पूज्य राजन्, मी वायूसच उपासितों,' असें तो ह्मणाला. (राजा—) हा तर नाना गतिरूप आत्मा वैश्वानर आहे कीं ज्याला तूं उपासितोस. त्यामुळें तुजकडे नाना दिशांतील बलि—उपहार येतात व तुझ्या मागून रथांच्या पंक्ति जातात. १

अत्स्यन्नं पश्यति प्रियमत्स्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते प्राणस्त्वेष आत्मन इति होवाच प्राणस्त उदक्रमिष्यद्यन्मां नाऽऽगमिष्य इति ॥ २

इति पञ्चमाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—" तूं अन्न खातोस, प्रिय पाहतोस; जो कोणी अशा रीतीनें या वैश्वानर आत्म्याची उपासना करतो तोहि अन्न खातो, प्रिय पाहतो, याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें. पण हा आत्म्याचा प्राण आहे " असें तो म्हणाला. [यत् मां न आगमिष्यः—] तूं मजकडे जर आला नसतास तर [ते प्राणः उदक्रमिष्यत्—] तुझा प्राण उत्क्रान्त झाला असता. २ (१४)

अथ होवाच जनःशार्कराक्ष्य कं त्वमात्मानमुपास्स इत्याकाशमे-व भगवो राजन्निति होवाचैष वै बहुल आत्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्त्वं बहुलोऽसि प्रजया च धनेन च ॥ १

अन्वयार्थ—नंतर राजा जनास म्हणाला—'हे शार्कराक्ष्य, तूं कोणत्या आत्म्याला उपासितोस?' 'हे भगवन् राजन्, मी आकाशासच उपासितों,' असें तो म्हणाला, (राजा—) हा बहुल आत्मा वैश्वानर आहे, कीं ज्या आत्म्याला तूं उपासितोस. तस्मात् तूं प्रजा व धन यांनीं बहुल आहेस. १.

अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्त्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते संदेहस्त्वेष आत्मन इति होवाच संदेहस्ते व्यशीर्यद्यन्मां नाऽऽगमिष्य इति ॥ २

इति पंचमाध्यायस्य पंचदशः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—अन्न खातोस, प्रिय पाहतोस; जो अशा रीतीनें या आत्म्यास वैश्वानरास उपासितो तोहि अन्न खातो, प्रिय पहातो व त्याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें. पण हा आत्म्याचा संदेह—शरीराचा मध्य भाग आहे. तूं मजकडे जर आला नसतास तर [ते संदेहः व्यशीर्यत्—] तुझा संदेह—शरीरमध्यभाग शीर्ण—नष्ट झाला असता. २

अथ होवाच बुडिलमाश्वतराश्विं वैयाघ्रपद्य कं त्वमात्मानमुपास्स इत्यप एव भगवो राजन्निति होवाचैष वै रयिरात्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्त्वꣳरयिमान्पुष्टिमानसि ॥ १

अन्वयार्थ—त्यानंतर राजा बुडिल आश्वतराश्वीस म्हणाला—" हे वैयाघ्रपद्य तूं कोणत्या आत्म्याला उपासितोस ? " तो म्हणाला—' हे भगवन् राजन्, मी ' अपः ' याच आत्म्याची उपासना करतों.' (राजा—) ज्या आत्म्याला तूं उपासितोस तोच हा रयि आत्मा वैश्वानर आहे. त्यामुळें तूं रयिमान्—धनवान् पुष्टिमान् आहेस. १

अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्त्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते बस्तिस्त्वेष आत्मन इति होवाच बस्तिस्ते व्यभेत्स्यद्यन्मां नाऽऽगमिष्य इति २

इति पञ्चमाध्यायस्य षोडशः खण्डः ॥ १६

अन्वयार्थ—'तूं अन्न खातोस, प्रिय पाहतोस, जो याप्रमाणें या आत्म्यास वैश्वानरास उपासितो तोहि अन्न खातो, प्रिय पाहतो व याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें. पण आत्म्याचा हा बस्ति आहे.' असें राजा म्हणाला. 'तूं जर मजकडे आला नसतास तर [ते बस्तिः व्यभेत्स्यत्—] तुझा बस्ति फुटला असता २.

अथ होवाचोद्दालकमारुणिं गौतम कं त्वमात्मानमुपास्स इति पृथिवीमेव भगवो राजन्निति होवाचैष वै प्रतिष्ठाऽऽत्मा वैश्वानरो यं त्वमात्मानमुपास्से तस्मात्त्वं प्रतिष्ठितोऽसि प्रजया च पशु-

भिश्च ॥१॥ अत्स्यन्नं पश्यसि प्रियमत्स्यन्नं पश्यति प्रियं भवत्यस्य ब्रह्मवर्चसं कुले य एतमेवमात्मानं वैश्वानरमुपास्ते पादौ त्वेतावात्मन इति होवाच पादौ ते व्यम्लास्येतां यन्मां नाऽऽगमिष्य इति२

इति पचमाध्यायस्य सप्तदशः खण्डः ॥ १७

अन्वयार्थ—नंतर राजा कैकेय उद्दालक आरुणीस ह्मणाला—' हे गौतमा, तूं कोणत्या आत्म्याला उपासितोस ?' ' हे पूज्य राजन्, पृथिवीसच मी उपासितों,' असें उद्दालक ह्मणाला. ' ज्या आत्म्याला तू उपासितोस तो हाच आत्मा वैश्वानर प्रतिष्ठा आहे. तस्मात् तूं प्रजेनें व पशूंनीं प्रतिष्ठित आहेस.' १. 'तूं अन्न खातोस, प्रिय पाहतोस. दुसराहि जो कोणी याप्रमाणें या वैश्वानर आत्म्याची उपासना करतो तो अन्न खातो, पुत्रादि प्रिय पाहतो. त्याच्या कुलांत ब्रह्मवर्चस होतें. पण हे त्या वैश्वानर आत्म्याचे दोन पाय आहेत. तूं जर मजकडे आला नसतास तर [ते पादौ व्यम्लास्येतां—] तुझे दोन्ही पाय विम्लान—लुले झाले असते,' असें तो बोलला २ (१७)

तान्होवाचैते वै खलु यूयं पृथगिवेममात्मानं वैश्वानरं विद्वाꣳसोऽन्नमत्थ यस्त्वेतमेवं प्रादेशमात्रमभिविमानमात्मानं वैश्वानरमुपास्ते स सर्वेषु लोकेषु सर्वेषु भूतेषु सर्वेष्वात्मस्वन्नमत्ति ॥ १ ॥

अन्वयार्थ—[तान् ह उवाच—] कैकेय त्यांस ह्मणाला—[यूयं एते खलु वै इमं आत्मानं वैश्वानरं पृथक् इव विद्वांसः अन्नं अत्थ—] तुम्ही हे सर्व या आत्म्याला—वैश्वानराला पृथक्-से जाणणारे अन्न खातां.[तु यः एतं एवं प्रादेशमात्रं अभिविमानं आत्मानं वैश्वानरं उपास्ते—] पण जो याप्रमाणें प्रादेशमात्र ' हाच मी ' अशा अभिमानाचा विषय होणाऱ्या वैश्वानर आत्म्याला उपासितो [सः सर्वेषु लोकेषु०—] तो सर्वलोकांमध्यें, सर्व भूतांमध्यें व सर्व आत्म्यांमध्यें [अन्नं अत्ति—] अन्न खातो. १.

तस्य ह वा एतस्याऽऽत्मनो वैश्वानरस्य मूर्धैव सुतेजाश्चक्षुर्विश्वरूपः प्राणः पृथग्वर्त्माऽऽत्मा संदेहो बहुलो बस्तिरेव रयिः पृथिव्येव पादावुर एव वेदिर्लोमानि बर्हिर्हृदयं गार्हपत्यो मनोऽन्वाहार्यपचन आस्यमाहवनीयः ॥ २

इति पञ्चमाध्यायस्याष्टादशः खण्डः ॥ १८

अन्वयार्थ—[तस्य ह वै एतस्य०—] त्याच या आत्म्याचा—वैश्वानराचा [मूर्धा एव सतेजाः—] मूर्धाच सुतेजा—द्युलोक आहे. [चक्षुः विश्वरूपः—] चक्षु विश्वरूप—आदित्य आहे. [प्राणः०—] प्राण वायु आहे. [संदेहः बहुलः—] देहमध्यभाग बहुल—आकाश आहे. [बस्तिः०—] बस्तिच रयि आहे व पृथिवीच दोन पाद आहेत. [उरः एव०—] उरच वेदि आहे. [लोमानि०—] लोम दर्भ आहेत. [हृदयं०—] हृदय गार्हपत्य, [मनः०—] मन अन्वाहार्यपचन व [आस्यं०—] आस्य—मुख आहवनीय आहे. या सर्व कल्पनेंतील सादृश्यादिकांसाठीं भाष्यार्थ पहा. शास्त्रार्थासाठीं सु. ब्र. १.२.७ पृ. ६० पहा.२ (१८).

तद्यद्भक्तं प्रथममागच्छेत्तद्धोमीयꣳस यां प्रथमामाहुतिं जुहुयात्तां जुहुयात्प्राणाय स्वाहेति प्राणस्तृप्यति ॥ १

अन्वयार्थ—[तत् यत् भक्तं प्रथमं आगच्छेत् तत् होमीयं—] असें असतां जें अन्न प्रथम भोजनार्थ येईल त्याचा होम करावा. [सः यां प्रथमां आहुतिं जुहुयात् तां जुहुयात् प्राणाय स्वाहा इति—] तो भोक्ता ज्या प्रथम आहुतीला देईल ती त्यानें 'प्राणाय स्वाहा' या मंत्रानें द्यावी. [प्राणः तृप्यति—] तिच्या योगानें प्राण तृप्त होतो. सु.ब्र.३.३.२६ पृ.३६० पहा.१.

प्राणे तृप्यति चक्षुस्तृप्यति चक्षुषि तृप्यत्यादित्यस्तृप्यत्यादित्ये तृप्यति द्यौस्तृप्यति दिवि तृप्यन्त्यां यत्किंच द्यौश्चाऽऽदित्यश्चाधितिष्ठतस्तत्तृप्यति तस्यानु तृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥ २

इति पञ्चमाध्यायस्यैकोनविंशः खण्डः ॥ १९

अन्वयार्थ—[प्राणे तृप्यति चक्षुः तृप्यति—] प्राण तृप्त झाला असतां चक्षु तृप्त होतो, [चक्षुषि तृप्यति आदित्यः०—] चक्षु तृप्त झाला असतां आदित्य तृप्त होतो. [आदित्ये०—] आदित्य तृप्त झाला असतां द्युलोक तृप्त होतो [दिवि तृप्यन्त्यां—] द्युलोक तृप्त झाला असतां [द्यौः च आदित्यः च यत् किंच अधितिष्ठतः तत् तृप्यति—] द्यौ व आदित्य ज्याच्यावर स्वामित्वानें अधिष्ठत होतात तें सर्व तृप्त होतें. [तस्य तृप्तिं अनु—] त्याच्या तृप्तीच्या मागोमाग स्वतः भोक्ता [प्रजया०—] प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनीं तृप्त होतो.२.(१९)

अथ यां द्वितीयां जुहुयात्तां जुहुयाद् व्यानाय स्वाहेति व्यानस्तृप्यति १व्याने तृप्यति श्रोत्रं तृप्यति श्रोत्रे तृप्यति चन्द्रमास्तृप्यति चन्द्रमसि तृप्यति दिशस्तृप्यन्ति दिक्षु तृप्यन्तीषु यत्किंच दिशश्च चन्द्रमाश्चाधितिष्ठन्ति तत्तृप्यति तस्यानु तृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति॥२

इति पचमाध्यायस्य विंशः खण्डः ॥ २०

अन्वयार्थ—[अथ यां द्वितीयां०—] नंतर भोक्त्यानें जी दुसरी आहुति द्यावयाची ती त्यानें ' व्यानाय स्वाहा' या मंत्रानें द्यावी. म्हणजे व्यान तृप्त होतो. १. व्यान तृप्त झाला असतां श्रोत्र तृप्त होतें. श्रोत्र तृप्त झालें असतां चंद्रमा तृप्त होतो. चंद्रमा तृप्त झाला असता दिशा तृप्त होतात, दिशा तृप्त झाल्या असतां दिशा व चंद्रमा ज्यावर अधिष्ठित होतात तें सर्व तृप्त होतें. त्याच्या तृप्तीच्या मागोमाग भोक्ता प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनी तृप्त होतो. २ (२०)

अथ यां तृतीयां जुहुयात्तां जुहुयादपानाय स्वाहेत्यपानस्तृप्यति ॥ १ ॥ अपाने तृप्यति वाक्तृप्यति वाचि तृप्यन्त्यामग्निस्तृप्यत्यग्नौ तृप्यति पृथिवी तृप्यति पृथिव्यां तृप्यन्त्यां यत्किंच पृथिवी चाग्निश्चाधितिष्ठतस्तत्तृप्यति तस्यानुतृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति२

इति पचमाध्यायस्य एकविंशः खण्डः ॥ २१

अन्वयार्थ—[अथ यां०—] नंतर तो जो तिसरी आहुति देईल ती त्यानें ' अपानाय स्वाहा ' या मंत्रानें द्यावी. तिच्या योगानें अपान तृप्त होतो. १. अपान तृप्त झाला असतां वाक् तृप्त होते, वाक् तृप्त झाली असतां अग्नि तृप्त होतो, अग्नि तृप्त झाला असतां पृथिवी तृप्त होते, पृथिवी तृप्त झाली असतां पृथिवी व अग्नि ज्याच्यावर अधिष्ठित होतात, तें सर्व तृप्त होतें. त्याच्या तृप्तीच्या मागून स्वतः भोक्ता प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनीं तृप्त होतो. २ (२१)

अथ यां चतुर्थीं जुहुयात्तां जुहुयात्समानाय स्वाहेति समानस्तृप्यति ॥ १ ॥ समाने तृप्यति मनस्तृप्यति मनसि तृप्यति पर्जन्यस्तृप्यति पर्जन्ये तृप्यति विद्युत्तृप्यति विद्युति

तृप्यन्त्यां यत्किंच विद्युच्च पर्जन्यश्चाधितिष्ठतस्तत्तृप्यति तस्यानु तृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥

इति पंचमाध्यायस्य द्वाविंशः खण्डः ॥ २२

अन्वयार्थ—नंतर तो जी चवथी आहुति देतो ती त्यानें ' समानाय स्वाहा ' या मंत्रानें द्यावी. म्हणजे समान तृप्त होतो. १ समान तृप्त झाला असतां मन तृप्त होतें, मन तृप्त झालें असतां पर्जन्य तृप्त होतो. पर्जन्य तृप्त झाला असतां विद्युत् तृप्त होते. विद्युत तृप्त झाली असतां विद्युत व पर्जन्य ज्याच्यावर अधिष्ठित होतात तें तृप्त होतें. त्याच्या मागोमाग भोक्ता प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनी तृप्त होतो. २ (२२)

अथ यां पञ्चमीं हुजुयात्तां जुहुयादुदानाय स्वाहेत्युदानस्तृप्यति ॥ १ ॥ उदाने तृप्यति त्वक्तृप्यति त्वचि तृप्यन्त्यां वायुस्तृप्यति वायौ तृप्यत्याकाशस्तृप्यत्याकाशे तृप्यति यत्किंच वायुश्चाऽऽकाशश्चाधितिष्ठतस्तत्तृप्यति तस्यानुतृप्तिं तृप्यति प्रजया पशुभिरन्नाद्येन तेजसा ब्रह्मवर्चसेनेति ॥ २

अन्वयार्थ—त्यानंतर तो जो पांचवी आहुति देईल ती त्यानें ' उदानाय स्वाहा ' या मंत्रानें द्यावी. त्यामुळें उदान तृप्त होतो. १. उदान तृप्त झाला असतां त्वक् तृप्त होते, त्वक् तृप्त झाली असतां वायु तृप्त होतो. वायु तृप्त झाला आसतां आकाश तृप्त होतें. आकाश तृप्त झालें असतां वायु व आकाश ज्याच्यावर अधिष्ठित होतात तें तृप्त होतें. त्याच्या तृप्तीच्या मागोमाग भोक्ता प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनीं तृप्त होतो. २ (२३)

स य इदमविद्वानग्निहोत्रं जुहोति यथाऽङ्गारानपोह्य भस्मनि जुहुयात्तादृक्तत्स्यात् ॥ १

अन्वयार्थ—[सः यः इदं अविद्वान्—] तो जो कोणी हें वैश्वानरदर्शन न जाणणारा [अग्निहोत्रं जुहोति—] अग्निहोत्राचें हवन करतो त्याचें तें हवन [अंगारान् अपोह्य यथा भस्मनि जुहुयात् तादृक् तत् स्यात्—) निखारे काढून टाकून भस्मांत—राखेंत जसें हवन करावें तसें तें होतें १.

अथ य एतदेवं विद्वानग्निहोत्रं जुहोति तस्य सर्वेषु लोकेषु सर्वेषु भूतेषु सर्वेष्वात्मसु हुतं भवति ॥ २

अन्वयार्थ—[अथ यः एतत् एवं विद्वान् अग्निहोत्रं जुहोति—] पण जो असें जाणणारा हें अग्निहोत्र होमितो [तस्य सर्वेषु०....हुतं भवति—] त्याचें सर्व लोकांमध्यें, सर्व भूतांमध्यें व सर्व आत्म्यांमध्यें हुत—हवन केलेलें असें होतें२

तद्यथेषीकातूलमग्नौ प्रोतं प्रदूयेतैवꣳहास्य सर्वे पाप्मानः
प्रदूयन्ते य एतदेवं विद्वानग्निहोत्रं जुहोति ॥ ३

अन्वयार्थ—[तत्—] त्याविषयीं दृष्टांत [यथा इषीकातूलं अग्नौ प्रोतं प्रदूयेत—] ज्याप्रमाणें मुंजातृणामध्यें असलेली काडी अग्नींत टाकली असतां तत्काल जळून जाते [एवं ह अस्य सर्वे पाप्मानः प्रदूयन्ते—] त्याप्रमाणें या विद्वानाचीं सर्व पापें जळतात, [यः एतत् एवं०—] जो हें असें जाणणारा अग्निहोत्रहवन करतो त्यांचीं पापें जळतात. सु.ब्र.पृ.४४३ पहा. ३

तस्मादु हैवंविद्यद्यपि चण्डालायोच्छिष्टं प्रयच्छेदात्मनि
हैवास्य तद्वैश्वानरे हुतꣳस्यादिति तदेष श्लोकः ॥ ४

अन्वयार्थ—[तस्मात् उ ह एवंविद् यद्यपि चण्डालाय उच्छिष्टं प्रयच्छेत्—] तस्मात् वैश्वानरोपासक जरी चांडालाला उच्छिष्ट देईल [तत् अस्य आत्मनि ह एव वैश्वानरे हुतं स्यात्—] तरी तें त्याचें उच्छिष्ट अन्नहि आत्म्यामध्येंच—वैश्वानरांत हुत होईल [तत् एषः श्लोकः—]या अर्थीं हा श्लोक आहे. ४

यथेह क्षुधिता बाला मातरं पर्युपासत एवꣳ सर्वाणि
भूतान्यग्निहोत्रमुपासत इत्यग्निहोत्रमुपासत इति ॥ ५

इति पंचमाध्यायस्य चतुर्विंश खण्डः ॥ २४

इति छान्दोग्योपनिषदि पंचमोऽध्याय. समाप्तः ॥ ५ ॥

अन्वयार्थ—[यथा इह क्षुधिताः बालाः मातरं पर्युपासते—] ज्याप्रमाणें येथें क्षुधित बालकें मातेची पर्युपासना करितात [एवं सर्वाणि भूतानि०—] त्याप्रमाणें सर्व भूतें अग्निहोत्राची उपासना करितात. ५ (२४)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
छान्दोग्योपनिषदाचा पांचवा अध्याय समाप्त झाला.

अथ षष्ठोऽध्यायः ।

'सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलान्० ' ३. १४–पृ. ३६० असें सांगितलें. पण त्याच्यापासून हें जगत् उत्पन्न होतें, त्याच्यामध्येंच लीन होतें व त्याच्यामुळेंच चेष्टा करतें, हें कसें ? तें सांगावें म्हणून हा सहावा अध्याय आरंभिला जातो. त्यानंतर 'एक विद्वान् जेवला असतां सर्व जगत् तृप्त होतें,' असें नुक्तेंच सांगितलें. पण सर्व भूतस्थ आत्म्याला जर एकत्व असेल तरच तसें होणें उपपन्न आहे. प्रतिशरीरीं आत्मभेद असतांना तसें होणें शक्य नाहीं. तेव्हां आत्म्याचें एकत्व कसें ? यास्तव त्यासाठी–तें सांगण्यासाठीहि हा सहावा अध्याय आरंभिला जातो. पिता-पुत्रांची जी आख्यायिका आहे ती विद्येचें अत्यंत सारत्व–सारतमत्व द्योतित करण्यासाठीं आहे. कारण पिता पुत्राला अत्यंत सारच सांगेल हें उघड आहे.

ॐ । श्वेतकेतुर्हाऽऽरुणेय आस तꣳह पितोवाच श्वेतकेतो वस ब्रह्मचर्यं न वै सोम्यास्मत्कुलीनोऽननूच्य ब्रह्मबन्धुरिव भवतीति ॥ १

अन्वयार्थ—[आरुणेयः श्वेतकेतुः ह आस–] अरुणपुत्राचा पुत्र श्वेतकेतु होता. [तं ह पिता उवाच–] त्याला पिता आरुणि म्हणाला. [श्वेतकेतो ब्रह्मचर्यं वस–] 'हे श्वेतकेतो, ब्रह्मचर्यवास कर.' [सोम्य अस्मत्कुलीनः अननूच्य ब्रह्मबन्धुः इव न वै भवति -] 'हे सोम्य, आमच्या कुलांतील पुत्र अध्ययन न करितां ब्रह्मबन्धुसा–ब्राह्मणांना आपले बंधु म्हणणारा पण स्वतः ब्राह्मणांसारखें आचरण न करणारा असा होत नाही.' १

स ह द्वादशवर्ष उपेत्य चतुर्विꣳशतिवर्षः सर्वान्वेदानधीत्य महामना अनूचानमानी स्तब्ध एयाय तꣳह पितोवाच श्वेतकेतो यन्नु सोम्येदं महामना अनूचानमानी स्तब्धोऽस्युत तमादेशमप्राक्ष्यः ॥ २

अन्वयार्थ––[सः ह द्वादशवर्षः उपेत्य चतुर्विंशतिवर्षः सर्वान् वेदान् अधीत्य–] तो श्वेतकेतु बारा वर्षांचा असतांना आचार्यापाशीं जाऊन चोवीस

वर्षांचा होईपर्यंत सर्व वेदांचें अध्ययन करून [महामनाः—] आपल्याला सर्वापेक्षां मोठा समजणारा, [अनूचानमानी—] आपल्याला मोठा प्रवक्ता मानणारा [स्तब्धः—] अनम्रस्वभाव असा होऊन [एयाय—] घरीं परत आला. [तं ह पिता उवाच—] त्याला पिता म्हणाला. [हे सोम्य श्वेतकेतो यत् नु इदं महामनाः अनूचानमानी स्तब्धः असि—] 'पुत्रा, हा जो तूं असा महामना, अनूचानमानी, स्तब्ध आहेस तो कां? [उत तं आदेशं अप्राक्ष्यः—] त्या आदेशाला तरी विचारलेंस का? (ज्याचा उपदेश केला जातो तो आदेश—परब्रह्म. किंवा ज्याच्यायोगानें परब्रह्माचा उपदेश केला जातो तो आदेश. तो तूं आचार्याला विचारलास का?) २.—त्या आदेशाचाच विशेष आरुणि सांगतो—

येनाश्रुतꣳश्रुतं भवत्यमतं मतमविज्ञातं विज्ञातमिति कथं नु भगवः स आदेशो भवतीति ॥ ३

अन्वयार्थ—[येन अश्रुतं श्रुतं भवति—] जो आदेश ऐकल्यानें अश्रुत असेंहि श्रुत होतें. [अमतं मतं—] अतर्कित असेंहि तर्कित होतें व [अविज्ञातं विज्ञातं—] अविज्ञात—अनिश्चित निश्चित होतें. (तें ऐकून श्वेतकेतु म्हणतो—) [भगवः कथं नु सः आदेशः भवति इति—] भगवन्, तो आदेश कसा आहे? सु. ब्र. पृ. १२५ पहा. ३.—तो आदेश कसा असतो, तें ऐक—

यथा सोम्यैकेन मृत्पिण्डेन सर्वं मृन्मयं विज्ञातꣳस्याद्वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥ ४

अन्वयार्थ—[सोम्य यथा एकेन मृत्पिण्डेन—] हे प्रियदर्शन, ज्याप्रमाणें एका मृत्पिंडानें—मातीच्या गोळ्याचें यथावत् ज्ञान झाल्यानें [सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात्—] सर्व मृन्मय विज्ञात होतें, [विकारः वाचारम्भणं नामधेयं—] विकार वाचारंभण—वाङ्मात्र नामधेय आहे. [मृत्तिका इति एव सत्यं—] मृत्तिका हीच सत्य आहे. सु. ब्र. पृ. १४५ पहा. ४.

यथा सोम्यैकेन लोहमणिना सर्वं लोहमयं विज्ञातꣳस्याद्वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं लोहमित्येव सत्यम् ॥ ५

अन्वयार्थ—[सोम्य यथा एकेन लोहमणिना—] हे प्रियदर्शन, ज्याप्रमाणें एका ज्ञात झालेल्या सुवर्णाच्या गोळ्यानें [सर्वं लोहमयं विज्ञातं स्यात्—] दुसरें

सर्व सुवर्णविकारजात विज्ञात होतें. [वाचा०–] वाक्-चें आलंबनमात्र विकार आहे. नुस्तें नांव आहे. सोनेंच खरें आहे. ५.

यथा सोम्यैकेन नखनिकृन्तनेन सर्वं काष्णायसं विज्ञातꣳ स्याद्वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं कृष्णायसमित्येव सत्यमेवꣳसोम्य स आदेशो भवतीति ॥ ६

अन्वयार्थ—[सोम्य यथा एकेन०–] हे सोम्य, ज्याप्रमाणें ज्ञात झालेल्या एका लोखंडाच्या गोळ्यानें सर्व लोखंडाचा विकार ज्ञात होतो. कारण विकार वाक्-चें आलंबनमात्र नामधेय आहे. लोखडच सत्य आहे. हे सोम्य, असा तो आदेश आहे. ६.

न वै नूनं भगवन्तस्त एतदवेदिषुर्यद्ध्येतदवेदिष्यन्कथं मे नावक्ष्यन्निति भगवाꣳस्त्वेव मे तद्ब्रवीत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ७

इति षष्ठाध्यायस्य प्रथम खण्ड. ॥ १

अन्वयार्थ—[नूनं ते भगवन्तः न वै एतत् अवेदिषुः–] " खरोखर ते माझे पूज्य गुरु हें जाणत नाहींत. [हि यत् एतत् अवेदिष्यन् कथं मे न अवक्ष्यन्–] कारण ते जर हें जाणत असते तर मला त्यांनी कसें सांगितलें नसतें ? [भगवान् तु एव मे तत् ब्रवीतु इति–] आपणच मला तें सांगा " [तथा सोम्य इति ह उवाच–] ' हे प्रिय पुत्रा, बरें तर तसें होवो,' असें आरुणि ह्मणाला. ७ (१)

सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् । तद्धैक आहुरसदेवेदमग्र आसीदेकमेवाद्वितीयं तस्मादसतः सज्जायत ॥ १ ॥

अन्वयार्थ—हे सोम्य, [इदं–] हें जगत् [अग्रे–] उत्पत्तीच्या पूर्वी [सत् एव–] सद्रूपच [आसीत्–] होतें. [एकं एव अद्वितीयं–] एकच व अद्वितीय. [तत् ह–] त्याविषयी [एके–] कित्येक [असत् एव इदं अग्रे आसीत् एकं एव अद्वितीयं इति आहुः–] हें उत्पत्तीच्या पूर्वी असत्-च एकच अद्वितीय होतें, असें ह्मणतात [तस्मात् असतः सत् जायत–अजायत–] त्या असत्-पासून सत् झालें. सु ब्र. १. १. ५. पृ. २०–२४, १४९.१९७. या वाक्याच्या सविस्तर व सोपपत्तिक विवेचनासाठीं भाष्यार्थ पहा. १.

कुतस्तु खलु सोम्यैवꣳस्यादिति होवाच कथमसतः सज्जायेतेति। सत्त्वेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ॥ २

अन्वयार्थ—[तु सोम्य एवं कुतः खलु स्यात् इति–] पण हे प्रियदर्शन, असें कोठून होईल ? [असतः सत् कथं जायेत इति–] असत्-पासून सत कसें होईल ? असें आरुणि ह्मणाला ? [सत् तु एव सोम्य इदं अग्रे आसीत् एकं०–] यास्तव हे सोम्य, हें पूर्वी सतच होतें एकच व अद्वितीय. सु.ब्र. पृ. ११८. पहा. २

तदैक्षत बहु स्यां प्रजायेयेति तत्तेजोऽसृजत तत्तेज ऐक्षत बहु स्यां प्रजायेयेति तदपोऽसृजत। तस्माद्यत्र क्व च शोचति स्वेदते वा पुरुषस्तेजस एव तदध्यापो जायन्ते ॥ ३ ॥

अन्वयार्थ—[तत् ऐक्षत बहु स्यां प्रजायेय इति–] तें सत् ' मीं बहु व्हावें, आधिक्यानें उत्पन्न व्हावें ' असें ईक्षण करतें झालें. ईक्षण करून [तत् तेजः असृजत–] त्यानें तेजाला उत्पन्न केलें. [तत् तेज ऐक्षत०–] त्या तेजानेंहि ' मी बहु व्हावें, आधिक्यानें उत्पन्न व्हावें, ' असें ईक्षण केलें; व ईक्षण करून [तत् अपः असृजत–] तें आपाला उत्पन्न करतें झालें. [तस्मात् पुरुषः यत्र क्व च शोचति स्वेदते वा–] त्यामुळें पुरुष ज्या काळीं अथवा जेथें संतप्त होतो किंवा त्याला घाम येतो तेव्हां [तेजसः एव तत् आपः अधिजायन्ते–] तेजापासूनच आप उत्पन्न होतात. सु.ब्र. पृ १९१. पहा. ३

ता आप ऐक्षन्त बह्व्यः स्याम प्रजायेमहीति ता अन्नमसृजन्त तस्माद्यत्र क्व च वर्षति तदेव भूयिष्ठमन्नं भवत्यद्भ्य एव तदध्यन्नाद्यं जायते४

इति षष्ठाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥ २

अन्वयार्थ—[ताः आपः ऐक्षन्त०–] त्या आप 'आह्मी बहु व्हावें, प्रकर्षानें उत्पन्न व्हावें ' असें ईक्षण करत्या झाल्या. [ताः अन्नं असृजन्त–] त्या अन्नाला–पृथ्वीला उत्पन्न करत्या झाल्या. [तस्मात्०–] तस्मात् ज्या कोठें आपांची वृष्टि होते तेथेंच पुष्कळ अन्न होतें. [अद्भ्यः एव–] आपांपासूनच तें अन्नाद्य–अन्न उत्पन्न होतें.येथें तेज व आप ह्म० त्या त्या भावास प्राप्त झालेलें सत्-च होय. ४. (२)

तेषां खल्वेषां भूतानां त्रीण्येव बीजानि भवन्त्याण्डजं जीवजमुद्भिज्जमिति

अन्वयार्थ—[तेषां खलु एषां भूतानां०—] त्या या प्रसिद्ध पक्ष्यादि भूतांचीं तीनच बीजें आहेत. आंडज, जीवज व उद्भिज्ज अशीं. सु.ब्र.पृ.२६३

सेयं देवतैक्षत हन्ताहमिमास्तिस्रो देवता अनेन जीवेनाऽऽत्मनाऽनुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणीति ॥ २

अन्वयार्थ—[सा इयं देवता ऐक्षत—] ती ही सत्-संज्ञक देवता ईक्षण करती झाली. [हन्त अहं इमाः तिस्रः देवताः अनेन जीवेन आत्मना अनुप्रविश्य—] आतां मी या तीन देवतांमध्यें या जीवानें—आत्म्यानें अनुप्रवेश करून [नामरूपे व्याकरवाणि—] नाम व रूप यांना व्यक्त करतें. सु. ब्र. पृ. २१, १०१, १४६, १४९ पहा. २

तासां त्रिवृतं त्रिवृतमेकैकां करवाणीति सेयं देवतेमास्तिस्रो देवता अनेनैव जीवेनाऽत्मनाऽनुप्रविश्य नामरूपे व्याकरोत् ॥ ३

अन्वयार्थ—[तासां एकैकां त्रिवृतं त्रिवृतं करवाणि इति—] त्या तीन देवतांतील एकेका देवतेला त्रिवृत् त्रिवृत् मी करतें, असें ईक्षण करून [सा इयं देवता इमाः तिस्रः देवताः०—] ती ही सत्-संज्ञक देवता या तेजःप्रभृति तीन देवतांमध्यें याच जीवानें—आत्म्यानें प्रवेश करून नाम व रूप यांना व्यक्त करती झाली. ३.

तासां त्रिवृतं त्रिवृतमेकैकामकरोद्यथा तु खलु सोम्येमास्तिस्रो देवतास्त्रिवृत्त्रिवृदेकैका भवति तन्मे विजानीहीति ॥

इति षष्ठाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—[तासां एकैकां त्रिवृतं....अकरोत्—] त्या तीन देवतांतील एकेका देवतेस ती सद्-देवता त्रिवृत त्रिवृत् करती झाली. [सोम्य इमाः तिस्रः देवताः—] हे सोम्य, या ज्या तीन देवता, [एकैका त्रिवृत् त्रिवृत् यथा तु खलु भवति—] त्यांतील प्रत्येक देवता त्रिवृत् त्रिवृत कशी आहे [तत मे विजानीहि—] तें मी सांगतों, ऐक. ४ (३).

यदग्ने रोहितꣳरूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तदन्नस्यापागादग्नेरग्नित्वं वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं त्रीणि रूपाणीत्येव सत्यम् ॥ १

अन्वयार्थ—[यत् अग्नेः रोहितं रूपं तत् तेजसः रूपं—] जें अग्नीचें रोहित—लाल रूप तें तेजाचें रूप, [यत् शुक्लं तत् अपां—] जें अग्नीचें शुक्ल रूप तें आपांचें रूप [यत् कृष्णं०—] जें अग्नीचें कृष्ण रूप तें अन्नाचें रूप [अग्नेः अग्नित्वं अपागात्—] त्याहून निराळ्या अवशिष्ट राहिलेल्या अग्नीचें अग्नित्वच निघून गेलें. [वाचा आरंभणं०—] कारण तो विकार हें केवल वाक्चें आलंबन नाम आहे. [त्रीणि रूपाणि इति एव सत्यं—] तीन रूपें हेंच सत्य आहे. सु. ब्र. पृ. १११ व २०२ पहा. १

यदादित्यस्य रोहितꣳरूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तदन्नस्यापागादादित्यस्यादित्यत्वं वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं त्रीणि रूपाणीत्येव सत्यम् ॥ २ ॥ यच्चन्द्रमसो रोहितꣳरूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तदन्नस्यापागाच्चन्द्राच्चन्द्रत्वं वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं त्रीणि रूपाणीत्येव सत्यम् ॥ ३ ॥ यद्विद्युतो रोहितꣳरूपं तेजसस्तद्रूपं यच्छुक्लं तदपां यत्कृष्णं तदन्नस्यापागाद्विद्युतो विद्युत्त्वं वाचाऽऽरम्भणं विकारो नामधेयं त्रीणि रूपाणीत्येव सत्यम् ॥ ४

अन्वयार्थ—जें आदित्याचें रोहित रूप तें तेजाचें रूप, जें शुक्ल तें आपांचें व जें कृष्ण तें अन्नाचें. आदित्याचें आदित्यत्व अपगत झालें. विकार वाक्-चें आलंबन नामधेय आहे. तीन रूपें हेंच सत्य आहे. २. जें चंद्राचें रोहित रूप तें तेजाचें रूप, जें शुक्ल तें आपांचें व जें कृष्ण तें अन्नाचें, चंद्राचें चंद्रत्व गेलें. विकार वागालंबन नामधेय आहे. तीन रूपेंच सत्य आहेत ३. विद्युत्-चें जें रोहित रूप त तेजाचें रूप, जें शुक्ल तें आपांचें व जें कृष्ण तें अन्नाचें, विद्युत्-चें विद्युत्त्व निघून गेलें. विकार वागालंबन नामधेय आहे. तीन रूपें हेंच सत्य आहे. ४.

एतद्ध स्म वै तद्विद्वाꣳस आहुः पूर्वे महाशाला महाश्रोत्रिया न नोऽद्य कश्चनाश्रुतममतमविज्ञातमुदाहरिष्यतीति ह्येभ्यो विदांचक्रुः

अन्वयार्थ—[एतत् ह स्म वै तत् विद्वांसः पूर्वे महाशालाः महाश्रोत्रियाः आहुः—] तें हें त्रिवृत्करण जाणणारे पूर्वीचे महागृहस्थ, महाश्रोत्रिय, असें म्हणाले. [नः अद्य कश्चन अश्रुतं०—] आमच्या कुलांत आतां कोणीहि

अश्रुत, अमत व अविज्ञात असें कांहीं राहिलें आहे, असें [न उदाहरिष्यति–] म्हणणार नाहीं. [हि एभ्यः विदांचक्रुः–] कारण, ते या ज्ञात झालेल्या त्रिवृत्कृतावरून अथवा अग्न्यादि दृष्टान्तांवरून सर्व जाणते झाले. ५.

यदु रोहितमिवाभूदिति तेजसस्तद्रूपमिति तद्विदांचक्रुर्यदु शुक्लमिवाभूदित्यपाꣳरूपमिति तद्विदांचक्रुर्यदु कृष्णमिवाभूदित्यन्नस्य रूपमिति तद्विदांचक्रुः ॥६॥ यदविज्ञातमिवाभूदित्येतासामेव देवतानाꣳसमास इति तद्विदांचक्रुर्यथा नु खलु सोम्येमास्तिस्रो देवताः पुरुषं प्राप्य त्रिवृत्त्रिवृदेकैका भवति तन्मे विजानीहीति ॥ ७ ॥

इति षष्ठाध्यायस्य चतुर्थ खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—जें रोहितसें रूप होतें तें तेजाचें रूप असें ते जाणते झाले. जें शुक्लसें होतें तें आपांचें रूप असें जाणते झाले. जें कृष्णसें रूप होतें तें अन्नाचें रूप असें जाणते झाले. ६ जें अविज्ञातसें रूप होतें तो या तीन देवतांचाच समुदाय आहे, असें जाणते झाले. आतां हे सोम्य, या तीन देवता शरीरेंद्रियसमुदायरूप पुरुषास प्राप्त होऊन त्यांतील प्रत्येक देवता त्रिवृत् त्रिवृत् कशी होते तें मजपासून समजून घे. ७ (४)

अन्नमाशितं त्रेधा विधीयते तस्य यः स्थविष्ठो धातुस्तत्पुरीषं भवति यो मध्यमस्तन्माꣳसं योऽणिष्ठस्तन्मनः ॥ १

अन्वयार्थ—[अशितं अन्नं त्रेधा विधीयते–] खाल्लेलें अन्न तीन प्रकारें विभागलें जातें. [तस्य यः स्थविष्ठः धातुः०–] त्याचा जो अत्यंत स्थूल भाग तें पुरीष–विष्ठा होतें, [यः मध्यमः०–] जो मध्यम भाग तें मांस होतें व [यः अणिष्ठः०–] जो अत्यंत सूक्ष्म भाग तें मन होतें. १

आपः पीतास्त्रेधा विधीयन्ते तासां यः स्थविष्ठो धातुस्तन्मूत्रं भवति यो मध्यमस्तल्लोहितं योऽणिष्ठः स प्राणः ॥ २

अन्वयार्थ—[पीताः आपः०–] प्यालेल्या आप तीन प्रकारें विभागिल्या जातात. त्यांचा जो अत्यंत स्थूल अंश तें मूत्र होतें. जो मध्यम अंश तें रक्त होतें व जो अत्यंत सूक्ष्म अंश तो प्राण होतो. २

तेजोऽशितं त्रेधा विधीयते तस्य यः स्थविष्ठो धातुस्तदस्थि भवति यो मध्यमः स मज्जा योऽणिष्ठः सा वाक् ॥ ३

अन्वयार्थ—[आशितं तेजः०—] खाल्लेल्या तैल-घृतादि तेजाचा तीन प्रकारें विभाग केला जातो. त्याचा जो अत्यंत स्थूल धातु तें हाड होतें, जो मध्यम धातु ती मज्जा व जो अत्यंत सूक्ष्म धातु ती वाक्. ३

अन्नमयꣳहि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥

इति षष्ठाध्यायस्य पञ्चमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[सोम्य मनः अन्नमयं हि—] हे सोम्य मन अन्नमय आहे, [प्राणः आपोमयः०—] प्राण आपोमय आहे, [वाक् तेजोमयी] व वाक् तेजोमयी आहे. [इति—] असें सांगितला गेलेला श्वेतकेतु म्हणाला—[भगवान् मा भूयः एव विज्ञापयतु—] " भगवान् मला पुनरपि विशेषतः समजून सांगोत. " तेव्हां [सोम्य तथा इति ह उवाच—] हे सोम्य, बरें आहे, असें आरुणि उद्दालक म्हणाला ४. (५)

दध्नः सोम्य मथ्यमानस्य योऽणिमा स ऊर्ध्वः समुदीषति तत्सर्पिर्भवति

अन्वयार्थ—हे सोम्य, [मथ्यमानस्य दध्नः यः अणिमा सः ऊर्ध्वः समुदीषति—] मंथन केल्या जाणाऱ्या दह्याचा जो सूक्ष्म अंश तो वर एकत्र समूह पावून येतो. [तत् सर्पिः भवति—] तेंच तूप होतें. १.

एवमेव खलु सोम्यान्नस्याश्यमानस्य योऽणिमा स ऊर्ध्वः समुदीषति तन्मनो भवति ॥ २

अन्वयार्थ—[एवं एव०—] या दृष्टान्ताप्रमाणेंच खरोखर हे सोम्य, [अश्यमानस्य अन्नस्य यः अणिमा सः ऊर्ध्वः समुदीषति—] खाल्ल्या जाणाऱ्या अन्नाचा जो अणिमा तो ऊर्ध्व—वर एकत्र जमून येतो.[तत् मनः भवति—] तें मन होतें.२

अपाꣳसोम्य पीयमानानां योऽणिमा स ऊर्ध्वः समुदीषति स प्राणो भवति ॥ ३

अन्वयार्थ—हे साम्य, [पीयमानानां अपां०—] प्राशन केल्या जाणाऱ्या आपांचा जो अणिमा तो वर संघात पावून येतो, तो प्राण होतो. ३.

तेजसः सोम्याश्यमानस्य योऽणिमा स ऊर्ध्वः समुदीषति सा वाग्भवति ॥ ४

अन्वयार्थ—हे सोम्य, भक्षण केल्या जाणाऱ्या तैलादि तेजाचा जो अणिमा –सूक्ष्म अंश तो वर एकत्र जमून जातो. ती वाक् होते. ४.

अन्नमयꣳहि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ५

इति षष्ठाध्यायस्य षष्ठः खण्डः ॥ ६

अन्वयार्थ—हे सोम्य, [अन्नमयं मनः०–] मन अन्नमय आहे. प्राण आपोमय आहे व वाक् तेजोमयी आहे, असें आरुणि म्हणाला. तेव्हां [भगवान् भूयः एव०–] ' भगवन्, आपण मला हें पुनरपि दृष्टान्तानें समजून सांगा' असें श्वेतकेतु म्हणाला. त्यावर [तथा०–] 'हे पुत्रा, बरें आहे' असें पिता म्हणाला. सु. ब्र. पृ. २०७ पहा. ५ (६)

–भक्षण केलेल्या अन्नाचा जो अति सूक्ष्म अंश तो मनांत शक्तीचें आधान करितो म्ह० त्यामुळें मन सशक्त होतें अन्नानें वृद्धि पावलेल्या त्या मनः-शक्तीचे सोळा विभाग करून ते पुरुषाच्या कलारूपानें येथें विवक्षित आहेत. यास्तव त्या सोळा कलांनीं युक्त असलेला शरीरेंद्रियसंघातरूप जीवविशिष्ट पुरुष षोडशकल म्हटला जातो––

षोडशकलः सोम्य पुरुषः पञ्चदशाहानि माऽशीः काम-मपः पिबाऽऽपोमयः प्राणो न पिबतो विच्छेत्स्यत इति ॥ १

अन्वयार्थ—' हे पुत्रा, [पुरुषः षोडशकलः–] पुरुष षोडशकल आहे. [पंचदश अहानि मा अशीः–] तूं पंधरा दिवस अन्न खाऊं नकोस. [अपः कामं पिब–] पाणी यथेच्छ पी. [प्राणः आपोमयः–] प्राण आपोमय आहे. [पिबतः न विच्छेत्स्यते–] त्यामुळें पाणी पिणाराचा प्राण विच्छिन्न होणार नाहीं. ' [इति–] असें पिता म्हणाला. १

स ह पञ्चदशाहानि नाऽऽशाथ हैनमुपससाद किं ब्रवीमि भो इत्यृचः सोम्य यजूꣳषि सामानीति स होवाच न वै मा प्रतिभान्ति भो इति ॥ २

अन्वयार्थ—[सः ह पंचदश अहानि न आश–] त्यानें पंधरा दिवस कांहीं खाल्लें नाही. [अथ ह एनं उपससाद–] नंतर तो पित्यापाशीं गेला व [किं ब्रवीमि भोः इति–] मी काय म्हणूं, असें विचारूं लागला. तेव्हां [ऋचः सामानि यजूंषि इति–] ' हे सोम्य, ऋचा, यजुर्मंत्र व सामें म्हण ' असें

पिता बोलला. त्यावर [भोः मा न प्रतिभान्ति इति–] ' भगवन्, मला ते मंत्र मनांत दिसत नाहींत, ते आठवत नाहींत.' असें पुत्र म्हणाला. २.

तꣳहोवाच यथा सोम्य महतोऽभ्याहितस्यैकोऽङ्गारः खद्योतमात्रः परिशिष्टः स्यात्तेन ततोऽपि न बहु दहेदेवꣳ सोम्य ते षोडशानां कलानामेका कलाऽतिशिष्टा स्यात्तयैतर्हि वेदान्नानुभवस्यशानाथ मे विज्ञास्यसीति ॥ ३

अन्वयार्थ––[तं ह उवाच–] त्यास पिता म्हणाला–' हे सोम्य, [यथा महतः अभ्याहितस्य एकः खद्योतमात्रः अंगारः परिशिष्टः स्यात्–] ज्याप्रमाणें मोठ्या इंधनांनी वाढलेल्या अग्नीचें एक काजव्या एवढें किटाळ अवशिष्ट रहावें [तेन ततः अपि बहु न दहेत्–] त्यानें त्या परिमाणामुळें थोडासाहि दाह तो करीत नाहीं, [एवं सोम्य ते षोडशाना कलाना एका कला अतिशिष्टा स्यात्–] त्याप्रमाणें हे सोम्य, तुझ्या सोळा कलांतील एक कला अवशिष्ट राहिलेली आहे. [तया एतर्हि वेदान् न अनुभवसि–] त्या कलेनें या वेळीं तूं वेदांना अनुभवीत नाहींस. [मे अशान विज्ञास्यसि इति–] हें माझें भाषण ऐकून आतां तूं अन्न खा. म्हणजे तूं सर्व जाणशील. ' ३.

स हाऽऽशाथ हैनमुपससाद तꣳह यात्किंच पप्रच्छ सर्वꣳह प्रतिपेदे ॥ ४

अन्वयार्थ––[सः ह आश–] तो भोजन करता झाला. [अथ ह एनं उपससाद–] नंतर पित्यासमीप आला. [तं ह यत् किंच पप्रच्छ सर्वं ह प्रतिपेदे–] तेव्हां त्याला पित्यानें जें कांही विचारलें तें सर्व त्याला प्राप्त झालें. तें सर्व त्यानें सांगितलें. ४

तꣳहोवाच यथा सोम्य महतोऽभ्याहितस्यैकमङ्गारं खद्योतमात्रं परिशिष्टं तं तृणैरुपसमाधाय प्राज्वलयेत्तेन ततोऽपि बहु दहेत् ॥ ५

अन्वयार्थ––[तं ह उवाच–] त्याला पिता म्हणाला–हे सोम्य, [यथा अभ्याहितस्य एकं अंगारं खद्योतमात्रं परिशिष्टं–] ज्याप्रमाणें मोठ्या इंधनांनी पेटलेल्या अग्नीची एक खद्योतप्रमाण ठिणगी रहावी व [तं तृणैः उपसमाधाय प्राज्वलयेत्–] तिच्यावर गवत घालून तिला प्रज्वलित करावें [तेन ततः अपि बहु दहेत्–] म्हणजे त्या दीप्त अंगारानेंच–किटाळानेंच पूर्व परिमाणाहूनहि तो अग्नि पुष्कळ दाह करतो, ५––

एवꣳ सोम्य ते षोडशानां कलानामेका कलाऽतिशिष्टाऽभूत्साऽन्नेनोपसमाहिता प्राज्वाली तयैतर्हि वेदाननुभवस्यन्नमयꣳ हि सोम्य मन आपोमयः प्राणस्तेजोमयी वागिति तद्धास्य विजज्ञाविति विजज्ञाविति ॥ ६

इति षष्ठाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—[एवं०—] त्याप्रमाणें हे सोम्य, [ते षोडशानां कलानां एका कला अतिशिष्टा अभूत—] तुझ्या सोळा अन्नकलांतील एक कला अवशिष्ट राहिलेली होती. [सा अन्नेन उपसमाहिता प्राज्वालि—] ती अन्नानें वाढविलेली कला प्रज्वलित झाली आहे; [तया एतर्हि वेदान् अनुभवसि—] त्या वृद्धि पावलेल्या कलेनें तूं आतां वेदांचा अनुभव घेत आहेस. [अन्नमयं०—] यास्तव हे सोम्य, मन अन्नमय आहे, प्राण आपोमय आहे व वाक् तेजोमयी आहे, असें पिता बोलला. [तत् ह अस्य विजज्ञौ इति—] तें मन-आदिकांचें अन्नमयत्वादिक श्वेतकेतूस विज्ञात झालें—कळलें ६ (७).

—याप्रमाणें त्रिवत्करणनिर्णयप्रकरण संपवून श्रुति महाप्रकरणाचा पुनः आरंभ करिते. त्यांत अगोदर सुषुप्तिसमयी मनाचा लय झाला असतां जीवाची सत्संपत्ति सांगण्यासाठी त्याच्या मन-उपाधिकत्वाचा अनुवाद करिते—

उद्दालको हारुणिः श्वेतकेतुं पुत्रमुवाच स्वप्नान्तं मे सोम्य विजानीहीति यत्रैतत्पुरुषः स्वपिति नाम सता सोम्य तदा संपन्नो भवति स्वमपीतो भवति तस्मादेनꣳ स्वपितीत्याचक्षते स्वꣳह्यपीतो भवति ॥ १

अन्वयार्थ—[आरुणिः ह उद्दालकः श्वेतकेतुं पुत्रं उवाच—] अरुणाचा पुत्र उद्दालक श्वेतकेतु-पुत्रास म्हणाला—हे सोम्य,[स्वप्नान्तं मे विजानीहि—] स्वप्नान्त ब्र० सषुप्त किंवा स्वप्नाचें स्वरूप तू मजपासून विशेषतः जाण. [यत्र पुरुषः—] ज्यावेळीं हा पुरुष [एतत् स्वपिति—] हें स्वपन—ही झोंप घेतो त्यावेळीं हे सोम्य, [सता संपन्नः भवति—] तो सत्शी संपन्न होतो. [स्वं अपीतः भवति—] स्वला—आत्म्याला अपीत—प्राप्त झालेला असा होतो. [तस्मात् एनं०—] म्हणून त्याला ' स्वपिति ' असें ह्मणतात. [हि स्वं अपीतः भवति—] कारण तो स्व-लाच प्राप्त झालेला असतो. सु. ब्र. सू. २२, ७७, २७८, २९५-९७ पहा. १.

स यथा शकुनिः सूत्रेण प्रबद्धो दिशं दिशं पतित्वाऽन्यत्राऽऽयतनमलब्ध्वा बन्धनमेवोपाश्रयत एवमेव खलु सोम्य तन्मनो दिशं दिशं पतित्वाऽन्यत्राऽऽयतनमलब्ध्वा प्राणमेवोपाश्रयते प्राणबन्धनꣳहि सोम्य मन इति ॥ २

अन्वयार्थ—[सः यथा०—] याविषयी दृष्टान्त—जसा पारध्यानें पायाला दोरीनें घट्ट बांधून सोडलेला पक्षी त्या बंधनापासून मुक्त होण्याच्या इच्छेनें प्रत्येक दिशेस पळून जाऊन बंधनस्थानावांचून दुसऱ्या कोठेंहि आश्रय न मिळल्यामुळें पुनः त्या बंधनस्थानाचाच येऊन आश्रय करतो, त्याचप्रमाणें हे प्रिय पुत्रा, [तन्मनः—]जीव प्रत्येक दिशेस वेगानें जाऊन दुसऱ्या कोठेंहि आधार न मिळून प्राणाचाच आश्रय करतो. [हि मनः प्राणबंधनं—] यास्तव हे सोम्य, मनाचें—जीवाचें प्राण हें बंधन आहे.

अशनापिपासे मे सोम्य विजानीहीति यत्रैतत्पुरुषोऽशिशिषति नामाऽऽप एव तदशितं नयन्ते यद्यथा गोनायोऽश्वनायः पुरुषनाय इत्येवं तदप आचक्षतेऽशनायेति तत्रैतच्छुङ्गमुत्पतितꣳसोम्य विजानीहि नेदममूलं भविष्यतीति ॥ ३

अन्वयार्थ—हे सोम्य, [मे अशनापिपासे विजानीहि—] मजपासून तूं अशनाया व पिपासा यांना समजून घे. त्यांचें कारण—स्वरूप जाण. [यत्र एतत् पुरुषः अशिशिषति नाम—] ज्यावेळी पुरुष भक्षण करण्याची इच्छा करतो तेव्हां तो 'अशिशिषति' या नावाचा होतो. [आपः एव तत् अशितं नयन्ते—] आपच तें अशित—भक्षित अन्न नेतात. [यथा गोनायः०—] जसा गायींना नेणारा तो गोनाय, अश्वनाय, पुरुषनाय—राजा किंवा सेनापति [इति-एवं तत् अपः अशनाया इति आचक्षते—]याप्रमाणें त्या आपांना 'अशनाया' असें म्हणतात. [तत्र सोम्य एतत् शुंगं उत्पतितं विजानीहि—] असें असल्यामुळें हे सोम्य, उत्पन्न झालेल्या या शुंगास—अंकुरास—कार्यास तूं जाण. [इदं अमूलं न भविष्यति इति—] हें निर्मूल असणार नाही. ३.

—वटादिकांच्या अंकुराप्रमाणें जर हें शरीर समूल आहे तर या शरीराचें मूळ कोठें असेल, असें पुत्राकडून विचारला गेलेला पिता म्हणतो—

तस्य क्व मूलꣳस्यादन्यत्रान्नादेवमेव खलु सोम्यान्नेन शुङ्गेनापो मूलमन्विच्छाद्भिः सोम्य शुङ्गेन तेजो मूलमन्विच्छ

तेजसा सोम्य शुङ्गेन सन्मूलमन्विच्छ सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः ॥ ४

अन्वयार्थ—[तस्य अन्नात् अन्यत्र क्व मूलं स्यात्—] त्याचें अन्नावांचून दुसऱ्या कशांत मूळ असणार ? [एवं एव खलु सोम्य अन्नेन शुंगेन आपः मूलं अन्विच्छ—] त्याचप्रमाणें हे पुत्रा, अन्न या शुंगानें आप हें मूळ तूं जाण. [अद्भिः शुंगेन०—] आप या शुंगावरून तेज हें मूळ शोध, [तेजसा शुंगेन सन्मूलं अन्विच्छ—] तेज या शुंगानें हे सोम्य तूं सत् हे मूळ जाण. हे सोम्य, [इमाः प्रजाः सन्मूलाः—] या सर्व प्रजा सन्मूलक आहेत. [सदायतनाः—] सत् हाच त्यांचा आश्रय आहे व [सत्प्रतिष्ठाः—] सत् हीच प्रतिष्ठा आहे.४.

त्यानंतर आतां अप्-कार्याच्या द्वारा 'सत्' या मूळाचा शोध करावा, असें आरुणि सांगतो—

अथ यत्रैतत्पुरुषः पिपासति नाम तेज एव तत्पीतं नयते तद्यथा गोनायोऽश्वनायः पुरुषनाय इत्येवं तत्तेज आचष्ट उदन्येति तत्रैतदेव शुङ्गमुत्पतितꣳसोम्य विजानीहि नेदममूलं भविष्यतीति ॥ ५

अन्वयार्थ—[अथ यत्र एतत् पुरुषः०—] नंतर ज्यावेळीं हा पुरुष 'पिपासति-' या नांवाचा होतो तेव्हा [तेजः एव तत् पीतं नयते—] तेजच त्या प्यालेल्या आपाला नेतें. [तत् यथा०—] त्याविषयी दृष्टान्त—जसा गोनाय, अश्वनाय, पुरुषनाय त्याप्रमाणें तें तेज 'उदन्या' असें लोकांकडून म्हटलें जातें, [तत्र एतत् एव०—] असें असल्यामुळें हे सोम्य, त्या आपांचेंहि हेंच शरीराख्य कार्य उत्पन्न झालें आहे, असें समज. [इदं अमूलं न भविष्यति इति—] कारण हें शरीर अमूल होणार नाही.५.—त्रिवृत्करणवशात् तेजाचेंहि हेंच शरीराख्य कार्य आहे—

तस्य क्व मूलꣳस्यादन्यात्राद्भ्योऽद्भिः सोम्य शुङ्गेन तेजो मूलमन्विच्छ तेजसा सोम्य शुङ्गेन सन्मूलमन्विच्छ सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठा यथा नु खलु सोम्येमास्तिस्रो देवताः पुरुषं प्राप्य त्रिवृत्त्रिवृदेकैका भवति तदुक्तं पुरस्तादेव भवत्यस्य सोम्य पुरुषस्य प्रयतो वाङ्मनसि संपद्यते मनः प्राणे प्राणस्तेजसि तेजः परस्यां देवतायाम् ॥ ६

अन्वयार्थ— हे सोम्य, [तस्य मूलं अद्भ्यः अन्यत्र क्व स्यात्–] त्याचें मूळ आपांवांचून दुसऱ्या कोठें असणार ? हे सोम्य, [अद्भिः शुंगेन तेजो-मूलं अन्विच्छ–] आप या शुंगावरून–कार्यावरून तेज हें मूळ जाण, हे पुत्रा, [तेजसा शुंगेन सत्-मूलम् अन्विच्छ–] तेज या शुंगावरून सत् मूळ जाण. हे सोम्य, [इमाः सर्वाः प्रजाः०–] या सर्व प्रजा सन्मूल, सदायतन, सत्प्रतिष्ठा आहेत. हे पुत्रा, [इमाः तिस्रः देवताः पुरुषं प्राप्य एकैका त्रिवृत त्रिवृत् यथा भवति तत पुरस्तात् एव उक्तं–] या तीन देवता पुरुषास प्राप्त होऊन एकेक देवता त्रिवृत् त्रिवृत् कशी होते तें मीं पूर्वींच सांगितलें आहे. हे श्वेतकेतो, [अस्य प्रयतः पुरुषस्य वाक् मनसि संपद्यते मनः प्राणे प्राणः तेजसि तेजः परस्यां देवतायां–] या मरण पावणाऱ्या पुरुषाची वाक् मनांत उपसंहृत होते, मन प्राणांत, प्राण तेजांत व तेज सदाख्य परा देवतेंत संपन्न होतें. सु. ब्र. पृ. ४५३ पहा. ६.

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ७

इति षष्ठाध्यायस्याष्टमः खण्डः ॥ ८

अन्वयार्थ—[सः यः एषः अणिमा०–] तो जो हा अणिमा [ऐतदात्म्यं०–] एतद्रूप हें सर्व आहे. [तत् सत्यं०–] तें सत्य, म्हणून तोच आत्मा. हे श्वेतकेतो, [तत् त्वं असि–] तें सत्य तूं आहेस. (पुत्र म्हणतो–) [भूयः एव०–] भगवान् मला पुनरपि हेंच समजून सांगोत. (पिता–) पुत्रा, तथास्तु असें म्हणाला. सु. ब्र. पृ. २२ पहा. ७. (८)

–प्रजा प्रत्यहीं सत्संपन्न होऊन ' आम्ही सत्संपन्न झालों आहों ' असें जें जाणत नाहीं तें त्यांचें अज्ञान कोणत्या कारणानें ? म्हणून जें तूं विचारीत आहेस त्याविषयीं दृष्टान्त ऐक––

यथा सोम्य मधु मधुकृतो निस्तिष्ठन्ति नानात्ययानां वृक्षाणाꣳरसान्समवहारमेकताꣳ रसं गमयन्ति ॥ १

अन्वयार्थ—हे प्रियदर्शन पुत्रा, [यथा मधुकृतः मधु निस्तिष्ठन्ति–] ज्याप्रमाणें मधुकर–मधमाशा मध निष्पन्न करितात. [नानात्ययानां०–] नाना देशांतील वृक्षांच्या रसांस आणून एकतेस–मध या रसास प्राप्त करवितात. १.

ते यथा तत्र न विवेकं लभन्तेऽमुष्याहं वृक्षस्य रसोऽस्म्यमुष्याहं वृक्षस्य रसोऽस्मीत्येवमेव खलु सोम्येमाः सर्वाः प्रजाः सति संपद्य न विदुः सति संपद्यामह इति ॥ २

अन्वयार्थ—[ते यथा०–] ते रस जसे त्या मधूंत विवेकास प्राप्त होत नाहींत, म्ह० [अहं अमुष्य वृक्षस्य रसः अस्मि०–] मी या वृक्षाचा रस आहें, मी या अमुक वृक्षाचा रस आहें, असा विवेक होत नाहीं [एवं एव०–] त्याप्रमाणेंच खरोखर हे सोम्य, ह्या सर्व प्रजा [सति संपद्य०–] सत्-मध्यें संपन्न होऊन आम्ही सत्-मध्यें संपन्न होतों, हें जाणत नाहींत. २–ज्याअर्थी ते याप्रमाणें आपली सद्रूपता न जाणतांच सत्संपन्न होतात त्याअर्थी—

त इह व्याघ्रो वा सिंहो वा वृको वा वराहो वा कीटो वा पतङ्गो वा दंशो वा मशको वा यद्यद्भवन्ति तदाभवन्ति ॥ ३

अन्वयार्थ—[ते इह व्याघ्रः०–] या लोकीं ते व्याघ्र, किंवा सिंह, किंवा लांडगा, किंवा डुकर, किंवा कीट, किंवा पतंग, किंवा दंश–डांस किंवा मशक यांतील पूर्वी [यत् यत् भवन्ति तत् आभवन्ति–] जे जे होते ते तेच पुनः होतात. सु. ब्र. पृ. २८१ पहा. ३–त्या प्रजा ज्यांत प्रवेश करून पुनः आविर्भूत होतात व त्या प्रजेहून अगदीं निराळे असे जे ज्ञानी–सत्य-आत्म-ज्ञानी ज्या सदात्म्यांत प्रवेश करून पुनः संसारांत परत येत नाहींत—

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ४

इति षष्ठाध्यायस्य नवम. खण्ड. ॥९

अन्वयार्थ—[सः यः एषः०–] तो जो हा अणिमा, ऐतदात्म्य–एतद्रूप हें सर्व आहे. [तत् सत्यं०–] तें सत्च परमार्थ सत्य आहे. तो आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें सत् तूं आहेस. (असें पिता ह्मणाला असतां पुत्र ह्मणतो–) [भूयः एव०–] भगवान् मला पुनरपि तें समजावून सांगोत. तेव्हां 'हे पुत्रा, तथास्तु' असें पिता ह्मणाला. ४ (९)–त्याविषयीं दृष्टान्त—

इमाः सोम्य नद्यः पुरस्तात्प्राच्यः स्यन्दन्ते पश्चात्प्रतीच्यस्ताः समुद्रात्समुद्रमेवापियन्ति स समुद्र एव भवति ता यथा तत्र न विदुरियमहमस्मीयमहमस्मीति ॥ १

अन्वयार्थ—[सोम्य इमाः नद्यः पुरस्तात् प्राच्यः स्यन्दन्ते पश्चात्०—] हे सोम्य, या नद्या पूर्वेकडे पूर्ववाहिनी वाहतात, पश्चिमेस पश्चिमवाहिनी वाहतात. [ताः समुद्रात् समुद्रं एव अपियन्ति—] त्या समुद्रापासून निघून पुनः समुद्रांत जाऊन मिळतात. [सः समुद्रः एव भवति—] तो समुद्रच होतो. [तत्र ताः यथा इयं अहं अस्मि इयं अहं अस्मि इति न विदुः—] पण त्या समुद्रांत त्या जशा 'ही मी आहें, ही मी आहें' असें जाणत नाहींत. १,

एवमेव खलु सोम्येमाः सर्वाः प्रजाः सत आगम्य न विदुः सत आगच्छामह इति त इह व्याघ्रो वा सिꣳहो वा वराहो वा कीटो वा पतङ्गो वा दꣳशो वा मशको वा यद्यद्भवन्ति तदाभवन्ति ॥ २ ॥ स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ३

इति षष्ठाध्यायस्य दशमः खण्ड. ॥ १०

अन्वयार्थ—हे सोम्य, [एवं एव खलु इमाः सर्वाः प्रजाः सतः आगम्य सतः आगच्छामहे इति न विदुः—] याप्रमाणेंच खरोखर या सर्व प्रजा सत्-पासून येऊन आम्ही सत्-पासून येत आहों—येतों, हें जाणत नाहीत. [ते इह व्याघ्रः वा०—] ते येथें व्याघ्र, किंवा सिंह, किंवा लांडगा, किंवा वराह, किंवा कीट, किंवा पक्षी, किंवा डांस, किंवा मशक, [यत् यत् भवन्ति तत् आभवन्ति—] जे जे असतात ते तेच होऊन आविर्भूत होतात. २. [सः यः एषः अणिमा०—] तो जो हा अणिमा ऐतदात्म्य हें सर्व आहे. तें सत्य, तो आत्मा, हे श्वेतकेतो, तें सत् तूं आहेस, असें पिता ह्मणाला. तेव्हां श्वेतकेतु, [भगवान् भूयः एव मा०—] 'आपण मला पुनरपि हें समजावून सांगा' असें ह्मणाला असतां पिता [तथा इति०—] 'तथास्तु' असें बोलला. ३ (१०)

—याविषयीं दृष्टान्त—

अस्य सोम्य महतो वृक्षस्य यो मूलेऽभ्याहन्याज्जीवन्स्रवेद्यो मध्येऽभ्याहन्याज्जीवन्स्रवेद्योऽग्रेऽभ्याहन्याज्जीवन्स्रवेत्स एष जीवेनाऽऽत्मनाऽनुप्रभूतः पेपीयमानो मोदमानस्तिष्ठति ॥ १

अन्वयार्थ—हे सोम्य, [यः अस्य महतः वृक्षस्य मूले अभ्याहन्यात्—] जर कोणीं या पुढील मोठ्या वृक्षाच्या मुळावर कुऱ्हाडीचा आघात केला तर तो [जीवन् स्रवेत्—] सुकत नाही, जिवंतच राहतो. पण त्याच्या रसाचा स्राव होतो. [यः मध्ये अभ्याहन्यात् जीवन् स्रवेत्—] त्याचप्रमाणें जर त्याच्या मध्यभागीं कोणीं प्रहार केला तरी तो जिवंत राहून रसस्राव करतो. [यः अग्रे अभ्याहन्यात् जीवन् स्रवेत्—] जर कोणी त्याच्या अग्रावर प्रहार केला तरी तो जिवंत राहून रसस्राव करतो. [सः एषः जीवेन आत्मना अनुप्रभूतः—] तो हा वृक्ष जीवानें—आत्म्यानें अनुव्याप्त [पेपीयमानः मोदमानः तिष्ठति—] अत्यंत पाणी पिणारा आनंदित होऊन राहतो. १

अस्य यदेकाꣳशाखां जीवो जहात्यथ सा शुष्यति द्वितीयां जहात्यथ सा शुष्यति तृतीयां जहात्यथ सा शुष्यति सर्वं जहाति सर्वः शुष्यत्येवमेव खलु सोम्य विद्धीति होवाच ॥२

अन्वयार्थ—[अस्य एकां शाखां—] त्याच्या एका रोगग्रस्त किंवा वाऱ्यानें वगैरे मोडलेल्या शाखेस [यत्—] जेव्हां [जीवः जहाति—] जीव सोडतो [अथ सा शुष्यति—] तेव्हां ती सुकते. [द्वितीयां जहाति अथ सा शुष्यति—] जेव्हां तो दुसरीलाहि सोडतो तेव्हां ती सुकते [तृतीयां०—] तिसरीला सोडतो तेव्हां ती सुकते. [सर्वं०—] तो जेव्हां सर्व वृक्षाला सोडतो तेव्हां तो सर्व वृक्ष सुकतो. [सोम्य एवं एव खलु विद्धि—] हे सोम्य, खरोखर असेंच समज, असें पिता म्हणाला. (जीवानें सोडलेल्या शाखा व सर्व वृक्ष सुकणें, प्रहार केला असतां रसस्राव होणें, त्याची वृद्धि, फल-पल्लवोत्पत्ति, क्षत भरून येणें, जलानें तृप्ति, इत्यादि चिह्नांवरून स्थावर पदार्थहि सचेतन आहेत, असें सिद्ध होतें.) २.—या वृक्षाच्या दृष्टान्तानें दाखविल्याप्रमाणेंच—

जीवापेतं वाव किलेदं म्रियते न जीवो म्रियत इति स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा साम्येति होवाच ॥ ३

इति षष्ठाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—हे पुत्रा, [जीवापेतं वाव किल इदं म्रियते–] जीववियुक्त असेंच हें शरीर मरतें, [जीवः न म्रियते–] जीव मरत नाहीं. [इति सः०–] तो जो हा अणिमा एतदात्मक हें सर्व आहे. तेंच सत्य आहे. तोच आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें तूं आहेस. (तेव्हां श्वेतकेतु–) [भूयः एव०–]'भगवान् मला पुनरपि हेंच दृष्टान्त देऊन समजावून सांगोत,' असें म्हणाला असतां 'हे पुत्रा तथास्तु-' असें आरुणि म्हणाला. सु. ब्र. पृ. २०८ पहा. ३ (११)

न्यग्रोधफलमत आहरेतीदं भगव इति भिन्द्धीति भिन्नं भगव इति किमत्र पश्यसीत्यण्व्य इवेमा धाना भगव इत्यासामङ्गैकां भिन्द्धीति भिन्ना भगव इति किमत्र पश्यसीति न किंचन भगव इति १

अन्वयार्थ—(पिता–) [न्यग्रोधफलं०–] पुत्रा, वडाचें फळ इकडे आण. (श्वेतकेतु–)[इदं भगव इति–] भगवन्, हें घ्या. (पिता–) [भिन्द्धिः०–] तें फोड (पुत्र–) [भिन्नं०–]फोडलें महाराज. (पिता–) [किं अत्र पश्यसि–] त्यांत तूं काय पाहत आहेस ? (पुत्र–)भगवन्[अण्व्यः इमाः धानाः०–] हे अत्यंत सूक्ष्म असे दाणे –बीं मला दिसतें.(पिता–)[आसां अंग एकां भिन्द्धि–] वत्सा, त्यांतील एक फोड. (पुत्र–) [भिन्नं०–] फोडलें महाराज (पिता–) [किं०–] त्यांत तूं काय पहात आहेस ? (पुत्र) [न किंचन भगवः इति०–] कांहीं नाही महाराज ! १.

तꣳहोवाच यं वै सोम्यैतमणिमानं न निभालयस एतस्य वै सोम्यैषोऽणिम्न एवं महान्न्यग्रोधस्तिष्ठति श्रद्धत्स्व सोम्येति ॥ २

अन्वयार्थ—[तं ह उवाच–] तेव्हां त्यास पिता म्हणाला–हे सोम्य, वटबीज फोडलें असतांहि [यं एतं अणिमानं न निभालयसे–] तूं ज्या वटबीजाच्या अणिम्यास पहात नाहींस [एतस्य अणिम्नः एव एषः महान् न्यग्रोधः तिष्ठति–] त्याच अणिम्याचा हा असा महान् वटवृक्ष होऊन उभा आहे. हे सोम्य, [श्रद्धत्स्व इति–] सूक्ष्म सत्-पासूनच हें स्थूल नाम-रूपयुक्त कार्य उत्पन्न झालें आहे, यावर विश्वास ठेव. २.

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच

इति पंचमाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—तो जो हा अणिमा एतद्रूप हें सर्व आहे, तें सत्य आहे. तो आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें तूं आहेस. (असें पित्यानें सांगितलें असतां पुत्र) ' भगवान् मला हें पुनरपि दृष्टान्त देऊन सांगोत ' (असें म्हणाला. तेव्हां पिता—) ' पुत्रा, तथास्तु ' असें बोलला. ३ (१२)

—विद्यमान असलेलीहि वस्तु उपलब्ध होत नाहीं, पण तीच दुसऱ्या प्रकारें उपलब्ध होते, याविषयीं दृष्टान्त ऐक—

लवणमेतदुदकेऽवधायाथ मा प्रातरुपसीदथा इति स ह तथा चकार तꣳ होवाच यद्दोषा लवणमुदकेऽवाधा अङ्ग तदाहरेति तद्धावमृश्य न विवेद

अन्वयार्थ—[लवणं एतत् उदके अवधाय अथ०—] ' हा मिठाचा खडा या पाण्यांत टाकून उद्यां सकाळी तूं माझ्यापाशीं तें घेऊन ये, ' असें आरुणि श्वेतकेतूस म्हणाला. [सः ह तथा चकार—] तेव्हां तो तसें करता झाला. तेव्हां पिता म्हणाला—[अंग दोषा यत् लवणं उदके अवाधाः तत् आहर इति—] ' हे वत्सा, तू रात्री जें मीठ पाण्यांत घातलेंस तें त्यांतून काढ. ' [तत् ह अवमृश्य न विवेद—] तेव्हां पुत्रानें उदकांत हात घालून पाहिलें. पण त्याला कांहीं कळलें नाहीं. कारण तें मीठ विद्यमानच असतांना जलांत लीन—तद्रूप झालें होतें. १.

यथा विलीनमेवाङ्गास्यान्तादाचामेति कथमिति लवणमिति मध्यादाचामेति कथमिति लवणमित्यन्तादाचामेति कथमिति लवणमित्यभिप्रास्यैतदथ मोपसीदथा इति तद्ध तथा चकार तच्छश्वत्संवर्तते तꣳहोवाचात्र वाव किल सत्सोम्य न निभालयसेऽत्रैव किलेति २

अन्वयार्थ—[यथा विलीनं एव—] जरी तें विलीनच झालें आहे तरी [अंग अस्य अन्तात् आचाम इति—]' हे पुत्रा, या जलाच्या वरूनच आचमन कर—वरच्याच जलानें आचमन कर. ' असें पिता म्हणाला. तेव्हां त्यानें आचमन केलें. पिता म्हणाला [कथं इति—] ' कसें लागतें ? ' [लवणं इति—] ' खारट ' असें पुत्र म्हणाला. (पिता—) ' मध्यांतून आचमन कर. कसें लागतें?' (पुत्र—) ' खारट. ' (पिता—) ' तळापासून आचमन कर. कसें लागतें ? ' (पुत्र—) ' खारट. ' [एतत् अभिप्रास्य अथ मा उपसीदथाः इति—] ' तर मग आतां हें पाणी टाकून देऊन तूं मजपाशीं ये. ' [तत् ह तथा चकार—]

तेव्हां त्यानें तसें केलें, व [तत् शश्वत् संवर्तते–] ' तें लवण–मीठ त्या उदकांत नित्य विद्यमानच आहे. ' असें म्हणत तो पित्यापाशीं आला. [तं ह उवाच–] तेव्हां पिता त्यास म्हणाला–[सोम्य अत्र वाव किल सत् न निभालयसे–] हे पुत्रा, तें लवण या उदकांतच विद्यमान असतांना तुला जसें दिसलें नाहीं, त्याप्रमाणें [अत्र एव किल–] या शरीरांतच असलेलें सत् उपलब्ध होत नाहीं. पण आचमनानें जलांतील लवणाचा प्रत्यय जसा आला तसाच सत्चा अन्य उपायानें प्रत्यय येईल. २.

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳ
स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा
भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ३

इति षष्ठाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ—[सः यः०–] तो जो हा अणिमा ऐतदात्म्य हें सर्व आहे, तें सत्य आहे, तो आत्मा आहे, हे श्वेतकेतो, तें तूं आहेस, असें (पिता ह्मणाला असतां पुत्र) ' भगवान् मला पुनरपि समजावून सांगोत ' (असें ह्मणाला तेव्हां पिता–] ' पुत्रा, तथास्तु ' असें बोलला. ३ (१३)

यथा सोम्य पुरुषं गन्धारेभ्योऽभिनद्धाक्षमानीय तं ततोऽ-
तिजने विसृजेत्स यथा तत्र प्राङ्वोदङ्वाऽधराङ्वा प्रत्य-
ङ्वा प्रध्मायीताभिनद्धाक्ष आनीतोऽभिनद्धाक्षो विसृष्टः ॥ १

अन्वयार्थ—[सोम्य यथा अभिनद्धाक्षं पुरुषं गंधारेभ्यः आनीय–] हे पुत्रा, ज्याप्रमाणें ज्याचे डोळे बांधले आहेत अशा पुरुषास गंधार देशांतून अरण्यांत आणून [तं ततः अतिजने विसृजेत्–] त्याला त्याहूनहि अति निर्जन प्रदेशांत सोडावें व [सः यथा तत्र प्राङ्वा०–] तो जसा तेथें पूर्वाभिमुख, किंवा उत्तराभिमुख किंवा दक्षिणाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख होऊन ओरडत सुटावा [अभिनद्धाक्षः आनीतः अभिनद्धाक्षः विसृष्टः–] ' मी चोराकडून डोळे झांकून आणलेला व डोळे झांकूनच सोडलेला आहें, ' असा त्यानें आक्रोश करावा, १

तस्य यथाभिनहनं प्रमुच्य प्रब्रूयादेतां दिशं गन्धारा
एतां दिशं व्रजेति स ग्रामाद्ग्रामं पृच्छन्पण्डितो मेधावी
गन्धारानेवोपसंपद्येतैवमेवेहाचार्यवान्पुरुषो वेद तस्य
तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्येऽथ संपत्स्य इति ॥ २

अन्वयार्थ—[तस्य यथा अभिनहनं प्रमुच्य एतां दिशं गन्धाराः एतां दिशं व्रज इति प्रब्रूयात्—] त्याचें जसें बंधन सोडून कोणी कारुणिकानें 'या दिशेस गंधार देश आहेत, या दिशेस जा,' असें त्यास म्हणावें, नंतर [सः पंडितः मेधावी ग्रामात ग्रामं पृच्छन्—] तो पंडित—शहाणा व मेधावी—धारणाशक्तिमान् पुरुष एका ग्रामाहून दुसऱ्या ग्रामास विचारीत विचारीत [गंधारान् एव उपसंपद्येत—] गंधार देशांसच प्राप्त होतो—जाऊन पोंचतो [एवं एव इह आचार्यवान् पुरुषः वेद—] त्याप्रमाणें आचार्यवान् पुरुष सत्-ला जाणतो. [यावत् न विमोक्षे तस्य तावत् एव चिरं—] जोंवर त्याचा देहान्त होत नाही तोंवरच त्याला उशीर असतो. [अथ संपत्स्ये—] देहपात होतांच तो सत्संपन्न होतो. याचा सविस्तर विचार भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. २२ पहा. २.

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳसर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच ॥ ३

इति षष्ठाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—तो जो हा अणिमा ऐतदात्म्य हें सर्व आहे. तें सत्य आहे. तो आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें सत् तूं आहेस. असें (पिता म्हणाला असतां पुत्र) भगवान् मला पुनरपि दृष्टान्तपूर्वक समजून सांगोत. (असें म्हणाला, तेव्हां पिता) 'हे पुत्रा तथास्तु' असें म्हणाला ३ (१४).

पुरुषꣳसोम्योतोपतापिनं ज्ञातयः पर्युपासते जानासि मां जानासि मामिति तस्य यावन्न वाङ्मनसि संपद्यते मनः प्राणे प्राणस्तेजसि तेजः परस्यां देवतायां तावज्जानाति ॥ १

अन्वयार्थ—[सोम्य उपतापिनं पुरुषं—] हे सोम्य, ज्वरादिकांनीं उपतापवान् झालेल्या पुरुषास [ज्ञातयः पर्युपासते—] बांधव सभोंवार परिवेष्टित करून—त्याच्या सभोंवार बसून [मां जानासि मां जानासि इति—] मला जाणतोस का ? मला जाणतोस का ? असें विचारतात. [तस्य वाक् मनसि यावत् न संपद्यते—] त्याची वाक् मनामध्यें जोंवर संपन्न होत नाहीं [मनः प्राणे प्राणः तेजसि तेजः परस्यां देवतायां—] मन प्राणांत, प्राण तेजांत व तेज पर देवतेमध्यें जोंवर संपन्न होत नाहीं [तावत् जानाति—] तोंवर तो जाणतो. १.—संसारी जीवाचा जो मरणक्रम तोच विद्वानाच्या सत्संपत्तीचाहि क्रम आहे, असें आरुणि सांगतो—

अथ यदाऽस्य वाङ्मनसि संपद्यते मनः प्राणे प्राण-
स्तेजसि तेजः परस्यां देवतायामथ न जानाति ॥ २

अन्वयार्थ—[अथ यदा०—] पण जेव्हां याची वाक् मनामध्यें संपन्न होते, मन प्राणांत, प्राण तेजांत, तेज पर देवतेमध्यें लीन होतें, [अथ न जानाति—] तेव्हां तो जाणत नाहीं. २.

स य एषोऽणिमैतदात्म्यमिदꣳ सर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेत-
केतो इति भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति तथा सोम्येति होवाच॥३

इति षष्ठाध्यायस्य पंचदशः खण्डः ॥ १५

अन्वयार्थ—तो जो हा अणिमा ऐतदात्म्य हें सर्व आहे. तें सत्य आहे. तो आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें सत् तूं आहेस. (असें पिता ह्मणाला असतां पुत्र) ' पुनरपि भगवान् मला सांगोत ' असें (ह्मणाला, तेव्हां पिता—) ' हे पुत्रा, तथास्तु ' असें बोलला. ३ (१५)

पुरुषꣳ सोम्योत हस्तगृहीतमानयन्त्यपहार्षीत्स्तेयमका-
र्षीत्परशुमस्मै तपतेति स यदि तस्य कर्ता भवति तत
एवानृतमात्मानं कुरुते सोऽनृताभिसंधोऽनृतेनाऽऽत्मान-
मन्तर्धाय परशुं तप्तं प्रतिगृह्णाति स दह्यतेऽथ हन्यते ॥ १

अन्वयार्थ—[सोम्य पुरुषं उत हस्तगृहीतं आनयन्ति—] हे पुत्रा, पुरुषाला हात बांधूनहि आणितात. [अपहार्षीत् स्तेयं अकार्षीत्—] यानें याच्या धनाचा अपहार केला. यानें चोरी केली. [अस्मै परशुं तपत इति—] याच्यासाठीं परशु तापवा, याला दिव्य करूं दे, असें सांगतात. [सः यदि तस्य कर्ता भवति—] तो जर चौर्याचा कर्ता असला व [ततः एव आत्मानं अनृतं कुरुते—] त्यानें ' मीं चोरी केली नाहीं,' असा अपह्नव केला तर तो त्या मिथ्या कथनानें आपल्याला अनृत करतो. [सः अनृताभिसंधः अनृतेन आत्मानं अन्तर्धाय—] तो अनृताभिसंध—अनृताशय अनृतानें आपल्याला झांकून [तप्तं परशुं प्रतिगृह्णाति—] तप्त परशूचा प्रतिग्रह करतो. [सः दह्यते अथ हन्यते—] त्यानें तो दग्ध केला जातो व त्यामुळें राजपुरुषांकडन मारला जातो. १.

अथ यदि तस्याकर्ता भवति तत एव सत्यमात्मानं कुरुते स सत्याभिसंधः सत्येनाऽऽत्मानमन्तर्धाय परशुं तप्तं प्रतिगृह्णाति स न दह्यतेऽथ मुच्यते ॥ २

अन्वयार्थ—[अथ यदि तस्य अकर्ता भवति—] पण तो पुरुष त्या चौर्याचा जर अकर्ता असला [ततः एव सत्यं आत्मानं कुरुते—] तर त्या चौर्याच्या अकर्तृत्वामुळेंच आपल्याला—स्वतःला सत्य करतो. [सः सत्याभिसंधः सत्येन०—] तो सत्याभिसंध सत्यानें आपल्याला झांकून [तप्तं परशुं०—] तप्त परशूचें ग्रहण करतो. [सः न दह्यते—] तो त्यानें दग्ध होत नाहीं. [अथ मुच्यते—] लागलाच मुक्त केला जातो. २.

स यथा तत्र नादाह्येतैतदात्म्यमिदꣳ सर्वं तत्सत्यꣳस आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति तद्धास्य विजज्ञाविति विजज्ञाविति ॥ ३

इति षष्ठाऽध्यायस्य षोडशः खण्डः ॥ १६

इति छान्दोग्योपनिषद्ब्राह्मणे षष्ठोऽध्यायः समाप्तः ॥ ६

अन्वयार्थ—[सः यथा तत्र न आदाह्येत—] तो सत्याभिसंध जसा दग्ध केला जात नाहीं (त्याप्रमाणें विद्वान् संसारांत आवृत्त होत नाहीं—परत येत नाहीं व अविद्वान् आवृत्त होतो) [ऐतदा०—] हें सर्व या सदात्मक आहे. तें सत्य आहे. तो आत्मा आहे. हे श्वेतकेतो, तें तूं आहेस, असें पिता ह्मणाला व [तत् ह अस्य विजज्ञौ इति०—] तें त्या श्वेतकेतूला ज्ञात झालें. यासंबंधी अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. ३ (१६)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील छांदोग्योपनिषदाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

अथ सप्तमोऽध्यायः ।

ज्यांत प्राधान्यानें परमार्थतत्त्वाचाच उपदेश केला आहे, असा सहावा अध्याय सद्-आत्मैकत्वनिर्णयपरत्वानेंच उपयुक्त आहे. उत्तमाधिकाऱ्यास अबाधित तत्त्वाचा उपदेश करणें, हें प्रधान. मागचा अध्याय तत्पर होता. त्याचें सत्-ब्रह्माच्या प्रत्यगात्मनिश्चयपरत्वानेंच व्याख्यान केलें, असा भावार्थ. पण त्यांत सत्-च्या अलीकडील विकारलक्षण तत्त्वांचा निर्देश केला नाहीं. यास्तव त्या नामादिकांचा—नामादि विकाररूप तत्त्वांचा क्रमानें निर्देश करून तद्द्वाराहि भूमाख्य निरतिशय तत्त्वाचा शाखा-चंद्रदर्शनाप्रमाणें मी निर्देश करीन म्हणून श्रुति हा सातवा प्रपाठक आरंभिते; किंवा सत्-च्या अलीकडील तत्त्वांचा निर्देश न केल्यास व नुस्त्या सत्-चाच निर्देश केल्यास दुसरेंहि पुष्कळ अविज्ञात राहिलेलें असेल अशी कोणाला आशंका येईल, ती येऊं नये म्हणून श्रुति त्यांचा निर्देश करण्याची इच्छा करते. अथवा सोपानावर—जिन्यावर जसें आरोहण करावें त्याप्रमाणें स्थूलापासून आरंभ करून सूक्ष्म व सूक्ष्मतर बुद्धिविषयास ज्ञापित करून तदतिरिक्त स्वाराज्यावर अधिकाऱ्याला अभिषेक करीन म्हणून वेद नामादिकांचा निर्देश करीत आहे—किंवा नामादि उत्तरोत्तर विशिष्ट तत्त्वें असून त्या सर्वांहून अत्यंत उत्कृष्ट भूमाख्य तत्त्व आहे, अशी त्याची स्तुति करण्यासाठीं नामादिकांचा क्रमानें उपन्यास केला आहे. आख्यायिका परविद्येच्या स्तुतीसाठीं आहे. नारदासारख्या कृतकर्तव्य व सर्वविद्यांनीं संपन्न असलेल्या देवर्षीलाहि जर आत्मज्ञानाच्या अभावीं शोक झाला तर इतर अल्पज्ञाविषयीं काय बोलावें !

ॐ अधीहि भगव इति होपससाद सनत्कुमारं नारदस्तꣳहोवाच यद्वेत्थ तेन मोपसीद ततस्त ऊर्ध्वं वक्ष्यामीति स होवाच ॥ १

अन्वयार्थ—[अधीहि भगवः इति०—] हे भगवन्, मला आत्मज्ञान सांगा, अशा अर्थाच्या 'अधीहि भगवः' या मंत्रानें—हा मंत्र ह्मणत नारद सनत्कुमारासमीप शिष्यभावानें गेला. [तं ह उवाच—] त्याला सनत्कुमार ह्मणाला—

[यत् वेत्थ तेन मा उपसीद–] आत्म्याविषयीं तूं जें जाणतोस तें प्रख्यापित करून मला उपसन्न हो. [ततः ते ऊर्ध्वं वक्ष्यामि इति–] त्यानंतर त्याच्या-पुढें मी तुला सांगेन, असें ह्मणाला. [सः ह उवाच–] तेव्हां नारद असें बोलला.

ऋग्वेदं भगवोऽध्येमि यजुर्वेदꣳसामवेदमाथर्वणं चतुर्थ-मितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्यꣳराशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्र-विद्यां नक्षत्रविद्याꣳसर्पदेवजनविद्यामेतद्भगवोऽध्येमि ॥ २

अन्वयार्थ—हे भगवन् [ऋग्वेदं अध्येमि०–] मी ऋग्वेदास स्मरतों, यजुर्वेद, सामवेद, आथर्वण हा चवथा वेद, इतिहास-पुराण हा पांचवा वेद, वेदांचा वेद–व्याकरण, श्राद्धकल्प, गणित, उत्पातज्ञान, निधिशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, देवविद्या–निरुक्त, ब्रह्मविद्या–शिक्षादि, भूततंत्र, धनुर्वेद, ज्यौतिष, गारुड, संगीत हे भगवन्, हें सर्व मी जाणतों. २.

सोऽहं भगवो मन्त्रविदेवास्मि नाऽऽत्मविच्छ्रुतꣳह्येव मे भगवद्दृ-शेभ्यस्तरति शोकमात्मविदिति सोऽहं भगवः शोचामि तं मा भगवा-ञ्छोकस्य पारं तारयत्विति तꣳहोवाच यद्वै किंचैतदध्यगीष्ठा नामैवैतत्

अन्वयार्थ—हे भगवन्, [सः अहं मंत्रविद् एव अस्मि न आत्म-विद्–] तो मी मंत्रवेत्ताच आहें, आत्मवेत्ता नाहीं. [भगवद्दृशेभ्यः मे श्रुतं हि एव–] आपल्या साररूपांच्या तोंडून मी ऐकलेंच आहे कीं [आत्मविद् शोकं तरति–] आत्मवेत्ता शोकास तरतो.–पु. ब्र. पृ. ६९ पहा–हे भगवन्, [सः अहं शोचामि–] तो मी अनात्मविद् शोक करतों. [तं मा भगवान् शोकस्य पारं तारयतु इति–] त्या मला भगवान् शोकाच्या पार तारो, या शोक-सागराच्या पार करो, असें (नारद ह्मणाला असतां) [तं ह उवाच–] सनत्कुमार त्यास ह्मणाला–[यत् वै किंच अध्यगीष्ठाः नाम एव एतत्–] 'तूं हें जें कांहीं जाणत आहेस तें नामच आहे.' ३

नाम वा ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेद आथर्वणश्चतुर्थ इति-हासपुराणः पञ्चमो वेदानां वेदः पित्र्यो राशिर्दैवो निधि-र्वाकोवाक्यमेकायनं देवविद्या ब्रह्मविद्या भूतविद्या क्षत्र-विद्या नक्षत्रविद्या सर्पदेवजनविद्या नामैवैतन्नामोपास्स्वेति ४

अन्वयार्थ—[नाम वै ऋग्वेदः०—] ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आथर्वण हा चतुर्थ वेद, इतिहासपुराण हा पांचवा वेद, वेदांचा वेद—व्याकरण, श्राद्धकल्प, ज्यौतिष, उत्पातज्ञान, निधिज्ञान, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, निरुक्त, वेदविद्या, भूतविद्या, क्षत्रविद्या, नक्षत्रविद्या, गारुड, संगीतादि कला व शिल्पज्ञान हें सर्व नाम आहे. [नाम उपास्स्व—] या नामाची ब्रह्मबुद्धीनें उपासना कर. ४.

स यो नाम ब्रह्मेत्युपास्ते यावन्नाम्नो गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो नाम ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो नाम्नो भूय इति नाम्नो वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ५

इति सप्तमाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—[सः यः नाम ब्रह्म इति उपास्ते—] तो जो कोणी 'नाम ब्रह्म' अशी उपासना करतो त्याला जें फळ मिळतें तें ऐक. [यावत् नाम्नः गतं—] जेवढा नामाचा विषय आहे [तत्र अस्य—] त्या नामाच्या विषयामध्यें याचा [यथाकामचारः०—] राजाचा जसा स्वदेशामध्यें यथेष्ट संचार होतो त्याप्रमाणें यथेष्ट आचार होतो, जो 'नाम ब्रह्म' अशी उपासना करतो. त्याचा यथेष्ट व्यवहार चालतो, (नारद)—[भगवः नाम्नः भूयः अस्ति—] 'भगवन् नामाहूनहि अधिक असें कांहीं आहे का?' (सनत्कुमार—) [नाम्नः वाव भूयः अस्ति—] 'नामाहूनहि अधिक आहे.' (नारद)—[तत् भगवान् मे ब्रवीतु—] 'तर मग भगवान् मला तें सांगोत' असें म्हणाला. ५ (१)

वाग्वाव नाम्नो भूयसी वाग्वा ऋग्वेदं विज्ञापयति यजुर्वेदꣳसामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्यꣳराशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्याꣳसर्पदेवजनविद्यां दिवं च पृथिवीं च वायुं चाऽऽकाशं चापश्च तेजश्च देवाꣳश्च मनुष्याꣳश्च पशुꣳश्च वयाꣳसि च तृणवनस्पतीꣳश्वापदान्याकीटपतङ्गपिपीलकं धर्मं चाधर्मं च सत्यं चानृतं च साधु चासाधु च हृदयज्ञं चाहृदयज्ञं च यद्वै वाङ्नाभविष्यन्न धर्मो नाधर्मो व्यज्ञापयिष्यन्न सत्यं नानृतं न साधु नासाधु न हृदयज्ञो नाहृदयज्ञो वागेवैतत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति १

अन्वयार्थ—[वाक् वाव०—] वाक्-च नामाहून अधिकतर आहे. [वाक् वै ऋग्वेदं०—] वाक्-च ऋग्वेदास विज्ञापित करते. यजुर्वेदास, सामवेदास, चवथ्या आथर्वण वेदास, पांचव्या इतिहासपुराणास, वेदांच्या वेदास, श्राद्धकल्पास, ज्यौतिषास, उत्पातशास्त्रास, निधिशास्त्रास, तर्कशास्त्रास, नीतिशास्त्रास, निरुक्तास, वेदविद्येस, भूतविद्येस, क्षत्रविद्येस, नक्षत्रविद्येस, सर्प-देवजनविद्येस, द्युलोकास, पृथिवीस, वायूस, आकाशास, उदकास, तेजास, देवांस, मनुष्यांस, पशूंस, पक्ष्यांस, तृण-वनस्पतींस, श्वापदांस, कीट-पतंग-पिपीलकांपर्यंत प्राण्यांस, धर्म व अधर्म, सत्य व अनृत, साधु व असाधु, हृदयप्रिय व अहृदयप्रिय, यांस वाक्-च विज्ञापित करते. [यत् वै वाक् न अभविष्यत् न धर्मः न अधर्मः०.... व्यज्ञापयिष्यत्—] जर वाक् नसती तर धर्माचें ज्ञान करून देतां आलें नसतें व अधर्माचें ज्ञान करून देतां आलें नसतें. सत्य नाहीं, अनृत नाहीं, साधु नाहीं, असाधु नाहीं, हृदयप्रिय नाहीं व अहृदयप्रिय नाहीं. यांतील कांहीं ज्ञात झालें नसतें. [वाक् एव एतत् सर्वं विज्ञापयति—] वाक्-च हें सर्व विज्ञापित करते. [वाचं उपास्व इति—] यास्तव वाक्-ची उपासना कर, असें सनत्कुमार म्हणाला. १.

स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते यावद्वाचो गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो वाचो भूय इति वाचो वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति २

इति सप्तमाध्यायस्य द्वितीयः खण्ड. ॥ २

अन्वयार्थ—[सः यः वाचं ब्रह्म इति उपास्ते—] तो जो कोणी वाक्‌ची ब्रह्मदृष्ट्या उपासना करतो [अस्य यावत् वाचः गतं तत्र०—] त्याचा जोंवर वाक्‌चा विषय आहे तेथवर यथाकामचार—यथेष्ट संचार होतो. [यः वाचं०—] जो वाक्-ला ब्रह्म म्हणून उपासितो त्याचा यथेष्ट संचार होतो. (नारद—) भगवन्, [वाचः भूयः अस्ति—] वाक्-हून अधिकतर कांहीं आहे काय? (सनत्कुमार—) [वाचः वाव भूयः अस्ति—] 'होय, वाक्-हूनहि भूयः आहे. (नारद—) भगवान् [तत् मे ब्रवीतु—] तें मला सांगो, असें म्हणाला २ (२)

मनो वाव वाचो भूयो यथा वै द्वे वाऽऽमलके द्वे वा कोले द्वौ वाऽक्षौ मुष्टिरनुभवत्येवं वाचं च नाम च मनोऽनुभवति

स यदा मनसा मनस्यति मन्त्रानधीयीयेत्यथाधीते कर्माणि कुर्वीयेत्यथ कुरुते पुत्राꣳश्च पशूꣳश्चेच्छेयेत्यथेच्छत इमं च लोकममुं चेच्छेयेत्यथेच्छते मनो ह्यात्मा मनो हि लोको मनो हि ब्रह्म मन उपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—[मनः वाव वाचः भूयः—] मनच वाक्-हून अधिकतर आहे. यथा वै द्वे आमलके—] ज्याप्रमाणें दोन आंवळे, [द्वे कोले द्वौ वा अक्षौ०—] ान बोरें, दोन बेहडे यांचा मुठींत अन्तर्भाव होतो [एवं वाचं च नाम च नः अनुभवति—] त्याप्रमाणें वाक् व नाम यांचा मनांत अन्तर्भाव होतो. सः यदा मनसा मंत्रान् अधीथीय इति मनस्यति—] तो पुरुष जेव्हां मनानें मीं त्रांचा उच्चार करावा असें मनस्यन—विवक्षाबुद्धि करतो [अथ अधीते—] ेव्हां अध्ययन करतो, [कर्माणि कुर्वीय इति अथ कुरुते—] जेव्हां मीं कर्में करावीं असें मनस्यन—विवक्षाबुद्धि करतो तेव्हां कर्म करतो. [पुत्रान् च०—] पुत्र व शु यांची मी इच्छा करावी, असें मनांत आणतो तेव्हां संकल्पितो—इच्छितो. [इमं च लोकं०—]या लोकास व पर लोकास मी इच्छावें, असें जेव्हां संकल्पितो तेव्हां इच्छितो [मनः हि आत्मा०—] मनच आत्मा आहे, मनच लोक, मनच ब्रह्म [मनः उपास्स्व—] मनाची उपासना कर. १.

स यो मनो ब्रह्मेत्युपास्ते यावन्मनसो गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो मनो ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो मनसो भूय इति मनसो वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति॥२

इति सप्तमाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३

अन्वयार्थ—[सः यः मनः ब्रह्म इति०—] तो जो कोणी मन ब्रह्म आहे अशी उपासना करतो [अस्य यावत् मनसः०—] त्याचा जोंवर मनाचा विषय असतो तोंवर यथेष्ट संचार होतो. कोणाचा? जो मन ब्रह्म आहे, अशी उपासना करतो त्याचा. (नारद—) हे भगवन्, मनाहून भूय कांहीं आहे का ? (सनत्कुमार—) मनाहूनहि भूय आहे. (नारद—) तर मग भगवान् मला तें सांगोत. २ (३)

संकल्पो वाव मनसो भूयान्यदा वै संकल्पयतेऽथ मनस्यत्यथ वाचमीरयति तामु नाम्नीरयति नाम्नि मन्त्रा एकं भवन्ति मन्त्रेषु कर्माणि ॥ १

अन्वयार्थ—[संकल्पः वाव मनसः भूयान्–] संकल्पच मनाहून अधिकतर आहे. [यदा वै संकल्पयते अथ मनस्यति–] जेव्हां पुरुष संकल्प करतो तेव्हां विवक्षा इत्यादि मनस्यन करतो. [अथ वाचं ईरयति–] नंतर वागिंद्रियाला प्रेरणा करतो. [तां उ नाम्नि ईरयति–] त्या वाक्-ला नामामध्यें प्रेरित करतो. [नाम्नि मंत्राः एकं भवन्ति–] नामांत मंत्र एकरूप होतात. [मंत्रेषु कर्माणि–] मंत्रांत कर्में एकरूप होतात. १

तानि ह वा एतानि संकल्पैकायनानि संकल्पात्मकानि संकल्पे प्रतिष्ठितानि समकल्पतां द्यावापृथिवी समकल्पेतां वायुश्चाऽऽकाशं च समकल्पन्तामापश्च तेजश्च तेषाꣳसंकल्पत्यै वर्षꣳसंकल्पते वर्षस्य संकल्प्त्या अन्नꣳसंकल्पतेऽन्नस्य संकल्प्त्यै प्राणाः संकल्पन्ते प्राणानाꣳसंकल्प्त्यै मन्त्राः संकल्पन्ते मन्त्राणाꣳ संकल्प्त्यै कर्माणि संकल्पन्ते कर्मणाꣳसंकल्प्त्यै लोकः संकल्पते लोकस्य संकल्प्त्यै सर्वꣳ संकल्पते स एष संकल्पः संकल्पमुपास्स्वेति ॥ २

अन्वयार्थ—[तानि ह वै एतानि०–] ती हीं सर्व संकल्प हेंच ज्यांचें लयस्थान आहे, अशीं आहेत. संकल्पात्मक आहेत. संकल्पांत प्रतिष्ठित आहेत. [द्यावापृथिवी समकल्पतां–] द्यौ व पृथिवी जणुंकाय संकल्प करत्या झाल्या. [वायुः च आकाशं च समकल्पेतां–] वायु व आकाश संकल्प करते झाले. [आपः च तेजः च समकल्पन्त–] आप व तेज संकल्प करतीं झाली. [तेषां संकल्प्त्यै वर्ष संकल्पते–] त्यांच्या संकल्पानें वृष्टि समर्थ होते. [वर्षस्य संकल्प्त्यै०–] तिच्या संकल्पामुळें अन्न समर्थ होतें. अन्नाच्या संकल्पनिमित्तानें प्राण समर्थ होतात. प्राणांच्या संकल्पनिमित्तानें मंत्र समर्थ होतात. मंत्रांच्या संकल्पनिमित्तानें कर्में समर्थ होतात. कर्मांच्या संकल्पामुळें लोक–फल समर्थ होतें. फलाच्या संकल्पानें सर्व समर्थ होतें. तो हा संकल्प आहे. संकल्प ब्रह्म आहे, अशी उपासना कर. २

स यः संकल्पं ब्रह्मेत्युपास्ते क्लृप्तान् वै स लोकान्ध्रुवान् ध्रुवः प्रतिष्ठितान् प्रतिष्ठितोऽव्यथमानानव्यथमानोऽभिसिध्यति यावत्संकल्पस्य गतं तत्रास्य यथाकामचारो

भवति यः संकल्पं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवः संकल्पाद्भूय इति संकल्पाद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान् ब्रवीत्विति ॥ ३

इति सप्तमाध्यायस्य चतुर्थः खण्डः ॥ ४

अन्वयार्थ—[सः यः०—] तो जो कोणी संकल्पास ब्रह्म म्हणून उपासेतो [सः वै कल्पान् ध्रुवान् लोकान् ध्रुवः—] तो धात्यानें कल्पिलेल्या ध्रुव लोकांस स्वतः ध्रुव होऊन [प्रतिष्ठितान्० —] प्रतिष्ठित लोकांस स्वतः प्रतिष्ठित होऊन [अव्यथमानान्० —] व्यथा न पावणाऱ्या लोकांस स्वतः व्यथारहित होऊन [अभिसिध्यति—] अभितः प्राप्त होतो [यावत् संकल्पस्य गतं—] जोंवर संकल्पाचा विषय असतो [तत्र अस्य यथाकामचारः भवति—] तोंवर याचा यथाकामचार होतो. कोणाचा ? जो संकल्पास ब्रह्मदृष्ट्या उपासितो त्याचा. (नारद—) 'भगवन्, संकल्पाहून अधिकतर कांहीं आहे का ?' (सनत्कुमार—) ' होय; संकल्पाहूनहि अधिकतर आहे.' 'भगवान् , तें मला सांगोत' असें नारद म्हणाला. ३ (४)

चित्तं वाव संकल्पाद्भूयो यदा वै चेतयतेऽथ संकल्पयतेऽथ मनस्यत्यथ वाचमीरयति तामु नाम्नीरयति नाम्नि मन्त्रा एकं भवन्ति मन्त्रेषु कर्माणि ॥ १

अन्वयार्थ—[चित्तं वाव संकल्पात् भूयः—] चित्तच संकल्पाहून भूय आहे. [यदा वै चेतयते अथ संकल्पयते—] जेव्हां पुरुष बोधवान्—चेतनावान् होतो तेव्हां संकल्प करतो; [अथ मनस्यति—] मग निश्चय करतो, [अथ वाचं ईरयति—]वागिंद्रियाला प्रेरणा करतो, [तां नाम्नि०—]तिला नामामध्यें प्रेरणा करतो. [नाम्नि मंत्राः०—] नामांत मंत्र एकरूप होतात व मंत्रांत कर्में एकरूप होतात. १.

तानि ह वा एतानि चित्तैकायनानि चित्तात्मानि चित्ते प्रतिष्ठितानि तस्माद्यद्यपि बहुविदचित्तो भवति नायमस्तीत्येवैनमाहुर्यदयं वेद यद्वा अयं विद्वान्नेत्थमचित्तः स्यादित्यथ यद्यल्पावित्तवान्भवति तस्मा एवोत शुश्रूषन्ते चित्तꣳ ह्येवैषामेकायनं चित्तमात्मा चित्तं प्रतिष्ठा चित्तमुपास्स्वेति २

अन्वयार्थ—[तानि ह वै०—] तीं हीं सर्व चित्तैकायन, चित्तरूप, चित्तांत प्रतिष्ठित आहेत. [तस्मात् यद्यपि बहुविद् अचित्तः भवति—] तस्मात जरी एखादा बहुज्ञ असूनहि अचित्त असला, [अयं अस्ति इति एव एनं न आहुः—]

तर तो आहे असेंच कोणी याला म्हणत नाहींत. [अयं यत् वेद–] हा जें जाणतो तेंहि व्यर्थच होतें. [यत् वा अयं विद्वान् इत्थं अचित्तः न स्यात्–] कारण जर हा विद्वान् असता तर असा अचित्त नसता, [इति–] असें लोक बोलतात. [अथ यदि–] पण जर एखादा [अल्पविद् चित्तवान् भवति–] अल्पज्ञ असूनहि चित्तवान असला तर [तस्मै एव उत शुश्रूषन्ते–] त्याचेंच ऐकण्याची इच्छा करतात. [हि चित्तं एषां एकायनं–] यास्तव चित्तच यांचें एकायन आहे, [चित्तं आत्मा–] चित्तच आत्मा आहे व [चित्तं प्रतिष्ठा–] चित्त प्रतिष्ठा आहे. [चित्तं उपास्स्व इति–] यास्तव चित्ताची ब्रह्मदृष्ट्या उपासना कर.२

स यश्चित्तं ब्रह्मेत्युपास्ते चित्तान्वै स लोकान्ध्रुवान्ध्रुवः प्रतिष्ठितान्प्रतिष्ठितोऽव्यथमानानव्यथमानोऽभिसिध्यति यावच्चित्तस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यश्चित्तं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवश्चित्ताद्भूय इति चित्ताद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ ३

इति सप्तमाध्यायस्य पंचमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[सः यः चित्तं०–] तो जो चित्त ब्रह्म आहे, अशी उपासना करतो तो बुद्धिमद्गुणांनीं उपचित अशा ध्रुवलोकांस ध्रुव होऊन, प्रतिष्ठित लोकांस स्वतः प्रतिष्ठित होऊन व व्यथाविरहित लोकांस स्वतः व्यथारहित होऊन [अभिसिध्यति–] प्राप्त होतो. [यावत् चित्तस्य०–]जोंवर चित्ताचा विषय असतो तोंवर–त्या विषयांत त्याचा यथेच्छ संचार होतो. कोणाचा ? जो चित्ताची ब्रह्मदृष्ट्या उपासना करतो, त्याचा. (नारद–)' भगवन्, चित्ताहून अधिकतर असें कांहीं आहे का ?' (सनत्कुमार–)'चित्ताहूनहि अधिकतर आहे.' (नारद–) 'भगवान् तें मला सांगोत,' असें म्हणाला. ३ (५)

ध्यानं वाव चित्ताद्भूयो ध्यायतीव पृथिवी ध्यायतीवान्तरिक्षं ध्यायतीव द्यौर्ध्यायन्तीवाऽऽपो ध्यायन्तीव पर्वता ध्यायन्तीव देवमनुष्यास्तस्माद्य इह मनुष्याणां महत्तां प्राप्नुवन्ति ध्यानापादाꣳशा इवैव ते भगन्त्यथ येऽल्पाः कलहिनः पिशुना उपवादिनस्तेऽथ ये प्रभवो ध्यानापादाꣳशा इवैव ते भवन्ति ध्यानमुपास्स्वेति ॥ १ ॥ स यो ध्यानं ब्रह्मेत्युपास्ते

यावद्ध्यानस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो ध्यानं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो ध्यानाद्भूय इति ध्यानाद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ २ ॥

अन्वयार्थ—[ध्यानं०—] ध्यान च चित्ताहून अधिकतर आहे. [पृथिवी ध्यायति इव०—] पृथिवी जणुंकाय ध्यान करते, अन्तरिक्ष जणुंकाय ध्यान करितें, द्यौ जणुंकाय ध्यान करिते, आप जणुंकाय ध्यान करतात, पर्वत ध्यानसें करितात, देव-मनुष्य जणुंकाय ध्यान करितात. [तस्मात इह मनुष्याणां महत्तां प्राप्नुवन्ति ते ध्यानापादांशा इव एव भवन्ति—] तस्मात् जे या लोकीं धनादिकांनीं मनुष्यांच्या महत्त्वास प्राप्त होतात ते जणुकाय ध्यानफलाच्या लाभांशानें युक्त होतात. [अथ ये अल्पाः ते कलहिनः पिशुनाः उपवादिनः -] पण जे अल्प असतात ते कलह करणारे, दुसऱ्याचा दोष व्यक्त करणारे, परदोष त्याच्या समक्ष बोलून दाखविणारे असे होतात. [अथ ये प्रभवः ते ध्यानापादांशाः इव एव भवन्ति—] पण जे प्रभु—समर्थ असतात ते ध्यानफलप्राप्तीचे जणुंकाय अंशच, असे होतात. [ध्यानं उपास्स्व—] ध्यानाची उपासना कर. १ तो जो कोणी ध्यान ब्रह्म आहे, अशी उपासना करतो त्याचा जेथवर ध्यानाचा विषय असतो तेथवर यथेच्छ संचार होतो.कोणाचा ? जो ध्यान ब्रह्म आहे, अशी उपासना करतो, त्याचा. (नारद—) 'भगवन्, ध्यानाहून 'भूयः' असें कांहीं आहे का ?' (सनत्कुमार—) 'ध्यानाहूनहि अधिकतर आहे.' (नारद—) ' भगवान् तें मला सांगोत,' असें म्हणाला. २ (६)

विज्ञानं वाव ध्यानाद्भूयो विज्ञानेन वा ऋग्वेदं विजानाति यजुर्वेदꣳसामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्यꣳराशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्याꣳसर्पदेवजनविद्यां दिवं च पृथिवीं च वायुं चाऽकाशं चापश्च तेजश्च देवाꣳश्च मनुष्याꣳश्च पशूꣳश्च वयाꣳसि च तृणवनस्पतीञ्छ्वापदान्याकीटपतङ्गपिपीलकं धर्मं चाधर्मं च सत्यं चानृतं च साधु चासाधु च हृदयङ्ग

चाहृदयञ्चं चान्नं च रसं चेमं च लोकमुं च विज्ञानेनैव विजानाति विज्ञानमुपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—विज्ञानच ध्यान हून अधिकतर आहे. [ऋग्वेदं विज्ञानेन वै विजानाति०—] ऋग्वेदास विज्ञानानेंच जाणतो, यजुर्वेदास, सामवेदास, चवथ्या आथर्वणास, पांचव्या इतिहासपुराणास, व्याकरणास, श्राद्धकल्पास, ज्यौतिषास, उत्पातज्ञानास, निधिशास्त्रास, तर्कशास्त्रास, नीतिशास्त्रास, निरुक्तास, वेदविद्येस, भूतविद्येस, क्षत्रविद्येस, नक्षत्रविद्येस, गारुड व शिल्पादि यांस, द्युलोकास, पृथिवीस, वायूस, आकाशास, आपांस, तेजास, देवांस, मनुष्यांस, पशूंस, पक्ष्यांस, तृण-वनस्पतींस, श्वापदांस, साधु—चांगलें व असाधु—वाईट यांस, हृदयप्रियास व अहृदयप्रियास, अन्नास व रसास, या लोकास व परलोकास विज्ञानानेंच जाणतो. विज्ञानाची उपासना कर. १

स यो विज्ञानं ब्रह्मेत्युपास्ते विज्ञानवतो वै स लोकाञ्ज्ञानवतोऽभिसिध्यति यावद्विज्ञानस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो विज्ञानं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो विज्ञानाद्भूय इति विज्ञानाद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति

इति सप्तमाध्यायस्य सप्तम खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—[सः यः०—] तो जो विज्ञान ब्रह्म आहे, अशी उपासना करतो [सः विज्ञानवतः ज्ञानवतः लोकान्०—] तो विज्ञानवान् व ज्ञानवान् लोकांस प्राप्त होतो. [यावत् विज्ञानस्य गतं०—] जेवढा विज्ञानाचा विषय आहे त्यांत त्याचें यथेच्छ आचरण होतें; कोणाचें? जो विज्ञान ब्रह्म आहे, असें उपासन करतो त्याचें. (नारद—) भगवन्, विज्ञानाहून अधिकतर कांहीं आहे का? (सनत्कुमार) विज्ञानाहूनहि अधिकतर आहे. [नारद—] भगवान् तें मला सांगोत; असें म्हणाला.

बलं वाव विज्ञानाद्भूयोऽपि ह शतं विज्ञानवतामेको बलवानाकम्पयते स यदा बली भवत्यथोत्थाता भवत्युत्तिष्ठन् परिचरिता भवति परिचरन्नुपसत्ता भवत्युपसीदन्द्रष्टा भवति श्रोता भवति मन्ता भवति बोद्धा भवति कर्ता भवति विज्ञाता भवति बलेन वै पृथिवी

तिष्ठति बलेनान्तरिक्षं बलेन द्यौर्बलेन पर्वता बलेन देवमनुष्या बलेन पशवश्च वयाꣳसि च तृणवनस्पतयः श्वापदान्याकीटपतङ्गपिपीलकं बलेन लोकस्तिष्ठति बलमुपास्स्वेति ॥१॥ स यो बलं ब्रह्मेत्युपास्ते यावद्बलस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यो बलं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवो बलाद्भूय इति बलाद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥२॥

इति सप्तमाध्यायस्य अष्टमः खण्डः ॥ ८

अन्वयार्थ—[बलं वाव०—] बलच विज्ञानाहून अधिकतर आहे. [विज्ञानां शतं एकः बलवान् आकंपयते—] शंभर विज्ञानवानांसहि एकटा बलवान् कांपवितो. [सः यदा बलवान०—] तो पुरुष जेव्हां बलवान् होतो तेव्हां ठणारा होतो, [उत्तिष्ठन् परिचरिता भवति—] उठून उभा राहणाराच परिर्या करणारा होतो, [परिचरन् उपसत्ता भवति०—] परिचर्या करणारा समीप मनकर्ता होतो. उपसन्न होणारा द्रष्टा होतो, श्रोता होतो, मन्ता होतो, द्धा होतो, कर्ता होतो, विज्ञाता होतो. बलानेंच पृथिवी उभी राहते, बलानें न्तरिक्ष, बलानें द्यौ, बलानें पर्वत, बलानें देव-मनुष्य, बलानें पशु, पक्षी, ण-वनस्पति, श्वापद, कीट-पतंग-पिपीलकापर्यंत प्राणी बलानें उभे राहतात. लानें लोक उभा राहतो, बलाची उपासना कर. १. तो जो बलास ब्रह्म ह्णून उपासितो त्याचें, जोंवर बलाचा विषय असतो तोंवर—त्यांत यथेच्छ चरण होतें. कोणाचें ? जो बलास ब्रह्म म्हणून उपसितो, त्याचें. (नारद—) भगवन्, बलाहून अधिकतर कांहीं आहे का ?' (सनत्कुमार—) ' बलाहूनहि धिकतर आहे.' (नारद—) 'भगवान् तें मला सांगोत.' असें म्हणाला २(८)

अन्नं वाव बलाद्भूयस्तस्माद्यद्यपि दशरात्रीर्नाश्नीयाद्यद्यु ह जीवेदथवाऽद्रष्टाऽश्रोताऽमन्ताऽबोद्धाऽकर्ताऽविज्ञाता भवत्यथान्नस्याऽऽयै द्रष्टा भवति श्रोता भवति मन्ता भवति बोद्धा भवति कर्ता भवति विज्ञाता भवत्यन्नमुपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—[अन्नं वाव०—] अन्नच बलाहून अधिकतर आहे. [तस्मात् द्यपि दशरात्रीः न अश्नीयात्—] त्यामुळें जर एखाद्यानें दहा दिवस अन्न खालें ाहीं तर तो मरतो. [यदि उ ह जीवेत्०—] पण तो जरी न मरतां जीवंत राहिला

तरी अद्रष्टा, अश्रोता, अमन्ता, अबोद्धा, अकर्ता, अविज्ञाता होतो. [अथ अन्नस्य आयै द्रष्टा भवति०–] पण अन्नाची प्राप्ति झाली असतां द्रष्टा होतो, श्रोता होतो, मन्ता होतो, बोद्धा होतो, कर्ता होतो, विज्ञाता होतो, अन्नाची ब्रह्मदृष्ट्या उपासना कर. १.

स योऽन्नं ब्रह्मेत्युपास्तेऽन्नवतो वै स लोकान्पानवतोऽभिसिध्यति यावदन्नस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति योऽन्नं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवोऽन्नाद्भूय इत्यन्नाद्धाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ २

इति सप्तमाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—तो जो अन्न ब्रह्म आहे, अशी उपासना करतो तो अन्नवान् व पानवान् लोकांस प्राप्त होतो. जेवढा अन्नाचा विषय असतो त्यांत त्याचा यथेच्छ संचार होतो. कोणाचा? जो अन्न ब्रह्म आहे, अशी उपासना करतो, त्याचा. (नारद–) 'भगवन्, अन्नाहून अधिकतर असें कांहीं आहे का?' (सनत्कुमार–) होय, अन्नाहून 'भूयः' आहे. (नारद–) तर मग भगवान्, तें मला सांगोत, असें म्हणाला. २ (९)

आपो वावान्नाद्भूयस्यस्तस्माद्यदा सुवृष्टिर्न भवति व्याधीयन्ते प्राणा अन्नं कनीयो भविष्यतीत्यथ यदा सुवृष्टिर्भवत्यानन्दिनः प्राणा भवन्त्यन्नं बहु भविष्यतीत्याप एवेमा मूर्ता येयं पृथिवी यदन्तरिक्षं यद्द्यौर्यत्पर्वता यद्देवमनुष्या यत्पशवश्च वयाꣳसि च तृणवनस्पतयः श्वापदान्याकीटपतङ्गपिपीलकमाप एवेमा मूर्ता अप उपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—[आपः वाव०–] आप अन्नाहून अधिकतर आहेत [तस्मात् यदा सुवृष्टिः न भवति प्राणाः व्याधीयन्ते–] म्हणून जेव्हां सुवृष्टि होत नाहीं तेव्हां प्राण दुःखी होतात. [अन्नं कनीयः भविष्यति इति–] आतां अन्न अगदी थोडें होईल, म्हणून प्राण दुःखी होतात. [अथ यदा सुवृष्टिः भवति प्राणाः अन्नं बहु भविष्यति इति आनंदिनः भवन्ति–] पण जेव्हां सुवृष्टि होते तेव्हां प्राण आतां अन्न पुष्कळ होईल, म्हणून आनंदी होतात. [या इयं पृथिवी इमाः मूर्ताः आपः एव–] ही जी पृथिवी त्या मूर्त–साकार आप्-च

आहेत. [यत् अन्तरिक्षं०....इमाः मूर्ताः आपः एव–] जें अन्तरिक्ष, जी द्यौ, जे पर्वत, जे देव-मनुष्य, जे पशु, पक्षी, तृण-वनस्पति, श्वापद, कीट-पतंग-पिपीलकान्त सर्व जीव या मूर्त आप्च आहेत. [अपः उपास्स्व इति–] आपांची ब्रह्मदृष्ट्या उपासना कर. १.

स योऽपो ब्रह्मेत्युपास्त आप्नोति सर्वान्कामाꣳस्तृप्तिमान् भवति याव-दपां गतं तत्रास्य यथाकामचारो भवति योऽपो ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भग-वोऽद्भ्यो भूय इत्यद्भ्यो वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान् ब्रवीत्विति ॥२

इति सप्तमाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—[सः यः अपः०–] तो जो आप् ब्रह्म आहे, अशी उपासना करतो तो सर्व कामांस प्राप्त होतो, तृप्तिमान् होतो, जेवढा आपांचा विषय असतो त्यांत याचा यथाकाम संचार होतो, कोणाचा ? जो ' आप् ब्रह्म ' अशी उपासना करतो, त्याचा. (नारद–)'भगवन्, आपांहून अधिकतर कांहीं आहे का?' (सनत्कुमार–) 'आपांहूनहि ' भूयः ' आहे.' (नारद–) ' तें मला भगवान् सांगोत,' असें म्हणाला. २ (१०)

तेजो वाव अद्भ्यो भूयस्तद्वा एतद्वायुमागृह्याकाशमभितपति तदा-हुर्निशोचति नितपति वर्षिष्यति वा इति तेज एव तत्पूर्वं दर्श-यित्वाथापः सृजते तदेतदूर्ध्वाभिश्च तिरश्चीभिश्च विद्युद्भिरा-ह्लादाश्चरन्ति तस्मादाहुर्विद्योतते स्तनयति वर्षिष्यति वा इति तेज एव तत्पूर्वं दर्शयित्वाऽथापः सृजते तेज उपास्स्वेति १

अन्वयार्थ—[तेजः वाव अद्भ्यः भूयः–] तेजच आपांहून भूयः आहे. [तत् वा एतत् वायुं आगृह्य आकाशं अभितपति–] तें हें तेज जेव्हां वायूस स्वात्मरूपानें निश्चल करून आकाशाला व्यापून तापतें [तदा आहुः निशोचति नितपति वर्षिष्यति वै इति–] तेव्हां लौकिक म्हणतात ' ऊष्मा होत आहे. उकाडा होत आहे. यास्तव वृष्टि होईल.' [तेजः एव तत् पूर्वं दर्शयित्वा–] तें तेजच पूर्वी स्वतःला उद्भूत झालेलें दाखवून [अथ अपः सृजते–] नंतर आपांस उत्पन्न करतें. [तत् एतत्–] तें हें तेजच वृष्टिहेतु होतें. [ऊर्ध्वाभिः च तिरश्चीभिः च विद्युद्भिः आह्लादाः चरन्ति–] ऊर्ध्वगामी व तिर्यक्-गामी विद्युत्-सह गडगडाट पसरतात. [तस्मात् आहुः विद्योतते–] त्यामुळें लोक

म्हणतात वीज होत आहे, [स्तनयति–] गडगडत आहे, [वर्षिष्यति–]पाऊस पडेल. [इति वै तत् तेजः एव पूर्वं दर्शयित्वा–] याप्रमाणें तें तेजच पूर्वी आपल्याला दाखवून [अथ अपः सृजते–] नंतर आप् ला उत्पन्न करतें. [तेजः उपास्स्व इति–] यास्तव तेज ब्रह्म आहे, अशी उपासना कर. १

स यस्तेजो ब्रह्मेत्युपास्ते तेजस्वी वै स तेजस्वतो लोकान्भास्वतोऽपहततमस्कानभिसिध्यति यावत्तेजसो गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यस्तेजो ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवस्तेजसो भूय इति तेजसो वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ २

इति सप्तमाध्यायस्य एकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—तो जो तेज ब्रह्म म्हणून उपासितो तो स्वतः तेजस्वी होऊन तेजस्वान्, प्रकाशवान्, तमःशून्य लोकांस प्राप्त होतो. जेवढा तेजाचा विषय आहे त्यांत याचा यथाकाम संचार होतो, जो तेजाची उपासना करतो त्याचा यथेष्ट संचार होतो. (नारद–) भगवन्, तेजाहून भूय आहे काय? (सनत्कुमार–) होय, तेजाहूनहि भूय आहे. (नारद–) भगवान् तें मला सांगोत, असें म्हणाला. २

आकाशो वाव तेजसो भूयानाकाशे वै सूर्याचन्द्रमसावुभौ विद्युन्नक्षत्राण्यग्निराकाशेनाह्वयत्याकाशेन शृणोत्याकाशेन प्रतिशृणोत्याकाशे रमत आकाशे न रमत आकाशे जायत आकाशमभिजायत आकाशमुपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—[आकाशः वाव०–] आकाशच तेजाहून भूयान् आहे. [आकाशे वै०–] कारण आकाशांतच सूर्य व चन्द्र हे दोघे, विद्युत्, नक्षत्रें, अग्नि आहेत. [आकाशेन आह्वयति०–] आकाशानेंच एक दुसऱ्याला बोलावितो, [आकाशेन शृणोति०–] आकाशानेंच तो ऐकतो, आकाशानेंच प्रतिश्रवण करतो. आकाशांत रमतो, आकाशांत रमत नाहीं. आकाशांत उत्पन्न होतो. [आकाशं अभिजायते–] आकाशाला अनुलक्षून अंकुरादि होतात. [आकाशं उपास्स्व–] आकाशाची उपासना कर. १

स य आकाशं ब्रह्मेत्युपास्त आकाशवतो वै स लोकान्प्रकाशवतोऽसंबाधानुरुगायवतोऽभिसिध्यति यावदाकाशस्य गतं तत्रास्य

यथाकामचारो भवति य आकाशं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगव आकाशाद्भूय इत्याकाशाद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति २

इति सप्तमाध्यायस्य द्वादशः खण्डः ॥ १२

अन्वयार्थ—तो जो आकाश ब्रह्म आहे, अशी उपासना करतो तो आकाशवान्, प्रकाशवान्, पीडारहित, विस्तीर्ण प्रचाराच्या लोकांस प्राप्त होतो. जो आकाश ब्रह्म आहे, अशी उपासना करतो त्याचा जेवढा आकाशाचा विषय आहे त्यांत यथाकाम संचार होतो. (नारद–) भगवन्, आकाशाहून अधिकतर कांहीं आहे का ? [सनत्कुमार–] आकाशाहूनहि अधिकतर आहे, (नारद–) ' भगवान् तें मला सांगोत, ' असें म्हणाला. २ (१२)

स्मरो वावाऽऽकाशाद्भूयस्तस्माद्यद्यपि बहव आसीरन्न स्मरन्तो नैव ते कंचन शृणुयुर्न मन्वीरन्न विजानीरन्यदा वाव ते स्मरेयुरथ शृणुयुरथ मन्वीरन्नथ विजानीरन्स्मरेण वै पुत्रान्विजानाति स्मरेण पशून्स्मरमुपास्स्वेति ॥ १ स यः स्मरं ब्रह्मेत्युपास्ते यावत्स्मरस्य गतं तत्रास्य यथाकामचारो भवति यः स्मरं ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगवः स्मराद्भूय इति स्मराद्वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ २

इति सप्तमाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ—[स्मरः वाव आकाशात् भूयः–] स्मरच आकाशाहून भूय आहे. [तस्मात् यद्यपि बहवः आसीरन् न स्मरन्तः–] तस्मात् यद्यपि पुष्कळ लोक एके ठिकाणीं जमून बसलेले असले व ते कांही स्मरत नसले तर [ते कंचन न एव शृणुयुः–] ते कोणत्याहि शब्दाला ऐकणार नाहींत, [न मन्वीरन्–] मनन करणार नाहीत, [न विजानीरन्–] जाणणार नाहींत, [यदा वाव ते स्मरेयुः–] पण जेव्हां ते स्मरतील [अथ शृणुयुः–] तेव्हां ऐकतील, [अथ मन्वीरन्–] मनन करतील [अथ विजानीरन्–] व जाणतील. [स्मरेण वै पुत्रान् विजानाति०–] स्मरानेंच पुत्रांस जाणतो व स्मरानें पशूंस जाणतो. स्मराची उपासना कर. १ तो जो कोणी स्मराची ब्रह्मदृष्ट्या उपासना करतो त्याचा जेवढा स्मराचा विषय असतो त्यांत यथाकाम संचार होतो, कोणाचा ? जो स्मराला ब्रह्म म्हणून उपासितो, त्याचा. (नारद–)'भगवन्, स्मराहून अधिक

असें कांहीं आहे का?' (सनत्कुमार–)'होय. स्मराहून अधिकतर आहे.'(नारद–) 'भगवान् तेंच मला सांगोत.' २ (१३)

आशा वाव स्मराद्भूयस्याशेद्धो वै स्मरो मन्त्रानधीते कर्माणि कुरुते पुत्राꣳश्च पशूꣳश्चेच्छत इमं च लोकममुं चेच्छत आशामुपास्स्वेति ॥ १

अन्वयार्थ—[आशा वाव स्मरात् भूयसी–] आशाच स्मराहून अधिकतरा आहे. [आशेद्धः वै स्मरः मंत्रान् अधीते–] आशेनें दीप्त झालेला स्मर मंत्रांचें अध्ययन करतो, [कर्माणि कुरुते–] कर्में करतो, [पुत्रान् च पशून् च इच्छते–] पुत्र व पशु यांची इच्छा करतो. [इमं च लोकं अमुं च इच्छते–] या लोकास व परलोकास इच्छितो. [आशां उपास्स्व इति–] आशेची उपासना कर. १.

स य आशां ब्रह्मेत्युपास्त आशयाऽस्य सर्वे कामाः समृध्यन्त्यमोघा हास्याऽऽशिषो भवन्ति यावदाशाया गतं तत्रास्य यथाकामचारो भवति य आशां ब्रह्मेत्युपास्तेऽस्ति भगव आशाया भूय इत्याशाया वाव भूयोऽस्तीति तन्मे भगवान्ब्रवीत्विति ॥ २

इति सप्तमाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—[सः यः०–] जो कोणी आशेला ब्रह्म म्हणून उपासितो [अस्य सर्वे कामाः आशया समृध्यन्ति–] त्याचे सर्व काम आशेनें समृद्ध होतात. [अस्य आशिषः अमोघाः भवन्ति–] याच्या आशा अमोघ होतात. [यावत्०–] जेवढा आशेचा विषय आहे त्यांत त्याचा यथाकामचार होतो, कोणाचा? जो ' आशा ब्रह्म ' अशी उपासना करतो, त्याचा (नारद–) ' भगवन्, आशेहून आणखीं कांहीं अधिकतर आहे का ? ' (सनत्कुमार–) ' आशेहूनहि अधिकतर आहे. ' (नारद–)' तें मला भगवान् सांगोत. ' २ (१४)

प्राणो वा आशाया भूयान्यथा वा अरा नाभौ समर्पिता एवमस्मिन्प्राणे सर्वꣳ समर्पितं प्राणः प्राणेन याति प्राणः प्राणं ददाति प्राणाय ददाति प्राणो ह पिता प्राणो माता प्राणो भ्राता प्राणः स्वसा प्राण आचार्यः प्राणो ब्राह्मणः ॥१

अन्वयार्थ—[प्राणः वै आशायाः भूयान्–] प्राणच आशेहून भूयान् आहे. [यथा वै अराः नाभौ समर्पिताः–] ज्याप्रमाणें अरा चाकाच्या नाभींत

–तुंब्यांत समर्पित–ठोकून बसविलेल्या असतात [एवं अस्मिन् प्राणे सर्वं समर्पितं–] त्याप्रमाणें या प्राणामध्यें सर्व समर्पित आहे. [प्राणः प्राणेन याति–] यास्तव प्राण प्राणानें म्ह० स्वशक्तीनें गमन करतो. [प्राणः प्राणं ददाति०–] प्राण प्राणास–स्वरूपास देतो. तो प्राणास देतो, दुसऱ्या कोणालाहि देत नाहीं. प्राणच पिता, प्राण माता, प्राण भ्राता, प्राण भगिनी, प्राण आचार्य व प्राण ब्राह्मण आहे. १

स यदि पितरं वा मातरं वा भ्रातरं वा स्वसारं वाऽचार्यं वा ब्राह्मणं वा किंचिद्भृशमिव प्रत्याह धिक्त्वाऽस्त्वित्येवैनमाहुः पितृहा वै त्वमसि मातृहा वै त्वमसि भ्रातृहा वै त्वमसि स्वसृहा वै त्वमस्याचार्यहा वै त्वमसि ब्राह्मणहा वै त्वमसीति ॥२

अन्वयार्थ—[सः यदि पितरं०–] जर कोणी पित्याला किंवा मातेला किंवा भ्रात्याला किंवा भगिनीला अथवा आचार्याला किंवा ब्राह्मणाला, [किंचित् भृशं इव प्रत्याह–] अननुरूप असें कांहीं वचन बोलेल तर त्याला समीपस्थ [धिक् त्वा अस्तु इति एव एनं आहुः–] 'तुला धिक्कार असो' असेंच म्हणतात. [त्वं पितृहा असि०–] तूं पितृहा–पित्याचें हनन करणारा आहेस, मातृहा आहेस, भ्रातृघातकी आहेस, भगिनीचा घात करणारा आहेस, तूं आचार्याचा घात करणारा आहेस, तूं ब्राह्मणघ्न आहेस, असें म्हणतात. २.

अथ यद्यप्येनानुत्क्रान्तप्राणाञ्शूलेन समासं व्यतिषंदहेन्नैवैनं ब्रूयुः पितृहाऽसीति न मातृहाऽसीति न भ्रातृहाऽसीति न स्वसृहाऽसीति नाऽचार्यहाऽसीति न ब्राह्मणहाऽसीति ॥ ३

अन्वयार्थ—[अथ एनान् उत्क्रान्तप्राणान्–] पण ज्यांचे प्राण शरीरांतून निघून गेले आहेत अशा त्या पित्रादिकांस [यद्यपि शूलेन समासं व्यतिषंदहेत्–] जरी सुळानें टोंचून एकत्र गोळा करून किंवा त्यांचे अवयव विभक्त करून कोणीं जाळलें तरी [एनं पितृहा असि०....ब्राह्मणहा असि इति न एव ब्रूयुः–] त्याला तूं पितृहा आहेस असें म्हणत नाहींत. मातृहा आहेस, तूं भ्रातृहा आहेस, भगिनीचा घात करणारा आहेस, आचार्यहा आहेस व ब्राह्मणाचा घात करणारा आहेस, असें कधींच म्हणत नाहींत. ३.

प्राणो ह्येवैतानि सर्वाणि भवति स वा एष एवं पश्यन्नेवं मन्वान एवं विजानन्नतिवादी भवति तं चेद्ब्रूयुरतिवाद्यसीत्यतिवाद्यस्मीति ब्रूयान्नापह्नुवीत ॥ ४

इति सप्तमाध्यायस्य पंचदशः खण्डः ॥ १५

अन्वयार्थ—[प्राणः हि एव एतानि सर्वाणि भवति—] प्राणच पित्रादि हीं सर्व होतो. [सः वै एषः एवं पश्यन् एवं मन्वानः०—] तोच हा असें पाहणारा, असें चिंतन करणारा, असें जाणणारा अतिवादी होतो. [तं चेत् अतिवादी असि इति ब्रूयुः—] त्याला जर कोणीं ' तूं अतिवादी आहेस ' असें म्हटलें तर त्यानें [अतिवादी अस्मि इति ब्रूयात्—] ' होय, मी अतिवादी आहें, ' असें म्हणावें. [न अपह्नुवीत—] त्याचा अपह्नव करूं नये. (मी अतिवादी नाहीं, असें म्हणूं नये.) ४.(१५)

एष तु वा अतिवदति यः सत्येनातिवदति सोऽहं भगवः सत्येनातिवदानीति सत्यं त्वेव विजिज्ञासितव्यमिति सत्यं भगवो विजिज्ञास इति ॥ १

इति सप्तमाध्यायस्य षोडश. खण्डः ॥ १६

अन्वयार्थ—(सनत्कुमार—) [यः सत्येन अतिवदति एषः तु वा अतिवदति—] जो वास्तविक सत्य आत्म्याच्या साक्षात्कारामुळें अतिवदन करतो तो खरा अतिवादी आहे. (नारद—) [भगवः अहं सत्येन अतिवदानि इति—] भगवन्, मी परमार्थ सत्य आत्मज्ञानानें अतिवादी होतों. (सनत्कुमार—) [सत्यं तु एव विजिज्ञासितव्यं इति—] सत्यालाच विशेषतः जाणण्याची इच्छा करावी. (नारद—) [सत्यं भगवः विजिज्ञासे इति—] भगवन्, मी सत्याचीच विजिज्ञासा करतों. सु. ब्र. पृ. ६९ पहा. १. (१६)

यदा वै विजानात्यथ सत्यं वदति नाविजानन्सत्यं वदति विजानन्नेव सत्यं वदति विज्ञानं त्वेव विजिज्ञासितव्यमिति विज्ञानं भगवो विजिज्ञास इति ॥ १

इति सप्तमाध्यायस्य सप्तदशः खण्डः ॥ १७

अन्वयार्थ—[यदा वै विजानाति अथ सत्यं वदति—] जेव्हां सत्याला परमार्थतः जाणतो तेव्हां सत्य बोलतो. [न अविजानन् सत्यं वदति—] सत्याला न जाणणारा सत्य बोलत नाहीं. [विजानन् एव सत्यं वदति—] तर सत्याला

साक्षात् जाणणाराच त्या सत्याचें कथन करतो. [विज्ञानं तु एव विजिज्ञासितव्यं इति–] यास्तव विज्ञानालाच विशेषतः जाणण्याची इच्छा करावी. (नारद–) [भगवः विज्ञानं विजिज्ञासे–] ' भगवन्, मी विज्ञानास विशेषतः जाणण्याची इच्छा करतों.' १ (१७)

यदा वै मनुतेऽथ विजानाति नामत्वा विजानाति मत्वैव विजानाति मतिस्त्वेव विजिज्ञासितव्येति मतिं भगवो विजिज्ञास इति ॥

इति सप्तमाध्यायस्याष्टादशः खण्डः ॥ १८

अन्वयार्थ—[यदा वै मनुते–] जेव्हां मनन करतो [अथ विजानाति–] तेव्हां विशेषतः जाणतो. [अमत्वा न विजानाति–] मनन न करितां विशेषतः जाणत नाहीं. [मत्वा एव विजानाति–] तर मनन करूनच जाणतो. [मतिः तु एव विजिज्ञासितव्या इति–] यास्तव मतीलाच विशेषतः जाणण्याची इच्छा करावी. (नारद–) [भगवः मतिं विजिज्ञासे इति–] भगवन्, मी मतीच्या विज्ञानाची इच्छा करतों १ (१८)

यदा वै श्रद्दधात्यथ मनुते नाश्रद्दधन्मनुते श्रद्दधदेव मनुते श्रद्धा त्वेव विजिज्ञासितव्येति श्रद्धां भगवो विजिज्ञास इति ॥ १

इति सप्तमाध्यायस्यैकोनविंशतितमः खण्डः ॥ १९

अन्वयार्थ—[यदा वै श्रद्दधाति–] जेव्हां श्रद्धा ठेवतो [अथ मनुते–] तेव्हां मनन करतो. [अश्रद्दधत् न मनुते–] श्रद्धा न ठेवणारा मनन करीत नाही. [श्रद्दधत् एव मनुते–] तर श्रद्धाळुच मनन करतो. [श्रद्धा तु एव विजिज्ञासितव्या इति–] यास्तव श्रद्धेला जाणण्याचीच इच्छा करावी (नारद–) भगवन् [श्रद्धां विजिज्ञासे इति–] मी श्रद्धेच्या विज्ञानाचीच इच्छा करतों. १

यदा वै निस्तिष्ठत्यथ श्रद्दधाति नानिस्तिष्ठञ्छ्रद्दधाति निस्तिष्ठन्नेव श्रद्दधाति निष्ठा त्वेव विजिज्ञासितव्येति निष्ठां भगवो विजिज्ञास इति

इति सप्तमाध्यायस्य विंशः खण्ड. ॥ २०

अन्वयार्थ—[यदा वै निस्तिष्ठति–] जेव्हां निष्ठा–गुरुशुश्रूषादितत्परता ठेवतो [अथ श्रद्दधाति–] तेव्हां श्रद्धा ठेवतो. [अनिस्तिष्ठन् न श्रद्दधाति–] निष्ठा न ठेवणारा श्रद्धाहि ठेवीत नाही. [निस्तिष्ठन् एव श्रद्दधाति–] तर अत्यंत तत्पर होणाराच श्रद्धा ठेवतो. [निष्ठा तु एव विजिज्ञासितव्या इति–]

निष्ठेचीच विजिज्ञासा करावी. (नारद) भगवन्, [निष्ठां विजिज्ञासे इति–] मी निष्ठेला जाणण्याची इच्छा करतों. १ (२०)

यदा वै करोत्यथ निस्तिष्ठति नाकृत्वा निस्तिष्ठति कृत्वैव निस्तिष्ठति कृतिस्त्वेव विजिज्ञासितव्येति कृतिं भगवो विजिज्ञास इति

इति सप्तमाध्यायस्य एकविंशः खण्डः ॥२१

अन्वयार्थ—[यदा वै करोति०–] जेव्हां कृति करतो तेव्हां निष्ठा ठेवतो [अकृत्वा न निस्तिष्ठति०–] न करतां निष्ठावान् होत नाहीं, तर करूनच निष्ठायुक्त होतो. [कृतिः तु एव–] यास्तव कृतीचीच विजिज्ञासा करावी. (नारद–) भगवन्, [कृतिं विजिज्ञासे–] मी कृतीची विजिज्ञासा करतों. १ (२१)

यदा वै सुखं लभतेऽथ करोति नासुखं लब्ध्वा करोति सुखमेव लब्ध्वा करोति सुखं त्वेव विजिज्ञासितव्यमिति सुखं भगवो विजिज्ञास इति१

इति सप्तमाध्यायस्य द्वाविंशः खण्डः ॥ २२

अन्वयार्थ—[यदा वै सुखं०–] जेव्हां सुख होतें तेव्हां कृति करतो. सुख मिळाल्यावांचून करीत नाहीं. तर सुख झालें म्हणजेच करतो. [सुखं तु एव विजिज्ञासितव्यं०–] यास्तव सुखालाच विशेषतः जाणण्याची इच्छा करावी. (नारद–) भगवन्, मी सुखाला जाणण्याची इच्छा करतों. १ (२२).

यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति भूमैव सुखं भूमा त्वेव विजिज्ञासितव्य इति भूमानं भगवो विजिज्ञास इति ॥ १

इति सप्तमाध्यायस्य त्रयोविंशः खण्डः ॥ २३

अन्वयार्थ—[यः वै भूमा तत् सुखं–] जो भूमा–निरतिशय महत्तत्त्वतेंच सुख, [अल्पे सुखं न अस्ति–] अल्पांत सुख नसतें. [भूमा एव सुखं–] भूमाच सुख आहे. [भूमा तु एव विजिज्ञासितव्यः इति–] भूमालाच विशेषतः जाणण्याची इच्छा करावी. [नारद–] हे भगवन्, [भूमानं विजिज्ञासे इति–] मी भूमाला जाणण्याची इच्छा करतों सु.ब्र.१.३.२.पृ.६९पहा.

यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छृणोति नान्यद्विजानाति स भूमाथ यत्रान्यत्पश्यत्यन्यच्छृणोत्यन्यद्विजानाति तदल्पं यो वै भूमा तदमृतमथ यदल्पं तन्मर्त्यꣳस भगवः कस्मिन्प्रतिष्ठित इति स्वे महिम्नि यदि वा न महिम्नीति ॥ १

अन्वयार्थ—[यत्र अन्यत् न पश्यति अन्यत् न शृणोति०—] ज्या भूमतत्त्वामध्यें अन्य करणानें अन्य द्रष्टव्य पहात नाहीं, तसेंच दुसरें श्रोतव्य ऐकत नाहीं, दुसरें विज्ञातव्य जाणत नाहीं [सः भूमा—] तो भूमा; [अथ यत्र अन्यत् पश्यति०—] पण ज्या अविद्यावस्थेंत अन्य द्रष्टा अन्य साधनानें अन्य द्रष्टव्य पाहतो, अन्य श्रोतव्य ऐकतो, दुसरें ज्ञेय जाणतो [तत् अल्पं—] तें अल्प. [यः भूमा तत् वै अमृतं—] जो भूमा तेंच अमृत, [अथ यत् अल्पं तत् मर्त्यं—] आणि जें अल्प तें मर्त्य. (नारद—) हे भगवन्, [सः कस्मिन् प्रतिष्ठितः—] तो भूमा कशामध्यें प्रतिष्ठित आहे? (सनत्कुमार—) [स्वे महिम्नि—] स्वतःच्या माहात्म्यांत, [यदि वा न महिम्नि इति—] किंवा वस्तुतः तो स्वमहिम्यांतहि प्रतिष्ठित नाहीं. याविषयी अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा.

गोअश्वमिह महिमेत्याचक्षते हस्तिहिरण्यं दासभार्यं क्षेत्राण्यायतनानीति नाहमेवं ब्रवीमि ब्रवीमीति होवाचान्यो ह्यन्यस्मिन्प्रतिष्ठित इति ॥ २

इति सप्तमाध्यायस्य चतुर्विंशः खण्डः ॥ २४

अन्वयार्थ—[गोअश्वं इह०—] गाई-बैल व अश्व हा येथें महिमा आहे, असें सांगतात. हत्ती व सोनें, दास व भार्या, क्षेत्रें, आयतनें हा महिमा आहे, असें म्हणतात. [अहं एवं न ब्रवीमि—] पण मी तसें म्हणत नाहीं. [हि अन्यः अन्यस्मिन् प्रतिष्ठितः इति—] कारण अन्य पदार्थ अन्य पदार्थांत प्रतिष्ठित असतो. ह्मणून [इति ब्रवीमि इति ह उवाच—] मी तर हें असें सांगतों, असें तो ह्मणाला. २ (२४)

स एवाधस्तात्स उपरिष्टात्स पश्चात्स पुरस्तात्स दक्षिणतः स उत्तरतः स एवेदꣳ सर्वमित्यथातोऽहंकारादेश एवाहमेवाधस्तादहमुपरिष्टादहं पश्चादहं पुरस्तादहं दक्षिणतोऽहमुत्तरतोऽहमेवेदꣳ सर्वमिति ॥ १

अन्वयार्थ—[सः एव अधस्तात्०—] तोच खालीं, तोच वर, तोच पाठीमागें, तोच उजव्या बाजूस, तोच डाव्या बाजूस, ह्म० दक्षिणतः व उत्तरतः [सः एव इदं सर्वं—] तोच हें सर्व आहे. [अथ अतः अहंकारादेशः—] आतां त्यानंतर अहंकारादेशच सांगितला जातो. [अहं एव अधस्तात्०—] मीच वर, मी पाठीमागें, मी पुढें, मी दक्षिणतः, मी उत्तरतः, मीच हें सर्व आहें. १.

अथात आत्मादेश एव आत्मैवाधस्तादात्मोपरिष्टादात्मा पश्चादात्मा पुरस्तादात्मा दक्षिणत आत्मोत्तरत आत्मैवेदꣳसर्वमिति स वा एष एवं पश्यन्नेवं मन्वान एवं विजानन्नात्मरतिरात्मक्रीड आत्ममिथुन आत्मानन्दः स स्वराड्भवति तस्य सर्वेषु लोकेषु कामचारो भवति । अथ येऽन्यथाऽतो विदुरन्यराजानस्ते क्षय्यलोका भवन्ति तेषाꣳसर्वेषु लोकेष्वकामचारो भवति ॥२

इति सप्तमाध्यायस्य पंचविंशः खण्डः ॥२५

अन्वयार्थ—[अथ अतः आत्मादेशः एव—] आतां आत्म्यानेंच भूमाचा आदेश—उपदेश केला जातो. [आत्मा एव अधस्तात्०—] आत्माच खालीं, आत्मा वर, आत्मा पश्चात्, आत्मा पुरस्तात्, आत्मा दक्षिणतः, आत्मा उत्तरतः, [आत्मा एव इदं सर्वं—] आत्माच हें सर्व आहे. [सः वै एषः एवं पश्यन्०—] तोच हा असें पाहणारा, असें मनन करणारा, असें विशेषतः जाणणारा, [आत्मरति०—] आत्मरति, आत्मक्रीड, आत्ममिथुन, आत्मानंद आहे. [सः स्वराड् भवति—] तो स्वराट् होतो. [तस्य सर्वेषु लोकेषु कामचारः भवति—] त्याचा सर्व लोकांमध्यें कामचार होतो. [अथ ये अतः अन्यथा विदुः ते अन्यराजानः क्षय्यलोकाः भवन्ति—] पण जे याहून अन्यथा—उलट जाणतात ते 'अन्यराजानः' होतात. म्ह० त्यांचा स्वामी त्यांच्याहून निराळा असतो. ते क्षय्यलोक होतात—त्यांचे लोक—फल क्षय पावणारें असतें. [तेषां सर्वेषु लोकेषु अकामचारः भवति—] त्यांचा सर्व लोकांमध्यें अकामचार होतो. —कामचार—यथेष्ट संचार होत नाहीं. सु. ब्र. पृ. २०५ पहा. २ (२५).

तस्य ह वा एतस्यैवं पश्यत एवं मन्वानस्यैवं विजानत आत्मतः प्राण आत्मत आशाऽऽत्मतः स्मर आत्मत आकाश आत्मतस्तेज आत्मत आप आत्मत आविर्भावतिरोभावावात्मतोऽन्नमात्मतो बलमात्मतो विज्ञानमात्मतो ध्यानमात्मतश्चित्तमात्मतःसंकल्प आत्मतो मन आत्मतो वागात्मतो नामाऽऽत्मतो मन्त्रा आत्मतः कर्माण्यात्मत एवेदꣳसर्वमिति

अन्वयार्थ—[तस्य ह वै एतस्य एवं पश्यतः—] त्या या असें पाहणाऱ्या, [एवं मन्वानस्य—] असें मनन करणाऱ्या [एवं विजानतः—] असें जाणणाऱ्या

विद्वानाच्या [आत्मतः प्राणः०—] आत्म्यापासूनच प्राण, आत्म्यापासून आशा, आत्म्यापासून स्मर, आत्म्यापासून आकाश, आत्म्यापासून तेज, आत्म्यापासून आप, आत्म्यापासून आविर्भाव व तिरोभाव, आत्म्यापासून अन्न, आत्म्यापासून बल, आत्म्यापासून विज्ञान, आत्म्यापासून ध्यान, आत्म्यापासून चित्त, आत्म्यापासून संकल्प, आत्म्यापासून मन, आत्म्यापासून वाक्, आत्म्यापासून नाम, आत्म्यापासून मंत्र, आत्म्यापासून कर्म व आत्म्यापासूनच हें सर्व होतें. १ —हें विद्याफल केवल ब्राह्मणोक्त नाही तर मंत्रोक्तहि आहे, असें सांगतात—

तदेष श्लोको न पश्यो मृत्युं पश्यति न रोगं नोत दुःखताꣳसर्वꣳह पश्यः पश्यति सर्वमाप्नोति सर्वश इति स एकधा भवति त्रिधा भवति पञ्चधा सप्तधा नवधा चैव पुनश्चैकादशः स्मृतः शतं च दश चैकश्च सहस्राणि च विꣳशतिराहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः स्मृतिलम्भे सर्वग्रन्थीनां विप्रमोक्षस्तस्मै मृदितकषायाय तमसस्पारं दर्शयति भगवान्सनत्कुमार-स्तꣳस्कन्द इत्याचक्षते तꣳस्कन्द इत्याचक्षते ॥ २

इति सप्तमाध्यायस्य षड्विंश खण्ड. ॥ २६

इति सप्तमोऽध्याय समाप्तः ॥ ७

अन्वयार्थ—[तत् एषः श्लोकः—] या अर्थी हा श्लोक—मंत्रहि आहे. [पश्यः मृत्युं न पश्यति—] पश्य म्ह० विद्वान् मृत्यूला पहात नाहीं, [रोगं न—] रोगाला पहात नाही, [दुःखतां उत न—] व दुःखतेलाहि पहात नाहीं. [पश्यः सर्वं ह पश्यति—] तो सर्वांस आत्मा पहातो. [सर्वशः सर्वं आप्नोति—] त्यामुळें सर्व प्रकारें सर्वांस प्राप्त होतो. तसाच [सः एकधा भवति०—] तो विद्वान् एकधा होतो, त्रिधा होतो, पंचधा, सप्तधा, नवधा होतो, तो एकादश म्हटलेला आहे. शत, दश, एक, सहस्र व वीस होतो. [आहारशुद्धौ सत्त्व-शुद्धिः—] आहारशुद्धि—विषयानुभवरूप विज्ञानाची शुद्धि झाली असतां सत्त्वाची—अन्तःकरणाची शुद्धि होते. [सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः—] सत्त्व-शुद्धि झाली असतां ध्रुवा स्मृति—अविस्मरण होतें. [स्मृतिलम्भे सर्वग्रंथीनां विप्रमोक्षः—] तशी अविच्छिन्न स्मृति झाली असतां सर्व हृदयग्रंथींचा सर्वथा

प्रमोक्ष—नाश होतो. [तस्मै मृदितकषायाय भगवान् सनत्कुमारः तमसस्पारं दर्शयति—] त्या राग-द्वेषादिदोषरहित नारदास भगवान् सनत्कुमार अविद्यातमाच्या पार असलेलें आत्मतत्त्व दाखविता झाला. [तं स्कंदः इति आचक्षते—] त्याला स्कंद असें म्हणतात. २ (२६).

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहातील
छांदोग्योपनिषदाचा सातवा अध्याय समाप्त झाला.

अथ अष्टमोऽध्यायः ।

—दिक्-देश-कालादिभेदशून्य ब्रह्म सत्, एकच, अद्वितीय आहे, आत्माच हें सर्व आहे, असें सहा व सात या दोन अध्यायांत सांगितलें. पण वस्तुतत्त्व दिग्देशादि भेदयुक्तच आहे अशा भावनेनें दृढ झालेली मंद-बुद्धि पुरुषांची बुद्धि विचारावांचून त्या परमार्थाकडे लागत नाहीं व ब्रह्म-साक्षात्कारावांचून पुरुषार्थसिद्धि होत नाहीं. यास्तव ब्रह्मसाक्षात्कारासाठीं हृदय-कमल हा देश सांगावा, तसेंच त्या मंदबुद्धि पुरुषांना वस्तुतः निर्गुण व केवल सत्प्रत्ययैकगम्य असलेलेंहि आत्मतत्त्व सगुण आहे, असें वाटतें. यास्तव त्याचे सत्यकामादि गुण सांगावे, तसेंच शब्दब्रह्मवेत्त्यांची स्त्र्यादिविषयांपासून आपो-आपच निवृत्ति जरी होत असली तरी अनेक जन्मातील विषयसेवनाच्या अभ्यासा-मुळें उत्पन्न झालेली जी विषयतृष्णा ती सहसा निवृत्त होत नाहीं, यास्तव तिच्या निवृत्तीसाठीं ब्रह्मचर्यादि विशेष साधनांचें विधान करावें, आणि आत्मै-कत्वज्ञानी स्वात्म्यामध्येंच जरी स्थित होत असले तरी ज्यांची बुद्धि गमन-कर्ता, गमन, गम्य प्रदेश या भावनांनीं भावित झालेली असते अशा हृदय-देश व गुण यांनीं विशिष्ट ब्रह्माची उपासना करणाऱ्या उपासकांची मूर्धन्य नाडीनें गति सांगावी, म्हणून हा आठवा अध्याय आरंभिला जातो—

ॐ अथ यदिदमस्मिन्ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म दहरोऽस्मिन्नन्तराकाशस्तस्मिन्यदन्तस्तदन्वेष्टव्यं तद्वाव विजिज्ञासितव्यमिति ॥ १

अन्वयार्थ—[अथ–] नंतर [यत् इदं अस्मिन् ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म–] हें जें या ब्रह्मपुरांत–शरीरांत सूक्ष्म कमलाकार स्थान आहे व [दहरः अस्मिन् अन्तराकाशः–] त्यांत जो सूक्ष्म आकाश आहे [तस्मिन् यत् अन्तः तत् अन्वेष्टव्यं–] त्याच्या आंत जें आहे त्याचें अन्वेषण करावें. [तत् वाव विजिज्ञासितव्यं–] त्याचीच विजिज्ञासा करावी. सु.ब्र १.३.५पृ.७६,८०,३५८पहा.१

तं चेद्ब्रूयुर्यदिदमस्मिन्ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म दहरोऽस्मिन्नन्तराकाशः किं तदत्र विद्यते यदन्वेष्टव्यं यद्वाव विजिज्ञासितव्यमिति स ब्रूयात् ॥ २

अन्वयार्थ—[तं चेत् ब्रूयुः–] त्या आचार्यास जर शिष्य म्हणतील कीं, [यत् इदं०–] हें जें या ब्रह्मपुरामध्यें अल्प कमलासारखें गृह आहे व त्यांत जो अल्प अन्तराकाश आहे, [अत्र किं तत् विद्यते–] त्यांत तें काय आहे, [यत् अन्वेष्टव्यं यत् वाव विजिज्ञासितव्यं इति–] की जें अन्वेषण करण्यास योग्य व जें विशेषतः जिज्ञासा करण्यास योग्य आहे ? तर त्याला [सः ब्रूयात्–] आचार्यानें असें म्हणावें. २.

यावान्वा अयमाकाशस्तावानेषोऽन्तर्हृदय आकाश उभे अस्मिन्द्यावापृथिवी अन्तरेव समाहिते उभावग्निश्च वायुश्च सूर्याचन्द्रमसावुभौ विद्युन्नक्षत्राणि यच्चास्येहास्ति यच्च नास्ति सर्वं तदस्मिन्समाहितमिति ॥ ३

अन्वयार्थ—[यावान् वै अयं आकाशः–] जेवढा हा भौतिक–बाह्य आकाश आहे [तावान् एषः अन्तर्हृदये आकाशः–] तेवढा हा अन्तर्हृदयांतील आकाश आहे. [द्यावा-पृथिवी उभे अस्मिन् अन्तरेव समाहिते–] द्यौ व पृथिवी हे दोन्ही लोक याच्या आंतच उत्तम प्रकारें स्थित आहेत. तसेच [उभौ अग्निः च वायुः च०–] अग्नि व वायु हे दोघे, सूर्य व चंद्र हे दोघे, विद्युत् व नक्षत्रें, त्याचप्रमाणें [यत् च अस्य इह अस्ति यत् च नास्ति०–] यांचें जें येथें आहे व जें यांचें नाहीं तें सर्व या ब्रह्माकाशांतच स्थित आहे. सु. ब्र. पृ. ७६ पहा. ३.

तं चेद्ब्रूयुरस्मिꣳश्चेदिदं ब्रह्मपुरे सर्वꣳसमाहितꣳसर्वाणि च भूतानि सर्वे च कामा यदैतज्जरा वाऽऽप्नोति प्रध्वꣳसते वा किं ततोऽतिशिष्यत इति ॥ ४

अन्वयार्थ—[तं चेत् ब्रूयुः—] त्या आचार्यास जर शिष्य म्हणाले कीं, [अस्मिन् ब्रह्मपुरे इदं सर्वं समाहितं चेत्—] या ब्रह्मपुरांत जर हें सर्व समाहित आहे, [सर्वाणि च भूतानि सर्वे च कामाः—] सर्व भूतें व सर्व काम त्यांतच स्थित आहेत तर [यत् एतत् जरा वा आप्नोति प्रध्वंसते वा—] जेव्हां या शरीरास जरा प्राप्त होते किंवा तें प्रध्वंस पावतें तेव्हां [ततः किं अवशिष्यते—] त्यांतून काय अवशिष्ट राहतें ? ४.

स ब्रूयान्नास्य जरयैतज्जीर्यति न वधेनास्य हन्यत एतत्सत्यं ब्रह्मपुरमस्मिन्कामाः समाहिता एष आत्माऽपहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पो यथा ह्येवेह प्रजा अन्वाविशन्ति यथानुशासनं यं यमन्तमभिकामा भवन्ति यं जनपदं यं क्षेत्रभागं तं तमेवोपजीवन्ति५

अन्वयार्थ—[सः ब्रूयात्—] त्यानें म्हणावें—[अस्य जरया एतत् न जीर्यति—] या देहाच्या जरेनें हें आकाशाख्य ब्रह्म जीर्ण होत नाहीं [अस्य वधेन न हन्यते—] या देहाच्या वधानें त्याचा वध होत नाहीं. [एतत् ब्रह्मपुरं सत्यं—] हें ब्रह्मरूप पुर सत्य आहे [अस्मिन् कामाः समाहिताः—] यांत काम समाहित आहेत. [एषः आत्मा०—] हा आत्मा आहे. तो धर्माधर्मशून्य, जराशून्य, मृत्युरहित, विशोक, अशनेच्छारहित, पिपासारहित, सत्यकाम, सत्यसंकल्प आहे. [यथा हि एव इह प्रजाः यथानुशासनं अन्वाविशन्ति—] ज्याप्रमाणें या लोकी प्रजा राजाच्या अनुशासनाप्रमाणें अनुवर्तन करितात, [यं यं अन्तं अभिकामाः भवन्ति—] त्या ज्या ज्या प्रत्यंत देशाची इच्छा करणाऱ्या होतात [यं जनपदं यं क्षेत्रभाग त तं एव उपजीवन्ति—] ज्या जनपदास—देशास, ज्या क्षेत्रभागास इच्छितात त्या त्यावर उपजीविका करितात. याचें अधिक सोपपत्तिक विवेचन भाष्यार्थांत पहा. ५.

तद्यथेह कर्मजितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्यजितो लोकः क्षीयते तद्य इहाऽऽत्मानमननुविद्य व्रजन्त्येताꣳश्च

सत्यान्कामाꣳस्तेषाꣳ सर्वेषु लोकेष्वकामचारो भवत्यथ य इहाऽऽत्मानमनुविद्य व्रजन्त्येताꣳश्च सत्यान्कामाꣳस्तेषाꣳ सर्वेषु लोकेषु कामचारो भवति ॥ ६ ॥

इत्यष्टमाध्यायस्य प्रथमः खण्डः ॥ १

अन्वयार्थ—[तत्—] त्याविषयीं दुसरा दृष्टान्त—[यथा इह कर्मजितः लोकः क्षीयते—] जसा येथें कर्मानें संपादन केलेला लोक—फल क्षय पावतें [एवं एव अमुत्र पुण्यजितः लोकः क्षीयते—] त्याप्रमाणेंच परलोकीं पुण्यार्जित लोक क्षय पावतो. [इह आत्मानं अननुविद्य ये व्रजन्ति—] या लोकी आत्म्याला न जाणतां जे या शरीरास सोडून जातात [च एतान् सत्यान् कामान्—] व जे या सत्य कामांस प्राप्त न होतां जातात [तेषां सर्वेषु लोकेषु अकामचारः भवति—] त्यांचा सर्व लोकांमध्यें कामचार—यथेष्टसंचार होत नाही. [अथ ये इह आत्मानं अनुविद्य व्रजन्ति—] पण जे येथें आत्म्याला जाणून शरीर सोडून जातात [च एतान् सत्यान् कामान्—] व जे या सत्यकामांस प्राप्त होऊन जातात [तेषां सर्वेषु लोकेषु कामचारः भवति—] त्याचा सर्व लोकांमध्यें कामसंचार होतो. ६(१)

स यदि पितृलोककामो भवति संकल्पादेवास्य पितरः समुत्तिष्ठन्ति तेन पितृलोकेन संपन्नो महीयते ॥ १

अन्वयार्थ—[सः यदि पितृलोककामः भवति—] तो जर पितृलोकाची कामना करणारा झाला तर [अस्य संकल्पात् एव पितरः समुत्तिष्ठन्ति—] याच्या नुस्त्या संकल्पामुळेंच याचे पितर त्याच्याशी संबंध पावतात. [तेन पितृलोकेन संपन्नः महीयते—] त्या पितृलोकभोगानें संपन्न झालेला तो पूज्य होतो. सु. ब्र. पृ. ४९७ पहा. १.

अथ यदि मातृलोककामो भवति संकल्पादेवास्य मातरः समुत्तिष्ठन्ति तेन मातृलोकेन संपन्नो महीयते ॥ २

अन्वयार्थ—नंतर तो जर मातृलोकाची इच्छा करणारा झाला तर केवल संकल्पानेंच याच्या माता—सुखहेतुभूत जन्माला कारण होणाऱ्या जननी त्याच्याशीं संबद्ध होतात. त्या मातृलोकानें संपन्न झालेला तो तेथें पूज्य होतो.२

अथ यदि भ्रातृलोककामो भवति संकल्पादेवास्य भ्रातरः समुत्तिष्ठन्ति तेन भ्रातृलोकेन संपन्नो महीयते ॥ ३

अन्वयार्थ—नंतर तो जर भ्रातृलोकाची इच्छा करणारा झाला तर याच्या नुस्त्या संकल्पानेंच भ्राते याच्याशीं संबद्ध होतात. त्या भ्रातृलोकानें संपन्न झालेला तो तेथें पूज्य होतो. ३.

अथ यदि स्वसृलोककामो भवति संकल्पादेवास्य स्वसारः समुत्तिष्ठन्ति तेन स्वसृलोकेन संपन्नो महीयते ॥ ४

अन्वयार्थ—नंतर तो जर स्वसृलोकाची—बहिणीच्या लोकाची इच्छा करणारा झाला तर त्याच्या संकल्पानेंच बहिणी याच्याशी संबद्ध होतात. त्या स्वसृलोकानें संपन्न झालेला तो तेथें पूज्य होतो. ४.

अथ यदि सखिलोककामो भवति संकल्पादेवास्य सखायः समुत्तिष्ठन्ति तेन सखिलोकेन संपन्नो महीयते ॥ ५

अन्वयार्थ—आतां तो जर सखिलोकाची इच्छा करणारा झाला तर नुस्त्या संकल्पानेंच याचे मित्र त्याच्याशीं संबद्ध होतात. त्या सखिलोकानें संपन्न झालेला तो तेथें पूज्य होतो. ५.

अथ यदि गन्धमाल्यलोककामो भवति संकल्पादेवास्य गन्धमाल्ये समुत्तिष्ठतस्तेन गन्धमाल्यलोकेन संपन्नो महीयते ॥ ६

अन्वयार्थ—तो जर गंध-माल्यलोककाम झाला तर नुस्त्या संकल्पानेंच याच्याशीं गंध-माल्य संबद्ध होतें. त्या गंध-माल्यलोकानें संपन्न झालेला तो पूज्य होतो. ६.

अथ यद्यन्नपानलोककामो भवति संकल्पादेवास्यान्नपाने समुत्तिष्ठतस्तेनान्नपानलोकेन संपन्नो महीयते ॥ ७

अन्वयार्थ—तो जर अन्न-पानलोककाम झाला तर याच्या नुस्त्या संकल्पानेंच याच्याशीं अन्न-पान संबद्ध होतें. त्या अन्न-पानलोकानें संपन्न झालेला तो पूज्य होतो. ७.

अथ यदि गीतवादित्रलोककामो भवति संकल्पादेवास्य गीतवादित्रे समुत्तिष्ठतस्तेन गीतवादित्रलोकेन संपन्नो महीयते ॥ ८

अन्वयार्थ—तो जर गीत-वादित्रलोककाम झाला तर याच्या नुस्त्या संकल्पानेंच गीत-वादित्र याच्याशी संबद्ध होतें. त्या गीतवादित्रलोकानें संपन्न झालेला तो पूज्य होतो. ८.

अथ यदि स्त्रीलोककामो भवति संकल्पादेवास्य स्त्रियः समुत्तिष्ठन्ति तेन स्त्रीलोकेन संपन्नो महीयते ॥ ९

अन्वयार्थ—आतां तो जर स्त्रीलोककाम झाला तर याच्या संकल्पानेंच याच्या स्त्रिया संबद्ध होतात. त्या स्त्रीलोकानें संपन्न झालेला तो पूज्य होतो. ९.

यं यमन्तमभिकामो भवति यं कामं कामयते सोऽस्य संकल्पादेव समुत्तिष्ठति तेन संपन्नो महीयते ॥ १०

इत्यष्टमाध्यायस्य द्वितीयः खण्डः ॥२

अन्वयार्थ—ज्या ज्या प्रदेशाची अभिकामना करणारा होतो व ज्या कामाची कामना करतो तो याच्या संकल्पानेंच याच्याशी संबद्ध होतो व त्यानें संपन्न झालेला तो पूजा केला जातो. १ (२)

—वर जसें सांगितलें आहे तशा आत्मध्यानरूप साधनाच्या अनुष्ठानाविषयीं साधकांचा उत्साह उत्पन्न करण्यासाठी श्रुति मोठ्या दयेनें म्हणते—

त इमे सत्याः कामा अनृतापिधानास्तेषाꣳ सत्यानाꣳसतामनृतमपिधानं यो यो ह्यस्येतः प्रैति न तमिह दर्शनाय लभते ॥ १

अन्वयार्थ—[ते इमे०—] ते हे सत्य काम—स्वात्मस्थ असल्यामुळें अवश्य प्राप्त होणारे काम अनृतापिधान आहेत. म्हणजे अनृत—मिथ्या हेंच त्यांचें आच्छादन आहे. [तेषां सत्यानां सतां अनृतं अपिधानं—] ते सत्य असूनहि अनृत हें त्यांचें अपिधान—आच्छादन आहे. [हि अस्य यः यः इतः प्रैति तं इह दर्शनाय न लभते—] कारण या प्राण्याचा जो जो कोणी आप्त येथून मरून जातो तो तो त्याला येथें पुनः पहावयास मिळत नाही. १.

अथ ये चास्येह जीवा ये च प्रेता यच्चान्यदिच्छन्न लभते सर्वं तदत्र गत्वा विन्दतेऽत्र ह्यस्यैते सत्याः कामा अनृतापिधानास्तद्यथाऽपि हिरण्यनिधिं निहितमक्षेत्रज्ञा उपर्युपरि संचरन्तो न विन्देयुरेवमेवेमाः सर्वाः प्रजा अहरहर्गच्छन्त्य एतं ब्रह्मलोकं न विन्दन्त्यनृतेन हि प्रत्यूढाः ॥ २

अन्वयार्थ—[अथ अस्य इह ये च जीवाः ये च प्रेताः—] पण याचे या लोकीं जे जिवंत असलेले व मेलेले पुत्रादिक [यत् च अन्यत् इच्छन् न लभते—] व जें दुसरें सर्व इच्छीत असून प्राप्त होत नाहीं [तत् सर्वं अत्र

गत्वा विन्दते–] तें सर्व ब्रह्मामध्यें जाऊन तो मिळवितो. [हि अत्र अस्य एते०–] कारण या हृदयाकाशांतच याचे हे सत्य काम अनृतापिधान होत्साते राहतात. [तत्–] त्याविषयीं दृष्टान्त–[यथा अपिनिहितं हिरण्यनिधिं–] ज्याप्रमाणें भूमींत पुरून ठेवलेल्या सुवर्णनिधीस [अक्षेत्रज्ञाः उपरि उपरि संचरन्तः न विन्देयुः–] त्याचें स्थान न जाणणारे त्यावरून वारंवार जात असले तरी त्यास प्राप्त होत नाहींत [एवं एव इमाः सर्वाः प्रजाः–] त्याप्रमाणेंच या सर्व प्रजा [अहरहः एतं ब्रह्मलोकं गच्छन्त्यः–] प्रत्यहीं या ब्रह्मलोकास जात असूनहि [न विंदन्ति–] त्यास जाणत नाहींत. [हि अनृतेन प्रत्यूढाः–] कारण त्या अनृतानें बाहेर आकृष्ट–आकर्षण केलेल्या आहेत. सु. ब्र. पृ. ७६ पहा. २.

स वा एष आत्मा हृदि तस्येतदेव निरुक्तꣳ हृद्ययमिति तस्माद्धृदयमहरहर्वा एवंवित्स्वर्गं लोकमेति ॥ ३

अन्वयार्थ—[सः वै एषः आत्मा हृदि–] तोच हा आत्मा हृदयांत आहे [तस्य हृदि अयं इति एतत् एव निरुक्तं–] त्याचें 'हृदि अयं-' असें हेंच निरुक्त –व्युत्पत्ति आहे. [तस्मात् हृदयं–] म्हणून तें 'हृदय' होय. [एवंविद् अहरहः वै स्वर्गं लोकं एति–] असें जाणणारा प्रत्यही स्वर्गास–हृदयस्थ ब्रह्मलोकास जातो. ३

अथ य एष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यत एष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति तस्य ह वा एतस्य ब्रह्मणो नाम सत्यमिति ॥ ४

अन्वयार्थ—[अथ यः एषः संप्रसादः–] आतां जो हा संप्रसाद म्ह० प्रकृत विद्वान् [अस्मात् शरीरात् समुत्थाय–] या शरीरापासून उत्थान पावून –'शरीरच मी' हा भाव टाकून देऊन [परं ज्योतिः उपसंपद्य–] परमात्मलक्षण ज्योतीस प्राप्त होऊन [स्वेन रूपेण अभिनिष्पद्यते–] आपल्या स्वरूपानें अभिनिष्पन्न होतो. [एषः आत्मा एतत् अमृतं अभयं एतत ब्रह्म इति ह उवाच–] हा आत्मा, हें अमृत, अभय, हें ब्रह्म असें तो आचार्य म्हणाला. [तस्य वै एतस्य ब्रह्मणः सत्यं इति नाम–] त्या या ब्रह्माचें सत्य असें नांव आहे. सु. ब्र. पृ. ७८ पहा. ४.

तानि ह वा एतानि त्रीण्यक्षराणि सतीयमिति तद्यत्सत्तदमृतमथ यत्ति तन्मर्त्यमथ यद्यं तेनोभे यच्छति यदनेनोभे यच्छति तस्माद्यमहरहर्वा एवंवित्स्वर्गं लोकमेति ॥ ५

हृद्यष्टमाध्यायस्य तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

अन्वयार्थ—[तानि ह वै एतानि०—] तीं ही तीनच अक्षरें आहेत. स, ति, यं, अशीं. [तत् यत् सत्०—] तें जें 'सत्' तें अमृत, जें 'ति' तें मर्त्य, जें 'यं' त्यानें दोहोंचें नियमन होतें, तें दोन्ही अक्षरांचें नियमन करतें. ज्याअर्थीं 'यं' या अक्षरानें दोहोंचें नियमन होतें त्याअर्थीं 'यं' असें जाणणारा प्रत्यहीं स्वर्गलोकास जातो. ५. (३)

अथ य आत्मा स सेतुर्विधृतिरेषां लोकानामसंभेदाय नैतꣳसेतुमहोरात्रे तरतो न जरा न मृत्युर्न शोको न सुकृतं न दुष्कृतꣳ सर्वे पाप्मानोऽतो निवर्तन्तेऽपहतपाप्मा ह्येष ब्रह्मलोकः ॥

अन्वयार्थ—[अथ यः आत्मा सः सेतुः०—] आतां जो आत्मा तो सेतु—जणुं काय सेतु आहे, [विधृतिः—] विधरण—विशेषतः धारण करणारा आहे. [एषां लोकानां असंभेदाय—] या भूतादिलोकांचा विनाश होऊं नये, म्हणून सेतु आहे. [एतं सेतुं अहोरात्रे न तरतः—] या सेतुरूप आत्म्यास अहोरात्र परिच्छिन्न करीत नाहींत. [न जरा०—] याला जरा प्राप्त होत नाही, मृत्यु नाही, शोक नाही, सुकृत नाहीं, दुष्कृत नाहीं. [सर्वे पाप्मानः अतः निवर्तन्ते—] वरील सर्व पापें यास प्राप्त न होतांच यापासून निवृत्त होतात. [हि एषः ब्रह्मलोकः अपहतपाप्मा—] कारण हा ब्रह्मलोक अपहतपाप्माच आहे. सु. ब्र. पृ. ७७, २९४, पहा. १

तस्माद्वा एतꣳसेतुं तीर्त्वाऽन्धः सन्ननन्धो भवति विद्धः सन्नविद्धो भवत्युपतापी सन्ननुपतापी भवति तस्माद्वा एतꣳसेतुं तीर्त्वाऽपि नक्तमहरेवाभिनिष्पद्यते सकृद्विभातो ह्येवैष ब्रह्मलोकः॥२

अन्वयार्थ—[तस्मात् वै एतं सेतुं तीर्त्वा—] तस्मात् या सेतूस तरून—प्राप्त होऊन [अन्धः सन् अनन्धः भवति—] अन्ध असूनहि अनन्ध होतो. [विद्धः सन् अविद्धः—] विद्ध असूनहि अविद्ध होतो. [उपतापी सन् अनुपतापी०—] रोगादि उपतापानें युक्त असूनहि अनुपतापी होतो. [तस्मात् वै एतं सेतुं तीर्त्वा—] त्यामुळेंच या सेतूस प्राप्त होऊन [नक्तं अपि अहर् एव अभिनिष्पद्यते—] अंधकारयुक्त रात्रहि दिवसच होते. [हि एषः ब्रह्मलोकः सकृद्विभातः एव—] कारण हा ब्रह्मलोक सकृद्विभात—सदा प्रकाशरूप आहे. २

तद्य एवैतं ब्रह्मलोकं ब्रह्मचर्येणानुविन्दन्ति तेषामेवैष ब्रह्मलोकस्तेषाꣳसर्वेषु लोकेषु कामचारो भवति ॥ ३

इत्यष्टमाध्यायस्य चतुर्थः खण्डः ॥४

अन्वयार्थ—[तत् ये एव एतं ब्रह्मलोकं ब्रह्मचर्येण अनुविन्दन्ति–] असें असतां जे या ब्रह्मलोकास ब्रह्मचर्याच्या योगानें शास्त्र व आचार्य यांच्या उपदेशानुसार साक्षात् जाणतात [तेषां एव एषः०–] त्यांचाच हा ब्रह्मलोक आहे. [तेषां सर्वेषु लोकेषु कामचारः भवति–] त्यांचा सर्व लोकांमध्यें कामचार होतो. ३ —सेतुत्वादि गुणांनीं ज्याची वर स्तुति केली आहे त्या आत्म्याच्या प्राप्तीसाठीं शमादिकांहून भिन्न व ज्ञानसहकारी असें ब्रह्मचर्य हें साधन सांगावें म्हणून श्रुति म्हणते–

अथ यद्यज्ञ इत्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तद्ब्रह्मचर्येण ह्येव यो ज्ञाता तं विन्दतेऽथ यदिष्टमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तद्ब्रह्मचर्येण ह्येवेष्ट्वाऽऽत्मानमनुविन्दते ॥ १

अन्वयार्थ—[अथ–] नंतर लोकांत [यत् यज्ञः इति आचक्षते तत् ब्रह्मचर्यं एव–] यज्ञ परमपुरुषार्थाचें साधन आहे म्हणून जें सांगतात तें ब्रह्मचर्यच आहे. [हि यः ज्ञाता सः ब्रह्मचर्येण एव तं विंदते–] कारण जो ज्ञाता तो ब्रह्मचर्यानेंच ब्रह्मलोकास प्राप्त होतो. [अथ यत् इष्टं०–] इष्ट म्हणून ज्याला म्हणतात तें ब्रह्मचर्यच. [हि ब्रह्मचर्येण एव इष्ट्वा आत्मानं अनुविंदते–] कारण ब्रह्मचर्यानेंच ईश्वराची पूजा करून आत्म्याला प्राप्त होतो. १

अथ यत्सत्त्रायणमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तद्ब्रह्मचर्येण ह्येव सत आत्मनस्त्राणं विन्दतेऽथ यन्मौनमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तद्ब्रह्मचर्येण ह्येवाऽऽत्मानमनुविद्य मनुते ॥ २

अन्वयार्थ—[अथ यत्०–] नंतर जें सत्त्रायण–ज्याचे यजमान अनेक आहेत असें वैदिक कर्म–म्हणून ह्मणतात तें ब्रह्मचर्यच. [हि ब्रह्मचर्येण एव सतः आत्मनः त्राणं विन्दते–] कारण ब्रह्मचर्यानेंच सत्–आत्म्यापासून त्राण प्राप्त होतें. [अथ यत्०–] आतां जें मौन म्हणून ह्मणतात तें ब्रह्मचर्यच आहे. [हि ब्रह्मचर्येण एव आत्मानं अनुविद्य मनुते–] ब्रह्मचर्यानेंच आत्म्याला जाणून त्याचें मनन करतो. २

अथ यदनाशकायनमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तदेष ह्यात्मा न नश्यति यं ब्रह्मचर्येणानुविन्दतेऽथ यदरण्यायनमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तत्तदरश्च ह वै ण्यश्चार्णवौ ब्रह्मलोके तृतीयस्यामितो दिवि तदैरंमदीयꣳ सरस्तदश्वत्थः सोमसवनस्तदपराजिता पूर्ब्रह्मणः प्रभुविमितꣳ हिरण्मयम् ॥ ३

अन्वयार्थ—[अथ यत्०—] आतां जें अनाशकायन—उपवासपरायणत्व म्हणून म्हणतात तें ब्रह्मचर्यच (त्याचा ब्रह्मचर्यांतच अंतर्भाव होतो.) [यं ब्रह्मचर्येण अनुविन्दते एषः हि आत्मा न नश्यति—] ज्या आत्म्याला ब्रह्मचर्यानें प्राप्त होतो तो हा आत्मा नाश पावत नाहीं. [यत् अरण्यायनं०—] जें अरण्यायन म्हणून म्हणतात तें ब्रह्मचर्यच. [तत् ब्रह्मलोके अरः च ह वै ण्यः च अर्णवौ—] तेथें ब्रह्मलोकांत प्रसिद्ध ' अर ' व ' ण्य ' असे दोन समुद्र आहेत. [इतः तृतीयस्यां दिवि तत् ऐरंमदीयं सरः—] या लोकापासून तिसऱ्या द्युलोकांत ' ऐरंमदीयं' सरोवर आहे. [तत् सोमसवनः अश्वत्थः—] तेथें 'सोमसवन' या नांवाचा अश्वत्थ वृक्ष आहे. [तत् ब्रह्मणः अपराजिता पूः—] तेथें ब्रह्माची अपराजिता पुरी आहे. [प्रभुविमितं हिरण्मयम्—] प्रभूनें विशेषतः निर्मिलेला सोन्याचा मंडप आहे. सु. ब्र. पृ. ४०९ पहा. ३.

तद्य एवैतावरं च ण्यं चार्णवौ ब्रह्मलोके ब्रह्मचर्येणानुविन्दन्ति तेषामेवैष ब्रह्मलोकस्तेषाꣳ सर्वेषु लोकेषु कामचारो भवति ॥ ४

इत्यष्टमाध्यायस्य पचमः खण्डः ॥ ५

अन्वयार्थ—[तत् ब्रह्मलोके एतौ अरं च ण्यं च अर्णवौ ये ब्रह्मचर्येण एव अनुविन्दन्ति—] त्या ब्रह्मलोकांतील हे दोन 'अर' व 'ण्य' या नांवाचे समुद्र जे ब्रह्मचर्यानें संपादन करितात [तेषां एव एषः ब्रह्मलोकः—] त्यांचाच हा ब्रह्मलोक आहे. [तेषां सर्वेषु लोकेषु कामचारः भवति—] त्यांचा सर्व लोकांमध्यें कामचार होतो. अधिक स्पष्टीकरण भाष्यार्थांत पहा. ४ (५)

—जो ब्रह्मचर्यादि साधनांनीं संपन्न आहे व ज्यानें बाह्य विषयाविषयींची मिथ्या तृष्णा सोडली आहे असा होत्साता हृदयकमलांतील सत्यकामत्वादि पूर्वोक्त गुणविशिष्ट ब्रह्माची उपासना करतो त्याची मूर्धन्य नाडीनें गति सांगावी म्हणून नाडीखंड आरंभिला जातो—

अथ या एता हृदयस्य नाड्यस्ताः पिङ्गलस्याणिम्नस्तिष्ठन्ति शुक्लस्य नीलस्य पीतस्य लोहितस्येत्यसौ वा आदित्यः पिङ्गल एष शुक्ल एष नील एष पीत एष लोहितः ॥ १

अन्वयार्थ—[अथ याः एताः०—] आतां ज्या या हृदयाच्या नाड्या [ताः पिंगलस्य०—] त्या पिंगटवर्ण सूक्ष्म रसानें पूर्ण अशा असतात, तशाच [शुक्लस्य०—] शुक्ल, नील, पीत, लोहित रसांनीं पूर्ण—तदाकार होऊन राहतात. [असौ वै आदित्यः०—] हाच आदित्य पिंगल, हा शुक्ल, हा नील, हा पीत व हा लोहित आहे. १.—त्या आदित्याचा शरीरांतील नाड्यांशीं संबंध कसा होतो, तें श्रुति सांगते—

तद्यथा महापथ आतत उभौ ग्रामौ गच्छतीमं चामुं चैवमेवैता आदित्यस्य रश्मय उभौ लोकौ गच्छन्तीमं चामुं चामुष्मादादित्यात्प्रतायन्ते ता आसु नाडीषु सृप्ता आभ्यो नाडीभ्यः प्रतायन्ते तेऽमुष्मिन्नादित्ये सृप्ताः ॥ २

अन्वयार्थ—[तत्—] त्याविषयी दृष्टान्त—[यथा महापथः आततः उभौ ग्रामौ गच्छति०—] ज्याप्रमाणें व्यवहारांत एखादा व्याप्त—विस्तीर्ण मार्ग दोन ग्रामांस जातो, या समीप असलेल्या व त्या दूरच्या अशा दोन्ही ग्रामांत प्रविष्ट झालेला असतो [एवं एव एताः आदित्यस्य०—] त्याप्रमाणेंच हे आदित्याचे किरण दोन्ही लोकांस जातात. या लोकास व त्या लोकास. [अमुष्मात् आदित्यात् प्रतायन्ते—] ते त्या आदित्यलोकापासून संतत—अविच्छिन्न पसरलेले असतात [ताः आसु०—] ते या नाड्यांमध्यें गेलेले असतात, [आभ्यः नाडीभ्यः प्रतायन्ते—] आणि जे या नाड्यांपासून निघतात [ते अमुष्मिन् आदित्ये सृप्ताः—] ते त्या आदित्यांत गेलेले आहेत. सु. ब्र. पृ. ४७२ पहा. २.

तद्यत्रैतत्सुप्तः समस्तः संप्रसन्नः स्वप्नं न विजानात्यासु तदा नाडीषु सृप्तो भवति तं न कश्चन पाप्मा स्पृशति तेजसा हि तदा संपन्नो भवति॥३

अन्वयार्थ—[तत् यत्र एतत् सुप्तः समस्तः संप्रसन्नः स्वप्नं न विजानाति—] असें असतां ज्यावेळीं हा निजलेला—चांगल्याप्रकारें लीन झालेला जीव संप्रसन्न होतो व त्यामुळेंच स्वप्नास जाणत नाहीं [तदा आसु नाडीषु सृप्तः भवति—] तेव्हां तो या नाड्यांमध्यें गेलेला असा होतो. [तं कश्चन पाप्मा न स्पृशति—]

त्याला कोणताहि पाप्मा—धर्माधर्मादि स्पर्श करूं शकत नाहीं. [तदा तेजसा हि संपन्नः भवति—] तो त्यावेळीं सौर तेजानेंच व्याप्त होतो. ३.

अथ यत्रैतदबलिमानं नीतो भवति तमभित आसीना आहुर्जानासि मां जानासि मामिति स यावदस्माच्छरीरादनुत्क्रान्तो भवति तावज्जानाति४

अन्वयार्थ—[अथ यत्र एतत् अबलिमानं नीतः भवति—] नंतर ज्यावेळीं शरीराच्या अबलभावास—कृशतेस हा प्राप्त होतो—मुमूर्षु होतो [तं अभितः आसीनाः जानासि मां जानासि मां इति आहुः—] तेव्हां त्याच्या सभोंवार बसलेले आप्त 'मला जाणतोस का, मला जाणतोस का?' असें विचारतात. [सः यावत् अस्मात् शरीरात् अनुत्क्रान्तः भवति—] तो जोंवर या शरीरांतून उत्क्रान्त झालेला नसतो [तावत् जानाति—] तोंवर जाणतो. ४.

अथ यत्रैतदस्माच्छरीरादुत्क्रामत्यथैतैरेव रश्मिभिरूर्ध्वमाक्रमते स ओमिति वा होद्वा मीयते स यावत्क्षिप्येन्मनस्तावदादित्यं गच्छत्येतद्वै खलु लोकद्वारं विदुषां प्रपदनं निरोधोऽविदुषाम् ॥ ५

अन्वयार्थ—[अथ यत्र एतत् अस्मात् शरीरात उत्क्रामति—] पण प्रारब्ध कर्म क्षीण होतांच ज्यावेळी या शरीरापासून उत्क्रमण होईल अशा प्रकारें तो उत्क्रमण करतो [अथ एतैः एव रश्मिभिः ऊर्ध्वं आक्रमते—] तेव्हां याच पूर्वोक्त रश्मींनीं वर आक्रमण करतो. [सः ओं इति वा ह उत् वा मीयते—] तो 'ओं' असें म्हणून आत्म्याचें ध्यान करीत ऊर्ध्वलोकीं किंवा अधोलोकीं जातो. [सः यावत् क्षिप्येत् मनः तावत् आदित्यं गच्छति—] तो जेवढ्या कालांत मन जातें तेवढ्या कालांत आदित्यास जाऊन पोंचतो. [एतत् वै खलु लोकद्वारं—] खरोखर आदित्य हें लोकद्वार आहे. [विदुषां प्रपदनं—] विद्वानांचें ब्रह्मलोकप्राप्तिद्वार व [अविदुषां निरोधः—] अविद्वानांचा निरोध आहे. ५.

तदेष श्लोकः । शतं चैका च हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनिःसृतैका । तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवन्त्युत्क्रमणे भवन्ति ॥ ६

इत्यष्टमाध्यायस्य षष्ठः खण्डः ॥६

अन्वयार्थ—[तत् एषः श्लोकः—] त्याअर्थीं हा श्लोक आहे. [हृदयस्य शतं च एका च नाड्यः—] हृदयाच्या शंभर व एक अशा नाड्या आहेत.

[तासां एका मूर्धानं अभिनिःसृता–] त्यांतील एक मूर्धप्रदेशाकडे निघाली आहे. [तया ऊर्ध्वं आयन् अमृतत्वं इति–] त्या नाडीनें वर जाणारा अमृतत्वास प्राप्त होतो. [विष्वङ् अन्याः उत्क्रमणे भवन्ति–] बाकीच्या तिरकस पसरलेल्या नाड्या उत्क्रमणासच कारण होतात. संसारगमनद्वारभूत होतात. सु. ब्र. पृ. ४७० पहा. ६ (६)

–दहरविद्येंत (पृ. ४७२) ' एषः संप्रसादः० ' इत्यादि वाक्यांत सांगितलेला संप्रसाद कोण ? त्याचें ज्ञान कसें होतें ? तो स्वरूपानें अभिनिष्पन्न कसा होतो ? ज्या स्वरूपानें निष्पन्न होतो त्या आत्म्याचें लक्षण काय आहे ? संप्रसादाचें देहसंबंधरहित स्वरूप कसें आहे, इत्यादि सांगण्यासाठीं या पुढील ग्रंथ आरंभिला जातो. येथें जी आख्यायिका आहे ती विद्याग्रहण, विद्याप्रदान, ब्रह्मचर्यादिविधि इत्यादि प्रदर्शित करण्यासाठीं व विद्येच्या स्तुतीसाठीं आहे.

य आत्माऽपहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ह प्रजापतिरुवाच ॥ १

अन्वयार्थ—[यः आत्मा०–] जो आत्मा अपहतपाप्मा, जरारहित, मृत्युरहित, विशोक, अशनायारहित, पिपासाशून्य, सत्यकाम, सत्यसंकल्प, [सः अन्वेष्टव्यः–] त्याचें अन्वेषण करावें, [सः विजिज्ञासितव्यः–] त्याची विशेषतः जिज्ञासा करावी. [सः सर्वान् लोकान् आप्नोति सर्वान् कामान् च आप्नोति–] तो सर्व लोकांस प्राप्त होतो व सर्व कामांस प्राप्त होतो. (तो कोण ?) [यः तं आत्मानं अनुविद्य विजानाति–] जो त्या आत्म्याला शास्त्र व आचार्य यांच्या उपदेशानुसार शोध करून जाणतो–मननपूर्वक साक्षात्कार संपादन करतो तो सर्व लोकांस व कामांस प्राप्त होतो, [इति ह प्रजापतिः उवाच–] असें प्रजापति ह्मणाला. सु· ब्र. पृ. ८१, ९८, ४९६ पहा. १.

तद्धोभये देवासुरा अनुबुबुधिरे ते होचुर्हन्त तमात्मानमन्विच्छामो यमात्मानमन्विष्य सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामानितीन्द्रो हैव देवानामभिप्रवव्राज विरोचनोऽसुराणां तौ हासंविदानावेव समित्पाणी प्रजापतिसकाशमाजग्मतुः ॥ २

अन्वयार्थ—[तत् ह उभये देवासुराः अनुबुबुधिरे—] तें प्रजापतीचें वाक्य देव व असुर असे दोघे परंपरेनें कानावर आलें असतां जाणते झाले. [ते ह ऊचुः हन्त तं आत्मानं अन्विच्छामः यं०—]ते म्हणाले " ज्या आत्म्याला जाणून पुरुष सर्व लोकांस प्राप्त होतो व सर्व कामांस प्राप्त होतो त्या आत्म्याला आम्ही आतां जाणतों, " [इति देवानां इंद्रः असुराणां विरोचनः तौ ह असंविदानौ एव—] असें म्हणून देवांचा राजा इंद्र व असुरांचा विरोचन—फलाविषयीं परस्पर ईर्ष्या प्रदर्शित करणारे असेच ते दोघे [समित्पाणी प्रजापतिसकाशं आजग्मतुः—] हातांत समिधांचा भार घेऊन प्रजापतीपाशीं आले. २

तौ ह द्वात्रिंशतं वर्षाणि ब्रह्मचर्यमूषतुस्तौ ह प्रजापतिरुवाच किमिच्छन्ताववस्तामिति तौ होचतुर्य आत्माऽपहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोको विजिघत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसंकल्पः सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च कामान् यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति भगवतो वचो वेदयन्ते तमिच्छन्तावावास्तामिति ॥ ३

अन्वयार्थ—[तौ ह द्वात्रिंशतं वर्षाणि ब्रह्मचर्यं ऊषतुः—]ते दोघे बत्तीस वर्षें शुश्रूषा करीत ब्रह्मचर्यवास करते झाले.[तौ ह प्रजापतिः उवाच—] तेव्हां त्या दोघांस प्रजापति म्हणाला—[किं इच्छन्तौ अवास्तं इति—]'तुम्ही कशाच्या इच्छेनें राहिलां आहां' [तौ ह ऊचतुः—] तेव्हां ते दोघे म्हणाले—[यः आत्मा०—] जो पापरहित, विजर, विमृत्यु, विशोक, अशनायारहित, पिपासाशून्य सत्यकाम व सत्यसंकल्प आत्मा त्याचें अन्वेषण करावें, त्याची विजिज्ञासा करावी. जो त्या आत्म्यास शास्त्राचार्योपदेशानुसार सामान्यतः जाणून साक्षात् जाणतो तो सर्व लोकांस प्राप्त होतो व सर्व कामांस प्राप्त होतो. [इति भगवतः वचः वेदयन्ते—] असें आपलें वचन शिष्ट सांगतात. [तं इच्छन्तौ अवास्तं इति—] त्याची इच्छा करणाऱ्या आम्हीं येथें ब्रह्मचर्यवास केला आहे. ३.—याप्रमाणें ते दोघे तपस्वी, ज्यांनीं आपले दोष प्रक्षालित केले आहेत असे व त्यामुळेंच योग्य आहेत, असें जाणून—

तौ ह प्रजापतिरुवाच य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यत एष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेत्यथ योऽयं भगवोऽप्सु परिख्यायते यश्चायमादर्शे कतम एष इत्येष उ एवैषु परिख्यायत इति होवाच ॥ ४

इत्यष्टमाध्यायस्य सप्तमः खण्डः ॥ ७

अन्वयार्थ—[तौ ह प्रजापतिः उवाच–] त्या दोघांस प्रजापति म्हणाला [यः एषः अक्षिणि पुरुषः दृश्यते एषः आत्मा इति ह उवाच–] 'हा जो अक्षीमध्यें–नेत्रांत पुरुष दिसतो, हा आत्मा आहे,' असें तो म्हणाला. [एतत् अमृतं अभयं एतत् ब्रह्म इति–]' हें अमृत, अभय, हें ब्रह्म ' असें तो बोलला. [अथ भगवः यः अयं अप्सु परिख्यायते–] नंतर हे भगवन्, जो हा आपांमध्यें परितः ज्ञात होतो, [च यः अयं आदर्शे–] व जो हा आरशांत प्रतिबिंबाकारानें दिसतो [कतमः एषः इति–] त्यांतील आत्मा कोणता ? [एषः उ एव एषु परिख्यायते इति ह उवाच–] तेव्हां प्रजापति म्हणाला–मीं जो चक्षूंतील पुरुष सांगितला तो हाच या सर्वांमध्यें सर्वतः प्रतीत होतो. सु. ब्र. पृ. ८०.

उदशराव आत्मानमवेक्ष्य यदात्मनो न विजानीथस्तन्मे प्रब्रूतमिति तौ होदशरावेऽवेक्षांचक्राते तौ ह प्रजापतिरुवाच किं पश्यथ इति तौ होचतुः सर्वमेवेदमावां भगव आत्मानं पश्याव आ लोमभ्य आ नखेभ्यः प्रतिरूपमिति ॥१

अन्वयार्थ—[उदशरावे आत्मानं अवेक्ष्य–] उदकपूर्ण शरावादिकांत–मृत्पात्रांत आत्म्याला पाहून [यत् आत्मनः न विजानीथः तत् मे प्रब्रूतं इति–] त्यांत 'आत्म्याचें जें तुम्हांला कळणार नाहीं तें मला सांगा,' असें प्रजापति म्हणाला. [तौ ह उदशरावे अवेक्षांचक्राते–] तेव्हां ते दोघे उदकपूर्ण पात्रांत पाहते झाले. [तौ ह प्रजापतिः किं पश्यथः इति उवाच–] त्या दोघांस प्रजापति " त्यांत काय पहात आहां ? " असें म्हणाला. [तौ ह ऊचतुः–] त्यावर ते दोघे [भगवः आवां इदं सर्वं आत्मानं एव पश्यावः–] हे भगवन्, आम्हीं दोघे हें सर्व आपल्यालाच पहात आहों. [आलोमभ्यः आनखेभ्यः प्रतिरूपं इति–] लोम व नखें यांपर्यंत प्रतिरूप–जसेच्या तसे आपणास पहात आहों.'सु.ब्र.पृ.२१६पहा.

तौ ह प्रजापतिरुवाच साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ भूत्वोदशरावेऽवेक्षेथामिति तौ ह साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ भूत्वोदशरावेऽवेक्षांचक्राते तौ ह प्रजापतिरुवाच किं पश्यथ इति ॥ २

अन्वयार्थ—[तौ ह०—] त्या दोघांस प्रजापति म्हणाला—[**साधु अलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ भूत्वा**—] उत्तमप्रकारें अलंकृत झालेले असे, उत्तम वस्त्रें परिधान केलेले, नखें, केंस वगैरे काढलेले असे होत्साते पुनः [**उदशरावे अवेक्षेथां**—] उदकशरावांत पहा. [तौ ह साधु-अलंकृतौ०—] तेव्हां ते दोघे उत्तम प्रकारें अलंकृत होऊन, उत्तम वस्त्रें परिधान करून व लोम, नखें इत्यादि काढून (म्ह० श्मश्रु करून) उदकपात्रांत आपल्याला पहाते झाले. [तौ ह०—] त्यांना प्रजापति ' काय पहात आहां ? त्यांत तुम्हांला काय दिसतें ' असें म्हणाला २.

तौ होचतुर्यथैवेदमावां भगवः साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतौ स्व एवमेवेमौ भगवः साध्वलंकृतौ सुवसनौ परिष्कृतावित्येष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति तौ ह शान्तहृदयौ प्रवव्रजतुः ॥ ३

अन्वयार्थ—[तौ ह ऊचतुः—] ते दोघे म्हणाले—[भगवः यथा एव आवां साधु अलंकृतौ०—] "हे भगवन्, जसे आम्ही उत्तम अलंकृत, उत्तम वस्त्रें नेसलेले, परिष्कृत आहों, [एवं एव इमौ०—] त्याचप्रमाणें हे भगवन्, हे दोघे साधु अलंकृत, सुंदर वस्त्रें परिधान केलेले व परिष्कृत आहेत." तेव्हां प्रजापति [एषः आत्मा एतत् अमृतं अभयं एतत् ब्रह्म इति ह उवाच—] 'हा आत्मा, हें अमृत, हें अभय, हें ब्रह्म, ' असें म्हणाला. [तौ ह शान्तहृदयौ प्रवव्रजतुः—] तेव्हां ते दोघेहि शांतचित्त होत्साते तेथून गेले. ३.—याप्रमाणें गेलेले ते दोघे राजे विषयासक्त झाल्यामुळें आत्म्याला विसरतील असें समजून प्रत्यक्ष वचनानें त्यांचें मन दुखवूं नये म्हणून ते गेल्यावर पूर्व वाक्याप्रमाणेंच हेंहि माझें वाक्य त्यांच्या कानावर जावें, या आशयानें—

तौ हान्वीक्ष्य प्रजापतिरुवाचानुपलभ्याऽऽत्मानमननुविद्य व्रजतो यतर एतदुपनिषदो भविष्यन्ति देवा वाऽसुरा वा ते पराभविष्यन्तीति स ह शान्तहृदय एव विरोचनोऽसुराञ्जगाम तेभ्यो हैतामुपनिषदं प्रोवाचाऽऽत्मैवेह महय्य आत्मा परिचर्य आत्मानमेवेह महयन्नात्मानं परिचरन्नुभौ लोकाववाप्नोतीमं चामुं चेति ॥ ४

अन्वयार्थ—[तौ ह अन्वीक्ष्य प्रजापतिः उवाच—] ते दोघे दूर गेले आहेत असें पाहून प्रजापति म्हणाला—[आत्मानं अनुपलभ्य अननुविद्य व्रजतः—] " आत्म्याला न जाणतां—त्याचा साक्षात्कार न करितां—त्याला स्वात्मप्रत्यक्ष न करितां हे दोघे जात आहेत. यास्तव [देवाः वा असुराः वा यतरे एतत् उपनिषदः भविष्यन्ति—] देव किंवा असुर यांतील जे कोणी ' एतदुपनिषदः-' यांचा जसा निश्चय आहे तशा विपरीत ग्रहानें युक्त होतील, [ते पराभविष्यन्ति इति—] त्यांचा पराभव होईल " [सः ह विरोचनः शान्तहृदयः एव असुरान् जगाम—] तो विरोचन शांतचित्तच—स्वतःला कृतार्थ मानूनच असुरांप्रत गेला व [तेभ्यः ह एतां उपनिषदं प्रोवाच—] त्यांना ही अशी आत्मविद्या सांगता झाला. [इह आत्मा एव महय्यः—] या लोकी आत्माच—देहच ' महय्यः'—पूजनीय आहे. [आत्मा परिचर्यः—] आत्माच परिचरणीय आहे. [इह आत्मानं एव महयन्०—] या लोकीं शरीररूपी आत्म्याचीच पूजा व परिचर्या करणारा [उभौ लोकौ अवाप्नोति—] दोन्ही लोकांस प्राप्त होतो. [इमं च अमुं च—] या लोकास व परलोकास. ४.—हा विरोचनाचा संप्रदाय अद्यापि चालू आहे—

तस्मादप्यद्येहाददानमश्रद्दधानमयजमानमाहुरासुरो बतेत्य-
सुराणाꣳह्येषोपनिषत्प्रेतस्य शरीरं भिक्षया वसनेनालंकारे-
णेति सꣳस्कुर्वन्त्येतेन ह्यमुं लोकं जेष्यन्तो मन्यन्ते ॥ ५

इत्यष्टमाध्यायस्याष्टमः खण्डः ॥ ८

अन्वयार्थ—[तस्मात् अद्य अपि इह अददानं अश्रद्दधानं०—] तस्मात् अद्यापि इह लोकीं दान न देणाऱ्या, श्रद्धा न ठेवणाऱ्या, यजन न करणाऱ्या पुरुषास [आसुरः बत इति आहुः—] ' अेरेरे हा असुरस्वभाव आहे ' असें शिष्ट खेदानें म्हणतात. [हि एषा असुराणां उपनिषद्—] कारण ही असुरांची उपनिषद्—ब्रह्मविद्या—आत्मविद्या आहे. [प्रेतस्य शरीरं भिक्षया वसनेन अलंकारेण इति संस्कुर्वन्ति—] ते मेलेल्याच्या शरीरास गंध-पुष्प-अन्न इत्यादि भिक्षेनें, वस्त्रानें, अलंकारानें संस्कार करितात. [एतेन हि अमुं लोकं जेष्यन्तः मन्यन्ते—] या संस्कारानें आम्ही परलोकास जिंकणारे आहों, असें मानतात. ५ (८)

अथ हेन्द्रोऽप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श यथैव खल्वयमस्मिञ्छरीरे
साध्वलंकृते साध्वलंकृतो भवति सुवसने सुवसनः परिष्कृते परि-

ष्कृत एवमेवायमस्मिन्नन्धेऽन्धो भवति स्रामे स्रामः परिवृक्णे परिवृक्णोऽस्यैव शरीरस्य नाशमन्वेष नश्यति ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह इन्द्रः देवान् अप्राप्य एव—] पण इंद्र देवांपर्यंत जाऊन न पोंचतांच [एतत् भयं ददर्श—] हें भय पाहता झाला. [यथा एव खलु—] जसें—[अस्मिन् शरीरे साधु-अलंकृते अयं साधु-अलंकृतः भवति—] हें शरीर साधु अलंकृत केलें असतां छायात्माहि चांगला अलंकृत होतो, [सुवसने सुवसनः—] शरीराला चांगलें वस्त्र गुंडाळलें असतां हा छायात्माहि सुवसन होतो, [परिष्कृते परिष्कृतः—] त्याला परिष्कृत केलें असतां छायात्माहि परिष्कृत होतो, [एवं एव अयं अस्मिन् अन्धे अन्धः भवति—]याच न्यायानें हा देह अंध झाला असतां छायात्मा अंध होतो. [स्रामे स्रामः—] देह स्राम झाला असतां तो स्राम होतो. (स्राम ह्म० ज्याच्या नेत्रांतून किंवा नाकांतून सदा स्राव होत आहे असा) [परिवृक्णे परिवृक्णः—] देह परिवृक्ण—हात किंवा पाय तुटलेला असा झाला असतां हा छायात्माहि परिवृक्ण होतो. [अस्य एव शरीरस्य नाशं अनु एषः नश्यति—] याच शरीराच्या नाशाच्या मागोमाग हा छायात्माहि नाश पावतो. १.

नाहमत्र भोग्यं पश्यामीति स समित्पाणिः पुनरेयाय तꣳह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्तहृदयः प्राव्राजीः सार्धं विरोचनेन किमिच्छन् पुनरागम इति स होवाच यथैव खल्वयं भगवोऽस्मिञ्छरीरे साध्वलंकृते साध्वलंकृतो भवति सुवसने सुवसनः परिष्कृते परिष्कृत एवमेवायमस्मिन्नन्धेऽन्धो भवति स्रामे स्रामः परिवृक्णे परिवृक्णोऽस्यैव शरीरस्य नाशमन्वेष नश्यति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ २

अन्वयार्थ—[अत्र अहं भोग्यं न पश्यामि इति—]या दर्शनांत मी ' भोग्यं ' —कांहीं फल पहात नाहीं, असें ह्मणून [सः समित्पाणिः पुनः एयाय—]तो हातांत समिधांचा भार घेऊन पुनः प्रजापतीकडे आला. [तं ह प्रजापतिः उवाच—]त्यास प्रजापति म्हणाला—[मघवन् यत् विरोचनेन सार्धं शान्तहृदयः प्राव्राजीः—] हे इंद्रा, तूं विरोचनासहवर्तमान शांतचित्त होऊन येथून गेलास व [किं इच्छन् पुनः आगमः—] आतां पुनः कशाची इच्छा करून परत आलास ?

[सः ह उवाच–] इंद्र म्हणाला–'हे भगवन्, [यथा अस्मिन् शरीरे साधु-अलंकृते अयं साधु-अलंकृतः०–] ज्याप्रमाणें हें शरीर उत्तमप्रकारें अलंकृत केलें असतां हा छायात्माहि साधु अलंकृत होतो, शरीर सुवसन झालें असतां हा सुवसन होतो, शरीर परिष्कृत केलें असतां हा परिष्कृत होतो त्याचप्रमाणें शरीर अंध झालें असतां छायात्मा अंध होतो, देह स्राम झाला असतां हा स्राम होतो. देह थोटा झाला असतां हा थोटा होतो. शरीराच्या नाशाच्या मागोमाग हा छायात्मा नाश पावतो. या देहात्मदर्शनांत किंवा छायात्मदर्शनांत मी भोग्य –फल कांहीं पहात नाहीं. २.

एवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्या-स्यामि वसापराणि द्वात्रिꣳशतं वर्षाणीति स हापराणि द्वात्रिꣳशतं वर्षाण्युवास तस्मै होवाच ॥ ३

इत्यष्टमाध्यायस्य नवमः खण्डः ॥ ९

अन्वयार्थ—[मघवन् एवं एव०–] हे इंद्रा, तूं चांगलें जाणलेंस. 'छाया आत्मा नव्हे,' असें प्रजापति म्हणाला. [एतं तु एव ते भूयः अनुव्याख्या-स्यामि–] या आत्म्याचेंच मी तुला पुनः अनुव्याख्यान करून सांगेन. [अप-राणि द्वात्रिंशतं वर्षाणि वस इति–] तूं येथें आणखीं बत्तीस वर्षें ब्रह्मचर्यव्रतानें रहा. [सः ह०–] इंद्र आणखीं बत्तीस वर्षें तेथें ब्रह्मचर्यपरिपालन करीत राहिला. [तस्मै ह उवाच–] त्यास प्रजापति म्हणाला. ३ (९)

य एष स्वप्ने महीयमानश्चरत्येष आत्मेति होवाचैतदमृतम-भयमेतद्ब्रह्मेति स ह शान्तहृदयः प्रवव्राज स हाप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श तद्यद्यपीदꣳशरीरमन्धं भवत्यनन्धः स भवति यदि स्राममस्रामो नैवैषोऽस्य दोषेण दुष्यति ॥ १

अन्वयार्थ—[यः एषः स्वप्ने महीयमानः चरति एषः आत्मा इति ह उवाच–] 'जो हा स्वप्नांत पूजा केला जाणारा असा होत्साता स्वाप्नभोगास भोगितो तो आत्मा ' असें प्रजापति म्हणाला. [एतत् अमृतं०–] 'हें अमृत, हें अभय हें ब्रह्म,' असें तो बोलला. [सः ह शांतहृदयः०–] तेव्हां तो इंद्र शांतहृदय –कृतार्थबुद्धि होऊन तेथून गेला. [सः ह देवान् अप्राप्य०–] पण तो देवांस प्राप्त न होऊनच म्ह० देवांपर्यंत येऊन पोंचण्यापूर्वीच हें भय पाहता झाला.

[तत् यद्यपि इदं शरीरं अन्धं भवति–] तें हें शरीर जरी अंध असलें तरी [सः अनन्धः भवति–] तो स्वप्नद्रष्टा अनन्ध होतो [यदि स्रामं अस्रामः–] शरीर स्राम असलें तरी तो अस्राम होतो, [एषः अस्य दोषेण न एव दुष्यति–] हा स्वप्नात्मा देहाच्या दोषानें दूषित होतच नाहीं. १.

न वधेनास्य हन्यते नास्य स्राम्येण स्रामो घ्नन्ति त्वेवैनं विच्छादयन्तीवाप्रियवेत्तेव भवत्यपि रोदितीव नाहमत्र भोग्यं पश्यामीति २

अन्वयार्थ—[अस्य वधेन न हन्यते–] या देहाच्या वधानें तो हत होत नाहीं. [अस्य स्राम्येण न स्रामः–] याच्या स्राम्यानें तो स्राम होत नाहीं. [तु एनं घ्नन्ति एव विच्छादयन्ति इव०–] पण याला कोणी जणुं काय मारतात, तसेंच त्याला कोणी जणुं काय पळवितात, जणुं काय हा अप्रियवेत्ता होतो, जणुं काय रडतो. यांत मी कांहीं फल पहात नाहीं २.

स समित्पाणिः पुनरेवाय तꣳह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्तहृदयः प्राव्राजीः किमिच्छन्पुनरागम इति स होवाच तद्यद्यपीदं भगवः शरीरमन्धं भवत्यनन्धः स भवति यदि स्राममस्रामो नैवैषोऽस्य दोषेण दुष्यति ॥ ३

अन्वयार्थ—[सः समित्पाणिः०–] तो इंद्र हातांत समिधा घेऊन पुनः प्रजापतीकडे आला. [तं प्रजापतिः०–] त्यास प्रजापति म्हणाला–" इंद्रा तूं शांतहृदय होऊन गेला होतास; आणि पुनः कोणत्या इच्छेनें–कशाची इच्छा करून परत आला आहेस. " [सः ह उवाच०–] तो इंद्र म्हणाला–" हे भगवन्, तें हें शरीर जरी अंध असतें तरी तो स्वप्नात्मा अनंध होतो. हें जरी स्राम असलें तरी तो अस्राम होतो. हा याच्या दोषानें दूषित होत नाहीं "

न वधेनास्य हन्यते नास्य स्राम्येण स्रामो घ्नन्ति त्वेवैनं विच्छादयन्तीवाप्रियवेत्तेव भवत्यपि रोदितीव नाहमत्र भोग्यं पश्यामीत्येवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्यास्यामि वसापराणि द्वात्रिꣳशतं वर्षाणीति स हापराणि द्वात्रिꣳशतं वर्षाण्युवास तस्मै होवाच ॥ ४

इत्यष्टमाध्यायस्य दशमः खण्डः ॥ १०

अन्वयार्थ—[अस्य वधेन न०—] " या शरीराच्या वधानें स्वप्नद्रष्टा हत होत नाहीं. [स्राम्येण०—] या शरीराच्या स्राम्य दोषानें तो स्राम होत नाहीं. [तु एनं घ्नन्ति०—] पण याला कोणी जणुं काय मारतात, [विच्छादयन्ति इव—] कोणी याला जणुं काय पळवितात, [अप्रियवेत्ता इव०—] तो जणुं काय अप्रिय जाणणारा होतो. [रोदिति इव—] जणुं काय तो रडतो, [अत्र अहं भोग्यं न पश्यामि—] यांत मी कांहीं फल पहात नाहीं " [एवं एव एषः—]" हे इंद्रा तूं म्हणतोस तसाच हा आहे. [एतं तु एव०—] याचेंच मी तुला पुनरपि व्याख्यान करून सांगेन. [अपराणि द्वात्रिंशतं०—] आणखीं बत्तीस वर्षे येथें वास कर." तेव्हां इंद्र आणखीं बत्तीस वर्षे तेथें राहिला. त्याला प्रजापति म्हणाला ४(१०)

तद्यत्रैतत् सुप्तः समस्तः संप्रसन्नः स्वप्नं न विजानात्येष आत्मेति होवाचैतदमृतमभयमेतद्ब्रह्मेति स ह शान्तहृदयः प्रवव्राज स हाप्राप्यैव देवानेतद्भयं ददर्श नाह खल्वय-मेवꣳसंप्रत्यात्मानं जानात्ययमहमस्मीति नो एवेमानि भूतानि विनाशमेवापीतो भवति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥१

अन्वयार्थ—[तत् यत्र एतत् सुप्तः समस्तः संप्रसन्नः स्वप्नं न विजा-नाति—] ज्या वेळीं हा ' सुप्तः-' निजलेला ' समस्तः-' दर्शनवृत्तिरहित होत्साता गाढ झोंपीं गेलेला म्हणूनच संप्रसन्न असा स्वप्नास जाणत नाहीं [एषः आत्मा इति०—] हा आत्मा, असें प्रजापति म्हणाला, [एतत् अमृतं०—] हें अमृत, अभय, हें ब्रह्म असें म्हणाला, [सः ह शांतहृदयः०—] तेव्हां इंद्र शांतहृदय होत्साता तेथून गेला. [सः ह अप्राप्य०—] पण तो देवांस न पोंचतांच—देवां-पर्यंत जाण्यापूर्वीच मार्गांत हें भय पाहता झाला. [खलु अयं एवं आत्मानं संप्रति अयं अहं अस्मि इति न अह जानाति—]खरोखर हा अशाप्रकारें आपल्याला आतां ' हा मी आहें' असें चांगल्याप्रमाणें जाणत नाहींच. [इमानि भूतानि नो एव—] त्याचप्रमाणें या भूतांस जाणत नाहीं.[विनाशं एव अपीतः भवति—] तो विनाशास प्राप्त झालेला असा होतो. [अत्र अहं भोग्यं न पश्यामि—] 'या आत्म्यांतहि मी इष्ट फल पहात नाहीं.' सु. ब्र. पृ ८१ पहा.१.

स समित्पाणिः पुनरेयाय तꣳह प्रजापतिरुवाच मघवन्यच्छान्त-हृदयः प्राव्राजीः किमिच्छन्पुनरागम इति स होवाच नाह खल्वयं

भगव एवꣳसंप्रत्यात्मानं जानात्ययमहमस्मीति नो एवेमानि भूतानि विनाशमेवापीतो भवति नाहमत्र भोग्यं पश्यामीति ॥ २

अन्वयार्थ—[सः समित्पाणिः०—] तो हातांत समिधा घेऊन पुनः प्रजापतीकडे आला. [तं ह०—] त्याला प्रजापति म्हणाला ' हे इंद्रा, तूं जो शांतहृदय होऊन येथून गेला होतास तो पुनः कशाची इच्छा करून आला आहेस?' [सः ह उवाच०—] त्यावर तो इंद्र म्हणाला—" हे भगवन् [नाह खलु०—] सुषुप्त्यवस्थेंत हा आपल्याला चांगल्याप्रकारें ' हा मी आहें ' असें जाणत नाहींच. [नो एव इमानि भूतानि—] त्याचप्रमाणें या सर्व भूतांना—प्राण्यांनाहि जाणत नाहीं. [विनाशं एव०—] तर तो जणुं काय विनाशास प्राप्त झालेलासा होतो, [अत्र अहं०—] या सुषुप्तदर्शनांत मी इष्ट फल पहात नाहीं." २

एवमेवैष मघवन्निति होवाचैतं त्वेव ते भूयोऽनुव्याख्यास्यामि नो एवान्यत्रैतस्माद्बसापराणि पञ्च वर्षाणीति स हापराणि पञ्च वर्षाण्युवास तान्येकशतꣳसंपेदुरेतत्तद्यदाहुरेकशतꣳह वै वर्षाणि मघवान्प्रजापतौ ब्रह्मचर्यमुवास तस्मै होवाच ॥ ३

इत्यष्टमाध्यायस्यैकादशः खण्डः ॥ ११

अन्वयार्थ—' हे इंद्रा, हा असाच आहे,' असें प्रजापति म्हणाला. ' याचेंच मी तुला पुनः अनुव्याख्यान करून सांगतों. [एतस्मात् अन्यत्र नो एव—] याहून निराळ्या आत्म्याचें नव्हे. [अपराणि पंच वर्षाणि वस इति—]आतां आणखी पांच वर्षे येथें ब्रह्मचर्यवास कर.' [सः ह०—] तो आणखी पांच वर्षें तेथें राहिला. [तानि एकशतं संपेदुः—] तीं सर्व मिळून एकशें एक वर्षें झालीं. [तत् एतत् यत् आहुः—] व्यवहारांत तेंच हें म्हणतात की [मघवान् प्रजापतौ एकशतं वर्षाणि ब्रह्मचर्यं उवास—] इंद्र प्रजापतीपाशीं एकशें एक वर्षें ब्रह्मचर्य परिपालन करून राहिला.[तस्मै ह उवाच—]त्यास प्रजापति म्हणाला ३.११

—याप्रमाणें विश्व, तैजस व प्राज्ञ सांगून आतां शरीररहित तुरीयाचा उपदेश करण्यासाठीं प्रजापति सशरीरतेची निंदा करितो—

मघवन्मर्त्यं वा इदꣳशरीरमात्तं मृत्युना तदस्यामृतस्याशरीरस्यात्मनोऽधिष्ठानमात्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्यां न ह वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्यशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः॥

अन्वयार्थ—[मघवन् इदं शरीरं मर्त्यं वै—] हे इंद्रा, हे शरीर मर्त्यच आहे. [मृत्युना आत्तं—] मृत्यूनें ग्रासलेलें आहे. [तत् अस्य अमृतस्य अशरीरस्य आत्मनः अधिष्ठानं—] तें या अमृत अशरीर आत्म्याचें अधिष्ठान आहे. [सशरीरः प्रियाप्रियाभ्यां आत्तः वै—] पण तो आत्मा ' शरीरच मी ' अशा अभिमानामुळें सशरीर झाला असतां प्रिय व अप्रिय यांनीं ग्रासलेला असा होतो. [सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोः अपहतिः न ह वै अस्ति—] सशरीर असलेल्या याच्या प्रियाप्रियांची अपहति—विनाश—उच्छेद होत नाहीं. [अशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः—] पण शरीराभिमान सोडल्यामुळें स्वभावतः अशरीर असलेल्या याला प्रिय व अप्रिय स्पर्श करीत नाहींत. यांचें अधिक सोपपत्तिक विवेचन भाष्यार्थांत पहा. १

अशरीरो वायुरभ्रं विद्युत् स्तनयित्नुरशरीराण्येतानि तद्यथैतान्यमुष्मादाकाशात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यन्ते ॥ २

अन्वयार्थ—[अशरीरः वायुः अभ्रं०—] वायु अशरीर आहे. अभ्र, विद्युत् व मेघ हीं सर्व अशरीर आहेत. [तत् यथा एतानि अमुष्मात् आकाशात् समुत्थाय परं०—] असें असतां ज्याप्रमाणें हीं या आकाशापासून समुत्थान पावून आदित्याच्या परं ज्योतीस प्राप्त होऊन आपापल्या रूपानें अभिनिष्पन्न होतात (त्याप्रमाणें असा पुढील कंडिकेशीं संबंध.) २.

एवमेवैष संप्रसादोऽस्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यते स उत्तमः पुरुषः स तत्र पर्येति जक्षत्क्रीडन्रममाणः स्त्रीभिर्वा यानैर्वा ज्ञातिभिर्वा नोपजनꣳस्मरन्निदꣳशरीरꣳस यथा प्रयोग्य आचरणे युक्त एवमेवायमस्मिञ्छरीरे प्राणो युक्तः ॥ ३

अन्वयार्थ—[एवं एव एषः संप्रसादः—] याप्रमाणेंच हा संप्रसाद [अस्मात् शरीरात्०—] या शरीरापासून समुत्थान पावून [परं ज्योतिः०—] परमात्म ज्योतीस उपसंपन्न होऊन [स्वेन रूपेण—] आपल्या रूपानें अभिनिष्पन्न होतो. [सः उत्तमः पुरुषः—] तो उत्तम पुरुष होय. (जो संप्रसाद आपल्या स्वाभाविक रूपानें अभिनिष्पन्न होतो तो उत्तम पुरुष.) [सः तत्र०—] तो तेथें हंसणारा, क्रीडा करणारा, स्त्रियांसह, यानांनीं किंवा ज्ञातिजनांसह रममाण होणारा

[उपजनं इदं शरीरं न स्मरन् सः—] जनसमीप असलेलें हें शरीर न स्मरणारा तो [यथा प्रयोग्यः आचरणे युक्तः—] जसा घोडा किंवा बैल रथाला किंवा गाडीला जोडलेला असतो [एवं एव अस्मिन् शरीरे अयं प्राणः युक्तः—] त्याप्रमाणेंच हा प्राण या शरीरांत जोडलेला आहे. याचा सविस्तर सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. ८०, ८२, ४९१ पहा. ३.

अथ यत्रैतदाकाशमनुविषण्णं चक्षुः स चाक्षुषः पुरुषो दर्शनाय चक्षुरथ यो वेदेदं जिघ्राणीति स आत्मा गन्धाय घ्राणमथ यो वेदेदमभिव्याहराणीति स आत्माऽभिव्याहाराय वागथ यो वेदेदꣳशृणवानीति स आत्मा श्रवणाय श्रोत्रम् ४

अन्वयार्थ—[अथ यत्र एतत् आकाशं अनुविषण्णं चक्षुः—] नंतर ज्या संसारदशेमध्यें कृष्णतारोपलक्षित आकाशांत—छिद्रांत हें चक्षु अनुषक्त—अनुगत असतें त्या संसारदशेंत—जागरितांत [सः चाक्षुषः पुरुषः—] तो अशरीर आत्म, चाक्षुष पुरुष होतो. [दर्शनाय चक्षुः—] त्याच्याच रूपोपलब्धीसाठीं हें चक्षु आहे. [अथ यः इदं जिघ्राणि इति वेद—] तसेंच जो 'मी हें हुंगेन' असें जाणतो [सः आत्मा—] तो आत्मा. [गन्धाय घ्राणं—] त्याच्या गंधविज्ञानासाठीं हें घ्राणेंद्रिय आहे. [यः इदं अभिव्याहराणि इति वेद०—] तसेंच जो 'मी बोलेन' असें जाणतो तो आत्मा. [अभिव्याहाराय वाक्—] त्याच्या भाषणक्रियेची सिद्धि होण्यासाठी वाक् हें इंद्रिय आहे. [यः शृणवानि इति०—] जो मी हें ऐकेन असें जाणतो तो आत्मा. [श्रवणाय श्रोत्रं—] त्याच्या श्रवणासाठीं हें श्रोत्र आहे. सु. ब्र. पृ. २४४ पहा. ४.

अथ यो वेदेदं मन्वानीति स आत्मा मनोऽस्य दैवं चक्षुः स वा एष एतेन दैवेन चक्षुषा मनसैतान्कामान्पश्यन्रमते ॥ ५

अन्वयार्थ—[अथ यः इदं मन्वानि इति वेद सः आत्मा—] नंतर जो मी हें मनन करीन असें जाणतो तो आत्मा. [मनः अस्य दैवं चक्षुः—] मन हें याचें दैवं—देवसंबंधीं—दिव्य चक्षु आहे. [सः वै एषः एतेन दैवेन चक्षुषा मनसा एतान् कामान् पश्यन् रमते—] तोच या दैव चक्षूनें, मनानें या कामांस पाहणारा असा होत्साता रमतो. भाष्यार्थ पहा. सु.ब्र. पृ. ५०० पहा. ५ —कोणत्या कामांस ? उत्तर—

य एते ब्रह्मलोके तं वा एतं देवा आत्मानमुपासते तस्मात्तेषाꣳसर्वे च लोका आत्ताः सर्वे च कामाः स सर्वाꣳश्च लोकानाप्नोति सर्वाꣳश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ह प्रजापतिरुवाच प्रजापतिरुवाच ॥ ६

इत्यष्टमाध्यायस्य द्वादशः खण्ड. ॥ १२

अन्वयार्थ—[ये एते ब्रह्मलोके–] जे हे ब्रह्मलोकांत काम आहेत त्यांस पहात रमतो, [देवाः तं वै एतं आत्मानं उपासते–] देव त्या या आत्म्याची उपासना करितात. [तस्मात् तेषां सर्वे च लोकाः आत्ताः सर्वे च कामाः–] त्या उपासनेमुळें त्या देवांना सर्व लोक प्राप्त आहेत व सर्व काम प्राप्त आहेत. [तं आत्मानं अनुविद्य यः विजानाति–] त्या आत्म्यास शास्त्राचार्योपदेशानुसार जाणून जो साक्षात् जाणतो [सः सर्वान् च लोकान् आप्नोति सर्वान् च कामान्–] तो सर्व लोकांस व सर्व कामांस प्राप्त होतो, [इति ह प्रजापतिः उवाच–] असें प्रजापति ह्मणाला, प्रजापति बोलला. ६ (१२)

–पुढील मंत्र पावन करणारा किंवा जपासाठी आहे—

श्यामाच्छबलं प्रपद्ये शबलाच्छ्यामं प्रपद्येऽश्व इव रोमाणि विधूय पापं चन्द्र इव राहोर्मुखात्प्रमुच्य धूत्वा शरीरमकृतं कृतात्मा ब्रह्मलोकमभिसंभवामीत्यभिसंभवामीति ॥१

इत्यष्टमाध्यायस्य त्रयोदशः खण्डः ॥ १३

अन्वयार्थ—[श्यामात्–] श्याम हा गंभीर वर्ण आहे. त्याप्रमाणें श्याम असलेल्या हार्द–हृदयस्थ ब्रह्माला जाणून त्याच्या ध्यानानें [शबलं प्रपद्ये–] शबलास–ब्रह्मलोकास मी मरणोत्तर प्राप्त होतों, कारण [शबलात् श्यामं प्रपद्ये–] मी ब्रह्मलोकापासून या हार्द भावास प्राप्त झालों आहें. [अश्वः रोमाणि इव–] अश्व जसा अंग हालवून–लोम हालवून निर्मल होतो त्याप्रमाणें [पापं विधूय–] पाप झाडून टाकून, [चन्द्रः इव राहोः मुखात् प्रमुच्य–] चन्द्र जसा राहूच्या मुखांतून मुक्त होतो त्याप्रमाणें [शरीरं धूत्वा–] शरीर टाकून [कृतात्मा–] मी कृतकृत्य होत्साता [अकृतं ब्रह्मलोकं अभिसंभवामि०–] नित्य ब्रह्मलोकास प्राप्त होतों. ब्रह्मलोकास संपादन करतों. सु. ब्र. पृ.२३७-४० पहा. १.(१३).

आकाशो वै नाम नामरूपयोर्निर्वहिता ते यदन्तरा तद्ब्रह्म तदमृतꣳस आत्मा प्रजापतेः सभां वेश्म प्रपद्ये

यशोऽहं भवामि ब्राह्मणानां यशो राज्ञां यशो विशां यशोऽहमनुप्रापत्सि स हाहं यशसां यशः श्येतमदत्कमदत्कꣳश्येतं लिन्दु माऽभिगां लिन्दु माऽभिगाम् ॥ १

इत्यष्टमाध्यायस्य चतुर्दशः खण्डः ॥ १४

अन्वयार्थ—[आकाशः वै नाम–] आकाश या नांवानें श्रुतीमध्यें प्रसिद्ध असलेला आत्मा [नाम-रूपयोः निर्वहिता–] नाम व रूप यांचा ' निर्वहिता ' निर्वाह करणारा–व्यक्त करणारा आहे. सु. ब्र. पृ. ७७ पहा. [ते यदन्तरा तत् ब्रह्म–] तें नाम-रूप ज्याच्या आंत आहे अथवा जें नाम-रूपरहित आहे तें ब्रह्म, [तत् अमृतं–] तें अमृत, [सः आत्मा–] तो आत्मा, [प्रजापतेः सभां वेश्म प्रपद्ये–] प्रजापति म्ह० चतुर्मुख त्याच्या सभेस त्या ' प्रभुविमितं ' गृहास मी प्राप्त होतों. [अहं यशः भवामि–] मी यशःसंज्ञक आत्मा होतों. [ब्राह्मणानां यशः–] ब्राह्मणांचा यशःसंज्ञक आत्मा, [राज्ञां यशः–] क्षत्रियांचा यशःसंज्ञक आत्मा व [विशां यशः–] वैश्यांचा यशःसंज्ञक आत्मा, [तत् यशः अहं अनुप्रापत्सि–] त्या यशास–आत्म्यास मी प्राप्त होण्याची इच्छा करतों. [सः ह अहं यशसां यशः–] तो मी यशांचा यश आहें पिकलेल्या बोराप्रमाणें [श्येतं–] रोहितवर्ण, [अदत्कं अदत्कं०–] दंतरहित असूनहि भक्षण करणारें असें जें लिंदु–पिच्छिल स्त्रीव्यंजन त्यास [मा अभिगां०–] मी प्राप्त न व्हावें, मी गर्भवासास प्राप्त न व्हावें. सु.ब्र.पृ ७७, १००, ४८६ पहा.१ (१४)

–या विज्ञानाचा संप्रदाय—

तद्धैतद्ब्रह्मा प्रजापतय उवाच प्रजापतिर्मनवे मनुः प्रजाभ्य आचार्यकुलाद्वेदमधीत्य यथाविधानं गुरोः कर्मातिशेषेणाभिसमावृत्य कुटुम्बे शुचौ देशे स्वाध्यायमधीयानो धार्मिकान्विदधदात्मनि सर्वेन्द्रियाणि संप्रतिष्ठाप्याहिꣳसन्सर्वभूतान्यन्यत्र तीर्थेभ्यः स खल्वेवं वर्तयन्यावदायुषं ब्रह्मलोकमभिसंपद्यते न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते ॥ १

इत्यष्टमाध्यायस्य पञ्चदशः खण्डः ॥ १५

इति च्छान्दोग्योपनिषद्यष्टमोऽध्यायः समाप्तः ॥ ८

॥ इति छान्दोग्योपनिषत्संपूर्णा ॥

अन्वयार्थ––[तत् ह एतत् ब्रह्मा प्रजापतये उवाच–] तेंच हें आत्मज्ञान ब्रह्मा प्रजापतीला सांगता झाला, [प्रजापतिः मनवे–] प्रजापति मनूला व [मनुः प्रजाभ्यः–] मनु प्रजांना सांगता झाला. (विद्याप्रकरण संपवून अविद्वानांनीं अनुष्ठिलेल्या कर्मांचें साफल्य त्यांच्या संतोषासाठीं श्रुति सांगते–) [यथाविधानं गुरोः कर्मातिशेषेण–] स्मृत्युक्त नियमांनीं युक्त होऊन गुरूचें कर्तव्य कर्म करून राहिलेल्या काळीं [वेदं अधीत्य–] वेदाध्ययन करून धर्मजिज्ञासा संपवून [आचार्यकुलात् अभिसमावृत्त्य–] गुरुकुलापासून निवृत्त होऊन [कुटुंबे शुचौ देशे स्वाध्यायं अधीयानः–]कुटुंबांत स्थित होऊन, शुचि प्रदेशीं स्वाध्यायाचें अध्ययन करणारा [धार्मिकान् विदधत्–] पुत्र व शिष्य यांस धार्मिक करणारा [आत्मनि सर्वेंद्रियाणि संप्रतिष्ठाप्य–] हार्द ब्रह्मामध्यें सर्व इंद्रियांची संप्रतिष्ठा करून [अन्यत्र तीर्थेभ्यः सर्वभूतानि अहिंसन्–] यज्ञादि तीर्थांना सोडून अन्यत्र कोणत्याहि प्राण्याची हिंसा न करणारा [यावत् आयुषं–] जोंवर आयुष्य संपे तोंवर[एवं वर्तयन् सः खलु–]अशातऱ्हेनें वर्तन करणारा तो मरणोत्तर [ब्रह्मलोकं अभिसंपद्यते–] ब्रह्मलोकास प्राप्त होतो [पुनः च न आवर्तते०–] व तेथून पुनः आवृत्त होत नाहीं. पुनः या संसारांत परत येत नाहीं. सु. ब्र. पृ. ३८९, ४२२ पहा. १ (१५)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
छांदोग्योपनिषदाचा आठवा अध्याय समाप्त झाला.

छान्दोग्योपनिषदाचें सिंहावलोकन.

प्रस्तुत प्रकरण हें सामवेदीय छांदोगशाखेचें ब्राह्मणोपनिषद् आहे. केनोपनिषद्हि सामवेदाच्या तलवकारशाखेचें उपनिषद् आहे, हें वर–पृ. २८–सांगितलेंच आहे. म्हणूनच ' आप्यायन्तु ममांगानि० ' ही त्या दोन्ही उपनिषदांची शांति आहे. या उपनिषदाचे आठ अध्याय आहेत. त्यांतील पहिल्या दोन अध्यायांत कर्मांगावबद्ध उपासना सांगितल्या आहेत. ज्या उपासना कर्माच्या अंगांशीं संबद्ध असतात त्या कर्मांगावबद्ध

उपासना होत. जसें उद्गीथ हें कर्माचें अंग आहे. त्या उद्गीथसंज्ञक ओंकाराची परमात्मदृष्टीनें उपासना करावयास या उपनिषदांत आरंभींच सांगितलें आहे. उपासना म्हणजे चिंतन—ध्यान. उद्गीथाचा एक अवयव असा जो ' ओं-'कार तेंच ब्रह्म आहे, असें चिंतन करणें हेंच उद्गीथाख्य ओंकाराचें उपासन होय. अशाच दुसऱ्याहि अनेक कर्मांगावबद्ध उपासना उपनिषदांत सांगितलेल्या असतात. चित्ताची शुद्धि—चित्ताचें ऐकाग्र्य हें त्यांचें फल आहे. चित्तशुद्धि झाली म्ह० पुरुषामध्यें ज्ञानाची—आत्मसाक्षात्काराची योग्यता येते. कर्मामध्यें ज्याचें चित्त आसक्त झालेलें असतें म्ह० दीर्घ काल कर्मानुष्ठान केल्यामुळें ज्याचें मन त्यांतच संतुष्ट झालेलें असतें त्याच्यानें एकाएकीं कर्मत्याग करवत नाहीं. पण ज्ञानासाठीं चित्तैकाग्र्याची तर अत्यंत आवश्यकता आहे. यास्तव मंत्र-ब्राह्मणात्मक वेदानें आरंभीं विधि-निषेधात्मक नियमांनीं पुरुषाच्या स्वाभाविक प्रवृत्तीला—यथेष्टाचरणाला प्रतिबंध करून त्याला विहितमार्गानेंच प्रवृत्ति करावयास लाविलें. नंतर विहित प्रवृत्ति दृढ झाल्यावर कर्मांगावबद्ध उपासना सांगितल्या. त्यांमुळें कर्माविषयींची रुचि कमी होऊन उपासनेची रुचि उत्पन्न होते. ती झाल्यावर वेद स्वतंत्र उपासना सांगतो. जसे—आदित्याची मधुदृष्ट्या उपासना, प्राणाची व मनाची ब्रह्मदृष्ट्या उपासना. या स्वतंत्र उपासनेनें चित्तस्थैर्य झाल्यावर ' आत्मा कोण व ब्रह्म काय ' याचा विचार करून महावाक्यांच्या ज्ञानानें ब्रह्मसाक्षात्कार होतो. ब्रह्मसाक्षात्कारानंतर पुरुष ब्रह्मनिष्ठ—जीवन्मुक्त होऊन परम शांतीचा अनुभव घेतो. जीवाच्या यथेच्छ आचरणापासून जीवन्मुक्तीपर्यंत उत्तरोत्तर उत्कर्षाचा हा असा क्रम आहे. त्याला अनुसरूनच या उपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या प्रथम खंडांत उद्गीथसंज्ञक ओंकाराचें माहात्म्य व त्याच्या उपासनेचें सर्वकामप्राप्ति हें फल सांगून परमात्मदृष्ट्या त्याच्या उपासनेचें विधान केलें आहे. दुसऱ्या व तिसऱ्या खंडांत आख्यायिकेच्या द्वारा घ्राणादि इतर सर्व प्राणांना असुरांनीं पापानें वेध केला, त्यामुळें सर्व इंद्रियें चागलें व वाईट अशा दोहोंनाहि विषय करितात, पण मुख्य प्राणाला असुर पाप्मवेध करूं शकले नाहींत; उलट प्राणाला वेध करावयास गेलेल्या त्यांचाच नाश झाला, इत्यादि प्राणाचें महत्त्व सांगून अध्यात्म प्राणदृष्ट्या व अधिदैव आदित्यदृष्ट्या ओंकाराची उपासना सांगितली.

पुढें क्रमानें व्यानदृष्ट्या ओंकारोपासना,' उद्गीथ ' या शब्दांतील उत्-गी-थ या अक्षरांची प्राणादिदृष्ट्या उपासना, अशा आणखीं अनेक उपासना सांगितल्या आहेत. दहाव्या खंडांत प्राणरक्षणार्थ उष्टे व शिळे कुल्माष खाणाऱ्या चाक्रायणाची कथा प्रस्ताव-प्रतिहारादि-उपासनाशेषत्वानें सांगितली आहे. ११-१३ खंडांत अन्नलाभासाठीं आख्यायिकेसह शौव उद्गीथोपासना आहे.

दुसऱ्या अध्यायांत साधुगुणविशिष्ट समस्त सामाची उपासना, लोकदृष्ट्या पंचविधसामाची उपासना, हिंकार, प्रस्ताव, उद्गीथ, प्रतिहार व निधन हें पंचविध साम होय. वृष्टि, आप्, ऋतु, पशु, प्राण, वाक् व आदित्य यांच्या दृष्टीनें हिंकारादिपंचविध सामोपासना, वरील पंचविध सामांतच आदि व उपद्रव या दोन प्रकारच्या सामांची गणना केली म्ह० तेंच सप्तविध साम होतें. त्याच्या अक्षरांच्या उपासना, विशिष्ट फल देणाऱ्या गायत्रादिकांची उपासना, त्रयी विद्येच्या दृष्टीनें हिंकारादि सामभक्तींची उपासना, अशा उपासना सांगून तेविसाव्या खंडांत आश्रमांचा व संन्यासाचा विचार स्वतंत्र ओंकारोपासना सांगण्यासाठी केला आहे. दुसऱ्या अध्यायांत महत्त्वाचा भाग हाच आहे. त्यांत यज्ञ, अध्ययन व दान हा गृहस्थ-आश्रम, तप हा वानप्रस्थ किंवा केवल आश्रमसंन्यास, नैष्ठिक ब्रह्मचर्य—यावज्जीव आचार्यगृही त्याची, त्याच्या अग्नीची, पत्नीची वगैरे शुश्रूषा करीत राहणें, हा ब्रह्मचर्याश्रम व ब्रह्मसंस्थ हा चवथा संन्यास आश्रम आहे. त्यांत ' त्रयो धर्मस्कंधाः ' असें म्हणून धर्माच्या तीन भागांचाच जरी उल्लेख केला आहे तरी हे सर्व पुण्यलोकास प्राप्त होतात व ब्रह्मसंस्थ अमृतत्वास—मोक्षास प्राप्त होतो, असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यामुळें धर्मविभागरूप तीन आश्रम व ' नैव धर्मी न चाधर्मी ' इत्यादि प्रकारचा विधिनिषेधातीत—गुणातीत परिव्राड् हा चवथा आश्रम आहे, असें सिद्ध होतें. त्याच्यासाठीं स्वतंत्र ओंकारोपासना सांगितली आहे. पूर्वी उद्गीथसंज्ञक ओंकाराची उपासना सांगितली. ती उद्गीथ या कर्मांगाशीं संबद्ध होती. म्हणून स्वतंत्र नव्हे. पण ही येथील ओंकारोपासना स्वतंत्र आहे. कारण ब्रह्माचें प्रतीक किंवा नांव अशा स्वरूपाच्या ओंकाराची ही उपासना आहे.

तिसऱ्या अध्यायांत आदित्याची मधुदृष्ट्या—ब्रह्मदृष्ट्या उपासना सांगून ' वेदच अमृतें आहेत, त्यांतील पहिल्या अमृतावर वसु उपजीविका करितात,'

इत्यादि वर्णन केलें आहे व या मधुज्ञानाचें पर्यवसान मुक्तिफलांत होतें, असें सांगितलें आहे. अकराव्या खंडांत या मधुज्ञानाचा संप्रदाय सांगून 'पित्यानें ज्येष्ठ पुत्राला किंवा योग्य शिष्याला तें सांगावें, दुसऱ्या कोणीं सार्वभौम राज्य जरी दिलें तरी त्याला सांगूं नये,' असें विधान केलें आहे. त्यानंतर गायत्रीद्वारा ब्रह्मविद्या सांगण्यास आरंभ केला व 'गायत्रीच हें सर्व चराचर आहे, गायत्र्याख्य ब्रह्माचा हा सर्व विभूतिविस्तार आहे. पण परमार्थ सत्य पुरुष त्याहून फार मोठा आहे' इत्यादि स्तुति केली आहे. तेराव्या खंडांत त्याच गायत्र्याख्य ब्रह्माच्या उपासनांगत्वानें द्वारपालादि गुणांचें विधान केलें आहे. त्यावरून 'गायत्र्युपाधिक ब्रह्माची उपासना करावी, त्यासाठी पांच द्वारपालांची उपासना करावी. त्यापासून अंगोपासनेच्या फलासह प्रधानोपासनेचें ब्रह्मप्राप्ति हें फल प्राप्त होतें,' हा अर्थ निष्पन्न झाला. नंतर त्याच तेराव्या खंडांत द्युलोकाच्या पलीकडे प्रकाशमान होणाऱ्या ब्रह्माचा कुक्षिस्थ ज्योतीमध्यें—त्याच प्रतीकांत आरोप करून दृष्टत्व व श्रुतत्व या गुणांनी विशिष्ट अशा दुसऱ्या उपासनेचें विधान केलें आहे. चवदाव्या खंडांत 'हें सर्व ब्रह्म आहे. कारण ब्रह्मापासून त्याचे उत्पत्ति-स्थिति-लय होतात. यास्तव क्रतु—निश्चय करावा. हा पुरुष क्रतुमय आहे. ज्याचा जसा निश्चय असतो तसा तो पुरुष हा लोक सोडून गेल्यावर होतो. यास्तव ब्रह्मनिश्चय करावा. 'ब्रह्म मनोमय, प्राणशरीर, प्रकाशरूप' इत्यादि प्रकारचें आहे, असा निश्चय करावा. तोच हा माझा आत्मा हृदयकमलामध्यें अणूहून अणु व महत्-हून महत् आहे, सर्वकर्मा, सर्वकाम, इत्यादि आहे, तें ब्रह्म आहे, मरणोत्तर मी त्यालाच प्राप्त होणार आहें, अशी उपासना करावी. 'असा ज्याचा निश्चय असतो व त्याविषयीं यत्किंचित्हि संशय नसतो तो ब्रह्मालाच प्राप्त होतो.' असें तिचें फलहि सांगितलें आहे. या उपासनेला 'शाण्डिल्यविद्या' असें म्हणतात. पंधराव्या खंडांत पुत्राला दीर्घायुष्ट्व प्राप्त होण्यासाठीं कोशविज्ञान व जप सांगितला आहे. सोळाव्यांत स्वतःच्या दीर्घजीवनासाठीं उपासना व जप सांगितला आहे. कारण पुरुष स्वतः जिवंत असला तरच पुत्रादिफलानें युक्त होतो. म्हणून पुरुष आपल्या जीवनविशिष्ट शरीरेंद्रियसंघातालाच यज्ञ कल्पितो. त्याच्या वयाचीं पहिलीं चोवीस वर्षें हें यज्ञांतील प्रातःसवन आहे. त्यानंतरचीं जीं चव्वेचाळीस वर्षें तें माध्यंदिन सवन

आहे. शेवटचीं अठ्ठेचाळीस वर्षें हें तृतीय सवन आहे. वसु, रुद्र व आदित्य ह्या त्यांच्या देवता आहेत. त्या त्या वयांत कांहीं व्याधि उद्भवल्यास उपासक त्या त्या सवनाच्या देवतेची 'माझें हें सवन पुढच्या सवनाशीं एकरूप करा. माझ्या यज्ञाचा विच्छेद होईल असें करूं नका.' अशी प्रार्थना करितो. महीदास ऐतरेय या उपासनेनें एकशें सोळा वर्षे जिवंत राहिला. अशी उपासना करणारा कोणताहि उपासक एकशें सोळा वर्षें जगतो, ही याची फलश्रुति आहे. सतराव्या खंडांत त्या यज्ञाच्या क्षुधा, तृषा व अरति, ह्या दीक्षा, जें भोजनादि ते उपसद, हंसणें वगैरे तींच स्तुतशस्त्रें, तप, दान, आर्जव, अहिंसा, सत्यवचन या दक्षिणा, त्याचा जन्म हेंच पुनरुत्पादन, मरणच अवभृथ, इत्यादि यज्ञांगांची कल्पना केली आहे. हें यज्ञदर्शन घोर आंगिरसानें देवकीपुत्राला—कृष्णाला सांगितलें. त्यामुळें तो अन्यदर्शनांविषयीं अगदी निरिच्छ झाला. शेवटीं अंतसमयीं त्या उपासकानें 'तूं अक्षत आहेस, अच्युत आहेस, सूक्ष्मप्राण आहेस,' या तीन मंत्रांचा जप करावा, असें सांगून या उपासनेच्या स्तुतीसाठीं दोन मंत्रांचा आधार दाखविला आहे. अठराव्या खंडांत 'मन ब्रह्म आहे व आकाश ब्रह्म आहे' असें अध्यात्म व अधिदैव उपासन सांगितलें आहे. अध्यात्म मन व अधिदैव आदित्य यांच्या ठिकाणी समस्त ब्रह्मदृष्टि करून म्ह० तेंच पूर्ण ब्रह्म आहे, असें चिंतन करावें. मन व आकाश हीं दोन्ही ब्रह्माप्रमाणें सूक्ष्म आहेत, मनानें ब्रह्माचें ज्ञान होतें व आकाश सर्वगत उपाधिहीन आहे. यास्तव त्या दोहोंमध्यें ब्रह्मदृष्टि करणें योग्यच आहे. वाक्, प्राण, चक्षु व श्रोत्र हे अध्यात्म चार पाद आणि अग्नि, वायु, आदित्य व दिशा हे अधिदैव चार पाद, याप्रमाणें ब्रह्म चतुष्पाद आहे. अध्यात्म वाक्-प्राणादि पाद अधिदैव अग्नि, वायु इत्यादि पादांनीं प्रकाशमान होतात. यास्तव अशी उपासना करणारा कीर्ति, यश, ब्रह्मवर्चस यांनीं युक्त होतो, ही फलश्रुति आहे. शेवटच्या एकोणीसाव्या खंडांत—आदित्याची ब्रह्मदृष्ट्या उपासना सांगितली आहे. पूर्वी हें सर्व अव्यक्त होतें. त्यापासून नाम-रूप व्यक्त झालें. आदित्यामुळेंच नाम-रूप व्यक्त होतें, हें प्रसिद्ध आहे. त्याचा क्रम असा—प्रथम तें अव्यक्तच किंचित् विकास पावलें. तेंच पुढें हळू हळू स्थूल होत गेलें. जलापासून अंडें झालें. तें कांहीं काल तसेंच राहिलें. पुढें पक्ष्यांच्या प्रसिद्ध

अंड्याप्रमाणेंच परिपूर्ण झाल्यावर तें फुटलें. त्याचीं दोन शकलें झालीं. खालचें शकल रजत झालें. वरचें सुवर्ण झालें. जें रजत ती पृथिवी, जें सुवर्ण ती द्यौ, त्यांतील गर्भवेष्टनादि जे पदार्थ तेच पर्वतादिक होत. त्या अंड्यांतून जो निघाला तोच हा आदित्य आहे. त्याच्या मागोमाग सर्व भूतें व सर्व काम झाले. तो आदित्यच ब्रह्म आहे, अशी जो उपासना करितो त्याला सुख होतें. (३)

चवथ्या अध्यायांत सूत्रात्मभूत प्राण व वायु यांना ब्रह्मकार्यत्व या रूपानें उपास्यत्व आहे, असें सविस्तर आख्यायिकेसह सांगितलें आहे. जानश्रुति या नांवाचा एक राजा होता. तो मोठा दानशूर होता. आपलेंच अन्न सर्वांनीं खावें म्हणून त्यानें सर्वत्र अन्नसत्रें घातली. एकदा ग्रीष्म ऋतूंत रात्री तो राजा आपल्या राजमंदिराच्या गच्चीवर बसला असतां त्याच्या या अन्नदानगुणानें संतुष्ट झालेल्या देवता किंवा ऋषि अन्तरिक्षांतून हंसरूपानें चालले व त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठीं एक हंस दुसऱ्या हंसास ह्मणतो. 'अरे आंधळ्या जानश्रुति-पौत्रायणाचें तेज सर्व अन्तरिक्षांत पसरलें आहे. त्याला स्पर्श करूं नको. तें तुला जाळील.' तेव्हां दुसरा हंस म्हणतो—'अरे वेड्या सयुग्वा—बैलाच्या गाडीसह राहणाऱ्या रैक्याप्रमाणें तूं मला हा कोण सांगत आहेस ? द्यूतांतील 'कृत-'नांवाच्या दश चिह्नांनीं युक्त असलेल्या फाशांमध्यें इतर तीन त्रेतादि फांसे जसे अन्तर्भूत होतात त्याप्रमाणें रैक्याच्या ज्ञानफलांत इतर सर्व पुण्यफलांचा अन्तर्भाव होतो. तसा का जानश्रुति आहे ? रैक्य जें जाणतो तें जर याला अवगत असतें तर याच्या तेजाला स्पर्श न करणें योग्य होतें.' इत्यादि बोलत ते हंस निघून गेले. जानश्रुतीनें हें त्यांचें भाषण ऐकलें. पाहांटे भाट स्तुति करूं लागला असतां जानश्रुति म्हणतो ' तूं माझी सयुग्वा रैक्याप्रमाणें स्तुति कशाला करितोस ? ' त्यावर तो क्षत्ता—क्षत्रीयापासून शूद्रयोनींत झालेला—राजाला म्हणाला " सयुग्वा रैक्य कसा आहे ! "राजानें हंसाच्या तोंडून ऐकलेलें त्याचें माहात्म्य त्याला सांगून त्याचा शोध करावययास पाठविलें. त्याला प्रथम त्याचा शोध लागला नाही. पण राजाच्या सांगण्यावरून पुनः ब्राह्मणांच्या प्रदेशामध्यें जेव्हां त्यानें त्याचा शोध केला, तेव्हां शकटाच्या खालीं खरूज खाजवीत बसलेला रैक्य त्या क्षत्त्याला दिसला. त्याच्या जवळ जाऊन व त्याच्या तिरस्कारयुक्त उत्तरावरून त्याला गृहस्थाश्रम करण्याची व त्यासाठीं वित्ताची आवश्यकता आहे असें

जाणून क्षत्त्यानें राजाला तसें सांगितलें. राजा पुष्कळ धन घेऊन त्याच्याकडे गेला. तेव्हां त्याला अपेक्षित असलेलें सर्व वित्त त्यांत नसल्यामुळें ' अरे शूद्रा, हा हार, रथ, गायी इत्यादि सर्व तुझें तुजपाशीं राहो ' असें रैक्व ह्मणाला. क्षत्रिय राजाला रैक्वानें ' शूद्र ' ह्मणून जें संबोधिलें आहे त्याचा आशय—हंसाचें वाक्य ऐकून याला शोक झाला व शोकावेशानें हा आपल्याकडे त्वरेनें आला, हें आपल्याला कळलें आहे, असें राजाला सुचवावें—हा आहे. 'शुचा'—शोकानें 'दुद्राव'—धांवला ह्मणून शूद्र. कारण तो क्षत्रिय होता, जातिशूद्र नव्हता, असें प्रकरणादिकांवरून सिद्ध होतें. तें ऐकून राजानें आणखी धन व कन्या त्याला दिली. तेव्हां 'हिच्यासाठीं मी तुला आपली विद्या सांगतों,' असें ह्मणून रैक्वानें जानश्रुतीला संवर्ग विद्या सांगितली. वायु हा अधिदैव संवर्ग आहे व प्राण अध्यात्म संवर्ग आहे. अधिदैव म्ह० देवांतील व अध्यात्म म्ह० शरीरांतील.संवर्ग ह्म०आपल्यामध्यें उपसंहार करणारा.जेव्हा अधिदैव अग्नि विझतो, सूर्य अस्त पावतो, चंद्र अस्त पावतो व आप सुकतें तेव्हां तीं सर्व वायूंत लय पावतात. वायूच त्या सर्वांना ग्रासतो. त्याचप्रमाणें जेव्हां पुरुष झोंपतो तेव्हां अध्यात्म वाक्, चक्षु, श्रोत्र व मन प्राणांतच लय पावतात. प्राणच त्या सर्वांना ग्रासतो. म्हणून देवांतील संवर्ग वायु आहे व इंद्रियांतील संवर्ग प्राण आहे. एक संवर्गोपासक ब्रह्मचारी म्ह० स्वतःला ब्रह्मज्ञ समजणारा भिक्षा मागत असतां शौनक व अभिप्रतारी यांना म्हणाला ' मी चार देवांना ग्रासणारा प्रजापति तुम्हांपुढें उभा असतांना मला अन्न न देतां तुम्ही खातां! वस्तुतः ज्याच्यासाठीं हें अन्न आहे यालाच तुम्ही तें दिलें नाहीं, अनेक प्रकारें राहणाऱ्या या प्रजापतीला कोणी मर्त्य पहात नाहीत.' तें ऐकून शौनक त्याच्याजवळ आला व 'आम्ही त्याला पाहतों, तो सर्व स्थावर-जंगमाचा आत्मा आहे.' इत्यादि त्याला म्हणाला सु. पं. प्र. ९ श्लो.७९पृ.५०६.

वागादिक व अग्न्यादि जगत् कारणरूपानें एकरूप मानून त्याचे सोळा भाग करून त्यामध्यें ब्रह्मदृष्टीचें विधान करावें, म्हणून चवथें खंड आरंभिलें आहे. श्रद्धा व तप यांना विद्यांगत्व आहे, हें प्रदर्शित करण्यासाठीं आरंभीं अशी आख्यायिका आहे—जबालेचा पुत्र सत्यकाम अध्ययनार्थ गुरुगृहीं वास करण्यासाठीं आपल्या आईजवळ आज्ञा मागूं लागला व आपलें गोत्र विचारूं

लागला. तेव्हां जबाला म्हणाली "तूं जेव्हां झालास तेव्हां मी अगदीं तरुण होतें. त्यावेळीं अतिथींची परिचर्या करण्याचें काम मजकडे होतें. त्यांतच माझा सर्व काल जात असे. पुढें तूं लहान असतांनाच तुझा पिता निवृत्त झाला. त्यामुळें मला तुझें गोत्र माहीत नाहीं. तूं आपल्या गुरूला 'मी सत्यकाम जाबाल आहें' असें सांग." तेव्हां तो हारिद्रुमत आचार्याकडे गेला. त्यानें त्याला गोत्र विचारलें. सत्यकामानें आईच्या सांगण्याप्रमाणेंच त्याला उत्तर दिलें. तेव्हां 'कोणीहि अब्राह्मण असें खरें बोलूं शकणार नाहीं,' असें म्हणून त्यानें त्याचें उपनयन केलें आणि अगदीं कृश व दुर्बल चारशें गायी त्याच्या स्वाधीन करून 'तूं यांच्या मागोंमाग जा' अशी आज्ञा केली. त्या गायींना घेऊन गुरुकुलांतून निघतांना 'यांची संख्या एकसहस्र झाल्यावांचून मी परत येणार नाहीं' अशी सत्यकामानें प्रतिज्ञा केली. तो दूर एका मोठ्या अरण्यांत गेला. तेथें बरींच वर्षें गोसेवा करीत राहिला. त्या अवधींत गायी एकसहस्र झाल्या. तेव्हां त्याच्या श्रद्धेनें व तपानें संतुष्ट झालेली वायुदेवता अनुग्रहबुद्धीनें वृषभाच्या शरीरांत प्रवेश करून म्हणाली—"हे प्रियदर्शन सत्यकामा, आम्ही आतां एक सहस्र झालों आहों. आतां आम्हांला आचार्यकुलास घेऊन चल. मी तुला ब्रह्माचा एक पाद सांगतें." असें बोलून वृषभस्थ वायुदेवता म्हणाली—"पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार दिशा ह्या ब्रह्माच्या चार कला आहेत. ह्या चार कला मिळून चतुष्पाद ब्रह्माचा 'प्रकाशवान्-'नांवाचा एक पाद होतो. त्याची जो उपासना करितो तो या लोकीं प्रकाशवान् होतो व मरणोत्तर प्रकाशवान् लोकांस प्राप्त होतो. ब्रह्माचा दुसरा पाद तुला अग्नि सांगेल," असें बोलून वायुदेवता उपराम पावली. दुसऱ्या दिवशीं सत्यकामानें त्या सहस्र गायींना गुरुकुलाकडे चालविलें. सायंकालीं त्या जेथें एकत्र जमल्या तेथेंच तो राहिला. अग्नीचें उपसमाधान केलें. समिद्धोम केला व अग्नीच्या पश्चात् पूर्वाभिमुख बसला. तेव्हां अग्नि ह्मणाला"पृथिवी, अंतरिक्ष, द्यौ व समुद्र ह्या कला हा ब्रह्माचा 'अनन्तवान्-' नामक पाद आहे. त्याची जो उपासना करितो तो या लोकीं अनन्तवान् होतो. त्याची संतति विच्छिन्न होत नाहीं. मेल्यावर त्याला अनन्तवान् लोकाची प्राप्ति होते. आतां तुला हंस तिसरा पाद सांगेल." असें बोलून अग्नि शांत झाला. दुसऱ्या दिवशीं सत्यकाम पुढें निघाला. सायंकालीं पूर्वीप्रमाणेंच गायींना एकत्र

जमवून, अग्निपरिचर्या करून त्याच्या पश्चात् पूर्वाभिमुख बसला. तेव्हां हंस त्याच्याजवळ आला व म्हणाला—" अग्नि, सूर्य, चंद्र व विद्युत् या चार कलांनीं युक्त असा ब्रह्माचा ' ज्योतिष्मान्-'नांवाचा पाद आहे. त्याची उपासना करणारा या लोकीं ज्योतिष्मान् होतो व ज्योतिष्मान् लोकांस प्राप्त होतो. मद्गु तुला चवथा पाद सांगेल." तिसऱ्या दिवशी सायंकालीं सत्यकाम पूर्वीप्रमाणेंच होम देऊन अग्नीच्या मागें पूर्वाभिमुख बसला. तेव्हां त्याच्याजवळ मद्गुपक्षी येऊन म्हणतो—" प्राण, चक्षु, श्रोत्र व मन या चार कला हा ब्रह्माचा आयतनवान् या नांवाचा पाद आहे. त्याची उपासना करणारा या लोकीं आश्रयवान् होतो व परलोकीं आयतनवान् लोकांस जिंकतो."याप्रमाणें सत्यकाम ब्रह्मवेत्ता होऊन आचार्यकुलास प्राप्त झाला. त्याला एकसहस्र गायींसह परत आलेला पाहून त्याचा आचार्य म्हणतो—" हे प्रिय शिष्या, तूं ब्रह्मवेत्त्यासारखा दिसतोस, तुला कोणीं अनुशासन केलें ? तुला ब्रह्मोपदेश कोणीं केला ?" त्यावर सत्यकाम म्हणाला—" मनुष्येतरांनीं म्ह० देवतांनीं मला उपदेश केला. तथापि माझी इच्छा असल्यामुळें आपणच मला विद्या सांगा. कारण आचार्यापासूनच प्राप्त झालेली विद्या अतिशय श्रेष्ठ व निर्दोष असते." तें ऐकून हारिद्रुमत आचार्यानेंहि देवतांनीं सांगितलेलीच विद्या अगदीं तशीच सांगितली.

त्या सत्यकामापाशीं कामलायन उपकोसल म्हणून एक शिष्य होता. त्यानें बारा वर्षें गुरूच्या अग्नीची परिचर्या केली. पण त्या आचार्यानें इतर सर्व ब्रह्मचाऱ्यांचें समावर्तन करून त्यांना आपापल्या पितृगृहीं पाठविलें. उपकोसलाचें मात्र समावर्तन केलें नाहीं. तें पाहून आचार्यभार्या पतीला म्हणाली—" भगवन्, या ब्रह्मचाऱ्याला अतिशय ताप झाला आहे. त्यानें अग्नींची परिचर्या फार उत्तम प्रकारें केली आहे. यास्तव त्यालाहि विद्या देऊन घरीं पाठवा. नाहीं तर हे अग्निच तुमची निंदा करतील. ' पण तिच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष्य करून जाबाल सत्यकाम प्रवासास गेला. त्यामुळें उपकोसलाला फार दुःख झालें. त्यानें उपवास करण्याचा निश्चय केला. तें पाहून आचार्यपत्नी त्याला म्हणाली—" हे ब्रह्मचारिन्, तूं अन्न खा, उपाशीं कां राहतोस ?" त्यावर उपकोसल म्हणाला—" मातुःश्री, या प्राकृत पुरुषांत अनेक प्रकारचे काम आहेत. मी व्याधींनीं पूर्ण आहें. त्यांना अनशनानें मी नाहींसे करितों." त्याचा असा हा

निग्रह पाहून अग्नि आपापसांत म्हणाले–" या ब्रह्मचाऱ्यानें आमची सेवा फार चांगल्या प्रकारें केली आहे. त्यानें त्यासाठीं अतिशय कष्ट सोसले आहेत. यास्तव आपणच याला विद्या सांगूं या." असें बोलून ते त्याला म्हणाले– " प्राण ब्रह्म आहे, कं ब्रह्म आहे, खं ब्रह्म आहे." तें ऐकून उपकोसल म्हणतो–' प्राण ब्रह्म आहे हें मला समजलें. पण कं व खं काय आहे तें मला ठाऊक नाहीं. ' अग्नि म्हणाले–" जें कं तेंच खं व जें खं तेंच कं आहे." असें म्हणून त्यांनीं त्याला प्राण व त्याचें आश्रयभूत सुखरूप आकाश सांगितलें. त्यानंतर गार्हपत्यानें त्याला ' पृथिवी, अग्नि, अन्न व आदित्य या माझ्या तनू आहेत. हा जो आदित्यांत पुरुष दिसत आहे तो मी आहें ' असें सांगून अशी उपासना करणाराला पापाचा नाश, अग्निलोकप्राप्ति, पूर्ण आयुष्य, उज्ज्वल जीवन, पुत्रादिकांचा क्षय न होणें, अग्नींनी या लोकीं व परलोकीं त्याचें रक्षण करणें, हें फल सांगितलें. अन्वाहार्यपचन–दक्षिणाग्नि म्हणाला " आप, दिशा, नक्षत्रें व चंद्रमा या माझ्या तनू आहेत. चंद्रांत जो हा पुरुष दिसतो तोच मी आहें. अशी उपासना करणाराला पूर्वोक्त फलच प्राप्त होतें." त्यानंतर आहवनीय अग्नींनें त्याला असा उपदेश केला. " प्राण, आकाश, द्यौ, विद्युत, या माझ्या तनू आहेत. विद्युत्-मधील पुरुषच मी आहें, अशी उपासना करणाराला पूर्वोक्त फलच प्राप्त होतें." असा उपदेश करून ते तिन्ही अग्नि त्याला पुनः म्हणाले " उपकोसला, ही आमची विद्या आहे. आत्मविद्या आरंभींच सांगितली आहे. आतां आचार्य तुला गति सांगेल. त्यानंतर त्याचा आचार्य–सत्यकाम जाबाल प्रवासांतून परत आला व शिष्याला म्हणाला ' तुझें मुख ब्रह्मवेत्त्याच्या मुखासारखें दिसतें. तुला ब्रह्मोपदेश कोणी केला ?' तेव्हां ' मला कोण उपदेश करणार, ' असें आरंभीं म्हणून त्यानें पर्यायानें अग्नींचें नांव सुचविलें. तेव्हां ' त्यांनीं तुला काय उपदेश केला ?' असें आचार्यानें विचारिलें असतां उपकोसलानें ' हें–असें सांगितलें ' असें बोलून त्यांच्या उपदेशाचा अनुवाद केला. तेव्हां आचार्य म्हणाला–" वत्सा, त्यांनीं तुला केवल लोक सांगितले. मी तुला ब्रह्म सांगतों. कमलपत्राला जसा जलाचा लेप लागत नाहीं त्याप्रमाणें ब्रह्मवेत्त्याला पाप लागत नाहीं." तेव्हां ' बरें आहे, आपण मला सांगा "

असें शिष्य बोलला असतां सत्यकाम म्हणतो—"हा जो नेत्रांत पुरुष दिसतो तो आत्मा आहे. तेंच आत्मतत्त्व अमृत, अभय ब्रह्म आहे. या पुरुषाच्या स्थानांत—नेत्रांत उदक किंवा घृत शिंपडलें असतां तें पापण्यांवरच जातें. त्याच्या स्थानालाहि त्याचा संसर्ग होत नाहीं. मग साक्षात् पुरुषाला कोठून होणार? याला 'संयद्वाम' असें ह्मणतात. कारण सर्व संसेवनीय वस्तु याच्याशीं सुसंगत होतात, त्याच्या उपासकालाहि सर्व संसेवनीय पदार्थ प्राप्त होतात. हाच 'वामनीः'—सर्व पुण्य कर्मफलें देणारा आहे. अशाप्रकारें जो त्याची उपासना करतो तो सर्व पुण्यफलांस प्राप्त होतो. हाच 'भामनीः-' सर्व लोकांत भासमान होणारा आहे. त्याचा उपासकहि सर्व लोकांमध्यें भासमान होतो. हा उपासक मृत झाला असतां त्याचें प्रेतकार्य कोणी करो कीं न करो, तो अर्चिराभिमानिनी देवतेस प्राप्त होतो. अर्चीपासून अहर्, शुक्लपक्ष, उत्तरायण, संवत्सर, यांच्या अभिमानिनी देवतांस क्रमानें प्राप्त होतो. संवत्सरापासून आदित्यास, तेथून चंद्रास, चंद्रापासून विद्युद्देवतेस तो प्राप्त होतो. तेथपर्यंत जाऊन पोंचल्यावर त्याला अमानव पुरुष सत्यलोकस्थ ब्रह्मास पोंचवितो. हा देवमार्ग—ब्रह्ममार्ग आहे. या मार्गानें जाणारे या मन्वन्तरांत परत येत नाहींत."

याप्रमाणें उपकोसल विद्या संपवून पुढील दोन खंडांत यज्ञांत कांहीं न्यूनतादि दोष घडल्यास प्रायश्चित्तासाठीं व्याहृतींचा उपदेश केला आहे व ऋत्विक् जो ब्रह्मा त्याच्या मौनाचें विधान केलें आहे. (४)

पांचव्या अध्यायांत पंचाग्निवेत्त्या गृहस्थांची, श्रद्धालु ऊर्ध्वरेत्यांची व इतर सगुण उपासकांची पूर्वोक्त उत्तर गतिच सांगून—तिचा अनुवाद करून वैराग्यासाठीं कर्मठांची पुनरावृत्तिरूप दक्षिण गति व अतिशय कष्टकर तिसरी गतीहि सांगावी म्हणून पांचव्या अध्यायाचा आरंभ केला आहे. पूर्वीं प्राणच वागादि सर्व इंद्रियांहून श्रेष्ठ आहे, असें सांगितलें आहे. पण तो श्रेष्ठ कसा, तें सांगण्यासाठीं प्राणाला श्रेष्ठ, वाक्ला वसिष्ठ, चक्षूला प्रतिष्ठा, श्रोत्राला संपत् व मनाला आयतन म्हणून ते सर्व प्राण 'मी श्रेष्ठ आहें, मी श्रेष्ठ आहें' असें म्हणून परस्पर कलह करूं लागले अशी आख्यायिका सांगण्यास आरंभ केला आहे. ते सर्व प्राण प्रजापतीकडे गेले व 'भगवन् आम्हांमध्यें श्रेष्ठ कोण' असें विचारूं लागले. तेव्हां प्रजापति म्हणाला 'तुम्हांपैकीं जो शरीर सोडून गेला असतां

तें अतिशय अमंगल दिसेल, तोच श्रेष्ठ होय.' प्राणांना वाईट वाटूं नये म्हणून प्रजापतीनें असें पर्यायानें उत्तर दिलें असतां प्रथम वागिंद्रिय शरीर सोडून गेलें. व तें एक वर्षभर शरीराच्या बाहेर राहून व परत येऊन म्हणालें " माझ्या वांचून हें शरीर जिवंत कसें राहूं शकलें " तेव्हां इतर प्राण म्हणाले ' जसे मुके बोलत मात्र नाहींत, पण प्राणानें श्वासोच्छ्वास करीत, चक्षूनें पहात, श्रोत्रानें ऐकत व मनानें चिंतन करीत जिवंत रहातात, तसेंच हें राहिलें. ' तें ऐकून वाक्‌चा ' मी श्रेष्ठ आहें ' हा अभिमान नाहींसा झाला व तें शरीरांत स्वस्थानीं प्रविष्ट झालें. याच न्यायानें चक्षु, श्रोत्र व मन यांनींहि क्रमानें उत्क्रमण केलें, पण चक्षूच्या अभावीं आंधळ्याप्रमाणें, श्रोत्राच्या अभावीं बहिऱ्याप्रमाणें, मनाच्या अभावी मूढाप्रमाणें त्याचा व्यवहार चालला होता. तें ऐकून त्यांनीं आपापल्या श्रेष्ठत्वाचा अभिमान टाकला. शेवटीं मुख्य प्राण शरीरांतून उत्क्रमण करण्याची नुस्ती इच्छा करूं लागला, त्याबरोबर वागादि सर्व इंद्रियें व्याकुल झालीं. प्राणाच्या अभावीं शरीरामध्यें त्यांची स्थितीहि असभवनीय झाली. तेव्हां तीं सर्व प्राणास म्हणालीं, ' तूंच आमचा स्वामी आहेस, तूंच आम्हांमध्यें श्रेष्ठ आहेस, उत्क्रमण करूं नकोस.'वाक् म्हणाली, ' मी वसिष्ठ नसून तूंच वसिष्ठ आहेस,' चक्षु म्हणाला ' तूंच प्रतिष्ठा आहेस.' श्रोत्र म्हणालें ' तूंच संपत् आहेस ' व मन म्हणालें ' तूंच आयतन आहेस,' म्हणूनच सर्व इन्द्रियांना वाक्, चक्षु, श्रोत्र, असें म्हणत नाहींत, तर ' प्राण ' असें म्हणतात. '

प्राण म्हणाला. ' माझें अन्न काय ? ' तेव्हां वागादिक प्राण म्हणाले ' सर्व प्राण्यांचें जें अन्न तें तुझेंच अन्न आहे व आप हें तुझें वस्त्र आहे. म्हणूनच भोजन करणारे द्विज भोजनापूर्वी व नंतर आपोशन घेतात. त्यामुळें तो प्राण अनग्न होतो. हेंच प्राणदर्शन सत्यकाम गोश्रुतीला सांगून म्हणाला " प्राणोपासकानें हें दर्शन एखाद्या खांबाला जरी सांगितलें तरी त्याला पालवी फुटेल." त्यानंतर प्राणोपासकांसाठीं श्रुतीनें मंथाख्य कर्म सांगितलें आहे.

आरुणीचा पुत्र श्वेतकेतु पांचालांच्या सभेंत गेला. त्याला प्रवाहण जैवलीनें ' मुला, तुला पित्यानें सुशिक्षण दिलें आहे का ? ' असें विचारिलें, तेव्हां ' होय महाराज, ' असें श्वेतकेतु म्हणाला. तें ऐकून ' या लोकांतून मरून जाणाऱ्या

प्रजा कोठें जातात ? त्या पुनः या लोकीं परत कशा येतात ? देवयान व पितृयाण हे दोन मार्ग परस्पर व्यावृत्त कोठें होतात ? पितृलोक भरून कसा जात नाही ? पांचवी आहुति दिल्यावर आप 'पुरुष' या संज्ञेस कशा प्राप्त होतात ?' असे पांच प्रश्न त्या जैवलि राजानें त्याला केले. पण त्यानें 'मला यांतील कांहींच माहित नाहीं,' हें एकच उत्तर दिलें. तें ऐकून 'या प्रश्नांचीं उत्तरें जर तुला ठाऊक नाहीत तर तूं आपल्याला विद्वान्–सुशिक्षित कसें म्हणवितोस' असें राजा बोलला. त्यामुळें श्वेतकेतूला खेद झाला व तो आपल्या पित्याकडे येऊन "मला न शिकवितांच 'मीं तुला सर्व शिकविलें आहे' असें कसें म्हटलेंत ? त्या क्षत्रियबंधूनें–जैवलीनें मला पांच प्रश्न विचारले. पण मी त्यांतील एकाचेंहि उत्तर देऊं शकलों नाहीं" असें म्हणाला. त्यावर आरुणि म्हणतो, 'बाबारे मलाहि या प्रश्नांचीं उत्तरें ठाऊक नाहींत. मला जर ही विद्या अवगत असती तर मीं तुला सांगितली नसती का ?' इतकें बोलून तो श्वेतकेतूचा पिता जैवलि राजाकडे गेला. राजानें त्याचा सत्कार केला. दुसरे दिवशीं सकाळीं तो राजसभेंत गेला. तेव्हां राजा म्हणतो. 'हे पूज्य गौतमा, मानुष-वित्ताचा वर माग.' त्यावर गौतम म्हणतो, 'हे राजा, तुझें मानुष वित्त तुजपाशींच असूं दे. माझ्या पुत्राला जें विचारलेंस तेंच तूं मला सांग.' तें ऐकून राजा खिन्न झाला. तथापि असल्या ब्राह्मणाला 'मी तें सांगत नाही' असें म्हणणें उचित दिसत नाहीं, हें जाणून न्यायानेंच विद्या सांगावी, अशा आशयानें 'तर मग एक वर्षभर ब्रह्मचर्यानें येथें रहा' असें तो म्हणाला. आरुणि तेथें राहिला. पुढें दीर्घकाल ठेवून घेतल्याबद्दल ब्राह्मणास क्रोध आला असेल असें जाणून राजा म्हणतो–" ही विद्या या पूर्वी ब्राह्मणांना प्राप्त झालेली नाहीं, हें तूं जाणतच आहेस; आजपर्यंत क्षत्रियच ही विद्या शिकवीत असत, पण आतां या पुढें तुझ्या द्वारा ती ब्राह्मणांमध्यें जाईल. म्हणून मी तुला वर्षभर जें ठेवून घेतलें त्याबद्दल रागावूं नकोस." असें बोलून व त्याची क्षमा मागून राजानें त्याला पंचाग्निविद्या सांगितली–"हे गौतमा, द्युलोक हाच अग्नि आहे. त्याची आदित्य ही समिधा, सूर्यकिरण हा धूम, दिवस ज्वाला, चंद्रमा निखारे व नक्षत्रें किटाळें आहेत. त्या अग्नींत श्रद्धेचा म्ह० अग्निहोत्राहुतीच्या परिणाम-अवस्थारूप सूक्ष्म आपांचा देव होम करितात.

त्या आहूतीपासून सोमराजा उत्पन्न होतो. म्ह० चंद्रांतील कार्यास आरंभ होतो. पर्जन्य हा दुसरा अग्नि आहे. वायु, अभ्र, विद्युत्, अशनि व मेघगर्जना हेच त्या अग्नीचे क्रमानें समिध्, धूम, ज्वाला, निखारे व विस्फुलिंग आहेत. त्या अग्नींत देव सोमराजाचें हवन करितात. त्या आहुतीचा वृष्टिरूपानें परिणाम होतो. पृथ्वी हाच तिसरा अग्नि आहे. संवत्सरादिक याच त्याच्या समिधा वगैरे आहेत, या अग्नींत देव वृष्टीची आहुति देतात. तिच्यापासून अन्न होतें. पुरुष हा चौथा अग्नि आहे. त्याची वाक्, प्राण, इत्यादि हींच समिधा, धूम वगैरे आहेत. त्या पुरुषाग्नींत देव अन्नाचें हवन करितात. त्या आहुतीपासून वीर्य उद्भवतें. स्त्री हाच पांचवा अग्नि आहे. त्यांत देव वीर्याचा होम करितात. त्यापासून शरीर संभवतें. याप्रमाणें पांचवी आहुति दिली असतां पूर्वोक्त श्रद्धासंज्ञक आप् पुरुषसंज्ञक होतात. जरायूनें आच्छादित झालेला तो गर्भ पूर्णांग होईपर्यंत मातेच्या उदरांत राहून उत्पन्न होतो. आयुष्य संपेपर्यंत जिवंत रहातो. तो जर वैदिक ज्ञान-कर्माधिकारी असला तर मृत झालेल्या त्याला त्याचे ज्ञातिबांधव अग्नि देण्यासाठी अरण्यांत घेऊन जातात. अर्थात् तो ज्या अग्नीपासून श्रद्धादि-आहुतिक्रमानें उत्पन्न झालेला असतो त्याच अग्नींत त्याची आहुति देतात.

गृहस्थांतील जे कोणी या पंचाग्नींची उपासना करणारे असतात, किंवा जे अरण्यांत श्रद्धा, तप इत्यादिकांची उपासना करतात ते अर्चिरभिमानिनी देवतेस प्राप्त होतात. तेथून अहर्, शुक्लपक्ष, उत्तरायण, संवत्सर, आदित्य, चंद्र व विद्युत् या देवतांस क्रमानें प्राप्त होतात. तेथें अमानव पुरुष असतो. तो त्यांना कार्यब्रह्मास म्ह० हिरण्यगर्भाच्या ब्रह्मलोकास पोंचवितो. या मार्गाला देवयान, उत्तरायण, अर्चिरादि किंवा शुक्लमार्ग म्हणतात. याप्रमाणें पांचव्या आहूतींत आप पुरुषसंज्ञक कशा होतात व मेल्यावर प्रजा कोठें जातात, या दोन प्रश्नांचें उत्तर देऊन त्याच प्रसंगानें राजा पितृयाण किंवा दक्षिणमार्गाचा उपदेश करतो.

जे गृहस्थ ग्रामांत राहतात म्ह० पत्नीसह वास करितात व इष्टापूर्त-दत्त हीं कर्में करितात ते मरणोत्तर धूमास—धूमाभिमानिनी देवतेस प्राप्त होतात. त्या देवतेपासून क्रमानें रात्र, कृष्णपक्ष व दक्षिणायनाचे सहा महिने, यांच्या अभिमानिनी देवतांस प्राप्त होतात. ते संवत्सराभिमानिनी देवतेस प्राप्त होत नाहींत,

तर दक्षिणायनाभिमानिनी देवतेपासून पितृलोकास, तेथून आकाशास, आकाशापासून चंद्रास प्राप्त होतात. चंद्र हा सोमराजा आहे. तें देवांचें अन्न आहे, देव त्यांचें भक्षण करितात. कर्मठ गृहस्थ त्यांच्या कर्माचा क्षय होईतों चंद्रमंडलांत राहून नंतर याच मार्गानें निवृत्त होतात. ते चंद्रमंडलांतून आकाशास,तेथून वायूस प्राप्त होतात. वायुरूप झाल्यावर ते धूम होतात. त्यानंतर अभ्र बनतात, मेघ होऊन वृष्टि करितात. वृष्टीबरोबर भूमीवर येऊन ते व्रीहि-यव इत्यादि बनतात. या अन्नभावास प्राप्त होई तों त्या अनुशयी—स्वर्गातील फल भोगून अवशिष्ट कर्मासह खाली येणाऱ्या जीवांची अधोगति झपाट्यानें होते. तिला फार वेळ लागत नाहीं. पण या अन्नभावास प्राप्त झाल्यावर त्यांतून सुटणें फार कठिण आहे. जो अन्न खातो व रेतःसेक करितो. प्रायः त्याच्याच आकाराचा तो अनुशयी होतो. त्या अनुशयी जीवांतील ज्यांचें शील उत्तम असतें ते सत्वरच ब्राह्मणादि शुभयोनींस प्राप्त होतात. पण ज्यांचें आचरण अशुभ असतें ते श्व-सूकरादि अशुभ योनींस प्राप्त होतात; जे उपासना व कर्म यांतील कांहींच करीत नाहींत ते पूर्वोक्त दोन मार्गांतील एकाहि मार्गानें न जातां वारंवार जन्मून वारंवार मरणारे कीटादि क्षुद्र प्राणी होतात. पूर्वोक्त दोन मार्गांच्या अपेक्षेनें हें तिसरें स्थान आहे. अर्थात् दक्षिण मार्गानें जाणारेहि पुनः परत येत असल्यामुळें व ज्ञान आणि कर्म यांचा अधिकार नसलेले या कष्टकर तृतीय स्थानीं जात असल्यामुळें येथून मरून जाणाऱ्या जीवांनीं परलोक भरून जात नाहीं. याप्रमाणें जैवलीनें आपल्या पांची प्रश्नांचीं उत्तरें सांगितलीं. या लोकांतून वर जाणाऱ्या प्रजा देवयान मार्गानें ब्रह्मलोकीं जातात व पितृयाण मार्गानें स्वर्गलोकीं जातात, हें पहिल्या प्रश्नाचें उत्तर आहे. दक्षिणायनमार्गानें गेलेल्या प्रजा त्याच मार्गानें उलट क्रमानें परत येतात, हें दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर आहे. उपासक व कर्मठ यांचा अग्निदाहापर्यंतचा उत्क्रमणक्रम सारखाच असतो. तेथून त्यांचे मार्ग निरनिराळे होतात. पण दक्षिणायन व उत्तरायण यांच्या मासाभिमानिनी देवतांस प्राप्त झालेले ते पुनः एकत्र जमून पुनः वियुक्त होतात. उपासक संवत्सराभिमानिनी देवतेस प्राप्त होतात व कर्मी पितृलोकास प्राप्त होतात. याप्रमाणें मार्गाची व्यावृत्ति सांगितली. अनुशयी जीव स्वर्गातून याप्रमाणें सतत परत येत असल्यामुळें तो लोक भरून जात नाहीं, असें चवथ्या प्रश्नाचें उत्तर

सांगितलें व पंचाग्निविद्येच्या प्रतिपादनानें पांचव्या प्रश्नाचें उत्तर आरंभींच दिलें आहे. या पंचाग्नींची उपासना करणाऱ्या पुरुषानें महापातक्यांशीं संसर्ग जरी केला तरी तो पापी होत नाही. तर शुद्ध व पावन होतो, पुण्य लोकीं जातो.

प्राचीनशालादि पांच गृहस्थ 'आमचा आत्मा कोण व ब्रह्म काय?' असा विचार करूं लागले. पण त्यांना त्यांचा निश्चय करवेना. तेव्हां' हा आरुणि वैश्वानर-आत्म्याला चांगल्या प्रकारें जाणतो तो आह्मांला सांगेल' असें म्हणून ते अरुणपुत्र उद्दालकाकडे गेले. पण त्यानें स्वतः त्यांना वैश्वानरदर्शन न सांगतां अश्वपतीकडे बोट दाखविलें, व तोहि त्यांच्याबरोबर त्या राजाकडे गेला. राजानें त्या सर्वांची पूजा केली व "माझ्या राज्यांत कोणतेंच पाप करणारा कोणीहि नाहीं. मीं यज्ञ करणार आहें. त्यांत एकेका ऋत्विजाला जितकें धन देईन तितकेंच तुम्हांलाहि देईन. आपण सर्वजण येथें रहा." अशी त्यांची प्रार्थना केली. पण ते म्हणाले—" मनुष्य ज्या उद्देशानें आला असेल त्याची तीच इच्छा पूर्ण करावी. राजन्, तूं वैश्वानर-आत्म्याला चांगल्या प्रकारें जाणतोस. त्याचाच आह्मांला उपदेश कर." तेव्हां 'बरें आहे, उद्यां सांगेन' असें तो ह्मणाला. दुसऱ्या दिवशी सकाळी ते हातांत समिधा घेऊन त्याच्यापाशीं गेले. पण त्यांचें उपनयन न करितांच त्यानें त्यांतील प्रत्येकाला 'तूं कोणत्या आत्म्याची उपासना करितोस?' असा प्रश्न केला. तेव्हां प्राचीनशाल म्हणाला—'मी द्युलोकाची उपासना करितों.' राजा म्हणतो—" पण द्युलोक हा वैश्वानराचा मूर्धा —मस्तक आहे. त्यामुळें तूं जर मजकडे आला नसतास तर तुला ऐहिक फल जरी यथेच्छ प्राप्त झालें आहे तरी त्या एकदेशी उपासनेमुळें तुझ्या पारलौकिक फलाचा नाश झाला असता. तुझा मूर्धापात झाला असता." सत्ययज्ञ ह्मणाला—" मी आदित्याची उपासना करितों." राजा—" आदित्य हा त्या वैश्वानराचा चक्षु आहे. तूं मजकडे आला नसतास तर अन्ध झाला असतास." भाल्लवेय—' राजन्, मी वायूची उपासना करितों.' राजा—" पण तो तर त्या वैश्वानर-आत्म्याचा प्राण आहे. तूं जर मजकडे आला नसतास तर तुझा प्राण उत्क्रान्त झाला असता." जन—' राजन्, मी आकाशाची उपासना करितों.' राजा—" पण हा वैश्वानराचा मध्यभाग आहे. तूं मजकडे आला नसतास तर तुझा मध्यभाग विशीर्ण झाला असता." बुडिल—' मी आपाची उपासना

करितों.' राजा—" पण ती वैश्वानर-आत्म्याची बस्ति आहे. तूं मजकडे आला नसतास तर तुझी बस्ति फुटली असती." उद्दालक—' राजन्, मी पृथ्वीची उपासना करितों.' राजा—" हे त्या वैश्वानरात्म्याचे पाद आहेत. तूं मजकडे आला नसतास तर तुझे पाय लुले झाले असते." याप्रमाणें वैश्वानराच्या प्रत्येक अवयवाच्या उपासनेची निंदा करून या सर्व अवयवांनीं युक्त अशा समस्त वैश्वानराची 'हाच मी' अशी जो उपासना करितो तो सर्व लोकांमध्यें, सर्व भूतांमध्यें व सर्व आत्म्यांमध्यें अन्न खातो. त्या वैश्वानर-आत्म्याचें 'द्यौ' हें मस्तक, आदित्य चक्षु, वायु प्राण, आकाश देहमध्यभाग, आप बस्ति व पृथिवी पाद आहेत, अशी उपासना करावी. असें प्रधान उपासनेचें विधान करून त्या वैश्वानरोपासकाच्या भोजनामध्यें अग्निहोत्राची कल्पना करण्यासाठीं अश्वपति ह्मणतो—" या वैश्वानररूप भोक्त्याचा उर हेंच स्थंडिल व उरावर पसरलेले लोम हेच स्थंडिलावर पसरलेले दर्भ आहेत. हृदय हा गार्हपत्य अग्नि, मन हाच दक्षिणाग्नि व मुख आहवनीय आहे. जें अन्न प्रथम पुढें येईल त्याचा 'प्राणाय स्वाहा' या मंत्रानें होम करावा. त्याच्यायोगानें प्राण तृप्त होतो. प्राणाच्या तृप्तीनें चक्षु तृप्त होतो. चक्षूच्या तृप्तीनें आदित्य, आदित्याच्या तृप्तीनें द्यौ, द्युलोकतृप्तीनें द्युलोक व आदित्य ज्याचे स्वामी आहेत तें सर्व तृप्त होतें. त्याच्या तृप्तीनें उपासक प्रजा, पशु, अन्नाद्य, तेज व ब्रह्मवर्चस यांनीं तृप्त होतो. याच न्यायानें 'व्यानाय स्वाहा' अशी दुसरी आहुति, 'अपानाय स्वाहा' अशी तिसरी, 'समानाय स्वाहा' अशी चवथी व 'उदानाय स्वाहा' अशी पांचवी आहुति द्यावी. व्यानादि तृप्त झाले असतां श्रोत्रादि तृप्त होतात व शेवटीं हा उपासकहि तृप्त होतो. हें वैश्वानरदर्शन न जाणतां जो अग्निहोत्रहवन करितो त्याचें तें हवन व्यर्थ होतें, पण याच्या उलट तें जाणून जो हवन करितो त्याचें तें हवन सफल होतें. त्याचें सर्व पाप भस्म होतें. वैश्वानरोपासकानें चांडालाला आपलें उष्टें अन्न जरी दिलें तरी त्यानें तें वैश्वानर-आत्म्यांतच हवन केलें आहे, असें होतें. क्षुधित अपत्यें जशीं अन्नासाठीं आईची उपासना करितात, त्याप्रमाणें सर्व भूतें अशा उपासकाच्या भोजनाची अपेक्षा करितात."(५)

अरुणाचा पुत्र जो आरुणि—उद्दालक त्याचा श्वेतकेतु ह्मणून एक पुत्र होता. त्याला पिता ह्मणाला—"वत्सा, अध्ययनासाठीं ब्रह्मचर्यवास कर. आमच्या कुलां-

तील पुत्र अध्ययन केल्यावांचून रहात नाहीं. " इतकें सांगून त्याचा पिता प्रवासास गेला. श्वेतकेतुहि बारा वर्षांचा असतांना गुरुगृहीं गेला व बारा वर्षें तेथें राहून सर्व वेद शिकून परत आला.पण तो आपल्याला फार मोठा समजणारा, विद्वन्मन्य व उद्धट झाला. तें पाहून त्याचा पिता ह्मणतो–' वत्सा, तूं जो इतका मानी व अनम्र झाला आहेस तो कां ? अरे, ज्याच्यायोगानें अश्रुत असेंहि सर्व श्रुत होतें, अमत असें सर्व मत–तर्काचा विषय होतें व अनिश्चित असेंहि सर्व निश्चित होतें तो आदेश–उपदेश तूं आपल्या गुरूला विचारलास का?' **श्वेतकेतु**–' भगवन्, तो आदेश कसा आहे?' **आरुणि**–"एका मृत्पिंडाचें, सोन्याचें किंवा लोखंडाचें पूर्ण ज्ञान झालें असतां सर्व मृद्विकार, सुवर्णालंकार व सुऱ्या, चाकू इत्यादि लोहविकार यांचें ज्ञान होतें, कारण विकार केवल शब्दमात्र असतो, मृत्तिका, सुवर्ण व लोखंडच सत्य असतें, असाच तो उपदेश आहे. " **श्वेतकेतु**–" माझ्या आचार्यांना असला आदेश माहीत नसावा. कारण तो त्यांना अवगत असता तर मला सांगितला असता. यास्तव आपणच तो मला सांगा." **आरुणि** –" बरें आहे. पुत्रा, जगदुत्पत्तीच्या पूर्वीं हें दिसणारें सर्व एकच व अद्वितीय सत् होतें. कोणी ह्मणतात कीं, हें सर्व पूर्वीं केवल असत् होतें व त्यापासून हें सर्व सत् झालें. पण हे पुत्रा, असत्-पासून सत् कसें होईल ? वंध्यापुत्राला पुत्र होणें कसें शक्य आहे ! यास्तव सृष्टीच्या पूर्वीं सत्च होतें. तें एकच व अद्वितीय होतें. त्या सत्-नें ' मीं बहु व्हावें, ' असें आलोचन करून तेज उत्पन्न केलें. म्ह० तें स्वतःच तेजोभावास प्राप्त झालें; त्यानें पुनः ' बहु व्हावें ' असें आलोचन करून आपाला उत्पन्न केलें. पुरुष जेव्हां संतप्त होतो किंवा त्याला घाम येतो तेव्हां तेजापासूनच आप होतें, असा प्रत्यय येतो. आप-भावास प्राप्त झालेल्या सत्नें पुनः ' बहु व्हावें ' असा संकल्प करून अन्नाला उत्पन्न केलें. जेथें वृष्टि होते तेथें विपुल अन्न होतें, असें आपण पाहतों. त्यावरून जलापासून अन्न होतें, ही गोष्ट सिद्ध होते. या प्रसिद्ध भूतांचीं आंडज, जीवज व उद्भिज्ज अशीं तीन बीजें आहेत. कारण स्वेदजांचा यथासंभव अंडज व उद्भिज्ज यांत अन्तर्भाव होतो. असो; नंतर त्या ' सत्-'संज्ञक देवतेनें ' मी आतां या तेजोऽब्-अन्नसंज्ञक तीन देवतांमध्यें या जीवानें आत्म्यानें प्रवेश करून नाम-रूपांना व्यक्त करितें. यांतील

प्रत्येक देवतेचें त्रिवृत्करण करितें' असा संकल्प करून त्याप्रमाणें केलें. तेज, जल व अन्न यांतील एकेक देवता त्रिवृत् त्रिवृत् कशी होते तें आतां मी सांगतों. अग्नीचें जें लाल, शुक्ल व कृष्ण रूप तें क्रमानें तेज, आप व अन्न यांचें रूप आहे. अशा दृष्टीनें विचार करितांच अग्नीचें अग्नित्व निवृत्त होतें. कारण विकार नाममात्र असून तीन रूपेंच सत्य आहेत. याच न्यायानें सूर्य, चंद्र, विद्युत् व इतर सर्व पदार्थ यांतील त्रिविध रूपावरून तेजादिकांच्या त्रिवृतत्वाचा निश्चय होतो. त्यानंतर या विकारात्मक जगांत अज्ञात असें कांहीं रहात नाहीं. त्यांत जें अविज्ञातसें रूप आहे तें या तीन तेजोऽबन्नरूप देवतांचाच समुदाय आहे, असा ते निश्चय करितात. आतां या तीन देवता या शरीरेंद्रिय-संघातरूप पुरुषाला प्राप्त होऊन त्यांतील एकेक त्रिवृत् कशी होते तें ऐक— खाल्लेल्या अन्नाचा तीन प्रकारें विभाग होतो. त्याचा जो स्थूल भाग त्याची विष्ठा होते, मध्यम भागापासून रस-रक्तादिक्रमानें मांस होतें व त्याच्या सूक्ष्मभागानें मनामध्यें सामर्थ्य येतें. प्यालेल्या पाण्याच्या स्थूल अंशाचें मूत्र होतें, मध्यम अंशा-पासून रक्त होतें व सूक्ष्म अंशापासून प्राण पुष्ट होतो. भक्षण केलेल्या तैल-घृतादि तेजाच्या स्थूलभागापासून अस्थि, मध्यमभागापासून मज्जा व अत्यंत सूक्ष्म भागापासून वाक् समर्थ होते. अर्थात् पुत्रा, मन अन्नमय, प्राण आपो-मय व वाक् तेजोमयी आहे " **श्वेतकेतु**—" भगवन्, हेंच मला पुनः समजावून द्या. " **आरुणि**—" पुत्रा दह्याचें मंथन केलें असतां त्यांतील जो सूक्ष्म सारभूत अंश वर जमून येतो तेंच घृत होय, त्याच न्यायानें खाल्लेल्या अन्नाचा जो सूक्ष्म सारभूत अंश उद्भवतो तें मन, प्यालेल्या पाण्याचा जो सूक्ष्म सारभूत अंश तो प्राण व भक्षण केलेल्या तेजाचा जो सारभूत अंश ती वाक् होय. ह्मणून मन अन्नमय, प्राण आपोमय व वाक् तेजोमयी आहे." **श्वेतकेतु**—' भगवन्, हेंच मला पुनः विशद करून सांगा-' **आरुणि**— "पुत्रा, हा पुरुष सोळा कलांनीं युक्त आहे. तूं पंधरा दिवस कांहीं खाऊं नको. पाणी हवें तितकें पी. प्राण आपोमय असल्यामुळें तूं पाणी पीत राहिलास म्हणजे त्यांचा विच्छेद होणार नाहीं. " श्वेतकेतूनें तसेंच केलें व सोळाव्या दिवशीं पित्यापाशीं जाऊन ' मी काय म्हणूं ? ' असें विचारलें. तेव्हां ' पुत्रा, ऋचा, यजुर्षे, सामें म्हण ' असें पिता म्हणाला. त्यावर पुत्र ह्मणतो—' मला

त्यांतील कांहीं आठवत नाहीं. ' तेव्हां आरुणीनें त्याला जेवून यावयास सांगितलें. त्याप्रमाणें जेवतांच त्याला ऋग्वेदादि सर्व आठवलें. तेव्हां आरुणि म्हणतो—" पुत्रा, मोठ्या पेटलेल्या अग्नीचें एक बारिकसें किटाळ जसें रहावें त्याप्रमाणें पंधरा दिवस न जेवल्यामुळें तुझ्या सोळा कलांतील एक कला अवशिष्ट राहिली होती. तें बारिक किटाळ जसें कोणाला जाळीत नाहीं त्याप्रमाणें तुझी ती एक कला वेदादिकांना आठवूं शकली नाहीं. पण त्याच बारिक किटाळावर गवत घातलें असतां तें कांहीं वेळ धुमसून जसें पेटतें व पूर्वीप्रमाणेंच ताप देऊं लागतें त्याप्रमाणें अन्नानें तुझी ती एक कला वृद्धि पावली. त्यामुळें तूं आतां सर्व वेद म्हणण्यास समर्थ झाला आहेस. यास्तव मन अन्नमय आहे, प्राण आपोमय आहे व वाक् तेजोमयी आहे, असें तूं निश्चयानें जाण. पित्याचा हा उपदेश ऐकून पुत्राची त्याविषयीं खात्री झाली.

उद्दालक श्वेतकेतूला म्हणाला—" पुत्रा, मी तुला स्वप्नाचें स्वरूप म्ह० सुषुप्त सांगतों. पुरुष—जीव जेव्हां निजतो तेव्हां सद्रूप होतो. आत्म्यामध्यें त्याचा लय होतो. तो स्वला—आत्म्याला प्राप्त होतो. म्हणून त्याला ' स्वपिति ' म्हणतात. पारध्यानें पायांला दोरी बांधून सोडलेला पक्षी बंधनापासून मुक्त होण्यासाठीं सर्व दिशांमध्यें उडून पाहतो. पण तो मुक्त होत नाहीं. शेवटीं थकून तो पारध्याच्या हातावरच येऊन बसतो त्याप्रमाणें मन-उपाधिक जीव नित्य सुखासाठी जाग्रत् व स्वप्न या अवस्थांमध्यें अनेक व्यापार करून त्यांत खऱ्या विश्रांतीचें स्थान प्राप्त न झाल्यामुळें प्राणसंज्ञक-सद्रूप परा देवतेचाच आश्रय करितो. यास्तव हे पुत्रा, मन-उपाधिक जीवाचें सत्-देवता हेंच बंधन-स्थान—मूळ आहे. अन्नादि कार्य-कारणपरंपरेवरूनहि सत्च जगाचें मूळ ठरतें. अशनाया म्ह० क्षुधा व पिपासा म्ह० तहान. खालेल्या अन्नाला जल द्रवरूप करून रसादिभावानें परिणत करितें. पहिलें अन्न जिरलें म्हणजे दुसरें खाण्याची इच्छा होते. गायीला नेणारा तो गोनाय, अश्वाला नेणारा अश्वनाय, त्याच प्रमाणें आप अन्नाला रसभावास पोंचवीत असल्यामुळें त्याला अशनाया म्हणतात. वटबीजापासून उत्पन्न होणाऱ्या अंकुराप्रमाणें आपानें रसभावास प्राप्त केलेल्या अन्नापासून हें शरीररूप कार्य उत्पन्न झालें आहे; कोणतेंहि कार्य निर्मूल—कारणावांचून संभवत नाहीं. या शरीराचें अन्नावांचून दुसरें काय मूळ

असणार ? पुत्रा, याच न्यायानें अन्न या कार्यावरून आप हें मूळ जाण, आप या कार्यावरून तेज या मुळाला ओळख व तेज या कार्यावरून 'सत्' या मुळाची कल्पना कर. श्वेतकेतो, या सर्व प्रजांचें मूळ सत् आहे. त्यांचें आश्रय-स्थानहि सत् आहे व अधिष्ठानहि तेंच आहे. पुरुषाला जेव्हां तृषा लागते तेव्हां तेजच त्या प्यालेल्या आपाला सुकवितें. त्या आपांचें शरीर हें कार्य आहे. आपांवरून तेज हें मूळ व तेजावरून सत् हें मूळ ओळखावें. तें सत् सर्व प्राणांचें मूळ, आधार व अधिष्ठान आहे. पुत्रा, मरणोन्मुख पुरुषाची वाक् मनांत, मन प्राणांत व प्राण या सत्-संज्ञक परा देवतेंत लीन होतो. हा जो जीवाचा सूक्ष्मभाव तद्रूप हें सर्व आहे, तेंच सत्य आहे, तोच आत्मा व तेंच सत् तूं आहेस." **श्वेतकेतु**–"भगवन्, मला पुनः हेंच अधिक स्पष्ट करून सांगा." **आरुणि**–"पुत्रा, मधमाशा अनेक वृक्षांचा रस आणून त्याला 'मध' या एका स्वरूपास प्राप्त करवितात. त्यानंतर त्यांतील प्रत्येक रस 'मी या वृक्षाचा आहें, मी या वृक्षाचा आहें,' हें जाणूं शकत नाही, म्ह० मध खाणाराला त्या रसांचा विवेक होत नाहीं. त्याच न्यायानें हे पुत्रा,या सर्व प्रजा सुषुप्ति, मरण व मूर्च्छा या कालीं सत्-मध्यें लीन होतात; पण आम्ही सत्-ला प्राप्त झालों आहों, हें जाणत नाहीत. तर लीन होण्यापूर्वी त्यांतील जे जे व्याघ्र, सिंह, इत्यादि असतात ते तेच होऊन पुनः जागे होतात. अर्थात् सर्व प्रजा ज्यांत प्रविष्ट होऊन पुनः आविर्भूत होतात किंवा सत्याभिसंध ज्ञानी ज्यांत प्रवेश करून पुनः आविर्भूत होत नाहींत तो अणिमाच हें सर्व आहे, तद्रूप सर्व आहे, तेंच सत्य, तोच आत्मा, श्वेतकेतो, तेंच तूं आहेस."**श्वेतकेतु**–'भगवन्, मला पुनः याचाच उपदेश करा.' **आरुणि**–"पुत्रा, त्याविषयीं दृष्टान्त ऐक–पूर्व, पश्चिम, दक्षिण, इत्यादि दिशांमध्यें वाहणाऱ्या या सर्व पूर्वादिवाहिनी नद्या समद्रांतून मेघांनीं आकर्षण करून घेतल्यामुळें व वृष्टिरूपानें पुनः खालीं आल्यामुळें समुद्रापासूनच जरी आलेल्या असल्या तरी त्या समुद्रापासून आल्या आहेत हें कळत नाहीं. त्या समुद्राला मिळाल्यावर समुद्रच होतात. मग ही गंगा, ही नर्मदा इत्यादि त्यांचा विवेक होत नाहीं, त्याप्रमाणें या सर्व प्रजा सत्-मध्यें जाऊन मिळतात व त्यापासूनच येतात. पण आम्ही सत्-मध्यें एकरूप झालों होतों व त्यापासूनच आविर्भूत झालों आहों, हें जाणत नाहींत.

तर पूर्व पुण्य-पापाप्रमाणें व्याघ्रादि ज्या ज्या शरीरांत असतात तें तेंच होऊन देहभानावर येतात. हे श्वेतकेतो, हा सद्-अणिमाच हें सर्व आहे. तोच आत्मा, तें सत्च तूं आहेस " **श्वेतकेतु**–'भगवन् पुनः हेंच सांगा.' **आरुणि**– " पुत्रा, या मोठ्या वृक्षाच्या मुळावर, मध्यभागीं किंवा अग्रावर कोणी कुऱ्हाडीनें प्रहार केल्यास तो मरत नाही. तर रसस्राव करितो, त्याच्या अंगांतून रस गळतो. पण तो जिवंत रहातो. तो आत्म्यानें व्याप्त असतो, पुष्कळ पाणी पितो व तृप्त होऊन राहतो पण त्याची एक शाखा रोगग्रस्त झाली किंवा कोणीं तोडली तर तिला जीव सोडतो. त्यामुळें ती सुकते. दुसऱ्या शाखेला जीवानें सोडलें तर तीहि सुकते. सर्व वृक्षाला जीवानें सोडलें तर तो सर्व सुकतो, असेंच हें समज. जीव ज्याला सोडतो तें सर्व मरतें. पण जीव शरीराबरोबर मरत नाही. तो जो अणिमा तेंच हें सर्व, तोच आत्मा. हे पुत्रा तेंच तूं आहेस. " **श्वेतकेतु**–'महाराज, पण या अतिसूक्ष्म सत्-पासून हें सर्व स्थूल जगत् कसें होतें? ' **आरुणि**–" पुत्रा, या वटवृक्षाचें फल आण. तें फोड. त्यांत काय दिसतें ? कांहीं नाहीं. पुत्रा, त्या न दिसणाऱ्या सूक्ष्म बीजापासूनच जसा हा एवढा मोठा वटवृक्ष झाला आहे तसेंच अति सूक्ष्म सत्-पासून हें सर्व स्थूल जगत् झालें आहे, या माझ्या सांगण्यावर तूं दृढ विश्वास ठेव. तें सूक्ष्म सत् च हें सर्व आहे. तो आत्मा आहे. तेंच तूं आहेस. पुत्रा, या पात्रांतील उदकांत हा मिठाचा मोठा खडा आतां टाकून ठेव व उद्यां सकाळीं हें पात्र मजपाशीं घेऊन ये. " श्वेतकेतूनें त्याप्रमाणें केलें. आपल्या आज्ञेप्रमाणें पुत्र तें पात्र घेऊन आला आहे, असें पाहून आरुणि म्हणाला–" वत्सा, काल या उदकांत टाकलेलें लवण वर काढ. " श्वेतकेतु त्यांत हात घालून पाहूं लागला. पण त्याच्या हाताला तें मीठ अंशःतहि लागेना. तेव्हां पिता म्हणाला–"वत्सा, तूं टाकलेलें तें लवण यांत विरून गेलें आहे. तथापि तूं या जलाच्या वरून, खालून व मध्यभागांतून पाणी घेऊन आचमन कर व कसें लागतें तें सांग. " श्वेतकेतूनें त्यांतील निरनिराळ्या ठिकाणच्या पाण्याचें आचमन केलें व तें त्याला एकसारखेंच खारट लागलें. तेव्हां पित्याच्या आज्ञेनें तें पाणी टाकून देऊन परत येतांना ' कालचें मीठ या पाण्यांतच ओतप्रोत भरून राहिलें आहे ' असें तो बोलला. तें ऐकून

आरुणि म्हणतो–"पुत्रा, तें लवण उदकांत विद्यमान असूनहि तुला जसें दिसलें नाहीं, तसेंच शरीरांत विद्यमान असलेलें सत् दिसत नाहीं. पण आचमन या उपायानें लवणाविषयीं तुझा जसा निश्चय झाला त्याचप्रमाणें विचारानें शरीरांतील सत्-चाहि तुला निश्चय करतां येईल. तें सत्च हें सर्व आहे, तेंच आत्मा व तेंच तूं आहेस. पुत्रा, चोरांनी गांधार देशांतून एखाद्याला डोळे बांधून आणावें व तशाच स्थितीत त्याला अरण्यांत सोडून जावें, मग तो चारी दिशांकडे तोंड करून 'अरे, मला चोरांनीं बांधून आणलें व येथें तसेंच सोडलें. मला कोणी तरी साह्य करा. माझ्या डोळ्यांवरील बंधन सोडून मला माझ्या गांधारदेशाचा रस्ता सांगा' असें मोठ्यानें ओरडूं लागतो. त्याचा तो आक्रोश ऐकून एखाद्या कारुणिकाला त्याची दया येते. तो त्याचें बंधन सोडून 'गांधार देश या बाजूला आहे. तूं असा उत्तरेस जा' असें सांगून मार्गाला लावून देतो व तो बुद्धिमान् पुरुष विचारीत विचारीत स्वस्थानी जातो; त्याचप्रमाणें अविवेकचोरानें जगदात्मरूप सत्-पासून दूर करून, अज्ञानपटलानें ज्ञानचक्षु बांधून, भौतिक देहरूप अरण्यांत सोडलेला जीव सुख-दुःखमय अनेक वेदनांनी व्याकुल होऊन आक्रोश करूं लागतो. त्याला सत्कर्माच्या परिपाकामुळें जेव्हां एखाद्या सत्-ब्रह्मज्ञाचा सहवास घडतो तेव्हां तो दयाळु आचार्य त्याला संसारांतील दोष दाखवितो. 'तूं संसारी नाहींस, सद्ब्रह्म आहेस,' असा उपदेश करितो. त्यामुळें तो विरक्त होतो. विचार करितो. सन्मार्गस्थ होतो. त्याचें अविद्यापटल नाहींसें होतें व सदात्म्याला प्राप्त होऊन नित्य सुखी होतो. अर्थात् आचार्यवान् पुरुषच आत्म्याला जाणतो. आत्मज्ञान झाल्यावर त्याच्या विदेह कैवल्याला शरीरपात होईं तोंच अवकाश असतो. प्रस्तुत शरीर मृत होऊन पडलें कीं तो सत्संपन्न होतो. सदात्मरूप होतो. श्वेतकेतो, तें सत्च तूं आहेस. पुत्रा, ज्वरादिकांमुळें मरणोन्मुख झालेल्या पुरुषापाशीं त्याचे आप्तसंबंधी बसतात व 'मला जाणतोस का? मी कोण?' इत्यादि विचारतात. पण त्याची वाक् मनांत, मन प्राणांत, प्राण भौतिक तेजांत व तेज परा देवतेंत जोंवर उपसंहृत होत नाहीं तोंवर तो इतरांना ओळखितो. पण त्या सर्वांचा सद्रूप परा देवतेंत लय झाल्यावर तो कोणालाहि ओळखीत नाहीं. तें सूक्ष्म सत्-च हें सर्व आहे, तेंच आत्मा व तेंच तूं आहेस. पुत्रा, राजपुरुष एखाद्याचे

हात बांधून आपल्या मुख्याकडे आणितात आणि 'यानें चोरी केली आहे, पण कबूल होत नाही. याला दिव्य करूं दे. याच्या दिव्यासाठीं परशु तापवा' असें म्हणतात. मुख्य राजपुरुष तापवून लाल केलेली कुऱ्हाड त्याच्या हातांत देऊन त्याला दिव्य करावयास लावितो. त्यानें जर खरोखरच चोरी केली असली व मिथ्या भाषणानें आपल्याला मिथ्या करीत असला तर तें परशुग्रहणरूप दिव्य करितांना त्याचा हात भाजतो व राजपुरुष त्याला ताडन करितात. पण तो जर चौर्यकर्ता नसला व सत्य भाषणानें स्वतःला सत्य करीत असला तर सत्यानेंच स्वतःला झांकून घेतलेल्या त्याचा हात तप्त परशुग्रहण करूनहि भाजत नाहीं. त्यामुळें राजपुरुष त्याला सोडून देतात. असत्य प्रतिज्ञा करणाराचा हात भाजतो व सत्याभिसंध पुरुषाचा हात तप्त परशूचें ग्रहण करूनहि भाजत नाहीं, याच न्यायानें मरणसमयीं विद्वान् व अविद्वान् यांची सत्संपत्ति एकसारखी जरी असली म्ह० ते दोघेहि जरी सद्रूप मूल कारणाला प्राप्त होत असले तरी विद्वान् पुनः शरीर धारण करीत नाही व अविद्वान् आपल्या शुभाशुभ कर्माप्रमाणें शरीर धारण करितो. श्वेतकेतो, हें सर्व सद्रूप आहे. सत्च सत्य आहे. तोच आत्मा आहे व तेंच तूं आहेस." हें ऐकून श्वेतकेतूला आत्मज्ञान झालें. (६)

'भगवन्, मला आत्म्याचा उपदेश करा' असें म्हणत नारद सनत्कुमारास शरण गेला, नारदानें यथाविधि गुरूपसदन केलें. तेव्हां सनत्कुमार-आचार्य म्हणतो—'तूं आत्म्यासंबंधी जें कांहीं जाणत असशील तें सर्व मला सांग व मग उपसन्न हो. म्हणजे मग त्यापुढें मी तुला सांगेन.' तेव्हां नारदानें 'मी ऋग्वेदादि चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें म्ह० चवदा विद्या, चवसष्ट कला इत्यादि सर्व जाणतों. पण भगवन्, मी नुस्ता मंत्रवेत्ता आहें. आत्मवेत्ता नाहीं. आत्मवेत्ता शोकाचें उल्लंघन करून जातो, असें मीं आपल्यासारख्यांच्या तोंडून ऐकलें आहे. पण मी आत्मज्ञ नसल्यामुळें फार संतप्त होत आहें. मला फार मनस्ताप होतो. आपण मला त्यापासून सोडवा' अशी प्रार्थना केली. तेव्हां सनत्कुमार म्हणतो—" तूं जें हें ऋग्वेदादिकांचें अध्ययन केलें आहेस तें सर्व नाम आहे. यास्तव तूं 'नाम ब्रह्म आहे' अशी उपासना कर. अशी उपासना करणाराचा नामाच्या विषयांत यथेष्ट संचार होतो."

नारद–' भगवन्, नामाहून अधिक असें कांहीं आहे का?' **सनत्कुमार**–"वाक् नामाहून अधिकतर आहे. कारण तीच ऋग्वेदादि सर्व विद्या, कला, भूतें, भौतिक पदार्थ, देव-मनुष्य-पशु-पक्ष्यादि, धर्म-अधर्म, सत्य-अनृत, चांगलें-वाईट, हृदयप्रिय व अप्रिय इत्यादिकांचें ज्ञान करून देते. वाक्-च्या अभावीं धर्माधर्मादिकांतील कशाचेंच ज्ञान झालें नसतें. वाक्च ह्या सर्वांचें ज्ञान करून देते. यास्तव ' वाक् ब्रह्म आहे ' अशी उपासना कर. वाक्हून मन अधिकतर आहे. वाक् व नाम हीं दोन्ही मनांत अन्तर्भूत होतात. मनःसंकल्पानेंच प्राण्याचा सर्व व्यवहार होतो. यास्तव ' मन ब्रह्म आहे ' अशी उपासना कर. मनाहून संकल्प अधिकतर आहे. संकल्पानेंच मनःप्रभृति सर्वांचा व्यवहार सुरू होतो. संकल्पच सर्वाधार आहे. संकल्पामुळेंच सर्व आपापलें कार्य करण्यास समर्थ होतें. यास्तव संकल्पाची उपासना कर. संकल्पाहून चित्त अधिकतर आहे, चित्ताहून ध्यान, ध्यानाहून विज्ञान, विज्ञानाहून बल, बलाहून अन्न, अन्नाहून आप्, आपाहून तेज, तेजाहून आकाश, आकाशाहून स्मर, स्माराहून आशा व आशेहून प्राण अधिकतर आहे." नंतर त्यांतील प्रत्येकाचें महत्त्व, प्रत्येकाची ' उपासना कर, ' असें विधान व त्याच्या त्याच्या विषयांत यथाकाम संचार, वगैरे त्याचें फल सांगितल्यावर सनत्कुमार म्हणतो–" प्राणच सर्वाधार आहे. प्राणच पिता, माता, भ्राता वगैरे आहे. पिता, माता इत्यादिकांच्या शरीरांत प्राण असेपर्यंतच पुत्रादिकांनीं त्यांचा तिरस्कार केल्यास लोक त्यांना दोष देतात. पण त्यांच्या शरीरांतून प्राण निघून गेल्यावर त्यांच्या शरीराचे तुकडे करून त्यांना जरी जाळलें तरी पुत्रादिकांना कोणी दोष देत नाहींत. यास्तव प्राणच हें सर्व आहे, असें जाणणारा अतिवादी होतो. त्याला कोणीं ' अतिवादी ' ह्मटल्यास ' होय, मी अतिवादी आहें ' असेंच त्यानें कबूल करावें. ' नाहीं ' असें म्हणूं नये. कारण सत्य आत्म्याच्या ज्ञानामुळें तो अतिवादी होतो. यास्तव सत्याची जिज्ञासा करावी. पुरुष जेव्हां जाणतो तेव्हांच सत्य बोलतो, त्यावांचून नाही. यास्तव विज्ञानाला जाणावें. जेव्हां मनन करितो तेव्हां विज्ञान होतें. यास्तव मतीला जाणावें. जेव्हां श्रद्धा ठेवतो तेव्हां मनन करितो. यास्तव श्रद्धेला जाणावें. जेव्हां निष्ठा ठेवतो तेव्हां श्रद्धा उत्पन्न होते. यास्तव निष्ठेला–गुरुशुश्रूषादि तत्परतेला जाणावें. कृतीनें निष्ठा होते. यास्तव

कृतीला जाणावें. जेव्हां सुख होतें तेव्हां कृति करितो. यास्तव सुखाला जाणावें. जें निरतिशय महत् तत्त्व—भूमा तेंच सुख. अल्प—परिच्छिन्न वस्तूंत सुख नाहीं. यास्तव भूमालाच जाणावें. ज्या अवस्थेंत स्वरूपाहून निराळें असें कांहीं पहात, ऐकत वगैरे नाहीं, तो भूमा व ज्या अवस्थेंत अन्य साधनानें अन्य विषय पाहतो, ऐकतो वगैरे तें अल्प. भूमाच अमृत आहे. जें अल्प असतें तें मर्त्य होय. तो भूमा स्वतःच्या माहात्म्यांत स्थित आहे. पण वस्तुतः तो स्वमहिम्यांतहि स्थित नाहीं. कारण एक वस्तु दुसऱ्या वस्तूंत राहते. भूमा एकच अद्वितीय आहे. पशु, सुवर्ण, भृत्य, पवित्र स्थानें इत्यादि हा सर्व त्याचा महिमा आहे, असें ह्मणतात. पण मी तसें ह्मणत नाहीं. तर 'तोच खालीं, वर, पुढें, मागें इत्यादि सर्वत्र पसरलेला आहे, तोच हें सर्व आहे,' असें मी म्हणतों. 'मीच वर, खालीं, पुढें, मागें, बाजूला आहें, मी हें सर्व आहें,' हा अहंकारादेश आहे. 'आत्माच खालीं, वर, पुढें, मागें, बाजूला व हें सर्व आहे,' हा आत्मादेश होय. असें पाहणारा, मनन करणारा विशेषतः जाणणारा, आत्मरति, आत्मक्रीड, आत्मानंद होतो. तो स्वराट् होतो. सर्व लोकांत त्याचा यथेष्ट संचार होतो. पण असें न जाणणारे परतंत्र होतात. त्यांचें फल विनाशी असतें. त्यांचा सर्व लोकांत यथेच्छ संचार होत नाहीं. असें पाहणाऱ्या, मनन करणाऱ्या व जाणणाऱ्या विद्वानाच्या आत्म्यापासूनच पूर्वोक्त प्राणापासून उलट क्रमानें नाम, मंत्र, कर्म येथपर्यंत हें सर्व झालें आहे. याविषयी एका मंत्रानें असें म्हटलें आहे—'विद्वान् मृत्यु, रोग व दुःखता यांचा अनुभव घेत नाहीं. तो सर्व सर्वतः पाहतो. तो एकधा, त्रिधा इत्यादि शत-सहस्रान्त होतो.' विषयानुभवरूप आहाराची शुद्धि झाली असतां चित्तशुद्धि होते. चित्तशुद्धि झाली असतां नित्य अविस्मरण होतें. अविच्छिन्न स्मृति झाली असतां संशय-विपर्यय-अहंकार-ममत्वादि सर्व हृदयग्रंथी तुटतात." याप्रमाणें निष्पाप झालेल्या—राग-द्वेषशून्य झालेल्या नारदाला भगवान् सनत्कुमारांनीं अविद्यातमाच्या पार असलेलें आत्मतत्त्व दाखविलें. त्यांनाच स्कंद ह्मणतात. (७)

या शरीराख्य ब्रह्मपुरांत जें अति अल्प हृदयपुंडरीक आहे व त्याच्या आंत जें सूक्ष्म आकाश आहे त्याचाच शोध करावा, त्यालाच जाणावें. 'त्यांत शोध करण्यासारखें, जाणण्यासारखें काय आहे' असें कोणीं विचारल्यास आचार्यांनीं

असें उत्तर द्यावें–' जेवढें हें बाह्य महा-आकाश आहे तेवढेंच तें हृदयांतील आकाश आहे. त्याच्या आंत द्यावा-पृथिवी, अग्नि-वायु-सूर्य-चंद्र, नक्षत्रें-विद्युत व इतर सर्व कांहीं उत्तम प्रकारें ठेवलेलें आहे.' ' अहोपण, या शरीरांतील आकाशांत जर हें सर्व आहे तर जेव्हां हें ब्रह्मपुर जरेनें युक्त होतें किंवा त्याचा विध्वंस होतो तेव्हां त्यांतून काय राहतें ? ' असा शिष्यांनीं प्रश्न केल्यास आचार्यानें म्हणावें–' शरीराच्या जरा-मरणानें हें जरा-मरणयुक्त होत नाहीं. तें ब्रह्म पर सत्य आहे. त्यांत सर्व समाहित आहे. तोच तुमचा आत्मा आहे. तो निष्पाप, जरा-मृत्यु-शोक-क्षुधा-तृषारहित आहे. तो सत्यकाम, सत्यसंकल्प आहे. स्वाराज्याची इच्छा करणांनीं गुरु व शास्त्र यांच्या द्वारा त्या आत्म्याला साक्षात् जाणावें. न जाणल्यास प्रजा राजपरतंत्र जशा असतात, तसे जीव दैवपराधीन होऊन रहातात. त्यांचें पुण्यफलहि पराधीन असतें. या लोकीं कर्मानें संपादन केलेलें फल जसें क्षीण होतें त्याचप्रमाणें परलोकीं पुण्यानें संपादन केलेलें फल क्षीण होतें. जे अधिकारी जीव या लोकीं आत्म्याला न जाणतां व सत्यकामांना प्राप्त न होतां मरून जातात ते सर्व लोकांमध्यें यथेष्ट संचार करूं शकत नाहींत; पण जे याच जन्मी आत्म्याला साक्षात् जाणून व सत्यकामांनीं संपन्न होऊन येथून जातात, ते पूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव घेतात. त्यांचा सर्व लोकांमध्यें यथेष्ट संचार होतो. पितृलोक, मातृलोक, भ्रातृलोक इत्यादि ज्याची ज्याची ते इच्छा करितात तें तें त्यांच्या संकल्पानेंच त्यांच्यापुढें सिद्ध होतें. हे सर्व सत्यकाम असून ते अनृतानें आच्छादित झालेले आहेत. त्यामुळें येथून मरून गेलेला जीव त्याच्या आप्तांना पुनः दिसत नाहीं. पण या विद्वानाला हृदयाकाशाख्य ब्रह्मामध्यें जाऊन सर्व काम प्राप्त होतात. तो आपल्या जिवंत असलेल्या व मृत झालेल्या जीवांस आणि इच्छा करूनहि प्राप्त न झालेल्या इतर पदार्थांस तेथें पाहतो. कारण या हृदयाकाशांतच हे सत्य काम अनृतानें आच्छादित होऊन राहिलेले असतात. भूमींत पुरून ठेवलेल्या सुवर्णनिधीची जागा ठाऊक नसली म्हणजे त्यावरून संचार करणारांनाहि तो निधि जसा सांपडत नाहीं, त्याप्रमाणें या सर्व प्रजा प्रतिदिवशीं सुषुप्तींत त्या ब्रह्मलोकाला जात असूनहि आम्ही ब्रह्मलोकाला प्राप्त झालों आहों हें जाणत नाहींत. कारण अनृत त्यांना बाहेर ओढतें. तोच हा महान् आत्मा हृदयांत आहे. ' हृदि+अयं=

हृदयं,' असें त्याचें निरुक्त आहे. असें जाणणारा प्रत्यहीं हृदयस्थ ब्रह्मलोकास प्राप्त होतो. हा विद्वान् 'शरीरच मी' हा भाव टाकून परमात्मज्योतीला प्राप्त होऊन स्वरूपानें निष्पन्न होतो. तो आत्मा अमृत, अभय व ब्रह्म आहे. त्याचें सत्य हें नांव आहे. त्यांत 'स, त्, यं' अशीं तीन अक्षरें आहेत. जें सत् तें अमृत, त् हें मर्त्य व 'यं' त्या दोहोंचें नियमन करणारें, अशी उपासना—चिंतन करणारा प्रत्यही सुखरूप ब्रह्मलोकास प्राप्त होतो.

पूर्वोक्त आत्मा हा सर्व लोकांचें धारण करणारा सेतु आहे. त्याला अहोरात्र परिच्छिन्न करीत नाहींत, त्याला जरा, मृत्यु, शोक होत नाहीं. सुकृत-दुष्कृत नाहीं. सर्व पुण्य-पापें याच्यापासून निवृत्त होतात. हा ब्रह्मरूप लोक सर्व पापशून्य आहे. पापाचें कार्य अंधत्वादि शरीरवानाच्या ठिकाणींच संभवतें. या अशरीर आत्म्याच्या ठिकाणी तें संभवत नाहीं. त्यामुळें पूर्वीं देहवत्त्वावस्थेंत अंध असलेलाहि जीव या सेतूला प्राप्त होऊन अनन्ध होतो. पूर्वीं विद्ध असलेला अविद्ध होतो. रोगी असलेला अरोगी होतो. हा सेतु अहोरात्ररहित असल्यामुळें त्याला प्राप्त होऊन तमोरूप रात्रहि दिवसच होते. हा ब्रह्मलोक नित्य प्रकाशरूप आहे. जे ब्रह्मचर्याच्या योगानें शास्त्र व आचार्य यांच्या उपदेशानुसार या ब्रह्मलोकास जाणतात त्यांचा सर्व लोकांमध्यें यथेष्ट संचार होतो.

याप्रमाणें सेतुत्वादि गुणांनीं ज्याची स्तुति केली आहे त्या आत्म्याच्या प्राप्तीचें ब्रह्मचर्य हें ज्ञानसहकारी दुसरें साधन आहे. कारण शिष्ट यज्ञ, इष्ट, अनेक यजमानकृत सत्र, उपवास, अरण्यवास इत्यादि जें जें परमपुरुषार्थसाधन म्हणून सांगतात तें तें हें ब्रह्मचर्यच आहे. ब्रह्मलोकांत 'अर' व 'ण्य' या नांवाचे दोन समुद्र किंवा समुद्रासारखीं दोन सरोवरें आहेत. तेथेंच 'ऐरंमदीय-' नांवाचें हर्षोत्पादक सरोवर आहे. अमृताचा स्राव करणारा 'सोमसवन-' संज्ञक अश्वत्थवृक्ष आहे. ब्रह्मचर्यसाधनरहित पुरुषांना कधींच प्राप्त न होणारी अशी 'अपराजिता-'नांवाची नगरी आहे. प्रभु-ब्रह्मानें निर्माण केलेला सोन्याचा मंडप आहे. ब्रह्मचर्य या साधनानें त्या दोन समुद्रांस जे संपादन करितात त्यांसच हा ब्रह्मलोक मिळतो. त्यांचा सर्व लोकांत यथेष्ट संचार होतो.

आठव्या अध्यायाच्या पांचव्या खंडांत सगुणविद्येच्या फलाचें स्वरूप सांगून सहाव्या खंडांत त्याच्या प्राप्तीसाठीं नाडीमार्ग सांगितला आहे. ब्रह्मोपासनेचें

स्थान असें जें हृदय त्यापासून सूर्याच्या किरणाप्रमाणें पिंगट, शुक्ल, नील, पीत व लोहित या रंगांच्या रसांनीं भरलेल्या नाड्या पसरल्या आहेत. आदित्याचेहि तसेच वर्ण आहेत. जसा एखादा विस्तीर्ण मार्ग जवळच्या गावाला जातो व दूरच्या गावालाहि जातो त्याप्रमाणें हे आदित्याचे किरण या व त्या अशा दोन्ही लोकांस जातात. आदित्यापासून निघालेले किरण या नाड्यांमध्यें गेलेले असतात व नाड्यांपासून निघालेले किरण आदित्यांत जातात. जेव्हां हा पुरुष गाढ झोंप घेत असतो तेव्हां तो नाड्यांत गेलेला असतो. त्याला धर्माधर्मादि स्पर्श करूं शकत नाहींत. तो त्यावेळीं तेजानें व्याप्त झालेला असतो. तो जेव्हां रोगादि किंवा जरादि निमित्तानें देहाच्या दुर्बलतेस प्राप्त होतो तेव्हां त्याच्या आसपास बसलेले लोक ' मला ओळखलेंस का ' असें विचारतात. तो या शरीरापासून उत्क्रमण करीपर्यंत त्यांना ओळखितो. पण प्रारब्धकर्म क्षीण होतांच तो जेव्हां शरीर सोडतो तेव्हां पूर्वोक्त सूर्यकिरणांनीच वर जाऊं लागतो. अविद्वान् सूर्यकिरणांच्या द्वाराच स्वकर्मार्जित लोकास जातो व पूर्वोक्त सर्व साधनांनीं संपन्न असलेला विद्वान् ' ओं ' असें म्हणून आत्म्याचें ध्यान करीत ऊर्ध्व लोकीं जातो. जेवढ्या अवकाशांत मन आदित्यापर्यंत जातें तेवढ्याच कालांत तो विद्वान् सूर्यापर्यंत जाऊन पोंचतो. म्ह० तो सूर्यलोकी सत्वर जातो, असा याचा भावार्थ. कारण आदित्य हें ब्रह्मलोकाचें द्वार आहे. विद्वानांच्या ब्रह्मलोकप्राप्तीचें साधन आहे व अविद्वानांना निरोध करणारें आहे. सूर्याचें तेज अविद्वानांचा देहांतच निरोध करितें. त्यांना मूर्धन्य नाडीनें उत्क्रमण करूं देत नाहीं. याविषयीं ' शतं चैका च हृदयस्य नाड्यः ' इत्यादि मंत्र प्रमाण आहे. मागें पृ. ८० व ४७७ पहा.

आठव्या अध्यायाच्या सात ते बारा खंडांत इंद्र-विरोचनांच्या विद्याप्राप्तीची कथा आहे. प्रजापतीनें ' य आत्माऽपहतपाप्मा विजरो विमृत्युः० ' इत्यादि म्हटलें. तें ऐकून देवांचा राजा इंद्र व असुरांचा राजा विरोचन ' ज्याच्या ज्ञानानें सर्व लोक व सर्व काम प्राप्त होतात त्याला आपण जाणूं ' अशा आशयानें मोठ्या विनयानें प्रजापतीपाशीं आले व बत्तीस वर्षें ब्रह्मचर्यानें राहिले. तेव्हां प्रजापतीनें ' तुम्ही कोणत्या इच्छेनें येथें आला आहां ' असें त्यांस विचारलें. ते म्हणाले—" आपण ' य आत्मापहतपाप्मा० ' इत्यादि ज्याचें

वर्णन केलेंत त्याला जाणण्याच्या इच्छेनें आम्ही येथें राहिलों आहों. तेव्हां हे दोघेहि निर्दोष व तपस्वी आहेत, असें पाहून प्रजापति म्हणाला—" अन्तर्मुख योग्यांना नेत्रांत हा जो पुरुष दिसतो तो आत्मा, तेंच अमृत, अभय ब्रह्म आहे. " अर्थात् प्रजापतीनें त्यांना जागरिताभिमानी विश्वाचा उपदेश केला. पण चित्तदोषामुळें त्यांना यथार्थ बोध झाला नाहीं. ' जो पाण्यांत किंवा आरशांत छायात्मा दिसतो त्यांतील खरा आत्मा कोणता ? ' असें त्यांनीं प्रजापतीला विचारलें. तेव्हां तो म्हणाला " मीं सांगितलेला चक्षुःपुरुष या सर्वांमध्यें प्रतीत होत आहे. यास्तव तुम्ही उदकपूर्ण पात्रांत आपल्याला पाहून त्यांत तुम्हांला आत्म्याविषयीं जें कळणार नाही तें मला सांगा " त्या दोघांनीं त्याप्रमाणें उदकपात्रांत पाहिलें व प्रजापतीनें ' काय पाहिलेंत ? ' असें विचारलें असतां ' भगवन्, आम्ही यांत आपल्यालाच नखाशिखांत जसेच्या तसेच पहात आहों.' असें म्हटलें. प्रजापतीनें त्यांना उत्तमप्रकारें अलंकृत होऊन जलपात्रांत पहावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं पाहिलें व ' आम्ही जसे भूषित आहों तसेच हे छायात्मे भूषित व अलंकृत आहेत. ' असा त्यांनी आपला अनुभव सांगितला. प्रजापति म्हणाला—' तोच आत्मा, तेंच अमृत, अभय ब्रह्म आहे.' तेव्हां ते दोघेहि शांतचित्त होऊन गेले. प्रजापतीनें ' तोच आत्मा० ' इत्यादि जें म्हटलें तें अक्षिपुरुषाला उद्देशून आहे. छायात्म्याला उद्देशून नाहीं. तथापि छायात्म्याला आत्मा समजून हे दोघे येथून जात आहेत असें पाहून प्रजापति म्हणाला—" आत्म्याला साक्षात् न जाणतां हे दोघे येथून जात आहेत. यास्तव देवासुरादिकांतील जे कोणी यांच्या सारखे मिथ्या आत्मज्ञानी होतील त्यांचा पराभव होईल. ते श्रेयोमार्गापासून भ्रंश पावतील. " विरोचन स्वतःला कृतार्थ मानून स्वस्थानीं गेला. त्यानें असुरांना ' येथें देहच पूज्य व परिचरणीय आहे. देहाचीच पूजा व परिचर्या करणारा इह-पर लोकांस प्राप्त होतो ' इत्यादि उपदेश केला. अदात्या, अश्रद्धालु व सदाचारशून्य मनुष्याला आतांहि असुर म्हणतात. या मताचे लोक प्रेताला अन्न-पुष्प-वस्त्रालंकारादिकांनीं संस्कार करितात. त्या संस्कारानेंच तो मृत परलोक जिंकील असें समजतात.

पण इंद्र देवांपर्यंत येण्यापूर्वीच त्याच्या मनांत असा विचार आला—" शरीराला वस्त्रालंकारादिकांनीं भूषित केलें म्हणजे त्याचें प्रतिबिंब तसें दिसतें, देह

लंगडा, थोटा, आंधळा, नकटा असला तर त्याची छायाहि तशीच दिसते. शरीर नाश पावलें कीं हाहि नाश पावतो. तेव्हां या आत्मज्ञानांत मला कांहींच फल दिसत नाहीं." असा विचार करून तो पुनः प्रजापतीकडे परत आला. त्यानें येण्याचें कारण विचारलें असतां इंद्रानें आपली वरील शंकाच त्याच्या पुढें व्यक्त केली. तेव्हां ' खरें आहे. छाया हा खरा आत्मा नव्हे. मी तुला पुनः सांगेन. तूं आणखी, बत्तीस वर्षें येथें रहा ?' असें प्रजापति बोलला इंद्रानें बत्तीस वर्षें ब्रह्मचर्यवास केल्यावर 'हा जो स्वप्नांतील भोग भोगतो तो आत्मा' असें म्हणून प्रजापतीनें त्याला आत्म्याचा दुसरा पाद—तैजस सांगितला.इंद्र शांत चित्तानें देवांकडे परत निघाला. तों रस्त्यांतच त्याला अशी शंका आली. 'हा स्वाप्न पुरुष शरीराच्या अंधत्वादि दोषांनीं दूषित होत नाहीं हें खरें, तथापि त्यालाहि कोणी मारतात, पळवितात, तो अप्रिय पाहतो, रडतो, त्यामुळें या आत्मज्ञानांतहि मी कांहीच फल पहात नाहीं.' असें बोलून तो पुनः प्रजापतीकडे आला. त्यानें आपली शंका त्याला सांगितली. पूर्वी प्रमाणेंच पुनः सांगण्याचें आश्वासन देऊन प्रजापतीनें त्याला बत्तीस वर्षें रहावयास सांगितलें. इंद्राचें व्रत पुरें झाल्यावर प्रजापतीनें त्याला सुषुप्त पुरुषाचा म्ह० आत्म्याच्या ' प्राज्ञ-'संज्ञक तिसऱ्या पादाचा उपदेश केला. इंद्राचें क्षणिक समाधान झालें. तो स्वलोकीं जाण्यासाठीं परतला. पण त्याला पुनः रस्त्यांतच अशी शंका आली—'पण हा सुषुप्त पुरुष स्वतःला किंवा दुसऱ्या कोणालाच जाणत नाहीं. जणुं काय विनाश पावल्यासारखाच होतो. या आत्मदर्शनांतहि मला विशेष फल दिसत नाहीं' असें म्हणून तो परतला.प्रजापतीनें त्याला परत येण्याचें कारण विचारिलें.इंद्रानें आपली शंका सांगितली. प्रजापतीनें 'ती बरोबर आहे, मी तुला हेंच पुनः सांगतों. आणखीं पांचच वर्षें येथें वास कर' असें म्हटलें. इंद्रानें अशी एकशें एक वर्षें तपश्चर्या केली.त्यामुळें त्याचें चित्त शुद्ध झालें. तो ज्ञानाधिकारी झाला. तेव्हां तुरीय ब्रह्माचा उपदेश करून त्याला कृतार्थ करण्यासाठीं प्रजापति ह्मणाला—' इंद्रा, हें शरीर मरणधर्मी आहे. मृत्यूनें ग्रासलेलें आहे. तें या अमृत व अशरीर आत्म्याचें अधिष्ठान आहे. पण ' तें शरीरच मी ' असें म्हणणारा आत्मा प्रिय व अप्रिय यांनीं युक्त—ग्रासलेला असा होतो. तो शरीराभिमानी असेपर्यंत त्याच्या प्रियाप्रियांची हानि —नाश होत नाहीं. शरीराभिमान सोडल्यावर मात्र स्वभावतः अशरीर असलेल्या याला प्रिय व अप्रिय स्पर्श करीत नाहींत. वायु, अभ्र, विद्युत्, मेघ इत्यादि

वस्तुतः अशरीर असूनहि आकाशापासून उत्पन्न होऊन, सूर्याच्या ज्योतीस प्राप्त होऊन, आपापल्या रूपानें व्यक्त होतात, आपापलें कार्य करूं लागतात. त्याप्रमाणें विद्वान् अविद्याप्राप्त देहाभिमान सोडून, परमात्मज्योतीस प्राप्त होऊन, आपल्या स्वाभाविक रूपानें निष्पन्न होतो. तो उत्तम पुरुष होय. तो हंसतो, क्रीडा करितो, स्त्रिया, यानें, ज्ञातिजन यांच्याशीं रममाण होतो. पण त्या सर्वांच्या अगदीं समीप असलेल्या या शरीराला स्मरत नाहीं. गाडीला जोडलेला घोडा किंवा बैल जसा तिला ओढून नेतो त्याप्रमाणें शरीरांत प्राण जोडला आहे. तो त्याला त्याच्या प्रारब्धप्राप्त कर्मांत प्रवृत्त करितो. जागरितांत तो आत्माच चाक्षुष पुरुष होतो. त्याच्या रूपदर्शनासाठीं चक्षु आहे. जो मी वास घेईन, बोलेन, ऐकेन इत्यादि म्हणतो तो आत्मा असून घ्राण, वाक्, श्रोत्र इत्यादि हीं त्याचीं त्या त्या क्रियेचीं साधनें आहेत. 'मी मनन करीन' असें जो कल्पितो तो आत्मा. मन हें त्याचें दिव्य ज्ञानसाधन आहे. तो या आपल्या दिव्य चक्षूनें ब्रह्मलोकांतील सर्व काम पहात रममाण होतो. देव या आत्म्याची उपासना करितात व सर्व लोक आणि काम यांस प्राप्त होतात. दुसराहि जो कोणी असें जाणतो त्यालाहि तसेंच फल प्राप्त होतें. तोहि सर्वात्मा व कृतात्मा होतो.

तेराव्या खंडांत जपासाठीं 'इमामाच्छबलं०-' हा पावन मंत्र सांगितला आहे. चवदाव्यांत ब्रह्माच्या लक्षणाचा निर्देश केला आहे. पंधराव्या खंडांत या विद्येचा संप्रदाय सांगून 'तर मग कर्मठांच्या कर्मांचें कांहीच फल नाहीं,' असें कोणाला वाटूं नये, ह्मणून त्यांनाहि उत्तरायण मार्गानें ब्रह्मलोकप्राप्ति होते, असें कर्मफल सांगितलें आहे.

याप्रमाणें हें उपनिषद् सर्व उपनिषदांहून अधिक महत्त्वाचें आहे. ब्रह्मसूत्र-शारीरमीमांसेंत यांतील वाक्यांचा वारंवार उल्लेख केला आहे. पहिल्या दोन अध्यायांत कर्मांगावबद्ध उपासना व स्वतंत्र ओंकारोपासना सांगितल्यावर तिसऱ्या अध्यायांत मधुविद्या, गायत्रीविद्या, शांडिल्यविद्या; चवथ्यांत संवर्गविद्या-अग्निविद्या-उपकोसलविद्या; पांचव्यांत प्राणविद्या-पंचाग्निविद्या-दक्षिणोत्तर मार्ग-वैश्वानर विद्या सांगून शेवटच्या तीन अध्यायांत शुद्ध आत्मविद्या सविस्तर, सोपपत्तिक व आख्यायिकांसह सांगितली आहे. त्यामुळें ती फार सुबोध झाली आहे.

अथ बृहदारण्यकोपनिषद्.

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

प्रथमाध्यायः ।

हें वाजसनेयिब्राह्मणोपनिषद् आहे. तें फार मोठें असल्यामुळें बृहत् व अरण्यांत म्हणावयाचें असल्यामुळें आरण्यक होय. वेदाच्या पूर्वकांडांत कर्म सांगितलें आहे. त्यांतील फलाच्या इच्छेनें केलेलें जें कर्म तें प्रवृत्त कर्म व ज्ञानपूर्वक निष्काम कर्म हें निवृत्त कर्म आहे. सकाम कर्म व उपासना यांचें फल क्रमानें स्वर्गसंज्ञक पितृलोक व देवतात्मभाव हें आहे तथापि तें संसारांतच अन्तर्भूत होतें. निवृत्त कर्मानें चित्तशुद्धि होते, उपासनेनें चित्ताचें ऐकाग्र्य होतें व ज्ञानानें स्वरूपावस्थानरूप मोक्ष होतो. यास्तव संसाराविषयीं विरक्त झालेल्या पुरुषाच्या अविद्येची निवृत्ति व्हावी म्हणून ब्रह्मविद्याप्रधान अशा या उपनिषदाचा आरंभ झाला आहे. अश्वमेध हा सर्व क्रतूंतील प्रधान क्रतु आहे. पण त्याचेंहि उपासनेसह अनुष्ठान जरी केलें तरी संसार हेंच जर फल मिळतें तर अग्निहोत्रादि इतर कर्मांची काय कथा, असा विचार करून बंधाला कारण होणाऱ्या कर्मराशीविषयीं विरक्त झालेल्या साधनचतुष्टयसंपन्न पुरुषानें कर्मसंन्यासपूर्वक श्रवणादि साधनांमध्यें प्रवृत्त व्हावें, म्हणून श्रुतीनें विद्येच्या आरंभीं दोन ब्राह्मणांत उपासना सांगितली आहे. अश्वमेधांत अश्वाला प्राधान्य असल्यामुळें पहिल्या ब्राह्मणांत अश्वसंबंधी दृष्टि सांगितली जात आहे—

ॐ उषा वा अश्वस्य मेध्यस्य शिरः । सूर्यश्चक्षुर्वातः प्राणो व्यात्तमग्निर्वैश्वानरः संवत्सर आत्माऽश्वस्य । द्यौः पृष्ठमन्तरिक्षमुदरं पृथिवी पाजस्यं दिशः पार्श्वे अवान्तरदिशः पर्शव ऋतवोऽङ्गानि मासाश्चार्धमासाश्च पर्वाण्यहोरात्राणि प्रतिष्ठा

नक्षत्राण्यस्थीनि नभो मांसानि। ऊवध्यꣳसिकताः सिन्धवो गुदा यकृच्च क्लोमानश्च पर्वता ओषधयश्च वनस्पतयश्च लोमान्युद्यन्पूर्वार्धो निम्लोचञ्जघनार्धो यद्विजृम्भते तद्विद्योतते यद्विधूनुते तत्स्तनयति यन्मेहति तद्वर्षति वागेवास्य वाक् ॥

अन्वयार्थ—[उषा वै मेध्यस्य अश्वस्य शिरः—] उषा—ब्राह्ममुहूर्त हें यज्ञिय अश्वाचें शिर आहे. [सूर्यः चक्षुः०—] सूर्य चक्षु आहे. वात प्राण आहे. [वैश्वानरः अग्निः व्यात्तं—] वैश्वानर नांवाचा अग्नि, हें उघडलेलें मुख आहे. [संवत्सरः अश्वस्य आत्मा—] संवत्सर हा त्या यज्ञिय अश्वाचा आत्मा—शरीर आहे. [द्यौः पृष्ठं०—] द्युलोक ही पाठ आहे. अन्तरिक्ष हें उदर आहे. पृथ्वी ही त्याची पाय ठेवण्याची जागा आहे. दिशा ह्या त्या अश्वाच्या कुशी आहेत. आग्नेय्यादि अवान्तर दिशा ह्या बरगड्या—कुशींतील हाडें आहेत. ऋतू हीच त्या अश्वाची इतर अंगें, मास व अर्धमास हीं पर्वें—पेरें—सांधे आहेत. अहोरात्र हेच पाय आहेत. नक्षत्रें या अस्थी आहेत. आकाशस्थ मेघ हींच त्याच्या उदरांतील मांसें आहेत. वाळू हेंच त्याच्या उदरांतील अर्धपक्व अन्न आहे. नद्या ह्याच त्या अश्वाच्या शरीरांतील रक्तवाहिन्या नाड्या आहेत. पर्वत हेंच त्याचें यकृत् व क्लोम—हृदयाच्या खालचा डावीकडील मांसाचा भाग आहेत. ओषधी हे त्याचे लोम व वनस्पती केंस आहेत. उदय पावणारा सूर्य हा त्याचा पूर्वार्ध व अस्त पावणारा सूर्य हा अपरार्ध आहे; तो अश्व आपलीं गात्रें जीं लांब करतो किंवा जांभयी देतो तेंच विजेचें चमकणें आहे. तो आपलीं गात्रें जीं हालवितो तोच मेघांचा गडगडाट आहे. तो जो मूत्रोत्सर्ग करतो तोच वर्षाव आहे. त्याचें खिंखाळणें हीच त्याची वाक् आहे. १. 'महिमा' या नांवाचे दोन ग्रह—हवनीय द्रव्यें ठेवण्याचीं विशेष पात्रें—अश्वाच्या संज्ञपनापूर्वी व मागून स्थापिले जातात. त्यांतील एक सोन्याचा व दुसरा रुप्याचा ग्रह असतो. त्याविषयींची दृष्टि पुढील कंडिकेंत सांगितली जाते—

अहर्वा अश्वं पुरस्तान्महिमाऽन्वजायत तस्य पूर्वे समुद्रे योनी रात्रिरेनं पश्चान्महिमाऽन्वजायत तस्यापरे समुद्रे योनिरेतौ वा अश्वं महिमानावाभितः संबभूवतुः। इयो

**भूत्वा देवानवहद्वाजी गन्धर्वानर्वाऽसुरानश्वो मनुष्या-
न्त्समुद्र एवास्य बन्धुः समुद्रो योनिः ॥ २**

इति प्रथमाध्यायस्य प्रथमं ब्राह्मणम् ॥ १

अन्वयार्थ—[अश्वं पुरस्तात् महिमा अन्वजायत–] अश्वाला अनुलक्षून सुवर्णाचा 'महिमा' या नांवाचा ग्रह अश्वाला मारण्याच्या पूर्वी प्रवृत्त झाला. [अहः वै–] त्याच्या ठिकाणीं अहर्दृष्टि करावी. [तस्य पूर्वे समुद्रे योनिः–] त्या ग्रहाची पूर्व समुद्र ही योनि आहे. [एनं पश्चात् रात्रिः महिमा अन्वजायत–] त्याला अनुलक्षून त्याचें संज्ञपन केल्यावर रात्र हा महिमा प्रवृत्त झाला. [तस्य अपरे समुद्रे योनिः–] त्याची अपर समुद्र ही योनि आहे. [एतौ वै महिमानौ अश्वं अभितः संबभूवतुः–] 'महिमा' या नांवाचे हे दोन ग्रह अश्वाच्या पूर्वी व मागून झाले आहेत. [हयः भूत्वा देवान् अवहत–] तो हय म्हणजे विशिष्ट गतिमान् होऊन देवांस वाहणारा झाला; [वाजी गंधर्वान्–] वाजी होऊन गंधर्वांस वाहता झाला; [अर्वा असुरान्–] अर्वा होऊन असुरांस वाहता झाला व [अश्वः मनुष्यान्–] अश्व होऊन मनुष्यांस वाहता झाला. [समुद्रः एव अस्य बंधुः–] समुद्र म्हणजे परमात्माच याचें बंधनस्थान व [समुद्रः योनिः–] तोच उत्पत्तीचें कारण आहे. २ (१)

–आतां अश्वमेधोपयोगी अग्नीची उत्पत्ति तद्विषयक दर्शन–उपासना सांगण्याच्या इच्छेनें स्तुत्यर्थ सांगितली जाते—

**नैवेह किंचनाग्र आसीन्मृत्युनैवेदमावृतमासीत् । अशनायया-
शनाया हि मृत्युस्तन्मनोऽकुरुताऽऽत्मन्वी स्यामिति । सोऽर्च-
न्नचरत्तस्यार्चत आपोऽजायन्तार्चते वै मे कमभूदिति तदेवा-
र्कस्यार्कत्वं कꣳह वा अस्मै भवति य एवमेतदर्कस्यार्कत्वं वेद ॥**

अन्वयार्थ—[इह अग्रे किंचन न एव आसीत्–] या संसारांत उत्पत्तीच्या पूर्वी कांहींहि नव्हतें, [मृत्युना एव इदं आवृतं आसीत्–] तर मृत्यूनेंच हें सर्व आवृत केलेलें होतें. [अशनायया–] अशनाया ह्म० खाण्याची इच्छा, या अशनायेनें लक्षित होणाऱ्या मृत्यूनें हें सर्व आवृत होतें. [हि अशनाया मृत्युः–] कारण अशनाया हाच मृत्यु आहे. [सः आत्मन्वी स्यां इति तत् मनः अकुरुत–] तो मी या मनानें मनस्वी व्हावें, अशा अभिप्रायानें

त्या मनाला–अन्तःकरणाला करिता झाला. [सः अर्चन् अचरत्–] तो प्रजापति आपलीच पूजा करीत राहिला. [तस्य अर्चतः आपः अजायन्त–] तो अर्चन करीत असतां आप–जल उत्पन्न झालें. [अर्चते वै मे कं अभूत् इति तत् एव अर्कस्य अर्कत्वं–] पूजा करणाऱ्या मला 'कं'–जल झालें, असें ज्या अर्थी त्यानें मानलें त्याअर्थी तेंच अर्काचें अर्कत्व सिद्ध होतें. ह्म० 'अर्चते कं–अर्कं' अशा व्युत्पत्तीनें अग्नीचें 'अर्क' हें नांव झालें आहे. [यः एवं एतत् अर्कस्य अर्कत्वं वेद–] जो अशा रीतीनें हें अर्काचें अर्कत्व जाणतो [अस्मै कं ह वै भवति–] त्याला सुख होतेंच. १

आपो वा अर्कस्तद्यदपाꣳ शर आसीत्तत्समहन्यत । सा पृथिव्यभवत्तस्यामश्राम्यत्तस्य श्रान्तस्य तप्तस्य तेजोरसो निरवर्तताग्निः ॥ २

अन्वयार्थ—[आपः वै अर्कः–] आपच अर्क आहे. [तत् यत् अपां शरः आसीत्–] त्यांत आपांचा जो शर–तवंग होता [तत् समहन्यत–] तो संघात पावला. [सा पृथिवी अभवत्–] तीच ही पृथिवी झाली. [तस्यां अश्राम्यत्–] त्या पृथिवीला उत्पन्न केलें असतां तो मृत्यु श्रान्त झाला. [तस्य श्रान्तस्य तप्तस्य तेजः रसः निरवर्तत–] त्या श्रान्त व खिन्न झालेल्या प्रजापतीपासून तेज हेंच सार निघालें. [अग्निः–] तोच अग्नि होय. २.

स त्रेधाऽऽत्मानं व्यकुरुताऽऽदित्यं तृतीयं वायुं तृतीयꣳ स एष प्राणस्त्रेधा विहितः । तस्य प्राची दिक्शिरोऽसौ चासौ चेमौ । अथास्य प्रतीची दिक्पुच्छमसौ चासौ च सक्थ्यौ दक्षिणा चोदीची च पार्श्वे द्यौः पृष्ठमन्तरिक्षमुदरमियमुरः स एषोऽप्सु प्रतिष्ठितो यत्र क्व चैति तदेव प्रतितिष्ठत्येवं विद्वान् ॥ ३

अन्वयार्थ—[सः आत्मानं त्रेधा व्यकुरुत–] तो प्रजापति आपल्याला तीन प्रकारचा करता झाला. [आदित्यं तृतीयं–] तो अग्नि व वायु यांच्या अपेक्षेनें आदित्याला तिसरा व [वायुं तृतीयं–] अग्नि-आदित्यांच्या अपेक्षेनें वायूला तिसरा करता झाला. [सः एषः प्राणः त्रेधा विहितः–] तो हा प्राण तीन प्रकारें विभक्त झाला. [तस्य प्राची०–] पूर्व दिशा हें त्याचें शिर आहे. [असौ च असौ च इमौ–] ऐशानी व आग्नेयी ह्या दोन दिशा हेच त्याचे दोन बाहू

आहेत. [अथ अस्य०—] आतां त्या अग्नीची पश्चिम दिशा हें पुच्छ आहे. [असौ च०—] वायव्य व नैर्ऋत्य ह्या सक्थी—मांड्या आहेत. [दक्षिणा च उदीची च०—] दक्षिण व उत्तर हेच त्याचे पार्श्वभाग आहेत. [द्यौः पृष्ठं०—] स्वर्ग ही त्याची पाठ, अन्तरिक्ष उदर, पृथिवी हा उर आहे. [सः एषः अप्सु प्रतिष्ठितः—] तो हा प्रजापतिरूप अग्नि आपामध्यें प्रतिष्ठित आहे. [एवं विद्वान् यत्र क्व च एति तत् एव प्रतितिष्ठति—] त्याला अशा रीतीनें जाणणारा ज्या कोठें जातो तेथेंच प्रतिष्ठित होतो. ३. त्यानें आपल्याला कसें उत्पन्न केलें तें श्रुति सांगते—

सोऽकामयत द्वितीयो म आत्मा जायेतेति स मनसा वाचं मिथुनꣳसमभवदशनाया मृत्युस्तद्यद्रेत आसीत्स संवत्सरोऽभवत् । न ह पुरा ततः संवत्सर आस तमेतावन्तं कालमबिभः । यावान्संवत्सरस्तमेतावतः कालस्य परस्तादसृजत । तं जातमभिव्याददात्स भाणकरोत्सैव वागभवत् ४

अन्वयार्थ—[सः अशनाया मृत्युः मे द्वितीयः आत्मा जायेत इति अकामयत—] तो अशनायेनें लक्षित होणारा मृत्यु माझा द्वितीय आत्मा—शरीर उत्पन्न व्हावा अशी कामना करता झाला. [सः मनसा वाचं मिथुनं समभवत्—] तो मनानें वेदलक्षण द्वंद्वभावाचें संभवन करता झाला—मनानें वेदविहित सृष्टिक्रमाचें आलोचन करता झाला. [तत् यत् रेतः आसीत्—] त्या मिथुनांत जें रेत—प्रथमशरीरी प्रजापतीच्या उत्पत्तीचें बीज होते त्याच्या भावनेनें भावित होत्साता [सः संवत्सरः अभवत्—] तो संवत्सर—प्रजापति झाला. [ततः पुरा संवत्सरः न ह आस—] त्या प्रजापतिरूप संवत्सराच्या पूर्वी कालरूप संवत्सर नव्हता. [यावान् संवत्सरः एतावन्तं कालं तं अबिभः—] जेवढा हा संवत्सरप्रमाण काल प्रसिद्ध आहे तेवढ्या काली—संवत्सरभर मृत्यु त्या प्रजापतीला गर्भांत धारण करता झाला. [एतावतः कालस्य परस्तात् तं असृजत—] तेवढ्या कालानंतर त्याला उत्पन्न करता झाला. [तं जातं अभिव्याददात्—] मृत्यु त्या उत्पन्न झालेल्या कुमाराचें मुखविदारण करता झाला. तेव्हां [सः भाण् अकरोत्—] तो बालक ' भाण् ' असा उच्चार करता झाला. [सा एव वाक् अभवत्—] तीच वाक् झाली. ४.

स ऐक्षत यदि वा इममभिमꣳस्ये कनीयोऽन्नं करिष्य इति स तया वाचा तेनाऽऽत्मनेदꣳ सर्वमसृजत यदिदं किंचर्चो यजूꣳषि सामानि च्छन्दाꣳसि यज्ञान्प्रजाः पशून्। स यद्यदेवासृजत तत्तदत्तुमध्रियत सर्वं वा अत्तीति तददितेरदितित्वꣳ सर्वस्यैतस्यात्ता भवति सर्वमस्यान्नं भवति य एवमेतददितेरदितित्वं वेद ॥ ५

अन्वयार्थ—[सः ऐक्षत–] तेव्हा त्या भ्यालेल्या व आवाज करणाऱ्या कुमाराला पाहून तो मृत्यु क्षुधित असूनहि असा विचार करता झाला–[यदि वै इमं अभिमंस्ये–] जर मी याला मारलें [कनीयः अन्नं करिष्ये–] तर अल्प अन्न करीन; [इति सः तया वाचा तेन आत्मना–] असा विचार करून तो त्या वेदरूप वाणीनें व त्याच मनानें [यत् इदं किंच इदं सर्वं असृजत–] हें जें कांही सर्व चराचर आहे तें निर्माण करता झाला. [ऋचः यजूंषि०–] ऋचा, यजुर्षे, सामें, छन्द, यज्ञ, प्रजा व पशू, यास त्यानें उत्पन्न केलें. [सः यत् यत् एव असृजत–] तो ज्याला ज्याला उत्पन्न करता झाला [तत् तत् अत्तुं अध्रियत–] तें तें खाण्याविषयी मन धरता झाला, तें तें खाण्याची इच्छा करता झाला. [सर्वं वै अत्ति इति तत् अदितेः अदितित्वं–] ज्याअर्थी तो सर्व खातो त्याअर्थी 'अद्' या नावाच्या मृत्यूचें–अदितीचें अदितित्व प्रसिद्ध आहे. [यः एवं एतत् अदितेः अदितित्वं वेद–] जो अशा रीतीनें अदितीचें हें अदितित्व जाणतो [सः सर्वस्य एतस्य अत्ता भवति–] तो या सर्वांचा भक्षक होतो. [अस्य सर्वं अन्नं भवति–] याचें सर्व अन्न होतें. ५–अश्व व अश्वमेध यांच्या निर्वचनासाठी श्रुति म्हणते—

सोऽकामयत भूयसा यज्ञेन भूयो यजेयेति। सोऽश्राम्यत्स तपोऽतप्यत तस्य श्रान्तस्य तप्तस्य यशो वीर्यमुदक्रामत्। प्राणा वै यशो वीर्यं तत्प्राणेषूत्क्रान्तेषु शरीरꣳ श्वयितुमध्रियत तस्य शरीर एव मन आसीत् ॥ ६

अन्वयार्थ—[भूयसा यज्ञेन भूयः यजेय इति सः अकामयत–] मोठ्या यज्ञानें मी पुनरपि–या जन्मांतहि यजन करावें, अशी तो कामना करता झाला. [सः अश्राम्यत्–] पण अशी कामना करून तो श्रान्त झाला. [सः तपः

अतप्यत–] तो तप करता झाला. [तस्य श्रान्तस्य तप्तस्य यशः वीर्यं उदक्रामत्–] त्या श्रान्त व तपानें तप्त झालेल्या मृत्यूपासून यश व वीर्य उत्पन्न झालें. [प्राणाः वै यशः वीर्यं–] चक्षुरादि प्राण हेंच यश व हेंच वीर्य–बल आहे. [प्राणेषु उत्क्रान्तेषु–] यात्प्रमाणें यश व बल या स्वरूपाचे प्राण शरीर सोडून निघून गेले असता [शरीरं श्वयितुं अध्रियत–] तें प्रजापतीचें शरीर फुगून जाऊं लागलें. तथापि [तस्य मनः शरीरे एव आसीत्–] त्याचें मन त्या शरीरांतच आसक्त होऊन राहिलें. ६–दूर गेलेल्या एखाद्याचें मन प्रिय विषयात जसें असतें त्याप्रमाणें ज्याचें मन शरीरात आसक्त होऊन राहिलें आहे अशा प्रजापतीनें काय केलें तें श्रुति सांगते––

सोऽकामयत मेध्यं म इदꣳ स्यादात्मन्व्यनेन स्यामिति ।
ततोऽश्वः समभवद्यदश्वत्तन्मेध्यमभूदिति तदेवाश्वमेधस्याश्वमेधत्वम् । एष ह वा अश्वमेधं वेद य एनमेवं वेद ॥

अन्वयार्थ––[मे इदं मेध्यं स्यात्–] माझे हें शरीर मेध्य–यज्ञिय व्हावें, व मी [अनेन आत्मन्वी स्यां इति सः अकामयत–] या शरीरानें 'आत्मन्वी' –शरीरवान् व्हावें अशी तो कामना करता झाला. [यत् अश्वत् ततः अश्वः समभवत्–] ज्याअर्थी तें शरीर माझ्या वियोगानें यश व वीर्य यांनी विरहित होत्सातें फुगलें त्याअर्थी तो अश्व झाला, आणि [मेध्यं अभूत् इति तत् एव अश्वमेधस्य अश्वमेधत्वं–] ज्या अर्थी तें मेध्य झालें त्याअर्थी तेच अश्वमेधाचें अश्वमेधत्व आहे. [यः एनं एवं वेद एषः ह वै अश्वमेधं वेद–] जो या अश्वाला असें अग्नि-सूर्यरूप जाणतो तोच अश्वमेधाला जाणतो–त्याची उपासना करितो; दुसरा कोणी नाही. ती कशी करितो ? उत्तर––

तमनवरुध्यैवामन्यत । तꣳसंवत्सरस्य परस्तादात्मन आलभत । पशून्देवताभ्यः प्रत्यौहत् । तस्मात्सर्वदेवत्यं प्रोक्षितं प्राजापत्यमालभन्त

अन्वयार्थ––[तं अनवरुध्य एव अमन्यत–] तो आपल्यालाच मेध्य पशु कल्पून त्याला अवरोध–प्रतिबंध न करितांच सोडलें आहे, असें मानता झाला. [संवत्सरस्य परस्तात् तं आत्मने आलभत–] संवत्सर पूर्ण झाल्यानंतर त्या पशूला आत्म्यासाठीं म्ह० प्रजापति ही त्याची देवता आहे, या भावानें मारता झाला. [पशून् देवताभ्यः प्रत्यौहत्–] इतर पशूंनाहि देवतांप्रत पोंच-

विता झाला. [तस्मात् सर्वदेवत्यं प्रोक्षितं प्राजापत्यं आलभन्त—] म्हणून सांप्रतकाळीं याज्ञिकहि सर्वदेवत्य प्रोक्षित प्राजापत्य पशूचें आलभन करितात.

एष ह वा अश्वमेधो य एष तपति तस्य संवत्सर आत्माऽयमग्निरर्कस्तस्येमे लोका आत्मानस्तावेतावर्काश्वमेधौ । सो पुनरेकैव देवता भवति मृत्युरेवापपुनर्मृत्युं जयति नैनं मृत्युराप्नोति मृत्युरस्याऽऽत्मा भवत्येतासां देवतानामेको भवति य एवं वेद ॥ ७

इति प्रथमाऽध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥ २

अन्वयार्थ—[यः एषः तपति एषः ह वै अश्वमेधः—] जो हा सूर्य जगाला प्रकाशित करीत आहे तोच हा प्रसिद्ध अश्वमेध आहे. [तस्य संवत्सरः आत्मा—] त्या यज्ञफलरूप अश्वमेधाचा सवत्सर हा आत्मा—शरीर आहे. [अयं अग्निः अर्कः—] हा अग्नि अर्क आहे. [तस्य इमे लोकाः आत्मानः—] त्याचे हे तिन्ही लोक आत्मे—शरीरावयव आहेत. [तौ एतौ अर्काश्वमेधौ—] ते दोघे अग्नि व आदित्यच अर्क व अश्वमेध आहेत. [पुनः सा उ एका एव देवता भवति—] ती पुनः एकच देवता होते व [मृत्युः एव—] ती मृत्युच आहे. [यः एवं वेद सः पुनर्मृत्युं अपजयति—] जो असे जाणतो तो पुनर्मृत्यूला जिकतो, [एनं मृत्युः न आप्नोति—] त्याला मृत्यु प्राप्त होत नाही. [मृत्युः अस्य आत्मा भवति—] कारण मृत्युच त्याचा आत्मा होतो. [एतासां देवतानां एकः भवति—] तोच या देवताचा एक होतो. ७ (२)

—ज्ञानसहित कर्मांची परागति म्ह० मृत्युरूपता सांगितली. आतां त्या मृत्युरूपतेच्या साधनभूत ज्ञान-कर्मांची उत्पत्ति ज्याच्यापासून होते त्याचें प्रकाशन करण्यासाठीं उद्गीथ ब्राह्मणाचा आरंभ केला जातो. स्वाभाविक पापासक्तिरूप मृत्यु कोण, त्याचा उद्भव कोठून होतो, त्याचें अतिक्रमण कसें होतें, इत्यादि सांगण्यासाठीं आख्यायिका आरंभिली आहे—

द्वया ह प्राजापत्या देवाश्चासुराश्च । ततः कानीयसा एव देवा ज्यायसा असुरास्त एषु लोकेष्वस्पर्धन्त ते ह देवा ऊचुर्हन्तासुरान्यज्ञ उद्गीथेनात्ययामेति ॥ १

अन्वयार्थ—[द्वया ह प्रजापत्याः—] प्रजापतीच्या पूर्वजन्मांतील अपत्यें दोन प्रकारची आहेत. [देवाः च असुराः च—]एक देव व दुसरे असुर. [ततः कानीयसाः एव देवाः ज्यायसाः असुराः—] त्यांतील देव लहान व असुर मोठे आहेत. [ते एषु लोकेषु अस्पर्धन्त—] ते देव व असुर या लोकांविषयी परस्पर स्पर्धा करूं लागले. [ते ह देवाः ऊचुः—] तेव्हां ते देव म्हणाले—[हन्त यज्ञे असुरान् उद्गीथेन अत्ययाम इति—] " बरें आहे, आतां आम्ही यज्ञांत उद्गीथाच्या योगानें असुरांचें अतिक्रमण करून जाऊ. " (प्रजापतीचे वागादि प्राण हेच देव व असुर. शास्त्रजनित ज्ञान व कर्म यांनीं सुसंकृत झालेले वागादि प्राण हेच प्रकाशरूपत्वामुळें देव आणि प्रत्यक्ष व अनुमान याच प्रमाणांनीं होणारें व इष्ट फल देणारें जें स्वाभाविक ज्ञान-कर्म त्यांनीं सुसंस्कृत झालेले वागादिक असुर होत. शास्त्रजनित ज्ञान-कर्मप्रवृत्तीहून स्वाभाविक ज्ञान-कर्मप्रवृत्ति पूर्वी होतें. म्हणून असुर ज्येष्ठ व देव कनिष्ठ. शिवाय स्वाभाविक प्रवृत्तीचें प्रमाण फारच मोठें असून शास्त्रीय प्रवृत्तीचें प्रमाण अल्प आहे. ते दोघे स्वाभाविक ज्ञान-कर्मसाध्य फलें—लोक व शास्त्रीय ज्ञान-कर्मसाध्य फलें याविषयीं परस्पर स्पर्धा करूं लागले. त्यांच्या त्यांच्या वृत्तीचा उद्भव व अभिभव होणें हीच स्पर्धा होय. कधीं देवांचा जय होतो व प्रायः नेहमी असुराचा जय होतो. देवांचा जय झाला असतां धर्माच्या आधिक्यामुळें प्रजापतित्वाची प्राप्ति होईतों उत्कर्ष होतो आणि असुरांचा जय झाला असता अधर्माच्या आधिक्यामुळें स्थावरत्वप्राप्तीपर्यंत अपकर्ष होतो. जेव्हां धर्माधर्मांचें साम्य होतें तेव्हां मनुष्यत्व प्राप्त होतें. असुरांकडून पराभूत झालेले देव 'उद्गीथकर्म व ज्ञान—उपासना यांच्या योगानें आपण आपल्या शत्रूंचा पराभव करूं या ' असा आपापसांत निश्चय करिते झाले. याविषयी सविस्तर सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा.) १.

ते ह वाचमूचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्यो वागुदगायत् । यो वाचि भोगस्तं देवेभ्य आगायद्यत्कल्याणं वदति तदात्मने । ते विदुरनेन वै न उद्गात्राऽत्येष्यन्तीति तमभिद्रुत्य पाप्मनाऽविध्यन्त्स यः स पाप्मा यदेवेदमप्रतिरूपं वदति स एव स पाप्मा ॥ २

अन्वयार्थ—[ते ह वाचं ऊचुः—] ते देव असा निश्चय करून वागभिमानिनी देवतेला म्हणाले [त्वं नः उद्गाय इति—] " तूं आम्हांकरितां उद्गात्याचें कर्म कर " तेव्हां [तथा इति तेभ्यः वाक् उदगायत्—] ' बरें आहे ' असें म्हणून ती देवता त्यांच्या करितां उद्गान करती झाली. [यः वाचि भोगः तं देवेभ्यः आगायत्—] जो वाणीच्या निमित्तानें भोग निष्पन्न होतो—वाग्व्यवहारानें सर्व इंद्रियसमूहावर उपकार होतो तो ती देवांकरितां संपादन करती झाली व [यत् कल्याणं वदति तत् आत्मने—] ती जें कल्याण—शुभ भाषण करते ' तें मजकरितांच आहे, ' असे ती म्हणाली. [ते अनेन वै उद्गात्रा नः अत्येष्यन्ति इति विदुः—] तेव्हां ते असुर ' या उद्गात्याच्या योगानें देव आमचें अतिक्रमण करतील, ' असें जाणते झाले; आणि [तं अभिद्रुत्य पाप्मना अविध्यन्—] ते त्या उद्गात्याजवळ वेगानें जाऊन आपल्या आसंगरूप पापानें त्याला वेध करिते झाले.[यः सः पाप्मा—] तो जो आसंगरूप पाप्मा [यत् एव इदं अप्रतिरूपं वदति—] तेंच हें अननुरूप भाषण आहे. वाणी हें जें अननुरूप भाषण करते [सः एव सः पाप्मा—] तोच तो पाप्मा आहे.सु.ब्र.पृ.३०८ पहा. अधिक स्पष्टीकरणासाठी भाष्यार्थ पहा. २.

अथ ह प्राणमूचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्यः प्राण उदगायद्यः प्राणे भोगस्तं देवेभ्य आगायद्यत्कल्याणं जिघ्रति तदात्मने। ते विदुरनेन वै न उद्गात्रात्येष्यन्तीति तमभिद्रुत्य पाप्मनाविध्यन्त्स यः स पाप्मा यदेवेदमप्रतिरूपं जिघ्रति स एव स पाप्मा ॥ ३

अन्वयार्थ—[अथ ह०—] त्यानंतर ते देव प्राणास म्हणजे घ्राणेंद्रियाच्या देवतेस म्हणाले [त्वं नः०—] " तू आमच्या साठी उद्गान कर. " तेव्हां ती घ्राणदेवता ' बरें आहे ' असें म्हणून त्या देवांकरितां उद्गान करती झाली. त्या निमित्तभूत प्राणामध्यें जो भोग तोच त्या देवतेनें त्या सर्व देवांकरितां आपल्या गानकर्मानें केला. तो प्राण—घ्राण जें कल्याण अवघ्राण करतो तें स्वतःकरितां फल आहे. तेव्हां ते असुर या घ्राणाख्य उद्गात्याच्या योगानें हे देव आपलें अतिक्रमण करून जातील, असें समजले, आणि त्याच्या सन्मुख जाऊन ते त्याला पापानें वेध करते झाले. तो जो कारणस्थ पाप्मा—पाप तोच हा घ्राणाख्य

कार्यांतील पाप्मा आहे. तो जें हें अप्रतिरूप अवघ्राण करतो तोच तो कारणभूत प्रजापतीतील पाप्मा आहे. ३

अथ ह चक्षुरूचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्यश्चक्षुरुदगायत् । यश्चक्षुषि भोगस्तं देवेभ्य आगायद्यत्कल्याणं पश्यति तदात्मने । ते विदुरनेन वै न उद्गात्राऽत्येष्यन्तीति तमभिद्रुत्य पाप्मनाऽविध्यन्त्स यः स पाप्मा यदेवेदमप्रतिरूपं पश्यति स एव स पाप्मा ॥ ४

अन्वयार्थ—त्यानंतर ते देव चक्षुरभिमानिनी देवतेला म्हणाले "तूं आम्हांकरितां उद्गान कर." तेव्हां ती चक्षुर्देवता 'बरें आहे' असें म्हणून त्या देवांकरितां उद्गान करती झाली. त्या निमित्तभूत चक्षूमध्यें जो भोग—फल तोच त्या देवतेनें त्या सर्व देवांकरिता आपल्या गानकर्मानें संपादन केला. चक्षु जें कल्याण पाहतो तें त्याचेच फल आहे. तेव्हा ते असुर 'या चक्षुराख्य उद्गात्याच्या योगानें हे देव आपलें अतिक्रमण करतील,' असें समजले; आणि त्याच्या सन्मुख जाऊन त त्याला पाप्म्याच्या योगानें वेध करते झाले. तो जो कारणस्थ पाप्मा तोच हा चक्षुराख्य कार्यातील पाप्मा आहे. तो जें हें अप्रतिरूप पाहतो तोच तो कारणभूत प्रजापतीतील पाप्मा आहे. ४

अथ ह श्रोत्रमूचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्यः श्रोत्रमुदगायद्यः श्रोत्रे भोगस्तं देवेभ्य आगायद्यत्कल्याणꣳ शृणोति तदात्मने । ते विदुरनेन वै न उद्गात्राऽत्येष्यन्तीति तमभिद्रुत्य पाप्मनाऽविध्यन्त्स यः स पाप्मा यदेवेदमप्रतिरूपꣳ शृणोति स एव स पाप्मा ॥ ५

अन्वयार्थ—त्यानंतर ते देव श्रोत्राभिमानिनी देवतेला म्हणाले, "तूं आम्हाकरितां उद्गान कर" तेव्हां ती श्रोत्राभिमानिनी देवता 'बरें आहे' असें म्हणून देवांकरिता उद्गान करती झाली. त्या निमित्तभूत श्रोत्रामध्यें जो भोग, तोच त्या देवतेनें देवांकरितां आपल्या गानकर्मानें केला. श्रोत्र जें कल्याण श्रवण करतें तें श्रोत्राचेच फल आहे. तेव्हां ते असुर 'या श्रोत्राख्य उद्गात्याच्या योगानें हे देव आमचें अतिक्रमण करतील,' असें जाणते झाले व त्याच्या सन्मुख जाऊन त्याला पाप्म्याचा वेध करते झाले. तो जो कारणस्थ

पाप्मा तोच हा श्रोत्राख्य कार्यातील पाप्मा आहे. श्रोत्र जें हें अप्रतिरूप पाहतें तोच तो कारणभूत प्रजापतीतील पाप्मा आहे. ५

अथ ह मन ऊचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्यो मन उदगायद्यो मनसि भोगस्तं देवेभ्य आगायद्यत्कल्याणꣳ संकल्पयति तदात्मने ते विदुरनेन वै न उद्गात्राऽत्येष्यन्तीति तमभिद्रुत्य पाप्मनाऽविध्यन्स्स यः स पाप्मा यदेवेदमप्रतिरूपꣳ संकल्पयति स एव स पाप्मैवमु खल्वेता देवताः पाप्मभिरुपासृजन्नेवमेनाः पाप्मनाऽविध्यन् ॥ ६

अन्वयार्थ—त्यानंतर ते मनेदेवतेला म्हणाले—" तूं आम्हाकरितां उद्गान कर " तेव्हा ती मनोदेवता ' बरें आहे ' असें म्हणून त्या देवाकरितां उद्गान करती झाली. त्या मनामध्ये जो भोग तोच त्या देवतेनें त्या सर्व देवाकरितां आपल्या गान कर्मानें केला. मन जे कल्याण संकल्प करतें ते स्वतःचें फल आहे. तेव्हा ते असुर ' या मन-आख्य उद्गात्याच्या योगानें हे देव आपलें अतिक्रमण करतील, ' असें समजले; आणि मनोदेवतेच्या सन्मुख जाऊन तिला पापानें वेध करते झाले. तो जो कारणस्थ पाप्मा तोच हा मन-आख्य कार्यातील पाप्मा आहे. तें मन हा जो अप्रतिरूप संकल्प करतें तोच कारणभूत प्रजापतीतील पाप्मा आहे. [एवं उ खलु एताः देवताः पाप्मभिः उपासृजन्—] खरोखर अशा रीतीनें या देवता पापाशी संसर्ग पावल्या; [एव एनाः पाप्मना अविध्यन्—] आणि अशा रीतीनें त्या पापाकडून विद्ध झाल्या ६.

अथ हेममासन्यं प्राणमूचुस्त्वं न उद्गायेति तथेति तेभ्य एष प्राण उदगायत्ते विदुरनेन वै न उद्गात्राऽत्येष्यन्तीति तदभिद्रुत्य पाप्मनाऽविध्यत्स्तस्य यथाऽश्मानमृत्वा लोष्टो विध्वꣳसेतैवꣳ हैव विध्वꣳसमाना विष्वञ्चो विनेशुस्ततो देवा अभवन्पराऽसुरा भवत्यात्मना पराऽस्य द्विषन्भ्रातृव्यो भवति य एवं वेद ॥ ७

अन्वयार्थ—[अथ ह इमं आसन्यं प्राणं ऊचुः—] त्यानंतर देव या मुखांतील प्राणाला म्हणाले, [त्वं न उद्गाय०—] " तूं आमच्या करितां उद्गान कर. " तेव्हा ' बरें आहे ' असें म्हणून तो प्राण त्यांच्या करितां

उद्गान करूं लागला. तेव्हां ते असुर ' या उद्गात्याच्या योगानें देव आमचें अतिक्रमण करतील, ' असें समजले; [तदभिद्रुत्य पाप्मना अविध्यत्सन्–] व इतर इंद्रियांप्रमाणें त्याच्या सन्मुख वेगानें जाऊन त्यालाहि वेध करण्याची इच्छा करते झाले. [सः यथा अश्मान ऋत्वा लोष्टः विध्वंसेत–] पण पाषाणापाशी वेगानें गेल्यास मातीचें ढेकुळ स्वतः विध्वंस पावतें, हा जसा दृष्टान्त आहे [एवं ह एव विध्वंसमानाः विष्वञ्चः विनेशुः–] त्याप्रमाणें प्राणास वेध करण्यासाठीं गेलेले असुर विशेषें करून ध्वंस पावून अनेक प्रकारें विनाश पावले. [ततः देवाः अभवन्–] त्यामुळें देव प्रकृतावस्थ झाले व [असुराः पराभवन्–] असुर पराभव पावले. [यः एवं वेद–] जो असें जाणतो [तस्य द्विषन् भ्रातृव्यः पराभवति–] त्याचा द्वेष्टा भ्रातृव्य पाप्मा पराभव पावतो व [सः आत्मना भवति–] तो प्रजापतिस्वरूपानें स्थित होतो. सु. ब्र. पृ.२४६, ३०७ पहा. ७.–याप्रमाणें फलाचा उपसंहार करून व आरुयायिकेचाच आश्रय करून, वागादिकाना सोडून मुख्य प्राणाचाच आश्रय का करावा, तें श्रुति सागते—

ते होचुः क्व नु सोऽभूद्यो न इत्थमसक्तेत्ययमास्येऽन्तरिति सोऽयास्य आङ्गिरसोऽङ्गानाꣳ हि रसः ॥ ८

अन्वयार्थ—[ते ह ऊचुः–] ते प्रजापतीचे प्राण म्हणाले,[यः नः इत्थं असक्त सः क्व नु अभूत्–] " जो आम्हांला अशारीतीनें देवभावास आत्मत्वानें पोंचविता झाला तो कोठें बरें आहे ? " [इति अयं आस्ये अन्तर् इति–] तेव्हां असा विचार करणाऱ्या त्यांना हा या मुखांतील आकाशांत आहे, असें कळलें. [सः अयास्यः आंगिरसः–] ह्मणून तो अयास्य व आंगिरस होय. [हि अंगाना रसः–] कारण तो अंगांचा रस आहे. (कारण त्याला अपाय झाला असतां शरीर सुकतें, असें श्रुति पुढें सांगणार आहे. यास्तव त्याचीच उपासना करावी.) ८. –हा प्राण शुद्धच आहे, याविषयी उपपत्ति–

सा वा एषा देवता दूर्नाम दूरꣳह्यस्या मृत्युर्दूरꣳह वा अस्मान्मृत्युर्भवति य एवं वेद ॥ ९

अन्वयार्थ—[सा वै एषा देवता दूर्नाम–] ती ही देवता ' दूः ' या नांवाची आहे. [हि अस्याः मृत्युः दूरं–] या देवतेपासून मृत्यु दूर असतो. [यः एवं वेद अस्मात् दूरं ह वै मृत्युः भवति–] जो असें जाणतो त्याच्या-

पासून मृत्यु दूर होतो. ९.—प्राणोपासकापासून मृत्यु दूर कसा होतो, तें पुढील श्रुति सांगते—

सा वा एषा देवतैतासां देवतानां पाप्मानं मृत्युमपहत्य यत्रास्सां दिशामन्तस्तद्गमयांचकार तदासां पाप्मनो विन्यदधात्तस्मान्न जनमियान्नान्तमियान्नेत्पाप्मानं मृत्युमन्ववायानीति ॥ १०

अन्वयार्थ—[सा वै एषा देवता—] ती ही प्रसिद्ध देवता—प्राण [एतासां देवतानां पाप्मानं मृत्युं अपहत्य—] या वागादि देवतांच्या पाप्म्यास—मृत्यूस नाहींसें करून [यत्र आसां दिशां अन्तः—] जेथें या दिशांचा अन्त होतो [तत् गमयांचकार—] तेथें त्याला पोंचविता झाला. [तत् आसां पाप्मनः विन्यदधात्—] तेथें पोंचवून या दिशांच्या पाप्म्यांस ती प्राणदेवता अन्त्यजनांत नानाप्रकारें तुच्छतेनें स्थापिती झाली. [तस्मात् न जनं इयात्—] यास्तव त्या अन्त्यजनाशीं संसर्ग पावूं नये. [अन्तं न इयात्—] त्या अन्तदेशासहि जाऊं नये. [नेत् पाप्मानं मृत्युं अन्ववायानि इति—] मी त्यांच्याशीं संसर्ग केल्यास पापी, मृत्यूस प्राप्त होईन, अशारीतीनें भयभीत होऊन त्यांच्याशी संसर्ग करूं नये. १०.

सा वा एषा देवतैतासां देवतानां पाप्मानं मृत्युमपहत्याधैना मृत्युमत्यवहत् ॥ ११

अन्वयार्थ—[सा वै एषा०—] ती ही प्रसिद्ध देवता या देवतांच्या पाप्म्यास—मृत्यूस अपहत करून [अथ एनाः मृत्युं अत्यवहत्—] त्यानंतर त्या वागादि देवतांना मृत्यूचें उल्लंघन करून अग्न्यादि देवतात्मनावास प्राप्त करती झाली ११.

स वै वाचमेव प्रथमामत्यवहत्सा यदा मृत्युमत्यमुच्यत सोऽग्निरभवत्सोऽयमग्निः परेण मृत्युमतिक्रान्तो दीप्यते ॥ १२

अन्वयार्थ—[सः वै प्रथमा वाचं एव अत्यवहत्—] तो प्रसिद्ध प्राण प्रधान वाणीलाच देवताभावास पोंचविता झाला. [सा यदा मृत्युं अत्यमुच्यत—] ती जेव्हां मृत्यूचें अतिक्रमण करून गेली [सः अग्निः अभवत्—] तेव्हां तो अग्नि झाला. [सः अयं अतिक्रान्तः अग्निः मृत्युं परेण दीप्यते—] तो हा अतिक्रान्त अग्नि मृत्यूच्या पलीकडे दीप्त होतो. १२.

अथ प्राणमत्यवहत्स यदा मृत्युमत्यमुच्यत स वायुर-
भवत्सोऽयं वायुः परेण मृत्युमतिक्रान्तः पवते ॥ १३

अन्वयार्थ—[अथ प्राणं०—] नंतर तो प्राण घ्राणसंज्ञक प्राणाला देवता भावास पोंचविता झाला. तो जेव्हां मृत्यूचें अतिक्रमण करून स्वतः मुक्त झाला तेव्हां तो वायु झाला. तो हा अतिक्रान्त वायु मृत्यूच्या पलीकडे वाहतो.

अथ चक्षुरत्यवहत्तद्यदा मृत्युमत्यमुच्यत स आदित्यो-
भवत्सोऽसावादित्यः परेण मृत्युमतिक्रान्तस्तपति ॥ १४

अन्वयार्थ—[अथ चक्षुः०—] त्यानंतर तो चक्षूला देवताभावास पोंचविता झाला. तें चक्षुरिंद्रिय जेव्हां मृत्यूचें उलंघन करून स्वतः मुक्त झालें तेव्हां तें आदित्य झालें. तो हा अतिक्रमण करून गेलेला आदित्य मृत्यूच्या पलीकडे तापतो, प्रकाशमान होतो. १४

अथ श्रोत्रमत्यवहत्तद्यदा मृत्युमत्यमुच्यत ता दिशोऽ-
भवꣳस्ता इमा दिशः परेण मृत्युमतिक्रान्ताः ॥ १५

अन्वयार्थ—[अथ श्रोत्रं०—] त्यानंतर तो प्राण श्रोत्राला देवताभावास पोंचविता झाला. तें श्रोत्र जेव्हां मृत्यूचें अतिक्रमण करून मुक्त झालें तेव्हां त्या दिशा झाल्या. त्या ह्या दिशा अतिक्रान्त होत्साल्या मृत्यूच्या पलीकडे राहिल्या.

अथ मनोऽत्यवहत्तद्यदा मृत्युमत्यमुच्यत स चन्द्रमा
अभवत्सोऽसौ चन्द्रः परेण मृत्युमतिक्रान्तो भात्येवꣳ
ह वा एनमेषा देवता मृत्युमतिवहति य एवं वेद ॥ १६

अन्वयार्थ—[अथ०—] त्यानंतर प्राण मनाला देवताभावास पोंचविता झाला. [तत् यदा०—] तें मन जेव्हां मृत्यूचें उलंघन करून मुक्त झालें तेव्हां तोच चंद्रमा झाला. [सः असौ चंद्रः०—] हा चंद्र मृत्यूचें अतिक्रमण केलेला असा होत्साता मृत्यूच्या पलीकडे प्रकाशमान होतो. [यः एवं वेद—] जो असें जाणतो, अशी उपासना करतो [एनं एवं ह वै एषा देवता मृत्युं अतिवहति—] त्याला अशाच प्रकारें ही देवता मृत्यूच्या पलीकडे पोंचविते. १६

अथाऽऽत्मनेऽन्नाद्यमागायद्यद्धि किंचान्नमद्यतेऽ-
नेनैव तदद्यत इह प्रतितिष्ठति ॥ १७

अन्वयार्थ—[अथ आत्मने अन्नाद्यं आगायत्—] नंतर मुख्य प्राण आपल्याकरितां अन्नाद्याचें—अन्नाचें आगान—संपादन करता झाला. [यत् हि किंच अन्नं अद्यते—] जें कांहीं अन्न खाल्लें जातें [तत् अनेन एव अद्यते—] तें याच्याकडूनच खाल्लें जातें; [इह प्रतितिष्ठति—] व प्राण त्या अन्नाद्यांत प्रतिष्ठित होतो. १७—भर्ता, ज्येष्ठ व पुरोगन्ता इत्यादि प्राणगुणांचें विधान करण्यासाठीं पुढील वाक्य आहे—

ते देवा अब्रुवन्नेतावद्वा इदꣳ सर्वं यदन्नं तदात्मन आगासीरनु नोऽस्मिन्नन्न आभजस्वेति ते वै माऽभिसंविशतेति तथेति ते समन्तं परिण्यविशन्त । तस्माद्यदनेनान्नमत्ति तेनैतास्तृप्यन्त्येवꣳ ह वा एनꣳस्वा अभिसंविशन्ति भर्ता स्वानाꣳ श्रेष्ठः पुर एता भवत्यन्नादोऽधिपतिर्य एवं वेद य उ हैवंविदꣳस्वेषु प्रति प्रतिर्बुभूषति न हैवालं भार्येभ्यो भवत्यथ य एवैतमनुभवति यो वैतमनु भार्यान्बुभूर्षति स हैवालं भार्येभ्यो भवति ॥ १८

अन्वयार्थ—[ते देवाः अब्रुवन्—] ते देव म्हणाले, [एतावत् वै इदं सर्वं यत् अन्नं—] " एवढेंच कायतें हें सर्व अन्न आहे. [तत् आत्मने आगासीः—] तें सर्व तूं आपल्यासाठींच गाता झालास—संपादन केलेंस. [अनु नः अस्मिन् अन्ने आभजस्व इति—] यास्तव आतां आह्मांला त्या अन्नांत विभाग घ्यावयास लाव. " तेव्हां प्राण म्हणाला—[ते वै मा अभिसंविशत इति—] " ते तुम्ही मजमध्यें चोहोंकडून निश्चयानें प्रवेश करा. " तेव्हां [तथा इति ते समन्तं परिण्यविशन्त—] ' ठीक आहे, ' असें बोलून वागादिक देव त्याला चोहोंकडून परिवेष्टित करून प्रवेश करते झाले. [तस्मात् यत् अन्नं अनेन अत्ति—] त्यामुळें लोक जें अन्न या प्राणाच्या योगानें खातात [तेन एताः तृप्यन्ति—] त्यानें ह्या देवता तृप्त होतात. (अर्थात् वागादिकांचा अन्नाशीं साक्षात् संबंध नाहीं. प्राणद्वारा आहे. त्यामुळें वर ' प्राणाकडूनच अन्न खाल्लें जातें ' असें जें अवधारण केलें आहे तें योग्यच आहे.) [यः एवं वेद—] याप्रमाणें या वागादिकांच्या आश्रयभूत प्राणाला जो जाणतो [एनं स्वाः एवं ह वै अभिसंविशन्ति—] त्याचा अशाच प्रकारें त्याच्या ज्ञातीचे लोक आश्रय करितात.

वागादिक जसे प्राणामध्यें त्याप्रमाणें त्याच्या ज्ञातीचे लोक त्याच्यामध्यें अभिसंनिविष्ट होतात. [स्वानां भर्ता–] नंतर अभिसंनिविष्ट झालेल्या त्या ज्ञातिजनांचा तो उपासक भर्ता होतो. [श्रेष्ठः–] तसाच त्यांच्यामध्यें श्रेष्ठ होतो. [पुरः एता–] त्यांच्या अग्रभागीं जाणारा होतो. [अन्नादः अधिपतिः भवति–] तो अन्नाद व अधिपति होतो. [स्वेषु यः उ ह एवंविदं प्रति प्रतिः बुभूषति–] शिवाय ज्ञातींतील जो कोणी असें जाणणाऱ्या या प्राणोपासकाच्या प्रतिकूल होण्याची इच्छा करतो [सः भार्येभ्यः अलं न एव भवति–] तो इतरांचें पोषण करण्यास समर्थ होत नाहीं. [अथ यः एव एतं अनुभवति–] पण ज्ञातींतील जो अशी उपासना करणाऱ्या उपासकाच्या अनुरोधानें राहतो; [यः एतं अनु भार्यान् बुभूषति–] किंवा जो या असें जाणणाऱ्या उपासकाच्या अनुसार आपल्या लोकांचें भरण करण्याची इच्छा करतो [सः ह एव भार्येभ्यः अलं भवति–] तोच त्यांचें भरण करण्यास समर्थ होतो. हें सर्व प्राणगुणोपासनेचें फल आहे. १८.–प्राण शरीरेंद्रियांचा आत्मा आहे असें प्रतिपादन करण्यासाठीं तो आंगिरस आहे, असें वर सांगितलें. पण तो आंगिरस कसा? त्याचप्रमाणें वागादिक प्राणाच्या अधीन आहेत, असेंहि वर म्हटलें आहे. पण तें तरी कसें, हें सांगण्यासाठीं श्रुति म्हणते––

सोऽयास्य आङ्गिरसोऽङ्गानाꣳहि रसः प्राणो वा अङ्गानाꣳ रसः प्राणो हि वा अङ्गानाꣳरसस्तस्माद्यस्मात्कस्माच्चाङ्गात्प्राण उत्क्रामति तदेव तच्छुष्यत्येष हि वा अङ्गानाꣳरसः १९

अन्वयार्थ––[सः अयास्यः आंगिरसः–] तो प्राण अयास्य आंगिरस आहे. [हि अंगानां रसः–] कारण तो अंगांचा रस–सार आहे. [प्राणः वै अंगानां रसः–] प्राणच अंगांचा रस आहे. [प्राणः हि वै अंगानां रसः–] प्राण अंगांचा रस आहे, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. [यस्मात् कस्मात् अंगात् प्राणः उत्क्रामति–] ज्या कोणत्याहि अंगापासून–शरीरावयवापासून प्राण उत्क्रान्त होतो–निघून जातो [तत् एव तत् शुष्यति–] तेथेंच तें अंग सुकतें. [तस्मात् एषः हि वै अंगानां रसः–] त्यामुळें हाच अंगांचा रस आहे. १९. –प्राण केवल रूप-कर्मभूत शरीरेंद्रियांचाच आत्मा आहे, असें नाहीं, तर तो

नामभूत ऋग्वेदादिकांचाहि आत्मा आहे, अशा आशयानें प्राणाची सर्वात्मकत्वानें स्तुति करणारी श्रुति म्हणते—

एष उ एव बृहस्पतिर्वाग्वै बृहती तस्या एष पतिस्तस्माद् बृहस्पतिः॥२०

अन्वयार्थ—[एषः उ एव बृहस्पतिः—] हाच बृहस्पति आहे. [वाक् वै बृहती—] वाक् मोठी आहे, हें प्रसिद्ध आहे. [तस्याः एषः पतिः—] तिचा हा पति. [तस्मात् उ बृहस्पतिः—] त्यामुळें हा बृहस्पति आहे. २०.

एष उ एव ब्रह्मणस्पतिर्वाग्वै ब्रह्म तस्या एष पतिस्तस्मादु ब्रह्मणस्पतिः

अन्वयार्थ—[एषः उ०—] हाच प्राण ब्रह्माचाहि पति आहे. [वाक् वै ब्रह्म—] वाक् ब्रह्म म्हणजे यजु आहे. [तस्याः०—] तिचा हा पति. यास्तव तो ब्रह्माचा पतिहि आहे. २१.

एष उ एव साम वाग्वै सामैष सा चामश्चेति तत्साम्नः सामत्वम् । यद्वेव समः प्लुषिणा समो मशकेन समो नागेन सम एभिस्त्रिभिर्लोकैः समोऽनेन सर्वेण तस्माद्वेव सामाश्नुते साम्नः सायुज्यꣳसलोकतां य एवमेतत्साम वेद २२

अन्वयार्थ—[एषः उ एव साम—] हाच सामहि आहे. [वाक् वै सा अम एषः—] वाक् हीच ' सा ' आहे व ' अम ' प्राण आहे. [सा च अमः च इति—] कारण ' सा ' व ' अम ' मिळून साम हा शब्द झाला आहे. [तत् साम्नः सामत्वं—] तेंच सामाचें सामत्व आहे. [यत् उ एव—] ज्याअर्थीं तो प्राण [प्लुषिणा समः—] एक प्रकारच्या मधमाशीशी सम, [मशकेन समः—] मशकाशी तुल्य, [नागेन समः—] हत्तीशीं तुल्य, [एभिः त्रिभिः लोकैः समः—] या तीन लोकांशीं म्ह० त्रैलोक्यशरीर प्रजापतीशीं सम व [अनेन सर्वेण समः—] या सर्व जगद्रूप हिरण्यगर्भाशीं सम आहे, [तस्मात् उ एव साम—] त्याअर्थीं तो साम आहे. [यः एवं एतत् साम वेद—] जो या सामाख्य प्राणाची अशी उपासना करतो [साम्नः सायुज्यं सलोकतां अश्नुते—] त्याला सामसंज्ञक प्राणाचें सायुज्य व सलोकता प्राप्त होते. सु. ब्र. पृ. २४३ पहा.

एष उ वा उद्गीथः प्राणो वा उत्प्राणेन हीदꣳ सर्वमुत्तब्धं वागेव गीथोच्च गीथा चेति स उद्गीथः ॥ २३

अन्वयार्थ—[एषः उ वै उद्गीथः—] हा प्राण उद्गीथहि आहे. [प्राणः वै उत्—] प्राणच उत् आहे. [प्राणेन हि इदं सर्वं उत्तब्धं—] प्राणाकडूनच हें सर्व धारण केलें गेलेलें आहे. [वाक् एव गीथा—] वाक्‌च गीथा आहे. [उत् च गीथा च इति सः उद्गीथः—] त्यामुळें उत् व गीथा मिळून तो उद्गीथ झाला आहे. २३ —उद्गीथदेवता प्राण आहे, वागादिक नव्हेत, हेंच दृढ करण्यासाठीं आख्यायिका—

तद्वापि ब्रह्मदत्तश्चैकितानेयो राजानं भक्षयन्नुवाचायं त्यस्य राजा मूर्धानं विपातयताद्यदितोऽयास्य आङ्गिरसोऽन्येनोदगायदिति वाचा च ह्येव स प्राणेन चोदगायदिति ॥ २४

अन्वयार्थ—[तत् ह अपि—] त्याअर्थीं ही अशी आख्यायिका आहे. [ब्रह्मदत्तः चैकितानेयः राजानं भक्षयन् उवाच—] ब्रह्मदत्तनामक चैकितानेय सोमराजाचें भक्षण करीत असतांना म्हणाला, [यत् अयास्यः आंगिरसः इतः अन्येन उदगायत्—] 'जर हा अयास्य आंगिरस-नांवाचा मुख्य प्राण वाक्प्राणव्यतिरिक्त देवतेच्या योगानें उद्गान करता झाला असेल [अयं राजा त्यस्य मूर्धानं विपातयतात्—] तर हा सोमराजा खोटें बोलणाऱ्या या माझें शिर पाडवो.' [इति वाचा च ह एव सः प्राणेन च उदगायत् इति—] यास्तव तो अयास्य वाक् व प्राण यांच्या योगानें उद्गान करता झाला. २४.

तस्य हैतस्य साम्नो यः स्वं वेद भवति हास्य स्वं तस्य वै स्वर एव स्वं तस्मादार्त्विज्यं करिष्यन्वाचि स्वरमिच्छेत तया वाचा स्वरसंपन्नयाऽऽर्त्विज्यं कुर्यात्तस्माद्यज्ञे स्वरवन्तं दिदृक्षन्त एव । अथो यस्य स्वं भवति भवति हास्य स्वं य एवमेतत्साम्नः स्वं वेद ॥ २५

अन्वयार्थ—[तस्य ह एतस्य साम्नः स्वं यः वेद—] त्या या साक्षात् सामाचें स्व—धन जो जाणतो [अस्य ह स्वं भवति—] त्याला धन प्राप्त होतें. [तस्य वै स्वरः एव स्वं—] त्या सामाचें स्वर हेंच स्व आहे. [तस्मात् आर्त्विज्यं करिष्यन्—] यास्तव आर्त्विज्य—ऋत्वित्कर्म करणारानें [वाचि स्वरं इच्छेत—] वाणीमध्यें स्वराची इच्छा करावी. [तया स्वरसंपन्नया वाचा आर्त्विज्यं कुर्यात्—] त्या स्वरसंपन्न वाणीनें आर्त्विज्य करावें. [तस्मात् यज्ञे स्वरवन्तं दिदृक्षन्ते

एव–] तस्मात् यज्ञांत स्वरवन्त उद्गात्यालाच पाहण्याची इच्छा करितात. [अथो यस्य स्वं भवति–] ज्याला धन असतें त्यालाच व्यवहारांत लोकहि पाहण्याची इच्छा करितात, हें प्रसिद्ध आहे. [यः एवं एतत् साम्नः स्वं वेद–] जो याप्रमाणें हें सामाचें स्व जाणतो [अस्य ह स्वं भवति–] त्याला स्व–धन प्राप्त होतें. २५.

तस्य हैतस्य साम्नो यः सुवर्णं वेद भवति हास्य सुवर्णं तस्य वै स्वर एव सुवर्णं भवति हास्य सुवर्णं य एवमेतत्साम्नः सुवर्णं वेद ॥२६

अन्वयार्थ—[तस्य ह०–] त्या या सामाचें सुवर्ण जो जाणतो त्याला सुवर्ण होतें. [तस्य स्वरः एव सुवर्णं–] त्याचें स्वर हेंच सुवर्ण आहे. [यः एवं०–] जो याप्रमाणें हें सामाचें सुवर्ण जाणतो त्याला सुवर्ण प्राप्त होतें.२६.

तस्य हैतस्य साम्नो यः प्रतिष्ठां वेद प्रति ह तिष्ठति तस्य वै वागेव प्रतिष्ठा वाचि हि खल्वेष एतत्प्राणः प्रतिष्ठितो गीयतेऽन्न इत्यु हैक आहुः ॥ २७

अन्वयार्थ—[तस्य ह०–] त्या या सामाच्या प्रतिष्ठेला जो जाणतो तो प्रतिष्ठित होतो.[तस्य वाक् एव वै प्रतिष्ठा–]त्याची वाक् हीच प्रतिष्ठा आहे. [हि वाचि खलु एषः प्राणः प्रतिष्ठितः एतत् गीयते–] ज्याअर्थी वाक्-मध्यें प्रतिष्ठित होऊन हा प्राण हें गान गातो–त्याला गीतिभावास प्राप्त करितो त्याअर्थी सामाची प्रतिष्ठा वाक् [अन्ने इति उ ह एके आहुः–] तो अन्नांत प्रतिष्ठित होऊन गातो, असें कित्येक म्हणतात. २७.–ज्याअर्थी प्राणोपासना करणाराकडून केलें जाणारें अभ्यारोहफलक जपकर्म देवभाव देण्यास समर्थ होतें त्याअर्थी त्याचेंच विधान–

अथातः पवमानानामेवाभ्यारोहः स वै खलु प्रस्तोता साम प्रस्तौति स यत्र प्रस्तुयात्तदेतानि जपेत् । असतो मा सद्गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्योर्माऽमृतं गमयेति स यदाहासतो मा सद्गमयेति मृत्युर्वा असत्सदमृतं मृत्योर्माऽमृतं गमयामृतं मा कुर्वित्येवैतदाह तमसो मा ज्योतिर्गमयेति मृत्युर्वै तमो ज्योतिरमृतं मृत्योर्माऽमृतं गमयामृतं मा कुर्वित्येवैतदाह मृत्योर्माऽमृतं गमयेति नात्र तिरोहितमिवास्ति । अथ यानीतराणि स्तोत्राणि तेष्वा-

**त्मनेऽन्नाद्यमागायेत्तस्मादु तेषु वरं वृणीत यं कामं काम-
येत तꣳ स एष एवंविदुद्गाताऽऽत्मने वा यजमानाय वा
यं कामं कामयते तमागायति तद्धैतल्लोकजिदेव न
हैवालोक्यताया आशाऽस्ति य एवमेतत्साम वेद ॥ २८**

इति प्रथमाध्यायस्य तृतीयं ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—[अथ अतः पवमानानां एव अभ्यारोहः—] आतां यानंतर पवमानांचाच अभ्यारोह सांगितला जातो—[सः वै खलु०—] तो प्रस्तोता सामाला आरंभ करतो. [सः यत्र प्रस्तुयात् तत् एतानि जपेत्०—] तो ज्या वेळीं त्याला आरंभ करील त्या वेळी 'असतो मा सद्गमय' 'तमसो मा ज्योतिर्गमय' 'मृत्योर्माऽमृतं गमय' या तीन याजुषांचा जप करावा. [सः यत् आह०—] 'असतो मा सद्गमय' असें जें तो मंत्र म्हणाला त्याचा अर्थ असा—[मृत्युः वै असत् अमृतं सत्—] मृत्युच असत व अमृत सत् आहे. [मृत्योः मा अमृतं गमय—] यास्तव मृत्यूपासून मला अमृताला पोंचीव, [मा अमृतं कुरु इति एव एतत् आह—] मला अमृत कर, असेंच हा मंत्र सांगतो. 'तमसो मा ज्योतिर्गमय'—[मृत्युः वै तमः ज्योतिः अमृतं—] मृत्युच तम आहे व ज्योति अमृत आहे. [मृत्योः मा०—] यास्तव मृत्यूपासून मला अमृताला पोंचीव, मला अमृत कर, हाच अर्थ हें वाक्य सांगतें. 'मृत्योर्माऽमृतं गमय' —[अत्र तिरोहितं इव न अस्ति—] या वाक्यांत गुप्त असें कांहींच नाहीं. यास्तव त्याचा अर्थ यथाश्रुतच आहे. [अथ यानि इतराणि स्तोत्राणि—] नंतर बाकीचीं जी स्तोत्रें [तेषु आत्मने अन्नाद्यं आगायेत्—] त्यांत स्वतःसाठीं अन्नाद्याचें आगान करावें, [सः एषः एवंविद् उद्गाता आत्मने वा यजमानाय वा यं कामं कामयते तं आगायति—] ज्याअर्थीं तो हा असें जाणणारा उद्गाता आपल्यासाठीं किंवा यजमानासाठीं ज्या कामाची इच्छा करतो त्याचें आगान करूं शकतो; त्याला गानानें संपादन करण्यास समर्थ आहे, [तस्मात् तेषु यं कामं कामयेत तं वरं वृणीत—] त्याअर्थीं यजमानानें, प्रस्तोता त्या स्तोत्रांचा प्रयोग करूं लागला असतां, ज्या उपभोगाची कामना असेल त्याची इच्छा—प्रार्थना करावी. [तत् ह एतत् लोकजित् एव—] तें हें प्राणदर्शन लोकप्राप्तीचें साधनच आहे. [यः एवं एतत साम वेद—] कारण जो अशा रीतीनें हें साम जाणतो,

—या सामान्य प्राणाची उपासना करतो, [अलोक्यतायाः आशा एव ह न अस्ति—] त्याला अलोक्यतेची आशाच नसते. कारण 'मीच प्राणात्मा आहें' असें ज्ञान झाल्यावर त्याचीच इच्छा संभवत नाही. २८ (३)

—समुचित ज्ञान-कर्म व केवल प्राणदर्शन—प्राणोपासना यांचें प्रजापतित्व-प्राप्ति हें फल सांगितलें. आतां त्या फलभूत प्रजापतीच्या—जगाच्या सृष्टि-स्थिति-संहाराविषयीच्या स्वातंत्र्यादि-विभूतीचें वर्णन करावें व त्याच्या द्वारा वैदिक ज्ञान-कर्माच्या फलाचा उत्कर्षहि व्यक्त करावा, म्हणून पुढील ब्राह्मण आरंभिलें जातें. त्याच्या योगानें कर्मकांडविहित ज्ञान-कर्मांची स्तुति केल्या-रखें होतें. हें सर्वहि ज्ञान-कर्मफल संसारच आहे, कारण तें भय-अरति इत्यादि-कांनीं युक्त आहे, तें शरीरेंद्रियरूप आहे, तें स्थूल—व्यक्त—अनित्यविषय आहे व पुढें सांगितली जाणारी ब्रह्मविद्याच मोक्षाचें निमित्त आहे, असें कळल्यानें पुरुष संसाराविषयीं विरक्त होऊन जिज्ञासु होतो. अतृषिताला जलपानाचा जसा अधिकार नाहीं, तसा अविरक्ताला ब्रह्मविद्येचा अधिकार नाहीं. यास्तव साध्य-साधनरूप संसाराविषयीं त्यांतील दोष कळल्यानें वैराग्य उत्पन्न व्हावें, ह्मणूनहि ज्ञान-कर्माच्या फलाचा उत्कर्ष येथें विवक्षित आहे—

आत्मैवेदमग्र आसीत्पुरुषविधः सोऽनुवीक्ष्य नान्यदात्मनोऽ-पश्यत्सोऽहमस्मीत्यग्रे व्याहरत्त ततोऽहंनामाभवत्तस्मादप्येतर्ह्या-मन्त्रितोऽहमयमित्येवाग्र उक्त्वाऽथान्यन्नाम प्रब्रूते यदस्य भवति स यत्पूर्वोऽस्मात्सर्वस्मात्सर्वान्पाप्मन औषत्तस्मा-त्पुरुष ओषति ह वै स तं योऽस्मात्पूर्वो बुभूषति य एवं वेद ॥१

अन्वयार्थ—[अग्रे इदं आत्मा एव आसीत्—] दुसऱ्या शरीरांची उत्पत्ति होण्यापूर्वी हें सर्व शरीरजात आत्माच म्ह० प्रथम शरीरी प्रजापतिच होतें. [सः पुरुषविधः अनुवीक्ष्य—] तो शिर, हात, पाय इत्यादि अवयवांनीं पुरुषा-सारखा असलेला विराट् मी कोण अथवा कोणत्या लक्षणाचा आहें, असा विचार करून [आत्मनः अन्यत् न अपश्यत्—] आपल्या शरीरेंद्रियांहून दुसरें कांहींएक पाहता झाला नाहीं. तर तो केवल आपल्याच—सर्वात्म्याला पाहता झाला. [सः अहं अस्मि इति अग्रे व्याहरत्—] तो 'मी आहें' असें पूर्वी बोलला. [ततः अहं नाम अभवत्—] त्यामुळें तो 'अहं' या नांवाचा झाला.

[तस्मात् एतर्हि अपि आमंत्रितः—] त्यामुळें आतांहि व्यवहारांत 'कोण आहे?' असें एखाद्याला विचारलें असतां, [अयं अहं इति एव अग्रे उक्त्वा—] तो 'मी आहें' असेंच अगोदर सांगून [अथ अन्यत् नाम यत् अस्य भवति तत् प्रब्रूते—] नंतर आपलें दुसरें जें लौकिक नांव असतें तें सांगतो. [सः अस्मात् सर्वस्मात् पूर्वः सर्वान् पाप्मनः यत् औषत्—] तो प्रजापति प्रजापतित्वाची इच्छा करणाऱ्या या सर्वांपेक्षां श्रेष्ठ—पूर्व होऊन सर्व आसंगलक्षण पापांना ज्यापक्षीं जाळता झाला [तस्मात् पुरुषः—] त्यापक्षीं तो पुरुष होय. [यः एवं वेद—] जो अशी उपासना करतो [सः यः अस्मात् पूर्वः बुभूषति तं ओषति ह वै—]तो याच्याहून जो पूर्व—प्रजापति होण्याची इच्छा करतो त्याला जाळतो. १.

—ज्या कर्मकांडविहित ज्ञान-कर्माच्या प्राजापत्यरूप फलाची येथें स्तुति करावयाची आहे तें संसारविषयाला सोडून नाही, असें दाखविणारी श्रुति म्हणते—

सोऽबिभेत्तस्मादेकाकी बिभेति स हायमीक्षांचक्रे यन्मदन्यन्नास्ति कस्मान्नु बिभेमीति तत एवास्य भयं वीयाय कस्माद्ध्यभेष्यद्द्वितीयाद्वै भयं भवति ॥ २

अन्वयार्थ—[सः अबिभेत्—] तो प्रजापति भ्याला. [तस्मात् एकाकी बिभेति—] त्यामुळेंच आतांहि व्यवहारांत एकाकी—असहाय प्राणी भितो. [सः ह अयं ईक्षांचक्रे—] पण तो हा प्रजापति असें ईक्षण करता झाला. [यत् मदन्यत् न अस्ति कस्मात् नु बिभेमि इति—] जर मजहून दुसरी वस्तुच नाहीं तर मी कोणाला भीत आहें [ततः एव अस्य भयं वीयाय—]असा विचार केल्यावरच त्याचें भय नाहींसें झालें. [हि कस्मात् अभेष्यत्—] पण त्याला हें भय कशापासून झालें? [द्वितीयात् वै भयं भवति—] दुसऱ्या वस्तूपासूनच भय होतें. (अधिक खुलासा भाष्यार्थांत पहा.) २.—प्रजापतित्व हें संसारांतच अन्तर्भूत होतें, याविषयीं आणखी कारण—

स वै नैव रेमे तस्मादेकाकी न रमते स द्वितीयमैच्छत्। स हैतावानास यथा स्त्रीपुमांसौ संपरिष्वक्तौ स इममेवात्मानं द्वेधापातयत्ततः पतिश्च पत्नी चाभवतां तस्मादिदमर्धबृगलमिव स्व इति ह स्माऽऽह याज्ञवल्क्यस्तस्मादयमाकाशः स्त्रिया पूर्यत एव तांसमभवत्ततो मनुष्या अजायन्त ॥ ३

अन्वयार्थ--[सः वै न एव रेमे–] तो प्रजापति रममाण झाला नाहीं. [तस्मात् एकाकी न रमते–] त्यामुळेंच आतांहि एकाकी प्राणी रममाण होत नाहीं. [सः द्वितीयं ऐच्छत्–] त्यानें दुसऱ्या वस्तूची इच्छा केली; तेव्हां [यथा स्त्रीपुमांसौ संपरिष्वक्तौ सः ह एतावान् आस–] परस्पर संबद्ध स्त्रीपुरुष ज्या परिमाणाचे होतात तेवढ्या परिमाणाचा तो झाला. [सः इमं एव आत्मानं द्वेधा अपातयत्–] तो याच आपल्या देहाला दोन प्रकारें पाडविता झाला. [ततः पतिः च पत्नी च अभवतां–] त्यामुळें पति व पत्नी असें दांपत्य झालें. [तस्मात् स्वः इदं अर्धबृगलं इव इति ह याज्ञवल्क्यः आह स्म–] त्यामुळें स्वतःचेंच हें शरीर अर्ध्या वेळूच्या कांबीसारखें आहे, असें याज्ञवल्क्य म्ह० यज्ञवल्क्याचा पुत्र दैवराती म्हणाला. [तस्मात् अयं आकाशः स्त्रिया पूर्यते एव–] तस्मात् हा पुरुषार्ध स्त्रीकडूनच पूर्ण केला जातो. [तां समभवत्–] तिच्याशीं–त्या शतरूपेशीं तो–मनु संगत झाला. [ताः मनुष्याः अजायन्त–] त्यापासून मनुष्य उत्पन्न झाले. ॥

सो ह इयमीक्षांचक्रे कथं नु मात्मन्यन एव जनयित्वा संभवति हन्त तिरोऽसानीति सा गौरभवदृषभ इतरस्तां समेवाभवत्ततो गावोऽजायन्त वडवेतराऽभवदश्वतृष इतरो गर्दभीतरा गर्दभ इतरस्तां समेवाभवत्तत एकशफमजायताजेतराऽभवदुस्त इतरोऽविरितरा मेष इतरस्तां समेवाभवत्ततोऽजावयोऽजायन्तैवमेव यदिदं किं च मिथुनमापिपीलिकाभ्यस्तत्सर्वमसृजत ॥ ४

अन्वयार्थ--[सा उ ह इयं ईक्षांचक्रे–] त्या शतरूपेनें ईक्षण–विचार केला. [कथं नु आत्मनः एव जनयित्वा मा संभवति–] आपल्यापासूनच मला उत्पन्न करून हा माझ्याशींच समागम कसा करीत आहे! [हन्त तिरः असानि इति–] यास्तव मीं आतां गुप्त व्हावें, असा विचार करून [सा गौः अभवत्–] ती गाय झाली. [इतरः ऋषभः–] तेव्हां मनु वृषभ झाला व [तां एव समभवत्–] तिच्याशींच संगत झाला. [ततः गावः अजायन्त–] त्या समागमापासून गाई व बैल उत्पन्न झाले. [इतरा वडवा अभवत्–] शतरूपा वडवा म्हणजे घोडी झाली. [इतरः अश्ववृषः–] तेव्हां मनु अश्वश्रेष्ठ

झाला. [इतरा गर्दभी–] शतरूपा गर्दभी झाली असतां [इतरः गर्दभः–] तो गर्दभ झाला व [तां एव समभवत्–] तिच्याशीच संगत झाला. तेव्हां [ततः एकशफं अजायत–] त्यापासून एका खुरानें युक्त असलेले प्राणी झाले. [इतरा अजा अभवत्–] शतरूपा अजा झाली; तेव्हां [इतरः बस्तः–] दुसरा अज म्हणजे बकरा झाला. [इतरा अविः–] ती मेंढी झाली; तेव्हां [इतरः मेषः–] दुसरा मेष म्हणजे मेंढा झाला; आणि [तां एव समभवत्–] क्रमानें तिच्याशींच संगत झाला. तेव्हां [ततः अजावयः अजायन्त–] त्यापासून बकऱ्या व मेंढ्या झाल्या. [एवं एव यत इदं किंच आपिपीलिकाभ्यः मिथुनं–] याचप्रमाणें हें जें कांहीं मुंग्यांपर्यंत स्त्रीपुरुषलक्षण द्वंद्व आहे [तत् सर्वं असृजत–] तें सर्व तो उत्पन्न करता झाला. ४.–याप्रमाणें हें सर्व जगत् उत्पन्न करून—

सोऽवेदहं वाव सृष्टिरस्म्यहꣳहीदꣳसर्वमसृक्षीति ततः सृष्टिरभवत्सृष्ट्याꣳ हास्यैतस्यां भवति य एवं वेद ॥ ५

अन्वयार्थ—[सः अहं वाव सृष्टिः अस्मि इति अवेत्–] तो प्रजापति मीच सृष्टि आहें, असें जाणता झाला. [अहं हि इदं सर्वं असृक्षि इति–] मीच हें सर्व जगत् उत्पन्न केलें आहे. [ततः सृष्टिः अभवत्–] त्यामुळें तो सृष्टि या नांवाचा झाला. [यः एवं वेद अस्य ह एतस्यां सृष्ट्यां भवति–] जो असें जाणतो तो या प्रजापतीच्या सृष्टींत जगाचा स्रष्टा होतो. ५. –याप्रमाणें हें मिथुनात्मक जगत् उत्पन्न करून ब्राह्मणादिवर्णांच्या नियामक देवतांना उत्पन्न करण्यासाठीं—

अथेत्यभ्यमन्थत्स मुखाच्च योनेर्हस्ताभ्यां चाग्निमसृजत तस्मादेतदुभयमलोमकमन्तरतोऽलोमका हि योनिरन्तरतः। तद्यदिदमाहुरमुं यजामुं यजेत्येकैकं देवमेतस्यैव सा विसृष्टिरेष उ ह्येव सर्वे देवाः ॥

अन्वयार्थ—[अथ सः इति अभ्यमन्थत्–] नंतर तो प्रजापति असे हात घालून मन्थन करता झाला; [मुखात् च हस्ताभ्यां च योनेः अग्निं असृजत–] आणि मुख व दोन हात या योनीपासून अग्नीला उत्पन्न करता झाला. [तस्मात् एतत् उभयं अन्तरतः अलोमकं–] त्यामुळें ती दोन्ही आंतल्या बाजूनें लोमरहित आहेत. [योनिः हि अन्तरतः अलोमका–] प्रसिद्ध योनिहि आंतून

लोमरहित असते. [तत् अमुं यज अमुं यज इति एकैकं देवं यत् इदं आहुः—] कर्मप्रकरणांत याज्ञिक 'या अग्नीचें यजन कर, या इंद्राला यज,' असें अग्न्यादिकांना भिन्न भिन्न देव मानून जें म्हणतात तें बरोबर नाहीं. कारण [एतस्य एव सा विसृष्टिः—] या प्रजापतीचीच ती सर्व विसृष्टि आहे. [एषः उ हि एव सर्वे देवाः—] सर्व देव हाच आहे. (याचा विस्तार भाष्यार्थांत पहा.) अन्नादिक हाहि याच एका देवाचा—प्रजापतीचा भेद आहे, असें श्रुति सांगते—

अथ यत्किंचेदमार्द्रं तद्रेतसोऽसृजत तदु सोम एता-
वद्वा इदꣳसर्वमन्नं चैवान्नादश्च सोम एवान्नमग्नि-
न्नादः सैषा ब्रह्मणोऽतिसृष्टिः । यच्छ्रेयसो देवानसृज-
ताथ यन्मर्त्यः सन्नमृतानसृजत तस्मादतिसृष्टिरति-
सृष्ट्याꣳहास्यैतस्यां भवति य एवं वेद ॥ ६

अन्वयार्थ—[अथ—] अस्त्या अग्नीची उत्पत्ति झाल्यानंतर [यत् किंच इदं आर्द्रं तत् रेतसः असृजत—] हें जें कांहीं द्रवात्मक आहे तें तो प्रजापति आत्म-बीजापासून उत्पन्न करता झाला. [तत् उ सोमः—] तें हा सोमच होय. [इदं सर्वं अन्नं अन्नादः च एव एतावत् वै—] हें सर्व अन्न व अन्नाद एवढेंच आहे. [सोमः एव अन्नं—] सोमच अन्न आहे व [अग्निः अन्नादः—] अग्नि अन्नाद आहे. [सा एषा ब्रह्मणः अतिसृष्टिः—] ही ब्रह्माची अतिसृष्टि आहे. [यत् श्रेयसः देवान् असृजत—] कारण तो आपल्यापासून अतिशय प्रशंसनीय देवांना उत्पन्न करता झाला. (यास्तव ती देवसृष्टिच अतिसृष्टि आहे.) [अथ यत् मर्त्यः सन् अमृतान् असृजत—] कारण तो स्वतः मर्त्य असून अमर्त्य देवांस उत्पन्न करता झाला. [तस्मात् अतिसृष्टिः—] म्हणून ही अतिसृष्टि—उत्कृष्ट ज्ञानाचें फल आहे. [यः एवं वेद—] जो या अतिसृष्टीला प्रजापतीच्या आत्मभूत जाणतो [अस्य एतस्यां अतिसृष्ट्यां ह भवति—] तो या अतिसृष्टींत प्रजापतीसारखा स्रष्टा होतो. ६—वैदिक ज्ञान व कर्म यांचें हें संसाराख्य फल सांगितल्यावर श्रुति त्याच साध्य-साधनलक्षण व्याकृत जगाची जी वृक्षाच्या बीजावस्थेसारखी बीजावस्था—उत्पत्तीच्या पूर्वीची अवस्था तिचा पर्यायानें निर्देश करिते. कारण कर्म हें ज्याचें बीज आहे व अविद्या क्षेत्र आहे असा

या संसारवृक्षाचा समूल उच्छेद केला पाहिजे. त्याचा उच्छेद केल्यानेंच समस्त पुरुषार्थाची प्राप्ति होते.

तद्धेदं तर्ह्यव्याकृतमासीत्तन्नामरूपाभ्यामेव व्याक्रियतासौ नामाऽयमिदꣳरूप इति तदिदमप्येतर्हि नामरूपाभ्यामेव व्याक्रियतेऽसौनामाऽयमिदꣳरूप इति ॥

अन्वयार्थ—[तत् ह इदं तर्हि अव्याकृतं आसीत्—] हेंच तें जगत् उत्पत्तीच्या पूर्वी अव्यक्त होतें. [तत् नामरूपाभ्यां एव व्याक्रियत—] तेंच अव्याकृत असलेलें जगत् नाम व रूप यांच्या योगानें व्यक्त झालें. [अयं असौनामा—] हा या नांवाचा व [इदंरूपः इति—] या रूपाचा, असें तें व्यक्त झालें. (हेंच निजून उठलेल्या पुरुषाच्या दृष्टान्तानें व्यक्त केलें जातें—) [तत् इदं एतर्हि अपि नामरूपाभ्यां एव अयं असौनामा इदंरूपः इति व्याक्रियते—] तें हें अव्याकृत वस्तुजात सांप्रतकाळीहि—व्यवहारमयीहि नाम-रूपांच्या योगानेंच—हा अमुक नांवाचा, अमुक रूपाचा—अशाच रीतीनें व्यक्त केलें जातें. —जगाचें मूळ व त्याचें कार्य सांगून त्यांत प्रविष्ट कोण झाला तें श्रुति सांगते—

स एष इह प्रविष्टः । आनखाग्रेभ्यः । यथा क्षुरः क्षुरधानेऽवहितः स्याद्विश्वंभरो वा विश्वंभरकुलाये तं न पश्यन्ति । अकृत्स्नो हि सः ॥

अन्वयार्थ—[सः—] ज्याच्या ज्ञानासाठीं कांडद्वयात्मक वेदाचा आरंभ झाला, स्वाभाविक अविद्येमुळें ज्याच्यामध्यें कर्ता, क्रिया व फल यांचा अध्यारोप होतो, जो सर्व जगाचें कारण आहे, जलापासून होणाऱ्या जलात्मकच फेनरूप मळाप्रमाणें ज्याच्यापासून नाम-रूप व्यक्त होतें, तो [एषः—] हा नित्य शुद्ध-बुद्ध-मुक्त परमात्मा [इह—] कर्मफलाश्रयभूत अशनायादिमान् ब्रह्मादिस्तंबपर्यंत देहांमध्यें [प्रविष्टः—] प्रविष्ट झाला. कोठवर ? [आनखाग्रेभ्यः—] नखाग्रांपर्यंत—नखशिखान्त देहांत प्रविष्ट झाला. (याविषयीं दृष्टान्त—) [यथा क्षुरधाने क्षुरः अवहितः स्यात्—] ज्याप्रमाणें नापिताच्या क्षुरधानांत असलेला वस्तरा त्यांत घालून ठेवलेलासा उपलब्ध होतो [वा विश्वभरः विश्वंभरकुलाये अवहितः स्यात्—] किंवा विश्वाचें भरण करणारा अग्नि विश्वंभराच्या घरटयांत —काष्ठादिकांत प्रविष्ट झालेलासा अनुभवास येतो त्याप्रमाणें तो आत्मा कार्यरूप देहांत नखाग्रांपर्यंत प्रविष्ट झालेलासा उपलब्ध होतो. पण [तं न पश्यन्ति—]

त्याला लोक पहात नाहींत. [हि अकृत्स्नः सः–] कारण त्यांत प्राणनादि क्रियांनीं विशिष्ट असलेला तो अकृत्स्न–असमस्त असतो. (तो संपूर्ण नसतो. तर त्या त्या क्रियेनें परिच्छिन्न झालेला असतो. म्हणून तोच परमात्मा आहे, असें त्याला कोणी जाणत नाहीत. येथील प्रवेशाविषयी सविस्तर व सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा.)त्याला अपूर्णत्व कोणत्या कारणानें प्राप्त होतें? उत्तर–

प्राणन्नेव प्राणो नाम भवति । वदन्वाक्पश्यꣳश्चक्षुः शृण्वञ्श्रोत्रं मन्वानो मनस्तान्यस्यैतानि कर्मनामान्येव । स योऽत एकैकमुपास्ते न स वेदाकृत्स्नो ह्येषोऽत एकैकेन भवत्यात्मेत्येवोपासीतात्र सर्वं एकं भवन्ति ॥

अन्वयार्थ—[प्राणन् एव प्राणः नाम भवति–] तो प्राणनक्रियाच करणारा 'प्राण' या नांवाचा होतो. [वदन् वाक्–] तसाच वदन–भाषण ही क्रिया करणारा तो 'वाक्' या नांवाचा होतो. [पश्यन् चक्षुः०–] पहाणारा तो चक्षु, ऐकणारा श्रोत्र व मनन करणारा तो मन होतो. [तानि अस्य एतानि कर्मनामानि एव–] हीं त्याची कर्मनामेंच आहेत. [सः यः अतः एकैकं उपास्ते–] या प्राणनादि क्रियासमुदायांतून जो प्राण, चक्षु इत्यादि एकेका क्रियेनें विशिष्ट अशा आत्म्याची उपासना करतो म्ह० जो प्राणनक्रिया करणारा तो आत्मा, जो दर्शनक्रिया करणारा तो आत्मा, असें परिच्छिन्न आत्म्याचें चिंतन करतो [सः न वेद–] तो ब्रह्माला जाणत नाहीं. [हि एषः अकृत्स्नः–] कारण तो प्राणनादि एकेका क्रियेनें विशिष्ट असलेला आत्मा असमस्त–अपूर्ण आहे. [अतः एकैकेन भवति–] यास्तव तो एकेका विशेषणानें विशिष्ट असतो. यास्तव [आत्मा इति-एव उपासीत–] तो आत्मा प्राणादि सर्व कार्य-करणांना व्यापणारा आहे, अशीच त्याची उपासना करावी. कारण [अत्र सर्वे एकं भवन्ति–] त्या आत्म्यामध्यें ते सर्व भेद एकरूप होतात. (याचा सविस्तर विचार भाष्यार्थांत पहा.) आत्माच ज्ञातव्य आहे, अनात्मा नाहीं, यांचें उपपादन–

तदेतत्पदनीयं सर्वस्य यदयमात्माऽनेन ह्येतत्सर्वं वेद । यथा ह वै पदेनानुविन्देदेवं कीर्तिꣳ श्लोकं विन्दते य एवं वेद ॥ ७

अन्वयार्थ—[तत् एतत् सर्वस्य पदनीयं–] तें हें या सर्वांना पदनीय–गमनीय–प्राप्त करण्यास योग्य आहे. तें काय तर [यत् अयं आत्मा–] जें हें

आत्मतत्त्व तें सर्वांस पदनीय आहे. [हि अनेन एतत् सर्वं वेद–] कारण पुरुष त्याच्या योगानेंच हें सर्व जाणतो. म्हणजे [यथा ह वै पदेन अनुविन्देत् एवं–] ज्याप्रमाणें सांडलेल्या पशूच्या पावलांवरून त्याला शोधून काढतात त्याप्रमाणें. [यः एवं वेद कीर्तिं श्लोकं विन्दते–] जो असें जाणतो तो ख्यातीला व इष्ट-जनांशीं संघाताला प्राप्त होतो. (याचा भाष्यार्थ पहा.) ७–पण दुसऱ्या सर्वांचा अनादर करून एक आत्मतत्त्वच ज्ञेय कां आहे ? उत्तर—

तदेतत्प्रेयः पुत्रात्प्रेयो वित्तात्प्रेयोऽन्यस्मात्सर्वस्मादन्तरतरं यदयमात्मा ॥ स योऽन्यमात्मनः प्रियं ब्रुवाणं ब्रूयात्प्रियꣳ रोत्स्यतीतीश्वरो ह तथैव स्यादात्मानमेव प्रियमुपासीत । स य आत्मानमेव प्रियमुपास्ते न हास्य प्रियं प्रमायुकं भवति ८

अन्वयार्थ—[तत् एतत् पुत्रात् प्रेयः–] तें हें आत्मतत्त्व पुत्राहून अधिक प्रिय आहे. [वित्तात् प्रेयः–] वित्ताहून अधिक प्रिय आहे. [अन्यस्मात् सर्व-स्मात् प्रेयः–] त्याचप्रमाणें तें दुसऱ्या सर्व प्रिय पदार्थांहून अधिक प्रिय आहे. कारण [यत् अयं आत्मा अन्तरतरं–] हें जें आत्मतत्त्व तें पुत्रादिकांच्या अपेक्षेनें अन्तर–समीप असलेल्या देहाहून अधिक समीप आहे. [सः यः आत्मनः अन्यं प्रियं ब्रुवाणं ब्रूयात्–] तो जो आत्मप्रियदर्शी त्यानें अनात्म्याला प्रिय म्हणणाऱ्या मूढ पुरुषाला म्हणावें कीं [प्रियं रोत्स्यति इति–] तुझें प्रिय विनाश पावेल. कारण [ईश्वरः ह–] तो तसें बोलण्यास समर्थच असतो. त्यामुळें [तथा एव स्यात्–] तसेंच होतें. यास्तव [आत्मानं एव प्रियं उपासीत–] आत्मा याच प्रियाची उपासना करावी. [सः यः आत्मानं एव प्रियं उपास्ते–] जो कोणी आत्म्याला प्रिय मानून त्याची उपासना करतो [अस्य ह प्रियं प्रमा-युकं न भवति–] त्याचें प्राणादि प्रिय अत्यंत मरणशील होत नाहीं. ८. –'आत्मेत्येवोपासीत' या वाक्यानें ब्रह्मविद्या सूत्ररूपानें सांगितली. आतां तिचेंच व्याख्यान करण्यासाठीं श्रुति उपोद्घातरूपानें म्हणते—

तदाहुर्यद्ब्रह्मविद्यया सर्वं भविष्यन्तो मनुष्या मन्यन्ते । किमु तद्ब्रह्मावेद्यस्माात्सर्वमभवादिति ॥ ९

अन्वयार्थ—[तत् आहुः] ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मण पुढें सांगितल्याप्रमाणें प्रश्न विचारते झाले. [ब्रह्मविद्यया सर्वं भविष्यन्तः मनुष्याः यत् मन्यन्ते–] ब्रह्म-

विद्येच्या योगानें आम्ही हें सर्व होऊं असें मनुष्य जें समजतात [तत् ब्रह्म किमु अवेत्—] तें ब्रह्म काय बरें जाणतें झालें ? त्याचप्रमाणें [यस्मात् तत् सर्वं अभवत् इति—] ज्या विज्ञानामुळें तें सर्व झालें तें ब्रह्म काय जाणतें झालें? (त्यानें कोणाला जाणलें स्वतःला की दुसऱ्याला ?) ९.—जर तें ब्रह्म कांहीं तरी जाणूनच सर्व झालें तर त्यानें काय जाणलें कीं ज्यामुळें तें सर्व झालें? उत्तर—

ब्रह्म वा इदमग्र आसीत्तदात्मानमेवावेत् । अहं ब्रह्मास्मीति तस्मात्तत्सर्वमभवत् । तद्यो यो देवानां प्रत्यबुध्यत स एव तदभवत्तथर्षीणां तथा मनुष्याणां तद्धैतत्पश्यन्नृषिर्वामदेवः प्रतिपेदेऽहं मनुरभवꣳसूर्यश्चेति । तदिदमप्यतर्हि य एवं वेदाहं ब्रह्मास्मीति स इदꣳसर्वं भवति तस्य ह न देवाश्चनाभूत्या ईशते । आत्मा ह्येषाꣳ स भवति ॥

अन्वयार्थ—[अग्रे इदं ब्रह्म वै आसीत्—] पूर्वी हें सर्व ब्रह्मच होतें [तत् आत्मानं एव अवेत्—] तें आपल्यालाच जाणतें झालें. [अहं ब्रह्म अस्मि इति—] मी ब्रह्म आहें, असें तें ब्रह्म जाणतें झालें न [तस्मात् तत् सर्वं अभवत्—] त्या ज्ञानामुळेंच तें सर्व झालें. [तत् देवानां यः यः प्रत्यबुध्यत—] त्या देवांतील जो जो ज्ञानसंपन्न झाला [स. एव तत् अभवत—] तो तो आत्मा तें ब्रह्मच झाला. [तथा ऋषीणां तथा मनुष्याणां—] त्याचप्रमाणें ऋषींतील व मनुष्यांतील जो जो ज्ञानी झाला तो तो तें ब्रह्म झाला. [तत् ह एतत् पश्यन् ऋषिः वामदेवः अहं मनुः अभवं सूर्यः च इति प्रतिपेदे—]त्या ह्या ब्रह्माला पाहणारा वामदेव ऋषि 'मी मनु झालों व सूर्य झालों,' असें जाणता झाला. [एतर्हि अपि यः तत् इदं एवं अहं ब्रह्म अस्मि इति वेद—] या वर्तमान समयीहि जो या ब्रह्माला 'मी ब्रह्म आहें' अशा रीतीनें जाणतो [सः इदं सर्वं भवति—] तो हें सर्व होतो. [तस्य ह अभूत्यै देवाश्चन न ईशते—] त्याच ब्रह्मवेत्त्याच्या नाशाला देवहि समर्थ होत नाहीत. मग दुसरे कोण समर्थ होणार ? [हि सः एषां आत्मा भवति—] कारण तो त्यांचा आत्माच होतो. (याविषयीं अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा)

अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योऽसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुरेवꣳस देवानाम् ॥

बृ. उ. ७०

अन्वयार्थ—[अथ यः अन्यः असौ अन्यः अहं अस्मि इति अन्यां देवतां उपास्ते—] आतां जो 'हा अन्य आहे व मी अन्य आहें' असें समजून आत्मभिन्न देवतेची उपासना करतो, [सः न वेद—] तो तत्त्व जाणत नाहीं. [यथा पशुः एवं सः देवानां—] इतकेंच नव्हे, तर आम्हांला जसा पशु ओझें वाहणें इत्यादि कार्यांच्या उपयोगी असतो तसा तो अविद्वान् देवांच्या उपयोगी असतो.—त्यामुळें देव अविद्वानालाच विघ्न करण्यास किंवा त्याच्यावर अनुग्रह करण्यास समर्थ आहेत, असें श्रुति सकारण सांगते—

यथा ह वै बहवः पशवो मनुष्यं भुञ्ज्युरेवमेकैकः पुरुषो देवान्भुनक्त्येकस्मिन्नेव पशावादीयमानेऽप्रियं भवति किमु बहुषु तस्मादेषां तन्न प्रियं यदेतन्मनुष्या विद्युः ॥ १०

अन्वयार्थ—[यथा ह वै बहवः पशवः मनुष्यं भुञ्ज्युः—] व्यवहारांत ज्याप्रमाणें पुष्कळ पशू मनुष्यास पाळतात [एवं एकैकः पुरुषः देवान् भुनक्ति—]त्याप्रमाणें एकेक पुरुष—मनुष्य देवांना पाळतो. [एकस्मिन् एव पशौ आदीयमाने अप्रियं भवति—] एखाद्याच पशूला व्याघ्रादिकानें उचलून नेलें असतां मनुष्याचें अप्रिय होतें. [किमु बहुषु—] मग पुष्कळ पशूंचा अपहार केल्यास काय विचारावें? [तस्मात् यत् एतत् मनुष्याः विद्युः—] ह्मणून मनुष्यांनीं ब्रह्मतत्त्वाला जाणावें, [तत् एषां न प्रियं—] हें देवांना प्रिय नाहीं.१०

ब्रह्म वा इदमग्र आसीदेकमेव तदेकꣳ सन्न व्यभवत् । तच्छ्रेयोरूपमत्यसृजत क्षत्रं यान्येतानि देवत्रा क्षत्राणीन्द्रो वरुणः सोमो रुद्रः पर्जन्यो यमो मृत्युरीशान इति । तस्मात्क्षत्रात्परं नास्ति तस्माद्ब्राह्मणः क्षत्रियमधस्तादुपास्ते राजसूये क्षत्र एव तद्यशो दधाति सैषा क्षत्रस्य योनिर्यद्ब्रह्म । तस्माद्यद्यपि राजा परमतां गच्छति ब्रह्मैवान्तत उपनिश्रयति स्वां योनिं य उ एनꣳहिनास्ति स्वाꣳस योनिमृच्छति स पापीयान्भवति यथा श्रेयाꣳसꣳहिꣳसित्वा ॥११

अन्वयार्थ—[अग्रे इदं ब्रह्म वै आसीत्—] पूर्वीं हें सर्व क्षत्रादि ब्रह्मच होतें. [एकं एव—] तें एकच अभिन्न होतें. [तत् एकं सत् न व्यभवत्—] तें एकच—अद्वितीय—क्षत्रादिभेदरहित होत्सातें विभूतियुक्त कर्म करण्यास समर्थ

झालें नाहीं. [तत् क्षत्रं श्रेयोरूपं अत्यसृजत–] तेव्हां त्यानें क्षत्र हें प्रशस्त-रूप अतिशयपणें उत्पन्न केलें. [यानि एतानि देवत्रा क्षत्राणि इंद्रः०–] हीं जीं देवतांतील इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यु व ईशान इत्यादि क्षत्रें त्यांना उत्पन्न केलें. [तस्मात् क्षत्रात् परं न अस्ति–] यास्तव क्षत्रिया-हून श्रेष्ठ कोणी नाहीं. [तस्मात् राजसूये ब्राह्मणः क्षत्रियं अधस्तात् उपास्ते–] म्हणून राजसूय यज्ञांत ब्राह्मण खालीं उभा राहून क्षत्रियाची उपासना करतो. [क्षत्रे एव तत् यशः दधाति–] ब्राह्मण तें आपलें यश क्षत्रियामध्यें स्थापितो. [यत् ब्रह्म सा एषा क्षत्रस्य योनिः–] जें ब्रह्म ती ही क्षत्राची योनिच म्हणजे उत्पत्तिस्थानच आहे. [तस्मात् राजा यद्यपि परमतां गच्छति–] त्यामुळें राजा यद्यपि श्रेष्ठतेस पात्र होतो [अंततः ब्रह्म एव उपनिश्रयति–] तरी तो राज-सूयाच्या शेवटीं ब्राह्मणाचाच आश्रय करतो. [स्वां योनिं–] तो आपल्या योनीचा आश्रय करतो. [यः उ एनं हिनस्ति–] जो क्षत्रिय त्याची हिंसा करतो [सः स्वां योनिं ऋच्छति–] तो आपल्या योनीचाच विनाश करतो. [यथा श्रेयांसं हिंसित्वा–] जसा एखादा व्यवहारांत श्रेष्ठाची हिंसा करून पापी होतो [तथा सः पापीयान् भवति–] तसा तो अतिशय पापी होतो. ११.

स नैव व्यभवत्स विशमसृजत यान्येतानि देवजातानि गणश आख्यायन्ते वसवो रुद्रा आदित्या विश्वेदेवा मरुत इति ॥१२

अन्वयार्थ—[सः न एव व्यभवत्–] तरी तो विभूतियुक्त कर्म करण्यास समर्थ झालाच नाहीं. [सः विशं असृजत–] म्हणून तो वैश्याला उत्पन्न करता झाला. [वसवः०–] वसू, रुद्र, आदित्य, विश्वेदेव, मरुत इत्यादि [यानि एतानि देवजातानि गणशः आख्यायन्ते–] हे जे देवजातिभेद गणशः सांगितले जातात (त्यांना त्यानें उत्पन्न केलें.) १२

स नैव व्यभवत्स शौद्रं वर्णमसृजत पूषणमियं वै पूषेयꣳहीदꣳ सर्वं पुष्यति यदिदं किंच ॥१३

अन्वयार्थ—[सः न व्यभवत्–] पण तो ब्राह्मणाभिमानी कर्म करण्यास समर्थ झाला नाहीं. म्हणून [सः शौद्रं वर्णं असृजत–] तो शूद्रवर्णास उत्पन्न करता झाला. [पूषणं–] पूषा हाच तो शूद्र वर्ण होय. [इयं वै पूषा–] ही

पृथ्वीच पूषा आहे. [हि इयं इदं सर्वं यत् किंच इदं पुष्यति—] कारण तीच हें जें कांही आहे त्या सर्वांचें पोषण करते. १३

स नैव व्यभवत्तच्छ्रेयोरूपमत्यसृजत धर्मं तदेतत्क्षत्रस्य क्षत्रं यद्धर्मस्तस्माद्धर्मात्परं नास्त्यतो अबलीयान्बलीयाꣳ समाशꣳसते धर्मेण यथा राज्ञैवं यो वै स धर्मः सत्यं वै तत्तस्मात्सत्यं वदन्तमाहुर्धर्मं वदतीति धर्मं वा वदन्तꣳ सत्यं वदतीत्येतद्ध्येवैतदुभयं भवति ॥ १४

अन्वयार्थ—[सः न एव व्यभवत्—] पण तो चार वर्णांना उत्पन्न करूनहि कर्म करावयास समर्थ झाला नाही. [तत् धर्मं श्रेयोरूपं अत्यसृजत—] म्हणून त्यानें धर्म हें श्रेयोरूप अतिशयपणें उत्पन्न केलें. [यत् धर्मः तत् एतत् क्षत्रस्य क्षत्रं—] धर्म हें क्षत्राचेंहि क्षत्र—नियन्तृ—आहे. [तस्मात् धर्मात् परं न अस्ति—] म्हणून धर्माहून श्रेष्ठ कांही नाही. [अतः धर्मेण अबलीयान् बलीयांसं आशंसते—] म्हणूनच धर्माच्या योगानें एखाद अतिशय दुर्बल असलेला प्राणीहि आपल्यापेक्षां अतिशय बलाढ्य असलेल्या प्राण्याला जिंकण्याची इच्छा करतो. [यथा राज्ञा एवं—] व्यवहारांत जसा एखादा साधारण कुटुंबीहि राजाच्या साह्यानें दुसऱ्या प्रबळाला जिंकण्याची इच्छा करतो त्याप्रमाणें. [यः वै सः धर्मः तत् सत्यं वै—] तो जो धर्म तें सत्यच होय [तस्मात् सत्यं वदन्तं धर्मं वदति इति आहुः—] म्हणून सत्य बोलणाराला हा धर्म बोलतो, असें म्हणतात [वा धर्मं वदन्तं सत्यं वदति इति—] व धर्म बोलणारा हा सत्य बोलतो असें म्हणतात. [एतत् हि एव एतत् उभयं भवति—] यास्तव तें दोन्ही धर्मच होय.१४

तदेतद्ब्रह्म क्षत्रं विट्शूद्रस्तदग्निनैव देवेषु ब्रह्माभवद्ब्राह्मणो मनुष्येषु क्षत्रियेण क्षत्रियो वैश्येन वैश्यः शूद्रेण शूद्रस्तस्मादग्नावेव देवेषु लोकमिच्छन्ते ब्राह्मणे मनुष्येष्वेताभ्याꣳ हि रूपाभ्यां ब्रह्माभवत् ॥

अन्वयार्थ—[तत् एतत्०—] तें हें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असें चातुर्वर्ण्य आहे. असो; [तत् अग्निना एव देवेषु ब्रह्म अभवत्—] त्यांना उत्पन्न करणारें तें ब्रह्म अग्नीच्या रूपानें देवांतील ब्राह्मण झालें; [ब्राह्मणः मनुष्येषु—] ब्राह्मणरूपानें मनुष्यांतील ब्राह्मण झालें. [क्षात्रियेण क्षत्रियः—]

तें क्षत्रियरूपानें क्षत्रिय, [वैश्येन वैश्यः—] वैश्यरूपानें वैश्य व [शूद्रेण शूद्रः—] शूद्ररूपानें शूद्र झालें. [तस्मात् अग्नौ एव देवेषु लोकं इच्छन्ते—] तस्मात् अग्नीमध्येंच कर्म करून देवांतील कर्मफल इच्छितात; [मनुष्येषु ब्राह्मणे—] आणि मनुष्यांतील फलाची इच्छा झाल्यास केवल ब्राह्मणजातीच्या आश्रयानें कर्मसिद्धि होते. [हि एताभ्यां रूपाभ्यां ब्रह्म अभवत्—] कारण ब्रह्म अग्नि व ब्राह्मण या दोन रूपांनीं झालें.—ब्रह्मानें कर्माकरितां वर्ण उत्पन्न केले. तें धर्माख्य कर्म कर्तव्यतारूपानें सर्वांचें नियमन करितें व पुरुषार्थाचें साधनहि आहे, तेव्हां परमात्मसंज्ञक स्वलोकाला जाणून काय करावयाचें आहे ? उत्तर—

अथ यो ह वा अस्माल्लोकात्स्वं लोकमदृष्ट्वा प्रैति स एनमविदितो न भुनक्ति यथा वेदो वाऽननूक्तोऽन्यद्वा कर्माकृतम् । यदिह वा अप्यनेवंविन्महत्पुण्यं कर्म करोति तद्वास्यान्ततः क्षीयत एवाऽऽत्मानमेव लोकमुपासीत स य आत्मानमेव लोकमुपास्ते न हास्य कर्म क्षीयते । अस्माद्धचेवाऽत्मनो यद्यत्कामयते तत्तत्सृजते ॥ १५

अन्वयार्थ—[अथ यः ह वै स्वं लोकं अदृष्ट्वा अस्मात् लोकात् प्रैति—] पण जो स्वलोकाला—आत्मसंज्ञक लोकाला न पहातां या अनात्मलोकांतून निघून जातो—मरतो [सः अविदितः एनं न भुनक्ति—] तो अज्ञात स्वलोक शोक-मोहादि दोषांचें निरसन करून याला पाळीत नाही. [यथा अननूक्तः वा वेदः—] जसा अनधीत वेद [वा अन्यत् कर्म अकृतं—] किंवा दुसरें एखादें न केलेलें लौकिक कर्म स्वफलदानानें पुरुषाचें पालन करीत नाहीं त्याप्रमाणें स्वलोक त्याचें रक्षण करीत नाहीं. [यत् इह वै अनेवंविद् महत् पुण्यं अपि कर्म करोति—] फार काय पण या लोकीं कोणी एखादा स्वलोकाला न जाणणारा महात्मा महत्पुण्य कर्महि करीत असला तरी, [तत् ह अस्य अन्ततः क्षीयते एव—] ते या अविद्वानाचें कर्म कर्मफलभोगाच्या शेवटीं क्षय पावतेंच. [आत्मानं एव लोकं उपासीत—] यास्तव आत्मलोकाचीच उपासना करावी [सः यः आत्मानं एव लोकं उपास्ते—] जो आत्मलोकाचीच उपासना करतो [अस्य कर्म न ह क्षीयते—] त्याचें कर्म क्षय पावतच नाहीं. [यत् यत् कामयते—] तो जें जें इच्छितो [तत् तत् अस्मात् हि एव आत्मनः सृजते—]

तें तें त्याला याच आत्म्यापासून प्राप्त होतें (भाष्यार्थ पहा.)१५.—वर्णाश्रमाभिमानी अविद्वान् देवादिकर्मकर्तव्यतेनें पशूप्रमाणें परतंत्र आहे, असें सांगितलें. आतां त्याचीं कर्तव्यकर्में कोणतीं व ज्यांच्यासाठीं पशूप्रमाणें तो तीं करितो ते देव कोण, तें श्रुति सांगते—

अथो अयं वा आत्मा सर्वेषां भूतानां लोकः स यज्जुहोति यद्यजते तेन देवानां लोकोऽथ यदनुब्रूते तेन ऋषीणामथ यत्पितृभ्यो निपृणाति यत्प्रजामिच्छते तेन पितृणामथ यन्मनुष्यान्वासयते यदेभ्योऽशनं ददाति तेन मनुष्याणामथ यत्पशुभ्यस्तृणोदकं विन्दति तेन पशूनां यदस्य गृहेषु श्वापदा वयाꣳस्यापिपीलिकाभ्य उपजीवन्ति तेन तेषां लोको यथा ह वै स्वाय लोकायारिष्टिमिच्छेदेवꣳहैवंविदे सर्वाणि भूतान्यरिष्टिमिच्छन्ति तद्वा एतद्विदितं मीमाꣳसितम् ॥

अन्वयार्थ—[अथो अयं वै आत्मा–] आतां हा गृही आत्मा–कर्माधिकृत पिंड [सर्वेषां भूतानां लोकः–] सर्व भूतांचा लोक–भोग्य आत्मा आहे. [सः यत् जुहोति यत् यजते–] तो गृहस्थ–पिंड जो होम करतो व जो याग करतो [तेन देवानां लोकः–] त्या होम यागरूप कर्मानें तो देवांचा लोक–भोग्य होतो. [अथ यत् अनुब्रूते तेन ऋषीणां–] जो प्रत्यहीं स्वाध्याय करतो त्याच्या योगानें ऋषींचा लोक होतो. [अथ यत् पितृभ्यः निपृणाति–] जें पितरांना पिंडोदकादि देतो [यत् प्रजां इच्छते–] व जी प्रजेची–संतानाची इच्छा करतो; संतानाला उत्पन्न करतो [तेन पितृणां–] त्याच्या योगानें पितरांचा लोक होतो. [अथ यत् मनुष्यान् वासयते–] मनुष्यांना आपल्या घरीं जें ठेवून घेतो व [एभ्यः यत् अशनं ददाति–] त्यांना भोजन देतो [तेन मनुष्याणां–] त्याच्या योगानें तो मनुष्यांचा लोक होतो. [अथ यत् पशुभ्यः तृणोदकं विन्दति–] तसेंच, पशूंना जें गवत व पाणी देतो [तेन पशूनां–] त्याच्या योगानें पशूंचा लोक होतो. [यत् अस्य गृहेषु श्वापदाः वयांसि आपिपीलिकाभ्यः उपजीवन्ति–] याच्या घरांत श्वापदें, पक्षी व मुंग्यांपर्यंत जीव अन्नकणादिकांच्या योगानें जी उपजीविका करितात [तेन तेषां लोकः–] त्याच्या

योगानें तो त्यांचा लोक होतो. त्यामुळें [यथा ह वै स्वाय लोकाय अरिष्टिं इच्छेत्–] ज्याप्रमाणें व्यवहारांत एखादा स्वतःच्या देहाचा अविनाश इच्छितो [एवं ह एवंविदे सर्वाणि भूतानि अरिष्टिं इच्छन्ति–] त्याप्रमाणें मी सर्व भूतांचा उपभोग्य आहें, असें जाणणाऱ्या त्याचा सर्व भूतें अविनाश इच्छितात. [तत् वै एतत् विदितं मीमांसितं–] तें हें कर्माचें अवश्य कर्तव्यत्व पंचमहायज्ञ-प्रकरणांत ज्ञात झालें आहे व अवदानप्रकरणांत त्याची मीमांसा केली आहे. १६

आत्मैवेदमग्र आसीदेक एव सोऽकामयत जाया मे स्यादथ प्रजायेयाथ वित्तं मे स्यादथ कर्म कुर्वीयेत्येतावान्वै कामो नेच्छꣳश्चनातो भूयो विन्देत्तस्मादप्येतर्ह्येकाकी कामयते जाया मे स्यादथ प्रजायेयाथ वित्तं मे स्यादथ कर्म कुर्वीयेति स यावदप्येतेषामेकैकं न प्राप्नोत्यकृत्स्न एव तावन्मन्यते ॥ तस्यो कृत्स्नता मन एवास्याऽऽत्मा वाग्-जाया प्राणः प्रजा चक्षुर्मानुषं वित्तं चक्षुषा हि तद्विन्दते श्रोत्रं दैवꣳ श्रोत्रेण हि तच्छृणोत्यात्मैवास्य कर्माऽऽत्मना हि कर्म करोति स एष पाङ्क्तो यज्ञः पाङ्क्तः पशुः पाङ्क्तः पुरुषः पाङ्क्तमिदꣳ सर्वं यदिदं किंच तदिदꣳ सर्वं प्राप्नोति य एवं वेद ॥ १७

इति प्रथमाध्याये चतुर्थं ब्राह्मणम् ॥ ४

अन्वयार्थ—[अग्रे आत्मा एव इदं आसीत्–] स्त्रीपरिग्रहाच्या पूर्वीं आत्माच–अविद्वान्–शरीरेंद्रियसंघातवान् ब्रह्मचारीच होता. [एकः एव–] तोच एक होता. [सः अकामयत जाया मे स्यात्–] तो कामना करता झाला कीं आतां मला भार्या असावी; [अथ प्रजायेय–] आतां मीं प्रजारूपानें उत्पन्न व्हावें; [अथ मे वित्तं स्यात्–] आतां मला वित्त असावें; [अथ कर्म कुर्वीय इति–] आतां मी कर्म करावें; [एतावान् वै कामः–] काम काय तो हा एवढाच. [इच्छंश्चन अतः भूयः न विन्देत–] इच्छा करणाराहि यापेक्षां अधिक कशालाच प्राप्त होत नाहीं. [तस्मात्०–] ज्याअर्थीं पूर्वीं असा अविद्वान् कामी कामना करिता झाला त्याअर्थीं [एतर्हि अपि एकाकी कामयते–] सांप्रतकाळींहि एकाकी कामीच अशी कामना करतो. [जाया मे स्यात्०–]

आतां मला भार्या असावी, मीं पुत्ररूपानें उत्पन्न व्हावें; आतां मला वित्त असावें व आतां मीं कर्म करावें; [सः एतेषां एकैकं अपि यावत् न प्राप्नोति–] तो यांतील एकेक कामालाहि जोंवर प्राप्त होत नाहीं (जाया, पुत्र, वित्त व कर्म यांतील एखादा कामहि जोंवर कमी असतो) [तावत् अकृत्स्नः एव मन्यते–] तोंवर तो आपणाला अपूर्णच समजतो [तस्य उ कृत्स्नता–] तो आपलें पूर्णत्व संपादन करण्यास जेव्हां असमर्थ असतो तेव्हां त्याची पूर्णता कल्पनेनें अशी होते–[मनः एव अस्य आत्मा–] मन हाच याचा आत्मा; [वाक् जाया–] वाक् हीच जाया; [प्राणः प्रजा–] प्राणच प्रजा; [चक्षुः मानुषं वित्तं–] चक्षु हेंच मानुष वित्त; [हि चक्षुषा तत् विन्दते–] कारण तो चक्षूनेंच गवादि वित्ताला जाणतो; [श्रोत्रं दैवं वित्तं–] श्रोत्र हेंच दैव वित्त; [हि श्रोत्रेण तत् शृणोति–] कारण श्रोत्रानें तें ऐकतो. [आत्मा एव अस्य कर्म–] आत्मा–देहेंद्रियसमूह हेंच याचें कर्म; [हि आत्मना कर्म करोति–] कारण त्या आत्म्याच्या योगानेंच तो कर्म करतो. [सः एषः पांक्तः यज्ञः–] तो हा पांक्त यज्ञ आहे. [पशुः पांक्तः–] पशु पांक्त आहे. [पुरुषः पांक्तः–] पुरुषः पांक्त आहे. [यत् इदं किंच इदं सर्वं पांक्तं–] हें जें कांही जगत् आहे तें पांक्त आहे.[यः एवं वेद–] जो असें जाणतो, अशी उपासना–चिंतन करितो [तत् इदं सर्वं आप्नोति–] त्याला हें सर्व प्राप्त होतें. १७ (४)

–अविद्येचें प्रकरण चालू आहे. त्यांत अविद्वान् ' मी उपासक निराळा व माझें उपास्य निराळें' अशा भेददृष्टीनें अन्य देवतेची उपासना करितो. तो वर्णाश्रमाभिमानी कर्मकर्तव्यतेनें नियमित व फलकामनेनें प्रेरित होत्साता अग्निहोत्रादि कर्मांनीं देवादिकांवर उपकार करीत सर्व भूतांचा भोग्य होतो, असें वर सांगितलें. सर्व भूतांनी याला स्वभोग्यत्वानें जसें उत्पन्न केलें आहे त्याचप्रमाणें यानेंहि सर्व भूतांना स्वकर्मानें आपल्या भोग्यत्वानें उत्पन्न केलें आहे. त्यामुळें एकेक जीव स्वकर्म व स्वविद्या यांच्या द्वारा सर्व जगाचा भोक्ता व जगाचें भोग्य होतो. याप्रमाणें जीवानें स्वकर्मानें आपलें भोग्य, या रूपानें उत्पन्न केलेल्या जगाचा कार्य-कारणरूपानें सात प्रकारें विभाग करून तें सप्त अन्नरूप आहे, असें ध्यानासाठीं श्रुति सांगते. हाच अर्थ थोडक्यांत सांगणारे हे पुढील सूत्रभूत मंत्र आहेत—

यत्सप्तान्नानि मेधया तपसाऽजनयत्पिता । एकमस्य साधारणं द्वे देवानभाजयत् । त्रीण्यात्मनेऽकुरुत पशुभ्य एकं प्रायच्छत् । तस्मिन्त्सर्वं प्रतिष्ठितं यच्च प्राणिति यच्च न कस्मात्तानि न क्षीयन्तेऽद्यमानानि सर्वदा । यो वैतामक्षितिं वेद सोऽन्नमत्ति प्रतीकेन । स देवानपिगच्छति स ऊर्जमुपजीवतीति श्लोकाः ॥ १

अन्वयार्थ—[पिता मेधया तपसा यत् सप्तान्नानि अजनयत्—] पिता विज्ञान व कर्म यांच्या योगानें जी सात अन्नें उत्पन्न करता झाला (त्यांन आम्ही प्रकाशित करतों.) [एकं अस्य साधारणं—] त्या सात अन्नांतील एक लौकिक अन्न याचें साधारण आहे. (तें सर्व प्राण्यांना साधारण आहे.) [द्वे देवान् अभाजयत्—] तो दोन अन्नें देवांना विभागून देता झाला. [त्रीणि आत्मने अकुरुत—] तीन स्वतःसाठीं करता झाला व [पशुभ्यः एकं प्रायच्छत्—] पशूंना एक देता झाला. [यत् च प्राणिति यत् च न तत् सर्वं तस्मिन् प्रतिष्ठितं—] जें प्राणनक्रिया करतें तें—सचेतन व जें प्राणनक्रिया करीत नाहीं तें—जड, असें हें सर्व त्यांत—दुधांत प्रतिष्ठित आहे. पण [सर्वदा अद्यमानानि तानि कस्मात् न क्षीयन्ते—] प्राण्यांकडून सर्वदा उपभोगिलीं जाणारीं तीं अन्नें कोणत्या कारणानें क्षीण होत नाहींत ? [यः वा एतां अक्षितिं वेद सः प्रतीकेन अन्नं अत्ति—] जो या अक्षितीला जाणतो तो आपल्या मुखरूप प्रतीकानें अन्न खातो [सः देवान् अपिगच्छति—] तो देवभावास प्राप्त होतो; [सः ऊर्जं उपजीवति इति श्लोकाः—] तो अमृतावर उपजीविका करतो, अशा अर्थाचे हे मंत्र आहेत. १

यत्सप्तान्नानि मेधया तपसाऽजनयत्पितेति मेधया हि तपसाऽजनयत्पिता । एकमस्य साधारणमितीदमेवास्य तत्साधारणमन्नं यदिदमद्यते । स य एतदुपास्ते न स पाप्मनो व्यावर्तते मिश्रꣳह्येतत् ॥

अन्वयार्थ—[यत्सप्तान्नानि मेधया तपसाऽजनयत्पिता इति—] या मंत्राचा अर्थ प्रसिद्ध आहे. [पिता मेधया हि तपसा अजनयत्—] पिता विज्ञान व कर्म यांच्या योगानें सात अन्नें उत्पन्न करता झाला. ' एकमस्य साधारणं इति '—[इदं एव अस्य तत् साधारणं अन्नं यत् इदं अद्यते—] हेंच त्याचें तें

साधारण अन्न आहे कीं जें हें खाल्लें जातें. [सः यः एतत् उपास्ते–] तो जो याची उपासना करतो, म्हणजे अन्नपर होतो [सः पाप्मनः न व्यावर्तते–] तो पापापासून सुटत नाहीं. [हि एतत् मिश्रं–] कारण हें साधारण असलेलें अन्न मिश्र आहे. एकट्याचेंच नव्हे. त्यामुळें इतरांना वाटून न देतां जो अन्नपर होतो तो पापापासून मुक्त होत नाहीं. (याचा भाष्यार्थ पहा.)

द्वे देवानभाजयदिति हुतं च प्रहुतं च तस्माद्देवेभ्यो जुह्वति च प्र च जुह्वत्यथो आहुर्दर्शपूर्णमासाविति । तस्मान्नेष्टियाजुकः स्यात् ॥

अन्वयार्थ—[द्वे देवान्०–] दोन अन्नें देवांना विभागून देता झाला, हें मंत्रपद आहे. [हुतं च प्रहुतं च–] हुत व प्रहुत हींच तीं दोन अन्नें होत. [तस्मात् देवेभ्यः जुह्वति च प्रजुह्वति च–] ह्मणून गृहस्थ देवांना उद्देशून हवन करतात व बलिहरण करितात. [अथो आहुः दर्शपूर्णमासौ इति–] पण दुसरे कित्येक म्हणतात कीं तीं दोन अन्नें दर्श व पूर्णमास हीं आहेत. [तस्मात् इष्टियाजुकः न स्यात्–] यास्तव काम्य इष्टींचें यजन करण्यांत तत्पर होऊं नये.

पशुभ्य एकं प्रायच्छदिति तत्पयः । पयो ह्येवाग्रे मनुष्याश्च पशवश्चोपजीवन्ति तस्मात्कुमारं जातं घृतं वै वाग्रे प्रतिलेह-यन्ति स्तनं वाऽनुधापयन्त्यथ वत्सं जातमाहुरतृणाद इति ॥

अन्वयार्थ—[पशुभ्यः०] पशूंना एक अन्न देता झाला, असें जें मंत्रांत सांगितलें आहे [तत् पयः–] तें अन्न ' पय '–दुग्ध आहे. [मनुष्याः च पशवः च पयः एव हि अग्रे उपजीवन्ति–] मनुष्य व पशू, हे दुग्धावरच प्रथम उपजीविका करितात, हें प्रसिद्ध आहे. [तस्मात् जातं कुमारं अग्रे घृतं वै वा प्रतिलेहयन्ति–] तस्मात् उत्पन्न झालेल्या बालकाला अगोदर घृतच –तूप चाटवितात [वा स्तनं अनुधापयन्ति–] किंवा स्तनपान करवितात. [अथ जातं वत्सं अतृणादः इति आहुः–] म्हणूनच नुकत्याच झालेल्या गोवत्साला ' तृण न खाणारा ' असें म्हणतात.

तस्मिन्त्सर्वं प्रतिष्ठितं यच्च प्राणिति यच्च नेति पयसि हीदꣳसर्वं प्रतिष्ठितं यच्च प्राणिति यच्च न ॥ तद्यदिदमाहुः संवत्सरं पयसा जुह्वदप पुनर्मृत्युं जयतीति न तथा विद्याद्यदहरेव जुहोति तदहः पुनर्मृत्युमपजयतीत्येवं विद्वान्सर्वꣳहि देवेभ्योऽन्नाद्यं प्रयच्छति॥

अन्वयार्थ—' तस्मिन्त्सर्वं प्रतिष्ठितं यच्च प्राणिति यच्च न इति ' या मंत्रपदांचा अर्थ असा–[यत् च प्राणिति यत् च न–] जें प्राणनक्रिया करतें व जें ती करीत नाहीं [इति इदं सर्वं पयसि प्रतिष्ठितं–] असें हें सर्व चर व अचर जगत् पयामध्यें प्रतिष्ठित आहे. [संवत्सरं पयसा जुह्वत् अपमृत्युं पुनः जयति इति यत् इदं आहुः–] संवत्सरभर–वर्षभर दुधानें हवन करणारा अपमृत्यूला जिंकतो, असें जें ब्राह्मणवाद ह्मणतात [तत् तथा न विद्यात्–] तें तसेंच समजूं नये. [यत् अहर् एव जुहोति तत् अहः पुनर्मृत्युं अपजयति इति–] तर ज्या दिवशीं हवन करतो त्याच दिवशीं अपमृत्यूला जिंकतो; असें समजावें [एवं विद्वान् सर्वं हि अन्नाद्यं देवेभ्यः प्रयच्छति–] असें जाणणारा सर्व अन्नाद्य–अन्न देवांना देतो.

कस्मात्तानि न क्षीयन्तेऽद्यमानानि सर्वदेति पुरुषो वा अक्षितिः स हीदमन्नं पुनः पुनर्जनयते । यो वैतामक्षितिं वेदेति पुरुषो वा अक्षितिः स हीदमन्नं धिया धिया जनयते कर्मभिर्यद्वैतन्न कुर्यात्क्षीयेत ह सोऽन्नमत्ति प्रतीकेनेति मुखं प्रतीकं मुखेनेत्येतत् । स देवानपिगच्छति स ऊर्जमुपजीवतीति प्रशंसा ॥ २

अन्वयार्थ—पण सर्वदा भक्षण केलीं जाणारीं तीं अन्नें क्षीण कां होत नाहींत ? या अर्थाच्या ' कस्मात्तानि० ' इत्यादि मंत्राचें व्याख्यान असें–[पुरुषः वै अक्षितिः–] भोक्ता पुरुषच अक्षिति–अक्षयाचें कारण आहे. [सः हि इदं अन्नं पुनः पुनः जनयते–] तोच हें अन्न पुनः पुनः उत्पन्न करतो. ' यो वैतामक्षितिं वेद ' याचें व्याख्यान–[पुरुषः वै अक्षितिः–] पुरुषच अक्षिति आहे, [सः हि इदं अन्नं धिया धिया कर्मभिः जनयते–] तोच हें अन्न त्या त्या वेळीं होणाऱ्या त्या त्या प्रज्ञेनें–ज्ञानानें व कर्मानें उत्पन्न करतो व [यत् वा एतत् न कुर्यात् क्षीयेत ह–] त्यानें जर हें अन्न न केलें तर तें क्षय पावेल, अशा रीतीनें जो जाणतो ' सोऽन्नमत्ति प्रतीकेन इति '–तो प्रतीकानें अन्न खातो, याचें व्याख्यान–[मुखं प्रतीकं–] मुख हेंच प्रतीक आहे. [मुखेन इति एतत्–] मुखानें तो अन्न खातो, असा याचा भावार्थ. [सः देवान् अपिगच्छति–] तो देवात्मभावास प्राप्त होतो व [सः ऊर्जं उपजीवति इति

प्रशंसा–] तो अमृतावर उपजीविका करतो, ही प्रशंसा आहे. २.–आतां पांक्त कर्मांचीं फलभूत अशीं जीं तीन आत्मानें वर सांगितलीं तीं कार्यें असल्यामुळें व त्यांचा विस्तार मोठा असल्यामुळें तीं पूर्वोक्त चार अन्नांहून पृथक् व उत्कृष्ट आहेत. यास्तव श्रुति प्रस्तुत ब्राह्मणाच्या समाप्तीपर्यंत त्यांचेंच व्याख्यान करिते–

त्रीण्यात्मनेऽकरुतेति मनो वाचं प्राणं तान्यात्मनेऽकुरुतान्यत्रमना अभूवं नादर्शमन्यत्रमना अभूवं नाश्रौषमिति मनसा ह्येव पश्यति मनसा शृणोति । कामः संकल्पो विचिकित्सा श्रद्धाऽश्रद्धा धृतिरधृतिर्ह्रीर्धीर्भीरित्येतत्सर्वं मन एव तस्मादपि पृष्ठत उपस्पृष्टो मनसा विजानाति यः कश्चन शब्दो वागेव सा । एषा ह्यन्तमायत्तैषा हि न । प्राणोऽपानो व्यान उदानः समानोऽन इत्येतत्सर्वं प्राण एवैतन्मयो वा अयमात्मा वाङ्मयो मनोमयः प्राणमयः ॥ ३

अन्वयार्थ—'त्रीणि आत्मनेऽकुरुत०' याचा अर्थ–[मनः वाचं प्राणं–] मन, वाणी व प्राण हीं तीं तीन अन्नें होत. [तानि आत्मने अकुरुत–] तीं तो आत्म्याकरितां कल्पिता झाला. [अन्यत्रमनाः अभूवं–] मी अन्यत्रमना होतों, माझें मन दुसरीकडे गेलें होतें; [न अदर्शम्–] त्यामुळें मीं पाहिलें नाहीं; [अन्यत्रमनाः०–] मी अन्यत्रमना होतों. त्यामुळें मीं ऐकलें नाहीं, असें मनुष्य म्हणतो. [मनसा एव हि पश्यति मनसा शृणोति–] पुरुष मनानेंच पाहतो, मनानेंच ऐकतो. [कामः संकल्पः०–] काम, संकल्प, संशय, श्रद्धा, अश्रद्धा, धृति, अधृति, लज्जा, बुद्धि, भीति [इति एतत् सर्वं मनः एव–] हें सर्व मनच आहे. [तस्मात् अपि पृष्ठतः उपस्पृष्टः मनसा विजानाति–] म्हणूनच पाठीमागून जरी कोणीं स्पर्श केला तरी मनुष्य मनानें जाणतो.[यः कश्चन शब्दः सा वाक् एव–] जो कोणताहि ध्वनिरूप शब्द ती वाक्च आहे. [सा हि अन्तं आयत्ता–) ती शब्दनिर्णयास प्राप्त झालेली आहे. [एषा हि न–] ही वाक् प्रकाश्या नाहीं, तर नुस्ती शब्दांना प्रकाशित करणारी आहे [प्राणः अपानः०–]प्राण, अपान, व्यान, उदान, समान [अनः इति–]व साधारण वायु [एतत् सर्वं प्राणः एव–] हें सर्व प्राणच आहे. [अयं आत्मा एतन्मयः वाङ्मयः मनोमयः प्राणमयः–] हा पिंडात्मा एतन्मय म्ह० वाङ्मय, मनोमय,

प्राणमय आहे. (या सप्तान्नसृष्टीचें संक्षेपतः वर्णन सुबोध पंचदशीत-प्र. ४ श्लो.१४-१७पृ. १४६ ४७ पहा.) ३.-त्याच प्रजापतीच्या अन्नांचा आधिभौतिक विस्तार सांगितला जातो—

त्रयो लोका एत एव वागेवायं लोको मनोऽन्तरिक्षलोकः प्राणोऽसौ लोकः

अन्वयार्थ—[एते एव त्रयः लोकाः-] हेच तीन लोक आहेत. [वाक् एव अयं लोकः-] वाक्च हा लोक आहे. [मनः अन्तरिक्षलोकः-] मन अन्तरिक्ष लोक आहे व [प्राणः असौ लोकः-] प्राण स्वर्गलोक आहे. ४

त्रयो वेदा एत एव वागेवर्ग्वेदो मनो यजुर्वेदः प्राणः सामवेदः॥ ५

अन्वयार्थ—[त्रयः वेदाः०-] तीन वेद हेच-वाक्, मन व प्राणसंज्ञक आहेत. त्यांतील वाक् हाच ऋग्वेद, मन यजुर्वेद व प्राण सामवेद आहे. ५

देवाः पितरो मनुष्या एत एव वागेव
देवा मनः पितरः प्राणो मनुष्याः ॥ ६

अन्वयार्थ—देव, पितर व मनुष्य हेच आहेत. वाक्च देव, मन पितर व प्राण मनुष्य आहेत. ६

पिता माता प्रजैत एव मन एव पिता वाङ्माता प्राणः प्रजा ॥ ७

अन्वयार्थ—पिता, माता व प्रजा हेच आहेत. मनच पिता, वाक् माता व प्राण प्रजा आहे. ७

विज्ञातं विजिज्ञास्यमविज्ञातमेत एव यत्किंच विज्ञातं
वाचस्तद्रूपं वाग्धि विज्ञाता वागेनं तद्भूत्वाऽवति ॥ ८

अन्वयार्थ—[विज्ञातं०-] विज्ञात, विजिज्ञास्य व अविज्ञात हेच मनआदि आहेत. [यत् किंच विज्ञातं तत् वाचः रूपं-] जें कांहीं विज्ञात तें वाक्चेंच रूप आहे. [हि वाक् विज्ञाता-] कारण वाक्च विज्ञाता आहे. [वाक् एनं तत् भूत्वा अवति-] वाक् या ज्ञात्याला विज्ञात होऊन रक्षिते. ८

यत्किंच विजिज्ञास्यं मनसस्तद्रूपं मनो हि
विजिज्ञास्यं मन एनं तद्भूत्वाऽवति ॥ ९

अन्वयार्थ—[यत् किंच०-] जें कांहीं विजिज्ञास्य असतें तें मनाचेंच रूप होय. [मनः हि०-] मनच विजिज्ञास्य आहे. [मनः तत् भूत्वा एनं अवति-] मन विजिज्ञास्य होऊन त्याला रक्षितें. ९.

यत्किंचाविज्ञातं प्राणस्य तद्रूपं प्राणो ह्यवि-
ज्ञातः प्राण एनं तद्भूत्वाऽवति ॥ १०

अन्वयार्थ—[यत् किंच०—] जें कांहीं अविज्ञात आहे तें प्राणाचें रूप आहे. [हि प्राणः०—] कारण प्राणच अविज्ञात आहे. [प्राणः तत भूत्वा एनं अवति—] प्राण अविज्ञात होऊन याला रक्षितो. १०

तस्यै वाचः पृथिवी शरीरं ज्योतीरूपमयमग्निस्तद्या-
वत्येव वाक्तावती पृथिवी तावानयमग्निः ॥ ११

अन्वयार्थ—[तस्यै वाचः पृथिवी शरीरं—] त्या वाचेचें पृथिवी हें शरीर आहे व [अयं अग्निः ज्योतीरूपं—] हा अग्नि ज्योतीरूप—करण आहे. [तत् यावती एव वाक्—] त्यांत जेवढी म्हणून वाक् आहे [तावती पृथिवी—] तेवढीच पृथिवी व [तावान् अयं अग्निः—] तेवढाच हा अग्नि आहे. ११.

अथैतस्य मनसो द्यौः शरीरं ज्योतीरूपमसावादित्यस्त-
द्यावदेव मनस्तावती द्यौस्तावानसावादित्यस्तौ मिथुनꣳ
समैतां ततः प्राणोऽजायत स इन्द्रः स एषोऽसपत्नो
द्वितीयो वै सपत्नो नास्य सपत्नो भवति य एवं वेद ॥१२

अन्वयार्थ—[अथ एतस्य मनसः द्यौः शरीरं —] आतां या मनाचें द्युलोक हें शरीर व [असौ आदित्यः ज्योतीरूपं—] हा आदित्य हें ज्योतीरूप म्हणजे करण आहे. [तत् यावत् एव मनः तावती द्यौः—] त्यांत जेवढें मन तेवढाच द्युलोक; व [तावान् असौ आदित्यः—] तेवढाच हा आदित्य आहे. [तौ मिथुनं समैतां—] ते दोघे म्हणजे द्यौ व आदित्य मिथुनास—इतरेतरसंसर्गास प्राप्त झाले. [ततः प्राणः अजायत—] त्यांच्या संगमनापासून प्राण—वायु उत्पन्न झाला. [सः इंद्रः—] तोच इंद्र—परमेश्वर होय. [सः एषः असपत्नः—] तो केवल इन्द्रच नव्हे, तर असपत्न म्हणजे ज्याला सपत्न—शत्रु नाहीं, असा आहे. [द्वितीयः वै सपत्नः—] दुसरा—प्रतिपक्ष होणाराच सपत्न असतो. [यः एवं वेद अस्य सपत्नः न भवति—] जो या प्राणाला असपत्न जाणतो त्या उपासकालाहि सपत्न असत नाहीं. १२

अथैतस्य प्राणस्याऽऽपः शरीरं ज्योतीरूपमसौ चन्द्रस्त-
द्यावानेव प्राणस्तावत्य आपस्तावनसौ चन्द्रस्त एते सर्व

एव समाः सर्वेऽनन्ताः स यो हैतानन्तवत उपास्तेऽन्तवन्तꣳ स लोकं जयत्यथ यो हैताननन्तानुपास्तेऽनन्तꣳ स लोकं जयति॥

अन्वयार्थ—[अथ०—] त्यानंतर या प्राणांचें आप हें शरीर; व हा चंद्र हें ज्योतीरूप—करण आहे. [तत् यावान्०—] त्यांत जेवढा प्राण तेवढ्याच आप व [तावान् असौ चन्द्रः—] तेवढाच हा चन्द्र आहे. [ते एते सर्वे एव समाः सर्वे अनन्ताः—] ते हे सर्व सम व सर्व अनन्त आहेत. [सः यः ह एतान् अन्तवतः उपास्ते—] जो कोणी यांना अन्तवन्त समजून उपासितो [सः अन्तवन्तं लोकं जयति—] तो अन्तवन्त लोकास जिंकतो; [अथ यः ह एतान् अनन्तान् उपास्ते—] आणि जो त्यांना अनन्त समजून त्यांची उपासना करतो [सः अनन्तं लोकं जयति—] तो अनन्त लोकास जिंकतो. १३

स एषः संवत्सरः प्रजापतिः षोडशकलस्तस्य रात्रय एव पञ्चदश कला ध्रुवैवास्य षोडशी कला स रात्रिभिरेवाऽऽ- च पूर्यतेऽप च क्षीयते सोऽमावास्यार्ꣳ रात्रिमेतया षोडश्या कलया सर्वमिदं प्राणभृदनुप्रविश्य ततः प्रातर्जायते तस्मादेतार्ꣳ रात्रिं प्राणभृतः प्राणं न विच्छिन्द्यादपि कृकलासस्यैतस्या एव देवताया अपचित्यै ॥ १४

अन्वयार्थ—[सः एषः प्रजापतिः संवत्सरः—] जो अन्नरूप प्रजापति तो हा संवत्सर. [षोडशकलः—] तो षोडशकल आहे, म्हणजे त्याचे सोळा अवयव आहेत. [तस्य रात्रयः एव पंचदश कलाः—] त्याच्या अहोरात्र ह्याच पंधरा कला; [ध्रुवा एव अस्य षोडशी कला—] आणि नित्य व्यवस्थित असलेली जी कला तीच याची सोळावी कला आहे. [सः रात्रिभिः एव आपूर्यते च अपक्षीयते च—] तो रात्रींच्या योगानेंच शुक्लपक्षांत वृद्धि पावतो व त्यांच्यायोगानेंच कृष्णपक्षांत अपक्षय पावतो. [सः अमावास्यां रात्रिं एतया षोडश्या कलया—] तो अमावास्येस रात्रीं या सोळाव्या कलेनें [सर्वं इदं प्राणभृत् अनुप्रविश्य—] या सर्व प्राणिजातामध्यें अनुप्रवेश करून राहतो [ततः प्रातः जायते—] आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं उत्पन्न होतो—म्हणजे द्वितीय कलेनें युक्त होतो. [तस्मात् एतां रात्रिं प्राणभृतः प्राणं न विच्छिन्द्यात्—] त्यामुळें त्या दिवशीं प्राण्याच्या प्राणाचा विच्छेद करूं नये—त्याला मारूं नये. [कृकलासस्य

अपि एतस्याः एव देवतायाः अपिचित्यै–] फार काय पण सरड्यासारख्या पापी प्राण्याच्या प्राणांचाहि याच देवतेच्या पूजेकरितां विच्छेद करूं नये. १४.

यो वै स संवत्सरः प्रजापतिः षोडशकलोऽयमेव स योऽयमेवंवित्पुरुषस्तस्य वित्तमेव पञ्चदश कला आत्मैवास्य षोडशी कला स वित्तेनैवाऽऽच पूर्यतेऽप च क्षीयते तदेतन्नभ्यं यदयमात्मा प्रधिर्वित्तं तस्माद्यद्यपि सर्वज्यानिं जीयत आत्मना चेज्जीवति प्रधिनाऽगादित्येवाऽऽहुः ॥ १५

अन्वयार्थ—[यः वै सः संवत्सरः प्रजापतिः षोडशकलः सः अयं एव–] तो जो वर सांगितलेला षोडशकल प्रजापति तो हाच होय. [यः अयं एवंविद् पुरुषः–] कीं जो हा असें जाणणारा पुरुष. [तस्य वित्तं एव पंचदश कलाः–] त्याचें गवादि वित्तच पंधरा कला व [आत्मा एव अस्य षोडशी कला–] पिंड हीच सोळावी कला आहे. [सः वित्तेन एव आपूर्यते च अपक्षीयते च–] तो वित्तानेंच पूर्ण केला जातो व क्षीण होतो. [तत् एतत् नभ्यं–] तें हें नभ्य–नाभीला हितकर किंवा नाभीला पात्र–आहे. तें काय? तर [यत् अयं आत्मा–] जो हा आत्मा–पिंड. [वित्तं प्रधिः–] वित्त त्याच्या परिवाराच्या स्थानीं आहे. [तस्मात् यद्यपि सर्वज्यानिं जीयते–] त्यामुळें सर्वस्व अपहरण होऊन तो जरी ग्लानीला प्राप्त झाला तरी [आत्मना चेत् जीवति–] स्वतः पिंडरूपानें जर जिवंत राहिला तर [प्रधिना अगात् इति एव आहुः–] हा नुस्ता बाह्य परिवारानेंच क्षीण झाला आहे, असें म्हणतात. १५–अशा रीतीनें दैव-वित्त-विद्यासंयुक्त पांक्त कर्मानें अन्नत्रयरूप प्रजापति होतो, असें व्याख्यान केलें. त्यानंतर जायादि वित्त परिवाराच्या स्थानीं आहे, हेंहि सांगितलें. त्यावरून पुत्र, कर्म व अपरविद्या यांना लोकप्राप्तीचें साधनत्व आहे, एवढेंच सामान्यतः अवगत झालें. पण पुत्रादिकांचा लोकप्राप्तिफलाशीं नियमानें असणारा विशेष संबंध कळला नाहीं. यास्तव त्या पुत्रादि साधनांचा प्रत्येक साध्याशीं असलेला तो संबंध सांगावा, म्हणून पुढील कंडिका प्रवृत्त झाली आहे.

अथ त्रयो वाव लोका मनुष्यलोकः पितृलोको देवलोक इति सोऽयं मनुष्यलोकः पुत्रेणैव जय्यो नान्येन कर्मणा

कर्मणा पितृलोको विद्यया देवलोको देवलोको वै लोकानाꣳ श्रेष्ठस्तस्माद्विद्यां प्रशꣳसन्ति ॥ १६

अन्वयार्थ—[अथ त्रयः वाव लोकाः—] आतां तीनच लोक आहेत. [मनुष्यलोकः०—]मनुष्यलोक, पितृलोक व देवलोक असे; [सः अयं मनुष्यलोकः पुत्रेण एव जय्यः—] तो हा मनुष्यलोक पुत्राच्या योगानेंच साध्य आहे, [अन्येन कर्मणा न—] दुसऱ्या कर्मानें नाहीं. [कर्मणा पितृलोकः विद्यया देवलोकः—] कर्मानें पितृलोक व विद्येनें देवलोक साध्य आहे. [देवलोकः वै लोकानां श्रेष्ठः—] त्या लोकांतील देवलोक श्रेष्ठ आहे. [तस्मात् विद्यां प्रशंसन्ति—] म्हणून विद्येची प्रशंसा करितात. १६

अथातः संप्रत्तिर्यदा प्रैष्यन्मन्यतेऽथ पुत्रमाह त्वं ब्रह्म त्वं यज्ञस्त्वं लोक इति स पुत्रः प्रत्याहाहं ब्रह्माहं यज्ञोऽहं लोक इति यद्वै किंचानूक्तं तस्य सर्वस्य ब्रह्मेत्येकता । ये वै के च यज्ञास्तेषाꣳ सर्वेषां यज्ञ इत्येकता ये वै के च लोकास्तेषाꣳ सर्वेषां लोक इत्येकता । एतावद्वा इदꣳ सर्वमेतन्मा सर्वꣳ सन्नयमितोऽभुनजादिति । तस्मात्पुत्रमनुशिष्टं लोक्यमाहुस्तस्मादेनमनुशासति स यदैवंविदस्माल्लोकात्प्रैत्यथैभिरेव प्राणैः सह पुत्रमाविशति स यद्यनेन किंचिदक्ष्णयाऽकृतं भवति तस्मादेनꣳ सर्वस्मात्पुत्रो मुञ्चति तस्मात्पुत्रो नाम स पुत्रेणैवास्मिँल्लोके प्रतितिष्ठत्यथैनमेते दैवाः प्राणा अमृता आविशन्ति ॥ १७

अन्वयार्थ—[अथ अतः संप्रत्तिः—] त्यानंतर यास्तव संप्रदान कर्म. [यदा प्रैष्यन् मन्यते—] पिता जेव्हां मी आतां मरणार असें समजतो [अथ पुत्रं आह—] तेव्हां पुत्राला बोलावून म्हणतो—[त्वं ब्रह्म त्वं यज्ञः त्वं लोकः इति—] ' तूं ब्रह्म आहेस, तूं यज्ञ आहेस व तूं लोक आहेस;' [सः पुत्रः प्रत्याह—] तेव्हां तो पुत्र उलट म्हणतो—[अहं ब्रह्म०—] 'मी ब्रह्म आहें, मी यज्ञ आहें व मी लोक आहें.' [यत् वै किंच अनूक्तं तस्य सर्वस्य ब्रह्म इति एकता—] जें कांहीं अधीत व अनधीत त्या सर्वांची ब्रह्मशब्दांत एकता होते. [ये वै के च यज्ञाः तेषां सर्वेषां यज्ञः इति एकता—] जे कांहीं यज्ञ त्या सर्वांची

यज्ञशब्दांत एकता होते [यै वै के च लोकाः०—] जे कांहीं लोक आहेत त्या सर्वांची लोक या शब्दांत एकता होते. [एतावत् वै इदं सर्वं—] गृहस्थाला कर्तव्य म्हणून असलेलें हें सर्व एवढेंच आहे. [एतत् मा सर्वं सन्नयं इतः अभुनजत् इति—] हा सर्व भार माझ्यापासून काढून घेऊन व तो आपल्यावर ठेवून घेऊन या लोकापासून हा माझें पालन करील, असें पिता मानतो [तस्मात् पुत्रं अनुशिष्टं लोक्यं आहुः—] यास्तव वर सांगितल्याप्रमाणें अनुशासन केल्या गेलेल्या पुत्राला ब्राह्मण लोक्य—लोकाला हितकर म्हणतात. [तस्मात् एनं अनुशासति—] म्हणूनच या पुत्राला पितर अनुशासन करितात. [सः एवंविद् यदा अस्मात् लोकात् प्रैति—] तो असें जाणणारा म्ह० मी आपली कर्तव्यता पुत्राला समर्पिली आहे, असा ज्याचा निश्चय झाला आहे तो जेव्हां या लोकापासून निघून जातो—मरतो; [अथ एभिः एव प्राणैः सह पुत्रं आविशति—] तेव्हां याच वाङ्-मनः-प्राणांसह पुत्रांत प्रवेश करतो. [सः पुत्रः यदि अनेन अक्ष्णया अकृतं भवति—] तो पुत्र पित्यानें जर कांही कोणच्छिद्रानें --प्रमादानें न केलेलें असेल तर [तस्मात् सर्वस्मात् एनं मुंचति—] त्या सर्वापासून त्याला सोडवितो. [तस्मात् पुत्रः नाम—] म्हणून त्याला पुत्र म्हणतात. [सः पुत्रेण एव अस्मिन् लोके प्रतितिष्ठति—] तो पिता पुत्राच्या योगानेंच या लोकांत प्रतिष्ठित होतो. असो; [अथ एनं एते दैवाः प्राणाः अमृताः आविशन्ति—] ज्यानें आपल्या कर्तव्याचें संप्रदान केलें आहे अशा पित्यामध्यें हे वागादिक हिरण्यगर्भसंबंधी अमृत प्राण प्रवेश करितात. १७. —दैव प्राण कसे आवेश करितात तें श्रुति या पुढें सांगते—

पृथिव्यै चैनमग्नेश्च दैवी वागाविशति सा वै दैवी
वाग्यया यद्यदेव वदति तत्तद्भवति ॥ १८

अन्वयार्थ—[पृथिव्यै च अग्नेः च दैवी वाक् एनं आविशति—] पृथिवी व अग्नि यांपासून अधिदैवात्मिका वाक् या संप्रदान केलेल्या पित्यामध्यें प्रवेश करते. [सा वै दैवी वाक् यया यत् यत् एव वदति तत् तत् भवति—] तीच दैवी वाक् कीं जिच्या योगानें पुरुष जें जें बोलतो तें तें होतें. १८.

दिवश्चैनमादित्याच्च दैवं मन आविशति तद्वै दैवं
मनो येनाऽऽनन्द्येव भवत्यथो न शोचति ॥ १९

अन्वयार्थ—[दिवः च आदित्यात् च दैवं मनः एनं आविशति—] द्युलोक व आदित्य यांपासून दैव मन त्याला—त्यामध्यें आवेश करतें. [तत् वै दैवं मनः—] तेंच दैव मन होय कीं [येन आनन्दी एव भवति—] ज्या मनानें तो आनन्दीच होतो व [न शोचति—] शोक करीत नाहीं. १९.

अद्भ्यश्चैनं चन्द्रमसश्च दैवः प्राण आविशति स वै दैवः प्राणो यः संचरꣳश्चासंचरꣳश्च न व्यथतेऽथो न रिष्यति स एवंवित्सर्वेषां भूतानामात्मा भवति यथैषा देवतैवꣳ स यथैतां देवताꣳसर्वाणि भूतान्यवन्त्येवꣳहैवंविदꣳसर्वाणि भूतान्यवन्ति। यदु किंचेमाः प्रजाः शोचन्त्यमैवाऽऽसां तद्भवति पुण्यमेवामुं गच्छति न ह वै देवान्पापं गच्छति ॥२०

अन्वयार्थ—[अद्भ्यः च चन्द्रमसः च दैवः प्राणः एनं आविशति—] आप् व चंद्र यांपासून दैव प्राण त्याच्यामध्यें आवेश करतो. [सः वै दैवः प्राणः—] तोच दैव प्राण कीं [यः संचरन् च असंचरन् च न व्यथते—] जो जंगम प्राण्यांत संचार करणारा व स्थावर प्राण्यांत संचार न करणारा असा असतांनाहि व्यथित होत नाहीं. [अथो न रिष्यति—] त्याचप्रमाणें तो विनाशहि पावत नाहीं. [सः एवंवित् सर्वेषां भूतानां आत्मा भवति—] तो असें जाणणारा सर्व भूतांचा आत्मा होतो. [यथा एषा देवता—] जशी ही हिरण्यगर्भ देवता [एवं सः—] तसाच तो होतो. [यथा एतां देवतां सर्वाणि भूतानि अवन्ति—] ज्याप्रमाणें या देवतेला सर्व भूतें पाळतात [एवं ह एवंविदं सर्वाणि भूतानि अवन्ति—] त्याचप्रमाणें त्र्यन्नात्मोपासकाला सर्व भूतें पाळतात. [इमाः प्रजाः यत् उ किंच शोचन्ति—] ही सर्व प्रजा जें कांहीं शोचितात—शोक करतात [आसां एव तत् अमा भवति—] त्या प्रजाशींच शोकादिकांचें निमित्त संयुक्त होतें, तें त्यांचेंच होतें. [अमुं पुण्यं एव गच्छति—] या प्राजापत्य पदीं स्थित असलेल्या पुरुषाला पुण्यच प्राप्त होतें. [देवान् पापं न ह वै गच्छति—] देवांना पाप लागत नाहीं. (प्रजाच शोक व शोकनिमित्तें यांनीं युक्त होतात. हा पुरुष सर्वांचा आत्मा जरी झाला तरी त्याला शोक होत नाहीं.) २०.

—' त एते सर्व एव समा सर्वेऽनन्ताः ।' (कंडिका १३) असें सामान्यरीतीनें वाक्, मन व प्राण यांचें उपासन सांगितलें. पण त्यांतील प्रत्येक

उपासनांतील विशेष सांगितला नाहीं. तेव्हां तें उपासन काय असेंच समजावें, कीं त्याचा विचार करूं लागलें असतां त्या व्रताचा–उपासनेचा कांहीं विशेष कळणें शक्य आहे, हें आतां सांगितलें जातें—

अथातो व्रतमीमांसा प्रजापतिर्ह कर्माणि ससृजे तानि सृष्टान्यन्योन्येनास्पर्धन्त वदिष्याम्येवाहमिति वाग्दध्रे द्रक्ष्याम्यहमिति चक्षुः श्रोष्याम्यहमिति श्रोत्रमेवमन्यानि कर्माणि यथाकर्म । तानि मृत्युः श्रमो भूत्वोपयेमे तान्याप्नोत्तान्याप्त्वा मृत्युरवारुन्द्ध तस्माच्छ्राम्यत्येव वाक्श्राम्यति चक्षुः श्राम्यति श्रोत्रमथेममेवं नाऽऽप्नोद्योऽयं मध्यमः प्राणस्तानि ज्ञातुं दध्रिरे ॥

अन्वयार्थ—[अथ अतः व्रतमीमांसा–] वरील उपासनेंत कांहीं विशेष आहे कीं काय ? अशी जिज्ञासा झाली असतां त्यानंतर–आतां उपासन कर्मांची विचारणा केली जाते. [प्रजापतिः ह कर्माणि ससृजे–] प्रजापति कर्में म्हणजे कर्मसाधनें–वागादि करणें उत्पन्न करता झाला. [सृष्टानि तानि अन्योन्येन अस्पर्धत–] उत्पन्न केलीं गेलेलीं तीं परस्पर स्पर्धा करूं लागलीं. [अहं वदिष्यामि एव इति वाक् दध्रे–] मी बोलेनच, मी एकसारखी बोलतच राहीन, असें व्रत वाकूनें धरलें; त्याचप्रमाणें [अहं द्रक्ष्यामि इति चक्षुः–] मी पाहीन असें चक्षु, [अहं श्रोष्यामि इति श्रोत्रं–] मी ऐकेनच, असें व्रत श्रोत्र धरतें झालें. [एवं अन्यानि कर्माणि यथाकर्म–] अशाच रीतीनें अन्य करणेंहि आपापल्या कर्माविषयीं व्रतें धरतीं झालीं. [मृत्युः श्रमः भूत्वा तानि उपयेमे–] मृत्यु श्रमरूप होऊन त्या करणांना धरता झाला. [तानि आप्नोत्–] तो त्यांना व्यापता झाला. [तानि आप्त्वा मृत्युः अवारुन्द्ध–] त्यांना व्यापून मृत्यु अवरोध करता झाला. (त्यांना आपल्या कर्मापासून च्युत करता झाला.) [तस्मात् श्राम्यति एव वाक्–] त्यामुळेंच आतांहि भाषण करावयास प्रवृत्त झालेली वाकू श्रान्त होतेच. [चक्षुः श्राम्यति–] चक्षु श्रान्त होतो; [श्रोत्रं श्राम्यति–] श्रोत्र श्रान्त होतें. [यः अयं मध्यमः प्राणः अथ इमं एव न आप्नोत्–] तो मृत्यु हा जो मध्यम प्राण त्यालाच कायतो व्यापूं शकला नाहीं. म्हणून [तानि ज्ञातुं दध्रिरे–] तीं इन्द्रियें त्याला जाणण्याचा निश्चय करतीं झालीं.

अयं वै नः श्रेष्ठो यः संचरꣳश्चासंचरꣳश्च न व्यथतेऽथो न रिष्यति हन्तास्यैव सर्वे रूपमसामेति त एतस्यैव सर्वे रूपमभवꣳस्तस्मादेत एतेनाऽऽख्यायन्ते प्राणा इति तेन ह वाव तत्कुलमाचक्षते यस्मिन्कुले भवति य एवं वेद य उ हैवंविदा स्पर्धतेऽनुशुष्यत्यनुशुष्य हैवान्ततो म्रियत इत्यध्यात्मम् २१

अन्वयार्थ—[अयं वै नः श्रेष्ठः—] हाच आमच्यांतील श्रेष्ठ आहे. कारण [यः संचरन् च असंचरन् च न व्यथते—] तो संचार व प्रतिसंचार करीत असतांनाहि व्यथा पावत नाहीं [अथो न रिष्यति—] व नाश पावत नाहीं. [हन्त अस्य एव सर्वे रूपं असाम इति—] यास्तव आतां आपण याच्याच रूपास प्राप्त होऊं असा संकल्प करून [ते सर्वे एतस्य एव रूपं अभवन्—] तीं सर्व या प्राणाचें रूप झालीं. [तस्मात् एते एतेन आख्यायन्ते प्राणाः इति—] म्हणून तीं इंद्रियें याच्या नांवानें ह्म० 'प्राण' अशीं बोलली जातात. [यः एवं वेद तेन ह वाव यस्मिन् कुले भवति तत् कुलं आचक्षते—] जो अशा रीतीनें सर्व करणांचें प्राणात्मत्व जाणतो त्या विद्वानाच्याच नांवानें तो ज्या कुलांत झालेला असतो तें कुल सांगितलें जातें; आणि [यः उ ह एवंविदा स्पर्धते अनुशुष्यति—] जो अशा विद्वानाशीं स्पर्धा करतो तो शोषास प्राप्त होतो; आणि [अनुशुष्य ह एव अन्ततः म्रियते—] शोष पावून शेवटीं मरतो. [इति अध्यात्मं—] हें अध्यात्म प्राणात्मदर्शन आहे. सु. ब्र. पृ. २४६-२४८ पहा. २१.

अथाधिदैवतं ज्वलिष्याम्येवाहमित्यग्निर्दध्रे तप्स्याम्यहमित्यादित्यो भास्याम्यहमिति चन्द्रमा एवमन्या देवता यथादैवतꣳस यथैषां प्राणानां मध्यमः प्राण एवमेतासां देवतानां वायुर्म्लोचन्ति ह्यन्या देवता न वायुः सैषाऽनस्तमिता देवता यद्वायुः ॥ २२

अन्वयार्थ—[अथ अधिदैवतं—] त्यानंतर अधिदैवत—देवताविषय दर्शन सांगितलें जातें. [अहं ज्वलिष्यामि एव इति अग्निः दध्रे—] मी ज्वलनच पावेन असें व्रत अग्नि धरता झाला. [तप्स्यामि अहं इति आदित्यः—] मी तप्तच होईन, असें आदित्य, [अहं भास्यामि इति चन्द्रमाः—] मी प्रकाश-

मानच होईन असें चंद्रमा व [एवं अन्याः देवताः यथादैवतं–] याचप्रमाणें विद्युतादि इतर देवताहि यथादैवत–प्रत्येक देवता आपापल्या व्यापारानुसार–व्रत धरत्या झाल्या. [यथा एषां प्राणानां सः मध्यमः प्राणः–] ज्याप्रमाणें वागादिकरणांतील तो मध्यम प्राण [एवं एतासां देवतानां वायुः–] त्याप्रमाणें या देवतांतील वायु अभग्नव्रत आहे. [हि अन्याः देवताः म्लोचन्ति–] कारण दुसऱ्या देवता अस्त पावतात, [वायुः न–] वायु अस्त पावत नाहीं. [यत् वायुः सा एषा अनस्तमिता देवता–] जो हा वायु ती अस्त न पावणारी देवता आहे.

अथैष श्लोको भवति यतश्चोदेति सूर्योऽस्तं यत्र च गच्छतीति प्राणाद्वा एष उदेति प्राणेऽस्तमेति तं देवाश्चक्रिरे धर्मꣳस एवाद्य स उ श्व इति यद्वा एतेऽमुर्ह्यध्रियन्त तदेवाप्यद्य कुर्वन्ति । तस्मादेकमेव व्रतं चरेत्प्राण्याच्चैवापान्याच्च नेन्मा पाप्मा मृत्युराप्नुवदिति यद्यु चरेत्समापिपयिषेत्तेनो एतस्यै देवतायै सायुज्यꣳ सलोकतां जयति ॥ २३

इति प्रथमाध्याये पञ्चम ब्राह्मणम् ॥ ५

अन्वयार्थ—[अथ एषः श्लोकः भवति–] याच अर्थी हा मंत्र आहे– [यतः च सूर्यः उदेति–] ज्या वायूपासून सूर्य उदय पावतो [यत्र च अस्तं गच्छति इति–] व ज्यांत तो अस्त पावतो. (असा मंत्र आहे. का.२.१.९पहा.) [प्राणात् वै एषः उदेति प्राणे अस्तं एति–] प्राणापासून तो उदय पावतो व प्राणांत अस्त पावतो. [तं देवाः धर्मं चक्रिरे–] त्याला देव धर्म करते झाले. [सः एव अद्य सः उ श्वः इति–] तोच आतां आहे व तोच उद्यां असेल, असा मंत्र आहे. [एते यत् वै अमुर्हि अध्रियन्त–] देव जें व्रत त्यावेळीं धारण करते झाले [तत् एव अद्य अपि कुर्वन्ति–] तेंच ते आजहि करीत आहेत. [तस्मात् एकं एव व्रतं चरेत्–] यास्तव एकच व्रत करावें. [प्राण्यात् च एव अपान्यात् च–] प्राणनव्यापार करावा व अपाननव्यापार करावा. [नेत् पाप्मा मृत्युः मा आप्नुवत् इति–] श्रमरूपी पापी मृत्यु मला प्राप्त होईल, या भीतीनें तें व्रत करावें. [यदि उ चरेत् समापिपयिषेत्–] जर या व्रताला प्रारंभ केला तर तें समाप्त करण्याची इच्छा अवश्य करावी. [तेन उ

एतस्यै देवतायै सायुज्यं सलोकतां जयति–] त्या व्रताच्या योगानें पुरुष या देवतेच्या सायुज्यास व सलोकतेस प्राप्त होतो. २३ (५)

–येथवर सविस्तर वर्णन केलेल्या अविद्याकार्याचा संक्षेपतः उपसंहार करण्यासाठीं श्रुति म्हणते—

त्रयं वा इदं नाम रूपं कर्म तेषां नाम्नां वागित्येतदेषामुक्थमतो हि सर्वाणि नामान्युत्तिष्ठन्ति । एतदेषाꣳ सामैतद्धि सर्वैर्नामभिः सममेतदेषां ब्रह्मैतद्धि सर्वाणि नामानि बिभर्ति १

अन्वयार्थ—[नाम रूपं कर्म त्रयं वै इदं–] नाम, रूप व कर्म, असें हें त्रय आहे. तें अनात्मा आहे, आत्मा नव्हे. यास्तव त्याविषयीं विरक्त व्हावें. [तेषां एषां नाम्नां वाक् इति एतत् उक्थं–] त्या या नांवांचें 'वाक्' हें उक्थ–कारण आहे. [अतः हि सर्वाणि नामानि उत्तिष्ठन्ति–] कारण वाक्पासूनच सर्व नांवें उत्पन्न होतात. [एतत् एषां साम–] वाक् हेंच यांचें साम आहे. [हि एतत् सर्वैः नामभिः समं–] कारण तेंच सर्व नामांशीं सम आहे. [एतत् एषां ब्रह्म–] तें यांचें ब्रह्म–आत्मा आहे. [हि एतत् सर्वाणि नामानि बिभर्ति–] कारण तेंच सर्व नामें धारण करतें. १

अथ रूपाणां चक्षुरित्येतदेषामुक्थमतो हि सर्वाणि रूपाण्युत्तिष्ठन्त्येतदेषाꣳ सामैतद्धि सर्वैं रूपैः सममेतदेषां ब्रह्मैतद्धि सर्वाणि रूपाणि बिभर्ति ॥२

अन्वयार्थ—[अथ चक्षुः इति रूपाणां–] आतां चक्षु हेंच रूपांचें सामान्य आहे. [एतत् एषां उक्थं–] तेंच यांचें उक्थ आहे. [अतः हि सर्वाणि रूपाणि उत्तिष्ठन्ति–] कारण त्यापासूनच सर्व रूपें उत्पन्न होतात. [एतत्०–] चक्षु हेंच रूपांचें साम आहे. [हि एतत् सर्वैः रूपैः समं–] कारण तेंच सर्व रूपांशीं सम आहे. [एतत् एषां ब्रह्म–] हें रूपांचें ब्रह्म–आत्मा आहे. [हि एतत् सर्वाणि रूपाणि बिभर्ति–] कारण तेंच सर्व रूपांना धारण करतें. २

अथ कर्मणामात्मेत्येतदेषामुक्थमतो हि सर्वाणि कर्माण्युत्तिष्ठन्त्येतदेषाꣳ सामैतद्धि सर्वैः कर्मभिः सममेतदेषां ब्रह्मैतद्धि सर्वाणि कर्माणि बिभर्ति तदेतत्त्रयꣳ सदेकम-

यमात्माऽऽत्मो एकः सन्नेतत्त्रयं तदेतदमृतꣳ सत्येन च्छन्नं प्राणो वा अमृतं नामरूपे सत्यं ताभ्यामयं प्राणश्छन्नः ॥३

इति प्रथमाध्याये षष्ठं ब्राह्मणम् ॥ ६

इति बृहदारण्यकोपनिषदि प्रथमोऽध्यायः ।

बृहदारण्यकक्रमेण तृतीयोऽध्यायः ॥ ३

अन्वयार्थ—[अथ कर्मणां आत्मा इति—] आतां सर्व कर्मांचा आत्मा—शरीर हें सामान्य आहे. [एतत् एषां०—] तें त्या कर्मांचें कारण आहे. याच्यापासूनच सर्व कर्मे उत्पन्न होतात. तेंच यांचें साम आहे. हेंच सर्व कर्मांशीं सम आहे. तें यांचें ब्रह्म—आत्मा आहे. तेंच सर्व कर्मांना धारण करतें. [तत् एतत् त्रयं सत् एकं अयं आत्मा—] तें हें त्रय होत्सातें हा एक आत्मा—देह आहे. [आत्मा उ एकः सन् एतत् त्रयं—] आत्माच एक होत्साता हें त्रय आहे. [तत् एतत् अमृतं सत्येन छन्नं—] तें हें अमृत सत्यानें आच्छादित झालेलें आहे. [प्राणः वै अमृतं—] करणात्मा प्राणच अविनाशी आहे व [नामरूपे सत्यं—] नामरूप सत्य आहे. [ताभ्यां अयं प्राणः छन्नः—] त्यांच्या योगानें हा क्रियात्मक प्राण आच्छादित झालेला आहे. याचा अधिक सोपपत्तिक विचार भाष्यार्थांत पहा. ३. (६)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
बृहदारण्यकोपनिषदाचा पहिला अध्याय समाप्त झाला.

अथ द्वितीयोऽध्यायः ।

—" आत्म्याचीच उपासना करावी, त्याच्या ज्ञानानें सर्व ज्ञात होतें, आत्मतत्त्व इतर सर्व पदार्थांहून अधिक प्रिय आहे. तोच जाणण्यास योग्य आहे, आत्म्यालाच ' मी ब्रह्म आहें ' असें जाणता झाला " अशा रीतीनें ज्याचा निर्देश केला आहे तें एक आत्मतत्त्वच विद्येचा विषय आहे. भेददृष्टि हा अविद्याविषय आहे. भेददृष्टि पुरुषाला आत्मज्ञान होत नाहीं. गेल्या अध्यायांत अविद्याविषयांचें वर्णन केलें. अविद्याविषय दोन प्रकारचा आहे. एक प्राण व दुसरा बाह्य कार्यरूप. त्यांतील बाह्य अविद्याविषयानें आंतर अमृत प्राण

आच्छादित झाला आहे, असा वर उपसंहार केला. तोच प्राण बाह्य भेदांमध्ये अनेक प्रकारें पसरला आहे. प्राण हा एक देव आहे. तोच विराट्, वैश्वानर, आत्मा, पुरुषविध, प्रजापति, कः, हिरण्यगर्भ इत्यादि पिंडप्रधानशब्दांनीं सांगितला जातो. सूर्यादि हे त्याचें अगदी भिन्न अवयव आहेत.

एक व अनेक ब्रह्म हें एवढेंच आहे. याहून निराळें नाहीं. तें प्रत्येक शरीरभेदामध्यें परिसमाप्त झालेलें आहे. (म्ह० पृथक् व परिच्छिन्न आहे.) तें चेतनायुक्त, कर्ता व भोक्ता आहे, अशा रीतीनें अविद्याविषयाला आत्मत्वानें समजलेला गार्ग्य ब्राह्मण वक्ता म्हणून पुढें आणला जातो; व आत्म्याला त्याच्या विपरीत जाणणारा अजातशत्रु श्रोता म्हणून स्थापिला जातो. कारण अशा रीतीनें पूर्वपक्ष व सिद्धान्त यांचा आख्यायिकारूपानें सांगितलेला अर्थ श्रोत्याच्या चित्तावर चांगला आरूढ होतो. पण याच्या उलट आख्यायिकेच्या रूपानें न सांगतां तर्कशास्त्राप्रमाणें केवल अर्थानुसारी वाक्यांनीं त्याचें समर्पण करूं लागल्यास तो दुर्विज्ञेय होतो. कारण आत्मवस्तु अत्यंत सूक्ष्म आहे. आत्मवस्तु सुसंस्कृत देवबुद्धीला—सात्त्विक बुद्धीला गम्य असून सामान्य बुद्धीला अगम्य आहे, असें काठकांत सविस्तर दाखविलें आहे. छान्दोग्यांत—'आचार्यवान् पुरुष जाणतो;' 'आचार्यापासूनच संपादन केलेली विद्या फलदायिनी होते,' असें सांगितलें आहे. गीतेंतहि 'ते तत्त्वदर्शी ज्ञानी तुला ज्ञानाचा उपदेश करतील' असें म्हटलें आहे. या बृहदारण्यकांतहि शाकल्य व याज्ञवल्क्य यांच्या संवादानें ब्रह्माचें अतिगहनत्व मोठ्या तत्परतेनें सांगितलें आहे. तस्मात् आख्यायिकारूपानें पूर्वपक्ष व सिद्धान्त यांचें स्वरूप देऊन आत्मवस्तूचें समर्पण करण्यासाठीं आरंभ करणें योग्यच आहे.

ॐ ॥ दृप्तबालाकिर्हानूचानो गार्ग्य आस स होवाचाजातशत्रुं काश्यं ब्रह्म ते ब्रवाणीति स होवाचाजातशत्रुः सहस्रमेतस्यां वाचि दद्मो जनको जनक इति वै जना धावन्तीति ॥

अन्वयार्थ—[ह गार्ग्यः दृप्तबालाकिः अनूचानः आस—] पूर्वीं गार्ग्य या गोत्राचा बलाकेचा पुत्र ब्रह्माला यथार्थ न जाणल्यामुळें दृप्त—गर्वित व 'अनूचान'—व्याख्यान करण्यास समर्थ असा होता. [सः ह अजातशत्रुं काश्यं ब्रह्म ते ब्रवाणि इति ह उवाच—] तो अजातशत्रु या नांवाच्या काशि-

राजापाशीं जाऊन 'मी तुला ब्रह्म सांगेन?' असें ह्मणाला. [सः ह अजातशत्रुः एतस्यां वाचि सहस्रं दद्मः—] तेव्हां तो अजातशत्रु " या वाणीकरितां—असें बोलल्याबद्दलच—आम्ही तुला सहस्र गायी देतों. कारण [जनकः जनकः इति वै जनाः धावन्ति इति उवाच—] सर्व लोक जनक दाता व जनक श्रोता, असें समजून 'जनक जनक' असें ह्मणून धांवत असतात. " (व तूंहि तीच गोष्ट माझ्या ठिकाणीं संभवनीय समजला असशील !) असें म्हणाला. १.

स होवाच गार्ग्यो य एवासावादित्ये पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा अतिष्ठाः सर्वेषां भूतानां मूर्धा राजेति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्तेऽतिष्ठाः सर्वेषां भूतानां मूर्धा राजा भवति॥२

अन्वयार्थ—[सः ह गार्ग्यः उवाच—] तेव्हां तो गार्ग्य म्हणाला—[यः एव असौ आदित्ये पुरुषः—] " हा जो आदित्यामध्यें पुरुष आहे [एतं एव अहं ब्रह्म उपासे इति—] त्यालाच मी ब्रह्म समजून उपासितों (तेंच ब्रह्म आहे, अशी मी उपासना करतों) " [सः अजातशत्रुः उवाच—] तें ऐकून अजातशत्रु उलट बोलला—[मा मा एतस्मिन् संवदिष्ठाः—]"नको नको या ब्रह्माविषयीं संवादच करूं नको. [सर्वेषां भूतानां अतिष्ठाः मूर्धा राजा इति वै अहं एतं उपासे इति—] कारण तें ब्रह्म सर्व भूतांचें अतिक्रमण करून राहतें. तें सर्व भूतांचा मूर्धा म्हणजे शिर आहे व दीप्तिगुणानें युक्त असल्यामुळें तें राजा आहे. मी या ब्रह्माची अशी उपासना करतों. [यः एतं एवं उपास्ते—] जो कोणी याची अशी उपासना करतो [सः सर्वेषां भूतानां अतिष्ठाः—]तो सर्व भूतांचें अतिक्रमण करून राहतो; [मूर्धा राजा भवति—] सर्व भूतांचा मूर्धा होतो व राजा होतो. " २—याप्रमाणें अजातशत्रूनें आदित्य-ब्रह्माचें प्रत्याख्यान केलें असतां गार्ग्य चंद्रामध्यें दुसरें ब्रह्म समजता झाला—

स होवाच गार्ग्यो य एवासौ चन्द्रे पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा बृहन्पाण्डरवासाः सोमो राजेति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्तेऽहरहर्ह सुतः प्रसुतो भवति नास्यान्नं क्षीयते॥

अन्वयार्थ—तेव्हां तो गार्ग्य म्हणाला—[यः एव असौ चन्द्रे पुरुषः—] " जो हा चंद्रामध्यें पुरुष आहे [एतं एव अहं ब्रह्म उपासे इति—] त्यालाच मी 'ब्रह्म' ह्मणून उपासतों. " तेव्हां [सः ह०—] तो अजातशत्रु म्हणाला—[मा मा०—] " नको नको, या ब्रह्माविषयीं संवाद करूं नको. कारण [बृहन्—] महान्, [पाण्डरवासाः—] ज्याचें शुक्ल वस्त्र आहे, [सोमः राजा०—] सोम राजा,अशी मी याची उपासना करतों [यः एतं०—]दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो [अस्य अहरहः ह सुतः प्रसुतः भवति—] त्याला प्रत्यहीं सोम अभिषुत होतो; प्रसुत होतो;[अस्य अन्नं न क्षीयते—] त्याचें अन्न क्षीण होत नाहीं."

स होवाच गार्ग्यो य एवासौ विद्युति पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा-स्तेजस्वीति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते तेजस्वी ह भवति तेजस्विनी हास्य प्रजा भवति ॥ ४

अन्वयार्थ—तो गार्ग्य ह्मणाला—[यः एव०—]" हा जो विद्युत्-मध्यें पुरुष आहे त्याचीच मी 'ब्रह्म' ह्मणून उपासना करतों." तेव्हां अजातशत्रु म्हणाला—" नको नको, या ब्रह्माविषयीं असा संवाद करूं नको. मी याची ' तेजस्वी ' अशी उपासना करतों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो तो तेजस्वी होतो व त्याची प्रजा तेजस्विनी होते. " ४

स होवाच गार्ग्यो य एवायमाकाशे पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठाः पूर्णमप्रवर्तीति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते पूर्यते प्रजया पशुभिर्नास्यास्माल्लोकात्प्रजोद्वर्तते ॥ ५

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—" हा जो आकाश, हृदय व हृदयाकाश यांत एक पुरुष आहे, त्याचीच मी ब्रह्म ह्मणून उपासना करतों. " तेव्हां तो अजातशत्रु म्हणाला—" नको नको, या ब्रह्माविषयीं संवाद करूं नको. पूर्ण व अक्रियावान् या गुणांनीं विशिष्ट अशा त्याची मी उपासना करतों. दुसराहि जो कोणी त्याची अशी उपासना करतो तो प्रजा व पशु यांनीं पूर्ण होतो. त्याची प्रजा या लोकांतून विच्छिन्न होत नाहीं." ५

स होवाच गार्ग्यो य एवायं वायौ पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा इन्द्रो वैकुण्ठोऽपराजिता सेनेति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते जिष्णुर्हापराजिष्णुर्भवत्यन्यतस्त्यजायी ॥ ६

अन्वयार्थ—तेव्हां तो गार्ग्य म्हणाला—"हा जो वायूमध्यें पुरुष आहे त्यालाच मी ब्रह्म ह्मणून उपासितों." तें ऐकून अजातशत्रु म्हणाला—"नको नको याविषयीं संवाद करूं नको. मी 'इंद्र—परमेश्वर वैकुंठ—अप्रसह्य—सहन न होणारा विशेषेंकरून अपराजित—अजिंक्य सेना' असेंच त्याचें उपासन करतों. दुसराहि जो कोणी त्याची अशी उपासना करतो तो जिष्णु, अपराजिष्णु व अन्यतस्त्यजायी—शत्रूंना जिंकणारा होतो." ६

स होवाच गार्ग्यो य एवायमग्नौ पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा विषासहिरिति वा अहमेतमुपास इति स ह एतमेवमुपास्ते विषासहिर्ह भवति विषासहिर्हास्य प्रजा भवति ॥ ७

अन्वयार्थ—तो गार्ग्य ह्मणाला—"हा जो अग्नीमध्यें पुरुष आहे त्यालाच मी 'ब्रह्म' ह्मणून उपासितों" तेव्हां अजातशत्रु म्हणाला—"नको, याविषयीं संवाद करूं नको. 'विषासहि' या गुणानें मी त्याची उपासना करतों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो तो स्वतः 'विषासहि'—सहनशील होतो व त्याची प्रजा 'विषासहि' होते." ७

स होवाच गार्ग्यो य एवायमप्सु पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठाः प्रतिरूप इति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते प्रतिरूपꣳहैवैनमुपगच्छति नाप्रतिरूपमथो प्रतिरूपोऽस्माज्जायते ॥ ८

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—"हा जो जलामध्यें पुरुष आहे त्यालाच मी 'ब्रह्म' म्हणून उपासितों." तें ऐकून अजातशत्रु म्हणाला—"नको; त्याविषयीं संवाद करूं नको. मी त्याला 'प्रतिरूप' म्हणून उपासितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो त्याला प्रतिरूपच—श्रुति-स्मृतिशासनानु-

रूपच फल प्राप्त होतें. अप्रतिरूप कधींहि प्राप्त होत नाहीं. त्या उपासकापासून प्रतिरूपच पुत्र उत्पन्न होतो." ८.

स होवाच गार्ग्यो य एवायमादर्शे पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा रोचिष्णुरिति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते रोचिष्णुर्ह भवति रोचिष्णुर्हास्य प्रजा भवत्यथो यैः संनिगच्छति सर्वाꣳस्तानतिरोचते ॥ ९

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—" हा जो आरशांत पुरुष आहे त्यालाच मी ' ब्रह्म ' म्हणून उपासितों " तेव्हां अजातशत्रु म्हणाला—" नको, याविषयीं संवाद करूं नको. मी ' रोचिष्णु '—दीप्तिस्वभाव म्हणून याची उपासना करतों. तो जो कोणी याची अशी उपासना करतो तो ' रोचिष्णु ' होतो; त्याची प्रजा ' रोचिष्णु ' होते व हा ज्यांच्याशीं संगत होतो त्या सर्वांपेक्षां अधिक दीप्त होतो. " ९

स होवाच गार्ग्यो य एवायं यन्तं पश्चाच्छब्दोऽनूदेत्येतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा असुरिति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते सर्वꣳहैवास्मिँल्लोक आयुरेति नैनं पुरा कालात्प्राणो जहाति ॥ १०

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—" जाणाऱ्या वायूच्या मागून हा जो शब्द उद्भवतो त्यालाच मी ' ब्रह्म ' म्हणून उपासितों. " तेव्हां अजातशत्रु म्हणाला—" याविषयीं संवाद करूं नको. मी असु—प्राण म्हणून याची उपासना करतों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो त्याला या लोकीं सर्व आयुष्य प्राप्त होतें. मरणकालापूर्वी त्याला प्राण सोडीत नाहीं. " १०.

स होवाच गार्ग्यो य एवायं दिक्षु पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवदिष्ठा द्वितीयोऽनपग इति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते द्वितीयवान्ह भवति नास्माद्गणश्छिद्यते ॥ ११

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—" हा जो दिशांमध्यें पुरुष आहे त्यालाच मी ' ब्रह्म ' म्हणून उपासितों. " तेव्हां अजातशत्रु म्हणाला—" नको,

याविषयीं संवाद करूं नको. 'द्वितीयत्व व अनपगत्व—अवियुक्तस्वभावत्व या गुणांनीं युक्त अशा त्याची मी उपासना करतों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो तो द्वितीयवान् होतो. याच्यापासून गण विच्छिन्न होत नाहीं."११

स होवाच गार्ग्यो य एवायं छायामयः पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादिष्ठा मृत्युरिति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्ते सर्वꣳहैवास्मिँल्लोक आयुरेति नैनं पुरा कालान्मृत्युरागच्छति ॥१२

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—" हा जो छायामय पुरुष आहे त्यालाच मी 'ब्रह्म' म्हणून उपासितों." तेव्हां अजातशत्र म्हणाला—" नको; याविषयीं संवाद करूं नको. मी याची 'मृत्यु' म्हणून उपासना करतों. जो कोणी याची अशी उपासना करतो त्याला या लोकांतील सर्व आयुष्य प्राप्त होतें. त्याला कालाच्या पूर्वी मृत्यु येत नाहीं." १२.

स होवाच गार्ग्यो य एवायमात्मनि पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपास इति स होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्सवदिष्ठा आत्मन्वीति वा अहमेतमुपास इति स य एतमेवमुपास्त आत्मन्वी ह भवत्यात्मन्विनी हास्य प्रजा भवति स ह तूष्णीमास गार्ग्यः॥१३

अन्वयार्थ—तो गार्ग्य म्हणाला—"हा जो आत्म्यामध्यें—प्रजापति, बुद्धि व हृदय, यांत पुरुष आहे त्यालाच मी 'ब्रह्म' म्हणून उपासितों." तेव्हां अजातशत्रु म्हणाला—"नको, याविषयीं संवाद करूं नको. मी याची 'आत्मन्वी'—आत्मवान् म्हणून उपासना करतों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करतो तो आत्मन्वी होतो. त्याची प्रजा आत्मन्विनी होते." हें ऐकून [सः ह गार्ग्यः तूष्णीं आस—] तो गार्ग्य मुकाट्यानें बसला. १३.

स होवाचाजातशत्रुरेतावन्नू ३ इत्येतावद्धीति नैतावता विदितं भवतीति स होवाच गार्ग्य उप त्वा यानीति ॥ १४

अन्वयार्थ—[सः अजातशत्रुः ह उवाच—] तेव्हां अजातशत्रु त्याला म्हणाला—[एतावन्नु इति—] " बस्स; एवढेंच का ?" तेव्हां गार्ग्य म्हणाला—[एतावत् हि इति—] " होय एवढेंच." पण [एतावता विदितं न भवति—] " एवढ्यानेंच ब्रह्म विदित होत नाहीं." असें जेव्हां अजातशत्रु म्हणाला,

तेव्हां [सः गार्ग्यः उवाच—] गार्ग्य म्हणाला—[त्वा उपयानि इति—] "मी तुला शिष्यभावानें शरण येतों." १४.

स होवाचाजातशत्रुः प्रतिलोमं चैतद्यद्ब्राह्मणः क्षत्रिय-मुपेयाद्ब्रह्म मे वक्ष्यतीति व्येव त्वा ज्ञपयिष्यामीति तं पाणावादायोत्तस्थौ तौ ह पुरुषꣳसुप्तमाजग्मतुस्तमेतैर्नाम-भिरामन्त्रयांचक्रे बृहन्पाण्डरवासः सोम राजन्निति स नोत्तस्थौ तं पाणिना पेषं बोधयांचकार स होत्तस्थौ ॥१५

अन्वयार्थ—तो अजातशत्रु म्हणाला—[यत् ब्राह्मणः क्षत्रियं उपेयात् ब्रह्म मे वक्ष्यति इति एतत् च प्रतिलोमं—] "ब्राह्मणानें क्षत्रियापाशीं 'हा मला ब्रह्म सांगेल' अशा समजुतीनें शिष्यवृत्तीनें उपसन्न होणें, हें विपरीत आहे. [त्वा विज्ञपयिष्यामि एव—] यास्तव मी तुला विज्ञानच करून देतों." [तं पाणौ आदाय उत्तस्थौ—] नंतर तो राजा अजातशत्रु त्याला हातांत धरून (त्याचा हात आपल्या हातांत धरून) उठला. [तौ ह सुप्तं पुरुषं आजग्मतुः—] ते दोघे एका निजलेल्या पुरुषापाशीं आले. [तं बृहन् पाण्डरवासः सोम राजन् इति एतैः नामभिः आमंत्रयांचक्रे—] राजा त्याला 'हे बृहन्, पांडरवास, सोम, राजन्' या नांवांनी हाका मारू लागला. [सः न उत्तस्थौ—] पण तो उठला नाहीं. [तं पाणिना पेषं बोधयांचकार—] म्हणून राजानें त्याला हातानें हलविलें. [सः ह उत्तस्थौ—] त्याबरोबर तो उठला. १५.

स होवाचाजातशत्रुर्यत्रैष एतत्सुप्तोऽभूद्य एष विज्ञानमयः पुरुषः कैष तदाऽभूत्कुत एत-दागादिति तदु ह न मेने गार्ग्यः ॥ १६

अन्वयार्थ—[सः०—] तो अजातशत्रु याप्रमाणें देहाहून व्यतिरिक्त आत्म्याचें अस्तित्व प्रतिपादून गार्ग्यास म्हणाला—[यत्र एषः यः एषः विज्ञानमयः एतत् सुप्तः अभूत्—] "ज्यावेळीं हा विज्ञानमय पुरुष स्वपन घेता झाला—स्वस्थ झोंप घेत होता [तदा एषः क अभूत्—] त्या वेळीं हा कोठें होता? व [कुतः एतत आगात् इति—] आतां हा कोठून आला?" [गार्ग्यः तत् उ ह न मेने—] पण गार्ग्याला त्या दोन्ही गोष्टी कळल्या नाहींत. १६.

स होवाचाजातशत्रुर्यत्रैष एतत्सुप्तोऽभूद्य एष विज्ञानमयः पुरुषस्तदेषां प्राणानां विज्ञानेन विज्ञानमादाय य एषोऽन्तर्हृदय आकाशस्तस्मिञ्छेते । तानि यदा गृह्णात्यथ हैतत्पुरुषः स्वपिति नाम तद्गृहीत एव प्राणो भवति गृहीता वाग्गृहीतं चक्षुर्गृहीतꣳश्रोत्रं गृहीतं मनः ॥ १७

अन्वयार्थ—[सः०—] तो अजातशत्रु आपल्याला विवक्षित असलेला अर्थ सांगण्यासाठीं म्हणाला—[यत्र एषः०—] " जेथें हा हें शयन करीत स्वस्थ निजला होता, जो हा विज्ञानमय पुरुष आहे [तत् विज्ञानेन एषां प्राणानां विज्ञानं आदाय—] त्यावेळी अंतःकरणांतील व्यक्त विशेष विज्ञानानें वागादिप्राणांचें हें विज्ञान—विषयग्रहणसामर्थ्य—घेऊन [यः एषः अन्तर्हृदये आकाशः तस्मिन् शेते—] हा जो हृदयांतील आकाश—परमात्मा—त्यांत शयन करितो. [तानि यदा गृह्णाति अथ ह एतत् पुरुषः स्वपिति नाम—] त्या विज्ञानांचें तो जेव्हां ग्रहण करतो तेव्हां पुरुषाचें ' स्वपिति ' हें नांव प्रसिद्ध होतें. [तत् गृहीतः एव प्राणः भवति—] त्यावेळीं प्राण गृहीतच होतो, [वाक् गृहीता—] वाक् गृहीत होते, [चक्षुः गृहीतं०—] चक्षु गृहीत होतें, श्रोत्र गृहीत होतें, मन गृहीत होतें. सु. ब्र. पृ.२२०,२७६पहा.१७.—"अहोपण, दर्शनरूप स्वप्नदर्शेंत शरीरेंद्रियांचा वियोग जरी झाला तरी पुरुष सुखी, दुःखी वगैरे संसारधर्मांनीं युक्त होतो. अर्थात् ' शरीरेंद्रियसंयोगामुळें होणाऱ्या भ्रान्तीनें आत्म्यामध्यें संसारधर्मित्व आरोपित आहे ' असें म्हणतां येत नाहीं!" समाधान—

स यत्रैतत्स्वप्न्यया चरति ते हास्य लोकास्तदुतेव महाराजो भवत्युतेव महाब्राह्मण उतेवोच्चावचं निगच्छति स यथा महाराजो जानपदान्गृहीत्वा स्वे जनपदे यथाकामं परिवर्तेतैवमेवैष एतत्प्राणान्गृहीत्वा स्वे शरीरे यथाकामं परिवर्तते॥

अन्वयार्थ—[सः यत्र एतत् स्वप्नया चरति—] तो आत्मा ज्यावेळीं दर्शनरूप स्वप्नवृत्तीनें असतो [तत् अस्य ते ह लोकाः—] त्यावेळीं याचे सर्व लोक—कर्मफळें उद्भवतात. [तत् उत इव महाराजः भवति—] तेथेंहि तो महाराजासारखा होतो. [उत इव महाब्राह्मणः—] महाब्राह्मणासारखा होतो. [उत इव उच्चावचं निगच्छति—] देवादि उच्च व तिर्यगादि नीच भावास

प्राप्त होतो. [सः महाराजः जानपदान् गृहीत्वा यथा स्वे जनपदे यथाकामं परिवर्तेत–] तो महाराजा देशांतील भृत्यादिकांना घेऊन ज्याप्रमाणें स्वतःच्या देशांत यथेच्छ परिवर्तन करतो [एवं एव एषः एतत् प्राणान् गृहीत्वा स्वे शरीरे यथाकामं परिवर्तते–] त्याप्रमाणेंच हा विज्ञानमय पुरुष प्राणांचा जागरित स्थानापासून उपसंहार करून आपल्या शरीरांतच आपल्या वासनेप्रमाणें परिवर्तन पावतो. (वासनेप्रमाणें विषयानुभव घेतो.याचा भाष्यार्थ व सु.ब्र.पृ.२२० पहा.) १८

–'दर्शनवृत्ति स्वप्नामध्यें वासनाराशीला दृश्यत्व असल्यामुळें तो–वासनासमूह आत्मधर्म नव्हे' असें वरील कंडीकेंत सिद्ध केलें. त्यावरून आत्म्याची विशुद्धता अवगत झाली. त्याचप्रमाणें स्वप्नांत ' यथेच्छ परिवर्तन करतो ' असें म्हणून कामवशात् परिवर्तन सांगितलें. पण ' विज्ञानमयाचा हा द्रष्टृ-दृश्यसंबंध स्वाभाविक आहे व त्यामुळें त्याच्या ठिकाणीं अशुद्धता आहे,' अशी शंका घेण्यांत येते. यास्तव तिचें निरसन करून आत्म्याची विशुद्धि सिद्ध करण्यासाठीं श्रुति म्हणते–

अथ यदा सुषुप्तो भवति यदा न कस्यचन वेद हिता नाम नाड्यो द्वासप्ततिः सहस्राणि हृदयात्पुरीततमभिप्रतिष्ठन्ते ताभिः प्रत्यवसृप्य पुरीतति शेते स यथा कुमारो वा महाराजो वा महाब्राह्मणो वाऽतिघ्नीमानन्दस्य गत्वा शयीतैवमेवैष एतच्छेते १९

अन्वयार्थ—[अथ यदा सुषुप्तः भवति–] नंतर जेव्हां तो सुषुप्त होतो; [यदा कस्यचन न वेद–] जेव्हां कांही एक जाणत नाहीं; [हिताः नाम द्वासप्ततिः सहस्राणि नाड्यः हृदयात पुरीततं अभिप्रतिष्ठन्ते–] हिता या नांवाच्या बाहत्तर सहस्र नाड्या हृदयापासून बहिर्मुख प्रवृत्त होऊन शरीराला व्यापतात [ताभिः प्रत्यवसृप्य पुरीतति शेते–] त्यांच्या द्वारा बुद्धीच्या मागोमाग जाऊन तो शरीरांत राहतो. [सः यथा कुमारः वा०–] तो जसा अति अल्प बालक, किंवा महाराज, किंवा महाब्राह्मण [आनंदस्य अतिघ्नीं गत्वा शयीत–] आनंदाच्या दुःखनाशक अवस्थेस प्राप्त होऊन राहतो [एवं एव एषः एतत् शेते–] त्याप्रमाणेंच हा विज्ञानमय हें शयन करितो. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २७६ पहा.) १९.

–प्राणादिकांची निष्पत्ति आत्म्यापासून कशी होते तें दृष्टान्तानें व्यक्त करितात–

स यथोर्णनाभिस्तन्तुनोच्चरेद्यथाऽग्नेः क्षुद्रा विस्फुलिङ्गा व्युच्चरन्त्येवमेवास्मादात्मनः सर्वे प्राणाः सर्वे लोकाः

सर्वे देवाः सर्वाणि भूतानि व्युच्चरन्ति तस्योपनिषत्स-त्यस्य सत्यमिति प्राणा वै सत्यं तेषामेष सत्यम् ॥ २०

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयाध्यायस्य प्रथम ब्राह्मणम् ॥ १

अन्वयार्थ—[सः यथा ऊर्णनाभिः तंतुना उच्चरेत्–] व्यवहारांत प्रसिद्ध कोळी जसा तंतूनें वर जातो किंवा [यथा अग्नेः क्षुद्राः विस्फुलिंगाः व्युच्चरन्ति–] जसे अग्नीपासून क्षुद्र विस्फुलिंग उडतात [एवं एव अस्मात् आत्मनः सर्वे प्राणाः०–] त्याचप्रमाणें या आत्म्यापासून सर्व प्राण, सर्व लोक, सर्व देव व सर्व भूतें उत्पन्न होतात. [तस्य सत्यस्य सत्यं इति उपनिषद्–] त्या आत्म्याचें –ब्रह्माचें ' सत्याचें सत्य ' हें उपनिषद्–अभिधायक नाम–आहे. [प्राणाः वै सत्यं–] प्राणच सत्य आहेत व [तेषां एषः सत्यम्–] त्यांचें हा आत्मा सत्य आहे. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २१० पहा.) २० (१).

–मी तुला ब्रह्म सांगतों, असा प्रस्ताव झाला. पुढें त्यांत जगत् ज्यापासून झालें, तें यद्रूप आहे व ज्यांत लीन होतें तें एक ब्रह्म आहे, असें ज्ञापित केलें. पण कोणत्या स्वरूपाचें तें जगत् उत्पन्न होतें व लय पावतें, तें पंचभूतात्मक आहे, भूतें नामरूपात्मक आहेत, नाम व रूप सत्य आहे, असें सांगितलें. त्या पंचभूतात्मक सत्याचें सत्य ब्रह्म आहे. पण बाधित होणारीं भूतें सत्य कशीं ? तें सांगण्यासाठीं हें व पुढील मूर्तामूर्त ब्राह्मण आहे.

यो ह वै शिशुꣳ साधानꣳसप्रत्याधानꣳसस्थूणꣳसदामं वेद सप्त ह द्विषतो भ्रातृव्यानवरुणद्धि। अयं वाव शिशुर्योऽयं मध्यमः प्राणस्तस्येदमेवाधानमिदं प्रत्याधानं प्राणः स्थूणाऽन्नं दाम ॥

अन्वयार्थ—[यः ह वै शिशुं साधानं सप्रत्याधानं०–] जो शिशूला आधानासह, प्रत्याधानासह, स्थूणासह व दामासह जाणतो तो [सप्त ह द्विषतः भ्रातृव्यान् अवरुणद्धि–] सात द्वेष करणाऱ्या शत्रूंना अवरोध करतो. [अयं वाव शिशुः यः अयं मध्यमः प्राणः–] हाच तो शिशु होय, कीं जो हा मध्यम प्राण. [तस्य इदं एव आधानं–] त्याचें शरीर हेंच आधान आहे, [इदं प्रत्याधानं–] हेंच प्रत्याधान आहे, [प्राणः स्थूणा–] प्राण स्थूणा (खांब, मेढ) आहे व [अन्नं दाम–] अन्न दाम (दावें) आहे १.

तमेताः सप्ताक्षितयः उपतिष्ठन्ते तद्या इमा अक्षन्लोहिन्यो राजयस्ताभिरेनꣳरुद्रोऽन्वायत्तोऽथ या अक्षन्नापस्ताभिः पर्जन्यो या कनीनका तयाऽऽदित्यो यत्कृष्णं तेनाग्नियच्छुक्लं तेनेन्द्रोऽधरयैनं वर्तन्या पृथिव्यन्वायत्ता द्यौरुत्तरया नास्यान्नं क्षीयते य एवं वेद ॥ २

अन्वयार्थ—[एताः सप्त अक्षितयः तं उपतिष्ठन्ते—] या सात अक्षिति त्याचें उपस्थान करितात. [तत या इमाः अक्षन् लोहिन्यः राजयः—] त्यांतील ज्या ह्या नेत्रांतील लाल रेखा [ताभिः एनं रुद्रः अन्वायत्तः—] त्यांच्या द्वारा रुद्र या मध्यम प्राणामध्यें अनुगत आहे. [अथ याः अक्षन् आपः—] नंतर जें हें नेत्रांतील पाणी [ताभिः पर्जन्यः—] त्यांच्या द्वारा पर्जन्य, [या कनीनका तया आदित्यः—] जी कनीनका तिच्या द्वारा आदित्य, [यत् कृष्णं तेन अग्निः—] जें कृष्णरूप त्याच्या द्वारा अग्नि, [यत शुक्लं तेन इंद्रः—] जें शुक्ल त्याच्या द्वारा इंद्र, [अधरया वर्तन्या एनं पृथिवी अन्वायत्ता उत्तरया द्यौः—] खालच्या पापणीच्या द्वारा पृथिवी, वरच्या पापणीच्या द्वारा द्यौ, यामध्यें अनुगत आहे. [यः एवं वेद अस्य अन्नं न क्षीयते—] अशी जो उपासना करतो त्याचें अन्न क्षीण होत नाहीं. २.

तदेष श्लोको भवति । अर्वाग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तास्मिन्यशो निहितं विश्वरूपम् । तस्याऽऽसत ऋषयः सप्त तीरे वागष्टमी ब्रह्मणा संविदानेति । अर्वाग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्न इतीदं ताच्छिर एष ह्यर्वाग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तास्मिन्यशो निहितं विश्वरूपमिति प्राणा वै यशो विश्वरूपं प्राणानेतदाह तस्याऽऽसत ऋषयः सप्त तीरे इति प्राणा वा ऋषयः प्राणानेतदाह वागाष्टमी ब्रह्मणा संविदानेति वाग्ध्यष्टमी ब्रह्मणा संवित्ते ॥ ३

अन्वयार्थ—[तत् एषः श्लोकः—] त्याअर्थी हा श्लोक-मंत्र आहे. [अर्वाक्-बिलः चमसः ऊर्ध्वबुध्नः—] (चमस म्ह० यज्ञांतील सोमरसाचें पात्र.) तो अर्वाक्-बिल व ऊर्ध्वबुध्न आहे. [तस्मिन् विश्वरूपं यशः निहितं—] त्यांत विश्वरूप यश स्थित आहे. [तस्य तीरे सप्त ऋषयः आसते०—] त्याच्या तीरा-

वर सात ऋषी असतात व वेदानें संवाद करणारी वाक् आठवी आहे. [इति–] याचें व्याख्यान–[अर्वाक्-बिलः०–] अर्वाग्बिल व ऊर्ध्व बुध्न चमस [इति इदं तत् शिरः–] म्हणजे हें शिर होय. [हि एषः अर्वाक्-बिलः चमसः ऊर्ध्व-बुध्नः–] कारण हाच अर्वाग्बिल व ऊर्ध्वबुध्न चमस आहे. [तस्मिन्०–] त्यांत नानारूप यश स्थित आहे. [प्राणाः वै विश्वरूपं यशः–] प्राण हेंच तें विश्वरूप यश आहे. [प्राणान् एतत् आह–] मंत्र प्राणांनाच यश ह्मणत आहे. [तस्य तीरे०–] त्याच्या तीरावर सात ऋषी राहतात. [प्राणाः वै ऋषयः–] प्राणच ऋषी. [प्राणान् एतत् आह–] प्राणाविषयीं मंत्र हें ह्मणत आहे. [वागष्टमी०–] ब्रह्मानें संवाद करणारी वाक् आठवी. [वाक् हि अष्टमी ब्रह्मणा संवित्ते–] तीच आठवी वाक् वेदानें संवाद करते. सु. ब्र. पृ. ११० पहा. ३–त्या चमसाच्या तीरीं राहणारे सात ऋषी कोण ? उत्तर—

इमावेव गोतमभरद्वाजावयमेव गोतमोऽयं भरद्वाज इमावेव विश्वामित्रजमदग्नी अयमेव विश्वामित्रोऽयं जमदग्निरिमावेव वसिष्ठकश्यपावयमेव वसिष्ठोऽयं कश्यपो वागेवात्रिर्वाचा ह्यन्नमद्यतेऽत्तिर्ह वै नामैतद्यदत्रिरिति सर्वस्यात्ता भवति सर्वमस्यान्नं भवति य एवं वेद ॥ ४

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयाध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥२

अन्वयार्थ—[इमौ एव गोतमभरद्वाजौ–] हे दोन कानच गोतम-भरद्वाज, [अयं एव गोतमः–] हा कानच गोतम व [अयं भरद्वाजः–] हा दुसरा कानच भरद्वाज. [इमौ एव विश्वामित्रजमदग्नी–] दोन चक्षु हेच विश्वामित्र-जमदग्नि. [अयं एव विश्वामित्रः–] हाच चक्षु विश्वामित्र व [अयं जमदग्निः–] हा दुसरा चक्षु जमदग्नि. [इमौ एव वसिष्ठकश्यपौ०–] दोन नाकपुड्या हेच वसिष्ठ-कश्यप. हाच वसिष्ठ व हाच कश्यप. [वाक् एव अत्रिः–] वाक् हाच अत्रि. [हि वाचा अन्नं अद्यते–] कारण वाक्-नेंच सर्व अन्न खाल्लें जातें. [यत् अत्रिः इति एतत् अत्तिः ह वै नाम–] ' अत्रि ' म्हणून जें म्हणतात तें ' अत्ति ' असेंच नांव आहे, [यः एवं वेद सः सर्वस्य अत्ता भवति–] असें जाणणारा सर्वांचा अत्ता होतो. [सर्वं अस्य अन्नं भवति–] सर्व याचें अन्न होतें. जो असें जाणतो तो भोक्ताच होतो. ४ (२)

—अजातशत्रुब्राह्मणाच्या म्हणजे पहिल्या ब्राह्मणाच्या शेवटीं प्राणच सत्य आहे असें सांगितलें. जीं प्राणाचीं उपनिषदें—रुद्रादिक नावें तीं ब्रह्मोपनिषदाच्या—ब्रह्मनामाच्या प्रसंगानें सांगितलीं. हे ते प्राण असेंहि सांगितलें. पण ते कोणत्या स्वरूपाचे आहेत व त्यांना सत्यत्व कसें आहे, तें सांगावें, म्हणून कार्य-करणात्मक—शरीरेंद्रियरूप सत्य पंचभूतांच्या स्वरूपाचा निश्चय करण्यासाठीं, हें पुढील ब्राह्मण आरंभिलें जात आहे. 'नेति नेति' अशा वाक्यांनीं ज्या विशेष उपाधींचा अपनय—अपवाद—निरास—केला तद्द्वारा ब्रह्माच्या स्वरूपाचा निर्धार करण्याची श्रुतीला इच्छा आहे. त्या उपाधिभूत पदार्थांच्या स्वरूपाचा निश्चय करण्यासाठीं हें ब्राह्मण आरंभिलें जात आहे, असा संबंध. 'सत्यस्य सत्यं' या वाक्यातील षष्ठ्यन्त सत्यशब्दाचा अर्थ त्याज्य आहे व प्रथमान्त सत्यशब्दाचा अर्थ ग्राह्य आहे. त्यांतील पहिल्या प्रकारच्या सत्याचें स्वरूप सांगण्यासाठीं यांतील पहिल्या दोन कंडिका आहेत व 'अथामूर्तं' इत्यादि पुढील सर्व भाग ग्राह्य स्वरूपाचें निर्धारण करण्यासाठीं आहे. हा या ब्राह्मणाचा संक्षिप्त अर्थ आहे—

द्वे वाव ब्रह्मणो रूपे मूर्तं चैवामूर्तं च मर्त्यं
चामृतं च स्थितं च यच्च सच्च त्यं च ॥ १

अन्वयार्थ—[ब्रह्मणो रूपे द्वे वाव—] ब्रह्माचीं रूपें दोनच आहेत. [मूर्तं च अमूर्तं च एव०—] मूर्त व अमूर्त, मर्त्य व अमृत, स्थित व चर, सत् व त्य. १. —यांतील मूर्ताचीं विशेषणें कोणतीं व अमूर्ताचीं कोणतीं तें श्रुति सांगते—

तदेतन्मूर्तं यदन्यद्वायोश्चान्तरिक्षाच्चैतन्मर्त्यमेतत्स्थितमे-
तत्सत्तस्यैतस्य मूर्तस्यैतस्य मर्त्यस्यैतस्य स्थितस्यैतस्य सत
एष रसो य एष तपति सतो ह्येष रसः ॥ २

अन्वयार्थ—[यत् वायोः च अन्तरिक्षात् च अन्यत् तत् एतत् मूर्तं—] जें वायूहून व अंतरिक्षाहून अन्य तें मूर्त होय. [एतत् मर्त्यं०—] हेंच मर्त्य, हेंच स्थित, व हेंच सत्. [तस्य एतस्य मूर्तस्य०—] त्या या मूर्ताचा, या मर्त्याचा, या स्थिताचा व या सत्-चा हा रस आहे. हा कोणता?—[यः एषः तपति—] जो हा तपतो तो त्यांचा रस आहे. [सतः हि एषः रसः—] हा सत्-चाच रस आहे. सु. ब्र. पृ. २८९ पहा. २.

**अथामूर्तं वायुश्चान्तरिक्षं चैतदमृतमेतद्यदेतत्त्यं तस्यै-
तस्यामूर्तस्यैतस्यामृतस्यैतस्य यत एतस्य त्यस्यैष रसो
य एष एतस्मिन्मण्डले पुरुषस्त्यस्य ह्येष रस इत्यधिदैवतम् ॥३**

अन्वयार्थ—[अथ अमूर्तं—] आतां अमूर्त ब्रह्मस्वरूप सांगितलें जातें. [वायुः च अन्तरिक्षं च—] वायु व अन्तरिक्ष हेंच अमूर्त, [एतत् अमृतं०—] हेंच अमृत, हेंच ' यत्'—जाणारें, व हेंच 'त्यत्'—परोक्ष आहे. [तस्य एतस्य अमूर्तस्य०—] त्या या अमूर्ताचा, या अमृताचा, या यत्-चा व या त्यत्-चा हा रस आहे. [यः एषः एतस्मिन् मंडले पुरुषः त्यस्य हि एषः रसः—] जो हा या मंडलांत पुरुष आहे तो या त्यत्-चाच रस आहे. [इति अधिदैवतं—] हें अधिदैवत होय. ३ —आतां अध्यात्म मूर्तामूर्ताचा विभाग—

**अथाध्यात्ममिदमेव मूर्तं यदन्यत्प्राणाच्च यश्चायमन्तरात्मन्ना-
काश एतन्मर्त्यमेतत्स्थितमेतत्सत्तस्यैतस्य मूर्तस्यैतस्य मर्त्य-
स्यैतस्य स्थितस्यैतस्य सत एष रसो यच्चक्षुः सतो ह्येष रसः ॥४**

अन्वयार्थ—[अथ अध्यात्मं—] आतां अध्यात्म विभाग सांगतों—[इदं एव मूर्तं—] हेंच तें मूर्त [यत् प्राणात् च यः च अयं अन्तरात्मन् आकाशः ततः अन्यत्—] कीं जें प्राणवायु व अंतःशरीरांतील आकाश यांहून अन्य आहे तें मूर्त होय. [एतत् मर्त्यं०—] हें मर्त्य, हें स्थित व हें सत् आहे. [तस्य एतस्य०—] त्या या मूर्ताचा, या मर्त्याचा, या स्थिताचा व या सत्-चा हा रस आहे. कोणता ? [यत् चक्षुः—] जो चक्षु [सतः हि एषः रसः—] तो हा सत्चाच रस आहे.

**अथामूर्तं प्राणश्च यश्चायमन्तरात्मन्नाकाश एतदमृतमेतद्य-
देतत्त्यं तस्यैतस्यामूर्तस्यैतस्यामृतस्यैतस्य यत एतस्य
त्यस्यैष रसो योऽयं दक्षिणेऽक्षन्पुरुषस्त्यस्य ह्येष रसः ॥५**

अन्वयार्थ—[अथ अमूर्तं—] आतां अमूर्ताचें व्याख्यान करतों—[प्राणः च यः च अयं अन्तरात्मन् आकाशः—] प्राण व हा जो अन्तरात्म्यांतील आकाश तें अमूर्त. [एतत् अमृतं०—] तें अमृत, तें यत् व तें त्यत् आहे. [तस्य एतस्य०—] त्या या अमूर्ताचा, या अमृताचा, या यत्-चा व या त्यत्-चा हा रस आहे. [यः अयं दक्षिणे अक्षन् पुरुषः त्यस्य हि एषः रसः—] जो हा दक्षिण नेत्रांतील पुरुष तो त्यत्-चा रस आहे. ५.—ब्रह्माच्या उपाधिभूत सत्य-

संज्ञक मूर्तामूर्तांचा कार्य-करणरूपानें अध्यात्म-अधिदैव विभाग सांगितला. आतां त्या पुरुषाचें–करणात्मक लिंगाचें वासनात्मक रूप श्रुति सांगते—

तस्य हैतस्य पुरुषस्य रूपम्। यथा महारजनं वासो यथा पाण्डाविकं यथेन्द्रगोपो यथाऽग्न्यर्चिर्यथा पुण्डरीकं यथा सकृद्विद्युत्तꣳसकृद्विद्युत्तेव ह वा अस्य श्रीर्भवति य एवं वेदाथात आदेशो नेति नेति न ह्येतस्मादिति नेत्यन्यत्परमस्त्यथ नामधेयꣳसत्यस्य सत्यमिति प्राणा वै सत्यं तेषामेष सत्यम्॥६

इति द्वितीयाध्याये तृतीयं ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—[तस्य ह एतस्य पुरुषस्य रूपं–] त्या या पुरुषाचे रूप–[यथा महारजनं वासः–] ज्याप्रमाणें हळदीनें रंगविलेलें वस्त्र, [यथा पांडाविकं–] जसें पांढरें लोकरीचें वस्त्र, [यथा इंद्रगोपः–] जसा इंद्रगोप–देवगायीचा पूंज, [यथा अग्न्यर्चिः–] जशी अग्नीची ज्वाला, [यथा पुंडरीकं–] जसें शुभ्र कमल, [यथा सकृत् विद्युत्तं–] जसें एकाएकी एकदाच विजेचें चमकणें, [इव ह वा अस्य–] तशींच–तशा प्रकारचीं याचीं निरनिराळी वासनारूपें होतात. [यः एवं वेद सकृद्विद्युत्ता इव ह वै अस्य श्रीः भवति–] हिरण्यगर्भाचें हें सकृत्प्रकाशनरूप वासनारूप जो जाणतो–त्याचें जो उपासन करतो, त्याची कीर्ति सकृद्विद्युत्ताच होते (विजेप्रमाणें त्याची ख्याति सर्वत्र एकदाच पसरते.) [अथ अतः नेति नेति इति आदेशः–] आतां 'नेति नेति' हा ब्रह्माचा आदेश–निर्देश आहे. [अथ सत्यस्य सत्यं इति नामधेयं–] व 'सत्याचें सत्य' हें नामधेय आहे. [न हि एतस्मात् अन्यत् परं अस्ति इति न इति–] सर्व प्राप्त विशेषाचा निषेध करणें –'नेति नेति' असा निर्देश करणें, याहून ब्रह्मच्या उपदेशाचा दुसरा श्रेष्ठ निर्देशप्रकार संभवत नाहीं. (ब्रह्माचे ठिकाणी विषयत्वानें ज्याची ज्याची प्राप्ति होते त्याचा त्याचा नकारद्वयानें निषेध केला जातो.) [प्राणाः वै सत्यं–] प्राणच सत्य आहेत. [तेषां एषः सत्यम्–] त्यांचें हें सत्य आहे (याची मीमांसा भाष्यार्थांत पहा. सु. ब्र. पृ. २८६, ८९-९०.) ६(४)

—आत्मज्ञानानें ज्याचा वर्णाश्रम-वयोऽवस्था इत्यादिकांविषयींचा अभिमान निवृत्त झालेला असतो त्याचा कर्म व कर्मसाधनें यांचा त्याग अर्थात्च

प्राप्त असतो, पण ज्याचा पूर्वोक्त अभिमान नष्ट झालेला नसतो त्यालाहि ज्ञानांगत्वानें संन्यास विहित आहे. यास्तव—

मैत्रेयीति होवाच याज्ञवल्क्य उद्यास्यन्वा अरेऽहमस्मात्स्था-
नादस्मि हन्त तेऽनया कात्यायन्याऽन्तं करवाणीति ॥ १

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्यः ' मैत्रेयि ' इति ह उवाच–] याज्ञवल्क्य " हे मैत्रेयि, " असें संबोधून तिला म्हणाला–[अरे अहं अस्मात् स्थानात् उद्यास्यन् वै अस्मि–] " मी या स्थानापासून वर जाण्याची–दुसऱ्या आश्रमांत जाण्याची इच्छा करीत आहें. [हंत, ते अनया कात्यायन्या अन्तं करवाणि इति–] यास्तव मी तुझी अनुमति विचारतों. या कात्यायनीशीं तुझा विच्छेद करतों–विभाग करून देतों." सु. ब्र. पृ. ३९९. पहा. १.

सा होवाच मैत्रेयी यन्नु म इयं भगो सर्वा पृथिवी वित्तेन
पूर्णा स्यात्कथं तेनाहममृता स्यामिति नेति होवाच याज्ञ-
वल्क्यो यथैवोपकरणवतां जीवितं तथैव ते जीवितꣳ
स्यादमृतत्वस्य तु नाऽऽशाऽस्ति वित्तेनेति ॥ २

अन्वयार्थ—[सा मैत्रेयी ह उवाच–] ती मैत्रेयी म्हणाली–[भगः यत् नु इयं सर्वा पृथिवी मे वित्तेन पूर्णा स्यात्–]"भगवन्! बरें, ही सर्व पृथ्वी मला वित्तानें पूर्ण अशी जर मिळाली [कथं तेन अहं अमृता स्याम् इति–] तर काय मी त्यानें अमृत होईन?" [याज्ञवल्क्यः न इति ह उवाच–] त्यावर याज्ञवल्क्य 'नाहीं' असें म्हणाला. [यथा एव उपकरणवतां जीवितं तथा एव ते जीवितं स्यात्–] "जसें अनेक सुखसाधनांनीं संपन्न असलेल्या लोकांचें जीवित असतें तसेंच तुझें जीवित सुखोपाय व भोग यांनीं संपन्न होईल. [वित्तेन अमृतत्वस्य तु आशा न अस्ति–] वित्तानें अमृतत्वाची तर कांहीं आशाच नाहीं." २.

सा होवाच मैत्रेयी येनाहं नामृता स्यां किमहं
तेन कुर्यां यदेव भगवान्वेद तदेव मे ब्रूहीति ॥ ३

अन्वयार्थ—[सा मैत्रेयी ह उवाच–] ती मैत्रेयी म्हणाली–[येन अहं अमृता न स्यां तेन अहं किं कुर्यां–] ज्यानें मी अमृत होणार नाहीं त्यानें मी काय करूं? [भगवान् यत् एव वेद तत् एव मे ब्रूहि इति–] यास्तव आपण जें अमृतत्वसाधन जाणतां तेंच मला सांगा. ३–याप्रमाणें जें मोक्षाचें साधन

नाहीं त्या वित्ताला व वित्तसाध्य कर्माला घेऊन मला काय करावयाचें आहे, हें भार्येचें भाषण ऐकून संतुष्ट झालेला—

स होवाच याज्ञवल्क्यः प्रिया बतारे नः सती प्रियं भाषस एह्यास्स्व व्याख्यास्यामि ते व्याचक्षाणस्य तु मे निदिध्यासस्वेति ॥ ४

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—[बत अरे नः प्रिया सती प्रियं भाषसे—] " अहाहा, तूं खरोखर पूर्वीहि आम्हांला प्रिय असून आतां प्रिय भाषण करीत आहेस. यास्तव [एहि आस्स्व—] ये, बैस. [ते व्याख्यास्यामि—] मी तुला आत्मज्ञानसाधन सांगतों. [व्याचक्षाणस्य तु मे निदिध्यासस्व इति—] सांगत असलेल्या माझ्या वाक्यांचें निश्चयानें चिंतन कर ४. —अमृत्वाचें साधन जें वैराग्य त्याचा उपदेश करण्याच्या इच्छेनें याज्ञवल्क्य प्रथम पति, पत्नी, पुत्र इत्यादिकांच्या आसक्तीचें खरें कारण सांगून त्यांच्या त्यागासाठीं वैराग्य उत्पन्न करितात व नंतर निरतिशय प्रेमास्पद जो आत्मा त्याच्याच श्रवणादिकांचें विधान करितात—

स होवाच न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति । न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवत्यात्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति । न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति । न वा अरे ब्रह्मणः कामाय ब्रह्म प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय ब्रह्म प्रियं भवति । न वा अरे क्षत्रस्य कामाय क्षत्रं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय क्षत्रं प्रियं भवति । न वा अरे लोकानां कामाय लोकाः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय लोकाः प्रिया भवन्ति । न वा अरे देवानां कामाय देवाः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय देवाः प्रिया भवन्ति । न वा अरे भूतानां कामाय भूतानि प्रियाणि भवन्त्यात्मनस्तु कामाय भूतानि प्रियाणि भवन्ति । न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवत्या-

त्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति। आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यो मैत्रेय्यात्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदꣳसर्वं विदितम् ॥ ५

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—[अरे वै पत्युः कामाय पतिः प्रियः न भवति—] 'हे मैत्रेयि, ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, पतीच्या प्रयोजनासाठीं पत्नीला पति प्रिय होत नाहीं; तर [आत्मनः तु कामाय पतिः प्रियः भवति—] स्वतःच्याच प्रयोजनाकरितां तिला पति प्रिय होतो. त्याच न्यायानें [अरे जायायै कामाय जाया प्रिया न भवति—] जायेच्या प्रयोजनासाठीं पतीला जाया प्रिय होत नाहीं, तर [आत्मनः तु कामाय जाया०—] आपल्या स्वतःच्या प्रयोजनासाठीं त्याला जाया प्रिय होते. पुत्रांच्या प्रयोजनासाठीं पुत्र आई-बापांना प्रिय होत नाहींत, तर ते त्यांच्या स्वतःच्या प्रयोजनासाठी प्रिय होतात. वित्ताच्या प्रयोजनासाठीं वित प्रिय होत नाहीं, तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं तें प्रिय होतें. ब्राह्मणाच्या प्रयोजनासाठीं ब्राह्मण प्रिय होत नाही तर आपल्या प्रयोजनासाठीं तो प्रिय होत असतो. क्षत्रियाच्या प्रयोजनासाठीं क्षत्रिय प्रिय होत नाहीं, तर आपल्या प्रयोजनासाठीं क्षत्रिय प्रिय होतो. स्वर्गादि लोकांच्या प्रयोजनासाठीं ते लोक मनुष्याला प्रिय होत नाहींत; तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं ते त्याला प्रिय होतात. देवांच्या प्रयोजनासाठीं देव प्रिय होत नाहींत, तर स्वतःच्या प्रयोजनासाठी ते प्रिय होतात. भूतांच्या प्रयोजनासाठीं भूतें प्रिय होत नाहीत, तर स्वतःच्या प्रयोजनासाठी तीं प्रिय होतात. अगे मैत्रेयि, सर्वांच्या प्रयोजनासाठी सर्व प्रिय होत नाहीं तर आपल्या प्रयोजनाकरितां सर्व प्रिय होतें, हें प्रसिद्ध आहे. [आत्मा वै अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः—] यास्तव सर्वांत अधिक प्रिय असलेला आत्माच दर्शनार्ह आहे. तोच श्रवणार्ह आहे. तोच मनन करण्यास योग्य आहे व तोच निश्चयानें ध्यान करण्यास योग्य आहे. [अरे मैत्रेयि आत्मनः वै दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेन इदं सर्वं विदितं—] हे मैत्रेयि, आत्म्याच्या दर्शनानें, श्रवणानें, मननानें व विज्ञानानें हें सर्व विदित होतें. (सु. ब्र. पृ. १०, १२२, १२३, १४६, ४२९ पहा.) ५—'अहोपण, एका आत्मवस्तूच्या ज्ञानानें इतर सर्व वस्तूंचें ज्ञान कसें होईल?' उत्तर—

ब्रह्म तं परादाद्योऽन्यत्राऽत्मनो ब्रह्म वेद क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः क्षत्रं वेद लोकास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो लोकान्वेद देवास्तं परादुर्योऽन्यत्राऽत्मनो देवान् वेद भूतानि तं परादुर्योऽन्यत्रात्मनो भूतानि वेद सर्वं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः सर्वं वेदेदं ब्रह्मेदं क्षत्रमिमे लोका इमे देवा इमानि भूतानीदꣳसर्वं यदयमात्मा ॥६

अन्वयार्थ—[ब्रह्म तं परादात् यः आत्मनः अन्यत्र ब्रह्म वेद—] ब्राह्मणजाति त्या पुरुषाला दूर करते जो ब्राह्मणजातीला आत्म्याहून पृथक्त्वानें जाणतो. [क्षत्रं तं०—] क्षत्रियजाति त्याला दूर करते, जो तिला आत्म्याहून पृथक् जाणतो. लोक त्याला दूर करतात, जो लोकांना आत्म्याहून पृथक् जाणतो, देव त्याला दूर करतात, जो देवांना आत्म्याहून पृथक् जाणतो; भूतें त्याला दूर करतात, जो भूतांना आत्म्याहून पृथक् जाणतो; सर्व त्याला दूर ठेवतें जो सर्वाला आत्म्याहून पृथक् जाणतो. [इदं ब्रह्म इदं क्षत्रं इमे लोकाः०—] हें ब्रह्म, हें क्षत्र, हे लोक, हे देव, हीं भूतें व हें सर्व [यत् अयं आत्मा—] हा प्रकृत आत्मा आहे ६—' पण या स्थितिकालीं सर्व आत्माच आहे, असें ज्ञान होणें शक्य कसें आहे ?' अशी शंका घेऊन ' चिन्मात्राची सर्वत्र अनुवृत्ति होत असल्यामुळें सर्व जगाला चिन्मात्ररूपताच आहे असें ज्ञान होऊं शकतें ' असें दृष्टान्तांनीं स्पष्ट करितात—

स यथा दुन्दुभेर्हन्यमानस्य न बाह्याञ्शब्दाञ्शक्नुयाद्ग्रहणाय दुन्दुभेस्तु ग्रहणेन दुन्दुभ्याघातस्य वा शब्दो गृहीतः ॥ ७

अन्वयार्थ—[सः यथा हन्यमानस्य दुंदुभेः—] तो दृष्टान्त असा—लौकिकांत ताडन केल्या जाणाऱ्या (काठीनें वाजविल्या जाणाऱ्या) दुंदुभीचे [बाह्यान् शब्दान् ग्रहणाय न शक्नुयात्—] बाह्य—दूरवर पसरणारे—विशेष ध्वनि जाणण्यास (हे दुंदुभीचे ध्वनी आहेत असें ओळखण्यास) कोणी समर्थ होत नाहीं, [तु दुंदुभेः ग्रहणेन—] पण (हे शब्द कशाचे आहेत असें म्हणून त्यांच्या उत्पत्तिस्थानापाशीं जाऊन किंवा पुष्कळ परिचयामुळें ते दुंदुभीचेच आहेत असें ओळखून) दुंदुभीच्या ज्ञानानें [वा दुंदुभ्याघातस्य ग्रहणेन—] किंवा दुंदुभीच्या आघाताच्या—वादनाच्या ज्ञानानें [शब्दः गृहीतः—] हा शब्द

दुंदुभीचा आहे, असें ज्ञान होतें. (नगाऱ्याच्या विशेष ध्वनीचें ज्ञान नगाऱ्याच्या सामान्य ध्वनीच्या ज्ञानावांचून होऊं शकत नाहीं. वास्तव ते त्याहून भिन्न नाहींत.) ७.

स यथा शङ्खस्य ध्यायमानस्य न बाह्याञ्शब्दाञ्शक्नुयाद्ग्रहणाय शङ्खस्य तु ग्रहणेन शङ्खध्मस्य वा शब्दो गृहीतः ॥ ८

अन्वयार्थ—दुसरा दृष्टान्त असा—ज्याप्रमाणें व्यवहारांत शब्दानें संयुक्त केल्या जाणाऱ्या शंखाचे बाह्य शब्द ग्रहण करण्यास मनुष्य समर्थ होत नाहीं, पण शंखाच्या ग्रहणानें किंवा शंखवादनाच्या ग्रहणानें हा शंखाचा शब्द आहे, असें ज्ञान होतें. ८.

स यथा वीणायै वाद्यमानायै न बाह्याञ्शब्दाञ्शक्नुयाद्ग्रहणाय वीणायै तु ग्रहणेन वीणावादस्य वा शब्दो गृहीतः ॥ ९

अन्वयार्थ—तिसरा दृष्टान्त—ज्याप्रमाणें वीणा वाजविली जाऊं लागली असतां तिचे बाह्य शब्द ग्रहण करण्यास कोणी समर्थ होत नाहीं. पण वीणेच्या किंवा वीणावादनाच्या ग्रहणानें तो शब्द गृहीत होतो.९.—स्थितिकालाप्रमाणेंच उत्पत्तिकालीं—त्या पूर्वीहि ब्रह्मच आहे, असें ज्ञान होणें शक्य आहे, असें सांगतात—

स यथाऽऽर्द्रैधाग्नेरभ्याहितात्पृथग्धूमा विनिश्चरन्त्येवं वा अरेऽस्य महतो भूतस्य निःश्वसितमेतद्यदृग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वाङ्गिरस इतिहासः पुराणं विद्या उपनिषदः श्लोकाः सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्यानान्यस्यैवैतानि निःश्वसितानि ॥ १०

अन्वयार्थ—[सः—] त्याविषयीं दृष्टान्त—[आर्द्रैधाग्नेः अभ्याहितात् यथा धूमाः पृथक् विनिश्चरन्ति—] ज्याचें इंधन आर्द्र आहे अशा अभ्याहित अग्नीपासून ज्याप्रमाणें धूम पृथक् निघतात [एवं वै अरे अस्य महतः भूतस्य एतत् निःश्वसितं—] त्याप्रमाणें हे मैत्रेयि, या महद्भूतार्चे हें निःश्वसित आहे.[यत् ऋग्वेदः०—] ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद, इतिहास, पुराण, विद्या, उपनिषद्, श्लोक, सूत्रें, मंत्रांचीं विवरणें, अर्थवाद, [एतानि अस्य एव निःश्वसितानि—] हीं सर्व या महद्भूताचींच निःश्वसितें आहेत. सु. ब्र. पृ. १४ पहा. १०

—स्थिति व उत्पत्तिकालाप्रमाणेंच प्रलयकालींहि जलबुद्बुदन्यायानें नाम, रूप व कर्म या प्रज्ञानकार्यांचा प्रज्ञानाहून पृथक्त्वानें अभाव आहे, असें सांगतात—

स यथा सर्वासामपाꣳ समुद्र एकायनमेवꣳ सर्वेषां स्पर्शानां त्वगेकायनमेवꣳ सर्वेषां गन्धानां नासिके एकायनमेवꣳसर्वेषाꣳरसानां जिह्वैकायनमेवꣳसर्वेषाꣳरूपाणां चक्षुरेकायनमेवꣳसर्वेषाꣳशब्दानाꣳश्रोत्रमेकायनमेवꣳसर्वेषाꣳ संकल्पानां मन एकायनमेवꣳ सर्वासां विद्यानाꣳ हृदयमेकायनमेवꣳ सर्वेषां कर्मणाꣳ हस्तावेकायनमेवꣳ सर्वेषामानन्दानामुपस्थ एकायनमेवꣳ सर्वेषां विसर्गाणां पायुरेकायनमेवꣳ सर्वेषामध्वनां पादावेकायनमेवꣳ सर्वेषां वेदानां वागेकायनम् ॥११

अन्वयार्थ—[सः यथा सर्वासां अपां समुद्रः एकायनं–] तो दृष्टान्त–ज्याप्रमाणें सर्व जलांचें समुद्र हें एक अयन–एक गमन–एक प्रलयस्थान आहे [एवं सर्वेषां स्पर्शानां त्वक् एकायनं–] त्याप्रमाणें सर्व स्पर्शांचें त्वक् हें एक अयन आहे; [एवं सर्वेषां गंधानां नासिके एकायनं०–] तसेंच सर्व गंधांचें नासिका हें एक अयन आहे, तसेंच सर्व रसांचें जिह्वा हें एक अयन आहे, सर्व रूपांचें चक्षु हें एक अयन आहे, सर्व शब्दांचें श्रोत्र हें एक अयन आहे, सर्व संकल्पांचें मन हें एक अयन आहे. तसेंच सर्व विद्यांचें हृदय हें एक अयन आहे, तसेंच सर्व कर्मांचें हात हें एक अयन आहे, तसेंच सर्व आनंदांचें उपस्थ हें एक अयन आहे, सर्व विसर्गांचें पायु हें एक अयन आहे, सर्व मार्गांचें पाय हें एकायन आहे, त्याचप्रमाणें सर्व वेदांचें वाक् हें एक अयन आहे. (बृ. ब्र. पृ. २३४ पहा) ११.

याप्रमाणें हें सर्व आत्मा आहे, अशी प्रतिज्ञा केली. त्या प्रतिज्ञात अर्थाच्या सिद्धीसाठीं आत्मसामान्यत्व, आत्मजत्व, आत्मप्रलयत्व हे हेतु दिले. त्यांवरून उत्पत्ति-स्थिति-लयसमर्थी जगाचा प्रज्ञानाहून पृथक्पणें अभाव असल्यामुळें प्रज्ञानात्माच हें सर्व आहे, असें तर्कतःहि सिद्ध केलें. पौराणिक प्रलय दोन प्रकारचा सांगतात. एक स्वाभाविक–कार्यांचें प्रकृतीमध्यें आश्रितत्व व दुसरा आत्यंतिक–ब्रह्मवेत्त्यांचा–ब्रह्मविद्येनें होणारा बुद्धिपूर्वक प्रलय. पुढील ग्रंथ या दुसऱ्या प्रकारच्या प्रलयाला उद्देशून आहे.—

स यथा सैन्धवखिल्य उदके प्रास्त उदकमेवानुविलियेत न हास्योद्ग्रहणायेव स्यात् । यतो यतस्त्वाददीत लवण-

मेवैवं वा अर इदं महद्भूतमनन्तमपारं विज्ञानघन एव। एतेभ्यो भूतेभ्यः समुत्थाय तान्येवानुविनश्यति न प्रेत्य संज्ञाऽस्तीत्यरे ब्रवीमीति होवाच याज्ञवल्क्यः ॥ १२

अन्वयार्थ---[सः यथा उदके प्रास्तः सैंधवखिल्यः उदकं एव अनुविलीयेत--] याविषयीं दृष्टान्त असा--ज्याप्रमाणें उदकांत टाकलेला सैंधवखिल्य उदकाबरोबरच विरघळून जातो व तो त्यांत विलीन झाला असतां [अस्य उद्ग्रहणाय इव न ह स्यात्--] त्याला पुनः पाण्यांतून वर काढण्यास कोणी समर्थ होत नाहीं; [यतः यतः तु आददीत लवणं एव--] जेथून जेथून तें पाणी घ्यावें तेथें तें लवणच--खारटच लागतें [एवं वै अरे--] त्याप्रमाणें हे मैत्रेयि, [इदं महद्भूतं अनन्तं अपारं विज्ञानघनः एव--] हें उपनिषत्प्रसिद्ध महद्भूत अनन्त, अपार, व विज्ञानघनच आहे. [एतेभ्यः भूतेभ्यः समुत्थाय तानि एव अनुविनश्यति--] या सत्यशब्दवाच्य भूतांपासून उत्तमप्रकारें उत्थित होऊन त्यांच्याच मागोमाग तो विनाश पावतो. [प्रेत्य संज्ञा न अस्ति--] याप्रमाणें विनाश पावल्यावर ' मी अमक्याचा अमुक' अशी विशेष संज्ञा रहात नाहीं, [इति अरे ब्रवीमि--] असें हे मैत्रेयि, मी तुला सांगतों. [इति याज्ञवल्क्यः ह उवाच--] याज्ञवल्क्य आपल्या मैत्रेयी भार्येला असें परमार्थदर्शन सांगता झाला.याची मीमांसा भाष्यार्थांत पहा.१२

सा होवाच मैत्रेय्यत्रैव मा भगवानमूमुहन्न प्रेत्य संज्ञाऽस्तीति स होवाच न वा अरेऽहं मोहं ब्रवीम्यलं वा अर इदं विज्ञानाय ॥ १३

अन्वयार्थ---[सा०--] ती मैत्रेयी ह्मणाली--[अत्र एव प्रेत्य संज्ञा न अस्ति इति भगवान् मा अमूमुहत्--] " या विषयीच ' शरीरपातानंतर विशेष संज्ञा नाहीं ' असें म्हणून आपण मला मोह पाडला आहे." [सः ह उवाच--] तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाले--[अरे अहं मोहं न वै ब्रवीमि--] " हे मैत्रेयि, मी तुला मोह पाडणारें वचन बोलतच नाहीं. [अरे इदं विज्ञानाय अलं वै--] हें माझें सांगणें त्या महद्भूताला जाणण्यास पुरेसें आहे." १३--'तर मग मरणोत्तर संज्ञा--भान रहात नाही, असें कसें ह्मणतां ? ' उत्तर---

यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं जिघ्रति तदितर इतरं पश्यति तदितर इतरꣳ शृणोति तदितर इतरमभिवदति तदितर इतरं मनुते तदितर इतरं विजानाति यत्र

वा अस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं जिघ्रेत्तत्केन कं पश्येत्तत्केन कꣳ शृणुयात्तत्केन कमभिवदेत्तत्केन कं मन्वीत तत्केन कं विजानीयात् । येनेदꣳ सर्वं विजानाति तं केन विजानीयाद्विज्ञातारमरे केन विजानीयादिति ॥ १४

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयाध्याये चतुर्थ ब्राह्मणम् ॥ ४

अन्वयार्थ—[यत्र हि द्वैतं इव भवति तत् इतरः इतरं जिघ्रति—] ज्या अविद्यावस्थेंत द्वैतसें होतें तेव्हां इतर घ्राता—वास घेणारा इतर—गंधाला हुंगतो; [तत् इतरः इतरं पश्यति०—] तेव्हां इतर द्रष्टा दुसऱ्या—रूपाला पाहतो; तेव्हां इतर—श्रोता इतर शब्दाला ऐकतो. तेव्हां इतर वक्ता इतर शब्दांना बोलतो; तेव्हां इतर—मनन करणारा इतर मन्तव्याचें मनन करतो; तेव्हां इतर विज्ञाता इतर विज्ञेयाला जाणतो. [यत्र वै अस्य सर्वं आत्मा एव अभूत्—] पण ज्या विद्यावस्थेंत या ब्रह्मवेत्त्याला सर्व आत्माच झालें [तत् केन कं जिघ्रेत्०—] तेव्हां कोण कोणत्या साधनानें कोणत्या गंधाचा वास घेणार ? तेव्हां कोणत्या साधनानें कोणाला पाहणार ? कोणत्या साधनानें कोणत्या शब्दाला ऐकणार ? कोणत्या साधनानें काय बोलणार ? कोणत्या साधनानें कशाचें मनन करणार ? कोणत्या साधनानें कशाला जाणणार ? [येन इदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात्—] ज्याच्यायोगानें हें सर्व जाणतो त्याला कशानें जाणावें ? [अरे विज्ञातारं केन विजानीयात् इति—] हे मैत्रेयि, विज्ञात्याला कोणत्या साधनानें जाणावें ? सु. ब्र. पृ.३९१,५०२ पहा. याचा भाष्यार्थहि पहा. १४. (४) —आतां या ब्राह्मणांत पूर्वोक्त दोन्ही अध्यायांच्या अर्थाचा उपसंहार केला जातो.

इयं पृथिवी सर्वेषां भूतानां मध्वस्यै पृथिव्यै सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्यां पृथिव्यां तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मꣳ शारीरस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ १

अन्वयार्थ—[इयं पृथिवी०—] ही पृथिवी सर्व भूतांचें मधु—कार्य आहे; [अस्यै पृथिव्यै०—] या पृथिवीचें सर्व भूतें मधु—कार्य आहे. [यः अयं अस्यां पृथिव्यां तेजोमयः०—] जो हा या पृथिवीमध्यें तेजोमय अमृतमय पुरुष आहे [यः च अयं अध्यात्मं शारीरः तेजो०—] आणि जो हा अध्यात्म शारीर तेजोमय

अमृतमय पुरुष आहे तो सर्व भूतांचें मधु आहे व सर्व भूतें त्याचें मधु आहे. [अयं एव सः०—] हाच तो ' योऽयमात्मा ' या वाक्यानें प्रकृत असलेला आत्मा आहे. [इदं अमृतं—] हें ज्ञान अमृत—मोक्षसाधन आहे. [इदं ब्रह्म—] हें ब्रह्म आहे व [इदं सर्वं—] हेंच ब्रह्मज्ञान सर्वप्राप्तीचें साधन आहे. सु. ब्र. पृ. २८५ पहा. १.

इमा आपः सर्वेषां भूतानां मध्वासामपाꣳसर्वाणि भूतानि
मधु यश्चायमास्वप्सु तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चाय-
मध्यात्मꣳ रैतसस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स
योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ २

अन्वयार्थ—या आप् (जल) सर्व भूतांचें मधु आहे. या आपांचें सर्व भूतें मधु आहे. हा जो आपांत तेजोमय अमृतमय पुरुष व जो हा अध्यात्म रेतांतील तेजोमय अमृतमय पुरुष तो भूतांचें व भूतें त्याचें मधु आहे. जो हा ' योऽयमात्मा ' या वाक्यानें प्रकृत असलेला आत्मा तोच हा होय. हें अमृत, हें ब्रह्म, व हें सर्व आहे. २.

अयमग्निः सर्वेषां भूतानां मध्वस्याग्नेः सर्वाणि भूतानि
मधु यश्चायमस्मिन्नग्नौ तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चाय-
मध्यात्मं वाङ्मयस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स
योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ३

अन्वयार्थ—हा अग्नि सर्व भूतांचें मधु—कार्य आहे. या अग्नीचीं सर्व भूतें कार्यें आहेत. हा जो या अग्नींत तेजोमय अमृतमय पुरुष व हा जो अध्यात्म वाङ्मय तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु आहे व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' इत्यादि प्रकृत असलेला आत्मा हाच तो होय. या चतुष्टयाच्या अधिष्ठानाचें ज्ञान हेंच अमृत, त्याचें अधिष्ठान हेंच ब्रह्म व ब्रह्मज्ञान हेंच सर्वप्राप्तीचें साधन आहे. ३.

अयं वायुः सर्वेषां भूतानां मध्वस्य वायोः सर्वाणि भूतानि
मधु यश्चायमस्मिन्वायौ तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चाय-
मध्यात्मं प्राणस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स
योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ४

अन्वयार्थ—हा वायु–शरीरस्थ प्राण सर्व भूतांचें मधु आहे. या वायूचीं सर्व भूतें मधु आहेत. हा जो या वायूमध्यें तेजोमय अमृतमय पुरुष व जो हा अध्यात्म तेजोमय अमृतमय प्राण (तोभूतांचें व सर्व भूतें यांचें मधु आहे.) 'योऽयमात्मा' या वाक्यांत प्रकृत असलेला हाच तो आत्मा होय. हें ज्ञान अमृत, हें ब्रह्म व हें ब्रह्मज्ञानच सर्व आहे. ४.

अयमादित्यः सर्वेषां भूतानां मध्वस्याऽऽदित्यस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्नादित्ये तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं चाक्षुषस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ५

अन्वयार्थ—हा आदित्य सर्व भूतांचें मधु आहे व सर्व भूतें या आदित्याचें मधु आहे. हा जो या आदित्यांत तेजोमय अमृतमय पुरुष आणि हा जो अध्यात्म चाक्षुष तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) 'योऽयमात्मा' या वाक्यानें प्रकृत असलेला जो आत्मा तोच हा. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे. ५.

इमा दिशः सर्वेषां भूतानां मध्वासां दिशाꣳ सर्वाणि भूतानि मधु यश्चायमासु दिक्षु तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मꣳ श्रौत्रः प्रातिश्रुत्कस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥६

अन्वयार्थ—या दिशा सर्व भूतांचें मधु आहे. या दिशांचें सर्व भूतें मधु आहे. या दिशांत जो हा तेजोमय अमृतमय पुरुष आणि जो हा अध्यात्म श्रोत्रगत प्रातिश्रुत्क (प्रतिश्रवणाचें वेळीं झालेला) तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु.) 'योऽयमात्मा' असा प्रकृत असलेला जो आत्मा तो हाच होय. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे. ६

अयं चन्द्रः सर्वेषां भूतानां मध्वस्य चंद्रस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिꣳश्चन्द्रे तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं मानसस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ७

अन्वयार्थ—हा चंद्र सर्व भूतांचें मधु आहे. सर्व भूतें या चंद्राचें मधु आहे. हा जो या चंद्रामध्यें तेजोमय अमृतमय पुरुष आणि हा जो अध्यात्म मानस तेजोमय अमृतमय पुरुष (त्याचीं सर्व भूतें हें मधु व हा सर्व भूतांचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' या वचनानें प्रकृत असलेला जो आत्मा तो हाच आहे. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे ७.

इयं विद्युत्सर्वेषां भूतानां मध्वस्यै विद्युतः सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्यां विद्युति तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं तैजसस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ८

अन्वयार्थ—ही विद्युत सर्व भूतांचें मधु, सर्व भूतें या विद्युत्-चें मधु. हा जो या विद्युत्-मध्यें तेजोमय अमृतमय पुरुष आणि हा जो अध्यात्म—त्वचागत तैजस तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' इत्यादि जो प्रकृत आत्मा तो हाच होय. हें ज्ञान अमृत—मोक्षसाधन आहे. हेंच ब्रह्म आहे व हें ब्रह्म-ज्ञानच सर्वप्राप्तीचें साधन आह ८.

अयं स्तनयित्नुः सर्वेषां भूतानां मध्वस्य स्तनयित्नोः सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिꣳस्तनयित्नौ तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं शाब्दः सौवरस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदꣳब्रह्मेदꣳ सर्वम्

अन्वयार्थ—हा मेघ—पर्जन्य सर्व भूतांचें मधु; या पर्जन्याचें सर्व भूतें मधु. हा जो या मेघामध्यें तेजोमय अमृतमय पुरुष आणि हा जो अध्यात्म शाब्द सौवर तेजोमय अमृतमय पुरुष (त्याची सर्व भूतें मधु व तो सर्व भूतांचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' या वाक्यानें प्रकृत असलेला जो आत्मा तो हाच होय. हेंच ज्ञान अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे. ९.

अयमाकाशः सर्वेषां भूतानां मध्वस्याऽऽकाशस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्नाकाशे तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं हृद्याकाशस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदं सर्वम् ॥ १०

अन्वयार्थ—हा आकाश सर्व भूतांचें मधु; या आकाशाचें सर्व भूतें मधु आहे. हा जो या आकाशांत तेजोमय अमृतमय पुरुष आणि जो हा अध्यात्म हृदयस्थ आकाश तेजोमय, अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु आणि भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' या वचनांत प्रकृत असलेला जो आत्मा तोच हा. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व १०—उपकार करणारे कार्यकरण-संघातरूप—शरीरेंद्रियसमूहरूप पृथिव्यादि-आकाशान्त भूतगण व देवतागण प्रत्येक शरीरवान् आत्म्याप्रत मधु होतात हें सांगितल. आतां ते उभयविधगण ज्याच्याकडून प्रेरित होत्साते शरीरी आत्म्याशीं संबद्ध होऊन मधुत्वानें—कार्य-त्वानें उपकार करितात तें सांगावें म्हणून हें आरंभिलें जातें—

अयं धर्मः सर्वेषां भूतानां मध्वस्य धर्मस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्धर्मे तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मं धार्मस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳ सर्वम् ॥ ११

अन्वयार्थ—हा धर्म सर्व भूतांचें मधु, सर्व भूतें या धर्माचें मधु, जो हा या धर्मामध्यें तेजोमय अमृतमय पुरुष आणि जो हा अध्यात्म धार्म, तेजोमय, अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु) 'जो हा आत्मा' म्हणून प्रकृत असलेला आत्मा तोच हा होय. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे.११.

इदꣳसत्यꣳसर्वेषां भूतानां मध्वस्य सत्यस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्त्सत्ये तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमध्यात्मꣳसात्यस्तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳसर्वम् १२

अन्वयार्थ—हें सत्य—आचाररूप धर्म सर्व भूतांचें मधु आहे. या सत्याचें सर्व भूतें मधु आहे. हा जो या सत्यांत तेजोमय, अमृतमय पुरुष व जो हा अध्यात्म सात्य, तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' इत्यादि वाक्यांतील प्रकृत जो आत्मा तो हाच होय. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे. १२.

इदं मानुषꣳसर्वेषां भूतानां मध्वस्य मानुषस्य सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्मानुषे तेजोमयोऽमृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳसर्वम् ॥ १३

अन्वयार्थ—हें मानुष–मनुष्यजाति सर्व भूतांचें मधु, या मानुषाचें सर्व भूतें मधु. हा जो या मानुषांत तेजोमय, अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' यांतील जो प्रकृत आत्मा तो हाच होय. हेंच अमृत, हेंच ब्रह्म व हेंच सर्व आहे. १३

अयमात्मा सर्वेषां भूतानां मध्वस्याऽऽत्मनः सर्वाणि भूतानि मधु यश्चायमस्मिन्नात्मनि तेजोमयोऽमृतमयः पुरुषो यश्चायमात्मा तेजोमयो मृतमयः पुरुषोऽयमेव स योऽयमात्मेदममृतमिदं ब्रह्मेदꣳसर्वम् ॥

अन्वयार्थ—हा आत्मा–मानुषादि जातिविशिष्ट शरीरेंद्रियसंघात सर्व भूतांचें मधु. या आत्म्याचें सर्व भूतें मधु. हा जो या आत्म्यामध्यें तेजोमय, अमृतमय पुरुष आणि हा जो आत्मा तेजोमय अमृतमय पुरुष (तो सर्व भूतांचें मधु व सर्व भूतें त्याचें मधु आहे.) ' योऽयमात्मा ' येथील जो प्रकृत आत्मा तो हाच होय. हें अमृत, हें ब्रह्म व हें सर्व आहे. १४

स वा अयमात्मा सर्वेषां भूतानामधिपतिः सर्वेषां भूतानाꣳ राजा तद्यथा रथनाभौ च रथनेमौ चाराः सर्वे समर्पिता एवमेवास्मिन्नात्मनि सर्वाणि भूतानि सर्वे देवाः सर्वे लोकाः सर्वे प्राणाः सर्व एत आत्मानः समर्पिताः ॥ १५

अन्वयार्थ—[सः वै अयं आत्मा–] पर आत्म्याशी तादात्म्य पावलेला जो विद्वान् तोच हा आत्मा [सर्वेषां भूतानां अधिपतिः०–] सर्व भूतांचा अधिपति, सर्व भूतांचा राजा आहे. [तत् यथा रथनाभौ च रथनेमौ च सर्वे अराः समर्पिताः–] याविषयीं दृष्टान्त–ज्याप्रमाणें रथाच्या नाभीमध्यें व रथाच्या नेमीमध्यें सर्व अर समर्पिलेले असतात [एवं एव अस्मिन् आत्मनि सर्वाणि भूतानि०–] त्याप्रमाणेंच या आत्म्यामध्यें सर्व भूतें, सर्व देव, सर्व लोक, सर्व प्राण व हे सर्व आत्मे समर्पित आहेत याचा भाष्यार्थ पहा. १५ –मैत्रेयीनें भर्त्याला जिच्याविषयीं प्रश्न केला होता ती अमृतत्वाचें साधन–ब्रह्मविद्या परिसमाप्त झाली. या ब्रह्मविद्येच्या स्तुतीकरितां ही प्रवर्ग्यप्रकरणस्थ आख्यायिका ' इदं वै तन्मधु ' या ब्राह्मणानें आणिली आहे. त्या आख्यायिकेचा अर्थ संक्षेपतः प्रकाशित करण्यासाठीं हे पुढील दोन मंत्र आहेत. ते सांगतात–

इदं वै तन्मधु दध्यङ्ङाथर्वणोऽश्विभ्यामुवाच । तदे-
तदृषिः पश्यन्नवोचत् । तद्वां नराः सनये दꣳस उग्रमा-
विष्कृणोमि तन्यतुर्न वृष्टिम् । दध्यङ् ह यन्मध्वाथ-
र्वणो वामश्वस्य शीर्ष्णा प्र यदीमुवाचेति ॥ १६

अन्वयार्थ—[इदं वै तत् मधु दध्यङ् आथर्वणः अश्विभ्यां उवाच–] हेंच तें मधु दध्यङ् आथर्वण अश्विनीकुमारांना सांगता झाला. [तत् एतत् पश्यन् ऋषिः अवोचत–] तें हें पहाणारा ऋषि–मंत्र म्हणाला–[हे नराः वां सनये तत् उग्रं दंसः अविष्कृणोमि–आविष्करोमि–] " हे नराकृति अश्विनीकुमारहो, तुम्हां दोघांचें तें लाभासाठी केलेलें उग्र दंसनामक कर्म मी प्रकट करतों. [तन्यतुः न वृष्टिम्–] पर्जन्य जसा वृष्टीला प्रकट करतो त्याप्रमाणें. [दध्यङ् आथर्वणः यत् मधु वां–] दध्यङ् आथर्वण जें मधु तुम्हां दोघांना [अश्वस्य शीर्ष्णा प्र-उवाच–] अश्वाच्या मस्तकानें सांगता झाला, तें मी प्रकट करतों. " (जें कक्ष्य ज्ञानाख्य मधु तें आथर्वण तुम्हां दोघांना अश्वाच्या मस्तकानें सांगता झाला. तो तुम्हांला जें मधु सांगता झाला तें मी आविष्कृत करतों, असा या उत्तरार्धाचा पूर्वार्धाशीं संबंध.) १६.

इदं वै तन्मधु दध्यङ्ङाथर्वणोऽश्विभ्यामुवाच । तदेतदृषिः पश्य-
न्नवोचत् । आथर्वणायाश्विना दधीचेऽश्व्यꣳ शिरः प्रत्यैरयतम् ।
स वां मधु प्रवोचदृतायन्त्वाष्ट्रं यद्दस्रावपि कक्ष्यं वामिति १७

अन्वयार्थ—[इदं वै तत् मधु०–] हेंच तें मधु दध्यङ् आथर्वण अश्विनीकुमारांस सांगता झाला. [तत् एतत् पश्यन् ऋषिः अवोचत्–] तें हें पाहणारा ऋषि म्हणाला–[अश्विना दधीचे आथर्वणाय अश्व्यं शिरः प्रत्यैरयतं–] " अहो अश्विनीकुमारहो, तुम्ही आथर्वण दधीचीला अश्वाचें शिर जोडते झालां. [ऋतायन् सः वां त्वाष्ट्रं मधु प्रवोचत्–] तेव्हां सत्याचें पालन करणारा तो तुम्हां दोघांस त्वाष्ट्र मधु सांगता झाला. [दस्रौ यत् कक्ष्यं तत् अपि वां प्रवोचत् इति–] अहो दस्रहो, जें कक्ष्य–रहस्यभूत विज्ञान तेंहि तो तुम्हांस सांगता झाला. " १७.–तें मधु काय आहे, तें सांगितलें जातें—

इदं वै तन्मधु दध्यङ्ङाथर्वणोऽश्विभ्यामुवाच । तदेतदृषिः
पश्यन्नवोचत् । पुरश्चक्रे द्विपदः परश्चक्रे चतुष्पदः । पुरः

स पक्षी भूत्वा पुरः पुरुष आविशदिति । स वा अयं पुरुषः सर्वासु पूर्षु पुरिशयो नैनेन किंचनानावृतं नैनेन किंचनासंवृतम् १८

अन्वयार्थ—[इदं वै०—] हें तें मधु दध्यङ् आथर्वण अश्विनीकुमारांस सांगता झाला. तें हें मधु पाहणारा ऋषि ह्मणाला—[द्विपदः पुरः चक्रे—] "परमेश्वर द्विपद—मनुष्य-पक्षि-शरीरें करता झाला व [चतुष्पदः पुरः चक्रे—] चतुष्पद शरीरें करता झाला. [पुरः स पक्षी भूत्वा—] अगोदर तो ईश्वर पक्षी—लिंगशरीर होऊन [पुरः पुरुषः आविशत्—] शरीरांत पुरुष प्रविष्ट झाला. [सः वै अयं पुरुषः सर्वासु पूर्षु पुरिशयः—] तोच हा पुरुष—सर्व शरीरांत पुरिशय—शरीरांत शयन करणारा आहे. [अनेन अनावृतं किंचन न—] यानें आच्छादित न केलेलें असें कांहीं नाही व [अनेन असंवृतं किंचन न—] यानें आंत प्रवेश न केलेलें असें कांहीं नाहीं." (बृ. ब्र. पृ. २८७ पहा. हा मंत्र संक्षेपतः आत्मैकत्व सांगतो.) १८.

इदं वै तन्मधु दध्यङ्ङाथर्वणोऽश्विभ्यामुवाच । तदेतदृषिः पश्यन्नवोचत् । रूपं रूपं प्रतिरूपो बभूव तदस्य रूपं प्रतिचक्षणाय । इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते युक्ता ह्यस्य हरयः शता दशेति । अयं वै हरयोऽयं वै दश च सहस्राणि बहूनि चानन्तानि च तदेतद्ब्रह्मापूर्वमनपरमनन्तरमबाह्यमयमात्मा ब्रह्म सर्वानुभूरित्यनुशासनम् ॥१९

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयाध्यायस्य पञ्चमं ब्राह्मणम् ॥५

अन्वयार्थ—[इद वै०—] हेंच तें मधु दध्यङ् आथर्वण अश्विनीकुमारांस सांगता झाला. [तत् एतत्०—] तें हें पाहणारा ऋषि—मंत्र ह्मणाला—[रूपं रूपं प्रतिरूपः बभूव—] "तो प्रत्येक रूपासारख्या दुसऱ्या रूपाचा झाला, अथवा प्रत्येक रूपाप्रमाणें झाला. [अस्य तत् रूपं प्रतिचक्षणाय—] या आत्म्याचें तें रूप प्रकट करण्याकरितां तो प्रतिरूप झाला. [इंद्रः मायाभिः पुरुरूपः ईयते—] परमेश्वर मायांच्या योगानें बहुरूप भासतो. [अस्य शता दश इति हरयः युक्ताः—] रथाला जसे घोडे त्याप्रमाणें याला जोडलेले हरि—इंद्रियें शंभर व दहा आहेत. [अयं वै हरयः—] हाच तीं इंद्रियें, [अयं वै दश च सहस्राणि०—] हाच दहा, सहस्र, बहु व अनन्त आहे. [तत् एतत् ब्रह्म अपूर्वं

अनपरं अनन्तरं अबाह्यं–] तेंच हें ब्रह्म, अपूर्व–कारणरहित, कार्यरहित, अनन्तर, अबाह्य आहे. [ब्रह्म अयं आत्मा–] तेंच ब्रह्म हा आत्मा. [सर्वानुभूः–] सर्वांचा सर्व रूपानें अनुभव घेणारा. [इति अनुशासनं–] हें सर्व वेदान्तांचें अनुशासन आहे." (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. ११ पहा.) १९. (५). –परिसमाप्त झालेल्या ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठीं श्रुति तिचा वंश–संप्रदाय सांगते–

अथ वꣳशः पौतिमाष्यो गौपवनाद्गौपवनः पौतिमाष्यात् पौतिमाष्यो गौपवनाद्गौपवनः कौशिकात्कौशिकः कौण्डिन्यात्कौण्डिन्यः शाण्डिल्याच्छाण्डिल्यः कौशिकाच्च गौतमाच्च गौतमः ॥ १

अन्वयार्थ—आतां या मधुकाण्डाचा वंश–गौपवनापासून पौतिमाष्य, पौतिमाष्यापासून गौपवन, गौपवनापासून पौतिमाष्य, कौशिकापासून गौपवन, कौंडिन्यापासून कौशिक, शांडिल्यापासून कौंडिन्य, कौशिकापासून व गौतमापासून शांडिल्य, 'गौतम-'शब्दाचा संबंध पुढील शब्दाशी आहे. १.

आग्निवेश्यादाग्निवेश्यः शाण्डिल्याच्चानभिम्लाताच्चानभिम्लात आनभिम्लातादानभिम्लात आनभिम्लातादानभिम्लातो गौतमाद्गौतमः सैतवप्राचीनयोग्याभ्याꣳ सैतवप्राचीनयोग्यौ पाराशर्यात्पाराशर्यो भारद्वाजाद्भारद्वाजो भारद्वाजाच्च गौतमाच्च गौतमो भारद्वाजाद्भारद्वाजः पाराशर्यात्पाराशर्यो बैजवापायनाद्बैजवापायनः कौशिकायनेः कौशिकायनिः ॥

अन्वयार्थ—आग्निवेश्यापासून गौतम, शाडिल्यापासून व आनभिम्लातापासून आग्निवेश्य, आनभिम्लातापासून आनभिम्लात (२), गौतमापासून आनभिम्लात, सैतव-प्राचीनयोग्यापासून गौतम, पाराशर्यापासून सैतव-प्राचीनयोग्य, भारद्वाजापासून पाराशर्य, गौतम व भारद्वाज यांपासून भारद्वाज, भारद्वाजापासून गौतम, पाराशर्यापासून भारद्वाज, बैजवापायनापासून पाराशर्य, कौशिकायनीपासून बैजवापायन, कौशिकायनि (याचा संबंध पुढें–)

घृतकौशिकाद्घृतकौशिकः पाराशर्यायणात्पाराशर्यायणः पाराशर्यात्पाराशर्यो जातूकर्ण्याज्जातूकर्ण्य आसुरायणाच्च यास्काच्चासुरायणस्त्रैवणेस्त्रैवणिरौपजन्धनेरौपजन्धनिरासुरेरासुरिर्भारद्वाजाद्भारद्वाज आत्रेयादात्रेयो माण्टेर्माण्टिर्गौ-

तमाद्गौतमो गौतमाद्गौतमो वात्स्याद्वात्स्यः शाण्डिल्याच्छाण्डिल्यः कैशोर्यात्काप्यात्कैशोर्यः काप्यः कुमारहारितात्कुमारहारितो गालवाद्गालवो विदर्भीकौण्डिन्याद्विदर्भीकौण्डिन्यो वत्सनपातो बाभ्रवाद्वत्सनपाद्बाभ्रवः पथः सौभरात्पन्थाः सौभरोऽयास्यादाङ्गिरसादयास्य आङ्गिरस आभूतेस्त्वाष्ट्रादाभूतिस्त्वाष्ट्रो विश्वरूपात्त्वाष्ट्राद्विश्वरूपस्त्वाष्ट्रोऽश्विभ्यामश्विनौ दधीच आथर्वणाद्दध्यङ्ङाथर्वणोऽथर्वणो दैवादथर्वा दैवो मृत्योःप्राध्वꣳसनान्मृत्युःप्राध्वꣳसनःप्रध्वꣳसनात्प्रध्वꣳसन एकर्षेरेकर्षिर्विप्रचित्तेर्विप्रचित्तिर्व्यष्टेर्व्यष्टिःसनारोःसनारुः सनातनात्सनातनः सनगात्सनगःपरमेष्ठिनःपरमेष्ठी ब्रह्मणो ब्रह्म स्वयंभु ब्रह्मणे नमः ॥३

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयाध्यायस्य षष्ठं ब्राह्मणम् ॥ ६

अन्वयार्थ—घृतकौशिकापासून कौशिकायनि, पाराशर्यायणापासून घृतकौशिक, पाराशर्यापासून पाराशर्यायण, जातूकर्ण्यापासून पाराशर्य, आसुरायणापासून व यास्कापासून जातूकर्ण्य, त्रैवणीपासून आसुरायण, औपजन्धनीपासून त्रैवणि, आसुरीपासून औपजन्धनि, भारद्वाजापासून आसुरि, आत्रेयापासून भारद्वाज, माण्टीपासून आत्रेय, गौतमापासून माण्टि, वात्स्यापासून गौतम, गौतमापासून गौतम, वात्स्यापासून गौतम, शाण्डिल्यापासून वात्स्य, काप्य-कैशोर्यापासून शाण्डिल्य, कुमारहारितापासून कैशोर्य काप्य, गालवापासून कुमारहारित, विदर्भी कौण्डिन्यापासून गालव, वत्सनपात् बाभ्रवापासून विदर्भी कौण्डिन्य, पन्थ सौभरापासून वत्सनपाद्बाभ्रव, अयास्य आंगिरसापासून पन्थ सौभर, त्वाष्ट्र आभूतीपासून अयास्य आंगिरस, विश्वरूप त्वाष्ट्रापासून त्वाष्ट्र आभूति, अश्वीपासून विश्वरूप त्वाष्ट्र, दधीच आथर्वणापासून अश्विनीकुमार, अथर्वा दैवापासून दध्यङ् आथर्वण, प्राध्वंसन मृत्यूपासून अथर्वादैव, प्रध्वंसनापासून प्रध्वंसन मृत्यु, एकर्षीपासून प्रध्वंसन, विप्रचित्तीपासून एकर्षि, व्यष्टीपासून विप्रचित्ति, सनारूपासून व्यष्टि, सनातनापासून सनारु, सनगापासून सनातन, परमेष्ठीपासून सनग, हिरण्यगर्भापासून परमेष्ठी, हिरण्यगर्भाख्य ब्रह्म स्वयंभु आहे. ब्रह्माला नमस्कार असो. ३ (६)

इति बृहदारण्यकोपनिषदि द्वितीयोऽध्यायः ॥ २

अथ तृतीयोऽध्यायः ।

पूर्वोक्त आगमार्थांचेंच परीक्षापूर्वक निर्धारण करण्यासाठीं उपपत्तिप्रधान याज्ञवल्क्यीय कांड आरंभिलें जातें. त्यांत आरंभीं विद्याप्राप्तीचा उपाय प्रदर्शित करण्यासाठीं आख्यायिका सांगितली जात आहे—

ॐ जनको ह वैदेहो बहुदक्षिणेन यज्ञेनेजे तत्र ह कुरु-पञ्चालानां ब्राह्मणा अभिसमेता बभूवुस्तस्य ह जनकस्य वैदेहस्य विजिज्ञासा बभूव कःस्विदेषां ब्राह्मणानामनूचा-नतम इति स ह गवाꣳ सहस्रमवरुरोध दश दश पादा एकैकस्याः शृङ्गयोराबद्धा बभूवुः ॥ १

अन्वयार्थ—[वैदेहः ह जनकः—] विदेहदेशांत झालेला जनक [बहु-दक्षिणेन यज्ञेन ईजे—] बहु दक्षिणायुक्त यज्ञानें यजन करता झाला. [तत्र ह कुरुपंचालानां ब्राह्मणाः अभिसमेताः बभूवुः—] त्या यज्ञांत कुरुदेशांतील व पंचालदेशांतील ब्राह्मण एकत्र जमले. [तस्य ह वैदेहस्य जनकस्य—] तेव्हां त्यांना पाहून त्या वैदेह जनकाला [एषां ब्राह्मणानां कः स्वित् अनूचानतमः इति विजिज्ञासा बभूव—] या ब्राह्मणांतील अनुप्रवचन करण्यास अतिशय समर्थ असा कोण बरें आहे, हें विशेषेंकरून जाणण्याची इच्छा झाली. [सः ह गवां सहस्रं अवरुरोध—] त्यानें गोठ्यांत एक सहस्र गायी अवरुद्ध केल्या. [एकैकस्याः शृंगयोः दश दश पादाः आबद्धाः बभूवुः—] एकेका गायीच्या दोन्ही शिंगांना मिळून दहा दहा सुवर्णाचे पाद बांधलेले होते. १.

तान्होवाच ब्राह्मणा भगवन्तो यो वो ब्रह्मिष्ठः स एता गा उदजतामिति । ते ह ब्राह्मणा न दधृषुरथ ह याज्ञवल्क्यः स्वमेव ब्रह्मचारिणमुवाचैताः सोम्योदज सामश्रवा ३ इति ता होदाचकार ते ह ब्राह्मणाश्चुक्रुधुः कथं नो ब्रह्मिष्ठो ब्रुवीतेत्यथ ह जनकस्य वैदेहस्य होताऽश्वलो बभूव स हैनं पप्रच्छ त्वं नु खलु नो याज्ञवल्क्य ब्रह्मिष्ठोऽसी ३

इति स होवाच नमो वयं ब्रह्मिष्ठाय कुर्मो गोकामा एव वयꣳ स्म इति तꣳह तत एव प्रष्टुं दध्रे होताऽश्वलः ॥ २

अन्वयार्थ—[तान् ह उवाच—] नंतर जनक त्या ब्राह्मणांस म्हणाला—[भगवन्तः ब्राह्मणाः—] " अहो पूज्य ब्राह्मणहो, [वः यः ब्रह्मिष्ठः सः एताः गाः उदजतां इति—] तुम्हांपैकीं जो ब्रह्मिष्ठ असेल तो या गायींना स्वगृहाकडे नेवो. " [ते ह ब्राह्मणाः न दधृषुः—] पण ते ब्राह्मण त्यांना नेण्यास धजले नाहींत. [अथ ह याज्ञवल्क्यः स्वं एव ब्रह्मचारिणं उवाच—] तेव्हां याज्ञवल्क्य आपल्याच विद्यार्थ्याला म्हणाला—[सोम्य सामश्रवः एताः उदज इति—] " हे प्रियदर्शना सामश्रवा ! यांना तूं माझ्या घरीं ने. " तेव्हां [ताः ह उदाचकार—] त्यानें त्यांना याज्ञवल्क्याच्या घरीं नेलें. तें पाहून [ते ह ब्राह्मणाः नः ब्रह्मिष्ठः कथं ब्रुवीत इति चुक्रुधुः—] ते ब्राह्मण ' हा आम्हांमध्यें आपल्याला ब्रह्मिष्ठ कसें म्हणतो ' असें म्हणून क्रुद्ध झाले. [अथ ह वैदेहस्य जनकस्य होता अश्वलः बभूव—] वैदेह जनकाचा होता—हवन करणारा—ऋत्विज अश्वल म्हणून होता. [सः ह एनं पप्रच्छ—] तो त्याला विचारूं लागला—[याज्ञवल्क्य त्वं नु खलु नः ब्रह्मिष्ठः असि इति—] " याज्ञवल्क्या, तूंच एक कायतो आम्हांमध्यें ब्रह्मिष्ठ आहेस होय ? " तेव्हां [सः ह उवाच—] याज्ञवल्क्य म्हणाला—[वयं ब्रह्मिष्ठाय नमः कुर्मः—] " आम्ही ब्रह्मिष्ठाला नमस्कार करतों. [वयं गोकामाः एव स्मः इति—] कारण आम्ही गोकामच—गायींची इच्छा करणारेच आहों. " [ततः एव होता अश्वलः तं ह प्रष्टुं दध्रे—] त्यामुळें होता अश्वल त्याला प्रश्न करण्याचा मनांत निश्चय करता झाला. २.

याज्ञवल्क्येति होवाच यदिदꣳसर्वं मृत्युनाऽऽप्तꣳसर्वं मृत्युनाऽभिपन्नं केन यजमानो मृत्योरासिमतिमुच्यत इति होत्रर्त्विजाऽग्निना वाचा वाग्वै यज्ञस्य होता तद्येयं वाक्सोऽयमग्निः स होता स मुक्तिः साऽतिमुक्तिः ॥ ३

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्य इति ह उवाच—] अश्वल म्हणाला—" हे याज्ञवल्क्या, [यत् इदं सर्वं मृत्युना आप्तं—] हें जें सर्व या कर्माचें साधन मृत्यूनें व्यापलें आहे, [सर्वं मृत्युना अभिपन्नं—] सर्व मृत्यूनें स्ववश केलें आहे [मृत्योः आप्तिं यजमानः केन अतिमुच्यते इति—] त्या मृत्यूच्या व्याप्तीचें अतिक्रमण करून

यजमान कोणत्या साधनानें मुक्त होतो–स्वतंत्र होतो ? " याज्ञवल्क्य म्हणतो– [होत्रा-ऋत्विजा अग्निना वाचा–] " होता–ऋत्विग्, अग्नि, वाक् यांच्या योगानें यजमान मृत्यूच्या व्याप्तीचें अतिक्रमण करतो. [वाक् वै यज्ञस्य होता–] यजमानाची वाक् हाच होता; [तत् या इयं वाक् सः अयं अग्निः–] त्यांत ही जी यजमानाची वाक् तोच हा प्रसिद्ध अग्नि; [सः होता०–] तोच होता, तीच मुक्ति व तीच अतिमुक्ति " (पूर्वी व्याख्यान केलेल्या मधुकांडांत जें उद्गीथ-प्रकरण आहे, त्यांत दर्शनसहित–दर्शनसमुच्चित–पांक्त कर्मानें यजमानाचें मृत्यु-अतिक्रमण–आसंग पाप्मरूप मृत्यूचा अत्यय संक्षेपतः सांगितला. त्या उद्गीथदर्शनाचाच हा प्रश्नप्रतिवचनरूप ग्रंथ परीक्षाविषय–विचारभूमि आहे. यास्तव त्यांतील दर्शनविशेषाकरितां हा विस्तार आरंभिला आहे) ३.–स्वाभाविक अज्ञानासक्तिप्रयुक्त कर्मलक्षणमृत्यूपासून यजमानाची मुक्ति सांगितली. आतां त्या कर्माच्या म्ह० आसंगसहित मृत्यूच्या आश्रयभूत दर्श-पूर्णमासादि कर्मसाधनांच्या विपरिणामाचा हेतु जो काल त्यापासून पृथक् अतिमुक्ति सांगावी म्हणून पुढील कंडिका आरंभिली जाते—

याज्ञवल्क्येति होवाच यदिदꣳ सर्वमहोरात्राभ्यामाप्तꣳ सर्वमहोरात्राभ्यामभिपन्नं केन यजमानोऽहोरात्रयोरातिमतिमुच्यत इत्यध्वर्युणर्त्विजा चक्षुषाऽऽदित्येन चक्षुर्वै यज्ञस्याध्वर्युस्तद्यदिदं चक्षुः सोऽसावादित्यः सोऽध्वर्युः स मुक्तिः साऽतिमुक्तिः॥

अन्वयार्थ—अथेल पुनः ह्मणाला–" हे याज्ञवल्क्या, [यत् इदं सर्वं अहोरात्राभ्यां आप्तं–] हें जे सर्व अहोरात्रांनीं व्यापलें आहे, [सर्वं अहोरात्राभ्यां अभिपन्नं–] सर्व अहोरात्रांनीं वश केलें आहे, [अहोरात्रयोः आप्तिं यजमानः केन अतिमुच्यते इति–] त्या अहोरात्रांच्या व्याप्तीला उल्लंघून यजमान कोणत्या साधनानें मुक्त होतो. " त्यावर याज्ञवल्क्य म्हणतो–[अध्वर्युणा ऋत्विजा–] " अध्वर्यु ऋत्विजानें, [चक्षुषा आदित्येन–] चक्षूनें, आदित्यानें अतिमुक्त होतो. [यज्ञस्य चक्षुः वै अध्वर्युः–] यजमानाचा चक्षूच अध्वर्यु आहे. [यत् इदं चक्षुः असौ आदित्यः०–] हें जें चक्षु तोच आदित्य, तो अध्वर्यु, तो मुक्ति व तीच अतिमुक्ति. " ४.–आतां तिथ्यादिरूप कालापासून अतिमुक्ति सांगितली जाते—

**याज्ञवल्क्येति होवाच यदिद॰ सर्वं पूर्वपक्षापरपक्षाभ्या-
माप्त॰ सर्वं पूर्वपक्षापरपक्षाभ्यामभिपन्नं केन यजमानः
पूर्वपक्षापरपक्षयोरातिमतिमुच्यत इत्युद्गात्रर्त्विजा वायुना
प्राणेन प्राणो वै यज्ञस्योद्गाता तद्योऽयं प्राणः स
वायुः स उद्गाता स मुक्तिः साऽतिमुक्तिः ॥ ५**

अन्वयार्थ—अश्वल म्हणाला—" हे याज्ञवल्क्या, [यत् इदं सर्वं पूर्व-पक्ष-अपरपक्षाभ्यां आप्तं०—] हें जें सर्व पूर्वपक्ष व अपरपक्ष यांनीं व्याप्त व सर्व पूर्वपक्ष-अपरपक्षांनीं वशीकृत केलेलें आहे [पूर्वपक्ष०—] त्या पूर्वपक्ष-अपरपक्षांच्या व्याप्तीला उल्लघून [यजमानः केन अतिमुच्यते—] यजमान कोणत्या साधनानें मुक्त होतो. " त्यावर याज्ञवल्क्य म्हणाले—[उद्गात्रा०—] "उद्गाता या ऋत्विजानें, वायूनें, प्राणानें. [यज्ञस्य प्राणः वै उद्गाता—] यजमानाचा प्राणच उद्गाता आहे. [तत् यः अयं०—] हा जो प्राण तो वायु, तो उद्गाता, ती मुक्ति व ती अतिमुक्ति आहे." ५—यजमानाची मृत्यूपासून—कालापासून अति-मुक्ति सांगितली. पण तो अतिमुक्त होणारा यजमान कोणत्या आश्रयानें परि-च्छेदाचा विषय असा जो मृत्यु त्याचें अतिक्रमण करून फलास प्राप्त होतो —अतिमुक्त होतो, तें सांगितलें जातें—

**याज्ञवल्क्येति होवाच यदिदमन्तरिक्षमनारम्बणमिव केनाऽऽ-
क्रमेण यजमानः स्वर्गं लोकमाक्रमत इति ब्रह्मणर्त्विजा मनसा
चन्द्रेण मनो वै यज्ञस्य ब्रह्मा तद्यदिदं मनः सोऽसौ चन्द्रः स
ब्रह्मा स मुक्तिः साऽतिमुक्तिरित्यतिमोक्षा अथ संपदः ॥ ६**

अन्वयार्थ—अश्वल म्हणतो—" हे याज्ञवल्क्या, हें जें अन्तरिक्ष [अना-रंबणं इव—] जणुंकाय आलंबनरहितसें आहे, यजमान कोणत्या आक्रमानें त्या स्वर्गलोकाचें आक्रमण करतो ? " याज्ञवल्क्य म्हणतो—" ब्रह्मा—ऋत्विज, मन, चन्द्र यांच्या योगानें तो स्वर्गाला प्राप्त होतो. यजमानाचा मन हाच ब्रह्मा आहे. त्यांतील हें जें अध्यात्म मन तोच चन्द्रमा, तो ब्रह्मा, ती मुक्ति, ती अतिमुक्ति. [इति अतिमोक्षाः—] याप्रमाणें मृत्यूपासून अतिमोक्ष होतात. [अथ संपदः—] आतां संपत्ती सांगितल्या जातात. " ६

याज्ञवल्क्येति होवाच कतिभिरयमद्यर्ग्भिर्होताऽस्मिन्यज्ञे करिष्यतीति तिसृभिरिति कतमास्तास्तिस्र इति पुरोनुवाक्या च याज्या च शस्यैव तृतीया किं ताभिर्जयतीति यत्किंचेदं प्राणभृदिति ॥ ७

अन्वयार्थ—'हे याज्ञवल्क्या' असें तो म्हणाला. प्रश्न—[अयं होता अस्मिन् यज्ञे कतिभिः ऋग्भिः अद्य करिष्यति इति—] 'हा होता या यज्ञांत आज किती ऋचांनीं शस्त्रशंसन करील ?' उत्तर—[तिसृभिः इति—] 'तीन ऋचांनीं.' प्रश्न—[कतमाः ताः तिस्रः इति—] 'त्या तीन ऋचा कोण या ?' उत्तर—[पुरोनुवाक्या च याज्या च शस्या एव तृतीया—] 'पुरोनुवाक्या, याज्या व तिसरी शस्या.' प्रश्न—[ताभिः किं जयति इति—] 'यजमान त्यांच्या योगानें काय जिंकतो ?' उत्तर—[यत् किंच इदं प्राणभृत् इति—] 'हें जेवढें प्राणभृज्जात आहे तें सर्व. म्हणजे लोकत्रय जिंकतो.' ७.

याज्ञवल्क्येति होवाच कत्ययमद्याध्वर्युरस्मिन्यज्ञ आहुतीर्होष्यतीति तिस्र इति कतमास्तास्तिस्र इति या हुता उज्ज्वलन्ति या हुता अतिनेदन्ते या हुता अधिशेरते किं ताभिर्जयतीति या हुता उज्ज्वलन्ति देवलोकमेव ताभिर्जयति दीप्यत इव हि देवलोको या हुता अतिनेदन्ते पितृलोकमेव ताभिर्जयत्यतीव हि पितृलोको या हुता अधिशेरते मनुष्यलोकमेव ताभिर्जयत्यध इव हि मनुष्यलोकः ॥८

अन्वयार्थ—अश्वल—'हे याज्ञवल्क्या' असें म्हणाला. [अद्य अयं अध्वर्युः अस्मिन् यज्ञे कति आहुतीः होष्यति इति—] 'आज हा अध्वर्यु या यज्ञांत किती आहुती होमील ?' उत्तर—[तिस्रः इति—] 'तीन.' प्र०—[कतमाः ताः तिस्रः—] 'कोणत्या त्या तीन ?' उत्तर—[याः हुताः उज्ज्वलन्ति—] 'ज्या होमिल्या असतां उज्ज्वल होतात, [याः हुताः अतिनेदन्ते—] ज्या होमिल्या असतां अतिशय शब्द करितात, [याः हुताः अधिशेरन्ते—] ज्या होमिल्या असतां भूमीवर जाऊन लीन होतात.' प्रश्न—[ताभिः किं जयति इति—] 'त्यांच्या योगानें यजमान काय जिंकतो ?' उत्तर—[याः हुताः०—] 'ज्या होमिल्या असतां उज्ज्वल होतात [ताभिः देवलोकं जयति—] त्यांच्या योगानें

देवलोकालाच जिंकतो. [हि देवलोकः दीप्यते इव–] कारण देवलोक जणुंकाय दीप्त होत असतो. [याः हुताः०–] ज्या आहुती होमिल्या असतां अतिशय शब्द करितात [ताभिः पितृलोकं०–] त्यांच्या योगानें पितृलोकालाच यजमान जिंकतो. कारण पितृलोक जणुंकाय यातना भोगणाऱ्या पाप्यांच्या द्वारा अतिशब्द करणाराच असतो. [याः हुताः०–] ज्या होमिल्या असतां भूमीवर लीन होतात त्यांच्या योगानें मनुष्यलोकासच जिंकतो. कारण मनुष्यलोक अधोभागींच असतो. ' ८.

याज्ञवल्क्येति होवाच कतिभिरयमद्य ब्रह्मा यज्ञं दक्षिणतो देवताभिर्गोपायतीत्येकयेति कतमा सैकेति मन एवेत्यनन्तं वै मनोऽनन्ता विश्वे देवा अनन्तमेव स तेन लोकं जयति ॥९

अन्वयार्थ—' याज्ञवल्क्या, ' असें अश्वल म्हणाला. प्रश्न–[अद्य अयं ब्रह्मा दक्षिणतः कतिभिः देवताभिः यज्ञं गोपायति इति–] ' आज हा ब्रह्मा दक्षिण दिशेंत आपल्या आसनावर बसून किती देवतांसह यज्ञाचें रक्षण करतो? ' उत्तर–[एकया इति–] ' एका देवतेसह. ' प्रश्न–[का सा इति–] ' ती एक देवता कोणती ? ' उत्तर–[मनः एव इति–] ' मन हीच ती एक देवता होय. [अनन्तं वै मनः–] मन अनन्त आहे. [विश्वेदेवाः अनन्ताः–] विश्वेदेवहि अनन्त आहेत. [सः तेन अनन्तं एव लोकं जयति–] यजमान त्या मनानें अनन्त लोकालाच जिंकतो. ' ९.

याज्ञवल्क्येति होवाच कत्ययमद्योद्गाताऽस्मिन्यज्ञे स्तोत्रियाः स्तोष्यतीति तिस्र इति कतमास्तास्तिस्र इति पुरोनुवाक्या च याज्या च शस्यैव तृतीया कतमास्ता या अध्यात्ममिति प्राण एव पुरोनुवाक्याऽपानो याज्या व्यानः शस्या किं ताभिर्जयतीति पृथिवीलोकमेव पुरोनुवाक्यया जयत्यन्तरिक्षलोकं याज्यया द्युलोकꣳ शस्यया ततो ह होताऽश्वल उपरराम ॥ १०

इति तृतीयाध्याये प्रथमं ब्राह्मणम् ॥ १

अन्वयार्थ—अश्वल म्हणाला–प्र०–' याज्ञवल्क्या, [अद्य अयं उद्गाता अस्मिन् यज्ञे कति स्तोत्रियाः स्तोष्यति इति–] आज हा उद्गाता या यज्ञांत

किती स्तोत्रिया स्तवील ?' उ०—[तिस्रः इति—] ' तीन. ' प्र०—[कतमाः ताः तिस्रः—] ' त्या तीन स्तोत्रिया कोणत्या ? ' उ०—[पुरोनुवाक्या०—] ' पुरोनुवाक्या, याज्या व तिसरी शस्या. ' प्र०—[कतमाः ताः याः अध्यात्मं इति—] ' त्या कोणत्या कीं, ज्या शरीरांतच होतात ?' उ०—[प्राणः एव०—] ' प्राण हीच पुरोनुवाक्या, अपान याज्या व व्यान शस्या. ' प्र०—[ताभिः किं जयति इति—] ' त्यांच्या योगानें काय जिंकतो ? ' उ०—[पुरोनुवाक्यया०—] ' पुरोनुवाक्येनें पृथिवीलोकासच जिंकतो, याज्येनें अन्तरिक्षलोकास, शस्येनें द्युलोकास; ' [ततः ह होता अश्वलः उपरराम—] त्यानंतर होता अश्वल मुकाट्यानें बसला. १०. (१)

—मुमुक्षूला साध्य-साधनरूप संसारापासून मुक्त करण्यासाठीं हेय बंधाचें ज्ञान करून देणें अवश्य आहे. म्हणून पुढील ब्राह्मणांत बंधरूप मृत्यूचें स्वरूप सांगितलें जातें—

अथ हैनं जारत्कारव आर्तभागः पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच कति ग्रहाः कत्यतिग्रहा इति । अष्टौ ग्रहा अष्टावतिग्रहा इति ये तेऽष्टौ गृहा अष्टावतिग्रहाः कतमे त इति ॥१

अन्वयार्थ—[अथ ह जारत्कारवः आर्तभागः एनं पप्रच्छ—] नंतर जारत्कारव आर्तभाग त्या याज्ञवल्क्याला विचारता झाला—तो म्हणाला—" हे याज्ञवल्क्या, [कति ग्रहाः कति अतिग्रहाः—] ग्रह किती आहेत ? व अतिग्रह किती आहेत?" [अष्टौ०—] " आठ ग्रह व आठ अतिग्रह आहेत. " असें याज्ञवल्क्य म्हणाला. पुनः जारत्कारव म्हणतो—[ये ते अष्टौ ग्रहाः०—] " ते जे आठ ग्रह व आठ अतिग्रह ते कोणते ? " सु. ब्र. पृ. २३४ पहा. १.

प्राणो वै ग्रहः सोऽपानेनातिग्राहेण गृहीतोऽपानेन हि गन्धाञ्जिघ्रति ॥ २

अन्वयार्थ—प्राण हा ग्रह आहे. [सः अपानेन०—] तो अपान या अतिग्रहानें गृहीत आहे. [हि अपानेन गंधान् जिघ्रति—] कारण प्राणी अपानानेंच गंधाचें अवघ्राण करतो. २

वाग्वै ग्रहः स नाम्नाऽतिग्राहेण गृहीतो वाचा हि नामान्यभिवदति ॥३

अन्वयार्थ—[वाक्०—] वाक् हा ग्रह आहे. [सः नाम्ना०—] तो नाम या अतिग्रहानें गृहीत आहे. [हि वाचा०—] वाक्-नेंच पुरुष नामांचा उच्चार

करतो, हें प्रसिद्ध आहे. (शब्दादि हा वाक्-च्या आसक्तीचा विषय आहे. ती असत्य, अनृत, असभ्य इत्यादि भाषणांत तत्पर असते. तिच्या योगानें लोक अपहृत होतात. म्हणून वाक् हा ग्रह आहे व वक्तव्य नाम अतिग्रह आहे. इतर ग्रहातिग्रहाविषयींहि अशींच उपपत्ति जाणावी.)३.

जिह्वा वै ग्रहः स रसेनातिग्राहेण गृहीतो जिह्वया हि रसान्विजानाति॥४

अन्वयार्थ—जिह्वा हाच ग्रह आहे. तो रस या अतिग्रहानें गृहीत आहे. प्राणी जिह्वेनेंच रसांना विशेषेंकरून जाणतो. ४.

चक्षुर्वै ग्रहः स रूपेणातिग्राहेण गृहीतश्चक्षुषा हि रूपाणि पश्यति ॥ ५

अन्वयार्थ—चक्षु हाच ग्रह आहे. तो रूप या अतिग्राहाकडून गृहीत आहे. प्राणी चक्षूनेंच रूपें पाहतो. ५.

श्रोत्रं वै ग्रहः स शब्देनातिग्राहेण गृहीतः श्रोत्रेण हि शब्दाञ्शृणोति ॥६

अन्वयार्थ—श्रोत्र हाच ग्रह आहे. तो शब्द या अतिग्राहाकडून गृहीत आहे. प्राणी श्रोत्रानेंच शब्दांना ऐकतो. ६

मनो वै ग्रहः स कामेनातिग्राहेण गृहीतो मनसा हि कामान्कामयते ॥ ७

अन्वयार्थ—मन हाच ग्रह आहे. तो काम या अतिग्राहाकडून गृहीत आहे. मनानेंच कामांची कामना करतो. ७

हस्तौ वै ग्रहः स कर्मणातिग्राहेण गृहीतो हस्ताभ्याꣳ हि कर्म करोति॥८

अन्वयार्थ—दोन हात हाच ग्रह आहे. तो कर्म या अतिग्राहाकडून गृहीत आहे. दोन्ही हातांनींच मनुष्य कर्म करतो. ८

त्वग्वै ग्रहः स स्पर्शेनातिग्राहेण गृहीतस्त्वचा हि
स्पर्शान्वेदयत इत्येतेऽष्टौ ग्रहा अष्टावतिग्रहाः॥ ९

अन्वयार्थ—त्वक् हाच ग्रह आहे. तो स्पर्श या अतिग्राहाकडून गृहीत आहे. त्वक्-नेंच प्राणी सर्व स्पर्शांना जाणतो. असे हे आठ ग्रह व आठ अतिग्रह आहेत. ९.—याप्रमाणें ग्रह व अतिग्रह यांचा उपसंहार केला असतां—

याज्ञवल्क्येति होवाच यदिदꣳ सर्वं मृत्योरन्नं का स्वित्सा देवता
यस्या मृत्युरन्नमित्यग्निर्वै मृत्युः सोऽपामन्नमप पुनर्मृत्युं जयति ॥१०

अन्वयार्थ—तो आर्तभाग ' हे याज्ञवल्क्या, ' अशी हाक मारून पुनः म्हणाला—[यत् इदं सर्वं मृत्योः अन्नं—] "हें जें सर्व वस्तुजात आहे तें मृत्यूचें

अन्न आहे. [का स्वित् सा देवता यस्याः मृत्युः अन्नं इति—] पण ती देवता कोणती बरें आहे कीं जिचें मृत्यु हें अन्न आहे?" त्यावर याज्ञवल्क्य सांगतात—[अग्निः वै मृत्युः—] "अग्नि हा मृत्यु आहे. [सः अपां अन्नं—] तो आपांचें—जलांचें—अन्न आहे. [पुनर्मृत्युं अपजयति—] ज्ञानानें पुनर्मृत्यूचा अपजय होतो." (शमादिपूर्वक श्रवणादिकांच्या योगानें ज्ञान होऊन ज्ञानानें साधक पुनर्मृत्यूला जिंकतो.) १०—सम्यग्ज्ञानानें पुनर्मृत्यूचा अपजय होतो, हें पूर्वोक्त फल विशद करण्यासाठीं दुसरा प्रश्न—

याज्ञवल्क्येति होवाच यत्रायं पुरुषो म्रियत उदस्मात्-
प्राणाः क्रामन्त्याहो ३ नेति। नेति होवाच याज्ञवल्क्यो ऽ-
त्रैव समवनीयन्ते स उच्छ्वयत्याध्मायत्याध्मातो मृतः शेते ॥ ११

अन्वयार्थ—' याज्ञवल्क्या, ' असें ह्मणून आर्तभाग असें बोलला—[यत्र अयं पुरुषः म्रियते—] "ज्यावेळीं हा पुरुष मरतो त्यावेळीं [अस्मात् प्राणाः उत्क्रामन्ति आहो न -] या ब्रह्मवेत्त्यापासून प्राण उत्क्रान्त होतात कीं नाहीं?" [न इति०—] त्यावर याज्ञवल्क्य ह्मणाला—"नाहीं [अत्र एव समवनीयन्ते—] ते या परब्रह्मामध्येंच एकरूप होऊन प्रलीन होतात. [सः उच्छ्वयति—] त्याचा देह फुगतो. [आध्मायति—] बाह्य वायूकडून भरला जातो व [आध्मातः मृतः शेते—] असा वायूनें भरलेला तो मृत होऊन पडतो." सु. ब्र. पृ. ४६३ पहा. ११—प्राण उत्क्रान्त होत नाहीत, याविषयींच आणखीं प्रश्न—

याज्ञवल्क्येति होवाच यत्रायं पुरुषो म्रियते
किमेनं न जहातीति नामेत्यनन्तं वै नामानन्ता विश्वे
देवा अनन्तमेव स तेन लोकं जयति ॥ १२

अन्वयार्थ—' याज्ञवल्क्या, ' असें म्हणून आर्तभाग बोलला—[यत्र अयं०—] "ज्यावेळी हा पुरुष मरतो त्यावेळी [एनं किं न जहाति इति—] त्याला काय सोडीत नाहीं?" त्यावर याज्ञवल्क्य म्हणतो—[नाम इति—] "नाम त्याला सोडीत नाहीं. [नाम अनन्तं वै—] नाम अनन्तच आहे. [अनन्ताः विश्वेदेवाः—] विश्वेदेव अनन्त आहेत. [तेन सः अनन्तं एव लोकं जयति—] या आनन्त्यदर्शनानें तो अनन्त लोकासच जिंकतो " १२.—ग्रहातिग्रहरूप मृत्युलक्षण बंध सांगितला—आणि मृत्यूचाहि मृत्यु असल्यामुळें मोक्षहि उपपन्न

होतो. प्रदीपनिर्वाणाप्रमाणें ग्रहातिग्रहांचा येथेंच प्रलय होणें, हाच मोक्ष आहे. यास्तव ग्रहातिग्रहाख्य मृत्यु व त्याचें निमित्त, यांच्या स्वरूपाचें निर्धारण करण्यासाठीं पुढील कंडिका—

याज्ञवल्क्येति होवाच य एष पुरुषस्य मृतस्याग्निं वाग-प्येति वातं प्राणश्चक्षुरादित्यं मनश्चन्द्रं दिशः श्रोत्रं पृथि-वीꣳ शरीरमाकाशमात्मौषधीर्लोमानि वनस्पतीन्केशा अप्सु लोहितं च रेतश्च निधीयते क्वायं तदा पुरुषो भवतीत्याहर सोम्य हस्तमार्तभागाऽऽवामेवैतस्य वेदिष्यावो न नावेतत्-सजन इति । तौ होत्क्रम्य मन्त्रयांचक्राते तौ ह यदूचतुः कर्म हैव तदूचतुरथ यत्प्रशशꣳसतुः कर्म हैव तत्प्रशशꣳ-सतुः पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति पापः पापे-नेति ततो ह जारत्कारव आर्तभाग उपरराम ॥ १३

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥२

अन्वयार्थ—आर्तभाग 'हे याज्ञवल्क्या,' असें संबोधून म्हणाला—[यत्र अस्य पुरुषस्य मृतस्य वाक् अग्निं अप्येति—] "ज्यावेळी या मेलेल्या अज्ञ पुरुषाची वाक् अग्नीमध्यें प्रलय पावते, [प्राणः वातं०—] प्राण वातांत, चक्षु आदित्यांत, मन चन्द्रांत, श्रोत्र दिशांमध्यें, शरीर पृथ्वीमध्यें, हृदयाकाश बाह्य भूताकाशांत, लोम ओषधींत, केंस वनस्पतींत, लोहित व रेत जलांमध्यें ठेवलें जातें, [तदा अयं पुरुषः क्व भवति—] त्यावेळीं हा पुरुष कोठें असतो ?" त्यावर याज्ञवल्क्य म्हणाले—"हे प्रियदर्शन आर्तभागा, [हस्तं आहर—] तुझा हात माझ्या हातांत दे. [आवां एव एतस्य वेदिष्यावः—] आपण दोघेच या प्रश्नाचें निरूपण करूं. [नौ एतत् सजने न इति—] आमचें हें ज्ञातव्य एवढ्या जनसमूहांत निर्णय करितां येण्यासारखें नाही (यास्तव एकांतांत चल.)" [तौ ह उत्क्रम्य मंत्रयांचक्राते—] नंतर ते दोघे एकान्तांत निघून जाऊन विचार करते झाले. [तौ ह यत् ऊचतुः तत् कर्म ह एव ऊचतुः—] ते जें बोलले तें कर्मच बोलले. [यत् प्रशशंसतुः—] त्यांनीं ज्याची प्रशंसा केली ती कर्माचीच प्रशंसा केली. [पुण्येन कर्मणा पुण्यः भवति—] पुण्य कर्मानें पुण्यवान् होतो व [पापेन

पापः इति–] पापकर्मानें पापी होतो. [ततः०–] तेव्हां जारत्कारव आर्तभाग शांत झाला. (याचा सविस्तर भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २५३ पहा.) १३. (२)

ग्रहातिग्रहरूप बंध सांगितला. ज्या सकारण बंधापासून मुक्त झालेला पुरुषच मुक्त होतो व ज्यानें बद्ध झालेला बद्ध होतो–संसार करतो तोच मृत्यु. त्यापासून मोक्ष उपपन्न होतो. कारण त्या मृत्यूचाहि मृत्यु आहे. मुक्ताची गति संभवत नाहीं, तर प्रदीपाच्या निर्वाणाप्रमाणें सर्वांचा उच्छेद होऊन तो नाममात्र अवशिष्ट राहतो, असा वर निर्णय केला. संसार करणाऱ्या व मुक्त होणाऱ्या जीवांच्या शरीरेंद्रियांचा त्यांच्या कारणाशीं एकसारखाच संसर्ग होत असतांना मुक्त शरीरेंद्रियांचें ग्रहण सर्वथा करीत नाहींत. बद्ध संसारी कर्मानें प्रेरित होऊन पुनः पुनः त्यांचें ग्रहण करितात. अर्थात् जीवांच्या संसाराचें कारण कर्म आहे, असें वर मीमांसा करून ठरविलें. त्या कर्माचा क्षय झाला असतां नाममात्र अवशिष्ट राहून सर्वांचा विनाश होणें हा मोक्ष आहे. तें कर्म पुण्य व पाप असें दोन प्रकारचें आहे. त्यांतील पापामुळें जीव स्वभावतःच दुःखमय असलेल्या स्थावर-जंगम-नरक-तिर्यक्-प्रेतादि योनींत पुनः पुनः जन्म घेऊन मरतो व दुःखी होतो, ही गोष्ट राजमार्गाप्रमाणें प्रसिद्ध आहे. 'पुण्यो वै पुण्येन कर्मणा भवति' या वाक्यानें सांगितलेला जो शास्त्रीय सुखानुभव त्याचा आदर श्रुति या पुढील ब्राह्मणांत करीत आहे. (याविषयीं सविस्तर विचार भाष्यार्थांत पहा.) येथें शास्त्रीय पुण्यकर्मांचें व उपासनासहित पुण्यकर्मांचेंहि फल संसार हेंच आहे, हें सांगावयाचें आहे—

अथ हैनं भुज्युर्लाह्यायनिः पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच । मद्रेषु चरकाः पर्यव्रजाम ते पतञ्चलस्य काप्यस्य गृहानैम तस्याऽऽसीद्दुहिता गन्धर्वगृहीता तमपृच्छाम कोऽसीति सोऽब्रवीत्सुधन्वाऽऽङ्गिरस इति तं यदा लोकानामन्तानपृच्छामाथैनमब्रूम क्व पारिक्षिता अभवन्निति क्व पारिक्षिता अभवन्स त्वा पृच्छामि याज्ञवल्क्य क्व पारिक्षिता अभवन्निति ॥१

अन्वयार्थ—[अथ ह एनं०–] नंतर भुज्यु या नांवाचा लाह्याचा पुत्र त्याला विचारता झाला. 'हे याज्ञवल्क्या,' असें संबोधून तो म्हणाला–[मद्रेषु चरकाः पर्यचराम–] " मद्रदेशांत अध्ययनार्थ व्रताचरण करणारे आम्ही पर्यटन

करीत असतां [ते काप्यस्य पतंचलस्य गृहान् ऐम–] कपिगोत्री पतंचलाच्या घरीं गेलों. [तस्य कन्या गंधर्वगृहीता आसीत्–] त्याची कन्या गंधर्वानें पछाडलेली होती. [तं अपृच्छाम–] त्या कन्येच्या अंगांत आलेल्या गंधर्वाला आम्हीं विचारलें–[कः असि इति–] 'तूं कोण आहेस ?' तेव्हां [सः अब्रवीत् सुधन्वा आंगिरसः इति–] तो ह्मणाला–" मी आंगिरस सुधन्वा आहें. " [तं यदा लोकानां अन्तान् अपृच्छाम–] त्याला जेव्हां आम्हीं लोकांचे अन्त विचारले [अथ एनं अब्रूम–] तेव्हां आम्हीं त्याला म्हटलें–[पारिक्षिता क्व अभवन् इति–] " पारिक्षित कोठें होते ? " [क्व पारिक्षिता अभवन्–] त्यानें आम्हांला पारिक्षित कोठें होते तें सांगितलें आहे. यास्तव त्या दिव्य गंधर्वापासून झालेल्या ज्ञानानें युक्त असलेला [सः त्वा पृच्छामि–] तो मी आतां तुला विचारतों. [याज्ञवल्क्य पारिक्षिताः क्व अभवन्–] " हे याज्ञवल्क्या, सांग; पारिक्षित कोठें होते ? " २.

स होवाचोवाच वै सोऽगच्छन्वै ते तद्यत्राश्वमेधयाजिनो गच्छन्तीति क्व न्वश्वमेधयाजिनो गच्छन्तीति द्वात्रिꣳशतं वै देवरथाहन्यान्ययं लोकस्तꣳसमन्तं पृथिवी द्विस्तावत्पर्येति तार्ꣳ समन्तं पृथिवीं द्विस्तावत्समुद्रः पर्येति तद्यावती क्षुरस्य धारा यावद्वा मक्षिकायाः पत्रं तावानन्तरेणाऽऽकाशस्तानिन्द्रः सुपर्णो भूत्वा वायवे प्रायच्छत्तान्वायुरात्मनि धित्वा तत्रागमयद्यत्राश्वमेधयाजिनोऽभवन्नित्येवमिव वै स वायुमेव प्रशशꣳस तस्माद्वायुरेव व्यष्टिर्वायुः समष्टिरप पुनर्मृत्युं जयति य एवं वेद ततो ह भुज्युर्लाह्यायनिरुपरराम

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य तृतीयं ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला–[वै सः उवाच–] " तो गंधर्व म्हणाला–[ते तत् वै अगच्छन्–] ते पारिक्षित तेथें गेले कीं [यत्र अश्वमेधयाजिनः गच्छन्ति इति–] जेथें अश्वमेधयाजी जातात." [अश्वमेधयाजिनः क्व गच्छन्ति इति–] 'अश्वमेधयाजी कोठें जातात,' असें भुज्यूनें पुनः विचारलें असतां [अयं लोकः द्वात्रिंशतं वै देवरथाहन्यानि–] "हा लोक बत्तीस देवरथाहन्यें इतक्या प्रमाणाचा आहे. [तं समन्तं पृथिवी द्विः तावत् पर्येति–]

त्याच्या सभोंवार दुप्पट प्रमाणानें पृथ्वी त्याला वेढून राहिली आहे. [तां पृथिवीं समन्तं द्विः तावत् समुद्रः पर्येति–] त्या पृथिवीच्या सभोंवार दुप्पट प्रमाणानें समुद्र परिवेष्टित आहे. [तत यावती क्षुरस्य धारा–] जेवढी वस्तऱ्याची धार [यावत् वा मक्षिकायाः पत्रं–] किंवा माशीचा पंख जितका सूक्ष्म असतो [तावान् अन्तरेण आकाशः–] तेवढें ब्रह्मांडाच्या दोन कपालांमध्यें छिद्र आहे. [इंद्रः सुपर्णः भूत्वा तान् वायवे प्रायच्छत्–] इंद्र म्हणजे चित्य अग्नि पक्षी होऊन त्या पारिक्षितांस वायूच्या स्वाधीन करता झाला. [वायुः तान् आत्मनि धित्वा–] वायु त्यांना आपल्या स्वरूपांत मिळवून [यत्र अश्वमेधयाजिनः अभवन्–] जेथें अश्वमेधयाजी होते [तत्र अगमयत्–] तेथें पोंचविता झाला. [इति एवं इव वै सः वायुं एव प्रशशंस–] याप्रमाणेंच तो गंधर्व वायूला प्रशंसिता झाला. [तस्मात् वायुः एव व्यष्टिः वायुः०–] तस्मात वायुच व्यष्टि व समष्टि आहे. [यः एवं वेद सः पुनर्मृत्युं अपजयति-] जो असें जाणतो तो पुनर्मृत्यूचा अपजय करतो. " [ततः वै०–] त्यानंतर भुज्यु लाह्यायनि उपराम पावला २. (३)–वरील प्रश्नांत पुण्याचा परम उत्कर्ष म्ह० हिरण्यगर्भप्राप्ति सांगितली. तो उत्कर्ष समष्टि-व्यष्टिरूप आहे, हेंहि सांगितलें. आतां ग्रहातिग्रहांनीं ग्रस्त झालेला संसारी पुरुष आहे कीं नाही व जर असेल तर त्याचें लक्षण काय, हें जाणण्यासाठीं म्ह० आत्म्यालाच विवेकतः जाणण्यासाठी पुढील प्रश्न–

अथ हैनमुषस्तश्चाक्रायणः पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच यत्साक्षादपरोक्षाद्ब्रह्म य आत्मा सर्वान्तरस्तं मे व्याचक्ष्वेत्येष त आत्मा सर्वान्तरः कतमो याज्ञवल्क्य सर्वान्तरो यः प्राणेन प्राणिति स त आत्मा सर्वान्तरो योऽपानेनापानीति स त आत्मा सर्वान्तरो यो व्यानेन व्यानीति स त आत्मा सर्वान्तरो य उदानेनोदानीति स त आत्मा सर्वोन्तर एष त आत्मा सर्वान्तरः ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह०–] त्यानंतर याज्ञवल्क्याला उषस्त चाक्रायण विचारता झाला. ' हे याज्ञवल्क्या, ' असें संबोधून तो म्हणाला–[यत् साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म–] " जें साक्षात अपरोक्ष ब्रह्म [यः आत्मा सर्वान्तरः तं मे व्याचक्ष्व–] जो सर्वान्तर आत्मा तो मला स्पष्टपणें सांग. "

याज्ञवल्क्य म्हणाला–[एषः ते आत्मा सर्वान्तरः–] "हा तुझा आत्मा सर्वान्तर आहे." उषस्त–" हे याज्ञवल्क्या, [सर्वान्तरः कतमः–] तो सर्वान्तर आत्मा कोणता ?" याज्ञवल्क्य–[यः प्राणेन प्राणिति सः ते आत्मा सर्वान्तरः–] " जो प्राणानें प्राणचेष्टा करतो तो तुझा सर्वान्तर आत्मा आहे. [यःअपानेन०–] जो अपानानें अपान क्रिया करतो तो तुझा सर्वान्तर आत्मा आहे. [यः व्यानेन०–] जो व्यानानें व्यानक्रिया करतो तो तुझा सर्वान्तर आत्मा आहे. जो उदानानें उदानाची क्रिया करतो तो तुझा सर्वान्तर आत्मा आहे. [एषः ते आत्मा सर्वान्तरः–]हा तुझा सर्वान्तर आत्मा होय." सु ब्र.पृ.३५२पहा.१.

स होवाचोषस्तश्चाक्रायणो यथा विब्रूयादसौ गौरसावश्व इत्येवमेवैतद्व्यपदिष्टं भवति यदेव साक्षादपरोक्षाद्ब्रह्म य आत्मा सर्वान्तरस्तं मे व्याचक्ष्वेत्येष त आत्मा सर्वान्तरः कतमो याज्ञवल्क्य सर्वान्तरः । न दृष्टेर्द्रष्टारं पश्येर्न श्रुतेः श्रोतारꣳशृणुया न मतेर्मन्तारं मन्वीथा न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीयाः । एष त आत्मा सर्वान्तरोऽतोऽन्यदार्त ततो होषस्तश्चाक्रायण उपरराम ॥ २

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य चतुर्थं ब्राह्मणम् ॥ ४

अन्वयार्थ—[सः ह०–] तो उषस्त चाक्रायण म्हणाला–[यथा असौ गौः असौ अश्वः इति विब्रूयात्–] " जशी एखाद्यानें मी तुला बैल किंवा घोडा दाखवितों अशी प्रतिज्ञा करून मागून त्याच्या उलट ' जो चालतो तो बैल, जो धांवतो तो घोडा,' असें तटस्थ लक्षणांनीं त्यांचें ज्ञान करून द्यावयास लागावें [एवं एव एतत् व्यपदिष्टं भवति–] त्याप्रमाणेंच हें ब्रह्मकथन आहे. [यत् एव साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म यः आत्मा सर्वान्तरः तं मे व्याचक्ष्व–] जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म, जो सर्वान्तर आत्मा तो मला स्पष्टपणें सांग." याज्ञवल्क्य–[एषः ते आत्मा सर्वान्तरः–] " हा तुझा आत्मा सर्वान्तर आहे." उषस्त–हे याज्ञवल्क्या, [कतमः सर्वान्तरः–] " तो सर्वान्तर कोणता?" याज्ञवल्क्य–[दृष्टेः द्रष्टारं न पश्येः–] दृष्टीच्या द्रष्ट्याला तूं पाहूं नयेस, कारण तूं त्याला पाहूं, ऐकूं वगैरे शकणार नाहींस. [श्रुतेः श्रोतारं न शृणुयाः–] श्रुतीच्या श्रोत्याला तूं ऐकूं नयेस, [मतेः मन्तारं०–] तूं मतीच्या मन्त्याचें–मनोवृत्तीच्या

व्यापकाचें मनन करूं नयेस व बुद्धिवृत्तीच्या व्यापणाऱ्यास तूं जाणूं नयेस [एषः ते आत्मा सर्वान्तरः—] हा तुझा आत्मा सर्वान्तर—सर्वविशेषणांनीं विशिष्ट आहे. [अतः अन्यत् आर्तं—] याहून दुसरें सर्व कार्य-करणादिक आर्त ह्मणजे विनाशी आहे. [ततः उषस्तः चाक्रायणः उपरराम—] त्यानंतर उषस्त चाक्रायण उपरम पावला. याचा सविस्तर भाष्यार्थ पहा. २ (४)

या अध्यायाच्या पहिल्या तीन ब्राह्मणांत अविद्यादि कारणांसह बंध सांगितला. चवथ्या ब्राह्मणांत बद्ध असलेल्या संसारी जीवाचें अस्तित्व व तो शरीरेंद्रियसंघाताहून पृथक् आहे, हेंहि कळलें. आतां त्या बद्ध जीवाच्या बंधमोक्षाचें साधन—संन्यासासह आत्मज्ञान सांगावें ह्मणून कहोलप्रश्न आरंभिला जातो—

अथ हैनं कहोलः कौषीतकेयः पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच यदेव साक्षादपरोक्षाद्ब्रह्म य आत्मा सर्वान्तरस्तं मे व्याचक्ष्वेत्येष त आत्मा सर्वान्तरः ॥

अन्वयार्थ—[अथ ह०—] त्यानंतर याज्ञवल्क्याला कहोल कौषीतकेय विचारूं लागला—" हे याज्ञवल्क्या, " असें संबोधून तो बोलला—[यत् एव साक्षात् अपरोक्षात् ब्रह्म०—] " जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म जो आत्मा सर्वांतर तो मला स्पष्टपणें सांग. " याज्ञवल्क्य म्हणाला—[एषः ते आत्मा सर्वान्तरः—] " हा तुझा आत्मा सर्वांतर आहे. " (बृ. ब्र. पृ. ३५२ व यावरील सविस्तर भाष्यार्थ पहा. मागील उषस्त व या कहोल ब्राह्मणांत एकाच सामान्य-विशेष आत्म्याविषयीं प्रश्न आहे. उषस्त ब्राह्मणांतील आत्मा त्वंपदार्थ आहे व कहोल ब्राह्मणांतील आत्मा तत्पदार्थ आहे.)

कतमो याज्ञवल्क्य सर्वान्तरो योऽशनायापिपासे शोकं मोहं जरां मृत्युमत्येति ॥

अन्वयार्थ—कहोल—" हे याज्ञवल्क्या, [कतमः सर्वान्तरः—] तो सर्वांन्तर कोणता ? " याज्ञवल्क्य—[यः अशनाया-पिपासे शोकं मोहं जरां मृत्युं अत्येति—] " जो अशनाया—भूक, पिपासा—तहान, शोक, मोह, जरा व मृत्यु यांचें उल्लंघन करतो तो सर्वान्तर आत्मा होय."—संसाराविषयीं विरक्त झालेल्या पुरुषाला पारिव्राज्य—संन्यास सांगण्यासाठीं पुढील वाक्य आहे—

एतं वै तमात्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रैषणायाश्च वित्तै-
षणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति ॥

अन्वयार्थ—[एतं वै तं आत्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रैषणायाः च०—] त्याच या आत्म्याला जाणून ब्राह्मण पुत्रैषणेपासून, वित्तैषणेपासून, लोकैषणेपासून [व्युत्थाय अथ भिक्षाचर्य०—] व्युत्थान पावून—त्यांचा त्याग करून नंतर भिक्षाचरण करितात. (एषणा ह्म० काम; पत्नीसाध्य पुत्र हें या लोकाचें, गवादि वित्तसाध्य कर्म हें पितृलोकाचें व उपासनायुक्त कर्म हें देवलोकाचें साधन. त्याविषयीची इच्छा ह्याच पुत्रादि-एषणा. त्या सोडणें हेंच व्युत्थान. याच्या अधिक स्पष्टीकरणार्थ भाष्यार्थ पहा).—आतां साध्य—तीन अनात्म लोक व त्याचें साधन—पुत्रादि यांविषयीची एषणा एकच आहे, असें श्रुति सांगते—

या ह्येव पुत्रैषणा सा वित्तैषणा या वित्तैषणा
सा लोकैषणोभे ह्येते एषणे एव भवतः ॥

अन्वयार्थ—[या हि एव पुत्रैषणा०—] जी पुत्रैषणा ती वित्तैषणाच होय. आणि जी वित्तैषणा ती लोकैषणा [उभे हि एते एषणे एव भवतः—] ह्या दोन्ही (साध्य-साधनेच्छा) एषणाच आहेत. (यावरील भाष्यार्थ पहा.)

तस्माद्ब्राह्मणः पाण्डित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्। बाल्यं
च पाण्डित्यं च निर्विद्याथ मुनिरमौनं च मौनं च निर्वि-
द्याथ ब्राह्मणः स ब्राह्मणः केन स्याद्येन स्यात्तेनेदृश
एवातोऽन्यदार्तं ततो ह कहोलः कौषीतकेय उपरराम ॥ १

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य पञ्चम ब्राह्मणम् ॥ ५

अन्वयार्थ—(ज्याअर्थी पूर्वीचे ब्राह्मण या साध्य-साधनरूप एषणांपासून व्युत्थान करून भिक्षाचर्य करिते झाले) [तस्मात् ब्राह्मणः पांडित्यं निर्विद्य—] त्याअर्थी ब्राह्मणानें पांडित्य—आत्मज्ञान—पूर्णपणें संपादन करून [बाल्येन तिष्ठासेत्—] आत्मविज्ञान हेंच बल, त्याच्या भावानें म्ह० बाल्यानें राहण्याची इच्छा करावी. [बाल्यं च पांडित्यं च निर्विद्य—] याप्रमाणें बाल्य व पांडित्य यांना निःशेष संपादन करून [अथ मुनिः—] नंतर मुनि—मननामुळें मुनि—योगी होतो. [अमौनं च मौनं च निर्विद्य—] अमौन व मौन हीं निःशेष संपादन करून [अथ ब्राह्मणः—] मग ब्राह्मण—कृतकृत्य होतो. [सः

ब्राह्मणः केन स्यात्–] तो ब्राह्मण कशानें होतो ? [येन स्यात् तेन ईदृशः एव–] ज्या कोणत्याहि आचरणानें होतो त्यानें असाच ब्राह्मण होतो. [अतः अन्यत् आर्तं–] या ब्राह्मण्याहून दुसरें सर्व आर्त–विनाशी आहे. [ततः०–] त्यानंतर कहोल कौषीतकेय उपरम पावला.(सु.ब्र.पृ.४२१ व भाष्यार्थ पहा.)१(५)

–जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म सर्वान्तर आत्मा म्हणून सांगितलें त्या सर्वान्तराचें स्वरूप साक्षात् कळण्यासाठीं शेवटच्या शाकल्य ब्राह्मणापर्यंतचा ग्रंथ आहे—

अथ हैनं गार्गी वाचक्नवी पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच यदिदꣳसर्वमप्स्वोतं च प्रोतं च कस्मिन्नु खल्वाप ओताश्च प्रोताश्चेति वायौ गार्गीति कस्मिन्नु खलु वायुरोतश्च प्रोतश्चेत्यन्तरिक्षलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खल्वन्तरिक्षलोका ओताश्च प्रोताश्चेति गन्धर्वलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु गन्धर्वलोका ओताश्च प्रोताश्चेत्यादित्यलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खल्वादित्यलोका ओताश्च प्रोताश्चेति चन्द्रलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु चन्द्रलोका ओताश्च प्रोताश्चेति नक्षत्रलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु नक्षत्रलोका ओताश्च प्रोताश्चेति देवलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु देवलोका ओताश्च प्रोताश्चेतीन्द्रलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खल्विन्द्रलोका ओताश्च प्रोताश्चेति प्रजापतिलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु प्रजापतिलोका ओताश्च प्रोताश्चेति ब्रह्मलोकेषु गार्गीति कस्मिन्नु खलु ब्रह्मलोका ओताश्च प्रोताश्चेति स होवाच गार्गि माऽतिप्राक्षीर्मा ते मूर्धा व्यपप्तदनतिप्रश्न्यां वै देवतामतिपृच्छसि गार्गि माऽतिप्राक्षीरिति ततो ह गार्गी वाचक्नव्युपरराम ॥ १

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य षष्ठं ब्राह्मणम् ॥ ६

अन्वयार्थ—[अथ ह०–] त्यानंतर याज्ञवल्क्याला गार्गी वाचक्नवी विचारूं लागली. [याज्ञवल्क्य इति ह उवाच–] ती ' हे याज्ञवल्क्या, ' असें संबोधून म्हणाली–" [यत् इदं सर्वं अप्सु ओतं च प्रोतं च–] जसें हें सर्व पार्थिवधातुजात उदकांत ओतप्रोत आहे, [कस्मिन् नु खलु आपः ओताः च

प्रोताः च–] त्याप्रमाणें तें उदक कशांत ओत व प्रोत आहे ?" याज्ञवल्क्य-[गार्गि वायौ इति–] " हे गार्गि, उदक वायूंत ओतप्रोत आहे. " गार्गी– " वायु कशांत बरें ओतप्रोत आहे ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, वायु अन्तरिक्षलोकांमध्यें ओतप्रोत आहे. " गार्गी–" अन्तरिक्षलोक कशांत बरें ओतप्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, गंधर्वलोकांमध्यें." गार्गी–" गंधर्वलोक कशांत ओत-प्रोत आहेत. ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, आदित्यलोकांमध्यें. " गार्गी–" आदित्यलोक कशामध्यें ओत-प्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, चंद्रलोकांमध्यें. " गार्गी–" चंद्रलोक कशांत ओत-प्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, नक्षत्रलोकांमध्यें. " गार्गी–" नक्षत्रलोक कशांत ओत-प्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, देवलोकांमध्यें," गार्गी –" देवलोक कशांत ओत-प्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–"हे गार्गि, इंद्रलोकांमध्यें. " गार्गी–" इंद्रलोक कशामध्यें बरं ओत-प्रोत आहेत ? " याज्ञवल्क्य–" हे गार्गि, प्रजापतिलोकांमध्यें. " गार्गी–" प्रजापतिलोक कशांत ओतप्रोत आहेत ?" याज्ञवल्क्य–"हे गार्गि, ब्रह्मलोकांमध्यें." गार्गी–"ब्रह्मलोक कशामध्यें ओत-प्रोत आहेत ?"त्यावर याज्ञवल्क्य म्हणाला–"हे गार्गि, [मा अतिप्राक्षीः - ०] न्यायाला सोडून अतिप्रश्न करूं नकोस. असा अतिप्रश्न करणाऱ्या तुझा मूर्धा - मस्तक न पडो. तूं जिच्याविषयीं अतिप्रश्न करूं नये, त्या देवतेविषयीं अतिप्रश्न करीत आहेस. पण हे गार्गि, अतिप्रश्न करूं नकोस." त्यानंतर गार्गी वाचक्नवी उपराम पावली. (स्पष्टीकरणासाठीं भाष्यार्थ पहा). १. (६).

सहाव्या ब्राह्मणांत सूत्राच्या अलीकडील व्यापक सांगितलें. आतां ब्रह्मलोकांच्याहि अतिशय अन्तर्भागीं असलेलें सूत्र सांगावें ह्मणून पुढील ब्राह्मण आहे–

अथ हैनमुद्दालक आरुणिः पप्रच्छ याज्ञवल्क्येति होवाच मद्रेष्ववसाम पतञ्चलस्य काप्यस्य गृहेषु यज्ञमधीयानास्तस्याऽऽसीद्भार्या गन्धर्वगृहीता तमपृच्छाम कोऽसीति सोऽब्रवीत्कबन्ध आथर्वण इति ॥

अन्वयार्थ—[अथ ह०–] त्यानंतर याज्ञवल्क्याला उद्दालक आरुणि विचारता झाला. ' हे याज्ञवल्क्या, ' असें संबोधून तो म्हणाला–[मद्रेषु यज्ञं अधीयानाः पतंचलस्य काप्यस्य गृहेषु अवसाम–] आम्ही मद्रदेशांत यज्ञशास्त्राचें

अध्ययन करीत कपिगोत्री पतंचलाच्या घरीं रहात होतों. [तस्य भार्यां गंधर्व-गृहीता आसीत्–] त्याची भार्या गंधर्वाकडून गृहीत–धरलेली–पछाडलेली होती. [तं अपृच्छाम कः असि इति–] तिच्या अंगांतील त्या गंधर्वाला आम्हीं 'तूं कोण आहेस ? असें विचारलें. [सः अब्रवीत् कबन्धः आथर्वणः इति–] तेव्हां तो म्हणाला–" मी कबंध आथर्वण आहें. "

सोऽब्रवीत्पतञ्चलं काप्यं याज्ञिकाꣳश्च वेत्थ नु त्वं काप्य तत्सूत्रं येनायं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतानि संदब्धानि भवन्तीति सोऽब्रवीत्पतञ्चलः काप्यो नाहं तद्भगवन्वेदेति ॥

अन्वयार्थ—[सः काप्यं पतंचलं च याज्ञिकान् अब्रवीत्–] तो पतंचलाच्या भार्येच्या अंगांतील गंधर्व कपिगोत्री पतंचल व त्याचे याज्ञिक शिष्य यांस म्हणाला–[काप्य येन अयं च लोकः परः च लोकः सर्वाणि च भूतानि संदब्धानि भवन्ति–] " हे काप्या, ज्यानें हा लोक, परलोक व सर्व भूतें संग्रथित होतात [तत् सूत्रं त्वं वेत्थ नु इति–] त्या सूत्राला तूं जाणतोस का ?" तेव्हां [सः काप्यः०–] तो काप्य पतंचल म्हणाला–" हे भगवन्, मी त्या सूत्राला जाणत नाहीं. "

सोऽब्रवीत्पतञ्चलं काप्यं याज्ञिकाꣳश्च वेत्थ नु त्वं काप्य तमन्तर्यामिणं य इमं च लोकं परं च लोकꣳ सर्वाणि च भूतानि योऽन्तरो यमयतीति सोऽब्रवीत्पतञ्चलः काप्यो नाहं तं भगवन्वेदेति ॥

अन्वयार्थ—पुनः तो गंधर्व काप्य पतंचल व त्याचे याज्ञिक शिष्य यांस म्हणाला–" हे काप्या, [यः इमं च लोकं०–] जो या लोकाला, परलोकाला, व सर्व भूतांना [अन्तरः यमयति–] आंतून नियमित करतो [तं अन्तर्यामिणं त्वं वेत्थ नु–] त्या अन्तर्यामीला तूं जाणतोस का ? " तेव्हां [सः अब्रवीत्–] काप्य पतंजल म्हणाला–" हे भगवन्, मी त्या अन्तर्यामीला जाणत नाहीं. "

सोऽब्रवीत्पतञ्चलं काप्यं याज्ञिकाꣳश्च यो वै तत्काप्य सूत्रं विद्यात्तं चान्तर्यामिणमिति स ब्रह्मवित्स लोकवित्स देववित्स वेदवित्स भूतवित्स आत्मवित्स सर्ववेदिति ॥

अन्वयार्थ—[सः अब्रवीत्०—] त्यावर तो गंधर्व काप्य पतंचल व याज्ञिक यांस म्हणाला—" हे काप्या, [यः तत् सूत्रं तं च अन्तर्यामिणं विद्यात्—] जो त्या सूत्राला व त्या अन्तर्यामीला उक्तप्रकारें जाणतो [सः आत्मवित्०—] तो आत्मविद्, तो ब्रह्मविद्, तो लोकविद्, तो देवविद्, तो वेदविद्, तो भूतविद् व तो सर्वविद् होय. "

तेभ्योऽब्रवीत्तदहं वेद तच्चेत्त्वं याज्ञवल्क्य सूत्रमविद्वाꣳस्तं चान्तर्यामिणं ब्रह्मगवीरुदजसे मूर्धा ते विपतिष्यतीति। वेद वा अहं गौतम तत्सूत्रं तं चान्तर्यामिणमिति॥ यो वा इदं कश्चिद्ब्रूयाद्वेद वेदेति यथा वेत्थ तथा ब्रूहीति॥ १

अन्वयार्थ—[तेभ्यः अब्रवीत्—] नंतर त्या गंधर्वानें त्या काप्यादिकांस जें सांगितलें [तत् अहं वेद—] तें मी जाणतों. [याज्ञवल्क्य तत् सूत्रं तं अन्तर्यामिणं च अविद्वान् त्वं ब्रह्मगवीः उदजसे चेत्—] " हे याज्ञवल्क्या, तूं त्या सूत्राला व अन्तर्यामीला न जाणतां ब्रह्मवेत्त्यांच्या स्वभूत गायी जर नेशील तर [ते मूर्धा विपतिष्यति—] तुझा मूर्धा पडेल. "—तें ऐकून याज्ञवल्क्य म्हणाला—" हे गौतमा, [अहं तत् सूत्रं च तं अन्तर्यामिणं वेद वै—] मी तें सूत्र व तो अन्तर्यामी यांस जाणतों. " त्यावर उद्दालक म्हणाला—[वेद वेद इति इदं यः वै कश्चित् ब्रूयात्—] " मी जाणतों, मी जाणतों, असें कोणीहि म्हणेल ! [यथा वेत्थ तथा ब्रूहि इति—] तूं कसें जाणतोस तें सांग पाहूं. "सु.ब्र.पृ५६ १—वर्तमानसमयीं पृथिवी जशी जलांत त्याप्रमाणें ब्रह्मलोक ज्यांत ओतप्रोत आहेत तें आगमगम्य सूत्र सांगावें, म्हणून हा प्रश्न आहे. त्याच्या निर्णयासाठीं—

स होवाच वायुर्वै गौतम तत्सूत्रं वायुना वै गौतम सूत्रेणायं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतानि संदब्धानि भवन्ति तस्माद्वै गौतम पुरुषं प्रेतमाहुर्व्यस्रꣳसिषतास्याङ्गानीति वायुना हि गौतम सूत्रेण संदब्धानि भवन्तीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्यान्तर्यामिणं ब्रूहीति॥ २

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—" हे गौतमा, [वायुः वै तत् सूत्रं—] वायुच तें सूत्र आहे. हे गौतमा, [वायुना वै सूत्रेण अयं लोकः०—] वायु या सूत्रानेंच हा लोक, पर लोक व सर्व भूतें संदब्ध—संग्रथित आहेत. [तस्मात्

वै०—] ह्मणूनच हे गौतमा, [प्रेतं पुरुषं आहुः—] मेलेल्या पुरुषाला ह्मणतात कीं [अस्य अंगानि व्यस्रंसिषत इति—] याचीं अंगें शिथिल झालीं आहेत, [हि गौतम वायुना सूत्रेण संदृब्धानि भवन्ति—] यास्तव हे गौतमा, वायु याच सूत्रानें सर्व भूतें संग्रथित असतात." त्यावर गौतम आरुणि म्हणाला—" हे याज्ञवल्क्या, [एवं एतत्—] तूं सूत्र बरोबर सांगितलेंस. [अन्तर्यामिणं ब्रूहि—] आतां त्या सूत्राच्या अन्तर्गत नियन्त्यास—अन्तर्यामीस सांग." सु. ब्र. पृ. ६८ पहा. २—तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाले—

यः पृथिव्यां तिष्ठन्पृथिव्या अन्तरो यं पृथिवी न वेद यस्य पृथिवी शरीरं यः पृथिवीमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ३

अन्वयार्थ—[यः पृथिव्यां तिष्ठन् पृथिव्याः अन्तरः—] जो पृथिवीमध्यें राहणारा पृथिवीच्या अभ्यन्तर—आन्तर आहे [यं पृथिवी न वेद—] ज्याला पृथिवी देवता जाणत नाहीं, [यस्य पृथिवी शरीरं—] ज्याचें पृथिवी हेंच शरीर आहे, [यः पृथिवी अन्तरः यमयति—] जो पृथिवीदेवतेला आंत राहून नियमित करतो [एषः ते आत्मा अन्तर्यामी अमृतः—] तो हाच तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत—सर्वसंसारधर्मरहित आहे. (तोच सर्व चराचराचा आत्मा आहे. सु. ब्र. पृ. २०३ पहा) ३.

योऽप्सु तिष्ठन्नद्भ्योऽन्तरो यमापो न विदुर्यस्याऽऽपः शरीरं योऽपोऽन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ४

अन्वयार्थ—जो उदकांत राहणारा, उदकांहून अभ्यन्तर, ज्याला आपदेवता जाणत नाहींत, आपच ज्याचें शरीर आहे, जो आपदेवतेला आंतून नियमित करतो तो तुझा आत्मा, अन्तर्यामी अमृत आहे.सु.ब्र.पृ.१६४पहा ४

योऽग्नौ तिष्ठन्नग्नेरन्तरो यमग्निर्न वेद यस्याग्निः शरीरं योऽग्निमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ५

अन्वयार्थ—जो अग्नींत राहणारा, अग्निहून अभ्यन्तर असतो, ज्याला अग्निदेवता जाणत नाहीं, अग्नि हेंच ज्याचें शरीर आहे, जो अग्निदेवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. ५.

योऽन्तरिक्षे तिष्ठन्नन्तरिक्षादन्तरो यमन्तरिक्षं न वेद यस्यान्तरिक्षं शरीरं योऽन्तरिक्षमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ६

अन्वयार्थ—जो अन्तरिक्षांत राहणारा, अन्तरिक्षाहून अभ्यन्तर असतो, ज्याला अन्तरिक्षदेवता जाणत नाहीं, ज्याचें अन्तरिक्ष हें शरीर आहे, जो अन्तरिक्षदेवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.६.

यो वायौ तिष्ठन्वायोरन्तरो यं वायुर्न वेद यस्य वायुः
शरीरं यो वायुमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥७

अन्वयार्थ—जो वायूमध्यें राहणारा वायुहून अभ्यन्तर असतो, ज्याला वायुदेवता जाणत नाहीं, ज्याचें वायु हें शरीर आहे, जो वायुदेवतेच्या आंत राहून तिचें नियमन करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. ७.

यो दिवि तिष्ठन्दिवोऽन्तरो यं द्यौर्न वेद यस्य द्यौः शरीरं
यो दिवमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ८

अन्वयार्थ—जो द्युलोकीं राहणारा, द्युलोकाहून अभ्यन्तर आहे, ज्याला द्युदेवता जाणत नाहीं, ज्याचें द्युलोक हेंच शरीर आहे, जो द्युदेवतेच्या अभ्यन्तरीं राहून तिचें नियमन करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. ८.

य आदित्ये तिष्ठन्नादित्यादन्तरो यमादित्यो न वेद यस्याऽऽदित्यः
शरीरं य आदित्यमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ९

अन्वयार्थ—जो आदित्यांत राहणारा आदित्याहून अभ्यंतर असतो, ज्याला आदित्यदेवता जाणत नाही, ज्याचें आदित्य हेंच शरीर आहे, जो आदित्यदेवतेला आंतून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे९

यो दिक्षु तिष्ठन्दिग्भ्योऽन्तरो यं दिशो न विदुर्यस्य दिशः शरीरं
यो दिशोऽन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ १०

अन्वयार्थ—जो दिशांमध्यें राहणारा, दिशांहून अभ्यन्तर असतो, ज्याला दिशांची देवता जाणत नाहीं, दिशा हेंच ज्याचें शरीर आहे, जो दिशांच्या देवतेचें आंत राहून नियमन करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.१०

यश्चन्द्रतारके तिष्ठंश्चन्द्रतारकादन्तरो यं चन्द्रतारकं
न वेद यस्य चन्द्रतारकं शरीरं यश्चन्द्रतारकमन्तरो
यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः॥ ११

अन्वयार्थ—जो चंद्रतारकांत राहणारा चंद्रतारकांहून अभ्यंतर असतो, ज्याला चंद्रतारका देवता जाणत नाहीं, चंद्रतारका हें ज्याचें शरीर आहे व जो चंद्रतारकांस आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे.

य आकाशे तिष्ठन्नाकाशादन्तरो यमाकाशो न
वेद यस्याऽऽकाशः शरीरं य आकाशमन्तरो
यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ १२

अन्वयार्थ—जो आकाशांत राहणारा आकाशाहून अभ्यंतर आहे, ज्याला आकाशदेवता जाणत नाहीं, आकाश ज्याचें शरीर आहे, जो आकाशाला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे १२.

यस्तमसि तिष्ठꣳस्तमसोऽन्तरो यं तमो न वेद यस्य तमः-
शरीरं यस्तमोऽन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ १३

अन्वयार्थ—जो तमामध्यें राहणारा, तमाहून अभ्यंतर आहे, ज्याला तमो-देवता जाणत नाहीं, ज्याचें तम हें शरीर आहे, जो तमोदेवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा—अन्तर्यामी अमृत आहे. १३.

यस्तेजसि तिष्ठꣳस्तेजसोऽन्तरो यं तेजो न वेद
यस्य तेजः शरीरं यस्तेजोऽन्तरो यमयत्येष
त आत्माऽन्तर्याम्यमृत इत्यधिदैवतमथाधिभूतम् ॥ १४

अन्वयार्थ—जो तेजामध्यें राहणारा, तेजाहून अभ्यंतर आहे, ज्याला तेजोदेवता जाणत नाहीं, ज्याचें तेज हें शरीर आहे, जो तेजोदेवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. हें अधिदैवत अन्तर्यामिदर्शन आहे. आतां अधिभूत दर्शन. १४

यः सर्वेषु भूतेषु तिष्ठन्त्सर्वेभ्यो भूतेभ्योऽन्तरो यꣳ-
सर्वाणि भूतानि न विदुर्यस्य सर्वाणि भूतानि शरीरं
यः सर्वाणि भूतान्यन्तरो यमयत्येष त आत्माऽ-
न्तर्याम्यमृत इत्यधिभूतमथाध्यात्मम् ॥ १५

अन्वयार्थ—जो सर्व भूतांमध्यें राहणारा, सर्व भूतांहून अभ्यंतर आहे, ज्याला सर्व भूतांची देवता जाणत नाहीं, सर्व भूतें हेंच ज्याचें शरीर आहे,

जो सर्व भूतदेवतांस त्यांच्या आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. असें हें अधिभूत अन्तर्यामिदर्शन आहे. आतां अध्यात्मदर्शन १५

यः प्राणे तिष्ठन्प्राणादन्तरो यं प्राणो न वेद यस्य प्राणः
शरीरं यः प्राणमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥

अन्वयार्थ—जो प्राणांत राहणारा, प्राणाहून अभ्यंतर आहे, ज्यास प्राण-देवता जाणत नाहीं, ज्याचें प्राण हें शरीर आहे, जो प्राणाला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे १६.

यो वाचि तिष्ठन्वाचोऽन्तरो यं वाङ्न वेद यस्य वाक्शरीरं
यो वाचमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ १७

अन्वयार्थ—जो वाक्-मध्यें राहणारा वाक्-हून अभ्यंतर आहे, ज्याला वाग्-देवता जाणत नाही, ज्याचें वाक् हें शरीर आहे, जो वाग्-देवतेस आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. १७.

यश्चक्षुषि तिष्ठꣳश्चक्षुषोऽन्तरो यं चक्षुर्न वेद यस्य चक्षुःशरीरं
यश्चक्षुमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ १८

अन्वयार्थ—जो चक्षूमध्यें राहणारा चक्षूहून अभ्यंतर आहे, ज्याला चक्षु-र्देवता जाणत नाहीं, ज्याचें चक्षु हें शरीर आहे, जो चक्षुर्देवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे १८.

यः श्रोत्रे तिष्ठꣳश्छ्रोत्रादन्तरो यꣳ श्रोत्रं न वेद यस्य श्रोत्रꣳशरीरं
यः श्रोत्रमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ १९

अन्वयार्थ—जो श्रोत्रांत राहणारा श्रोत्राहून अभ्यंतर आहे ज्याला श्रोत्र-देवता जाणत नाहीं, श्रोत्र हें ज्याचें शरीर आहे, जो श्रोत्रदेवतेला अभ्यंतरीं राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. १९.

यो मनसि तिष्ठन्मनसोऽन्तरो यं मनो न वेद यस्य मनः
शरीरं यो मनोऽन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥२०

अन्वयार्थ—जो मनामध्यें राहणारा मनाहून अभ्यंतर आहे, ज्याला मन जाणत नाहीं, ज्याचें मन हें शरीर आहे, जो मनोदेवतेला अभ्यन्तरीं राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे २०.

यस्त्वचि तिष्ठꣳस्त्वचोऽन्तरो यं त्वङ्न वेद यस्य त्वक्शरीरं यस्त्वचमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ २१

अन्वयार्थ—जो त्वचेमध्ये राहणारा त्वचेहून अभ्यंतर असतो, ज्याला त्वग्-देवता जाणत नाहीं, ज्याचें त्वक् हें शरीर आहे, जो त्वग्देवतेला आंतून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे २१.

यो विज्ञाने तिष्ठन्विज्ञानादन्तरो यं विज्ञानं न वेद यस्य विज्ञानꣳ शरीरं यो विज्ञानमन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतः ॥ २२

अन्वयार्थ—जो विज्ञानांत राहणारा विज्ञानाहून अभ्यंतर आहे, ज्याला विज्ञानदेवता जाणत नाहीं, ज्याचें विज्ञान हें शरीर आहे, जो विज्ञानदेवतेला आंत राहून नियमित करतो तो तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. २२.

यो रेतसि तिष्ठन्रेतसोऽन्तरो यꣳ रेतो न वेद यस्य रेतः शरीरं यो रेतोऽन्तरो यमयत्येष त आत्माऽन्तर्याम्यमृतोऽदृष्टो द्रष्टाऽश्रुतः श्रोताऽमतो मन्ताऽविज्ञातो विज्ञाता नान्योऽतोऽस्ति द्रष्टा नान्योऽतोऽस्ति श्रोता नान्योऽतोऽस्ति मन्ता नान्योऽतोऽस्ति विज्ञातैष त आत्माऽन्तर्याम्यमृतोऽतोऽन्यदार्तं ततो होद्दालक आरुणिरुपरराम ॥ २३

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य सप्तमं ब्राह्मणम् ॥७

अन्वयार्थ—[यः रेतसि०—] जो रेतामध्ये राहणारा रेताहून अभ्यंतर आहे, ज्याला रेतोदेवता जाणत नाहीं, रेत हें ज्याचें शरीर आहे, जो रेतोदेवतेच्या आंत राहून तिचें नियमन करतो तो तुझा आत्मा, अन्तर्यामी अमृत आहे. [अदृष्टः द्रष्टा अश्रुतः श्रोता०—] तो अदृष्ट पण द्रष्टा, अश्रुत पण श्रोता, अमत पण मन्ता, अविज्ञात पण विज्ञाता आहे. [अतः अन्यः द्रष्टा न अस्ति—] याहून अन्य द्रष्टा नाहीं. [अतः अन्यः श्रोता०—] याहून अन्य श्रोता नाहीं, याहून अन्य मन्ता—मनन करणारा नाहीं, याहून अन्य विज्ञाता नाहीं, हा तुझा आत्मा अन्तर्यामी अमृत आहे. [अतः अन्यत् आर्तं—] याहून अन्य सर्व आर्त म्ह० विनाशी आहे. [ततः उद्दालकः आरुणिः उपरराम—] त्यानंतर उद्दालक आरुणि उपरम पावला. . ब्र. पृ. २९२ पहा. २३ (७)

—आतां यापुढें अशनायादिकांपासून सर्वथा निर्मुक्त निरुपाधिक साक्षात् अपरोक्ष सर्वान्तर ब्रह्म सांगावें ह्मणून आरंभ केला जातो—

अथ ह वाचक्नव्युवाच ब्राह्मणा भगवन्तो हन्ताहमिमं द्वौ प्रश्नौ प्रक्ष्यामि तौ चेन्मे वक्ष्यति न वै जातु युष्माकमिमं कश्चिद्ब्रह्मोद्यं जेतेति पृच्छ गार्गीति ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह०—] त्यानंतर वाचक्नवी पुनः म्हणाली—[भगवन्तः ब्राह्मणाः हन्त अहं इमं द्वौ प्रश्नौ प्रक्ष्यामि—] "अहो पूजावंत ब्राह्मणहो, आतां मी याला दोन प्रश्न विचारीन, [तौ चेत् मे वक्ष्यति—] त्यांची उत्तरें जर यानें दिलीं तर [युष्माकं कश्चित इमं जातु ब्रह्मोद्यं न वै जेता—] तुम्हांपैकीं कोणीहि याला केव्हांच ब्रह्मसंबंधी भाषणांत जिंकणारच नाहीं. " तेव्हां [पृच्छ गार्गि इति—] इतर ब्राह्मण म्हणाले—" हे गार्गि, बरें विचार. " १

सा होवाचाहं वै त्वा याज्ञवल्क्य यथा काश्यो वा वैदेहो वोग्रपुत्र उज्ज्यं धनुरधिज्यं कृत्वा द्वौ बाणवन्तौ सपत्नातिव्याधिनौ हस्ते कृत्वोपोत्तिष्ठेदेवमेवाहं त्वा द्वाभ्यां प्रश्नाभ्यामुपोदस्थां तौ मे ब्रूहीति पृच्छ गार्गीति ॥ २

अन्वयार्थ—याप्रमाणें ब्राह्मणांची अनुज्ञा मिळाली असतां ती ह्मणाली—" हे याज्ञवल्क्या, [अहं वै त्वा—]मीच तुला विचारतें [यथा काश्यः वा उग्रपुत्रः वैदेहः वा उज्ज्यं धनुः अधिज्यं कृत्वा—] जसा काशिस्थ काश्य किंवा शूरवंशांत झालेला वैदेह गुण उतरलेलें धनुष्य पुनः सज्ज करून [द्वौ बाणवन्तौ सपत्नातिव्याधिनौ हस्ते कृत्वा उपोत्तिष्ठेत्—] दोन बाणवान्—साम्र शत्रूला अति पीडा करणारे शर हातांत घेऊन समोर येऊन प्रकट होतो [एवं एव अहं त्वा द्वाभ्यां प्रश्नाभ्यां उपोदस्थां—] त्याप्रमाणेंच मी तुझ्यापाशीं दोन प्रश्न घेऊन उभी आहें. [तौ मे ब्रूहि इति—] त्यांचीं उत्तरें मला सांग. " तेव्हां याज्ञवल्क्य म्हणाला—[पृच्छ गार्गि इति—] " गार्गि, विचार. " २

सा होवाच यदूर्ध्वं याज्ञवल्क्य दिवो यदवाक्पृथिव्या यदन्तरा द्यावापृथिवी इमे यद्भूतं च भवच्च भविष्यच्चेत्याचक्षते कस्मिंस्तदोतं च प्रोतं चेति ॥ ३

अन्वयार्थ—ती म्हणाली—" हे याज्ञवल्क्या, [यत् दिवः ऊर्ध्वं—] जें 'द्युलोक' या अंडकपालाच्या वर, [यत् पृथिव्याः अवाक्—] जें 'पृथिवी' या अंडकपालाच्या खालीं, [यत् अन्तरा इमे द्यावा-पृथिवी—] जें मध्यें—या द्यावा-पृथिवी, [यत् भूतं०—] जें भूत, वर्तमान व भविष्यत्, [इति आचक्षते—] असें सांगतात [तत् कस्मिन् ओतं०—] तें कशामध्यें ओत व प्रोत आहे? ३.

स होवाच यदूर्ध्वं गार्गि दिवो यदवाक्पृथिव्या यद-
न्तरा द्यावापृथिवी इमे यद्भूतं च भवच्च भविष्य-
च्चेत्याचक्षत आकाशे तदोतं च प्रोतं चेति ॥ ४

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—" हे गार्गि, जें द्युलोकावर व पृथिवीच्या खाली, त्यांच्या मध्यभागीं ही द्यावापृथिवी, जें भूत, वर्तमान व भविष्यत् म्ह० त्रिकालीं राहणारें असें सांगतात [तत् आकाशे ओतं च प्रोतं च इति—] तें आकाशांत ओतप्रोत आहे. ४.

सा होवाच नमस्तेऽस्तु याज्ञवल्क्य यो म एतं
व्यवोचोऽपरस्मै धारयस्वेति पृच्छ गार्गीति ॥ ५

अन्वयार्थ—तेव्हां ती म्हणाली—" हे याज्ञवल्क्या, [यः मे एतं व्यवोचः तस्मै ते नमः अस्तु—] ज्या तूं मला हें सांगितलेंस त्या तुला नमस्कार असो. आतां [अपरस्मै धारयस्व—] दुसऱ्या प्रश्नाकरितां तूं आपल्याला दृढ कर." याज्ञवल्क्य म्हणतात—" हे गार्गि, विचार. " ५.

सा होवाच यदूर्ध्वं याज्ञवल्क्य दिवो यदवाक्पृथिव्या
यदन्तरा द्यावापृथिवी इमे यद्भूतं च भवच्च भविष्यच्चे-
त्याचक्षते कस्मिꣳस्तदोतं च प्रोतं चेति ॥ ६

अन्वयार्थ—ती म्हणाली—" हे याज्ञवल्क्या, जें द्युलोकाच्या वर जें पृथिवीच्या खालीं, जें मध्यभागीं—या द्यावापृथिवी, जें भूत, भवत्, व भविष्यत असें सांगतात तें कशामध्यें ओत-प्रोत आहे. " ६.

स होवाच यदूर्ध्वं गार्गि दिवो यदवाक्पृथिव्या यदन्तरा
द्यावापृथिवी इमे यद्भूतं च भवच्च भविष्यच्चे-
त्याचक्षत आकाश एव तदोतं च प्रोतं चेति
कस्मिन्नु खल्वाकाश ओतश्च प्रोतश्चेति ॥ ७

अन्वयार्थ—तो म्हणाला—" हे गार्गी, जें द्युलोकाच्या वर, जें पृथिवीच्या खालीं, जें त्यांच्या मध्यें ही द्यावापृथिवी, जें भूत, वर्तमान व भविष्यत् असें सांगतात तें आकाशांतच ओत व प्रोत आहे. " (पूर्वोक्त अर्थाचेंच अवधारण —निश्चय करण्यासाठीं पुनः त्याच प्रश्नोत्तरांचा अनुवाद केला आहे. त्यांत अपूर्व असा दुसरा कोणताच अर्थ सांगितलेला नाहीं.) गार्गी विचारते—[कस्मिन् नु खलु आकाशः ओतः च प्रोतः च इति—] " आकाश कशांत ओत-प्रोत आहे ? " (कालत्रयातीत आकाशच अगोदर दुर्ज्ञेय आहे. मग तें ज्यांत ओत-प्रोत आहे त्या अक्षराच्या अत्यंत दुर्ज्ञेयत्वाविषयीं काय सांगावें ? अर्थात् तें अवाच्य आहे. त्यामुळेंच अनुभवाचा विषय होत नाहीं. तीच अप्रतिपत्ति म्ह० अज्ञान होय. बरें, अवाच्य असलेलेंहि अक्षर जर हा सांगेल तर तेंच विपरीत ज्ञान होय. तार्किकांच्या सिद्धान्ताप्रमाणें तीं दोन्हीं निग्रहस्थानें आहेत. यास्तव हा प्रश्न उत्तर न देतां येण्यासारखा आहे, असें गार्गी समजत होती.) ७ —पण त्या दोन्ही दोषांचा परिहार करण्याच्या इच्छेनें—

स होवाचैतद्वै तदक्षरं गार्गि ब्राह्मणा अभिवदन्त्यस्थूलमनण्वह्रस्वमदीर्घमलोहितमस्नेहमच्छायमतमोऽवाय्वनाकाशमसङ्गमरसमगन्धमचक्षुष्कमश्रोत्रमवागमनोऽतेजस्कमप्राणममुखममात्रमनन्तरमबाह्यं न तदश्नाति किंचन न तदश्नाति कश्चन ॥ ८

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—"हे गार्गि, [एतत् वै तत्—] तूं जें विचारलेंस तें हेंच आहे. [ब्राह्मणाः अक्षरं अभिवदन्ति—] ब्राह्मण त्याला अक्षर असें म्हणतात. (मी ब्राह्मणांचें म्हणणें सांगत असल्यामुळें ' अवाच्यकथन ' हा दोष मजकडे येत नाहीं व त्यावरूनच मला तें अज्ञात आहे असेंहि ठरत नाहीं. अशा रीतीनें याज्ञवल्क्यांनीं दोन्ही दोषांचा परिहार केला आहे. ' तर मग तें अक्षर काय आहे,' असें गार्गीनें विचारलें असतां याज्ञवल्क्य सांगतात—) [अस्थूलं०—] अस्थूल, अनणु, अह्रस्व, अदीर्घ, (म्ह० सर्व द्रव्यधर्मरहित) अलोहित, अस्नेह, अच्छाय, अतम, अवायु, अनाकाश, असंग, अरस, अगंध, अचक्षुष्क, अश्रोत्र, अवाक्, अमन, अतेजस्क, अप्राण, अमुख, अमात्र, अनन्तर, अबाह्य, [तत् किंचन न अश्नाति—] तें कांहीं खात नाहीं व [तत् कश्चन न अश्नाति—] त्याला कोणी खात नाहीं. " (याचा भाष्यार्थ

व सु. ब्र. पृ. ७२, ७३, २८४, ३४७ पहा.) ८—याप्रमाणें श्रुतीनें अगोदर अनेक विशेषणांच्या प्रतिषेधानें—निषेधमुखानें अक्षराचें अस्तित्व सिद्ध केलें. तथापि जें जें विद्यमान असतें तें तें सविशेषणच असतें, अशी लोकांची भावना असल्यामुळें निर्विशेष अक्षर नाहींच, अशी शंका येते; म्हणून त्याच्या अस्तित्वाविषयीं अनुमानप्रमाणाचा उपन्यास करितात—

एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि सूर्याचंद्रमसौ विधृतौ तिष्ठतः । एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि द्यावापृथिव्यौ विधृते तिष्ठतः । एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि निमेषा मुहूर्ता अहोरात्राण्यर्धमासा मासा ऋतवः संवत्सरा इति विधृतास्तिष्ठन्ति । एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि प्राच्योऽन्या नद्यः स्यन्दन्ते श्वेतेभ्यः पर्वतेभ्यः प्रतीच्योऽन्या यां यां च दिशमनु । एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि ददतो मनुष्याः प्रशंसन्ति यजमानं देवा दर्वीं पितरोऽन्वायत्ताः ॥ ९

अन्वयार्थ—हे गार्गि, [एतस्य वै अक्षरस्य प्रशासने सूर्याचंद्रमसौ विधृतौ तिष्ठतः—] याच अक्षराच्या प्रशासनामध्यें सूर्य व चंद्र विशेषेंकरून धारण केलेले, असे होत्साते राहतात. (सूर्य-चंद्रादिकांचें प्रशासितृ—नियामक अक्षर आहे.) हे गार्गि, याच अक्षराच्या प्रशासनांत द्यावा-पृथिवी विशेषतः धारण केल्या गेलेल्या अशा होऊन राहतात. हे गार्गि, या अक्षराच्या प्रशासनांत निमेष, मुहूर्त, अहोरात्र, अर्धमास, मास, ऋतु, संवत्सर, हे कालाचे अवयव विशेषतः धारण केलेले असे होत्साते राहतात. (अक्षर परमात्मा या कालावयवांचा नियन्ता आहे.) हे गार्गि, या अक्षराच्या प्रशासनांत पूर्वेकडे वाहणाऱ्या व दुसऱ्याहि नद्या हिमालयादि श्वेतपर्वतांपासून स्रवतात, दुसऱ्या पश्चिमेकडे स्रवतात; ज्या ज्या दिशेकडे वाहूं लागतात तिचें तिचें अतिक्रमण करीत नाहींत. (नद्यांचें हें अव्यभिचारित्व अक्षर प्रशास्त्याचें सूचक चिह्न आहे.) हे गार्गि, या अक्षराच्या प्रशासनांत मनुष्य दात्यांची प्रशंसा करितात. देव यजमानाच्या अनुगत होतात, तसेच पितर दर्वीहोमाच्या अनुगत असतात. (मनुष्य दान देणाऱ्या पुरुषांचा दानफलाशीं संयोग होतो असें पाहून—

'हिरण्यदा अमृतत्वं भजन्ते०' हिरण्य देणारे अमृतत्वास प्राप्त होतात—या प्रमाणास जाणणारे असल्यामुळें दात्याची प्रशंसा करितात. ती दात्याची प्रशंसा कर्त्याचा कर्मफलाशीं संयोग करणारा व कर्मफलांचा विभाग जाणणारा असा विशिष्ट प्रशास्ता जर नसेल तर उपपन्न होत नाहीं. सु.ब्र.पृ.२९८पहा.)९ —अक्षराचें ज्ञान न झाल्यास नियमानें संसारप्राप्ति होते व त्याच्या ज्ञानानें संसाराचा विच्छेद होतो, त्यावरूनहि अक्षराचें अस्तित्व सिद्ध होतें, असें सांगतात—

यो वा एतदक्षरं गार्ग्यविदित्वाऽस्मिल्ँलोके जुहोति यजते तपस्तप्यते बहूनि वर्षसहस्राण्यन्तवदेवास्य तद्भवति । यो वा एतदक्षरं गार्ग्यविदित्वाऽस्माल्लोकात्प्रैति स कृपणोऽथ य एतदक्षरं गार्गि विदित्वाऽस्माल्लोकात्प्रेति स ब्राह्मणः ॥ १०

अन्वयार्थ—हे गार्गि, [यः वै एतत् अक्षरं अविदित्वा अस्मिन् लोके जुहोति यजते—] जो या अक्षराला न जाणून या लोकीं होम करतो, याग करतो, [बहूनि वर्षसहस्राणि तपः तप्यते—] अनेक सहस्र वर्षें तप करतो [अस्य तत् अंतवत एव भवति—] त्याचें तें सर्व फल अंतवत्च होतें.(अर्थात् कर्मानें संसाराचा विच्छेद होत नाहीं.) [गार्गि यः वै एतत् अक्षरं अविदित्वा अस्मात् लोकात् प्रैति—] हे गार्गि, जो या अक्षराला न जाणून या लोकांतून मरून जातो [सः कृपणः—] तो कृपण [अथ गार्गि यः एतत अक्षरं विदित्वा अस्मात् लोकात् प्रैति—] व हे गार्गि, जो या अक्षराला जाणून या लोकांतून मरून जातो [सः ब्राह्मणः—] तो ब्राह्मण होय १०.—अग्नीच्या दहनाप्रमाणें व प्रकाशकत्वाप्रमाणें अचेतनाचेंच प्रशास्तृत्व स्वाभाविक आहे, असें प्रधानवादी सांख्य म्हणतात, ह्मणून याज्ञवल्क्य सांगतात—

तद्वा एतदक्षरं गार्ग्यदृष्टं द्रष्टृश्रुतꣳश्रोत्रमतं मन्त्रविज्ञातं विज्ञातृ नान्यदतोऽस्ति द्रष्टृ नान्यदतोऽस्ति श्रोतृ नान्यदतोऽस्ति मन्तृ नान्यदतोऽस्ति विज्ञात्रेतस्मिन्नु खल्वक्षरे गार्ग्याकाश ओतश्च प्रोतश्चेति ॥ ११

अन्वयार्थ—हे गार्गि, [तत् वै एतत् अक्षरं अदृष्टं द्रष्टृ अश्रुतं श्रोतृ अमतं मन्तृ अविज्ञातं विज्ञातृ—] तेंच हें अक्षर अदृष्ट पण द्रष्टृ, अश्रुत पण

श्रोतृ, अमत पण मन्तृ—मनन करणारें, अविज्ञात पण विज्ञातृ आहे. [अतः अन्यत् द्रष्टृ न अस्ति—] याहून अन्य द्रष्टृ—पाहणारें नाहीं, [अतः अन्यत्०—] याहून दुसरें श्रोतृ नाहीं, याहून दुसरें कोणी मनन करणारें नाहीं, याहून आणखी कोणी विज्ञातृ नाहीं. हे गार्गि, [एतस्मिन् नु खलु अक्षरे आकाशः ओतः च प्रोतः च इति—] खरोखर या अक्षरांत आकाश ओत व प्रोत आहे ११.

सा होवाच ब्राह्मणा भगवन्तस्तदेव बहु मन्येध्वं यदस्मान्नमस्कारेण मुच्येध्वं न वै जातु युष्माकमिमं कश्चिद्ब्रह्मोद्यं जेतेति ततो ह वाचक्नव्युपरराम ॥ १२

अन्वयार्थ—[सा ह उवाच—] ती म्हणाली—[भगवन्तः ब्राह्मणाः—] "हे पूज्य ब्राह्मणहो, [यत् अस्मात् नमस्कारेण मुच्येध्वं तत् एव बहु मन्येध्वं—] या याज्ञवल्क्याला नमस्कार करून तुम्ही मुक्त झालांत तर तेंच पुष्कळ झालें असें समजा. [युष्माकं कश्चित् इमं ब्रह्मोद्यं जातु न वै जेता—] तुम्हांपैकीं कोणीहि याला ब्रह्मविषयक भाषणांत केव्हांहि जिंकणार नाहीं."[ततः वाचक्नवी उपरराम—]त्यानंतर वाचक्नवी उपराम पावली (भाष्यार्थ पहा.)१२(८)

—देवतांचा प्राणापर्यंत संकोच व आनन्त्यापर्यंत विकास सांगून त्यानंतर वस्तूचा निर्देश करावा यासाठीं पुढील ब्राह्मणाचा आरंभ—

अथ हैनं विदग्धः शाकल्यः पप्रच्छ कति देवा याज्ञवल्क्येति स हैतयैव निविदा प्रतिपेदे यावन्तो वैश्वदेवस्य निविद्युच्यन्ते त्रयश्च त्री च शता त्रयश्च त्री च सहस्रेत्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येति त्रयस्त्रिꣳशदित्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येति षडित्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येति त्रय इत्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येति द्वावित्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येत्यध्यर्ध इत्योमिति होवाच कत्येव देवा याज्ञवल्क्येत्येक इत्योमिति होवाच कतमे ते त्रयश्च त्री च शता त्रयश्च त्री च सहस्रेति ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह एनं०—] त्यानंतर याज्ञवल्क्याला विदग्ध शाकल्य विचारूं लागला—"हे याज्ञवल्क्या [देवाः कति—] देव किती आहेत ?"

तेव्हां [स एतया एव निविदा प्रतिपेदे–] याज्ञवल्क्य या पुढील निविदेनेंच सांगता झाला. [यावन्तः वैश्वदेवस्य निविदि उच्यन्ते–] " जितके वैश्वदेवाच्या निविदेंत सांगितले जातात तितके देव आहेत. [त्रयः च त्री च शता०–] तीन व तीनशें आणि तीन व तीन सहस्र (म्ह० तीन सहस्र तीनशें सहा) इतके देव आहेत " शाकल्य ह्मणतो–'ठीक आहे.' पुनः विचारतो–[कति एव देवाः०–] " याज्ञवल्क्या देव किती आहेत ? " याज्ञवल्क्य–'तेतीस' शाकल्य– " ठीक आहे. याज्ञवल्क्या, देव किती आहेत ? " याज्ञ०–'सहा' शाक०–'ठीक आहे. याज्ञवल्क्या, देव किती आहेत ?' याज्ञ०–'तीन आहेत.' शाक०– 'ठीक आहे. याज्ञवल्क्या, देव किती आहेत ?' याज्ञ०–'दोन.' शाकल्य– ' ठीक आहे. याज्ञवल्क्या, देव किती आहेत ? ' याज्ञ०–'दीड आहे.' शाकल्य–' ठीक आहे, याज्ञवल्क्या, देव किती आहेत ?' याज्ञवल्क्य–' एक आहे.' शाकल्य–' ठीक आहे. आतां ते तीन व तीनशें आणि तीन व तीन सहस्र देव कोणते ? ' १.

स होवाच महिमान एवैषामेते त्रयस्त्रिꣳशत्त्वेव देवा इति कतमे ते त्रयस्त्रिꣳशदित्यष्टौ वसव एकादश रुद्रा द्वादशाऽऽदित्यास्त एकत्रिꣳशदिन्द्रश्चैव प्रजापतिश्च त्रयस्त्रिꣳशाविति ॥२

अन्वयार्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला–[एते एषां महिमानः एव–] " तीन सहस्र तीनशें सहा देव ह्या खऱ्या तेतीस देवांच्या विभूति आहेत.[त्रयस्त्रिंशत् तु एव देवाः–] वस्तुतः तेतीसच देव आहेत. " शाकल्य–[कतमे त्रयस्त्रिंशत् इति–] 'ते तेतीस कोणते ?' याज्ञवल्क्य–[अष्टौ वसवः०–] 'आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, मिळून एकतीस आणि इंद्र व प्रजापति हे दोन मिळून तेतीस' २.

कतमे वसव इत्यग्निश्च पृथिवी च वायुश्चान्तरिक्षं चाऽऽदित्यश्च द्यौश्च चन्द्रमाश्च नक्षत्राणि चैते वसव एतेषु हीदꣳसर्वꣳ हितमिति तस्माद्वसव इति ॥ ३

अन्वयार्थ—शाकल्य–[कतमे वसवः०–] " वसु कोणते ? " याज्ञवल्क्य–" अग्नि, पृथिवी, वायु, अन्तरिक्ष, आदित्य, द्यौ, चंद्रमा, नक्षत्रें, हे वसु आहेत. यांच्यामध्येंच हें जगत् स्थापिलेलें आहे. ह्मणून ते वसू होत " ३.

कतमे रुद्रा इति दशेमे पुरुषे प्राणा आत्मैकादशस्ते यदाऽस्माच्छरीरान्मर्त्यादुत्क्रामन्त्यथ रोदयन्ति तद्यद्रोदयन्ति तस्मादुद्रा इति ॥ ४

अन्वयार्थ—शाकल्य—[कतमे रुद्राः०—] "रुद्र कोणते ?" याज्ञवल्क्य—" या पुरुषांतील हे दहा प्राण—ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें, आणि आत्मा म्ह० मन अकरावें. [ते यदा अस्मात् मर्त्यात् शरीरात् उत्क्रामन्ति—] ते जेव्हां या मर्त्य शरीरांतून उत्क्रमण करितात [अथ रोदयन्ति—] तेव्हां रडवितात. [तत् यद्०—] मरणसमयीं ज्यापक्षीं रडवितात त्यापक्षीं रुद्र हें नांव त्यांस प्राप्त होतें." सु. ब्र. पृ. २३४. पहा. ४.

कतम आदित्या इति द्वादश वै मासाः संवत्सरस्यैत आदित्या एते हीदꣳसर्वमाददाना यन्ति ते यदिदꣳसर्वमाददाना यन्ति तस्मादादित्या इति ॥ ५

अन्वयार्थ—प्रश्न—[कतमे०—] आदित्य कोणते ? उत्तर—[द्वादश वै०—] बारा मास संवत्सरसंज्ञक कालाचे अवयव प्रसिद्ध आहेत, तेच आदित्य होत. ते कसे ? [हि एते इदं सर्वं०—] ज्याअर्थीं हेच पुनः पुनः परिवर्तन करीत राहणारे मास प्राण्यांचीं आयुष्यें व कर्मफल यांचें ग्रहण करणारे असे होत्साते जातात, [ते यदिदं०] ते ज्याअर्थीं याप्रमाणें हें सर्व ग्रहण करणारे असे जातात त्याअर्थीं ते आदित्य होत, असा भावार्थ. ५

कतम इन्द्रः कतमः प्रजापतिरिति स्तनयित्नुरेवेन्द्रो यज्ञः प्रजापतिरिति कतमः स्तयियित्नुरित्यशनिरिति कतमो यज्ञ इति पशव इति ॥ ६

अन्वयार्थ—शाकल्य—" इंद्र कोणता व प्रजापति कोणता ? "याज्ञवल्क्य—" स्तनयित्नु—मेघ हाच इंद्र व यज्ञ हाच प्रजापति." शाकल्य—" स्तनयित्नु कोणता ? " याज्ञ०—" अशनि हा स्तनयित्नु. " शाक०—" यज्ञ कोणते ? " याज्ञ०—" पशू हाच यज्ञ. " ६

कतमे षडित्यग्निश्च पृथिवी च वायुश्चान्तरिक्षं चादित्यश्च द्यौश्चैते षडेते हीदꣳसर्वꣳ षडिति ॥ ७

अन्वयार्थ—शाकल्य—" सहा कोणते ? " याज्ञवल्क्य—" अग्नि, पृथिवी, वायु, अन्तरिक्ष, आदित्य व द्यौ हे सहा देव आहेत. [एते हि षड् इदं सर्वं—] हे सहाच हें सर्व आहे." ७.

कतमे ते त्रयो देवा इतीम एव त्रयो लोका एषु हीमे सर्वे देवा इति कतमौ तौ द्वौ देवावित्यन्नं चैव प्राणश्चेति कतमोऽध्यर्ध इति योऽयं पवत इति ॥ ८

अन्वयार्थ—शाकल्य—" ते तीन देव कोणते ? " याज्ञवल्क्य—" हेच तीन लोक. कारण यांमध्येंच हे सर्व देव आहेत. " शाकल्य—" ते दोन देव कोणते ? " याज्ञवल्क्य—" अन्न व प्राण. " शाकल्य—" अध्यर्ध देव कोणता ? " याज्ञवल्क्य—" जो वाहतो तो अध्यर्ध—दीड देव आहे. " ८

तदाहुर्यदयमेक इवैव पवतेऽथ कथमध्यर्ध इति यदस्मिन्निदꣳसर्वमध्याप्नोत्तेनाध्यर्ध इति कतम एको देव इति प्राण इति स ब्रह्म त्यदित्याचक्षते ॥ ९

अन्वयार्थ—[तत् आहुः यत् अयं एकः इव एव पवते—] त्याविषयीं प्रश्न करितात—कीं हा वायु एकटाच वहातो. [अथ कथं अध्यर्धः इति—] मग असें असतां अध्यर्ध—दीड असें कसें ह्मणतां ? (उत्तर—) [यत् अस्मिन् इदं सर्वं अधि आप्नोत्—] ज्याअर्थी हा वायु असला तरच हें सर्व ऋद्धीला प्राप्त होतें [तेन अध्यर्धः इति—] त्याअर्थी त्याला ' अध्यर्ध ' असें ह्मणतात. शाकल्य—[कतमः एकः देवः—] " एक देव कोणता ? " याज्ञवल्क्य—[प्राणः इति—] प्राण हाच एक देव आहे. [सः ब्रह्म—] तो प्राण ब्रह्म आहे. [त्यत् इति आचक्षते—] त्यालाच ' त्यत् ' असें ह्मणतात. ९—याप्रमाणें संकोचविस्तारानें प्राणस्वरूप सांगितलें. आतां त्यांचाच ध्यानसौकर्यासाठीं पुनः अष्टधा भेद सांगितला जातो—

पृथिव्येव यस्याऽऽयतनमग्निर्लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳस वै वेदिता स्यात् याज्ञवल्क्य । वेद वा अहं तं पुरुषꣳसर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ । य एवायꣳशारीरः पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेत्यमृतमिति होवाच ॥ १०

अन्वयार्थ—[पृथिवी एव यस्य आयतनं—] पृथिवीच ज्या देवाचें आयतन—आश्रय—शरीर आहे, [अग्निः लोकः—] अग्नि हा लोक—दर्शनशक्ति आहे, [मनः ज्योतिः—] मन ज्योति—संकल्प-विकल्प करण्याचें साधन आहे, [यः

वै तं पुरुषं सर्वस्य आत्मनः परायणं विद्यात्–] जो त्या पृथिव्यभिमानी पुरुषाला–आध्यात्मिक कार्यकरणसमूहाच्या–शरीरेंद्रिय-संघाताच्या परम आश्रयाला जाणतो [याज्ञवल्क्य सः वै वेदिता स्यात्–] याज्ञवल्क्या, तोच ज्ञाता–पंडित आहे. पण तूं त्याला न जाणतांच नुस्ता पंडिताभिमानी आहेस. याज्ञवल्क्य म्हणतो–[यं सर्वस्य आत्मनः परायणं आत्थ तं अहं वेद वै–] जर त्या पुरुषाच्या ज्ञानानेंच पांडित्य प्राप्त होत असेल तर तूं ज्याला सर्व शरीरेंद्रिय-संघातांचें परायण म्हणून म्हणतोस त्याला मी जाणतोंच. (शाकल्य– ' पण तूं त्याला जर जाणतोस तर तो कोणत्या विशेषणांनीं विशिष्ट आहे तें सांग पाहूं. ') याज्ञवल्क्य–[यः एव अयं शारीरः पुरुषः सः एषः एव–] ' शाकल्या, जो हा शारीर–पार्थिवांश शरीरांत असणारा मातृजन्य त्वङ्मांस-रुधिररूप पुरुष तोच तूं विचारलेला हा पुरुष आहे. (पण अद्यापि त्या पृथिवी-देवाचा पूर्णपणें निर्णय झाला नाहीं. म्हणून–) [शाकल्य तस्य का देवता इति वद एव–) हे शाकल्या, त्या पुरुषाची देवता कोणती आहे, असें विचारत्च. ' तेव्हां रागावलेला शाकल्य म्हणतो–' त्या शारीर देवाची देवता कोणती ? ' याज्ञवल्क्य–[अमृतं इति०–] ' अमृत–खाल्लेल्या अन्नाचा रस –मातृजन्य लोहिताचें कारण ही त्याची देवता आहे ' १०.

काम एव यस्याऽऽयतनꣳहृदयं लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳस वै वेदिता स्याद्याज्ञवल्क्य । वेद वा अहं तं पुरुषꣳसर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायं काममयः पुरुषः स एष वैदैव शाकल्य तस्य का देवतेति स्त्रिय इति होवाच ॥ ११

अन्वयार्थ—[कामः एव यस्य आयतनं–]'कामच ज्याचें आयतन आहे, [हृदयं लोकः–] हृदय लोक आहे व [मनः ज्योतिः–] मन ज्योति आहे, [सर्वस्य आत्मनः परायणं तं पुरुषं यः वै विद्यात् सः वै वेदिता स्यात्–]सर्वांच्या कार्य-करणसंघाताचें परायण अशा त्या पुरुषाला जो जाणतो तोच पंडित होतो. परंतु–याज्ञवल्क्या, तूं वृथा पंडिताभिमानी आहेस ' याज्ञवल्क्य–'' शाकल्या, [त्वं यं आत्थ तं सर्वस्य आत्मनः परायणं पुरुषं अहं वेद वै–] तूं ज्याला सांगतोस त्या सर्वांच्या आत्म्याच्या–शरीरेंद्रियसमूहाच्या परायणभूत पुरुषास

मी जाणतों.'' (शाकल्य–'' जर तूं जाणत असशील तर सांग–'') याज्ञ० [यः एव अयं काममयः पुरुषः सः एषः–] ' जो हा काममय पुरुष तोच हा होय. [शाकल्य वद एव–] शाकल्या, बोलच ' (आणखी विचार) शाकल्य–[तस्य का देवता इति–] ' त्याची देवता कोणती ? ' [स्त्रियः इति ह उवाच–] ' स्त्रिया, ही त्याची देवता आहे,' असें याज्ञवल्क्य म्हणाला.११

रूपाण्येव यस्याऽऽयतनं चक्षुर्लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात् याज्ञवल्क्य । वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवासावादित्ये पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेति सत्यमिति होवाच ॥ १२

अन्वयार्थ—रूपें हेंच ज्या कामाचें शरीर आहे, चक्षु हा लोक–दर्शनसाधन आहे, मन ज्योति आहे, सर्वांच्या शरीरेंद्रियात्म्याचें परायण अशा त्या पुरुषाला जो जाणतो तो पंडित होतो. पण याज्ञवल्क्या, तूं नुस्ता पंडिताभिमानी आहेस. याज्ञ०–'तूं सर्वांच्या आत्म्याचें परायण ज्याला म्हणतोस त्या पुरुषाला मी जाणतोंच.' (जाणतोस तर सांग–) ' जो हा आदित्यांत पुरुष आहे तोच हा होय. शाकल्या, बोलच (आणखी विचार)' प्रश्न–त्याची देवता कोण आहे! उत्तर–'सत्य ही त्याची देवता आहे,' असें याज्ञवल्क्य म्हणाला १२.

आकाश एव यस्याऽऽयतनꣳश्रोत्रं लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात् । याज्ञवल्क्य वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायꣳश्रोत्रः प्रातिश्रुत्कः पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेति दिश इति होवाच ॥ १३

अन्वयार्थ—[आकाशः एव०–] आकाशच ज्याचें आयतन आहे, श्रोत्र लोक आहे व मन ज्योति आहे. [यः वै तं०–] जो त्या पुरुषाला–सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला जाणतो तोच पंडित होतो.–पण याज्ञवल्क्या, तूं नुस्ता पंडिताभिमानी आहेस. याज्ञवल्क्य–[यं आत्थ०–] ज्याला तूं सांगतोस त्या पुरुषाला–सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला मी जाणतों [यः एव अयं श्रोत्रः प्रातिश्रुत्कः पुरुषः सः एषः–] हा जो श्रोत्रांतील प्रतिश्रवणाच्या

वेळीं विशेषतः होणारा पुरुष तोच हा होय. शाकल्या, आणखीं बोलच. प्र०—'त्याची कोणती देवता ?' उ०—'दिशा, ही त्याची देवता आहे,' असें याज्ञवल्क्य म्हणाला १३.

तम एव यस्याऽऽयतनꣳ हृदयं लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात्। याज्ञवल्क्य वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायं छायामयः पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेति मृत्युरिति होवाच ॥ १४

अन्वयार्थ—[तमः एव०—] तम हेंच ज्याचें आयतन आहे, हृदय लोक आहे, मन ज्योति आहे, [यः वै०—] जो त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला जाणतो तोच पंडित होतो. याज्ञवल्क्या, तूं त्याला न जाणतांच पंडिताभिमानी आहेस. याज्ञवल्क्य—[यं आत्थ०—] जो तूं सांगतोस त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला मी जाणतों. [यः एव अयं छायामयः पुरुषः०—] जो हा छायामय पुरुष तोच हा आहे. शाकल्या, आणखी विचारच. प्र०—'त्याची देवता कोण आहे ?' उ०—'मृत्यु ही त्याची देवता आहे,' असें याज्ञवल्क्य म्हणाला. १४.

रूपाण्येव यस्याऽऽयतनं चक्षुर्लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात्। याज्ञवल्क्य वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायमादर्शे पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेत्यसुरिति होवाच ॥ १५

अन्वयार्थ—[रूपाणि०—] रूपेंच ज्याचें आयतन आहे, चक्षु लोक—दर्शनसाधन आहे, मन ज्योति आहे. [यः तं०—] जो त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला जाणतो तो पंडित होतो. याज्ञवल्क्या, तूं त्याला न जाणतांच पंडिताभिमानी आहेस. याज्ञ०—[यं आत्थ०—] जो तूं सांगत आहेस त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला मी जाणतोंच. [यः अयं आदर्शे०—] हा जो आदर्शांत—आरशांत पुरुष आहे तोच तो. हे शाकल्या,

तूं आणखीं बोलच. प्र०—'त्याची देवता कोणती?' उ०—'असु'—प्राण ही त्याची देवता आहे, असें याज्ञवल्क्य ह्मणाला. १५.

आप एव यस्याऽऽयतनꣳ हृदयं लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात्। याज्ञवल्क्य वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायमप्सु पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेति वरुण इति होवाच ॥ १६

अन्वयार्थ—आपच ज्याचें आयतन, हृदय लोक व मन ज्योति आहे. जो त्या पुरुषाला—सर्वांच्या शरीरेंद्रियसंघाताच्या परायणाला जाणतो तो पंडित होतो. याज्ञवल्क्या, तूं त्याला न जाणतांच पंडिताभिमानी आहेस. याज्ञ०—तूं जो सांगतोस त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला मी जाणतोंच. हा जो आपांतील पुरुष तोच तो. हे शाकल्या, आणखीं बोलच. प्र०—'त्याची देवता कोणती ?' उ०—' वरुण-' असें तो ह्मणाला. १६.

रेत एव यस्याऽऽयतनꣳ हृदयं लोको मनो ज्योतिर्यो वै तं पुरुषं विद्यात्सर्वस्याऽऽत्मनः परायणꣳ स वै वेदिता स्यात्। याज्ञवल्क्य वेद वा अहं तं पुरुषꣳ सर्वस्याऽऽत्मनः परायणं यमात्थ य एवायं पुत्रमयः पुरुषः स एष वदैव शाकल्य तस्य का देवतेति प्रजापतिरिति होवाच ॥ १७

अन्वयार्थ—रेतच ज्याचें आयतन आहे, हृदय लोक व मन ज्योति आहे, जो त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला जाणतो तोच पंडित होतो. याज्ञवल्क्या, तूं त्याला न जाणतांच पंडिताभिमानी आहेस. याज्ञवल्क्य—जो तूं सांगत आहेस त्या पुरुषाला—सर्वांच्या आत्म्याच्या परायणाला मी जाणतोंच. हा जो पुत्रमय पुरुष तोच हा होय. हे शाकल्या, विचारच. शाकल्य—'त्याची देवता कोण ?' 'प्रजापति त्याची देवता आहे,' असें याज्ञवल्क्य ह्मणाला. १७.

—लोक म्हणजे सामान्याकार, पुरुष—विशेष पदार्थांतील अवच्छेद व देव—त्यांचें कारण, याप्रमाणें तीन तीन प्रकारें आपल्याला प्रविभक्त करून अवस्थित असलेला जो एकेक देव सांगितला तो प्राणच सूत्रात्मा आहे. कारण पूर्वोक्त सर्व हा त्याचाच भेद असून तोच उपासनेसाठीं आठ प्रकारचा वर सांगितला आहे.

आतां दिग्विभागानें पांच प्रकारें प्रविभक्त झालेल्या सर्व जगाचा आत्म्यामध्यें-हृदयांत उपसंहार करण्यासाठीं श्रुति सांगते--

शाकल्येति होवाच याज्ञवल्क्यस्त्वा᳕ स्विदिमे ब्राह्मणा अङ्गारावक्षयणमक्रता३ इति ॥ १८

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्यः शाकल्य इति ह उवाच–] याज्ञवल्क्य 'हे शाकल्या,' असें ह्मणाला–[त्वां स्विद् इमे ब्राह्मणाः अंगारावक्षयणं अक्रत इति–] तुला खरोखर हे ब्राह्मण कोळसे काढण्याचा चिमटा वगैरे करते झाले आहेत ! (म्ह० तुला पुढें करून वाद करवीत आहेत. पण तूं विचार कर. मजकडून तूं जाळला जात आहेस, हें तुझ्या ध्यानांत येत नाहीं.) १८.–पण या हितोपदेशालाहि विपरीत समजून शाकल्य म्हणतो—

याज्ञवल्क्येति होवाच शाकल्यो यदिदं कुरुपञ्चालानां ब्राह्मणानत्यवादीः किं ब्रह्म विद्वानिति दिशो वेद सदेवा सप्रतिष्ठा इति यद्दिशो वेत्थ सदेवाः सप्रतिष्ठाः ॥ १९

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्य इति०–] 'हे याज्ञवल्क्या,' असें शाकल्य म्हणाला–[कुरुपंचालानां ब्राह्मणान् यत् इदं अत्यवादीः–] "कुरुपंचाल देशांतील ब्राह्मणांना उद्देशून तूं जें हें अतिभाषण केलें आहेस [तत् किं ब्रह्म विद्वान् इति–] तें तूं काय ब्रह्मवेत्ता आहेस ह्मणून ?" याज्ञवल्क्य–[दिशः वेद–] "मी दिशांविषयींचें ज्ञान जाणतों, [सदेवाः सप्रतिष्ठाः इति–] त्या दिशांना देवांसह व प्रतिष्ठांसह जाणतों." शाकल्य–[यत् सदेवाः सप्रतिष्ठाः दिशः वेत्थ–] "जर तूं देवांसह व प्रतिष्ठांसह दिशांना जाणतोस (तर तूं सफल विज्ञानाची प्रतिज्ञा केली आहेस.)" १९

किंदेवतोऽस्यां प्राच्यां दिश्यसीत्यादित्यदेवत इति स आदित्यः कस्मिन्प्रतिष्ठित इति चक्षुषीति कस्मिन्नु चक्षुः प्रतिष्ठितमिति रूपेष्विति चक्षुषा हि रूपाणि पश्यति कस्मिन्नु रूपाणि प्रतिष्ठितानीति हृदय इति होवाच हृदयेन हि रूपाणि जानाति हृदये ह्येव रूपाणि प्रतिष्ठितानि भवन्तीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ २०

अन्वयार्थ—शाकल्य–[अस्यां प्राच्यां दिशि किंदेवतः असि–] 'या पूर्व दिशेंत आदित्यभूत अशा तुझी कोणती देवता आहे ? तूं किंदैवत आहेस ?' याज्ञवल्क्य–[आदित्यदेवतः इति–] 'मी आदित्यदेवत आहें. प्रश्न–[सः आदित्यः०–] 'तो आदित्य कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' उत्तर–[चक्षुषि इति–] 'चक्षूमध्यें.' प्रश्न–[चक्षुः०–] 'चक्षु कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' उत्तर–[रूपेषु इति–]'रूपांमध्यें. [हि चक्षुषा रूपाणि पश्यति–]कारण चक्षूनेंच रूपें पाहतो.' प्रश्न–[रूपाणि कस्मिन्नु प्रतिष्ठितानि–] 'रूपें कशामध्यें प्रतिष्ठित आहेत ?' उत्तर–[हृदये इति ह उवाच–] 'हृदयामध्यें, असें ह्मणाला [हि हृदयेन रूपाणि जानाति–] कारण हृदयानेंच रूपें जाणतो. [हृदये हि एव०–] यास्तव हृदयामध्येंच रूपें प्रतिष्ठित आहेत.' शाकल्य–[एवं एव०–] 'हे याज्ञवल्क्या, तूं ह्मणतोस तसेंच आहे.' (याचा भाष्यार्थ पहा.) २०.

किंदेवतोऽस्यां दक्षिणायां दिश्यसीति यमदेवत इति स यमः कस्मिन्प्रतिष्ठित इति यज्ञ इति कस्मिन्नु यज्ञः प्रतिष्ठित इति दक्षिणायामिति कस्मिन्नु दक्षिणा प्रतिष्ठितेति श्रद्धायामिति यदा ह्येव श्रद्दधात्यथ दक्षिणां ददाति श्रद्धाया ह्येव दक्षिणा प्रतिष्ठितेति कस्मिन्नु श्रद्धा प्रतिष्ठितेति हृदय इति होवाच हृदयेन हि श्रद्धा जानाति हृदये ह्येव श्रद्धा प्रतिष्ठिता भवतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥२१

अन्वयार्थ—'या दक्षिण दिशेमध्यें किंदेवत आहेस ?' 'यमदेवत आहें.' 'तो यम कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'यज्ञांत.' 'यज्ञ कशांत बरें प्रतिष्ठित आहे ?' 'दक्षिणेंत' 'दक्षिणा कशांत प्रतिष्ठित आहे ?' 'श्रद्धेंत. यजमान जेव्हां श्रद्धा ठेवतो तेव्हां दक्षिणा देतो. तस्मात् श्रद्धेंतच दक्षिणा प्रतिष्ठित आहे.' 'श्रद्धा कशांत प्रतिष्ठित आहे ?' 'हृदयांत' असें याज्ञवल्क्य ह्मणाला. 'हृदयानेंच श्रद्धेला जाणतो. हृदयांतच श्रद्धा प्रतिष्ठित होते.' शाकल्य–'याज्ञवल्क्या, असेंच आहे.' २१.

किंदेवतोऽस्यां प्रतीच्यां दिश्यसीति वरुणदेवत इति स वरुणः कस्मिन्प्रतिष्ठित इत्यप्स्विति कस्मिन्नप्वापः प्रतिष्ठिता इति रेतसीति कस्मिन्नु रेतः प्रतिष्ठितमिति हृदय इति तस्मादपि

प्रतिरूपं जातमाहुर्हृदयादिव सम्भो हृदयादिव निर्मित इति हृदये ह्येव रेतः प्रतिष्ठितं भवतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥

अन्वयार्थ—'या पश्चिम दिशेंत तूं किंदेवत आहेस ?' 'मी वरुणदेवत आहें.' 'तो वरुण कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'आपांमध्यें.' 'आप कशामध्यें प्रतिष्ठित आहेत ?' 'रेतामध्यें.' 'रेत कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'हृदयांत. म्हणून पित्याच्या अनुरूप झालेल्या पुत्राला लोक म्हणतात कीं हा जणुंकाय पित्याच्या हृदयापासूनच निघालेला आहे, जणुंकाय हृदयापासून निर्माण केलेला आहे. म्हणून हृदयांतच रेत प्रतिष्ठित होतें.' शाकल्य—"याज्ञवल्क्या, खरें आहे." २२.

किंदेवतोऽस्यामुदीच्यां दिश्यसीति सोमदेवत इति स सोमः कस्मिन्प्रतिष्ठित इति दीक्षायामिति । कस्मिन्नु दीक्षा प्रतिष्ठितेति सत्य इति तस्मादपि दीक्षितमाहुः सत्यं वदेति सत्ये ह्येव दीक्षा प्रतिष्ठितेति कस्मिन्नु सत्यं प्रतिष्ठितमिति हृदय इति होवाच हृदयेन हि सत्यं जानाति । हृदये ह्येव सत्यं प्रतिष्ठितं भवतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ २३

अन्वयार्थ—'या उत्तर दिशेंत तूं किंदेवत आहेस ?' 'सोमदेवत आहें.' 'तो सोम कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'दीक्षेमध्यें.' 'दीक्षा कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'सत्यामध्यें. म्हणूनच दीक्षिताला सत्य बोल, असें सांगतात. सत्यामध्येंच दीक्षा प्रतिष्ठित आहे,' 'सत्य कशामध्यें बरें प्रतिष्ठित आहे ?' 'हृदयामध्यें. हृदयानेंच सत्य जाणतो. म्हणून हृदयांतच सत्य प्रतिष्ठित होतें.' शाकल्य—'याज्ञवल्क्या, बरोबर आहे.' २३.

किंदेवतोऽस्यां ध्रुवायां दिश्यसीत्यग्निदेवत इति सोऽग्निः कस्मिन्प्रतिष्ठित इति वाचीति कस्मिन्नु वाक्प्रतिष्ठितेति हृदय इति कस्मिन्नु हृदयं प्रतिष्ठितमिति ॥ २४

अन्वयार्थ—'या ध्रुवा दिशेमध्यें तूं किंदेवत आहेस ?' 'माझी अग्नि ही देवता आहे.' 'तो अग्नि कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'वाक्-मध्यें.' 'वाक् कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' 'हृदयांत.' 'हृदय कशामध्यें प्रतिष्ठित आहे ?' (हे विभाग सांगणाऱ्या श्रुतीचा आशय असा—देव व प्रतिष्ठा यांसह

दिशा त्या नाम-रूप-कर्मात्मभूत याज्ञवल्क्याच्या आत्मभूत झाल्या. जें रूप तें पूर्व दिशेसह याज्ञवल्क्याच्या हृदयभूत झालें. जें केवल कर्म, पुत्रोत्पादनलक्षण कर्म व ज्ञानसहित कर्म, तें फल व अधिष्ठातृ देवता यांसह दक्षिणा, प्रतीची व उदीची या कर्मफलात्मिका दिशा त्याच्या हृदयासच प्राप्त झाल्या आहेत. ध्रुवा दिशेसह सर्व नाम वाक्-च्या द्वारा हृदयासच प्राप्त झालें आहे. नाम, रूप व कर्म ह्मणून जें कांही आहे, तें सर्व एवढेंच; आणि तें सर्व हृदयच आहे. यास्तव 'कस्मिन्नु हृदय प्रतिष्ठितं-' या वाक्यानें तें सर्वात्मक हृदयच विचारलें जातें. (याचा भाष्यार्थ पहा.) २४.

अहल्लिकेति होवाच याज्ञवल्क्यो यत्रैतदन्यत्रास्मन्मन्यासै यद्धये-तदन्यत्रास्मत्स्याच्छ्वानो वैनदद्युर्वयाꣳसि वैनद्विमथ्नीरन्निति २५

अन्वयार्थ—याज्ञवल्क्य 'अहल्लिका' असें ह्मणाला. [यत्र एतत् अस्मत् अन्यत्र मन्यासै—] ज्या वेळीं हें हृदय आह्मांपासून कोठें अन्य प्रदेशीं राहतें असें तूं मानशील (त्या वेळीं हें शरीर मृत होईल.) [यत् हि एतत अस्मत् अन्यत्र स्यात्—] जर हें हृदय आह्मांपासून अन्य प्रदेशीं राहील तर [एन श्वानः वा अद्युः—] त्याला कुत्रे खातील [वा वयांसि एनं विमथ्नीरन् इति—] किंवा पक्षी त्याला इकडे तिकडे ओढतील. (तस्मात् मजमध्यें—शरीरांत हृदय प्रतिष्ठित आहे.) २५.—यात्रमाणें कार्य—शरीर करणाची—हृदयाची प्रतिष्ठा आहे व हृदय शरीराची प्रतिष्ठा आहे, असें सांगितलें. ह्मणून शाकल्य ह्मणतो—

कस्मिन्नु त्वं चाऽऽत्मा च प्रतिष्ठितौ स्थ इति प्राण इति कस्मिन्नु प्राणः प्रतिष्ठित इत्यपान इति कस्मिन्न्व-पानः प्रतिष्ठित इति व्यान इति कस्मिन्नु व्यानः प्रतिष्ठित इत्युदान इति कस्मिन्नूदानः प्रतिष्ठित इति समान इति ।

अन्वयार्थ—[त्वं च आत्मा च कस्मिन् नु प्रतिष्ठितौ स्थः—] 'तूं व आत्मा ह्मणजे शरीर व हृदय कशांत प्रतिष्ठित आहांत ?' [प्राणे इति—] 'प्राणांत.' 'प्राण कशांत प्रतिष्ठित आहे ?' 'अपानांत.' 'अपान कशांत बरें प्रतिष्ठित आहे ?' 'व्यानांत.' 'व्यान कशांत प्रतिष्ठित आहे ?' 'उदानांत.' 'उदान कशांत प्रतिष्ठित आहे ?' 'समानांत.' (— आकाशापर्यंत हें सर्व

ष्याच्यामुळें नियत, ज्यांत प्रतिष्ठित व ओत-प्रोत आहे त्या निरुपाधिक साक्षात् अपरोक्ष ब्रह्माचा निर्देश करावा म्हणून हा पुढील आरंभ आहे–)

स एष नेति नेत्यात्माऽगृह्यो न हि गृह्यतेऽशीर्यो न हि शीर्यतेऽसङ्गो न हि सज्यतेऽसितो न व्यथते न रिष्यति।

अन्वयार्थ—[' नेति नेति ' इति सः एषः–] मधुकांडांत ' नेति नेति ' म्हणून ज्याचा निर्देश केला तो हा. [अगृह्यः–] तो आत्मा अगृह्य आहे. [हि न गृह्यते–] कारण त्याचें ग्रहण केलें जात नाहीं. तसाच [अशीर्यः–] ' अशीर्य आहे. ' [हि न शीर्यते–] कारण त्याचा नाश होत नाहीं. तसाच [असंगः–] असंग आहे, [न हि सज्यते–] आसक्त होत नाहीं. [असितः–] तो अबद्ध आहे. [न व्यथते–] त्याला व्यथा होत नाहीं. [न रिष्यति–] तो हिंसेला प्राप्त होत नाहीं. (श्रुतीनें क्रमाचें उल्लंघन करून व आख्यायिकेला सोडून औपनिषद पुरुषाचा हा स्वतःच त्वरेनें निर्देश केला आहे. याचा भाष्यार्थ पहा.)–श्रुति पुनः आख्यायिकेचाच आश्रय करून म्हणते—

एतान्यष्टावायतनान्यष्टौ लोका अष्टौ देवा अष्टौ पुरुषाः स यस्तान्पुरुषान्निरुह्य प्रत्युह्यात्यक्रामत्तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि तं चेन्मे न विवक्ष्यसि मूर्धा ते विपतिष्यतीति। तꣳह न मेने शाकल्यस्तस्य ह मूर्धा विपपाताऽपि हास्य परिमोषिणोऽस्थीन्यपजह्रुरन्यन्मन्यमानाः ॥ २६

अन्वयार्थ—[एतानि अष्टौ आयतनानि०–] हीं आठ आयतनें, आठ लोक, आठ देव, आठ पुरुष; [सः यः तान् पुरुषान् निरुह्य प्रत्युह्य अत्यक्रामत्–] तो जो त्या पुरुषांस निश्चयानें जाणून पुनः त्यांचा हृदयांत उपसंहार करून उपाधिधर्मांचें अतिक्रमण करता झाला [तं तु औपनिषदं पुरुषं पृच्छामि–] त्या औपनिषद पुरुषाला मी विचारतों. [तं चेत् मे न विवक्ष्यसि–] तो जर तूं मला स्पष्टपणें सांगणार नाहींस तर [ते मूर्धा विपतिष्यति इति–] तुझा मूर्धा पडेल, (असें याज्ञवल्क्य म्हणाला.) [तं शाकल्यः न मेने–] त्याला शाकल्य जाणत नव्हता. [तस्य ह मूर्धा विपपात–] त्याचा मूर्धा पडला–मस्तक गळून पडलें [परिमोषिणः अन्यत् मन्यमानाः अस्य अस्थीनि अपि ह अपजह्रुः–] इतकेंच नव्हे, तर चोर ' हें धनच आहे, ' असें सम-

जून त्याचीं हाडेंहि चोरून नेते झाले. २६—ज्या ब्रह्म 'नेति नेति' असा अन्यप्रतिषेधाच्या द्वारा निर्देश केला त्याचा विधिमुखानें कसा निर्देश करावा, म्हणून व जगाचें मूळ सांगावें म्हणून पुनः आख्यायिकेचाच आश्रय करून श्रुति सांगते—अब्रह्मज्ञ ब्राह्मणांना जिंकून गोधन हरण करावें, असा आख्यायिकासंबंध आहे. ब्राह्मणांचें धन त्यांच्या अनुमतीवांचून नेल्यास तें अनर्थाला कारण होईल. म्हणून त्यांचें अनुमोदन घेणें न्याय्य आहे, अशा आशयानें—

अथ होवाच ब्राह्मणा भगवन्तो यो वः कामयते स मा पृच्छतु सर्वे वा मा पृच्छत यो वः कामयते तं वः पृच्छामि सर्वान्वा वः पृच्छामीति ते ह ब्राह्मणा न दधृषुः ॥ २७

अन्वयार्थ—[अथ ह उवाच—] त्यानंतर ब्राह्मण मुकाट्यानें बसले असतां याज्ञवल्क्य म्हणाला—[भगवन्तः ब्राह्मणाः वः यः कामयते सः मा पृच्छतु—] "अहो पूज्य ब्राह्मणहो, तुम्हांपैकी ज्या कोणाची इच्छा असेल तो मला प्रश्न करूं दे. [सर्वे वा मा पृच्छत—] किंवा तुम्ही सर्व मला विचारा. तसेंच [वः यः कामयते वः तं पृच्छामि—] मीं विचारावें, अशी तुम्हांपैकीं ज्याची इच्छा असेल त्याला मी विचारतों. [वः सर्वान् वा पृच्छामि इति—] किंवा तुम्हां सर्वांनाच मी विचारतों." [ते ह ब्राह्मणाः न दधृषुः—] पण ते ब्राह्मण त्याला कांहींच प्रत्युत्तर देण्यास धजले नाहीत. २७—ते ब्राह्मण असे अप्रगल्भ झाले असतां आपल्या ज्ञानाचा उत्कर्ष प्रकट करण्यासाठी—

तान्हैतैः श्लोकैः पप्रच्छ यथा वृक्षो वनस्पतिस्तथैव पुरुषो मृषा। तस्य लोमानि पर्णानि त्वगस्योत्पाटिका बहिः॥ १

अन्वयार्थ—[तान् ह एतैः श्लोकैः पप्रच्छ—] त्यांना या श्लोकांनीं याज्ञवल्क्य विचारता झाला. [यथा वृक्षः वनस्पतिः—] ज्याप्रमाणें व्यवहारांत फार मोठा वृक्ष [तथा एव पुरुषः अमृषा—] तसाच पुरुष अमृषा म्हणजे सत्य आहे. [तस्य लोमानि पर्णानि—] पुरुषाचे जे लोम तींच वनस्पतीचीं पानें. [अस्य त्वक् बहिः उत्पाटिका—] पुरुषाची जी त्वचा ती वृक्षाची बाहेरची नीरस साल आहे.

त्वच एवास्य रुधिरं प्रस्यन्दि त्वच उत्पटः। तस्मात्तदाऽऽतृण्णात्प्रैति रसो वृक्षादिवाऽऽहतात् ॥ २

अन्वयार्थ—[अस्य त्वचः एव रुधिरं प्रस्यंदि–] पुरुषाच्या त्वचेपासूनच रक्त वाहतें, व [त्वचः उत्पटः–] वनस्पतीच्या त्वचेपासून चीक-डिंक निघतो. [तस्मात् आहतात् वृक्षात् रसः इव आतृण्णात् तत् प्रैति–] त्यामुळें तोडलेल्या वृक्षापासून जसा रस तसें हिंसा केलेल्या पुरुषापासून रक्त बाहेर पडतें.२.

मांसान्यस्य शकराणि किनाटꣳस्नाव ततिस्थिरम् ।
अस्थीन्यन्तरतो दारूणि मज्जा मज्जोपमा कृता ॥ ३

अन्वयार्थ—[अस्य मांसानि शकराणि–] या पुरुषाचें मांस हीं वृक्षाचीं शकलें–अन्तर्साल आहे. [किनाटं स्नावः–] वृक्षाचें किनाट–अन्तर्सालीच्या आंतील पातळ साल, त्या पुरुषाच्या शिरा होत. [तत् स्थिरं–] तें किनाट शरीरांतील शिरांप्रमाणें दृढच असतें. [अस्थीनि अन्तरतः दारूणि–] पुरुषाच्या शिरांच्या आंत असणाऱ्या अस्थी हीं वृक्षाच्या किनाटाच्या आंत असणारीं काष्ठें होत. [मज्जा मज्जोपमा कृता–] वनस्पतीच्या मज्जेला पुरुषाच्या मज्जेची उपमा केली आहे ३.

यद्वृक्षो वृक्णो रोहति मूलान्नवतरः पुनः । मर्त्यः
स्विन्मृत्युना वृक्णः कस्मान्मूलात्प्ररोहति ॥ ४

अन्वयार्थ—[यत् वृक्षः वृक्णः–] जर वृक्ष तोडला तर [पुनः मूलात् नवतरः रोहति–] तो पुनः मुळापासून पूर्वापेक्षां अधिक नूतन होऊन वाढतो. पण [मर्त्यः स्वित् मृत्युना वृक्णः–] मर्त्याला मृत्यूनें तोडलें असतां तो [कस्मात् मूलात् प्ररोहति–] कोणत्या मुळापासून प्ररोह पावतो ? (सांगा.) ४.

रेतस इति मा वोचत जीवतस्तत्प्रजायते ।
धानारुह इव वै वृक्षोऽञ्जसा प्रेत्य संभवः ॥ ५

अन्वयार्थ— [रेतसः इति मा वोचत–] रेतापासून असें म्हणूं नका. [जीवतः तत् प्रजायते–] कारण रेत जीवंत पुरुषापासून होतें. (वृक्ष व पुरुष यांचें वैधर्म्य–) [धानारुहः इव वै वृक्षः–] वृक्ष बीजापासूनहि वाढणारा असतो. (तो केवल कांडापासूनच होतो, असें नाहीं. बीजापासूनहि मरून उत्पत्ति होते.) [अंजसा प्रेत्य संभवः–] पण वनस्पतीपासून साक्षात उत्पत्ति होते. ५.

यत्समूलमावृहेयुर्वृक्षं न पुनराभवेत् । मर्त्यः
स्विन्मृत्युना वृक्णः कस्मान्मूलात्प्ररोहति ॥ ६

अन्वयार्थ—(तथापि वैधर्म्य कसें तें सांगतात—) [यत्—] जर [समूलं—] मुळासह किंवा बीजासह [वृक्षं आवृहेयुः—] वृक्षाला उपटलें तर [न पुनराभवेत्—] तो पुनः उत्पन्न होत नाहीं. (तर मग तशीच पुरुषाचीहि पुनरुत्पत्ति न होवो, अशी आशंका घेऊन पूर्वोक्तांचेंच निरसन करितात—) तस्मात् तुम्हांला मी सर्व जगाचेंच मूळ विचारतों [मर्त्यः स्विन्मृत्युना०—] मृत्यूकडून छिन्न झालेला मर्त्य कोणत्या मुळापासून पुनः उत्पन्न होतो ? ६—चार्वाकाचा स्वभाववाद उत्थापित करितात—

जात एव न जायते को न्वेनं जनयेत्पुनः । विज्ञानमानन्दं ब्रह्म रातिर्दातुः परायणं तिष्ठमानस्य तद्विद इति ॥७॥२८॥

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य नवम ब्राह्मणम् ॥ ९

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयोऽध्यायः ॥ ३

बृहदारण्यकक्रमेण पंचमोऽध्यायः ॥ ५

अन्वयार्थ—[जातः एव—] अहो तो उत्पन्न झालेलाच आहे; (त्याविषयीं काय विचारतां ?) [न—] असें नाहीं. [जायते—] मेलेलाहि उत्पन्न होतोच. [एनं कः नु पुनः जनयेत्—] तेव्हां या मृताला कोण बरें पुनः उत्पन्न करील ? (याचें उत्तर ब्राह्मण देऊं शकले नाहींत. ह्मणून श्रुति सांगते—) [विज्ञानं आनंदं ब्रह्म—] विज्ञान आनंद ब्रह्म. [रातिः दातुः परायणं—] तें धन देणाऱ्या —कर्म करणाऱ्या यजमानाचें परायण आहे—कर्मफल देणारें आहे, तसेंच तें [तिष्ठमानस्य तद्विदः इति—] ब्रह्मनिष्ठ होऊन राहणाऱ्या ब्रह्मवेत्त्याचेंहि परायण आहे. (मेलेला पुरुष पुनः ज्यापासून उत्पन्न होतो तें जगाचें मूळ ब्राह्मणांना कळलें नाहीं. याज्ञवल्क्याचें सर्वांत श्रेष्ठत्व सिद्ध झालें. ब्रह्मिष्ठत्वामुळें याज्ञवल्क्यानें गायींचें हरण केलें, ब्राह्मणांस जिंकलें. आख्यायिका समाप्त झाली. सर्व ब्राह्मण आपापल्या स्थानी गेले; शेवटीं स्वतः श्रुतीनेंच तें जगाचें मूळ कर्मठांचें व ब्रह्मज्ञांचें परायण—परागति ह्मणून सांगितलें. याचा भाष्यार्थ पहा.) ७. २८. (९).

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
बृहदारण्यकोपनिषदाचा तिसरा अध्याय समाप्त झाला.

अथ चतुर्थोऽध्यायः ।

—शारीरादि आठ पुरुषांचा विस्तारपूर्वक निर्देश करून, पुनः हृदयांत त्यांचा उपसंहार करून, पुनरपि प्राच्यादि दिशांच्या भेदानें पांच प्रकारें विस्तारपूर्वक व्यवहार करून त्यांचाहि हृदयांत उपसंहार करून, पुनः ज्यांना परस्परांचें प्रतिष्ठात्व आहे असें हृदय व शरीर यांचा प्राणादि पंचवृत्त्यात्मक समानाख्य जगदात्मभूत—अव्याकृत सूत्रामध्यें उपसंहार करून ज्यानें शरीर, हृदय व सूत्र या अवस्थेस प्राप्त झालेल्या जगदात्म्याचें म्ह० अव्याकृताचें अतिक्रमण केलें आहे, ज्याचा 'नेति नेति' असा निर्देश केला आहे व जो औपनिषद पुरुष, त्याचा साक्षात् व उपादानकारणस्वरूपानें 'विज्ञानमानन्दं' याप्रमाणें निर्देश केला. (आतां पुढील दोन ब्राह्मणांचें तात्पर्य सांगतात—) त्याचाच वागादिकांच्या अग्न्यादि देवताद्वारा पुनः अवबोध करावा, ह्मणून अवबोधाच्या दुसऱ्या उपायांसाठीं हा पुढील ब्राह्मणद्वयाचा आरंभ आहे. येथील आख्यायिका आचार प्रदर्शित करण्यासाठी आहे.

ॐ जनको ह वैदेह आसांचक्रेऽथ ह याज्ञवल्क्य आववाज । तꣳहोवाच याज्ञवल्क्य किमर्थमचारीः पशूनिच्छन्नण्वन्तानिति । उभयमेव सम्राडिति होवाच ॥ १

अन्वयार्थ—[जनकः ह०—] जनक वैदेह आसन करिता झाला. (आपली भेट घेण्यासाठी आलेल्यांस अवकाश देता झाला; त्यासाठी त्यानें एक स्थान व काल नियत केला, असा भावार्थ.) [अथ ह याज्ञवल्क्यः आववाज—] तेव्हां याज्ञवल्क्य आला. [तं ह उवाच—] त्याला जनक म्हणाला—[याज्ञवल्क्य किमर्थं अचारीः—] "याज्ञवल्क्या, कशासाठीं आलास? [पशून् इच्छन् अण्वन्तान् इति—] पशूंसाठीं कीं सूक्ष्मवस्तूचा निर्णय होईपर्यंत माझे प्रश्न ऐकण्यासाठीं?" त्यावर [उभयं एव सम्राड् इति०—] याज्ञवल्क्य ह्मणाला, "राजा, मी दोन्हीकरितां आलों आहें." १.

यत्ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्यब्रवीन्मे जित्वा शैलिनिर्वाग्वै ब्रह्मेति । यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तच्छै-

लिनिरब्रवीद्वाग्वै ब्रह्मेत्यवदतो हि किꣳस्यादिति ।
अब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदित्येकपा-
द्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य ॥

अन्वयार्थ—[कश्चित यत् ते अब्रवीत् तत शृणवाम इति अब्रवीत्–] ' कोणी आचार्य तुला जें सांगता झाला आहे (तुझ्या आचार्यानें तुला जें सांगितलें आहे) तें आम्ही ऐकतों, ' असें याज्ञवल्क्य म्हणाला. तेव्हां जनक बोलला–[जित्वा शैलिनिः वाक् वै ब्रह्म इति मे अब्रवीत्–] " जित्वा या नांवाचा शिलिनाचा पुत्र–शैलिनि मला " वाक् हेंच ब्रह्म आहे " असें सांगता झाला. " त्यावर याज्ञवल्क्य म्हणाला–[यथा मातृमान् पितृमान् आचार्यवान् ब्रूयात्–]"ज्याप्रमाणें मातृमान्, (ज्या पुत्राला अनुशासन करणारी माता आहे तो मातृमान् इत्यादि.) पितृमान् व आचार्यवान पुरुषानें सांगावें [तथा शैलिनिः वाक् वै ब्रह्म इति तत् अब्रवीत्–] त्याप्रमाणें जित्वा शैलिनीनें 'वाक्' हेंच ब्रह्म आहे ' असें सांगितलें आहे. [हि अवदतः किं स्यात्–] कारण जो बोलत नाहीं त्याला काय लाभ होणार ? [तु ते तस्य आयतनं प्रतिष्ठां अब्रवीत्–] परंतु त्यानें तुला त्या ब्रह्माचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली काय ? " जनक म्हणतो–[न मे अब्रवीत्–] " मला त्यानें तें सांगितलें नाहीं. " याज्ञवल्क्य म्हणतो–[सम्राड् एतत् एकपाद् वै–] " हे राजा, हें एकपाद ब्रह्म आहे. " जनक–[याज्ञवल्क्य सः वै नः ब्रूहि–] "तर मग याज्ञवल्क्या, तूं आम्हांला सांग."

वागेवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठा प्रज्ञेत्येनदुपासीत ।
का प्रज्ञता याज्ञवल्क्य । वागेव सम्राडिति होवाच ।
वाचा वै सम्राड्बन्धुः प्रज्ञायत ऋग्वेदो यजुर्वेदः
सामवेदोऽथर्वाङ्गिरस इतिहासः पुराणं विद्या उप-
निषदः श्लोकाः सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्या-
नानीष्टꣳहुतमाशितं पायितमयं च लोकः परश्च लोकः
सर्वाणि च भूतानि वाचैव सम्राट् प्रज्ञायन्ते ॥

अन्वयार्थ—याज्ञ०–[वाक् एव आयतनं०–]"वाक् हेंच त्याचें आयतन, आकाश प्रतिष्ठा, [प्रज्ञा इति एनत् उपासीत–] ' प्रज्ञा ' असें जाणून याची उपासना करावी. " जनक–" हे याज्ञवल्क्या, [का प्रज्ञता–] प्रज्ञता ती

कोणती ? " [वाक् एव सम्राड्–] ' वाक् हीच प्रज्ञता आहे ' असें याज्ञवल्क्य म्हणाला. "हे सम्राट्, [वाचा वै बंधुः प्रज्ञायते–] वाक्-नेंच बंधु जाणला जातो. [ऋग्वेदः०–] ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वाङ्गिरस, इतिहास, पुराण, विद्या, उपनिषदें, श्लोक, सूत्रें, अनुव्याख्यानें, इष्ट, हुत, आशित, पायित,(म्ह० याग, होम, अन्नदान, पानदान या निमित्तांनीं होणारें सर्व धर्म) हा लोक, पर लोक व सर्व भूतें हे राजा, [वाचा एव प्रज्ञायन्ते–]वाक्-नेंच जाणलीं जातात."

वाग्वै सम्राट् परमं ब्रह्म नैनं वाग्जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदुपास्ते। हस्त्यृषभꣳसहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति॥

अन्वयार्थ—" हे सम्राट्, [वाक् वै परमं ब्रह्म–] वाक् हेंच परं ब्रह्म आहे. [एनं वाक् न जहाति–] याप्रमाणें उपासना करणाऱ्याला वाक् सोडीत नाहीं. [सर्वाणि भूतानि एनं अभिक्षरन्ति–] सर्व भूतें याच्यावर बलिदानादिकांच्या योगानें उपकार करितात. [यः एवं विद्वान् एतत् उपास्ते–] जो असें जाणणारा याची उपासना करतो तो [देवः भूत्वा देवान् अप्येति–] येथेंच देव होऊन मरणोत्तर देवांमध्यें लय पावतो. " [वैदेहः जनकः ह उवाच–] वैदेह जनक म्हणाला–[सहस्रं हस्त्यृषभं ददामि इति–] " (या विद्येच्या निष्क्रयार्थ) मी तुला ज्या सहस्र गायींत एक हत्तीसारखा बैल आहे, अशीं एक सहस्र हस्त्यृषभ देतों. " पण त्यावर [सः ह याज्ञवल्क्यः उवाच–] याज्ञवल्क्य म्हणाला–[मे पिता अमन्यत अननुशिष्य न हरेत इति–] "माझा पिता असें समजत असे की, शिष्याला कृतार्थ केल्यावांचून त्याच्यापासून धन घेऊं नये."

यदेव ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्यब्रवीन्म उदङ्कः शौल्बायनः प्राणो वै ब्रह्मेति यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तच्छौल्बायनोऽब्रवीत्प्राणो वै ब्रह्मेत्यप्राणतो हि किꣳस्यादित्यब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदिति॥

अन्वयार्थ—याज्ञवल्क्य–[यदेव०–] ' जें तुला कोणीं सांगितलें असेल, तें आम्ही प्रथम ऐकतों' जनक–[शौल्बायनः उदंकः प्राणः वै ब्रह्म इति मे अब्रवीत्–] " शुल्बाचें अपत्य उदंक ' प्राणच ब्रह्म आहे ' असें मला सांगता

झाला. " याज्ञ०–[यथा मातृमान्–] "ज्याप्रमाणें एखाद्या मातृमान्, पितृमान्, आचार्यवान् आचार्यानें सांगावें तसेंच तो शौल्बायन ' प्राणो वै ब्रह्म० ' असें सांगता झाला. [हि अप्राणतः किं स्यात्–] कारण प्राणक्रिया न करणाराला काय लाभ होणार ? पण त्यानें तुला त्याचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली का?" जनक–' नाहीं, मला सांगितली नाहीं. '

एकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य प्राण एवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठा प्रियमित्येनदुपासीत का प्रियता याज्ञवल्क्य प्राण एव सम्राडिति होवाच प्राणस्य वै सम्राट्कामायायाज्यं याजयत्यप्रतिगृह्यस्य प्रतिगृह्णात्यपि तत्र वधाशङ्कं भवति यां दिशमेति प्राणस्यैव सम्राट् कामाय ॥

अन्वयार्थ––याज्ञ०– [एकपाद् वै–] ' हे राजा, हें एकपाद् ब्रह्म आहे. ' जनक–[सः वै नः०–] ' तर मग हे याज्ञवल्क्या, आम्हांला तें तूंच सांग.' याज्ञ०–[प्राणः एव आयतनं०–] ' प्राणच आयतन–शरीर असून अव्याकृताख्य आकाश प्रतिष्ठा आहे. [प्रियं इति एनत् उपासीत–] ' प्रिय ' असें समजून त्याची उपासना करावी. ' जनक–' हे याज्ञवल्क्या, [का प्रियता–] प्रियता काय आहे. ' याज्ञ०–[प्राणः एव०–] ' हे राजा, प्राणच प्रियता आहे. हे सम्राट्, [प्राणस्य वै कामाय अयाज्यं याजयति–] प्राणाच्याच करितां अयाज्याकडूनहि यजन करवितो. [अप्रतिगृह्यस्य अपि प्रतिगृह्णाति–] जो अप्रतिगृह्य–प्रतिग्रह घेण्यास अयोग्य असतो त्याच्यापासूनहि प्रतिग्रह घेतो.[यां दिशं एति तत्र वधाशंकं भवति–] ज्या दिशेस जातो त्या दिशेंत आपल्याला कोणी मारील, असा वधाविषयी साशंक होतो. हे राजा, [प्राणस्य एव कामाय–] हें सर्व प्राणाच्याच कामासाठीं होतें. '

प्राणो वै सम्राट् परमं ब्रह्म नैनं प्राणो जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदुपास्ते हस्त्यृषभꣳसहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति ॥

अन्वयार्थ—याज्ञ०–' हे राजन्, [प्राणः वै परमं ब्रह्म–] प्राणच परम ब्रह्म आहे. [एनं प्राणः न जहाति–] त्याला प्राण सोडीत नाहीं. [सर्वाणि

भूतानि०—]सर्व भूतें याच्यावर उपहारादिकांच्या द्वारा अभितः उपकार करितात. [यः एवं विद्वान्०—] जो याप्रमाणें जाणणारा या ब्रह्माची उपासना करतो तो देव होऊन देवांस प्राप्त होतो. ' त्यावर वैदेह जनक म्हणाला—" मी तुला एक सहस्र हस्त्यृषभ देतों. " पण तें ऐकून याज्ञवल्क्य म्हणतो—" शिष्याला कृतार्थ केल्यावांचून त्याचें धन घेऊं नये, असें माझा पिता समजत असे " ३

यदेव ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्यब्रवीन्मे बर्कुर्वार्ष्णश्चक्षुर्वै ब्रह्मेति यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तद्वार्ष्णोऽब्रवीच्चक्षुर्वै ब्रह्मेत्यपश्यतो हि किꣳस्यादित्यब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदिति ॥

अन्वयार्थ—याज्ञवल्क्य—'जो कोणी आचार्य तुला जें कांहीं बोलला असेल तेंच आम्ही ऐकूं. ' जनक—[वार्ष्णः बर्कुः०—] ' वृष्णाचें अपत्य बर्कु ' चक्षुर्वै ब्रह्म ' असें म्हणाला. ' याज्ञ०—'जसें मातृमान् , पितृमान्, आचार्यवान् आचार्य सांगतो तसेंच ' चक्षुर्वै ब्रह्म ' हें वार्ष्ण बोलला. [हि अपश्यतः किं स्यात्—] कारण न पाहणाऱ्याला काय लाभ होणार? पण त्यानें तुल त्याचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली का ? ' जनक—' त्यानें मला तें कांहीं सांगितलें नाहीं. '

एकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य चक्षुरेवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठा सत्यमित्येनदुपासीत का सत्यता याज्ञवल्क्य चक्षुरेव सम्राडिति होवाच चक्षुषा वै सम्राट् पश्यन्तमाहुरद्राक्षीरिति स आहाद्राक्षमिति तत्सत्यं भवति ॥

अन्वयार्थ—याज्ञ०—' हे राजा, हें एकपाद् ब्रह्म आहे.' जनक—' हे याज्ञवल्क्या, तूंच आम्हांस सांग ' याज्ञ०—' चक्षु हेंच आयतन—शरीर व अव्याकृत आकाश ही त्रिकालीं प्रतिष्ठा आहे. [सत्यं इति एनत् उपासीत—] ' सत्यं ' अशी त्याची उपासना करावी. ' जनक—' हे याज्ञवल्क्या, [का सत्यता—] सत्यता कोणती ? ' याज्ञ०—' हे सम्राट्, [चक्षुः एव—] चक्षु हीच सत्यता,' असें याज्ञवल्क्य म्हणाला—' हे राजा, [चक्षुषा पश्यन्तं आहुः अद्राक्षीः इति—] चक्षूनें पाहणाराला म्हणतात कीं तूं पाहिलेंस का ? व [सः आह अद्राक्षं इति—] तो म्हणतो—होय मीं पाहिलें [तत् सत्यं भवति—] तेंच सत्य होतें.'

चक्षुर्वै सम्राट् परमं ब्रह्म नैनं चक्षुर्जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदुपास्ते हस्त्यृषभꣳसहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति॥

अन्वयार्थ—'हे सम्राट्, [चक्षुः वै परमं ब्रह्म–] चक्षु हेंच परम ब्रह्म आहे. [एनं चक्षुः न जहाति–] अशी उपासना करणाराला चक्षु सोडीत नाहीं. [सर्वाणि भूतानि०–] सर्व भूतें याच्यावर सर्वतः उपकार करितात. [यः एवं विद्वान्०–] जो असें जाणणारा याची उपासना करितो तो देव होऊन देवांस प्राप्त होतो.' 'मी एक सहस्र हस्त्यृषभ तुला देतों,' असें वैदेह जनक म्हणाला. पण 'शिष्याला कृतार्थ केल्यावांचून त्याच्यापासून धन घेऊं नये असें माझा पिता समजत होता' असें याज्ञवल्क्य बोलला. ४.

यदेव ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्यब्रवीन्मे गर्दभीविपीतो भारद्वाजः श्रोत्रं वै ब्रह्मेति यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तद्भारद्वाजोऽब्रवीच्छ्रोत्रं वै ब्रह्मेत्यशृण्वतो हि किꣳस्यादित्यब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदिति ॥

अन्वयार्थ—[याज्ञ०–] 'ज्या कोणीं आचार्यानें तुला जें सांगितलें असेल तेंच ऐकूं.' जनक–'भारद्वाज गोत्राचा गर्दभीविपीत मला 'श्रोत्रं वै ब्रह्म' असें सांगता झाला.' याज्ञ०–'ज्याप्रमाणें एखाद्या मातृमान्, पितृमान्, आचार्यवान् आचार्यानें सांगावें तसेंच 'श्रोत्रं वै ब्रह्म' हें भारद्वाज बोलला. कारण जो न ऐकणारा त्याला काय लाभ होणार? पण त्यानें तुला त्याचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली का?' जनक–'त्यानें सांगितली नाहीं.'

एकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य श्रोत्रमेवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठाऽनन्त इत्येनदुपासीत काऽनन्तता याज्ञवल्क्य दिश एव सम्राडिति होवाच तस्माद्वै सम्राडपि यां कां च दिशं गच्छति नैवास्या अन्तं गच्छत्यनन्ता हि दिशो दिशो वै सम्राट् श्रोत्रम् ॥

अन्वयार्थ—याज्ञ०–'हे राजन् हें एकपाद् ब्रह्म आहे.' जनक–'तर मग हे याज्ञवल्क्या, तूंच तें मला सांग.' याज्ञ०–'श्रोत्रच त्याचें आयतन व आकाश

प्रतिष्ठा आहे. 'अनन्त' अशी याची उपासना करावी.' जनक–'हे याज्ञवल्क्या, अनन्तता कोणती?' याज्ञ०–'हे समाट्, दिशा हीच अनन्तता आहे. त्यामुळेंच हे राजन्, मनुष्य कोणत्याहि दिशेला जावो, तिच्या अन्तास पोंचत नाहीं. कारण दिशा अनन्त आहेत. राजा, दिशा हेंच श्रोत्र आहे.'

श्रोत्रं वै सम्राट् परमं ब्रह्म नैनꣳश्रोत्रं जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदुपास्ते हस्त्यृषभꣳसहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति ॥ ५

अन्वयार्थ—[याज्ञ०–] 'हे सम्राट्, श्रोत्रच परम ब्रह्म आहे. जो असें जाणणारा याची उपासना करितो त्याला श्रोत्र सोडीत नाहीं. सर्व भूतें त्यावर सर्वतः उपकार करितात. तो येथेंच देव होऊन देवांस प्राप्त होतो.' तेव्हां वैदेह जनक म्हणाला–'मी एकसहस्र हस्त्यृषभ देतों.'' पण याज्ञवल्क्य म्हणतो–''माझा पिता–'शिष्याला कृतार्थ केल्यावांचून त्याच्यापासून धन घेऊं नये,' असें समजत होता.'' ५

यदेव ते कश्चिदब्रवीत्तच्छ्रुणवामेत्यब्रवीन्मे सत्यकामो जाबालो मनो वै ब्रह्मेति यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तज्जाबालोऽब्रवीन्मनो वै ब्रह्मेत्यमनसो हि किꣳस्यादित्यब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदिति ॥

अन्वयार्थ—याज्ञ०–'जें तुला कोणी आचार्य सांगता झाला तेंच आम्हीं ऐकूं' जनक–'जबालेचें अपत्य–जाबाल सत्यकाम 'मनो वै ब्रह्म' असें सांगता झाला.' याज्ञ०–'मातृमान् पितृमान् व आचार्यवान् अशा आचार्यानें जसें सांगावें त्याचप्रमाणें 'मनो वै ब्रह्म' हें जाबाल बोलला. कारण मनानें शून्य असणाराला काय लाभ होणार? पण त्यानें तुला त्याचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली का?' जनक–'त्यानें मला सांगितली नाहीं.'

एकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य मन एवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठाऽऽनन्द इत्येनदुपासीत काऽऽ-

नन्दता याज्ञवल्क्य मन एव सम्राडिति होवाच मनसा वै सम्राट् स्त्रियमभिहार्यते तस्यां प्रतिरूपः पुत्रो जायते स आनन्दः ॥

अन्वयार्थ—याज्ञ०—'हे राजन्, हें एकपाद् ब्रह्म आहे.' जनक—'तर मग हे याज्ञवल्क्या, तूंच तें मला सांग.' याज्ञ०—'मन हेंच त्याचें आयतन, अव्याकृताकाश प्रतिष्ठा आहे. 'आनन्द' अशी त्याची उपासना करावी.' जनक—'हे याज्ञवल्क्या, आनन्दता कोणती ?' याज्ञ०—'हे सम्राट्, मन हीच आनन्दता आहे. हे राजन्, मनानेंच स्त्रीची इच्छा करतो. तिच्यामध्यें प्रतिरूप-अनुरूप पुत्र उत्पन्न होतो. तो आनंदाचा हेतु आहे.'

मनो वै सम्राट् परमं ब्रह्म नैनं मनो जहाति सर्वाण्येनं भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदुपास्ते हस्त्यृषभꣳसहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति ॥६

अन्वयार्थ—याज्ञ०—'हे राजन्, मनच ब्रह्म आहे. जो असें जाणणारा त्याची उपासना करतो त्याला मन सोडीत नाहीं. सर्व भूतें याच्यावर सर्वप्रकारें उपकार करितात व तो येथेंच देव होऊन मेल्यावर देवांस प्राप्त होतो.' वैदेह जनक म्हणाला—"मी तुला एक सहस्र हस्त्यृषभ देतों." पण त्यावर याज्ञवल्क्य म्हणतो—'शिष्याला उपदेशानें कृतार्थ केल्यावांचून त्याचें धन घेऊं नये, असें माझा पिता समजत होता' ६.

यदेव ते कश्चिदब्रवीत्तच्छृणवामेत्य वीन्मे विदग्धः शाकल्यो हृदयं वै ब्रह्मेति यथा मातृमान्पितृमानाचार्यवान्ब्रूयात्तथा तच्छाकल्योऽब्रवीद्धृदयं वै ब्रह्मेत्यदहृयस्य हि किꣳस्यादित्यब्रवीत्तु ते तस्याऽऽयतनं प्रतिष्ठां न मेऽब्रवीदिति॥

अन्वयार्थ—याज्ञ०—'कोणीं आचार्यानें तुला जें सांगितलें असेल तेंच आम्हीं ऐकतों.' जनक—'विदग्ध शाकल्य मला 'हृदयच ब्रह्म आहे' असें सांगता झाला.' याज्ञ०—'ज्याप्रमाणें मातृमान्, पितृमान् व आचार्यवान् गुरूनें सांगावें तसेंच 'हृदयं वै ब्रह्म' हें शाकल्य बोलला. कारण ज्याला हृदयच नाहीं

त्याला काय लाभ होणार? पण त्यानें तुला त्याचें आयतन व प्रतिष्ठा सांगितली का?' जनक–' त्यानें मला तें सांगितलें नाहीं. '

एकपाद्वा एतत्सम्राडिति स वै नो ब्रूहि याज्ञवल्क्य हृद-
यमेवाऽऽयतनमाकाशः प्रतिष्ठा स्थितिरित्येनदुपासीत का
स्थितता याज्ञवल्क्य हृदयमेव सम्राडिति होवाच हृदयं वै
सम्राट् सर्वेषां भूतानामायतनꣳ हृदयं वै सम्राट् भूतानां
प्रतिष्ठा हृदये ह्येव सम्राट् सर्वाणि भूतानि प्रतिष्ठितानि भवन्ति॥

अन्वयार्थ—[याज्ञ०–] ' हे राजा, हें एकपाद् ब्रह्म आहे ' जनक– ' तर मग हे याज्ञवल्क्या, तूंच आम्हांला सांग. ' याज्ञ०–' हृदय हेंच त्याचें आयतन व अव्याकृताख्य आकाश ही प्रतिष्ठा आहे. ' स्थिति ' अशी याची उपासना करावी.' जनक–'हे याज्ञवल्क्या, स्थितता काय आहे?' ' हे राजा, हृदय हींच स्थितता आहे,' असें मुनि म्हणाला.'हे राजा हृदय हेंच सर्व भूतांचें आयतन आहे. हे सम्राट्, हृदयच सर्व भूतांची प्रतिष्ठा आहे. कारण हे राजन्, हृदयांतच सर्व भूतें प्रतिष्ठित आहेत. '

हृदयं वै सम्राट् परमं ब्रह्म नैनꣳ हृदयं जहाति सर्वाण्येनं
भूतान्यभिक्षरन्ति देवो भूत्वा देवानप्येति य एवं विद्वानेतदु-
पास्ते हस्त्यृषभꣳ सहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः
स होवाच याज्ञवल्क्यः पिता मेऽमन्यत नाननुशिष्य हरेतेति॥

इति बृहदारण्यकोपनिषदि चतुर्थाध्यायस्य प्रथमं ब्राह्मणम् ॥ १

अन्वयार्थ––याज्ञ०–' हे राजन्, हृदयच परम ब्रह्म आहे. जो असें जाणणारा याची उपासना करतो त्याला हृदय सोडीत नाहीं. सर्व भूतें याच्यावर सर्वतः उपकार करितात. तो येथेंच देव होऊन शरीरपातानंतरहि देवांस प्राप्त होतो. ' वैदेह जनक–' सहस्र हस्त्यृषभ देतों' असें म्हणाला. पण याज्ञवल्क्य म्हणाला–" शिष्याला शिकवून कृतार्थ केल्यावांचून त्याचें धन घेऊं नये " असें माझा पिता समजत असे. ७ (१)

–पूर्व ब्राह्मणांत कांहीं ज्ञानसाधनभूत उपासनें सांगितलीं. आतां त्या उपासनांनीं जाणण्यास योग्य असलेल्या ब्रह्माचें ज्ञान जागरादि अवस्थांच्या द्वारा करून देण्यासाठीं या ब्राह्मणाचा आरंभ—

जनको ह वैदेहः कूर्चादुपावसर्पन्नुवाच नमस्तेऽस्तु याज्ञवल्क्यानु मा शाधीति स होवाच यथा वै सम्राण्महान्तमध्वानमेष्यन्रथं वा नावं वा समाददीतैवमेवैताभिरुपनिषद्भिः समाहितात्माऽस्येवं वृन्दारक आढ्यः सन्नधीतवेद उक्तोपनिषत्क इतो विमुच्यमानः क्व गमिष्यसीति नाहं तद्भगवन्वेद यत्र गमिष्यामीत्यथ वै तेऽहं तद्वक्ष्यामि यत्र गमिष्यसीति ब्रवीतु भगवानिति ॥ १

अन्वयार्थ—वैदेह जनक [कूर्चात् उपावसर्पन् उवाच—] विशेषप्रकारच्या आसनावरून उठून आपला ज्ञानित्वाभिमान सोडून याज्ञवल्क्यासमीप शिष्यभावानें जाऊन ह्मणाला—"हे याज्ञवल्क्या, [नमः ते अस्तु—] तुला नमस्कार असो. [मा अनुशाधि—] मला अनुशासन—उपदेश कर." तेव्हां तो याज्ञवल्क्य ह्मणाला—"हे सम्राट्, [महान्तं अध्वानं एष्यन्—] दूर मार्गास—दूर प्रदेशास जाणारा [यथा रथं वा नावं वा समाददीत—] ज्याप्रमाणें रथ किंवा नाव घेतो. [एवं एव एताभिः उपनिषद्भिः समाहितात्मा असि—] त्याप्रमाणें तूं या उपनिषदांनीं—उपासनांनीं समाहितचित्त आहेस [एवं वृदारकः आढ्यः अधीतवेदः उक्तोपनिषत्कः सन्—] ह्मणोन पूज्य, श्रीमान्, वेदाध्ययन केलेला, व ज्याला आचार्यांनी उपनिषदें—उपासनें—सांगितलीं आहेत असा आहेस. पण [इतः विमुच्यमानः क्व गमिष्यसि इति—] या देहांतून निघून जाणारा तूं कोठें जाशील?" 'भगवन्, [यत्र अहं गमिष्यामि तत् अहं न वेद—] मी कोठें जाईन तें जाणत नाहीं.' [यत्र गमिष्यसि तत् अहं ते वक्ष्यामि—] 'तूं कोठें जाशील तें मी तुला सांगतों.' [भगवान् ब्रवीतु—] भगवान् मला सांगोत. १

इन्धो ह वै नामैष योऽयं दक्षिणेऽक्षन्पुरुषस्तं वा एतमिन्धꣳ सन्तमिन्द्र इत्याचक्षते परोक्षेणैव परोक्षप्रिया इव हि देवाः प्रत्यक्षद्विषः ॥ २

अन्वयार्थ—[इन्धः ह वै नाम एषः पुरुषः—] इन्ध या नांवाचा हा पुरुष आहे कीं [यः अयं दक्षिणे अक्षन्—] जो हा दक्षिण नेत्रांत विशेषतः स्थित आहे [तं एतं इन्धं सन्तं इंद्रः इति परोक्षेण वै आचक्षते—] पण तो हा याप्रमाणें इन्ध असतांना त्याला इंद्र असें परोक्षवृत्तीनेंच ह्मणतात. [हि देवाः परोक्षप्रियाः

इव प्रत्यक्षद्विषः–] कारण देवांना परोक्ष नांवच प्रिय असतें व प्रत्यक्ष नांवाचा ते द्वेष करणारे असतात. २.

अथैतद्वामेऽक्षणि पुरुषरूपमेषाऽस्य पत्नी विराट् तयोरेष संस्तावो य एषोऽन्तर्हृदये आकाशोऽथैनयोरेतदन्नं य एषोऽन्तर्हृदये लोहितपिण्डोऽथैनयोरेतत्प्रावरणं यदेतदन्तर्हृदये जालकमिवाथैनयोरेषा सृतिः संचरणी यैषा हृदयादूर्ध्वा नाड्युच्चरति यथा केशः सहस्रधा भिन्न एवमस्यैता हिता नाम नाड्योऽन्तर्हृदये प्रतिष्ठिता भवन्त्येताभिर्वा एतदास्रवदास्रवति तस्मादेष प्रविविक्ताहारतर इवैव भवत्यस्माच्छारीरादात्मनः ॥ ३

अन्वयार्थ—[अथ वामे अक्षणि एतत् पुरुषरूपं–] आतां डाव्या नेत्रांत हें जें पुरुषरूप [एषा अस्य पत्नी विराट्–] ती याची पत्नी विराट्–अन्न, [यः एषः अन्तर्हृदये आकाशः एषः तयोः संस्तावः–] हा जो अन्तर्हृदयांत आकाश हेंच त्या दोघांचें संस्ताव–संगतिस्थान. [अथ यः एषः अन्तर्हृदये लोहितपिंडः एतत् एनयोः अन्नं–] हा जो हृदयांतील रक्तपिंड तेंच त्या दोघांचें अन्न. [अथ यत् एतत् अन्तर्हृदये जालकं इव एतत् एनयोः प्रावरणं–] हें जें हृदयांत नाड्यांच्या छिद्रांचें जाळेसें आहे तें यांचें प्रावरण. [या एषा हृदयात् ऊर्ध्वा नाडी उच्चरति अथ एनयोः एषा सृतिः संचरणी–] ही जी हृदयापासून वर नाडी निघते ती यांची सृति–मार्ग, स्वप्नांतून जागरितांत संचार करण्याचा मार्ग. [यथा सहस्रधा भिन्नः केशः एवं अस्य एताः हिताः नाम नाड्यः अन्तर्हृदये प्रतिष्ठिताः भवन्ति–] ज्याप्रमाणें सहस्रावधि तुकडे केलेला केंस–केशाग्र त्याप्रमाणें या देहाच्या हितानांवाच्या नाड्या हृदयांत प्रतिष्ठित होतात. [एताभिः वै एतत् आस्रवत् आस्रवति–] त्यांच्या द्वारा शरीरांत जाणारें हें अन्न जातें. [एषः तस्मात् प्रविविक्ताहारतरः इव एव भवति–] हा लिंगात्मा त्या सूक्ष्माहार पिंडाहूनहि अतिशय सूक्ष्माहार आहे. [अस्मात् शारीरात् आत्मनः–] या वैश्वानराहून तैजस अधिक सूक्ष्म अन्नानें उपचित होतो. ३.–हा हृदयभूत तैजस सूक्ष्म प्राणाकडून धारण केला जाणारा असा होत्साता प्राणच –अज्ञात प्रत्यगात्मा–प्राज्ञच होतो—

तस्य प्राची दिक्प्राञ्चः प्राणा दक्षिणा दिग्दक्षिणे प्राणाः प्रतीची दिक्प्रत्यञ्चः प्राणा उदीची दिगुदञ्चः प्राणा ऊर्ध्वा दिगूर्ध्वाः प्राणा अवाची दिगवाञ्चः प्राणाः सर्वा दिशः सर्वे प्राणाः ॥

अन्वयार्थ—[तस्य प्राची दिक् प्राञ्चः प्राणाः०—] या क्रमानें वैश्वानरापासून तैजसास हृदयात्म्यास प्राप्त झालेल्या व हृदयात्म्यापासून प्राणात्म्यास प्राप्त झालेल्या त्या विद्वानाची पूर्व दिशा हे पूर्वेतील प्राण आहेत. दक्षिण दिशा हे दक्षिणेतील प्राण; प्रतीची—पश्चिम दिशा हे पश्चिमेतील प्राण; उत्तर दिशा हे उत्तरेतील प्राण; ऊर्ध्व दिशा हे ऊर्ध्वदिशेतील प्राण, अधरा दिशा हे अधर प्राण व सर्व दिशा हे सर्व प्राण आहेत.

स एष नेति नेत्यात्माऽगृह्यो न हि गृह्यतेऽशीर्यो न हि शीर्यतेऽसङ्गो न हि सज्यतेऽसितो न व्यथते न रिष्यत्यभयं वै जनक प्राप्तोऽसीति होवाच याज्ञवल्क्यः ॥

अन्वयार्थ—[सः एषः नेति नेति इति आत्मा अगृह्यः—] तो हा 'नेति नेति' ह्मणून वर सांगितलेला आत्मा अगृह्य आहे, [हि न गृह्यते—] कारण त्याचें ग्रहण केलें जात नाहीं; [अशीर्यः—] अशीर्य आहे, [न हि शीर्यते—] त्याचा नाश होत नाहीं; [असंगः न हि सज्यते—] असंग आहे, तो आसक्त होत नाहीं; [असितः न व्यथते—] तो अबद्ध आहे, व्यथा पावत नाहीं, [न रिष्यति—] हिंसा पावत नाहीं, [जनक अभयं वै प्राप्तः असि—] हे जनका, तूं अभयास प्राप्त झाला आहेस. [इति याज्ञवल्क्यः ह उवाच—] असें याज्ञवल्क्य ह्मणाला.

स होवाच जनको वैदेहोऽभयं त्वा गच्छताद्याज्ञवल्क्य यो नो भगवन्नभयं वेदयसे नमस्तेऽस्त्वमे विदेहा अयमहमस्मि ॥ ४

इति बृहदारण्यकोपनिषदि चतुर्थाध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥ २

अन्वयार्थ—[सः वैदेहः जनकः ह उवाच—] तो वैदेह जनक म्हणाला—[भगवन् याज्ञवल्क्य यः नः अभयं वेदयसे तं त्वा अभयं गच्छतात्—] "हे भगवन् याज्ञवल्क्य, जो तूं आम्हांला अभय ब्रह्माला पोंचवीत आहेस त्या तुलाहि अभय प्राप्त होवो. [ते नमः अस्तु—] तुला नमस्कार असो. [अयं अहं अस्मि इमे विदेहाः—] हा मी व हे विदेह देश तुझ्या अधीन आहेत."४(२)

—वरील कूर्च ब्राह्मणांत उपासनांचें क्रममुक्ति हें फल आहे, हें सांगण्याच्या प्रसंगानें जाग्रत्, स्वप्न, सुषुप्त व तुरीय यांचा उपन्यास केला. म्ह० 'इन्धः' 'प्रविविक्ताहारतरः' 'सर्वे प्राणाः' व 'स एष नेति नेतीति' अशा प्रकारें त्यांचा उपन्यास केला. आतां जाग्रत, स्वप्न, सुषुप्ति व तुरीय यांच्या द्वाराच महत्—अबाधित तर्कानें विस्तारपूर्वक त्याच प्रस्तुत ब्रह्माचा अवबोध करावा, म्हणून हें ब्राह्मण आरंभिलें जात आहे; अभय प्राप्त करवावें, आत्म्याचा सद्भाव—अस्तित्व सिद्ध करावें, वेदबाह्य लोकांच्या विप्रतिपत्तीनें—विरुद्ध कल्पनेनें आत्मा नाहीं, अशी आशंका आली असतां तिचें निरसन करून आत्म्याचा सद्भाव जाणावा, त्याचें देहादिकांहून व्यतिरिक्तत्व जाणावें, शुद्धत्व म्ह० तो कर्ता किंवा भोक्ता नाहीं, असें जाणावें, त्याचें स्वयंज्योतिष्ट्व म्ह० तो जड नाहीं, स्वप्रकाश आहे असें जाणावें, त्याला अलुप्तशक्तिस्वरूपत्व आहे, असें जाणावें, निरतिशय आनंद हाच त्याचा स्वभाव आहे व त्याला अद्वैतत्व आहे, हें जाणावें म्हणून हें ब्राह्मण आरंभिलें जातें. आख्यायिका तर विद्येचें संप्रदान—शिष्य व त्याचा ग्रहणविधि—श्रद्धादि प्रकार यांच्या प्रकाशनार्थ आहे, आणि विशेषतः ती विद्येच्या स्तुतीकरितां आहे—

जनकꣳह वैदेहं याज्ञवल्क्यो जगाम स मेने न वदिष्य इत्यथ ह यज्जनकश्च वैदेहो याज्ञवल्क्यश्चाग्निहोत्रे समूदाते तस्मै ह याज्ञवल्क्यो वरं ददौ स ह कामप्रश्नमेव वव्रे तꣳ हास्मै ददौ तꣳ ह सम्राडेव पूर्वं पप्रच्छ ॥ १

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्यः वैदेहं जनकं ह जगाम—] याज्ञवल्क्य वैदेह जनकाकडे गेला, [सः मेने न वदिष्ये इति—] जातांना त्यानें असा विचार केला कीं, मी राजाला कांहीं सांगणार नाहीं. [अथ ह यत् जनकः च वैदेहः याज्ञवल्क्यः च अग्निहोत्रे समूदाते—] पण पूर्वीं एकदा जनक व याज्ञवल्क्य यांचा अग्निहोत्राच्या निमित्तानें संवाद झाला. तेव्हां जनकाच्या तद्विषयक ज्ञानानें संतुष्ट होऊन [याज्ञवल्क्यः तस्मै ह वरं ददौ—] याज्ञवल्क्यानें त्याला वर दिला. [सः ह कामप्रश्नं एव वव्रे—] पण जनकानें कामप्रश्न हाच वर मागितला. [तं ह अस्मै ददौ—] याज्ञवल्क्यानें तो त्याला दिला. [सम्राड् एव तं ह पूर्वं पप्रच्छ—] त्या वराच्या सामर्थ्यानें पूर्वीं राजाच याज्ञवल्क्याला विचारता झाला. १.

याज्ञवल्क्य किंज्योतिरयं पुरुष इति । आदित्यज्योतिः सम्राडिति होवाचाऽऽदित्येनैवायं ज्योतिषाऽऽस्ते पल्ययते कर्म कुरुते विपल्येतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ २

अन्वयार्थ—[याज्ञवल्क्य किंज्योतिः अयं पुरुषः इति—] 'हे याज्ञवल्क्या, हा देहाख्य पुरुष किंज्योति आहे, कोणत्या ज्योतीनें हा व्यवहार करतो ?' [सम्राट् आदित्यज्योतिः इति०—] 'हे सम्राट्, तो आदित्यज्योति असतो,' असें याज्ञवल्क्य म्हणाला. [अयं आदित्येन एव ज्योतिषा आस्ते—] 'हा आदित्य या ज्योतीनेंच बसतो, [पल्ययते—] सर्वत्र गमन करतो, [कर्म कुरुते—] कर्म करतो व [विपल्येति—] परत येतो,' जनक म्हणतो—[एवं एव एतत०—] 'हे याज्ञवल्क्या, खरें आहे.' २.

अस्तमित आदित्ये याज्ञवल्क्य किंज्योतिरेवायं पुरुष इति चन्द्रमा एवास्य ज्योतिर्भवतीति चन्द्रमसैवायं ज्योतिषाऽऽस्ते पल्ययते कर्म कुरुते विपल्येतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ ३

अन्वयार्थ—प्रश्न—'हे याज्ञवल्क्या, [आदित्ये अस्तमिते किंज्योतिः एव अयं पुरुषः—] आदित्य अस्त पावला असतां हा पुरुष 'किंज्योति' आहे ?' उत्तर—[चन्द्रमाः एव अस्य ज्योतिः भवति इति—] 'चंद्रमा हीच याची ज्योति असते. [चन्द्रमसा एव०—] हा चंद्रमा याच ज्योतीनें बसतो, पर्यटन करतो —क्षेत्राला किंवा अरण्यांत जातो, तेथें जाऊन कर्म करतो व परत येतो.' जनक—'खरें आहे.' ३.

अस्तमित आदित्ये ाज्ञवल्क्य चन्द्रमस्यस्तमिते किंज्योतिरेवायं पुरुष इत्यग्निरेवास्य ज्योतिर्भवतीत्यग्निनैवायं ज्योतिषाऽऽस्ते पल्ययते कर्म कुरुते विपल्येतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ ४

अन्वयार्थ—प्रश्न—" हे याज्ञवल्क्या, [आदित्ये अस्तमिते चंद्रमसि अस्तमिते किंज्योतिः०—] आदित्य अस्त पावला असतां व चंद्रहि अस्त पावला असतां हा पुरुष 'किंज्योतिच' असतो. " उत्तर—[अग्निः एव०—] 'अग्नि हीच याची ज्योति असते. [अयं अग्निना एव०—] हा अग्नि याच ज्योतीनें बसतो, जातो, कर्म करतो व येतो.' जनक—" याज्ञवल्क्या खरें आहे. " ४.

अस्तमित आदित्ये याज्ञवल्क्य चन्द्रमस्यस्तमिते शान्तेऽग्नौ किंज्योतिरेवायं पुरुष इति वागेवास्य ज्योतिर्भवतीति वाचैवायं ज्योतिषाऽऽस्ते पल्ययते कर्म कुरुते विपल्येतीति तस्माद्वै सम्राडपि यत्र स्वः पाणिर्न विनिर्ज्ञायतेऽथ यत्र वागुच्चरत्युपैव तत्र न्येतीत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य ॥ ५

अन्वयार्थ—प्रश्न—" हे याज्ञवल्क्या, [आदित्ये अस्तमिते०—] आदित्य अस्त पावला असतां, चंद्रमा अस्त पावला असतां व [अग्नौ शान्ते—] अग्निहि शांत झाला असतां हा पुरुष ' किंज्योतिच ' असतो ! " उत्तर—[वाक् एव अस्य०—] "वाक् हीच याची ज्योति असते. [अयं वाचा एव०—] हा वाक् याच ज्योतीनें बसतो, जातो, कर्म करतो व परत येतो. म्हणून हे सम्राट्, ज्यावेळीं आपला हातहि चांगल्याप्रकारें जाणला जात नाहीं—दिसत नाहीं त्यावेळीं जेथून शब्द निघत—येत असतो तेथें जातो." जनक—" याज्ञवल्क्या, खरें आहे."

अस्तमित आदित्ये याज्ञवल्क्य चन्द्रमस्यस्तमिते शान्तेऽग्नौ शान्तायां वाचि किंज्योतिरेवायं पुरुष इत्यात्मैवास्य ज्योतिर्भवतीत्यात्मनैवायं ज्योतिषास्ते पल्ययते कर्म कुरुते विपल्येतीति ॥

अन्वयार्थ—' हे याज्ञवल्क्या, [अस्तमिते आदित्ये०—] आदित्य अस्त पावला असतां, चंद्रमाहि अस्त पावला असतां, अग्नि विझला असतां व [वाचि शान्तायां०—] शब्दहि शांत झाला असतां हा पुरुष ' कीं ज्योतिच' असतो !' ' हे राजा, [आत्मा एव अस्य ज्योतिः०—] आत्माच याची ज्योति असते. तो आत्मा याच ज्योतीनें बसतो, जातो, कर्म करतो व परत येतो. ' (त्याचा सविस्तर भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २१२ पहा) ६.—आत्मा देहाहून व्यतिरिक्त आहे इत्यादि जरी सिद्ध झालें तरी देहादि अनुग्राह्यांवर त्याच्याच जातीच्या आदित्यादिकांचा अनुग्रह होतो असें दिसतें, त्यामुळें आत्मज्योतिहि आदित्यादिकांसारखीच अनुग्राहक असल्यामुळें देहादिकांच्या जातीचीच आहे, अशी भ्रांति होते आणि आत्मा अनेक इन्द्रियांतीलच एक आहे कीं, त्याहून भिन्न आहे, या गोष्टीचा विवेक होत नाहीं; म्हणून जनक ' आत्मा कोणता ' असें विचारीत आहे. किंवा आत्मा शरीराहून भिन्न जरी असला तरी सर्व

इन्द्रियें जणु काय विज्ञानानें युक्त असल्यासारखीं भासतात. आत्मा त्यांहून पृथक् असल्याचा अनुभव येत नाहीं म्हणून पुढील प्रश्न आहे—

कतम आत्मेति योऽयं विज्ञानमयः प्राणेषु हृद्यन्तर्ज्योतिः पुरुषः। स समानः सन्नुभौ लोकावनुसंचरति ध्यायतीव लेलायतीव स हि स्वप्नो भूत्वेमं लोकमतिक्रामति मृत्यो रूपाणि ॥७

अन्वयार्थ—[कतम आत्मा—] देह, इंद्रियें, प्राण, मन यांतील आत्मा कोणता ? तर [यः अयं प्राणेषु विज्ञानमयः हृदि अन्तर्ज्योतिः पुरुषः—] जो तूं विचारलास तो हा प्राणांतील विज्ञानमय बुद्धिवृत्तीच्याहि आंत असणारा, ज्योतिःस्वरूप पूर्ण आत्मा आहे. [सः समानः सन् उभौ लोकौ अनुसंचरति—] तो सदृश होऊन—बुद्ध्यादिकांच्या आकाराचा होऊन—हा लोक व पर लोक यांतून संचार करतो. [ध्यायति इव लेलायति इव—] तो बुद्धि चिंतन करूं लागली असतां जणुं काय चिंतन करतो. बुद्ध्यादि करणें व प्राण चलन करूं लागले असतां तो चलनसें करतो. [हि सः स्वप्नः भूत्वा इमं लोकं अतिक्रामति—] कारण तोच स्वप्न होऊन या शरीरेंद्रियसंघाताचें अतिक्रमण करतो. [मृत्योः रूपाणि—] शरीर व इंद्रियें या मृत्यूच्या रूपांचें अतिक्रमण करतो. याचा सविस्तर भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २१७, २३०, ३२० पहा. ७.—ज्याप्रमाणें येथें—एका देहांत आत्मा स्वप्न होऊन मृत्यूचीं रूपें अशीं जीं कार्यकरणें—शरीरेंद्रियें त्यांचें अतिक्रमण करून स्वप्नामध्यें स्वरूपांत—आत्मज्योतींत राहतो त्याप्रमाणें दुसऱ्या देहांतहि वर्तमान जन्म सोडून दुसरा जन्म घेणारा आत्मा कार्य-करणाचें अतिक्रमण करतो. स्वप्न व जागरित यांतील संचारामुळें तो देहादिकांहून भिन्न आहे, हें जसें ठरतें त्याचप्रमाणें तो इहलोक व परलोक यांतून संचार करतो असें म्हटल्यानेंहि त्याचें देहादिभिन्नत्व सिद्ध होतें, असें सांगतात—

स वा अयं पुरुषो जायमानः शरीरमभिसंपद्यमानः पाप्मभिः संसृज्यते स उत्क्रामन्म्रियमाणः पाप्मनो विजहाति ॥ ८

अन्वयार्थ—[सः वै—] तोच हा पुरुष उत्पन्न होणारा—शरीरास आत्मा समजणारा असा होत्साता पापांनीं म्ह० शरीरेंद्रियांनीं संयुक्त होतो. पण तोच मरूं लागला असतां—एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरास जाऊं लागला असतां त्या देहेंद्रियांस सोडतो; त्यांचा परित्याग करतो. ८.—' अहोपण, स्वप्न व

जागरित या दोन स्थानांप्रमाणें जन्म व मरण यांच्या योगानें अनुक्रमानें ज्यांत हा पुरुष संचार करतो ते याचे दोन लोक नाहींतच. स्वप्न व जागरित हीं दोन्ही प्रत्यक्ष अनुभवाला येतात, पण त्याप्रमाणें इहलोक व परलोक कोणत्याहि प्रमाणानें अवगत होत नाहींत. यास्तव स्वप्न व जागरित हेच इह-परलोक आहेत, अशी आशंका घेऊन सांगतात—

तस्य वा एतस्य पुरुषस्य द्वे एव स्थाने भवत इदं च परलोकस्थानं च संध्यं तृतीयꣳस्वप्नस्थानं तस्मिन्संध्ये स्थाने तिष्ठन्नेते उभे स्थाने पश्यतीदं च परलोकस्थानं च।

अन्वयार्थ—[तस्य वै एतस्य पुरुषस्य द्वे एव स्थाने भवतः—] त्याच या पुरुषाचीं दोनच स्थानें असतात. [इदं च परलोकस्थानं च—] हें स्थान व परलोकस्थान. [तृतीयं स्वप्नस्थानं संध्यं च—] तिसरें स्वप्नस्थान हें संध्य स्थान आहे. [तस्मिन् संध्ये स्थाने तिष्ठन् इदं च परलोकस्थानं च इति एते उभे स्थाने पश्यति—] त्या संध्यस्थानामध्यें राहणारा पुरुष हें स्थान व परलोक स्थान अशीं हीं दोन्ही स्थानें पाहतो.

अथ यथाक्रमोऽयं परलोकस्थाने भवति तमाक्रममाक्रम्योभयान्पाप्मन आनन्दाꣳश्च पश्यति ॥

अन्वयार्थ—[अथ—] आतां तो तीं स्थानें कशीं पाहतो तें ऐक. [अयं परलोकस्थाने यथाक्रमः भवति—] हा पुरुष परलोकप्राप्तीच्या निमित्तानें जशा प्रकारच्या आक्रमानें—परलोकप्राप्तिसाधनानें—युक्त होतो [तं आक्रमं आक्रम्य उभयान् पाप्मनः आनंदान् च पश्यति—] त्याच आक्रमाचा आश्रय करून पापफळें—दुःखें व धर्मफळें—आनंद या दोहोंस पहातो.

स यत्र प्रस्वपित्यस्य लोकस्य सर्वावतो मात्रामपादाय स्वयं विहत्य स्वयं निर्माय स्वेन भासा स्वेन ज्योतिषा प्रस्वपित्यत्रायं पुरुषःस्वयंज्योतिर्भवति

अन्वयार्थ—[सः यत्र प्रस्वपिति—] तो प्रकृत आत्मा ज्यावेळीं गाढ निद्रेचा अनुभव घेतो तेव्हां [अस्य सर्वावतः लोकस्य मात्रां अपादाय—] या दृष्ट—जागरितलक्षण लोकाची—कार्य-करणसंघाताची मात्रा—एकदेश—कादून घेऊन (त्या जन्मांतील वासनांनीं वासित होऊन) [स्वयं विहत्य स्वयं निर्माय—] स्वतःच देहाला पाडवून—भानशून्य करून व वासनामय स्वप्नदेह स्वतः निर्माण

करून [स्वेन भासा स्वेन ज्योतिषा प्रस्वपिति–] आपल्याच प्रकाशानें व आपल्याच नित्य साक्षिज्योतीनें निजतो. (आपल्या नित्य ज्योतीनें वासनात्मक प्रकाशास पहातो.) [अत्र अयं पुरुषः स्वयंज्योतिः भवति–] या अवस्थेंत हा पुरुष स्वयंज्योति होतो. याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २७२ पहा.९.–'अहोपण स्वप्नांत पुरुष स्वयंज्योति कसा ? कारण जागरिताप्रमाणेंच स्वप्नांतहि सर्व व्यवहार प्रतीत होतो,' अशी आशंका घेऊन त्या दोन अवस्थांतील वैलक्षण्य दाखवितात–

न तत्र रथा न रथयोगा न पन्थानो भवन्त्यथ रथान्रथयोगान्पथः सृजते न तत्राऽऽनन्दा मुदः प्रमुदो भवन्त्यथाऽऽनन्दान्मुदः प्रमुदः सृजते न तत्र वेशान्ताः पुष्करिण्यः स्रवन्त्यो भवन्त्यथ वेशान्तान्पुष्करिणीः स्रवन्तीः सृजते स हि कर्ता ॥ १०

अन्वयार्थ—[तत्र न रथाः न रथयोगाः०–] स्वप्नांत रथ नसतात, रथाला जोडावयाचे अश्वादिक नसतात, रथाचे मार्ग नसतात; [अथ रथान्०–] पण तो रथ, अश्वादिक व मार्ग यांस स्वतः उत्पन्न करतो. [तत्र आनंदाः मुदः प्रमुदः न भवन्ति–] तेथें आनंद, मुद–पुत्रादिलाभनिमित्त हर्ष व प्रमुद नसतात. [अथ आनन्दान् मुदः प्रमुदः सृजते–] पण तो आनंदांस, मोदांस व प्रमोदांस उत्पन्न करतो. [तत्र वेशान्ताः पुष्करिण्यः स्रवन्त्यः न भवन्ति–] स्वप्नांत डबकीं नसतात, तडाग नसतात व नद्या नसतात; [अथ वेशान्तान्०–] पण तो डबकीं, तडाग व नद्या यांस निर्माण करतो. [सः हि कर्ता–] तोच त्यांचा कर्ता आहे. सु. ब्र. पृ. १५२, २७१ पहा. १०.

तदेते श्लोका भवन्ति । स्वप्नेन शारीरमभिप्रहत्यासुप्तः सुप्तानभिचाकशीति । शुक्रमादाय पुनरैति स्थानꣳहिरण्मयः पुरुष एकहꣳसः ॥

अन्वयार्थ—[तत् एते श्लोकाः भवन्ति–] याच अर्थीं हे श्लोक–मंत्र आहेत–[स्वप्नेन शारीरं अभि प्रहत्य–] स्वप्नानें शरीराला निश्चेष्ट करून [असुप्तः सुप्तान् अभिचाकशीति–] स्वतः न निजलेला–नित्य दृग्रूप आत्मा सुप्त–वासनाकार सर्व पदार्थांस प्रकाशित करतो. [शुक्रं आदाय पुनः स्थानं ऐति–] शुद्ध –इंद्रियमात्रारूप घेऊन पुनः (कर्म करण्यासाठीं) जागरित स्थानास येतो. [हिरण्मयः पुरुषः एकहंसः–] जणुंकाय हिरण्मय–चैतन्यात्मस्वभाव पुरुष एकच जाग्रत्, स्वप्न, इहलोक व परलोक या स्थानीं जातो. ११

प्राणेन रक्षन्नवरं कुलायं बहिष्कुलायादमृतश्चरित्वा । स ईयतेऽमृतो यत्र कामꣳहिरण्मयः पुरुष एकहꣳसः ॥ १२

अन्वयार्थ—[अवरं कुलायं प्राणेन रक्षन्—] ह्या निकृष्ट शरीराचें पंचवृत्ति प्राणानें रक्षण करणारा तो [अमृतः बहिष्कुलायात् चरित्वा—] स्वतः अमरण-धर्मवान् शरीराच्या बाहेर फिरून [सः अमृतः हिरण्मयः एकहंसः पुरुषः—] तो अमृत, हिरण्मय—ज्योतिःस्वभाव, एकहंस—एकटाच गमन करणारा पुरुष [यत्र कामं तत्र ईयते—] जेथें वासनारूपानें उद्भूत झालेला काम असतो तेथें जातो १२.

स्वप्नान्त उच्चावचमीयमानो रूपाणि देवः कुरुते बहूनि । उतेव स्त्रीभिः सह मोदमानो जक्षदुतेवापि भयानि पश्यन् ॥ १३

अन्वयार्थ—[स्वप्नान्ते उच्चावचं ईयमानः देवः बहूनि रूपाणि कुरुते—] स्वप्नस्थानीं उच्च-नीच भावांस प्राप्त होणारा देव असंख्य वासनारूपें करतो. [उत स्त्रीभिः सह मोदमानः इव—] तसेंच स्त्रियांसह आनंद भोगणारासा [उत जक्षत् इव—] मित्रांबरोबर हंसणारासा व [भयानि अपि पश्यन्—] व्याघ्र-सिंहादि भयांनाहि पहातसा असतो १३.

आराममस्य पश्यन्ति न तं पश्यति कश्चनेति । तं नाऽऽयतं बोधयेदित्याहुः । दुर्भिषज्यꣳ ह्यस्मै भवति यमेष न प्रतिपद्यते ॥

अन्वयार्थ—[अस्य आरामं पश्यन्ति—] सर्व लोक त्याच्या गृह-नगरादि आरामास—आक्रीडेस पाहतात; पण [तं कश्चन न पश्यति इति—] त्याला कोणी पहात नाहीं. [तं आयतं न प्रबोधयेत् इति आहुः—] त्या निजलेल्या आत्म्याला सहसा—अत्यंत जागें करूं नये, असें वैद्यादि लोक सांगतात. [यं एषः न प्रतिपद्यते—] ज्या इंद्रियप्रदेशांतून हा निघाला त्याला पुनः हा कदाचित् प्राप्त होत नाहीं. [दुर्भिषज्यं ह अस्मै भवति—] त्यामुळें त्याचें शरीर दुश्चिकित्स्य होतें.—ज्याअर्थीं स्वप्न होऊन मृत्यूच्या शरीरेंद्रियादि रूपांचें अतिक्रमण केलेला असा तो होतो त्याअर्थीं आत्मा स्वयंज्योति आहे, असें सांगून आतां दुसरें मत उत्थापित करितात—

अथो खल्वाहुर्जागरितदेश एवास्यैष इति यानि ह्येव जाग्रत्पश्यति तानि सुप्त इत्यत्रायं पुरुषः स्वयंज्योतिर्भवति सोऽहं भगवते सहस्रं ददाम्यत ऊर्ध्वं विमोक्षाय ब्रूहीति ॥१४

अन्वयार्थ—[अथो खलु आहुः—] पण खरोखर कित्येक म्हणतात— [अस्य एषः जागरितदेशे एव इति—] ' या आत्म्याचा हा स्वप्न जागरितदेशींच होतो. [हि यानि एव जाग्रत् पश्यति—] कारण जें पदार्थजात जाणणारा तो जाग्रत्-दशेंत पाहतो, [तानि सुप्तः इति—] तेंच पदार्थजात निजलेला तो स्वप्नदशेंत पाहतो. पण तें मत बरोबर नाही. कारण [अत्र अयं पुरुषः०—] स्वप्नांत हा पुरुष स्वयंज्योति होतो. [सः अहं भगवते सहस्रं ददामि—] तो मी जनक तुला यासाठी एक सहस्र धन देतों. [अतः ऊर्ध्वं विमोक्षाय ब्रूहि इति—] यापुढें विमोक्षासाठी मला सांग (सम्यग्ज्ञानाचा उपदेश कर.) १४.

—'आत्मना एव अयं ज्योतिषा आस्ते-' इत्यादि वाक्यानें जें आत्म्याचें स्वयं-ज्योतिष्ट्व ब्राह्मणादिकांत प्रस्तुत आहे तेंच ' अत्रायं पुरुषः स्वयंज्योतिर्भवति-' या वाक्यानें प्रत्यक्षतः स्वप्नांत प्रतिपादिलें. पण ' स्वप्नो भूत्वा इमं लोकं अति-क्रामति मृत्यो रूपाणि '—तो स्वप्न होऊन या लोकाचें—मृत्यूच्या रूपांचें अति-क्रमण करतो, असें जें वर म्हटलें आहे त्याविषयी ही आशंका घेतली जाते. आत्मा मृत्यूच्या रूपांचेंच अतिक्रमण करतो; मृत्यूचें नाही. कारण स्वप्नांत शरीर व इंद्रियें यांपासून व्यावृत्त झालेल्याहि आत्म्याला आनंद, भय (इच्छा, द्वेष) इत्यादिकांचा अनुभव येतो, हें प्रसिद्ध आहे. तस्मात् (म्ह० कार्याची कारणाहून अन्य स्थली प्रवृत्ति होणें अयोग्य असल्यामुळें) खचित हा मृत्यूचें अतिक्रमण करीतच नाहीं. कारण मोद-भय इत्यादि हे कर्मरूप मृत्यूचें कार्य आहे, हें प्रसिद्ध आहे. यास्तव स्वप्नाला प्राप्त झालेला आत्मा कर्माख्य मृत्यूचें उल्लंघन करीत नाहीं, आणि जर हा आत्मा स्वभावतःच मृत्यूनें बद्ध असेल तर विमोक्ष उपपन्नच होत नाही. कारण स्वभावापासून कोणी विमुक्त होत नाहीं. मृत्यु हा जर आत्म्याचा स्वभाव नसेल तर त्यापासून मोक्ष उपपन्न होईल. यास्तव ज्याप्रकारें हा मृत्यु आत्म्याचा धर्म नव्हे, असें सिद्ध होईल त्याप्रकारें प्रदर्शित करण्यासाठी ' अत ऊर्ध्वं विमोक्षाय ब्रूहि ' याप्रमाणें जनका-कडून प्रश्न केला गेलेला याज्ञवल्क्य मृत्यूचें अतिक्रमण दाखविण्याच्या इच्छेनें प्रवृत्त झाला आहे—

स वा एष एतस्मिन्संप्रसादे रत्वा चरित्वा दृष्ट्वैव पुण्यं च पापं च पुनः प्रतिन्यायं प्रतियोन्याद्रवति स्वप्नायैव स यत्तत्र

किंचित्पश्यत्यनन्वागतस्तेन भवत्यसङ्गो ह्ययं पुरुष इत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य सोऽहं भगवते सहस्रं ददाम्यत ऊर्ध्वं विमोक्षायैव ब्रूहीति ॥ १५

अन्वयार्थ—[सः वै एषः—] तो हा प्रकृत आत्मा [एतस्मिन् संप्रसादे—] या संप्रसादांत—सुषुप्तांत क्रमानें संप्रसन्न होऊन, तो कसा ? स्वप्नांत [रत्वा चरित्वा—] रतीचा अनुभव घेऊन, विहार करून [पुण्यं च पापं च दृष्ट्वा एव—] पुण्यफल व पापफल यांस केवल पाहूनच, भोगून नव्हे, संप्रसादांत शिरून त्याचा अनुभव घेऊन [पुनः प्रतिन्यायं प्रतियोनि स्वप्नाय एव आद्रवति—] पुनः गेल्या मार्गानें व त्या त्या पूर्व स्थानींच स्वप्नस्थानार्थच परत येतो. [सः तत्र यत् किंचित पश्यति तेन अनन्वागतः भवति—] तो स्वप्नांत जें कांहीं पुण्य-पापफल पाहतो त्यानें असंबद्ध असतो. [हि अयं पुरुषः असंगः—] कारण हा पुरुष असंग आहे. जनक—' याज्ञवल्क्या, [एवं एतत्०—] अगदीं खरें आहे. या ज्ञानासाठी मी तुला एक सहस्र दान देतों. आतां या पुढें विमोक्षासाठीच ज्ञान सांग.' (याचा सविस्तर भाष्यार्थ व सु.ब्र.पृ.२२२पहा.) १५—असंगत्व हा आत्म्याच्या अकर्तृत्वाविषयी हेतु आहे. पण पूर्वी श्लोकांत—पृष्ठ ६७३—तो कर्मवशात् जेथें जेथें काम असेल तेथें तेथें जातो, असें सांगितलें आहे. काम हाच संग आहे. त्यामुळें असंगत्व हा हेतु असिद्ध आहे, अशी शंका घेऊन सांगतात—

स वा एष एतस्मिन्स्वप्ने रत्वा चरित्वा दृष्ट्वैव पुण्यं च पापं च पुनः प्रतिन्यायं प्रतियोन्याद्रवति बुद्धान्तायैव स यत्तत्र किंचित्पश्यत्यनन्वागतस्तेन भवत्यसङ्गो ह्ययं पुरुष इत्येवमेवैतद्याज्ञवल्क्य सोऽहं भगवते सहस्रं ददाम्यत ऊर्ध्वं विमोक्षायैव ब्रूहीति ॥ १६

अन्वयार्थ—[सः वै एषः—] तोच हा प्रकृत आत्मा [एतस्मिन् स्वप्ने रत्वा चरित्वा०—] या स्वप्नांत रतीचा अनुभव घेऊन, विहार करून पुण्य व पाप यांचीं फलें नुस्तीं पाहूनच पुनः यथागत व यथास्थान [बुद्धान्ताय एव०—] जागरितस्थानासच परत येतो. [सः तत्र०—] तो स्वप्नांत जें कांहीं पुण्य-पाप पाहतो त्यानें अनन्वागत—असंबद्ध असतो. [हि अयं पुरुषः असंगः—] कारण

हा पुरुष असंग आहे. जनक–" हे याज्ञवल्क्या, खरें आहे. आपल्याला मी या ज्ञानासाठीं एक सहस्र द्रव्य देतों. या पुढें विमोक्षासाठींच ज्ञान सांगा. " (सु. ब्र. पृ. २७९ पहा.) १६.–ज्याप्रमाणें हा आत्मा असंग असल्यामुळें स्वप्नांतील स्वप्नसंगजन्य दोषांनीं जागरितांत आला असतां लिप्त होत नाहीं त्याप्रमाणेंच जागरित संगजन्यदोषांनींहि जागरितांत लिप्त होत नाहीं,असें सांगतात–

स वा एष एतस्मिन्बुद्धान्ते रत्वा चरित्वा दृष्ट्वैव पुण्यं च पापं च पुनः प्रतिन्यायं प्रतियोन्याद्रवति स्वप्नान्तायैव ॥ १७

अन्वयार्थ—[सः वै एषः एतस्मिन् बुद्धान्ते रत्वा चरित्वा०–] तो हा प्रकृत आत्मा या जागरितांत रतीचा अनुभव घेऊन व विहार करून पुण्य व पाप यांच्या फलांना केवल पाहूनच पुनः यथागत–पूर्वीं गेलेल्या मार्गानेंच व यथास्थान–पूर्वीच्याच आपापल्या स्थानीं स्वप्नान्तासाठींच–संप्रसादासाठींच परत येतो. (तो त्या जागरितांत जें कांहीं पाहतो त्यानें अनन्वागत–असंबद्ध होतो. कारण हा पुरुष असंग आहे. जनक–" तुम्ही सांगतां तें कबूल आहे. तो मी तुम्हांला या विद्येसाठीं सहस्र दान देतों. आतां या पुढें विमोक्षासाठींच सांगा. याचा भाष्यार्थ पहा.) १७–याप्रमाणें तीन कंडिकांत आत्मा स्वयंज्योति, शरीरेंद्रियें व त्यांचें प्रयोजक काम-कर्म यांहून विलक्षण आहे, कारण तो असंग आहे, असें सांगितलें. तेंच दृष्टान्तानें स्पष्ट करितात—

तद्यथा महामत्स्य उभे कूले अनुसंचरति पूर्वं चापरं चैवमेवायं पुरुष एतावुभावन्तावनुसंचरति स्वप्नान्तं च बुद्धान्तं च ॥ १८

अन्वयार्थ—[तत् यथा महामत्स्यः उभे कूले पूर्वं च अपरं च अनुसंचरति–] त्याविषयीं दृष्टान्त–ज्याप्रमाणें लौकिकांत फार मोठा मासा नदीच्या दोन्ही म्हणजे पूर्व व अपर तीरीं अनुक्रमानें संचार करतो [एवं एव अयं पुरुषः एतौ उभौ अन्तौ स्वप्नान्तं बुद्धान्तं च अनुसंचरति–] त्याचप्रमाणें हा पुरुष या दोन्ही अन्तांतून म्ह० स्वप्नान्त व बुद्धान्त यांतून अनुक्रमानें संचार करतो. १८. –आतां पूर्वीच्या सर्व वाक्यांची एकवाक्यता करून आत्म्याची नित्य-शुद्ध-बुद्ध मुक्तस्वभावता एकत्र प्रदर्शित करण्यासाठीं पुढील कंडिका आहे—

तद्यथाऽस्मिन्नाकाशे श्येनो वा सुपर्णो वा विपरिपत्य श्रान्तः सꣳहत्य पक्षौ संलयायैव ध्रियत एवमेवायं पुरुष एतस्मा अन्ताय धावति यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति ॥ १९

अन्वयार्थ—[तत् यथा अस्मिन् आकाशे श्येनः वा सुपर्णः वा विपरिपत्य श्रान्तः—] त्याविषयीं दृष्टान्त—ज्याप्रमाणें या आकाशांत फार मोठा पण मंद श्येन किंवा अति वेगवान् श्येन विहार करून श्रांत होतो व [पक्षौ संहत्य संलयाय एव ध्रियते—] पंख पसरून आपल्या घरट्याकडेच जावयास निघतो [एवं एव अयं पुरुषः एतस्मै अन्ताय धावति—] त्याप्रमाणेंच हा आत्मा पुरुष या अन्ताला धावतो. [यत्र सुप्तः न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति—] ज्या अज्ञात ब्रह्मरूप अंतांत निजलेला तो कोणत्याहि कामाची कामना करीत नाहीं व कोणतेंहि स्वप्न पहात नाहीं. १९.

ता वा अस्यैता हिता नाम नाड्यो यथा केशः सहस्रधा भिन्नस्तावताऽणिम्ना तिष्ठन्ति शुक्लस्य नीलस्य पिङ्गलस्य हरितस्य लोहितस्य पूर्णा ॥

अन्वयार्थ—[ताः वै अस्य एताः हिताः नाम नाड्यः—] या शिरःपाण्यादिमान्—देहरूप पुरुषाच्या त्या या 'हिता'या नांवाच्या नाड्या [यथा केशः सहस्रधा भिन्नः—] ज्याप्रमाणें सहस्रधा तोडलेला केंस त्याप्रमाणें [तावता अणिम्ना तिष्ठन्ति—] तेवढ्या अणुत्वानें—तेवढ्या सूक्ष्म प्रमाणानें (शरीरांत पसरलेल्या अशा) राहतात. [शुक्लस्य नीलस्य पिंगलस्य हरितस्य लोहितस्य पूर्णा—] त्या शुभ्र, निळ्या, पिंगट, हिरव्या, लाल या रंगांच्या रसानें भरलेल्या असतात.

अथ यत्रैनं घ्नन्तीव जिनन्तीव हस्तीव विच्छाययति गर्तमिव पतति यदेव जाग्रद्भयं पश्यति तदत्राविद्यया मन्यतेऽथ यत्र देव इव राजेवाहमेवेदꣳ सर्वोऽस्मीति मन्यते सोऽस्य परमो लोकः ॥ २०

अन्वयार्थ—[अथ यत्र एनं घ्नन्ति इव—] वस्तुस्थिति अशी असतां ज्यावेळीं शत्रु किंवा चोर येऊन मला जणुं काय मारीत आहेत, [जिनन्ति इव—] जणुं काय वश करीत आहेत, [हस्ती विच्छाययति इव—] जणुं काय

हत्ती पळवीत आहे, [गर्तं पतति इव–] गर्तेमध्यें जणुं काय तो पडत आहे, असें पाहतो; फार काय पण [जाग्रत् यत् एव भयं पश्यति तत् अत्र अविद्यया मन्यते–] जाग्रदवस्थेंत असतांना तो जें भय पाहतो तेंच येथें अविद्येनें मानतो. [अथ यत्र देवः इव राजा इव–] पण तेंच, ज्यावेळीं स्वतः देवसा होतो, राजासा होतो; (तेव्हां अविद्येचा अपकर्ष व विद्येचा उत्कर्ष होत आहे असें जाणावें. त्याचप्रमाणें जेव्हां अविद्येचा अत्यंत क्षय होऊन विद्येचा चांगला रुद्भव होतो तेव्हां जाग्रद्वासनेनेंच) [अहं एवं इदं सर्वः अस्मि इति मन्यते–] मीच हें, व सर्व आहें, असें तो स्वप्नांतहि मानतो; [सः अस्य परमः लोकः–] तो सर्वात्मभाव हा याचा परम लोक आहे २ ·.–विद्या व अविद्या यांचें फल सांगितल्यावर आतां हा जो सर्वात्मभावरूप मोक्ष–क्रिया-कारक-फलशून्य विद्याफल त्याचा प्रत्यक्षतः निर्देश केला जातो. ज्यांत अविद्या-काम-कर्म नाहीत तो मोक्ष––

तद्वा अस्यैतदतिच्छन्दा अपहतपाप्माभयꣳरूपम्। तद्यथा प्रियया स्त्रिया संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नाऽन्तरमेवमेवायं पुरुषः प्राज्ञेनाऽऽत्मना संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नाऽन्तरं तद्वा अस्यैतदाप्तकाममात्मकाममकामꣳ रूपꣳशोकान्तरम् ॥

अन्वयार्थ––[तत् वै अस्य एतत् अतिच्छन्दा अपहतपाप्मा अभयं रूपं–] –' यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते ' (कं १९) येथें सांगितलेलें तेंच हें याचें रूप कामरहित, धर्माधर्मरहित, भयकारण जी अविद्या तिनें विरहित असें आहे. (सुषुप्तीत चैतन्यज्योतिःस्वभाव आत्मा जर असतो तर आपल्याला व दुसऱ्याला जाणत कां नाहीं, तें दृष्टान्तपूर्वक सांगतात–) [तत् यथा प्रियया स्त्रिया संपरिष्वक्तः न बाह्यं किंचन वेद न आन्तरं–] व्यवहारांत ज्याप्रमाणें इष्ट भार्येकडून आलिंगन दिला गेलेला पुरुष आपल्याहून अन्य–बाह्य पदार्थास किंवा स्वतःलाहि जाणत नाहीं [एवं एव अयं पुरुषः प्राज्ञेन आत्मना संपरिष्वक्तः बाह्यं किंचन न वेद०–] त्याचप्रमाणें प्राज्ञ आत्म्याकडून आलिंगिलेला –एकरूप झालेला हा पुरुष इतर अनात्मवस्तूलाहि जाणत नाहीं. [तत् वै अस्य एतत् आप्तकामं आत्मकामं अकामं शोकान्तरं रूपं–] तेंच हें याचें आप्तकाम, आत्मकाम, अकाम व शोकशून्य रूप आहे. (याचा भाष्यार्थ व

सु.ब्र.पृ.१०२व२९४पहा.)२१.—याप्रमाणें आत्म्याचें स्वयंज्योतिष्ट्व स्वाभाविक आहे, असें प्रासंगिक सांगून प्रकृत निष्कामत्वादि रूपाचेंच प्रतिपादन करितात—

अत्र पिताऽपिता भवति माताऽमाता लोका अलोका देवा अदेवा वेदा अवेदाः । अत्र स्तेनोऽस्तेनो भवति भ्रूणहाऽभ्रूणहा चाण्डालोऽचाण्डालः पौल्कसोऽपौल्कसः श्रमणोऽश्रमणस्तापसोऽतापसोऽनन्वागतं पुण्येनानन्वागतं पापेन तीर्णो हि तदा सर्वाञ्छोकान्हृदयस्य भवति ॥ २२

अन्वयार्थ—[अत्र पिता अपिता भवति—] या सुषुप्तिकालीं पिता अपिता होतो, [माता अमाता०—] माता अमाता होते, लोक अलोक होतात, देव अदेव होतात, व वेद अवेद होतात; [अत्र स्तेनः अस्तेनः०—] त्या अवस्थेंत ब्राह्मणाचें सुवर्ण चोरणारा असून अचोर होतो. भ्रूणहत्या करणारा अभ्रूणहा होतो. चांडाल अचांडाल होतो. पुल्कस अपुल्कस होतो. श्रमण—संन्यासी अश्रमण होतो. तापस—वानप्रस्थ अतापस होतो. तें अभय आत्मरूप [पुण्येन अनन्वागतं पापेन अनन्वागतं—] पुण्यानें असंबद्ध पापानें असंबद्ध आहे. [हि तदा सर्वान् हृदयस्य शोकान् तीर्णः भवति—] तो पुरुष ज्याअर्थी सर्वकामातीत आहे त्याअर्थी सुषुप्तीत बुद्धीचे जे शोक—काम त्यांना उल्लंघिलेला असा होतो. याचा सविस्तर भाष्यार्थ पहा.२२.—'संपरिष्वक्त स्त्री-पुरुषांप्रमाणें सुषुप्तीत जीवात्म-परमात्म्याचें एकत्व असल्यामुळें पहात नाही,' असें सांगितलें. 'आत्मा स्वयंज्योति आहे,' असेंहि सांगितलें. स्वयंज्योतिष्ट्व म्ह० चैतन्यास्वभावता. आत्मा जर अग्नीच्या उष्णत्वादिकांप्रमाणें चैतन्य-आत्मस्वभाव—चैतन्यस्वरूप असेल तर, जरी त्याचें परमात्म्याशी एकत्व झालें तरी, तो स्वभाव कसा सोडील ? ह्मणजे आपल्याला व दुसऱ्याला कसा जाणणार नाहीं ? आतां 'तो आपला चैतन्यस्वभाव सोडीतच नाही,' ह्मणून म्हणाल तर तो या सुषुप्तावस्थेंत पहात कसा नाहीं ? 'तो चैतन्यात्मस्वभावहि आहे व जाणतहि नाहीं' हें म्हणणें परस्पर विरुद्ध आहे, या शंकेचा परिहार—

यद्वै तन्न पश्यति पश्यन्वै तन्न पश्यति न हि द्रष्टुर्दृष्टेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वात् । न तु तद्द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यत्पश्येत् ॥ २३

अन्वयार्थ—[तत् यत् वै न पश्यति पश्यन् वै तत् न पश्यति—] आत्मा सुषुप्तींत जें पहात नाहीं, असें तूं समजतोस तें तसें नाहीं, तो पाहणारा असतो. तथापि विशेष दर्शनाच्या अभावीं, विशेष दर्शनाचा अभाव पहात असून पहात नाहीं, अशी भ्रांति होते. [हि द्रष्टुः दृष्टेः विपरिलोपः न विद्यते—] कारण द्रष्टयाच्या दृष्टीचा विनाश होत नाहीं. [अविनाशित्वात्—] कारण तिला अविनाशित्व आहे. [ततः अन्यत् विभक्तं तत् द्वितीयं न तु अस्ति यत् पश्येत्—] त्या दृष्टयाहून निराळी—विभक्त अशी ती द्वितीय—विषयभूत वस्तुच नाहीं, कीं जी तो पाहील. याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ.२१३,५०२पहा.२३

यद्वै तन्न जिघ्रति जिघ्रन्वै तन्न जिघ्रति न हि
घ्रातुर्घ्रातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु
तद्द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यज्जिघ्रेत् ॥२४

अन्वयार्थ—[यद्वै तत् न जिघ्रति०—] आत्मा सुषुप्तींत जें हुंगीत नाहीं तें तो हुंगणारा असतांनाच हुंगीत नाहीं, असें वाटतें. वास घेणाऱ्याच्या गंध-ग्रहणशक्तीचा विनाश होत नाहीं. कारण ती शक्ति अविनाशी आहे. सुषुप्तींत त्या घ्रात्यापासून निराळी विभक्त अशी दुसरी विषयभूत वस्तुच नाहीं, कीं जिचा तो वास घेईल २४.

यद्वै तन्न रसयते रसयन्वै तन्न रसयते न हि रसयितू
रसयतेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वि-
तीयमास्ति ततोऽन्यद्विभक्तं यद्रसयेत् ॥ २५

अन्वयार्थ—[आत्मा सुषुप्तींत जें चाखीत नाहीं तें तो तेथें रस ग्रहण करणारा असतांनाच रस ग्रहण करीत नाहीं. कारण रसास्वाद घेणाऱ्या पुरुषाच्या रसग्रहणशक्तीचा विनाश होत नाहीं. कारण ती अविनाशी आहे. त्या पुरुषाहून निराळी विभक्त अशी दुसरी वस्तु नाहीं कीं जिचा तो रस चाखील.२५

यद्वै तन्न वदति वदन्वै तन्न वदति न हि वक्तु-
र्वक्तेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वितीय-
मस्ति ततोऽन्यद्विभक्तं यद्वदेत् ॥ २६

अन्वयार्थ—आत्मा सुषुप्तींत जें बोलत नाहीं तें तो तेथें बोलणारा असा असतांनाच बोलत नाहीं. वक्त्याच्या वक्तीचा—वचनशक्तीचा विनाश होत

नाहीं. कारण ती अविनाशी आहे. त्या वक्त्याहून निराळी–विभक्त विषयभूत दुसरी वस्तु नाहीं कीं जिच्या विषयी तो बोलेल. २६

यद्वै तन्न शृणोति शृण्वन्वै तन्न शृणोति न हि श्रोतुः श्रुतेर्विपरिलोपो विद्यते विनाशित्वान्न तु तद्-द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यच्छृणुयात् ॥ २७

अन्वयार्थ—आत्मा सुषुप्तींत जें ऐकत नाहीं तें तो तेथें ऐकणारा असा असतांनाच ऐकत नाही. कारण श्रोत्याच्या श्रुतीचा विनाश होत नाहीं. कारण ती अविनाशी आहे. त्या श्रोत्याहून निराळें–विभक्त असें दुसरें विषय-भूत कांहीं नाहीं, की जें तो ऐकेल. २७.

यद्वै तन्न मनुते मन्वानो वै तन्न मनुते न हि मन्तुर्मतेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यन्मन्वीत

अन्वयार्थ—आत्मा सुषुप्तींत जें मनन करीत नाहीं तें तेथें तो मनन कर-णारा असा असतांनाच मनन करीत नाहीं. कारण मनन करणाऱ्याच्या मतीचा विनाश होत नाही. कारण ती मति अविनाशी आहे. मनन करणाराहून निराळें –विभक्त असें दुसरें विषयभूत नाहीं, कीं ज्याचें तो मनन करील. २८.

यद्वै तन्न स्पृशति स्पृशन्वै तन्न स्पृशति न हि स्प्रष्टुः स्पृष्टेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यत्स्पृशेत् ॥ २९

अन्वयार्थ—आत्मा सुषुप्तींत जो स्पर्श करीत नाहीं तो तेथें स्पर्श करणारा असा असतांना स्पर्श करीत नाही. कारण स्पर्श करणाराच्याच स्पर्शनशक्तीचा विनाश होत नाहीं. कारण ती शक्ति अविनाशी आहे. त्या स्पर्शकर्त्याहून निराळी विभक्त अशी दुसरी विषयभूत वस्तु नसते कीं ज्याला तो स्पर्श करील.

यद्वै तन्न विजानाति विजानन्वै तन्न विजानाति न हि विज्ञातुर्विज्ञातेर्विपरिलोपो विद्यतेऽविनाशित्वान्न तु तद्-द्वितीयमस्ति ततोऽन्यद्विभक्तं यद्विजानीयात् ॥ ३०

अन्वयार्थ—आत्मा सुषुप्तींत जें जाणत नाहीं तें तो तेथें जाणणारा असा असतांनाच जाणत नाहीं. कारण विज्ञात्याच्या विज्ञातीचा विनाश होत नाहीं. कारण ती विज्ञानशक्ति अविनाशी असते. सुषुप्तींत विज्ञानाहून निराळी–विभक्त

दुसरी विषयभूत वस्तु नसते कीं जिला तो जाणील. (उपपत्तीसाठीं याचा भाष्यार्थ पहा) ३०—जाग्रत् व स्वप्न या अवस्थांप्रमाणें सुषुप्तींतहि पुरुष ज्याला पाहील—जाणील अशी दुसरी आत्मभिन्न वस्तूच नाहीं, त्यामुळें सुषुप्तींत त्याला कोणत्याहि विशेषाचें ज्ञान होत नाहीं असें सांगितलें. आतां जाग्रत् व स्वप्न या अवस्थांमध्यें त्याला विशेषविज्ञान कोणत्या निमित्तानें होतें तें सांगतात—

यत्र वा अन्यदिव स्यात्तत्रान्योऽन्यत्पश्येदन्योऽन्यज्जिघ्रेदन्योऽन्यद्रसयेदन्योऽन्यद्वदेदन्योऽन्यच्छृणुयादन्योऽन्यन्मन्वीतान्योऽन्यत्स्पृशेदन्योऽन्यद्विजानीयात् ॥ ३१

अन्वयार्थ—[यत्र वै अन्यत् इव स्यात् तत्र अन्यः अन्यत् पश्येत्—] ज्या जागरित किंवा स्वप्न दशेंत आत्म्याहून भिन्न वस्तूशी होते त्या अवस्थेंत आपल्याला अन्यसा मानणारा प्रमाता अन्य वस्तु पाहतो, त्याचप्रमाणें [अन्यः अन्यत् जिघ्रेत्०—] अन्य अन्याचा वास घेतो, अन्य अन्याचा रस चाखतो, अन्य अन्य वक्तव्य बोलतो, अन्य स्वतःहून भिन्न शब्दाला ऐकतो, अन्य अन्य मन्तव्याचें मनन करितो, अन्य अन्य पदार्थाला स्पर्श करितो व अन्य अन्याला जाणतो. ३१.—सुषुप्तींत दुसऱ्या वस्तूला प्रत्युपस्थापित करणारी अविद्या शांत झालेली असते. त्यामुळें द्वितीय वस्तूचा अभाव होतो. प्राज्ञ स्वयंप्रकाश आत्म्याशीं एकरूप व संप्रसन्न—स्वच्छ होतो—

सलिल एको द्रष्टाऽद्वैतो भवत्येष ब्रह्मलोकः सम्राडिति हैनमनुशशास याज्ञवल्क्य एषाऽस्य परमा गतिरेषाऽस्य परमा संपदेषोऽस्य परमो लोक एषोऽस्य परम आनन्द एतस्यैवाऽऽनन्दस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति ॥ ३२

अन्वयार्थ—[सलिले एकः द्रष्टा अद्वैतः भवति—] ज्याप्रमाणें जलांत त्याप्रमाणें सुषुप्तींत एक द्रष्टा अद्वैत होतो. [एषः ब्रह्मलोकः सम्राड् इति ह एनं अनुशशास—] हा ब्रह्मलोक आहे, ' हे सम्राट्, ' असें संबोधून याज्ञवल्क्य जनकाला असें अनुशासन करता झाला. [एषा अस्य परमा गतिः—] ही याची परमा गति, [एषा अस्य परमा संपत—] ही याची परमा संपत्, [एषः अस्य परमः लोकः—] हा याचा परम लोक, [एषः अस्य परमः आनंदः—] हा याचा परम आनन्द. [एतस्य एव आनंदस्य मात्रां अन्यानि भूतानि

उपजीवन्ति—] याच आनंदाच्या मात्रेवर—कलेवर अन्य भूतें आपली उपजीविका करितात ३२.—सैंधव मिठाच्या खड्यांवरून त्याच्या पर्वतांचें ज्ञान जसें करून द्यावें त्याप्रमाणें परमानंदाच्या ज्या लेशांवर ब्रह्मादि-मनुष्यान्त भूतें उपजीविका करितात त्या लेशांच्या द्वारा त्यांच्या मूळ आनंदसिंधूचें ज्ञान करून देण्यासाठीं याज्ञवल्क्य म्हणतात—

स यो मनुष्याणाꣳराद्धः समृद्धो भवत्यन्येषामाधिपतिः सर्वैर्मानुष्यकैर्भोगैः संपन्नतमः स मनुष्याणां परम आनन्दोऽथ ये शतं मनुष्याणामानन्दाः स एकः पितॄणां जितलोकानामानन्दोऽथ ये शतं पितॄणां जितलोकानामानन्दः स एको गन्धर्वलोक आनन्दोऽथ ये शतं गन्धर्वलोक आनन्दाः स एकः कर्मदेवानामानन्दो ये कर्मणा देवत्वमभिसंपद्यन्तेऽथ ये शतं कर्मदेवानामानन्दाः स एक आजानदेवानामानन्दो यश्च श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतोऽथ ये शतमाजानदेवानामानन्दाः स एकः प्रजापतिलोक आनन्दो यश्च श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतोऽथ ये शतं प्रजापतिलोक आनन्दाः स एको ब्रह्मलोक आनन्दो यश्च श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतोऽथैष एव परम आनन्द एष ब्रह्मलोकः सम्राडिति होवाच याज्ञवल्क्यः सोऽहं भगवते सहस्रं ददाम्यत ऊर्ध्वं विमोक्षायैव ह्रीत्यत्र ह याज्ञवल्क्यो बिभयांचकार मेधावी राजा सर्वेभ्यो माऽन्तेभ्य उदरौत्सीदिति ३३

अन्वयार्थ—[सः यः मनुष्याणां राद्धः समृद्धः भवति—] तो जो मनुष्यांतील अविकल—समग्रावयव, समृद्ध—उपभोगोपकरणसंपन्न असतो [अन्येषां अधिपतिः—] दुसऱ्या स्वसमान जातीच्या लोकांचा अधिपति असतो [सर्वैः मानुष्यकैः भोगैः संपन्नतमः—] सर्व मनुष्यांच्या भोगसाधनांनीं अत्यंत संपन्न असतो, (युधिष्ठिरासारखा राजा हें याचें उदाहरण आहे.) [सः मनुष्याणां परमः आनन्दः—] तोच मनुष्यांचा परम आनंद होय. [अथ ये मनुष्याणां शतं आनन्दाः—] असे जे मनुष्यांचे शंभर आनंद [सः एकः पितॄणां जितलोकानां आनन्दः—] तो कर्मानें पितृलोकास जिंकलेल्या पितरांचा एक आनंद

होय. जितलोक पितरांचे जे शंभर आनंद तो गंधर्वलोकचा एक आनंद. गंधर्वलोकांतील जे शंभर आनंद तो कर्मदेवांचा एक आनंद. [ये कर्मणा देवत्वं अभिसंपद्यन्ते–] जे कर्मानें देवत्वास प्राप्त होतात ते कर्मदेव. जे कर्मदेवांचे शंभर आनंद [सः आजानदेवानां एकः आनंदः–] तो जन्मसिद्ध देवांचा एक आनंद, तसाच [यः च अव्रजिनः अकामहतः श्रोत्रियः–] जो निष्पाप, निष्काम, श्रोत्रिय त्याचाहि आनंद आजानदेवांच्या आनंदाच्या परिमाणाचाच असतो. [आजानदेवानां०–] आजानदेवाचे जे शंभर आनंद तो प्रजापतिलोकांतील–विराट्-शरीरांतील एक आनंद व जो निष्पाप, निष्काम श्रोत्रिय त्याचाहि तो आनंद. जे प्रजापतिलोकांतील शत आनंद तो एक ब्रह्मलोकांतील –हिरण्यगर्भशरीरांतील आनंद. तसाच जो निष्पाप व निष्काम श्रोत्रिय त्याचाहि तो आनंद होय. [अथ एषः एव परमः आनंदः–] आतां यापुढें गणिताची निवृत्ति होते. ' एषः अस्य परमः आनन्दः ' असें म्हणून जो आनंद वर सांगितला, समुद्राच्या तुषारांप्रमाणें ज्या परमानन्दाचे ब्रह्मलोकांतील आनंद हे अंश आहेत, उत्तरोत्तर शतगुणवृद्धीनें युक्त असलेले आनंद ज्यांत एकत्वास प्राप्त होतात व जो श्रोत्रियप्रत्यक्ष आहे तो हाच संप्रसादलक्षण परम आनंद आहे. [सम्राड् एषः ब्रह्मलोकः इति ह उवाच याज्ञवल्क्यः–] ' हे सम्राट्, हा ब्रह्मलोक ' असें याज्ञवल्क्य म्हणाला. त्यावर जनक म्हणतो–[अहं भगवते सहस्रं ददामि०–] " मी तुम्हांला सहस्र गाई देतों. आतां या पुढें विमोक्षासाठीं त्याचेंच साधन सांगा. " [अत्र याज्ञवल्क्यः ह बिभयांचकार–] तें ऐकून याज्ञवल्क्य भ्याला. [मेधावी राजा मा सर्वेभ्यः अन्तेभ्यः उदरौत्सीत् इति–] हा मेधावी–धारणा शक्तिमान् राजा मला सर्व निर्णयान्तासाठीं अवरोध करीत आहे. (याचा भाष्यार्थ पहा.) ३३–आतां अज्ञ संसारी जीवाच्या संचरणाचें कामादि निमित्तांसह वर्णन करावें, म्हणून पुढील ग्रंथास आरंभ––

स वा एष एतस्मिन्स्वप्नान्ते रत्वा चरित्वा दृष्ट्वैव पुण्यं च पापं च पुनः प्रतिन्यायं प्रतियोन्याद्रवति बुद्धान्तायैव ॥ ३४

अन्वयार्थ––[सः वै एषः एतस्मिन् स्वप्नान्ते रत्वा चरित्वा–] तोच हा या स्वप्नान्तांत रत होऊन, विहार करून, [पुण्यं च पापं च दृष्ट्वा एव–] पुण्यफल व पापफल यांना नुस्तें पाहूनच [पुनः प्रतिन्यायं प्रतियोनि बुद्धान्ताय एव

आद्रवति–] पुनः गेल्या मार्गानें व यथास्थान बुद्धान्तासाठींच परत येतो. (याच्या पूर्वोत्तर संबंधासाठीं भाष्यार्थ पहा.) ३४–येथून पुढें याच्या संसारांचें वर्णन केलें जातें. जसा हा आत्मा स्वप्नान्तांतून बुद्धान्तास आला तसाच तो या देहापासून दुसऱ्या देहास प्राप्त होतो, याविषयीं दृष्टान्त—

तद्यथाऽनः सुसमाहितमुत्सर्जद्यायादेवमेवायꣳशारीर आत्मा प्राज्ञेनाऽऽत्मनाऽन्वारूढ उत्सर्जन्याति यत्रैतदूर्ध्वोच्छ्वासी भवति ॥ ३५

अन्वयार्थ—[तत् यथा सुसमाहितं अनः–] लोकांत ज्याप्रमाणें सामानानें अतिशय लादलेला गाडा [उत्सर्जन् यायात्–] मोठा शब्द करीत जावा [एवं एव अयं शारीरः आत्मा–] त्याचप्रमाणें हा शारीर–लिंगोपाधि आत्मा [प्राज्ञेन आत्मना अन्वारूढः उत्सर्जन् याति–] पर आत्म्याकडून अधिष्ठित होत्साता शब्द करीत जातो; [यत्र एतत् ऊर्ध्वोच्छ्वासी भवति–] जेव्हां त्याला हें ऊर्ध्वोच्छ्वासित्व प्राप्त होतें (तेव्हां तो दुःखानें दीन शब्द करीत जातो. लिंगोपाधि आत्मा मर्मांचा च्छेद होऊं लागला असतां–मर्में तोडलीं जाऊं लागलीं असतां दुःखवेदनेनें आर्त होत्साता शब्द करीत जातो. ही कष्टकर अवस्था दृश्यमान–अनुभवास येणारी जरी असली तरी जन्म-मरणरूप संसाराविषयीं वैराग्य उत्पन्न व्हावें, म्हणून श्रुति तिचा अनुवाद करीत आहे. खरोखर हा संसार अशाप्रकारचा अतिशय कष्टकर आहे कीं, ज्यामुळें उत्क्रान्तिसमयीं मर्मांचा छेद होऊं लागला असतां दुःखाच्या वेदनेनें आर्त झालेल्या पुरुषाची स्मृति नष्ट होते व ज्याचें चित्त परवश झालें आहे अशा त्याला पुरुषार्थाच्या साधनाचें अनुष्ठान करण्याचें सामर्थ्य नसतें. तस्मात् जोंवर ही अवस्था प्राप्त झाली नाहीं तोंवरच पुरुषार्थाच्या साधनाचें अनुष्ठान करण्याविषयीं अप्रमत्त–सावधान–व्हावें, असें श्रुति कारुण्यानें सांगत आहे.) ३५–त्याचें हें ऊर्ध्वोच्छ्वासित्व कोणत्या वेळीं, कोणत्या निमित्तानें, कसें व कशासाठीं होतें तें सांगतात–

स यत्रायमणिमानं न्येति जरया वोपतपता वाऽणिमानं निगच्छति तद्यथाऽग्रं वोदुम्बरं वा पिप्पलं वा बन्धनात्प्रमुच्यत एवमेवायं पुरुष एभ्योऽङ्गेभ्यः संप्रमुच्य पुनः [illegible]न्यायं प्रा[illegible]न्याद्रवति प्राणायैव ॥ ३६

अन्वयार्थ—[सः अयं यत्र अणिमानं न्येति–] तो हा देह ज्यावेळीं कृशत्वास प्राप्त होतो, [जरया वा उपतपता वा अणिमानं निगच्छति–] एक तर जरेनें–वार्द्धक्यामुळें किंवा ज्वरादिरोगानें तो कृशत्वास प्राप्त होतो [तत् यथा आम्रं वा उदुंबरं वा पिप्पलं वा बन्धनात् प्रमुच्यते–] तेव्हां जसें आम्रफळ किंवा उदुंबरफळ अथवा पिंपळाचें फळ बंधनापासून–देंठापासून सुटतें, [एवं एव अयं पुरुषः एभ्यः अंगेभ्यः संप्रमुच्य–] त्याचप्रमाणें हा लिंगोपाधि पुरुष या चक्षुरादि शरीरावयवांपासून अगदीं प्रमुक्त होऊन [पुनः प्रतिन्यायं प्रतियोनि प्राणाय एव आद्रवति–] पुनः आल्यामार्गानें प्रत्येक योनीप्रत प्राणाच्या विशेष अभिव्यक्तीसाठीच जातो. ३६–' पण हें शरीर सोडून जाणाऱ्या त्या लिंगोपाधि आत्म्यामध्यें दुसरें शरीर ग्रहण करण्याचें सामर्थ्य नसतें. कारण त्याच्या शरीरेंद्रियांचा वियोग झालेला असतो. राजाच्या भृत्यांप्रमाणें त्याचें शरीर तयार करून त्याची वाट पहात राहणारे त्याचे भृत्यहि नसतात. तेव्हां तो दुसऱ्या शरीराचें ग्रहण कसा करितो ?' यांचें सदृष्टान्त उत्तर––

तद्यथा राजानमायान्तमुग्राः प्रत्येनसः सूतग्रामण्योऽन्नैः पानैरावसथैः प्रतिकल्पन्तेऽयमायात्ययमागच्छतीत्येवꣳ हैवंविदꣳ सर्वाणि भूतानि प्रतिकल्पन्त इदं ब्रह्मायातीदमागच्छतीति ॥

अन्वयार्थ—[तत् यथा राजानं आयान्तं उग्राः प्रत्येनसः सूतग्रामण्यः–] त्याविषयीं दृष्टान्त–जसे राजा येत असतां उग्र कर्म करणारे–पाप कर्मांत नियुक्त केलेले लोक, सूत व ग्रामनायक [अन्नैः पानैः आवसथैः अयं आयाति अयं आगच्छति इति प्रतिकल्पन्ते–) विविध अन्न, पान व प्रासादादिक तयार करून 'हा येत आहे' 'हा येत आहे' असें ह्मणत त्याची प्रतीक्षा करितात [एवं ह एवंविदं सर्वाणि भूतानि इदं ब्रह्म आयाति इदं आगच्छति इति प्रतिकल्पन्ते–] त्याप्रमाणें या कर्मफलवेत्त्या भोक्त्याचीं सर्व भूतें 'हें ब्रह्म येत आहे,' 'हें येत आहे' असें म्हणून प्रतीक्षा करितात. (सर्व जगत् या अज्ञाच्या स्वकर्मफलोपभोगासाठीं साधन सिद्ध व्हावें ह्मणून ग्रहण केलेलें आहे. हा एका देहापासून दुसऱ्या देहास प्राप्त होण्याची इच्छा करणारा भोक्ता आपल्या कर्माचें फल भोगण्यासाठीं प्रवृत्त झाला आहे. यास्तव सर्वच जगत् भोक्त्याच्या कर्मानें प्रेरित होत्सातें त्याच्या कर्मफलोपभोगास योग्य असें साधन निर्माण करून प्रतीक्षा करीतच राहतें.

ज्याप्रमाणें स्वप्नस्थानांतून जागरित स्थानास प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषाचें शरीर पूर्वीच केलेलें असतें, त्यावेळीं अपूर्व शरीर कांहीं केलें जात नाहीं, त्याचप्रमाणें एका देहांतून दुसऱ्या देहास प्राप्त होण्याची इच्छा करणाराचें दुसरें शरीर पंचभूतादिकांनीं केलेलेंच असतें, असा भावार्थ.) ३७.—त्याच्याबरोबर येथून कोण कोण जातात? उत्तर—

त था राजानं प्रयियासन्तमुग्राः प्रत्येनसः सूतग्रामण्योऽभिसमायन्त्येवमेवेममात्मानमन्तकाले सर्वे प्राणा अभिसमायन्ति यत्रैतदूर्ध्वोच्छ्वासी भवति ॥ ३८

इति बृहदारण्यकोपनिषदि तृतीयाध्यायस्य तृतीय ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—[तत् यथा राजानं०—] त्याविषयीं दृष्टान्त—ज्याप्रमाणें प्रकर्षानें जाण्याची इच्छा करणाऱ्या राजाच्या अभिमुख होऊन हिंसादि पापकर्मांत नियुक्त केलेले उग्र, सूत व ग्रामणी येतात [एवं एव यत्र एतत् ऊर्ध्वोच्छ्वासी भवति तदा अन्तकाले सर्वे प्राणाः इमं आत्मानं अभिसमायन्ति—] त्याप्रमाणेंच ज्यावेळी हा आत्मा ऊर्ध्वोच्छ्वासी होतो त्यावेळी—अन्तकालीं सर्व प्राण या आत्म्याच्या अभिमुख होऊन येतात. (त्याच्या बरोबर जावयास तयार होतात. सु. ब्र. पृ. ४५७ पहा.) ३८ (३)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
बृहदारण्यकाच्या चवथ्या अध्यायाचें तिसरें ब्राह्मण समाप्त.

—संसाराचें उपवर्णन प्रस्तुत आहे. त्या संसारप्रकरणांत 'हा पुरुष या अंगांपासून उत्तम प्रकारें प्रमुक्त होऊन,' असें सांगितलें. तें ' संप्रमोक्षण '—उत्तम प्रकारें मोक्षण—मुक्त होणें कोणत्या वेळीं किंवा कसें होतें, तें सांगण्यासाठीं—त्या संसरणाचें सविस्तर वर्णन करावें, म्हणून हें ब्राह्मण आरंभिलें जात आहे—

स यत्रायमात्माऽबल्यं न्येत्य संमोहमिव न्येत्यथैनमेते प्राणा अभिसमायन्ति स एतास्तेजोमात्राः समभ्याददानो हृदयमेवान्ववक्रामति स यत्रैष चाक्षुषः पुरुषः पराङ्पर्यावर्ततेऽथारूपज्ञो भवति ॥ १

अन्वयार्थ—[सः अयं आत्मा यत्र अबल्यं न्येत्य—] तो हा प्रकृत आत्मा जेव्हां दुर्बलतेस प्राप्त होऊन [संमोहं इव न्येति—] संमूढतेलासा प्राप्त होतो

[अथ एते प्राणाः एनं अभिसमायन्ति–] त्यावेळीं हे वागादिक प्राण या आत्म्यास आभिमुख्यानें निःशेष प्राप्त होतात. [सः एताः तेजोमात्राः समभ्याददानः–] तो या चक्षुरादि तेजोमात्रा–तेजाचे अवयव निःशेष आकर्षण करून घेणारा असा होत्साता [हृदयं एव अन्ववक्रामति–] हृदयामध्येंच अभिव्यक्त विज्ञानवान् होतो. चक्षुरादि तेजोमात्रांचें आकर्षण करून घेतल्यावर त्यांचें विज्ञान हृदयांतच अभिव्यक्त होतें. [यत्र सः एषः चाक्षुषः पुरुषः पराङ् पर्यावर्ततें–] ज्यावेळीं तो हा चाक्षुष–चक्षूंतील पुरुष–आदित्यांश सर्वतः व्यावृत्त होतो [अथ अरूपज्ञः भवति–] तेव्हां मुमूर्षु अरूपज्ञ होतो, त्याला रूपज्ञान होईनासें होतें. (सु. ब्र. पृ. २५३ पहा.) १.

एकीभवति न पश्यतीत्याहुरेकीभवति न जिघ्रतीत्याहुरेकीभवति न रसयत इत्याहुरेकीभवति न वदतीत्याहुरेकीभवति न शृणोतीत्याहुरेकीभवति न मनुत इत्याहुरेकीभवति न स्पृशतीत्याहुरेकीभवति न विजानातीत्याहुः ॥

अन्वयार्थ—[एकीभवति न पश्यति इति आहुः–] चक्षुरिंद्रिय लिंगात्म्याशीं एकरूप होतें, त्यावेळीं हा पहात नाहीं, असें ह्मणतात. [एकीभवति न जिघ्रति इति आहुः–] घ्राणेंद्रिय एकरूप होतें, तेव्हां वास घेत नाहीं, असें ह्मणतात. [एकीभवति०–] रसनेंद्रिय एकरूप होतें, तेव्हां रस जाणत नाहीं, असें ह्मणतात. वागिंद्रिय एकरूप होतें, तेव्हां बोलत नाहीं, असें ह्मणतात. श्रोत्रेंद्रिय एकरूप होतें, तेव्हां ऐकत नाही, असें ह्मणतात. मन लिंगात्म्याशीं एकरूप होतें, तेव्हां मनन करीत नाही, असें ह्मणतात. त्वगिंद्रिय एकरूप होतें, तेव्हां स्पर्श करीत नाहीं, असें ह्मणतात. बुद्धि लिंगात्म्याशी एकरूप होते, तेव्हां जाणत नाहीं, असें ह्मणतात. (त्याची सर्व इंद्रियें आपल्या लिंगात्म्याशीं एकरूप होतात. त्यामुळें त्याच्याजवळ बसलेले लोक हा पहात, ऐकत वगैरे नाहीं, असें ह्मणतात. याप्रमाणें मुमूर्षावस्थेंत हृदयांत सर्व करणांचा उपसंहार झाला असतां आंतल्या आंत होणारा जो व्यापार तो सांगितला जातो–)

तस्य हैतस्य हृदयस्याग्रं प्रद्योतते तेन प्रद्योतेनैष आत्मा निष्क्रामति चक्षुष्टो वा मूर्ध्नो वाऽन्येभ्यो वा शरीरदेशेभ्यस्तमुत्क्रामन्तं प्राणोऽनूत्क्रामति प्राणमनूत्क्रामन्तं

**सर्वे प्राणा अनूत्क्रामन्ति सविज्ञानो भवति सविज्ञानमे-
वान्ववक्रामति । तं विद्याकर्मणी समन्वारभेते पूर्वप्रज्ञा च ॥२**

अन्वयार्थ—[तस्य ह एतस्य हृदयस्य अग्रं प्रद्योतते—] त्या या हृदयाचें अग्र—नाडीमुख—बाहेर जाण्याचें द्वार प्रद्योतित—अतिशय प्रकाशित होतें [तेन प्रद्योतेन एषः आत्मा चक्षुष्टः वा मूर्ध्नः वा अन्येभ्यः वा शरीरदेशेभ्यः निष्क्रामति—] त्या आत्मज्योतिःप्रकाशानें हा लिंगात्मा चक्षूच्या द्वारा, मूर्धप्रदेशांतून किंवा दुसऱ्या शरीरप्रदेशांतून बाहेर निघतो. [तं उत्क्रामन्तं प्राणः अनूत्क्रामति—] तो लिंगोपाधि आत्मा शरीर सोडून जाऊं लागला असतां त्याच्या मागोमाग प्राण जाऊं लागतो. [प्राणं अनूत्क्रामन्तं सर्वे प्राणाः अनूत्क्रामन्ति—] प्राण अनूत्क्रमण करूं लागला असतां सर्व इंद्रियें अनूत्क्रमण करितात. [सविज्ञानः भवति—] त्यावेळी हा आत्मा सविज्ञान—विशेष विज्ञानवान् होतो. [सविज्ञानं एव अन्ववक्रामति—] तो त्या विज्ञानासहवर्तमानच गन्तव्य प्रदेशास जातो. [तं विद्याकर्मणी समन्वारभेते पूर्वप्रज्ञा च—] परलोकास जाणाऱ्या त्याच्या मागोमाग ज्ञान, कर्म व पूर्वप्रज्ञा—विषयानुभववासना जातात. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. २३५, २५२, ३८९, ४६९ पहा.) २

**तद्यथा तृणजलायुका तृणस्यान्तं गत्वाऽन्यमाक्रममाक्र-
म्याऽऽत्मानमुपसꣳहरत्येवमेवायमात्मेदꣳशरीरं निहत्यावि-
द्यां गमयित्वाऽन्यमाक्रममाक्रम्याऽऽत्मानमुपसꣳहरति ॥३**

अन्वयार्थ—[तत्—] त्याविषयी—देहान्तरसंचाराविषयीं हें निदर्शन—दृष्टान्त आहे. [यथा तृणजलायुका तृणस्य अन्तं गत्वा अन्यं आक्रमं आक्रम्य—] जशी गवतावरील जळू तृणाच्या टोंकाला जाऊन दुसरें तृण, या आक्रमाचा आश्रय करून [आत्मानं उपसंहरति—] आपला उपसंहार करते—आपल्या शरीराचा पूर्व अवयव अन्त्य अवयवाच्या ठिकाणी ओढून घेते [एवं एव अयं आत्मा इदं शरीरं निहत्य—] त्याप्रमाणेंच हा आत्मा या शरीराला मारून, [अविद्यां गमयित्वा—] त्याला अचेतन करून [अन्यं आक्रमं आक्रम्य—] दुसऱ्या आक्रमाचें—आश्रयाचें—भावी देहाचें आक्रमण करून [आत्मानं उपसंहरति—] आपला उपसंहार करतो. ३.—त्या दुसऱ्या देहाच्या आरंभाचे वेळीं

नित्य उपात्त उपादानच पुनः पुनः सोडून दुसरा देह केला जातो कीं तो अपूर्व असेंच उपादान पुनः पुनः घेतो ? उत्तर—

तद्यथा पेशस्कारी पेशसो मात्रामपादायान्यन्नवतरं कल्याणतरꣳरूपं तनुत एवमेवायमात्मेदꣳशरीरं निहत्याविद्यां गमयित्वाऽन्यन्नवतरं कल्याणतरꣳरूपं कुरुते पित्र्यं वा गान्धर्वं वा दैवं वा प्राजापत्यं वा ब्राह्मं वाऽन्येषां वा भूतानाम् ४

अन्वयार्थ—[तत् यथा—] त्याविषयीं दृष्टान्त—ज्याप्रमाणें [पेशस्कारी पेशसः मात्रां अपादाय अन्यत् नवतरं कल्याणतरं रूपं तनुते—]सुवर्णकार—सोनार सोन्याची मात्रा म्ह० अंश काढून घेऊन पूर्व रचनेहून निराळें अतिशय नवें व कल्याणाहून अधिक कल्याण—अधिक चांगलें रूप निर्माण करतो [एवं एव अयं आत्मा०—] त्याचप्रमाणें हा आत्मा या शरीराला मारून त्याला निश्चेष्ट करून दुसरें पहिल्यापेक्षां अधिक नवें व त्याहून अधिक चांगलें [पित्र्यं वा०—] पितरांचें, गंधर्वांचें, देवांचें, प्रजापतीचें, ब्रह्मदेवाचें, किंवा अन्यभूतांचें [रूपं कुरुते—] रूप निर्माण करतो.४. —जे या आत्म्याचे उपाधिभूत बंधनसंज्ञक बुद्ध्यादि पदार्थ, ज्यांनीं संयुक्त असलेला हा आत्मा तन्मय असल्यासारखा भासतो ते पदार्थ एकत्र गोळा करून—त्यांचा संग्रह करून येथें प्रतिनिर्देश केला जातो—

स वा अयमात्मा ब्रह्म विज्ञानमयो मनोमयः प्राणमयश्चक्षुर्मयः श्रोत्रमयः पृथिवीमय आपोमयो वायुमय आकाशमयस्तेजोमयोऽतेजोमयः काममयोऽकाममयः क्रोधमयोऽक्रोधमयो धर्ममयोऽधर्ममयः सर्वमयस्तद्यदेतदिदंमयोऽदोमय इति । यथाकारी यथाचारी तथा भवति साधुकारी साधुर्भवति पापकारी पापो भवति पुण्यः पुण्येन कर्मणा भवति पापः पापेन । अथो खल्वाहुः काममय एवायं पुरुष इति । स यथाकामो भवति तत्क्रतुर्भवति यत्क्रतुर्भवति तत्कर्म कुरुते यत्कर्म कुरुते तदभिसंपद्यते ॥ ५

अन्वयार्थ—[स वा अयं आत्मा ब्रह्म—] जो अशा रीतीनें तीन अवस्था व इह-परलोक यांतून संचार करितो तो आत्मा ब्रह्मच आहे. जो अशनायापिपासा इत्यादि धर्मांनीं रहित आहे तो परमात्माच आहे. (याप्रमाणें आत्म्याचें

वास्तव रूप सांगून अवास्तवरूप सांगतात–) [विज्ञानमयः मनोमयः०–] तो विज्ञानमय, मनोमय, प्राणमय, चक्षुर्मय, श्रोत्रमय, पृथिवीमय, आपोमय, वायुमय, आकाशमय, तेजोमय, अतेजोमय, काममय, अकाममय, क्रोधमय, अक्रोधमय, धर्ममय, अधर्ममय, सर्वमय; [तत् यत् एतत् इदंमयः अदोमयः इति–] तात्पर्य यांचें इदंमयत्व व अदोमयत्व म्ह० प्रत्यक्ष पदार्थप्रायत्व व परोक्ष पदार्थप्रायत्व सिद्ध झालें. (पूर्वपक्ष–) [यथाकारी यथाचारी तथा भवति–] तो जसें करणारा व जसें आचरणारा असतो तसा होतो [साधुकारी साधुः भवति–] शुभ करणारा शुभ होतो, [पापकारी पापः भवति–] पाप करणारा पापी होतो; [पुण्येन कर्मणा पुण्यः भवति–] पुण्य कर्मानें पुण्यवान् होतो व [पापेन पापः भवति–] पाप कर्मानें पापी होतो. (सिद्धान्त–) [अथो खलु आहुः–] दुसरेहि कित्येक म्हणतात–[अयं पुरुषः काममयः एव–] हा पुरुष काममयच आहे. [सः यथाकामः भवति तत्क्रतुः भवति–] तो जशा प्रकारच्या कामानें युक्त होतो तशा निश्चयाचा होतो. [यत्क्रतुः भवति तत् कर्म कुरुते–] ज्या निश्चयाचा असतो तें कर्म करतो आणि [यत् कर्म कुरुते तत् अभिसंपद्यते–] जें कर्म करतो त्याच्या फलाला प्राप्त होतो (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. १०४पहा.)५

तदेष श्लोको भवति । तदेव सक्तः सह कर्मणैति लिङ्गं मनो यत्र निषक्तमस्य । प्राप्यान्तं कर्मणस्तस्य यत्किंचेह करोत्ययम् । तस्माल्लोकात्पुनरैत्यस्मै लोकाय कर्मण इति नु कामयमानोऽथाकामयमानो यो कामो निष्काम आप्तकाम आत्मकामो न तस्य प्राणा उत्क्रामन्ति ब्रह्मैव सन्ब्रह्माप्येति।।६

अन्वयार्थ—[तत् एषः श्लोकः०–] त्याअर्थी हा मंत्र आहे. [अस्य लिंगं मनः यत्र निषक्तं–] यांचें लिंग–मन ज्यामध्यें निषक्त–अत्यंत आसक्त असतें [तत् एव सक्तः कर्मणा सह एति–] त्याच फलाविषयीं ज्याचा अभिलाष उद्भूत झाला आहे असा होत्साता, असा भावार्थ; तो कर्मासह त्या फलालाच प्राप्त होतो. [अयं इह यत् किंच करोति तस्य कर्मणः अन्तं प्राप्य–] हा या लोकीं जें कांहीं कर्म करतो त्या कर्माच्या अन्तास–समाप्तीस भोगानें प्राप्त होऊन [तस्मात् लोकात् पुनः अस्मै लोकाय कर्मणे ऐति–] त्या लोकापासून पुनः या लोकास कर्म करण्यासाठीं येतो. [इति नु कामयमानः–]

याप्रमाणेंच स्वरोखर कामयमान पुरुष संसार करतो. [अथ अकामयमानः यः अकामः निष्कामः आप्तकामः आत्मकामः—] आतां अकामयमान—जो अकाम, निष्काम, आप्तकाम, आत्मकाम असतो [तस्य प्राणाः न उत्क्रामन्ति—] त्याचे प्राण उत्क्रान्त होत नाहींत. [ब्रह्म एव सन् ब्रह्म अप्येति—] तो ब्रह्मच होऊन ब्रह्माला प्राप्त होतो. ब्रह्म होतो. याचा भाष्यार्थ व सु. ब्र.पृ.२१४ पहा.)६.

तदेष श्लोको भवति। यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः। अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुत इति। तद्यथाऽहिनिर्ल्वयनी वल्मीके मृता प्रत्यस्ता शयीतैवमेवेदꣳ शरीरꣳ शेतेऽथायमशरीरोऽमृतः प्राणो ब्रह्मैव तेज एव सोऽहं भगवते सहस्रं ददामीति होवाच जनको वैदेहः॥ ७

अन्वयार्थ—[तदेषः०—] त्याच अर्थी हा मत्र आहे. [यदा अस्य हृदि श्रिताः ये सर्वे कामाः प्रमुच्यन्ते—] ज्यावेळी याच्या हृदयाचा आश्रय करून असलेले जे सर्व काम ते सर्वथा नाहीसे होतात [अथ मर्त्यः अमृतः भवति—] तेव्हां हा मर्त्य अमृत होतो व [अत्र ब्रह्म समश्नुते—] या शरीरांत असतांनाच ब्रह्मभावास प्राप्त होतो. [तत्—] त्याविषयीं हा दृष्टान्त—[यथा अहिनिर्ल्वयनी वल्मीके मृता प्रत्यस्ता शयीत—] ज्याप्रमाणें सापाची कात, वारुळादि सर्पाच्या राहण्याच्या ठिकाणीं, मेलेली व सर्पानें तिच्यावरील आत्मभाव काढून घेऊन टाकलेली अशी पडून राहते [एवं एव इदं शरीरं शेते—] त्याचप्रमाणें हें शरीर पडून राहतें [अथ अयं अशरीरः अमृतः प्राणः ब्रह्म एव तेजः एव—] व हा अशरीर, अमृत, प्राण, ब्रह्मच, तेजच आहे [सः अहं भगवते सहस्रं ददामि इति०—] तेव्हां 'तो मी तुम्हांला सहस्र गायी देतों' असें वैदेह जनक म्हणाला.—(याचा सविस्तर भाष्यार्थ पहा.) ७.—आत्म्याचीच कामना करणाऱ्या आत्मकाम ब्रह्मवेत्त्याला मोक्ष मिळतो, या मंत्र-ब्राह्मणोक्त अर्थी, त्याच अर्थाचें प्रतिपादन करणारे—

तदेते श्लोका भवन्ति। अणुः पन्था विततः पुराणो मांꣳ स्पृष्टोऽनुवित्तो मयैव। तेन धीरा अपियन्ति ब्रह्मविदः स्वर्गं लोकमित ऊर्ध्वं विमुक्ताः॥ ८

अन्वयार्थ—[तत्०—] त्याविषयीं हे श्लोक आहेत. [पन्थाः अणुः विततः पुराणः—] हा मोक्षसाधनभूत ज्ञानमार्ग सूक्ष्म, विस्तीर्ण (अथवा माध्यंदिनीयांचा ' वितरः ' हा पाठ घेतल्यास संसारतरणाचें साधन आहे, असा भावार्थ) तो पुराण—फार जुना आहे. [मां स्पृष्टः—] तो मलाच लाधला आहे. [मया एव अनुवित्तः—] मीच अनुभविला आहे, मजमध्येंच त्याचा फलावसानापर्यंत परिपाक झाला आहे. [तेन धीराः ब्रह्मविदः विमुक्ताः—] त्या मार्गानें दुसरेहि बुद्धिमान् ब्रह्मवेत्ते जिवंत असतांनाच विमुक्त होत्साते [इतः ऊर्ध्वं स्वर्गं लोकं अपियन्ति—] शरीरपातानंतर स्वर्गलोकास—मोक्षास प्राप्त होतात. ८

तस्मिञ्छुक्रमुत नीलमाहुः पिङ्गलꣳहरितं लोहितं च। एष पन्था ब्रह्मणाऽनुवित्तस्तेनैति ब्रह्मवित्पुण्यकृत्तैजसश्च ॥९

अन्वयार्थ—[तस्मिन्—] त्या मार्गाविषयीं मुमुक्षूंचा मतभेद आहे. [शुक्रं उत नीलं आहुः०—] कोणी त्याला शुक्र म्हणतात, कोणी निळा, पिंगट, हिरवा व लाल म्हणतात. [एषः पन्थाः ब्रह्मणा ह अनुवित्तः—] हा ज्ञानमार्ग परमात्मस्वरूप ब्राह्मणानें साक्षात् अनुभविलेला आहे.[ब्रह्मवित् पुण्यकृत् तैजसः तेन एति—] पुण्य करणारा आत्मभूत ब्रह्मवेत्ता त्या मार्गानें जातो ९. सु.ब्र.पृ. ४११ पहा.

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते। ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाꣳरताः ॥ १०

अन्वयार्थ—[ये अविद्यां उपासते ते अन्धं तमः प्रविशन्ति—] जे अविद्येचें—कर्माचें उपासन करितात ते अज्ञानाख्य संसारनियामक तमाला प्राप्त होतात. [ये उ विद्यायां रताः ते ततः भूयः इव तमः—] जे कर्मकांडरूप वेदलक्षण विद्येमध्यें रत असतात ते त्याहून अधिकच तमांत प्रवेश करितात १०.—ते अविद्यारूप तमांत जरी प्रवेश करीत असले तरी त्यांत काय दोष आहे ? उत्तर—

अनन्दा नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः। ताꣳस्ते प्रेत्याभिगच्छन्त्यविद्वाꣳसोऽबुधो जनाः ॥ ११

अन्वयार्थ—[अनन्दाः नाम ते लोकाः०—] असुख या नांवाचे ते लोक अन्धतमानें व्याप्त आहेत. [तान् ते अविद्वांसः अबुधः जनाः प्रेत्य अभिगच्छन्ति—] त्या लोकांस ते अविद्वान्, अनात्मज्ञ लोक मरून प्राप्त होतात.११.

आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः ।
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥ १२

अन्वयार्थ—[आत्मानं अयं पूरुषः अस्मि इति विजानीयात् चेत्–] जर कोणी संसारधर्मरहित आत्म्याला हा पुरुष मी आहें, असें जाणील तर मग तो [किं इच्छन् कस्य कामाय शरीरं अनुसंज्वरेत्–] आत्मातिरिक्त अशा कशाची इच्छा करणारा असा होत्साता व आत्मव्यतिरिक्त अशा कोणाच्या प्रयोजनासाठीं शरीरतापाच्या मागोमाग स्वतः संतप्त होईल ? (कशाच्याहि इच्छेनें व कोणासाठींहि तो संतप्त होणार नाहीं.) १२.

यस्यानुवित्तः प्रतिबुद्ध आत्माऽस्मिन्संदेह्ये गहने प्रविष्टः ।
स विश्वकृत्स हि सर्वस्य कर्ता तस्य लोकः स उ लोक एव ॥

अन्वयार्थ—[अस्मिन् संदेह्ये गहने प्रविष्टः आत्मा–] या अनेक अनर्थांनीं भरलेल्या व अनेक विवेकविज्ञानप्रतिबंधांनीं विषम अशा शरीरांत प्रविष्ट झालेला आत्मा [यस्य अनुवित्तः प्रतिबुद्धः–] ज्या ब्राह्मणाला प्राप्त झालेला व साक्षात्कार झालेला आहे [सः विश्वकृत्–] तो विश्वकृत्–विश्वाला करणारा आहे, [सः हि सर्वस्य कर्ता–] तोच सर्वांचा कर्ता आहे. [तस्य लोकः–] सर्व लोक त्याचा आहे व [सः उ लोकः एव–] तो सर्व लोकच आहे, (येथील 'लोक-'शब्दानें आत्मा सांगितला जातो. त्याचा सर्व आत्मा आहे व तो सर्वांचा आत्मा आहे.) १३.

इहैव सन्तोऽथ विद्मस्तद्वयं न चेदवेदिर्महती विनष्टिः ।
ये तद्विदुरमृतास्ते भवन्त्यथेतरे दुःखमेवापियन्ति ॥ १४

अन्वयार्थ—[इह एव सन्तः–] अनेक अनर्थांनीं व्याप्त अशा या शरीरांत अज्ञान दीर्घ निद्रेनें मोहित होऊन रहात असतांनाच [अथ वयं तत् कथंचित् विद्मः–] आम्ही ब्रह्मतत्त्वाला कसें तरी जाणतों आणि त्यामुळें कृतार्थ होतों. [न चेत् अवेदिः महती विनष्टिः–] पण या शरीरांत असतांना जर त्याला न जाणलें तर मी अज्ञ होईन; आणि त्या अज्ञानानें फारच मोठा जन्म-मरणादिरूप विनाश होईल. पण अहाहा, आम्हीं अद्वय ब्रह्माला जाणलें व त्यामुळें मोठ्या विनाशापासून सर्वथा मुक्त झालों. असेच दुसरेहि [ये तत्

विदुः—] जे त्या ब्रह्माला जाणतात [ते अमृताः भवन्ति—] ते अमृत होतात. [अथ इतरे दुःखं एव अपियन्ति—] पण इतर अब्रह्मज्ञ दुःखासच प्राप्त होतात.

यदैतमनुपश्यत्यात्मानं देवमञ्जसा । ईशानं
भूतभव्यस्य न ततो विजुगुप्सते ॥ १५

अन्वयार्थ—[यदा एतं देवं आत्मानं अंजसा अनुपश्यति—] जेव्हां या प्रकाशमान अथवा कर्मफल देणाऱ्या आत्म्याला आचार्यप्रसादानंतर साक्षात् जाणतो, [भूत-भव्यस्य ईशानं—] भूत व भविष्यत् कालांच्या स्वामीला साक्षात पहातो [ततः न विजुगुप्सते—] तेव्हां मग त्या ईशानापासून आपलें रक्षण करण्याची इच्छा करीत नाही. १५.

यस्मादर्वाक्संवत्सरोऽहोभिः परिवर्तते । तद्देवा
ज्योतिषां ज्योतिरायुर्होपासतेऽमृतम् ॥ १६

अन्वयार्थ—[यस्मात् अर्वाक् संवत्सरः अहोभिः परिवर्तते—] ज्या ईश्वराच्या अलीकडेच संवत्सर अहोरात्राख्य अवयवांसह राहतो [तत् ज्योतिषां अमृतं ज्योतिः देवाः आयुः इति ह उपासते—]त्या आदित्यादि ज्योतींचीहि अमृत ज्योति अशा ईश्वराची—ब्रह्माची देव ' आयुः ' अशा भावनेनें उपासना करितात.

यस्मिन्पञ्च पञ्चजना आकाशश्च प्रतिष्ठितः । तमेव
मन्य आत्मानं विद्वान्ब्रह्मामृतोऽमृतम् ॥ १७

अन्वयार्थ—[यस्मिन् पंच पंचजनाः च आकाशः प्रतिष्ठितः—] ज्या ब्रह्मामध्यें पांच गंधर्वादि पंचजन व अव्याकृतसंज्ञक आकाश प्रतिष्ठित आहे [तं एव आत्मानं अमृतं ब्रह्म मन्ये—] त्याच आत्म्याला मी अमृत ब्रह्म समजतों. [विद्वान् अमृतः—] ब्रह्माला जाणणारा असा होत्साता मी अमृतच आहें. सु. ब्र. पृ. ११३ पहा. १७.—किंवा प्रकृत पांच पंचजन ज्योतीसह प्राणादिकहि होऊं शकतील अशा आशयानें—

प्राणस्य प्राणमुत चक्षुषश्चक्षुरुत श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो
ये मनो विदुः । ते निचिक्युर्ब्रह्म पुराणमग्र्यम् ॥ १८

अन्वयार्थ—[प्राणस्य प्राणं०—] तो आत्मा—ब्रह्म प्राणाचा प्राण, चक्षूंचा चक्षु, श्रोत्राचा श्रोत्र व [मनसः मनः ये विदुः—] मनाचें मन आहे असें जे जाणतात [ते पुराणं अग्र्यं ब्रह्म निचिक्युः—] तेच त्या पुराण—फार प्राचीन

व अत्यंत श्रेष्ठ ब्रह्माला निश्चयानें जाणतात. सु.ब्र.पृ. ९६,११४पहा.१८. —त्या ब्रह्मदर्शनाचें साधन—

मनसैवानुद्रष्टव्यं नेह नानाऽस्ति किंचन । मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ॥ १९

अन्वयार्थ—[मनसा एव अनुद्रष्टव्यं–] परमार्थज्ञानानें संस्कृत अशा मनानेंच आचार्योपदेशपूर्वक ब्रह्म पहावें. [इह नाना किंचन न अस्ति–] त्या ब्रह्मामध्यें नाना असें कांहीं नाही. [यः इह नाना इव पश्यति–] जो ब्रह्मामध्यें नाना–भेदसा पहातो [सः मृत्योः मृत्युं आप्नोति–] तो मरणापासून मरणास प्राप्त होतो सु.ब्र.पृ.१४४पहा. १९–ज्याअर्थी असें आहे त्याअर्थी—

एकधैवानुद्रष्टव्यमेतदप्रमयं ध्रुवम् । विरजः पर आकाशादज आत्मा महान्ध्रुवः ॥ २०

अन्वयार्थ—[एकधा एव अनुद्रष्टव्यं–] आचार्योपदेशपूर्वक विज्ञानघन-अखंड-एकरस या एका प्रकारानेंच तें पहावें. कारण [एतत् अप्रमयं ध्रुवं–] तें ब्रह्म अप्रमेय, ध्रुव–निर्विकार आहे. [विरजः आकाशात् परः अजः आत्मा महान् ध्रुवः–] तें धर्माधर्मादिमलरहित, अव्याकृत आकाशाहूनहि सूक्ष्म, जन्मरहित, आत्मा, महान् व अविनाशी आहे. २०.

तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः । नानुध्यायाद्बहूञ्छब्दान्वाचो विग्लापनंहि तदिति ॥२१

अन्वयार्थ—[धीरः ब्राह्मणः तं एव विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत–] बुद्धिमान् ब्राह्मणानें त्याच आत्म्याला शास्त्र व आचार्योपदेश यांच्या द्वारा जाणून (परोक्ष शाब्द ज्ञान संपादन करून) त्याविषयीची प्रज्ञा करावी. साक्षात्काराच्या साधनांचें अनुष्ठान करावें. [बहून् शब्दान् न अनुध्यायात्–] पुष्कळ शब्दांचें अनुध्यान–चिंतन करूं नये. [हि·तत् वाचः विग्लापनं–] कारण तें–बहुशब्दांचें अनुध्यान वाणीला शिणविणारें आहे. २१.–मंत्र-ब्राह्मणांनीं हेतूंसह बंध व मोक्ष सांगितले. पुनः श्लोकांनीं मोक्षाचें स्वरूप सविस्तर प्रतिपादिले. येणेंप्रमाणें या आत्मविषयामध्यें सर्व वेद कसा उपयुक्त होतो तें सांगावें म्हणून अगोदर या प्रपाठकांतिल सफल आत्मज्ञानाचा अनुवाद—

स वा एष महानज आत्मा योऽयं विज्ञानमयः प्राणेषु य एषोऽन्तर्हृदय आकाशस्तस्मिञ्छेते सर्वस्य वशी सर्वस्येशानः सर्वस्याधिपतिः स न साधुना कर्मणा भूयान्नो एवासाधुना कनीयानेष सर्वेश्वर एष भूताधिपतिरेष भूतपाल एष सेतुर्विधरण एषां लोकानामसंभेदाय ॥

अन्वयार्थ—[सः वै एषः महान् अजः आत्मा यः अयं प्राणेषु विज्ञानमयः—] तोच हा महान् अज आत्मा कीं जो हा प्राणांतील विज्ञानमय. [यः एषः अन्तर्हृदये आकाशः तस्मिन् शेते—] हा जो हृदयांतील अव्याकृत आकाश त्यांत तो राहतो [सर्वस्य वशी सर्वस्य ईशानः सर्वस्य अधिपतिः—] तो सर्वांना स्ववश ठेवणारा, सर्वांचा ईशान, सर्वांचा अधिपति आहे. [सः साधुना कर्मणा न भूयान्—] तो पुण्यकर्मानें वाढत नाहीं व [असाधुना कनीयान् नो एव—] पापकर्मानें न्यून होत नाहींच. [एषः सर्वेश्वरः०—] हा सर्वेश्वर, हा भूतांचा अधिपति, हा भूतपाल, [एषः विधरणः एषां लोकानां असंभेदाय सेतुः—] हा सर्वांचें विधारण करणारा या लोकांची मर्यादा तुटूं नये म्हणून सेतु आहे. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. १०३, ३५८, ३२० पहा.)—आतां काम्यकर्मांना सोडून बाकीच्या सर्व कर्मकांडाचा परंपरेनें ज्ञानोत्पत्तीच्या अंगत्वानें विनियोग केला जातो—

तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेनैतमेव विदित्वा मुनिर्भवति । एतमेव प्रव्राजिनो लोकमिच्छन्तः प्रव्रजन्ति ॥

अन्वयार्थ—[तं एतं—] त्या या औपनिषद पुरुषाला [ब्राह्मणाः—] ब्राह्मण [वेदानुवचनेन यज्ञेन दानेन अनाशकेन तपसा विविदिषन्ति—] नित्य स्वाध्यायलक्षण वेदानुवचनानें तसेंच यज्ञ, दान व अनाशक तप, यांनीं जाणण्याची इच्छा करितात. [एतं एव विदित्वा मुनिः भवति—] यालाच जाणून मुनि होतो. [एतं एव लोकं इच्छन्तः प्रव्राजिनः प्रव्रजन्ति—] त्याच आत्मलोकाची इच्छा करणारे संन्यसनशील पुरुष संन्यास करितात. (अनाशक म्ह० रागद्वेषरहित इंद्रियांनीं विषयसेवन व यदृच्छालाभसंतुष्टत्व, या तपानें. याचा सविस्तर भाष्यार्थ पहा.)—पण ते आत्मलोकार्थी प्रव्रजनच कशासाठीं करितात ? उ०—

एतद्ध स्म वै तत्पूर्वे विद्वांसः प्रजां न कामयन्ते किं प्रजया करिष्यामो येषां नोऽयमात्माऽयं लोक इति ॥

अन्वयार्थ—[एतत् ह स्म वै तत्—] पारिव्राज्याविषयीं हें तें कारण—खरोखर [पूर्वे विद्वांसः प्रजां न कामयन्ते—] भूतकालीन आत्मज्ञ प्रजा, कर्म व उपासना यांची इच्छा करीत नव्हते. कारण [प्रजया किं करिष्यामः—] प्रजा या साधनानें आम्ही कोणतें फल मिळविणार ? कीं [एषां नः अयं आत्मा अयं लोकः इति—] ज्या आमचा आत्मा हाच लोक आहे. आम्हांला आत्मा हेंच प्राप्तव्य फल अभिप्रेत आहे. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. ३९१ पहा.)

ते ह स्म पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति या ह्येव पुत्रैषणा सा वित्तैषणा या वित्तैषणा सा लोकैषणोभे ह्येते एषणे एव भवतः ॥

अन्वयार्थ—[ते ह—] याप्रमाणें साध्य-साधनव्यवहाराची निंदा करणारे ते खरोखर [पुत्रैषणायाः च वित्तैषणायाः च०—] पुत्रैषणा, वित्तैषणा व लोकैषणा यांपासून [व्युत्थाय—] व्युत्थान करून—निवृत्त होऊन [भिक्षाचर्यं चरन्ति—] भिक्षाचर्य करितात. [या हि एव पुत्रैषणा०—] जी पुत्रैषणा ती वित्तैषणा [या वित्तैषणा०—] जी वित्तैषणा तीच लोकैषणा; [उभे हि एते एषणे एव—] ह्या दोन्ही एषणाच आहेत. (याचा सविस्तर भाष्यार्थ पहा.)—अहोपण, हा आत्मा हाच लोक जर इष्ट आहे तर त्याच्या प्राप्तीचें साधन म्हणून कर्मेंच कां आरंभूं नयेत ? पारिव्राज्यच काय करावयाचें आहे ? उत्तर—

स एष नेति नेत्यात्माऽगृह्यो न हि गृह्यतेऽशीर्यो न हि शीर्यतेऽसङ्गो न हि सज्यतेऽसितो न व्यथते न रिष्यत्येतमु हैवैते न तरत इत्यतः पापमकरवमित्यतः कल्याणमकरवमित्युभे उ हैवैष एते तरति नैनं कृताकृते तपतः ॥ २२

अन्वयार्थ—[सः एषः नेति नेति इति आत्मा अगृह्यः०—] तो हा 'नेति नेति' अशा रीतीनें निर्देश केला गेलेला आत्मा अगृह्य आहे, कारण त्याचें ग्रहण केलें जात नाहीं; अशीर्य आहे, कारण त्याचा नाश होत नाहीं; असंग आहे, कारण तो आसक्त होत नाहीं. तो अबद्ध आहे; व्यथा पावत नाहीं; हिंसा पावत नाहीं. [एतं उ ह एव एते न तरतः—] अर्से जाणणाऱ्या ब्रह्मज्ञालाच हीं दोन्ही

प्राप्त होत नाहींत, हें योग्यच आहे. [इति अतः पापं अकरवं–] शरीरधारणेच्या निमित्तानें मीं पाप केलें, असा पश्चात्ताप व [इति अतः कल्याणं अकरवं इति–] त्यासाठींच पुण्य केलें, असा हर्ष त्याला होत नाहीं. [एषः एते उभे उ ह एव तरति–] तो ब्रह्मज्ञ पुण्य व पाप या दोहोंचेंहि उल्लंघन करून जातो. [कृताकृते एनं न तरतः–] केलेलें व न केलेलें नित्यानुष्ठान त्याला फलदानानें व प्रत्यवायोत्पादनानें ताप देत नाहीं. (याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. ४४४ पहा.) २२

तदेतदृचाऽभ्युक्तम् । एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य न
वर्धते कर्मणा नो कनीयान् । तस्यैव स्यात्पदवित्तं
विदित्वा न लिप्यते कर्मणा पापकेनेति ॥

अन्वयार्थ—[तत् एतत् ऋचा अभ्युक्तं–] हेंच तत्त्व ऋचेनें सांगितलें आहे. [ब्राह्मणस्य एषः नित्यः महिमा–] ब्राह्मणाचा हा 'नेति नेति' इत्यादिलक्षण नित्य महिमा आहे. [सः कर्मणा न वर्धते नो कनीयान्–] कारण तो पुण्यकर्मानें वृद्धि पावत नाहीं व पापानें क्षीण होत नाहीं. [तस्य एव पदवित् स्यात्–] त्याच महिम्याचें पद–स्वरूप जाणणारा व्हावें, कारण [तं विदित्वा पापकेन कर्मणा न लिप्यते इति–] त्याला जाणून धर्माधर्मलक्षण पाप कर्मानें लिप्त होत नाहीं. (पुण्यहि संसाराला कारण होतें, म्हणून तेंहि येथें पापच आहे.)–ज्याअर्थीं याप्रमाणें 'नेति नेति' इत्यादिरूप ब्राह्मणाचा महिमा अकर्मसंबंधी आहे–

तस्मादेवंविच्छान्तो दान्त उपरतस्तितिक्षुः समाहितो
भूत्वाऽऽत्मन्येवाऽऽत्मानं पश्यति सर्वमात्मानं पश्यति नैनं
पाप्मा तरति सर्वं पाप्मानं तरति नैनं पाप्मा तपति सर्वं पाप्मानं तपति विपापो विरजोऽविचिकित्सो ब्राह्मणो भवत्येष
ब्रह्मलोकः सम्राडेनं प्रापितोऽसीति होवाच याज्ञवल्क्यः
सोऽहं भगवते विदेहान्ददामि मां चापि सह दास्यायेति २३

अन्वयार्थ—[तस्मात् एवंविद्–] त्याअर्थीं आत्मा कर्म व त्याचें फल यांशीं संबंध न ठेवणारा आहे, असें आपाततः जाणणारा [शान्तः दान्तः उपरतः०–] शांत, दान्त, उपरत, तितिक्षु, समाहित होऊन[आत्मनि एव आत्मानं पश्यति–]

स्वशरीरांतच प्रत्यक्-चैतन्यस्वरूपास पाहतो. [सर्वं आत्मानं पश्यति–] तो सर्व आत्मा आहे, असें पाहतो. [एनं पाप्मा न तरति–] असें पाहणाराला पुण्य-पापलक्षण पाप प्राप्त होत नाहीं. [सर्वं पाप्मानं तरति–] सर्व पापांना उल्लंघितो. [एनं पाप्मा न तपति–] त्याला कृताकृतलक्षण पाप ताप देत नाहीं. [सर्वं पाप्मानं तपति–] तोच सर्व पापाला भस्मसात् करतो. [विपापः विरजः अविचिकित्सः ब्राह्मणः भवति–] तो धर्माधर्मरहित, निष्काम, निःसंशय ब्राह्मण होतो. [सम्राड् एषः ब्रह्मलोकः–] हे सम्राट्, हा ब्रह्मलोक आहे. [एनं प्रापितः असि–] या ब्रह्मलोकाला तूं पोंचविला गेला आहेस, [इति ह०–] असें याज्ञवल्क्य म्हणाला. तेव्हां जनक म्हणतो–[सः अहं भगवते विदेहान् ददामि–] " तो मी कृतार्थ केला गेलेला तुम्हांला विदेह देशांस देतों. [मां च अपि सह दास्याय इति–] त्यांच्या सहवर्तमान मी आपल्यालाहि दास्यासाठीं देतों. " २३–जो जनक-याज्ञवल्क्यांच्या आख्यायिकेंत व्यक्त करून सांगितलेला आत्मा—

स वा एष महानज आत्माऽऽन्नादो वसुदानो
विन्दते वसु य एवं वेद ॥ २४

अन्वयार्थ—[सः वै एषः महान् अजः आत्मा अन्नादः–] तोच हा महान् अज आत्मा सर्वभूतस्थ होऊन अन्न भक्षण करणारा [वसुदानः–] सर्व प्राण्यांच्या कर्मांचें फल देणारा आहे. [यः एवं वेद सः वसु विन्दते–] अन्नाद व वसुदान या गुणांनीं युक्त अशा याची जो उपासना करितो, त्याला सर्व कर्मांचें फल मिळतें. (सु. ब्र. पृ. २९८ पहा.) २४.–निरुपाधिक ब्रह्मज्ञानानें मुक्ति व सोपाधिक ब्रह्मज्ञानानें अभ्युदय सांगितला. आतां या सर्वच आरण्यकाचा अर्थ एकत्र समुच्चित करून सांगतात—

स वा एष महानज आत्माऽजरोऽमरोऽमृतोऽभयो ब्रह्माभयं
वै ब्रह्माभयꣳ हि वै ब्रह्म भवति य एवं वेद ॥ २५

इति बृहदारण्यकोपनिषदि चतुर्थाध्यायस्य चतुर्थं ब्राह्मणम् ॥ ४

अन्वयार्थ—[सः वै एषः महान् अजः आत्मा०–] तोच हा महान्, अज, अजर, अमर, अमृत, अभय आत्माच ब्रह्म आहे. [अभयं वै ब्रह्म–]

अभयच ब्रह्म आहे. [यः एवं वेद सः अभयं हि ब्रह्म भवति–] जो आत्म्याला अभय ब्रह्म जाणतो तो अभय ब्रह्मच होतो. २५ (४).

अथ ह याज्ञवल्क्यस्य द्वे भार्ये बभूवतुर्मैत्रेयी च कात्यायनी
च तयोर्ह मैत्रेयी ब्रह्मवादिनी बभूव स्त्रीप्रज्ञैव तर्हि
कात्यायन्यथ ह याज्ञवल्क्योऽन्यद्वृत्तमुपाकरिष्यन् ॥ १

अर्थ––पूर्वीच्या हेतुप्रधान वाक्यानंतर असें घडलें. याज्ञवल्क्याच्या दोन भार्या होत्या. मैत्रेयी व कात्यायनी. त्यांतील मैत्रेयी ब्रह्मवादिनी होती; व कात्यायनी प्राकृत स्त्रीबुद्धिच होती. तेव्हां पूर्ववृत्ताहून अन्यवृत्ताचें अवलंबन करण्याची इच्छा करणारा याज्ञवल्क्य (म्हणाला, असा पुढें संबंध. याचा भाष्यार्थ पहा.)

मैत्रेयीति होवाच याज्ञवल्क्यः प्रव्रजिष्यन्वा अरेऽहमस्मात्स्था-
नादस्मि हन्त तेऽनया कात्यायन्याऽन्तं करवाणीति ॥ २

अर्थ––याज्ञवल्क्य म्हणाला–" हे मैत्रेयि, मी या स्थानापासून प्रव्रजन करण्याची–दुसऱ्या आश्रमांत जाण्याची इच्छा करीत आहें. यास्तव मी तुझी अनुमति विचारतों, या कात्यायनीसह तुझा विच्छेद करतों–विभाग करून देतों १

सा होवाच मैत्रेयी यन्नु म इयं भगोः सर्वा पृथिवी वित्तेन
पूर्णा स्यात्स्यां न्वहं तेनामृताऽऽहो नेति, नेति होवाच याज्ञवल्क्यो
यथैवोपकरणवतां जीवितं तथैव ते जीवितꣳ स्यादमृतत्वस्य तु
नाऽऽशाऽस्ति वित्तेनेति ॥३॥ सा होवाच मैत्रेयी येनाहं नामृता
स्यां किमहं तेन कुर्यां यदेव भगवान्वेद तदेव मे ब्रूहीति ॥ ४

अर्थ––ती मैत्रेयी म्हणाली–" भगवन्, बरें ही सर्व पृथ्वी वित्तानें पूर्ण अशी जर मला मिळाली तर त्या वित्तानें मी अमृत होईन का, कीं नाहीं ?" त्यावर याज्ञवल्क्य म्हणाला–" नाही. जसें अनेक सुखसाधनांनीं संपन्न असलेल्या लोकांचें जीवित असतें तसेंच तुझें जीवित सुखोपाय व भोग यांनीं संपन्न होईल. वित्तानें अमृतत्वाची तर कांहीं आशाच नाहीं. " ३. ती मैत्रेयी म्हणाली–" ज्यानें मी अमृत होणार नाहीं त्यानें मी काय करूं ? यास्तव आपण जें अमृतत्वसाधन जाणतां तेंच मला सांगा. " ४.

स होवाच याज्ञवल्क्यः प्रिया वै खलु नो भवति सती प्रियमवृधद्धन्त तर्हि भवत्येतद्व्याख्यास्यामि ते व्याचक्षाणस्य तु मे निदिध्यासस्वेति ॥५

अर्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—" खरोखर तूं पूर्वीहि आम्हांला प्रिय असून आतांहि प्रियच वाढविलें आहेस. त्यामुळें संतुष्ट होऊन आतां हे स्त्रिये, मी तुला मोक्षाचें साधन सांगेन. सांगत असलेल्या माझ्या भाषणाचें तूं लक्ष लावून श्रवण कर व त्याचेंच चिंतन कर. " ५.

स होवाच न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति । न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवत्यात्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति । न वा अरे पुत्राणां कामाय पुत्राः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति । न वा अरे वित्तस्य कामाय वित्तं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति । न वा अरे पशूनां कामाय पशवः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय पशवः प्रिया भवन्ति । न वा अरे ब्रह्मणः कामाय ब्रह्म प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय ब्रह्म प्रियं भवति । न वा अरे क्षत्रस्य कामाय क्षत्रं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय क्षत्रं प्रियं भवति । न वा अरे लोकानां कामाय लोकाः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय लोकाः प्रिया भवन्ति । न वा अरे देवानां कामाय देवाः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय देवाः प्रिया भवन्ति । न वा अरे वेदानां कामाय वेदाः प्रिया भवन्त्यात्मनस्तु कामाय वेदाः प्रिया भवन्ति । न वा अरे भूतानां कामाय भूतानि प्रियाणि भवन्त्यात्मनस्तु कामाय भूतानि प्रियाणि भवन्ति । न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवत्यात्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति । आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यो मैत्रेय्यात्मनि खल्वरे दृष्टे श्रुते मते विज्ञात इदꣳ सर्वं विदितम् ॥ ६

अर्थ—तो याज्ञवल्क्य म्हणाला—' हे मैत्रेयि, ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं, पतीच्या प्रयोजनासाठी पत्नीला पति प्रिय होत नाहीं; तर स्वतःच्याच प्रयोजनाकरितां तिला पति प्रिय होतो. त्याच न्यायानें जायेच्या प्रयोजनासाठी

पतीला जाया प्रिय होत नाहीं, तर आपल्या स्वतःच्या प्रयोजनासाठीं त्याला जाया प्रिय होते. पुत्रांच्या प्रयोजनासाठीं पुत्र आई-बापांना प्रिय होत नाहींत, तर ते त्यांच्या स्वतःच्या प्रयोजनासाठीं प्रिय होतात. वित्ताच्या प्रयोजनासाठीं वित्त प्रिय होत नाहीं तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं तें प्रिय होतें. पशूंच्या प्रयोजनासाठीं पशू प्रिय होत नाहीत तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं ते प्रिय होतात. ब्राह्मणाच्या प्रयोजनासाठीं ब्राह्मण प्रिय होत नाहीं तर आपल्या प्रयोजनासाठीं तो प्रिय होत असतो. क्षत्रियाच्या प्रयोजनासाठीं क्षत्रिय प्रिय होत नाहीं, तर आपल्या प्रयोजनासाठीं क्षत्रिय प्रिय होतो. स्वर्गादि लोकांच्या प्रयोजनासाठीं ते लोक मनुष्याला प्रिय होत नाहीत, तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं ते त्याला प्रिय होतात. देवांच्या प्रयोजनासाठी देव प्रिय होत नाहींत तर स्वतःच्या प्रयोजनासाठी ते प्रिय होतात. वेदांच्या प्रयोजनासाठीं वेद प्रिय होत नाहींत, तर स्वतःच्या प्रयोजनासाठी वेद प्रिय होतात. भूतांच्या प्रयोजनासाठीं भूतें प्रिय होत नाहींत तर स्वतःच्या प्रयोजनासाठीं तीं प्रिय होतात. अगे मैत्रेयि, सर्वांच्या प्रयोजनासाठीं सर्व प्रिय होत नाहीं तर आपल्या प्रयोजनासाठीं सर्व प्रिय होतें, हें प्रसिद्ध आहे. यास्तव सर्वांत अधिक प्रिय असलेला आत्माच दर्शनार्ह आहे. तोच श्रवणार्ह आहे. तोच मनन करण्यास योग्य आहे व तोच निश्चयानें ध्यान करण्यास योग्य आहे. हे मैत्रेयि, खरोखर आत्म्याला पाहिलें असतां, ऐकलें असतां, त्याचें मनन केलें असतां व त्याला विशेषतः जाणलें असतां हें सर्व विदित होतें. ६.

ब्रह्म तं परादाद्योऽन्यत्राऽऽत्मनो ब्रह्म वेद क्षत्रं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः क्षत्रं वेद लोकास्तं परादुर्योऽन्यत्राऽऽत्मनो लोकान्वेद देवास्तं परादुर्योऽन्यत्राऽऽत्मनो देवान्वेद वेदास्तं परादुर्योऽन्यत्रात्मनो वेदान्वेद भूतानि तं परादुर्योऽन्यत्राऽऽत्मनो भूतानि वेद सर्वं तं परादाद्योऽन्यत्रात्मनः सर्वं वेदेदं ब्रह्मेदं क्षत्रमिमे लोका इमे देवा इमे वेदा इमानि भूतानीदꣳ सर्वं यदयमात्मा ॥ ७

अर्थ—ब्राह्मणजाति त्या पुरुषाला दूर करते, जो ब्राह्मणजातीला आत्म्याहून पृथक्त्वानें जाणतो; क्षत्रियजाति त्याला दूर करते जो तिला आत्म्याहून पृथक् जाणतो; लोक त्याला दूर करतात जो लोकांना आत्म्याहून पृथक् जाणतो; देव

त्याला दूर करितात जो देवांना आत्म्याहून पृथक् जाणतो; वेद त्याला दूर करितात जो वेदांना आत्म्याहून पृथक् जाणतो; भूतें त्याला दूर करतात जो भूतांना आत्म्याहून पृथक् जाणतो; सर्व त्याला दूर ठेवतें जो सर्वांला आत्म्याहून पृथक् जाणतो. हें ब्रह्म, हें क्षत्र, हे लोक, हे देव, हे वेद, हीं भूतें व हें सर्व हा प्रकृत आत्मा आहे. ७.

स यथा दुन्दुभेर्हन्यमानस्य न बाह्याञ्छब्दाञ्छक्नुयाद्ग्रहणाय
दुन्दुभेस्तु ग्रहणेन दुन्दुभ्याघातस्य वा शब्दो गृहीतः ॥ ८ ॥

अर्थ—तो दृष्टान्त जसा—लौकिकांत ताडन केल्या जाणाऱ्या (काठीनें वाजविल्या जाणाऱ्या) दुंदुभीचे बाह्य—दूरवर पसरणारे—विशेष ध्वनि जाणण्यास (हे दुंदुभीचे ध्वनी आहेत असें ओळखण्यास) कोणी समर्थ होत नाहीं, पण (हे शब्द कशाचे आहेत असें ह्मणून त्यांच्या उत्पत्तिस्थानापाशी जाऊन किंवा पुष्कळ परिचयामुळें ते दुंदुभीचेच आहेत असें ओळखून) दुंदुभीच्या ज्ञानानें किंवा दुंदुभीच्या आघाताच्या—वादनाच्या ज्ञानानें हा शब्द दुंदुभीचा आहे, असें ज्ञान होतें. (नगाऱ्याच्या विशेष ध्वनीचें ज्ञान नगाऱ्याच्या सामान्य ध्वनीच्या ज्ञानावांचून होऊं शकत नाहीं. यास्तव ते त्याहून भिन्न नाहींत.) ८

स यथा शंखस्य ध्मायमानस्य न बाह्याञ्छब्दाञ्छक्नुयाद्ग्रह-
णाय शंखस्य तु ग्रहणेन शंखध्मस्य वा शब्दो गृहीतः ॥ ९ ॥

अर्थ—दुसरा दृष्टान्त असा—ज्याप्रमाणें व्यवहारांत शब्दानें संयुक्त केल्या जाणाऱ्या शंखाचे बाह्य शब्द ग्रहण करण्यास मनुष्य समर्थ होत नाहीं, पण शंखाच्या ग्रहणानें किंवा शंखवादनाच्या ग्रहणानें हा शंखाचा शब्द आहे, असें ज्ञान होतें. ९

स यथा वीणायै वाद्यमानायै न बाह्याञ्छब्दाञ्छक्नुयाद्ग्रहणाय
वीणायै तु ग्रहणेन वीणावादस्य वा शब्दो गृहीतः ॥ १०

अर्थ—तिसरा दृष्टान्त—ज्याप्रमाणें वीणा वाजविली जाऊं लागली असतां तिचे बाह्य शब्द ग्रहण करण्यास कोणी समर्थ होत नाहीं, पण वीणेच्या किंवा वीणानादाच्या ग्रहणानें तो शब्द गृहीत होतो. १०.

स यथाऽऽर्द्रेधाग्नेरभ्याहितस्य पृथग्धूमा विनिश्चरन्त्येवं वा अरेऽस्य
महतो भूतस्य निःश्वसितमेतद्यद्ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वाङ्गिरस

इतिहासः पुराणं विद्या उपनिषदः श्लोकाः सूत्राण्यनुव्याख्यानानि व्याख्यानानीष्टं हुतमाशितं पायितमयं च लोकः परश्च लोकः सर्वाणि च भूतान्यस्यैवैतानि सर्वाणि निःश्वसितानि ॥ ११

अर्थ—ज्याचें इंधन आर्द्र आहे अशा अभ्याहित—सर्वतः प्रज्वलित अग्नीपासून ज्याप्रमाणें धूम पृथक् निघतात त्याप्रमाणें हे मैत्रेयि, या महद्भूतांचें हें निःश्वसित आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्वणवेद, इतिहास, पुराण, विद्या, उपनिषद्, श्लोक, सूत्रें, मंत्रांचीं विवरणें, अर्थवाद, इष्ट, हुत, आशित, पायित, हा लोक, परलोक, सर्व भूतें हीं सर्व या महद्भूतांचीच निःश्वसितें आहेत. ११.

स यथा सर्वासामपाꣳसमुद्र एकायनमेवꣳसर्वेषाꣳस्पर्शानां त्वगेकायनमेवꣳसर्वेषां गन्धानां नासिके एकायनमेवꣳसर्वेषाꣳरसानां जिह्वैकायनमेवꣳसर्वेषाꣳरूपाणां चक्षुरेकायनमेवꣳसर्वेषाꣳशब्दानाꣳ श्रोत्रमेकायनमेवꣳसर्वेषाꣳसंकल्पानां मन एकायनमेवꣳसर्वासां विद्यानाꣳहृदयमेकायनमेवꣳसर्वेषाꣳकर्मणाꣳहस्तावेकायनमेवꣳसर्वेषामानन्दानामुपस्थ एकायनमेवꣳसर्वेषां विसर्गाणां पायुरेकायनमेवꣳ सर्वेषामध्वनां पादावेकायनमेव सर्वेषांꣳवेदानां वागेकायनम् ॥ १२

अर्थ—तो दृष्टान्त—ज्याप्रमाणें सर्व जलांचें समुद्र हें एक अयन—एक गमन—एक प्रलयस्थान आहे त्याप्रमाणें सर्व स्पर्शांचें त्वक् हें एक अयन आहे, तसेंच सर्व गंधांचें नासिका हें एक अयन आहे, तसेंच सर्व रसांचें जिह्वा हें एक अयन आहे; सर्व रूपांचें चक्षु हें एक अयन आहे, सर्व शब्दांचें श्रोत्र हें एक अयन आहे, सर्व संकल्पांचें मन हें एक अयन आहे. तसेंच सर्व विद्यांचें हृदय हें एक अयन आहे, तसेंच सर्व कर्मांचें हात हें एक अयन आहे, तसेंच सर्व आनंदांचें उपस्थ हें एक अयन आहे, तसेंच सर्व विसर्गांचें पायु हें एक अयन आहे, तसेंच सर्व मार्गांचें पाय हें एकायन आहे, त्याचप्रमाणें सर्व वेदांचें वाक् हें एक अयन आहे. १२

स यथा सैन्धवघनोऽनन्तरोऽबाह्यः कृत्स्नो रसघन एवैवं वा अरेऽयमात्माऽनन्तरोऽबाह्यः कृत्स्नः प्रज्ञानघन एवैतेभ्यो भूतेभ्यः समुत्थाय तान्येवानुविनश्यति न प्रेत्य संज्ञाऽस्तीत्यरे ब्रवीमीति होवाच याज्ञवल्क्यः ॥ १३

अर्थ—त्याविषयीं दृष्टान्त—विद्यानिमित्तानें सर्व कार्यांचा प्रलय झाला असतां ज्याप्रमाणें सैंधवाचा खडा अनन्तर, अबाह्य, संपूर्ण, रसघनच त्याप्रमाणेंच हे मैत्रेयि, हा आत्मा अनन्तर, अबाह्य, कृत्स्न, प्रज्ञानघनच या भूतांपासून चांगल्याप्रकारें उत्थित होऊन त्यांच्याच मागोमाग तो विनाश पावतो. याप्रमाणें विनाश पावल्यावर' मी अमक्याचा अमुक' ही विशेष संज्ञा रहात नाहीं, असें हे मैत्रेयि, मी तुला सांगतों, असें याज्ञवल्क्य म्हणाला सु ब्र.पृ.४९६.पहा. सा होवाच मैत्रेय्यत्रैव मा भगवान्मोहान्तमापीपिपन्न वा अहमिमं विजानामीति स होवाच न वा अरेऽहं मोहं ब्रवीम्यविनाशी वा अरेऽयमात्माऽनुच्छित्तिधर्मा १४

अर्थ—ती मैत्रेयी म्हणाली—" याच प्रज्ञानघनाविषयी आपण मला मोहांत पाडलें आहे. मला संमूढ केलें आहे. त्यामुळें [न वै अहं इमं विजानामि इति—] मी या आत्म्याला जाणत नाहीं." याज्ञवल्क्य ह्मणाला—"हे मैत्रेयि, मी मोह पाडण्यासारखें सांगत नाहीं. हा आत्मा अविनाशीच आहे. हा अविनाश या धर्मानें युक्त आहे. त्याला विकाररूप किंवा उच्छेदरूप विनाश नाहीं. १४

यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं पश्यति तदितर इतरं जिघ्रति तदितर इतरꣳरसयते तदितर इतरमभिवदति तदितर इतरꣳशृणोति तदितर इतरं मनुते तदितर इतरꣳस्पृशति तदितर इतरं विजानाति यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्तत्केन कं जिघ्रेत्तत्केन कं रसयेत्तत्केन कमभिवदेत्तत्केन कꣳशृणुयात्तत्केन कं मन्वीत तत्केन कं स्पृशेत्तत्केन कं विजानीयाद्येनेदꣳसर्वं विजानाति तं केन विजानीयात्स एष नेति नेत्यात्माऽगृह्यो न हि गृह्यतेऽशीर्यो न हि शीर्यतेऽसङ्गो न हि सज्यतेऽसितो न व्यथते न रिष्यति विज्ञातारमरे केन विजानीयादित्युक्तानुशासनाऽसि मैत्रेय्येतावदरे खल्वमृतत्वमिति होक्त्वा याज्ञवल्क्यो विजहार ॥ १५

इति बृहदारण्यकोपनिषदि चतुर्थाध्यायस्य पंचमं ब्राह्मणम् ॥ ५

अर्थ—ज्या अविद्यावस्थेंत द्वैतसें होतें तेव्हां इतर—दृष्टा इतर—रूपास पाहतो, इतर इतरास हुंगतो, इतर इतरास चाखतो, इतर इतरास बोलतो, इतर इतरास ऐकतो, इतर इतरांचें मनन करतो, इतर इतरास स्पर्श करतो, इतर इतराला जाणतो. पण जेव्हां याला सर्व आत्माच झालें तेव्हां कोणत्या साध-

नानें कशाला पाहणार ? कोणत्या साधनानें कशाचा वास घेणार ? कशानें कशाला चाखणार ? कशानें कोणाला बोलणार ? कशानें काय ऐकणार ? कशानें कसलें मनन करणार ? कशानें कोणाला स्पर्श करणार ? कशानें कोणाला जाणणार ? ज्याच्या योगानें हें सर्व विशेषतः जाणतो त्याला कोण कशानें जाणणार ? तो हा 'नेति नेति' असा निषेधमुखानेंच जाणण्यास योग्य असलेला आत्मा अगृह्य आहे, त्याचें ग्रहण केलें जात नाहीं, अशीर्य आहे, त्याचा विनाश होत नाहीं. तो असंग आहे, तो आसक्त केला जात नाहीं, तो अबद्ध आहे, व्यथा पावत नाहीं, हिंसा पावत नाही, विज्ञात्याला कोणत्या साधनानें जाणावें ? हे मैत्रेयि, याप्रमाणें तूं मजकडून अनुशासन सांगितली गेली आहेस. अमृतत्व-साधन खरोखर एवढेंच आहे, असें बोलून याज्ञवल्क्य प्रव्रजन करता झाला. (यावरील महत्त्वाचा भाष्यार्थ पहा.) १५. (५)

अथ वꣳशः पौतिमाष्यो गौपवनाद्गौपवनः पौतिमाष्यात्पौतिमाष्यो गौपवनाद्गौपवनः कौशिकात्कौशिकः कौण्डिन्यात्कौण्डिन्यः शाण्डिल्याच्छाण्डिल्यः कौशिकाच्च गौतमाच्च गौतमः ॥ १

अर्थ—आतां (याज्ञवल्कीय कांडाचा) वंश—गौपवनापासून पौतिमाष्य, पौतिमाष्यापासून गौपवन, गौपवनापासून पौतिमाष्य, कौशिकापासून गौपवन, कौण्डिन्यापासून कौशिक, शाण्डिल्यापासून कौण्डिन्य, गौतमापासून व कौशिकापासून शाण्डिल्य, गौतम (याचा संबंध पुढें)

आग्निवेश्यादाग्निवेश्यो गार्ग्याद्गार्ग्यो गार्ग्याद्गार्ग्यो गौतमाद्गौतमः सैतवात्सैतवः पाराशर्यायणात्पाराशर्यायणो गार्ग्यायणाद्गार्ग्यायण उद्दालकायनादुद्दालकायनो जाबालायनाज्जाबालायनो माध्यंदिनायनान्माध्यंदिनायनः सौकरायणात्सौकरायणः काषायणात्काषायणः सायकायनात्सायकायनः कौशिकायनेः कौशिकायनिः ॥ २

अर्थ—आग्निवेश्यापासून, आग्निवेश्य गार्ग्यापासून, गार्ग्य गार्ग्यापासून, गार्ग्य गौतमापासून, गौतम सैतवापासून, सैतव पाराशर्यायणापासून, पाराशर्यायण गार्ग्यायणापासून, गार्ग्यायण उद्दालकायनापासून, उद्दालकायन जाबालायनापासून, जाबालायन माध्यंदिनायनापासून, माध्यंदिनायन सौकरायणापासून, सौकरायण काषायणापासून, काषायण सायकायनापासून, सायकायन कौशिकायनीपासून, कौशिकायनि (याचा अन्वय पुढें)

घृतकौशिकाद्घृतकौशिकः पाराशर्यायणात्पाराशर्यायणः पाराशर्यात्पाराशर्यो जातूकर्ण्याज्जातूकर्ण्य आसुरायणाच्च यास्काच्चाऽऽसुरायणस्त्रैवणेस्त्रैवणिरौपजन्धनेरौपजन्धनिरासुरेरासुरिर्भारद्वाजाद्भारद्वाज आत्रेयादात्रेयो माण्टेर्माण्टिर्गौतमाद्गौतमो गौतमाद्गौतमो वात्स्याद्वात्स्यः शाण्डिल्याच्छाण्डिल्यः कैशोर्यात्काप्यात्कैशोर्यः काप्यः कुमारहारितात्कुमारहारितो गालवाद्गालवो विदर्भीकौण्डिन्याद्विदर्भी कौण्डिन्यो वत्सनपातो बाभ्रवाद्वात्सनपाद्बाभ्रवः पथः सौभरात्पन्थाः सौभरोऽयास्यादांगिरसादयास्य आंगिरस आभूतेस्त्वाष्ट्रादाभूतिस्त्वाष्ट्रो विश्वरूपात्त्वाष्ट्राद्विश्वरूपस्त्वाष्ट्रोऽश्विभ्यामश्विनौ दधीच आथर्वणाद्ध्यङ्ङाथर्वणोऽथर्वणो दैवादथर्वा दैवो मृत्योः प्राध्वꣳसनान्मृत्युः प्राध्वꣳसनः प्रध्वꣳसनात्प्रध्वꣳसन एकर्षेरेकर्षिर्विप्रचित्तेर्विप्रचित्तिर्व्यष्टेर्व्यष्टिः सनारोः सनारुः सनातनात्सनातनः सनगात्सनगः परमेष्ठिनः परमेष्ठी ब्रह्मणो ब्रह्म स्वयंभु ब्रह्मणे नमः ॥ ३

इति बृहदारण्यकोपनि दि चतुर्थोऽध्यायः ॥ ४

अर्थ—घृतकौशिकापासून, घृतकौशिक पाराशर्यायणापासून, पाराशर्यायण पाराशर्यापासून, पाराशर्य जातूकर्ण्यापासून, जातूकर्ण्य आसुरायणापासून व यास्कापासून, आसुरायण त्रैवणीपासून, त्रैवणि औपजंधनीपासून, औपजंधनि आसुरीपासून, आसुरि भारद्वाजापासून, भारद्वाज आत्रेयापासून, आत्रेय मांटीपासून, मांटि गौतमापासून, गौतम गौतमापासून, गौतम वात्स्यापासून, वात्स्य शांडिल्यापासून, शांडिल्य कैशोर्य काप्यापासून, कैशोर्य काप्य कुमार हारितापासून, कुमार हारित गालवापासून, गालव विदर्भी कौंडिन्यापासून, विदर्भी कौंडिन्य वत्सनपात् बाभ्रवापासून, वत्सनपात् बाभ्रव पथ सौभरापासून, पन्थ सौभर अयास्य आंगिरसापासून, अयास्य आङ्गिरस आभूति त्वाष्ट्रापासून, आभूति त्वाष्ट्र विश्वरूप त्वाष्ट्रापासून, विश्वरूप त्वाष्ट्र अश्वीपासून, अश्वी दधीच आथर्वणापासून, अध्यङ् आथर्वण अथर्वा दैवापासून, अथर्वा दैव प्राध्वंसन मृत्यूपासून, प्राध्वंसन मृत्यु प्रध्वंसनापासून, प्रध्वंसन एकर्षीपासून, एकर्षि विप्रचित्तीपासून, विप्रचित्ति व्यष्टीपासून, व्यष्टि सनारूपासून, सनारु सनातनापासून, सनातन सनगापासून, सनग परमेष्ठीपासून, परमेष्ठी ब्रह्मापासून, ब्रह्म स्वयंभु आहे. त्या ब्रह्माला नमस्कार असो ३. (६) ॥४॥

अथ पंचमोऽध्यायः ।

—पूर्वी वादन्यायानें सफल व सांगोपांग ब्रह्मज्ञान सांगितलें. आतां या पुढें खिलकांड आरंभिलें जातें. पूर्वी न सांगितलेल्या पारिशिष्ट वस्तूला खिल म्हणतात. या पूर्वीच्या चार अध्यायांत जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म, जो सर्वान्तर आत्मा, निरुपाधिक, अशनायादि धर्मांनी रहित, व 'नेति नेति' असा व्यपदेश करण्यास योग्य आहे त्याचा निश्चय केला. केवल आत्मविज्ञानच अमृतार्चे साधन आहे, असाहि निर्धार केला. आतां त्याच सोपाधिक, शब्दार्थादिव्यवहाराच्या विषयत्वास प्राप्त झालेल्या आत्म्याचीं मार्गे न सांगितलेलीं, कर्मांशीं विरुद्ध नसलेलीं अभ्युदयसाधनें व क्रममुक्ति देण्यास समर्थ असलेलीं उपासनें सांगावीं म्हणून पुढील ग्रंथ आहे. सर्व उपासनांच्या अंगत्वानें ओंकार, दम, दान, दया हीहि साधनें येथें सांगावयाचीं आहेत—

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

अर्थ—हें परब्रह्म पूर्ण—व्यापी आहे. हें सोपाधिक रूपहि स्वरूपानें पूर्ण आहे. तें कार्यात्मक ब्रह्म पूर्ण कारणात्मकापासून पूर्णरूपानेंच उद्भवतें. विद्येनें पूर्ण—कार्यात्मक ब्रह्मार्चे पूर्णत्व घेऊन व अविद्याकृत अन्यत्वावभासाचा तिरस्कार करून पूर्णच अवशिष्ट राहतें. (याचा भाष्यार्थ पहा.)

ॐ खं ब्रह्म । खं पुराणं वायुरं खमिति ह स्माऽऽह कौरव्यायणीपुत्रो वेदोऽयं ब्राह्मणा विदुर्वेदेनेन यद्वेदितव्यम् ॥

इति बृहदारण्यकोपनिषदि पंचमाध्यायस्य प्रथमं ब्राह्मणम् ॥ १

अन्वयार्थ—[ॐ खं ब्रह्म—] ओंशब्दवाच्य आकाश ब्रह्म आहे. (हा मंत्र आहे. ब्राह्मण त्याचें व्याख्यान करतें—) [खं पुराणं—] हें ख—आकाश पुराण—सनातन आहे. म्हणजे तें परमात्माकाश आहे. पण [कौरव्यायणीपुत्रः खं इति ह वायुरं आह स्म—] कौरव्यायणीपुत्र 'खं' या शब्दानें वायु ज्यांत असतो तें वायुर ख—आकाश घ्यावें असें म्हणाला आहे. [यत् वेदितव्यं तत्

एनेन वेद–] जें ज्ञातव्य ब्रह्म तें ओंकारानें साधक जाणतो. म्हणून [अयं वेदः–] ओंकार हा वेद आहे, असें [ब्राह्मणाः विदुः–] ब्राह्मण समजतात. याचा भाष्यार्थ पहा. (१)–आतां दमादि तीन साधनांचें विधान—

त्रयाः प्राजापत्याः प्रजापतौ पितरि ब्रह्मचर्यमूषुर्देवा मनुष्या असुरा उषित्वा ब्रह्मचर्यं देवा ऊचुर्ब्रवीतु नो भवानिति तेभ्यो हैतदक्षरमुवाच द इति व्यज्ञासिष्टा ३ इति व्यज्ञासिष्मेति होचुर्दाम्यतेति न आत्थेत्योमिति होवाच व्यज्ञासिष्टेति ॥१

अन्वयार्थ—[देवाः मनुष्याः असुराः त्रयाः प्राजापत्याः–] देव, मनुष्य व असुर अशीं तीन प्रजापतीची अपत्यें [प्रजापतौ पितरि ब्रह्मचर्यं ऊषुः–] प्रजापति पित्यापाशीं शिष्यवृत्तीनें राहून ब्रह्मचर्यव्रत पाळतीं झालीं. [ब्रह्मचर्यं उषित्वा देवाः ऊचुः–] ब्रह्मचर्यवास करून देव प्रजापतीला म्हणाले–[भवान् नः ब्रवीतु इति–] " आपण आम्हांला उपदेश करा. " [तेभ्यः ह एतत् अक्षरं उवाच ' द ' इति–] तेव्हां त्यांना प्रजापति ' द ' असें हें अक्षर सांगता झाला; आणि केवल ' द ' हेंच अक्षर सांगून [व्यज्ञासिष्ट इति–] 'मीं काय सांगितलें तें कळलें का ? ' असें तो म्हणाला. त्यावर [व्यज्ञासिष्म इति ह ऊचुः–] 'आम्ही समजलों, आम्हांला कळलें,' असें देव म्हणाले. [दाम्यत इति नः आत्थ इति–] ' तुम्ही स्वभावतः अदान्त आहां, यास्तव दान्त व्हा– बाह्य इंद्रियांचें दमन करा, ' असें तुम्हीं सांगितलें. तेव्हां [ओं व्यज्ञासिष्ट इति ह उवाच–] ' होय, तुम्हांला बरोबर कळलें, तुम्ही जाणलेंत, ' असें प्रजापति बोलला. १.

अथ हैनं मनुष्या ऊचुर्ब्रवीतु नो भवानिति तेभ्यो हैतदेवाक्षरमुवाच द इति व्यज्ञासिष्टा ३ इति व्यज्ञासिष्मेति होचुर्दत्तेति न आत्थेत्योमिति होवाच व्यज्ञासिष्टेति ॥ २

अन्वयार्थ—[अथ ह एनं मनुष्याः ऊचुः–]नंतर प्रजापतीला मनुष्य बोलले– [नः भवान् ब्रवीतु इति–] ' आम्हांला आपण उपदेश करा. ' तेव्हां [तेभ्यः ह द इति एतत् एव अक्षरं उवाच–] त्यांनाहि ' द ' असें हेंच अक्षर प्रजापति सांगता झाला; आणि [व्यज्ञासिष्ट इति–] ' या अक्षराचा अर्थ समजलांत का ? ' असें विचारूं लागला. तेव्हां [व्यज्ञासिष्म दत्त इति नः आत्थ

इति ह ऊचुः—] 'होय, आम्ही त्याचा अर्थ समजलों. स्वभावतः लुब्ध असलेल्या आम्हांला 'द्या' असें तूं सांगत आहेस,' असें ते बोलले. त्यावर प्रजापति ह्मणाला—[ओं व्यज्ञासिष्ट—] "होय, चांगलें जाणलेंत." २.

अथ हैनमसुरा ऊचुर्ब्रवीतु नो भवानिति तेभ्यो हैतदेवाक्षरमुवाच द इति व्यज्ञासिष्टा३ इति व्यज्ञासिष्मेति होचुर्दयध्वमिति न आत्थेत्योमिति होवाच व्यज्ञासिष्टेति ॥

अन्वयार्थ—त्यानंतर प्रजापतीला असुर ह्मणाले—"आपण आह्मांला उपदेश करा." तेव्हां प्रजापति त्यांनाहि 'द' हेंच अक्षर सांगता झाला; आणि 'या अक्षराचा अर्थ जाणलात का?' असें विचारूं लागला. तेव्हां असुर 'आह्मांला अर्थ कळला. दया करा असें तूं स्वभावतःच क्रूर व हिंसारुचि असलेल्या आम्हांला सांगत आहेस' असें बोलले. त्यावर प्रजापति 'होय, चांगलें, बरोबर जाणलेंत' असें ह्मणाला.

तदेतदेवैषा दैवी वागनुवदति स्तनयित्नुर्द द द इति दाम्यत दत्त दयध्वमिति तदेतत्त्रयꣳ शिक्षेद्दमं दानं दयामिति ॥३

इति बृहदारण्यकोपनिषदि पंचमाध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥ २

अन्वयार्थ—[तत् एतत्०—] तें हें प्रजापतीचें अनुशासन अद्यापि अनुवृत्त होतेंच. [स्तनयित्नुः एषा दैवी वाक् द द द इति अनुवदति—] मेघ या दैवी वाक्चा 'द द द' असा अनुवाद करितो. [दाम्यत दत्त दयध्वं इति—] दान्त व्हा, दान करा व दया करा, असा त्या तीन दकारांचा अर्थ आहे; यास्तव [दमं दानं दयां इति तत् एतत् त्रयं शिक्षेत्—] दम, दान व दया हें प्रजापतीचें त्रिविध अनुशासन आपण स्वीकारावें. ३. (२)

—सर्व उपासनांच्या अंगभूत दमादि साधनत्रयाचें विधान केलें. दान्त, अलुब्ध व दयालु होत्साता साधक सर्व उपासनांमध्यें अधिकृत होतो. त्यांपैकीं निरुपाधिक ब्रह्माचें दर्शन—उपासन वर होऊन गेलें. आतां सोपाधिक ब्रह्माचींच अभ्युदय हें फल देणारीं उपासनें सांगावीं, ह्मणून हा आरंभ आहे—

एष प्रजापतिर्यद्धृदयमेतद्ब्रह्मैतत्सर्वं तदेतत्त्र्यक्षरꣳहृदयमिति हृ इत्येकमक्षरमभिहरन्त्यस्मै स्वाश्चान्ये च य

एवं वेद द इत्येकमक्षरं ददत्यस्मै स्वाश्चान्ये च य एवं वेद यमित्येकमक्षरमेति स्वर्गं लोकं य एवं वेद ॥ १

इति बृहदारण्यकोपनिषदि पंचमाध्यायस्य तृतीयं ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—[यत् हृदयं एषः प्रजापतिः०—] जें हृदय हा प्रजापति, हें ब्रह्म, हें सर्व. तें हें 'हृदय' असें नांव त्र्यक्षर आहे. 'ह्' हें एक अक्षर. [यः एवं वेद अस्मै स्वाः च अन्ये च अभिहरन्ति—] जो असें जाणतो त्याला स्वज्ञातीचे व इतर—असंबद्ध पुरुष संमुख बलि आणून अर्पण करितात. 'द' हें एक अक्षर आहे. जो असें जाणतो त्याला स्वकीय व इतर वीर्य देतात. 'यं-' हें एक अक्षर आहे. असें जो जाणतो तो स्वर्गलोकास जातो. १ (३)

—त्याच हृदयाख्य ब्रह्माच्या 'सत्य' या उपासनेचें विधान करण्याची इच्छा करणारा वेद म्हणतो—

तद्वै तदेतदेव तदास सत्यमेव स यो हैतं महद्यक्षं प्रथमजं वेद सत्यं ब्रह्मेति जयतीमाँल्लोकाञ्जित इन्वसावसद्य एवमेतन्महद्यक्षं प्रथमजं वेद सत्यं ब्रह्मेति सत्यꣳह्येव ब्रह्म ॥ १

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्य चतुर्थं ब्राह्मणम् ॥ ४

अन्वयार्थ—तें जें हृदय ब्रह्म तेंच हें होतें. तें—पंचभूतात्मक सत्यच ब्रह्म. जो कोणी या महत्, पूज्य प्रथमजाला सत्य ब्रह्म असें जाणतो तो या लोकांना जिंकतो. त्याचा शत्रु त्याच्या अधीन—वश राहतो. त्याचा अभाव होतो. जो याप्रमाणें या महत्, पूज्य, प्रथमजाला सत्य ब्रह्म असें जाणतो त्याला वरील फल मिळतें—कारण ब्रह्म सत्यच आहे. सु. ब्र. पृ. ३५६ पहा. १ (४)

—महत्, यक्ष, प्रथमज, असें वर म्हटलें, पण तें प्रथमज कसें तें सत्य ब्रह्माच्या स्तुत्यर्थ सांगितलें जातें—

आप एवेदमग्र आसुस्ता आपः सत्यमसृजन्त सत्यं ब्रह्म ब्रह्म प्रजापतिं प्रजापतिर्देवाꣳस्ते देवाः सत्यमेवोपासते तदेतत्त्र्यक्षरꣳ सत्यमिति स इत्येकमक्षरं तीत्येकमक्षरं यमित्येकमक्षरं प्रथमोत्तमे अक्षरे सत्यं मध्यतोऽनृतं तदेतदनृतमुभयतः सत्येन परिगृहीतꣳसत्यभूयमेव भवति नैवंविद्वाꣳसमनृतꣳ हिनस्ति ॥ १

अन्वयार्थ—हें व्यक्त जगत् त्याच्या उत्पत्तीच्या पूर्वीं आपच होतें. त्या आप सत्याला—सूत्रात्म्याला—हिरण्यगर्भाला उत्पन्न करत्या झाल्या. म्हणून तें सत्य ब्रह्म (प्रथमज होय.) तें ब्रह्म प्रजापतीला—विराटाला उत्पन्न करतें झालें. प्रजापति देवांस उत्पन्न करिता झाला. ते देव सत्याचीच उपासना करितात. तें 'सत्यं' असें हें नाम त्र्यक्षर आहे. 'स' असें हें एक अक्षर 'ति' [त्] असें एक अक्षर व 'यं' असें एक अक्षर. त्यांतील पहिलें व शेवटचें अक्षर सत्य व मधलें अनृत—खोटें. तें हें अनृत दोन्ही बाजूंनीं सत्यानें परिगृहीत आहे. त्यामुळें तें सत्यभूयत्व—सत्यबहुलच होतें. असें जाणणाऱ्या विद्वानाला प्रमादानें कदाचित् बोललेलें अनृत मारीत नाहीं. १

—आतां या सत्य ब्रह्माचें एका विशेष आकारांत उपासन सांगितलें जातें—

तद्यत्तत्सत्यमसौ स आदित्यो य एष एतस्मिन्मण्डले पुरुषो यश्चायं दक्षिणेऽक्षन्पुरुषस्तावेतावन्योन्यस्मिन्प्रतिष्ठितौ रश्मिभिरेषोऽस्मिन्प्रतिष्ठितः प्राणैरयममुष्मिन्स यदोत्क्रमिष्यन्भवति शुद्धमेवैतन्मण्डलं पश्यति नैनमेते रश्मयः प्रत्यायन्ति ॥ २

अर्थ—तें जें सत्य तो हा आदित्य. हा जो या मंडलांत पुरुष आहे व हा जो दक्षिण नेत्रांत पुरुष आहे ते दोघे एकमेकांत प्रतिष्ठित आहेत. आदित्य प्रकाशानें चाक्षुषांत प्रतिष्ठित आहे व चाक्षुष प्राणांच्या योगानें आदित्यांत प्रतिष्ठित आहे. तो विज्ञानमय जेव्हां शरीर सोडून जाणारा असा होतो तेव्हां (आदित्य पुरुष आपल्या किरणांचा उपसंहार करून औदासीन्य रूपानें राहतो. तेव्हां) तो विज्ञानमय हें शुद्धच मंडल पाहतो. मरणानंतर हे रश्मि—किरण त्याच्याकडे परत येत नाहींत. सु. ब्र. पृ. ३५६ पहा. २.

य एष एतस्मिन्मण्डले पुरुषस्तस्य भूरिति शिर एकꣳशिर एकमेतदक्षरं भुव इति बाहू द्वौ बाहू द्वे एते अक्षरे स्वरिति प्रतिष्ठा द्वे प्रतिष्ठे द्वे एते अक्षरे तस्योपनिषदहरिति हन्ति पाप्मानं जहाति च य एवं वेद ॥ ३

अन्वयार्थ—हा जो या मंडलांत पुरुष आहे त्याचें 'भूः' हें शिर आहे; शिर एक आहे, हें अक्षरहि एक आहे. 'भुवः' हे बाहू आहेत. बाहू दोन असतात. हीं अक्षरेंहि दोन आहेत. 'स्वर्' ही प्रतिष्ठा—पाय—आहेत. प्रतिष्ठा म्ह०

पाय दोन आहेत व हीं अक्षरेंहि दोन आहेत. त्याचें उपनिषद्—गुप्त नांव 'अहर्' असें आहे. 'अहर्' हें रूप 'हन्' धातु व 'हा' धातु यांपासून झालें आहे, असें जो जाणतो—'अहर्' या नांवाची उपासना करतो तो पापाला मारतो व त्याचा त्याग करतो. सु. ब्र. पृ. ३२६ पहा. ३.

योऽयं दक्षिणेऽक्ष-पुरुषस्तस्य भूरिति शिर एकꣳशिर एक-
मेतदक्षरं भुव इति बाहू द्वौ बाहू द्वे एते अक्षरे स्वरिति
प्रतिष्ठा द्वे प्रतिष्ठे द्वे एते अक्षरे तस्योपनिषदहमिति
हन्ति पाप्मानं जहाति च य एवं वेद ॥ ४

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्य पञ्चमं ब्राह्मणम् ॥ ५

अन्वयार्थ—हा जो दक्षिण नेत्रांतील पुरुष त्याचें 'भूः' हें शिर आहे. शिर एक व हें अक्षरहि एक. 'भुवः' हे बाहू आहेत. बाहू दोन व हीं अक्षरेंहि दोन. 'स्वर्' ही प्रतिष्ठा आहे. प्रतिष्ठा दोन व हीं अक्षरें दोन. त्याचें उपनिषद् 'अहम्' असें आहे. जो त्या नांवाची उपासना करतो तो पापाला मारतो व त्याचा त्याग करतो. सु. ब्र पृ. ३२६ पहा. ४ (५)

—उपाधि अनेक असल्यामुळे व त्यांतील प्रत्येक उपाधीचीं विशेषणें अनेक असल्यामुळें त्याच मनउपाधिविशिष्ट प्रकृत ब्रह्माच्या उपासनेचें विधान करण्याची इच्छा करणारा वेद म्हणतो—

मनोमयोऽयं पुरुषो भाः सत्यस्तस्मिन्नन्तर्हृदये
यथा व्रीहिर्वा यवो वा स एष सर्वस्येशानः
सर्वस्याधिपतिः सर्वमिदं प्रशास्ति यदिदं किंच ॥ १

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्य षष्ठं ब्राह्मणम् ॥ ६

अन्वयार्थ—हा पुरुष मनोमय आहे. 'भाः' म्ह० प्रकाश हेंच ज्याचें स्वरूप आहे तो 'भाः सत्यः—' भास्वर—प्रकाशमान होणारा तो त्या अन्तर्हृदयांत जसा व्रीहि किंवा यव असतो तेवढ्या परिमाणाचा आहे. तो हा सर्वाचा स्वामी, सर्वाचा अधिष्ठाता, हें जें कांहीं सर्व जगत् आहे त्याचा प्रशास्ता—पूर्णपणें शासन करणारा आहे. १ (६)

—तसेंच सत्य ब्रह्माचें विशिष्ट फल देणारें दुसरें उपासन आरंभिलें जातें—

विद्युद्ब्रह्मेत्याहुर्विदानाद्विद्युद्विद्यत्येनं पाप्मनो
य एवं वेद विद्युद्ब्रह्मेति विद्युद्ध्येव ब्रह्म ॥
इति बृहदारण्यकोपनिषदि पंचमाध्यायस्य सप्तमं ब्राह्मणम् ॥ ७

अन्वयार्थ—विद्युत् ब्रह्म असें म्हणतात. विदानामुळें–विनाश करीत असल्यामुळें विद्युत्. जो विद्युद्ब्रह्म असें जाणतो, अशी उपासना करतो तो आत्म्याला प्रतिकूल असलेल्या पापांचा विनाश करतो. कारण विद्युत्च ब्रह्म आहे १ (७)

—त्याच ब्रह्माच्या आणखी उपासनेचें विधान—

वाचं धेनुमुपासीत तस्याश्चत्वारः स्तनाः स्वाहाकारो वषट्कारो हन्तकारः स्वधाकारस्तस्यै द्वौ स्तनौ देवा उपजीवन्ति स्वाहाकारं च वषट्कारं च हन्तकारं मनुष्याः स्वधाकारं पितरस्तस्याः प्राण ऋषभो मनो वत्सः ॥
इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्याष्टम ब्राह्मणम् ॥ ८

अन्वयार्थ—त्रयीलक्षण–वेदरूप 'वाक्' याच धेनूचें उपासन करावें. तिचे चार स्तन आहेत. स्वाहाकार, वषट्कार, हन्तकार व स्वधाकार. तिच्या दोन स्तनांवर देव उपजीविका करितात. स्वाहाकार व वषट्कार, या दोन्हींवर देवांची उपजीविका होते, हन्तकारावर मनुष्य उपजीविका करितात व स्वधाकारावर पितर उपजीविका करितात त्या धेनूचा प्राण हाच वृषभ आहे व मन वत्स आहे १ (८)—आणखी उपासना—

अयमग्निर्वैश्वानरो योऽयमन्तः पुरुषे येनेदमन्नं पच्यते यदिदमद्यते तस्यैष घोषो भवति यमेतत्कर्णावपिधाय शृणोति स यदोत्क्रमिष्यन्भवति नैनं घोषꣳशृणोति ॥ १
इति बृहदारण्यकोपनिषदि पंचमाध्यायस्य नवमं ब्राह्मणम् ॥ ९

अन्वयार्थ—हा अग्नि वैश्वानर आहे, हा कोण? जो हा या शरीराख्य पुरुषाच्या आंत आहे. ज्याच्याकडून हें अन्न पक्व केलें जातें. जें हें अन्न खाल्लें जातें तें जो परिपक्व करतो त्याचा हा घोष होतो, कीं ज्या घोषाला पुरुष कान झांकून साक्षात् ऐकतो. पण पुरुष जेव्हां शरीर सोडण्यास तयार होतो तेव्हां या घोषास ऐकत नाहीं. मु. ब्र. पृ. ६३. पहा १ (९)

—आतां या प्रकरणांतील सर्व उपासनांची गति व फल सांगितलें जातें—

यदा वै पुरुषोऽस्माल्लोकात्प्रैति स वायुमागच्छति तस्मै स तत्र विजिहीते यथा रथचक्रस्य खं तेन स ऊर्ध्व आक्रमते स आदित्यमागच्छति तस्मै स तत्र विजिहीते यथा लम्बरस्य खं तेन स ऊर्ध्व आक्रमते स चन्द्रमसमागच्छति तस्मै स तत्र विजिहीते यथा दुन्दुभेः खं तेन स ऊर्ध्व आक्रमते स लोकमागच्छत्यशोकमहिमं तस्मिन्वसति शाश्वतीः समाः१

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्य दशमं ब्राह्मणम् ॥ १०

अन्वयार्थ—[यदा वै पुरुषः अस्मात् लोकात् प्रैति सः वायुं आगच्छति—] ज्या वेळीं पुरुष या शरीराला सोडून जातो तेव्हां तो वायूस प्राप्त होतो. [सः तस्मै तत्र विजिहीते—] तो वायु आपल्यामध्यें आलेल्या त्याला आपल्यामधून मार्ग देतो. आपल्यामध्यें छिद्र करतो. [यथा रथचक्रस्य खं—] जसें रथचक्राचें छिद्र असतें तेवढें छिद्र करतो. [तेन सः ऊर्ध्वः आक्रमते—] त्यांतून तो वर जातो. [सः आदित्यं आगच्छति०—] तो आदित्यास प्राप्त होतो. आदित्यहि आपले अवयव दूर करून त्याला मार्ग देतो. जसें 'लंबर' या नांवाच्या वाद्याचें छिद्र त्याप्रमाणें ते छिद्र असतें. त्यांतून तो वर जातो [सः चंद्रमसं०—] व चंद्रास प्राप्त होतो. आपल्यामध्यें आलेल्या त्याला चंद्रहि आपल्याला छिद्रयुक्त करून मार्ग देतो. जसें दुंदुभीचें छिद्र असतें त्याचप्रमाणें तें द्वार असतें. त्यांतून तो वर जातो. [सः अशोकं अहिमं लोकं आगच्छति—] तो शारीर व मानसिक दुःखशून्य प्रजापतिलोकास प्राप्त होतो [तस्मिन् शाश्वतीः समाः वसति—] त्यांत तो नित्य—शाश्वत वर्षें—अनेक कल्पपर्यंत रहातो. सु.ब्र.पृ ४७८पहा.१(१०)

एतद्वै परमं तपो यद्व्याहितस्तप्यते परमꣳहैव लोकं जयति य एवं वेदैतद्वै परमं तपो यं प्रेतमरण्यꣳहरन्ति परमं हैव लोकं जयति य एवं वेदैतद्वै परमं तपो यं प्रेतमग्नावभ्यादधाति परमꣳहैव लोकं जयति य एवं वेद ॥१

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्यैकादशं ब्राह्मणम् ॥ ११

अन्वयार्थ—हें परम तप आहे कीं [यत् व्याहितः तप्यते—] जो हा व्याधियुक्त होऊन संतप्त होतो. व्याधिजन्य दुःख हें परम तप आहे, असें जो चिंतन करतो तो परम लोकासच जिंकतो. [यं प्रेतं अरण्यं नयन्ति एतद्वै परमं

तपः—] ज्या मृत मनुष्याला अरण्यास नेतात हेंच परम तप आहे. मला मेल्यावर ग्रामांतून अरण्यांत नेतील हेंच माझें परम तप आहे, असें जो मरणापूर्वी चिंतन करतो तो परम लोकासच जिंकतो. [यं प्रेतं अग्नौ अभ्यादधाति एतद्वै परमं तपः—] मेलेल्या मनुष्याला अग्नींत सर्वप्रकारें घालितात हें परम तप आहे, असें जो जाणतो तो परम लोकासच जिंकतो १.(११)—आणखी उपासना—

अन्नं ब्रह्मेत्येक आहुस्तन्न तथा पूयति वा अन्नमृते प्राणात्प्राणो ब्रह्मेत्येक आहुस्तन्न तथा शुष्यति वै प्राण ऋतेऽन्नादेते ह त्वेव देवते एकधाभूयं भूत्वा परमतां गच्छतस्तद्ध स्माऽऽह प्रातृदः पितरं किं स्विदेवैयं विदुषे साधु कुर्यां किमेवास्मा असाधु कुर्यामिति स ह स्माऽऽह पाणिना मा प्रातृद कस्त्वेनयोरेकधाभूयं भूत्वा परमतां गच्छतीति तस्मा उ हैतदुवाच वीत्यन्नं वै व्यन्ने हीमानि सर्वाणि भूतानि विष्टानि रमिति प्राणो वै रं प्राणे हीमानि सर्वाणि भूतानि रमन्ते सर्वाणि ह वा अस्मिन्भूतानि विशन्ति सर्वाणि भूतानि रमन्ते य एवं वेद ॥ १ (१२)

अन्वयार्थ—[अन्नं ब्रह्म०—] अन्न ब्रह्म आहे, असें कित्येक म्हणतात. पण तें तसें नाही. कारण [ऋते प्राणात् अन्नं पूयति वै—] प्राणावांचून अन्न नासतें. त्याचप्रमाणें [प्राणः ब्रह्म०—] प्राण ब्रह्म आहे, असें कित्येक म्हणतात. पण तेंहि तसें नाहीं. कारण [अन्नात् ऋते प्राणः शुष्यति वै—] अन्नावांचून प्राण सुकतो, हें प्रसिद्ध आहे. [एते एव देवते एकधाभूयं भूत्वा परमतां गच्छतः—] ह्या दोन देवता एकभावास प्राप्त होऊन परमत्वास जातात, असा निश्चय करून प्रातृद ऋषि आपल्या पित्यास म्हणाला—[किं स्वित् एव एवं विदुषे साधु कुर्यां०—] "असें जाणणाराला मी काय बरें साधु—अनुकूल करीन किंवा त्याला मी असाधु—प्रतिकूल तरी काय करणार ?(कारण तो कृतकृत्य होत असल्यामुळें मी त्याला कांहीं करूं शकणार नाहीं.)" [सः ह आह पाणिना मा०—] पण त्याचें हातानें निवारण करून पिता म्हणाला—" हे प्रातृदा, [एनयोः एकधा भूयं भूत्वा परमतां कः गच्छति०—] या दोहोंच्या एकत्वरूपास प्राप्त होऊन परब्रह्मत्वास कोण जाणार ? (कोणी नाहीं,) " [तस्मै उ

६०—] त्यावर प्रातृद त्यास 'वि' असें म्हणाला. 'अन्न' हेंच 'वि' आहे. अन्नांतच हीं सर्व भूतें प्रविष्ट आहेत. तसेंच 'रं' असें तो म्हणाला. प्राणच 'रं' आहे. कारण प्राणांत हीं सर्व भूतें रममाण होतात. जो असें जाणतो त्यांत सर्व भूतें प्रवेश करितात व सर्व भूतें रममाण होतात —उक्थशस्त्रदृष्ट्या प्राणोपासना—

उक्थं प्राणो वा उक्थं प्राणो हीदꣳसर्वमुत्थापयत्युद्वास्मादुक्थ-
विद्वीरस्तिष्ठत्युक्थस्य सायुज्यꣳसलोकतां जयति य एवं वेद ॥ १

अन्वयार्थ—प्राणाची उक्थदृष्ट्या उपासना करावी. प्राणच उक्थ आहे. कारण प्राणच हें सर्व उत्थापित करतो. या उपासकापासून उक्थवेत्ता—प्राणवेत्ता पुत्र उत्पन्न होतो. (हें दृष्ट फल. आतां अदृष्ट फल—) जो असें जाणतो —उपासना करतो तो प्राणाच्या सायुज्यास व सलोकतेस प्राप्त होतो. १. —यजुर्दृष्ट्या प्राणोपासना—

यजुः प्राणो वै यजुः प्राणे हीमानि सर्वाणि भूतानि
युज्यन्ते युज्यन्ते हास्मै सर्वाणि भूतानि श्रैष्ठ्याय
यजुषः सायुज्यꣳसलोकतां जयति य एवं वेद ॥ २

अन्वयार्थ—'यजुः' अशी प्राणाची उपासना करावी. प्राणच यजु आहे. कारण प्राण असला तरच हीं सर्व भूतें संयुक्त होतात. सर्व भूतें याच्या श्रेष्ठत्वासाठीं याच्याशीं संयुक्त होतात. जो असें जाणतो तो यजूच्या सायुज्यास व सलोकतेस प्राप्त होतो. २. सामदृष्ट्या प्राणोपासना—

साम प्राणो वै साम प्राणे हीमानि सर्वाणि भूतानि
सम्यञ्चि सम्यञ्चि हास्मै सर्वाणि भूतानि श्रैष्ठ्याय कल्पन्ते
साम्नः सायुज्यꣳसलोकतां जयति य एवं वेद ॥ ३

अन्वयार्थ—'साम' असें प्राणाचें उपासन करावें. प्राणच साम आहे. प्राणांतच—प्राण असला तरच हीं सर्व भूतें सुसंगत होतात. सर्व भूतें यास सुसंगत होतात. इतकेंच नव्हे तर याच्या श्रेष्ठत्वास समर्थ होतात. जो असें जाणतो तो सामाच्या—प्राणाच्या सायुज्यास व सलोकतेस जिंकतो. ३. —क्षत्रदृष्ट्या प्राणोपासना—

क्षत्रं प्राणो वै क्षत्रं प्राणो हि वै क्षत्रं त्रायते हैनं
प्राणः क्षणितोः प्र क्षत्रमत्रमाप्नोति क्षत्रस्य सा-
युज्यꣳसलोकतां जयति य एवं वेद ॥ ४

अन्वयार्थ—त्या प्राणाची क्षत्र अशी उपासना करावी. प्राणच क्षत्र आहे. प्राण हेंच क्षत्र आहे, हें प्रसिद्ध आहे. प्राण या देहास शस्त्रादिजन्य क्षतापासून रक्षितो, दुसऱ्या कोणाकडूनहि त्राण केल्या न जाणाऱ्या क्षत्रास—प्राणास प्राप्त होतो. जो असें जाणतो तो क्षत्राच्या—प्राणाच्या सायुज्यतेस व सलोकतेस जिंकतो. ४ (१३)

—हृदयादि अनेक उपाधिविशिष्ट ब्रह्माचें उपासन सांगितलें. आतां गायत्री या उपाधीनें विशिष्ट अशा ब्रह्माचें उपासन सांगावें म्हणून आरंभ केला जातो—गायत्री उपासकाच्या प्राणाचें रक्षण करणारी व ब्राह्मणाच्या दुसऱ्या जन्माचें कारण आहे. त्यामुळें सर्व छन्दांमध्यें ती प्रधान आहे. म्हणून श्रुति म्हणते—

भूमिरन्तरिक्षं द्यौरित्यष्टावक्षराण्यष्टाक्षरꣳह वा एकं गायत्र्यै पदमेतदु हैवास्या एतत्स यावदेषु त्रिषु लोकेषु तावद्ध जयति योऽस्या एतदेवं पदं वेद ॥ १

अन्वयार्थ—'भूमिः अन्तरिक्षं द्यौः' हीं आठ अक्षरें. गायत्रीचें प्रथम पदहि अष्टाक्षर असतें. हेंच भूम्यादिरूप गायत्रीचें पद—प्रथम पाद आहे. जो हिचें हें असें प्रथम पद जाणतो तो या तीन लोकांत जेवढें म्हणून कांहीं जेतव्य आहे त्या सर्वांस जिंकतो. १

ऋचो यजूꣳषि सामानीत्यष्टावक्षराण्यष्टाक्षरꣳ ह वा एकं गायत्र्यै पदमेतदु हैवास्या एतत्स यावतीयं त्रयी विद्या तावद्ध जयति योऽस्या एतदेवं पदं वेद ॥ २

अन्वयार्थ—'ऋचः यजूंषि सामानि' अशी हीं आठ अक्षरें आहेत व गायत्रीचें दुसरें पदहि अष्टाक्षर आहे. हेंच गायत्रीचें दुसरें पद—दुसरा पाद आहे. जो हिचें हें असें पद जाणतो तो जेवढी ही त्रयीविद्या आहे—त्रयी-विद्येचें जेवढें फल आहे तेवढें सर्व जिंकतो २.

प्राणोऽपानो व्यान इत्यष्टावक्षराण्यष्टाक्षरꣳ ह वा एकं गायत्र्यै पदमेतदु हैवास्या एतत्स यावदिदं प्राणि तावद्ध जयति योऽस्या एतदेवं पदं वेदाथास्या एतदेव तुरीयं दर्शतं पदं परोरजा य एष तपति यद्वै चतुर्थं तत्तुरीयं दर्शतं पदमिति

दद्दश इव ह्येष परोरजा इति सर्वमु ह्येवैष रज उपर्युपरि तपत्येवꣳ हैव श्रिया यशसा तपति योऽस्या एतदेवं पदं वेद ३

अन्वयार्थ—' प्राणः अपानः व्यानः ' अशीं आठ अक्षरें व गायत्रीचें तिसरें पदहि अष्टाक्षर आहे. हेंच तिचें तिसरें पद आहे. जो गायत्रीचें हें असें तिसरें पद जाणतो तो जेवढें हें प्राणिजात आहे तेवढें सर्व जिंकतो. आतां यानंतर जो हा तापतो—प्रकाशमान होतो तेंच या गायत्रीचें तुरीय, दर्शत, परोरजा पद आहे. जें चतुर्थ तेंच तुरीय. 'दर्शतं पदं' याचा अर्थ—हा आदित्य-मंडलस्थ पुरुष जणुं काय दिसतो. ' परोरजाः ' याचा अर्थ—हा सर्व रजाच्या —समस्त लोकांच्या वर वर—आधिपत्यानें प्रकाशमान होतो. (सर्व लोकांस अधिपति या नात्यानें प्रकाशित करतो.) जो या गायत्रीचें हें असें तुरीय दर्शत परोरजा पद जाणतो तो सूर्याप्रमाणेंच शोभा व कीर्ति यांनीं प्रकाशमान होतो. ३

सैषा गायत्र्येतास्मिꣳस्तुरीये दर्शते पदे परोरजसि प्रतिष्ठिता तद्वै तत्सत्ये प्रतिष्ठितं चक्षुर्वै सत्यं चक्षुर्हि वै सत्यं तस्माद्यदिदानीं द्वौ विवदमानावेयातामहमदर्शमहमश्रौषमिति य एवं ब्रूयादहमदर्शमिति तस्मा एव श्रद्दध्याम तद्वै सत्सत्यं बले प्रतिष्ठितं प्राणो वै बलं तत्प्राणे प्रतिष्ठितं तस्मादाहुर्बलꣳ सत्यादोगीय इत्येवम्वेषा गायत्र्यध्यात्मं प्रतिष्ठिता सा हैषा गयाꣳ स्तत्रे प्राणा वै गयास्तत्प्राणाꣳस्तत्रे तद्यद्गयाꣳ स्तत्रे तस्माद्गायत्री नाम स यामेवामूꣳसावित्रीमन्वाहैषैव सा स यस्मा अन्वाह तस्य प्राणाꣳस्त्रायते ४

अन्वयार्थ—[सा एषा गायत्री—] ती ही त्रैलोक्य-त्रैविद्य-प्राणलक्षण गायत्री [एतस्मिन् तुरीये दर्शते परोरजसि पदे प्रतिष्ठिता—] या तुरीय, दर्शत, परोरज पदामध्यें प्रतिष्ठित आहे. [तत् वै तत् सत्ये प्रतिष्ठितं—] तें तुरीय पद सत्यामध्यें प्रतिष्ठित आहे. [चक्षुः वै सत्यं—] चक्षु हेंच सत्य आहे. [चक्षुः हि वै सत्यं—] चक्षु हेंच सत्य आहे, हें प्रसिद्ध आहे. [तस्मात् यत इदानीं द्वौ विवदमानौ एयातां अहं अदर्शं अहं अश्रौषं इति—] म्हणूनच आतां दोघे ' मीं पाहिलें, ' व ' मीं ऐकलें ' असें म्हणून परस्पर विरुद्ध भाषण करीत जर आपल्यापाशीं न्यायासाठीं आले तर [अहं अदर्शं इति एवं यः ब्रूयात—] ' मीं

पाहिलें ' अस जो म्हणतो [तस्मै एव श्रद्दध्याम–] त्याच्यावरच आम्ही विश्वास ठेवतों. [तत् सत्यं बले प्रतिष्ठितं०–] तेंच तुरीय पदाचा आश्रय करून राहिलेलें सत्य बलामध्यें प्रतिष्ठित आहे. [प्राणः वै बलं–] प्राणच बल आहे. [प्राणे तत् प्रतिष्ठितं–] त्या प्राणांत सत्य प्रतिष्ठित आहे. [तस्मात् बलं सत्यात् ओगीयः इति आहुः–] बलांत सत्य प्रतिष्ठित असल्यामुळेंच बल सत्याहून अधिक ओजस्वी आहे असें म्हणतात. [एवं उ एषा गायत्री०–]या न्यायानेंच ही गायत्री अध्यात्म–शरीरस्थ प्राणांत प्रतिष्ठित आहे. [सा ह एषा गयान् तत्रे–] तीच ही गयांना रक्षिती झाली. [प्राणाः वै गयाः–] वागादिक प्राण हेच गय आहेत. [तत् प्राणान् तत्रे–] म्हणून ती प्राणांस रक्षिती झाली. [यत् तत् गयान् तत्रे तस्मात् गायत्री नाम–] ज्याअर्थी ती गयांचें त्राण करती झाली त्याअर्थी गायत्री होय, म्हणून गायत्री हें तिचें नाम आहे. [सः यां एव अमूं सावित्री अन्वाह–] तो आचार्य अष्टवर्ष बटूला उपनयनसमयीं ज्या या सावित्रीचाच उपदेश करतो [सा एषा एव–] ती हीच होय. [सः यस्मै अन्वाह तस्य प्राणान् त्रायते–] तो आचार्य ज्या बटूला तिचा उपदेश करतो त्याच्या प्राणांचें रक्षण करतो ४.

तां हैतामेके सावित्रीमनुष्टुभमन्वाहुर्वागनुष्टुबेतद्वाचमनुब्रूम इति न तथा कुर्यादायत्रीमेव सावित्रीमनुब्रूयाद्यदि ह वा अप्येवंविद्बह्विव प्रतिगृह्णाति न वैव तद्गायत्र्या एकंचन पदं प्रति॥५

अन्वयार्थ––[एके तां एतां सावित्री अनुष्टुभं अन्वाहुः–] एका शाखेचे लोक ती ही सावित्री अनुष्टुभ उपदेशितात (गायत्रीछंदाच्या सवितृदेवताक ऋचेचा उपनीत बटूला उपदेश न करितां अनुष्टुभ छंदाच्या सावित्रीचा उपदेश करितात.) कारण ते म्हणतात–[वाक् अनुष्टुप्–] वाक् अनुष्टुप् आहे. म्हणून [एतत् वाचं अनुब्रूमः इति–] आम्ही वाक्-चाच उपदेश करतों. पण [तथा न कुर्यात्–] तसें करूं नये. तर [गायत्रीं०–] गायत्री सावित्रीचाच बटूला उपदेश करावा. [यदि ह वै एवंविद्०–] असें जाणणारा पुष्कळसा जरी प्रतिग्रह करीत असला तरी तो गायत्रीच्या एका पदाच्या बरोबरहि होत नाहीं.५.

स य इमाꣳस्त्रीँल्लोकान्पूर्णान्प्रतिगृह्णीयात्सोऽस्या एतत्प्रथमं पदमाप्नुयादथ यावतीयं त्रयी विद्या यस्तावत्प्रति-

गृह्णीयात्सोऽस्या एतद्द्वितीयं पदमाप्नुयादथ यावदिदं प्राणि यस्तावत्प्रतिगृह्णीयात्सोऽस्या एतत्तृतीयं पदमाप्नुयादथास्या एतदेव तुरीयं दर्शतं पदं परोरजा य एष तपति नैव केनचनाऽऽप्यं कुत उ एतावत्प्रतिगृह्णीयात् ॥ ६

अन्वयार्थ—[सः यः इमान् पूर्णान् त्रीन् लोकान्०—]तो जो या पूर्ण तीन लोकांचा प्रतिग्रह करील तो या गायत्रीच्या प्रथम पदास व्यापील. [अथ यावती०—] आतां जेवढी ही त्रयी विद्या आहे तेवढा जर कोणीं प्रतिग्रह केला तर तो गायत्रीच्या दुसऱ्या पदाच्या विज्ञानाचें जें फल त्यास प्राप्त होईल. [अथ यावत् इदं प्राणि०—] जेवढें ह्मणून हें सर्व प्राणिजात आहे तेवढा जर कोणीं प्रतिग्रह केला तर तो प्रतिग्रह गायत्रीच्या तिसऱ्या पदास प्राप्त होईल. (प्रतिग्रह करणारानें तृतीय पदविज्ञानाचें फल भोगिलें आहे, असें होईल.) [अथ अस्याः एतत् एव०—] आतां यानंतर या गायत्रीचें हेंच तुरीय दर्शत परोरजा पद आहे कीं जो हा तापतो—प्रकाशमान होतो. [केनचन न एव आप्यं—] हें पद कोणत्याहि प्रतिग्रहानें आप्य—प्राप्य नाहीं. कारण [एतावत् कुतः उ प्रतिगृह्णीयात्—] एवढा मोठा त्रैलोक्यादि परिमाणाचा प्रतिग्रह कोठून घेणार ? (तो शक्य नाही.) ६

तस्या उपस्थानं गायत्र्यस्येकपदी द्विपदी त्रिपदी चतुष्पद्यपदसि न हि पद्यसे। नमस्ते तुरीयाय दर्शताय पदाय परोरजसेऽसावदो मा प्रापदिति यं द्विष्यादसावस्मै कामो मा समृद्धीति वा न हैवास्मै स कामः समृध्यते यस्मा एवमुपतिष्ठतेऽहमदः प्रापमिति वा ॥ ७

अन्वयार्थ—[तस्याः उपस्थानं—] त्या गायत्रीचें उपस्थान—[गायत्रि एकपदी०—] हे गायत्रि, तूं एकपदी आहेस, द्विपदी आहेस, त्रिपदी आहेस, चतुष्पदी आहेस. अपद् आहेस. [न हि पद्यसे—] तूं जाणली जात नाहींस. [ते तुरीयाय०—] तुझ्या तुरीय, दर्शत, परोरज पदाला नमस्कार असो [असौ अदः मा प्रापत् इति—] हा शत्रु आपलें कार्य करण्यास समर्थ न होवो [असौ यं द्विष्यात्—] हा विद्वान् ज्याचा द्वेष करीत असेल [असौ अस्मै कामः मा समृद्धि इति—] त्याचें नांव घेऊन, त्याचें अभिप्रेत प्राप्त न होवो, किंवा याला

काम समृद्ध न होवो, असें उपस्थान करावें. म्हणजे [यस्मै एवं उपतिष्ठते अस्मै सः कामः न एव समृध्यते–] ज्याला उद्देशून असें उपस्थान करतो त्याचा तो काम समृद्ध होत नाहीं [अहं अदः प्रापं इति वा–] किंवा मीं या इष्ट अर्थाला प्राप्त व्हावें असें उपस्थान करावें. ७.

एतद्ध वै तज्जनको वैदेहो बुडिलमाश्वतराश्विमुवाच यन्नु हो तद्गायत्रीविदब्रूथा अथ कथꣳहस्तीभूतो वहसीति मुखꣳ ह्यस्याः सम्राण्न विदांचकारेति होवाच तस्या अग्निरेव मुखं यदि ह वा अपि बह्विवाग्नावभ्यादधति सर्वमेव तत्संदहत्येवꣳ हैवैवंविद्यद्यपि बह्विव पापं कुरुते सर्वमेव तत्संप्साय शुद्धः पूतोऽजरोऽमृतः संभवति ॥ ८

इति बृहदारण्यकोपनिषदि पञ्चमाध्यायस्य चतुर्दश ब्राह्मणम् ॥ १४

अन्वयार्थ—[एतत् ह वै०–] हेंच तो जनक वैदेह बुडील आश्वतराश्वीला म्हणाला–[यत् नु हो०–] " काय रे तूं आपल्याला गायत्रीविद् असें म्हणवितोस; [अथ कथं हस्तीभूतः वहसि–] पण गायत्रीविद् असतांना तूं हत्ती होऊन भार कसा वहात आहेस ? " त्यावर तो बुडिल उलट म्हणाला–" हे राजा, [अस्याः मुखं न विदांचकार–] मीं या गायत्रीचें मुख जाणलें नाहीं, " असें तो बोलला. तेव्हां राजा जनक म्हणाला–[तस्याः अग्निः एव मुखं–] " त्या गायत्रीचें अग्नि हेंच मुख आहे. [यदि ह वै०–] अग्नीमध्यें लोकांनीं पुष्कळसें इंधन जरी घातलें तरी तो तें सर्व चांगल्याप्रकारें जाळतो. [एवं हि एवंविदि०–] त्याचप्रमाणें गायत्री अग्निमुख आहे असें जाणणारा जरी पुष्कळ पाप करीत असला तरी तें सर्वच भक्षण करून तो शुद्ध, पूत, अजर, अमर होतो.८ (१४.)

–जो ज्ञानकर्मसमुच्चय करणारा तो अन्तकालीं आदित्याची प्रार्थना करितो—

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥

अन्वयार्थ—ज्योतिर्मय पात्रानें सत्याख्य ब्रह्माचें मुख–स्वरूप आच्छादित केलेलें आहे. हे पोषका, तूं तें आच्छादन उघड. (कशासाठीं ?) सत्य हाच ज्याचा धर्म आहे त्या मज सत्यधर्माला दिसण्यासाठीं (तें तूं उघड.)

पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह रश्मीन्त्समूह तेजो यत्ते रूपं कल्याणतमं तत्ते पश्यामि। योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि ॥

अन्वयार्थ—[पूषन्—] हे जगत्पोषका, [एकर्षे—] एकाकी गमन करणाऱ्या अथवा एकच सर्वद्रष्टया, [यम—] सर्व जगाच्या नियामका, [सूर्य—] जगाच्या चांगल्या प्रेरका, [प्राजापत्य—] ईश्वराच्या किंवा हिरण्यगर्भाच्या पुत्रा, आपल्या रश्मींना—किरणांना घालीव, तेज एकत्र संक्षिप्त कर, त्याचा उपसंहार कर. जें हें कल्याणतम रूप तें मी पाहतों. हा जो मंडलस्थ पुरुष तोच मी आहें.

वायुरनिलममृतमथेदं भस्मान्तꣳशरीरम् ॥ ॐ क्रतो स्मर कृतꣳ स्मर क्रतो स्मर कृतꣳ स्मर ॥

अन्वयार्थ—मज अमृत सत्याचा वायु—प्राण (शरीरपातानंतर) बाह्य अमृत वायूस प्राप्त होवो. तसेंच हें शरीरहि भस्मान्त होऊन पृथ्वीस प्राप्त होवो. हे ॐ, हे क्रतो, माझ्या विषयीं जें स्मर्तव्य असेल तें स्मर. मीं जें केलें आहे त आठव. (आदर दाखविण्यासाठीं याच प्रार्थनेची मंत्रांत द्विरुक्ति केली आहे.)

अग्ने नय सुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान्।
युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ॥

अन्वयार्थ—हे अग्ने, आम्हांला तूं कर्मफलप्राप्त्यर्थ शोभन मार्गानें—उत्तरायण—देवयान—मार्गानें ने. हे देव, सर्व प्राण्यांच्या सर्व प्रज्ञानांस जाणणाऱ्या हे विद्वाना, (आम्हांस तूं शुभ मार्गानें ने) तसेंच आमचें कुटिल पाप घालीव. आम्ही तुला पुष्कळ नमस्कारवचन बोलतों. नमस्कारवचनानें तुझी परिचर्या करतों.

इति बृहदारण्यकोपनिषदाचा पांचवा अध्याय समाप्त झाला.

—प्राण गायत्री आहे, असें सांगितलें. गायत्रीला प्राणभाव कोणत्या बरें कारणानें आहे व वागादिभाव कां नाही ? ज्याअर्थीं प्राण ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे, वागादिक ज्येष्ठत्व व श्रेष्ठत्व यांस पात्र नाहींत, त्याअर्थीं प्राण गायत्री आहे, हें योग्यच सांगितलें आहे. पण प्राणाला ज्येष्ठत्व व श्रेष्ठत्व कसें, असें कोणी विचारील म्हणून त्याचा निर्धार करण्याच्या इच्छेनें हें ब्राह्मण आरंभिलें जातें. अथवा चक्षुरादि अन्य करणें असतांनाहि उक्थ, यजुः, साम, क्षत्र इत्यादि भावांनीं प्राणाचेंच उपासन सांगितलें. विशिष्ट गुणयुक्त प्राणालाच जें उपास्यत्व सांगितलें आहे त्याचा केवल ज्येष्ठत्वादि हेतु येथें सांगितला जात आहे. या कांडाला खिलत्व असल्यामुळें पूर्वीच्या उपासनेंत जें सांगितलेलें नाहीं तें

विशिष्ट फल देणारें प्राणविषयक उपासन येथें विवक्षित आहे, तें सांगावें, म्हणून या ब्राह्मणाचा आरंभ केला जात आहे.

ॐ यो ह वै ज्येष्ठं च श्रेष्ठं च वेद ज्यष्ठश्च श्रेष्ठश्च स्वानां भवति प्राणो वै ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च स्वानां भवत्यपि च येषां बुभूषति य एवं वेद ॥ १

अर्थ—जो कोणी ज्येष्ठाला व श्रेष्ठाला जाणतो तो स्वकीयांमध्यें ज्येष्ठ व श्रेष्ठ होतो. प्राणच ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे. जो अशी उपासना करतो तो स्वजातीयांमध्यें ज्येष्ठ व श्रेष्ठ होतो. तसाच तो ज्या दुसऱ्यांमध्यें ज्येष्ठ व श्रेष्ठ होण्याची इच्छा करतो त्यांतहि ज्येष्ठ व श्रेष्ठ होतो. सु. ब्र. पृ. ३०१ पहा. (ही विद्या छांदोग्याच्या पांचव्या अध्यायांत अशीच सविस्तर सांगितली आहे. म्हणून येथें श्रुतीचा अन्वय दिला नाही.) १.

यो ह वै वसिष्ठां वेद वसिष्ठः स्वानां भवति वाग्वै वसिष्ठा वसिष्ठः स्वानां भवत्यपि च येषां बुभूषति य एवं वेद ॥ २

अर्थ—जो वसिष्ठेला जाणतो तो स्वजातीयांमध्यें वसिष्ठ होतो. वाक् हीच वसिष्ठा आहे. जो अशी उपासना करतो तो स्वजातीयांमध्यें वसिष्ठ होतो. त्याचप्रमाणें ज्यांच्यामध्यें वसिष्ठ होण्याची इच्छा करतो त्यांमध्येंहि वसिष्ठ होतो.

यो ह वै प्रतिष्ठां वेद प्रतितिष्ठति समे प्रतितिष्ठति दुर्गे चक्षुर्वै प्रतिष्ठा चक्षुषा हि समे च दुर्गे च प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति समे प्रतितिष्ठति दुर्गे य एवं वेद ॥ ३

अर्थ—जो प्रतिष्ठेला जाणतो तो सम देश व काल यांत प्रतिष्ठित होतो. तसाच दुर्गम काल व देश यांतहि प्रतिष्ठित होतो. चक्षु हीच प्रतिष्ठा आहे. चक्षूनेंच सम व दुर्गम यांत प्रतिष्ठित होतो. जो अशी उपासना करतो तो समामध्यें प्रतिष्ठित होतो व विषमामध्यें प्रतिष्ठित होतो. ३.

यो ह वै संपदं वेद सꣳ हास्मै पद्यते यं कामं कामयते श्रोत्रं वै संपच्छ्रोत्रे हीमे सर्वे वेदा अभिसंपन्नाः सꣳ हास्मै पद्यते यं कामं कामयते य एवं वेद ॥ ४

अर्थ—जो संपद्-ला जाणतो, जो संपद्गुणयुक्त उपासना करतो, तो ज्या कामाची इच्छा करतो त्यास संपन्न—प्राप्त होतो. श्रोत्र हीच संपद् आहे.

श्रोत्रांतच हे सर्व वेद अभिसंपन्न आहेत. जो अशी उपासना करतो तो ज्या कामाची कामना करतो तो त्यास प्राप्त होतो. ४

यो ह वा आयतनं वेदाऽऽयतनꣳस्वानां भवत्यायतनं जनानां मनो वा आयतनमायतनꣳस्वानां भवत्यायतनं जनानां य एवं वेद ॥ ५

अर्थ—जो आयतनाला जाणतो तो स्वकीयांचें आयतन होतो व इतर जनांचेंहि आयतन होतो. मन हेंच आयतन आहे. जो अशी उपासना करतो तो आपल्या ज्ञातीचें व इतर जनांचें आयतन होतो. ५.

यो ह वै प्रजातिं वेद प्रजायते ह प्रजया पशुभी रेतो वै प्रजातिः प्रजायते ह प्रजया पशुभिर्य एवं वेद ॥ ६

अर्थ—जो प्रजातीला जाणतो तो प्रजेनें संपन्न होतो व पशूंनीं संपन्न होतो. रेतच प्रजाति आहे. जो असें जाणतो तो प्रजा व पशु यांनीं संपन्न होतो. ६.

ते हेमे प्राणा अहꣳश्रेयसे विवदमाना ब्रह्म जग्मुस्तद्धोचुः को नो वसिष्ठ इति तद्धोवाच यस्मिन्व उत्क्रान्त इदꣳशरीरं पापीयो मन्यते स वो वसिष्ठ इति ॥ ७

अर्थ—ते हे वागादिक सर्व प्राण 'मी श्रेष्ठ' हें ठरविण्यासाठीं विवाद करणारे असे होत्साते ब्रह्माकडे–प्रजापतीकडे गेले व त्याला ह्मणाले–"आह्मांमध्यें वसिष्ठ कोण?" ब्रह्मा म्हणाला–"तुह्मांपैकीं जो शरीर सोडून गेला असतां हें–शरीर पाहिल्यापेक्षां अधिक पापी होतें, असें जनसमूह मानतो तो तुह्मांमध्यें वसिष्ठ." सु. ब्र. पृ. १३४ पहा. ७.–ब्रह्मदेवाकडून असें सांगितले गेलेले ते वागादि प्राण आपापल्या वीर्याचें परीक्षण करण्यासाठीं क्रमानें शरीर सोडून गेले—

वाग्घोच्चक्राम सा संवत्सरं प्रोष्याऽऽगत्योवाच कथमशकत मदृते जीवितुमिति ते होचुर्यथा कला अवदन्तो वाचा प्राणन्तः प्राणेन पश्यन्तश्चक्षुषा शृण्वन्तः श्रोत्रेण विद्वा - सो मनसा प्रजायमाना रेतसैवमजीविष्मेति प्रविवेश ह वाक् ॥८

अर्थ—प्रथम वाक् शरीर सोडून गेली व ती एक वर्षभर बाहेर राहून परत आली आणि म्हणाली–"तुम्ही मजवांचून जिवंत राहण्यास कसे समर्थ झालां?" तेव्हां ते इतर प्राण म्हणाले–"जसे मुके वाणीनें न बोलणारे पण प्राणानें

प्राणन क्रिया करीत, नेत्रानें पहात, श्रोत्रानें श्रवण करीत, मनानें जाणत व रेतानें उत्पन्न करीत जिवंत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलों." तें ऐकून वाक् शरीरांत प्रविष्ट झाली. ८.

चक्षुर्होच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्याऽऽगत्योवाच कथमशकत मदृते जीवितुमिति ते होचुर्यथाऽन्धा अपश्यन्तश्चक्षुषा प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा शृण्वन्तः श्रोत्रेण विद्वाꣳसो मनसा प्रजायमाना रेतसैवमजीविष्मेति प्रविवेश ह चक्षुः ॥९

अर्थ—चक्षुरिंद्रिय उत्क्रान्त झालें. तें एक वर्ष बाहेर राहून व परत येऊन म्हणालें—" माझ्यावांचून तुम्ही जिवंत राहण्यास कसे समर्थ झालां ? " तेव्हां ते इतर प्राण म्हणाले—" जसे आंधळे चक्षूनें न पाहणारे, पण प्राणानें प्राणन क्रिया करणारे, वाक्नें बोलणारे, श्रोत्रानें ऐकणारे, मनानें जाणणारे व रेतानें प्रजोत्पत्ति करणारे असे जिवंत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलों." तें ऐकून चक्षु शरीरांत प्रविष्ट झालें. ९.

श्रोत्रꣳहोच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्याऽऽगत्योवाच कथमशकत मदृते जीवितुमिति ते होचुर्यथा बधिरा अशृण्वन्तः श्रोत्रेण प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा पश्यन्तश्चक्षुषा विद्वाꣳसो मनसा प्रजायमाना रेतसैवमजीविष्मेति प्रविवेश ह श्रोत्रम् ॥१०

अर्थ—श्रोत्रेंद्रिय शरीर सोडून गेलें. तें एक संवत्सर प्रवास करून व परत येऊन म्हणालें—" मजवाचून तुम्ही जिवंत कसे राहूं शकलां ? " इतर प्राण म्हणाले—"जसे बहिरे श्रोत्रानें न ऐकणारे, पण प्राणानें प्राणन क्रिया करणारे, वाक्नें बोलणारे, चक्षूनें पाहणारे, मनानें जाणणारे व रेतानें प्रजोत्पत्ति करणारे असे जिवंत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलों." तें ऐकून श्रोत्र शरीरांत शिरलें. १०.

मनो होच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्याऽऽगत्योवाच कथमशकत मदृते जीवितुमिति ते होचुर्यथा मुग्धा अविद्वाꣳसो मनसा प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा पश्यन्तश्चक्षुषा शृण्वतः श्रोत्रेण प्रजायमाना रेतसैवमजीविष्मेति प्रविवेश ह मनः ॥ ११

अर्थ—मन उत्क्रमण करतें झालें. तें एक वर्षभर प्रवासांत राहून व परत येऊन म्हणालें—" तुम्ही मजवांचून जिवंत राहूं कसे शकलां ? " तेव्हां ते इतर प्राण म्हणाले—" जसे मुग्ध—मूढ—वेडे मनानें न जाणणारे, पण प्राणानें प्राणनक्रिया करीत, वाकूनें बोलत, चक्षूनें पहात, श्रोत्रानें ऐकत व रेतानें प्रजोत्पादन करीत जिवंत राहतात तसे आम्ही जिवंत राहिलों. " तें ऐकून (व आपण कांहीं श्रेष्ठ नव्हे असें समजून) मन शरीरांत शिरलें. ११.

रेतो होच्चक्राम तत्संवत्सरं प्रोष्याऽऽगत्योवाच कथमशकत मदृते जीवितुमिति ते होचुर्यथा क्लीबा अप्रजायमाना रेतसा प्राणन्तः प्राणेन वदन्तो वाचा पश्यन्तश्चक्षुषा शृण्वन्तः श्रोत्रेण विद्वाꣳसो मनसैवमजीविष्मेति प्राविवेश ह रेतः॥ १२

अर्थ—रेत उत्क्रान्त झालें. तें वर्षभर प्रवास करून व परत येऊन म्हणालें—" मजवांचून तुम्ही जिवंत कसे राहूं शकलां ? " तेव्हां इतर प्राण म्हणाले—" जसे नपुंसक रेतानें प्रजोत्पादन करीत नाहींत, पण प्राणानें प्राणनक्रिया करीत, वाणीनें बोलत, चक्षूनें पहात, श्रोत्रानें ऐकत व मनानें जाणत राहतात त्याप्रमाणें आम्ही जिवंत राहिलो." तें ऐकून रेत शरीरांत प्रविष्ट झालें. १२

अथ ह प्राण उत्क्रमिष्यन्यथा महासुहयः सैन्धवः पड्वीश-शङ्कून्संवृहेदेवꣳहैवेमान्प्राणान्संववर्ह ते होचुर्मा भगव उत्क्रमीर्न वै शक्ष्यामस्त्वदृते जीवितुमिति तस्यो मे बलिं कुरुतेति तथेति

अर्थ—नंतर प्राण उत्क्रमण करूं लागला. त्याबरोबर जसा मोठा लक्षणसंपन्न सिंधुदेशांतील घोडा पायबन्धाच्या मेखांना एकदम उपटतो त्याप्रमाणें तो या सर्व प्राणांस आपापल्या स्थानापासून भ्रष्ट करता झाला. तेव्हां ते प्राण म्हणाले—" हे भगवन्, शरीराला सोडून जाऊं नकोस. तुजवांचून आम्ही जिवंत राहण्यास समर्थ नाहीं. " प्राण म्हणतो—" तर मग मला कर द्या ? " ते प्राण म्हणाले—" बरें आहे. " १३.

सा ह वागुवाच यद्वा अहं वसिष्ठाऽस्मि त्वं तद्वसिष्ठोऽसीति यद्वा अहं प्रतिष्ठाऽस्मि त्वं तत्प्रतिष्ठोऽसीति चक्षुर्यद्वा अहꣳ संपदस्मि त्वं तत्संपदसीति श्रोत्रं यद्वा अहमायतनमस्मि त्वं तदायतनमसीति मनो यद्वा अहं प्रजा-

तिरस्मि त्वं तत्प्रजातिरसीति रेतस्तस्यो मे किमन्नं किं वास इति यदिदं किंचाऽऽश्वभ्य आ कृमिभ्य आ कीटपतंगेभ्यस्तत्तेऽन्नमापो वास इति न ह वा अस्यानन्नं जग्धं भवति नानन्नं प्रतिगृहीतं य एवमेतदनस्यान्नं वेद तद्विद्वा सः श्रोत्रिया अशिष्यन्त आचामन्त्यशित्वाऽऽचामन्त्येतमेव तदनमनग्नं कुर्वन्तो मन्यन्ते ॥ १४

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठाध्यायस्य प्रथमं ब्राह्मणम् ॥ १

अर्थ—ती वाक् म्हणाली—" जी मी वसिष्ठा आहें ती तूंच वसिष्ठ आहेस. " " मी जी प्रतिष्ठा आहें ती तूंच प्रतिष्ठा आहेस, " असें चक्षु म्हणाला. " मी जी संपद् आहें ती तूंच संपद् आहेस " असें श्रोत्र म्हणालें. " मी जें आयतन आहें तें तूंच आयतन आहेस " असें मन म्हणालें. " मी जी प्रजाति आहें ती तूंच प्रजाति आहेस " असें रेत म्हणालें [म्ह० आम्हांतील तो तो गुण तुझ्या निमित्तानें आहे. यास्तव आमचें वसिष्ठत्वादि सर्व माहात्म्य हाच बलि—कर आम्ही तुला देतों, असा भावार्थ.] त्यावर प्राण म्हणाला,—" तर त्या माझें अन्न काय आहे व वस्त्र काय आहे? " तेव्हां वागादि इतर प्राण म्हणाले—" कुत्र्यांपर्यंत, कृमींपर्यंत कीट-पतंगांपर्यंत जेवढें म्हणून अन्न आहे तें तुझें अन्न आहे. आप—जल—हें वस्त्र आहे. जो असें हें प्राणाचें अन्न जाणतो त्यानें अभक्ष्य भक्षण केलें आहे असें होत नाहीं व अप्रतिग्राह्याचा प्रतिग्रह केला आहे, असें होत नाहीं. म्हणून वेदाध्ययन केलेले ब्राह्मण भोजन करतांना आपोशन घेतात व भोजन करून आचमन करितात. याच प्राणाला आम्ही अनग्न करणारे आहों, असें मानतात. याचा भाष्यार्थ सु. ब्र. पृ. ३२३, ४०५ पहा. १४ (१)

—हा खिलाधिकार—खिलप्रकरण आहे. म्हणून कर्मकांड व ज्ञानकांड यांत प्राधान्यानें न सांगितलेलें येथें सांगावें, म्हणून हें ब्राह्मण आहे. वरील—पृ.७२४—' सुपथा-'शब्दावरून अनुष्ठित कर्माच्या फलोपभोगाच्या मार्गाचें ज्ञान होतें. पण कोणतेंहि कर्मफल संसारांतच अन्तर्भूत होतें. यास्तव मुमुक्षूला त्याविषयीं वैराग्य यावें म्हणून पंचाग्निविद्या आरंभितात—

श्वेतकेतुर्ह वा आरुणेयः पञ्चालानां परिषदमाजगाम स आजगाम जैवलिं प्रवाहणं परिचारयमाणं तमुदीक्ष्याभ्युवाद कुमारा ३ इति स भो ३ इति प्रतिशुश्रावानुशिष्टोऽन्वसि पित्रेत्योमिति होवाच ॥ १

अर्थ—मागें असें घडलें—श्वेतकेतु या नांवाचा अरुणाचें अपत्य जो आरुणि त्याचें अपत्य—अरुणाचा नातु श्वेतकेतु खरोखर पंचालांच्या परिषदेस आला त्या परिषदेला जिंकून तो भृत्यांकडून परिचर्या करविणाऱ्या प्रवाहण नांवाच्या जैवलि पंचालराजाकडेहि आला. पण त्याच्याकडे पाहून राजा 'कायरे मुला' असें म्हणाला. तेव्हां 'ओ महाराज' असें श्वेतकेतूहि बोलला. 'बापानें तुला शिकविलें आहे का?' असें राजा म्हणाला. त्यावर 'होय' असें श्वेतकेतु बोलला. मागें पृ. ४०० पहा १.

वेत्थ यथेमाः प्रजाः प्रयत्यो विप्रतिपद्यन्ता ३ इति नेति होवाच वेत्थो यथेमं लोकं पुनरापद्यन्ता ३ इति नेति हैवोवाच वेत्थो यथाऽसौ लोक एवं बहुभिः पुनः पुनः प्रयद्भिर्न संपूर्यता ३ इति नेति हैवोवाच वेत्थो यतिथ्यामाहुत्यां हुतायामापः पुरुषवाचो भूत्वा समुत्थाय वदन्ती ३ इति नेति हैवोवाच वेत्थो देवयानस्य वा पथः प्रतिपदं पितृयाणस्य वा यत्कृत्वा देवयानं वा पन्थानं प्रतिपद्यन्ते पितृयाणं वाऽपि हि न ऋषेर्वचः श्रुतं द्वे सृती अशृणवं पितृणामहं देवानामुत मर्त्यानां ताभ्यामिदं विश्वमेजत्समेति यदन्तरा पितरं मातरं चेति नाहमत एकंचन वेदेति होवाच॥

अन्वयार्थ—(राजा—) "ज्या प्रकारें या मरणाऱ्या प्रजा निरनिराळ्या मार्गानें जातात तो प्रकार तूं जाणतोस का?" 'नाहीं?' असें तो बोलला. "त्या पुनः या लोकास कशा येतात तें जाणतोस का?" "नाहीं." असें तो म्हणाला. "याप्रमाणें मरून पुनः पुनः जाणाऱ्या असंख्य लोकांकडून तो लोक ज्याप्रकारें संपूर्ण होत नाहीं—भरत नाहीं तें जाणतोस का?" 'नाहीं' असेंच श्वेतकेतु म्हणाला. "कितवी आहुति हुत केली असतां आप पुरुषशब्दवाच्य होऊन चांगल्यारीतीनें उत्पन्न होऊन बोलतात हें तूं जाणतोस का?"

त्यावर 'नाहीं' असेंच तो बोलला. [वेत्थ देवयानस्य वा पथः प्रतिपदं पितृयाणस्य वा–] "देवयान मार्गाचें प्रतिपद्–कर्मरूप साधन व पितृयाणमार्गाचें प्रतिपद् तूं जाणतोस का? कीं [यत् कृत्वा देवयानं वा पन्थानं प्रतिपद्यन्ते पितृयाणं वा–] जें प्रतिपद्–कर्म करून देवयानमार्गाला प्राप्त होतात किंवा जें करून पितृयाणमार्गाला प्राप्त होतात, [अपि हि नः ऋषेः वचः श्रुतं–] याच अर्थाचें प्रकाशक असा मंत्राचें हें वचन आम्हीं ऐकलें आहे. (मंत्रवचनाचा अर्थ–) [अहं द्वे सृती अशृणवं–] मीं दोन मार्ग ऐकले आहेत [पितृणां देवानां–] एक पितरांचा व दुसरा देवांचा, (या मार्गांनीं कोण जातात? उत्तर–) [मर्त्यानां उत–] हे मार्ग मनुष्यांचेच आहेत. [ताभ्यां इदं विश्वं एजत समेति–] त्या दोन मार्गांनीं जाणारे हें जगत् चांगल्याप्रकारें जातें. [यदन्तरा पितरं मातरं च इति–] ते दोन मार्ग ज्या माता-पित्यांच्या मध्यें आहेत ते जाणतोस का? [अतः अहं एकंचन न वेद इति ह उवाच–] 'यांतील एकहि गोष्ट मी जाणत नाहीं' असें श्वेतकेतु म्हणाला. २.

अथैनं वसत्योपमन्त्रयांचक्रेऽनादृत्य वसतिं कुमारः प्रदुद्राव स आजगाम पितरं तं होवाचेति वाव किल नो भवान्पुराऽनुशिष्टानवोच इति कथꣳ सुमेध इति पञ्च मा प्रश्नान्राजन्यबन्धुरप्राक्षीत्ततो नैकंचन वेदेति कतमे त इतीम इति ह प्रतीकान्युदाजहार ॥ ३

अन्वयार्थ—[अथ एनं वसत्या उपमंत्रयांचक्रे–] नंतर त्या प्रकृत श्वेतकेतूला राजानें राहण्यासाठीं प्रार्थना केली. पण [कुमारः वसतिं अनादृत्य प्रदुद्राव–] तो कुमार त्याच्या येथील वसतीचा अनादर करून निघून गेला. [सः आजगाम पितरं–] तो पित्याकडे आला व [तं ह उवाच–] त्याला म्हणाला– [इति वाव किल भवान् नः पुरा अनुशिष्टान् अवोचः–] "असेंचना तुम्हीं मला पूर्वीं सर्व विद्या शिकविलेला ह्मणून म्हटलेंत तें?" (पिता–) "हे धारणाशक्तिमाना, काय झालें?" (पुत्र–) "मला तो क्षत्रियबंधु पांच प्रश्न विचारता झाला. पण त्यांतील एकालाहि मी जाणत नाहीं." (पिता–) ते कोणते? 'हे ते' असें म्हणून त्यानें प्रश्नांचीं प्रतीकें–मुखें उच्चारलीं ३.

स होवाच तथा नस्त्वं तात जानीथा यथा यदहं किंच वेद सर्वमहं तत्तुभ्यमवोचं प्रेहि तु तत्र प्रतीत्य ब्रह्मचर्यं वत्स्याव इति भवानेव गच्छत्विति स आजगाम गौतमो यत्र प्रवाहणस्य जैवलेरास तस्मा आसनमाहृत्योदकमाहारयांचकाराथ हास्मा अर्घ्यं चकार तꣳ होवाच वरं भगवते गौतमाय दद्म इति ॥ ४

अन्वयार्थ—तो पिता म्हणाला—" हे वत्सा, [यद् अहं किंच वेद तत् सर्वं अहं तुभ्यं अवोचं इति यथा तथा नः त्वं जानीथाः—] मी जें कांहीं जाणतों तें सर्व तुला सांगितलें आहे, असेंच तूं समज.[प्रेहि तु तत्र प्रतीत्य ब्रह्मचर्यं वत्स्यावः इति—] चल, आपण त्या राजाकडे जाऊं व तेथें जाऊन ब्रह्मचर्य पाळूं."त्यावर पुत्र ह्मणाला—[भवान् एव गच्छतु इति—] "आपणच जा."[सः गौतमः यत्र प्रवाहणस्य जैवलेः आस तत्र आजगाम—] तो गौतम जेथें प्रवाहण जैवलीचें श्रोतृस्थान होतें तेथें आला. [तस्मै आसनं०—] राजा त्याला आसन देववून उदक आणविता झाला.[अथ ह अस्मै अर्घ्यं चकार०—]पुरोहिताकडून त्याला अर्घ्य देवविलें. नंतर राजा त्यास ह्मणाला—[भगवते गौतमाय वरं दद्मः इति—] "पूज्य गौतमाला आम्ही वर देतों." (काय पाहिजे तें माग.) ४.

स होवाच प्रतिज्ञातो म एष वरो यां तु कुमारस्यान्ते वाचमभाषथास्तां मे ब्रूहीति ॥ ५

अन्वयार्थ—तो म्हणाला—[मे एषः वरः प्रतिज्ञातः—] " तूं मला हें वर देण्याचें वचनच दिलें आहेस. [यां वाचं कुमारस्य अन्ते अभाषथाः तां मे ब्रूहि इति—] जी वाणी तूं कुमाराच्या समीप बोललास ती मला सांग. " ५

स होवाच दैवेषु वै गौतम तद्वरेषु मानुषाणां ब्रूहीति ॥ ६

अन्वयार्थ—तो राजा म्हणाला—" हे गौतमा तो देवांच्या वरांतील एक वर आहे. मनुष्यांच्या वरांतील एखादा वर माग " ६.

स होवाच विज्ञायते हास्ति हिरण्यस्यापात्तं गोअश्वानां दासीनां प्रवाराणां परिधानस्य मा नो भवान्बहोरनन्तस्यापर्यन्तस्याभ्यवदान्यो भूदिति स वै गौतम तीर्थेने-

च्छासा इत्युपैम्यहं भवन्तमिति वाचा ह स्मैव
पूर्व उपयन्ति स होपायनकीर्त्योवास ॥ ७

अन्वयार्थ—[सः ह उवाच०—] गौतम म्हणाला—'आपण जाणतांच कीं मजपाशीं माणूस वर आहे. सुवर्णाची प्राप्ति आहे, गायी व घोडे यांची प्राप्ति आहे, दासी, परिवार व परिधान यांची प्राप्ति आहे [भवान् बहोः अनन्तस्य अपर्यन्तस्य नः अभि अवदान्यः मा भूत् इति—] आपण विपुल, अक्षय फलद व निःसीम धनादिकांचे दाते असून केवल मजप्रतच अदाते होऊं नका.' (राजा म्हणतो—) [गौतम सः वै तीर्थेन इच्छासै इति—] 'हे गौतमा, तो तूं शास्त्र-विहित न्यायानें मजपासून विद्या मिळविण्याची इच्छा कर.' (गौतम—) [अहं भवन्तं उपैमि—] 'मी तुजपाशीं शिष्यभावानें येतों. [पूर्वे वाचा ह एव उपयन्ति स्म—] पूर्वींचे ब्राह्मणादिक आपत्तींत केवल शब्दानेंच उपगमन करीत असत.' [सः ह उपायनकीर्त्या उवास—] गौतम केवल 'उपगमन करतों,' असें बोलूनच त्याच्यापाशीं विद्येसाठीं राहिला. ७

स होवाच तथा नस्त्वं गौतम माऽपराधास्तव च पिता-
महा यथेयं विद्येतः पूर्वं न कस्मिंश्चन ब्राह्मण उवास तां
त्वहं तुभ्यं वक्ष्यामि को हि त्वैवं ब्रुवन्तमर्हति प्रत्याख्यातुमिति ॥

अन्वयार्थ—राजा म्हणाला—'हे गौतमा [तव च पितामहाः तथा नः त्वं मा अपराधाः—] तुझे पितामह आमच्या पितामहांचे अपराध जसे मानीत नसत त्याप्रमाणें तूं हा माझा अपराध मानूं नकोस. [यथा इतः पूर्वं इयं विद्या न कस्मिंश्चन ब्राह्मणे उवास—] यापूर्वी ही विद्या कोणत्याहि ब्राह्मणाचे ठिकाणीं नव्हती, हें तूं जाणतोसच [तु तां अहं तुभ्यं वक्ष्यामि—] पण ती मी तुला सांगतों. [एवं ब्रुवन्तं कः हि प्रत्याख्यातुं अर्हति—] असें बोलणाराचा निषेध करण्यास कोण समर्थ आहे ?' ८.

असौ वै लोकोऽग्निर्गौतम तस्याऽऽदित्य एव समिद्रश्मयो धूमोऽ-
हरर्चिर्दिशोऽङ्गारा अवान्तरदिशो विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेत-
स्मिन्नग्नौ देवाः श्रद्धां जुह्वति तस्या आहुत्यै सोमो राजा संभवति॥

अन्वयार्थ—हे गौतमा, द्युलोक हाच अग्नि आहे. त्याची आदित्य हीच समिध आहे. किरण हा धूम, दिवस ही ज्वाला आहे. दिशा हे निखारे आहेत.

अवांतर दिशा हे विस्फुलिंग आहेत. त्या या अग्नीमध्यें देव श्रद्धेचें हवन करितात. त्या आहुतीपासून सोम राजा होतो. याचा भाष्यार्थ पहा. ९.

पर्जन्यो वा अग्निर्गौतम तस्य संवत्सर एव समिदभ्राणि धूमो विद्युदर्चिरशनिरङ्गारा ह्रादुनयो विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः सोमꣳराजानं जुह्वति तस्या आहुत्यै वृष्टिः संभवति॥

अन्वयार्थ—हे गौतमा, पर्जन्यच दुसरा अग्नि—आहुतीचा आधार आहे. त्याची संवत्सर हीच समिध, अभ्रें हा धूम, विद्युत् ही ज्वाला, अशनि हे निखारे, मेघाचा गडगडाट हे विस्फुलिंग आहेत, त्या या अग्नींत देव सोम राजाचें हवन करितात. त्या आहुतीपासून वृष्टि संभवते. १०

अयं वै लोकोऽग्निर्गौतम तस्य पृथिव्येव समिदग्निर्धूमो रात्रिरर्चिश्चन्द्रमा अङ्गारा नक्षत्राणि विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा वृष्टिं जुह्वति तस्या आहुत्या अन्नꣳसंभवति ११

अन्वयार्थ—हा लोकच अग्नि. त्याची पृथिवी हीच समिधा, अग्नि हा धूम, रात्रि अर्चि, चंद्रमा हे निखारे, नक्षत्रें हे विस्फुलिंग; त्या या अग्नींत देव वृष्टीचें हवन करितात. त्या आहुतीपासून अन्न उद्भवतें. ११

पुरुषो वा अग्निर्गौतम तस्य व्यात्तमेव समित्प्राणो धूमो वागर्चिश्चक्षुरङ्गाराः श्रोत्रं विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा अन्नं जुह्वति तस्या आहुत्यै रेतः संभवति ॥ १२

अन्वयार्थ—हे गौतमा, पुरुष हा अग्नि आहे. त्याचें उघडलेलें मुख हीच समिधा, प्राण हा धूम, वाक् ही ज्वाला, चक्षु हे निखारे व श्रोत्र हीं किटाळें; त्या या अग्नीमध्यें देव अन्नाचें हवन करितात. त्या आहुतीपासून रेत उद्भवतें. १२

योषा वा अग्निर्गौतम तस्या उपस्थ एव समिल्लोमानि धूमो योनिरार्चिर्यदन्तः करोति तेऽङ्गारा अभिनन्दा विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा रेतो जुह्वति तस्या आहुत्यै पुरुषः संभवति स जीवति यावज्जीवत्यथ यदा म्रियते॥ १३

अन्वयार्थ—हे गौतमा, स्त्री हाच अग्नि आहे. तिचें उपस्थ—जननेंद्रिय हीच समिध्, लोम हा धूम, योनि ही ज्वाला, जें अंतःकरण—मैथुनव्यापार ते अंगार व त्यामुळें होणारे जे सुखलेश ते विस्फुलिंग होत. त्या या अग्नींत

देव रेतार्चे हवन करितात. त्या आहुतीपासून पुरुष उद्भवतो. याप्रमाणें झालेला तो पुरुष कांहीं काल जिवंत राहतो. कर्मक्षय होईपर्यंत जिवंत राहतो. पण त्या कर्मांचा क्षय झाला असतां जेव्हां तो मरतो (तेव्हां त्याला अन्त्य आहुतीकरितां अग्नींत होमितात, असा पुढील कंडिकेशीं संबंध)१३.

अथैनमग्नये हरन्ति तस्याग्निरेवाग्निर्भवति समित्समिद्धूमो धूमोऽर्चिरर्चिरङ्गारा अङ्गारा विस्फुलिङ्गा विस्फुलिङ्गास्तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः पुरुषं जुह्वति तस्या आहुत्यै पुरुषो भास्वरवर्णः संभवति ॥ १४

अन्वयार्थ—तेव्हां त्या मृताला अग्नींत होम करण्याकरितां नेतात. त्या आहुतिभूत मृताचा प्रसिद्ध अग्नि हाच अग्नि होतो. समिधा हीच समिधा, प्रसिद्ध धूप हाच त्याचा धूम, अर्चि हीच अर्चि, अंगार हेच अंगार व विस्फुलिंग हेच विस्फुलिंग होत. त्या या अग्निमध्यें देव पुरुषाला होमितात. त्या आहुतीपासून पुरुष अतिशय दीप्तिमान् होतो. १४.

ते य एवमेतद्विदुर्ये चामी अरण्ये श्रद्धाꣳ सत्यमुपासते तेऽर्चिरभिसंभवन्त्यर्चिषोऽहरह्न आपूर्यमाणपक्षमापूर्यमाणपक्षाद्यान्षण्मासानुदङ्ङादित्य एति मासेभ्यो देवलोकं देवलोकादादित्यमादित्याद्वैद्युतं तान्वैद्युतान्पुरुषो मानस एत्य ब्रह्मलोकान्गमयति ते तेषु ब्रह्मलोकेषु पराः परावतो वसन्ति तेषां न पुनरावृत्तिः ॥ १५

अन्वयार्थ—ते जे गृहस्थ अग्नि, समिध् इत्यादिकांनीं विशिष्ट अशा पंचाग्नींस जाणतात तसेच जे हे अरण्यांतील परिव्राजक व वानप्रस्थ श्रद्धायुक्त होऊन सत्य ब्रह्मास—हिरण्यगर्भात्म्यास जाणतात ते अर्चिरभिमानिनी देवतेला प्राप्त होतात. या देवतेपासून अहरभिमानिनी देवतेस, तेथून शुक्लपक्षदेवतेस, शुक्लपक्षापासून ज्या सहा महिन्यांत सूर्य उत्तरेस जातो त्या मासांच्या अभिमानी देवतेस, तेथून देवलोकास, देवलोकापासून आदित्यास, आदित्यापासून वैद्युतास. त्या वैद्युतांस मानस पुरुष येऊन ब्रह्मलोकांस पोंचवितो. ते त्या ब्रह्मलोकांमध्यें अनंत संवत्सर राहतात. त्यांची पुनरावृत्ति होत नाहीं. याचा भाष्यार्थ व सु. ब्र. पृ. ४८४ पहा. १५.

अथ ये यज्ञेन दानेन तपसा लोकाञ्जयन्ति ते धूममभिसं-
भवन्ति धूमाद्रात्रिꣳ रात्रेरपक्षीयमाणपक्षमपक्षीयमाणपक्षा-
द्यान्षण्मासान्दक्षिणाऽऽदित्य एति मासेभ्यः पितृलोकं
पितृलोकाच्चन्द्रं ते चन्द्रं प्राप्यान्नं भवन्ति ताꣳस्तत्र देवा
यथा सोमꣳराजानमाप्यायस्वापक्षीयस्वेत्येवमेनाꣳस्तत्र
भक्षयन्ति तेषां यदा तत्पर्यवैत्यथेममेवाऽऽकाशमभिनिष्प-
द्यन्त आकाशाद्वायुं वायोर्वृष्टिं वृष्टेः पृथिवीं ते पृथिवीं
प्राप्यान्नं भवन्ति ते पुनः पुरुषाग्नौ हूयन्ते ततो योषाग्नौ
जायन्ते लोकान्प्रत्युत्थायिनस्त एवमेवानुपरिवर्तन्तेऽथ य
एतौ पन्थानौ न विदुस्ते कीटाः पतङ्गा यदिदं दन्दशूकम् १६

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठाध्यायस्य द्वितीयं ब्राह्मणम् ॥ २

अन्वयार्थ—पण जे यज्ञानें, दानानें, तपानें, लोकांस जिंकतात ते धूमास —धूमाभिमानिनीदेवतेस अभिसंपन्न होतात. धूमाधिदेवतेपासून रात्रिदेवतेस, रात्रि-देवतेपासून कृष्णपक्षदेवतेस, कृष्णपक्षदेवतेपासून ज्या सहा महिन्यांत आदित्य दक्षिण दिशेस जातो त्या सहा मासांच्या देवतांस, मासदेवतांपासून पितृलो-कास, पितृलोकापासून चन्द्रास, ते कर्मठ चन्द्रास प्राप्त होऊन अन्न होतात, ज्याप्रमाणें ऋत्विज सोमराजास 'आप्यायस्व अपक्षीयस्व' असें करून म्ह० वारंवार चमसांत भरून पितात त्याप्रमाणें तेथें देव त्यांस भक्षण करितात. (धनी जसा चाकरांचा उपभोग घेतात त्याप्रमाणें देव त्यांचा उपभोग घेतात—) त्यांचें तें कर्म जेव्हां उपभोगानें क्षीण होतें तेव्हां ते कर्मी याच प्रसिद्ध आका-शास अभिनिष्पन्न होतात. आकाशापासून वायूस, वायूपासून वृष्टीस, वृष्टी-पासून पृथिवीस प्राप्त होतात. पृथिवीस प्राप्त होऊन अन्न होतात. ते पुनः पुरुषाग्नींत होमिले जातात. तेथून लोकांप्रत पुनः उत्थान पावणारे ते योषाग्नींत उत्पन्न होतात. ते याच न्यायानें पुनः पुनः परिवर्तन करितात. पण जे या दोन मार्गांना जाणत नाहींत ते कीट, पतंग, दंश-मशक होतात. याचा भाष्यार्थ पहा. १६. (२).

—ज्ञान व कर्म यांची गति सांगितली. त्यांतील ज्ञान स्वतंत्र आहे. पण कर्म दैववित्त व मानुषवित्त या दोहोंच्या अधीन असतें. यास्तव कर्मासाठीं त्या

द्विविध वित्तांचें उपार्जन करणें उचित आहे. पण तें प्रत्यवायप्राप्ति न करील अशा उपायानें संपादन केलें पाहिजे. यास्तव वित्ताच्या सिद्ध्यर्थ मंथाख्य कर्म महत्त्व-प्राप्तीसाठीं आरंभिलें जातें महत्त्व प्राप्त झालें असतां वित्त अर्थात् सिद्ध होतें—

स यः कामयेत महत्प्राप्नुयामित्युद्गयन आपूर्यमाणपक्षस्य पुण्याहे द्वादशाहमुपसद्व्रती भूत्वौदुम्बरे कꣳसे चमसे वा सर्वौषधं फलानीति संभृत्य परिसमूह्य परिलिप्याग्निमुपसमाधाय परिस्तीर्योऽऽहृताऽऽज्यꣳसꣳस्कृत्य पुꣳसा नक्षत्रेण मन्थꣳसंनीय जुहोति। यावन्तो देवास्त्वयि जातवेदस्तिर्यञ्चो घ्नन्ति पुरुषस्य कामान्। तेभ्योऽहं भागधेयं जुहोमि ते मा तृप्ताःसर्वैःकामैस्तर्पयन्तु स्वाहा। या तिरश्ची निपद्यतेऽहं विधरणी इति तां त्वा घृतस्य धारया यजे सꣳराधनीमहꣳस्वाहा॥१

अन्वयार्थ—मी महत्त्वास प्राप्त व्हावें, असें जो इच्छितो त्यानें उदगयनांत शुक्लपक्षाच्या शुभ दिवशी, पूर्वी बारा दिवस उपसद्व्रती—पयोव्रती होऊन कंसाकार अथवा चमसाकार औदुंबराच्या काष्ठाच्या पात्रांत सर्वौषधीचा समूह, फळें व इतर संभार जमवून परिसमूहन, परिलेपन करून, गृह्याग्नीचें उपसमाधान करून परिस्तरणें घालून गृह्योक्त इतिकर्तव्यतेनें आज्याला संस्कार करून पुरुषनांवाच्या नक्षत्रानें मंथाला—सर्वौषधिफलपिष्टाला अग्नीच्या व आपल्यामध्यें संस्थापित करून 'यावन्तो देवाः०' इत्यादि मंत्रांनीं आज्याचें हवन करावें. (पहिल्या मंत्राचा अर्थ—) हे जातवेदा, तुझ्या अधीन असलेले जेवढे देव वक्रमति होऊन माझ्या—पुरुषाच्या—कामास प्रतिबंध करितात त्यांस उद्देशून मी आज्यभाग तुजमध्यें होमितों. त्यानें तृप्त होऊन ते सर्व पुरुषार्थांनीं मला तृप्त करोत. मी तुझ्या अधीन अर्पिलेला आहें ('या तिरश्ची०' या दुसऱ्या मंत्राचा अर्थ—) जी देवता कुटिलमति होऊन सर्वांना मीच धारण करणारी आहें, असें मानून तुझा आश्रय करून राहते त्या सर्वसाधनी देवतेस उद्देशून मी घृताच्या धारेनें हवन करतों. स्वाहा. मागें पृ. ३९८ पहा. १.

ज्येष्ठाय स्वाहा श्रेष्ठाय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति प्राणाय स्वाहा वसिष्ठायै स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति वाचे स्वाहा प्रतिष्ठायै स्वाहेत्यग्नौ

हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति चक्षुषे स्वाहा संपदे स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति श्रोत्राय स्वाहाऽऽयतनाय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति मनसे स्वाहा प्रजात्यै स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति रेतसे स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति ॥ २

अन्वयार्थ—'ज्येष्ठाय स्वाहा' 'श्रेष्ठाय स्वाहा' या मंत्रांनीं अग्नींत हवन करून मंथामध्यें संस्रव—सुरेला राहिलेलें आज्य पाडवितो. 'प्राणाय स्वाहा' 'वसिष्ठायै स्वाहा' या मंत्रानीं अग्नींत हवन करून मंथात संस्रव पाडवितो. 'वाचे स्वाहा' 'प्रतिष्ठायै स्वाहा' या मंत्रांनी अग्नींत हवन करून मंथांत संस्रव पाडवितो. 'चक्षुषे स्वाहा' 'संपदे स्वाहा' या मंत्रांना अग्नींत हवन करून मंथामध्यें संस्रव पाडवितो. 'श्रोत्राय स्वाहा' 'आयतनाय स्वाहा' या मंत्रांनीं अग्नींत हवन करून मन्थात संस्रव पाडवितो. 'मनसे स्वाहा' 'प्रजात्यै स्वाहा' या मंत्रांनी अग्नींत हवन करून मंथामध्यें संस्रव टाकतो. 'रेतसे स्वाहा' या मंत्रानें अग्नींत हवन करून मंथांत संस्रव टाकतो. २.

अग्नये स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति सोमाय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति भूः स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति भुवः स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति स्वःस्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति भूर्भुवःस्वःस्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति ब्रह्मणे स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति क्षत्राय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति भूताय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति भविष्यते स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति विश्वाय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति सर्वाय स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति प्रजापतये स्वाहेत्यग्नौ हुत्वा मन्थे सꣳस्रवमवनयति ॥ ३

अन्वयार्थ—'अग्नये स्वाहा' 'सोमाय स्वाहा' 'भूः स्वाहा' 'भुवः स्वाहा' 'स्वः स्वाहा' भूर्भुवःस्वः स्वाहा' 'ब्रह्मणे स्वाहा' 'क्षत्राय स्वाहा'

'भूताय स्वाहा' 'भविष्यते स्वाहा' 'विश्वाय स्वाहा' 'सर्वाय स्वाहा' 'प्रजापतये स्वाहा' या मंत्रांनीं क्रमानें अग्नींत हवन करून प्रत्येक वेळीं मंथामध्यें संस्रव पाडवावा-टाकावा. ३.

अथैनमभिमृशति भ्रमदसि ज्वलदसि पूर्णमसि प्रस्तब्धमस्येकसभमसि हिंकृतमसि हिंक्रियमाणमस्युद्गीथमस्युद्गीयमानमसि श्रावितमसि प्रत्याश्रावितमस्यार्द्रे संदीप्तमसि विभूरसि प्रभूरस्यन्नमसि ज्योतिरसि निधनमसि संवर्गोऽसीति ॥ ४

अन्वयार्थ—नंतर त्या मंथाला 'भ्रमदसि०' इत्यादि मंत्रानें स्पर्श करतो. (मंथद्रव्याची प्राण ही देवता असल्याकारणानें त्याला प्राणाच्या एकरूपत्वामुळें सर्वात्मकत्व आहे. ह्मणून) सर्व देहामध्यें तूं प्राणरूपानें 'भ्रमद्'-भ्रमण करणारा आहेस. (कारण प्राणाला चलनात्मकत्व आहे व मंथ तद्रूप आहे) सर्व देहांत तूं अग्निरूपानें 'ज्वलत्'-दीप्त होणारा आहेस. ब्रह्मरूपानें 'पूर्ण' आहेस, आकाशरूपानें 'अतिशय स्तब्ध'-निष्कंप आहेस. सर्वांशीं अविरोधित्व असल्यामुळें सर्वहि जगत् 'एका सभेप्रमाणें' आत्म्यामध्यें अन्तर्भूत करून अपरिच्छिन्नत्वानें स्थित असलेली वस्तु तूं आहेस. प्रस्तोत्याकडून यज्ञाच्या आरंभीं तूंच 'हिंकृत' आहेस. त्याच प्रस्तोत्याकडून यज्ञांत 'हिंक्रियमाण' तूंच आहेस. उद्गात्याकडून यज्ञाच्या आरंभीं व यज्ञामध्यें उच्च स्वरानें गायला जाणारा 'उद्गीथ' तू आहेस. अध्वर्यूकडून तूं 'श्रावित' आहेस. आग्नीध्राकडून प्रत्याश्रावित आहेस. 'आर्द्रे'-मेघोदरात 'उत्तमप्रकारें दीप्त' आहेस. 'विभु'-विविध होणारा व 'प्रभु'-समर्थ आहेस. (भोग्यरूपानें-सोमात्मरूपानें स्थित असल्यामुळें) 'अन्न' आहेस. भोक्तृरूपानें-अग्निस्वरूपनें 'ज्योति' आहेस. कारणत्वामुळें 'निधन'-लय आहेस. अध्यात्म वागादिक व अधिदैव अग्न्यादिक त्याच्या संहरणामुळे तू 'संवर्ग' आहेस. (असा अभिमर्शन-स्पर्शमंत्राचा अर्थ आहे.) ४.

अथैनमुद्यच्छत्यामꣳस्यामꣳहि ते महि स हि राजेशानोऽधिपतिः स मार् राजेशनोऽधिपतिं करोत्विति ॥ ५

अन्वयार्थ—त्यानंतर त्याला 'आमंसि आमंहि०' इत्यादि मंत्रानें वर उचलतो. (त्या मंत्राचा अर्थ-)'आमंसि'-तूं सर्व जाणतोस व आम्ही 'ते महि'

तुझें अतिशय मोठें रूप 'आमंहि–' जाणतों. ' स हि राजा० '– तो प्राण राजा, ईशान, अधिपति आहे. तो मला राजा, ईशान व अधिपति करो. (हा वर उचलण्याचा मंत्र आहे.) ५.

अथैनमाचामति तत्सवितुर्वरेण्यम् । मधु वाता ऋतायते । मधु क्षरन्ति सिन्धवः । माध्वीर्नः सन्त्वोषधीः । भूः स्वाहा । भर्गो देवस्य धीमहि । मधु नक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवꣳरजः । मधु द्यौरस्तु नः पिता । भुवः स्वाहा । धियो यो नः प्रचोदयात् । मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः । माध्वीर्गावो भवन्तु नः । स्वः स्वाहेति सर्वां च सावित्रीमन्वाह सर्वाश्च मधुमतीरहमेवेदꣳसर्वं भूयासं भूर्भुवः स्वः स्वाहेत्यन्तत आचम्य पाणी प्रक्षाल्य जघनेनाग्निं प्राक्शिराः संविशति प्रातरादित्यमुपतिष्ठते दिशामेकपुण्डरीकमस्यहं मनुष्याणामेकपुण्डरीकं भूयासमिति यथेतमेत्य जघनेनाग्निमासीनो वꣳशं जपति ॥ ६

अन्वयार्थ––त्यानंतर या मंथाचें ' तत्सवितुः० ' इत्यादि मंत्रांनीं भक्षण करतो. ' तत्सवितुः० '–सूर्याच्या त्या वरेण्य–श्रेष्ठ पदाचें आम्ही ध्यान करतों 'वाताः मधु ऋतायन्ते'– वायुभेद सुखकर वाहतात, 'सिन्धवः मधु क्षरन्ति'– नद्या मधुर रसांचा स्राव करितात. ' नः ओषधीः माध्वीः सन्तु '–आम्हांप्रत औषधी मधुररस होवोत. ' भूः स्वाहा. ' (या अर्थाच्या मंत्राने मंथाचा पहिला ग्रास भक्षितो.) ' देवस्य भर्गः धीमहि '–सवित्या देवाचें तेज आम्ही चिंतितों. ' नक्तं उत उषसः मधु '–रात्र व दिवस प्रीतिकर होवोत, ' पार्थिवं रजः मधुमत् '–पृथ्वीचें रज–धूळ अनुद्वेगकर–उद्वेग न करणारी असो. ' द्यौः पिता नः मधु अस्तु–' द्यौ–स्वर्गलोक हा पिता आम्हांप्रत सुखकर असो. ' भुवः स्वाहा ' (अशा अर्थाच्या मंत्राने दुसरा ग्रास खावा) ' यः नः धियः प्रचोदयात् '–जो सविता आमच्या बुद्धीस प्रेरणा करतो त्याच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों ' नः वनस्पतिः मधुमान् अस्तु–' आम्हांला वनस्पति–सोम मधुमान् असो. ' सूर्यः मधुमान् अस्तु '–सूर्य आम्हांप्रत मधुमान् असो. ' गावः नः माध्वीः भवन्तु'–किरण किंवा दिशा आम्हांला सुखकर असोत.'स्वः स्वाहा'

(अशा अर्थाच्या मंत्रानें तिसरा ग्रास घ्यावा.) नंतर ' तत्सवितुर्वरेण्यं० ' इत्यादि सर्व सावित्री, ' मधुवाता ऋतायते० ' इत्यादि सर्व मधुमती ऋचा, ' मींच हें सर्व व्हावें, ' अशा अर्थाचें ' अहमेवेदं सर्वं भूयासं ' असें वाक्य शेवटीं म्हणून ' भूर्भुवः स्वः स्वाहा ' या मंत्रानें शेवटीं सर्व मंथ भक्षण करून दोन्ही हात धुवून अग्नीच्या पश्चाद्भागीं–पश्चिमेस पूर्वेकडे मस्तक करून निजतो. प्रातःकालीं ' दिशामेकपुण्डरीकमसि० ' या मंत्रानें आदित्याचें उपस्थान करतो. (त्या मंत्राचा अर्थ–तूं दिशांचा एक पुंडरीक–अखंड श्रेष्ठ आहेस, मीं मनुष्यांतील एक पुंडरीक व्हावें.) नंतर गेल्या मार्गानें परत येऊन अग्नीच्या पश्चात् भागीं बसणारा तो पुढील वंशाचा जप करतो ६.

तꣳहैतमुद्दालक आरुणिर्वाजसनेयाय याज्ञवल्क्यायान्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनꣳशुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति

अन्वयार्थ—उद्दालक आरुणि त्याच या मंथाला आपला अन्तेवासी जो वाजसनेय याज्ञवल्क्य त्यास सांगून म्हणाला–" जर कोणी या मंथाला शुष्क स्तंभावरहि टाकील तर त्या स्तंभालाहि शाखा फुटतील व पानें येतील. " ७.

एतमु हैव वाजसनेयो याज्ञवल्क्यो मधुकाय पैङ्ग्यायान्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनꣳशुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ॥ ८

अन्वयार्थ—वाजसनेय याज्ञवल्क्य हाच मंथ मधुक पैंग्य शिष्याला सांगून म्हणाला–" याला जर कोणी वाळलेल्या लांकडावर टाकील तर त्यालाहि शाखा फुटतील व पानें येतील. " ८.

एतमु हैव मधुकः पैङ्ग्यश्चूलाय भागवित्तयेऽन्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनꣳशुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति

अन्वयार्थ—मधुक पैंग्य हाच मंथ चूल भागवित्ति शिष्याला सांगून म्हणाला–" जर याला कोणीं शुष्क स्थाणूवरहि टाकलें तर त्याला शाखा येतील व पानें फुटतील. " ९.

एतमु हैव चूलो भागवित्तिर्जानकय आयस्थूणायान्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनꣳशुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ॥ १०

अन्वयार्थ—चूल भागवित्ति जानकि आयस्थूण शिष्याला हाच मंथ सांगून म्हणाला—" जर कोणी याला वाळलेल्या वृक्षाच्या खोडावर टाकील तर त्यालाहि शाखा फुटतील व पानें येतील " १०.

एतमु हैव जानकिरायस्थूणः सत्यकामाय जाबाला-
यान्तेवासिन उक्त्वोवाचापि य एनꣳ शुष्के स्थाणौ निषि-
ञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ॥ ११

अन्वयार्थ—जानकि आयस्थूण सत्यकाम जाबाल या शिष्याला हाच मंथ सांगून म्हणाला—" जर कोणी हा मंथ निर्जीव लांकडावर टाकील तर त्यालाहि डाहळ्या फुटतील व पानें येतील. " ११.

एतमु हैव सत्यकामो जाबालोऽन्तेवासिभ्य उक्त्वोवाचापि
य एनꣳशुष्के स्थाणौ निषिञ्चेज्जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः
पलाशानीति तमेतं नापुत्राय वाऽनन्तेवासिने वा ब्रूयात् ॥ १२

अन्वयार्थ—सत्यकाम जाबाल हाच मंथ अनेक शिष्यांना सांगून म्हणाला—" जर कोणीं हा मंथ शुष्क स्थाणूवर टाकिला तर त्यालाहि अवयव फुटतील व पानें येतील.' तो हा मंथ अपुत्र किंवा अशिष्य यांना सांगूं नये. १२.

चतुरौदुम्बरो भवत्यौदुम्बरः स्रुव औदुम्बरश्चमस औदु-
म्बर इध्म औदुम्बर्यौ उपमन्थन्यौ दश ग्राम्याणि
धान्यानि भवन्ति व्रीहियवास्तिलमाषा अणुप्रियंगवो
गोधूमाश्च मसूराश्च खल्वाश्च खलकुलाश्च तान्पिष्टान्द-
धनि मधुनि घृत उपसिञ्चत्याज्यस्य जुहोति ॥ १३

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठाध्यायस्य तृतीयं ब्राह्मणम् ॥ ३

अन्वयार्थ—हा मंथ चतुरौदुंबर असतो. म्हणजे यांत औदुंबरकाष्ठाचीच स्रुवा, औदुंबरकाष्ठाचाच चमस, औदुंबरकाष्ठाचाच इध्म व औदुंबराच्याच दोन उपमंथनी. दहा ग्राम्य धान्यें असतात. व्रीहि—भात, यव, तिल, माष (उडीद), अणु (चीनक), प्रियंगु (राळे), गहूं, मसूर, वाल व कुळीथ. त्यांचें पीठ करतो व तें दहीं, मध व घृत यांत घालतो व घृताच्या आहुति देतो १३(३)

—जशाप्रकारच्या जन्मानें युक्त, ज्या प्रकारानें उत्पन्न केलेला व ज्या गुणांनीं विशिष्ट आणि जो आपल्या व पित्याच्या उत्तम लोकाला हितकर होतो

असा पुत्र कसा होईल, अशी अपेक्षा झाली असतां त्याला संपादन करण्यासाठीं पुढील ब्राह्मण आरंभिलें जातें. प्राणोपासकाचा व वरील श्रीमन्थ या नांवाचें कर्म ज्यानें केलें आहे त्याचाच या पुत्र-मंथकर्मामध्यें अधिकार आहे. जेव्हां प्राणोपासक पुत्रमंथ करण्याची इच्छा करतो तेव्हा वरील श्रीमंथ करून पत्नीच्या ऋतुकालाची अपेक्षा करीत राहतो, ही गोष्ट रेताची ओषध्यादिकांच्या रसतमत्वानें स्तुति केल्यानें अवगत होते. (या ब्राह्मणांतील पुढील भाग अवाच्य ग्राम्य धर्मविशिष्ट आहे. त्याचा मुमुक्षूंना फारसा उपयोगहि नाही. यास्तव त्याचा स्पष्ट अर्थ न देतां पुढें मूलमात्र दिलें आहे. ज्यांना त्याच्या शब्दार्थाचीच आवश्यकता वाटेल त्यांनी याच्या भाष्यार्थांत तो पहावा.)

एषां वै भूतानां पृथिवी रसः पृथिव्या आपोऽपामोषधय ओषधीनां पुष्पाणि पुष्पाणां फलानि फलाना पुरुषः पुरुषस्य रेतः ॥ १
स ह प्रजापतिरीक्षांचक्रे हन्तास्मै प्रतिष्ठा कल्पयानीति स स्त्रियꣳ ससृजे ताꣳसृष्ट्वाऽध उपास्त तस्मात्स्त्रियमव उपासीत स एतं प्राञ्चं ग्रावाणमात्मन एव समुदपारयत्तेनैनामभ्यसृजत् ॥ २
तस्या वेदिरुपस्थो लोमानि बर्हिश्चर्माधिषवणे सामिद्धो मध्यतस्तौ मुष्कौ स यावान्ह वै वाजपेयेन यजमानस्य लोको भवति तावानस्य लोको भवति य एवं विद्वानधोपहासं चरत्यासाꣳस्त्रीणाꣳ सुकृतं वृङ्क्तेऽथ य इदमविद्वानधोपहासं चरत्यस्य स्त्रियः सुकृतं वृञ्जते॥ ३
एतद्ध स्म वै तद्विद्वानुद्दालक आरुणिराहैतद्ध स्म वै तद्विद्वान्नाको मौद्गल्य आहैतद्ध स्म वै तद्विद्वान्कुमार्हारित आह बहवो मर्या ब्राह्मणायना निरिन्द्रिया विसुकृतोऽस्माल्लोकात्प्रयन्ति य इदमविद्वाꣳसोऽधोपहासं चरन्तीति बहु वा इदꣳसुप्तस्य वा जाग्रतो वा रेतः स्कन्दति॥ ४
तदभिमृशेदनु वा मन्त्रयेत यन्मेऽद्य रेतः पृथिवीमस्कान्त्सीद्यदोषधीरप्यसरद्यदपः । इदमहं तद्रेत आददे पुनर्मामैत्विन्द्रियं पुनस्तेजः पुनर्भगः । पुनरग्निर्धिष्ण्या यथास्थानं कल्पन्तामित्यनामिकाङ्गुष्ठाभ्यामादायान्तरेण स्तनौ वा भ्रुवौ वा निमृज्यात् ॥ ५
अथ यद्युदक आत्मानं पश्येत्तदभिमन्त्रयेत मयि तेज इन्द्रियं

यशो द्रविणꣳसुकृतमिति श्रीर्हि वा एषा स्त्रीणां यन्मलो-
द्वासास्तस्मान्मलोद्वाससं यशस्विनीमभिक्रम्योपमन्त्रयेत ॥ ६
सा चेदस्मै न दद्यात्काममेनामवक्रीणीयात्सा चेदस्मै नैव
दद्यात्काममेनां यष्ट्या वा पाणिना वोपहत्यातिक्रामेदिन्द्रियेण
ते यशसा यश आदद इत्ययशा एव भवति ॥ ७
सा चेदस्मै दद्यादिन्द्रियेण ते यशसा यश आदधामीति यशस्विनावेव भवतः ॥ ८
स यामिच्छेत्कामयेत मेति तस्यामर्थं निष्ठाय मुखेन मुखꣳसंधायो-
पस्थमस्या अभिमृश्य जपेदङ्गादङ्गात्संभवसि हृदयादधिजायसे ।
स त्वमङ्गकषायोऽसि दिग्धविद्धामिव मादयेमाममूं मयीति ॥ ९
अथ यामिच्छेन्न गर्भं दधीतेति तस्यामर्थं निष्ठाय मुखेन मुखꣳसंधायाभि-
प्राण्यापान्यादिन्द्रियेण ते रेतसा रेत आदद इत्यरेता एव भवति ॥ १०
अथ यामिच्छेद्दधीतेति तस्यामर्थं निष्ठाय मुखेन मुखꣳसंधायापान्याभि-
प्राण्यादिन्द्रियेण ते रेतसा रेत आदधामीति गर्भिण्येव भवति ॥ ११
अथ यस्य जायायै जारः स्यात्तं चेद्द्विष्यादामपात्रेऽग्निमुपसमा-
धाय प्रतिलोमꣳशरबर्हिस्तीर्त्वा तस्मिन्नेताः शरमृष्टीः प्रतिलोमाः
सर्पिषाऽक्ता जुहुयान्मम सामिद्धेऽहौषीः प्राणापानौ त आददेऽ-
साविति मम सामिद्धेऽहौषीः पुत्रपशूꣳस्त आददेऽसाविति मम
समिद्धेऽहौषीरिष्टापूर्ते त आददेऽसाविति मम सामिद्धेऽहौषी-
राशापराशौ त आददेऽसाविति स वा एष निरिन्द्रियो विसु-
कृतोऽस्माल्लोकात्प्रैति यमेवंविदब्राह्मणः शपति तस्मादेवंविच्छो-
त्रियस्य दारेण नोपहासमिच्छेदुत ह्येवंवित्परो भवति ॥ १२
अथ यस्य जायामार्तवं विन्देत त्र्यहं कꣳसेन पिबेदहतवासा नैनां
वृषलो न वृषल्युपहन्यात्त्रिरात्रान्त आप्लुत्य व्रीहीनवघातयेत् ॥ १३
स य इच्छेत्पुत्रो मे शुक्लो जायेत वेदमनुब्रुवीत सर्वमायुरियादिति
क्षीरौदनं पाचयित्वा सर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवै ॥ १४
अथ य इच्छेत्पुत्रो मे कपिलः पिङ्गलो जायेत द्वौ वेदावनुब्रुवीत सर्वमायु-
रियादिति दध्योदनं पाचयित्वा सर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवै ॥ १५

अथ य इच्छेत्पुत्रो मे श्यामो लोहिताक्षो जायेत त्रीन्वेदाननुब्रुवीत सर्वमायुरियादित्युदौदनं पाचयित्वा सर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवै ॥ १६

अथ य इच्छेद्दुहिता मे पण्डिता जायेत सर्वमायुरियादिति तिलौदनं पाचयित्वा सर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवै ॥ १७

अथ य इच्छेत्पुत्रो मे पण्डितो विजिगीषः समितिंगमः शुश्रूषितां वाचं भाषिता जायेत सर्वान्वेदाननुब्रुवीत सर्वमायुरियादिति माꣳसौदनं पाचयित्वा सर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवा ऐक्षेण वाऽऽर्षभेण वा ॥ १८

अथाभिप्रातरेव स्थालीपाकावृताऽऽज्यं चेष्टित्वा स्थालीपाकस्योपघातं जुहोत्यग्नये स्वाहाऽनुमतये स्वाहा देवाय सवित्रे सत्यप्रसवाय स्वाहेति हुत्वोद्धृत्य प्राश्नाति प्राश्येतस्याः प्रयच्छति प्रक्षाल्य पाणी उदपात्रं पूरयित्वा तेनैनां त्रिरभ्युक्षत्युत्तिष्ठातो विश्वावसोऽन्यामिच्छ प्रपूर्व्यां सं जायां पत्या सहेति ॥ १९

अथैनामभिपद्यतेऽमोऽहमस्मि सा त्वꣳसा त्वमस्यमोऽहं सामाहमस्मि ऋक्त्वं द्यौरहं पृथिवी त्वं तावेहि सꣳरभावहै सह रेतो दधावहै पुꣳसे पुत्राय वित्तय इति २०

अथास्या ऊरू विहापयति विजिहीथां द्यावापृथिवी इति तस्यामर्थं निष्ठाय मुखेन मुखꣳ संधाय त्रिरेनामनुलोमामनुमार्ष्टि विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिꣳशतु । आसिञ्चतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते । गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि पृथुष्टके । गर्भं ते अश्विनौ देवावाधत्तां पुष्करस्रजौ ॥ २१

हिरण्मयी अरणी याभ्यां निर्मन्थतामश्विनौ । तं ते गर्भं हवामहे दशमे मासि सूतये । यथाऽग्निगर्भा पृथिवी यथा द्यौरिन्द्रेण गर्भिणी । वायुर्दिशां यथा गर्भ एवं गर्भं दधामि तेऽसाविति ॥ २२

सोष्यन्तीमद्भिरभ्युक्षति । यथा वायुः पुष्करिणीꣳसमिङ्गयति सर्वतः ॥ एवा ते गर्भ एजतु सहावैतु जरायुणा । इन्द्रस्यायं व्रजः कृतः सार्गलः सपरिश्रयः । तमिन्द्र निर्जहि गर्भेण सावराꣳ सहेति ॥ २३

जातेऽग्निमुपसमाधायाङ्क आधाय कꣳसे पृषदाज्यꣳसंनीय पृषदाज्यस्योपघातं जुहोत्यस्मिन्सहस्रं पुष्यासमेधमानः स्वे गृहे । अस्योपसन्द्यां मा च्छैत्सीत्प्रजया च पशुभिश्च स्वाहा । मयि प्राणाꣳ स्त्वयि

मनसा जहोमि स्वाहा । यत्कर्मणाऽत्यरीरिचं यद्वा न्यूनमिहाकरम् अग्निष्टत्स्विष्टकृद्विद्वान्स्विष्टꣳ सुहुतं करोतु नः स्वाहेति ॥ २४
अथास्य दक्षिणं कर्णमभिनिधाय वाग्वागिति त्रिरथ दधि मधु घृतꣳ संनीयानन्तर्हितेन जातरूपेण प्राशयति भूस्ते दधामि भुवस्ते दधामि स्वस्ते दधामि भूर्भुवः स्वः सर्वं त्वयि दधामीति ॥ २५
अथास्य नाम करोति वेदोऽसीति तद्गुह्यमेव नाम भवति ॥२६

अथैनं मात्रे प्रदाय स्तनं प्रयच्छति यस्ते स्तनः शशयो
यो मयोभूर्यो रत्नधा वसुविद्यः सुदत्रः । येन विश्वा
पुष्यसि वार्याणि सरस्वति तमिह धातवे करिति ॥२७

अथास्य मातरमभिमन्त्रयते । इल ऽसि मैत्रावरुणी वीरे वीरमजीजनत् । सा त्वं वीरवती भव याऽस्मान्वीरवतोऽकरदिति । तं वा एतमाहुरतिपिता बताभूरतिपितामहो बताभूः परमां बत काष्ठां प्रापच्छ्रिया यशसा ब्रह्मवर्चसेन य एवंविदो ब्राह्मणस्य पुत्रो जायत इति॥२८

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठाध्यायस्य चतुर्थं ब्राह्मणम् ॥ ४

—आतां समस्तप्रवचनाचा वंश सांगितला जातो. पूर्वीचे दोन वंश पुरुषविशेषित होते, आणि हा स्त्रीविशेषित कां ? उत्तर—स्त्रीप्राधान्यामुळें हा वंश स्त्रीविशेषित आहे. गुणवान् पुत्र होतो, असें प्रकरण चालू आहे. ह्मणून स्त्रीविशेषणानेंच पुत्रविशेषण करून (आईच्या नांवांवरूनच पुत्रांना विशेषित करून) येथें आचार्यपरंपरा सांगितली जाते—

अथ वꣳशः । पौतिमाषीपुत्रः कात्यायनीपुत्रात्कात्यायनीपुत्रो गौतमीपुत्राद्गौतमीपुत्रो भारद्वाजीपुत्राद्भारद्वाजीपुत्रः पाराशरीपुत्रात्पाराशरीपुत्र औपस्वस्तीपुत्रादौपस्वस्तीपुत्रः पाराशरीपुत्रात्पाराशरीपुत्रः कात्यायनीपुत्रात्कात्यायनीपुत्रः कौशिकीपुत्रात्कौशिकीपुत्र आलम्बीपुत्राच्च वैयाघ्रपदीपुत्राच्च वैयाघ्रपदीपुत्रः कण्वीपुत्राच्च कापीपुत्राच्च कापीपुत्रः ॥१

अर्थ—आतां वंश—पौतिमाषीपुत्र कात्यायनीपुत्रापासून, कात्यायनीपुत्र गौतमीपुत्रापासून, गौतमीपुत्र भारद्वाजीपुत्रापासून, भारद्वाजीपुत्र पाराशरीपुत्रापासून, पाराशरीपुत्र औपस्वस्तीपुत्रापासून, औपस्वस्तीपुत्र पाराशरीपुत्रापासून, पाराशरीपुत्र कात्यायनीपुत्रापासून, कात्यायनीपुत्र कौशिकीपुत्रापासून, कौशिकीपुत्र

आलम्बीपुत्रापासून व वैयाघ्रपदीपुत्रापासून, वैयाघ्रपदीपुत्र काण्वीपुत्रापासून व कापीपुत्रापासून, कापीपुत्र (आत्रेयीपुत्रापासून असा पुढें संबंध.) १.

आत्रेयीपुत्रादात्रेयीपुत्रो गौतमीपुत्राद्गौतमीपुत्रो भारद्वाजीपुत्राद्भारद्वारजीपुत्रः पाराशरीपुत्रात्पाराशरीपुत्रो वात्सीपुत्राद्वात्सीपुत्रः पाराशरीपुत्रात्पाराशरीपुत्रो वार्कारुणीपुत्राद्वार्कारुणीपुत्रो वार्कारुणीपुत्राद्वार्कारुणीपुत्र आर्तभागीपुत्रादार्तभागीपुत्रः शौङ्गीपुत्राच्छौङ्गीपुत्रः सांकृतीपुत्रात्सांकृतीपुत्र आलम्बायनीपुत्रादालम्बायनीपुत्र आलम्बीपुत्रादालम्बीपुत्रो जायन्तीपुत्राज्जायन्तीपुत्रो माण्डूकायनीपुत्रान्माण्डूकायनीपुत्रो माण्डूकीपुत्रान्माण्डूकीपुत्रः शाण्डिलीपुत्राच्छाण्डिलीपुत्रो राथीतरीपुत्राद्राथीतरीपुत्रो भालुकीपुत्राद्भालुकीपुत्रः क्रौञ्चिकीपुत्राभ्यां क्रौञ्चिकीपुत्रौ वैदभृतीपुत्राद्वैदभृतीपुत्रः कार्शकेयीपुत्रात्कार्शकेयीपुत्रः प्राचीनयोगीपुत्रात्प्राचीनयोगीपुत्रः सांजीवीपुत्रात्सांजीवीपुत्रः प्राश्नीपुत्रादासुरिवासिनः प्राश्नीपुत्रः आसुरायणादासुरायण आसुरेरासुरिः ॥ २

अर्थ—(कापीपुत्र) आत्रेयीपुत्रापासून, आत्रेयीपुत्र गौतमीपुत्रापासून, गौतमीपुत्र भारद्वाजीपुत्रापासून, भारद्वाजीपुत्र पाराशरीपुत्रापासून, पाराशरीपुत्र वात्सीपुत्रापासून, वात्सीपुत्र पाराशरीपुत्रापासून, पाराशरीपुत्र वार्कारुणीपुत्रापासून, वार्कारुणीपुत्र वार्कारुणीपुत्रापासून वार्कारुणीपुत्र आर्तभागीपुत्रापासून आर्तभागीपुत्र शौंगीपुत्रापासून, शौंगीपुत्र सांकृतीपुत्रापासून, सांकृतीपुत्र आलंबायनीपुत्रापासून, आलंबायनीपुत्र आलंबीपुत्रापासून, आलंबीपुत्र जायन्तीपुत्रापासून, जायन्तीपुत्र माण्डूकायनीपुत्रापासून, माण्डूकायनीपुत्र माण्डूकीपुत्रापासून, माण्डूकीपुत्र शाण्डिलीपुत्रापासून, शाण्डिलीपुत्र राथीतरीपुत्रापासून राथीतरीपुत्र, भालुकीपुत्रापासून, भालुकीपुत्र दोघां क्रौंचिकीपुत्रांपासून, दोघे क्रौंचिकीपुत्र वैदभृतीपुत्रापासून, वैदभृतीपुत्र कार्शकेयीपुत्रापासून, कार्शकेयीपुत्र प्राचीनयोगीपुत्रापासून, प्राचीनयोगीपुत्र सांजीवीपुत्रापासून, सांजीवीपुत्र आसुरिवासी प्राश्नीपुत्रापासून, प्राश्नीपुत्र आसुरायणापासून, आसुरायण आसुरीपासून, आसुरि (याज्ञवल्क्यापासून असा याचा पुढें संबंध.) २

याज्ञवल्क्याद्याज्ञवल्क्य उद्दालकादुद्दालकोऽरुणादरुण उपवेशेरुपवेशिः कुश्रेः कुश्रिर्वाजश्रवसो वाजश्रवा जिह्वावतो बाध्योगाज्जिह्वावान्बाध्योगोऽसिताद्वार्षगणादसितो वार्षगणो हरितात्कश्यपाद्धरितः कश्यपः शिल्पात्कश्यपाच्छिल्पः कश्यपः कश्यपान्नैध्रुवेः कश्यपो नैध्रुविर्वाचो वाग्भिण्या अम्भिण्यादित्यादादित्यानीमानि शुक्लानि यजूंषि वाजसनेयेन याज्ञवल्क्येनाऽऽख्यायन्ते ॥ ३

अर्थ—(आसुरि) याज्ञवल्क्यापासून, याज्ञवल्क्य उद्दालकापासून, उद्दालक अरुणापासून, अरुण उपवेशीपासून, उपवेशि कुश्रीपासून कुश्रि वाजश्रवापासून, वाजश्रवा जिह्वावतापासून, जिह्वावान् बाध्योगापासून, बाध्योग वार्षगण असितापासून, वार्षगण असित हरितकश्यपापासून, हरितकश्यप शिल्पापासून, शिल्प कश्यपापासून, कश्यप कश्यपनैध्रुवीपासून, कश्यपनैध्रुवि वाक्पासून, वाक् अंभिणीपासून, अंभिणी आदित्यापासून, आदित्यानें सांगितलेलीं हीं शुक्ल यजुर्वेद याज्ञवल्क्यापासून प्रकट केली जातात. ३.

समानमा सांजीवीपुत्रात्सांजीवीपुत्रो माण्डूकायनेर्माण्डुकायनिर्माण्डव्यान्माण्डव्यः कौत्सात्कौत्सो माहित्थेर्माहित्थिर्वामकक्षायणाद्वामकक्षायणः शाण्डिल्याच्छाण्डिल्यो वात्स्याद्वात्स्यः कुश्रेः कुश्रिर्यज्ञवचसो राजस्तम्बायनाद्यज्ञवचा राजस्तम्बायनस्तुरात्कावषेयात्तुरः कावषेयः प्रजापतेः प्रजापतिर्ब्रह्मणो ब्रह्म स्वयंभु ब्रह्मणे नमः ४

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठाध्यायस्य पचमं ब्राह्मणम् ॥ ५

इति बृहदारण्यकोपनिषदि षष्ठोऽध्यायः ॥ ६

बृहदारण्यककर्मेणाष्टमोऽध्यायः ॥ ८

अर्थ—सांजीवीपुत्रापर्यंत सर्व वाजसनेयिशाखांमध्यें एकच वंश आहे. सांजीवीपुत्र मांडूकायनीपासून, मांडूकायनि मांडव्यापासून, मांडव्य कौत्सापासून, कौत्स माहित्थीपासून, माहित्थि वामकक्षायणापासून, वामकक्षायण शांडिल्यापासून, शांडिल्य वात्स्यापासून, वात्स्य कुश्रीपासून, कुश्रि यज्ञवचापासून, यज्ञवचा राजस्तंबायनापासून, राजस्तंबायन तुर कावषेयापासून, तुर कावषेय प्रजापतीपासून, प्रजापति ब्रह्मापासून, ब्रह्म स्वयंभु—नित्य आहे. त्या ब्रह्मास नमस्कार असो ४. (५) इति बृहदारण्यकाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

बृहदारण्यकोपनिषदाचें सिंहावलोकन.

बृहदारण्यक हें वाजसनेयिब्राह्मणोषनिषद् आहे. ईशावास्य हें याच शाखेचें संहितोपनिषद् आहे. कर्म व उपासना यांचें फल असा जो संसार त्याविषयीं विरक्त झालेल्या अधिकारी पुरुषाला ब्रह्मविद्येचा उपदेश करावा, ह्मणून याचा आरंभ आहे. पण तिच्या आरंभीं 'उषा वा अश्वस्य' इत्यादि दोन ब्राह्मण अश्वमेधविज्ञानाकरितां आहेत अश्वमेध हें सर्व कर्मांत श्रेष्ठ कर्म आहे. सर्व व्यापी हिरण्यगर्भाची प्राप्ति व एकदेशी हिरण्यगर्भाची प्राप्ति हें त्याचें फल आहे. तथापि ब्रह्मविद्येच्या आरंभीं त्याचा जो पाठ केला आहे तो सर्व कर्मांना संसार-विषयत्व आहे हें दाखविण्यासाठी आहे. पहिल्या ब्राह्मणांत उषा इत्यादि कालाच्या अवयवांमध्यें यज्ञिय अश्वाच्या शिरःप्रभृति अंगांची दृष्टि करावयास सांगितली आहे. नक्षत्रें मेघ इत्यादिकांच्या ठिकाणीं अस्थि, मांस इत्यादिकांची दृष्टि सांगितली आहे अश्वमेधांत अश्वाला मारण्याच्या पूर्वी व मागून जीं दोन 'महिमा' या नांवाचीं पात्रें विहित आहेत त्यांच्या ठिकाणी दिवसाची व रात्रीची दृष्टि करावयास सांगितली आहे. दुसऱ्या ब्राह्मणांत अश्वमेधोपयोगी अग्नीची उत्पत्ति अशी सांगितली आहे—या संसारांत पूर्वी कांहीं नव्हतें. मृत्यूनेंच हें सर्व आच्छादित करून सोडलें होतें. अशनाया म्ह० खाण्याची इच्छा हाच तो मृत्यु होय. त्यानें मनन करण्यासाठीं संकल्पानें अंतःकरण उत्पन्न केलें. तो आपलीच पूजा करीत राहिला. त्यापासून आप झालें. त्यावरील तरंग एकरूप झाले. तीच ही पृथ्वी होय. पण तिला उत्पन्न केल्यावर मृत्यु श्रान्त झाला. श्रान्त झालेल्या प्रजापतीपासून जें तेज निघालें तोच अग्नि होय. त्यानें आपल्याला अग्नि, सूर्य व वायु असें तीन प्रकारें विभागिलें. पूर्वादि दिशा हेच त्याचे शिरःप्रभृति अवयव आहेत. हा प्रजापतिरूप अग्नि आपांमध्यें प्रतिष्ठित आहे. त्याची अशी उपासना करणारा जेथें जातो तेथें प्रतिष्ठित होतो. त्यानें माझें दुसरें शरीर उत्पन्न व्हावें अशी इच्छा केली. पूर्वीच उत्पन्न झालेल्या मनानें तो वेदरूप द्वंद्वभावास प्राप्त झाला. वेदत्रयींत सांगितलेल्या सृष्टिक्रमाचें

अलोचन केलें. त्यानें जन्मान्तरकृत ज्ञानकर्मरूप बीज पाहिलें. जलाला उत्पन्न करून व त्यांत ज्ञानकर्मरूप बीजानें प्रवेश करून अंड्याच्या रूपानें तो गर्भभूत झाला. तो संवत्सराला उत्पन्न करणारा संवत्सराख्य प्रजापति झाला. त्यापूर्वी संवत्सर नव्हता. मृत्यूनें त्याला एक वर्षभर त्या जलांत धारण केलें. तें अंडें फुटलें. त्यांतून प्रथमशरीरी अग्नि–प्रजापति हा बालक झाला. तेव्हां अशनायेनें युक्त असलेल्या मृत्यूनें त्याला खाण्यासाठीं आपलें तोंड उघडलें. पण स्वाभाविक अविद्येनें भ्यालेल्या त्या कुमारानें 'भाण' असा शब्द केला. तीच वाक् झाली. तें पाहून मृत्यूनें मनांत असा विचार केला कीं, मीं याला जर मारलें तर माझें अन्न थोडें होईल. ह्मणून त्यानें वाक् व मन या युग्मापासून सर्व स्थावर-जंगम जगत् उत्पन्न केलें. त्यानें ज्याला ज्याला निर्माण केलें त्याला त्याला खाण्याचा निश्चय केला. त्यामुळेंच तो अशनायारूप मृत्यु अदिति आहे. कारण तो या सर्व सृष्टीचा भक्षक आहे. जो या मृत्यूचें अदितित्व जाणतो –त्याची सर्वभक्षक या दृष्टीनें उपासना करतो तो सर्वांचा भक्षक होतो. त्यानें मीं पुनः मोठा यज्ञ करावा अशी इच्छा केली. त्यामुळें तो श्रान्त झाला. त्यानें तप केलें तेव्हां श्रान्त व तप्त झालेल्या त्या मृत्यूपासून चक्षुरादि प्राण हेंच यश व तेंच वीर्य उत्पन्न झालें. प्राण शरीर सोडून गेले असतां प्रजापतीचें शरीर फुगूं लागलें म्ह० त्यांत विकार उत्पन्न झाला. तें अशुद्ध झालें. तथापि शरीरांतून निघालेल्याहि त्या प्रजापतीचें मन त्या शरीरांतच आसक्त होऊन राहिलें. त्यानें 'माझें शरीर यज्ञिय व्हावें व मीं या शरीरानें शरीरवान् व्हावें' अशी इच्छा केली. ज्याअर्थीं तें शरीर माझ्या वियोगानें यश व वीर्य यांनीं विरहित होऊन 'अश्वत्'–फुगलें त्याअर्थीं तो अश्व झाला. ज्याअर्थी तें शरीर मेध्य झालें त्याअर्थीं तेंच अश्वमेधाचें अश्वमेधत्व आहे. त्याच्या उपासकाला अश्वमेधाचें फल मिळतें. मोठ्या यज्ञाच्या इच्छेनें त्या प्रजापतीनें आपल्यालाच पशु कल्पून व त्याला निष्प्रतिबंध सोडलें आहे, अशी कल्पना करून एक संवत्सर पूर्ण होतांच स्वतःसाठीं त्याचें आलभन केलें. ह्मणजे त्याला प्रजापतिदेवताक कल्पून त्याची हिंसा केली. इतर पशूंनाहि देवतांच्या उद्देशानें मारलें. म्हणूनच आतांहि याज्ञिक यज्ञांत प्रजापति व देव यांना उद्देशून पशूचें आलभन करितात. हा जगाला प्रकाशित करणारा सूर्यच अश्वमेध आहे. त्या

यज्ञफलरूप अश्वमेधाचा संवत्सर हा आत्मा, अग्नि हा साधनभूत अर्क व तीन लोक हेच शरीरावयव आहेत. अग्नि व आदित्यच अर्क व अश्वमेध आहेत. ती एकच मृत्युदेवता आहे. अशा दृष्टीनें उपासना करणारा पुनर्मृत्यूला जिंकतो.(२)

प्रजापतीचीं अपत्यें देव व असुर ह्या० क्रमानें सद्वृत्ति व असद्वृत्ति अशीं दोन प्रकारचीं आहेत. त्यांतील स्वाभाविक वृत्तिरूप असुर पुष्कळ व प्रथम उत्पन्न झालेले असल्यामुळें तीं वडिल अपत्यें व सद्वृत्तिरूप देव शास्त्रीय ज्ञान-कर्मापासून मागून उत्पन्न होत असल्यामुळें व त्यांची संख्याहि थोडी असल्यामुळें ते कनिष्ठ. ते देवासुर परस्पर स्पर्धा करूं लागले. त्यांच्या त्या स्पर्धेंत यत्नसाध्यवृत्तिरूप देवांचा पराभव होऊन स्वाभाविक वृत्तिरूप असुरांचा विजय होऊं लागला. तेव्हां आम्ही यज्ञांतील उद्गीथाच्या योगानें या असुरांचें अतिक्रमण करूं, असा देवांनीं निश्चय केला. ते वाक्‌ला ' तूं आमच्यासाठीं उद्गान कर ' असें म्हणाले. वाक्-देवता यज्ञांत देवांसाठीं उद्गानकर्म करूं लागली. वाणीचा सर्व भोग देवांना प्राप्त व्हावा असें ती आगान करूं लागली. असुरांना तें कळलें. त्याबरोबर त्यांनीं तिला आसंगरूप पापानें वेध केला. त्यामुळें ती अननुरूप भाषण करूं लागली. त्याचप्रमाणें घ्राणेंद्रिय, चक्षु, श्रोत्र, मन यांना क्रमानें देवांनीं उद्गान करावयास सांगितलें व असुरांनीं त्यांना आसंगरूप पापानें वेधलें. त्यामुळें तीं सर्व इंद्रियें सत् व असत् अशा दोन्हीं विषयांचें ग्रहण करूं लागलीं. शेवटीं देवांनीं मुख्य प्राणाला उद्गान करावयास सांगितलें. तो उद्गातृकर्म करूं लागला. असुर त्यालाहि इतर इंद्रियदेवतांप्रमाणें आसंगरूप पापाचा वेध करावयास प्रवृत्त झाले. पण पाषाणावर फेंकलेल्या मातीच्या ढेंकळाप्रमाणें त्यांचा विध्वंस झाला. देवांचा विजय होऊन असुरांचा असा पराभव झाला. त्यामुळें जो कोणी मुख्य प्राणाची उपासना करतो त्याला शत्रुविनाश हें फल प्राप्त होतें. या प्राणदेवतेपासून आसंगरूप मृत्यु दूर रहातो. प्राणानें वागादिदेवतांच्या पापाला—मृत्यूला नाहींसें करून त्यापासून दूर घालविलें. त्यानें वागादिकांना अग्न्यादि देवताभावास पोंचविलें, याप्रमाणें प्राणोपासना करणारालाहि मृत्यूचें अतिक्रमण हें फल प्राप्त होतें. त्या मुख्य प्राणानें स्वतःसाठीं अन्न संपादन केलें. कारण अन्नभक्षक तोच आहे. प्राण अन्नांत प्रतिष्ठित आहे. तेव्हां अग्न्यादि देव प्राणाला म्हणाले—" तूं सर्व अन्न आपल्या-

साठींच संपादन केलें आहेस ! आम्हांलाहि त्यांतील कांहीं भाग दे." तें ऐकून प्राणानें त्यांना आपल्यामध्यें प्रवेश करावयास सांगितलें. वागादि इंद्रियांच्या अग्न्यादि देवांनींहि प्राणांत प्रवेश केला. त्यामुळेंच प्राणाच्या योगानें जें अन्न खाल्लें जातें त्या अन्नानें देवता तृप्त होतात. अशा रीतीनें प्राणोपासना करणारा उपासकहि आपल्या ज्ञातिजनांचा भर्ता—पोषक, त्यांच्यामध्यें श्रेष्ठ, त्यांचा अग्रगामी, अन्नाद व अधिपति होतो. प्राणोपासकाशी जो विरोध करतो तो स्वकीयांचें पोषण करूं शकत नाहीं. पण प्राणोपासकाच्या अनुरोधानें जो वागतो तो स्वकीयांचें पोषण करण्यास समर्थ होतो. तो प्राण शरीरेंद्रियांचा जसा आत्मा आहे तसाच सर्व अंगांचा रस—सार आहे. तो ज्या शरीरावयवापासून उत्क्रान्त होतो तें अंग सुकतें. त्यामुळेंच तो आंगिरस ह्म० अंगांचा रस. तो शरीर व इंद्रियें यांचाच ह्म० रूप व कर्म यांचाच आत्मा आहे, असें नाहीं, तर ऋग्वेदादि नामाचाहि आत्मा आहे, वाक् बृहती म्ह० मोठी होय. तिचा हा पति म्हणून बृहस्पति. प्राण हाच ब्रह्माचा म्ह० यजूषांचा पति आहे. म्हणून ब्रह्मणस्पति. हाच साम आहे. कारण तो कीट, पशु, पतंग इत्यादि सर्व प्राण्यांशीं व सर्व लोकांशीं सम आहे ह्मणून तो साम आहे. या सामाख्य प्राणाची जो उपासना करितो त्याला सालोक्य व सायुज्य प्राप्त होतें. हा प्राण उद्गीथहि आहे. कारण प्राणाकडूनच हें सर्व धारण केलें जातें. वागादिक उद्गीथदेवता नव्हेत, ही गोष्ट ब्रह्मदत्तानें प्रतिज्ञेनें सांगितली आहे. सामाचें स्वर हेंच धन आहे. म्हणून यज्ञांत सुस्वरसंपन्न उद्गात्याला पहाण्याची इच्छा करितात. इत्यादि प्रकारें तिसऱ्या ब्राह्मणांत उद्गीथप्राणाचीच उपासना सविस्तर व सफल सांगितली आहे. (३.)

समुच्चित ज्ञानकर्म व केवल प्राणोपासना यांचें प्रजापतित्वप्राप्ति हें फल आहे; पण तेंहि संसारांतच अन्तर्भूत होतें. विरक्तालाच ब्रह्मविद्येचा अधिकार आहे. यास्तव साध्य-साधनरूप संसारांतील दोष दाखवून त्याविषयीं वैराग्य उत्पन्न करावें म्हणून चवथ्या ब्राह्मणांत ज्ञानकर्माच्या फलाचा उत्कर्ष विवक्षित आहे. पूर्वीं म्ह० दुसऱ्या कोणत्याहि शरीराची उत्पत्ति जेव्हां झाली नव्हती तेव्हां हा पुरुषाकार प्रथमशरीरी प्रजापतिच हें सर्व होतें. त्यानें 'मी कोण व कसा आहें' याचा विचार केला. पण त्याला आपल्या शरीरेंद्रियाहून दुसरें कांहीं

दिसलें नाहीं. ह्मणून तो 'मी आहें' असें बोलला. त्यामुळें तो 'मी' याच नांवाचा झाला. ह्मणूनच व्यवहारांतहि अद्यापि 'कोण आहे' असें कोणीं कोणाला विचारलें असतां 'मी आहें' असें तो प्रथम उत्तर देतो व मग आपलें नांव सांगतो. याप्रमाणें उपासनेसाठीं प्रजापतीचें 'अहं' हें नांव सांगून आतां त्याच्या 'पुरुष' या नांवाची व्युत्पत्ति सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—पूर्वजन्मांतील साधकावस्थेंत कर्मादि-अनुष्ठान व 'मी' अशी भावना यांच्या योगानें प्रजापतित्वप्राप्तीची इच्छा करणाऱ्या इतर सर्व साधकांमध्यें मुख्य होऊन आपल्या प्रजापतित्वप्राप्तीला प्रतिबंध करणाऱ्या आसंग, अज्ञान इत्यादि सर्व पापाला सम्यक् कर्मादि अनुष्ठानांनीं जाळल्यामुळें तो पुरुषसंज्ञक झाला. याच्या उपासकालाहि असेंच फल प्राप्त होतें. तो प्रजापति भ्याला. ह्मणूनच अद्यापिहि व्यवहारांत एकाकी मनुष्य भितो. पण त्या प्रजापतीनें असा विचार केला कीं, 'माझ्याहून भिन्न वस्तूच जर नाही तर मी कोणाला भीत आहें?' एवढा विचार केल्यानेंच त्याची भीति नाहीशी झाली. कारण नेहमीं दुसऱ्या वस्तूपासून भीति उद्भवते. तसाच तो रममाण होईना, एकाकी असलेल्या त्याला करमेना. ह्मणूनच आतांहि एकट्या मनुष्याला करमत नाही. प्रजापति दुसऱ्या सहकारीची इच्छा करूं लागला. त्यानें परस्परांना दृढ आलिंगन दिलेल्या स्त्रीपुरुषांप्रमाणें स्वतःला केलें. तेंच मनु व शतरूपा हें दांपत्य होय. याप्रमाणें पति व पत्नी हे एकाच शरीराचे दोन भाग आहेत. त्यामुळें स्त्रीपरिग्रह करण्यापूर्वी पुरुष अपूर्ण असतो. शिंप, पावटा, हरभरा, या द्विदल पदार्थांतील एका दलाप्रमाणें तो असतो. विवाहानंतर तो पूर्ण होतो. असो, मनु शतरूपा भार्येशीं ग्राम्यधर्मानें संयुक्त होऊं लागला. पण शतरूपा 'मी याची कन्या असून हा असें अवाच्य कर्म करण्यास कसा प्रवृत्त होत आहे' असें म्हणून स्वतःचें रूप सोडून क्रमानें गाय, घोडी, बकरी, वगैरे झाली. मनुहि तिच्यासारखाच बैल, घोडा, बकरा वगैरे होऊन तिच्या ठिकाणी त्या त्या जातीची प्रजा उत्पन्न करता झाला. याप्रमाणें हें सर्व कीट-पतंग-पिपीलिकान्त प्राणिजात उत्पन्न झालें. प्रजापतीची भीति, अरति, कामप्राप्ति इत्यादि हाच सर्व संसार आहे. त्यावरूनच प्राजापत्यस्थानहि संसारांतच अन्तर्भूत होतें, हें सिद्ध होतें. त्या जगत्स्रष्ट्याला 'मीच ही सृष्टि आहें. कारण हा सर्व माझाच

मिथ्या परिणाम–विवर्त आहे,' असें ज्ञान झालें. तशी उपासना करणाराहि सृष्टिकर्ता होतो. त्यानें अग्नि, सोम, इंद्र इत्यादि सर्व अनुग्राहक सृष्टि उत्पन्न केली. पूर्वोक्त प्राणिजात ही अनुग्राह्य सृष्टि आहे. कारण त्यावर अग्न्यादि देव अनुग्रह करितात. त्या देवांची सृष्टि ही अतिसृष्टि आहे. कारण तें उत्कृष्ट ज्ञान-कर्मांचें फल आहे.

हें सर्व व्याकृत–व्यक्त जगत् आहे. त्यानंतर सबीजसंसारांतून उद्धार करण्यासाठीं श्रुतीनें जगाची बीजभूत अव्याकृत अवस्था सांगितली आहे–हें व्यक्त जगत् त्याच्या उत्पत्तीपूर्वीं अव्याकृत होतें म्ह० त्याचें नाम-रूप व्यक्त नव्हतें. निजलेला मनुष्य जसा जागा होतो त्याप्रमाणें तें अव्याकृतच नाम-रूपांनीं व्यक्त झालें. त्या व्यक्त नाम-रूपांत परमात्मा प्रतिबिंबाप्रमाणें नखशिखान्त प्रविष्ट झाला. काष्ठादिकांत जसा अग्नि त्याप्रमाणें तो आब्रह्मस्तंभपर्यंत सृष्टींत सामान्यतः व्यापून राहिला. तोच चक्षुः-श्रोत्रादि नाड्यांमध्यें राहून दर्शन-श्रवणादि कर्मांमुळें द्रष्टा, श्रोता वगैरे होतो. यास्तव तीं सर्व त्याचीं कर्मनामें–त्या त्या कर्मामुळें प्राप्त होणारीं नांवें आहेत. तीं तीं कर्में करतांना तो जणुकाय परिच्छिन्न झालेला असतो. त्यामुळें जो त्याला प्राण, द्रष्टा, श्रोता, मन्ता इत्यादि एकदेशी रूपानेंच जाणतो त्याला त्याच्या पूर्ण स्वरूपाचें ज्ञान होत नाहीं. कारण एकेका क्रियेमुळें तो त्यावेळीं अपूर्णच असतो. यास्तव त्याची 'आत्मा' अशीच उपासना करावी. कारण त्या निरुपाधिक आत्म्यामध्यें प्राणादि सर्व उपाधिकृत विशेष एकत्वास प्राप्त होतात. म्हणून आत्माच ज्ञातव्य आहे. अनात्मा नाहीं. आत्माच सर्वांचें प्राप्तव्य स्थान आहे. सांडलेल्या गायीला तिच्या पावलांवरून जसें शोधून काढतात त्याचप्रमाणें आत्म्याच्या योगानेंच पुरुष सर्व दृश्यजात जाणतो. आत्मोपासकाची मोठी ख्याति होते व तो इष्ट जनांनीं युक्त होतो. आत्माच पुत्र, वित्त इत्यादि सर्व प्रिय पदार्थांहून अधिक प्रिय आहे. कारण तेंच तत्त्व स्वरूपाशीं अगदीं समीप–स्वरूपच आहे. अनात्म्याला प्रिय म्हणणाऱ्या मूढ पुरुषाला आत्मज्ञानें 'तुझें प्रिय विनाश पावेल' असें म्हणावें. कारण ज्ञानसामर्थ्यानें तो तसें बोलण्यास समर्थच असतो व त्याच्या म्हणण्याप्रमाणें घडूनहि येतें. यास्तव प्रिय आत्म्याची उपासना करावी. आत्मोपासकाचें प्राणादि प्रिय अत्यंत विनाशशील होत नाहीं.

आत्म्याचीच उपासना करावी या वाक्यानें ब्रह्मविद्या सूत्ररूपानें सांगितली. आतां तिचेंच व्याख्यान करण्यासाठीं श्रुति म्हणते—नित्य निरतिशय श्रेयाला प्राप्त होण्याची इच्छा करणारे ब्राह्मण म्हणतात—'ब्रह्मविद्येनें आम्ही सर्व होऊं' असें जें मनुष्य समजत असतात तें काय आहे ? ज्याच्या विज्ञानानें ब्रह्म सर्व होतें तें ब्रह्म आत्मस्वरूप आहे कीं त्याहून भिन्न आहे म्हणजे ज्ञानानें प्राप्त होणारी सर्वभावप्राप्ति पूर्वीं विद्यमानच असून ज्ञानानें केवल अभिव्यक्त होते किं ती नवीनच उत्पन्न होते ? जर ब्रह्म कांहीं जाणूनच सर्व झालें तर त्यानें काय जाणलें व तें सर्व झालें ? उत्तर—पूर्वीं हें सर्व ब्रह्मच होतें. त्यानें आपल्यालाच जाणलें.' मी ब्रह्म आहें'असें जाणण्यामुळें तें सर्व झालें. या ब्रह्मविद्येचा अधिकार एकट्या मनुष्यालाच आहे असें नाहीं, तर देव, ऋषि मनुष्य यांतील जो जो कोणी आत्म्याला जाणतो, तो तो सर्वात्मक ब्रह्म होतो. ब्रह्मच आत्मा आहे असें जाणणाऱ्या वामदेवाला ' मी मनु व सूर्य झालों ' असें ज्ञान झालें. आतां वर्तमानसमयीहि जो कोणी ' मी ब्रह्म आहें ' असें जाणील तो हें सर्व होईल. त्याच्या या सर्वात्मभावाला विघ्न करण्यास देवहि समर्थ नसतात. कारण तो ब्रह्मवेत्ता देवांचाहि आत्मा होतो.

याप्रमाणें सोपपत्तिक विद्यासूत्र सांगून श्रुति अविद्यासूत्र सांगते—पण जो कोणी अब्रह्मवेत्ता स्वतःला कर्ता मानून स्वभिन्न देवता आपलें उपास्य आहे, असें समजतो तो भेददृष्टीनें उपासना करणारा आपलें व त्या उपास्य देवतेचेंहि तत्त्व जाणत नाहीं. तो केवल अविद्वानच असतो, इतकच नव्हे तर पशूसारखा देवांचा किंकर होतो. गाय, बैल इत्यादि पशू आमच्या जसे उपयोगी असतात त्याप्रमाणें तो अविद्वान् देवांतील प्रत्येक देवाच्या अनेक प्रकारें उपयोगी पडतो. लौकिक पशु मनुष्याच्या उपभोगाचें साधन जसे होतात त्याप्रमाणें अनेक पशूंच्या स्थानीं असलेला हा कर्मठ पुरुष देव, ऋषि, पितर यांच्या उपभोगाचें साधन होतो. त्यामुळेंच मनुष्यानें या पशुभावापासून निवृत्त व्हावें, हें देवांना आवडत नाहीं. मनुष्याच्या अनेक पशूंतील एखाद्या पशूलाहि व्याघ्रादि हिंस्र प्राण्यानें मारल्यास त्याला जसें फार दुःख होतें त्याप्रमाणें अनेक पशूंच्या स्थानीं असलेला कर्मठ ज्ञानमार्गाला लागल्यास देवांना वाईट वाटतें. त्यामुळेंच मनुष्यांना ब्रह्मतत्त्वज्ञान व्हावें हें देवांना आवडत नाहीं.

विद्येप्रमाणेंच येथें अविद्याहि सूत्रित केली आहे. येथून पुढें प्रथमाध्यायाच्या समाप्तीपर्यंत तिचाच विस्तार केला आहे. वर अनुग्राहक देवतांची सृष्टि सांगण्यास आरंभ करून त्यांत अग्नीचीच उत्पत्ति सांगितली. इंद्रादिकांची सांगितली नाहीं. ती सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—पूर्वी एक ब्राह्मणजातिच होती. ती परिपालनादि विभूतियुक्त कर्म करण्यास समर्थ झाली नाहीं. म्हणून तिनें क्षत्रजाति उत्पन्न केली. इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य यम, मृत्यु, ईशान हें देवांतील क्षत्र आहे. क्षत्रजाति ब्राह्मणांचेंहि नियमन करणारी आहे. म्हणून ती श्रेष्ठ. त्यासाठींच राजसूयांत सिंहासनावर बसलेल्या क्षत्रियाची ब्राह्मण खालीं उभा राहून उपासना करितो. 'हे राजन्, तूं ब्रह्म आहेस' असें म्हणून तो आपलें यश त्याला देतो. तथापि ब्राह्मणाची योग्यता त्याहून अधिक आहे. कारण ब्राह्मण हें क्षत्रियाचें उत्पत्तिकारण आहे. म्हणून राजसूयांतील अभिषेकसमयीं क्षत्रिय ब्रह्मत्वगुणाला पात्र जरी होत असला तरी तें कर्म संपतांच तो आपल्या उत्पत्तिकारणाचा—पुरोहिताचा आश्रय करितो. क्षत्रियानें बलाभिमानानें वगैरे ब्राह्मणाला पीडा दिल्यास त्याला मोठा दोष लागतो. असो; त्यानंतर ब्राह्मणाभिमानिनी अग्निदेवतेनें कर्मांगभूत द्रव्य संपादन करण्यासाठीं वैश्य व परिचर्येसाठीं शूद्र वर्ण, यांना उत्पन्न केलें. आठ वसु, एकादश रुद्र, बारा आदित्य इत्यादि गणदेवता हाच देवांतील वैश्यवर्ण व पूषा हा देवशूद्र आहे. पृथ्वीच पूषा आहे. कारण ती सर्व प्राणिजातांचें पोषण करिते. क्षत्रियजाति अतिशय उग्र असल्यामुळें तिचेंहि नियमन करण्यासाठीं धर्माला उत्पन्न केलें. धर्म क्षत्रियाचेंहि नियमन करतो. यास्तव धर्म सर्वांत श्रेष्ठ आहे. राजाच्या आश्रयानें एखादा दुर्बलहि बलवानाशीं जसा स्पर्धा करूं शकतो त्याप्रमाणें धर्माच्या बलानें एखादा हीनहि उत्तमाचें नियमन करितो. सत्य हाच धर्म आहे. सत्यच धर्म असल्यामुळें यथाशास्त्र सत्य बोलणाराला हा धर्म बोलत आहे व धर्म सांगणाराला हा सत्य सांगत आहे, असें म्हणतात. अग्न्यादि, इंद्रादि, वस्वादि व पूषा या देवांतील चातुर्वर्ण्यापासून मनुष्यांतील चातुर्वर्ण्य झालें. देवांमध्यें अग्नि व मनुष्यांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ असल्यामुळेंच देवांच्या अधीन असलेलें फल जेव्हां साधावयाचें असतें तेव्हां अग्निसंबंधी कर्म करावें व मनुष्याधीन फल साध्य असल्यास ब्राह्मणसंबंधी कर्म करावें. कित्येक अग्न्यादिसाध्य कर्मानें मोक्ष

मिळविण्याची इच्छा करितात पण तें बरोबर नाहीं, असें श्रुति सांगते–जो कोणी या परमात्मसंज्ञक लोकाला ' मी ब्रह्म–परमात्मा आहें ' अशा रीतीनें न जाणतां मरतो त्याचें–तो अज्ञात परमात्मा शोक-मोहादि संसारदोषांचें निवारण करून–रक्षण करीत नाहीं. अनधीत वेद किंवा न केलेलें कोणतेंहि कर्म मनुष्याला आपापलें फल जसें देत नाहीं त्याचप्रमाणें परमात्म्याला न जाणणाराला ज्ञानफल प्राप्त होत नाहीं. अनात्मज्ञानें अश्वमेधासारखें फार मोठें पुण्य कर्म सतत जरी केलें तरी तें शेवटीं फलभोगानें क्षयच पावतें. स्वप्नांतील विभूतीप्रमाणें तें कृतक–कर्मजन्य असल्यामुळें क्षीण होतें. यास्तव सर्व अनात्मदृष्टीचा परिहार करून प्रत्यग्-ब्रह्मैकत्वरूप आत्मलोकाचेंच निरंतर अनुसंधान करावें. आत्म्याचेंच निरंतर चिंतन करणाऱ्या आत्मोपासकाचें कर्म क्षीण होत नाहीं. तो ज्याची ज्याची इच्छा करितो तें तें त्याला आत्म्यापासूनच प्राप्त होतें.

याप्रमाणें उपोद्घातप्रसंगानें प्राप्त झालेलें विद्वानाचें स्वातंत्र्य सांगून अविद्वान् पशूप्रमाणें कोणकोणत्या कर्मानें कोणा-कोणाच्या कसा उपयोगी पडतो तें प्रकृत विषयाला अनुसरून श्रुति सांगते-हा अविद्वान् कर्माधिकारी गृहस्थ देवांपासून पिपीलिकेपर्यंत सर्वप्राण्यांचा विहित वर्णाश्रमादिकर्माच्या योगानें उपभोग्य–सुखोपकरण होतो. तो जें हवन–होम-यागादि करितो त्यानें देवांचा, जो प्रत्यहीं वेदाध्ययनरूप स्वाध्याय करितो त्यानें ऋषींचा, पिंडोदकदानादिकांनीं व प्रजोत्पादनानें पितरांचा, अन्न, वस्त्र, वसतिस्थान, दान, यांच्या योगानें मनुष्यांचा, तृणोदकांच्या योगानें पशूंचा, घरांत पडलेल्या धान्यकणादिकांच्या योगानें वैगरे इतर श्वापदें, किड-मुंगी इत्यादिकांचा उपभोग्य होतो. म्ह० देवादि सर्वांचा तो ऋणी असतो व ते सर्व त्याच्यावर उपजीविका करितात. त्यामुळें प्राणी आपल्या शरीराचा विनाश जसा इच्छीत नाहींत त्याचप्रमाणें ते त्या आपल्या उपकारक गृहस्थाचाहि विनाश इच्छीत नाहींत. पंचमहायज्ञप्रकरणांत गृहस्थाच्या या कर्तव्याचाच विचार केला आहे. 'पण प्रवृत्ति व निवृत्ति असे हे दोन्ही मार्ग जर ब्रह्माचाऱ्याला एकसारखेच प्राप्त आहेत तर तो दुःखात्मक प्रवृत्तिमार्गांतच स्वेच्छेनें कां प्रवृत्त होतो ?' म्हणून विचाराल तर श्रुति म्हणते–काम त्याला प्रवृत्तिमार्गांतच नियुक्त करितो. एखादा भूताविष्ट मनुष्य अवश होऊन स्वतःचेंच अहित जसें करितो त्याप्रमाणेंच हा कामाविष्ट ब्रह्मचारी

स्वात्मलोकापासून बहिर्मुख होऊन प्रवृत्तिमार्गांत पडतो. तो स्वाभाविक अविद्यावशात् मला कर्मांगभूत जाया असावी, अशी इच्छा करितो. पुत्रसाधनभूत पत्नी प्राप्त झाल्यावर मी आतां पुत्ररूपानें उत्पन्न व्हावें, अशी इच्छा करितो. त्यानंतर कर्माचें साधन असें जें दोनप्रकारचें—देवता ज्ञान व गाय, गृह, क्षेत्र इत्यादि दैव-मानुष वित्त तें मला असावें, असें इच्छितो. हें दोन्ही प्रकारचें वित्त प्राप्त झाल्यावर मी आतां नित्य-नैमित्तिक-काम्य कर्म करावें, असें त्याच्या मनांत येतें. जाया, पुत्र, वित्त व कर्म हा एवढाच सर्व काम आहे. म्ह० इच्छा करण्यास योग्य असें हें एवढेंच आहे. मनुष्य याच्या पलीकडे कांहीं इच्छीत नाहीं. मनुष्याला फलाविषयींहि इच्छा असते. पण ती या साधनेच्छेंत अन्तर्भूत होते. म्हणून काम कायतो हा एवढाच, असें येथें अवधारण केलें आहे. असो, त्या एकाकी असलेल्या ब्रह्मचाऱ्यानें याप्रमाणें क्रमानें जायादि साधनांची इच्छा केल्यावर त्यांतील एखादें साधनहि जरी न मिळालें तरी तो आपल्याला अपूर्ण समजतो. ही काममूलक प्रवृत्ति प्रजापतीपासून सुरू झाली आहे. त्यामुळें ती जगाच्या प्रलयापर्यंत तशीच राहणार. अर्थात् 'एषणा-'संज्ञक काम हेंच कर्ममार्गप्रवृत्तीचें निमित्त आहे. असो, याप्रमाणें इच्छा करूनहि जेव्हां तो सर्व साधनसंपन्न होत नाहीं, तेव्हां त्यानें मनालाच आत्मा—कर्ता गृहस्थ, मनाच्या इच्छेप्रमाणें वागणारी वाक् ही पत्नी, त्यांपासून होणारा प्राण प्रजा, दर्शनकर्मयुक्त चक्षु हें गाय, धन इत्यादिरूप मानुषवित्त, श्रवणकर्म करणारें श्रोत्र हें शब्दज्ञानोत्पादक दैववित्त व कर्म करणारें शरीरच कर्म आहे, अशी कल्पना करून पूर्णत्व संपादन करावें. हा पांक्त म्ह० कर्ता, जाया, प्रजा, वित्त व कर्म या पांच पदार्थांनीं निष्पन्न होणारा दर्शनात्मक—कल्पनात्मक यज्ञ आहे. पशुसाध्य बाह्य यज्ञहि पांक्त—पांच पदार्थांनीं होणारा आहे. पुरुषहि पांक्त आहे. फार काय पण पंचभूतात्मक हिरण्यगर्भसंबंधी जगत्हि पांक्त आहे. याप्रमाणें कर्मसाधन-फलात्मक असलेलें हें सर्व पांक्तच आहे. मी पांक्त यज्ञ आहें, असें जाणणारा—असें चिंतन करणारा या सर्व जगाला आत्मत्वानें प्राप्त होतो. (४)

याप्रमाणें कामप्रयुक्त—कामप्रेरित गृहस्थानें किंवा अगृहस्थानें पांक्त ज्ञानकर्माच्या योगानें किंवा केवल ज्ञानानें—उपासनेनें उत्पन्न केलेल्या व भोग्यरूप असल्यामुळें अन्नात्मक अशा या जगाचें, सात प्रकारें विभाग करून, निरूपण

करण्यासाठीं हें पांचवें ब्राह्मण प्रवृत्त झालें आहे—ज्ञान-कर्माधिकारी क्षेत्रज्ञ पित्यानें पांक्त उपासनेनें व तपानें म्ह० पांक्त कर्मानें जीं सात अन्नें उत्पन्न केलीं त्यांतील क्षुधेचें निवारण करणारें जें प्रसिद्ध अन्न तें सर्वप्राणिसाधारण आहे. हुत-प्रहुत म्ह० हवीचा त्याग व बलिहरण किंवा दर्श-पूर्णमास हीं दोन अन्नें देवांना दिलीं. दुग्ध हें चवथें अन्न पशूंना दिलें मनुष्यें व पशु प्रथम त्यावर उपजीविका करितात. चराचर सर्व जगत् या चवथ्या अन्नांत प्रतिष्ठित आहे. भोक्ता पुरुषच त्या अन्नाच्या अक्षयाचें कारण आहे. पूर्वोक्त अन्न भोक्त्याकडून नित्य भक्षण केलें जात असलें तरी तो त्या शरीरेंद्रियरूप—क्रियाफलात्मक सप्तविध अन्नाला पुनः पुनः उत्पन्न करितो. त्यामुळें त्याचा क्षय होत नाहीं. त्यानें त्याला जर वारंवार उत्पन्न केलें नसतें तर त्याचा क्षय झालाच असता. याच्या उपासकाला प्राधान्यानें अन्नभक्षण हें फल मिळतें. याप्रमाणें साधनभूत चार अन्नांचें व्याख्यान केल्यावर श्रुति फलभूत तीन अन्नांचें व्याख्यान करिते—मन, वाक् व प्राण हीं तीन अन्नें त्यानें स्वतःसाठीं केलीं. 'समोरच्या हत्तीला तूं पाहिलेंस का? व माझा शब्द तूं ऐकलास का?' असें कोणीं कोणाला विचारलें असतां 'माझें मन दुसरीकडे—अन्य विषयांत आसक्त—होतें, त्यामुळें मीं त्याला पाहिलें नाहीं व तुझा शब्दहि ऐकला नाहीं' असें तो सांगतो. त्यामुळें प्रत्येक जीव आत्मा ज्याचा साक्षी आहे अशा मनानेंच पाहतो, एकतो, वास घेतो. त्यावरून मनाचें अस्तित्व सिद्ध होतें. काम, संकल्प, संशय, श्रद्धा, अश्रद्धा इत्यादि हें सर्व मनच आहे. अशा अनेक प्रकारच्या वृत्ति हें त्याचें स्वरूप आहे. एखाद्यानें कोणाला मागून येऊन हाताचा, गुडघ्याचा वगैरे स्पर्श केल्यास तो नेत्रानें प्रत्यक्ष पाहिल्यावांचूनहि 'हा हाताचा स्पर्श आहे, हा गुडघ्याचा आहे' इत्यादि मनानेंच ओळखतो. त्यावरूनहि विवेकाचें साधन मन आहे, हें सिद्ध होतें. वर्णात्मक किंवा ध्वनिरूप असा सर्व शब्द वाक्-च आहे. ती प्रकाशमात्रस्वरूप आहे. त्यामुळें ती शब्दार्थज्ञानापर्यंत अनुवृत्त होते. तीच विषयाचा निर्णय करिते. ती दुसऱ्या कोणत्याहि अनात्म्याकडून प्रकाशित केली जात नाहीं. तर सर्व शब्दार्थाला प्रकाशित करिते. श्वासोच्छ्वासादि पंचवृत्तीनें युक्त असलेला प्राण शरीरांत भिन्न भिन्न क्रिया करीत रहातो. त्याचे प्राणापानादि पांच प्रकार आहेत. हा शरीरेंद्रियसंघात या तीन अन्नांचाच विकार

आहे. तो वाङ्मय, मनोमय, प्राणमय आहे. याप्रमाणें वागादिकांची शरीरांतील —आध्यात्मिक विभूति—विस्तार सांगून पुढें क्रमानें भूतांतील—आधिभौतिक व देवांतील—आधिदैविक विभूति सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—वाक्च हा लोक, ऋग्वेद, देव, माता व विज्ञात आहे, मनच अन्तरिक्षलोक, यजुर्वेद, पितर, पिता व विजिज्ञास्य आहे. प्राणच स्वर्गलोक, सामवेद, मनुष्य, प्रजा व अविज्ञात आहे. आधिदैविक वाक्चें पृथिवी हें शरीर—आधार आहे व अग्नि ज्योतीरूप—करणरूप आहे. मनाचें द्यौ हें शरीर व आदित्य ज्योतीरूप आहे. त्या आधिदैविक अग्नि-आदित्यांपासून व वाङ्-मनापासून प्राण—अन्तरिक्षांतील वायु कर्मासाठीं झाला. तोच परमेश्वर होय. तो प्रतिपक्षरहित आहे. त्याचा उपासकहि प्रतिपक्षरहित होतो. त्या अन्नरूप प्राणाचें आप हें शरीर आहे. चंद्र ज्योतीरूप आहे. हे सर्व वागादिक आधिदैविकरूपानें सर्व जगाला व्यापणारे व संसार विद्यमान असे पर्यंत विद्यमान असणारे असे आहेत त्यामुळें ते सर्व सम व अनन्त आहेत. त्यांच्या उपासकांना अनन्त लोकाची प्राप्ति होते.

अधिदैवविषयांतील जें पांक्त कर्मफल तेंहि पांक्तच सांगणें उचित आहे. त्यांतील मनो-वाक्-प्राणरूप माता-पिता-प्रजा हें त्रय सांगितलें. पण वित्त व कर्म सांगितलें नाहीं. यास्तव तें सांगण्यासाठी श्रुति म्हणते-संवत्सरात्मक प्रजापति षोडशकल—सोळा अवयवांनी युक्त आहे. पंधरा तिथि याच पंधरा कला असून त्यांना पूर्ण करणारी सोळावी कला नित्य आहे. त्या कला हेंच वित्त आहे. कारण चंद्रात्मा प्रजापति शुक्लपक्षांत वृद्धि पावतो व कृष्णपक्षांत क्षय पावतो. त्याची सोळावी कला मात्र ध्रुव असते. तो प्रजापति अमावास्येस रात्रीं या कलेनें या सर्व स्थावर-जंगमात्मक प्राण्यांमध्यें ओषधिरूपानें प्रवेश करून राहतो व दुसऱ्या दिवशीं म्ह० शुक्लप्रतिपदेच्या दिवशीं दुसऱ्या कलेनें युक्त होतो. ज्याअर्थीं त्या रात्रीं चंद्र सर्व प्राणिजातांमध्यें प्रवेश करून एका कलेनें राहतो त्याअर्थीं त्या रात्रीं चंद्राच्या पूजेसाठीं एखाद्या अतिशय क्षुद्र जिवालाहि मारूं नये. आतां हेंच आधिदैविक कलात्मक—अन्नात्मप्रजापतीचें उपासना अहंग्रहानें करावें, अशा आशयानें श्रुति म्हणते—हा पूर्वोक्त षोडशकल संवत्सरात्मक प्रजापति अत्यंत परोक्ष नाहीं. कारण तोच हा प्रत्यक्ष पुरुष आहे.

यास्तव तो व्यन्नात्मक प्रजापति मीच आहें, अशी उपासना करावी. त्या उपासकाचें जाया, गाय, गृह, क्षेत्र इत्यादि वित्त ह्याच पंधरा कला व देह हीच सोळावी ध्रुवा कला आहे. चंद्राच्या कलांप्रमाणेंच याच्या वित्तरूप कला वृद्धि-क्षय पावतात. त्याचें शरीर ही जणुंकाय रथचक्राची नाभि व बाह्य वित्त हाच त्या चाकाचा घेर—बाह्य परिवार आहे. ह्मणूनच त्याच्या सर्व बाह्य वित्ताचा क्षय जरी झाला व नाभिस्थानीय शरीररूपानें तो जिवंत असला तरी बाह्य परिवारानें पुनः युक्त होतो.

याप्रमाणें दैववित्तात्मक विद्यासंयुक्त पांक्त कर्मानें व्यन्नामक प्रजापतिभाव प्राप्त होतो, असें सांगितलें. त्यानंतर जायादिवित्त परिवाराच्या स्थानीं असून देह नाभिस्थानीं आहे, असें प्रतिपादन केलें. त्या सर्व विवेचनावरून पुत्र, कर्म व अपर विद्या हीं लोकप्राप्तीचीं साधनें आहेत, असें सामान्यतः अवगत झालें. पण त्या पुत्रादिकांतील अमुक अमक्या लोकाचें साधन आहे, असें विशेषतः ज्ञात झालें नाहीं. म्हणून श्रुति म्हणते—मनुष्यलोक, पितृलोक व देवलोक असे तीन लोक आहेत. त्यांतील मनुष्यलोक पुत्रानेंच जिंकतां येतो, कर्म किंवा विद्या—देवताज्ञान यांच्या योगानें तो प्राप्त होत नाहीं. अग्निहोत्रादि केवल कर्मानें पितृलोक जिंकतां येतो व विद्येनें—देवताज्ञानानें देवलोक प्राप्त होतो. या तीन लोकांत देवलोक श्रेष्ठ आहे. ह्मणूनच देवलोकसाधनभूत विद्येची प्रशंसा करितात. जाया हें पुत्राचें साधन आहे व वित्त कर्माचें साधन आहे. त्यामुळें त्यांना स्वतंत्र लोकसाधनत्व नाहीं. कर्म अनुष्ठानानें पितृलोकसाधन होतें व विद्याहि सतत अनुसंधानानेंच देवात्मभाव देऊं शकते. अर्थात् तीं दोन्हीं शारीर-मानस क्रियारूप आहेत. पण पुत्र हें कोणत्याच प्रकारचें कर्म नव्हे. तेव्हां तें लोकप्राप्तीचें साधन कसें होतें? तें सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—"पुत्राचें लोकसाधनत्व व्यक्त करण्यासाठीं मी आतां संप्रदान कर्म सांगतें." 'आपण आतां मरणार' असें जेव्हां पित्याला वाटतें तेव्हां तो पुत्राला म्हणतो—' तू ब्रह्म, तूं यज्ञ, व तूं लोक आहेस. ' पुत्राला पूर्वीच सुशिक्षण दिलेलें असल्यामुळें तोहि ' मी ब्रह्म, मी यज्ञ व मी लोक आहें ' असें प्रतिवचन देतो. त्या पित्याचें जें कांहीं अवशिष्ट अधीत किंवा अनधीत असतें त्या सर्वांची ब्रह्म या शब्दांत एकता होते. आजपर्यंत वेदाध्ययनासंबंधी जें माझें कर्तव्य होतें तें आतां तूं कर. मीं आज-

पर्यंत जे यज्ञ केले किंवा जे कांहीं करावयाचे राहिले आहेत ते सर्व तूं कर. जे लोक मीं संपादन केले आहेत किंवा संपादन करावयाचे आहेत ते तूं संपादन करावेस. तात्पर्य माझ्या सर्व कर्तव्यांचा भार मीं तुजपर सोंपविला आहे. अध्ययन, यज्ञ व लोकप्राप्तिहेतुभूत इतर कर्म हेंच काय तें गृहस्थाचें कर्तव्य. आजपर्यंत तें मी करीत होतों. पण आतां यापुढें माझा पुत्र तें सर्व करील व या बंधनहेतुभूत लोकापासून माझें रक्षण करील, असें पिता समजतो. ज्याअर्थी अशा प्रकारें संपन्न–समर्थ असलेला पुत्रच पित्याला कर्तव्यबंधापासून सोडवितो त्याअर्थी ब्राह्मण अशा अनुशिष्ट पुत्रालाच लोक्य–पित्याच्या लोकाला हितावह म्हणतात आणि त्याचसाठी सांप्रत कालचे पुत्रवान् गृहस्थ पुत्राला अनुशासन करितात–पुत्राला सुशिक्षणादि देऊन त्याला समर्थ करितात. याप्रमाणें ज्यानें संप्राप्ति–संप्रदान केलें आहे असा तो 'मी अनन्त वाङ्मनः-प्राणात्मक आहें,' अशी उपासना करणारा मुमूर्षु पिता जेव्हां हें शरीर सोडतो तेव्हां तो याच उपास्य वाङ्-मनः-प्राणांनीं पुत्रामध्यें प्रवेश करितो. तो फलरूपानें परलोकीं जरी असला तरी अनुशिष्ट पुत्ररूपानें या लोकीं राहतो. ज्याअर्थी हा पुत्र पित्याच्या कर्तव्यकर्मांतील छिद्र–न्यून भरून काढतो व त्यापासून त्याचें रक्षण करितो त्याअर्थी तो पुत्र होय. असो, तो पिता जरी मृत झाला तरी पुत्ररूपानें यालोकीं राहतो. हाच त्याचा मनुष्यलोकजय आहे. असो; याप्रमाणें संप्रत्तिकर्म केलेल्या या पित्यामध्यें हिरण्यगर्भाचे अमरणधर्मी प्राण प्रवेश करितात. पृथिवी व अग्नि यांपासून आधिदैविकी वाक् याच्यामध्यें प्रवेश करिते. त्या दैवी वाक्-मध्यें आसक्तिरूप दोष नसतो. त्यामुळें तिच्यायोगानें तो जें जें बोलतो तें तें होतें. त्याचप्रमाणें द्युलोक व आदित्य यांपासून त्याच्यामध्यें दैव मन प्रवेश करितें. त्या मनानें तो आनंदीच असतो, शोक करीत नाहीं. आप व चंद्र यांपासून दैव प्राण प्रवेश करितात. जो प्राण जंगम प्राण्यांमध्यें संचार करीत असतांना व स्थावरांत संचार करीत नसतांनाहि व्यथा पावत नाहीं, नाश पावत नाहीं, तो दैव प्राण होय. याप्रमाणें उपासनेनें वाङ्-मनः-प्राणरूप अन्नत्रयात्मक प्रजापतीला जो प्राप्त होतो तो सर्व भूतांचा आत्मा होतो. तो सर्वात्मक होत असल्यामुळें पूर्वसिद्ध हिरण्यगर्भदेवतेप्रमाणेंच सर्वज्ञ व सर्वकर्ता होतो. हिरण्यगर्भदेवतेप्रमाणेंच सर्व भूतें त्याची पूजा करितात. तो उपासक

सर्वांचा आत्मा जरी होत असला तरी भूतांचें शोकादि पापफल त्याला प्राप्त होत नाहीं. अहं-ममाभिमानामुळें त्यांचें दुःख तीं भोगितात. देवांना पाप-दुःख प्राप्त होत नाहीं. कारण त्यांचा त्या त्या भूतांचे ठिकाणीं अहं-ममाभिमान नसतो. आपल्या उदरांतील कृमि कीटादिकांचें दुःख आपल्याला जसें भासत नाहीं त्याचप्रमाणें प्राण्यांचें दुःख देवांना प्राप्त होत नाहीं.

'ते एते सर्वे समाः सर्वे अनन्ताः'—पृ. ५६६—या वाक्यावरून वाक्, मन व प्राण यांच्या साम्याचा निश्चय होतो, त्यामुळें उपासकानें त्यांतील कोणाची उपासना करावी व कोणाच्या कर्माचें व्रतरूपानें धारण करावें, तें सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—प्रजापतीनें स्वकर्मासाठीं वागादि करणें उत्पन्न केलीं. तीं परस्पर स्पर्धा करूं लागलीं. 'मी सतत बोलेनच' असें व्रत वाक्नें धरलें. 'मी सतत पाहीनच' असें चक्षूनें, 'मी सतत ऐकेनच' असें श्रोत्रानें व इतर इंद्रियांनींहि अशींच आपापल्या कर्मांविषयीं व्रतें धरलीं. पण मृत्यूनें श्रमरूप होऊन त्यांना त्यांच्या व्रतापासून च्युत केलें. प्रजापतीच्या वागादि इंद्रियांना श्रमरूप मृत्यूनें प्रतिबंध केल्यामुळेंच आतांहि मनुष्याचीं वागादि इन्द्रियें आपापल्या कर्मांत प्रवृत्त झालीं असतां श्रांत होतात. श्रमरूपी मृत्यु त्यांना आपापल्या कर्मांपासून निवृत्त करितो. त्यामुळें वागादि इन्द्रियें कांहीं वेळ आपापलें भाषणादि कर्म करून श्रांत होतात. पण मृत्यु प्रजापतीच्या मुख्य प्राणाला मात्र श्रान्त करूं शकला नाहीं. म्हणूनच हल्लींच्या प्रजेंतील प्राण वागादि इंद्रियांप्रमाणें श्रांत होत नाहीं. तें पाहून वागादिकांनीं 'आमच्यामध्यें हा प्राणच श्रेष्ठ आहे. तो संचारादि करीत असूनहि व्यथा पावत नाहीं व नाश पावत नाहीं.' असें जाणून त्याचाच आश्रय केला. तीं प्राणरूप झालीं. आमचीं भाषणादिकांविषयींचीं व्रतें मृत्यूचें निवारण करण्यास समर्थ नाहींत, असें जाणून त्यांनीं प्राणव्रतच धरलें. प्रकाशात्मक इन्द्रियें प्राणाच्या चलनरूप व्यापारानंतरच आपापला व्यापार करितात. म्हणूनच त्यांना—वागादि इंद्रियांना प्राण असें म्हणतात. त्यांचें हें प्राणादिरूपत्व व प्राण हें नांव जो जाणतो—त्यांचें जो चिंतन करितो त्याचें सर्व कुल त्याच्याच नांवानें प्रसिद्ध होतें. त्याच्याशीं जो स्पर्धा करितो त्याचा नाश होतो. हें अध्यात्मदर्शन झालें. आतां आधिदैवत दर्शन व देवांतील श्रेष्ठ देवाचा निश्चय करण्यासाठीं व्रतमीमांसा—अग्नीनें 'मी प्रज्वलितच होईन,' सूर्यानें

'मी तप्तच होईन,' चंद्रानें 'मी प्रकाशमानच होईन,' इत्यादि व्रतें धरलीं. विद्युतादि इतर देवतांनींहि तशींच आपापल्या कर्मांविषयीं व्रतें धारण केलीं. पण तीं सर्व अध्यात्म वागादिकांच्या व्रतांप्रमाणें भग्न झालीं. वागादिकांतील मुख्य प्राणाप्रमाणें देवांतील वायु मात्र भग्नव्रत झाला नाहीं. कारण अध्यात्म वागादिक प्राण जसे अस्त पावतात त्याप्रमाणें अग्न्यादि देवता अस्त पावतात. पण मुख्य प्राणाप्रमाणेंच अधिदैव वायु अस्त पावत नाहीं. वायु ही अनस्तमिता—अस्त न पावलेली—आपल्या कर्मापासून उपरत न होणारी देवता आहे. ह्मणूनच 'यतश्चोदेति सूर्योऽस्तं यत्र च गच्छति०' या मंत्रांत अधिदैव अध्यात्मरूप प्राणापासून अधिदैव सूर्य व अध्यात्म चक्षु उदय पावतात व प्राणांत लय पावतात, असें सांगितलें आहे. अग्न्यादि देवांनी व वागादि प्राणांनीं वायुव्रत व प्राणव्रत त्यावेळीं जें धरलें तें अद्यापि सोडलें नाहीं व पुढेंहि सोडणार नाहींत. ज्याअर्थीं प्राणाच्या परिस्पंदावांचून वागादिक व अग्न्यादिक राहूं शकत नाहींत त्याअर्थीं उपासकानें इतर इंद्रियांचे व्यापार सोडून प्राणापानव्यापारच करावा. 'मी जर कदाचित् या व्रतापासून च्युत झालों तर मृत्यु मला ग्रासील,' अशा भीतीनें हें व्रत धरावें व हें सर्वेंद्रियव्यापारोपरमरूप संन्यासलक्षण प्राणव्रत एकदा धरलें कीं मग तें मरेपर्यंत सोडूं नये. सूत्रात्म्याचें सायुज्य—एकत्व व सलोक्य—एकस्थानत्व हें या प्राणव्रताचें फल आहे. उपासकाला तें प्राप्त होतें. (५)

—'जो अन्य देवतेची भेददृष्ट्या उपासना करितो,' इत्यादि वाक्यानें संक्षेपतः सांगितलेल्या अविद्येचा साध्य-साधनरूप व्याकृत-अव्याकृतव्यापार सांगितला. आतां त्याचाच नाम-रूप-कर्मरूपानें उपसंहार करण्यासाठीं श्रुति म्हणते—हें सर्व जगत् नाम-रूप-कर्मात्मक आहे. वाक् हें सर्व नामांचें उपादान आहे. कारण सर्व नामें वाक्पासून उत्पन्न होतात. त्याच न्यायानें चक्षु हें सर्व रूपांचें उपादान आहे. मनन-दर्शन-चलनात्मक सर्व कर्मांचें आत्मा—शरीरानें होणारें कर्मसामान्य हें उपादान आहे. नाम-रूप-कर्म हीं तिन्ही मिळून हा शरीरेंद्रियसंघात होतो. लिंगात्मा प्राण त्याचा आधार आहे. तो चैतन्याच्या उपाधित्वानें अवस्थित असल्यामुळें म्ह० तो चैतन्योपाधि असल्यामुळें अमृत आहे. कारण स्थूल देहाचा नाश जरी झाला तरी मोक्षापर्यंत तो अविनाशी आहे. पण तें अमृत सत्यानें आच्छादित झालेलें आहे. पंचीकृत पंचभूतांचें कार्य अशा या

शरीरांतील नामरूप हेंच सत्य आहे. विराडात्मक व स्थूल देहात्मक अशा या नाम-रूपांच्या योगानें तो अमृत प्राण—सूत्रसंज्ञक लिंगात्मा झांकून गेला आहे. त्यामुळें तो दुर्विज्ञेय आहे. प्रत्यगात्मतत्त्व तर त्याहूनहि अत्यंत दुर्ज्ञेय आहे. यास्तव त्याच्या ज्ञानासाठीं फार मोठा प्रयत्न केला पाहिजे. दोषदृष्ट्या सर्व स्थूल-सूक्ष्मप्रपंचाविषयीं विरक्त झालेल्या पुरुषालाच विद्येचा अधिकार आहे, असा याचा भावार्थ. (६.१.)

सूत्रात्म्याच्या उपासनेनें देहद्वयात्मक सकल जगाविषयीं विरक्त झालेल्या पुरुषाला उद्देशून 'आत्मेत्येवोपासीत'—पृ५५१—अशी सूत्ररूपानें सांगितलेली जी सफल आत्मविद्या तिच्या विषयाचें म्ह० आत्म्याचें यथार्थ स्वरूप सांगण्यासाठीं दुसरा अध्याय आरंभिलेला आहे. पहिल्या अध्यायाच्या शेवटीं सांगितलेल्या सूत्रात्म्याचीच आदित्य-चंद्रादिकांमध्यें आत्मत्वानें उपासना करून तद्रूपत्वास प्राप्त झालेला जो गार्ग्य त्याला सिद्धान्ताला विवक्षित असलेल्या आत्मस्वरूपाचें निरूपण करण्यासाठीं पूर्वपक्षवादी या रूपानें येथें पुढें आणिलें आहे. गर्गगोत्राचा बालाकि—बलाकेचा पुत्र म्हणून एक ब्राह्मण होता. 'मी मोठा ब्रह्मवेत्ता आहें,' असा त्याला अभिमान वाटत असे. ज्याला कधीं कोणी शत्रुच उत्पन्न झालेला नाहीं, अशा अजातशत्रु काशिराजाकडे जाऊन गार्ग्य 'मी तुला ब्रह्माचा उपदेश करितों,' असे म्हणाला. तें ऐकून श्रद्धादि गुणांनीं युक्त असलेला अजातशत्रु—'तुला ब्रह्म सांगतों' इतकें बोलल्याबद्दलच मी तुला सहस्र गायी देतों, असें म्हणाला. ब्रह्माचें श्रवण व कथन करणारे व प्रतिग्रह घेणारे ब्राह्मण एकटा जनकच काय तो दाता व श्रोता असें समजून त्याच्याकडे धांवत असतात. हा ब्राह्मणहि तशाच संभावनेनें मजकडे आला असेल, असें समजून नुस्तें 'ब्रह्म सांगतों' एवढें बोलल्याबद्दलच सहस्र गायी देण्यास तो तयार झाला. असो; याप्रमाणें सहस्र गोप्रदानाची प्रतिज्ञा करून ऐकण्यास तयार झालेल्या राजाला गार्ग्य म्हणतो—"हा जो आदित्य व चक्षु यांतील एक अभिमानी पुरुष चक्षुरादिकांच्या द्वारा हृदयांत प्रविष्ट होऊन मी कर्ता व भोक्ता अशा रूपानें स्थित आहे त्याच पुरुषाची मी या शरीरांत ब्रह्मदृष्ट्या उपासना करतों. त्यालाच मी 'ब्रह्म' असें निरंतर पाहतों. तूंहि तशीच उपासना कर." तें ऐकून अजातशत्रु म्हणतो—'हे गार्ग्या, या विज्ञेय ब्रह्माविषयीं तूं मुळींच

बोलूं नकोस. मी त्याला जाणतों. तो सर्व भूतांचा अतिष्ठा—सर्वांचें उल्लंघन करून राहणारा, सर्व भूतांचा मूर्धा—पूज्य व सर्व भूतांचा राजा—प्रकाशमान होणारा, अशा दृष्टीनें मी त्याची या शरीरांत सतत उपासना करतों. त्याचा उपासकहि सर्व भूतांचा राजा, मूर्धा व अतिष्ठा होतो.' याप्रमाणें अजातशत्रूनें आदित्य-चक्षुः-पुरुषाचें प्रत्याख्यान केलें असतां गार्ग्य क्रमानें "चंद्र व मन यांतील एका पुरुषाचें व विद्युत्, आकाश, वायु, अग्नि, जल, आदर्श, प्राण व वायु, दिशा व कर्ण, बाह्य तम व हृदयांतील आवरणात्मक अज्ञान यांतील पुरुषांचें मी ब्रह्मदृष्ट्या उपासन करतों व तूंहि तसेंच कर" असें म्हणाला. पण अजातशत्रूनें त्यांतील प्रत्येक पुरुषाचें प्रत्याख्यान करून आपण त्यांचें कसें उपासन करतों तें सांगितलें व त्या त्या उपासनेच्या अनुसारच उपासकाला फल मिळतें असेंहि सांगितलें. तेव्हां गार्ग्य खालीं मान घालून मुकाट्यानें बसला. तें पाहून अजातशत्रु ह्मणाला—'तुला इतकेंच ब्रह्मज्ञान झालें आहे का? किंवा यापेक्षां तूं अधिक कांहीं जाणतोस?' गार्ग्य म्हणतो—'इतकेंच, यापेक्षां मला अधिक कांहीं ठाऊक नाहीं.' यावर अजातशत्रु म्हणतो—"एवढ्याच ज्ञानानें तुला मुख्य ब्रह्म ज्ञात होणें शक्य नाहीं." तेव्हां मुख्य ब्रह्माच्या ज्ञानासाठीं गार्ग्य अजातशत्रूला म्हणतो—"मी तुला उपसन्न होतों." पण 'ब्राह्मणानें क्षत्रियाला उपसन्न होणें, हें शास्त्रविरुद्ध आहे. मी तुला गुरूपसदनविधीवांचूनच ब्रह्म सांगतों.' असें बोलून अजातशत्रु त्याचा हात आपल्या हातांत धरून उठला व एका गाढ निजलेल्या पुरुषापाशीं येऊन 'हे बृहन्, पांडरवास, सोम, राजन्' अशा नांवांनीं हाका मारूं लागला. पण तो जागा झाला नाहीं. तेव्हां राजानें त्याला हालवून जागें केलें व गार्ग्यास म्हटलें—"हा विज्ञानमय याला हालविण्यापूर्वी कोठें—कशा प्रकारच्या स्वरूपांत निजला होता व हा आतां कोणापासून च्युत होऊन येथें आला आहे, हें तूं जाणतोस का?" पण गार्ग्याला तें कांहीच माहीत नव्हतें. म्हणून अजातशत्रु त्यास म्हणाला—"ज्यावेळीं हा विज्ञानमय पुरुष निजतो—विशेषविज्ञानरहित होतो तेव्हां या वागादि प्राणांचें विषयप्रकाशनसामर्थ्य चैतन्याभासरूप करणानें आकर्षण करून घेऊन हृदयांतील आकाशांत—बुद्धींतील असंसारी परमात्म्यांत राहतो. त्यावेळीं सर्व इंद्रियें लीन होतात. ज्यावेळीं हा प्रकृत आत्मा स्वप्न पहातो त्यावेळीं तो

जणु काय महाराजा, महाब्राह्मण इत्यादि उच्चनीच स्वभावाचा अनुभव घेतो. जसा एखादा सार्वभौम राजा आपल्या देशांतील लोकांना बरोबर घेऊन आपल्या राज्यांत यथेच्छ संचार करितो त्याप्रमाणें हा विज्ञानमय वागादिकांना जागरितांतून घेऊन आपल्या देहांतच यथेच्छ संचार करितो. स्वप्नांत त्याचा देहाच्या बाहेर संचार होत नाहीं. जाग्रद्वासनेनेंच तो स्वप्न पहात असल्यामुळें तें मिथ्या आहे. पण जेव्हां हा शयन करितो तेव्हां कोणताच विषय जाणत नाहीं. हितफलाच्या प्राप्तीचें निमित्त, म्हणून 'हिता' या नांवाच्या बाहत्तर सहस्र मुख्य शिरा हृदयापासून ह्मणजे उदर व वक्षःस्थल यांच्यामध्यें असलेल्या शुभ्र कमलाकार मांसपिंडापासून सर्व शरीरभर पसरलेल्या आहेत. त्यांच्या द्वारा विज्ञानमय इंद्रियांचा उपसंहार करितो व शरीरांत शयन करितो. जसा लहान बालक, महाराजा किंवा महाविद्वान् ब्राह्मण आनंदाच्या पराकाष्ठेस प्राप्त होऊन केवल सुखानुभव घेत राहतो, त्याप्रमाणें हा विज्ञानमय सर्वसंसारधर्मरहित होऊन शयन करितो. म्ह० सुषुप्तींत राहतो. याप्रमाणें 'तो कोठें होता,' या प्रश्नाच्या उत्तरानें आत्म्याचें स्वतः असंसारित्व प्रकट केलें व त्याच्या द्वारा त्याचें ब्रह्मत्व सांगितलें. आतां त्याचें अद्वितीयत्व प्रकट करण्यासाठीं 'तो कोठून आला ?' या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर राजा स्वतःच देतो. जसा कोळी एकटाच—कोणत्याहि बाह्य साधनाची अपेक्षा न करितां तंतु उत्पन्न करितो व त्यावरून गमन करितो, किंवा ज्याप्रमाणें एकरूप अग्नीपासून ठिणग्या सभोंवार उडतात, त्याप्रमाणें या आत्म्यापासून वागादि सर्व प्राण, कर्मफलभूत भूरादि सर्व लोक, प्राण व लोक यांचे अधिष्ठाते सर्व देव आणि ब्रह्मादिस्तंबपर्यंत सर्व भूतें उत्पन्न होतात. जलाच्या बुडबुड्याप्रमाणें ज्या सुषुप्तस्थ आकाशसंज्ञक आत्म्यापासून—ब्रह्मापासून हें सर्व उत्पन्न होतें, त्यांतच स्थित होतें व त्यांतच लीन होतें. त्याचें 'सत्य' हें गुप्त नांव आहे. प्राणच सत्य आहे. त्यांतील आत्मा हेंच सत्य—अबाधित तत्त्व आहे. (१)

'प्राणच सत्य आहे' या पूर्वोक्त वाक्याचा विशेष अर्थ प्रकट करण्यासाठीं या पुढील दोन ब्राह्मण आहेत. त्यांतील 'प्राणा वै सत्यं' येथपर्यंतच्या वाक्यानें सांगितलेल्या प्राणोपनिषदाच्या व्याख्यानासाठीं हें दुसरें शिशुब्राह्मण आहे.—जो शिशूला आधान, प्रत्याधान, स्थूणा व दाम यांसह जाणतो—त्याची

उपासना करितो तो दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या व मुख या सात शत्रूंना जिंकतो. म्ह० जितेंद्रिय होतो. हा जो शरीरांतील मुख्य प्राण ज्याला वर बृहन्-पांडरवास असें संबोधिलें आहे, तो लिंगशरीरात्मा हाच शिशु—गोवत्स आहे. त्याचें शरीर हेंच आधान—अधिष्ठान, मस्तक हें प्रत्याधान, बल या नांवाची अन्नपानादिजनित शक्ति किंवा श्वासोच्छ्वास करणारा प्राण हीच स्थूणा—बंधनस्तंभ व खाल्लेलें अन्न हेंच त्याचें दाम—दावें—बंधनरज्जु आहे. कारण दाव्याप्रमाणें तें त्याला—लिंगात्म्याला अन्नजन्य शक्तिरूप किंवा प्राणरूप खांबाशीं बांधून ठेवतें आणि कर्माच्या क्षयामुळें त्याचा क्षय होतांच प्राण शरीराला सोडून जातो. दावें एका बाजूनें खांबाला व दुसऱ्या बाजूनें वत्साच्या गळ्याला बांधलेलें असतें. त्याचप्रमाणें छांदोग्यांत सांगितल्याप्रमाणें—पृ. ४२६—त्रिधा परिणत झालेलें व एकीकडून लिंगात्म्या-प्राणाला व शरीराला बांधणारें अन्न दुसऱ्या बाजूनें पूर्वोक्त अन्नजन्यशक्तिरूप किंवा श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्राणरूप खांबाशीं त्याला बांधतें. ह्मणून तें त्याचें दावें. सात आक्षिति त्याच प्राणाख्य शिशूचें उपस्थान करितात. नेत्रांतील ज्या रक्तवर्ण रेखा त्यांच्या द्वारा या मध्यम प्राणाचें रुद्र उपस्थान करितात, त्याच्या समीप स्थित होतात. नेत्रांतील आपांच्या द्वारा पर्जन्य, कनीनिकेच्या—दृक्शक्तीच्या द्वारा आदित्य, कृष्णाच्या द्वारा अग्नि, शुक्लाच्या द्वारा इंद्र, खालच्या पापणीच्या द्वारा पृथिवी व वरच्या पापणीच्या द्वारा द्यौ त्याच्या समीप उपस्थित होते. या रुद्रादि देवता प्राणोपासनेनें वागादिरूप झाल्या आहेत. वास्तव वागादि इंद्रियें हाच रुद्रादिशब्दांचा अर्थ आहे. हाच अर्थ सांगणारा 'अर्वाक्बिलश्चमसः०' हा प्रसिद्ध मंत्र आहे. चमस हें एक यज्ञपात्र आहे. प्राणाख्य शिशूचें प्रत्याधान ह्मणून सांगितलेलें शिर हा तो चमस आहे. त्याचें मुख खालीं व बूड वर असतें. हें प्रसिद्ध मस्तकहि तसेंच आहे. कारण मुख हें त्याचें अर्वाक्बिल व शिर बुध्नाकार—तलाकार आहे. चमसपात्रांत जसा सोम ठेवितात त्याप्रमाणें या शिरःसंज्ञक चमसांत विश्वरूप यश ठेविलें आहे. श्रोत्रादि सात प्राण हेंच यश होय. त्याच्या जवळ सात ऋषि स्थित आहेत. प्राण—करणाश्रय वायु हेच ते सात ऋषि होत. कारण ऋषि जसे वेदमंत्रांना पाहतात त्याचप्रमाणें हे शब्दादि विषयांना पाहतात. वेदांशीं संसर्ग पावणारी वाक् ही आठवी त्या

चमसापाशीं आहे. त्यांतील दोन कान हेच गौतम व भारद्वाज, उजवा कान गौतम, डावा भारद्वाज, उजवा नेत्र हा विश्वामित्र व डावा जमदग्नि, उजवें नासापुट हा वसिष्ठ, डावें कश्यप, मधुरादिरसाला व्यक्त करणारी रसना हाच सातवा अत्रि, शब्दाचा उच्चार करणारी ही आठवी वाक् रसनेहून निराळी आहे. अन्नाचें अदन–भक्षण केल्यामुळेंच रसनेला अत्री हें नांव प्राप्त झालें आहे. मध्यम प्राणाच्या उपासकाला सर्वान्नप्राप्ति होते. तो आधान-प्रत्याधानगत मध्यम प्राण होऊन सर्व अन्नजाताचा भोक्ता होतो. (२)

पण या प्राणांना सत्यत्व कसें व आत्म्याला त्या सत्याचेंहि सत्यत्व कसें तें सांगण्यासाठीं हें मूर्तामूर्त ब्राह्मण आहे–'नेति नेति' इत्यादि पुढील वाक्यानें अपवाद करून ज्या ब्रह्माचें निरूपण कर्तव्य आहे त्या ब्रह्माचीं मायामय अशीं हीं दोनच रूपें आहेत. त्यांच्या द्वारा ब्रह्माचें ज्ञान करून दिलें जातें. एक मूर्त व दुसरें अमूर्त. त्या द्विरूप ब्रह्माचींच क्रमानें मूर्त, मर्त्य, स्थित व सत् आणि अमूर्त, अमृत, यत् व त्यत् अशी चार चार विशेषणें आहेत. पृथिवी, आप व तेज हें भूतत्रय हेंच मूर्त–साकार, त्यामुळेंच मर्त्य–विनाशी म्हणूनच स्थित–स्थिर–परिच्छिन्न व परिच्छिन्न असल्यामुळेंच सत्–प्रत्यक्ष उपलब्ध होणारें आहे. अशा चार विशेषणांनीं युक्त असलेल्या या भूतत्रयाचें आदित्य-मंडल हें अतिशय सारभूत कार्य आहे. हें आधिदैविक कार्यात्मक ब्रह्माचें रूप आहे. वायु व आकाश हें ब्रह्माचें दुसरें अमूर्त, अमृत, यत्–व्यापक व त्यत्–परोक्ष रूप आहे. आदित्यमंडलांतील जो करणात्मक विराडात्मा हिरण्यगर्भपुरुष तेंच त्याचें सार आहे. हें आधिदैविक करणात्मक ब्रह्माचें रूप आहे. याप्रमाणें आधिदैविक विभाग सांगितल्यावर श्रुति अध्यात्म विभाग सांगते–शरीरस्थ उच्छ्वासरूप प्राणाख्य वायूहून व शरीरस्थ आकाशाहून भिन्न असें जें शरीरारंभक भूतत्रय–तेज-आप्-पृथिवी–तेंच अध्यात्म कार्यात्मक ब्रह्माचें मूर्तादि रूप आहे. चक्षु हें त्यांचें अतिशय सार आहे. प्राण व अन्तरात्म्यांतील आकाश हें अमूर्त-अमृत-व्यापक-परोक्ष करणात्मक ब्रह्माचें अध्यात्मरूप आहे. दक्षिण नेत्रांतील पुरुष हा त्याचा–सारभूत रस आहे.

आतां श्रुति या करणात्म्याचें वासनामयरूप सांगते–त्या आधिदैविक व आध्यात्मिक लिंग पुरुषाचें हें वासनामय रूप आहे. जसें हळदीनें रंगविलेलें

वस्तु असावें त्याप्रमाणें स्त्र्यादि विषयांचा संयोग झाला असतां रंजनाकार वासनारूप उत्पन्न होतें. तसेंच कोणाचें किंचित् शुभ्रवर्ण, रक्तवर्ण, भास्वरवर्ण, शुक्लवर्ण, असेंहि सत्त्वादि गुणांच्या न्यूनाधिक्यामुळें वासनारूप होतें. हिरण्यगर्भादि कोणाचें वासनारूप ज्ञानप्रकाशाच्या वृद्धीमुळें विजेच्या चमकण्याप्रमाणें सर्वतः प्रकाशक असें होतें. या वासनारूपाची जो उपासना करितो त्याची ख्याति विजेच्या चमकण्याप्रमाणें एकदाच सर्वतः पसरते.

याप्रमाणें स्थूल-सूक्ष्मप्रपंचात्मक 'सत्य-' शब्दाचा त्याज्य अर्थ सांगून ग्राह्य 'सत्य-'शब्दार्थाचें व्याख्यान करण्यासाठीं श्रुति म्हणते—याप्रमाणें 'सत्यस्य सत्यं' यांतील षष्ठ्यन्त सत्यशब्दाच्या स्वरूपाचा निर्देश केल्यावर प्रथमान्त सत्य अवशिष्ट राहतें. त्या ब्रह्माचा 'नेति नेति' असा हा निर्देश आहे. 'नेति नेति' या द्विरुक्तीनें मूर्त-अमूर्त व त्याची वासना, एतद्रूप अविद्याकार्य व त्याचा अभाव याच्या अवधित्वानें—त्याचें अधिष्ठान या रूपानें व त्याच्या साक्षित्वानें ब्रह्माचा निर्देश केला आहे. कारण निरवधिक व निःसाक्षिक अशा त्याचा निषेध संभवत नाहीं. ज्ञेय—ज्ञानाचे विषय होणारे जेवढे म्हणून पदार्थ आहेत त्या सर्वांचा 'नेति नेति' या निर्देशांतील दोन नकारांच्या विषयत्वानें निर्देश केला जातो. त्यामुळें निर्विषय ब्रह्माचा 'नेति नेति' या निर्देशाहून निराळा निर्देशच संभवत नाहीं. किंवा या ब्रह्माहून भिन्न वस्तुच नाहीं. म्हणून 'न' असें म्हटलें जातें. तें ब्रह्म मुळीं नाहींच, या आशयानें तसें म्हटलेलें नाहीं. कारण त्यावरून निषिद्ध व अपरमार्थभूत अशा प्रपंचाहून निराळें अनिषिद्ध व अत्यंत परमार्थभूत असें ब्रह्म आहे, असें अवगत होतें. 'सत्यस्य सत्यं'—सत्याचें सत्य हें त्याचेंच नांव आहे. प्राणच सत्य आहेत. त्याचें हें ब्रह्म सत्य आहे.(३)

बृहदारण्यकाचा हा दुसरा अध्याय पहिल्या अध्यायांत सूत्ररूपानें सांगितलेल्या विद्यासूत्राच्या व्याख्यानासाठीं आहे. यास्तव गार्ग्यानें अजातशत्रूला 'मी तुला ब्रह्म सांगतों' असे जें म्हटलें आहे तेथपासून 'नेति नेति' येथपर्यंत सांगितलेल्या ब्रह्मविद्येच्या अंगत्वानें संन्यासाचें विधान करण्यासाठीं या अध्यायाचें हें चवथें मैत्रेयी ब्राह्मण आहे. याज्ञवल्क्य ऋषि आपल्या मैत्रेयी भार्येला संबोधून म्हणाला—" मी आतां हा गृहस्थाश्रम सोडून पारिव्राज्याचा स्वीकार करितों. तूं मला अनुमोदन दे. माझ्या दुसऱ्या 'कात्यायनी-'नांवाच्या

भार्येशीं तुझा विभाग करून–द्रव्यविभागानें तुम्हां दोघींची वाटणी करून देऊन मी आश्रमान्तर करितों" त्यावर मैत्रेयी म्हणते–"भगवन्, मला ही सर्व पृथ्वी धनानें पूर्ण अशी जरी मिळाली तरी त्या वित्तानें कर्म करून मी अमृत–अमरणधर्मवती–मुक्त होईन का?" याज्ञवल्क्य म्हणाला–"नाहीं. वित्त-साध्य कर्मानें तूं मुक्त होणार नाहींस. तर व्यवहारांत वित्तादिसाधनसंपन्न लोकांचें जीवित सुखानें जसें जातें–त्यांचा काल सुखोपभोगांतच जसा व्यतीत होतो त्याप्रमाणें तुझें जीवन सुखानें होईल. पण वित्तसाध्य कर्मानें मोक्षप्राप्तीची मुळींच आशा करावयास नको." तेव्हां 'मी जर वित्तसाध्य कर्मानें मुक्त होणार नाहीं तर मला त्याची अपेक्षा नाहीं. ज्याला आपण मोक्षाचें निश्चित साधन समजत असाल तेंच मला सांगा.' असें मैत्रेयी म्हणाली. तें ऐकून याज्ञवल्क्य म्हणतात–"खरोखर तूं मला पूर्वीहि प्रिय होतीस व आतांहि प्रिय–माझ्या चित्तानुकूलच भाषण करीत आहेस. यास्तव ये, बैस. मी तुला इष्ट असलेलें मोक्षसाधन–आत्मज्ञान सांगतों. तूं तें लक्षपूर्वक ऐकून त्याचेंच चिंतन कर." असा उपक्रम करून अमृताचें साधन जें ज्ञान त्याच्या अंगत्वानें सर्व सुखसाधनांविषयीं वैराग्य उत्पन्न करण्यासाठीं म्हणतात–"मैत्रेयि, पतीच्या प्रयोजनासाठीं पत्नीला पति प्रिय होत नाही. तर स्वतःच्या प्रयोजनासाठींच तो तिला प्रिय होतो, हें प्रसिद्ध आहे. त्याच न्यायानें भार्या, पुत्र, वित्त, ब्राह्मण, क्षत्रिय, लोक, देव, भूतें व इतर सर्व, यांच्या प्रयोजनासाठीं पति-माता-पिता, इत्यादिकांना ते ते प्रिय होत नाहींत, तर आपल्या सुखासाठीं ते सर्व प्रिय होतात. यास्तव प्रीतीचें मुख्य पात्र जो आत्मा त्याचेंच साक्षात् ज्ञान संपादन करावें व त्या आत्मसाक्षात्काराचा उपाय या रूपानें आचार्य-मुखानें उपनिषदादि आत्मशास्त्राचें श्रवण, तर्कतः मनन व निश्चयानें ध्यान करावें. श्रवणादि उपायांनीं साक्षात्काररूप आत्मज्ञान झालें असतां हें सर्व अनात्मभूत चराचर जगत् ज्ञात होतें. 'तें कसें' म्हणून म्हणशील तर सांगतों–आत्म्याहून भिन्न दुसरें कांहींच नसल्यामुळें जो ब्राह्मणजाति, क्षत्रिय-जाति, लोक, देव, भूतें व सर्व यांना आत्म्याहून पृथक् जाणतो त्याला ती ती जाति व लोकादिक 'अनात्मरूपानें हा आम्हांला पाहतो' असें समजून कैवल्यापासून दूर सारतात. कारण परमात्माच त्या सर्वांचा आत्मा आहे. पण हें

तत्त्व न जाणल्यामुळें तो अनात्मदर्शी पुरुषार्थापासून च्युत होतो. वर सांगितलेलें ब्रह्मादि व इतरहि सर्व हा आत्माच आहे. कारण स्फुरणात्मक स्वरूपाहून भिन्नत्वानें कशाचेंहि ग्रहण करितां येत नाहीं. ज्याच्यावांचून ज्याचें ग्रहणच संभवत नाही तें तद्रूपच असतें. जसें—मातीचा घट मातीहून भिन्नस्वरूपानें दिसत नाहीं, म्हणून तो मृद्रूप. या व्याप्तीला दृढ करण्यासाठीं याज्ञवल्क्य तीन दृष्टान्त देतात—वाजविल्या जाणाऱ्या नगाऱ्यापासून दूरवर पसरणारे नगाऱ्याचे विविध विशेष शब्द नगाऱ्याच्या सामान्य शब्दाचें ज्ञान असल्यावांचून कळत नाहींत. पण तेंच नगाऱ्याच्या सामान्य शब्दाचें ज्ञान असलें किंवा त्याच्या वादनप्रकाराचें ज्ञान असलें म्हणजे हे नगाऱ्याचे शब्द आहेत, असें कळतें. शंख व वीणा यांच्या विशेष ध्वनींचें ज्ञानहि त्यांच्या सामान्य ध्वनीच्या ज्ञानानेंच होतें. त्याच न्यायानें चेतनाचेतनात्मक सर्व पदार्थ स्थितिकालीं प्रज्ञानघन प्रत्यगात्म्याच्या सत्तेनेंच सत्तावान् होतात.

याप्रमाणें स्थितिकाली जगाला ब्रह्मैकत्व आहे, असें सांगून उत्पत्तिकालींहि त्याला तद्रूपत्वच आहे, असें ज्ञान करून देण्यासाठीं कार्याच्या उत्पत्तीपूर्वी तें कारणाहून अभिन्न असतें—कारणरूपच असतें, याविषयीं दृष्टान्त सांगतात—ओल्या लांकडांनीं अग्नि पेटविला असतां त्यापासून नानाप्रकारचा धूर, किटाळें वगैरे विकार जसे उद्भवतात त्याप्रमाणें या प्रकृत अपरिच्छिन्न परमार्थ सत्य आत्म्यापासून ऋग्वेदादि सर्व प्रपंच निःश्वसिताप्रमाणें सहज उत्पन्न होतो. तो उत्पत्तीपूर्वी ब्रह्माहून पृथक् नसतो. तर निजलेल्या पुरुषाच्या सर्व लौकिक-वैदिक ज्ञानांप्रमाणें आत्मरूप असून निजून उठलेल्या मनुष्याच्या ज्ञानाप्रमाणेंच सृष्टिसमयीं अभिव्यक्त होतो. यास्तव वेद स्वार्थाविषयीं निरपेक्ष प्रमाण आहे. तसेंच, प्रलयकालींहि प्रपंच ब्रह्मात्मकच असतो, असें सदृष्टान्त सांगतात—ज्याप्रमाणें सर्व नद्यांतील जलाचें समुद्र—जलसामान्य हें एक अयन—एक आश्रय—अविभागप्राप्ति आहे त्याप्रमाणें वायूच्या आत्मभूत मृदु-काठिन्यादि सर्व स्पर्शांचें त्वक्—स्पर्शसामान्य हें एक अयन आहे. त्याच न्यायानें सर्व रसांचें जिह्वा, सर्व गंधांचें घ्राण, सर्व रूपांचें चक्षु, सर्व शब्दांचें श्रोत्र, सर्व संकल्पांचें मन, सर्व विद्यांचें बुद्धि—विज्ञानसामान्य व सर्व कर्मांचें हस्त-पादादि कर्मेंद्रियें अयन आहे. म्हणजे सर्व विज्ञानांचा प्रज्ञानघन ब्रह्मामध्यें लय होतो व सर्व कर्मांचा

प्राणामध्यें व त्याचा कारणात्म्यामध्यें लय होतो. याप्रमाणें प्राकृतिक प्रलयाच्या दर्शनानें सर्व मूलप्रकृतिभूत अद्वय आत्मतत्त्वाचें ज्ञान करून दिलें. आतां ब्रह्मविद्येनें अविद्यानिवृत्तिद्वारा होणारा जो आत्यंतिक प्रलय तो सदृष्टान्त सांगतात—पाण्यांत टाकलेला मिठाचा खडा त्यांत जसा विरून जातो व तो पाण्यांत मिळून गेल्यावर त्याला पुनः वर काढतां येत नाहीं, पण तें पाणी कोठूनहि घेऊन त्याचें आचमन जरी केलें तरी खारटच लागतें, त्याप्रमाणें हें अनन्त, अपार विज्ञानघन आत्मतत्त्व शरीर-इंद्रिय-विषयाकार परिणत झालेल्या या पूर्वोक्त सत्यशब्दवाच्य भूतांपासून 'मी मनुष्य आहें, ब्राह्मण आहें' इत्यादि भावानें उत्पन्न होऊन तीं भूतें विनाश पावूं लागलीं असतां त्यांच्या मागोमाग विनाश पावतें. जलापासून चंद्रादिकांचें प्रतिबिंब जसें उत्पन्न व्हावें त्याप्रमाणें शरीरादि-आकारानें परिणत झालेल्या भूतांपासून उत्पन्न होऊन—विशेष स्वरूपास प्राप्त होऊन जल नाहींसें झालें असतां त्या बरोबरच त्यांतील प्रतिबिंब जसें लुप्त होतें त्याप्रमाणें आत्मतत्त्वाला विशेष स्वरूप प्राप्त करून देणारीं तीं—प्रकट झालेलीं शरीरेंद्रियादिरूप भूतें विनाश पावतांच आत्म्याचें तें विशेषस्वरूपहि सामान्याकार होतें. प्रत्यागात्मा परमात्मरूप होतो. याप्रमाणें शरीरेंद्रियसंघातापासून विमुक्त झालेल्या ब्रह्मवेत्त्याला शरीरत्यागानंतर 'हा मी अमुक, अमक्याचा पुत्र, हें माझें धन-क्षेत्रादि, मी सुखी-दुःखी' इत्यादि प्रकारचें विशेष ज्ञान नसतें असें याज्ञवल्क्यांनीं भार्येला परमार्थदर्शन सांगितलें.

"भगवन्, या एकाच ब्रह्मात्मवस्तूविषयी 'ती विज्ञानघन आहे,' अशी पूर्वी प्रतिज्ञा करून आतां त्याच्या उलट 'शरीरत्यागानंतर त्याला विशेष ज्ञान राहत नाहीं,' असें आपण सांगत असल्यामुळें मला मोह उत्पन्न होतो. आत्मतत्त्वाचा निश्चय होत नाहीं" असें मैत्रेयी बोलली असतां याज्ञवल्क्य पुनः म्हणतात—"मैत्रेयि, मी मोह पडण्यासारखें तुला कांहीं सांगत नाहीं. 'शरीरेंद्रियसंघातापासून मुक्त झाल्यावर विशेष ज्ञानाचा अभाव होतो व आत्मा आपल्या नित्य-निरंतर-विज्ञानघन स्वभावांत स्थित होतो,' असें मी तुला सांगत आहें, तें आत्मतत्त्व स्वप्रकाश असल्यामुळें त्याचें विज्ञान होणें सर्वथा दुर्लभ आहे."

याप्रमाणें सांगितलेला विशेषविज्ञानाचा अभावच अन्वय-व्यतिरेकानें दृढ करण्यासाठीं मुनि पुनः म्हणतात—"ज्या अविद्याविलाससमयीं एकाच आत्म्यामध्यें

द्वैत भासूं लागतें, त्यावेळीं इतर घ्राता इतर घ्राणेंद्रियानें इतर वास घेतो, द्रष्टा स्वभिन्न रूप पाहतो, श्रोता शब्द ऐकतो, वक्ता भाषण करितो, मनन करणारा स्वभिन्न विषयाचें मनन करितो, विज्ञाता स्वभिन्न विज्ञेय जाणतो, हाच त्याचा भूतें व अविद्या या उपाधीमुळें उद्भवलेला संसार आहे. पण ज्या विद्यावस्थेंत या ब्रह्मवेत्त्याचें कर्तृ-कर्म-क्रिया-फलादिक प्रत्यगात्म्याच्या स्वरूपविज्ञानानें विलय पावून आत्माच होतें त्या अवस्थेंत कोण कोणत्या साधनानें काय पाहणार, ऐकणार, बोलणार ? कांहीं नाही. त्यावेळीं ज्ञाता, ज्ञान, ज्ञेय इत्यादि त्रिपुटींचा अभाव होतो. त्यामुळें त्याच्या विशेष विज्ञानाचाहि अभाव होतो. फार काय, पण अविद्यावस्थेंतहि साक्षी आत्मा ज्ञानाचा विषय होत नाहीं. कारण कूटस्थाच्या स्वरूपभूत बोधानें व्याप्त झाल्यामुळेंच लोकांना परस्परांचें ज्ञान होतें. कूटस्थबोधावांचून तें होत नाहीं. अर्थात् ज्या कूटस्थबोधानें लोक हें सर्व जाणतात, त्याला ते कोणत्या साधनानें जाणणार ? अगे मैत्रेयि, जो स्वतः विज्ञाता त्याला कशानें जाणतां येणार ? प्रकाशालाच दुसरा कोणता प्रकाश प्रकाशित करणार !! (४)

आतां आत्मा प्रतिशरीरांत भिन्न भिन्न आहे, ही शंका घालविण्यासाठीं मधुब्राह्मणाचा आरंभ—ही प्रसिद्ध पृथिवी ब्रह्मादिस्तंबपर्यंत प्राण्यांचें कार्य आहे व सर्व प्राणी या पृथिवीचें कार्य आहे. या पृथिवींत जो चिन्मात्रप्रकाशमय अमरणधर्मा पुरुष आहे व जो हा या शरीरांत चिन्मात्रप्रकाश, अमृत पुरुष आहे तोच हा आत्मा, तेंच अमृत, तेंच ब्रह्म व तेंच सर्व आहे. याच न्यायानें आप, अग्नि, वायु, आदित्य, दिशा, चन्द्र, विद्युत्, मेघ, आकाश, धर्म, सत्य, मानुषादि जाति, हें सर्व सर्वभूतांचें कार्य आहे व सर्व भूतें त्या सर्वांचें कार्य आहे व तें सर्व स्वप्रकाशरूप व अमृतमय आहे. रैतस पुरुष हें जलाचें अध्यात्म, वाङ्मय पुरुष हें अग्नीचें, घ्राणेंद्रिय हें वायूचें, चाक्षुष पुरुष हें आदित्याचें, प्रातिश्रुत्क पुरुष हें दिशांचें, मानस पुरुष चन्द्राचें, त्वचा हें विद्युत्चें, स्वरांतील—सौवर शब्द हें पर्जन्याचें, हृदयाकाश हें आकाशाचें, सामान्य धर्म हें धर्मसामान्याचें, विशेष सत्य हें सत्यसामान्याचें, विशेष जाति हें विशेष जातीचें अध्यात्म कार्य आहे. मनुष्यादि जातिविशिष्ट देह हें सर्व भूतांचें कार्य व सर्व भूतें देहांचें कार्य आहे. त्यांतील जो तेजोमय, अमृतमय पुरुष तोच हा

आत्मा, तेंच ब्रह्म व हें सर्व आहे. तोच हा तेजोमय, अमृतमय आत्मा सर्व भूतांचा अधिपति, सर्व भूतांचा राजा आहे. रथनाभीमध्यें जसे अर त्याप्रमाणें ब्रह्मज्ञामध्यें हें सर्व जगत् समर्पिलेलें आहे.

याप्रमाणें पूर्णपणें निरूपिलेल्या ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठीं प्रवर्ग्यप्रकरणांतील आख्यायिकेचा अर्थ थोडक्यांत सांगणाऱ्या दोन मंत्रांचा उल्लेख केला आहे. हें मधुविज्ञान अध्यङ् आथर्वणानें अश्विनीकुमार या नांवाच्या दोघां देववैद्यांस सांगितलें. प्रवर्ग्यप्रकरणांत त्याचा नुस्ता उल्लेख केला आहे. पण प्रत्यक्ष तें सांगितलेलें नाहीं. येथें तें सविस्तर सांगितलें आहे. त्या ज्ञानदानाचा प्रकार एका मंत्रद्रष्ट्या ऋषीनें दोन मंत्रांनीं असा प्रकट केला आहे—" अहो नराकार अश्विनीकुमारहो, तुम्ही एखाद्या लोभी प्राकृत पुरुषाप्रमाणें स्वतःच्या लाभासाठी जें क्रूर कर्म केलेंत तें मी प्रकट करितों. दध्यङ्ऋषीनें अश्वमुखानें तुम्हांला हें सांगितलें आहे. तुम्हीं त्या ऋषीची या ज्ञानासाठीं प्रार्थना केलीत. त्यानें तुम्हांला तें सांगण्याचें अभिवचन दिलें. पण इंद्राला हें कळतांच त्यानें दधीच ऋषीला तें न सांगण्याविषयी बजावलें व सांगितल्यास ' मी तुझा शिरश्छेद करीन ' अशी भीति घातली. तथापि तुम्ही त्या ऋषीचें शिर तोडून त्याच्या धडाला घोड्याचें शिर जोडलेंत. ऋषीनें आपलें वचन खरें करण्यासाठीं त्या अश्वशिरानें तुम्हांला त्वाष्ट्रमधु-विद्या सांगितली. तें ऐकतांच इंद्रानें त्या ऋषीचें तें शिर तोडलें. तेव्हां तुम्ही त्याचें मूळ शिर त्याच्या धडाला पुनः पूर्वीप्रमाणें जोडलेंत. अशा क्रूर कर्मानें तुम्हीं ज्ञान संपादन केलें आहे. त्या ऋषीनें तुम्हांला केवल त्वाष्ट्रमधु—आदित्यविज्ञानच सांगितलें नाहीं तर कक्ष्य—अत्यंत रहस्य असें हें मधुविज्ञानहि—परमार्थविज्ञानहि—सांगितलें आहे. दध्यङ् आथर्वणानें हें मधु त्यांना सांगितलें—अव्यक्तनामरूपांना व्यक्त करणाऱ्या ईश्वरानें प्रथम भूतादि सृष्टि निर्माण करून व पंचीकृत भूतांपासून भूः, भुवः इत्यादि लोकांस उत्पन्न करून मनुष्य-पक्ष्यादि द्विपद शरीरें व पश्वादि चतुष्पदशरीरें केलीं. अशीं नानाप्रकारचीं शरीरें केल्यावर तो प्रथम लिंगशरीरी होऊन त्या शरीरांत पुरुषरूपानें प्रविष्ट झाला. तो सर्व पुरांत—शरीरांत रहात असल्यामुळें पुरुष होय. तथापि शरीर आधार व तो आधेय अशी द्वैतापत्ति येथें येऊं शकत नाहीं. कारण त्या परमात्म्यानें ज्याला आच्छादित केलें नाहीं असें कांहीं नाहीं व त्यानें

ज्यांत प्रवेश केलेला नाहीं असेंहि कांहीं नाहीं. तात्पर्य परमात्माच अन्तर्बहिर्भावानें कार्य-करणरूपानें व्यवस्थित आहे. त्याहून निराळें कांहीं नाहीं. दधीच ऋषीनें अश्विनीकुमारांना हें मधुज्ञान सांगितलें. तो ईश्वर प्रत्येक शरीरांत तदाकार झाला. प्रतिबिंब झाला. तो शरीरांत प्रतिबिंबाकारानें कशासाठीं शिरला? आपलें निरुपाधिक स्वरूप कळावें, आत्मस्वरूपाचें ज्ञान व्हावें म्हणून तो प्रतिबिंबरूपानें शरीरांत प्रविष्ट झाला. कारण तो जर प्रतिशरीरांत प्रविष्ट झाला नसता तर अनादि-अनिर्वचनीय अविद्यापटानें आच्छादित झालेल्या त्याचें ज्ञान कोणालाच झालें नसतें व त्यामुळें सर्व जगत् पुरुषार्थहीन झालें असतें. असंग-निर्विकार इत्यादिरूप असलेल्या त्याला प्रतिबिंबभाव प्राप्त होण्याचें कारण आत्म्याचें अज्ञानच आहे. तो परमेश्वर असंख्य मायाविक्षेपांमुळें ह्म० नाम-रूप-विषय-मिथ्या अभिमान या रूपानें परिणत झालेल्या मायेनें अनेकरूप असल्याचा मिथ्या प्रत्यय येतो. रथाला जोडलेल्या घोड्याप्रमाणें शरीरांत अनेक इंद्रियें जोडलीं आहेत. तीं प्रत्यगात्म्याला आपापल्या विषयांकडे ओढून नेतात. म्हणून त्यांना 'हरयः' हें नांव प्राप्त झालें आहे. आत्माच तीं असंख्य इंद्रियें आहेत. कारण तोच त्यांच्या रूपानें भासतो. यास्तव तोच असंख्य प्राणिशरीरांतील असंख्य इंद्रियें आहे. तेंच हें अपूर्व-अनपर इत्यादि सर्व विशेषशून्य ब्रह्मतत्त्व आहे. सर्वांचा अनुभव घेणारा द्रष्टा-श्रोता-मन्ता-विज्ञाता असा हा प्रत्यगात्माच ब्रह्म आहे.हाच सर्व वेदान्तांचा—सर्व उपनिषदांचा उपदेश आहे. (५)

त्यानंतर या दुसऱ्या अध्यायाच्या सहाव्या ब्राह्मणांत येथवर निरूपण केलेल्या ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठी, तिच्या उत्पत्त्यर्थ जपासाठीं, हिच्या असांप्रदायिकत्वाविषयींची शंका घालविण्यासाठीं व अध्यापनासाठी वंश—आचार्यपरंपरा सांगितली जाते. स्वयंभुब्रह्मापासून या विद्येचा संप्रदाय सुरू झाला. त्या ब्रह्मापासून परमेष्ठी पितामहाला ही प्राप्त झाली. त्यापासून सनग, सनगापासून सनातन,सनातनापासून सनारु, सनारूपासून व्यष्टि, व्यष्टीपासून विप्राचित्ति, विप्रचित्तीपासून एकर्षि, त्यापासून प्रध्वंसन, त्यापासून प्राध्वंसन मृत्यु, त्यापासून अथर्वा दैव अशा आचार्यपरंपरेनें ही विद्या पौतिमाष्यापर्यंत प्राप्त झाली व ती पुढें लोकांत विस्तार पावली. (६. २.)

बृहदारण्यकाच्या तिसऱ्या अध्यायाला मुनिकांड म्हणतात. कारण त्यांत अश्वलादि अनेक ब्रह्मवेत्त्यांचा याज्ञवल्क्याशीं वाद झाल्याचें वर्णन आहे. आगम-प्रधान मधुकांडानें सांगितलेल्या अर्थाचेंच उपपत्तीनें निरूपण करण्यासाठीं हें उपपत्तिप्रधान कांड आरंभिलें आहे. उपपत्ति वाद व जल्प अशा दोन प्रकारच्या असतात. वाद म्ह० तत्त्वनिश्चयासाठीं गुरुशिष्यांचा संवाद व जल्प म्ह० परमत-दूषणपूर्वक स्वमतस्थापन.

या अध्यायांत त्यांतील जल्पकथेनें युक्तीचें निरूपण केलें आहे. त्याच्या प्रस्तावासाठीं पहिल्या अश्वल ब्राह्मणानें आख्यायिका रचिली आहे. विज्ञानाची स्तुति, विद्याप्राप्तीचा उपाय व दान यांसाठीहि आरंभीं आख्यायिका आहे. विदेहाच्या वंशांत उत्पन्न झालेल्या जनकानें एकदा पुष्कळ दक्षिणायुक्त यज्ञ केला. त्यानिमित्तानें कुरु-पंचालदेशांतील मोठमोठे वेदवेत्ते एकत्र जमले होते. अनेक विद्वान् ब्राह्मणांचा तो मोठा समूह पाहून राजाला ' यांमध्यें अतिशय श्रेष्ठ प्रवचनकर्ता ब्रह्मिष्ठ कोण आहे ' हें विशेषतः जाणण्याची इच्छा झाली. त्यासाठीं त्यानें आपल्या गोठ्यांत एक सहस्र गायींचा संघ करविला. त्यांतील प्रत्येक गायीच्या एकेका शिंगाला सोन्याचीं ' पाद' या नांवाचीं पांच पांच नाणीं बांधलीं होतीं. अर्थात् प्रत्येक गायीच्या दोन्ही शिंगांना मिळून सुवर्णाचीं दहा नाणीं बांधली. नंतर तो त्या ब्राह्मणांस म्हणाला—" अहो पूज्य ब्राह्मणहो, तुम्हांमध्यें जो ब्रह्मिष्ठ—अतिशय ब्रह्मज्ञ असेल त्यानें या गायींना आपल्या घरीं न्यावें " पण त्या ब्राह्मणांतील कोणीच त्यांना नेण्यास धजेना. त्यांना कोणीच नेत नाहीं, असें पाहून याज्ञवल्क्यानें आपल्या सोमश्रवा शिष्याला त्या गायींना आपल्या घरीं न्यावयास सांगितलें. तेव्हां सामविधीचें श्रवण करणाऱ्या त्या शिष्यानें आचार्याच्या आज्ञेप्रमाणें त्यांना त्याच्या घराकडे चालविलें. तें पाहून ' आम्ही एवढे मोठमोठे ब्रह्मिष्ठ येथें असतांना हा स्वतःलाच ब्रह्मिष्ठ कसा म्हणवीत आहे ? ' अशा आशयानें इतर ब्राह्मण क्रुद्ध झाले, त्यांत जनकाचा होता—हवनकर्ता ' अश्वल ' म्हणून एक ब्राह्मण होता. तो स्वतःला ब्रह्मिष्ठ समजत असे. राजाश्रयामुळें धृष्ट झालेला तो याज्ञवल्क्यास म्हणाला—" अरे याज्ञवल्क्या, तूं आम्हांपुढें आपल्याला ब्रह्मिष्ठ कसें म्हणवितोस ? इतक्या विद्वानांमध्यें स्वतःलाच अतिशय ब्रह्मज्ञ समजून राजाच्या गायींचा अपहार करणें, सर्वथा अयोग्य आहे. " तें ऐकून ब्रह्मवेत्त्याचें अनौद्धत्य—विनय हें चिह्न

प्रकट करीत याज्ञवल्क्य म्हणाले—" आम्ही ब्रह्मिष्ठांना नमस्कार करितों. आम्हांला गायींची इच्छा होती. म्हणून आम्हीं त्यांना नेलें." तें ऐकून ब्रह्मिष्ठत्वाचा पण स्वीकारल्यामुळें होता अश्वल त्यास असें विचारूं लागला—

मधुकांडांतील उद्गीथ ब्राह्मणांत सांगितलेलें मुख्य प्राणदर्शन वागादिकांच्या पाप्ममृत्यूचें अतिक्रमण करून अग्न्यादिभावप्राप्तीचें साधन आहे, असें सांगितलें. पण त्यांतील प्रत्येकाच्या तद्भावप्राप्तीचें साधन कोणतें तें सांगितलें नाहीं. तें सांगावें म्हणून पुढील प्रश्न प्रवृत्त झाला आहे अश्वल म्हणतो—"याज्ञवल्क्या, या कर्माचें हें जें ऋत्विक्-अग्नि इत्यादि साधनजात आहे त्याला स्वाभाविक अज्ञानजन्य आसंगासह कर्मलक्षण मृत्यूनें व्यापिले आहे, नुस्तें व्यापलेलेंच नाहीं तर त्या मृत्यूनें त्याला ग्रासलेंहि आहे. तेव्हां यजमान कोणत्या दर्शनरूप साधनानें मृत्यूच्या या व्याप्तीचें उल्लंघन करून स्वतंत्र होतो—मृत्युवश होत नाहीं?"

याज्ञवल्क्य ह्मणतात—" होता, या ऋत्विजाच्या योगानें, अग्नीनें, वाक्-नें यजमान मृत्यूचे उल्लंघन करून मृत्युवश होत नाही." याचा अभिप्रेत अर्थ स्वतः श्रुतिच सांगते—यजमानाची जी अध्यात्म वाक् तोच अधियज्ञ होता आहे. म्ह० यजमानाच्या शरीरांतील वाक् हाच त्याच्या यज्ञांतील होता—हवनकर्ता आहे. असें असल्यामुळें जी यजमानाची वाक् तोच प्रसिद्ध अधिदैवतरूप अग्नि आहे. तोच वाक्-शीं एकरूप होऊन होता बनतो. याप्रमाणें अग्निरूपानें पाहिलेला होताच मुक्ति—मृत्यु-अतिक्रमणरूप मुक्तीचें साधन आहे. ती मुक्तिच अतिमुक्तीचें म्ह० फलरूप अग्न्यादिभावप्राप्ति, या अतिमुक्तीचें साधन आहे. अध्यात्म वाक् व अधियज्ञ होता या परिच्छिन्न पदार्थांना अधिदैव अग्निरूपानें पाहणें म्ह० यज्ञाच्या वेळीं होता या ऋत्विजानें मी अपरिच्छिन्न अग्निरूप यजमानवागात्मक आहें,' अशी भावना—ध्यान करणें हें अध्यात्म परिच्छेदरूप मृत्यूचें उल्लंघन करून फलभूत अग्न्यादिभावरूप अतिमुक्तीचें साधन आहे.

अश्वल पुनः म्हणाला—' याज्ञवल्क्या, हें सर्व कर्मसाधन अहोरात्रांनीं व्यापलें व ग्रासलें आहे. यजमान कोणत्या उपायानें त्यांचें उल्लंघन करून मुक्त होतो?' त्यावर याज्ञवल्क्य ह्मणतात—' अध्वर्यु—ऋत्विक्, चक्षु व आदित्य या उपायानें तो अहोरात्ररूप कालात्मक मृत्यूचें उल्लंघन करितो म्ह० पूर्वीप्रमाणें यजमानाचा चक्षु व अध्वर्यु यांचें अध्वर्यूनें आदित्यरूपानें ध्यान करणें हें

कालात्मक मृत्यूच्या अतिक्रमणाचें साधन आहे. त्यानंतर अश्वलानें—वृद्धि-क्षयादिविशिष्ट चंद्रामुळें होणाऱ्या तिथ्यादिरूप कालाच्या अतिक्रमणाचें साधन विचारलें असतां याज्ञवल्क्यानें—' यजमानाचा प्राण व उद्गाता यांचें उद्गात्यानें वायुरूपानें ध्यान करणें ' हेंच यजमानाच्या शुक्ल-कृष्णपक्षात्मक कालाच्या अतिक्रमणाचें साधन सांगितलें. 'याप्रमाणें कालादिरूप मृत्यूमुळें होणाऱ्या परिच्छेदापासून मुक्त होणारा यजमान कोणत्या आलंबनामध्यें फलाला प्राप्त होतो,' असा अश्वलानें प्रश्न केला असतां ' ब्रह्मा या ऋत्विजानें यजमानाचें मन व ब्रह्मा—ऋत्विज यांचें चन्द्ररूपानें ध्यान केलें असतां यजमान स्वर्गलोक या कर्मफलास प्राप्त होतो ' असें मुनि ह्मणाला. याच न्यायानें यजमानाच्या त्वगादिकांचें वायु-प्रभृति देवतात्मभावानें चिंतन केल्यानें यजमान अतिमुक्त होतो, अशा आशयानें श्रुतीनें या अतिमोक्षप्रकरणाचा उपसंहार केला आहे. त्यानंतर श्रुतीनें संपत्तिकर्माला आरंभ केला आहे. अग्निहोत्रादि अति अल्प कर्मांमध्यें महत्कर्मांचें त्यांच्या फलाच्या कामनेनें संपादन—चिंतन करणें किंवा अधिकाऱ्यानें त्यांत महत्फलाचेंच संपादन करणें यालाच संपत्तिकर्म ह्मणतात. अश्वल म्हणतो—" याज्ञवल्क्या, होता या यज्ञांत किती ऋग्जातींनीं शंसनकर्म—स्तुति करील ? " याज्ञवल्क्य—" पुरोनुवाक्या, याज्या व शस्या या तीन ऋग्जातीनीं तो तें कर्म करील." (प्रयोगकालापूर्वी होत्याकडून प्रयोग केली जाणारी जी ऋग्जाति ती पुरोनुवाक्या, यागासाठीं प्रयोग केली जाणारी जी ऋग्जाति ती याज्या व शस्त्रासाठीं—स्तुतीसाठी प्रयोग केली जाणारी जी ऋग्जाति ती शस्या.) "त्यांच्या-योगानें यजमान त्रैलोक्यांतील प्राणिजातालाला जिंकतो. "

याप्रमाणें ऋग्जातींतील फलसंपादन सांगितलें असतां अध्वर्युकृत आहुतींतील फलसंपादनाच्या जिज्ञासेनें अश्वल म्हणतो—" अध्वर्यु या यज्ञांत किती आहुति होमील व त्याचें फल काय ? " याज्ञवल्क्य—" ज्या होमिलेल्या समिद्-आज्यादि आहुत्या उज्ज्वल होतात, ज्या मांसादि आहुत्या होमिल्या असतां अतिशय शब्द करितात व ज्या पयःसोमादि आहुत्या खालीं जाऊन भूमींत जिरतात त्या तीन प्रकारच्या आहुत्यांच्या योगानें क्रमानें यजमान देवलोकास, पितृलोकास व मनुष्यलोकास जिंकतो. " अश्वल—" ब्रह्मा आहवनीयाच्या दक्षिणेस ब्रह्मासनावर बसून किती देवतांनीं यज्ञाचें रक्षण करितो ? "

याज्ञवल्क्य–" ब्रह्मा मनानें ध्यान हाच व्यापार करीत असतो. यास्तव 'मन' याच एका देवतेच्या योगानें तो यज्ञाचें रक्षण करितो. मन वृत्तिरूपानें अनंत आहे. त्याचे अधिष्ठातृदेवहि अनंत आहेत. त्यामुळें उपासकाला ध्यानानुसार अनन्त फलच प्राप्त होतें. " अश्वल–" याज्ञवल्क्या, उद्गाता या यज्ञांत कोणत्या स्तोत्रियांचा–गीतिविशिष्ट ऋग्जातींचा–स्तुतिकर्मांत प्रयोग करील ? " याज्ञवल्क्य–" पूर्वोक्त गीतिरूप पुरोनुवाक्यादि तीन ऋग्जातींनींच तो स्तुति करील. शरीरांतील प्राण हीच पुरोनुवाक्या, अपान याज्या व व्यान शस्या. त्यांच्या योगानें यजमान क्रमानें पृथिवीलोकास, अन्तरिक्षलोकास व द्युलोकास जिंकतो. तें ऐकून जनकाचा होता अश्वल मुकाट्यानें बसला. (१)

याप्रमाणें काल-कर्मरूप मृत्यूचें उल्लंघन हें उपासनेचें फल जरी असलें तरी त सूत्रान्तर्गतच असल्यामुळें मृत्युग्रस्त आहे, हें सांगण्यासाठी मृत्यूचें स्वरूप व्यक्त करण्याच्या उद्देशानें अगोदर मुक्ति व अतिमुक्ति यांचे प्रतियोगीभूत पदार्थच आख्यायिकेला अनुसरून सांगितले जातात–जारत्कारवगोत्री आर्तभाग म्हणाला–" याज्ञवल्क्या, ग्रह किती आहेत व अतिग्रह किती आहेत?" याज्ञवल्क्य–" आठ ग्रह व आठ अतिग्रह आहेत. " आर्तभाग–" ते कोणते?" याज्ञ०–" घ्राणसंज्ञक प्राण हा ग्रह असून तो अपान–गंध या अतिग्रहानें गृहीत आहे. कारण अपान व गंध एकमेकाला सोडून रहात नाहींत. येथें ' अपान-'शब्दानें अन्तर्मुख श्वास विवक्षित आहे. त्यानें वाहेरून आणलेल्या गंधाचा लोक वास घेतात. म्हणून प्राण त्याच्याकडून गृहीत आहे. त्याचप्रमाणें वाक् ग्रह व वक्तव्य तिचा अतिग्रह; जिह्वा ग्रह, रस अतिग्रह; चक्षु ग्रह, रूप अतिग्रह; श्रोत्र ग्रह, शब्द अतिग्रह; मन ग्रह, काम अतिग्रह; हात ग्रह कर्म अतिग्रह; त्वक् ग्रह, स्पर्श त्याचा अतिग्रह आहे. कारण तें तें इंद्रिय त्या त्या अतिग्रहाकडून गृहीत आहे.

ज्यांच्यापासून मुक्त व अतिमुक्त व्हावयाचें असे मुक्ति-अतिमुक्तीचे प्रतियोगी ग्रह व अतिग्रह सांगून आता अतिमुक्तिरूपानें सांगितलेल्या ज्ञान-कर्मफलभूत सूत्रपदालाहि पूर्वोक्तरीत्या वागादिरूप अग्न्यादिकांहून भिन्नत्व नसल्यामुळें ग्रहातिग्रहरूप मृत्युत्वच आहे. यास्तव त्याच्या पासूनहि अतिमुक्ति व्हावी म्हणून त्याला मारणाऱ्या दुसऱ्या मृत्यूविषयीं आर्तभाग प्रश्न

करितो–" हें सर्व व्यक्त जगत् मृत्यूचें अन्न आहे. पण तो मृत्यु कोणत्या देवतेचें अन्न आहे ?" (याज्ञवल्क्यानें या मृत्यूचाहि मृत्यु जर सांगितला तर त्याचा मृत्यु कोण ? त्या मृत्यूचा मृत्यु कोण, त्याचा मृत्यु कोण, अशी प्रश्नपरंपरा सुरू झाल्यामुळें अनवस्था प्राप्त होईल, व यानें मृत्यूचा दुसरा मृत्यु जर सांगितला नाहीं तर ग्रहातिग्रहरूप मृत्यूपासून मोक्षच संभवणार नाहीं, असा प्रश्नकर्त्या आर्तभागाचा आशय आहे. पण त्यावर याज्ञवल्क्य म्हणतात–) 'अग्नि हा प्रसिद्ध मृत्यु आहे. कारण तो सर्वान्नभक्षक आहे. पण तोहि आपांचें अन्न आहे. कारण आप अग्नीला शांत करतें किंवा येथें अग्नि म्ह० हिरण्यगर्भ व आप म्ह० त्याचें कारण अव्याकृत. अर्थात् मृत्यूचाहि मृत्यु आहे. त्याचप्रमाणें अशा सर्व मृत्यूंचा मृत्यु ब्रह्मात्मसाक्षात्कार आहे. त्यामुळें अनवस्था दोष येत नाहीं. त्या सर्वमृत्यूच्या प्राप्तीनें मृत्यूचा सर्वथा जय होतो.' (ब्रह्मात्मसाक्षात्काराचें मृत्युजय हें फलच अधिक विशद करण्यासाठीं आर्तभाग पुनः म्हणतो–) "याज्ञवल्क्या, परमात्मसाक्षात्काररूप महामृत्यूनें कार्यासह अज्ञानमृत्यूचा नाश केल्यावर मुक्त झालेला विद्वान् जेव्हां मरतो तेव्हां त्याच्या मुक्तीला प्रतिबंध करणारे वागादि ग्रह अन्तःस्थ वासनामय नामादि अतिग्रहांसह शरीरांतून वर निघून जातात कीं नाहीं ?" याज्ञवल्क्य–" नाहीं, ते शरीराला सोडून कोठें जात नाहीत, तर परब्रह्मामध्यें एकत्वास प्राप्त झालेल्या या विद्वानामध्येंच, समुद्रांत लीन होणाऱ्या तरंगाप्रमाणें ते लीन होतात. "तर मग 'तो मृत झाला' असें कां म्हणतात ?" म्हणून विचारशील तर ती लोकप्रसिद्धि शरीराला उद्देशून आहे. प्राण आत्मस्वरूपांत लीन झाल्यावर मुक्ताचा देह फुगतो. चामड्याच्या भात्याप्रमाणें बाह्य वायूकडून तो भरला जातो आणि तो फुगलेला देह निश्चेष्ट होऊन भूमीवर मरून पडतो. अर्थात् देहालाच मरण आहे." 'पण प्राणादिकांचा लय झाल्यावरहि संसाराचें निमित्त जें कर्म त्याचा जर लय होत नसेल तर विद्वानाला पुनः संसारप्राप्ति होईल' अशा आशयानें आर्तभाग पुनः म्हणतो–" याज्ञवल्क्या, जेव्हां हा विद्वान् पुरुष मरतो तेव्हां त्याला काय सोडीत नाहीं ?" याज्ञवल्क्य–"एक नाम मात्र त्याला सोडीत नाहीं. बाकी सर्व सोडतें. कारण नाम अनन्त आहे. म्हणूनच 'शुक मुक्त झाला. वामदेव मुक्त झाला' अशी व्यवहारपरंपरा चालते. (ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठीं आणखी कांहीं विशेष सांगतात–)

प्रसिद्ध विश्वेदेव अनन्त आहेत. यास्तव जो विद्वान् त्या विश्वेदेवांचें 'मी ब्रह्म आहें' अशा भावनेनें आत्मत्वानें चिंतन करितो तो अनन्त लोकालाच जिंकतो."

पण ज्याच्या योगानें प्रवृत्त झालेल्या मृत्यूकडून अविद्वान्, बद्ध होतो त्या ग्रहातिग्रहलक्षण मृत्यूचें प्रयोजक-प्रेरक काय आहे, अशा आशयानें त्याचें स्वरूप निश्चित करण्यासाठीं आर्तभाग म्हणतो-" याज्ञवल्क्या, जेव्हां या मृत अविद्वानाची वाक्-अधिष्ठातृदेवता अग्नींत लीन होते, घ्राणाख्य प्राण वातांत लीन होतो, चक्षु आदित्यांत, मन चंद्रांत, श्रोत्र दिशांत, शरीर पृथ्वींत, आत्म्याच्या अभिव्यक्तीचें अधिष्ठान हृदयाकाश महाकाशांत लीन होतें तेव्हां हा पुरुष कशाचा आश्रय करून राहतो? कशाच्या आश्रयानें तो दुसऱ्या शरीरेंद्रिय-संघाताचें ग्रहण करितो? " याज्ञवल्क्य-" हे आर्तभागा, तुझा हात दे. आपण एकांतांत जाऊन याचा निर्णय करूं. या प्रश्नाचा निर्णय एवढ्या जन-समुदायांत करतां येणें शक्य नाहीं. कारण, त्याविषयी अनेक वाद्यांचा मतभेद आहे." असें बोलून ते एकांतात गेले व त्यांनीं प्रस्तुत प्रश्नाचा निर्णय केला. श्रुति म्हणते-त्यांनी पुष्कळ विचार करून पुनः पुनः शरीरेंद्रियग्रहणाचें प्रयोजक निमित्त जे ठरविलें तें कर्मच होय. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं काल, ईश्वर इत्यादि निरनिराळ्या लोकांनी कल्पिलेल्या अनेक कारणांतील मुख्यतः या कर्माचीच प्रशंसा केली आहे. कर्मच संसाराचें मुख्य कारण आहे, असें त्यांनीं ठरविलें. ग्रहातिग्रहरूप शरीरेंद्रियाचें पुनः पुनः ग्रहण करण्याचें निश्चित कारण कर्मच आहे. त्यामुळेंच शास्त्रविहित पुण्य कर्माच्या योगानें देवादिकांत उत्पन्न होणारा पुण्यात्मा होतो, व शास्त्रनिषिद्ध पाप कर्मानें स्थावरादिकांत उत्पन्न होणारा पापात्मा होतो. याप्रमाणें आपल्या प्रश्नाचा निर्णय झाला असतां 'या महाब्राह्मणाचा पराजय करण्याचें कोणीं मनांतहि आणूं नये' असें समजून आर्तभाग मुकाट्यानें बसला. (२)

पुण्योत्कर्षामुळें फलाचा उत्कर्ष होतो, हें प्रसिद्ध आहे. त्यामुळें पुण्याचा फार मोठा उत्कर्ष झाला असतां मोक्ष प्राप्त होईल, ही शंका घालविण्यासाठीं पुण्याच्या परमोत्कर्षाची व्याप्ति संसारान्तर्गतसूत्रपदापर्यंतच आहे, हें सांगण्याच्या उद्देशानें आख्यायिकेला अनुसरून हें तिसरें भुज्यु ब्राह्मण प्रवृत्त झालें आहे. त्यानंतर लाह्यायनि भुज्यु म्हणाला-"आम्ही अध्ययनार्थ व्रताचरण करीत असतां

मद्रदेशांत पर्यटन केलें. एकदा आम्ही कपिगोत्री पतंचलाच्या घरीं गेलों. त्याच्या कन्येच्या अंगांत एक गंधर्व येत असे. आम्हीं त्याला 'तूं कोण आहेस' असा प्रश्न केला. तेव्हां 'मी सुधन्वा आंगिरस आहें' असें तो बोलला. आम्हीं त्या गंधर्वाला लोकांचें अन्त जेव्हां विचारले तेव्हां पारिक्षित म्ह० सर्व पापांचा क्षय करणाऱ्या अश्वमेधाचें अनुष्ठान करणारे कोठें होते, असा प्रश्न केला. त्यानें त्याचें योग्य उत्तर दिलें. तें मला माहीत आहे. म्ह० माझी विद्या गुरूपदेश-पूर्वक आहे. यास्तव हे याज्ञवल्क्या, ते पारिक्षित कोठें होते, तें मला सांग. नाहींतर आपला पराभव कबूल कर. तें ऐकून याज्ञवल्क्य म्हणतात—'हे भुज्यो, तो गंधर्व तुला म्हणाला की प्राचीन अश्वमेधयाजी जेथें जातात तेथें आधुनिक पारिक्षितहि गेले आहेत.' 'प्राचीन पारिक्षित कोठें जातात' असें त्यानें विचारलें असतां प्रथम भुवनकोशाचें परिमाण सांगून याज्ञवल्क्य म्हणतात—"या ब्रह्मांडाच्या दोन कपालांच्या मध्यें वस्तऱ्याच्या अग्रासारखें किंवा माशीच्या पंखासारखें सूक्ष्म विवर आहे. इंद्रानें—अश्वमेधांत श्येनाकारानें चयन केलेल्या विराडात्मरूप अग्नीनें पक्षी होऊन त्या विवरांतून पारिक्षितांना वायूच्या स्वाधीन केलें. कारण त्या पक्ष्याला त्या विवरांतून बाहेर जातां येणें शक्य नव्हतें. वायूनें त्यांना स्वात्मरूप करून जेथें पूर्वीचे अश्वमेधयाजी होते तेथें पोंचविलें. हे भुज्यो, त्या गंधर्वानें तुला असें सांगून वायूलाच—सूत्रालाच पारिक्षितांचें गतिस्थान म्हणून प्रशंसिलें." श्रुति म्हणते—"क्रियाशक्तिरूप वायूच व्यष्टि व समष्टि आहे. तोच सर्व चराचर सृष्टीला व्यापून राहिला आहे. जो कोणी समष्टि-व्यष्टिरूप वायुरूपानें आत्मोपासना करितो तो पुनर्मृत्यूला जिंकतो." याज्ञवल्क्याचें वरील उत्तर ऐकून भुज्यु स्वतःच पराभूत झाला. (३)

याप्रमाणें आत्म्याच्या अज्ञानामुळें जीव पुण्य-पापप्रयुक्त ग्रहातिग्रहांनीं ग्रस्त होऊन वारंवार त्यांचा त्याग व स्वीकार करीत आब्रह्मस्तंबपर्यंत संसार करितो. पुण्याच्या परमोत्कर्षानेंहि तो संसारांतून सुटत नाहीं; हें गेल्या तीन ब्राह्मणांनीं सांगितलें. आतां या पुढील सर्व अध्याय ब्रह्मात्मैक्यबोधासाठीं प्रवृत्त झाला आहे. पण याप्रमाणें संसार करणाऱ्या अधिकारी मुमुक्षूचें स्वरूप काय आहे, तें सांगण्यासाठीं म्ह० देहेंद्रियांहून भिन्न असलेल्या मुख्य ब्रह्माहून अभिन्न असें जें प्रत्यगात्मत्व तेंच त्याचें स्वरूप आहे, असा निर्णय करण्यासाठीं हें चवथें

उषस्त ब्राह्मण प्रवृत्त झालें आहे. उषस्त चाक्रायण म्हणतो—"हे याज्ञवल्क्या, जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म कीं जें ब्रह्मच सर्वान्तर आत्मा आहे, तें मला सांग." (साक्षात् व अपरोक्ष हीं ब्रह्माचीं विशेषणें तें परोक्ष आहे, हा भ्रम घालविण्यासाठीं आहेत. जें साक्षात्—स्वरूपतःच अपरोक्ष असलेलें ब्रह्म तें सांग किंवा उपासनेसाठीं 'मनो ब्रह्म' 'आदित्यो ब्रह्म' 'प्राणो ब्रह्म' अशी गौण ब्रह्मेंहि सांगितलीं आहेत. यास्तव तसें गौण ब्रह्म न सांगतां साक्षात्—मुख्य ब्रह्म सांग. तसेंच सर्वान्तर हें आत्म्याचें विशेषण त्याच्या परिच्छिन्नत्वादि भ्रमाची निवृत्ति करण्यासाठी आहे. अर्थात् जो सर्वांच्या अभ्यंतर असणारा ब्रह्मांगिन्न—ब्रह्मरूप प्रत्यगात्मा तो मला स्पष्टपणें सांग. बोट टेवून जशी एखादी वस्तु' ती ही'अशी दाखवितात तसा मला ब्रह्मरूप प्रत्यगात्मा दावीव.असा या प्रश्नाचा आशय आहे.)

याज्ञवल्क्य म्हणतात—" तुझ्या शरीरेंद्रियसमूहाचा जो हा आत्मा तोच तो सर्वान्तर साक्षात् अपरोक्ष ब्रह्मरूप आत्मा आहे. " प्रश्न—' पण तो शारीर आत्मा तरी कोणता, स्थूल-सूक्ष्म शरीरें, बुद्धि, साक्षी यांतील तो कोणता ? ' उत्तर—"जो मुख-नासिकादि स्थानांतून संचार करणाऱ्या प्राणाच्या योगानें प्राणनक्रिया करितो, अपानानें अपानक्रिया करितो, व्यानानें व्यानक्रिया व उदानानें उदानक्रिया करितो म्ह० प्राणादि जडवर्गाला जो त्यांच्या त्यांच्या क्रिया करावयास लावतो तो विज्ञानमय तुझा सर्वान्तर आत्मा आहे. " उषस्त म्हणतो—"याज्ञवल्क्या, एखाद्यानें' मी बैल किंवा घोडा प्रत्यक्ष दाखवितों' असें प्रथम म्हणून मागून ' जो चालतो तो बैल, जो धांवतो तो घोडा ' असें त्याच्या उलट जसें सांगावें तसेंच तुझें हें सांगणें आहे. जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म, जो सर्वान्तर आत्मा तो मला सांग. माझ्या प्रश्नाला अनुसरून उत्तर दे. नाहीतर आपलें अज्ञान कबूल कर. गायींच्या लोभानें असा छलवाद करूं नकोस. " याज्ञ०—"हाच तुझा आत्मा सर्वान्तर आहे. " उषस्त—' हा म्ह० कोणता ? ' याज्ञवल्क्य—"उषस्ता, अनित्य लौकिक दर्शनवृत्तीला नित्य स्वात्मरूप अलौकिक दृष्टीनें व्यापणाराला तूं पाहूं नयेस. तूं त्याला पाहूंच शकणार नाहींस. त्याचप्रमाणें श्रवणवृत्ति, मनोवृत्ति, बुद्धिवृत्ति या सर्व वृत्तींच्या व्यापक आत्म्याला—त्यांच्या साक्षीला तूं पाहूं शकणार नाहींस. तो सर्व वृत्तींचा साक्षीच हा तुझा सर्वान्तर

आत्मा आहे. या आत्म्याहून भिन्न असलेलें सर्व अनामजात विनाशी, रज्जु-सर्पाप्रमाणें मिथ्याभूत आहे."तें ऐकून उषस्त चाक्रायणहि मुकाट्यानें बसला.(४)

या अध्यायाच्या एक ते तीन ब्राह्मणांत सहेतुक बंधन सांगितलें. चवथ्या ब्राह्मणांत आत्मनिश्चय केला. आतां त्याच्या सहेतुक बंधाची निवृत्ति करणारें संन्यासासह तत्त्वज्ञान सांगावें म्हणून हें पांचवें कहोल ब्राह्मण आरंभिलें जातें. कहोल म्हणतो–" जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म जो सर्वान्तर आत्मा तोच मला सांग." (कांहीं विशेष सांगण्यासाठीं पूर्वीचाच प्रश्न पुनः केला आहे.) याज्ञवल्क्य–" हा तुझा आत्मा सर्वान्तर आहे." या प्रश्नांतील विशेष व्यक्त करण्यासाठी कहोल पुनः म्हणतो–" तो कोणता?" याज्ञवल्क्य–"जो अशनाया –क्षुधा, पिपासा–तृषा, शोक, मोह, जरा, मृत्यु, या संसारधर्मांनी रहित आहे तो तुझा सर्वान्तर आत्मा आहे." (या ज्ञानाच्या अंगत्वानें संन्यासाचें विधान–) "याच त्वंपदार्थ-तत्पदार्थलक्षण आत्म्याला–मीच ब्रह्मैक्यरूप–सर्व संसारविनिर्मुक्त नित्यतृप्त आहें अशा प्रकारें श्रुति व आचार्य यांच्या द्वारा जाणून ब्राह्मण–ब्रह्मनिष्ठ किंवा ब्राह्मण्य जातिमान् पुरुष एषणात्याग करतो. पुत्रासाठीं जी स्त्रीपरिग्रहेच्छा ती पुत्रैषणा, उपासना हें दैववित्त व गाय-धन इत्यादि मानुष वित्त यांविषयींची जी एषणा–ती वित्तैषणा, पुत्रानें मी हा लोक जिंकीन, केवल कर्मानें पितृलोक जिंकीन व उपासनासहित कर्मानें किंवा केवल उपासनेनें देव-लोक जिंकीन, अशा भावनेनें त्यांच्या साधनांचें अनुष्ठान करणें ही लोकैषणा होय. या एषणांपासून व्युत्थान करून–त्यांचा त्याग–संन्यास करून तो देहरक्षणार्थ भिक्षेसाठीं संचार करितो. जी पुत्रैषणा तीच वित्तैषणा व तीच लोकैषणा आहे. लोकैषणेपासून साधनैषणा उद्भवते, त्यामुळें लोकैषणा एक जरी असली तरी ती साध्य-साधनरूपानें द्विविध आहे. कारण त्या दोन्ही एषणाच आहेत. ज्याअर्थी प्राचीन ब्राह्मणांनीं क्रमानें या आत्म्याला जाणून, व्युत्थानादि केलें त्याअर्थी आधुनिक ब्राह्मणानेंहि या आपातरमणीय एषणांपासून व्युत्थान करून पांडित्य –श्रवण करून ज्ञानबलभावानें स्थित व्हावें. म्ह० मनन करीत रहावें. श्रवण-मनन करून सतत आत्मप्रत्यय–निदिध्यासन करावें. याप्रमाणें श्रवण, मनन, निदिध्यासन निःशेष संपादन केल्यानें ब्राह्मण–मुख्य ब्राह्मण्यानें युक्त–कृतकृत्य होतो!" पण हा अशा प्रकारचा कृतकृत्य मुख्य ब्राह्मण कोणत्या साधनानें

होतो ? उत्तर—" या नैष्कर्म्यसाधनांनेंच ब्राह्मण होतो. ज्याला अद्यापि ज्ञान झालें नाहीं तोहि या साधनानें कृतकृत्य ब्राह्मणासारखाच होतो. या ब्राह्मण्यावस्थानरूप सर्व संसारधर्मरहित आत्मतत्त्वाहून इतर सर्व एषणादिरूप वस्तु विनाशी आहेत. स्वप्न-माया-मृगजलादिकांप्रमाणें असार आहेत." तें ऐकून कहोल उपराम पावला. (५)

आतां या पूर्वोक्त सर्वान्तराचाच निर्णय करण्यासाठीं या पुढील तीन ब्राह्मण आहेत. त्यांतील या गार्गीब्राह्मणांत अनात्मभूत सर्व पदार्थ सांगतात—त्यानंतर वाचक्नवी गार्गी ह्मणाली—"हे मुने, हें सर्व पार्थिव धातुजात आपांमध्यें जसें ओतप्रोत आहे, तसें आप कशांत ओतप्रोत आहे?" याज्ञ०—"पंचीकृत पृथिवी हे आपांचें कार्य असल्यामुळें ती आपल्या कारणभूत पंचीकृत आपांमध्यें जशी ओतप्रोत आहे त्याप्रमाणें पंचीकृत आपहि कार्य असल्यामुळें पंचीकृत वायूंत ओतप्रोत आहे. वस्त्राच्या उभ्या तंतूंत आडवे तंतू जसे विणलेले असतात, त्याप्रमाणें कार्य आपल्या कारणामध्यें ओतप्रोत असतें. त्याच न्यायानें वायु अंतरिक्षलोकांत, अंतरिक्षलोक गंधर्वलोकांत, गंधर्वलोक आदित्यलोकांत, आदित्यलोक चंद्रलोकांत, चंद्रलोक नक्षत्रलोकांत, नक्षत्रलोक देवलोकांत, देवलोक इंद्रलोकांत, इंद्रलोक प्रजापतिलोकांत, प्रजापतिलोक ब्रह्मलोकांत ओतप्रोत आहेत. " गार्गी—" मुने, ब्रह्मलोक कशांत ओतप्रोत आहेत ?" याज्ञवल्क्य—" हे गार्गि, ब्रह्मलोक ज्यांत ओतप्रोत आहेत ती प्राणात्मभूत सूत्रदेवता अनुमानाचा विषय होत नाहीं. यास्तव त्या देवतेविषयीं तूं अनुमानानें विचारूं नकोस. जर विचारशील तर तुझा मूर्धपात होईल ? आगमाच्या विषयाला सोडून तूं हा प्रश्न करीत आहेस. यास्तव तुला मरण्याची इच्छा नसेल तर तूं असा प्रश्न विचारूं नको. " तें ऐकून गार्गी मुकाट्यानें बसली. (६)

सूत्राच्या आलिकडील व्यापक तत्त्व सांगून आतां जें केवल आगमगम्य असलेलें सूत्र व त्याच्याहि अन्तर्गत असलेला व जगज्जन्मादिकांचें निमित्त असा जो अन्तर्यामी त्यांचें व्याख्यान करण्यासाठीं अन्तर्यामिब्राह्मण आरंभिलें जातें—उद्दालक आरुणि म्हणतो—" याज्ञवल्क्या, आम्ही मद्र देशांतील पतंचल काप्याच्या घरीं यज्ञविद्या शिकत होतों. त्याच्या भार्येच्या अंगांत गंधर्व येत असे. त्याला ' तूं कोण आहेस ' असें विचारलें असतां तो म्हणाला—' मी कबंध

आथर्वण आहे.' त्यानंतर तो त्या काप्याला व त्याच्या शिष्यांना म्हणाला—" काप्या, ज्या सूत्रानें हा लोक, परलोक व सर्व भूतें संग्रथित—उत्तम प्रकारें गुंफलेलीं आहेत त्या सूत्राला तूं जाणतोस का?" काप्य—' नाहीं. भगवन्,' असें बोलला. तो पुनः म्हणतो—" जो या लोकाच्या, परलोकाच्या व सर्व भूतांच्या आंत राहून त्यांचें नियमन करितो त्याला तूं जाणतोस का?" त्याचेंहि ' नाहीं भगवन्,' असेंच त्यानें उत्तर दिलें. तेव्हां तो गंधर्व पुनः म्हणाला—" जो त्या सूत्राला व त्या अन्तर्यामीला जाणतो तोच ब्रह्मवेत्ता, लोकवेत्ता, देववेत्ता, वेदवेत्ता, भूतवेत्ता, आत्मवेत्ता व सर्ववेत्ता आहे." इतकें बोलून त्यानें तें सूत्र व तो अन्तर्यामी यांचें स्वरूप सांगितलें. तें मी जाणतों. याज्ञवल्क्या, त्या सूत्राला व त्या अन्तर्यामीला न जाणतां तूं जर ब्रह्मज्ञांच्या गायी हरण करशील तर तुझा मूर्धपात होईल, तुझें मस्तक गळून पडेल!" त्यावर याज्ञवल्क्य म्हणतो—" गौतमा, मी त्या दोहोंनाहि जाणतों." उद्दालक—' मी जाणतों, मी जाणतों ' असें कोणीहि म्हणेल. तूं कसें जाणतोस तें सांग पाहूं. याज्ञवल्क्य—" गौतमा, वायु हेंच तें सूत्र आहे. वायु याच सूत्रानें हा लोक, पर लोक व सर्व भूतें संग्रथित आहेत. म्हणूनच हे गौतमा, मेलेल्या शरीराला उद्देशून ' याचे अवयव विशीर्ण-शिथिल झाले आहेत,' असें लोक म्हणतात. सूत्र तुटलेल्या माळेंतील मण्यांप्रमाणें मृताचे हस्त-पादादि अवयव अस्ताव्यस्त पसरतात. यास्तव हे गौतमा, समष्टि-प्राणात्मक वायुरूप सूत्रानेंच सर्व भूतें संग्रथित आहेत." तें ऐकून उद्दालक म्हणतो—" याज्ञवल्क्या, तूं सूत्राचें स्वरूप बरोबर सांगितलेंस. आतां त्या सूत्रांतील अन्तर्यामीचें स्वरूप सांग पाहूं." याज्ञवल्क्य—" जो पृथिवीमध्यें राहणारा, पृथिवीच्या अभ्यंतर आहे, ज्याला पृथिवीची अभिमानिनी देवता माझ्यामध्यें दुसराच कोणी आहे, हें जाणत नाहीं. पृथिवीदेवतेचें जें शरीर तेंच ज्याचें शरीर आहे व जो तिच्या आंत राहून पृथिवीदेवतेचें नियमन करतो, इ० तिच्या कर्मसाक्षित्वानें तिला नियमानें प्रवृत्त करतो तोच तुझ्याहि शरीरेंद्रियसंघाताचा आत्मा अन्तर्यामी व अमृत म्हणजे सर्वसंसारधर्मरहित आहे. याच न्यायानें आप, अग्नि, अंतरिक्ष, वायु, द्युलोक, आदित्य, दिशा, चंद्र, तारका, आकाश, बाह्य आवरणात्मक तम, तेज, सर्व भूतें, प्राण, वाक्, चक्षु, श्रोत्र, मन, त्वक्, विज्ञान व रेत यांमध्यें राहणारा

जो त्यांच्या अभ्यंतर आहे, ज्याला यांतील कोणतीच अभिमानिनी देवता जाणत नाहीं, त्या त्या देवतेचें जें तें तें शरीर तींच ज्याचीं शरीरें आहेत, म्ह० ज्याला स्वतःचीं स्वाभाविक शरीरेंद्रियें नाहींत व जो त्या सर्व देवतांचें आंतून नियमन करतो तोच तुझा आत्मा अंतर्यामी अमृत आहे. तो चक्षु, श्रोत्र, मन, विज्ञान यांचा विषय होत नाहीं. पण द्रष्टा, श्रोता, मन्ता व विज्ञाता आहे. या अंतर्यामीहून दुसरा कोणी द्रष्टा नाहीं, श्रोता नाहीं, मन्ता—मनन करणारा नाहीं, विज्ञाता नाहीं. हाच तुझा आत्मा अंतर्यामी अमृत आहे. याहून इतर सर्व विनाशी आहे." तें ऐकून उद्दालक आरुणि मुकाट्यानें बसला. (७)

पूर्व ब्राह्मणांत सूत्र व अंतर्यामी यांचा निश्चय केला. पण आत्म्याचें तें दोन्ही प्रकारचें सोपाधिक रूप आहे यास्तव आतां निरुपाधिक, अशनायादि सर्व संसार-धर्मरहित असें जें साक्षात् अपरोक्ष ब्रह्म त्याचें स्वरूप सांगण्यासाठीं हें 'अक्षर-' ब्राह्मण प्रवृत्त झालें आहे. त्यानंतर वाचक्नवी गार्गी एकदा मूर्धपाताच्या भीतीनें उपरत झाली असतांहि पुनः म्हणाली—" अहो पूज्य ब्राह्मणहो, मी काय म्हणतें तें ऐका. माझ्या मनांत या ब्राह्मणाला पुनः दोन प्रश्न विचारावे असें आहे. तुम्ही जर अनुमोदन देत असाल तर मी ते विचारतें. यानें त्यांचीं उत्तरें जर दिलीं तर याला तुम्हांपैकीं कोणीहि ब्रह्मसंबंधी वादांत जिंकूं शकणार नाहीं." तेव्हां ते ब्राह्मण म्हणाले—' गार्गि, भिऊं नकोस, विचार. ' ती म्हणाली—' याज्ञवल्क्या, मी तुला दोन प्रश्न विचारतें. जसा काशिराजा किंवा शूरपुत्र वैदेहराजा आपलें धनुष्य सज्य करून दोन बाण घेऊन शत्रूच्या पुढें उभा राहतो त्याप्रमाणें मी हे दोन प्रश्न घेऊन तुझ्यापुढें आलें आहें. मला त्यांचीं उत्तरें सांग. ' तेव्हां ' विचार ' असें याज्ञवल्क्य म्हणाले. गार्गी म्हणते—'हे मुने, द्युलोकावर, पृथिवीच्या खालीं, मध्यें व त्रिकालीं सर्वत्र असणारें जें सूत्र-संज्ञक वायुतत्त्व तें कशामध्यें ओतप्रोत आहे ? ' याज्ञवल्क्य—' गार्गि, तें व्यक्तजगदात्मक सूत्र अव्याकृतसंज्ञक अविद्याशबल नारायणाख्य अंतर्यामीमध्यें त्रिकालीं ओतप्रोत आहे. ' तें ऐकून गार्गी म्हणते—' हे मुने, तुला नमस्कार असो. तूं माझ्या या कठिण प्रश्नाचें उत्तर सहज दिलें आहेस. आतां आणखी एक प्रश्न विचारतें त्याचें उत्तर दे. ' याज्ञवल्क्य म्हणतो—'ठीक आहे, विचार.' तेव्हां पूर्वोक्त सूत्रसंबंधी प्रश्नोत्तरांचाच अनुवाद केल्यावर गार्गी म्हणते—'याज्ञ-

वल्क्या, तें अव्याकृत आकाश कशामध्यें ओतप्रोत आहे?' याज्ञवल्क्य–'गार्गि, ब्रह्मज्ञ ब्राह्मण केव्हांहि क्षय न पावणारें जें अक्षर शुद्ध ब्रह्म तें या अव्याकृताचें अधिष्ठान आहे असें सांगतात.' 'पण तें अक्षर ब्रह्म कसें आहे तें मला सांग.' असें गार्गीनें मोठ्या विनयानें म्हटलें असतां याज्ञवल्क्य म्हणतात–'तें अस्थूल, अनणु, अह्रस्व, अदीर्घ, इत्यादि आहे. तें अक्षर कोणत्याहि विषयाचा उपभोग घेत नाहीं व कोणीहि त्याला आपला विषय करीत नाही.' (याप्रमाणें सर्व निषेधांच्या अवधित्वानें व साक्षित्वानें अक्षराचें अस्तित्व सिद्ध झालें असतां आतां त्याच ईश्वरात्मभूत अक्षराचें अस्तित्व अनुमानानें सांगतात–) 'हे गार्गि, त्याच अक्षराच्या आज्ञेंत सूर्य-चंद्र, द्यावा-पृथ्वी, निमेषादि-संवत्सरान्त कालावयव, नद्या वगैरे सर्व एखाद्या चाकराप्रमाणें नियमित होऊन रहातें. तेंच देवादिकांच्या द्वारा दानादि पुण्यकर्म करणारांना त्याचें फल देतें. गार्गि, या अक्षराला साक्षात् न जाणतां जो या लोकीं अनेक सहस्र वर्षेहि होम, त्याग, तप, इत्यादि करतो त्याचें तें सर्व कर्म विनाशी फलच देतें. जो या अक्षराला साक्षात् न जाणतां या कर्मलोकांतून मरून जातो तो कर्मी पुरुष कृपण–दीन आहे. तो एखाद्या दासाप्रमाणें कर्मफलाचाच भोक्ता आहे. मोक्षाचा अधिकारी नाहीं. पण जो श्रुति व आचार्योपदेश यांच्या द्वारा 'अहं ब्रह्मास्मि' असें जाणून या लोकांतून जातो तोच–ब्राह्मण–ब्रह्मभूत–मुक्त होय.' (आतां पुनः अक्षराचें ईश्वरत्व या उपाधीनें रहित असें स्वाभाविक स्वरूप सांगतात–) "गार्गि त्या अक्षराला कोणीहि पाहिलेलें नाहीं. कारण तें दृष्टीचा विषयच होत नाही. पण स्वतः दृक्स्वरूप असल्यामुळें सर्वांचें द्रष्टृ–पाहणारें आहे. तसेंच तें अश्रुत पण श्रोतृ, अमत पण मन्तृ, अविज्ञात पण विज्ञातृ आहे. त्या अक्षराहून दुसरें कोणी द्रष्टृ, श्रोतृ, मंतृ व विज्ञातृहि नाहीं. अशा या अक्षरांतच अव्याकृताकाश ओतप्रोत आहे." तें ऐकून गार्गी इतर ब्राह्मणांस म्हणते–'अहो पूज्य ब्राह्मणहो! या मुनीला नमस्कार करून तुम्ही येथून सुखरूपपणें गेलांत तर तेंच आपलें मोठें भाग्य समजा. यानें माझ्या अतिशय कठिण प्रश्नांचेंहि योग्य उत्तर दिलें आहे. यास्तव याचा पराभव करण्याचें तुम्ही मनांतहि आणू नका.'(८)

याप्रमाणें तीन ब्राह्मणांनीं ब्रह्माचें साक्षित्व अर्थतः निश्चित केलें. तेंच शब्दतः साक्षात् निश्चित करण्यासाठीं 'शाकल्य' ब्राह्मणाचा आरंभ केला जातो. त्यानंतर

विदग्ध शाकल्य म्हणतो–"याज्ञवल्क्या, देव किती आहेत?" याज्ञवल्क्य–'तीन हजार तीनशें सहा?' शाकल्यानें पुनः पुनः तोच प्रश्न केला असतां याज्ञवल्क्यानें क्रमानें–'तेतीस, सहा, तीन, दोन, दीड व एक' असें सांगितलें. 'तीन हजार तीनशें सहा देव कोणते' असा प्रश्न झाला असतां याज्ञवल्क्य म्हणतात– तेतीस देवच खरे; बाकीचा सर्व त्यांचाच विस्तार आहे. आठ वसु, अकरा रुद्र, बारा आदित्य, इंद्र व प्रजापति हे तेतीस मुख्य देव आहेत. अग्नि, पृथिवी इत्यादि हे आठ वसु, ज्ञानेंद्रिय-कर्मेंद्रियरूप दहा प्राण व मन हे अकरा रुद्र, कारण ते प्राणोत्क्रमणसमयीं जीवांना रडवितात. बारा मास हेच आदित्य, मेघ हाच इंद्र, यज्ञ हा प्रजापति; अग्नि-पृथिवी इत्यादि हेच सहा देव आहेत. तीन लोक हेच तीन देव, अन्न व प्राण हे दोन देव व वायु हा दीड देव आहे. कारण त्या वायूमुळेंच सर्व चराचर अधिक वृद्धि पावतें. म्हणून तो वस्तुतः एकच जरी असला तरी 'अधि-अधर्नोत् इति अध्यर्ध' या व्युत्पत्तीनें त्याला अध्यर्ध–दीड म्हटलें आहे. प्राण हाच एक देव आहे. त्यालाच ब्रह्म म्हणतात. कारण तो सूत्रात्मरूपानें सर्वकार्यांचें भरण–पोषण करितो. त्याचा साक्षात् निर्देश करितां येणें शक्य नसल्यामुळें 'त्यत्' या परोक्षवाचक शब्दानें निर्देश करितात. (याप्रमाणें संकोच-विस्तारानें प्राणस्वरूप सांगितलें. आतां ध्यान सुकर व्हावें म्हणून त्याचाच आठ प्रकारें भेद–) शाकल्य–" याज्ञवल्क्या, पृथ्वी हेंच ज्या देवाचें आयतन–आश्रय–शरीर आहे, अग्नि आलोकनसाधन आहे, मन विज्ञान-साधन आहे व जें सर्व शरीराचें व बीजस्थानीय पितृजन्य अस्थि-मज्जा-शुक्ररूप कारणाचें परायण आहे त्या पृथिव्यभिमानी देवाला जो जाणील तो खरा विद्वान् होय. " याज्ञवल्क्य–" या ज्ञानानेंच जर पांडित्य सिद्ध होत असेल तर तूं म्हणतोस त्या पुरुषाला मी जाणतों. " शाकल्य–" जर जाणत असशील तर सांग. " याज्ञवल्क्य–" जो हा प्रसिद्ध शरीरांतील जनकत्वानें स्थित असलेला मातृजन्य त्वक्-मांस-रुधिरलक्षण कोशत्रयरूप पुरुष तोच तूं विचार-लेला पुरुष आहे." पण एवढ्यानेंच हें दर्शन संपलें असें समजणाऱ्या शाकल्याला याज्ञवल्क्य म्हणतो–" अरे वेड्या, त्याची देवता कोण म्हणून विचार; असा गप्प कां बसतोस?" तें ऐकून चिडून गेलेला शाकल्य–" त्या मातृजन्य कोशत्रयात्मक शारीर पुरुषाची देवता–कारण काय आहे?" याज्ञवल्क्य–

" लोहितादि धातूंना कारण होणारा जो मातेनें खाल्लेल्या अन्नाचा रस, ज्याला अमृत म्हणतात, तें त्याचें कारण आहे. " अशाच रीतीनें पुढें काम, रूप आकाश, तम, प्रतिबिंबभूत रूपें, आप व रेत हीं ज्याचीं आयतनें आहेत त्या पुरुषाविषयीं प्रश्नोत्तरें झालीं. त्यांत अष्टधा भिन्न असलेल्या सूत्रात्म्या प्राणदेवाचेच सामान्याकारानें, विशेषाकारानें, व तत्कारणरूपानें तीन पोट भेद सांगितले. नंतर त्याचेंच पांच दिशांच्या विभागानें पांच प्रकारचें ध्यान सांगावें, म्हणून पुढील श्रुति प्रवृत्त झाली आहे. या सूत्रात्म्याविषयीचें अवशिष्ट राहिलेलें दर्शनहि मला यानें विचारावें, अशा आशयानें मुकाट्यानें बसलेल्या शाकल्याला चिडविण्यासाठीं किंवा अतिप्रश्न केल्यास या ब्राह्मणावर अनर्थ गुदरेल, असें जाणून करुणेनें याज्ञवल्क्य म्हणतात–" शाकल्या, हे ब्राह्मण तुला निखारे काढण्याचें साधन–चिमटा वगैरे करीत आहेत व तूं मजकडून जाळला जात आहेस हें तुझ्या ध्यानांत आलें का ? " पण या हितोपदेशाचाहि विपरीत अर्थ समजून शाकल्य म्हणतो–' याज्ञवल्क्या, कुरु पंचाल देशांतील या मोठमोठ्या ब्राह्मणांविषयीं तूं जो हें असें अयोग्य भाषण करीत आहेस, म्ह० ते स्वतः वाद करावयास भीत असून माझ्या द्वारा परस्पर तुझ्याशीं वाद करवीत आहेस, असें जें तूं म्हणत आहेस तें ब्रह्मज्ञ आहेस म्हणून कीं काय ? " याज्ञवल्क्य म्हणतात–" मी अधिष्ठातृ देवांसह व प्रतिष्ठांसह दिशांना जाणतों–त्यांची आत्मभावनेनें उपासना करितों." शाकल्य–" तर मग या पूर्वादि दिशांमध्यें तूं कोणत्या देवतारूपानें संपन्न आहेस तें सांग." याज्ञवल्क्य–" पूर्वदिशेंत मी आदित्यदेवत आहें. आदित्य चक्षूमध्यें, चक्षु रूपामध्यें व रूपें बुद्धीमध्यें प्रतिष्ठित आहेत. प्राणी बुद्धीनेंच रूपें पाहतो व तीं सर्व वासनारूपानें बुद्धींतच स्थित आहेत. दक्षिणेंत मी यमदेवत आहें. यम यज्ञांत, यज्ञ दक्षिणेंत, दक्षिणा श्रद्धेंत व मनोवृत्तिरूप श्रद्धा हृदयांत स्थित आहे. पश्चिमेंत मी वरुणदेवत आहें. वरुण आपांत, आप रेतांत व रेत हृदयांत प्रतिष्ठित आहे. म्हणूनच अनुरूप पुत्राला 'हा पित्याचा औरस–उरापासून–हृदयापासून झालेला पुत्र आहे,' असें म्हणतात. उत्तरेंत मी सोमदेवत आहे. तो सोम दीक्षेंत व दीक्षा सत्यांत प्रतिष्ठित आहे. म्हणूनच दीक्षिताला 'सत्य भाषण कर' असें म्हणतात. सत्य हृदयांत प्रतिष्ठित आहे. ऊर्ध्वादिशेंत मी अग्निदेवत आहें. अग्नि वाक्-मध्यें व

वाक् हृदयांत प्रतिष्ठित आहे. " याप्रमाणें हृदय सर्वांची प्रतिष्ठा आहे, असें ऐकून शाकल्य ' हृदय कशांत प्रतिष्ठित आहे ' असें विचारूं लागला. तेव्हां त्याला ' तूं प्रेतासारखें भाषण करीत आहेस, ' असें म्हणून "हृदय शरीरांतच प्रतिष्ठित आहे, कारण तें जर आपल्या शरीराला सोडून राहील तर शरीर मृत झाल्यामुळें त्याला कोल्हीं-कुतरी फाडतील" असें सकारण सांगितलें. त्यावर ' तूं व तुझें हृदय म्ह० तुझें स्थूल-सूक्ष्म शरीर कशांत प्रतिष्ठित आहे?' असा शाकल्यानें प्रश्न केला असतां 'तीं दोन्ही ऊर्ध्ववृत्ति प्राणांत, प्राण अधोवृत्ति अपानांत, अपान मध्यवृत्ति व्यानांत, व्यान त्यांच्या बंधनरूप उदानांत व उदान सूत्रात्मसंज्ञक समानांत प्रतिष्ठित आहे' असें मुनि म्हणाला.-(तो सूत्रात्मा—समान अन्तर्यामीत व अन्तर्यामीहि अक्षर कूटस्थ ब्रह्मांत प्रतिष्ठित आहे. हें अर्थात् सिद्ध आहे, असें समजून श्रुति स्वमुखानेंच त्या ब्रह्माचें स्वरूप सांगते—) जो सूत्राश्रय अन्तर्यामीच्या कल्पनेचा अधिष्ठानभूत परमात्मा तोच प्रत्यगात्मा असून त्याचा मूर्तामूर्त ब्राह्मणांत 'नेति नेति' असा सकल उपाधिनिषेधानें निर्देश केला आहे. तो अगृह्य—अविषय, अशीर्य—अक्षय, असंग, अबद्ध, व्यथारहित व अविनाशी आहे.

आतां पुनः आख्यायिकेला अनुसरून ' हा स्वतः ब्रह्मवेत्ता असून मला विचारीत आहे, अर्थात् हा अपराधी आहे ' असें मानून याज्ञवल्क्य म्हणतात— " शाकल्या, वर सांगितलेलीं ही पृथिव्यादि आठ आयतनें, अग्न्यादि आठ लोक, आठ देव, आठ शारीर पुरुष, यांचें निश्चयानें ज्ञान करून देऊन, लोकस्थितीचें उपपादन करून, पुनः त्यांचा प्राच्यादि दिशांच्या द्वारा हृदयांत उपसंहार करून, हृदयापासून समानापर्यंत उपाधिधर्मांचें अतिक्रमण करून स्वरूपानें स्थित असलेला जो ब्रह्मज्ञ त्या औपनिषद—उपनिषदांतच अवगत होणाऱ्या सर्व संसारधर्मरहित पुरुषाविषयीं मी तुला प्रश्न करितों. तो पुरुष तूं मला स्पष्टपणें न सांगशील तर ब्रह्मज्ञतेचा वृथा अभिमान धरणाऱ्या तुझा मूर्धपात होईल. " याज्ञवल्क्यानें असा शाप दिला असतां पुढें काय झालें तें श्रुति सांगते—शाकल्याला त्याचें—औपनिषद पुरुषाचें ज्ञान नव्हतें. त्यामुळें त्याचें मस्तक गळून पडलें. (ब्रह्मज्ञाचा द्वेष केला असतां परलोकाचाहि विघात होतो, हें दाखविण्यासाठीं श्रुति म्हणते—)तो नुस्ता मृतच झाला नाहीं तर त्याचे शिष्य अग्निहोत्रानें अग्निसंस्कार करण्यासाठीं त्याचे अस्थि वस्त्रांत बांधून नेत असतांना

मार्गांत चोरांनीं तें धन आहे असें समजून त्यांचा अपहार केला. त्यानंतर आपलें सर्वातिशायित्व सिद्ध करण्यासाठीं व न्यायानेंच गायींचें हरण करण्यासाठीं याज्ञवल्क्य म्हणतात—" पूज्य ब्राह्मणहो, तुम्हांपैकीं कोणाला आणखीं कांहीं विचारावयाचें असल्यास मला विचारा किंवा तुमची इच्छा असल्यास मी तुम्हांला विचारतों " पण ब्राह्मणांना त्याचें कांहींच उत्तर देतां आलें नाहीं. ते मुकाट्यानें बसले. तेव्हां जगाचें कारण विचारण्यासाठीं याज्ञवल्क्य तीन श्लोकांनीं वृक्ष व पुरुष—शरीर यांचें साम्य दाखवून व त्यापुढील तीन श्लोकांनीं त्यांचें वैधर्म्य दाखवून ब्राह्मणांना जगत्कारण विचारूं लागला पण त्यांना तें सांगतां आलें नाहीं. त्यामुळें याज्ञवल्क्यांचा सर्वतोमुख जय झाला. त्यांनीं न्यायानें गायींचें हरण केलें. शेवटीं स्वतः श्रुतीनेंच ' विज्ञान-आनंद-अपरिच्छिन्न-साक्षात्-अपरोक्ष ब्रह्मच जगाचें मूळ आहे, तेंच कर्मठांना कर्मफल देणारें व ब्रह्मनिष्ठांचें परम अयन आहे ' असें सांगितलें (९. ३.)

तिसऱ्या अध्यायांत जल्पन्यायानें ब्रह्माचा निश्चय केला. आतां वाद-न्यायानें त्याचा निर्णय करण्यासाठीं हा चवथा अध्याय आरंभिला जातो. पूर्वाध्यायांत जें विज्ञान-आनंद-साक्षात्-अपरोक्ष ब्रह्म सांगितलें त्याचाच वागादि-अधिष्ठातृ-अग्न्यादिदेवतांमध्यें ब्रह्मदृष्टि करणें, या उपायानें निर्णय करण्यासाठीं षडाचार्यब्राह्मण व कूर्चब्राह्मण, आचारादि ज्ञानग्रहणोपायाचें शिक्षण देण्याच्या हेतूनें, आख्यायिकारूपानें आरंभिलीं जातात—वैदेह जनकानें आपल्याला भेटण्याची इच्छा करणाऱ्या लोकांसाठीं एक नियतकाल व स्थल यांची योजना केली. त्याच्यावर अनुग्रह करण्यासाठीं याज्ञवल्क्य त्याच्याकडे आला. तो आलेला पाहून व त्याची यथाविधि पूजा करून जनक म्हणाला—'मुने, कोणत्या इच्छेनें आगमन केलें ? पुनः गायींची इच्छा करून आलांत कीं सूक्ष्म वस्तूच्या निर्णयापर्यंत माझे प्रश्न ऐकून त्यांचीं उत्तरें देण्यासाठीं आलांत ? ' याज्ञवल्क्य म्हणतो—' हे राजा, मी तुजकडे दोन्हींसाठीं आलों आहें. ' त्यानंतर राजाला जो विषय अज्ञात असेल त्याचाच उपदेश करण्याची इच्छा करणारा मुनि म्हणतो—' हे राजन्, तुला ज्या कोणत्याहि आचार्यानें जो उपदेश केला असेल तो मला अगोदर ऐकूं दे.' राजा—" जित्वा शैलिनीनें ' वागभिमानिनी देवता अग्नि हेंच ब्रह्म आहे ' असें सांगितलें. " " ज्याप्रमाणें

माता, पिता व आचार्य यांच्याकडून उपदेश केला गेलेल्या आचार्यानें स्वशिष्याला उपदेश करावा, त्याचप्रमाणें शैलिनीनें तुला 'वाक् ब्रह्म आहे' असा उपदेश केला. कारण वाग्-रहित मुक्याला या लोकीं किंवा परलोकीं कशाचा लाभ होणार? परंतु हे राजा, तेवढ्याच ब्रह्मज्ञानानें तूं आपल्याला कृतार्थ मानूं नकोस. त्यानें तुला वाग्देवतेचें शरीर व त्रैकालिक आश्रय कोणता सांगितला?" असें याज्ञवल्क्य बोलला. तेव्हां 'मला त्यानें तें कांहीं सांगितलें नाहीं.' असें जनकानें दिलेलें उत्तर ऐकून याज्ञवल्क्य म्हणतो—'हें एकपाद ब्रह्म आहे. तसल्या—तीन पादांनी हीन असलेल्या ब्रह्माला उपास्यत्व संभवत नाही. तेव्हां राजा विस्मयानें म्हणाला—'तर मग आपणच तें मला सांगा.' याज्ञवल्क्य—"राजन्! त्यानें सांगितलेल्या वाग्देवतारूप ब्रह्माचें वाक्-इंद्रिय हेंच आयतन—शरीर आहे. अव्याकृतसंज्ञक अंतर्यामी आकाश हीच त्याची उत्पत्ति-स्थिति-लयकालांतील प्रतिष्ठा—आश्रय आहे. या वाग्देवताख्य ब्रह्माची 'प्रज्ञा' या नांवानें उपासना करावी. म्हणजे चार पादांनीं पूर्ण असलेलें तें ब्रह्म फलद होतें." पण त्या वाग्देवता-ब्रह्माचें 'प्रज्ञा' हें नांव आयतन व प्रतिष्ठा यांप्रमाणें त्याहून भिन्न आहे कीं अभिन्न, अशा आशयानें जनक म्हणतो—"मुने, 'प्रज्ञता' कोणती?" याज्ञवल्क्य—"राजा, वाग्देवता हीच प्रज्ञा आहे. कोणीं एखाद्यानें 'हा आमचा बंधु आहे' असें सांगितलें असतां वाक् या देवतेनेंच त्याला मनुष्य जाणतो. ऋग्वेदादि सर्व वाक्नेंच ज्ञात होतें. याग, होम, अन्नदान, पानदान यांपासून होणारें सर्व धर्मजात वाक्नेंच ज्ञात होतें. हा लोक—जन्म, परलोक—पुढील प्राप्तव्य जन्म, सर्व भूतें वाक्नेंच ज्ञात होतात. यास्तव वाक्-देवतेलाच परब्रह्म मानून त्याचें चिंतन करावें. जो अशी उपासना करितो त्याला वाग्देवता सोडीत नाहीं. सर्व भूतें याला उपहार आणून देतात. याच जन्मीं त्याला देवताभाव प्राप्त होऊन शरीरत्यागानंतर तो देवांस प्राप्त होतो." हें ऐकून राजा प्रस्तुत विद्येच्या निष्क्रयार्थ म्हणतो—"हस्तीसारखा बैल ज्यांत आहे अशा एक सहस्र गायी मी तुला देतों." याज्ञवल्क्य—'पण शिष्याला कृतकृत्य केल्यावांचून त्याच्यापासून कांहीं घेऊं नये' असें माझा पिता समजत असे व तें मलाहि संमत आहे. त्यानंतर उदंकानें 'प्राण—वायुदेवता ब्रह्म आहे' असें जें राजाला सांगितलें होतें त्याचीहि पूर्वीप्रमाणेंच

ांसा करून "अध्यात्म प्राण—वायुसहित घ्राण हें त्याचें आयतन व आकाश
ेष्ठा आहे. त्याची 'प्रिय' या नांवानें उपासना करावी. कारण प्राण प्रिय आहे.
ाच्या रक्षणासाठीं प्राणी वाटेल तें अकार्यहि करण्यास तयार होतो. प्राणाचा
च्छेद होईल कीं काय अशी त्याला सर्वत्र भीति वाटते. पण अशा सभयस्था-
हि तो धनादिलोभानें प्राणासाठींच जातो. यास्तव त्याचीच उपासना करावी.
येथें देवतात्मभावास प्राप्त होऊन मरणोत्तर देव होतो." असें याज्ञवल्क्यानें
गितलें. तेव्हां राजा पूर्वीप्रमाणेंच सहस्र गोप्रदान देऊं लागला. पण मुनीनें
ीप्रमाणेंच बोलून त्याचा निषेध केला. त्यानंतर 'बर्कु-आचार्यानें सांगितलेल्या
क्षुर्देवतारूप ब्रह्माचें चक्षुरिन्द्रिय हें शरीर व आकाश प्रतिष्ठा आहे, असें सांगून
ाची 'सत्य' या नांवानें उपासना करावी,' असें याज्ञवल्क्य म्हणाला. 'चक्षु-
म' या उपदेशाची प्रशंसा 'चक्षुच सत्य' याविषयीं उपपत्ति, त्या उपासनेचें
ळ, सहस्र गोदान व त्याचा निषेध हें सर्व पूर्वीप्रमाणेंच पुढील सर्व पर्या-
त जाणावें. 'श्रोत्रदेवता—दिक् हेंच ब्रह्म' याप्रमाणें भारद्वाजानें सांगित-
ल्या ब्रह्माचें 'श्रोत्रेंद्रिय हेंच आयतन व आकाश प्रतिष्ठा आहे,' असें म्हणून
अनन्त' या नांवानें त्याची उपासना करावी, असें तो म्हणाला. जाबालानें
मनोदेवता—चन्द्र हेंच ब्रह्म आहे' असें सांगितलें होतें. त्याचें मन हेंच
ायतन व आकाश प्रतिष्ठा आहे असें सांगून 'आनंद' या नांवानें त्याची
ासना करावी, असें याज्ञवल्क्य म्हणाला. विदग्ध शाकल्यानें त्याला 'हृदय-
ता प्रजापति हेंच ब्रह्म आहे,' असें सांगितलें होतें. त्याचें हृदय हेंच आय-
न व आकाश प्रतिष्ठा आहे, असें सांगून त्याची 'स्थिति' या नांवानें उपा-
ना करावी, असें मुनीनें म्हटलें. या सहाहि पर्यायांत एकच उपासना सांगि-
ली आहे. कारण वागादि, आयतन व प्रतिष्ठा या शब्दांनीं सूक्ष्म, स्थूल व
ाचें कारण या रूपानें क्रमानें सूत्र, विरा व अंतर्यामी यांचेंच उपास्यत्व
गितलें आहे. (१)

आतां त्या उपासनांनीं ज्ञेय असलेलें जें ब्रह्म त्याचें जागरादि अवस्थांच्या
ारा ज्ञान करून देण्यासाठीं या दुसऱ्या कूर्चब्राह्मणाचा आरंभ केला जातो—
हि जनक आपल्या कूर्चसंज्ञक विशिष्ट आसनावरून उठून मुनीजवळ
ला आणि त्याच्या चरणांवर मस्तक ठेवून म्हणाला—" भगवन्! ज्या ज्ञाना-

वांचून मी कृतार्थ होणार नाहीं, असें आपण म्हणालांत त्या तत्त्वज्ञानाचा मला उपदेश करा." (आचार्यानें मुमुक्षूला ज्ञान व ज्ञानसाधन सांगावें, असा नियम आहे. त्यांतील ज्ञानसाधन राजाला प्राप्तच आहे, असें मुनि दृष्टान्त देऊन सांगतो–)" हे राजा, फार दूर प्रदेशीं जलमार्गानें किंवा स्थलमार्गानें जाणारा प्रवासी जसें नांव किंवा रथ हें साधन घेतो त्याप्रमाणें पूर्व ब्राह्मणांत सांगितलेल्या प्रिय, सत्य इत्यादि उपासनांनीं तूं समाहितचित्त झाला आहेस. तूं पूज्य, धनाढ्य, वेदाध्ययन केलेला व आचार्योपदेशानें युक्त आहेस. तूं सर्व ज्ञानसाधनांनीं संपन्न आहेस. त्यामुळें तुला त्यांचा उपदेश करण्याची आवश्यकता नाहीं. आतां तुला जर ज्ञान नसेल तर तेंच सांगणें उचित आहे. यास्तव राजन्, या शरीराचा त्याग केल्यावर रथादिकांच्या स्थानीं असलेल्या या उपासनांनीं समाहितचित्त झालेला तूं कोठें जाशील, कोणत्या वस्तूला प्राप्त होशील तें जाणतोस का?" (राजाला आत्मज्ञान झालें आहे कीं नाहीं, हें जाणण्याच्या इच्छेनें मुनीनें उपासनेचें परंपरा फल–चित्तशुद्धि व ज्ञानप्राप्ति यांच्या द्वारा मिळणारें फल–अशी जी मुक्ति तिच्याविषयींच हा प्रश्न केला आहे.)

राजा जनक म्हणाला–" भगवन्, मरणोत्तर मी कोठें जाऊन कृतकृत्य होईन, तें मला माहीत नाहीं." याज्ञवल्क्य–"राजन्, तूं जेथें जाऊन कृतकृत्य होशील ती वस्तु मी तुला सांगतों." राजा–"आपण कृपा करून ती वस्तु मला सांगा." तेव्हां याज्ञवल्क्य आचार्य विश्व, तैजस व प्राज्ञ यांचा अनुवाद करून तुरीय पदाचें प्रतिपादन करण्यासाठीं प्रथम वैश्वानराभिन्न जागराभिमानी विश्वाचें स्वरूप सांगतात–" हा जो नेत्रांत पुरुष आहे तो इंध म्हणून प्रसिद्ध आहे. स्थूल विषयांचा भोक्ता या रूपानें सदा स्फुरण पावणारा तो जागरितांत दीप्त होतो. त्यालाच वर 'आदित्यान्तर्गत चक्षुर्ब्रह्म' असें म्हटलें आहे. तो 'इंद्र' असतांनाच त्याला परोक्षत्वासाठीं 'इंध' म्हणतात. कारण लोकांप्रमाणेंच देव प्रत्यक्ष नांवाचा द्वेष करणारे असतात. त्यांना परोक्षनांवच आवडतें. याच पुरुषाचें डाव्यानेत्रांतील जें रूप ती या इंद्राची पत्नी विराट् इंद्राणी आहे. तीं दोन्ही मिळून जागरितांतील विश्व आहेत. तेंच दांपत्य स्वप्नांत एकरूप होऊन 'तैजस' या नांवास पात्र होतें. स्वप्न-देशेस प्राप्त झालेल्या त्या इंद्र-इंद्राणींचें हृदयपुंडरीकांतील छिद्र हें समागमस्थान आहे. खालेल्या अन्नाचा

जो अतिशय सूक्ष्म रक्ताकार परिणाम तेंच त्यांचें अन्न आहे. हृदयांत जें हें नाड्यांच्या मुखामुळें जाळ्यासारखें दिसतें तेंच त्यांचें प्रावरण—पांघरूण आहे. हृदयापासून जी ऊर्ध्वमुख नाडी वर जाते तोच त्यांचा स्वप्नांतून जागरितांत येण्याचा मार्ग आहे. एका केंसाचे जसे सहस्रधा विभाग करावे तशा अति सूक्ष्म 'हिता' या नांवाच्या सहस्रावधि नाड्या हृदयपिंडापासून इतस्ततः पसरल्या आहेत. त्या सूक्ष्म नाड्यांच्या द्वारा पूर्वोक्त अतिसूक्ष्म अन्नरस शरीरभर पसरतो व अन्तर्बहिरिंद्रियात्मक लिंगोपाधिक विज्ञानमयाला स्थितीसाठीं व्यापतो. त्यामुळें स्थूलशरीरोपाधिक वैश्वानर आत्म्याहून हा सूक्ष्मशरीरोपाधिक तैजस अतिशय सूक्ष्माहार आहे. वैश्वानरापासून सूत्रात्मक तैजसास प्राप्त झालेल्या त्याचे नासिकाद्वारा बाहेर पडणारे जे प्राण ते प्राची—पूर्व दिशाच झाले. दक्षिण प्राण दक्षिण दिशा, उत्तरेंतील प्राण उत्तर दिशा, पश्चिमेंतील प्राण पश्चिम दिशा व सर्व दिशांतील प्राण सर्व दिशा झाले. म्हणजे ते सर्व प्रत्यक्-कारणात्म्यामध्यें लीन झाले." (याप्रमाणें उपाधिभूत प्राणांचा कारणामध्यें लय दाखविणारी श्रुति त्या उपाधीनें युक्त असलेल्या सूत्राभिन्न तैजसाचाहि प्राज्ञाभिन्न कारणात्म्या ईश्वरामध्यें अर्थात् उपसंहार केला आहे, असें मानून त्या ईश्वरात्मभूत उपासकाचें 'ईश्वरत्व' या उपाधीनें रहित असें स्वरूप 'स एष नेति नेति आत्मा अगृह्यः अशीर्यः०' इत्यादि पूर्वोक्त—पृ.६५१—वाक्यानेंच सांगते. आतां या दोन ब्राह्मणांनीं सांगितलेल्या उपासनामुळें उत्पन्न झालेल्या ज्ञानाचें फल मुनि सांगतो—)"हे जनका, तूं जन्म-मरणादिनिमित्तानें प्राप्त होणाऱ्या भयानें रहित अशा अभय आत्मतत्त्वास निश्चयानें प्राप्त झाला आहेस." (या मुनीनें 'मी तें तुला सांगतों' असें म्हणून ज्याची वर प्रतिज्ञा केली तें मला सांगितलें आहे, पण पूर्वी आपण देऊं केलेली दक्षिणा या ज्ञानाला शोभण्यासारखी नाहीं, असें जाणून राजा म्हणतो—)" मुने, जो तूं मला अभय ब्रह्म सांगत आहेस त्या तुलाहि अभयप्राप्ति होवो. अविद्यापटल दूर सारून साक्षात् आत्म्याचेंच दान करणाऱ्या तुला नमस्कार असो. मी तुला आतां दुसरें काय देऊं? हे विदेहदेश तुझ्या यथेष्ट भोगासाठीं असोत व मीहि तुझें दास्य करण्यास तयार आहें. माझा व या राज्याचा यथेष्ट स्वीकार कर."(२)

त्यानंतर पूर्वोक्त जाग्रदादि-अवस्थांचा आश्रय करून पूर्वोक्त आत्म्याचेंच श्रुत्यनुसारी तर्कानें सविस्तर ज्ञान करून देण्यासाठीं हें तिसरें ज्योतिर्ब्राह्मण

प्रवृत्त झालें आहे. ब्रह्मविद्येच्या स्तुतीसाठीं वगैरे आख्यायिका आहे. याज्ञवल्क्य वैदेह जनकाकडे योगक्षेमासाठीं गेला. जातांना मी राजाला कांहीं सांगणार नाहीं, असा त्यानें मनांत विचार केला होता. पण पूर्वी एकदा जनक व याज्ञवल्क्य यांचा परस्पर अग्निहोत्राविषयीं संवाद झाला होता. त्यावेळीं राजाचें अतिशय विशद विज्ञान पाहून संतुष्ट झालेल्या याज्ञवल्क्यानें त्याला वर दिला. जनकानें वाटेल तो प्रश्न विचारण्याचाच वर मागितला आणि त्याच्या बलावर याज्ञवल्क्य कांहीं बोलत नाहीं असें पाहून जनकानेंच प्रथम प्रश्न केला—'याज्ञवल्क्या, हा शरीरेंद्रियसंघातरूप पुरुष कोणत्या ज्योतीनें अनुगृहीत होत्साता आपला आसन-भाषण-गमनादि व्यवहार करतो?' याज्ञवल्क्य—'चक्षूवर अनुग्रह करणाऱ्या पण देहेंद्रियादिकांहून भिन्न अशा आदित्यज्योतीनें तो बसणें, गमन करणें, परत येणें इत्यादि व्यवहार करतो.' जनक म्हणतो—'देहादिकांहून अगदीं भिन्न अशा ज्योतीनेंच त्याचा व्यवहार होतो ही गोष्ट खरी आहे. पण सूर्याचा अस्त झाल्यावर हा कोणत्या ज्योतीनें व्यवहार करितो?' उत्तर—'चंद्रमा या ज्योतीनें त्याचा सर्व व्यवहार होतो.' प्रश्न—'आदित्य व चंद्र या दोहोंचाहि अस्त झाल्यावर?' उत्तर—'अग्नि या ज्योतीनें.' प्रश्न—'आदित्य व चंद्र या दोहोंचा अस्त होऊन अग्नीहि शांत झाल्यावर तो कसा व्यवहार करतो?' उत्तर—'शब्दानें.' प्रश्न—'आदित्य व चंद्र यांचा अस्त व अग्नि आणि पाणी यांचा उपशम झाल्यावर याचा कसा व्यवहार होतो? अर्थात् जाग्रदवस्था सोडून स्वप्नादि दशेंत गेल्यावर तो कोणत्या ज्योतीनें व्यवहार करतो?' उत्तर—'राजन्, आत्मा या ज्योतीनेंच त्याचा व्यवहार चालतो.' प्रश्न—'पण व्यवहारांत बुद्ध्यादि अनेक पदार्थ दिसतात, त्यांतील आत्मा कोणता?' उत्तर—"जो हा ज्ञानेंद्रियें, कर्मेंद्रियें व पंचप्राण यांच्या समीप असणारा बुद्धिस्थ विज्ञानप्रचुर आत्मा, त्याच ज्योतीनें त्याचा व्यवहार चालतो. अर्थात् तो या सर्वांहूनहि भिन्न आहे. तथापि तो बुद्ध्यादिकांसारखा होऊन हा लोक व परलोक यांतून क्रमानें संचार करतो. हा बुद्ध्यादिकांच्या द्वारा पूर्वदेह टाकून दुसरा देह घेतो. स्वतः कशाचा त्याग करीत नाहीं व कशाचें ग्रहण करीत नाहीं. ध्यान हा बुद्धीचा व्यापार आहे. पण बुद्धीमध्यें असणारा तो त्याला प्रकाशित करीत असल्यामुळें तोच ध्यान करतो, असें भासतें. त्याचप्रमाणें बुद्ध्यादि इंद्रियें व प्राणादि वायु

चलन करूं लागले असतां त्यांचा अवभासक या रूपानें त्यांच्यासारखा होऊन हा जणुं काय चलनच करतो. पण वस्तुतः ध्यान व चलन या त्याच्या क्रिया नव्हेत. कारण तो स्वप्नाकार परिणत झालेल्या बुद्धिवृत्तींच्या अवभासकत्वामुळें स्वप्नाकार होऊन जाग्रद्व्यवहाररूप या लोकाला सोडतो. म्ह० शरीरेंद्रियांवरील अभिमान टाकतो. त्याचप्रमाणें अहंकारादि मृत्युरूपांचेंहि उल्लंघन करतो. त्यामुळें तें त्याचें स्वाभाविक स्वरूप नव्हे" (ज्याप्रमाणें स्वप्न व जागृति यांतून संचार करणाऱ्या आत्म्याचें देहादिकांहून भिन्नत्व सिद्ध होतें, त्याचप्रमाणें इहलोक व परलोक यांतून त्याचा संचार होत असल्यामुळेंहि तो देहादि-कांहून भिन्न आहे, असें सांगतात—) " हा पुरुष उत्पन्न होणारा म्ह० घटादि पदार्थांप्रमाणें पूर्वी नसून होणारा नाहीं. तर तो शरीरादिकांवर ' हा मी ' असा अभिमान ठेवणारा असल्यामुळें शरीरेंद्रियादि-धर्माधर्मकार्यांनीं संयुक्त होतो व तोच पुनः देहादिकांच्या आरंभाला कारण होणाऱ्या कर्माचा क्षय झाला असतां शरीर सोडून जातो. त्या मरणसमयीं तो पूर्व शरीरेंद्रियांचा केवल अभिमानत्यागानेंच परित्याग करतो. या पुरुषाचीं हा लोक व परलोक अशीं दोनच स्थानें आहेत. प्रस्तुत जन्म व पुढील जन्म हींच तीं दोन स्थानें असून त्यांच्या संधीमध्यें होणारें तिसरें स्वप्नस्थान आहे. त्यांत राहून हा ती दोन्हीं स्थानें पहातो. ' कशाच्या आश्रयानें व कोणत्या प्रकारें तो तीं पाहतो ' म्हणून विचारशील तर सांगतो. परलोक स्थानाच्या प्राप्तीचें निमित्त उद्भवलें असतां तो विद्या, कर्म व पूर्वप्रज्ञा, एतद्रूप जशा प्रकारच्या आश्रयानें युक्त होतो, तशाच बीजभूत आश्रयाचें आक्रमण करून अधर्माचें फल दुःख व धर्माचें फल सुख तो पाहतो. धर्मामुळें किंवा देवताप्रसादानें अंत्य वयामध्यें या लोकीं असंभाव्य असलेलेंहि जें कांहीं तो स्वप्नांत पाहतो तेंहि पारलौकिकच होय. तो जेव्हां झोंपतो व स्वप्नाचा अनुभव घेतो तेव्हां या जाग्रद्रूप देहांतून वासनात्मक इंद्रियांश काढून घेऊन, जाग्रत्-देहाला निश्चेष्ट करून, स्वकर्मा-नुसार प्रातिभासिक स्वप्नदेह निर्माण करून, अंतःकरणवृत्तींतील प्रकाशानें आपल्या आत्मज्योतीनें निर्माण केलेल्या वस्तूला पहात राहतो. त्यावेळीं हा पुरुष स्वयंज्योति होतो. स्वप्नांत रथ, घोडे किंवा मार्ग नसतात, पण तो वासनात्मक रथादि पदार्थांना उत्पन्न करतो. पुत्रादिकांच्या संसर्गानें होणाऱ्या आनंदांचा

अनुभव घेतो. तेथें नद्या, सरोवरें, तडाग वगैरे नसतात, तथापि तो जीवात्मा त्यांना आपल्या वासनांनीं उत्पन्न करतो. त्यांच्या साक्षित्वानेंच तो त्यांचा कर्ता होतो. याच अर्थी 'स्वप्नेन शारीरं अभिप्रहत्य०'–पृ. ६७२–इत्यादि मंत्र आहेत. 'व्यवहारांतहि गाढ झोंप घेत असलेल्या पुरुषाला एकाएकीं जागें करूं नये,' असें वैद्य सांगतात. कारण त्याला एकाएकीं उठविल्यास ज्या प्रदेशांतून इंद्रियांच्या शक्ति घेऊन तो निजलेला असतो त्याच प्रदेशास कदाचित् प्राप्त होणार नाहीं. त्यामुळें अंधत्वादि दोषहि संभवेल व त्यावर औषधोपचार करणें फार कष्टकर होईल. कित्येक असें म्हणतात कीं, हा आत्मा जागृतींत जे पदार्थ पाहतो तेच निजल्यावरहि पहातो. पण त्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण स्वप्न ही जागृताहून अगदीं पृथक् अवस्था आहे. या अवस्थेंत पुरुष स्वयंज्योति होतो." त्यावर राजा म्हणतो–"मी आपल्याला एक सहस्र गायी देतों. आपण मला हा मोक्षाचा एकदेशच सांगितला आहे. यास्तव पुढील अवशिष्ट भागहि सांगा. मोह, त्रास इत्यादिकांना उत्पन्न करणारा कर्माख्य मृत्यु हा आत्म्याचा स्वभाव कसा नव्हे तेंच मला सांगा." देह, इंद्रियें, मन, बुद्धि, प्राण व अहंकार यांहून आत्म्याचें स्वरूप अगदीं विलक्षण आहे, असें जरी येथवर सांगितलें आहे, तरी भयाचें निमित्त अशा काम-कर्मादि सकलसंसारधर्मातीत स्वरूप सांगितलेलें नाहीं. यास्तव तिन्ही अवस्थांतील त्याचें सर्व संसारधर्मातीत स्वरूप सांगण्यासाठीं मुनि पुनः म्हणतो–'तो स्वप्न पाहणारा स्वयंज्योति आत्मा स्वप्नांत क्रीडा व विहार करून सुख-दुःखांचा अनुभव घेऊन संप्रसन्न होतो. म्ह० सुषुप्तस्थानीं जातो. तेथेंहि आनंदानुभव घेऊन पुनः गेलेल्या मार्गानें परत येतो. तो त्या त्या अवस्थेमध्यें जें जें कांहीं पहातो, त्यानें बद्ध होत नाहीं. कारण हा पुरुष असंग आहे. सुषुप्त स्थानांत गेल्यावर तो कर्माख्य मृत्यूचें उल्लंघन करतो.' राजा–'भगवन्, आपण सांगतां त्याप्रमाणें स्वप्नादिकामध्यें आत्मा कर्मांशीं असंबद्धच आहे. मी या एकदेशी ज्ञानासाठीं आपल्याला एक सहस्र गायी देतों. मला मोक्षासाठीं सम्यग्ज्ञानाचा उपदेश करा.' तेव्हां मुनि म्हणतो–'तो हा या स्वप्नांत रममाण होऊन व विहार करून पुण्यफल व पापफल नुस्तें पाहूनच गेलेल्या मार्गानें पुनः जागरणासाठीं परत येतो. तो तेथें–स्वप्नांत जें

कांहीं पाहतो त्यानें अनन्वागत—असंबद्धच असतो. कारण हा पुरुष असंग आहे. त्याच न्यायानें हा या जागरावस्थेंत क्रीडा-विहारादि करून कर्मप्राप्त सुख-दुःख पाहून पुनः सुषुप्तीसाठीं किंवा स्वप्नदर्शनासाठीं आल्या मार्गानें परत जातो. याप्रमाणें स्वप्न व जागर यांतून संचार करीत असलेलाहि हा आत्मा असंग असल्यामुळें त्या त्या अवस्थेच्या धर्मांनीं युक्त होत नाहीं. याविषयीं दृष्टान्त- नदीच्या प्रवाहानें ज्याला अवश केलेलें नाहीं असा स्वतंत्र महा मत्स्य—मोठा मासा त्या नदीच्या दोन्ही तीरांवर स्वेच्छेनें संचार करितो त्याप्रमाणें हा आत्मा स्वप्न व जागरित या दोन्हीं अवस्थांमध्यें स्वातंत्र्यानें व स्वेच्छेनें संचार करितो. महा मत्स्य जसा त्या नदीप्रवाहाहून भिन्न आहे त्याप्रमाणें हाहि त्या अवस्थांहून भिन्न व त्या अवस्थाधर्मांशीं असंसृष्ट आहे. (आत्मा सुषुप्तावस्थेहून विलक्षण आहे असें सदृष्टान्त सांगतात—) जसा एखादा महाशरीरी व मंदगति श्येन किंवा अल्पशरीरी व मोठा वेगवान् पक्षी आकाशांत नानाप्रकारें गमन करून श्रांत झाला असतां दोन्ही पंख पसरून विश्रांतीसाठीं आपल्या घरट्याकडे स्वतःच यावयास निघतो तसाच हा पुरुष जाग्रत् व स्वप्न या अवस्थांमध्यें धर्माधर्मानुसार परिभ्रमण करून श्रान्त झाला असतां त्या दोन्ही अवस्थांचें ज्यांत पर्यवसान होतें, अशा अज्ञात ब्रह्मामध्यें प्रवेश करितो. त्या अज्ञात ब्रह्मामध्यें प्रवेश केल्यावर तो कोणत्याहि विषयाची इच्छा करीत नाहीं किंवा कोणतेंहि स्वप्न पहात नाहीं. (याप्रमाणें दोन शरीरें, दोन अवस्था व त्यांतील धर्म यांच्याशीं आत्म्याचा स्वाभाविक संबंध नाहीं. कारण तीं सर्व स्वकारणभूत अव्याकृतसंज्ञक अविद्यामात्रव्यवहित सुषुप्तांत लीन झालेलीं असतात, असें सांगितलें. आतां आत्म्याचा अविद्यासंबंधहि स्वाभाविक नाहीं असें सांगतात—)अतिशय सूक्ष्म केशविभागासारख्या ' हिता-'नांवाच्या अति सूक्ष्म नाड्या आहेत. त्या शुक्ल-नीलादि वर्णाच्या रसानें भरलेल्या असतात. त्यांत अविद्याकार्यभूत लिंगशरीर राहूं लागलें असतां त्या स्वप्नसमयीं स्वप्नद्रष्ट्याला चोर जणुंकाय मारतात, कोणी त्याला दास बनवितात, हत्ती मागें लागतो, तो जणुंकाय मोठ्या गर्तेंत पडतो, तात्पर्य तो जागरितांत जें जें भय निमित्त पाहतो तेंच स्वप्नांत अधर्मानें प्रकाशित केलेल्या वासनात्मक अविद्येनें पाहतो, त्याचप्रमाणें धर्मोद्भासित वासनात्मक अविद्येनें म्ह० जाग्रतींतील देवतो

पासनादिजन्य वासनेनें मी देव आहें, महाराजा आहें, असें पाहतो, फार काय पण जाग्रतींतील आत्मज्ञानाच्या वासनेनें वासित झालेला हा स्वप्नद्रष्टा स्वप्नांत 'हें सर्व मींच चिन्मात्र आहें, माझ्याहून भिन्न कांहीं नाहीं, त्यामुळें मी पूर्ण आहें, सर्व आहें' असें मानतो. आत्म्याचा हा सर्वात्मभाव पूर्वोक्त लोकांहून अतिशय श्रेष्ठ पूर्ण लोक आहे. तो विद्येनें संपादन केलेला असल्यामुळें स्वाभाविक आहे. (म्हणूनच येथें पूर्वीप्रमाणें ' इव '—जणुंकाय असें म्हटलें नाहीं. हा आत्मलोक अविद्यावानांच्या सुषुप्तीचा आश्रय करून प्रकट करितात—) सर्वात्मभावास प्राप्त झालेल्या पुरुषाचें हें कामशून्य, धर्माधर्मादि पापशून्य व भयशून्य रूप आहे. (' अहोपण, सुषुप्तींत अविद्या-काम-कर्मादिकांप्रमाणें स्वयंज्योतिष्ट्वहि प्रतीत होत नाहीं. त्यामुळें अविद्यादिकांप्रमाणेंच तेंहि आत्माचें स्वाभाविक स्वरूप नव्हे ' अशी शंका घेऊन स्वयंज्योतिष्ट्वाचा प्रत्यय न येण्याचें कारण सदृष्टान्त सांगतात—)प्रिय भार्येनें दृढ आलिंगन दिलेल्या व संयोगसुखाचा अनुभव घेणाऱ्या कामी पुरुषाला त्यावेळीं बाहेरच्या कशाचें भान नसतें व शरीरांतील दुःखाचेंहि भान नसतें त्याच न्यायानें जलचंद्राप्रमाणें शरीरेंद्रियांत प्रविष्ट झालेला हा क्षेत्रज्ञ पुरुष उपाधीचा विलय झाल्यामुळें स्वाभाविक अविद्यासाक्षी प्राज्ञाशीं अत्यंत एकीभूत होतो. त्यामुळें तो सर्वात्मा बाह्य स्वभिन्न अनात्म्यालाहि जाणत नाहीं व आंतीलहि कांहीं जाणत नाहीं, त्याच्या स्वरूपभूत स्वयंज्योतिष्ट्वाचा अभाव होतो, म्हणून तो जाणत नाहीं, असें नव्हे. (याप्रमाणें प्रासंगिक शंकेचें निरसन करून प्रकृत कामरहित वाक्यांत सांगितलेलें रूपच स्पष्ट करितात—) सुषुप्तींत सर्वात्मत्वाला प्राप्त झालेल्या आत्म्याचें रूप आप्तकाम—ज्यांत सुखादि सर्व काम प्राप्त आहेत असें आहे. (तरमग तें हिरण्यगर्भासारखें असेल ? उत्तर—) त्या विज्ञान-आनंदरूप ब्रह्मामध्यें आत्मा हाच सुखसाक्षात्काररूप काम आहे. तें रूप आत्मकाम होय. त्यामुळेंच तें इतर अनात्मकामरहित आहे. त्यामुळेंच तें शोकशून्य आहे. (याप्रमाणें प्रत्यक्ष कामादिसंबंधराहित्य सांगून आतां त्याचें निमित्त असा जो कर्माख्य अविद्यासंबंध त्याचाहि अभाव सांगतात—) या सुषुप्त स्थानांत प्रकृतरूप आत्म्याचा लौकिक पिताहि अपिता, माता अमाता, लोक अलोक वगैरे होतात. म्ह० ज्या ज्या कर्मनिमित्तानें जो जो पिता-माता-लोक-जाति-आश्रम इत्यादि संबंध होतो तो तो त्यावेळीं निवृत्त

होतो. तें प्रकृत आत्मस्वरूप शास्त्रविहित पुण्य कर्मांशीं असंबद्ध आहे. विहित आचरण न करणें व अविहिताचरण करणें एतद्रूप पापकर्मांशींहि तें असंबद्ध असतें. कारण सुषुप्तस्थानांत तें आत्मरूप बुद्धिसंबंधी सर्व शोकांचें निमित्त अशा सर्व कामांचें उल्लंघन केलेलें असें होतें.

(परस्पर दृढ आलिंगन दिलेल्या स्त्री-पुरुषांच्या दृष्टान्तानें सुषुप्तींत एकीभूत झाल्यामुळें विशेष विज्ञानाचा अभाव होतो, स्वाभाविक स्वयंज्योतिष्ट्वाचा अभाव झाल्यामुळें नव्हे, असें जें वर सांगितलें तेंच प्रश्नपूर्वक स्पष्ट करितात—) "सुषुप्त्यवस्थेंत आत्मा पहात नाहीं, असें जें तूं समजतोस, तें बरोबर नाहीं. कारण तो स्वरूपचैतन्यानें सर्वसाक्षी असल्यामुळें पहात असूनच विषयभूत पदार्थांना पहात नाहीं. म्हणजे तो स्वरूपाला पाहतो; पण विषयाला पहात नाहीं. कारण द्रष्ट्याची जी सर्वसाक्षिभूत दृष्टि किंवा कूटस्थचिन्मात्ररूपाची जी स्वरूपभूत दृष्टि तिचा विनाश संभवत नाहीं. कारण ती अविनाशी आहे. म्ह० विनाशाला कारण होणारा जो परिणाम त्यानें ती रहित आहे. 'तर मग विषयाला कां पहात नाहीं,' म्हणून म्हणशील तर सांगतों—सुषुप्तींत आत्मस्वरूपाहून भिन्न असें साभास अंतःकरणरूप प्रमातृस्वरूप, आत्मस्वरूपाहून भिन्न असें चक्षुःश्रोत्रादिरूप करणजात—प्रमाण व आत्मभिन्न रूपादिलक्षण प्रमेय नाहीं, कीं ज्याला प्रमाता प्रमाणानें पाहील! वास घेणें, रसस्वाद घेणें, भाषण करणें, श्रवण करणें, मनन करणें, स्पर्श करणें, विज्ञान होणें, इत्यादि सर्व क्रियांना हाच न्याय लागूं आहे. कारण सुषुप्तींत आत्मस्वरूपाहून भिन्न अशी घ्राता घ्राण-घ्रेय, रसयिता-रसना-रस्य, वक्ता-वाक्-वक्तव्य इत्यादि कोणतीच त्रिपुटी नसते. त्यामुळें त्या अवस्थेंत आत्म्याला स्वरूपदर्शन असूनहि विशेषज्ञान होत नाहीं. (याप्रमाणें सुषुप्तींत अविद्याजन्य द्वैताचा अभाव असल्यामुळें विशेषविज्ञानाचा अभाव असतो, असा व्यतिरेक दाखवून जागृतींत किंवा स्वप्नांत द्वैत विद्यमान असल्यामुळें विशेषविज्ञान होतें, असा अन्वय दाखवितात—) पण ज्या अवस्थेंत जणुंकाय आत्मभिन्न वस्तु अविद्येकडून प्रत्युपस्थापित केली जाते तेव्हां अन्य प्रमाता आपल्याहून भिन्न रूप पाहतो, आत्मभिन्न शब्द ऐकतो, जणुंकाय भिन्न रसाचा स्वाद घेतो, स्वभिन्न गंधाचा वास घेतो, भिन्न रूप जाणतो, भिन्न वक्तव्य बोलतो. शुद्ध जलामध्यें दुसरें प्रतिबिंब पाहणारा

वस्तुतः एकच असतो, तसाच हा प्रकार आहे. राजा, सुषुप्त्यवस्थेला प्राप्त झालेला हा प्रत्यगात्माच ब्रह्मलोक आहे, तें स्वयंज्योतिःस्वरूप ब्रह्मच आहे," असा याज्ञवल्क्यानें जनकाला उपदेश केला. या बुद्ध्युपाधिक विज्ञानमयाची हीच परमा—नैष्ठिकी गति आहे. ब्रह्मादि दुसऱ्या सर्व गति 'अपरमा' आहेत. कारण त्यांचें या गतींतच पर्यवसान होतें. विज्ञानमयाची हीच परमविभूति आहे. हाच या विज्ञानमयाचा परम मोक्षरूप लोक—स्वयंज्योतिःस्वभाव आहे. या सुषुप्त विज्ञानमयाचा हाच स्वरूपानुभवरूप परम—कोणत्याहि साधनानें साध्य न होणारा—निरतिशय आनंद आहे. याच परम आनंदाच्या मात्रेवर म्ह० विषयेंद्रियसंयोगकाली भासणाऱ्या सुखाच्या लेशावर ब्रह्मादि-स्तंबपर्यंत अन्य भूतें उपजीविका करितात. (त्यानंतर मनुष्यापासून हिरण्यगर्भापर्यंत उत्तरोत्तर शतपट अधिक असलेल्या आनंदांचें वर्णन करून त्याच्या द्वारा याज्ञवल्क्यांनीं याच परमानन्दाचा बोध केला आहे. त्याच्या वर्णनाचा प्रकार प्रायः तैत्तिरीयांतील आनंदाच्या मीमांसेसारखाच आहे.) हे राजन्! सुखाच्या या परमोत्कर्षाची गति जेथें कुंठित होते तोच हा परमानंद निरतिशय असून तो प्रत्यगात्म्याच्या स्वरूपभूत आहे. निष्काम व निष्पाप श्रोत्रियाच्या साक्षात अनुभवास येणारा हा आनंद ब्रह्मस्वरूपभूत लोक आहे."

त्यावर जनक पुनः म्हणतो—"भगवन्, मी आपल्याला या ज्ञानासाठीं सहस्र गायी देतों. यापुढें मोक्षसाधनाचाच मला उपदेश करा." हें ऐकून याज्ञवल्क्याला भीति वाटली. हा बुद्धिमान् राजा वाटेल तो प्रश्न करण्याविषयींच्या वराच्या मिषानें माझें सर्व ज्ञान ग्रहण करण्यासाठीं मला अडवीत आहे, हें त्याच्या ध्यानांत आलें. तथापि आपलें वरदान पूर्ण करण्यासाठीं तो पुनः म्हणतो—"याप्रमाणें हा या स्वप्नांत रममाण होऊन व विहार करून पुण्य-पापफलाचा अनुभव घेऊन पुनः गेल्या मार्गानें जागरावस्थेंत परत येतो. (स्वप्नांतून जागृतींत येण्याप्रमाणेंच तो या लोकांतून लोकांतरीं जातो हें दृष्टान्तपूर्वक सांगतात—) व्यवहारांत जसा एखादा सामानानें अतिशय लादलेला गाडा मोठ्यानें आवाज करीत जातो त्याप्रमाणें हा स्थूल शरीरांतील पुढें सांगितलेल्या विद्यादिसंभारानें संपन्न झालेला आत्मा—लिंगशरीर सूर्यानें आपल्या प्रतिबिंबाच्या द्वारा व्यापलेल्या जलपात्राप्रमाणें, स्वयंज्योतिःस्वभाव आत्म्याकडून आपल्या चिदा-

भासाच्या द्वारा अधिष्ठित—व्याप्त होत्साता मरणकालच्या वेदनांनीं आर्त होऊन नानाप्रकारचे शब्द करीत—उचक्या वगैरे देत जातो. (केव्हां जातो ? उत्तर—) जेव्हां हा ऊर्ध्वोच्छ्वासी होतो तेव्हां तो आर्त शब्द करीत शरीर सोडून जातो. (आतां तो ऊर्ध्वोच्छ्वासी तरी केव्हां होतो तें सांगतात—) हा हस्त-पाद-मस्तकादि अवयवांनीं युक्त असलेला देह जेव्हां जरेनें किंवा ज्वरादि-रोगानें अत्यंत कृश—निर्बल होतो तेव्हां आर्तशब्द करीत शरीर सोडून जातो. ज्याप्रमाणें आंबा किंवा उदुंबर फल वारा सुटणें, दगड लागणें इत्यादि निमित्तानें देंठापासून सुटतें तसा हा लिंगात्मा चिदाभासाकडून प्रकाशित होत्साता चक्षु-रादि देहावयवांपासून सर्वथा मुक्त होऊन—पूर्णपणें एकत्वास प्राप्त होऊन जसा शरीरांत आला होता तसाच—त्याच मार्गानें भिन्न भिन्न योनीस प्राप्त होतो (कशासाठीं ? उत्तर—) सर्व प्राणांना दुसऱ्या नवीन देहांत त्यांच्या त्यांच्या स्थानी स्थापून राहण्यासाठीं म्ह० दुसरें शरीर घेण्यासाठीं जातो. (पण याच्या दुसऱ्या शरीराची सिद्धि कोणत्या कारणानें होतें ? उत्तर—) ज्याप्रमाणें राजा येत आहे असें कळतांच त्याचे सेवक अन्न-पान-गृह इत्यादि पदार्थ तयार करून 'हा आला, हा येत आहे' अशी वाट पहात राहतात त्याप्रमाणें कर्मफलास प्राप्त होणाऱ्या या संसारी जीवाची—त्याच्या कर्मांकडूनच प्रेरित झालेलीं शरीरा-रंभक भूतें व इंद्रियांवर अनुग्रह करणाऱ्या आदित्यादि देवता, त्याच्या भोगाचें साधन शरीरादिक तयार करून, वाट पाहतात. देहादि-आकारानें परिणत झालेल्या आपल्यामध्यें आत्म्याच्या अभिव्यक्तीची आकांक्षा करितात. 'हें आमचें भोक्तृ व कर्तृ ब्रह्म—संसारी जीवतत्त्व येत आहे, हें आलें,' अशी प्रतीक्षा करि-तात. (या दृष्टान्तांत 'आत्म्याचीं शरीरारंभक भूतें विद्यमान असतात' एवढाच अंश विवक्षित आहे. राजाच्या भृत्यांप्रमाणें अगोदर तीं देह तयार करितात व मंग राजाप्रमाणें आत्मा त्यांत येऊन राहतो, हा अंश विवक्षित नाहीं. कारण शरीरारंभक भूतांसहवर्तमानच जीव जातो, असा ब्रह्मसूत्रांत सिद्धान्त केला आहे. सु. ब्र. पृ. २५२—पहा. असो; आतां लोकान्तरीं जाणाऱ्या संसारी आत्म्याच्या मागोमाग कोण कसे जातात तें दृष्टान्तपूर्वक सांगतात—) राजा कोठें जाऊं लागला असतां त्याच्या खास परिवारांतील भृत्यादिक त्याच्याबरोबर जाण्यासाठीं जसे सर्व एकत्र जमून त्याच्या संमुख येतात त्याप्रमाणें भोक्ता

—आत्मा शरीर सोडून जाऊं लागला असतां मरणसमयीं वागादि सर्व प्राण त्यानें न बोलावितांच त्याच्या कर्मानें प्रेरित होत्साते त्याच्या संमुख येतात. वर सांगितल्याप्रमाणें जेव्हां हा ऊर्ध्वोच्छ्वासी होतो तेव्हां हें असें घडतें. (३)

'शरीरावयवांपासून पूर्णपणें मुक्त होऊन' इत्यादि सूत्रभूत वाक्यानें वैराग्यासाठीं वर जो देहत्याग सांगितला तो केव्हां व कसा होतो तें सविस्तर सांगण्यासाठीं हें शारीर ब्राह्मण प्रवृत्त झालें आहे. हा प्रकृत संसारी आत्मा जेव्हां जरा-रोगादि कारणानें अत्यंत दुर्बल होऊन जणुंकाय संमोहास—अविवेकतेस प्राप्त होतो तेव्हां वागादि सर्व प्राण एकरूप होऊन या करणस्वामीच्या संमुख येतात. तेव्हां तो अविद्वान् संसारी आत्मा त्या सर्व तेजोमात्रांना—इंद्रियांना पूर्णपणें—निःशेष आकर्षण करून घेऊन हृदयस्थ बुद्धींत जातो. म्ह० बुद्धींत ज्याचें विज्ञान अभिव्यक्त झालें आहे, असा होतो. भोक्त्याच्या कर्माचा क्षय झाला असतां जेव्हां चाक्षुष पुरुष म्ह० आदित्यांश भोक्तृवर्गापासून विमुख होऊन आपल्या अंशिभूत देवतारूपाकडे परत येतो तेव्हां त्या मुमूर्षूला रूपज्ञान होत नाहीं. याप्रमाणें आदित्याचा अंश आदित्यांत जाऊन मिळाला असतां चक्षु लिंगात्म्याशीं एकरूप होतो. त्यामुळें तो त्याच्या शरीराजवळ बसलेल्या लोकांना पहात नाहीं, त्याला कशाचा वास कळत नाहीं, तो शब्द ऐकत नाहीं, असें लोक ह्मणतात. त्यानंतर ज्यानें सर्व इंद्रियांचा स्वात्म्यामध्यें उपसंहार केला आहे अशा त्या प्रकृत लिंगोपाधिक मुमूर्षूच्या हृदयछिद्राचें नाडीमुख स्वप्नाप्रमाणें चैतन्यज्योतीनें प्रकाशित होतें. भाविदेहाविषयींच्या बुद्धिवृत्तिरूपानें प्रकाशमान होतें. त्या प्रकाशानें प्रकाशित होणारा हा लिंगोपाधि आत्मा शरीरांतून बाहेर पडतो. (त्या प्रकाशानें पुढील कर्मार्जित लोकाला पाहणारा तो आत्मा मरणसमयीं हृदयापासून कोणत्या मार्गानें बाहेर जातो ? उत्तर—) जर आदित्य-लोकप्राप्तीला निमित्त होणारें त्याचें ज्ञान व कर्म असेल तर तो चक्षुर्द्वारा बाहेर पडतो. ब्रह्मलोकप्राप्तिनिमित्त ज्ञान-कर्म असल्यास ब्रह्मरंध्रद्वारा निघतो. किंवा त्याला ज्ञान-कर्मानुसार जेथें जावयाचें असेल त्याच्या अनुसार तो श्रोत्रादिद्वारा निघतो. याप्रमाणें उत्क्रमण करणाऱ्या राजस्थानीय विज्ञानमयाच्या मागोमाग प्रधानस्थानीय प्राण उत्क्रमण करितो. मुख्य प्राणाच्या मागोमाग परिवारस्थानीं असलेले वागादि सर्व प्राण उत्क्रमण करितात. (येथील अनु

—मागोमाग हा शब्द विज्ञानमयाचें केवल प्राधान्य सुचविणारा आहे. अगोदर विज्ञानमय, त्याच्या मागून प्राण, प्राणानंतर वागादिक असा क्रम येथें विवक्षित नाहीं. कारण त्याचा येथें असंभव आहे. विज्ञानमय त्या सर्वांना घेऊन एकदम उत्क्रमण करितो. आतां पूर्वोक्त हृदयाग्रप्रकाशनच स्पष्ट करितात—) उत्क्रमणाचे वेळीं मुमूर्षु विज्ञानासह-कर्मापासून उद्भवलेल्या संस्कारजनित विज्ञानानें युक्त होतो. ज्ञान-कर्मसंस्कारामुळें उत्पन्न झालेल्या भावि-देहाविषयींच्या विज्ञानानें—अंत्यमतीनें स्वप्नाप्रमाणें तो विशेष विज्ञानवान् होतो व त्या भाविदेहविषयक विशेष विज्ञानानें प्रकाशित केलेल्या गन्तव्य प्रदेशालाच तो जातो. (पण तो आपल्या बरोबर काय नेतो ? उत्तर—) प्रमाण व अप्रमाण यांपासून झालेलें विहित-प्रतिषिद्धादिरूप व दृष्ट किंवा अदृष्ट फल देणारें शास्त्रीय, लौकिक व स्वाभाविक कायिक-वाचिक-मानसिक सर्व कर्म आणि पूर्वप्रज्ञा म्ह० त्या ज्ञान-कर्मापासून झालेले हृदयस्थ फलभोगजनित संस्कार ही सामुग्री त्याच्या बरोबर जाते. यास्तव शुभ ज्ञान, शुभ कर्म व शुभ संस्कारच शुभफलासाठीं संपादन करावे. ''

(असा त्रिविध संभार बरोबर घेऊन दुसऱ्या देहास प्राप्त होणारा हा संसारी त्या देहाला कसा प्राप्त होतो तें सांगतात—) ''जशी तृणावरील कीड—जळू ज्या तृणावर असते त्याच्या टोंकावर जाऊन दुसरें तृण पुढील पायांनीं धरून मागील तृण सोडते त्याप्रमाणें हा आत्मा या पूर्वशरीराला स्वप्नाप्रमाणेंच अचेतन करून पुढील प्राप्त होणाऱ्या शरीराचा वासनेनें आश्रय करून 'तेंच शरीर मी आहें,' असा आत्मभाव धारण करितो. पूर्वशरीरावरील आत्मभाव टाकणें हाच शरीरत्याग व भावी शरीरावर आत्मभाव ठेवणें, हेंच याचें शरीरग्रहण आहे.(असो; पंचभूतांपासून होणारा त्याचा देह एकदा ग्रहण केलेल्या भूतांचाच पुनः पुनः होतो, किंवा प्रत्येक शरीराचे वेळीं नवीन भूतांपासून तो केला जातो ? उत्तर—) जसा सोनार जुन्या अलंकारांतील सोनें काढून घेऊन त्याचाच दुसरा नवा सुंदर अलंकार घडवितो, त्याप्रमाणें हा संसारी आत्मा पूर्वोपात्त पंचभूतांचाच नवा देह निर्मितो. त्याला आपल्या कर्माप्रमाणें व ज्ञानाप्रमाणें पितृलोक, गंधर्वलोक, देवलोक, ब्रह्मलोक किंवा त्यांहून उत्तरोत्तर हीन प्रेत-मनुष्य-तिर्यक्-नारकादि योनि यांतील ज्यामध्यें शरीर धारण करावयाचें असेल त्यांतील सुखदुःखोपभोगाला

सर्वथा योग्य असें शरीर तो उत्पन्न करितो. (पण आत्म्याचा हा संसारधर्म खरा नव्हे. औपाधिक आहे. यास्तव निरुपाधिक स्वरूप प्रदर्शित करणारे मुनि सर्व उपाधींचा एकत्र अनुवाद करितात—) तो हा संसारी आत्मा सर्व उपाधिशून्य, अशनाया-पिपासादि संसारधर्मरहित ब्रह्म—परमात्माच असतांना बुद्धि—विज्ञान या उपाधीशीं ऐक्याध्यास पावून बुद्धिमय—विज्ञानमय होतो. तसाच तो मनाच्या सांनिध्यामुळें मनोमय, प्राणोपाधीमुळें प्राणमय, चक्षुःश्रोत्रमय, पृथिव्यादि भूतमय, तेजोमय-अतेजोमय, धर्ममय-अधर्ममय, व्यक्तमय अव्यक्तमय इत्यादि सर्वमय होतो. ज्याचें जसें कर्म व शील असतें तसा. तो होतो. अग्निहोत्रादि साधु—पुण्यकर्म करणारा पित्रादिलोकांत उत्कृष्ट होतो व पापाचरण करणारा स्थावरादि लोकांत निकृष्ट होतो. पुण्यकर्मानें पुण्यवान् होतो, पापकर्मानें पापी होतो. तथापि या सर्व संसाराचें असाधारण कारण काम आहे.हा पुरुष काममय—विषयेच्छामय आहे,असें बंध मोक्षकुशल पुरुष ह्मणतात. याप्रमाणें सामान्यतः काममय असलेला हा पुरुष जशा विशेष कामानें युक्त होतो तसाच कर्मनिश्चय करितो. कर्मनिश्चयानुसार कर्म करितो व जसें कर्म करितो तशाच त्याच्या फलास प्राप्त होतो. याच अर्थाचें प्रतिपादन करणारा ' तदेव सक्तः सह कर्मणैति० ' हा मंत्र आहे. —पु.६९१पहा. याप्रमाणें सकाम पुरुष जन्म-मरण-सुख-दुःखप्राप्तिरूप संसार करितो. (येथवर जागरित व स्वप्न या दृष्टान्तांचा दार्ष्टान्तिकभूत संसार सांगितला. आतां सुषप्तींत सांगितलेल्या रूपाचा दार्ष्टान्तिकभूत मोक्ष साधनासह सांगतात—) कामी पुरुषच संसार करितो. अर्थात् अकामयमान संसार करीत नाहीं. कारण तो शब्द-स्पर्शादि बाह्य विषयांविषयींच्या इच्छेनें रहित असतो. कारण त्याच्या ठिकाणीं हृदयस्थ वासनात्मक कामहि नसतात. कारण तो आप्तकाम असतो. त्याला सर्व कामांची प्राप्ति झालेली असते.कारण आत्माच त्याचा काम असतो. हिरण्यगर्भापर्यंत दुसऱ्या कोणत्याहि शरीराचा काम—अभिलाष त्याच्या ठिकाणीं नसतो. शब्दादि बाह्य विषयांपासून होणारें सुखहि आत्ममात्र असल्यामुळें आत्मज्ञानानें अविद्येचा उच्छेद झाल्याकारणानें तो निरिच्छ—पूर्ण विरक्त होतो. त्याचे वागादिक प्राण शरीरांतून निघून जात नाहींत. कारण कामाच्या अभावीं कर्माचा अभाव झाला असतां त्याच्या गमनाचें कांहीं निमित्तच रहात नाहीं. त्यामुळें तो जिवंत असतांनाच ब्रह्म होऊन ब्रह्माला प्राप्त होतो.

देहादि-आवरणाचा विच्छेद होणें, या परिणामाच्या अपेक्षेनें त्याचा ब्रह्मांत लय होतो, असें गौण वृत्तीनें म्हटलें आहे. कारण तो स्वरूपाला नित्य प्राप्तच असल्यामुळें त्याचा ब्रह्मामध्यें मुख्य लय संभवत नाहीं. हा मोक्ष व त्याचें साधन यांचें प्रतिपादन करणारे ' यदा सर्वे प्रमुच्यन्ते० ' इत्यादि मंत्र आहेत. पृ. ६९२ पहा.

(' अहोपण, आत्मज्ञान झाल्यावरहि ज्ञानी पूर्वीप्रमाणें देहांतच जर रहात असेल तर त्या विद्येचा काय उपयोग ? ' उत्तर—) जीवन्मुक्ताचा देह व स्वतः जीवन्मुक्त यांविषयीं हा दृष्टान्त आहे—जशी सर्पाची कात त्याच्या बिळावर पडून रहाते, सर्प तिच्या ठिकाणीं अहं-ममाभिमान ठेवीत नाहीं, त्याप्रमाणें जीवन्मुक्तानें अनात्मभावानें सोडलेलें हें स्थूल-सूक्ष्म-शरीर मृत झाल्याप्रमाणेंच रहातें. त्यामुळें जीवन्मुक्त शरीररहितच असतो. कारण तो सर्पाप्रमाणें त्यावर अहं-ममाभिमान ठेवीत नाही. अर्थात् तो अमरणधर्मी प्राण—साक्षी आहे, अशनायादि धर्मरहित परमात्माच आहे; तो विज्ञानज्योतिच आहे. अर्थात् तो शरीरांतच जरी रहात असला तरी पूर्वीप्रमाणें देहवान् नसतो. त्यामुळें विद्या व्यर्थ ठरत नाहीं. (याप्रमाणें मोक्ष, त्याचें साधन ज्ञान व ज्ञानाचें साधन संन्यास जरी सांगितला तरी शमादिकांचें विधान केलेलें नाहीं, म्हणून त्यासाठीं जनकानें पुनः सहस्रगोदानाची प्रतिज्ञा करून त्या विषयींची जिज्ञासा प्रकट केली असतां याज्ञवल्क्य 'मुक्ति ज्ञानसाध्यच आहे.' या संक्षिप्त अर्थाच्या विवरणभूत श्लोकांचा अनुवाद करितात—) '' जनका, आत्मकर्म ब्रह्मवेत्त्यालाच मुक्ति प्राप्त होते, या अर्थीं 'अणुः पन्था विततः० हे मंत्र आहेत. पृ. ६९२पहा. (आतां या ' विविदिषा-' वाक्यानें ब्रह्मात्म्यामध्यें काम्य कर्म सोडून बाकीच्या सर्व कर्मकांडाचा विनियोग करण्यासाठीं अगोदर या अध्यायांत सांगितलेल्या सफल आत्मज्ञानाचा अनुवाद करितात—) तो हा ज्योतिर्ब्राह्मणोक्त प्राणांतील विज्ञानमय आत्मा—जीव या सुषुप्तींतील हृदयस्थ परमात्म्यामध्यें एकरूप होऊन रहातो. हेंच विज्ञानफल अक्षर-ब्राह्मणामध्यें ' सर्वांना वश ठेवणारा, सर्वांचा ईशान, सर्वांचा अधिपति, ' इत्यादि शब्दांनीं सांगितलें आहे. तो विद्वान् अधिपति शास्त्रविहित कर्मानें वृद्धि पावत नाहीं व शास्त्रनिषिद्ध कर्मानें क्षय पावत नाहीं. तो पुण्यानें मोठा होत नाहीं व पापानें अल्प होत

नाहीं. हा धर्मादिकांचाहि नियामक आहे. स्थावर-जंगम भूतांचा अधिपति आहे. सर्व भूतांचें आपल्या चैतन्यानें पालन करणारा आहे. या भूः भुवः इत्यादि लोकांचा परस्पर संकर होऊं नये म्हणून वर्णाश्रमादिव्यवस्थेचा विधारक जणुं काय सेतु आहे. ब्राह्मण या औपनिषद पुरुषाला वेदाध्ययन, यज्ञ व निष्काम तप या उपायांनीं जाणण्याची इच्छा करतात. या उपायांनी चित्तशुद्धीच्या द्वारा विविदिषा–जिज्ञासा उत्पन्न झाली असतां श्रवणादि क्रमानें या आत्म्यालाच जाणून पुरुष मुनि–मननशील योगी होतो. याच आत्मलोकाची इच्छा करणारे जिज्ञासु संन्यास करितात, सर्व कर्मांचा त्याग करितात. कारण प्राचीन आत्मज्ञ ' आम्हांला प्रजादिकांचा काय उपयोग ? आत्मा हाच आमचा पुरुषार्थ आहे. तेव्हां अनात्म लोकांचें साधन जें पुत्र, मानुषवित्त व दैववित्त त्याला घेऊन आम्हांला काय करावयाचें आहे ? ' असें म्हणून पुत्रादि एषणांपासून व्युत्थान करून शरीरनिर्वाहासाठीं भिक्षाचर्य स्वीकारीत असत. शाकल्य ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें हा आत्मा ' नेति नेति ' अशा निर्देशास योग्य, अगृह्य, अशीर्य, असंग, अबद्ध, व्यथारहित व विनाशरहित आहे. याला ' मीं पाप केल्यामुळें मला नरकप्राप्ति होईल' हा पश्चात्ताप व ' शुभ कर्म केल्यामुळें मला स्वर्ग मिळेल ' असा हर्ष होत नाहीं. कारण ब्रह्मवेत्ता पुण्य व पाप या दोन्हीं प्रकारच्या कर्मांचें उल्लंघन करतो. या ब्रह्मवेत्त्याला केलेलें पाप व न केलेलें पुण्य हीं दोन्हीं संताप देत नाहींत. हेंच ब्रह्मविद्येचें फल 'एष नित्यो महिमा ब्राह्मणस्य ' या मंत्रानें सांगितलें आहे. पृ. ६९९ पहा. यास्तव आत्म्याच्या परोक्षज्ञानी पुरुषानें शम, दम, उपरति, तितिक्षा यांनीं युक्त व शांतचित्त होऊन हृदयस्थ बुद्धींत आत्म्याला पहावें. त्या आत्मदर्शी ब्राह्मणाला काम्यनिषिद्ध कर्मरूप दोष प्राप्त होत नाहींत. कारण विद्वान् त्याला आत्मभावानें व्यापतो. कृताकृतरूप पाप्मा स्वफलाला उत्पन्न करून त्याला संताप देत नाहीं. तो सर्व पापांना सर्वात्मदर्शनरूप अग्नीनें जाळून टाकतो. तो निष्पाप, निष्काम व निःसंशय ब्राह्मण होतो. राजा, हाच ब्रह्मरूप लोक आहे, मीं तुला या लोकास नेऊन पोंचविलें आहे. " तेव्हां कृतार्थ झालेल्या त्या राजानें पूर्वीप्रमाणेंच ' माझा हा देश व हा मी यांचें आपल्या दास्यासाठीं समर्पण करितों. '

असें म्हटलें. त्यानंतर याज्ञवल्क्यानें दोन कंडिकेंत सोपाधिक ब्रह्माचें व निर्गुण ब्रह्माचें सफल ध्यान सांगून सर्व शास्त्रार्थाचा उपसंहार केला आहे. (४)

चवथ्या अध्यायाच्या पांचव्या ब्राह्मणांत पूर्वोक्त मैत्रेयी ब्राह्मणाचाच अनुवाद केला असून सहाव्यांत याज्ञवल्कीय कांडाचा वंश पूर्वीप्रमाणेंच सांगितला आहे. (५.६. ४.)

बृहदारण्यकाचे या पुढील दोन अध्याय खिलकांडरूप आहेत. त्यांत अभ्युदय, क्रममुक्ति व कर्मसमृद्धि या फलांसाठीं सोपाधिक ब्रह्माच्या अनेक उपासना सांगितल्या आहेत. प्रथम शुद्धब्रह्मस्वरूपाचा अनुवाद करून पांचव्या अध्यायाच्या पहिल्या दोन ब्राह्मणांत सर्व उपासनांच्या अंगभूत ओंकाराचें व दम-दान-दया यांचें विधान केलें आहे. तिसऱ्या ब्राह्मणापासून पुढें सोपाधिक ब्रह्माचीं अभ्युदय हें फल देणारीं उपासनें सांगावयास आरंभ केला आहे. ' हृदयं ब्रह्म, ' ' सत्यं ब्रह्म, ' ' आदित्यमंडलस्थ पुरुष व अध्यात्म चाक्षुष ' ' मनोमय ब्रह्म ' ' विद्युत् ब्रह्म ' ' वैश्वानर अग्नि ' इत्यादि उपासनें नवव्या ब्राह्मणापर्यंत सांगून दहाव्या ब्राह्मणांत उपासकाची गति सांगितली आहे. अकराव्या ब्राह्मणांत व्याधि, प्रेताला अरण्यांत नेणें व दहन करणें, यांच्या ठिकाणीं परम तपाची दृष्टि करावयास सांगितलें आहे. बाराव्यांत अन्न व प्राण यांची एकत्वानें उपासना सांगितल्यावर तेराव्यांत उक्थादिदृष्टया प्राणोपासना विहित आहे. चवदाव्या ब्राह्मणांत गायत्रीची उपासना असून पंधराव्यांत आदित्याची मार्गासाठीं प्रार्थना केली आहे.

सहाव्या अध्यायाच्या पहिल्या ब्राह्मणांत ज्येष्ठत्व-श्रेष्ठत्वादि गुणविशिष्ट प्राणाची उपासना व प्राणच ज्येष्ठ-श्रेष्ठादिगुणविशिष्ट आहे, याविषयीं प्राणसंवादात्मक आख्यायिका सांगितली आहे. दुसऱ्या ब्राह्मणांत प्रवाहणनामक जैवलि पांचाल राजानें गौतमाला पंचाग्निविद्येचा उपदेश केल्याची समग्र हकीकत असून देवयान व पितृयाण मार्गहि सांगितले आहेत. तिसऱ्या ब्राह्मणांत श्रीमन्थ या नांवाचें आभ्युदयिक कर्म सर्व इतिकर्तव्यतेसह वर्णिलें आहे. चवथ्या ब्राह्मणांत पुत्रमन्थ या नांवाचें कर्म सर्व इतिकर्तव्यतेसह विहित आहे. त्याच्या योगानें इष्ट पुत्र संपादन करतां येतो; पांचव्या ब्राह्मणांत या सर्व प्रवचनाचा वंश

सांगितला आहे. या शेवटच्या दोन अध्यायांतील बहुतेक सर्व विषय छांदोग्यादि उपनिषदांत पूर्वी येऊन गेला आहे. म्हणून आम्ही येथें त्याचा संक्षेपानें उल्लेख केला आहे. हें उपनिषद् फार महत्त्वाचें असल्यामुळें त्याचें सिंहावलोकनहि सविस्तर केलें आहे. याचे दोन, तीन व चार हे अध्याय तर फारच महत्त्वाचे आहेत. पहिल्या अध्यायाचाहि उत्तरार्ध विद्याविद्याप्रतिपादक असल्यामुळें अत्यंत मननीय आहे. ब्रह्ममीमांसेंत यांतील वाक्यांचाहि छान्दोग्यस्थ वाक्यांप्रमाणें वारंवार उल्लेख व विचार केला आहे. तात्पर्य नांवाप्रमाणेंच हें उपनिषद् ग्रंथतः मोठें असून योग्यतेनेंहि तसेंच आहे.(५.६.)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहातील

बृहदारण्यकोपनिषद् सिंहावलोकनासह समाप्त झालें.

कौषीतकिब्राह्मणोपनिषद् ।

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह]

अथ प्रथमोऽध्यायः ।

वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता मनो मे वाचि प्रतिष्ठितं० इति शांतिः ॥

या शांतीचा अर्थ पूर्वी ऐतरेयोपनिषदाच्या आरंभी केला आहे.पृ.२५८पहा. —आरशासारखीं तैजस द्रव्यें घर्षणादि उपायांनीं शुद्ध–स्वच्छ होतात, हें प्रसिद्ध आहे. अन्तःकरणहि तैजस आहे. कारण तें तेजोमय सत्त्वगुणाचें कार्य आहे. त्यामुळें कर्मकांडांत अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यंत सांगितलेलीं जीं कर्में तीं अन्तःकरणाच्या शुद्धीचीं निमित्तें आहेत. तीं कर्में विविदिषा–जिज्ञासा उत्पन्न करणारीं आहेत, हेंहि श्रुतिप्रमाणानेंच सिद्ध आहे. शिवाय स्वर्गादि कर्मफल सुखविशेषरूप आहे व अन्तःकरणाचा प्रसाद–स्वास्थ्य हाच त्याचा दुसरा पर्याय आहे. 'ह० अन्तःकरणप्रसाद हेंच स्वर्गरूप सुख आहे. त्यामुळें कर्में अन्तःकरणाच्या शुद्धीचीं निमित्तें आहेत, हें कर्मी लोकांनाहि संमत आहे. त्यासाठींच आरंभीं कर्मांचें सविस्तर वर्णन करून आतां श्रुति ब्रह्मविद्या सांगण्यास प्रवृत्त झाली आहे. त्यांतील ' चित्रो ह वै गार्ग्यायणिः०' येथपासून ' य एवं वेद०' येथपर्यंतचे चार अध्याय हेंच कौषीतकिब्राह्मणोपनिषद् आहे. त्याच्या पहिल्या अध्यायांत दक्षिणोत्तर मार्गांपर्यंत पर्यंकविद्या, दुसऱ्या अध्यायांत प्राणविद्या आणि विशेष फलसिद्धीसाठीं प्राणोपासकाचीं बाह्य व आध्यात्मिक कर्में आणि तिन-चार अध्यायांत आत्मविद्या सांगितली आहे. वस्तुतः या ब्रह्मविद्याप्रकरणांत ' प्रतर्दनो ह०' इत्यादि ब्रह्मविद्याच प्रथम सांगावयास पाहिजे होती. पण शुद्ध चित्तहि ब्रह्माचें स्वरूप न कळल्यामुळें सर्वभयशून्य असलेल्या ब्रह्मामध्येंहि एकाएकीं प्रवृत्त होत नाहीं.

त्याला त्याची भीति वाटते. पुत्र गर्भामध्यें असतांनाच त्याचा पिता प्रवासास गेला व तो पुत्र तरुण झाल्यावर परत आला, अशा प्रसंगीं तो तरुण पुत्र सदाचरण-संपन्न जरी असला तरी त्या पित्याचें दर्शन घेण्यास जसा प्रथम भितो तशींच त्या शुद्ध चित्ताचीहि स्थिति होते. यास्तव त्याची ती भीति घालविण्यासाठीं श्रुतीनें उत्तरमार्गानें प्राप्त होणाऱ्या व या लोकांतील राजाप्रमाणें ब्रह्मलोकीं स्थित असलेल्या सगुण ब्रह्माचेंच प्रथम कथन केलें आहे. या उपनिषदाच्या प्रथमाध्यायांत 'स आगच्छति अमितौजसं पर्यंकं स प्राणः' असें प्राणाचें पर्यंकत्व सांगितलें आहे. श्रोत्यांना त्या प्राणाविषयीं जिज्ञासा होते. म्ह० हा प्राण केवल श्वासमात्र आहे कीं विविध ऐश्वर्यांनीं युक्त आहे? अशी श्रोत्यांच्या मनांत आकांक्षा उत्पन्न होते. तिच्या निवृत्तीसाठीं दुसऱ्या अध्यायांत प्राणोपासनेचा उपक्रम केला आहे. त्यानंतर ब्रह्मविद्येचा योग्य अवसर प्राप्त झाला असतां तिसऱ्या व चवथ्या अध्यायांत तिचें प्रतिपादन केलें आहे. या उपनिषदाच्या चार अध्यायांचा असा पूर्वापर संबंध असल्यामुळें आरंभींच ब्रह्मविद्येचा उपक्रम न करणें, यांत कांहीं दोष नाहीं. सगुण ब्रह्मविद्याहि प्राचीन गौतम, श्वेतकेतु इत्यादि मोठमोठ्या महर्षींनीं अमानित्वादि गुणांनीं युक्त होऊन गुरुमुखानेंच प्राप्त करून घेतली. यास्तव आधुनिक ब्रह्मविद्यार्थ्यांनींहि अमानित्वादिगुणसंपन्न होऊन सगुण व निर्गुण ब्रह्मविद्या संपादन करावी, हें सुचविण्यासाठीं प्रथम आख्यायिका आरंभिली जाते—

ॐ ॥ चित्रो ह वै गार्ग्यायणिर्यक्ष्यमाण आरुणिं वव्रे स ह पुत्रं श्वेतकेतुं प्रजिघाय याजयेति तं हाऽऽसीनं पप्रच्छ गौतमस्य पुत्रास्ति संवृतं लोके यस्मिन्मा धास्यस्यन्यमताहो वाद्ध्वा तस्य मा लोके धास्यसीति ॥

अन्वयार्थ—[चित्रः ह वै—] चित्र या नांवाचा—श्रुति व त्या कालचे लोक यांना माहित असलेला—प्रसिद्ध [गार्ग्यायणिः—] गार्ग्यकुलांत उत्पन्न झालेला कोणीएक त्रैवर्णिक [यक्ष्यमाणः—] ज्योतिष्टोमादि कांहीं एक याग करणार होता. त्यानें [आरुणिं वव्रे—] अरुणाचें अपत्य असा जो उद्दालक त्याचें वरण केलें. म्ह० तूं माझ्या या यज्ञांत मुख्य याजक हो, अशी प्रार्थना केली. तेव्हां [सः ह पुत्रं श्वेतकेतुं याजय इति प्रजिघाय—] गार्ग्यायणीकडून वरलेला तो

आरुणि आपल्या श्वेतकेतु-पुत्राला 'यांचें तूं याजन कर—याच्याकडून याग करीव' असें म्हणून त्याच्याकडे पाठविता झाला. [तं ह आसीनं पप्रच्छ—] याप्रमाणें पित्यानें चित्राकडे पाठविलेल्या, दुसऱ्या श्रुतीमध्यें मोठा अभिमानी व प्रवाहणादिकांशीं संवाद करणारा म्हणून प्रसिद्ध असलेल्या व चित्रानें दिलेल्या आसनावर बसलेल्या श्वेतकेतूला चित्र असा प्रश्न करिता झाला—[गौतमस्य पुत्र—] हे गौतमाच्या गोत्रांतील औरस पुत्रा, [लोके संवृतं अस्ति—] स्थावर व जंगम जगाचें निवासस्थान अशा या लोकीं संवृत—गुप्त—बहिर्मुख जीवांना अज्ञात पुनर्जन्मशून्य असें स्थान आहे. [यस्मिन् मा धास्यसि—] ज्या स्थानीं मज प्रश्नकर्त्याला—शिष्याला तूं माझा याजक गुरु होऊन स्थापिशील [उत-अहो—] कीं [अन्यं वाध्वा तस्य लोके मा धास्यसि—] काष्ठाला घट्ट बांधून जसें एखाद्याला ठेवितात त्याप्रमाणें दुसऱ्या लोकीं—असंवृत स्थानीं मला स्थापिशील. म्ह० तूं मला सर्व जगाचा आत्मभूत, त्याहून भिन्न असा करशील कीं राज्यादिकांप्रमाणें कांहीं काल भोगण्यास योग्य असें परतंत्र फल देशील? [इति—] अशाप्रकारें पुत्रासह पित्याचा अभिमान घालविण्यासाठीं त्या राजानें प्रश्न केला. तेव्हां

स होवाच नाहमेतद्वेद हन्ताऽऽचार्यं प्रच्छानीति स ह पितरमासाद्य पप्रच्छेतीति माऽप्राक्षीत्कथं प्रतिब्रवाणीति स होवाचाहमप्येतन्न वेद सदस्येव वयं स्वाध्यायमधीत्य हरामहे यन्नः परे ददत्येद्युभौ गमिष्याव इति ॥

अन्वयार्थ—[सः ह—] याप्रमाणें चित्राकडून विचारला गेलेला तो प्रसिद्ध गौतमपुत्र श्वेतकेतु [उवाच—] म्हणाला—[अहं एतत् न वेद—] मी हें कांहीं जाणत नाहीं. लोकांतील संवृत व असंवृत स्थान, अन्यत्वानें किंवा अनन्यत्वानें, बांधून किंवा न बांधून कसें तुला स्थापावें तें मला ठाऊक नाही. [हन्त—] तथापि राजा, तूं मला हे प्रश्न विचारलेस हें फार चांगलें झालें. त्यामुळें मलाहि यांचें ज्ञान होईल. मी आतां [आचार्यं पृच्छानि—] सर्व शास्त्रार्थाला जाणणाऱ्या, स्वतः अनुष्ठान करणाऱ्या व इतरांस आचारांत स्थापणाऱ्या माझ्या आचार्य पित्याला हे प्रश्न विचारितों, [इति—] असें तो श्वेतकेतु बोलला व [सः ह पितरं आसाद्य इति पप्रच्छ—] चित्राला ज्याला उत्तर द्यावयाचें आहे असा तो प्रसिद्ध श्वेतकेतु त्याचा पिता—आचार्य—गुरु—असा जो आरुणि त्याच्याजवळ

जाऊन असें बिचारूं लागला. [इति मा अप्राक्षीत्–] मला त्या चित्रानें असे प्रश्न केले. " तूं माझें याजन करून मला कोठें स्थापिशील ? एक संवृत–गुप्त–पुनर्जन्मरहित स्थान आहे त्यांत स्थापणार व तेंहि अन्यत्वानें स्थापणार कीं अनन्यत्वानें–जगदात्मरूपानें ? किंवा काष्ठाला घट्ट बांधून ज्याप्रमाणें एखाद्याला पाठवितात त्याप्रमाणें असंवृत–सर्वलोकप्रसिद्ध अशा स्थानीं परतंत्र फल भोगण्यास पाठविणार ? " असे त्यानें मला प्रश्न केले [कथं प्रतिब्रवाणि इति–] त्या प्रश्नांचें उत्तर मी कसें देऊं ? [सः ह उवाच–] याप्रमाणें पुत्राकडून विचारला गेलेला तो गुरु–आरुणि म्हणाला–[अहं अपि एतत् न वेद–]" मलाहि या प्रश्नांचें उत्तर माहीत नाहीं. यास्तव [सदसि एव वयं स्वाध्यायं अधीत्य हरामहे–] गार्ग्यायण चित्राच्या सभेंतच आपण स्वाध्यायाचें अध्ययन करून–या अर्थाचें प्रतिपादन करणाऱ्या वेदभागाचें सार्थ ज्ञान संपादन करून त्याच्यापासून तें घेऊन येऊं. [यत् नः परे ददति–] कारण ज्यांना ' नाहीं ' असें सांगणें सर्वथा अनुचित आहे अशा आमच्यासारख्या याचकांना दुसरे विद्यादाते व धनदाते मागावें तें देतात. त्यामुळें तो चित्र आम्हांला ती विद्या देणार नाहीं, अशी शंकाहि घेऊं नये. [एहि उभौ गमिष्याव–] ये, आपण दोघेहि जाऊं. [इति–] असें आरुणि म्हणाला.

स ह समित्पाणिश्चित्रं गार्ग्यायणिं प्रतिचक्रम उपायानीति तं होवाच ब्रह्मार्घोऽसि गौतम यो न मानमुपागा एहि व्येव त्वा ज्ञपयिष्यामीति॥

अन्वयार्थ––[सः ह समित्पाणिः–] तो प्रसिद्ध आरुणि गुरुदर्शनासाठीं हातांत समिधा घेऊन [चित्रं गार्ग्यायणिं–] ' चित्र-'संज्ञक गार्ग्यायणीजवळ [उपायानि इति प्रतिचक्रमे–] ' विशिष्ट विद्या जाणणाऱ्या तुजपाशीं गुरुभावानें मी प्राप्त झालों आहें ' असें म्हणून गेला. तेव्हां [तं ह उवाच–] त्या शिष्यभावानें प्राप्त झालेल्या प्रसिद्ध आरुणीला चित्र म्हणाला–[गौतम ब्रह्मार्घः असि–] हे गौतमा, तूं ब्रह्मदेवाप्रमाणें पूज्य आहेस. कारण [यः मानं न उपागाः–] तूं वेदवेत्त्यांमध्यें अग्रेसर माझा गुरु याजक असून मीं पुत्राच्या द्वारा प्रश्न केले असतां मज शिष्यालाहि त्यांचें उत्तर विचारावयास आलास. या शिष्याला विचारून काय करावयाचें आहे, असा अभिमान धरून बसला नाहींस. [एहि–] ये, [त्वा विज्ञपयिष्यामि एव–] मी तुला त्याचा स्पष्ट बोध करितों.

उगीच कांहीं तरी सांगून तुझ्या चित्तांत संदेहादिक उत्पन्न करीत नाहीं. [इति–] अशी त्या चित्रानें प्रतिज्ञा केली. १.

स होवाच ये वै के चास्माल्लोकात्प्रयन्ति चन्द्रमसमेव ते सर्वे गच्छन्ति तेषां प्राणैः पूर्वपक्ष आप्यायते तानपरपक्षे न प्रजनयत्येतद्वै स्वर्गस्य लोकस्य द्वारं यश्चन्द्रमास्तं यः प्रत्याह तमतिसृजतेऽथ य एनं न प्रत्याह तमिह वृष्टिर्भूत्वा वर्षति ॥

अन्वयार्थ––[सः ह उवाच–] तो चित्र म्हणाला–(प्रथम भेददृष्टि कर्मठांचें गुप्तस्थान तो सांगतो–) [ये वै के च–] जे कोणी अग्निहोत्रादि कर्मे करणारे त्रैवर्णिक [अस्मात् लोकात्–] या प्रत्यक्षसिद्ध द्विजशरीरांतून [प्रयन्ति–] निघून जातात म्ह० मरतात [ते सर्वे चंद्रमसं एव गच्छन्ति–] ते सर्व शरीरत्याग केलेले कर्मी धूम-रात्रि-कृष्णपक्ष-दक्षिणायन-आकाश इत्यादि आतिवाहिक देवतांच्या मार्गानें जाऊन शेवटीं कर्मफलभूत, 'स्वर्ग' म्हणून ज्याला दुसरें नांव आहे, अशा चंद्रमंडलासच प्राप्त होतात. (मु. ब्र. पृ. २१४ व २६० पहा.) आदित्यमंडलास प्राप्त होत नाहींत. [तेषां प्राणैः पूर्वपक्षः आप्यायते–] त्या स्वर्गलोकास प्राप्त झालेल्या कर्मठांच्या प्राणांनीं–प्राणापानादिकांसह इंद्रियांनीं शुक्लपक्षांत चंद्रमा वृद्धि पावतो. प्रजेपासून कर वगैरे घेऊन राजाची जशी वृद्धि होते त्याप्रमाणें चंद्र वृद्धिंगत होतो. [तान् अपरपक्षे न प्रजनयति–] तो चंद्र कृष्ण पक्षांत त्या कर्मठांच्या प्राणांना उत्पन्न करीत नाहीं. म्ह० ज्याच्या जवळचें धन संपलें आहे, असा राजा आपल्या परिवारांतील लोकांना तें जसें देऊं शकत नाहीं त्याप्रमाणें क्षीण झालेला कृष्णपक्षांतील चंद्र स्वर्गस्थांची तृप्ति करूं शकत नाहीं. [यः चंद्रमाः एतत् वै स्वर्गस्य लोकस्य द्वारं–] जो चंद्रमा तेंच प्रसिद्ध स्वर्ग लोकाचें प्रवेशद्वार आहे. आपल्या घराला जसें द्वार असतें तसेंच तें प्रसिद्ध अमृतरूप चंद्रमंडल स्वर्गाचें द्वार आहे. आतां संवृत स्थान सांगण्याची इच्छा करणारा राजा म्हणतो–[यः तं प्रत्याह–] पण जो अमानित्वादि-गुणवान् त्या दक्षिणमार्गसंज्ञक चंद्राचें निराकरण करितो, मी या संतत संपातानें युक्त असलेल्या चंद्रलोकीं–स्वर्गांत जाणार नाहीं, असा निश्चय करितो तो [तं अतिसृजते–] त्या लोकाचें अतिक्रमण करितो, त्याचें उल्लंघन करून विद्युतादि आतिवाहिकांत जातो म्ह० त्याचा उपासनासंकल्प

त्याला ब्रह्मलोकास नेतो. [अथ यः एनं न प्रत्याह–] पण जो कर्मी-स्वर्गाभिलाषी या स्वर्गलोकाचें निराकरण करीत नाहीं, तर मी स्वर्गाला जाईन असाच ज्याचा संकल्प असतो [तं इह वृष्टिः भूत्वा वर्षति–] त्या स्वर्गकामी पुरुषाला शुभ व अशुभ आचरणाच्या फलभूत अशा या लोकीं वृष्टिरूपानें सोडतो. ज्या स्वर्ग देणाऱ्या कर्मामुळें तो स्वर्गांत गेला होता त्या कर्माचा उपभोगानें क्षय होतांच अवशिष्ट राहिलेल्या कर्मांनीं युक्त असलेल्या त्याला मेघभाव प्राप्त होतो व तो मेघ आपल्या जलधारांसह त्याला पृथ्वीवर सोडतो.

स ह कीटो वा पतङ्गो वा शकुनिर्वा शार्दूलो वा सिंहो वा मत्स्यो वा परश्वा वा पुरुषो वान्यो वैतेषु स्थानेषु प्रत्याजायते यथाकर्म यथाविद्यं ॥

अन्वयार्थ—[सः–] याप्रमाणें वृष्टिरूपानें भूलोकास प्राप्त झालेला तो अनुशयी जीव जर निंद्य–अशुभ आचरणानें युक्त असला तर दक्षिण व उत्तर या दोन्ही मार्गापासून भ्रष्ट होऊन [इह–] यालोकीं [कीटः वा–] कीड-मुंगी इत्यादि अल्पशरीरी जीव [पतंगः वा–] दीपतेजाशीं विरोध करणारा क्षुद्र जीव, खद्योत–काजवा वगैरे [शकुनिः वा–] पक्षी-वानर वगैरे [शार्दूलः वा–] व्याघ्र-सूकरादिक [सिंहः वा–] सिंह-सरभादि, [मत्स्यः वा–] मत्स्य-मकरादि [परश्वा वा–] सर्प-वृश्चिक वगैरे, जर तो शुभाशुभ कर्माशयानें युक्त असेल तर [पुरुषः वा–] मनुष्य स्त्री-वगैरे, त्या पुरुषांतेंहि पुण्य अधिक असल्यास ब्राह्मण वगैरे व पापबाहुल्य असल्यास स्त्री-वैश्यादिक [अन्यः वा–] यांहून निराळा असा कोणी जंगम किंवा स्थावर [एतेषु स्थानेषु प्रत्याजायते–] या पूर्वोक्त कीटादि स्थानांत–त्या त्या शरीरांत उत्पन्न होतो.–स्वर्गांतून भ्रष्ट होऊन खालीं येणारा जीव अशा रीतीनें सर्वतः जन्म घेतो. त्यांच्या उत्पत्तीचें निमित्त श्रुति सांगते–[यथाकर्म–] ज्याचें जसें शुभ, अशुभ किंवा मिश्र कर्म असेल त्याप्रमाणें व [यथाविद्यं–] ज्याची जशी शास्त्रीय, अशास्त्रीय किंवा व्यामिश्र विद्या असेल त्याप्रमाणें शुभ, अशुभ किंवा मिश्र शरीर होतें. याप्रमाणें कर्माची गति–स्वर्ग, नरक किंवा सुख-दुःखात्मक उभयरूप कर्मफल-वैराग्यासाठीं सांगून गुरु-शिष्यांचें कर्तव्य सांगण्याची इच्छा करणारा चित्रराजा प्रथम गुरूचें कर्तव्य सांगतो—

तमागतं पृच्छति कोऽसीति तं प्रतिब्रूयाद्विचक्षणादृतवो रेत आभृतं पञ्चदशात्प्रसूतात्पित्र्यवतस्तन्मा पुंसि कर्तर्येरयध्वं ॥

अन्वयार्थ—[तं–] नरकाप्रमाणें–दुःखाप्रमाणें स्वर्गाविषयीं–परिणामीं असह्य दुःख देणाऱ्या विशिष्ट सुखाविषयीं विरक्त झालेल्या–स्वर्ग-नरकगतीचा अनुभव घेतलेल्या–त्रिविध तापांनीं संतप्त झालेल्या व अमानित्वादि गुणांनीं संपन्न असलेल्या शिष्याला [आगतं–] शुभाशुभ कर्मांनीं स्वर्गांतून भूलोकीं आलेल्या व कांहीं उत्कट पूर्वपुण्यामुळें आपल्याला शरण आलेल्या त्या शिष्याला [पृच्छति–] ज्याचें हृदय करुणेनें परिपूर्ण आहे, जो वेदान्तार्थाला यथार्थपणें जाणत आहे व जो गुरूच्या सर्व लक्षणांनीं युक्त आहे असा गुरु प्रश्न करितो. अशा गुरूनें पूर्वोक्त शिष्याला प्रश्न करावा. [कः असि इति–] 'तूं कोण आहेस ? शरीरेंद्रियादिरूप आहेस की त्यांहून अगदीं विलक्षण आहेस ?' अशा प्रकारें गुरूनें त्यास प्रश्न करावा. [तं प्रतिब्रूयात्–] असा प्रश्न करणाऱ्या स्वगुरूला शिष्यानें असें प्रत्युत्तर द्यावें. (देहादिसंघातच आत्मा आहे, असें मानून शिष्य म्हणतो–) [विचक्षणात्–] 'नाना प्रकारचे भोग देण्यांत फार कुशल असलेल्या सूर्य-सुषुम्नानाडीरूप चन्द्रापासून [ऋतवः–] वसंतादि ऋतुस्वरूपापासून [रेतः आभृतं–] श्रद्धा, सोम, वृष्टि व अन्न यांचा परिणाम असें शुक्र रेतःसेक करणाऱ्या पुरुषाग्नींत देवांनीं आहुतिप्रक्षेपानें–आहुतींच्या द्वारा स्थापिलें.' चन्द्राचीं विशेषणें–[पंचदशात्–] शुक्ल-कृष्णपक्षाला कारण होणाऱ्या पंधरा कलारूप [प्रसूतात्–] सायं-प्रातरग्निहोत्राहुतिद्वयरूप अपूर्वसंज्ञक श्रद्धेपासून उत्पन्न झालेल्या सोमप्रकृतिविकाररूप [पित्र्यवतः–] पितृमान्–पितृलोकस्वरूप अशा या सर्व विशेषणांनीं विशिष्ट चंद्रापासून म्ह० विचक्षण, ऋतुरूप, पंधरा कलात्मक, अपूर्वाख्य श्रद्धेपासून झालेल्या व पितृलोकरूप चंद्रापासून देव [तत्–] त्या पूर्वोक्त–आभृत–देवांनीं पित्यामध्यें स्थापिलेल्या रेताला म्ह० [मा–] अनुशयी जीवासह असलेल्या अप्स्वरूप अशा मलामज रेताला [पुंसि कर्तरि–] ग्राम्यधर्माचें अनुष्ठान करणाऱ्या रेतःसिक्-मध्यें–पुरुषाचे ठिकाणीं [एरयध्वं–] त्याच्या अनेक अंगांमध्यें असलेल्या मज रेतोरूप जीवाला एकत्र हृदयप्रदेशीं प्रेरोत–प्रेरणा करोत. (पंचाग्निविद्येंतील देव पूर्वोक्त चंद्रापासून मला रेतोरूपानें पुरुषशरीरांत हृदयस्थानीं एकत्र करोत,

असा याचा भावार्थ.) शिष्याच्या या प्रतिवचन वाक्याचा सरळ अन्वयार्थ असा—विचक्षणात् ऋतवः पंचदशात् प्रसूतात् पित्र्यक्तः तत् आभृतं रेतः मा पुंसि एरयध्वं '—विविध भोग देण्यांत कुशल, वसंतादि ऋतुरूप, पंचदशकलात्मक, श्रद्धा किंवा अपूर्व या नांवाच्या दोन अग्निहोत्राहुतींपासून झालेल्या व पितृलोकस्वरूप चंद्रापासून हे देवांनो, पितृशरीरांत आहुतिरूपानें स्थापिलेल्या रेतोरूप अशा मला तुम्ही पित्याच्या हृदयप्रदेशीं एकत्र करा. हाच अर्थ अधिक स्पष्टपणें ध्यानांत येण्यासाठी छान्दोग्यांतील व बृहदारण्यकांतील पंचाग्निविद्याप्रकरण पहा. सु. उ. पृ.४८० व ७३० पहा.

पुंसा कर्त्रा मातरि मा निषिक्त स जाय उपजायमानो द्वादशत्रयोदश उपमासो द्वादशत्रयोदशेन पित्राऽऽसं तद्विदे प्रतितद्विदेऽहं तन्म ऋतवोऽमर्त्यव आभरध्वं तेन सत्येन तेन तपसर्तुरस्म्यार्तवोऽस्मि कोऽसि त्वमस्मीति तमतिसृजते ॥२

अन्वयार्थ—[कर्त्रा पुंसा मातरि मा निषिक्त—] ग्राम्यधर्माचें अनुष्ठान करणाऱ्या पुरुषाच्या द्वारा रेतासह असणाऱ्या मज अनुशयी जीवाला पंचम अग्निरूप स्त्रीमध्यें देव सेचन करिते झाले. (देवांनीं मज रेतोरूप अनुशयीचा रेतःसेक करणाऱ्या पुरुषाच्या द्वारा मातेमध्यें सेक केला) [सः जाये उपजायमानः—] स्त्रीमध्यें रेतोरूपानें सेक केला गेलेला तो मी जन्मासाठीं—व्यक्त होण्यासाठीं शरीराचें ग्रहण करणारा असा होत्साता [द्वादशत्रयोदशः उपमासः—] तसाच स्वभावतः बारा या संख्येनें विशिष्ट व केव्हां केव्हां तेरा या संख्येनें विशिष्ट असा मासांसमीप असणारा जो संवत्सर त्यानें उपलक्षित होत्साता [द्वादशत्रयोदशेन पित्रा आसं—] बारा किंवा तेरा मासात्मक संवत्सरानें उपलक्षित होणाऱ्या पित्याशी—रेतःसेक करणाराशीं तादात्म्य पावून राहिलों होतों. [तद्विदे प्रतितद्विदे—] भाग्याचा योग असल्यास रेतःसेकाच्या पूर्वी ब्रह्माच्या ज्ञानासाठीं व भाग्ययोग नसल्यास ब्रह्मज्ञानाहून प्रतिकूल असलेल्या अनात्मज्ञानासाठीं [अहं—] मी स्वर्गांतून भ्रष्ट झालेला शास्त्रदृष्टि अनुशयी आहें. [तत्—] त्यामुळें हे देवहो, [मे—] मजसाठीं [ऋतवः—] ब्रह्मसाक्षात्कार होईतों दीर्घकाल जीवन [अमर्त्यवे—] ब्रह्मज्ञानाच्या पूर्तीसाठीं [आभरध्वं—] सर्वतः धारण करा. [तेन सत्येन—] ' विचक्षणात्-' इत्यादि पूर्वोक्त सत्यवचनानें [तेन तपसा—] चन्द्र-

निवासापासून मातेच्या उदरांतून बाहेर पडेपर्यंत झालेल्या तपानें–क्लेशानें झालेला [ऋतुः अस्मि–] मी पूर्वोक्त प्रकारें संवत्सरादिरूप मर्त्य आहें–होतों. [आर्तवः अस्मि–] शुक्र-शोणितशरीरात्मक आहें. पण असें म्हणणाऱ्या माझें तूं जर मस्तक व हात हालवून निवारण करीत असशील तर [कः अस्मि–] 'मी कोण आहे?' असें शिष्यानें विचारलें असतां पुढील दोन अध्यायांत सांगितल्याप्रमाणें गुरूनें आत्म्याचा उपदेश केला व त्यानंतर 'तूं कोण आहेस' असें विचारलें असतां शिष्य पुनः म्हणतो–[त्वं अस्मि–]'मला उपदेश करणारा जो तूं प्राण-प्रज्ञात्मा–तीन अवस्थांहून अगदीं विलक्षण तोच मी सगुणत्वानें पर्यंकावर बसलेला आहें.' [तं अतिसृजते–] याप्रमाणें बोलणाऱ्या म्ह० 'विचक्षणात्' येथून ' त्वं अस्मि ' येथवर जसें वर्णन केलें आहे तसें बोलणाऱ्या, नरकाप्रमाणें चंद्रलोकरूप स्वर्गालाहि भिणाऱ्या त्या ब्रह्मवेत्त्याला गुरु संसारांतून वर काढून उत्पन्न करितो. ब्रह्मविद्येच्या योगानें मुक्त करितो. २.–सगुणब्रह्मवेत्त्याचा देवयान मार्ग श्रुति सांगते.–सु.ब्र.पृ. ४७८ पहा.—

स एतं देवयानं पन्थानमापद्याग्निलोकमागच्छति स वायुलोकं स आदित्यलोकं स वरुणलोकं स इन्द्रलोकं स प्रजापतिलोकं स ब्रह्मलोकं॥

अन्वयार्थ—[सः–] पर्यंकविद्यादि कोणत्या तरी विद्येनें युक्त असलेला, प्राणप्रयाणसमयीं प्राज्ञ आत्म्याशीं एकीभूत झालेला व हृदयाग्रज्वलनानें ज्याला सुषुम्नाद्वार प्रदर्शित केलें आहे असा तो सगुण ब्रह्मवेत्ता [एतं देवयानं पन्थानं आपद्य–] या पुढें सांगितल्या जाणाऱ्या देवयान मार्गास–अर्चिरादि देवांकडून वाहून गेल्या जाणाऱ्या उपासकांना प्राप्त होणारा जो मार्ग तो देवयान मार्ग, त्यास सुषुम्नेच्या द्वारा मूर्धास्थानाचा भेद करून प्राप्त होतो. त्यास प्राप्त होऊन प्रथम [अग्निलोकं आगच्छति–] अग्निलोकास येतो. सगुण ब्रह्मवेत्त्याला जो देवयानमार्गांत नेतो तो अग्नि, अग्नि हाच लोक, तो प्रकाशमय आहे. त्याला म्ह० अर्चिरभिमानिनी देवतेला प्राप्त होतो. त्यानंतर अहरभिमानिनी देवता, शुक्लपक्षाभिमानिनी देवता, उदगयनाच्या सहा मासांची देवता, संवत्सराभिमानिनी देवता यांना क्रमानें प्राप्त होऊन [सः–] देवलोकीं पोंचलेला तो [वायुलोकं–] वायुलोकास प्राप्त होतो. [सः आदित्यलोकं–] वायूनें रथचक्राच्या छिद्रासारखा ज्याला मार्ग दिला आहे असा तो आदित्यलोकास प्राप्त होतो.

वायुलोकानंतर व चंद्रलोकाच्या पूर्वी हा आदित्य लोक आहे. ती आदित्य देवता त्याला डंबराकाशासारखा मार्ग देते. [सः—] आदित्यलोकाहून चंद्रलोकाला व विद्युल्लोकाला प्राप्त झालेला तो [वरुणलोकं—] विद्युल्लोकाहून अमानव पुरुषाकडून वरुणलोकास—वरुणदेवतेस पोंचविला जातो. [सः इंद्रलोकं—] अमानव पुरुषाकडूनच नेला जाणारा व वरुणापासून ज्याला साहाय्य करणारा मिळाला आहे असा तो इंद्रलोकास जातो. [सः प्रजापतिलोकं—] इंद्रापासून ज्याला साह्यकर्ता मिळाला आहे असा तो तेथून प्रजापतिलोकास—विराड्रूप प्रजापति देवतेस प्राप्त होतो. [सः ब्रह्मलोकं—] ज्याला विराडाचें साह्य मिळालें आहे असा तो ब्रह्मलोकास म्ह० हिरण्यगर्भलोकास प्राप्त होतो. तो लोक केवल अनामव पुरुषालाच जातां येण्यासारखा आहे.—त्याच ब्रह्मलोकाचें वर्णन—

तस्य ह वा एतस्य ब्रह्मलोकस्यारो ह्रदो मुहूर्ता येष्टिहा विजरा नदील्यो वृक्षः सालज्यं संस्थानमपराजितमायतन-मिन्द्रप्रजापती द्वारगोपौ विभुप्रमितं विचक्षणाऽऽसंद्यमि-तौजाः पर्यङ्कः प्रिया च मानसी प्रतिरूपा च चाक्षुषी पुष्पाण्यावयतौ वै च जगान्यम्बाश्चाम्बायवीश्चाप्सरसोऽ-म्बया नद्यस्तामित्थंविदा गच्छति तं ब्रह्माऽऽहाभिधावत मम यशसा विजरां वा अयं नदीं प्रापन्न वा अयं जरयिष्यतीति ॥ ३

अन्वयार्थ—[तस्य ह वै एतस्य ब्रह्मलोकस्य—] अमानव पुरुषानें नेल्या-मुळें प्राप्त झालेल्या ' ह '—शास्त्रप्रसिद्ध ' वै '—ब्रह्मवेत्त्यांकडून स्मरण केल्या-जाणाऱ्या ' एतस्य '—त्या प्रत्यक्ष ब्रह्मलोकाचा—हिरण्यगर्भाच्या निवासस्थानाचा [आरः ह्रदः—] आर ह्रद—डोह आहे. तो ब्रह्मलोकांत प्रवेश करीत असतांना ब्रह्म लोकाचा मार्ग आडविणारा शंभर समुद्रांइतका गंभीर—खोल, ज्यांतील जल सतत नीलवर्ण आहे असा आहे. काम-क्रोधादि अरींनीं—शत्रूंनीं त्याला रचलें असल्या-मुळें त्याचें ' आर ' असें नांव आहे. त्या आर ह्रदाच्या परतीरावर [येष्टिहाः मुहूर्ताः—] काम-क्रोधादि प्रवृत्तींना उत्पन्न करून ब्रह्मलोकानुकूल उपासनेचा घात करणारे मुहूर्ताभिमानी देव राहतात. (दोन घटिका म्ह० मुहूर्त.) [विजरा नदी—] दर्शनादिकांमुळें जिची जरा गेली आहे ती उपासनाक्रियाच त्या नांवाची नदी आहे. [इल्यः वृक्षः—] इला म्ह० पृथिवी तद्रूपत्वानें ' इल्य-'

नांवाचा वृक्ष, यालाच छान्दोग्यांत सोमसवन अश्वत्थ म्हटलें आहे. [सालज्यं संस्थानं–] सालवृक्षासारखी ज्या–जणुंकाय धनुष्यांचा गुणच अशी वस्तु ज्याच्या समीप आहे तें सालज्य म्ह० अनेक देवांना सेव्य अशा बागा, वापी, कूप, तडाग, नद्या इत्यादि विविध जलपूर्ण असें संस्थान–अनेक जननिवासरूप नगर, [अपराजितं आयतनं–] अनेक सूर्यांसारखें असल्यामुळें कोणाकडूनहि पराभूत न झालेलें असें ब्रह्माचें–हिरण्यगर्भाचें निवासस्थान–राजमंदिर आहे. [इंद्रप्रजापती द्वारगोपौ–] त्या अपराजित नामक आयतनांत मेघावरून उपलक्षित होणारा वायु व यज्ञावरून उपलक्षित होणारें आकाश हेच ' इंद्रप्रजापति-'नांवाचे द्वाररक्षक आहेत. [विभुप्रमितं–] अहंकाराचें स्वरूप अत्यंत अधिक असूनहि ' अहं ' अशा सामान्याकारानेंच प्रमित–ज्ञात झालेलें, म्हणून ' विभुप्रमित ' या नांवाचें त्या ब्रह्माचें सभास्थान आहे. [विचक्षणा आसन्दी–] बुद्धि-महत्तत्त्व इत्यादि शब्दवाच्य–कुशल आसन्दी–त्या सभेंतील मध्यवेदी आहे. [अमितौजाः पर्यंकः--] प्राणसंवादादिकांत प्रसिद्ध असलेलें ज्याचें ओज–बल अपरिमित आहे तो अमितौजा प्राण हाच त्या ब्रह्माचा–हिरण्यगर्भाचा पर्यंक–आसनभूत मंचक आहे. [प्रिया च मानसी–] मनाची कारणभूत प्रकृति–मनामध्यें आह्लाद उत्पन्न करणारी भार्या आहे. [प्रतिरूपा च चाक्षुषी–] चक्षूची प्रकृतिभूत तैजसी प्रतिच्छाया (या दोन्ही वाक्यांतील ' च-'कारानें त्यांचें अलंकरणादिकहि त्याच होत, असें सुचविलें आहे.) [जगानि वै च पुष्पाणि आवयतौ–] सलोकत्वास प्राप्त झालेलीं चार प्रकारचीं भूतें हीच जणुंकाय पुष्पें, कारण त्यांचा धर्म पुष्पांसारखा आहे. तशीच तीं भूतें म्ह० उत्तरीय व अधर वस्त्रेंच आहेत. कारण वस्त्रांप्रमाणेंच भूतांचा संकोचविकास होतो. [अम्बाः च अम्बायवीः च अप्सरसः–] ' अंबाः '–जगज्जननी श्रुति व 'अंबायवीः'–न्यूनाधिक न होणाऱ्या बुद्धि याच अप्सरा आहेत. [अम्बया नद्यः–] ' अंब ' म्ह० लोचन–ब्रह्मज्ञान त्यास ' यान्ति '–प्राप्त होतात, म्हणून अंबया उपासना, त्याच नद्या–जलप्रवाह धारण करणाऱ्या–नगर-ग्रामादिकांतून राहणाऱ्या लोकांस उपभोग्य आहेत. [तं–] त्या अशा प्रकारच्या आरम्हदापासून अंबया नद्यांपर्यंत सांगितलेल्या पदार्थांनीं युक्त असलेल्या त्या ब्रह्मलोकास [इत्थंविद्–] पूर्वोक्त किंवा पुढें सांगितल्या जाणाऱ्या

प्रकारानें पर्यंकस्थ ब्रह्मवेत्ता—पर्यंकस्थ ब्रह्माची उपासना करणारा [आगच्छति—] सर्वतः प्राप्त होतो. [तं—] अमानव पुरुषाकडून आणल्या जाणाऱ्या त्या उपासकाला उद्देशून [ब्रह्मा आह—] हिरण्यगर्भ आपले परिचारक व अप्सरा यांस म्हणतो—[अभिधावत—] या उपासकाच्या सन्मुख सत्वर जा व [मम यशसा—] माझ्या कीर्तीनें—माझ्या योग्य असा संभार घेऊन माझ्याच भावनेनें याची पूजा करा.—'अहोपण, आपण अजर आहां. हा जरावान् आहे. तेव्हां आपल्या पूजेला तो योग्य कसा होईल,' असें ते परिचारक विचारतील म्हणून ब्रह्मा म्हणतो—[अयं विजरां वै नदीं प्रापत्—] हा जरेचें हरण करणाऱ्या प्रसिद्ध विजरा नदीस प्राप्त झाला आहे. [अयं न वै जरयिष्यति—] हा आतां जरेला कधींच प्राप्त होणार नाहीं. [इति—] असें तो ब्रह्मा बोलतो. ३.—हिरण्यगर्भ असें बोलतांच—

तं पञ्चशतान्यप्सरसां प्रतियन्ति शतं चूर्णहस्ताः शतं वासोहस्ताः शतं फलहस्ताः शतमाञ्जनहस्ताः शतं माल्यहस्तास्तं ब्रह्मालंकारेणालंकुर्वन्ति स ब्रह्मालंकारेणालंकृतो ब्रह्मविद्वान् ब्रह्मैवाभिप्रैति ॥ ४

अन्वयार्थ—[तं—] ब्रह्मलोकी आलेल्या त्या पर्यंकविद्योपासकापाशीं—त्याच्या सन्मुख [अप्सरसां पंच शतानि प्रतियन्ति—] रूपयौवनसंपन्न मनोरम पांचशें अप्सरा त्याच्या दर्शनाच्या लालसेनें ब्रह्मसभेंतील दुसऱ्या अनेक लोकांसह येतात. (त्यांतील कोणाजवळ कोणता संभार असतो तें श्रुति सांगते—) [शतं चूर्णहस्ताः—] त्यांतील शंभर अप्सरांच्या हातांत हरिद्रा-केसर-कुंकुमचूर्ण असतें. [शतं वासोहस्ताः—] शंभरजणींच्या हातांत नानाप्रकारचीं उंचीं वस्त्रें असतात. [शतं फलहस्ताः—] शंभरजणींच्या हातांत विविध फलें असतात. [शतं आञ्जनहस्ताः—] शंभरजणींच्या हातांत विविध आभरणें असतात. [शतं माल्यहस्ताः—] शंभरजणींच्या हातांत फुलांच्या माळा असतात. [तं ब्रह्मालंकारेण अलंकुर्वन्ति—] ज्यानें अजून आरम्हदाचें उल्लंघन केलेलें नाहीं अशा ब्रह्मलोकाला प्राप्त झालेल्या त्याला, हिरण्यगर्भाला योग्य अशा अलंकारांनीं, अलंकृत करितात. [ब्रह्मालंकारेण अलंकृतः सः—] अप्सरांकडून ब्रह्मालंकारानें अलंकृत केला गेलेला तो पर्यंकविद्योपासक हिरण्यगर्भाचें ज्ञान असल्यामुळें हिरण्यगर्भ-

रूपालाच सर्वतः प्राप्त होतो. दुसऱ्या कशालाहि प्राप्त होत नाहीं. आतां श्रुति त्याच्या ब्रह्मप्राप्तीचा क्रम सांगते—

स आगच्छत्यारं ह्रदं तं मनसात्येति तमित्वा संप्रतिविदो मज्जन्ति स आगच्छति मुहूर्तान्येष्टिहांस्तेऽस्मादपद्रवन्ति स आगच्छति विजरां नदीं तां मनसैवात्येति ॥

अन्वयार्थ—[सः—] यापप्रमाणें ब्रह्मलोकास प्राप्त झालेला व अप्सरांनीं ब्रह्मालंकारानें अलंकृत केलेला तो त्या अप्सरा व सभासद यांसह [आरं ह्रदं—] 'आर'नामक ह्रदास [आगच्छति—] प्राप्त होतो. [तं मनसा अत्येति—] त्या आरह्रदाचें मनानेंच म्ह० नौकेची वगैरे अपेक्षा न करितां केवल अंतःकरणानें उल्लंघन करितो. त्याचें मनानें उल्लंघन करणें युक्तच आहे. कारण आरह्रद हा काम-क्रोधादि वृत्तींचाच प्रकार आहे. त्यामुळें तो आपल्या उल्लंघनास मनावांचून दुसऱ्या साधनाची अपेक्षा करीत नाहीं. पण जे ब्रह्मविद्याशून्य असतात ते अनर्थांत पडतात, असें श्रुति सांगते—[तं इत्वा संप्रतिविदः मज्जन्ति—] कांहीं पुण्यकर्मानें त्या आरह्रदास प्राप्त होऊन संप्रतिवेत्ते त्यांत बुडतात. आत्म्याच्या प्रतिकूल असलेलें जें वैषयिक सुख तेंच अनुकूल आहे असें समजणारे ते संप्रतिज्ञ अज्ञ नौका फुटली असतां त्यांतील प्रवासी जसे समुद्रांत बुडतात तसे त्या ह्रदांत बुडतात. त्यांतून त्यांचा उद्धार कोणालाहि करितां येत नाहीं. [सः येष्टिहान् मुहूर्तान् आगच्छति—] ज्यानें आरह्रदाचें अतिक्रमण केलें आहे असा तो 'येष्टिहा'नांवाच्या मुहूर्तांस प्राप्त होतो. [ते अस्मात् अपद्रवन्ति—] ते काम-क्रोधादिवृत्तींना उत्पन्न करणारे येष्टिहा मुहूर्त मनानें आर ह्रदाचें उल्लंघन केलेल्या याच्यापासून दूर पळून जातात. हिरण्यकशिपूला ज्यानें मारलें आहे, अशा नृसिंहापासून विप्रचित्तिप्रभृति दैत्य आपला प्राण वांचविण्यासाठीं जसे पळतात तसेच ते मुहूर्त याच्यापासून दूर जातात. नंतर [सः विजरां नदीं आगच्छति—] ज्यानें आपल्या केवल दर्शनानेंच मुहूर्तांना पळविलें आहे असा तो 'विजरा 'नामक नदीला प्राप्त होतो. [तां मनसा एव अत्येति—] त्या विजरा नदीचें तो दुसऱ्या कोणत्याहि साधनाची अपेक्षा न करितां नुस्त्या मनानेंच उल्लंघन करितो.—सु.ब्र.पृ.३४० पहा—'अहोपण, विजरेचें उल्लंघन करितांना त्याला साह्य करणारें पुण्य तरी असतेंच!' उत्तर—

**तत्सुकृतदुष्कृते धुनुते तस्य प्रिया ज्ञातयः सुकृतमुपयन्त्य-
प्रिया दुष्कृतं तद्यथा रथेन धावयन्रथचक्रे पर्यवेक्षत
एवमहोरात्रे पर्यवेक्षत एवं सुकृतदुष्कृते सर्वाणि च द्वन्द्वानि
स एष विसुकृतो विदुष्कृतो ब्रह्म विद्वान् ब्रह्मैवाभिप्रैति ॥४**

अन्वयार्थ—[तत् सुकृतदुष्कृते धुनुते–] त्यावेळीं म्हणजे शरीराचा परित्याग करण्याच्या वेळीं किंवा उपासना केलेल्या जाणाऱ्या ब्रह्माच्या साक्षात्काराचे वेळीं तो पुण्य व पाप यांचा परित्याग करितो. घोडा आपलें अंग हालवून रोमांचा जसा त्याग करितो त्याप्रमाणें हा सुकृत-दुष्कृतांच्या परिपाकज्ञानानें त्यांचा त्याग करितो. ' अहोपण, विद्यमान सुकृत-दुष्कृतांचा परित्याग कसा करितां येईल ' अशी आशंका घेऊन ' ज्याप्रमाणें विद्यमान काष्ठांचा अग्नीकडून दाह केला जातो त्याप्रमाणें ज्ञानानें कर्माचा त्याग संभवतो' हा त्या शंकेचा परम परिहार सोडून अगोदर प्रसंगानें ब्रह्मवेत्त्यावर प्रेम व द्वेष करणारांस त्या प्रीति-द्वेषांचें फल सांगण्याची इच्छा करणारा राजा ब्रह्मविद्येची स्तुति करितो–[तस्य प्रियाः ज्ञातयः सुकृतं उपयन्ति–] शत्रु व मित्र यांच्या ठिकाणीं सम बुद्धि ठेवणाऱ्या ब्रह्मोपासकाच्या प्रिय ज्ञाती म्ह० त्यावर प्रेम करणारे मनुष्य, विष्णूवर प्रेम करणारांप्रमाणें, त्याच्या सुकृतास प्राप्त होतात व [अप्रियाः दुष्कृतं–] त्या ब्रह्मज्ञाशीं द्वेष करणारे त्याच्या पापाला प्राप्त होतात. ' अहोपण, जो करितो त्याला त्याचें फल भोगावें लागत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे.' अशी आशंका घेऊन दृष्टान्तानें तिचें समाधान करितो–[तत् यथा–] कर्म करविणाराला त्या कर्माचा लेप लागत नाहीं, याविषयीं दृष्टान्त–ज्याप्रमाणें [रथेन धावन् रथचक्रे पर्यवेक्षते–] रथांत बसून त्याच्या योगानें धांवणारा रथाची चाकें भूमीशी संयोग व वियोग पावतात, असें सर्व बाजूंनी पाहतो त्याला त्यांच्या संयोग-वियोगांचें फल प्राप्त होत नाहीं. [एवं अहोरात्रे पर्यवेक्षते–] याप्रमाणें अन्तःकरण-शरीरादिकृत अदृष्टामुळें प्रवृत्त होणाऱ्या अहोरात्रांस तो सर्वतः अवलोकन करितो [एवं सुकृत-दुष्कृते सर्वाणि च द्वंद्वानि–] रात्र व दिवस यांना जसें पाहतो त्याचप्रमाणें पुण्य-पापांना नुस्तें पाहतो. केवल पुण्य-पापांनाच नव्हे तर छाया-प्रकाश, शीत-उष्ण, सुख-दुःख इत्यादि सर्व द्वंद्वांना पहातो. पण त्यांच्या फलाला पात्र होत नाहीं. कारण नुस्त्या द्रष्ट्याला फल मिळत नाहीं. कलहादिकांना पाहणाऱ्या मध्यस्थाला सुख-दुःख होत

रसल्याचें दिसत नाहीं. [सः एषः—] ज्याला ब्रह्मलोक प्राप्त झाला आहे असा ा उपासक ब्रह्मप्राप्तीच्या पूर्वीच [विसुकृतः विदुष्कृतः—] पुण्यरहित झालेला व ापरहित झालेला [ब्रह्म विद्वान्—] ब्रह्मवेत्ता.—हिरण्यगर्भोपासक [ब्रह्म एव अभि-ति—] ब्रह्मालाच—हिरण्यगर्भरूपालाच सर्वतः प्राप्त होतो.—सु.ब्र.पृ३३४-३८.४.

स आगच्छतील्यं वृक्षं तं ब्रह्मगन्धः प्रविशति स आग-च्छति सालज्यं संस्थानं तं ब्रह्मरसः प्राविशति स आग-च्छत्यपराजितमायतनं तं ब्रह्मतेजः प्रविशति स आगच्छति ॥

अन्वयार्थ—[सः इल्यं वृक्षं आगच्छति—] ज्यानें विजरानदीचें लंघन केलें आहे तो ब्रह्मोपासक त्या ' इल्य-'नामक वृक्षास प्राप्त होतो. तं ब्रह्मगन्धः प्रविशति—] इल्यवृक्षास प्राप्त झालेल्या त्याला—त्याच्यामध्यें ब्रह्मगंधं प्रवेश करितो. ज्याचा पूर्वी कधींहि अनुभव घेतलेला नाही, जो सर्व गंधांहून अतिशय सुगंधयुक्त आहे असा ब्रह्मगंध त्याच्या हृदयकमलांत वेश करितो. त्याचा अनुभव आला असतां ब्रह्मलोकातिरिक्त लोकांतील र्व सुगंध दुर्गंध आहेत, असेंच त्याला वाटूं लागतें. [सः सालज्यं संस्थानं ागच्छति—] ज्यानें ब्रह्मगंधाचा वास घेतला आहे तो 'सालज्य-'नांवाच्या नगरास ाप्त होतो. [तं ब्रह्मरसः प्रविशति—] याप्रमाणें सालज्यपुरास प्राप्त झालेल्या ाच्यामध्यें पूर्वी कधीहि स्वाद न घेतलेला, इतर सर्व रसांविषयीं हेयताबुद्धि त्पन्न करणारा व ब्रह्मलोकाविषयीच आसक्ति उत्पन्न करणारा अपूर्व रस रसना-ारा प्रवेश करितो. [सः अपराजितं आयतनं आगच्छति—] ब्रह्मरसाचा आ-ाद घेतलेला तो ' अपराजित-'संज्ञक ब्रह्मगृहास प्राप्त होतो. [तं ब्रह्मतेजः विशति—] अपराजित गृहास प्राप्त झालेल्या त्याच्या हृदयकमलांत अदृष्टपूर्व, तर सर्व तेजांना तुच्छ करणारें व ब्रह्मलोकाविषयींच आसक्ति वाढविणारें तेज क्षूच्या द्वारा प्रवेश करितें. [सः आगच्छति—] अशा प्रकारचा तो प्राप्त ोतो. कोठें? उत्तर—

इन्द्रप्रजापती द्वारगोपौ तावस्मादपद्रवतः स आगच्छति विभुप्रमितं तं ब्रह्मतेजः प्रविशति स आगच्छति विचक्ष-णामासन्दीं बृहद्रथन्तरे सामनी पूर्वौ पादौ श्यैतनौधसे चापरौ पादौ वैरूपवैराजे अनूच्ये शाक्ररैवते तिरश्ची सा

प्रज्ञा प्रज्ञया हि विपश्यति स आगच्छत्यमितौजसं पर्यङ्कं स प्राणस्तस्य भूतं च भविष्यच्च पूर्वौ पादौ श्रीश्चेरा चापरौ बृहद्रथन्तरे अनूच्ये भद्रयज्ञायज्ञीये शीर्षण्ये ऋचश्च सामानि च प्राचीनातानानि यजूंषि तिरश्चीनानि सोमांशव उपस्तरणमुद्गीथ उपश्रीः श्रीरुपबर्हणं तस्मिन्ब्रह्माऽऽस्ते तमित्थंवित्पादेनैवाग्र आरोहति तं ब्रह्मा पृच्छति कोऽसीति तं प्रतिब्रूयात् ५

अन्वयार्थ—[इंद्रप्रजापती द्वारगोपौ—] इंद्र व प्रजापति या नांवाचे द्वाररक्षक आहेत. त्यांच्यापाशीं तो येतो. [तौ अस्मात् अपद्रवतः—] ते दोघे द्वारपाल ज्याला ब्रह्मगंध, रस व तेज प्राप्त झालें आहे अशा या ब्रह्मस्वरूप उपासकाला पाहतांच हात जोडून, आपलीं आसनें सोडून त्या द्वारप्रदेशांतून ' जय जय ' असें म्हणत दूर होतात. [सः विभुप्रमितं आगच्छति—] याप्रमाणें इंद्र-प्रजापतींना ज्यानें दूर व्हावयास लावलें आहे असा तो ' विभु-' संज्ञक सभास्थानास प्राप्त होतो. [तं ब्रह्मतेजः प्रविशति—] विभुप्रमितस्थानाला प्राप्त झालेल्या त्याच्यामध्यें मी ब्रह्म आहें, अशाप्रकारचें ब्रह्मतेज मनोद्वारा प्रवेश करितें. [सः विचक्षणां आसन्दीं आगच्छति—] ब्रह्मयशानें युक्त झालेला तो विचक्षण-संज्ञक आसनास प्राप्त होतो, त्या आसनापर्यंत जाऊन पोंचतो. (त्या आसंदीचाच प्रकार वर्णितात—[बृहत्-रथंतरे सामनी पूर्वौ पादौ—] त्या आसंदीचे बृहत्साम व रथंतर साम हे दोन पूर्व पाद—पूर्वेकडील किंवा पुढचे पाय आहेत. [श्यैतन-औधसे अपरौ—] श्यैतनसाम व औधससाम हे अपर—पश्चिम—मागचे पाद आहेत. [वैरूप-वैराजे अनूच्ये—] वैरूप व वैराज हीं सामें तिचे अनूच्य म्ह० दक्षिणोत्तर अस्र—कोपरे आहेत. [शाक्कर-रैवते तिरश्ची—]शाक्कर साम व रैवत साम तिचे पूर्व-पश्चिम अस्र आहेत [सा प्रज्ञा—] अशी ही चतुरस्र—चौकोनी वेदीच पूर्वोक्त विचक्षणा आसंदी आहे. प्रज्ञा म्ह० महत्तत्त्वरूपिणी बुद्धि, तीच त्या ब्रह्मसभेंतील आसंदी—आसन आहे. तेथें आलेल्या त्या उपासकाला कोणतें फल प्राप्त होतें तें सांगतात—[हि प्रज्ञया विपश्यति—] ज्या अर्थीं तो विचक्षणेला—चतुरस्र प्रज्ञारूप आसंदीला प्राप्त झालेला असतो त्या अर्थीं आत्मबुद्धीनें विविध विश्वाला पाहतो. [सः अमितौजसं पर्यंकं आगच्छति—] प्रज्ञेला प्राप्त झालेला तो ' अमितौजो-'नामक पर्यंकाला प्राप्त होतो. [सः प्राणः—] तो

प्राणापानादि पंचवृत्ति प्राण सर्व इंद्रियांहून सर्वप्रकारें अधिक क्रियाशक्ति आहे. [तस्य भूतं च भविष्यत च पूर्वौ पादौ–] त्या अमित-औजस पर्यंकाचे भूत व भविष्यत् विश्व हे दोन पूर्व पाद आहेत. उशाकडील गाताखालचे पूर्व दिशेंतील ते दोन पाद आहेत. [श्रीः च इरा च अपरौ–] श्री–लक्ष्मी व इरा–इला–पृथ्वी हे दोन पायांखालच्या गाताचे–पश्चिमेंतील दोन पाद आहेत. [बृहत्-रथंतरे अनूच्ये–] बृहत् व रथंतर हीं दोन सामें हींच या पर्यंकाचीं ' अनूच्य-' म्हणजे दक्षिण-उत्तर दोन अंगें आहेत. [भद्रयज्ञायज्ञीये शीर्षण्ये–] भद्र-यज्ञायज्ञीय हीं दोन सामें हींच उशाखालचें व पायांखालचें अशीं पूर्व-पश्चिम अंगें आहेत. [ऋचः च सामानि च प्राचीनातानानि–] ऋचा व सामें ह्या चार कोपऱ्यांतील पूर्व-पश्चिम-खालीं-वर असलेल्या उभ्या पट्ट्या आहेत [यजूंषि तिरश्चीनानि–] प्रसिद्ध यजुर्मंत्र ह्या आडव्या पट्ट्या आहेत. [सोमांशवः उपस्तरणं–] चंद्रकिरण हींच मऊ गादी आहे. [उद्गीथः उपश्रीः–] उद्गीथ हें त्यावरील आच्छादन आहे. (व्यवहारांत त्यालाच पलंगपोस किंवा गादीवरील चादर म्हणतात.) [श्रीः उपबर्हणं–] लक्ष्मी ही त्यावरील उशी आहे. (पूर्वी लक्ष्मीला पाय म्हटलें आहे व येथें उशी म्हटलें आहे. यास्तव पूर्वीची लौकिक लक्ष्मी व ही वैदिक लक्ष्मी आहे असें जाणावें. म्हणजे पुनरुक्ति दोष येणार नाहीं.) [तस्मिन् ब्रह्म आस्ते–] अशा स्वरूपाच्या त्या पर्यंकावर या उपासकानें स्वतादात्म्यानें ज्याची उपासना केली आहे तें हिरण्यगर्भसंज्ञक ब्रह्म बसलेलें असतें. [तं इत्थंविद् पादेन एव अग्रे आरोहति–] त्या ब्रह्माच्या आसनभूत पर्यंकावर हा ब्रह्मोपासक–पर्यंकस्थ ब्रह्माशीं आपलें तादात्म्य जाणणारा पायानेंच प्रथम आरोहण करितो. त्या पर्यंकावर पाय ठेवून उभा राहतो. आपण खुर्चीवर पाय खालीं सोडून जसे बसतों तसा तो बसत नाहीं, असा याचा भावार्थ. [तं ब्रह्मा कः असि इति पृच्छति–] पायानें पर्यंकावर चढून येणाऱ्या त्याला, प्रिय पुत्राला पिता जसा प्रश्न करितो, तसा तो हिरण्यगर्भ ' तूं कोण आहेस ' असा प्रश्न करितो. (श्रुति या प्रश्नाचें उत्तर कसें द्यावें, तें शिकविते–) [तं प्रतिब्रूयात्–] त्याला त्यानें असें प्रत्युत्तर द्यावें ५.–आतां तें वक्तव्य उत्तरच सांगितलें जातें—

ऋतुरस्म्यार्तवोऽस्म्याकाशाद्योनेः संभूतो माया एतत्संवत्सरस्य तेजो भूतस्य भूतस्य भूतस्य भूतस्यात्मा ॥

अन्वयार्थ—[ऋतुः अस्मि–] मी वसंतादि ऋतुरूप आहें. त्याच्या कालात्मकत्वाविषयीं उपपत्ति–[आर्तवः अस्मि–] मी ऋतुसंबंधी आहें. कारण कालात्मक असलेल्या माझ्याशीं त्याचा संबंध आहे. कालात्मक असलेल्या माझी कालात्मकच असलेल्या तुझ्याशीं ज्याअर्थीं अभेदप्राप्ति आहे त्याअर्थीं मी काल व कालसंबंधी आहे. ' तर मग काय तूं चंद्रामुळें झालेला ऋतु व ऋतुसंबंधी आहेस ? ' नाही, [आकाशात् योनेः संभूतः–] अव्याकृत या उपादान कारणापासून उत्पन्न झालों आहें. [मायाः–] स्वयंप्रकाश ब्रह्मापासून झालों आहें. माझें उपादान कारण केवल जड नाही, तर स्वयंप्रकाश मायाशबल ब्रह्म माझें उपादान आहे. ' अरे पण, तू स्वयंप्रकाश अव्याकृत उपादानापासून कसा झालास आणि ऋतु व ऋतुसंबंधी कसा आहेस ? ' उत्तर–[भूतस्य भूतस्य भूतस्य भूतस्य आत्मा–] भूतकालच्या, यथार्थ कारणरूप, चतुर्विध चेतनाचेतनात्मक व पंचमहाभूतात्मक भूताचा आत्मा आहें. पण संवत्सरावांचून चतुर्विध भूतें व पंच महाभूतें उत्पन्न होत नाहीत. यास्तव [संवत्सरस्य एतत् तेजः आत्मा–] वसंतादि अनेक ऋतुस्वरूप संवत्सराचें हें अंतर्बहिर् राहणारें माझ्या बुद्धीला प्रकाशित करणारें तेज–दीप्तिस्वरूप ' आत्मा ' अशा प्रत्ययाला व व्यवहाराला योग्य होतें. कारण संवत्सर व त्याचें कार्य हीं मज स्वयंप्रकाशस्वरूपामध्यें आरोपित आहेत. बरें ' एतत्संवत्सरस्य तेजोभूतस्य ' या आदित्यादिरूप तेजःस्वरूप संवत्सराचा ' भूतस्य '–व्यवहारयोग्य चेतनाचेतनात्मक प्रपंचाचा ' भूतस्य '–कारणाचा ' भूतस्य '–कार्याचा ' आत्मा '–अधिष्ठानभूत मी आहें, असें जरी या शब्दांचें व्याख्यान केलें तरी माझें ऋतुत्व व ऋतुसंबंधित्व अविरुद्ध आहे. कारण कालाचेंहि कारणत्व दोन्ही ठिकाणीं समान आहे. पण हा आत्मा कोण ? उत्तर–

त्वमात्मासि यस्त्वमसि सोऽहमस्मीति तमाह कोऽहमस्मीति सत्यमिति ब्रूयात्किं तद्यत्सत्यमिति यदन्यद्देवेभ्यश्च प्राणेभ्यश्च तत्सदथ यद्देवाश्च प्राणाश्च तत्त्यं तदेतया वाचाभिव्याहियते सत्यमित्येतावदिदं सर्वमिदं सर्वमसीत्येवैनं तदाऽऽह ॥

अन्वयार्थ—[त्वं आत्मा असि—] तूं पर्यंकस्थ ब्रह्मा आत्मा—आत्मशब्द-भाक् आहेस. [यः त्वं असि सः अहं अस्मि—] आणि जो तूं पर्यंकस्थ ब्रह्मा आहेस तोच मी आहें, [इति—] असें त्याला उत्तर द्यावें. [तं आह—] असें बोलणाऱ्या त्या उपासकाला पर्यंकस्थ ब्रह्मा म्हणतो—[कः अहं अस्मि—] 'पण ज्याला तूं 'आत्मा आहेस' असें म्हटलेंस तो मी तरी कोण आहें?' [इति—] असें विचारल्या गेलेल्या त्यानें [सत्यं इति ब्रूयात्—] तूं 'सत्य-'शब्द-वाच्य अधिष्ठान आहेस, असें सांगावें. [किं तत् यत् सत्यं इति—] 'पण तूं ज्याला सत्य—अधिष्ठान म्हणतोस तें तरी काय आहे?' याप्रमाणें प्रश्न केला असतां त्या उपासकानें [यत् देवेभ्यः च प्राणेभ्यः च अन्यत् तत् सत्—] जें सुप्रसिद्ध तत्त्व अग्न्यादि देवांहून व वागादि प्राणांहून अगदीं विलक्षण आहे तें सत्य होय. यांतील 'च-'शब्द तें वायु व आकाश यांहूनहि विलक्षण आहे, हें सुचविण्यासाठी आहेत. [अथ—] किंवा [यत् देवाः च प्राणाः च तत् त्यं—] जे प्रसिद्ध अग्न्यादि देव, प्राणासह वागादि इंद्रियें, वायु व आकाश तेंच 'त्यं-' म्ह० 'तें' या शब्दाचा अर्थ आहे. [तत् सत्यं इति एतया वाचा अभिव्याह्रियते—] तें चराचर जगत् 'सत्य' अशा या वचनानें सर्वप्रकारें सांगितलें जातें. [एतावत् इदं सर्वं—] एवढेंच हें सर्व प्रत्यक्षादि प्रमाणांचा विषय होणारें जगत् आहे. आतां श्रुति म्हणते—'हे ब्रह्मन्, [इदं सर्वं असि—] हें सर्व जगत् तूं आहेस,' [इति एव एनं तदा आह—] असेंच तो मंचकस्थ ब्रह्माच्या समीप गेलेला उपासक त्यावेळीं त्याला म्हणतो.

तदेतच्छ्लोकेनाभ्युक्तम् । यज्जदरः सामशिरा असावूर्ङ्मू-र्तिरव्ययः । स ब्रह्मेति स विज्ञेय ऋषिर्ब्रह्ममयो महानिति ॥
तमाह केन मे पौंस्यानि नामान्याप्नोषीति प्राणेनेति ब्रूया-त्केन स्त्रीनामानीति वाचेति केन नपुंसकानीति मनसेति केन गन्धानिति प्राणेनेत्येव ब्रूयात्केन रूपाणीति चक्षुषेति केन शब्दानिति श्रोत्रेणेति केनान्नरसानिति जिह्वयेति केन कर्माणीति हस्ताभ्यामिति केन सुखदुःखे इति शरीरेणेति केनानन्दं रतिं प्रजातिमित्युपस्थेनेति केनेत्या इति पादाभ्यामिति केन धियो विज्ञातव्यं कामा·

निति प्रज्ञयेति ब्रूयात्तमाहापो वै खलु मे ह्यसावयं ते लोक इति सा या ब्रह्मणो जितिर्या व्यष्टिस्तां जितिं जयति तां व्यष्टिं व्यश्नुते य एवं वेद य एवं वेद ॥ ६

अन्वयार्थ—[तत् एतत् श्लोकेन अभ्युक्तं–] तेंच हें ब्रह्मस्वरूप मंत्रानें सर्वप्रकारें सांगितलें आहे. [यजूदरः–] यजुः हें ज्याचें उदर आहे [सामशिराः–] साम ज्याचें शिर आहे, [असौ ऋङ्मूर्तिः अव्ययः–] असा हा ऋक्-मूर्ति अव्यय आहे. [सः ब्रह्मा इति विज्ञेयः–] तो ब्रह्मा आहे, असें जाणावें [ब्रह्ममयः महान् ऋषिः इति–] तो ब्रह्ममय–वेदमय महान् ऋषि आहे. 'इति-'शब्द मंत्र-समाप्त्यर्थ आहे. [तं आह–] स्वतःचें सर्वात्मकत्व सांगणाऱ्या त्या उपासकाला ब्रह्मा म्हणतो–[केन मे पौंस्यानि नामानि आप्नोषि इति–] 'कोणत्या साधनानें–करणानें किंवा रूपानें तू मज सर्वात्म्या ब्रह्माच्या पुल्लिंगसंबंधी नावांना प्राप्त होतोस,' असें–तो ब्रह्मा विचारूं लागला असतां त्या उपासकानें [प्राणेन इति ब्रूयात्–] ' अधिदैव वायूसह पंचवृत्ती प्राण, या साधनानें मी तुझ्या पुंवाचक नांवांस प्राप्त होतों,' असें सांगावें. [केन स्त्रीनामानि इति–] ' कोणत्या साधनानें किंवा कोणत्या रूपानें तूं माझ्या स्त्रीनांवांस प्राप्त होतोस,' असें त्यानें विचारलें असतां त्या ब्रह्मोपासकानें [वाचा इति–] 'प्राणापासून उत्पन्न होणाऱ्या, वर्णांच्या अभिव्यक्तीला कारण होणाऱ्या वाक्‌नें मी तुझ्या स्त्रीनांवांस प्राप्त होतों,' असें म्हणावें. [केन नपुंसकानि इति–] ' कोणत्या करणानें किंवा रूपानें तूं माझ्या नपुंसक नांवास प्राप्त होतोस,' असें त्यानें विचारलें असतां त्यानें [मनसा इति–] ' मनानें ' असें सांगावें. [केन गन्धान् इति–] ' तूं केवल पृथिवीगुणभूत गंधांना कोणत्या साधनानें प्राप्त होतोस,' असें त्यानें पुनः विचारलें असतां [प्राणेन इति एव ब्रूयात्–] 'घ्राणाख्य प्राणानें,' असेंच उपासकानें उत्तर द्यावें. [केन रूपाणि इति–] 'तूं तेजोबन्नाख्य भूतांच्या गुणभूत रूपांना कोणत्या साधनानें प्राप्त होतोस?' [चक्षुषा इति–] 'आदित्यदेवतायुक्त चक्षूनें' [केन शब्दान् इति–] 'ध्वनि-वर्ण-पद-वाक्यरूप शब्दांस कोणत्या साधनानें प्राप्त होतोस ?' [श्रोत्रेण इति–] ' दिक् ' या देवतेसह शब्दश्रवणसाधनानें–श्रोत्रानें. [केन अन्नरसान् इति–] 'चतुर्विध अन्नाच्या कटु-अम्लादि रसांना कोणत्या साधनानें प्राप्त होतोस?' [जिह्वया इति–] ' अधिदैवासह रसनेंद्रियानें.' [केन कर्माणि इति–] ' कोणत्या साधनानें

ग्राह्य वस्तूंचें ग्रहण करितोस ?' [हस्ताभ्यां इति–] 'दोन हात या साधिदैव साधनानें वस्तूंचें आदान करितों.' [केन सुखदुःखे इति–] 'तूं सुख-दुःखांचें ग्रहण कोणत्या साधनानें करितोस ?' [शरीरेण इति–] 'पुण्य-पापसहित अज्ञान हें ज्याचें कारण आहे अशा स्थूल सूक्ष्म शरीरानें,' असें म्हणावें. [केन आनन्दं रतिं प्रजातिं इति–] 'मैथुनावसानकालीं होणारा आनंद, मैथुनाच्या आसक्तीमुळें स्त्रीच्या आलिंगनापासून मैथुनसमाप्तीपर्यंत होणारें सुख व कन्या-पुत्रादि प्रजा यांचा अनुभव कोणत्या साधनानें घेतोस ?' [उपस्थेन इति–] 'अधिदेवतेसह उपस्थेंद्रियानें,' असें त्यानें सांगावें. [केन इत्या इति–] 'तूं कोणत्या साधनानें गमन करितोस ?' [पादाभ्यां इति–] 'साधिदैविक पादेंद्रियानें.' [केन धियः विज्ञातव्यं कामान् इति–] 'बुद्धिवृत्ति, त्यांच्या विषयांचें ज्ञान व विविध इच्छा यांना कोणत्या कारणानें प्राप्त होतोस ?' [प्रज्ञया इति ब्रूयात्–] 'स्वयंप्रकाश आत्मबोधानें,' असें त्यानें सांगावें. (वस्तुतः सर्वांना व्यापणारी ही प्रज्ञाच आहे; तथापि वागादिकांच्या नामादिव्याप्तीचें साक्षात इंद्रियें हें द्वार मध्यें असतें, तसें बुद्धि व प्रज्ञा यांच्यामध्यें दुसरें कांहीं व्यवधान नसतें. सुख-दुःखहि केवल प्रज्ञेचाच विषय आहे. तथापि 'माझ्या पायांत दुःख आहे, मस्तकांत वेदना आहेत,' इत्यादि प्रत्ययाला अनुसरून येथें त्यांचें साधन शरीर सांगितलें आहे. प्राण, वाक् व मन ह्यांचा स्वतंत्र निरनिराळा व्यापार जरी आहे, तथापि त्यांना पुंवाचक, स्त्रीवाचक व नपुंसकवाचक नांवांचें करणत्व जें सांगितलें आहे तें तीं नामव्याप्तीमध्यें परस्पर सहकारी असल्यामुळें सांगितलें आहे. मन सर्व ज्ञानांचें साधारण साधन आहे. वाक् केवल नामव्याप्तीचें साधन आहे व प्राण केवल जीवनसाधन आहे, हें प्रसिद्ध आहे.) [तं आह–] याप्रमाणें पायांनीं पर्यंकावर चढून गेलेल्या व असें आपलें सर्वात्मज्ञान सांगणाऱ्या त्या उपासकाला पर्यंकस्थ ब्रह्मा म्हणतो–सु. ब्र. पृ. ५०५ पहा–[हि आपः वै खलु मे असौ–] अप्संज्ञक –अप्प्रधान पंचीकृत पंचमहाभूतें भौतिक कार्यांसह लोक व वेद यांमध्यें प्रसिद्ध आहेत. मज परब्रह्माभिन्न स्रष्ट्या हिरण्यगर्भाची तीच विस्तीर्ण सुखानुभवभूमि आहे. [अयं ते लोकः इति–] हा माझा प्रत्यक्ष निवासच तुझा–माझा उपासक जो तूं त्या तुझा लोक–ब्रह्मलोक आहे. कारण तूं मजहून भिन्न नाहींस. त्यामुळें जेवढें कांहीं माझें आहे तेवढें तें सर्व तुझें आहे, असें तो पर्यंकस्थ ब्रह्मा

त्याला म्हणतो—आतां उक्त उपासनेचें फल स्वतः श्रुति संक्षेपतः सांगते—[सा या ब्रह्मणः जितिः या व्यष्टिः—] ती जी केवल शास्त्रावरूनच ज्ञात होणारी व ब्रह्मवेत्त्यांना प्रसिद्ध असलेली पर्यंकस्थ हिरण्यगर्भाची विजयरूप सर्व नियंतृता व जी त्याची सुप्रसिद्ध व्याप्ति—सर्वात्मकता [तां जितिं जयति—] त्या जयरूप जितीला हा उपासक स्वाधीन करून घेतो. [तां व्यष्टिं व्यश्नुते—] त्या प्रसिद्ध व्याप्तीला व्यापतो म्ह० सर्वात्मकतेला प्राप्त होतो. तो कोण ? [यः एवं वेद—] जो पर्यंकस्थ ब्रह्मोपासक त्याची उपासना करतो तो त्या जितीला जिंकतो व व्याप्तीला प्राप्त होतो. 'य एवं वेद' या वाक्याचा अभ्यास अध्यायाच्या परिसमाप्त्यर्थ आहे.७

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहातील कौषीतकि ब्राह्मणोपनिषदाचा प्रथम अध्याय व कौषीतकि-आरण्यकाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

अथ द्वितीयोऽध्यायः ।

—पहिल्या अध्यायांत पर्यंकविद्या सांगितली. तेथें 'स आगच्छति अमितौजसं पर्यंकम्०' इत्यादि वाक्यानें प्राणाचें महाप्रभावत्व सांगितलें. उपासक मंद, मध्यम व उत्तम असा तीन प्रकारचा असतो. जो एकदाच सोपपत्तिक सांगितलेल्या उपदेशाचें ग्रहण करतो तो उत्तम. जो गुरूनें सांगितलेल्या मार्गाचें ग्रहण करतो, पण आपल्या चित्ताचा निरोध करूं शकत नाहीं तो मध्यम; पण जो अनेकदा सांगूनहि ग्रहण करूं शकत नाहीं, तर आपल्याला व गुरूला क्लेश देऊनच त्याचें ग्रहण करतो तो मंद उपासक होय. त्यांतील मध्यम उपासक गुरूनें सांगितलेल्या किंवा दुसऱ्या उपदेशानें व नानाप्रकारच्या वैदिक उपायांनीं, चित्तस्थैर्यास प्राप्त होईल, असें करावे, या न्यायाचा आश्रय करणारी भगवती श्रुति चित्ताचें स्थैर्य संपादन करणारी व कल्पद्रुमाप्रमाणें अनेक प्रकारचें फल देणारी प्राणोपासना व उपासकाला विविध फलें देणारी बाह्य व आध्यात्मिक कर्मे सांगण्यासाठीं दुसरा अध्याय आरंभिते. त्याच्या आरंभीं ' प्राणो ब्रह्म ' ही उपासना सांगणाऱ्या प्रसिद्ध ऋषीचें मत सांगते—

प्राणो ब्रह्मेति ह स्माह कौषीतकिस्तस्य ह वा एतस्य प्राणस्य ब्रह्मणो मनोदूतं चक्षुर्गोप्तृ श्रोत्रं संश्रावयितृ वाक्परिवेष्ट्री यो ह वा एतस्य प्राणस्य ब्रह्मणो मनोदूतं वेद दूतवान् भवति यश्चक्षुर्गोप्तृ गोप्तृमान् भवति यः श्रोत्रं संश्रावयितृ संश्रावयितृमान् भवति यो वाचं परिवेष्ट्रीं परिवेष्ट्रीमान् भवति तस्मै वा एतस्मै प्राणाय ब्रह्मण एताः सर्वा देवता अयाचमानाय बलिं हरन्ति तथो एवास्मै सर्वाणि भूतान्ययाचमानायैव बलिं हरन्ति य एवं वेद तस्योपनिषन्न याचेदिति ॥

अन्वयार्थ—[प्राणः ब्रह्म इति ह आह स्म कौषीतकिः—] जो हा मुखांतील पंचवृत्ति प्राण तें सत्य-ज्ञान-अनन्तलक्षण जगत्कारण ब्रह्म आहे, असें पूर्वी कौषीतकीनें सांगितलें. ('अहोपण, ब्रह्म महाराजाच्या उपचारांस योग्य आहे. प्राण तसा नाहीं.' अशी आशंका घेऊन श्रुति प्राणांमध्येंहि कांहीं राजचिह्नें संपादन करिते—) [तस्य ह वै एतस्य ब्रह्मणः प्राणस्य मनः दूतं—] या प्रसिद्ध व प्रत्यक्षसिद्ध पंचवृत्ति ब्रह्मरूप प्राणाचा मन—अन्तःकरण हा दूत आहे. [चक्षुः गोप्तृ—] महाराजाच्या भूमिरक्षक मंत्र्याप्रमाणें चक्षुरिंद्रिय इतर सर्व इंद्रियांचें रक्षक आहे. [श्रोत्रं संश्रावयितृ—] श्रोत्रेंद्रिय प्रतीहारासारखें आहे. [वाक् परिवेष्ट्री—] वाक्-इंद्रिय अन्नादि वाढणारी विश्वसनीय स्त्री आहे. [यः ह वै एतस्य प्राणस्य ब्रह्मणः मनोदूतं वेद दूतवान् भवति—] जो या प्राणाच्या—ब्रह्माच्या मनोदूताला जाणतो—मनाची दूतदृष्ट्या उपासना करितो तो दूतवान् होतो. [यः चक्षुः गोप्तृ गोप्तृमान् भवति—] जो चक्षूला गोप्तृ—रक्षक जाणतो तो गोप्तृमान् होतो [यः श्रोत्रं संश्रावयितृ संश्रावयितृमान् भवति—] जो श्रोत्राला वार्ता ऐकविणारा द्वारपाल जाणतो तो द्वारपालवान् होतो व [यः वाचं परिवेष्ट्रीं परिवेष्ट्रीमान् भवति—] जो वाक्ला परिवेषन करणारी—अन्न वाढणारी जाणतो तो परिवेष्ट्रीनें युक्त होतो. [तस्मै वै एतस्मै प्राणाय ब्रह्मणे—]त्या या प्राणाला ब्रह्माला [एताः सर्वाः देवताः—] या सर्व देवता [बलिं हरन्ति—] अपेक्षित सर्व विषयजात अर्पण करितात. (पण तें प्राण ब्रह्म कसें ? उत्तर—) [अयाचमानाय—] मला अमुक आणून द्या, अशी प्रार्थना न करणाऱ्या त्याला, प्रजा राजाला जसा

कर देतात त्याप्रमाणें, इष्ट अर्थ समर्पितात. [तथा उ एव–] त्याचप्रमाणें [अस्मै अयाचमानाय एव–] या याचना न करणाऱ्या अशाच प्राणोपासकाला [सर्वाणि भूतानि–] स्थिर-चर सर्व भूतें [बलिं हरन्ति–] सर्व विषयजात अर्पण करितात. [यः एवं वेद–] जो प्राण-ब्रह्मोपासक या प्रकारें उपासना करितो [तस्य न याचेत् इति उपनिषद्–] त्याचें प्राण जाण्याचा प्रसंग आला असतांहि याचना न करणें हें रहस्यव्रत आहे. याचना करूं नये, या विषयीं दृष्टान्त—

तद्यथा ग्रामं भिक्षित्वाऽलब्ध्वोपविशेन्नाहमतो दत्तम-श्नीयामिति य एवैनं पुरस्तात्प्रत्याचक्षीरंस्त एवैनमुप-मन्त्रयन्ते ददाम त इत्येष धर्मो याचितो भवत्य-न्यतस्त्वेवैनमुपमन्त्रयन्ते ददाम त इति ॥

अन्वयार्थ—[तत्-यथा–] त्या अयाचनेविषयीं दृष्टान्त–[ग्रामं भिक्षित्वा अलब्ध्वा उपविशेत्–] ब्राह्मणादिकांनीं युक्त असलेल्या ग्रामांत भिक्षेसाठीं प्रतिगृहीं जाऊन एकहि शीत न मिळाल्यास त्या ग्रामांत भिक्षा मिळेल ही आशा सोडून, असा संकल्प करून त्यानें बसावें–(तो संकल्पच श्रुति सांगते–) [अहं अतः दत्तं न अश्नीयां इति–] ' मी आतां यापुढें या सर्व ग्रामानें मिळून जरी कांहीं दिलें तरी तें भक्षण करणार नाहीं, ' असा संकल्प करून बसावें. [ये एव पुरस्तात् एनं प्रत्याचक्षीरन्–] ज्यांनीं पूर्वीं याला 'भिक्षा देत नाहीं,' असें म्हटलें होतें [ते एव एनं ते ददाम इति उपमंत्रयन्ते–] तेच ' आम्ही आपल्याला भिक्षा देतों,' असें याच्या समीप येऊन सांगतात. (' आतां मी या अदात्यांचें मुखावलोकनहि करणार नाहीं, ' असें म्हणून याचनाविमुख झालेल्या भिक्षूपाशीं येऊन तेच प्रार्थना करूं लागतात.) [याचितः एषः धर्मः भवति–] याचकाचा दीनवदन वगैरे होणें हा धर्म–गुणविशेष आहे–[तु–] पण दुसऱ्या पक्षीं [अन्यतः एव–] दुसऱ्यापासून निःस्पृह-प्रसन्नवदन वगैरे असणें हा गुण अयाचनेंत असतो. तो याचनेमध्यें संभवत नाहीं आणि जेव्हां तो असतो तेव्हांच [ददाम ते इति एनं उपमंत्रयन्ते–] आम्ही तुला देतों, असें लोक त्याच्यापाशीं येऊन बोलतात. याप्रमाणें याचना करणें व न करणें यां-तील गुण-दोषांचें पर्यालोचन करून याचना करूं नये.–कौषीतकीप्रमाणेंच–

प्राणो ब्रह्मेति ह स्माह पैङ्ग्यस्तस्य ह वा एतस्य प्राणस्य ब्रह्मणो वाक्परस्ताच्चक्षुरारुन्धे चक्षुः परस्ताच्छ्रोत्रमारुन्धे श्रोत्रं परस्तान्मन आरुन्धे मनः परस्तात्प्राण आरुन्धे तस्मै वा एतस्मै प्राणाय ब्रह्मण एताः सर्वा देवता अयाचमानाय बलिं हरन्ति तथो एवास्मै सर्वाणि भूतान्ययाचमानाय बलिं हरन्ति य एवं वेद तस्योपनिषन्न याचेदिति तद्यथा ग्रामं भिक्षित्वाऽलब्ध्वोपविशेन्नाहमतो दत्तमश्नीयामिति य एवैनं पुरस्तात्प्रत्याचक्षीरंस्त एवैनमुपमन्त्रयन्ते ददाम त इत्येष धर्मो याचितो भवत्यन्यतस्त्वेवैनमुपमन्त्रयन्ते ददाम त इति ॥ १

अन्वयार्थ—[प्राणः ब्रह्म इति ह स्म पैग्यः आह—] प्राण ब्रह्म आहे, असें 'पैग्य-'नांवाचा मुनि म्हणाला. 'अहोपण, मनोदूतत्वादिलक्षणानें प्राणाला ब्रह्मत्व जरी असलें तरी त्या प्राणाला प्रत्यक्त्व नसल्यामुळें ब्रह्मत्वहि नाहीं' अशी शंका घेऊन श्रुति म्हणते—[तस्य ह वै एतस्य प्राणस्य ब्रह्मणः वाक्-परस्तात् चक्षुः आरुन्धे—] त्या या प्रसिद्ध प्राण-ब्रह्माच्या वाक्-इंद्रियाच्या आंत चक्षुरिंद्रिय सर्वतः आच्छादित करून रहातें. वाक्-हून चक्षु आंतर आहे, कारण उक्तीप्रमाणें पाहिलेल्या वस्तूविषयीं प्रायः विसंवाद होत नाहीं. [चक्षुः परस्तात् श्रोत्रं आरुन्धे—] चक्षुरिंद्रियाच्या आंत श्रोत्रेंद्रिय आवृत करून राहतें. चक्षु शिंपीला रुपें पाहतो. पण श्रोत्र अविद्यमान शब्द प्रायः ऐकत नाहीं. [श्रोत्रं परस्तात् मनः आरुन्धे—] श्रोत्राच्या आंत मन—संकल्पविकल्पात्मक अन्तःकरण सर्वतः व्यापून राहतें कारण मन सावधान असलें तरच श्रोत्रानें शब्द ऐकूं येतो. त्यामुळें मनाला श्रोत्राहून आन्तरत्व असणें युक्तच आहे. [मनः परस्तात् प्राणः आरुन्धे—] मनाच्या आंत पंचवृत्ति प्राण व्यापून राहतो. याप्रमाणें प्राणाला आंतरत्व असल्यामुळें ब्रह्मत्व युक्तच आहे. [तस्मै एतस्मै अयाचमानाय प्राणाय ब्रह्मणे—] त्या या याचना न करणाऱ्या प्राणाला—ब्रह्माला [एताः सर्वाः देवताः बलिं हरन्ति—] या सर्व देवता बलि समर्पण करितात.[तथा उ एव अस्मै०—] त्याचप्रमाणें या प्राण-ब्रह्मोपासकाला सर्व भूतें विषयजात समर्पितात. [यः एवं वेद तस्य न याचेत्०—]जो त्या प्राणाची अशी

उपासना करितो त्याचें याचना न करणें हें रहस्यव्रत आहे. [तत् यथा ग्रामं०—] त्याविषयीं दृष्टान्त—ब्राह्मणादिकांच्या घरोघर भिक्षा मागून ती प्राप्त न झाल्यास ' मी आतां यांनीं दिलेलें अन्न खाणार नाहीं' असा संकल्प करून त्यानें बसावें. म्हणजे [ये एव पुरस्तात् एनं प्रत्याचक्षीरन् ते एव०—]ज्यांनीं पूर्वी याला 'भिक्षा देत नाहीं,' असें म्हटलें होतें तेच याला ' आम्ही भिक्षा देतों, ' असें जवळ येऊन बोलतात. [याचितः एषः धर्मः भवति—] याचना करणाराचा दीनमुख करणें, इत्यादि हा धर्म आहे [तु अन्यतः एव—] पण त्याच्या उलट याचना न करणाराचा प्रसन्न-मुखत्वादि हा धर्म आहे. [एनं ते ददाम इति उपमंत्रयते—] त्या अयाचकाला ' आम्ही तुला देतों ' असें लोक त्याच्या जवळ येऊन बोलतात. यास्तव याचना व अयाचना यांतील हे गुण-दोष जाणून याचना करूं नये. १—आतां प्राणोपासकाला धनाची इच्छा असल्यास त्याच्या प्राप्तीसाठीं कर्तव्य सांगतात—

अथात एकधनावरोधनं यदेकधनमभिध्यायात् पौर्णमास्यां वामावास्यायां वा शुद्धपक्षे वा पुण्ये नक्षत्रेऽग्निमुपसमाधाय परिसमूह्य परिस्तीर्य पर्युक्ष्योत्पूय दक्षिणं जान्वाच्य स्रुवेण वा चमसेन वा कंसेन वैता आज्याहुतीर्जुहोति ॥

अन्वयार्थ—[अथ—] प्राण-ब्रह्मज्ञानानंतर [अतः—] ज्याअर्थीं धनाची इच्छा झाली आहे त्याअर्थीं [एकधनावरोधनं—] एकधन हें प्राणाचें नांव आहे. कारण या जगांत तोच एक धन आहे. त्याच्यापुढें बाकी सर्व संपत्ति तुच्छ आहेत. त्या एकधनाचें—प्राणाचें अवरोधन—एकत्र स्थापन करावें. धनाची इच्छा असल्यास व तें प्राप्त न झाल्यास चित्त विक्षिप्त होतें. त्यामुळें तसल्या चित्तानें प्राणब्रह्माचें चिंतन होऊं शकत नाहीं. पण पुढील उपायानें धनप्राप्ति झाली असतां प्रसन्नचित्त पुरुषाचें प्राणचिंतन संभवतें. यास्तव प्राणाला एकत्र स्थापावें. [यत् एकधनं अभिध्यायात्—] अर्थेच्छु पुरुषानें प्राणाचें सर्वतः ध्यान केलें व त्याला धन मिळालें म्हणजे मग त्यानें हें करावें किंवा एकधन म्हणजे दुसऱ्या कोणालाहि प्राप्त न होणारें धन त्याचें अवरोधन म्ह० प्राप्तीचा उपाय. प्राणोपासकानें जर त्या एकधनाचें सर्वतः ध्यान केलें तर [पौर्णमास्यां वा अमावास्यायां वा—] त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें पूर्णिमेच्या दिवशीं किंवा अमावास्येस [शुद्धपक्षे वा—] शुक्लपक्षांत किंवा कृष्णपक्षांत [पुण्ये नक्षत्रे—] आपल्याला

अनुकूल असलेल्या अश्विन्यादि शास्त्रविहित नक्षत्रावर [अग्निं उपसमाधाय–] श्रौत किंवा स्मार्त अग्नीचें स्वशाखोक्तक्रमानें कुंड-स्थंडिलादिकांत प्रतिष्ठापन करून [परिसमूह्य–] आजुबाजूचें तृणादिक दूर करून [परिस्तीर्य–] सभोंवार दर्भ पसरून [पर्युक्ष्य–] मंत्रानें पवित्र केलेल्या जलाचें समंतात्-भागीं परिषेचन करून [उत्पूय–] आपल्या गृह्यसूत्रांत सांगितल्याप्रमाणें घृताचा उत्पवनसंस्कारानें संस्कार करून [दक्षिणं जानु आच्य–] उजवा गुडघा खालीं करून–भूमीवर टेंकून [स्रुवेण वा चमसेन वा कंसेन वा–] स्रुवेनें, चमसानें किंवा कांशाच्या दर्व्यादि पात्रानें म्ह० या तीन होमसाधनातील कोणतेंहि साधन घेऊन [एताः आज्याहुतीः जुहोति–] या पुढें सांगितलेल्या आज्याहुति होमितो. (पुढें सांगितलेल्या मंत्रानीं घृताच्या आहुति द्याव्या.)आतां श्रुति होममंत्र सांगते–

वाङ्नामदेवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहा प्राणो नाम देवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहा चक्षुर्नाम देवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहा श्रोत्रं नाम देवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहा मनो नाम देवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहा प्रज्ञा नाम देवतावरोधिनी सा मेऽमुष्मादिदमवरुन्धां तस्यै स्वाहेत्यथ धूमगन्धं प्रजिघ्रायाज्यलेपेनाङ्गान्यनुविमृज्य वाचंयमोऽभिप्रव्रज्यार्थं ब्रुवीत दूतं वा प्रहिणुयाल्लभते हैव ॥ २

अन्वयार्थ—[वाङ्नाम देवता अवरोधिनी–] वाक् या नांवाची देवता उपासकाचा अभीष्ट अर्थ संपादन करणारी आहे. [सा मे अमुष्मात् इदं अवरुन्धां–] ती देवता धनाची इच्छा करणाऱ्या मज प्राणोपासकाला, मला अभीष्ट असलेल्या या स्वामीपासून–धनवानापासून हें मला इष्ट असलेलें सर्व धन संपादन करो, तें मला देववो. [तस्यै स्वाहा–] त्या वाङ्नामदेवतेला उद्देशून ही आहुति सुहुत असो. ती देवता या सुहुत आहुतीचा स्वीकार करो. [प्राणः नाम देवता०–] ' प्राण ' या नांवाची देवता मला इष्ट असलेला अर्थ संपादन करून देणारी आहे. ती मला या अमक्या धनाढ्यापासून हें मला इष्ट असलेलें धन प्राप्त करून देववो. तिला उद्देशून यथाशास्त्र दिलेल्या या आहुतीचा

ती स्वीकार करो. [चक्षुर्नाम०—] ' चक्षुः' या नांवाची देवता माझा इष्टार्थ संपादन करणारी आहे. ती मला या स्वामीपासून हें अमुक धन मिळवून देववो. ती या आहुतीचा स्वीकार करो. [श्रोत्रं नाम०—] ' श्रोत्र ' या नांवाची देवता मला इष्ट धन संपादन करून देणारी आहे. ती मला या धनवानापासून हें धन देववो. तिला उद्देशून दिलेली ही आहुति सुहुत असो. [मनः नाम देवता०—] ' मनः ' या नांवाची देवता मला धन देणारी आहे. ती मला या धनिकाकडून हें धन देववो. तिला उद्देशून ही आहुति सुहुत होवो. [प्रज्ञा नाम०—] ' प्रज्ञा ' या नांवाची देवता मला इष्ट वस्तु प्राप्त करून देणारी आहे. ती मला या अमुक श्रीमानाकडून अमुक धन देववो, तिला ही आहुति प्राप्त होवो. [स्वाहा इति—] येथील ' इति ' हा शब्द मंत्रांच्या समाप्तीसाठी आहे. [अथ—] याप्रमाणें होम केल्यावर [धूमगन्धं प्रजिघ्राय—] होमाच्या धुराचा वास घेऊन [आज्यलेपेन—] होम करून राहिलेल्या घृताच्या लेपानें [अंगानि अनुविमृज्य—] सर्व अंगांना अनुलेप लावून [वाचंयमः—] मौनव्रत धरून [अभिप्रव्रज्य—] होम प्रदेशांतून उठून जेथें तो अर्थस्वामी असेल तेथें त्याच्यापाशीं जाऊन [अर्थं—] आपल्याला अभीष्ट असलेला अर्थ—धन [ब्रुवीत—] मला तुझ्यापासून मिळावें असें त्यानें त्याला बोलावें. [दूतं वा प्रहिणुयात्—] किंवा धनस्वामी कोठें दूरप्रदेशीं असल्यास त्याच्याकडे आपला भृत्य-पुत्रादि दूत पाठवावा. [लभते ह एव—] असें केल्यानें त्याला इष्ट अर्थ प्राप्त होतोच. २. —याप्रमाणें धनप्राप्तीचा उपाय सांगून श्रुति वश्योपाय सांगते—

अथातो दैवः स्मरो यस्य प्रियो बुभूषेद्यस्यै वा एषां वैतेषामेवैकस्मिन्पर्वण्यग्निमुपसमाधायैतयैवावृतैता आज्याहुतीर्जुहोति वाचं ते मयि जुहोम्यसौ स्वाहा प्राणं ते मयि जुहोम्यसौ स्वाहा चक्षुस्ते मयि जुहोम्यसौ स्वाहा श्रोत्रं ते मयि जुहोम्यसौ स्वाहा मनस्ते मयि जुहोम्यसौ स्वाहा प्रज्ञां ते मयि जुहोम्यसौ स्वाहेत्यथ धूमगन्धं प्रजिघ्रायाऽऽज्यलेपेनाङ्गान्यनुविमृज्य वाचंयमोऽभिप्रव्रज्य संस्पृशं जिगमिषेदपि वाताद्वा संभाषमाणस्तिष्ठेत्स्त्रियो हैव भवति स्मरन्ति हैवास्य ॥

अन्वयार्थ—[अथ–] प्राणब्रह्मज्ञानानंतर [अतः–] ज्याअर्थी आपण एखाद्याला प्रिय व्हावें अशी इच्छा आहे त्याअर्थी [दैवः स्मरः–] वागादिकांच्या योगानें आपलें प्रिय–अभिलषित संपन्न कसें होईल तें सांगितलें जातें–[यस्य प्रियः बुभूषेत्–] ज्या पुरुषव्यक्तीला मीं प्रिय व्हावें, असें प्राणोपासक इच्छीत असेल [यस्यै वा–] किंवा ज्या स्त्रीला मीं प्रिय व्हावें, असें त्याला वाटत असेल त्यानें [एषां वा एतेषां एव–] त्या प्रीतिशून्य राजादि श्रीमानांच्या किंवा त्या प्रीतिशून्य राजपत्न्यादिकांच्या वागादि-अधिष्ठातृ-देवतांचा–अग्न्यादिकांचा प्रिय होण्याची इच्छा करावी. [एकस्मिन् पर्वणि–] दर्श-पौर्णमासांतील कोणत्या तरी एका पर्वदिवशी किंवा शुक्लपक्षांत शुभ नक्षत्र असेल त्या दिवशी [अग्निं उपसमाधाय–] अग्नीचें उपसमाधान–स्थंडिलादिकांत प्रस्थापन करून [एतया एव आवृता–] पूर्वोक्त परिसमूहनादि सर्व विधि करून [एताः आज्याहुतीः जुहोति–] या आज्याहुतींचा होम करावा. [ते वाचं मयि जुहोमि–] तुझ्या वाक्-इंद्रियाचा मी माझ्या ठिकाणीं होम–प्रक्षेप करितों. प्रीति करणाऱ्या मजविषयीं–प्रीतिविषयाविषयी तुझी जी अप्रीति किंवा औदासीन्य त्यांतील एका इंधनानें–काष्ठानें प्रदीप्त झालेल्या या अग्नींत मी तुझ्या वागिंद्रियाचा प्रक्षेप–त्याग करितों. [असौ–] मी अमुक नांवाचा आहें. किंवा माझा हा अमुक काम–इच्छा आहे तो संपन्न–सिद्ध होवो. [स्वाहा–] माझी वाक् ही अमुक इच्छा करणाऱ्या माझ्या आज्याहुतीला अनुज्ञा देवो. [प्राणं ते मयि०–] तुझ्या प्राणाला मी माझ्या ठिकाणीं होमितों. हा मी अमुक आहें किंवा माझा काम अमुक आहे स्वाहा. [ते चक्षुः०–] तुझा चक्षु माझ्या ठिकाणी होमितों. हा मी किंवा माझा काम अमुक आहे. [श्रोत्रं ते० मनः ते० प्रज्ञां ते०–] तुझें श्रोत्र, मन व प्रज्ञा यांचा माझ्या ठिकाणीं प्रक्षेप करितों. माझा काम किंवा नांव अमुक आहें. [अथ धूमगन्धं प्रजिघ्राय०–] नंतर होमधूमाचा वास घेऊन, आज्यलेप अंगाला माखून, वाणीचें नियमन करून, होमस्थानापासून उठून जेथें तो किंवा ती स्त्री असेल तेथें जाऊन (असें केल्यानें फल कोणतें मिळतें तें श्रुति सांगते–) [संस्पर्शं जिगमिषेत्–] आपल्याला साध्य असलेल्या व्यक्तीला संस्पर्श करण्याची इच्छा करून–स्पर्श करण्यासाठीं जावें. (पण ती व्यक्ति अतिशय विभूतियुक्त असल्यामुळें तिला स्पर्श करणें अशक्य झाल्यास काय

करावें, तें श्रुति सांगते–) [अपि वातात् वा संभाषमाणः तिष्ठेत्–] किंवा आपल्याला साध्य असलेल्या व्यक्तीशीं संभाषण करीत रहावें. संभाषण करणेंहि अशक्य झाल्यास आपल्या अंगावरून जाणारा वायु त्या व्यक्तीच्या अंगाला स्पर्श करील अशा प्रदेशीं अवस्थित व्हावें. किंवा ' वातात् संभाषमाणः०'– आपले शब्द वायूच्या योगानें त्या व्यक्तीच्या कर्णरन्ध्राशीं संयुक्त होतील असें करावें. [प्रियः ह एव भवति–] असें केल्यानें तो उपासक त्या साध्य व्यक्तीला प्रियच होतो. अप्रिय कधीं होत नाही. इतकेंच नव्हे तर तो समीप नसल्यास –ग्रामांतरीं वगैरे गेल्यास [अस्य स्मरन्ति ह एव–] राजादि प्रसिद्ध पुरुषहि त्याला आठवीत–स्मरण करीत राहतात. विसरत नाहीत. (पुत्रादिक दूरस्थ माता-पितरांचें जसें स्मरण करीत राहतात त्याप्रमाणें त्या विभूतियुक्त राजाराजपत्नी वगैरे व्यक्तिहि या उपासकाचें स्मरण करितात.) ३.–आतां प्राणोपासकाला अग्निहोत्राचें फल प्राप्त होतें, असें सांगण्याची इच्छा करणारा वेद आध्यात्मिक अग्निहोत्र सांगतो––

अथातः सांयमनं प्रातर्दनमान्तरमग्निहोत्रमिति चाचक्षते यावद्वै पुरुषो भाषते न तावत्प्राणितुं शक्नोति प्राणं तदा वाचि जुहोति यावद्वै पुरुषः प्राणिति न तावद्भाषितुं शक्नोति वाचं तदा प्राणे जुहोति ॥

अन्वयार्थ––[अथ अतः–] प्राणब्रह्मोपासनेनंतर ज्याअर्थीं अग्निहोत्रफलाची इच्छा आहे, पण अग्निहोत्राचें साक्षात् अनुष्ठान करण्यास असमर्थ आहे किंवा तें करण्याची इच्छा नाहीं त्याअर्थीं [सांयमनं–] सम्यक् यमनं–अहिंसादिक, तत्संबंधी तें सांयमन [प्रातर्दनं–] दिवोदासपुत्र प्रतर्दनानें अनुष्ठिलेलें, त्यामुळें त्याच्या नांवानें चिह्नित झालेलें [आन्तरं अग्निहोत्रं इति च आचक्षते–] व बाह्य साधनांची अपेक्षा न करणारें–आंतर व अग्निहोत्रसंज्ञक कर्म, असें सांगतात. (विद्वान् ज्याला ' आंतर ' असें म्हणतात तें कर्म सांगण्यासाठीं वाक् व प्राण यांना अमित–अमर्याद व्यापारांचें कर्तृत्व श्रुति सांगते–) [यावत् वै पुरुषः भाषते–] पुरुषाकार शरीर धारण करणारा जन्तु–प्राणी जेवढें म्हणून हें भाषण करितो [तावत् प्राणितुं न शक्नोति–] तेवढें प्राणन–प्राणव्यापाररूप कर्म करण्यास समर्थ नसतो. किंवा ' यावत्०'–जेवढा वेळ तो भाषण

करितो 'तावत्'–तेवढा वेळ–प्राणाचा श्वासोच्छ्वासादि व्यवहार करण्यास समर्थ नसतो. [तदा–] त्या वाग्व्यापारसमयीं [प्राणं–] वाग्व्यापार होत असतांना आपला व्यापार न करणाऱ्या ह्मणूनच वाक्हून न्यूनव्यापारवान् व बाह्य अग्निहोत्रांतील दहीं-दूध इत्यादि हविःस्थानीं असलेला जो प्राण त्याला [वाचि जुहोति–] स्वतः भाषणव्यापार करीत असल्यामुळें प्राणाहून अधिक असलेल्या अग्नितुल्य वाक्-मध्यें होमितो–तेव्हां प्राणाचा वाक्-मध्यें प्रक्षेप करितो. (आतां श्रुति प्राणाला वाक्समानधर्मत्व व वाक्-ला प्राणसमानधर्मत्व आहे, असें सांगते–) [यावत् वै पुरुषः प्राणिति तावत् भाषितुं न शक्नोति–] जोंवर हा प्रसिद्ध शरीरेंद्रियवान् पुरुष प्राणाचा श्वासोच्छ्वासादि व्यापार करीत असतो तोंवर भाषण करूं शकत नाहीं. [तदा प्राणे वाचं जुहोति–] त्यावेळीं प्राणामध्यें वाक्-चा होम–प्रक्षेप करितो. (मनुष्य जेव्हां बोलत असतो तेव्हां श्वासोच्छ्वास करीत नाहीं व जेव्हां श्वासोच्छ्वास करितो तेव्हां बोलूं शकत नाहीं, हें सर्वलोकप्रसिद्ध आहे. आतां श्रुति अग्निहोत्र सांगते—)

एते अनन्ते अमृताहुती जाग्रच्च स्वपंश्च संततमव्यवच्छिन्नं जुहोत्यथ या अन्या आहुतयोऽन्तवत्यस्ताः कर्ममय्यो हि भवन्त्येतद्ध वै पूर्वे विद्वांसोऽग्निहोत्रं न जुहवाञ्चक्रुः ॥

अन्वयार्थ—[एते–] हे सांगितलेले वाक् व प्राण [अनन्ते–] असंख्यात व्यापारांचे आधार आहेत. किंवा 'अनन्ते'–परस्पर अग्नीमध्यें प्रवेश करीत असूनहि अक्षीण–अन्तरहित–अविनाशी आहेत. [अमृताहुती–] जें अन्तवान् असतें तेंच मरतें, हे ज्याअर्थी अनन्त आहेत त्याअर्थी अमृतरूप आहुती आहेत, किंवा अमृतत्व–मोक्ष या फलाला कारण होत असल्यामुळें 'अमृताहुती' आहेत. [जाग्रत् च स्वपन् च–] जागरावस्थेंत व स्वप्नदशेंत [संततं अव्यवच्छिन्नं जुहोति–] निरंतर म्ह० गर्भांतून बाहेर पडल्यापासून शेवटचा श्वास सोडीपर्यंत अविच्छिन्नपणें–भोजन-आच्छादनादि व्यवधानावांचूनच –त्यावेळींहि. (कारण जिवंत पुरुषाचा, वाक् व प्राण यांतील कोणत्या तरी एकाच्या व्यापारावांचून, एक क्षणहि जात नाहीं, हें प्रसिद्ध आहे.) अर्थात् जन्मभर अहोरात्र केव्हांहि न थांबतां प्राणोपासक हवन करितो. प्राण

व वाक् यांच्या परस्परप्रवेशामध्यें होमाची भावना करितो (त्यानें त्यांत होमबुद्धि करावी, असा याचा भावार्थ. आतां या अग्निहोत्राची स्तुति करण्यासाठीं श्रुति दुसऱ्या प्रसिद्ध बाह्य अग्निहोत्राची निंदा करिते—) [अथ याः अन्याः आहुतयः—] पण यांहून भिन्न अशा ज्या दूध-दहीं इत्यादि द्रव्यानें साध्य होणाऱ्या—वाक्प्राणांहून भिन्न असलेल्या आहुती—देवतांना उद्देशून जलसेकपूर्वक केलेला द्रव्यत्याग [ताः कर्ममय्यः—] त्या शरीराच्या व्यापारानें साध्य होणाऱ्या म्हणजे कृतक आहेत. [हि अन्तवत्यः भवन्ति—] ज्याअर्थीं त्या कर्ममय आहेत त्याअर्थीं स्वरूपतः व फलतःहि विनाश पावणाऱ्या आहेत. (या वाक् प्राणरूप अग्निहोत्राचें असें ज्ञान झालें असतां श्रुति सर्वसंगपरित्यागरूप संन्यास सांगते—) [ह वै पूर्वे एतत् विद्वांसः—] हें अग्निहोत्र जाणणारे पूर्वीचे प्रसिद्ध विद्वान्—भाषणव्यापार करणाऱ्या वाक्-अग्नीमध्यें निःश्वास-उच्छ्वासरूप व्यापारशून्य झालेला प्राण हेंच आज्य होमिलें जातें व निःश्वासोच्छ्वासव्यापारवान् प्राणामध्यें—प्राण याच अग्नीत भाषणव्यापारशून्य वाक् हेंच घृत होमिलें जातें, असें जाणणारे विद्वान्—प्राणोपासक [अग्निहोत्रं न जुहवांचक्रुः—] अग्निहोत्र हवन करीत नसत. त्यांनीं सर्वसंगपरित्यागरूप संन्यास केला, असा याचा भावार्थ.—'प्राणो वा उक्थं०' इत्यादि वाक्यावरून काण्वादि-शाखांमध्यें प्राण या अर्थीं 'उक्थ' हा शब्द प्रसिद्ध असल्यामुळें त्या प्रसिद्धीलाच अनुसरणारी श्रुति प्राणाचा 'उक्थ-'शब्दानें निर्देश करून त्यांत ऋगादिकांचें विधान करण्यासाठीं प्राणाच्या ब्रह्मत्वाविषयीं कौषीतकि व पैंग्य यांप्रमाणें शुष्कभृंगाराचीहि संमति आहे, असें सांगते—

उक्थं ब्रह्मेति ह स्माह शुष्कभृङ्गारस्तदगित्युपासीत सर्वाणि हास्मै भूतानि श्रैष्ठ्यायाभ्यर्चन्ते तद्यजुरित्युपासीत सर्वाणि हास्मै भूतानि श्रैष्ठ्याय युज्यन्ते तत्सामेत्युपासीत सर्वाणि हास्मै भूतानि श्रैष्ठ्याय संनमन्ते तच्छ्रीरित्युपासीत तद्यश इत्युपासीत तत्तेज इत्युपासीत तद्यथैतच्छस्त्राणां श्रीमत्तमं यशस्वितमं तेजस्वितमं भवति तथो एवैवंविद्वान् सर्वेषां भूतानां श्रीमत्तमो यशस्वितमस्तेजस्वितमो भवति ॥

अन्वयार्थ—[शुष्कभृंगारः उक्थं ब्रह्म इति ह स्म आह—] ' शुष्कभृंगार ' या नांवाचा मुनि ' उक्थ-'संज्ञक प्राण हें ब्रह्म आहे, असें सांगता झाला. [तत् उक्थं ऋक् इति उपासीत—] तें उक्थ ऋक्, अशी उपासना करावी. (प्राणच ऋग्वेद आहे, असा साक्षात्कार होईतों त्याचेंच अखंडित चिंतन करावें. प्राणामध्यें ऋग्बुद्धि केली असतां कोणतें फल प्राप्त होतें तें श्रुति सांगते—) [सर्वाणि ह भूतानि—] हीं सर्व प्रासिद्ध स्थावर-जंगम भूतें [अस्मै श्रैष्ठ्याय अभ्यर्चन्ते—] याला प्रशस्ततमत्व प्राप्त व्हावें, म्हणून याची सर्वतः पूजा करितात. [तत् यजुः इति उपासीत—] तें उक्थ यजु आहे अशी उपासना करावी. [सर्वाणि ह भूतानि अस्मै श्रैष्ठ्याय युज्यन्ते—] सर्व भूतें याच्या श्रेष्ठत्वासाठीं उद्युक्त असतात. [तत् साम इति उपासीत सर्वाणि०—] त्याची सामदृष्ट्या उपासना करावी. सर्व भूतें याच्या श्रेष्ठत्वाकरितां याच्यापुढें पूर्णपणें नम्र होतात. [तत श्रीः इति उपासीत तत यशः इति उपासीत तत् तेजः इति उपासीत—] त्या उक्थाची ' श्री ' म्ह० मनुष्यादिकांची विभूति या दृष्टीनें कीर्ति—यश या दृष्टीनें व प्रकाशादिकांचें कारण ज्योति—तेज या दृष्टीनें उपासना करावी. (श्रुति त्यांचें फल दृष्टान्तपूर्वक सांगते) [तत्—] त्या श्री, यश व तेज या दृष्टीनें केलेल्या उपासनेच्या फलाविषयीं दृष्टान्त—[यथा—] ज्याप्रमाणें [एतत् शस्त्राणां श्रीमत्तमं यशस्वितमं तेजस्वितमं भवति—] हें अर्जुनासारख्या शूरानें आकर्ण प्रत्यंचा ओढून शरसंयुक्त केलेलें महाधनुष्य खड्गादि इतर सर्व शस्त्रांमध्यें अतिशय विभूतियुक्त, अतिशय यशःसंपन्न व अतिशय तेजःसंपन्न असतें [तथा उ एव—] त्याच प्रमाणें [एवंविद्वान् सर्वेषां भूतानां श्रीमत्तमः यशस्वितमः तेजस्वितमः भवति—] प्राण हें श्री-यश-स्तेजोबुद्धीचें आलंबन आहे असें जाणणारा म्ह० त्याचें त्या बुद्धीनें चिंतन करणारा सर्व चराचर भूतांमध्यें अतिशय विभूतिमान्, कीर्तिमान् व तेजस्वी होतो. (आतां वेदविहित विद्या—उपासना संसारांतील विनाशी फल देणाऱ्या जरी असल्या तरी प्राणोपासना मोक्षाचें साधन आहे, असें श्रुति सांगते—)

तमेतमैष्टकं कर्ममयमात्मानमध्वर्युः संस्करोति तस्मि-
न्यजुर्मयं प्रवयति यजुर्मय ऋङ्मयं होता ऋङ्मये साम-

मयमुद्गाता स एष सर्वस्यै त्रयीविद्याया आत्मैष उ एवास्यात्मैतदात्मा भवति य एवं वेद ॥ ४

अन्वयार्थ—[तं एतं–] 'उक्थ' या नांवाच्या, ऋगादिबुद्धीच्या आलंबनीभूत प्राणाला–या प्रत्यक्ष मुखस्थ वायूला, [ऐष्टकं कर्ममयं आत्मानं–] इष्टकासंबंधी कर्मस्वरूप अग्नीला व आत्म्याला [अध्वर्युः–] अध्वर्यु या नांवाचा यजुःशाखीय ऋत्विक् [संस्करोति–] प्राणबुद्ध्या संस्कार करितो. म्ह० जो हा कर्मसाधनभूत इष्टकांमध्यें चयन केलेला अग्नि तोहि प्राणात्मकच आहे. कारण प्राण ऋगादिरूप आहे व ऋगादिसाध्य कर्म निष्पन्न करणारा मी तोच प्राण आहें. त्यामुळें ऋगादिरूप सर्वात्मा प्राण मी आहें व हा अग्नि मद्रूप आहे, असा अध्वर्यु आपल्याला संस्कार करितो. [तस्मिन् यजुर्मयं प्रवयति–] प्राणबुद्धीनें संस्कार केलेल्या अग्निरूप आत्म्यामध्यें–स्वतःमध्यें यजुःसाध्य कर्मवितान–कर्मांचा विस्तार कर्ममंत्रतंतूंनीं विस्तृत करितो. कोष्ठी जसा तंतूंनीं पट –वस्त्र विणतो त्याप्रमाणें हा अध्वर्यु स्वतःमध्यें यजुर्मंत्रांनी साध्य असलेलें सर्व कर्म त्या मंत्रांनीं विणतो. [होता यजुर्मये ऋङ्मय–] होता ऋत्विक् यजुःसाध्य कर्मविस्तार प्रवृत्त झाला असतां किंवा त्या कर्मविस्तारांत ऋक्साध्य कर्मविस्तार पूर्णपणें गुंफितो. [उद्गाता ऋङ्मये साममयं–] उद्गान कर्म करणारा ऋत्विक् ऋक्साध्य कर्मामध्यें किंवा तें कर्म प्रवृत्त झालें असतां सामसाध्य कर्मवितान पूर्णपणें विणतो. [सः एषः सर्वस्यै त्रयीविद्यायाः आत्मा–] तो–अध्वर्युसंस्काराचें साधन असा हा मुखस्थ प्राण ऋक्-यजुः-सामरूप सर्व त्रयीविद्येचा आत्मा आहे. शरीराचा जसा जीव तसा तो त्या विद्येचा आत्मा आहे. [एषः उ एव अस्य आत्मा–] मुखांत राहणारा हाच तो प्राण वेदविद्येचा आत्मा आहे. (आतां या उपासनेचें फल–) [यः एवं वेद सः एतदात्मा भवति–] कर्मांतील ऋत्विक्-यजमानादिकांप्रमाणें जो प्रसिद्ध उपासक–अध्वर्यु प्राण-बुद्धीनें संस्कृत केलेल्या अध्वर्युरूप अग्नींत यजुर्मय, होता यजुर्मयांत ऋङ्मय व उद्गाता ऋङ्मयांत साममय दृष्टि ठेवतो तो या त्रयीविद्येचा आत्मा होतो. ४.–'प्राण ब्रह्म आहे,' असें कौषीतकि, पैंग्य व शुष्कभृंगार यांच्या सोपपत्तिक मतांनीं सांगितलें. त्यांत ऋगादि दृष्टि करावयास सांगितली. तो प्राण बाह्य व आध्यात्मिक असा दोन प्रकारचा आहे. आधिदैविक आदित्य

व पुत्रादिरूप हा बाह्य प्राण आहे. आदित्य अग्नि-सोमात्मक आहे. त्यांतील आधिदैविक प्राणाचा स्वीकार करून विशेष फलाच्या सिद्धीकरितां श्रुति प्रथम कांहीं उपासना सांगते—

अथातः सर्वजितः कौषीतकेस्त्रीण्युपासनानि भवन्ति यज्ञोपवीतं कृत्वाऽप आचम्य त्रिरुदपात्रं प्रसिच्योद्यन्तमादित्यमुपतिष्ठेत वर्गोऽसि पाप्मानं मे वृङ्धीत्येतयैवावृता मध्ये सन्तमुद्वर्गोऽसि पाप्मानं म उद्वृङ्धीत्येतयैवावृताऽस्तं यन्तं संवर्गोऽसि पाप्मानं मे संवृङ्धीति यदहोरात्राभ्यां पापं करोति सं तद्वृङ्क्ते ॥

अन्वयार्थ—[अथ–] प्राण ब्रह्म आहे, असें कथन केल्यावर [अतः–] ज्याअर्थी उपासकाला दुसऱ्या फलाचीहि इच्छा आहे त्याअर्थी [सर्वजितः कौषीतकेः–] स्ववर्णाश्रमाचारांनीं सर्व त्रैवर्णिकांना जिंकतो म्हणून सर्वजित्–अशा सर्व जित् कौषीतकीचीं [त्रीणि उपासनानि भवन्ति–] तीन उपासनें–आधिदैविक प्राणाचीं ज्ञानें आहेत, म्ह० कौषीतकीनें तीं पाहिलीं आहेत. यास्तव ' आतां तींच मी सांगतें, ' असें श्रुति म्हणते–[यज्ञोपवीतं कृत्वा–] यज्ञोपवीत सव्य करून [अपः आचम्य–] जलाचमन करून [उदपात्रं त्रिः प्रसिच्य–] सोन्याच्या, रुप्याच्या किंवा तांब्याच्या उदकपात्राचें स्वच्छजलानें तीन वेळ प्रसेचन करून–तींनदां तें धुवून [उद्यन्तं आदित्यं उपतिष्ठेत–] उदय पावणाऱ्या आदित्याचें उपस्थान करावें. गुडघे भूमीवर टेंकून सर्व संभारासह उदकपूर्ण पात्र वर उचलून धरून मंत्रासह उपस्थान करावें. (कोणत्या मंत्रानें तें श्रुति सांगते–) [वर्गः असि पाप्मानं मे वृङ्धि इति–] आत्मबोधानें सर्व जगाचा तृणाप्रमाणें परित्याग करितो. म्हणून (वृंक्ते इति वर्गः) वर्ग, तूं वर्ग आहेस. समंत्रक अर्घ्यानें सूर्योपस्थान करणाऱ्या माझ्या भूत व भविष्यत् पापाचा विनाश कर. ' इति-'शब्द मंत्राच्या समाप्तीसाठीं आहे. [एतया एव आवृता मध्ये सन्तं उद्वर्गः असि पाप्मानं मे उद्वृङ्धि इति–] या पूर्वोक्त–यज्ञोपवीति–इत्यादि प्रकारानें आकाशमध्यभागीं आलेल्या आदित्याचें 'उद्वर्गोऽसि०' या मंत्रानें उपस्थान करावें. ' उद्-वृङ्धि ' म्हणजे अतिशय नाश कर. [एतया एव आवृता अस्तं यन्तं०–] याच इतिकर्तव्यतेनें अस्त पावणाऱ्या आदित्याचें

'संवर्गोऽसि०' या मंत्रानें उपस्थान करावें. 'संवृङ्धि' म्ह० सम्यक्-चांगल्या प्रकारें नाश कर. (याप्रमाणें आदित्याला तीन वेळ अर्घ्य देणाराला कोणतें फल प्राप्त होतें, तें श्रुति सांगते-) [यत् पापं अहोरात्राभ्यां करोति तद् संवृङ्क्ते-] जें दृष्ट दुःख देणारें पाप दिवसा व रात्रीं करितो त्या अशास्त्रीय कर्माचा फलतः विनाश करितो. त्याला पापफल प्राप्त होत नाहीं. हें कर्मात्मक एक उपासन झालें. आतां श्रुति दुसरें उपासन सांगते—

अथ मासि मास्यमावास्यायां पश्चाच्चन्द्रमसं दृश्यमानमुपतिष्ठतैतयैवावृता हरितृणाभ्यां वाक् प्रत्यस्यति यत्ते सुसीमं हृदयमधिचन्द्रमसि श्रितम् ॥ तेनामृतत्वस्येशाने माऽहं पौत्रमघं रुदमिति न हास्मात्पूर्वाः प्रजाः प्रैतीति नु जातपुत्रस्य ॥

अन्वयार्थ—[अथ मासि मासि अमावास्यायां पश्चात् दृश्यमानं चन्द्रमसं एतया एव आवृता उपतिष्ठेत-] अग्निरूप आदित्याच्या कर्मरूप उपासनेनंतर हें दुसरें कर्मरूप उपासन सांगितलें जातें. बाह्य प्राण जो आदित्य त्याचें हें सुषुम्नानाडिरूप सोमात्मक उपासन आहे. एक वर्षभर प्रत्येक महिन्याच्या अमावास्येस-'अमा' या नांवाच्या किरणांत चन्द्राच्या निवासदिवशीं आदित्याच्या पश्चिमभागीं 'सुषुम्ना-'नांवाच्या रश्मीमध्यें राहणाऱ्या चन्द्राला शास्त्रदृष्टीनें पाहून पूर्वोक्त मंत्रांनी पूर्वोक्त कालींच त्याचें उपस्थान करावें. (आतां त्यांतील विशेष तेवढा श्रुति सांगते-) [हरितृणाभ्यां वाक् प्रत्यस्यति-] अशुष्क-ताज्या दोन दूर्वांकुरांसह अर्घ्य देऊन नंतर 'यत्ते०' इत्यादि मंत्ररूप वाक् चन्द्राला उद्देशून सोडतो. अर्घ्य देऊन हा मंत्र म्हणावा, असा याचा भावार्थ. (आतां 'यत्ते०' इत्यादि मंत्राचा अर्थ असा-) [यत् ते सुसीमं हृदयं अधि चन्द्रमसि श्रितं तेन हे अमृतत्वस्य ईशाने अहं पौत्रं अघं मा रुदं इति-] जें तुझें-सोमात्मकप्रकृतीचें सुंदर मर्यादायुक्त-आदित्यपुरुषाच्या एकदेशरूप हृदयांत आनंदरूपानें जाणारें-आनंदात्मस्वरूप चंद्रमंडलाचा आश्रय करून राहिलें आहे, त्या रूपानें हे मोक्षाच्या ईश्वरि मी-स्त्री सोमात्मक व पुरुष अग्न्यात्मक आहे, असें जाणणारा मी-पुत्रसंबंधी दुःखानें दुःखी न व्हावें. पुत्र न झाल्यामुळें, तो होऊन मेल्यामुळें व त्याच्या रोगादिकांमुळें किंवा त्याला विद्या-संतति वगैरे यांची प्राप्ति न झाल्यामुळें होणारें जें निरुपम दुःख तें मला

तुझ्या प्रसादानें न होवो. शेवटचा ' इति-'शब्द मंत्रसमाप्त्यर्थ आहे. [अस्मात् पूर्वाः प्रजाः न ह प्रैति (प्रयन्ति)–] या अशा प्रकारच्या उपासकाच्या पूर्वी झालेल्या पुत्रादिरूप प्रजा मरत नाहींत. [इति नु जातपुत्रस्य–] खरोखर हा उपासनाप्रकार ज्याला पुत्र झाला आहे त्याच्यासाठीं आहे.

अथाजातपुत्रस्य ॥ आप्यायस्व समेतु ते ॥ संते पयांसि समु यन्तु वाजाः ॥ यमादित्या अंशुमाप्याययन्तीति ॥ एतास्तिस्र ऋचो जपित्वा माऽस्माकं प्राणेन प्रजया पशुभिराप्यायय्यिष्ठा योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मस्तस्य प्राणेन प्रजया पशुभिराप्यायस्वेति दैवि मावृतमावर्ते आदित्यस्यावृतमन्वावर्त इति दक्षिणं बाहुमन्वावर्तते ॥५

अन्वयार्थ—[अथ अजातपुत्रस्य–] पुत्रवानाच्या उपासनेचा प्रकार सांगितल्यानंतर ज्याला पुत्र झालेला नाहीं त्याच्या उपासनेचा प्रकार सांगितला जातो–(पुत्रवानाप्रमाणेंच अजातपुत्रवान् पुरुषानें सर्व तंत्र संपादन करून दोन ताज्या सरस दूर्वांकुरांनीं अर्घ्य तयार करावें व ' आप्यायस्व० ' इत्यादि पुढील मंत्र जपावे–) [आप्यायस्व समेतु ते–] वृद्धिंगत हो. आप्यायनास प्राप्त हो, तुझ्या ठिकाणीं चांगल्याप्रकारें प्राप्त होवो. श्रुतीनें हा एकच पाद प्रतीकरूपानें पढला आहे. त्याचे पुढील दोन पाद–'विश्वतः सोम वृष्ण्यं, भवा वाजस्य संगथे' असे आहेत. त्यांचा अर्थ–'विश्वतः'–सर्वतः अग्निरूप पुरुषगात्रापासून हे 'सोम'–स्त्रीरूप, 'वृष्ण्यं'–शरीराचें कारण असें शुक्र–अग्नीचें तेज 'वाजस्य'–अन्नाच्या 'संगथे भव'–संगत हो म्ह० पुत्रोत्पत्तीच्या द्वारा पितरांना पिंडादि अन्न देणारा हो. किंवा प्रजासंपत्तीनें तुझें तेज माझ्याशीं सर्वतः संगत होवो. मला सर्वतः अन्नाचा संगम –अन्नप्राप्ति करणारा हो. श्रुति आतां दुसऱ्या मंत्राचा प्रतीकभूत पाद सांगते–[संते पयांसि समु यन्तु वाजाः–] सोमात्मक अशा तुझीं स्तन-चंद्र-मेघमंडलस्थ क्षीरें अन्नोपजीवी पुत्रांस प्राप्त होवोत. या मंत्राचे तीन पाद असे आहेत–" संवृष्ण्यान्यभिमातिषाहः । आप्यायमानो अमृताय सोम दिवि श्रवांस्युत्तमानि धिष्व ॥" 'संवृष्ण्यानि'–उत्तमप्रकारें पुरुषोपकार करणारीं क्षीरें ' अभिमातिषाहः–' वैऱ्याला सहन करणारा म्ह० पुत्राच्या अतिशय वृद्धीनें क्षीरें वैऱ्यांचा पराभव करणारीं, हे सोम ' अमृताय '–अमृतत्वासाठीं–पुत्रोत्पत्त्यर्थ, ' आप्यायमानः '–स्वतःच्या

व अग्नीच्या तेजानें आह्लादास प्राप्त होणारा तूं ' दिवि '—स्वर्गांत ' उत्तमानि श्रवांसि धिष्व '—श्रवणयोग्य अशीं श्रेष्ठ यशें धारण कर. आतां श्रुति तिसऱ्या मंत्राचा प्रतीकभूत पाद सांगते—[यं आदित्याः अंशुं आप्याययन्ति इति—] आदित्य-अग्न्यात्मक पुरुष ' यं अंशुं '—सूर्याच्या ज्या सर्वोत्पत्तिकारणरूप प्रसिद्ध सुषुम्नसंबंधी स्त्रीरूप सोमास ' आप्यायन्ति '—आह्लाद देतात. याचे बाकीचे तीन पाद असे आहेत—" यमक्षितमक्षितयः पिबन्ति तेन नो राजा वरुणो बृहस्पतिराप्याययन्तु भुवनस्य गोपाः ॥ "—' यं अक्षितं ' —ज्या सूर्यप्रकृतिरूप सुषुम्नानाडीरूपानें अक्षीण असलेल्या सोमराजाला ' अक्षितयः '—क्षयशून्य आदित्यादिक पुरुष पति-पुत्रत्वादिरूपानें स्थित होऊन ' पिबन्ति '—पितात—लावण्य, दुग्ध इत्यादि रूपानें प्राशन करितात. ' तेन '—त्या अक्षितरूप सुषुम्नासंज्ञक किरणानें ' नः '—आम्हां सोमोपासकांस ' भुवनस्य गोपाः '—लोकाचे रक्षक प्रजापति, बृहस्पति व वरुणराजा हे ' आप्यायन्तु '—आनंदित करोत. ' इति-'शब्द तीन मंत्रांच्या प्रतीकभूत तीन पादांची समाप्ति सुचविण्यासाठीं आहे. [एताः तिस्रः ऋचः जपित्वा—] या तीन ऋचांचा जप करून (पुढील मंत्रानें सोमाच्या समोर धरलेला आपला उजवा हात मागें घेतो , असें श्रुति सांगते—) [अस्माकं—] आम्हां सोमोपासकांच्या [प्राणेन—] प्राणानें—मुखच्छिद्रांतून संचार करणाऱ्या वायूनें [प्रजया पशुभिः—] पुत्रादिरूप प्रजेनें गवादिरूप पशूंनीं [मा आप्याययिष्ठाः—] आमच्या शत्रूंना आनंदित करूं नको. आमच्या प्राण-प्रजा-पशूंच्या अभावामुळें आमच्या शत्रूंना आनंद होईल, असें करूं नको. पण [यः अस्मान् द्वेष्टि—] जो प्रसिद्ध शत्रु आम्हां सोमोपासकांचा द्वेष करितो [यं च वयं द्विष्मः—] व ज्या अपकार केलेल्या किंवा अपकार न केलेल्या अशा आमच्या प्रसिद्ध द्वेष्ट्याचा आम्ही द्वेष करितों [तस्य प्राणेन प्रजया पशुभिः आप्याययस्व—] त्याचा प्राण, प्रजा व पशु यांच्या अभावानें आम्हांला आनंद दे. [' इति '—] या मंत्राच्या अर्थरूप [दैवीं आवृतं आवर्ते—] देवानें संपादन केलेल्या संचरण क्रियेचें मी समन्ततः वर्तन करितों. [आदित्यस्य आवृतं अन्वावर्ते इति दक्षिणं बाहुं अन्वावर्तते इति—] अग्नि-सोमात्मक आदित्याच्या संचरण क्रियेचें मी अनुवर्तन करितों. ' इति-'शब्द मंत्रसमाप्तीसाठीं आहे. या मंत्रांनीं पूर्वी

सोमाच्या समोर धरलेला उजवा हात मागें काढून घेतो—दूर करितो. ५. —याप्रमाणें दोन उपासना सांगून तिसरें सोमाचें उपासन श्रुति सांगते—

अथ पौर्णमास्यां पुरस्ताच्चन्द्रमसं दृश्यमानमुपतिष्ठेतैतयैवावृता सोमो राजाऽसि विचक्षणः पञ्चमुखोऽसि प्रजापतिर्ब्राह्मणस्त एकं मुखं तेन मुखेन राज्ञोऽत्सि तेन मुखेन मामन्नादं कुरु ॥ राजा त एकं मुखं तेन मुखेन विशोऽत्सि तेन मुखेन मामन्नादं कुरु ॥ श्येनस्त एकं मुखं तेन मुखेन पक्षिणोऽत्सि तेन मुखेन मामन्नादं कुरु ॥ अग्निष्ट एकं मुखं तेन मुखेनेमं लोकमत्सि तेन मुखेन मामन्नादं कुरु ॥ त्वयि पञ्चमं मुखं तेन मुखेन सर्वाणि भूतान्यत्सि तेन मुखेन मामन्नादं कुरु ॥ मास्माकं प्राणेन प्रजया पशुभिरवक्षेष्ठा योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मस्तस्य प्राणेन प्रजया पशुभिरवक्षीयस्वेति दैवीमावृतमावर्त आदित्यस्यावृतमन्वावर्त इति दक्षिणं बाहुमन्वावर्तते ॥

अन्वयार्थ—[अथ—] प्रकृत अमावास्योपासनेहून दुसरी उपासना आतां सांगितली जाते. [पौर्णमास्यां—] सोळा कलांनीं युक्त असलेल्या पौर्णिमेस [पुरस्तात् दृश्यमानं चंद्रमसं एतया एव आवृता उपतिष्ठेत—] आपल्या अभिमुख दिसणाऱ्या चंद्राचें पूर्वोक्त विधीनेंच उपस्थान करावें (उपस्थानाचा मंत्र—) [सोमः राजा असि—] तूं विश्वप्रकृति जी उमा तिच्या सहवर्तमान किंवा सोम म्ह० प्रियदर्शन राजा—दीप्तिमान् आहेस. [विचक्षणः—] सर्व लौकिक-वैदिक कार्यांत कुशल आहेस. [पंचमुखः असि—] तूं पंचमुख—पांच मुखांनीं युक्त आहेस. [प्रजापतिः—] तसाच तूं स्थावर-जंगमांचा पालनकर्ता आहेस. (पांची मुखांचा विभाग—) [ब्राह्मणः ते एकं मुखं—] ब्राह्मण हें तुझें एक मुख आहे. [तेन मुखेन राज्ञः अत्सि—] त्या मुखानें राजजातीय क्षत्रियांना भक्षितोस. [तेन मुखेन मां अन्नादं कुरु—] त्या मुखानें मला अन्नाद—अन्नभक्षणास समर्थ—दीप्ताग्नि कर. [राजा ते एकं०—] अभिषिक्त क्षत्रिय राजा हें तुझें एक मुख आहे. त्यानें तूं वैश्यप्रधान प्रजेला खातोस. त्या मुखानें मला अन्नाद कर. [श्येनः ते०—] श्येन या नांवाचा मांसाशन करणारा क्रूर पक्षी हें तुझें एक मुख

आहे. त्यानें तूं कपोतादि—पारव्यासारख्या गरीब पक्ष्यांना खातोस. त्या मुखानें मला अन्नाद कर. [अग्निः ते०—] दाह, प्रकाश व पाक करणारा हा प्रसिद्ध अग्नि तुझें एक मुख आहे. त्याच्या योगानें तूं वायु व आकाश यांना सोडून बाकीच्या सर्व विश्वाला खातोस. त्या मुखानें तूं मला अन्नभक्षक कर [त्वयि पंचमं मुखं—] तूंच सोमराजामध्यें पांचवें मुख आहेस. [तेन मुखेन सर्वाणि०—] त्याच्या योगानें तूं सर्व स्थावर-जंगम भूतांना खातोस. त्या मुखानें मला अन्नभक्षक कर. [अस्माकं प्राणेन०—] आमच्या प्राणानें, प्रजेनें व पशूंनीं [मा अवक्षेष्ठाः—] आमच्या बंधूंचा नाश करूं नकोस. [यः अस्मान्०—] जो आमचा द्वेष करितो व ज्याचा आम्ही द्वेष करितों त्याचा प्राण, प्रजा व पशु यांनीं नाश कर. [इति दैवी आवृतं आवर्ते आदित्यस्य आवृतं अन्वावर्ते इति दक्षिणं बाहुं अन्वावर्तते—] या मंत्राच्या अर्थरूप—देवानें केलेल्या—संचरण क्रियेचें मी समंततः आवर्तन करितों. आदित्याच्या संचरण क्रियेचें मी अनुवर्तन करितों, अशा अर्थाच्या मंत्रानें तो पूर्वी सोमाच्या समोर धरलेला उजवा हात परत घेतो. किंवा भावी शुक्ल-कृष्णपक्षांच्या अपेक्षेनें आप्यायन—वृद्धि व अवक्षय—ऱ्हास हे चंद्राचे धर्मच ध्यावे. म्हणजे आपली वृद्धि व वैऱ्याचा नाश ही फलप्राप्ति अर्थात्च सांगितल्यासारखी होते.

अथ संवेश्यञ्जायायै हृदयमभिमृशेत् ॥ यत्ते सुसीमे हृदये हितमन्तः प्रजापतौ मन्येऽहं मां तद्विद्वांसं तेन माहं पौत्रमघं रुदमिति न हास्मात्पूर्वाः प्रजाः प्रैतीति॥६

अन्वयार्थ—[अथ—] याप्रमाणें सोमाची प्रार्थना केल्यावर [संवेश्यन्—] उत्तम प्रकारचा आनन्द, रति व प्रजा यांसाठीं भार्येसह बसणाऱ्या पुरुषानें [जायायै हृदयं अभिमृशेत्—] पत्नीच्या हृदयास पुढील ' यत्ते० ' या मंत्रानें सर्वतः स्पर्श करावा. [यत्—] जें दुसऱ्या शरीराला कारण होणारें सुख [ते सुसीमे हृदये—] सोमरूप असलेल्या तुझ्या सुसीमायुक्त हृदयकमलसंज्ञक आनन्दात्म्याच्या निवासस्थानीं चन्द्रमण्डलांतील अमृताप्रमाणें [अन्तःप्रजापतौ हितं—] प्रजापालकामध्यें स्थित आहे. किंवा प्रजापतिरूप मज स्रष्ट्याकडून जें शरीरान्तरकारणभूत सुख तुझ्या हृदयामध्यें ठेवलें गेलें आहे तें मी जाणतों. [अहं मां तद्विद्वांसं मन्ये—] मी सोमोपासक—तुझा पति प्रजापतीनें ठेवलेल्या त्या पूर्वोक्त

मज सोमोपासकाला—समस्तशास्त्रार्थज्ञाला जाणतों. [तेन अह पौत्रं अघं मा रुदं इति—] त्या सत्यानें मी पुत्राच्या निमित्तानें रुदन करूं नये. मला पुत्र-शोक होऊं नये. [अस्मात् पूर्वाः प्रजाः न ह प्रैति इति—] या प्रार्थनेनें व उपासनेनें याच्या पूर्वींची प्रजा मरत नाहीं, त्याची प्रजा त्याच्या हयातींत मरत नाहीं, असा याचा भावार्थ. ६.—आतां श्रुति सपुत्र सोमोपासकाचें आणखी कर्तव्य सांगते—

अथ प्रोष्याऽऽयन् पुत्रस्य मूर्धानमभिमृशेत् । अङ्गाद-ङ्गात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा त्वं पुत्र माऽऽविथ स जीव शरदः शतम् ॥ असाविति नामास्य गृह्णाति । अश्मा भव परशुर्भव हिरण्यमस्तृतं भव । तेजो वै पुत्रनामा-सि स जीव शरदः शतम् ॥ असाविति नामास्य गृह्णाति । येन प्रजापतिः प्रजाः पर्यगृह्णादरिष्ट्यै । तेन त्वा परिगृ-ह्णाम्यसाविति नामास्य गृह्णात्यथास्य दक्षिणे कर्णे जपत्यस्मै प्रयन्धि मघवन्नृजीषिन्नितीन्द्र श्रेष्ठानि द्रविणानि धेहीति सव्ये मा च्छित्था मा व्यथिष्ठाः शतं शरद आयुषो जीव पुत्र । ते नाम्ना मूर्धानमवजिघ्राम्यसाविति त्रिर्मूर्धानमवजि-घ्रेद्रवां त्वा हिंकारेणाभि हिंकरोमीति त्रिर्मूर्धानमभिहिं कुर्यात् ॥

अन्वयार्थ—[अथ—] वर सांगितलेली सोमाची उपासना केल्यावर [प्रोष्य—] दुसऱ्या गांवास किंवा अन्य देशास जाऊन [आयन्—] आलेल्या पित्यानें [पु-त्रस्य मूर्धानं अभिमृशेत्—] त्याच्या दुःखाचें निवारण करणाऱ्या पुत्राच्या मस्त-कास हातानें स्पर्श करावा. (त्या संस्पर्शाचा मंत्र—) [अंगात् अंगात् संभ-वसि हृदयात् अधिजायसे—] मस्तक-हात-पाय इत्यादि सर्व गात्रांपासून तूं निघतोस—बाहेर येतोस, ' हृदयात् अधिजायसे '—सर्व अंगांपासून निघालेला तो तूं हृदयापासून आधिकच प्रकट होतोस. [पुत्र आत्मा त्वं मा आविथ—] हे पुत्र मत्स्वरूप असलेल्या तूं ' पुं-'नामक नरकापासून माझें रक्षण केलेंस. [सः शरदः शतं जीव—] माझा रक्षक असा तो तूं शंभर वर्षें जिवंत रहा. [असौ इति अस्य नाम गृह्णाति—] असा मंत्र म्हणून पिता या पुत्राचें **'अमुक'** असें नांव घेतो. (नामग्रहणासाठीं दुसरा मंत्र—) [अश्मा भव परशुः

भव–] पाषण हो. रोगांनीं पीडा न पावणारा–लोखंडासारखा सुदृढ हो. परशूसारखा–कुऱ्हाडीप्रमाणें शत्रुरूपी वृक्षांचा छेद करणारा हो. [अस्तृतं हिरण्यं भव–] सर्वतः हांतरलेल्या–पसरलेल्या सोन्याप्रमाणें सर्व प्रजेला प्रिय हो. [पुत्र तेजः वै नाम असि–] हे पुत्रा, जें प्रसिद्ध सर्वगात्रसारभूत तेज संसारवृक्षाचें बीज तेंच तूं आहेस. [सः शरदः शतं जीव–] तो तूं माझा पुत्र शंभर वर्षें जिवंत रहा. [असौ इति अस्य नाम गृह्णाति–] असा मंत्र म्हणून पिता पुत्राचें 'अमुक' असें नांव घेतो. (तिसऱ्यांदा नांव घेण्यासाठीं तिसरा मंत्र–) [येन प्रजापतिः प्रजाः पर्यगृह्णात्–] ज्या प्रसिद्ध स्वयंप्रकाश तेजानें प्रजांचा पालक धाता आपल्या संतानरूप स्थावर-जंगमसंज्ञक प्रजा सर्वतः स्वीकारता झाला. (कशासाठीं ? उत्तर–) [अरिष्टयै–] प्रजांच्या अविनाशासाठीं स्वीकारता झाला [तेन त्वा परिगृह्णामि–] त्या प्रजापतीच्या प्रजाग्रहणतेजानें तुझा मी सर्वतः स्वीकार करितों. [असौ इति अस्य नाम गृह्णाति–] हा मंत्र म्हणून पिता 'अमुक' असें पुत्राचें नांव घेतो. [अथ अस्य दक्षिणे कर्णे ' अस्मै प्रयन्धि मघवन् ऋजीषिन् ' इति जपति–] त्यानंतर याच्या दक्षिण–उजव्या कानांत पिता ' अस्मै प्रयन्धि० ' हा मंत्र जपतो. [' इंद्र श्रेष्ठानि द्रविणानि धेहि ' इति सव्ये–] ' इंद्र श्रेष्ठानि० '–हे इंद्रा श्रेष्ठ द्रव्यें दे, अशा अर्थाचा मंत्र पिता पुत्राच्या डाव्या कातांत जपतो. आतां श्रुति मस्तकाच्या आघ्राणाचा मंत्र सांगते–) [मा च्छित्थाः–] माझ्या संतानाचा छेद करूं नको. [मा व्यथिष्ठाः–] शरीरेंद्रिय-मनांनीं व्यथा पावूं नको. [आयुषः शरदः शतं जीव–] आयुष्याचीं शंभर वर्षें जिवंत रहा. [पुत्र ते नाम्ना मूर्धानं अवजिघ्रामि–] हे पुत्रा, तुझ्या देवदत्तादि नांवानें मी तुझ्या मस्तकाचें अवघ्राण करितों. [असौ–] हा मी अमुक नांवाचा तुझा पिता आहें. [इति मूर्धानं त्रिः अवजिघ्रेत्–] या मंत्रानें पुत्राच्या मस्तकाचें त्रिवार आघ्राण करावें. (आतां श्रुति हिंकार मंत्र सांगते–) [गवां हिंकारेण त्वा अभिहिं करोमि–] गायी आपल्या वत्साला बोलवण्यासाठीं जसा हिंकार करतात तशा कामधेनुप्रभृति गायींच्या हिंकारानें मी तुला सर्वतः बोलावितों. [इति मूर्धानं त्रिः अभिहिंकुर्यात्–] या मंत्रानें तीन वेळां त्याच्या मस्तकावर सर्वतः हिंकारशब्द करावा. ७.

—याप्रमाणें कौषीतकीचीं तीन उपासनें सांगून संवर्ग विद्यारूपानें गुप्त असलेलें प्रकृत प्राणाचें ब्रह्मत्व सांगणारा वेद भिन्न फलासाठीं त्याचेंच भिन्न नाम सांगतो—

अथातो दैवः परिमर एतद्वै ब्रह्म दीप्यते यदग्निर्ज्वलत्यथैतन्म्रियते यन्न ज्वलति तस्यादित्यमेव तेजो गच्छति वायुं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यदादित्यो दृश्यतेऽथैतन्म्रियते यन्न दृश्यते तस्य चन्द्रमसमेव तेजो गच्छति वायुं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यच्चन्द्रमा दृश्यतेऽथैतन्म्रियते यन्न दृश्यते तस्य विद्युतमेव तेजो गच्छति वायुं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यद्विद्युद्विद्योततेऽथैतन्म्रियते यन्न विद्योतते तस्य वायुमेव तेजो गच्छति वायुं प्राणः ता वा एताः सर्वा देवता वायुमेव प्रविश्य वायौ मृता न मृच्छन्ते तस्मादेव पुनरुदीरत इत्यधिदैवतम् ॥

अन्वयार्थ—[अथ—] प्राणाचें ब्रह्मत्व सांगितल्यानंतर [अतः—] ज्या अर्थीं वैद्याच्या मरणाची इच्छा आहे त्या अर्थी [दैवः परिमरः—] अग्निवागादि देवांचा परिमर सांगितला जातो. (प्राणाच्या स्वरूपांत अग्न्यादिक व वागादिक देवता मरतात—लीन होतात, म्हणून ब्रह्मरूप प्राण त्यांचा परिमर आहे.) [एतत् वै ब्रह्म दीप्यते—] हें प्रसिद्ध प्राणोपाधिक सत्यज्ञानादिरूप ब्रह्म प्रकाशमान होतें. केव्हां ? उत्तर—[यत् अग्निः ज्वलति—] जेव्हां अग्नि—दाह-पाक-प्रकाश यांना कारण होणारा हा अग्नि—दीप्तिमान् होतो. [अथ एतत् म्रियते—] पण तेव्हां हें पूर्वोक्त ब्रह्म मरतें—प्राणाला सोडतें. तेव्हां म्हणजे केव्हां ? उत्तर—[यत् न ज्वलति—] जेव्हां हा अग्नि दीप्तिमान् होत नाहीं तेव्हां तें मरतें, [तस्य तेजः आदित्यं एव गच्छति—] त्या दीप्तिशून्य अग्नीचें तेज आदित्यालाच प्राप्त होतें. [प्राणः वायुं—] सर्व चेष्टेला—व्यापाराला कारण होणारा प्राण वायूला—आधिदैविक प्राणाला प्राप्त होतो. [यत् आदित्यः दृश्यते एतत् वै ब्रह्म दीप्यते—] जेव्हां सूर्य दृष्टिगोचर होतो तेव्हां हें प्राणोपाधिक सत्यज्ञानादिलक्षण ब्रह्म प्रकाशित होतें. [यत् न दृश्यते अथ एतत् म्रियते—] जेव्हां तो दृग्गोचर होत नाहीं तेव्हां तें पूर्वोक्त ब्रह्म मरतें. [तस्य तेजः चंद्रमसं एव गच्छति—] त्याचें तेज चंद्रालाच प्राप्त होतें. [प्राणः वायुं—] प्राण

आधिदैविक वायूला प्राप्त होतो. [यत् चंद्रमाः दृश्यते एतत् वै ब्रह्म दीप्यते–] जेव्हां चंद्र दिसतो तेव्हां तें प्राणोपाधिक ब्रह्मच दीप्त होतें. [यत् न दृश्यते अथ एतत् म्रियते–]जेव्हां तो दिसत नाहीं तेव्हां तें मरतें [तस्य तेजः विद्युतं०–] त्याचें तेज विद्युत्तलाच प्राप्त होतें व प्राण वायूला. [यत् विद्युत् विद्योतते एतत् वै ब्रह्म दीप्यते यत् न०–] जेव्हां विद्युत् चकाकते तेव्हां हें ब्रह्मच प्रकाशित होतें पण जेव्हां ती चमकत नाहीं, तेव्हां तिचें तेज वायूलाच प्राप्त होतें व प्राणहि वायूला प्राप्त होतो. [ताः वै एताः सर्वाः देवताः–] त्या या अग्नि-आदित्य-चंद्र-विद्युद्रूप सर्व देवता [वायुं एव प्रविश्य–] वायूंत–प्राणांत प्रवेश करून [वायौ मृताः न मृच्छन्ते–] वायूमध्यें–आधिदैविक प्राणामध्यें मृत–अस्तंगत होत्साल्या वायुतादात्म्यामुळें नाश पावत नाहींत. [तस्मात् एव उ पुनः उदीरते–] आणि त्या वायूपासूनच पुनः उदय पावतात. [इति अधिदैवतं–] असें हें अधिदैवत –देवतांतील परिमरदर्शन आहे.

अथाध्यात्मम्। एतद्वै ब्रह्म दीप्यते यद्वाचा वदत्यथैतन्म्रियते यन्न वदति तस्य चक्षुरेव तेजो गच्छति प्राणं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यच्चक्षुषा पश्यत्यथैतन्म्रियते यन्न पश्यति तस्य श्रोत्रमेव तेजो गच्छति प्राणं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यच्छ्रोत्रेण शृणोत्यथैतन्म्रियते यन्न शृणोति तस्य मन एव तेजो गच्छति प्राणं प्राण एतद्वै ब्रह्म दीप्यते यन्मनसा ध्यायत्यथैतन्म्रियते यन्न ध्यायति तस्य प्राणमेव तेजो गच्छति प्राणं प्राणस्ता वा एताः सर्वा देवताः प्राणमेव प्रविश्य प्राणे मृता न मृच्छन्ते तस्मादेव उ पुनरुदीरते ॥

अन्वयार्थ––[अथ अध्यात्मं–] अधिदैवत परिमरकथनानंतर आतां अध्यात्म–शरीरांतील परिमरकथन–[यत् वाचा वदति एतत् वै ब्रह्म दीप्यते–] जेव्हां वागिंद्रियानें बोलतो तेव्हां हें पूर्वोक्त सत्यज्ञानादिलक्षण प्राणोपाधिक ब्रह्म प्रकाशमान होतें. [यत् न वदति अथ एतत् म्रियते–] पण जेव्हां बोलत नाहीं तेव्हां तें मरतें. [तस्य तेजः चक्षुः एव गच्छति–] त्याचें तेज चक्षूलाच प्राप्त होतें. [प्राणः प्राणं–] व प्राण प्राणालाच प्राप्त होतो. [यत् चक्षुषा पश्यति एतत् वै ब्रह्म दीप्यते०–] जेव्हां चक्षूनें पहात नाहीं तेव्हां हेंच ब्रह्म प्रकाशित

होतें. जेव्हां पहात नाहीं तेव्हां तें मरतें. त्याचें तेज श्रोत्राला व प्राण अध्यात्म प्राणाला प्राप्त होतो. [यत् श्रोत्रेण शृणोति०—] जेव्हां श्रोत्रानें ऐकतो तेव्हां हें ब्रह्म दीप्त होतें, जेव्हां ऐकत नाहीं तेव्हां तें मरतें. त्याचें तेज मनाला व प्राण प्राणाला प्राप्त होतो. [यत् मनसा ध्यायति०—] जेव्हां मनानें ध्यान करितें तेव्हां तें ब्रह्म दीप्त होतें. जेव्हां ध्यान करीत नाहीं तेव्हां मरतें. [तस्य तेजः प्राणं एव गच्छति प्राणं प्राणः—] त्याचें तेज प्राणालाच प्राप्त होतें व प्राण प्राणाला प्राप्त होतो. [ताः वै एताः सर्वाः देवताः—] त्या या वाक्-चक्षुः-श्रोत्र-मनोरूप सर्व देवता [प्राणं एव प्रविश्य—] अध्यात्म प्राणांतच प्रवेश करून [प्राणे मृताः—] प्राणांत मृत—अस्त पावलेल्या अशा होत्साल्या प्राणतादात्म्यानें [न मृच्छन्ते—] विनाश पावत नाहीत. [तस्मात् एव उ पुनः उदीरते—] त्या प्राणापासूनच पुनः उदय पावतात.—या अधिदैवपरिमर-ज्ञानाचें फल—

तद्यदि ह वा एवंविद्धांस उभौ पर्वतावभिप्रवर्तेयातां तुस्तूर्षमाणौ दक्षिणश्चोत्तरश्च न हैवैनं स्तृण्वीयातामथ य एनं द्विषन्ति यांश्च स्वयं द्वेष्टि त एनं सर्वे परिम्रियन्ते ॥ ८

अन्वयार्थ—[तत्-] त्या दैव परिमराला जाणलें असतां त्याची उपासना केली असतां [यदि—] जर कदाचित् त्याला इच्छा झाली तर [ह वै एवं-विद्वांसः—] ते प्रसिद्ध—स्मरणाचा विषय होणारे दैवपरिमरज्ञानवान् [उभौ पर्वतौ अभिप्रवर्तेयातां—] दोन पर्वतांना सर्वतः प्रवृत्त करूं शकतात. त्यांना दोन योद्ध्यांप्रमाणें परस्पर द्वंद्वयुद्ध करावयास लावतात. (तर मग काय ते पर्वत एखाद्या दगडासारखे अल्पप्रमाणाचे व जथळ जवळ असतात की काय? उत्तर—) [दक्षिणः च उत्तरः च तुस्तूर्षमाणौ—] दक्षिण व उत्तर दिशा यांना आपल्या विस्तारानें आच्छादित करणारे, सूर्याच्या गतीला निरोध करणारे, आपल्या भारानें पृथिवीला पाताळांत नेणारे. तात्पर्य आपल्या देहानें सर्व विश्वा-च्या अवकाशाला व्यापणारे. अशा दोन पर्वतांनाहि ते परस्पर युद्धासाठी प्रवृत्त करूं शकतात. [एनं न ह एव स्तृण्वीयाताम्—] ते पर्वत या विद्वानांच्या आज्ञेचें उल्लंघन करीत नाहींत. ते जें सांगतात तेंच करितात. [अथ—] पण असें असतांना [ये—] जे दैवपरिमरज्ञानशून्य अभाग्यवान् पुरुष [एनं द्विषन्ति—]

या उपासकाचा द्वेष करितात [यान् च स्वयं द्वेष्टि–] व ज्यांचा हा विद्वान् स्वतः द्वेष करितो–त्यांच्याच अभाग्यामुळें जे या उपासकाला प्रिय होत नाहींत [ते सर्वे एनं परिम्रियन्ते–] ते सर्व–याचा द्वेष करणारे व याला अप्रिय होणारे पुत्र-पशु-बांधवांसह सर्वतः नाश पावतात. ८.

अथातो निःश्रेयसादानं सर्वा ह वै देवता अहंश्रेयसे विवदमाना अस्माच्छरीरादुच्चक्रमुस्तद्दारुभूतं शिश्येऽथैनद्वाक्प्रविवेश तद्वाचा वदञ्छित्वा एवाथैनच्चक्षुः प्रविवेश तद्वाचा वदञ्चक्षुषा पश्यञ्छित्वा एवाथैनच्छ्रोत्रं प्रविवेश तद्वाचा वदञ्चक्षुषा पश्यञ्छ्रोत्रेण शृण्वञ्छित्वा एवाथैनन्मनः प्रविवेश तद्वाचा वदञ्चक्षुषा पश्यञ्छ्रोत्रेण शृण्वन्मनसा ध्यायञ्छित्वा एवाथैनत्प्राणः प्रविवेश तत्तत एव समुत्तस्थौ ते देवा प्राणे निः यसं विदित्वा प्राणमेव प्रज्ञात्मानमभिसंभूय सहैतैः सर्वैरस्माल्लोकादुच्चक्रमुस्ते वायुप्रतिष्ठा आकाशात्मानः स्वरीयुस्तथो एवैवं विद्वान्त्सर्वेषां भूतानां प्राणमेव प्रज्ञात्मानमभिसंभूय सहैतैः सर्वैरस्माच्छरीरादुत्क्रामति स वायुप्रतिष्ठ आकाशात्मा स्वरेति स तद्भवति यत्रैते देवास्तत्प्राप्य तदमृतो भवति यदमृता देवाः ॥ ९

अन्वयार्थ—[अथ अतः–] परिमरगुणोपासनेनंतर ज्याअर्थीं दुसऱ्या फलाची अपेक्षा आहे त्याअर्थीं [निःश्रेयसादानं–] निःश्रेयसाचें आदान–स्वीकार केला जातो. निःश्रेयस म्ह० सर्वांपेक्षां उत्कृष्ट असणें हा गुण, त्या गुणानें विशिष्ट असलेल्या प्राणाचा स्वीकार केला जातो. प्राण निःश्रेयस आहे, ही गोष्ट विचार न करितां नुस्त्या स्नेहानें मानलेली नाहीं. तर मोठ्या परीक्षणदृष्टीनें व विचारानें निश्चित केली आहे, हें सुचविण्यासाठीं आख्यायिका– [सर्वाः ह वै देवताः अहंश्रेयसे विवदमानाः–] वागादि सर्व प्रसिद्ध देवता 'मी मोठी, मी सर्वांमध्यें श्रेष्ठ' असें मानून त्यासाठीं परस्पर विवाद करीत होत्साल्या स्वतःच त्याविषयीं निश्चय करण्यास असमर्थ झाल्यामुळें प्रजापति पित्याकडे गेल्या, व 'हे भगवन्, आम्हांमध्यें श्रेष्ठ कोण' असें त्याला विचारूं लागल्या. शरीरांतील वागादि सर्व देवतांमध्यें प्राणच श्रेष्ठ आहे, हें ठाऊक

असूनहि आपल्याच अपत्यांना खरें सांगून दुखविण्यास तो असमर्थ झाला व 'तुम्हांतील जी देवता शरीर सोडून गेली असतां हें शरीर पापिष्ठ—शवासारखें होईल ती श्रेष्ठ असें समजा,' असा त्यानें पर्यायानें उपाय सुचविला. तेव्हां आपल्या श्रेष्ठत्वाचा निश्चय करण्यासाठीं त्यांनीं क्रमानें उत्क्रमण केलें असें श्रुति सांगते— [अस्मात् शरीरात् उच्चक्रमुः—] त्या वागादि देवता या मनुष्यादि शरीरापासून क्रमानें उत्क्रमण करत्या झाल्या. [तत् दारुभूतं शिश्ये—] तेव्हां तें स्थूल शरीर वागादि प्रत्येक इंद्रियानें उत्क्रमण केलें असतां भाषणादि त्या त्या इंद्रियाचा व्यापार मात्र सोडून राहिलें. पण जेव्हां मुख्य प्राण त्यांतून निघाला तेव्हां तें चितेंतील काष्ठासारखें अस्पृश्य व सर्व व्यापारशून्य होऊन राहिले. (याप्रमाणें व्यतिरेकन्यायानें प्राणाचें श्रेष्ठत्व जरी सिद्ध झालें तरी अत्यंत स्पर्धेमुळें अन्वयावांचून त्यांची खात्री होईना. म्हणून त्यांनीं अन्वयन्यायानेंहि आपली खात्री करून घेतली असें श्रुति सांगते—) [अथ एनत् वाक् प्रविवेश—] प्राणोत्क्रमणामुळें शरीर काष्ठाप्रमाणें पडून राहिलें असतां त्या शरीरांत वागिंद्रिय प्रविष्ट झालें. [तत् वाचा वदत् शिश्ये एव—] पण तें शरीर वागिंद्रियानें नुस्ता वाग्व्यवहार—भाषण करीत तसेंच पडून राहिलें. भूमीवर शयन केलेलें तें उठलें नाहीं. [अथ एनत् चक्षुः प्रविवेश—] त्या वाक् प्रवेशानंतर चक्षुरिंद्रियानें त्यांत प्रवेश केला. [तत् वाचा वदत चक्षुषा पश्यत् शिश्ये एव—] पण तें वाणीनें भाषण करीत व चक्षूनें पहात पडूनच राहिलें. [अथ एनत् श्रोत्रं प्रविवेश०—] त्यानंतर त्यांत श्रोत्रानें प्रवेश केला. तेव्हां तें वाणीनें बोलत, चक्षूनें पहात व श्रोत्रानें शब्दश्रवण करीत पडूनच राहिलें. [अथ एनत् मनः०—] त्यानंतर त्यांत मनानें प्रवेश केला तेव्हा तें वाक्-चक्षुः-श्रोत्रांनीं बोलत, पहात, ऐकत, व मनानें ध्यान करीत पडूनच राहिलें. [अथ एनत् प्राणः०—] त्यानंतर त्यांत प्राणानें प्रवेश केला. [तत् ततः एव समुत्तस्थौ—] तें त्यानें प्रवेश केल्यामुळेंच एकदम चांगल्याप्रकारें उठून बसलें. तेव्हां [ते देवाः—] ज्यांनीं आपल्या श्रेष्ठत्वाविषयींचा अभिमान पार टाकून दिला आहे असे ते 'देव-'संज्ञक वागादिक [प्राणे निःश्रेयसं विदित्वा—] शरीराच्या उत्थापनाचें निमित्त व श्रेष्ठ क्रियावान् अशा प्राणामध्यें आपणां सर्वांपेक्षां अधिक उत्कर्ष आहे, तो श्रेष्ठ आहे, असें जाणून [प्राणं एव प्रज्ञात्मानं—] प्राणालाच—प्रज्ञात्म्याला—ब्रह्माच्या

उपाधिभूत संप्रसादाला किंवा प्राण असला तरच प्रज्ञा असते व तो नसला तर ती नसते, त्यामुळें त्याला प्रज्ञात्मत्व असणें योग्यच आहे. यास्तव त्या प्रज्ञात्म्या प्राणालाच [एतैः सर्वैः सह—] प्राण-अपान-व्यान-उदान-समान या सर्व वृत्तिभेदांसह, [अभिसंभूय—] सर्वतः प्राप्त होऊन म्ह० जसे प्राणवृत्तिभेद आध्यात्मिक परिच्छेदरहित असतात त्याचप्रमाणें वागादिकहि परिच्छेदशून्य होऊन [अस्मात् लोकात् उच्चक्रमुः—] या प्रत्यक्ष शरीरापासून—त्यावरील 'मी चक्षु मी वाक्' इत्यादि अभिमानापासून उत्क्रमण करिते झाले. (ते देव प्राणालाच श्रेष्ठ समजून त्या प्रज्ञात्म्याशीं एकरूप होऊन आध्यात्मिक परिच्छेद सोडून शरीरावरील अभिमान सोडते झाले, असा याचा भावार्थ.) [ते—] ज्यांनीं शरीराभिमान सोडला आहे असे ते वागादिक [वायुप्रतिष्ठाः—] वायूमध्यें—आधिदैविक प्राणांत ज्यांची प्रतिष्ठा आहे म्ह० प्राण श्रेष्ठ आहे हें ज्ञान ज्यांचा आश्रय आहे व [आकाशात्मानः—] ज्यांचा आत्मा आकाशाप्रमाणें सर्वगत आहे असे होत्साते [स्वर् ईयुः—] स्वर्गाला—अग्न्यादिस्वरूपाला प्राप्त झाले [तथा उ एव—] त्याचप्रमाणें म्ह० जसे देव तसेच ते अग्न्यादिस्वरूप झाले. त्यांहून भिन्नस्वरूपाचे झाले नाहीत [एवं विद्वान्—] याप्रमाणें प्राणामध्यें निःश्रेयस—प्राणाचें श्रेष्ठत्व जाणणारा उपासक[सर्वेषां भूतानां प्राणं एव प्रज्ञात्मानं सर्वैः एतैः सह अभिसंभूय—] सर्व स्थावर-जंगमांच्या प्राणासच—प्रज्ञात्म्यास प्राणाच्या पांची वृत्तींसह सर्वतः प्राप्त होऊन—तद्रूप होऊन [अस्मात् शरीरात् उत्क्रामति—] या शरीरावरील अभिमानापासून निवृत्त होतो. 'शरीरच मी' हा अभिमान सोडतो, असा याचा भावार्थ. [सः वायुप्रतिष्ठः आकाशात्मा स्वर् एति—] तो उपासक वायुच ज्याची प्रतिष्ठा आहे व आकाशाप्रमाणें ज्याचें सर्वव्यापी स्वरूप झालें आहे, असा स्वर्गाला—प्राण-देवतास्वरूपास प्राप्त होतो. किंवा ब्रह्मज्ञानोत्पादनाच्या द्वारा आनंदात्म्याला प्राप्त होतो. ('स्वेति' याचेंच व्याख्यान—) [सः तत् भवति—] तो उपासक पूर्वोक्त प्राणस्वरूप होतो. ('तत् भवति' येथील 'तत्-'शब्दाचा अर्थ—) [यत्र एते देवाः—] ज्या प्राणस्वरूपांत हे अग्न्यात्मक वागादि देव एकरूप झाले आहेत [तत् प्राप्य—] त्या प्राणस्वरूपास प्राप्त होऊन [तदमृतः भवति—] तें सर्व परिच्छेदशून्य अमृतत्व ज्याला आहे तो तदमृत होतो. [यदमृताः देवाः—] देव ज्या प्रसिद्ध सर्वपरिच्छेदशून्य

अमृतत्वानें युक्त असतात त्या अमृतानें तो युक्त होतो. ९—आतां श्रुति प्राण-वेत्त्याचें संप्रत्तिकर्म सांगते—

अथातः पितापुत्रीयं संप्रदानमिति चाऽऽचक्षते पिता पुत्रं प्रेष्यन्नाह्वयति नवैस्तृणैरगारं संस्तीर्याग्निमुपसमाधायोदकुम्भं सपात्रमुपनिधायाहतेन वाससा संप्रच्छन्नः स्वयं श्येत एत्य पुत्र उपरिष्टादभिनिपद्यत इन्द्रियैरस्येन्द्रियाणि संस्पृश्यापि वास्याभिमुखत एवासीताथास्मै संप्रयच्छति वाचं मे त्वयि दधानीति पिता वाचं ते मयि दध इति पुत्रः प्राणं मे त्वयि दधानीति पिता प्राणं ते मयि दध इति पुत्रश्चक्षुर्मे त्वयि दधानीति पिता चक्षुस्ते मयि दध इति पुत्रः श्रोत्रं मे त्वयि दधानीति पिता श्रोत्रं ते मयि दध इति पुत्रः॥ अन्नरसान्मे त्वयि दधानीति पिता अन्नरसांस्ते मयि दध इति पुत्रः कर्माणि मे त्वयि दधानीति पिता कर्माणि ते मयि दध इति पुत्रः सुखदुःखे मे त्वयि दधानीति पिता सुखदुःखे ते मयि दध इति पुत्र आनन्दं रतिं प्रजातिं मे त्वयि दधानीति पिता आनन्दं रतिं प्रजातिं ते मयि दध इति पुत्रः। इत्या मे त्वयि दधानीति पिता इत्यास्ते मयि दध इति पुत्रो धियो विज्ञातव्यं कामान्मे त्वयि दधानीति पिता धियो विज्ञातव्यं कामांस्ते मयि दध इति पुत्रः॥

अन्वयार्थ—[अथ अतः—] प्राणोपासनानंतर ज्याअर्थी मरण अवश्यंभावी आहे त्याअर्थी [पितापुत्रीयं—] पित्याकडून पुत्राला दिलें जाणारें असें जें [संप्रदानं—] संप्रत्तिकर्म [इति च आचक्षते—] तें अशा प्रकारचें सांगतात. [पिता प्रेष्यन् पुत्रं आह्वयति—] पिता या रोगादि निमित्तानें मी आतां मरणार असा निश्चय करून आपल्या औरस पुत्राला बोलावितो. [नवैः तृणैः अगारं संस्तीर्य—] नवीन कुशादितृणांनीं गृहाला आच्छादित करून [अग्निं उपसमाधाय—] त्या गृहांत श्रौत किंवा स्मार्त अग्नीचें उपसमाधान करून—अग्नीची स्थापना करून अग्नीच्या उत्तरेला किंवा पूर्वेला [सपात्रं उदकुंभं उपनिधाय—] व्रीहीनें—भातानें भरलेलें पात्र ज्याच्यावर ठेवलें आहे अशा जलपूर्ण कुंभाला त्याच्या समीप

स्थापून [स्वयं अहतेन वाससा संप्रच्छन्नः—] स्वतः नवीन वस्त्र परिधान करून [श्येतः—] शुभ्र पुष्पांची माळ व शुभ्र वस्त्र धारण करणारा असा होऊन [एत्य—] अग्नीसमीप येऊन पुत्राला बोलावितो असा वरील 'पुत्रं आह्वयति' या पदांशीं अन्वय. [पुत्रे—] पुत्र आला असतां [उपरिष्टात् अभिनिपद्यते—] त्याच्या उपरिभागीं —अंगावर सर्वतः अत्यंत प्राप्त होतो—पडतो (त्याची इतिकर्तव्यता—)[इन्द्रियैः अस्य इंद्रियाणि संस्पृश्य—] आपल्या इन्द्रियांनीं पुत्राच्या इन्द्रियांस चांगला स्पर्श करून 'अभिनिपद्यते'—सर्वतः अत्यंत प्राप्त होतो, असा अन्वय. (दुसरा पक्ष—)[अपि वा अस्य अभिमुखतः एव आसीत्—] किंवा या पुत्राच्या संमुख—समोरच बसावें. कारण त्याच्या उपरिभागीं म्ह० अंगावर पडणें हें लोकांत गर्ह्य मानलेलें आहे. [अथ अस्मै संप्रयच्छति—] त्यानंतर—पुत्राच्या समोर बसल्यावर त्या पुत्राला पुढील विधीनें पिता आपल्या वागादिकांचें संप्रदान—सम्यक् दान करितो. [मे वाचं त्वयि दधानि इति पिता—] 'मी मुमूर्षु तुझा पिता माझ्या वागिंद्रियाला तुज पुत्राचे ठिकाणीं—मला अनृणी करणाऱ्या तुझ्या ठिकाणीं धारण करितों—ठेवतों' असें पिता म्हणतो. [ते वाचं मयि दधे इति पुत्रः—] 'तुज पित्याच्या वागिंद्रियाला मी —तुझा पुत्र आपल्या ठिकाणीं धारण करितों—ठेवून घेतों,' असें पुत्र म्हणतो. [प्राणं मे त्वयि दधानि०—] 'मी आपले घ्राणाख्य व मुख्य प्राण तुझ्या ठिकाणीं धारण करितों,' असें पिता व 'तुझे प्राण मी आपल्या ठिकाणीं धारण करितों,' असें पुत्र म्हणतो. [चक्षुः मे०—] 'माझें चक्षुरिंद्रिय मी तुझ्या-मध्यें धारण करितों,' असें पिता व 'तुझें चक्षुरिंद्रिय मी माझ्यामध्यें धारण करितों' असें पुत्र म्हणतो. [श्रोत्रं मे०—] 'माझें श्रोत्र मी तुझ्यामध्यें ठेवतों' असें पिता व 'तुझें श्रोत्र मी मजमध्यें धारण करितों' असें पुत्र म्हणतो. [अन्नरसान् मे०—] 'मी आपले मधुरादि अन्नरस तुझ्या ठिकाणीं धारण करितों' असें पिता व 'तुझे अन्नरस मी आपल्या मध्यें धारण करितों' असें पुत्र म्हणतो. [कर्माणि मे०—] 'माझीं कर्में मी तुझ्या ठिकाणीं धारण करितों' असें पिता व 'तुझीं कर्में मी आपल्यामध्यें धारण करितों,' असें पुत्र म्हणतो. [सुखदुःखे०—] 'माझें शरीरोपभोग्य सुखदुःख, माझे आनंद, रति, पुत्रादि प्रजा, गती, इंद्रियवृत्ति, विज्ञातव्य—विषय, काम, इत्यादि सर्व मी तुझ्या ठिकाणीं धारण करितों,' असें पिता व 'तें सर्व मी आपल्यामध्यें धारण करितों,' असें पुत्र म्हणतो. (कोठें मन व प्रज्ञा, यांचें संप्रदान अधिक सांगितलें आहे.)

अथ दक्षिणावृत्प्राङुपनिष्क्रामति तं पितानुमन्त्रयते यशो ब्रह्मवर्चसमन्नाद्यं कीर्तिस्त्वा जुषतामित्यथेतरः सव्यमंसमन्ववेक्षते पाणिनान्तर्धाय वसनान्तेन वा प्रच्छाद्य स्वर्गाँल्लोकान्कामानाप्नुहीति स यद्यगदः स्यात्पुत्रस्यैश्वर्ये पिता वसेत्पारे वा व्रजेद्यद्यु वै प्रेयाद्यदेवैनं समापयति तथा समापयितव्यो भवति तथा समापयितव्यो भवति ॥ १०

अन्वयार्थ—[अथ–] त्यानंतर [दक्षिणावृत् प्राङ् उपनिष्क्रामति–] प्रदक्षिणा प्रकारानें पुत्र पूर्वदिशेमध्यें पित्याजवळून निघून जातो (पित्याला प्रदक्षिणा घालून पुत्र त्याच्या जवळून दूर पूर्व दिशेंत जातो.) [पिता तं अनुमंत्रयते–] पिता त्या पुत्राला अनुमंत्रित करितो. मागून बोलावून सांगतो– [यशः ब्रह्मवर्चसं अन्नाद्यं कीर्तिः त्वा जुषतां इति–] लौकिक यश–बंधुजनादिकांपासून कीर्ति, ब्रह्मतेज, भक्षणीय अन्न व शास्त्रीय यश तुझें सेवन करो, तुला तें प्राप्त होवो, असें अनुमंत्रण करितो. [अथ इतरः सव्यं अंसं पाणिना अन्तर्धाय वसनान्तेन वा प्रच्छाद्य अन्ववेक्षते–] त्यानंतर पुत्र आपला सव्य–डावा खांदा हातानें झांकून किंवा वस्त्राच्या पदरानें आच्छादित करून मागें पाहतो व पित्याला म्हणतो–[स्वर्गान् लोकान् कामानाप्नुहि इति–]अत्यंत प्रीति उत्पन्न करणाऱ्या विशेष देशांस व तेथें असलेल्या सुंदर भोगांस प्राप्त हो, असें पुत्र पित्याला म्हणतो. याप्रमाणें पुत्रानें केलें असतां [सः यदि अगदः स्यात्–] तो पिता जर कदाचित् रोगरहित–बरा झाला–त्या दुखण्यांतून उठला तर [पुत्रस्य ऐश्वर्ये पिता वसेत्–] पुत्राच्या ऐश्वर्यावर पित्यानें रहावें. एखाद्या प्रवाश्याप्रमाणें घरांत रहावें. कोणतेंहि गृहकार्य पाहूं नये. तिकडे लक्षहि देऊं नये. [वा परिव्रजेत्–] किंवा जर वैराग्य असेल तर सर्वसंगपरित्याग करावा. [यदि उ वै प्रेयात्–] आणि जर कदाचित् तो प्रसिद्ध परलोकास गेला [यत् एव एनं समापयति–] तर जें प्रसिद्ध वागादिकच त्यानें या पुत्राला चांगल्या प्रकारें प्राप्त करून दिलें असेल [तथा समापयितव्यः भवति–] तें तसेंच त्या पुत्रानें पित्याला चांगल्या प्रकारें प्राप्त करावें. त्याच्या सर्व इच्छा पूर्ण कराव्या. त्यानें जें जें कांहीं कर्तव्य सांगितलें असेल तें तें पुत्रानें तसेंच करावें. त्याच्या इच्छेच्या विरुद्ध कांहीं करूं नये. शेवटच्या वाक्याची द्विरावृत्ति अध्यायपरिसमाप्त्यर्थ आहे.

इति कौषीतकि-ब्राह्मणोपनिषदाचा दुसरा अध्याय समाप्त झाला.

अथ तृतीयोऽध्यायः ।

ज्या ब्रह्मविद्येसाठीं विविध गुणांनीं युक्त अशी पर्यंकोपासना व प्राणोपासना सांगितली ती विद्या सांगण्याची इच्छा करणारा वेद तिच्याविषयी आस्तिक्य उत्पन्न करण्यासाठीं देवांहून बलाढ्य, श्रीमान्, ब्रह्मविद्यार्थी अशा काशिराजपुत्र प्रतर्दनाला शिष्य व मनुष्यांना ती विद्या सांगण्याची इच्छा न करणाऱ्या पण सत्यपाशानें बद्ध झालेल्या देवराजाला गुरु संपादन करून आख्यायिका सांगतो—

ॐ प्रतर्दनो ह वै दैवोदासिरिन्द्रस्य प्रियं धामोपजगाम युद्धेन च पौरुषेण च तं हेन्द्र उवाच प्रतर्दन वरं ते ददानीति स होवाच प्रतर्दनस्त्वमेव मे वृणीष्व यं त्वं मनुष्याय हिततमं मन्यस इति तं हेन्द्र उवाच न वै वरोऽवरस्मै वृणीते त्वमेव वृणीष्वेत्येवमवरो वै किल स इति होवाच प्रतर्दनोऽथो खल्विन्द्रः सत्यादेव नेयाय सत्यं हीन्द्रः ॥

अन्वयार्थ—[प्रतर्दनो ह दैवोदासिरिन्द्रस्य प्रियं धामोपजगाम युद्धेन च पौरुषेण च—] ' प्र '—अतिशय ' तर्दन '—भर्त्सन—पराभव करणारा, 'प्रतर्दन' या नांवाचा (आपल्या शत्रूंना तुच्छ करीत असल्यामुळें प्रतर्दन अशा यथार्थ नांवाचा) 'दिवोदास' या नांवाच्या काशिराजाचा पुत्र ' इंद्रस्य '—परमैश्वर्यसंपन्न देवराजाच्या ' प्रियं धाम'—प्रिय स्थानास—स्वर्गास ' उपजगाम'—प्राप्त झाला. (स्वर्गास जाण्याचें कारण—) ' युद्धेन च पौरुषेण च'—समरांत अनेक वीरांचा पराभव करून व उत्साहानें—स्वर्गाच्या मर्मज्ञानानें तो स्वर्गास प्राप्त झाला. [तं ह इन्द्रः उवाच—] समरांत कुशल व उत्साहसंपन्न अशा त्या स्वर्गाला आलेल्या प्रतर्दनाला ' ह '—खरोखर ' इन्द्रः '—युद्ध व पौरुष—उत्साह यांनीं संतुष्ट झालेला देवराज म्हणाला—[प्रतर्दन वरं ते ददानि इति—] हे प्रतर्दना, मी तुला अत्यंत इष्ट असलेला पदार्थ—वर देतों, असें तो बोलला. [सः प्रतर्दनः ह उवाच—] इंद्राकडून असें बोलला गेलेला तो प्रतर्दन इंद्राला म्हणाला—[त्वमेव मे वृणीष्व यं त्वं मनुष्याय हिततमं मन्यसे इति—] 'त्वं एव '—तूंच—मजपुढें स्थित असलेला व हिताहित जाणणारा देवराजच ' मे '—

मज हितार्थी प्रतर्दनाला—मजसाठीं ' वृणीष्व '—इष्ट वर देण्याची इच्छा कर, इष्ट वर माग, की ' यं '—ज्या अर्थाला ' त्वं '—तूं सर्वज्ञ 'मनुष्याय '—अज्ञानी मनुष्याला ' हिततमं '—अतिशय हितकर ' मन्यसे'—समजत असशील ' इति '—असें तो बोलला. [तं-] त्या प्रतर्दनास [ह—] खरोखर [इन्द्रः—] इंद्र [उवाच—] म्हणाला—[वै—] ही गोष्ट प्रसिद्ध आहे कीं [अवरस्मै] दुसऱ्यासाठीं [वरः—] दुसरा [न वृणीते—] वर मागत नाहीं. यास्तव [त्वं एव—] तूंच [वृणीष्व—] आपल्यासाठीं वर माग [इति—] असें इंद्र म्हणाला. [एवं—] असें इंद्राकडून बोलला गेलेला ' प्रतर्दन ' [अवरः वै—] तर मग तो प्रसिद्ध वर अवरच होईल म्ह० वर देतों अशी प्रतिज्ञा करून तो दिलेला नाहीं, असें होईल [मे—] मज हिताहितज्ञानशून्य मनुष्याला प्रतिज्ञात अर्थ दिला नाहीं, असें होईल, [इति होवाच—] असें म्हणाला. [अथो—] प्रतर्दनच्या अशा भाषणानंतर [खलु—] खरोखर [इन्द्रः—] सत्य वाद्यांतील अग्रगण्य देवराज [सत्यात्—] मी तुला वर देतों अशी जी प्रतिज्ञा केली होती तिच्यापासून [न इयाय—] ढळला नाहीं. [हि—] कारण [सत्यं—] यथार्थ स्वरूप हाच [इन्द्रः—] इंद्र आहे. (तो स्वतः वरदाता असूनहि स्वतःच स्वतःला वराची याचना करता झाला, असा भावार्थ.)

स होवाच मामेव विजानीह्येतदेवाहं मनुष्याय हिततमं मन्ये यन्मां विजानीयात् त्रिशीर्षाणं त्वाष्ट्रमहनमरुन्मुखान्यतीन्सालावृकेभ्यः प्रायच्छं बह्वीः संधा अतिक्रम्य दिवि प्रह्लादीयानतृणमहमन्तरिक्षे पौलोमान्पृथिव्यां कालखाञ्जांस्तस्य मे तत्र नलोम च मा मीयते स यो मां विजानीया नास्यकेन च कर्मणा लोको मीयते न मातृवधेन न पितृवधेन न स्तेयेन न भ्रूणहत्यया नास्य पापंचन चक्रुषो मुखान्नीलं वेतीति ॥ १

अन्वयार्थ—[सः—] तो सत्यपाशबद्ध इंद्र [ह उवाच—] खरोखर बोलला —प्रतर्दनासाठीं आपल्याला वराची याचना करता झाला. [मां एव—] मज आनन्दात्म्यासच [विजानीहि—] तूं साक्षात् जाण. दुसऱ्या कोणालाहि जाणूं नको.—सु. ब्र.पृ.४०—[एतत् एव—] हें माझें ज्ञानच [अहं—] तुला वर देणारा व तुजसाठीं वर मागणारा मी [मनुष्याय हिततमं—] मनुष्याला अत्यंत हितकर आहे असें

[मन्ये–] समजतों. (' एतत्-'शब्दाचा अर्थ स्पष्ट करितात–) [यत्–] जें [मां–] मला–मज आनंदात्म्याला [विजानीयात्–] साक्षात् जाणावें, (हेंच ज्ञान मनुष्याला हिततम आहे, असा माझा निश्चय आहे.) ' पण तुझ्या विज्ञानानें कोणता लाभ होणार? इतरांपेक्षां तुझ्यामध्यें जर कांहीं विशेष–आधिक्य असेल तरच तुझें ज्ञान मनुष्यांना हिततम–अत्यंत हितावह होईल, त्यावांचून नाहीं. ' असें प्रतर्दन म्हणेल म्हणून इंद्र अद्वैतज्ञान मातृ-पितृवधादि महापातकांचाहि नाश करणारें आहे, असें सांगतो–) [त्रिशीर्षाणं त्वाष्ट्रं अहनं–] मी त्रिशीर्ष त्वाष्ट्राला–त्वष्ट्याच्या पुत्राला–विश्वरूपाला मारलें. [अरुन्मुखान् यतीन्–] ' रुत् ' म्हणजे वेदाध्ययन, त्यावरून यतीना अवश्य असलेला ब्रह्ममीमांसानांवाचा उपनिषदर्थ लक्षित होतो. तो ब्रह्मविचार ज्यांच्या तोंडांत नाहीं त्या अरुन्मुख यतींस–प्रयत्नशील चतुर्थाश्रमी पुरुषांस [सालावृकेभ्यः–] लांडग्यांना [प्रायच्छं–] वज्रानें शतशः तोडून खावयास दिलें. [बह्वीः संधाः–] पुष्कळ संधींचें [अतिक्रम्य–] अतिक्रमण करून [प्रह्लादीयान्–] प्रह्लादाच्या संबंधी राक्षसांस [दिवि अतृणम्–] स्वर्गांत मारलें. [अहं–] मी आत्मज्ञानी–तुला वर देणारा इंद्र [अन्तरिक्षे–] भुवर्लोकीं [पौलोमान्–] पुलोमसंबंधी असुरांस मारलें. (पुष्कळ संधींचें–प्रतिज्ञांचें–वचनांचें अतिक्रमण करून, अनेक प्रतिज्ञांचा भंग करून, ह्याची अनुवृत्ति प्रत्येक ठिकाणी करावी.) [पृथिव्यां–] भूलोकीं [कालखाञ्जान्–] कालखंजसंबंधी असुरांस [अतृणं–] मारलें. [तस्य मे–] गुरु-ब्राह्मणाचा वध करणाऱ्या, संन्याशांचे तुकडे करून लांडग्यांना घालणाऱ्या, यज्ञादिकांनी संपन्न असलेल्या महामायावी असुरांची हिंसा करणाऱ्या मज इंद्राचा [तत्र–] त्या क्रूर कर्मामुळें [नलोम च–] अल्पहि केंस [मा मीयते–] तोडला जात नाहीं. (कांहीं कारणानें मी अधिकारी शरीरवान् झालों व त्यामुळें त्रैलोक्याच्या स्थापनेसाठीं वरील घोर कर्में केलीं, असा याचा आशय. मजप्रमाणेंच) [सः यः–] जो कोणी दुसराहि देव किंवा मनुष्य [मां विजानीयात्–] मला–आनंदात्म्याला–इन्द्राला जाणील–मी इंद्र आहें असा अनुभव घेईल [अस्य केन च कर्मणा–] याचा कोणत्याहि पापकर्मानें [लोको न मीयते–] कृत किंवा केल्या जाणाऱ्या कर्मांचें फल नष्ट होत नाहीं. (आणखीं हिंसक कर्मांचेंच प्रदर्शन करून इंद्र म्हणतो–) [न मातृवधेन न पितृवधेन–] मातृवधानें त्याचें फल न

होत नाहीं. पितृवधानें होत नाहीं. (माता व पिता प्रसिद्ध आहेत.) [न स्तेयेन–] सुवर्ण म्हणून एक ऐशीं गुंजाभार सोन्याचें नाणें आहे. त्या परिमाणाचें किंवा त्याहून अधिक परिमाणाचें सोनें त्याच्या धन्याला न विचारतां त्याच्या परोक्ष घेणें हें स्तेय. त्या स्तेयानें–सोन्याच्या चोरीनें त्याची हानि होत नाहीं. [न भ्रूणहत्यया–] भ्रूण म्ह० वेदाध्ययनानंतर सूत्र-भाष्यादिकांचें अध्ययन करणारा ब्राह्मण. त्याची शरीर, वाणी व मन यांनीं हिंसा करणें ही भ्रूणहत्या. तिच्या योगानेंहि त्याचें कर्मफल नष्ट होत नाहीं. [पापंचन चकृषः अस्य–] फार काय, पण पापहि करण्याची इच्छा करणाऱ्या या आत्मज्ञान्याच्या [मुखात् नीलं न वेति–] मुखावरून नील–मुखकांतिस्वरूप जात नाहीं–त्याचें तोंड निस्तेज होत नाहीं. [इति–] शेवटचा 'इति-'शब्द प्रकृत ब्रह्मज्ञानाच्या स्तुतीच्या परिसमाप्त्यर्थ आहे. १.–याप्रमाणें ब्रह्मज्ञानाची स्तुति करून आपलें म्हणजे ब्रह्माचें स्वरूप सांगण्याची इच्छा करणारा—

स होवाच प्राणोऽस्मि प्रज्ञात्मा तं मामायुरमृतमित्युपास्स्वायुः प्राणः प्राणो वा आयुः प्राण एवामृतं यावद्ध्यस्मिञ्छरीरे प्राणो वसति तावदायुः । प्राणेन ह्येवामुष्मिल्लँलोकेऽमृतत्वमाप्नोति प्रज्ञया सत्यं संकल्पं स यो मामायुरमृतमित्युपास्ते सर्वमायुरस्मिल्लोक एत्याप्नोत्यमृतत्वमाक्षितिं स्वर्गे लोके ॥

अन्वयार्थ—[सः–] तो इंद्र [ह–] खरोखर [उवाच–] म्हणाला– [प्राणः–] प्राणशब्दवाच्य–प्राणसंज्ञक अथवा प्राणोपाधिक–प्राण ज्याची उपाधि आहे तो [अस्मि–] मी आहें. [प्रज्ञात्मा–] बुद्धिवृत्तींत प्रतिबिंबित झालेला प्रज्ञान-एकस्वभाव [तं मां–] त्या प्राण-प्रज्ञास्वरूप अशा मला–आनंदात्म्या इंद्राला [आयुः–] सर्व प्राण्यांच्या जीवनाचें कारण–प्राण व अपान यांहून व्यतिरिक्त–प्राणापानांच्या आश्रयभूत [अमृतं–] मरणशून्य–षड्भावविकारशून्य असा भावार्थ [इति–] असें म्ह० ' प्राण प्रज्ञात्मा इंद्र आयु अमृत मी आहें' अशा रूपानें [उपास्स्व–] आत्मसाक्षात्कार होईतों उपासन कर म्ह० विजातीयप्रत्ययशून्य सजातीयप्रत्ययप्रवाह सुरूं ठेव.–सु.ब्र.पृ.४०–('पण एकच असलेल्या तुज इंद्राचे प्राण, प्रज्ञात्मा, आयुः व अमृत हे गुण आहेत कीं काय?' उत्तर– 'नाहीं.' तर काय? [आयुः प्राणः–] जें आयुष्य तोच प्राण आहे. ' अहोपण,

आयुच प्राण जरी असला तरी प्राणाला आयुष्ट्व नसेल' अशी शंका व तिचें उत्तर–[प्राणः वै आयुः–] प्राणच आयु आहे. प्राण व आयु यांचा अंग-अंगी, गुण-गुणी, असा भेद नाही. अमृतत्वहि तसेंच आहे, असें इंद्र सांगतो– [प्राणः एव अमृतं–] प्राणच अमृत आहे. षड्भावविकाररहित आहे. (प्राणाचें आयुष्ट्व व अमृतत्व यांचें उपपादन–) [हि यावत् अस्मिन् शरीरे प्राणः वसति तावत् आयुः–] कारण जोंवर या शरीरांत प्राण असतो तोंवरच त्याचें आयुष्य असतें. तसेंच प्राण अमृत आहे–[हि प्राणेन एव अमुष्मिन् लोके अमृतत्वं आप्नोति–] कारण प्राणानेंच, शरीरानें नव्हे, स्वर्गादि परलोकीं अमृतत्व म्ह० सुख भोगतो. ('अहोपण, प्राण क्रियाशक्ति आहे. त्याचें हें आयुष्ट्वादिक असो, पण प्रज्ञेचा काय उपयोग ?' उत्तर–[प्रज्ञया सत्यं–] ज्ञानशक्तिरूपानें [सत्यं–] सत्य वचनाला किंवा निष्प्रपंच ब्रह्माला व [संकल्पं–] हें मला असावें, अशा प्रकारच्या मनाच्या प्रचारास प्राप्त होतो. (याप्रमाणें प्रज्ञादिकांचा उपयोग सांगून आयुष्ट्व व अमृतत्व यांच्या उपासनेचें फल इंद्र सांगतो–) [यः–] जो कोणीहि [मां०–] मज इंद्राचें–प्राणा मरूपानें प्रत्यग्भूत अशा माझें आयु व अमृत असें उपासन करतो [सः–] तो उपासक [अस्मिन् लोके सर्वं आयुः एति–] या लोकांतील सर्व म्ह० शतसंवत्सरात्मक आयुष्यास प्राप्त होतो आणि [स्वर्गे लोके–] परलोकी [अक्षितिं अमृतं आप्नोति–] क्षयरहित अमृतत्वास प्राप्त होतो. (इन्द्रानें सांगितलेला हा प्राणशब्द ऐकून प्राण व इन्द्रियें यांच्या एकत्वाविषयीं प्रतर्दनानें पूर्वी जें जें ऐकलें होतें, त्याचें त्याला स्मरण झालें व त्यामुळें तो इन्द्रास म्हणाला—)

तद्वैक आहुरेकभूयं वै प्राणा गच्छन्तीति न हि कश्चन शक्नुयात् सकृद्वाचा नाम प्रज्ञापयितुं चक्षुषा रूपं श्रोत्रेण शब्दं मनसा ध्यातुमित्येकभूयं वै प्राणाः । एकैकं सर्वाण्येवैतानि प्रज्ञापयन्ति वाचं वदन्तीं सर्वे प्राणा अनुवदन्ति चक्षुः पश्यत्सर्वे प्राणा अनुपश्यन्ति श्रोत्रं शृण्वत्सर्वे प्राणा अनुशृण्वन्ति मनो ध्यायत्सर्वे प्राणा अनुध्यायन्ति प्राणं प्राणन्तं सर्वे प्राणा अनुप्राणन्तीति । एवमु हैतदिति होन्द्र उवाच अस्ति त्वेव प्राणानां निःश्रेयसमिति ॥ २

अन्वयार्थ—[तत्—] प्राणांना अनेकत्व असतांना [ह—] खरोखर [एके—] कित्येक विद्वान् [आहुः—] सांगतात—(काय ?) [एकभूयं वै—] एकभावा-सच—एकत्वासच [प्राणाः—] इंद्रियें [गच्छन्ति—] प्राप्त होतात, [इति—] असें सांगतात. (त्याविषयीं उपपत्ति—) [हि—] कारण [कश्चन—] कोणीहि [सुकृत्—] एकाच वेळीं [वाचा नाम प्रज्ञापयितुं—] वाणीनें नाम बोलण्यास, [चक्षुषा रूपं—] चक्षूनें रूप [प्रज्ञापयितुं—] जाणण्यास [श्रोत्रेण शब्दं—] श्रोत्रेंद्रियानें शब्द ऐकण्यास व [मनसा ध्यातुं—] मनानें ध्यान करण्यास [न शक्नुयात्—] समर्थ होत नाहीं. [इति—] या प्रकारें [एकभूयं वै प्राणाः—] प्राण—इंद्रियें एकभावासच प्राप्त होतात. (या हेतूचेंच विवरण—) [सर्वाणि एव एतानि—] हीं सर्वच वागादि इंद्रियें [एकैकं—] रूप-रसादि एकेकासच [प्रज्ञापयन्ति—] आधिक्यानें निष्पन्न—संपादन करितात. (तीं कशीं ?) [वाचं वदन्तीं—] वाग्-इंद्रिय बोलूं लागलें असतां—आपला व्यापार करूं लागलें असतां [सर्वे प्राणाः—] सर्व इंद्रियें [अनुवदन्ति—] (राजा बोलूं लागला असतां सर्व सभासद जसे त्याला अनुमोदन देतात किंवा आपला व्यापार सोडून त्याला अनुसरतात त्याप्रमाणें सर्व इंद्रियें) आपापला व्यापार सोडून तिला (वाणीला) अनुसरतात किंवा जर कांहीं व्यापार केलाच तर तो तिच्या व्यापाराला अनुकूल असाच करितात. त्याच न्यायानें [चक्षुः पश्यत्० —] चक्षु पाहूं लागला असतां इतर इंद्रियें त्याला अनुसरतात; श्रोत्र ऐकूं लागलें असतां इतर सर्व प्राण त्याला अनुसरतात; मन ध्यान करूं लागलें असतां सर्व इंद्रियें त्याच्या मागोमाग ध्यान करूं लागतात व मुख्य प्राण आपला प्राणन हा व्यापार करूं लागला असतां सर्व इंद्रियें त्याला अनुसरसात. 'इति-' हा शब्द प्रतर्दनाचा प्रश्न संपला हें सुचवितो. (यावरून अष्टावधानी-शतावधानी इत्यादिकांच्या एकाच वेळीं अनेक क्रिया होत असल्याचा जो भास होतो तो मिथ्या आहे. कारण एखाद्या शतपत्र कमलाला सुईच्या अग्रानें वेध केला असतां तो एकाच क्षणीं झाला, हें जसें वाटतें, पण वस्तुतः प्रत्येक पाकळीच्या वेधाचा काल फारच सूक्ष्मप्रमाणानें भिन्न भिन्न असतो, त्याप्रमाणेंच शतावधान्याच्या ज्ञानाचाहि काल अगदीं सूक्ष्मप्रमाणांत भिन्न असतो असें जाणावें. प्रतर्दनाच्या वरील प्रश्नाचा अंगीकार करून इंद्र उत्तर सांगतो—) [एवं उ—] प्रतर्दना, **असेंच**

आहे. सर्व प्राण एकाच वेळीं आपापले व्यापार करीत नाहींत, [ह–] ही गोष्ट सर्व लोकांच्या अनुभवानेंच सिद्ध आहे. [एतत्–) एकाच वेळीं सर्व इंद्रियांनीं आपापला व्यापार न करणें हें असेंच आहे, असा ' एवं उ ' याच्याशीं संबंध. [इति ह–] असें खरोखर [इन्द्रः उवाच–] इंद्र बोलला. (मग असें जर आहे म्ह० सर्व प्राणांना तुझें उपाधित्व जर समान आहे तर तुझा ' प्राणोऽस्मि ' असा एका मुख्य प्राणाविषयींच पक्षपात कां ? उत्तर–) [तु–] असें जरी आहे तरी प्राण निःश्रेयसरूप अशा माझी निःश्रेयसरूप उपाधि आहे. प्राणसंवादादिकांत प्राणाचें निःश्रेयस प्रसिद्ध आहे. तें मागें होतें किंवा पुढें असेल असें नाहीं तर [अस्ति एव–] नित्य आहेच. (केव्हांहि नाहीं असें नाहीं.) [प्राणानां–] प्राणाच्या प्राणनादि पंचवृत्तींचें [निःश्रेयसं–] शरीरधारणादिक नित्य आहे. ' इति ' हा शब्द निःश्रेयसाच्या अस्तित्वाची प्रतिज्ञा परिसमाप्त झाली, हें सुचविण्यासाठीं आहे. २.–हें निःश्रेयस वाक्, चक्षु व श्रोत्र यांनाहि नाहीं असें क्रमानें सहेतुक सांगतात—

जीवति वागपेतो मूकान्हि पश्यामो जीवति चक्षुरपेतोऽन्धान्हि पश्यामो जीवति श्रोत्रापेतो बधिरान्हि पश्यामो जीवति मनोऽपेतो बालान्हि पश्यामो जीवति बाहुच्छिन्नो जीवत्यूरुच्छिन्न इत्येवं हि पश्याम इति ॥

अन्वयार्थ—[वागपेतः–] वाक्‌रहित प्राणी [जीवति–] जिवंत असतो. [हि–] कारण आपण [मूकान् पश्यामः–] मुक्यांना पाहतों. ' चक्षूरहितहि जिवंत असतो. कारण आपण अंधांना पाहतों. ' ' श्रोत्रेंद्रियरहितहि जिवंत असतो. कारण आपण बहिऱ्यांना पाहतों. ' ' मनोविरहितहि प्राणी जिवंत असतो. कारण आपण मूढांना पाहतों. ' (इंद्रियांचें ज्ञान त्यांच्या कार्यावरून होतें. भाषणादि कार्यांच्या अभावीं त्यांचाहि अभाव सिद्ध होतो.) [बाहुच्छिन्नः जीवति–] ज्याचे बाहू तोडले आहेत असाहि जिवंत राहतो. [ऊरुच्छिन्नः जीवति–] ज्याच्या मांड्या तोडलेल्या आहेत असाहि जिवंत राहतो. [इति एवं हि पश्यामः–] असेंच आम्ही पाहतों, असें इन्द्र बोलला. (मुख्य प्राणामध्येंच निःश्रेयस आहे, याविषयीं उपपत्ति–)

अथ खलु प्राण एव प्रज्ञात्मेदं शरीरं परिगृह्योत्थापयति तस्मादेतदेवोक्थमुपासीत यो वै प्राणः सा प्रज्ञा या वा प्रज्ञा स प्राणः सह ह्येतावस्मिञ्छरीरे वसतः सहोत्क्रामतस्तस्यैषैव दृष्टिरेतद्विज्ञानं ॥

अन्वयार्थ—[अथ खलु–] ज्याअर्थी हें सर्व प्रत्यक्ष आहे, त्याअर्थी [प्राणः एव प्रज्ञात्मा–] क्रियाशक्ति ही ज्याची उपाधि आहे तोच ज्ञानशक्ति-उपाधि आहे (म्ह० क्रियाशक्ति व ज्ञानशक्ति या दोन्ही एकाच्याच उपाधि आहेत.) तो [इदं शरीरं–] हें प्रत्यक्ष दिसणारें स्थूल शरीर [परिगृह्य–] हेंच मी किंवा हें माझें, अशारीतीनें याचा स्वीकार करून [उत्थापयति–] शयन, आसन इत्यादिकांवरून वर उठवितो. (आतां प्रसंगानें म्ह० स्मरण झाल्या-मुळें छान्दोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांतून प्रसिद्ध असलेल्या प्राणाच्याच दुसऱ्या उपासनेचें इंद्र स्मरण करून देतो–) [तस्मात्–] ज्याअर्थी हा प्राण या शरीराला उठवितो त्याअर्थी [एतदेव–] या उत्थापनाला कारण होणाऱ्याच[उक्थं उपासीत–] 'उक्थ' या नांवाच्या प्राणाची उपासना करावी. (अहोपण, प्राणच जर 'उक्थ' या नांवाचें उपास्य असेल तर तो परमात्मा नव्हे. तर प्राण-अपा-नादि पंचवृत्ति भौतिक प्राण असला पाहिजे, असें कोणी म्हणेल म्हणून इन्द्र सांगतो–) [यः वै प्राणः सा प्रज्ञा–] जो येथें प्राण म्हणून प्रसिद्ध आहे तीच प्रसिद्ध प्रज्ञा–सर्व बोधांची साक्षिभूत संविद् आहे, आणि [या वा प्रज्ञा सः प्राणः–] जी प्रज्ञा तोच प्राण–प्राणोपाधिक परमात्मा आहे. [हि–] कारण [एतौ–] तीं दोन्ही प्राण व प्रज्ञा [सह–] मिळून [अस्मिन् शरीरे वसतः–] या शरीरांत राहतात–निवास करितात, [सह उत्क्रामतः–] व मरणसमयीं जीवाशीं मिळून या शरीरांतून उत्क्रमण करितात. [तस्य–] त्या प्राणाची–प्राणोपाधिक आत्म्याची [एषा एव–] ही पुढें सांगितलेल्या प्रकारचीच [दृष्टिः–] दर्शन या नांवाची अवगति–ज्ञान–बोध आहे. म्हणजे [एतत् विज्ञानं–] हें जें सुषुप्त तेंच आत्म्याला प्राणत्व आहे, हें जाणण्याचें कारण आहे. ('एतत्-' शब्दाचाच अर्थ इन्द्र सांगतो–)

यत्रैतत्पुरुषः सुप्तः स्वप्नं न कंचन पश्यत्यथास्मिन्प्राण एवैकधा भवति तदैनं वाक्सर्वैर्नामभिः सहाप्येति चक्षुः

सर्वैं रूपैः सहाप्येति श्रोत्रं सर्वैः शब्दैः सहाप्येति मनः सर्वैर्ध्यानैः सहाप्येति स यदा प्रतिबुध्यते यथाग्नेर्ज्वलतः सर्वा दिशो विस्फुलिङ्गा विप्रतिष्ठेरन्नेवमेवैतस्मादात्मनः प्राणा यथायतनं विप्रतिष्ठन्ते प्राणेभ्यो देवा देवेभ्यो लोकाः ॥

अन्वयार्थ—[यत्र–] ज्या अवस्थेत [एतत्–] सर्व विशेषज्ञानरहित होऊन [पुरुषः–] वस्तुतः परिपूर्ण असूनहि परिच्छिन्न हृदयांत राहणारा आत्मा [सुप्तः–] झोपीं गेलेला असा होत्साता [कंचन स्वप्नं न पश्यति–] कोणताच जाग्रद्वासनारूप पदार्थ पहात नाहीं [अथ–] त्यावेळी [अस्मिन् प्राणे एव–] या मुख-नासिकादि स्थानांतून संचार करणाऱ्या प्राणांतच–क्रियाशक्तीतच–दुसऱ्या कशाहि मध्यें नाही [एकधा भवति–] एकत्वास प्राप्त होतो. म्ह०प्राणोपाधिक –' प्राण ' या शब्दास योग्य असा पुरुष होतो. [तदा–] त्यावेळीं–प्राण एकत्वास प्राप्त होण्याच्या वेळीं [एनं–] या प्राणोपाधिक आत्म्यास–आत्म्यामध्यें [वाक् सर्वैः नामभिः सह अप्येति–] वाक् सर्व नामांसह लय पावते. [चक्षुः०–] चक्षु सर्व रूपांसह लय पावतें, [श्रोत्रं०–] श्रोत्र सर्व शब्दांसह लय पावतें. [मनः०–] मन सर्व ध्यानांसह लय पावतें. (पण समुद्रांत जशा नद्या त्याप्रमाणें प्राणांत लीन झालेल्या त्यांची पुनरुत्पत्ति कोठून होते ? उत्तर– [सः–] तो प्राणोपाधिक पुरुष [यदा–] जेव्हां [प्रतिबुध्यते–] जाग्रदवस्थेस प्राप्त होतो–जागा होतो तेव्हां [यथा–] ज्याप्रमाणें [ज्वलतः अग्नेः–] जाज्वल्यमान अग्नीपासून [सर्वाः दिशः–] सर्व दिशांकडे [विस्फुलिंगाः–] क्षुद्र अग्निकण–बारीक किटाळें [विप्रतिष्ठेरन्–] सर्व बाजूस उडतात [एवमेव–] याच न्यायानें [एतस्मात् आत्मनः–] या प्राणोपाधिक आत्म्यापासून [प्राणाः–] वाक्, चक्षु इत्यादि गौण प्राण [यथायतनं–] ज्याचें जें जिह्वा, डोळे, कान इत्यादि स्थान असतें त्याला उद्देशून–त्याच्याकडे [विप्रतिष्ठन्ते–] नानाप्रकारें जातात. [प्राणेभ्यः–] त्या वागादि प्राणांपासून [देवाः–] अग्न्यादि विविध देव व [देवेभ्यः लोकाः–] त्या देवांपासून नाम-रूपादि विविध लोक–विषय उद्भवतात. (याप्रमाणें जिवंतपणीं–जीवदवस्थेंत प्राणोपाधित्व सांगून मरणावस्थेंतहि तें इंद्र सांगतो—)

तस्यैषैव सिद्धिरेतद्विज्ञानं यत्रैतत्पुरुष आर्तो मरिष्यन्नाबल्यं न्येत्य संमोहं न्येति तदाहुरुदक्रमीच्चित्तं न शृणोति न पश्यति न वाचा वदति न ध्यायत्यथास्मिन्प्राण एवैकधा भवति तदैनं वाक्सर्वैर्नामभिः सहाप्येति चक्षुः सर्वै रूपैः सहाप्येति श्रोत्रं सर्वैः शब्दैः सहाप्येति मनः सर्वैर्ध्यानैः सहाप्येति स यदा प्रतिबुध्यते यथाग्नेर्ज्वलतो विस्फुलिङ्गा विप्रतिष्ठेरन्नेवमेवैतस्मादात्मनः प्राणा यथायतनं विप्रतिष्ठन्ते प्राणेभ्यो देवा देवेभ्यो लोकाः ॥ ३

अन्वयार्थ—[तस्य–] त्या प्राणोपाधिकाची [एषा एव–] मरणावस्थारूपच, दुसरी नव्हे, [सिद्धिः–] प्राणत्वाविषयी प्रसिद्धि आहे. (याचेंच व्याख्यान–) [एतत्–] हें सर्वप्रत्यक्ष मरण [विज्ञानं–] प्रमाण आहे. (आत्मा प्राण आहे, याविषयी मरणावस्था हीच प्रसिद्धि आहे व तेंच त्याविषयीं प्रमाण–विज्ञानाचें साधन आहे, असा भावार्थ. आतां ' एतत् ' या शब्दानें सांगितलेलें मरणच श्रुति सांगते–) [यत्र–] ज्या अवस्थेंत [एतत् पुरुषः–] हा पुरुष–प्रत्यक्ष मनुष्यत्वाद्यभिमानी [आर्तः–] जरा, व्याधि इत्यादिकांच्या अधीन झालेला [मरिष्यन्–] मरणारा–आसन्नमृत्यु–मुमूर्षु होतो [आबल्यं–] अबलत्वास–दुर्बलत्वास [न्येत्य–] अगदीं प्राप्त होऊन [संमोहं–] बंधु, आप्त इत्यादिकांचें ज्ञान न होणें, अशा स्वरूपाच्या संमोहास [न्येति–] सर्वथा प्राप्त होतो [तदा आहुः–] त्यावेळीं त्याच्या समीप बसलेले लोक म्हणतात– [उदक्रमीत् चित्तम्–] याच्या मनानें उत्क्रमण केलें–तें उत्क्रान्त झालें. (चित्ताच्या उत्क्रमणाचीं चिन्हें श्रुति सांगते—) [न शृणोति न पश्यति न वाचा वदति न ध्यायति–] तो ऐकत नाहीं, पहात नाहीं, वाक्-नें भाषण करीत नाहीं, ध्यान करीत नाहीं, इत्यादि प्रकारें ते जवळचे लोक बोलतात. [अथ अस्मिन् प्राणे एव०–] तो या प्राणांतच एकरूप होतो. [तदा एनं वाक्०–] त्यावेळीं–मरणसमयीं वाक्-इंद्रिय सर्व नामांसह या प्राणांत लीन होतें. चक्षु सर्व रूपांसह त्यांत लीन होतें. श्रोत्र सर्व शब्दांसह प्राणांत लीन होतें. मन सर्व ध्यानांसह प्राणांत लीन होतें. पण [सः यदा प्रतिबुध्यते०–] तो जेव्हां पुनः उत्पन्न–जागा होतो–दुसरें शरीर ग्रहण करतो तेव्हां जशीं पेटलेल्या अग्नीपासून

विस्फुलिंग–किटाळें निरनिराळ्या दिशांकडे उडतात [एवमेव०–] त्याचप्रमाणें या आत्म्यापासून प्राण–इंद्रियें आपआपल्या स्थानाकडे विशेषतः निघतात. त्या इंद्रियाख्य प्राणांपासून अग्न्यादि देव व देवांपासून लोक म्ह० विषय उदय पावतात. म्ह० दुसऱ्या शरीराचें ग्रहण केल्यावर त्याहि शरीरांत मोहापासून सर्वथा मुक्त होतो, असा भावार्थ (या प्रमाणें मरणकालीं मूर्च्छा व इंद्रियांचा लय सांगून शरीरापासून उत्क्रमण करण्याच्या वेळीं त्याच लयाविषयींचा विशेष सांगतात—)

स यदाऽस्माच्छरीरादुत्क्रामति सहैवैतैः सर्वैरुत्क्रामति । वागस्मात्सर्वाणि नामान्यभिविसृजते । वाचा सर्वाणि नामान्याप्नोति । प्राणोऽस्मात्सर्वान्गन्धानभिविसृजते । प्राणेन सर्वान्गन्धानाप्नोति । चक्षुरस्मात्सर्वाणि रूपाण्यभिविसृजते चक्षुषा सर्वाणि रूपाण्याप्नोति । श्रोत्रमस्मात्सर्वाञ्शब्दानभिविसृजते श्रोत्रेण सर्वाञ्शब्दानाप्नोति । मनोऽस्मात्सर्वाणि ध्यानान्यभिविसृजते मनसा सर्वाणि ध्यानान्याप्नोति सैषा प्राणे सर्वाप्तिः । यो वै प्राणः सा प्रज्ञा या वा प्रज्ञा स प्राणः सह ह्येतावस्मिञ्शरीरे वसतःसहोत्क्रामतः । अथ खलु यथाऽस्यै प्रज्ञायै सर्वाणि भूतान्येकं भवन्ति तद्व्याख्यास्यामः ॥

अन्वयार्थ—[सः] तो मुमूर्षु [यदा–] ज्यावेळीं [अस्मात् शरीरात्–] या प्रत्यक्ष शरीरापासून [उत्क्रामति–] वर निघून जातो.–सु.ब्र.पृ.२१४– [सह एव एतैः सर्वैः उत्क्रामति–] तेव्हां या सर्वांसहवर्तमानच वर निघून जातो. [वाक्–] वाक्इंद्रिय [अस्मात्–] या स्वामीपासून [सर्वाणि–] सर्व [नामानि–] स्वविषयभूत नामें [अभिविसृजते–] सर्वतः सोडून देतें. वाक्-इंद्रिय आपल्या विषयव्यापारापासून सर्वथा उपरम पावून पुनः आपल्या स्वामीला भोग देत नाहीं. [वाचा सर्वाणि नामानि आप्नोति–] प्राण वाक्-इंद्रियासह सर्व नामांना व्यापतो. केवल वाक्-इंद्रियच प्राणांत लीन होत नाहीं तर ती वाक् आपल्या विषयांसह प्राणांत लीन होते. [प्राणः अस्मात्०–] घ्राणेंद्रिय या स्वामीपासून सर्व गंधांचा परित्याग करतें. घ्राणासह सर्व गंधांना मुख्य प्राण व्यापतो. चक्षु सर्व रूपांचा याच्यापासून परित्याग करतो. प्राण चक्षूसह सर्व रूपांना व्यापतो.

श्रोत्र या स्वामीपासून सर्व शब्दांचा परित्याग करतें. प्राण श्रोत्रानें सर्व शब्दांस व्यापतो. मन या स्वामीपासून सर्व ध्यानांचा सर्वथा परित्याग करतें. प्राण मनासह सर्व ध्यानांस व्यापतो. [सा एषा–] तीच ही वर ' स यदा० ' या वाक्यानें सांगितलेली [प्राणे–] प्राणोपाधिक आत्म्यामधील [सर्वाप्तिः–] विषयेंद्रियादिलक्षण सर्वांची प्राप्ति आहे. (पण हा प्राण म्ह० प्राण-अपान इत्यादि पंचवृत्तिमात्र अध्यात्म वायु नव्हे, तर क्रिया-ज्ञानशक्तियुक्त आत्मा आहे, ह्या पूर्वीच्या अर्थाचेंच स्मरण देतात–) [यः वै प्राणः–] जो हा प्राण [सा प्रज्ञा०–] तीच प्रज्ञा व जी प्रज्ञा तोच प्राण. [सह हि एतौ अस्मिन् शरीरे वसतः सहोत्क्रामतः–] तीं दोघें या शरीरांत बरोबरच राहतात व बरोबरच शरीरापासून निघून जातात. (प्राणामध्यें सर्व भूतांचा एकीभाव सांगितला. आतां प्राण व प्रज्ञा यांचा सर्व प्रकारें एकीभाव सांगण्यासाठीं इंद्र प्राणाप्रमाणें तिलाहि सर्वात्मत्व आहे, असें सांगण्यास आरंभ करितो–) [अथ–] प्राणाचें सर्वात्मत्व सांगितल्यानंतर [खलु–] खरोखर [यथा–] ज्याप्रकारें [अस्यै प्रज्ञायै–] या प्रज्ञेंत–ज्ञानशक्तींत–साक्षिचैतन्यांत [सर्त्राणि भूतानि–] विषयांसह स्थिर-चरसंज्ञक सर्व भूतें–वागादि इंद्रियें [एकं भवन्ति–] प्राणाप्रमाणेंच एकरूप होतात [तत्–] तें–तो प्रकार [व्याख्यास्यामः–] अगदीं स्पष्टपणें सर्व प्रकारें सांगूं. ४.–(एकभावाची प्रतिज्ञा करून प्रथमतः प्रज्ञेचा विभाग सांगतात–)

वागेवास्या एकमङ्गमदूहळं तस्यै नाम परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । प्राण एवास्या एकमङ्गमदूहळं तस्य गन्धः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । चक्षुरेवास्या एकमङ्गमदूहळं तस्य रूपं परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । श्रोत्रमेवास्या एकमङ्गमदूहळं तस्य शब्दः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । जिह्वैवास्या एकमङ्गमदूहळं तस्या अन्नरसः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । हस्तावेवास्या एकमङ्गमदूहळं तयोः कर्म परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । शरीरमेवास्या एकमङ्गमदूहळं तस्य सुखदुःखे परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । उपस्थ एवास्या एकमङ्गमदूहळं

**तस्यानन्दो रतिः प्रजातिः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा।
पादावेवास्या एकमङ्गमदूहळं तयोरित्याः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा । प्रज्ञैवास्या एकमङ्गमदूहळं तस्यै धियो विज्ञातव्यं कामाः परस्तात्प्रतिविहिता भूतमात्रा ॥ ५**

अन्वयार्थ—[वाक् एव—] वागिंद्रियच [अस्याः—] या प्रज्ञेचें [एकं अंगं—] एक भाग—गाईच्या एका स्तनाप्रमाणें [अदूहळम्—] दोहन करतें झालें. वाक्‌नें प्रज्ञेचा एक भाग आपल्या स्वाधीन करून घेतला. [तस्यै—] जिनें प्रज्ञेच्या एका भागाचें दोहन केलें आहे अशा त्या वाक्-चा [नाम—] बोलावयाचें सर्व शब्दजात हा [परस्तात्—] विषयत्वानें परदेशांत म्ह० बहिर्देशांत [प्रतिविहिता भूतमात्रा—] भूतभाग विनिर्माण केला, किंवा तिच्या विषयत्वानें बहिर्देशीं निर्माण केलेली भूतमात्रा नाम—शब्दजात आहे. [प्राण एव०—] घ्राणाख्य प्राणच या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेता झाला. त्याच्या विषयत्वानें बाहेर निर्माण केलेली भूतमात्रा गंध आहे. [चक्षुरेवास्याः०—] चक्षुच या प्रज्ञेचा एक भाग स्वाधीन करिता झाला. रूप ही त्याची बाहेर निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [श्रोत्रमेवास्याः०—] श्रोत्रच त्या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेतें झालें. त्याची शब्द ही बाहेर निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [जिह्वा एवास्याः०—] जिह्वाच प्रज्ञेच्या एका अंगाला स्वाधीन करून घेती झाली. अन्नरस हीच तिच्या विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [हस्तौ एव०—] दोन हातच हिच्या एका अंगाला स्वाधीन करून घेते झाले. यांचें कर्म ही बाहेर विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [शरीरमेवास्याः०—] शरीरच या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेतें झालें. त्याच्या बाह्य विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा सुख-दुःख आहे. [उपस्थः एव०—] उपस्थच या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेता झाला. आनन्द, रति, प्रजाति, हीच त्याची बाह्य विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [पादौ एव अस्याः०—] दोन पाय हेच या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेते झाले. गति ही त्यांची बाहेर विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा आहे. [प्रज्ञैवास्याः०—] प्रज्ञाच या प्रज्ञेचें एक अंग स्वाधीन करून घेती झाली. तिची बुद्धि, ज्ञातव्य विषय व

काम ही बाहेर विषयत्वानें निर्माण केलेली भूतमात्रा आहे ५.—वर वर्णन केल्याप्रमाणें प्रज्ञेचा विभाग सांगून या खंडांत अविभाग सांगतात—

प्रज्ञया वाचं समारुह्य वाचा सर्वाणि नामान्याप्नोति ।
प्रज्ञया प्राणं समारुह्य प्राणेन सर्वान् गंधान् आप्नोति ।
प्रज्ञया चक्षुः समारुह्य चक्षुषा सर्वाणि रूपाण्याप्नोति ।
प्रज्ञया श्रोत्रं समारुह्य श्रोत्रेण सर्वान् शब्दानाप्नोति ।
प्रज्ञया जिह्वां समारुह्य जिह्वया सर्वानन्नरसानाप्नोति ।
प्रज्ञया हस्तौ समारुह्य हस्ताभ्यां सर्वाणि कर्माण्याप्नोति ।
प्रज्ञया शरीरं समारुह्य शरीरेण सुखदुःखे आप्नोति ।
प्रज्ञयोपस्थं समारुह्योपस्थेनानन्दं रतिं प्रजातिमाप्नोति ।
प्रज्ञया पादौ समारुह्य पादाभ्यां सर्वा इत्या आप्नोति ।
प्रज्ञया धियं समारुह्य प्रज्ञयैव धियो विज्ञातव्यं कामानाप्नोति ॥ ६

अन्वयार्थ—[प्रज्ञया—] वाणीनें स्वाधीन करून घेतलेल्या पूर्वोक्त संविदेनें [वाचं—] वागिंद्रियावर [समारुह्य—] तादात्म्यसंबंधानें आरोहण करून 'मीच वाक् आहें' अशा अभिमानास प्राप्त होऊन [वाचा—] पूर्वोक्त प्रज्ञारूप वाक्-इंद्रियानें [सर्वाणि नामानि—] सर्व वक्तव्य नामांस—शब्दांस प्रज्ञा [आप्नोति—]प्राप्त होते. (प्रज्ञेवांचून नुस्त्या इंद्रियाला आपल्या विषयास प्राप्त होतां येत नाहीं. म्हणून जें ज्यावांचून उपलब्ध होत नाहीं तें तदात्मक असतें. जसा तंतूवांचून पट उपलब्ध होत नाहीं म्हणून तो तन्त्वात्मक आहे, किंवा शिंपीवांचून उपलब्ध न होणारें रजत शिंपीच असतें, त्याप्रमाणें इंद्रियावांचून उपलब्ध न होणारा विषय इंद्रियात्मक आहे व प्रज्ञेवांचून उपलब्ध न होणारे इंद्रिय प्रज्ञात्मक आहे. हाच न्याय इतर विषय व इंद्रियें यांस लागू आहे, असें क्रमानें श्रुति सांगते—) [प्रज्ञया प्राणं०—] प्रज्ञेनें घ्राणेंद्रियाशीं तादात्म्य पावून घ्राणेंद्रियानें सर्व गंधांस प्रज्ञा प्राप्त होते. प्रज्ञेनें चक्षूंशीं तादात्म्य पावून चक्षूनें सर्व रूपांस प्रज्ञा प्राप्त होते. प्रज्ञेनें श्रोत्रेंद्रियावर आरूढ होऊन श्रोत्रानें सर्व शब्दांस प्राप्त होते. प्रज्ञेनें जिह्वेवर आरूढ होऊन 'तीच मी' असा अभिमान धरून जिह्वेनें सर्व अन्नरसांस प्राप्त होते. प्रज्ञेनें हस्तांवर आरोहण करून दोन्ही हातांनीं सर्व कर्मांस प्राप्त होते. प्रज्ञेनें शरीरावर आरोहण करून शरीरानें सुख

व दुःख यांस प्राप्त होते. प्रज्ञेनें उपस्थावर आरोहण करून उपस्थानें आनंद, रति, प्रजाति यांस प्राप्त होते. प्रज्ञेनें दोन पायांवर आरोहण करून दोन पायांनीं गतींस प्राप्त होते. प्रज्ञेनें बुद्धीवर आरोहण करून प्रज्ञेनेंच बुद्धि, विज्ञातव्य, काम यांस प्राप्त होते. सु. ब्र. २१६ पहा. ६.

('अहोपण, प्रज्ञा काय करावयाची आहे? वागादि इंद्रियांकडूनच आपापला विषय जाणला जातो' अशी शंका घेऊन प्रज्ञारहित वागादिकांचा त्यांच्या त्यांच्या विषयांशीं संबंध जरी झाला तरी नुस्त्या संबंधानेंच विषयाचें ज्ञान होऊं शकत नाहीं, ही गोष्ट सर्वानुभवसिद्ध आहे, असें श्रुति दाखविते—)

न हि प्रज्ञापेता वाङ्नाम किंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतन्नाम प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतः प्राणो गन्धं कंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतं गन्धं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतं चक्षू रूपं किंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतद्रूपं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतं श्रोत्रं शब्दं कंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतं शब्दं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेता जिह्वान्नरसं कंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतमन्नरसं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतौ हस्तौ कर्म किंचन प्रज्ञापयेतामन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतत्कर्म प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतं शरीरं सुखं दुःखं किंचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतत्सुखं दुःखं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेत उपस्थ आनन्दं रतिं प्रजातिं कांचन प्रज्ञापयेदन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतमानन्दं रतिं प्रजातिं प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेतौ पादावित्यां कांचन प्रज्ञापयेतामन्यत्र मे मनोऽभूदित्याह नाहमेतामित्यां प्राज्ञासिषमिति न हि प्रज्ञापेता धीः काचन सिद्ध्येन्न प्रज्ञातव्यं प्रज्ञायेत ॥ ७

अन्वयार्थ—[हि—] ज्याअर्थी [प्रज्ञापेता वाक्—] प्रज्ञारहित वागिंद्रिय [किंचन नाम—] कोणतेंहि वक्तव्य [न प्रज्ञापयेत्—] स्वतःला किंवा दुसऱ्याला

प्रकाशित करीत नाहीं. (प्रज्ञारहित वाक् आपला व्यापार करूं शकत नाहीं आणि ती प्रज्ञेवांचूनच जर स्वव्यापार करूं लागली तर अविवक्षित किंवा असंबद्ध अर्थहि बोलेल, असा भावार्थ. याविषयीं सर्व लोकांचा अनुभव हेंच प्रमाण श्रुति देते–) [अन्यत्र–] दुसऱ्या विषयामध्यें [मे–] माझें म्ह० इंद्रियांचा स्वामी असा जो मी त्या माझें [मनः–] अन्तःकरण, अशी जी बुद्धिवृत्ति तिचें जनक–आंतिल ज्ञानसाधन अशा बुद्धिवृत्तीला उत्पन्न करणारें प्रज्ञासाक्षि [अभूत्–] होतें, [इति आह–] असें मनुष्य बोलतो. (मन अन्यत्र असल्यामुळें काय होतें तें श्रुति अनुभवी लोकांच्या म्हणण्याचा अनुवाद करून सांगते–) [अहं–] मीं–इंद्रियांच्या स्वामीनें [एतत्–] तूं सांगितलेलें हें वाक्य –वागिंद्रियाचा विषय [न प्राज्ञासिषम्–] उत्कृष्टरीतीनें जाणला नाहीं. (दुसऱ्याचें ज्ञान व अज्ञान जरी प्रत्यक्ष नसलें तरी त्याच्या भाषणावरून त्याचें अनुमान होऊं शकतें. अर्थात् प्रज्ञारहित वागिंद्रिय आपला व्यापार करूं शकत नाहीं आणि जशी वाक् तशींच इतर इंद्रियें वगैरे, असें सांगतात–) [न हि प्रज्ञापेतः प्राणः०–] प्रज्ञारहित घ्राणेंद्रिय कोणत्याहि गंधाचें ज्ञान करून देत नाहीं. ' माझें मन अन्य विषयामध्यें आसक्त होतें, मीं या गंधाला जाणलें नाहीं ' असें सांगतो. [न हि प्रज्ञापेतं चक्षुः०–] प्रज्ञारहित चक्षु कोणत्याहि रूपाचें ज्ञान करून देत नाहीं. ' माझें मन अन्यत्र होतें. त्यामुळें मीं हें रूप जाणलें नाहीं, ' असें सांगतो. [न हि प्रज्ञापेतं श्रोत्रं०–] प्रज्ञारहित श्रोत्र कोणत्याहि शब्दाचें ज्ञान करून देत नाहीं. ' माझें मन अन्यत्र होतें, त्यामुळें मीं या शब्दाला जाणलें नाहीं, ' असें सांगतो. [न हि प्रज्ञापेता जिह्वा अन्नरसं कंचन०–] प्रज्ञारहित रसनेंद्रिय कोणत्याहि अन्नरसाचें ज्ञान करून देत नाहीं. ' माझें मन अन्यत्र होतें. त्यामुळें मीं या अन्नरसाला जाणलें नाहीं, ' असें मनुष्य म्हणतो. [न हि प्रज्ञापेतौ हस्तौ कर्म किंचन०–] प्रज्ञारहित हात कोणत्याहि कर्माचें ज्ञान करून देत नाहींत. ' माझें मन अन्यत्र होतें, त्यामुळें मीं हें कर्म जाणलें नाहीं,' असें मनुष्य सांगतो. [न हि प्रज्ञापेतं शरीरं०–] प्रज्ञारहित शरीर कांहींच सुख व दुःख यांचें ज्ञान करून देत नाहीं. ' माझें मन अन्यत्र होतें, त्यामुळें मीं हें सुख-दुःख जाणलें नाहीं, ' असें सांगतो. [न हि प्रज्ञापेतः उपस्थः–] प्रज्ञारहित उपस्थ कोणताहि आनंद, रति, प्रजाति यांचें ज्ञान

करून देत नाहीं. 'माझें मन अन्यत्र होतें, त्यामुळें मीं या आनंदाला, रतीला व प्रजातीला जाणलें नाहीं,' असें म्हणतो. [न हि प्रज्ञापेतौ पादौ इत्यां०—] प्रज्ञारहित पाय कोणत्याहि गतीचा अनुभव देत नाहींत. 'माझें मन अन्यत्र होतें. त्यामुळें मीं कोणतीहि गति जाणली नाहीं,' असें मनुष्य म्हणतो. ज्ञातव्य विषय व काम बुद्धीवांचून उपलब्ध होत नाहींत, हें सर्वांना माहीत आहे. यास्तव श्रुति बुद्धीचाच स्वीकार करून म्हणते—[न हि प्रज्ञापेता धीः काचन सिध्येत्। न प्रज्ञातव्यं प्रज्ञायेत—] विज्ञातव्य, काम इत्यादि भेदांनीं भिन्न असलेली कोणतीहि धी म्ह० अंतःकरणवृत्ति प्रज्ञारहित—असाक्षिक—साक्षिरहित सिद्ध होत नाहीं म्ह० ती उत्पन्न होत नाहीं व जाणलीहि जात नाहीं. प्रज्ञातव्य म्ह० बुद्धीचा विषयहि साक्षिप्रज्ञेवांचून जाणला जात नाहीं. यास्तव इंद्रियादिकांना प्रज्ञेची जशी अपेक्षा आहे तशीच प्रज्ञेला बाह्य विषयांच्या ज्ञानासाठीं इंद्रियादिकांची अपेक्षा जरी असली तरी प्रज्ञा सर्व ज्ञानांचा आधार आहे. तिच्या ठिकाणींच सर्व अध्यस्त आहे. यास्तव प्रज्ञेचीच उपासना करावी. ७.

(याप्रमाणें इंद्रियें व प्रज्ञा यांचा जर अभेद आहे तर 'तं मामायुरमृतमित्युपास्स्व-' येथें सांगितल्याप्रमाणें वागादि इंद्रियेंच उपासना करण्यास योग्य होतील, म्हणून कोणी म्हणेल तर श्रुति सांगते—)

न वाचं विजिज्ञासीत वक्तारं विद्यान्न गन्धं विजिज्ञासीत घ्रातारं विद्यान्न रूपं विजिज्ञासीत रूपविद्यं विद्यान्न शब्दं विजिज्ञासीत श्रोतारं विद्यान्नान्नरसं विजिज्ञासीतान्नरसस्य विज्ञातारं विद्यान्न कर्म विजिज्ञासीत कर्तारं विद्यान्न सुखदुःखे विजिज्ञासीत सुखदुःखयोर्विज्ञातारं विद्यान्नानन्दं रतिं प्रजातिं विजिज्ञासीतानन्दस्य रतेः प्रजातेर्विज्ञातारं विद्यान्नेत्यां विजिज्ञासीतैतारं विद्यान्न मनो विजिज्ञासीत मन्तारं विद्यात्॥

अन्वयार्थ—[वाचं न विजिज्ञासीत—] वागिंद्रियाची उपासना कर असें जाणूं नये, असा विचार करूं नये तर [वक्तारं—] वागिंद्रियाचा प्रेरक सर्व इंद्रियवृत्तींचा साक्षी जो आनंदात्मा त्याला [विद्यात्—]'तो प्रज्ञात्मा, प्राण, वक्ता, आयुः, अमृत आहे,' असें जाणावें. [न गन्धं विजिज्ञासीत घ्रातारं विद्यात्—] गंधाला जाणूं नये, तर गंध घेणारा जो आनंदात्मा त्याला जाणावें. त्याची उपासना

करावी. [न रूपं विजिज्ञासीत रूपविदं विद्यात्—] रूपाला जाणण्याची इच्छा करूं नये तर रूपवेत्त्याला जाणावें. [न शब्दं विजिज्ञासीत श्रोतारं विद्यात्—] शब्दाला जाणण्याची इच्छा करूं नये तर श्रोत्याला जाणावें. [न अन्नरसं विजिज्ञासीत०—] अन्नरसाला जाणण्याची इच्छा करूं नये तर अन्नरसाच्या विज्ञात्याला जाणावें. [न कर्म विजिज्ञासीत कर्तारं विद्यात्—] कर्माला जाणण्याची इच्छा करूं नये. कर्त्याला जाणावें. [न सुखदुःखे विजिज्ञासीत सुखदुःखयोर्विज्ञातारं विद्यात्—] सुख व दुःख यांना जाणण्याची इच्छा करूं नये, तर सुख व दुःख यांच्या विज्ञात्याला जाणावें. [नानन्दं न रतिं न प्रजातिं०—] आनंद, रति व प्रजाति यांस जाणण्याची इच्छा करूं नये, तर आनन्द, रति व प्रजाति यांच्या विज्ञात्याला जाणण्याची इच्छा करावी. [न इत्यां विजिज्ञासीत । एतारं विद्यात्—] गतीला जाणण्याची इच्छा करूं नये. गमन करणाराला जाणण्याची इच्छा करावी. (याप्रमाणें आठ विषयांचा निषेध करून विषयी आत्म्याचीच उपासना करावी, असें सांगून पहिल्या पर्यायांत वाक्-इंद्रियाचा निषेध करून त्याच्या स्वामीला जाणावें हें जसें सांगितलें तसेंच आतां शेवटच्या पर्यायांतहि सांगतात—) [न मनो विजिज्ञासीत मन्तारं विद्यात्—] ' मन या इंद्रियाची उपासना कर ' असें समजूं नये तर मनाचा प्रेरक सर्वेंद्रियवृत्तिसाक्षी जो आनंदात्मा त्यास जाणावें. तोच मी प्राण प्रज्ञात्मा मन्ता आयु अमृत आहें, असें जाणावें, अशी उपासना करावी.

(याप्रमाणें सर्व इंद्रियें व विषय यांच्या साक्षीचें ज्ञान सांगून प्रसंगतः सर्व अनर्थांचें मूळ असें हें संसारचक्र परस्पर साक्षेप असलेल्या इंद्रिय-विषयांच्या योगानें प्रवृत्त होतें, पण त्यांतील कांहीं तरी एक नाहींसें झालें तर तें प्रवृत्त होत नाहीं, अशा अभिप्रायानें श्रुति म्हणते—)

ता वा एता दशैव भूतमात्रा अधिप्रज्ञं दश प्रज्ञामात्रा
अधिभूतं यद्धि भूतमात्रा न स्युर्न प्रज्ञामात्राः
स्युर्यद्वा प्रज्ञामात्रा न स्युर्न भूतमात्राः स्युः ।
न ह्यन्यतरतो रूपं किंचन सिद्ध्येन्नो एतन्नाना ॥

अन्वयार्थ—[ताः—] त्या संसारचक्राच्या मूलभूत अशा [एताः वै—] या प्रसिद्ध असलेल्या प्रत्यक्ष व अनुमेय [दश एव—] दहाच [भूतमात्राः—] बकव्यादि विषय आहेत. [अधिप्रज्ञं—] त्या प्रज्ञानें म्हणजे इंद्रियें, यांना उद्देशून

प्रवृत्त होतात. [दश प्रज्ञामात्राः अधिभूतम्—] दहा इंद्रियें भूतांना—विषयांना उद्देशून प्रवृत्त होतात. [यत्—] जर [हि—] ह्या प्रसिद्ध [भूतमात्राः—] भूतमात्रा [न स्युः—] नसत्या तर [प्रज्ञामात्राः न स्युः—] प्रज्ञामात्रा नसतात म्ह० इंद्रियें निर्विषय होतात व [यद्वा प्रज्ञामात्राः०—] जर प्रज्ञामात्रा नसत्या तर भूतमात्रा नसतात. म्ह० विषय इंद्रियरहित होतात. त्यांचें ग्रहण होत नाहीं. [हि—] कारण [अन्यतरतः—] प्रज्ञामात्रा व भूतमात्रा यांच्यापैकीं कोणत्या तरी एकाच्याच योगानें [किंचन रूपं न सिध्येत्—] कोणतेंच रूप सिद्ध होत नाहीं. म्ह० विषय विषयाच्याच योगानें व इंद्रिय इंद्रियाच्याच योगानें ज्ञात होत नाहीं. ' तर मग परस्पर सापेक्ष इंद्रियें व विषय यांच्या योगानें प्रज्ञेचाहि भेद होईल व तो झाल्यावर ' प्रज्ञायां सर्वाणि भूतानि एकं भवन्ति ' ही प्रतिज्ञा व्याहत होईल ' म्हणून म्हणाल तर श्रुति सांगते—[नो एतन्नाना—] हें प्रज्ञामात्रा-भूतमात्ररूप नाना—भेदवान् नाहीं. (नानात्वाच्या अभावाची प्रतिज्ञा करून त्याविषयीं दृष्टान्त सांगतात—)

तद्यथा रथस्यारेषु नेमिरर्पिता नाभावरा अर्पिता एवमेवैता भूतमात्राः प्रज्ञामात्रास्वर्पिताः प्रज्ञामात्राः प्राणेऽर्पिताः । स एष प्राण एव प्रज्ञात्मानन्दोऽजरोऽमृतो न साधुना कर्मणा भूयान्नो एवासाधुना कर्मणा कनीयानेष ह्येवैनं साधु कर्म कारयति तं यमेभ्यो लोकेभ्य उन्निनीषत एष उ एवैनमसाधु कर्म कारयति तं यमधो निनीषते एष लोकपाल एष लोकाधिपतिरेष सर्वेशः स म आत्मेति विद्यात्स म आत्मेति विद्यात् ॥ ८

अन्वयार्थ—[तत्—] त्याविषयीं दृष्टान्त—[यथा—] ज्याप्रमाणें [रथस्य अरेषु—] रथचक्राच्या अरांमध्यें [नेमिः—] घांव [अर्पिता—] अर्पिलेली असते (नेमि अरांवर राहते) [नाभौ अराः अर्पिताः—] नाभीमध्यें—मध्यवर्ती तुंब्यामध्यें अर अर्पिलेले असतात [एवमेव—] त्याप्रमाणेंच [एताः भूतमात्राः—] हे उपलब्ध होणारे विषय—नेमिस्थानीय विषय [प्रज्ञामात्रासु—] अरस्थानीय इंद्रियांमध्यें [अर्पिताः—] प्रतिष्ठित आहेत. [प्रज्ञामात्राः—] अरारूप इंद्रियें [प्राणे—] मुखनासिकांतून संचार करणाऱ्या नाभिस्थानीय प्राणांत [अर्पिताः—] प्रतिष्ठित आहेत. [सः एषः प्राणः एव०—] तो हा प्राणोपाधिक—प्राणच प्रज्ञात्मा

आनंद अजर अमृत आहे. स्वयंप्रकाश, विज्ञान-आनन्दात्मस्वरूप व सर्व विक्रिया-शून्य आहे. (रथाच्या चक्राच्या मध्यभागीं जें वर्तुलाकार काष्ठ असतें व ज्यांत चाकाचे अर ठोकून बसविलेले असतात ती नाभि, त्यांत ठोकून बसविलेलीं जीं लांब लांब पातळ कांबीसारखीं काष्ठें ते अर, व त्यांच्या सभोंवार वर्तुलाकार ठोकून बसविलेल्या पायट्यांसह जी लोखंडी धांव ती नेमि होय.) [साधुना–]शास्त्रविहित पुण्यरूप [कर्मणा–] कर्मानें [न भूयान्–] तो अधिक होत नाहीं [असाधुना कर्मणा–] शास्त्रनिषिद्ध कर्मानें–पापानें [कनीयान् नो एव–] तो कनिष्ठ–न्यून होतच नाहीं. (कारण ज्याच्या ठिकाणीं क्रिया असते त्याच्याच ठिकाणीं न्यूनाधिक भाव संभवतो. आकाशासारख्या अक्रिय पदार्थामध्यें कोणताच अतिशय संभवत नाहीं.) [हि–] ज्या अर्थीं [एषः एव–] हा प्राण-प्रज्ञोपाधिकच, दुसरा कोणी नाहीं, [एनं–] शरीरादिकांना आत्मा मानणाऱ्या याच्याकडून [साधु कर्म–] शास्त्रविहित धर्मरूप कर्म [कारयति–] करवितो, शरीरांत ज्याचा आवेश झाला आहे असा तो स्वतः जरी लोहचुंबकाप्रमाणें व्यापारशून्य असला तरी शरीरावर आत्मत्वाभिमान ठेवणाऱ्या त्याच्याकडून व्यापार करवितो. (कोणाकडून ?) [तं–] त्याच्याकडून कीं, [यं–] ज्या स्वर्गाची इच्छा करणाऱ्या प्रसिद्ध कर्मठ सकाम पुरुषाला [एभ्यः लोकेभ्यः–] या प्रत्यक्ष इहलोकांहून [उन्निनीषते–] ऊर्ध्व–वर नेण्याची इच्छा करतो. [एषः उ एव–] हा पूर्वोक्त प्राण-प्रज्ञोपाधिकच [एनं–] या शरीरादिकांना आत्मा मानणाऱ्या पुरुषाकडून [असाधु कर्म–] शास्त्रनिषिद्ध कर्म--पातक [कारयति–] करवितो, त्याची इच्छा नसली तरी त्याच्या हातून करवितो. सु. ब्र. पृ. १५८, २२४, ३०० पहा. (कोणाकडून ?) [तं–] त्याच्याकडून कीं [यं–] ज्या पातक्याला [एभ्यः लोकेभ्यः–] या इहलोकांहून–मनुष्यादिकांच्या निवास स्थानाहून [अधः–] खालीं [निनीषते–] नेण्याची इच्छा करतो. प्राण्यांना त्यांच्या त्यांच्या कर्मानुसार स्वर्गाला किंवा नरकाला नेण्यासाठीं ईश्वरच त्यांच्याकडून साधु व असाधु कर्म करवितो, असें सांगितलें. पण तेंहि या शरीरोपाधिरहित चिन्मात्र केवल नियन्तृत्व या शक्तींत प्रविष्ट झालेल्या अन्तर्यामीच्या ठिकाणींच संभवतें, असें हें श्रुतिवाक्य सांगतें– [एषः–] हा स्वर्ग व नरक यांत नेणारा [लोकपालः–] साधूंचें सुखाच्या

योगानें—सुख देऊन व असाधूंचें दुःखाच्या योगानें—दुःख देऊन पालन करणारा—रक्षण करणारा आहे. (पण हा राजाच्या मंड्याप्रमाणें लोकपाल असेल असें कोणाला वाटूं नये म्हणून श्रुति सांगते—) [एषः—] हा वर सांगितलेला लोकपाल [लोकाधिपतिः—] लोकांचा पित्यादिकांप्रमाणें अधिष्ठाता होऊन पालन करणारा आहे. (तथापि ' एखाद्या राजाप्रमाणें याचें ऐश्वर्य संकुचित असेल ' असें कोणी समजेल म्हणून श्रुति सांगते—) [एषः—] हा पूर्वोक्त लोकांचा अधिपति [सर्वेशः—] सर्व भूत-भौतिकांचा ईश—नियंता आहे. [सः—] तो वर सांगितलेला सर्वेशत्वादि गुणविशिष्ट [मे—] माझा—इंद्राचा—या वक्त्याचा [आत्मा—] स्वरूप आहे, [इति विद्यात्—] असें जाणावें. (अध्यायाची समाप्ति सुचविण्यासाठीं 'स म आत्मेति विद्यात्' या वाक्याची द्विरुक्ति केली आहे.)

इति कौषीतकि-ब्राह्मणोपनिषदाचा दुसरा अध्याय समाप्त झाला.

अथ चतुर्थोऽध्यायः ।

—पूर्वाध्यायांत प्रायः प्राणोपाधिक आत्माच सांगितला आहे. त्यावरून कदाचित् कोणाला चैतन्यविशिष्ट आनंदादिगुणयुक्त प्राणच आत्मा आहे, असा भ्रम होण्याचा संभव आहे. यास्तव त्याचें निवारण करण्यासाठीं बाह्य चैतन्यापासून निवृत्त झालेल्या सुषुप्तावस्थ प्राणाहून अगदीं पृथक् व श्रेष्ठ असलेल्या चेतन-आनंदादिरूप आत्म्याचें कथन करण्याची इच्छा करणारा वेद ब्रह्मविद्या अमानित्वादिगुणांवांचून प्राप्त होणें फार कठिण आहे, हें पूर्वोत्तरपक्षांनीं दाखविण्यासाठी आख्यायिकेस आरंभ करितो—

अथ गार्ग्यो ह वै बालाकिरनूचानः संस्पृष्ट आस सोऽवसदुशीनरेषु स वसन्मत्स्येषु कुरुपञ्चालेषु काशीविदेहेष्विति स होजातशत्रुं काश्यमेत्योवाच ब्रह्म ते ब्रवाणीति तं होवाचाजातशत्रुः सहस्रं ददस्त इत्येतस्यां वाचि जनको जनक इति वा उ जना धावन्तीति ॥ १

अन्वयार्थ—[अथ–] आतां [गार्ग्यः–] गर्गगोत्रीय–गार्ग्यनामक [ह वै–] पूर्वी एक, दुसऱ्या श्रुतींत–पृ. ५७७ पहा–अतिशय गर्विष्ठ म्हणून प्रसिद्ध असलेला [बालाकिः–] बालाकेचें किंवा बलाकाचें अपत्य–संतान [अनूचानः–] आचार्याच्या उच्चारामागून स्वतःहि तसाच उच्चार करणारा म्ह० ज्यानें वेदाध्ययन केलें आहे असा [संस्पृष्टः–] उत्तमप्रकारें लोकांत प्रख्यात झालेला असा [आस–] होता. (पूर्वी एक विद्वान्, प्रख्यात व गर्विष्ठ बालाकि गार्ग्य होता.) [सः उशीनरेषु अवसत्–] तो गार्ग्य उशीनर देशांत राहत असे. [सः वसन्–] तो आपल्या कीर्तीच्या इच्छेनें सर्वत्र पर्यटन करीत असतांना [मत्स्येषु कुरुपंचालेषु काशीविदेहेषु इति–] मत्स्यदेशांत, कुरुदेशांत, पंचालदेशांत, काशीनें उपलक्षित होणाऱ्या विदेहदेशांत अशा त्रैवर्णिकांनीं युक्त असलेल्या प्रदेशांत राहिला. [सः ह अजातशत्रुं काश्यं एत्य उवाच–] तो अनेक देशांत राहून प्रख्यात व मोठा गर्वाढ्य झालेला गार्ग्य खरोखर सर्वत्र समबुद्धि ठेवल्यामुळें ज्याला आपल्याला कोणी शत्रु आहे, असें कधींच वाटत नसे अशा ' अजातशत्रु ' या यथार्थ नांवाच्या काशिदेशाधिपतीच्या समेंत येऊन त्याला म्हणाला–[ब्रह्म ते ब्रवाणि–] ब्रह्मशब्दाचा मुख्य अर्थ म्ह० साक्षात् ब्रह्म मी तुला सांगतों, तुझी इच्छा असल्यास मी तुला ब्रह्माचा उपदेश करितों. [इति–] असें गार्ग्य अजातशत्रूला म्हणाला. [तं ह अजातशत्रुः उवाच–] असें बोलणाऱ्या त्या गार्ग्याला खरोखर अजातशत्रु म्हणाला–[ते सहस्रं ददमः इति–] " तुज ब्रह्मज्ञ ब्राह्मणाला–दानाच्या सत्पात्राला आम्ही एक सहस्र गायी देतों. आम्ही राजे थोड्याशा कार्यासाठींहि वाटेल तितकें धन देतों, मग तुझ्या सारख्या योग्य ब्राह्मणाला देण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? पण ही ब्रह्मविद्येची दक्षिणा आहे असें तूं समजू नको. तर [एतस्यां वाचि–] ' मी तुला ब्रह्म सांगतों ' असें जें तूं आतां बोललास तेवढ्यासाठीं मी हें धन देत आहें, असें तूं समज. कारण [जनाः वै उ जनकः जनकः इति धावन्ति–] सर्व सुप्रसिद्ध विद्वान् ब्राह्मण व इतरहि त्रैवर्णिक लोक ' जनक-'नांवाचा मिथिलाधिपतिच ससाधन ब्रह्मविद्येचा दाता आहे व तोच तिचा प्रतिग्रह करणारा आहे, असें समजून त्याच्याकडेच एकसारखे धांवत असतात पण मीहि त्याच्या सारखाच किंबहुना त्याहून अधिक आहें, हें जाणत नाहींत ? " [इति–] असें अजातशत्रु म्हणाला. १.

स होवाच बालाकिर्य एवैष आदित्ये पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा बृहन्पाण्डरवासा अतिष्ठाः सर्वेषां भूतानां मूर्धेति वा अहमेतमपास इति स यो हैतमेवमुपास्तेऽतिष्ठाःसर्वेषां भूतानां मूर्धा भवति ॥२

अन्वयार्थ—[सः बालाकिः ह उवाच—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः आदित्ये पुरुषः तं एव अहं उपासे इति—] 'हा जो सुप्रसिद्ध व माझ्या सारख्याला प्रत्यक्ष दिसणारा आदित्यमंडलांतील पुरुषाकार चेतन आहे त्याचीच मी उपासना करितों,' असें बोलला. [तं अजातशत्रुः एतस्मिन् मा मा संवादयिष्ठाः इति ह उवाच—] असें बोलणाऱ्या त्या गार्ग्याला अजातशत्रु ह्मातानें खूण करीत "नको नको. या उक्त पुरुषाविषयीं—या आदित्यपुरुषाच्या उपदेशाविषयीं तूं गुरु शिष्यभावानें मला संवाद करावयास लावूं नको. कारण त्या पुरुषाविषयीं आम्हां दोघांचेंहि ज्ञान समान आहे. शिवाय त्याविषयींच जर आम्ही बोलूं लागलों तर तें मुख्य ब्रह्म नसल्यामुळें आपण बाधित होऊं." असें म्हणाला अरे पण राजा, तूं त्या पुरुषाला जरी जाणत असलास तरी त्याच्या गुणाची उपासना व फल जाणत नाहींस' असें गार्ग्य म्हणेल म्हणून राजा म्हणतो— बृहन्—] सर्वापेक्षां सर्वतः अधिक, [पाण्डरवासाः—] शुक्लगुणयुक्त उज्ज्वल वस्त्रवान् (कारण चंद्रमा सूर्य-सुषुम्नानाडीरूप आहे व हे शास्त्रान्तरीं सांगितलेले गुण सूर्यामध्येंहि अविरुद्ध आहेत.) [अतिष्ठाः—] सर्व भूतांचें उल्लंघन करून राहणारा, [सर्वेषां भूतानां मूर्धा—] स्थावर-जंगम सर्व भूतांचा मूर्धा—मस्तक, [इति वै अहं एतं उपासे इति—] अशा प्रकारें सर्व निरभिमानी ब्रह्मवेत्त्यांना प्रसिद्ध असलेला मी या पुरुषाची उपासना करितों. उपासनेनें मी याला साक्षात् पाहतों [यः ह एतं एवं उपास्ते—] दुसराहि जो कोणी उपासक खरोखर या अशा गुणांनीं युक्त असलेल्या पुरुषाची उपासना करितो— उक्त गुणोपासनेनें साक्षात् जाणतो [सः अतिष्ठाः सर्वेषां भूतानां मूर्धा भवति—] तो अतिष्ठा—सर्व भूतांचें उल्लंघन करून राहणारा व सर्व स्थावर-जंगम भूतांचा मूर्धा होतो. २.—तेव्हां—

स होवाच बालाकिर्य एवैष चन्द्रमसि पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः

सोमो राजान्नस्यात्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्तेऽन्नस्यात्मा भवति ॥ ३

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः०—] हा जो चन्द्रमण्डलामध्यें पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. [तं ह उवाच०—] त्याला अजातशत्रु ह्मणाला—नको नको, या चंद्रस्थ पुरुषाविषयीं संवाद करूं नको. ' सोमः '—प्रियदर्शन 'राजा '—दीप्तिमान् [अन्नस्य आत्मा०—] चतुर्विध अन्नाचा आत्मा—कारण किंवा स्वरूप, या दृष्टीनें मी त्याची उपासना करितों. [यः ह एतं०—] जो कोणी दुसराहि उपासक याची अशी उपासना करितो तो अन्नाचा आत्मा—कारण होतो. ३.—तें ऐकून—

स होवाच बालाकिर्य एवैष विद्युति पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठास्तेजस आत्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते तेजस आत्मा भवति ॥ ४

अन्वयार्थ—[सः ह उवाच०—] तो बालाकि ह्मणाला—" हा जो या विद्युन्मण्डलांत पुरुष आहे, त्याचीच मी ब्रह्मबुद्धीनें उपासना करितों. " त्याला अजातशत्रु हातानें ' नको नको ' अशी खूण करून [मा मा एतस्मिन्०—] छेः छेः तूं याविषयीं मला मुळींच संवाद करावयास लावूं नकोस. [तेजसः आत्मा इति वै०—] तेजाचा आत्मा—'मी तेजस्वी' इत्यादि अभिमानवान्, अशा दृष्टीनेंच मी त्याची उपासना करितों. [यः ह एतं०—] दुसराहि जो कोणी याला अशा दृष्टीनें उपासितो तोहि तेजाचा आत्मा होतो. ४.

स होवाच बालाकिर्य एवैष स्तनयित्नौ पुरुष एतमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः शब्दस्यात्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते शब्दस्यात्मा भवति ॥ ५

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—' हा जो या मेघमंडलांत पुरुष आहे त्याचीच मी ' ब्रह्म ' अशी उपासना करितों. ' अजातशत्रु हाताचा पंजा हालवून म्हणतो—" नको नको, याविषयीं मला संवाद करावयास लावूं नकोस. [शब्दस्य आत्मा इति०—] ध्वनिरूप व वर्णरूप शब्दाचा आत्मा

—कारण किंवा स्वरूप, या दृष्टीनें मी त्याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी त्याची अशी उपासना करितो तो शब्दाचा आत्मा होतो." ५.

स होवाच बालाकिर्य एवैष आकाशे पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः पूर्णमप्रवर्ति ब्रह्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते पूर्यते प्रजया पशुभिर्नो एव स्वयं नास्य प्रजा पुरा कालात्प्रवर्तते ॥ ६

अन्वयार्थ—[सः ह उवाच०—] तो बालाकि म्हणाला—"हा जो आकाशांत—प्रसिद्ध भूताकाशांत किंवा अव्याकृतांत पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों." अजातशत्रु—" नको, त्याविषयी मला संवाद करावयास लावूं नको. [पूर्णं अप्रवर्ति ब्रह्म इति वै०—] मी त्याची पूर्ण व क्रियाशून्य ब्रह्म—बृहत्—सर्वांहून अधिक अशा दृष्टीनें उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो तो [प्रजया पशुभिः पूर्यते—] प्रजा व पशु यांनीं परिपूर्ण होतो. (हें पूर्णगुणोपासनेचें फल आहे. आतां अप्रवर्तिगुणोपासनेचें फल राजा सांगतो—) [स्वयं नो एव न अस्य प्रजा पुरा कालात् प्रवर्तते—] तो उपासक स्वतः शंभर वर्षें भरण्यापूर्वीं मरत नाहीं व त्याची पुत्रादि प्रजाहि शतवर्षात्मक आयुःकालापूर्वीं मरत नाहीं." ६.

स होवाच बालाकिर्य एवैष वायौ पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा इन्द्रो वैकुण्ठोऽपराजिता सेनेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते जिष्णुर्ह वापराजयिष्णुरन्यतस्त्यजायी भवति ॥७

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—"हा जो वायूमध्यें पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों." अजातशत्रु—" नको, त्याविषयीं मला बोलावयास लावूं नको. [इन्द्रः—] परमैश्वर्यसंपन्न, [वैकुण्ठः—] ज्याच्यापासून दुसऱ्याचें निवारण निवृत्त झालें आहे—ज्याचें कोणी निवारण करूं शकत नाहीं असा, [अपराजिता सेना०—] दुसऱ्यांकडून अपराजित सेना, अशा दृष्टीनें मी त्याची उपासना करितों. (इन्द्रगुणाचें फल—) जो कोणी याची अशी उपासना करितो तो [जिष्णुः ह वा०—] जयनशील—विजयीच होतो. (वैकुण्ठगुणाचें

फल–) तो [अपराजयिष्णुः–] दुसऱ्यांकडून जिंकला न जाणें, हेंच ज्याचें शील आहे असा, (अपराजित सेना या गुणाचें फल–) तो [अन्यतस्त्य-जायी–] वैऱ्याला जिंकणें हें ज्याचें शील आहे, असा होतो." ७.

स होवाच बालाकिर्य एवैषोऽग्नौ पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा विषासहिरिति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते विषासहिर्हैवान्वेष भवति ॥ ८

अन्वयार्थ—[सः ह०–] तो बालाकि म्हणाला–" हा जो अग्नींत पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. अजातशत्रु–" नको, त्याविषयीं मला वाद करावयास लावूं नको. [विषासहिः इति०–] मी ' विविध दुःखांना सहन करणारा किंवा दुसऱ्यांना दुःसह ' अशा दृष्टीनें याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो तो [विषासहिः–] विविध दुःखादिकांना सहन करणारा किंवा इतरांना दुःसह होतो. " ८.

स होवाच बालाकिर्य एवैषोऽप्सु पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा नाम्न आत्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते नाम्न आत्मा भवतीत्यधिदैवतमथाध्यात्मम् ॥ ९

अन्वयार्थ— [सः ह०–] तो बालाकि म्हणाला–" हा जो जलामध्यें पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों." [तं होवाच०–] त्याला अजात-शत्रु म्हणाला–" नको, त्या विषयीं मला वाद करावयास लावूं नको. [नाम्नः आत्मा इति वै०–] स्वात्मनांवाचा आत्मा–स्वरूप किंवा कारण या दृष्टीनें मी याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो तो नामाचा आत्मा होतो." बृहदारण्यकांत–मागें पृ. ५८० पहा–या जलांतील पुरुषाचा प्रतिरूप हा गुण सांगितला आहे. पण त्याचा येथील गुणाशीं विरोध येत नाहीं. कारण नामाचें वस्तूशीं साम्य आहेच. घट ही वस्तु व घट हें नांव, यांचें अत्यंत सादृश्य उपलब्ध होतें. [इति अधिदैवतं–] असें हें अधिदैवत–देवांतील उपासन सांगितलें. [अथ अध्यात्मम्–] आतां शरीरांतील उपासन सांगितलें जातें. ९.

स होवाच बालाकिर्य एवैष आदर्शे पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः प्रतिरूप इति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते प्रतिरूपो हैवास्य प्रजायामाजायते नाप्रतिरूपः ॥ १०

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—" हा जो आदर्शांत—आरशासारख्या भास्वर द्रव्यांत पुरुष दिसतो त्याचीच मी उपासना करितों. " [तं ह उवाच अजातशत्रुः—] त्याला अजातशत्रु म्हणाला—" नको नको, त्या पुरुषाविषयी मला संवाद करावयास लावूं नको. [प्रतिरूपः इति वै अहं एतं उपासे—] मी त्याची प्रतिरूप—सदृश रोचिष्णु—चमकणारा अशी उपासना करितों. [यः ह एतं एवं उपास्ते—] जो कोणी दुसराहि याची अशी उपासना करितो [अस्य ह एव प्रजायां प्रतिरूपः आजायते—] याच्या सारखाच पुत्र प्रजानिमित्तानें उत्पन्न होतो. [अप्रतिरूपः—] असदृश—त्याहून विलक्षण पुत्र होत नाहीं." १०

स होवाच बालाकिर्य एवैष प्रतिश्रुत्कायां पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा द्वितीयोऽनपग इति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते विन्दते द्वितीयाद्वितीयवान् भवति ॥ ११

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—" हा जो या प्रत्येक श्रवणाचे वेळी श्रोत्रामध्यें अधिष्ठित होणाऱ्या प्रतिश्रुत्केमध्यें पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. " [तं ह०—] त्याला अजातशत्रु म्हणाला—" नको, नको, त्या विषयीं मला संवाद करावयास लावूं नकोस. [द्वितीयः अनपगः०—] मी त्याची दुसरा व गमनशून्य या दृष्टीनें उपासना करितों. [यः ह एतं०—] दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो त्याला [द्वितीयात् विन्दते—] दुसऱ्या भार्याशरीरापासून दुसऱ्याची—पुत्राची प्राप्ति होते [द्वितीयवान् भवति—] व तो द्वितीयवान् होतो. त्याचे पुत्र-पौत्रादि त्याला सोडून जात नाहींत " ११.

स होवाच बालाकिर्य एवैष शब्दः पुरुषमन्वेति तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा असुरिति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते नो ह्येव स्वयं नास्य प्रजा पुरा कालात्संमोहमेति ॥ १२

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः शब्दः पुरुषं अन्वेति—] गमन करणाऱ्या पुरुषाच्या मागून हा जो शब्द जातो त्याचीच मी उपासना करितों. [तं ह०—] अजातशत्रु त्याला म्हणाला—[मा मा एतस्मिन्०—] याच्या विषयीं मला तूं संवाद करावयास लावूं नकोस [असुः इति वै अहं एतं उपासे—] मी त्याची जीवनाचें निमित्त 'असु' या दृष्टीनें उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो [स्वयं नो एव अस्य प्रजा कालात् पुरा न संमोहं एति—] तो स्वतः किंवा त्याची पुत्रादि प्रजा कालाच्या पूर्वी मरत नाहीं. (आकाशपर्यायांत याचें व्याख्यान केलें आहे) १२.

स होवाच बालाकिर्य एवैष च्छायापुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा मृत्युरिति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते नो एव स्वयं नास्य प्रजा पुरा कालात्प्रमीयते ॥ १३

अन्वयार्थ— [सः०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः छायापुरुषः—] हा जो छायारूप पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. [तं०—] त्याला अजातशत्रु म्हणाला—" मला याविषयीं बोलावयास लावूं नको. [मृत्युः इति०—] 'मृत्यु' या दृष्टीनें मी याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो [नो एव स्वयं०—] तो स्वतः किंवा त्याची प्रजा शंभर वर्षें हें आयुष्य भरण्यापूर्वी [न प्रमीयते—] मरत नाहीं. १३.

स होवाच बालाकिर्य एवैष शारीरः पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः प्रजापतिरिति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते प्रजायते प्रजया पशुभिः ॥ १४

अन्वयार्थ—[सः०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः शारीरः पुरुषः०—] हा जो शरीरांतील पुरुष त्याचीच मी उपासना करितों. [तं०—] त्याला अजातशत्रु म्हणाला [मा०—] नको, त्याच्याविषयीं मला बोलावयास लावूं नको [प्रजापतिः इति०—] मी त्याची प्रजांचा पालक या दृष्टीनें उपासना करितों. [सः यः०.... प्रजया पशुभिः प्रजायते—] जो कोणी याची

अशी उपासना करितो तो प्रजा व पशु यांच्या वृद्धीस प्राप्त होता. (त्याच्या प्रजेची व पशूची वृद्धि होते, असा याचा भावार्थ.) १४.

स होवाच बालाकिर्य एवैष प्राज्ञ आत्मा येनैतत्पुरुषः सुप्तः स्वप्नया चरति तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा यमो राजेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्ते सर्वं हास्मा इदं श्रैष्ठ्याय यम्यते ॥१५

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः प्राज्ञः आत्मा—] हा जो प्राज्ञ—सुषुप्त प्राणोपाधिक प्रज्ञायुक्त, ' आत्मा ' हा शब्द व ' आत्मा ' असा अनुभव यांचा आश्रय [येन एतत् सुप्तः पुरुषः स्वप्नया चरति—] ज्या प्राज्ञ आत्म्याशीं एकरूप होण्यासाठीं या स्वप्नदर्शनरूप शयनास प्राप्त झालेला पुरुष स्वप्नानुभव घेतो [तं एव०—] त्याचीच मी उपासना करितों. [तं ह०—] त्याला अजातशत्रु म्हणतो—" नको नको, तूं त्याच्या-विषयीं मला संवाद करावयास लावूं नको. [यमः राजा इति वै०—] तो यम राजा आहे, अशी मी त्याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो [इदं सर्वं ह अस्मै श्रैष्ठ्याय यम्यते—] प्रत्यक्षादि प्रमाणांनीं उपलब्ध होणारें हें सर्व या उपासकाच्या श्रेष्ठत्वासाठीं नियमानें प्रवृत्त होतें."

स होवाच बालाकिर्य एवैष दक्षिणेऽक्षन्पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठा नाम्न आत्माग्नेरात्मा ज्योतिष आत्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्त एतेषां सर्वेषामात्मा भवति ॥ १६

अन्वयार्थ—[सः ह०—] तो बालाकि म्हणाला—[यः एव एषः दक्षिणे अक्षन् पुरुषः०—] जो हा दक्षिण नेत्रांतील पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. [तं ह०—] त्याला अजातशत्रु म्हणतो—"त्याविषयीं मला बोलण्याचा प्रसंगच आणूं नको. [नाम्नः आत्मा अग्नेः आत्मा ज्योतिषः आत्मा इति वै] वर्णात्मक शब्दाचें कारण किंवा स्वरूप, अग्नीचा आत्मा—स्वरूप व प्रकाशाचें स्वरूप अशा दृष्टीनें मी याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी त्याची अशी उपासना करितो तो [एतेषां सर्वेषां आत्मा भवति—] नाम, अग्नि व प्रकाश यांचें स्वरूप होतो."१६.

स होवाच बालाकिर्य एवैष सव्येऽक्षन्पुरुषस्तमेवाहमुपास इति तं होवाचाजातशत्रुर्मा मैतस्मिन्संवादयिष्ठाः सत्यस्यात्मा विद्युत आत्मा तेजस आत्मेति वा अहमेतमुपास इति स यो हैतमेवमुपास्त एतेषां सर्वेषामात्मा भवतीति ॥ १७

अन्वयार्थ—[स ह०—] तो बालाकि म्हणाला— [यः एव एषः सव्ये अक्षन् पुरुषः०—] जो हा डाव्या नेत्रांत पुरुष आहे त्याचीच मी उपासना करितों. [तं ह०—] त्याला अजातशत्रु म्हणाला—"नको, त्याविषयीं आमचा संवाद होईल असें करूं नको. [सत्यस्य आत्मा विद्युतः आत्मा तेजसः आत्मा इति०—] तो प्राणरूप सत्याचा आत्मा—स्वरूप आहे, विद्युन्मंडलाचें स्वरूप आहे व ज्योतींचें स्वरूप आहे, अशी मी त्याची उपासना करितों. दुसराहि जो कोणी याची अशी उपासना करितो तो [एतेषां०—] या सर्वांचें स्वरूप होतो." ' इति-'शब्द पुरुषाचा उपदेश समाप्त झाला, हें सुचविण्यासाठीं आहे.

तत उ ह बालाकिस्तूष्णीमास तं होवाचाजातशत्रेतावन्नु बालाका३इ इति एतावद्धीति होवाच बालाकिस्तं होवाचाजातशत्रुर्मृषा वै किल मा समवादयिष्ठा ब्रह्म ते ब्रवाणीति। स होवाच यो वै बालाक एतेषां पुरुषाणां कर्ता यस्य वैतत्कर्म स वै वेदितव्य इति ॥

अन्वयार्थ—[ततः उ ह बालाकिः तूष्णीं आस—] डाव्या नेत्रांतील पुरुषाचें प्रत्याख्यान—निराकरण केल्यावर त्यानंतर खरोखर बलाकाचा पुत्र मुकाट्यानें बसला. [तं—] तेव्हां त्या तूष्णीं अवस्थित झालेल्या बालाकीला [अजातशत्रुः ह उवाच—] अजातशत्रु म्हणाला—[एतावत् नु बालाका३इ इति—] काय बालाके, बस्स, झालें, एवढेंच का तुझें ब्रह्मज्ञान आहे कीं याहूनहि अधिक आहे? (येथील ' बालाका३इ ' हा प्लुत स्वरोच्चार त्याच्या निर्भर्त्सनेसाठीं आहे. ब्राह्मणाची अशी निर्भर्त्सना करणें अयोग्य आहे हें खरें; तथापि त्याच्या गर्वाचा परिहार करण्यासाठीं ती केली आहे. गर्व हा महत्पुरुषार्थाचा नाश करणारा कंटक आहे व कंटकोद्धार करणें, हा राजाचा धर्म आहे. त्यामुळें ही निर्भर्त्सना दोषावह नाहीं.) [एतावत् हि इति बालाकिः ह उवाच—] झालें, एवढेंच मला ब्रह्मज्ञान आहे, असें बालाकि बोलला. तेव्हां

याप्रमाणें गर्वशून्य झालेल्या त्या ब्राह्मणाला अजातशत्रु म्हणाला–[ब्रह्म ते ब्रवाणि इति मृषा वै किल समवादयिष्ठाः–] 'तर मग मी तुला ब्रह्म सांगतों, असें खरोखर खोटेंच बोललास?' इतकें बोलून गर्वशून्य व लज्जाजड झालेल्या अधोमुख बालाकीवर अनुग्रह करण्यासाठीं [सः ह उवाच–] तो अजातशत्रु राजा त्याला म्हणाला–[बालाके एतेषां पुरुषाणां यः वै कर्ता–] "बालाके, तूं ब्रह्मत्वानें ज्यांचा प्रस्ताव केलास त्या आदित्यादि सर्व पुरुषांचा जो प्रसिद्ध –सत्यज्ञानादिलक्षण उत्पादक आहे [वा यस्य एतत् कर्म–] किंवा वेदान्तांमध्यें प्रसिद्ध असलेल्या ज्यांचें हें भूत-भौतिकरूप विश्व हें कर्म–क्रिया आहे (नुस्ता आदित्यादि पुरुषांचाच कर्ता–उत्पादक असा संकोच करण्यांत काय अर्थ आहे? ज्याचें सर्व विश्व हें कर्म आहे, जो सर्व विश्वाचा कर्ता–उत्पादक आहे) [सः वै वेदितव्यः–] तो तूं सांगितलेल्या सर्व पुरुषांसह सर्व विश्वाचा कर्ता– प्रसिद्ध सत्यज्ञानादिलक्षण आत्मा श्रवणादि उपायांनी साक्षात् जाणण्यास योग्य आहे." [इति–] अशाप्रकारें तो बोलला. (बृ.ब्र.१.४.५.पृ.११९.)

तत उ ह बालाकिः समित्पाणिः प्रतिचक्रम उपायानीति तं होवाचाजातश : प्रतिलोमरूपमेव तत्स्याद्यत्क्षत्रियो ब्राह्मणमुपनयेत् । एहि व्येव त्वा ज्ञपयिष्यामीति तं ह पाणावभिपद्य प्रवव्राज तौ ह सुप्तं पुरुषमाजग्मतुस्तं हाजातशत्रुरामन्त्रयांचक्रे बृहन्पाण्डरवासः सोम राजन्निति ॥ स उ ह तूष्णीमेव शिश्ये तत उ हैनं यष्ट्याऽऽविचिक्षेप स तत एव समुत्तस्थौ तं होवाचाजातशत्रुः क्वैष एतद्बालाके पुरुषोऽशयिष्ट क्वैतदभूत्कुत एतदगा३दिति तदु ह बालाकिर्न विजज्ञे ॥

अन्वयार्थ—[ततः उ ह–] याप्रमाणें राजानें भाषण केलें असतां खरोखर [बालाकिः–] ब्रह्मजिज्ञासु बालाकि [समित्पाणिः–] हातांत समिधा हेंच उपायन घेऊन [प्रतिचक्रमे–] ब्रह्मोपदेशासाठीं राजाकडे आला व [उपायानि इति तं ह उवाच–] जर तुझी अनुज्ञा असेल तर मी तुझ्याजवळ गुरुत्वानें प्राप्त होतों, तुला गुरु मानून शिष्यभावानें येतों, असें बोलला. तेव्हां [तं–] ज्याचा गर्व पार नाहींसा झाला आहे व त्यामुळें जो अत्यंत दीनावस्थेस प्राप्त झाला आहे अशा त्या बालाकीला [ह अजातशत्रुः उवाच–] खरोखर

अजातशत्रु म्हणाला–[यत् क्षत्रियः ब्राह्मणं उपनयेत् तत् प्रतिलोमरूपं एव स्यात्–] "क्षत्रियानें ब्राह्मणाचें उपनयन करणें हें अननुरूपच होईल. अनुरूप कधींच होणार नाहीं. वर्णानें हीन असलेल्या क्षत्रियानें–दुर्बलांचें क्षतापासून रक्षण करणारानें उत्तम वर्णाच्या ब्राह्मणाला ब्रह्मविद्येसाठीं दीक्षा द्यावी, हें विरुद्ध आहे. तथापि तूं भिऊं नकोस. [एहि–] या जनसमूहांतून निघून तूं एकांतांत ये. [त्वा विज्ञपयिष्यामि एव–] तूं जो माझा गुरु त्या तुला मी जें जाणतों तेंच सांगेन, कांहीं तरी सांगून तुला फसविणार नाहीं." [इति–] याप्रमाणें बोलून राजा [तं ह पाणौ अभिपद्य प्रवव्राज–] त्या ब्रह्मविद्यार्थी बालाकीला हातांत धरून म्ह० मोठ्या स्नेहानें त्याचा हात आपल्या हातांत धरून सभेंतून उठून गेला. [तौ ह सुप्तं पुरुषं आजग्मतुः–] ते दोघे–राजा व बालाकि खरोखर श्रांत होऊन गाढ झोंपीं गेलेल्या एका राज-पुरुषापाशीं आले. [तं ह अजातशत्रुः बृहन् पाण्डरवासः सोम राजन् इति आमंत्रयांचक्रे–] त्या निजलेल्या पुरुषाला अजातशत्रु राजा हे बृहन्–सर्वांहूनहि अधिक असलेल्या प्राणा, हे पांडरवास–पाण्डर म्ह० आप–जल तें ज्याचें वस्त्र आहे असा, हे पाण्डरवास प्राणा, हे सोमात्मक प्राणा, हे दीप्तिमान् प्राणा, अशा प्राणनामांनीं हाका मारूं लागला. [सः उ ह तूष्णीं एव शिश्ये–] पण तो याप्रमाणें हाका मारला गेलेला प्राण जरी जागत होता, कारण सुषुप्त पुरुषाचाहि प्राण श्वासोच्छ्वासरूपानें जागत असतो हें प्रसिद्ध आहे, तरी त्याहून अगदीं भिन्न असलेला जीव दुसऱ्या अवस्थेंत असल्यामुळें तो स्वस्थ निजलाच होता. तो कांहीं त्या प्राणाच्या नांवांनीं जागा झाला नाहीं. [ततः उ ह–] त्यानंतर तत्काल खरोखर [एनं यष्ट्या आविचिक्षेप–] राजानें त्या झोंपी गेलेल्या पुरुषाला हातांतील बारीक काठीनें हळू हळू सभोंवार ताडन केलें. [सः ततः एव समुत्तस्थौ–] तेव्हां तो प्राणाहून निराळाच असलेला सुप्त पुरुष त्या यष्टिताडनामुळें त्याच क्षणीं जागा होऊन उभा राहिला. [तं ह अजातशत्रुः उवाच–] त्याबरोबर अजातशत्रु त्या प्राणात्मवादी बालाकीला म्हणाला–" प्राण जागत असूनहि त्याला माझी हाक ऐकूं आली नाहीं. तेव्हां तो आत्मा नव्हे, हें उघड झालें. पण [बालाके एषः पुरुषः क एतत् अशयिष्ट–] हे बालाके, हा प्राणाहून अगदीं पृथक् असलेला चेतन पुरुष याप्रमाणें सर्व चैतन्यशून्य होत्साता कोठें शयन करीत होता ? [क

एतत् अभूत्–] कोणत्या प्रदेशांत हें त्याचें शयन झालें ? (यांतील पहिला प्रश्न पुरुषाविषयीं व दुसरा अवस्थेविषयीं आहे. याप्रमाणें पुरुष व शयन यांचे देश विचारून राजा त्याचा आगमनप्रदेशहि विचारीत आहे–) [कुतः एतत् आगात् इति–] व हा कोणत्या प्रदेशांतून आतां या जागरावस्थेंत आला आहे ? याचा चांगला विचार करून सांग.'' अशाप्रकारें राजानें त्याला प्रश्न विचारले. [ततः उ ह बालाकिः न विजज्ञे–] पण राजानें विचारलेल्या त्या प्रश्नांचें उत्तर बालाकीला देतां आलें नाहीं. त्याला ते प्रदेश माहीत नव्हते.

तं होवाचाजातशत्रुर्यत्रैष एतद्बालाके पुरुषोऽशयिष्ट यत्रै-
तदभूदत एतदागादिति हिता नाम हृदयस्य नाड्यो हृद-
यात्पुरीततमभिप्रतन्वन्ति तद्यथा सहस्रधा केशो विपाटि-
तस्तावदण्व्यः पिङ्गलस्याणिम्ना तिष्ठन्ति शुक्लस्य कृष्णस्य
पीतस्य लोहितस्येति तासु तदा भवति यदा सुप्तः स्वप्नं न
कंचन पश्यत्यथास्मिन्प्राण एवैकधा भवति तदैनं वाक्
सर्वैर्नामभिः सहाप्येति चक्षुः सर्वै रूपैः सहाप्येति श्रोत्रं
सर्वैः शब्दैः सहाप्येति मनः सर्वैर्ध्यानैः सहाप्येति स
यदा प्रतिबुध्यते यथाग्नेर्ज्वलतः सर्वा दिशो विस्फुलिङ्गा
विप्रतिष्ठेरन्नेवमेवैतस्मादात्मनः प्राणा यथायतनं विप्रति-
ष्ठन्ते प्राणेभ्यो देवा देवेभ्यो लोकाः ॥ १८

अन्वयार्थ—[अजातशत्रः तं ह उवाच–] अजातशत्रु बालाकीला आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येत नाहींत, असें पाहून त्याला म्हणाला–[बालाके एषः पुरुषः यत्र एतत् अशयिष्ट–] बालाके, हा चेतन पुरुष जेथें हें शयन करीत होता, [यत्र एतत् अभूत्–] जेथें हें त्याचें शयन होतें व [यतः एतत् आगात् इति–] हा जेथून या अवस्थेंत आला तें मी सांगतों, ऐक–[हिताः नाम हृदयस्य नाड्यः–] प्राण्यांच्या हिताला कारण होणाऱ्या असल्यामुळें ' हिताः ' या नांवाच्या हृदयाच्या–हृदयकमलसंबंधी–हृदयकमलापासून निघालेल्या नाड्या –शिरा [हृदयात् पुरीततं अभिप्रतन्वन्ति–] हृदयापासून निघून ' पुरीतत्-' नांवाच्या हृदयवेष्टनाला सर्वतः आधिक्यानें परिवेष्टित करितात. [तत् यथा–]

त्या नाड्या केवढ्या प्रमाणाच्या असतात ? उत्तर– [सहस्रधा केशः विपाटितः–] केंस नानाप्रकारें फाडला असतां म्ह० एका केंसाच्या अग्राचा सहस्रांश जेवढा असतो [तावत् अण्व्यः–] तेवढ्या प्रमाणाच्या त्या सूक्ष्म असतात. [पिंगलस्य अणिम्ना तिष्ठन्ति–] चित्रवर्ण अतिसूक्ष्म रसानें भरून राहिलेल्या –परिपूर्ण असतात. (त्यांचा सामान्यतः वर्ण सांगून विशेषतः सांगतो–) [शुक्लस्य कृष्णस्य पीतस्य लोहितस्य इति–] शुभ्र वर्णाच्या, कृष्णवर्णाच्या, पीतवर्णाच्या, रक्तवर्णाच्या अशा दुसऱ्या प्रकारच्या सूक्ष्म रसांनींहि त्या भरलेल्या असतात. [तासु तदा भवति–] हृदयगमनाच्या मार्गाप्रमाणें असलेल्या त्या नाड्यांमध्यें–त्यांच्या सामीप्यानें तो पुरुष त्या स्वप्नसमयी रहातो. (या प्रमाणें स्वप्नस्थान सांगून राजा जागरासह विस्तृत सुषुप्तस्थान सांगतो–) [यदा सुप्तः स्वप्नं कंचन न पश्यति–] पण जेव्हां गाढ झोंपीं गेलेला हा कोणतेंहि स्वप्न पहात नाहीं [अथ अस्मिन् प्राणे एव एकधा भवति–] तेव्हां या प्राणोपाधिक आनंदात्म्यांतच एकरूप होतो. [तदा वाक् सर्वैः नामभिः सह एनं अप्येति–] तेव्हां वाक्-इंद्रिय सर्व नामांसह या प्रज्ञात्म्या प्राणांत लीन होतें. [चक्षुः सर्वैः रूपैः०–] चक्षु सर्व रूपांसह त्यांत लीन होतें. श्रोत्र सर्व शब्दांसह त्यांत लीन होतें. मन सर्व ध्यानांसह त्यांत लीन होतें. पण [सः यदा प्रतिबुध्यते–] तो जेव्हां जागा होतो तेव्हां [यथा ज्वलतः अग्नेः विस्फुलिंगाः सर्वाः दिशः विप्रतिष्ठेरन्–] ज्या प्रमाणें प्रदीप्त झालेल्या अग्नीपासून किटाळें सर्व दिशांमध्यें उडावीं (एवं एव एतस्मात् आत्मनः प्राणाः यथायतनं विप्रतिष्ठन्ते–] त्याचप्रमाणें या आत्म्यापासून प्राण–इंद्रियें आपापल्या स्थानाकडे विशेषतः निघतात. [प्राणेभ्यः देवाः देवेभ्यः लोकाः–] त्या वागादि इंद्रियाख्य प्राणांपासून अग्न्यादि देव व देवांपासून लोक–विषय उदय पावतात. (नाड्यांच्या द्वारा हृदयाकाशांत जाऊन त्यांतील आनंदात्म्यांत सुषुप्तीला प्राप्त होऊन त्यापासूनच, त्याच नाड्यांच्या द्वारा, जागरणावस्थेस प्राप्त होतो. तो आधार-आधेयभावशून्य झालेला आत्मा विज्ञान-आनंदस्वरूप ब्रह्मशब्दवाच्य होतो. तुला अभिमत असलेला अधिदैवत किंवा अध्यात्म प्राणादि तो नव्हे.) १८.–पण तो ब्रह्मशब्दवाच्य आत्मा उपलब्ध कसा होऊं शकतो, तें राजा सदृष्टान्त सांगतो—

तद्यथा क्षुरः क्षुरधानेऽवहितः स्याद्विश्वंभरो वा विश्वंभरकुलाय एवमेवैष प्रज्ञ आत्मेदं शरीरमात्मानमनुप्रविष्ट आ लोमभ्य आ नखेभ्यः ॥ १९

अन्वयार्थ—[तत् यथा—] आत्म्याच्या उपलब्धीविषयीं दृष्टान्त—ज्या प्रमाणें [क्षुरः—] ज्याचें अग्र अतिशय तीक्ष्ण आहे, असा प्रसिद्ध वस्तरा [क्षुरधाने—] ज्यांत वस्तरे ठेवले जातात त्या पात्रांत [अवहितः स्यात्—] एका भागामध्यें खोंचून ठेवलेला असतो त्याप्रमाणें हा आत्मा हृदयकमलांत—शरीराच्या एका विशिष्ट भागांत उपलब्ध होतो. आतां त्याची सर्व शरीरांत उपलब्धि कशी होते त्याविषयीं दृष्टान्त—[वा विश्वंभरः विश्वंभरकुलाये—] किंवा अग्नि अग्निनीडांत—अरणींत, काष्ठांत वगैरे असतो [एवं एव एषः प्रज्ञः आत्मा इदं शरीरं आत्मानं अनुप्रविष्टः—] त्याचप्रमाणें हा—प्रकृत नित्यस्वयंप्रकाशप्रज्ञायुक्त 'मी' अशा प्रत्ययाला व शब्दव्यवहाराला योग्य असलेला आत्मा या शरीरांतील आत्म-'शब्द व प्रत्यय यांच्या आश्रयभूत इंद्रियांत अनुप्रविष्ट झाला आहे. उत्पन्न केलेल्या त्या शरीरेंद्रियसंघातांत तो मागून प्रविष्ट झाला. (राजा त्या प्रवेशाची मर्यादा सांगतो—) [आ लोमभ्यः आ नखेभ्यः—] नखांच्या अग्रांपर्यंत व शरीरांतून बाहेर पडलेल्या केंसांपर्यंत म्ह० नखांचीं अग्रें व बाहेर पडलेले लोम—केंस यांस सोडून बाकीच्या सर्व शरीरांत प्रविष्ट झाला आहे. १९.—याप्रमाणें स्वप्न-सुषुप्ति-जागरणामध्यें प्राणाहून भिन्न असलेला आत्मा सांगून त्याची सर्व शरीरांत सामान्यतः व हृदयांत विशेषतः व्याप्ति व त्याचें स्वामित्व सांगण्याची इच्छा करणारा राजा दृष्टान्तपूर्वक म्हणतो—

तमेतमात्मानमेत आत्मानोऽन्ववस्यन्ति यथा श्रेष्ठिनं स्वास्तद्यथा श्रेष्ठी स्वैर्भुङ्क्ते यथा वा स्वाः श्रेष्ठिनं भुञ्जन्ति एवमेवैष प्रज्ञात्मैतैरात्माभिर्भुङ्क्ते ॥ यथा श्रेष्ठी स्वैरेवं वै तमात्मानमेत आत्मानो भुञ्जन्ति यथा श्रेष्ठिनं स्वाः । स यावद्ध वा इन्द्र एतमात्मानं न विजज्ञे तावदेनमसुरा अभिबभूवुः स यदा विजज्ञेऽथ हत्वाऽसुरान्विजित्य सर्वेषां देवानां श्रैष्ठ्यं स्वाराज्यमाधिपत्यं परीयाय तथो एवैवं

विद्वान्सर्वान्पाप्मनोऽपहत्य सर्वेषां भूतानां श्रैष्ठ्यं स्वाराज्यमाधिपत्यं पर्येति य एवं वेद य एवं वेद ॥ २०

अन्वयार्थ—[यथा श्रेष्ठिनं स्वाः तथा तं एतं आत्मानं एते आत्मानः अन्ववस्यन्ति—] ज्याप्रमाणें प्राधान्यानें—श्रेष्ठत्वानें युक्त असलेल्या कुटुंबीला त्याचे सर्व उपजीवी ज्ञातिबांधव अनुसरतात त्याप्रमाणें लोम-नखांपर्यंत शरीरांत प्रविष्ट झालेल्या त्या बुद्धिसाक्षी आनंद-आत्म्याला हे प्रत्यक्ष शरीरस्थ अधिदैवभेदशून्य वागादि आत्मे अनुसरतात. त्याच्या निश्चयाच्या अनुसार हे आपापल्या विषयांचा निश्चय करितात. (निश्चयाविषयीं आत्म्याचें प्राधान्य सांगून भोगांतील प्राधान्यहि राजा सदृष्टान्त सांगतो—) [तत्—] त्याच्या भोग-प्राधान्याविषयीं दृष्टान्त—[यथा श्रेष्ठी स्वैः भुंक्ते—] ज्याप्रमाणें कुटुंबी आपल्या संबंधी ज्ञातिजनांसह अन्नाचा भोग घेतो [यथा वा श्रेष्ठिनं स्वाः भुंजन्ति—] किंवा ज्याप्रमाणें प्रधान कुटंबीला तत्संबंधी जन खातात—त्याच्या ऐश्वर्यावर सुख भोगितात [एवं एव एषः प्रज्ञात्मा एतैः आत्मभिः भुंक्ते—] त्याच प्रकारें ज्ञान-क्रियाशक्ति या उपाधीनें युक्त असलेला हा प्रज्ञात्मा या प्रत्येक प्राण्यामध्यें विशेषतः स्थित असलेल्या वागादि आत्म्यांसह भोग घेतो. किंवा दृष्टान्त व दार्ष्टांतिक यांतील ' स्वैः ' व ' एतैः आत्मभिः ' या तृतीया ' करण ' या अर्थी आहेत. कारण भृत्यादिकांच्या साह्यावांचून धनाढ्य कुटुंबीचाहि भोग संभवत नाहीं. कारण त्याच्या द्रव्यादिकांचा अपहार वगैरे होण्याचाहि संभव असतो. त्याच न्यायानें असंग, उदासीन व केवल चित्स्वरूप आत्म्याचाहि इंद्रियादिकांवांचून भोग संभवत नाहीं. यास्तव श्रेष्ठी जसा आपल्या संबंधी लोकांच्या योगानें भोग भोगतो, तसा आत्मा इंद्रियांनी भोग भोगतो. [यथा श्रेष्ठी स्वैः०—] एखादें कार्य उपस्थित झालें असतां प्रधान कुटुंबी आपल्या लोकांबरोबर विचार करून जसें तें पार पाडतो त्याप्रमाणें आत्मा यांच्या साह्यानें कार्याचा निर्वाह करितो. (' तमेतं आत्मानं० ' याचाच ' यथा श्रेष्ठिनं स्वाः'—ज्याप्रमाणें श्रेष्ठीला त्याचे बांधव,हा विस्तार आहे.) [एवं वै तं आत्मानं एते आत्मानः भुञ्जन्ति—] त्याच न्यायानें या इंद्रियांच्या अधिष्ठात्या आत्म्याला हे इंद्रियात्मे भोगतात. त्याच्या आश्रयानें सुखानुभव घेतात. (येथील या पुनरुक्तीचें समाधान सामान्य-विशेषभावानें करावें. आतां या आत्म्याच्या ज्ञानानें कोणाला कोणतें

फल मिळालें, तें राजा सांगतो–) [सः इन्द्रः यावत् ह वै एतं आत्मानं न विजज्ञे–] तो प्रसिद्ध इंद्र–प्रतर्दनाचा गुरु जोंवर मोठ्या प्रयासानें प्रजापतीपासून आत्मज्ञान संपादन करून या आत्म्याला जाणत नव्हता, आत्मज्ञानी झाला नव्हता, या साक्षात् आनंदात्म्याला 'हा मी' असें जाणत नव्हता, [तावत् असुराः एनं अभिबभूवुः–] तोंवर त्याला विरोचनादिक किंवा शास्त्रनिषिद्ध व्यापार करणारे वागादिक हेच असुर त्याचा पराभव करीत होते. पण [सः यदा विजज्ञे–] तो परमैश्वर्यसंपन्न त्रैलोक्याधिपति जेव्हां छान्दोग्यांत सांगितल्याप्रमाणें 'य आत्माऽपहतपाप्मा० '–पृ. ४७८ पहा.–इत्यादि स्वरूपाच्या आत्म्याला साक्षात् जाणता झाला [अथ असुरान् हत्वा विजित्य–] तेव्हां असुरांना मारून विजय संपादन करून [सर्वेषां देवानां श्रैष्ठ्यं–] अग्न्यादि सर्व देवांचें श्रेष्ठत्व–प्राधान्य, [स्वाराज्यं आधिपत्यं पर्यायं–] अप्रतिहत-इच्छत्व व सर्वांचा अधिष्ठाता होऊन पालयितृत्व, यांस सर्वतः प्राप्त झाला. [तथा उ एव–] त्या इंद्राप्रमाणेंच [एवं विद्वान्–] अवस्थात्रयातीत, प्राणादिकांना आश्रय करण्यास योग्य, असंग-उदासीनस्वभाव, आकाशाप्रमाणें सर्वगत असूनहि शरीरांत सामान्यरूपानें व हृदयांत विशेषरूपानें ज्याचें चैतन्य उपलब्ध होतें असा, सर्वधर्मशून्य आनंदात्मा मी आहें, अशाप्रकारें जाणणारा [सर्वान् पाप्मनः अपहत्य–] धर्माधर्माख्य सर्व पापांचा नाश करून [सर्वेषां भूतानां श्रैष्ठ्यं स्वाराज्यं आधिपत्यं पर्येति–] स्थिर-चर सर्व भूतांचें श्रेष्ठत्व, स्वाराज्य–अप्रतिहतेच्छत्व व स्वामित्व, यांस प्राप्त होतो. [यः एवं वेद–] जो शमादिसाधनचतुष्टयसंपन्न पुरुष असें जाणतो त्याला हें फल प्राप्त होतें. 'य एवं वेद' या वाक्याची द्विरुक्ति उपनिषत्समाप्त्यर्थ आहे. २०.

'वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता०' ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील कौषीतकिब्राह्मणोपनिषदाचा चवथा अध्याय व आरण्यकाचा नववा अध्याय समाप्त झाला.

येथें हें कौषीतकिब्राह्मणोपनिषद् समाप्त झालें.

कौषीतकिब्राह्मणोपनिषदाचें सिंहावलोकन.

प्रस्तुत उपनिषद् ऋग्वेदाच्या कौषीतकिशाखेचें आहे. याचे चार अध्याय आहेत. कौषीतकि-आरण्यकाचे सहा ते नऊ अध्याय म्हणजेच हें उपनिषद् होय. याचा तिसरा अध्याय फार महत्त्वाचा आहे. त्यांतील विषयहि अपूर्व आहे. तीच मुख्य ब्रह्मविद्या आहे. बाकीच्या अध्यायांतील विषय थोड्याशा फरकानें छान्दोग्य व बृहदारण्यक यांत येऊन गेला आहे. पहिल्या अध्यायांत पर्यंकविद्या सांगितली आहे. तिचा आरंभ गार्ग्यकुलोत्पन्न चित्रराजा व आरुणि-पुत्र श्वेतकेतु यांच्या संवादानें झाला आहे. चित्रानें यज्ञासाठीं आरुणीला बोलाविलें. त्यानें आपल्या श्वेतकेतु पुत्राला पाठविलें. चित्रानें त्याला 'तूं यज्ञ करून मला कोठें पाठविणार ? पुनर्जन्मयुक्त स्थानीं—स्वर्गांत कीं पुनर्जन्मरहित स्वर्गलोकीं' असा प्रश्न केला. श्वेतकेतूला त्याचें उत्तर देतां आलें नाहीं. 'मी आपल्या पित्याला विचारून येतों' असें बोलून तो आरुणीकडे आला. पण त्यालाहि तें माहीत नव्हतें. म्हणून तो ती विद्या संपादन करण्यासाठीं चित्राकडे आला व केवल शब्दानेंच उपसन्न झाला. तेव्हां त्याचें निरभिमानित्व व विद्यार्थित्व यांची प्रशंसा करून त्यानें दक्षिणमार्गाचा उपदेश केला. जे कर्मठ हें शरीर सोडून जातात ते सर्व धूमादि मार्गानें चंद्रालाच प्राप्त होतात. त्यांच्या प्राणांनीं शुक्लपक्षांत चंद्र वृद्धि पावतो. कृष्णपक्षांत क्षीण झालेला चंद्र स्वर्गस्थांना तृप्त करूं शकत नाहीं. चंद्रमा हें स्वर्गलोकाचें द्वार आहे. जो अमानित्वादि गुण-वान् उपासक चंद्राला मी प्राप्त होणार नाहीं, अशा निश्चयानें त्याचें अतिक्रमण करितो तो चंद्रलोकाचें उल्लंघन करून विद्युतादिकांच्या द्वारा ब्रह्मलोकास जातो. पण जो केवल स्वर्गेच्छु असतो त्याला स्वर्गांतील पुण्यफलभोग संपतांच मेघभाव प्राप्त होतो व वृष्टीच्या द्वारा भूलोकीं येऊन अवशिष्ट कर्म व विद्या—ज्ञान यांच्या अनुसार तो मनुष्य-पश्वादि हीन-मध्यम योनींत जन्म घेतो. कर्माची स्वर्ग, नरक व मनुष्यादि मिश्र अशी त्रिविध गति वैराग्यासाठीं सांगून वैराग्यसंपन्न शिष्यावर अनुग्रह करण्यासाठीं गुरूनें शरण आलेल्या मुमुक्षूला 'तूं कोण आहेस' असा प्रश्न करावा, असें चित्रानें गुरूचें कर्तव्य सांगितलें

आहे. शिष्य 'मी ऋतुरूप चंद्रलोकांतून येऊन मातापित्यांपासून शरीरेंद्रियरूप झालेलों आहें' असें म्हणतो. गुरु त्याच्या त्या मिथ्या ज्ञानाचा निषेध करून त्याला उपासना व ज्ञान यांचा उपदेश करितो व पुनः 'तूं कोण?' असा प्रश्न करितो. त्यावर शिष्य 'तूंच मी आहें' असा आपला अनुभव प्रकट करितो. हें पर्यंकविद्येचें प्रकरण असल्यामुळें येथील 'तूंच मी' हें ज्ञान मुख्य आत्मज्ञान नव्हे, तर 'सगुणत्वानें पर्यंकस्थ प्राण-प्रज्ञात्माच मी आहें' असा सगुण साक्षात्कार आहे. असो; त्यानंतर श्रुतीनें सगुणब्रह्मवेत्त्याचा देवयानमार्ग सांगितला आहे. त्या मार्गानें ब्रह्मलोकास प्राप्त झालेल्या त्याचा तेथें कसा सत्कार होतो, तें सांगण्यासाठीं श्रुति म्हणते—त्या ब्रह्मलोकांत काम-क्रोधादि अरींपासून झालेला 'आर-' नांवाचा फारच मोठा डोह आहे. त्याच्या तीरावर मुहूर्ताभिमानी देव आहेत. ते काम-क्रोधांना उत्पन्न करून ब्रह्मलोक देणाऱ्या उपासनेला प्रतिबंध करितात. विजरा नदी, इल्य—पृथिवीरूप वृक्ष, एक सर्वसुंदर नगर, अनेक सूर्यांसारखें ब्रह्माचें निवासस्थान, अहंकारसामान्यरूप सभास्थान, सर्वश्रेष्ठ प्राण हाच पर्यंक, मनाचें कारण हीच आनंद देणारी भार्या, विविध श्रुति व बुद्धि याच अप्सरा, उपासना याच नद्या आहेत. अशा ब्रह्मलोकास प्राप्त झालेल्या त्या उपासकापाशीं हिरण्यगर्भाच्या आज्ञेनें नानाप्रकारचा पूजासंभार घेऊन अप्सरा वगैरे येतात. त्या त्याला ब्रह्मप्रमाणेंच भूषित करितात. त्यामुळें तो ब्रह्मोपासक ब्रह्मरूप होतो. नंतर तो आर-ह्रद, मुहूर्ताभिमानी देव व विजरा नदी, यांचें मनानेंच उल्लंघन करितो. त्यानें उपासनाबलानें साक्षात्कार होतांच पुण्यपापांचा त्याग केलेला असतो. त्यामुळें पुण्य-पापरहित झालेला तो हिरण्यगर्भरूपच होतो. नंतर तो क्रमानें इल्यवृक्ष, सालज्यनगर, अपराजित ब्रह्ममंदिर यांस प्राप्त होतो. त्याच्यामध्यें क्रमानेंच ब्रह्मगंध, ब्रह्मरस व ब्रह्मतेज प्रवेश करितात. त्या ब्रह्ममंदिराच्या द्वारावर इंद्र व प्रजापति हे द्वारपाल असतात. पण ते याला पाहतांच हात जोडून दूर सरतात. तो अहंकाराख्य ब्रह्मसभास्थानास प्राप्त होतो. त्यामध्यें ब्रह्मतेज प्रवेश करितें. तो प्रज्ञा याच चतुर आसन्दीला—आसनापर्यंत येऊन पोंचतो. तो आत्मबुद्धीनें विविध विश्वाला पाहतो. तो प्राणाख्य पर्यंकाला प्राप्त होतो. त्या मंचकावर ब्रह्मा—हिरण्यगर्भ बसलेला असतो. त्या मंचकावर हा ब्रह्मोपासक पायांनींच चढून जातो. त्याला ब्रह्मा

'तूं कोण आहेस?' असें विचारतो. तो म्हणतो—'मी ऋतु, ऋतुसंबंधी आहें. कालात्मा आहें. स्वयंप्रकाश अव्याकृत या उपादानापासून झालेला आहें. सर्व कार्य-कारणांचें अधिष्ठान आहें. जो तूं तोच मी आहें. तूं सत्य आहेस. अग्न्यादि देव, वागादि प्राण यांहून जें भिन्न तें 'सत्' व प्राण आणि देव हें 'त्यत्' आहे. या चराचर जगाला सत्य म्हणतात. हें सर्व तूं आहेस. तो तूंच मी आहें. शेवटीं त्या ब्रह्मानें प्रश्न केला असतां "मी प्राणानें तुझ्या पुल्लिंगी नांवास, वाक्-नें स्त्रीलिंगी नांवास, मनानें नपुंसकलिंगी नांवास, घ्राणानें गंधांस, चक्षूनें रूपांस, श्रोत्रानें शब्दांस, जिह्वेनें रसांस, हातांनीं कर्मांस, शरीरानें सुखदुःखांस वगैरे प्राप्त होतों" असें त्यानें उत्तर द्यावें, असें श्रुति शिकविते. याप्रमाणें पायांनी पर्यंकावर चढून गेलेल्या व आपलें सर्वात्मज्ञान सांगणाऱ्या त्या उपासकाला पर्यंकस्थ ब्रह्मा म्हणतो—"हा प्रसिद्ध भूत-भौतिक कार्यसमूह हीच मज परब्रह्मरूप स्रष्ट्या हिरण्यगर्भाची सुखानुभवभूमि आहे. तीच तुझीहि असो. कारण तूं मद्रूप आहेस. जें कांहीं माझें आहे तें सर्व तुझेंच आहे. याप्रमाणें सगुण ब्रह्मोपासकाला त्या स्रष्ट्याचीच विजयरूप नियन्तृता व सर्वव्याप्ति—सर्वात्मकता प्राप्त होते. या अध्यायांत पूर्वोक्त प्राणाख्य पर्यंकस्थ सगुण ब्रह्माची उपासना सांगितली असल्यामुळें तिला पर्यंकविद्या म्हणतात. १.

दुसऱ्या अध्यायांत चित्ताचें स्थैर्य संपादन करणारी व कल्पवृक्षाप्रमाणें इष्ट फल देणारी प्राणोपासना व उपासकाला विविध फलें देणारीं बाह्य व आध्यात्मिक कर्में सांगितलीं आहेत. प्राणापानादि पंचवृत्ति प्राणच सत्य-ज्ञानादिलक्षण ब्रह्म आहे, असें ध्यान करावें असें कौषीतकीनें सांगितलें. त्या प्राण ब्रह्माचें मन हा दूत, चक्षु रक्षक, श्रोत्र द्वारपाल, वाक् भोजन वाढणारी स्त्री आहे. अशी उपासना करणाराला तसेंच फल मिळतें. प्राणब्रह्माला याचना न करतांच वागादि सर्व देवता बलि समर्पण करितात. त्याच्या उपासकालाहि याचनेवांचूनच सर्व भूतें विषयजात समर्पितात. याचना न करणें हें त्याचें व्रत आहे. तो एखाद्या गांवांत भिक्षा मागावयास गेला व त्याला कोणीं कांहीं दिलें नाहीं तर त्यानें 'यांच्यापासून कांहीं घ्यावयाचें नाहीं' असा निश्चय करावा. म्हणजे लोक आपण होऊन त्याच्या जवळ येऊन अन्नादि देतात. अयाचक दीन मुख होत नाहीं. याचक दीनमुख होतो. हें जाणून याचना सोडावी. पैंग्यानेंहि 'प्राण ब्रह्म

आहे ' असेंच चिंतन करावयास सांगून ' प्राण सर्वान्तर आहे. कारण वाक्-च्या आंत चक्षु, चक्षूच्या आंत श्रोत्र, श्रोत्राच्या आंत मन व मनाच्या आंत प्राण आहे. तीं उत्तरोत्तर व्यापक आहेत. त्या अयाचक प्राणाला सर्व देवता बलि अर्पण करितात. त्याच्या उपासकालाहि तसेंच फल मिळतें. याचना न करणें हें प्राणोपासकाचें गुप्त व्रत आहे. ' असा उपदेश केला व कौषीतकी-प्रमाणेंच अयाचनेचें महत्त्व वर्णिलें आहे. त्यानंतर प्राणोपासकाला धनाची इच्छा असल्यास धनाचें उपायभूत कर्म व वशीकरण कर्म, इतिकर्तव्यता व होममंत्र यांसह, सांगून बाह्य अग्निसाध्य अग्निहोत्र कांहीं कारणानें अशक्य झाल्यास आध्यात्मिक अग्निहोत्र सांगितलें आहे. मनुष्य जोंवर भाषण करितो तोंवर श्वासोच्छ्वास सोडीत नाही व प्राणव्यापाराचे वेळी बोलत नाही. अर्थात भाषणाचे वेळीं वाक्मध्यें प्राणाचा व श्वासोच्छ्वाससमयी प्राणांत वाक्चा होम होतो. यास्तव त्याच दोन अमृत—अविनाशी आहुति आहेत, असें चिंतन करावें.कारण हा होम जन्मापासून मरेपर्यंत अविच्छिन्नपणें चालतो. बाह्य कर्ममय आहुति विनाशी फल देतात. पण या आहुती परंपरेनें मोक्षरूप फल देतात. या अग्निहोत्राला जाणणारे सर्वसंगपरित्यागरूप संन्यास करितात. या आध्यात्मिक अग्निहोत्राचें विधान केल्यावर शुष्कभृंगारानें उक्थाख्य प्राणाची ब्रह्मदृष्ट्या उपासना सांगितली आहे. उक्थाची ऋक्-यजुः-सामदृष्टीनें, श्री, यश, तेज या दृष्टीनें उपासना व त्यांचें तदनुरूप फल कथन केलें आहे. वेदविहित इतर उपासना संसारांतीलच फल देतात; पण ही प्राणोपासना मोक्षाचें साधन आहे, यास्तव अध्वर्युप्रभृति ऋत्विक् आपल्याला संस्कार कसे करितात त्याचें वर्णन करून बाह्य प्राणरूप आधिदैविक आदित्याचीं तीन कर्मात्मक उपासनें सर्व इतिकर्तव्यता व फल यांसह सांगितलीं आहेत. त्यानंतर 'परिमर-'संज्ञक प्राणाच्या उपासनेचें विधान केलें आहे. येथील 'परिमर' व छांदोग्यांतील 'संवर्ग' एकच. कारण अधिदैवत वायूंत अग्न्यादि देवता व अध्यात्म प्राणांत वागादि देवता लीन होतात, असें दोन्ही ठिकाणीं एकसारखेंच पण थोड्या फरकानें सांगितलें आहे. बृहदारण्यकांतील व छांदोग्यांतील वागादिकांच्या कलहाप्रमाणेंच येथेंहि देवतांचा श्रेष्ठत्वासाठीं विवाद वर्णिला आहे. वागादि इंद्रियांच्या प्रवेशानें निजलेलें—मृत झालेलें शरीर उठलें नाहीं तर प्राणाच्या प्रवेशानेंच तें उठलें, असें दाखवून

प्राणाचें श्रेष्ठत्व निश्चित केलें आहे. शेवटीं बृहदारण्यकांतील संप्रत्तिकर्मांप्रमाणेंच येथें पितापुत्रीय संप्रदान सर्व इतिकर्तव्यतेसह थोड्या फरकानें सांगितलें आहे. २

तिसऱ्या अध्यायांत इंद्रानें प्रतर्दनास ब्रह्मविद्येचा उपदेश केला आहे. प्रतर्दन म्हणून एक काशिराज दिवोदासाचा पुत्र होता. तो शौर्य व उत्साह या गुणांमुळें स्वर्गास गेला. त्याच्या गुणानें संतुष्ट झालेल्या इंद्रानें त्याला वर मागावयास सांगितलें. तेव्हां 'मनुष्याला जो अत्यंत हितकर असेल असा वर तूंच मला दे' असें प्रतर्दन बोलला. पण त्यानें मागितल्यावांचून इंद्र वर देईना. तेव्हां 'तर मग मला तुझा वरच नको' असें प्रतर्दन बोलला. तें ऐकून आपल्या सत्यवचनाचें रक्षण करण्यासाठीं इंद्रानेंच मनुष्याला हिततम असलेलें आत्मज्ञान त्याला सांगितलें.

इंद्र म्हणाला—"तूं मलाच—आत्म्याला जाण, मला साक्षात् जाणणें हें ज्ञानच मनुष्याला अत्यंत हितावह आहे. हें अद्वैत आत्मज्ञान महापातकांचाहि नाश करणारें आहे. कारण मी विश्वरूप ब्राह्मणाला मारलें, अनात्मज्ञ यतींचे तुकडे करून त्यांचें मांस लांडग्यांना खाऊं घातलें, तिन्ही लोकांतील असुरांना आपल्या प्रतिज्ञांचा वेळोवेळीं भंग करूनहि मारलें. पण माझें मोक्षदृष्ट्या कांहीं नुकसान झालें नाहीं. मजप्रमाणेंच दुसऱ्याहि आत्मज्ञाला मातृ-पितृवध, सुवर्णाची चोरी, भ्रूणहत्या इत्यादि कर्मांपासून पाप लागत नाहीं. त्याच्या मुखावरील कांति नष्ट होत नाहीं." इंद्राच्या याच माहात्म्याला अनुसरून गीतेंत 'अपि चेदसि पापेभ्यः०' सु. गी. पृ. ९७ 'सर्वथा वर्तमानोऽपि०' पृ. २५५ व 'यस्य नाहंकृतो भावः०' सु. गी. पृ. ३२१ 'सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणः०' पृ. ३४१ इत्यादि वचनांत ज्ञानाची स्तुति केली आहे.

याप्रमाणें ब्रह्मज्ञानाची स्तुति करून इंद्र ब्रह्माचें स्वरूप सांगण्यासाठीं म्हणतो—"मी प्रज्ञात्मा प्राण आहें. माझें आयु व अमृत या दृष्टीनें चिंतन कर. शरीरांत जोंवर प्राण असतो तोंवर प्राण्याचें जीवन होतें. यास्तव प्राणच आयुष्य आहे. मनुष्य प्राणात्म्यानेंच मरणोत्तर अमृतत्वाचा अनुभव घेतो. तसेंच प्रज्ञेनें सत्य ब्रह्माला व संकल्पाला प्राप्त होतो. यास्तव जो कोणी मज प्राण-प्रज्ञात्म्याचें आयु-अमृत असें अनुसंधान करितो त्याला या लोकीं पूर्ण आयुष्य प्राप्त होऊन मरणोत्तर अक्षय अमृतत्वाचा लाभ होतो."

त्यावर प्रतर्दन म्हणतो–" पण कित्येक विद्वान् सर्व प्राण एकत्वास प्राप्त होतात, असें सांगतात. कारण वाक्-चक्षुः-श्रोत्र-मन यांच्या भाषणादि क्रिया एकाच वेळीं होत नाहींत. तर वाक् जेव्हां बोलते तेव्हां इतर इंद्रियें तिला अनुसरतात, चक्षु रूप पाहतो, तेव्हां इतर इंद्रियें त्याला अनुसरतात. इतर इंद्रियांच्या क्रियांनाहि हाच न्याय लागू आहे. तेव्हां यांतील तत्त्व काय आहे?" इंद्र–"प्रतर्दना, विद्वानांचें हें म्हणणें अगदी खरें आहे. तथापि मुख्य प्राणामध्यें 'त्याच्यामुळें शरीराचें धारण होणें' हें निःश्रेयस आहे. कारण वागादि इंद्रियांवांचून शरीर जिवंत राहूं शकतें. आपण मुके, आंधळे, बहिरे, वेडे वगैरे पाहतों. पण प्राणावांचून शरीर राहूं शकत नाहीं. हा प्रज्ञात्मा प्राणच शरीराला आसनादिकांवरून उठवितो. यास्तव तोच शरीराचा उत्थापक आहे, असें चिंतन करावें. प्राणच प्रज्ञा आहे व प्रज्ञा प्राण आहे ती दोन्ही मिळूनच शरीरांत राहतात व जिवाशीं एकरूप होऊनच शरीर सोडून जातात. या प्राणाची हीच पुढें सांगितलेली दृष्टि–बोध व हेंच पुढील विज्ञानकारण आहे. जेव्हां पुरुष गाढ झोंपतो तेव्हां तो या प्राणांतच एकरूप होतो. तेव्हां वागादि सर्व अंतर्बहिर् इंद्रियें आपापल्या विषयांसह त्यांत लीन होतात व जेव्हां तो जागा होतो तेव्हां प्रदीप्त अग्नीपासून जशीं किटाळें त्याप्रमाणें त्यापासून वागादि सर्व प्राण उत्पन्न होतात, वागादिकांपासून अग्न्यादि देव व देवतांपासून विषय उत्पन्न होतात. मरणावस्था हीच त्याच्या प्राणत्वाची प्रसिद्धि व हेंच प्रमाण आहे. जेव्हां हा पुरुष जरा-व्याधि इत्यादि निमित्तांनीं व्याकुल होऊन आसन्नमरण होतो, अतिशय दुर्बल, मोहित होतो, तेव्हां त्याच्याजवळ बसलेले आप्त वगैरे 'याच्या मनानें उत्क्रमण केलें, हा पहात नाहीं, बोलत नाहीं, प्राणांतच एकरूप झाला आहे,' असें म्हणतात. त्यावेळीं त्याचीं वागादि सर्व इंद्रियें आपापल्या नामादि विषयांसह प्राणांतच लीन होतात व तो जेव्हां दुसऱ्या शरीरांत जागा होतो तेव्हां पूर्वोक्त अग्नि-विस्फुलिंगन्यायानें या आत्म्यापासूनच वागादि सर्व प्राण, प्राणांपासून अग्न्यादि देव व देवांपासून सर्व विषय उद्भवतात. शरीरांतून जाण्याच्या वेळीं वागादि इंद्रियें आपल्या विषयांपासून निवृत्त होऊन स्वामीला भोग देत नाहींत. प्रज्ञात्मा प्राण सर्व इंद्रियांसह त्यांच्या विषयांस व्यापतो.

प्राणच प्रज्ञा व प्रज्ञाच प्राण आहे. तीं दोन्ही एकाच वेळीं शरीरांत राहतात व एकाच वेळीं शरीर सोडून जातात. ''

याप्रमाणें प्राणाचें सर्वात्मत्व सांगून त्या प्रज्ञात्म्यांत सर्व भूतें प्राणाप्रमाणेंच एकरूप कशीं होतात त्याचें व्याख्यान केलें आहे. वाक् हें त्या प्रज्ञेचें एक अंग असून म्ह० तिनें प्रज्ञेचा एक अंश स्वाधीन करून घेऊन नाम—वक्तव्य हीच बाह्य भूतमात्रा निर्माण केली. त्याचप्रमाणें घ्राणेंद्रिय, चक्षु, श्रोत्र, जिह्वा, हात, शरीर, पाद इत्यादि सर्व इंद्रियें व प्रज्ञा हीं मुख्य प्रज्ञेचीं अंगें असून क्रमानें गंध, रूप, शब्द, अन्नरस, कर्म, सुखदुःख, आनंदादि, गति व बुद्धि-काम वगैरे या त्यांच्या विषयत्वानें निर्माण केलेल्या भूतमात्रा आहेत. असा प्रज्ञेचा विभाग झाला आहे. पण प्रज्ञेवांचून नुस्त्या इंद्रियाला आपापला विषय जाणतां येत नाहीं. यास्तव सर्व इंद्रियें व विषय प्रज्ञारूप आहेत. प्रज्ञा सर्व इंद्रियांशीं तादात्म्य पावून त्यांच्या विषयांना व्यापते. यास्तव प्रज्ञा वस्तुतः एकरूपच आहे. तिचा वागादि विभाग खरा—तात्त्विक नव्हे नुस्तें प्रज्ञारहित इंद्रिय विषयाला जाणत नाहीं. म्हणून लोक नेहमीं 'माझें मन—अंतःकरणसाक्षिप्रज्ञा दुसऱ्या विषयांत आसक्त होती, त्यामुळें मी शब्द-स्पर्शादि जाणला नाहीं,' असें सांगतात. फार काय, पण बुद्धिवृत्तिहि या नित्य प्रज्ञे-वांचून सिद्ध होत नाहीं व आपल्या ज्ञातव्य विषयाला जाणत नाहीं. अर्थात् बाह्य विषयांचें ज्ञान इंद्रियांवांचून जरी होत नसलें तरी प्रज्ञाच सर्व ज्ञानांचा आधार—अधिष्ठान आहे. तिच्यावरच सर्व विषयज्ञानें आरोपित आहेत. यास्तव त्या प्रज्ञेचीच उपासना करावी. दुसऱ्या कशाचीहि उपासना करूं नये. कारण प्रज्ञाच आत्मा असून इतर—तिच्या विषयभूत असें सर्व अनात्मा आहे. शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध इत्यादिकांची उपासना करूं नये; तर वक्ता, श्रोता, मंता, रस चाखणारा, सुखदुःखांचा अनुभव घेणारा, विज्ञानात्मा जो आत्मा—प्रज्ञा त्यालाच जाणावें—त्याची उपासना करावी.

या दहा भूतमात्रा—विषय व दहा प्रज्ञामात्रा—इंद्रियें परस्पर सापेक्ष आहेत. कारण इंद्रियांच्या अभावीं विषय नाहींत व विषयांच्या अभावीं इंद्रियें नाहींत, आणि चक्राप्रमाणें असलेल्या या विषयेन्द्रियांपासूनच सर्व अनर्थ प्रवृत्त होतात. तथापि तात्त्विकदृष्ट्या तीं सर्व प्रज्ञाच आहेत, वस्तुतः भिन्न नाहींत. कारण रथ-

चक्राच्या नाभींत अर व अरांवर पायट्यांसह धांव जशी बसविलेली असते त्याप्रमाणें आधारभूत प्रज्ञेंत प्रज्ञामात्रा व प्रज्ञामात्रांत या भूतमात्रा अवस्थित आहेत. यास्तव हा प्राणोपाधि प्रज्ञात्माच आनंद, अजर, अमृत आहे. तो पुण्यकर्मानें वृद्धि पावत नाहीं व पापकर्मानें क्षय पावत नाहीं. तोच पुण्यवानांकडून त्यांचा उद्धार करण्यासाठीं पुण्य करवितो व पाप्यांकडून त्यांना अधोगतीला पोंचविण्यासाठीं पाप करवितो. तोच लोकपाल, लोकाधिपति, सर्वेश्वर आहे, 'तोच माझा आत्मा आहे,' असें प्रत्येक मुमुक्षूनें साक्षात् जाणावें. (३).

तिसऱ्या अध्यायांत प्रायः प्राणोपाधिक आत्मा सांगितला. त्यावरून चैतन्यविशिष्ट प्राणच आनंदात्मा आहे, असा भ्रम होण्याचा संभव आहे. यास्तव सुषुप्तावस्थेतील बाह्य चैतन्यशून्य प्राणाहून भिन्न चेतन आनंदात्मा आहे, हें चवथ्या अध्यायांत आख्यायिकारूपानें सांगितलें आहे. गार्ग्य बालाकि व काशिराज अजातशत्रु यांचा संवादच त्या आख्यायिकेंत वर्णिला आहे. पण तो संवाद पूर्वी बृहदारण्यकाच्या दुसऱ्या अध्यायांत—पृ.५७७—प्रायः असाच-फारच थोड्या फरकानें सविस्तर येऊन गेला असल्यामुळें येथें त्याची पुनरुक्ति करीत नाहीं. गार्ग्यानें 'मी तुला ब्रह्म सांगतों' अशी प्रतिज्ञा करून क्रमानें आदित्य, चंद्र, विद्युत्, मेघ, आकाश, वायु, अग्नि, जल, आरसा, प्रतिश्रवण व ध्वनिरूप शब्द, यांतील पुरुष, छायापुरुष, शारीर पुरुष, स्वप्नद्रष्टा प्राज्ञ पुरुष, दक्षिणनेत्रांतील व वाम नेत्रांतील पुरुष, यांचें मी ब्रह्मदृष्ट्या उपासन करितों असें सांगितलें. पण ब्रह्मज्ञ अजातशत्रूनें त्यांच्या ब्रह्मत्वाचा निषेध करून ते सर्व त्या मुख्य ब्रह्माचे एकदेश आहेत, असें म्हटलें. तेव्हां गार्ग्य कुंठित झाला. मुख्य ब्रह्मज्ञानासाठीं तो राजाला उपसन्न झाला. शिष्यभावानें शरण गेला. पण क्षत्रिय राजानें त्या पूज्य ब्राह्मणाचा शिष्यत्वानें अंगीकार न करितां त्याला युक्तीनें ब्रह्मबोध केला. सुषुप्तीतील विज्ञानरहित प्राण आनंदात्मा नसून त्या अवस्थेचा साक्षी आत्मा आहे, हें त्याच्या प्रत्ययास आणून देण्यासाठीं बृहदारण्यकांत सांगितल्या प्रमाणेंच तो गार्ग्याला घेऊन एका निजलेल्या पुरुषापाशीं गेला व प्राणाच्या नांवांनीं हाका मारूं लागला. पण तो जागा झाला नाहीं. म्हणून त्यानें आपल्या हातांतील काठीनें त्याच्या अंगावर प्रहार केला. त्याबरोबर तो जागा झाला. तेव्हां राजा म्हणाला—'बालाके, हा प्राणाहून अगदीं भिन्न असलेला पुरुष कोठें

निजला होता व आतां कोठून आला आहे ?' पण बालाकीला कांहीं सांगतां आलें नाहीं. म्हणून राजाच त्याला म्हणाला—" हृदयापासून शरीरभर पसरलेल्या सहस्रावधि अति सूक्ष्म नाड्या हा त्याचा शयनस्थानीं जाण्याचा मार्ग असून त्यांतच तो स्वप्न पाहतो. हृदयाकाशांतील आनंदात्मा हें याचें शयनस्थान आहे. त्यांत एकरूप होऊन तो शयन करितो. त्यावेळीं सर्व इंद्रियें आपापल्या विषयांसह त्यांत लीन होतात व त्या आनंदात्म्यापासूनच जागरावस्थेंत तो येतो. त्यावेळीं अग्निविस्फुलिंगन्यायानें त्याच्यापासून इंद्रियें, इंद्रियांपासून अग्न्यादि देव व देवांपासून विषय उत्पन्न होतात. क्षुरधानांत—धोकटींत एका विशिष्ट स्थानीं तीक्ष्ण वस्तरा जसा ठेवलेला असतो तसा हा शरीराच्या एकदेशांत—हृदयांत उपलब्ध होतो. किंवा काष्ठांत जसा अग्नि तसा हा नखशिखान्त सर्व शरीरांत उपलब्ध होतो. एखाद्या कुटुंबीला त्याचे संबंधी जन जसे अनुसरतात त्याप्रमाणें या आनंदात्म्याला वागादि सर्व अनुसरतात. त्याच्या बरोबरच सुखानुभव घेतात. इंद्र जोंवर या आत्म्याला साक्षात् जाणत नव्हता तोंवरच असुर त्याचा पराभव करण्यास समर्थ होते. पण छांदोग्याच्या आठव्या अध्यायांत वर्णन केल्याप्रमाणें त्यानें मोठ्या प्रयत्नानें आत्म्याला जाणल्यावर तो असुरांना जिंकून सर्वश्रेष्ठ झाला. जो दुसराहि कोणी या आत्म्याला जाणतो तोहि इंद्राप्रमाणेंच सर्वश्रेष्ठ होतो." याप्रमाणें आत्मज्ञानाचें फल—मुक्ति सांगून हा अध्याय व हें अतिशय सुंदर उपनिषद् संपविलें आहे. याचें महत्त्व वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखें असल्यामुळें आम्ही अधिक विस्तार करीत नाहीं. इतर उपनिषदांप्रमाणेंच या उपनिषदांतील वाक्यांचाहि ब्रह्ममीमांसेंत बऱ्याच अधिकरणांत विचार केला आहे. उदाहरणार्थ सु. ब्र. पृ. ४०,११९,१५८,२१४,२१६,२२४,२६० २९४,३००,३३४,३४०,४७८,५०५ पहा.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील
कौषीतकिब्राह्मणोपनिषद् सिंहावलोकनासह समाप्त झालें

अथ श्वेताश्वतरोपनिषत्

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह.]

प्रथमोऽध्यायः ।

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः० ।
सह नाववतु सह नौ भुनक्तु० ॥ इति शान्तिः ॥

या तिन्ही शान्तींचा अर्थ क्रमानें पृ. १, ११, ९१, वर पहा.

ॐ ब्रह्मवादिनो वदन्ति । किं कारणं ब्रह्म कुतः स्म जाता जिवाम केन क्व च संप्रतिष्ठाः । अधिष्ठिताः केन सुखेतरेषु वर्तामहे ब्रह्मविदो व्यवस्थाम् ॥ १

अन्वयार्थ—[ब्रह्मवादिनः—] सर्व ब्रह्मवदनशील विद्वान्—वेदवेत्ते [वदन्ति—] बोलूं लागले—विचार करूं लागले. [किं कारणं ब्रह्म—] कारण ब्रह्माचें स्वरूप काय आहे ? किंवा या जगाचें कारण ब्रह्म आहे कीं पुढें सांगितलेले काल, स्वभाव इत्यादि त्याचें आणखीं कांहीं कारण आहे ? किंवा ब्रह्म उपादान कारण आहे कीं उपादान व निमित्त कारण आहे ? किंवा ब्रह्म कारण आहे कीं तें अकारण आहे? जर तें कारण असेल तर कोणतें कारण ? निमित्त कीं उपादान ? कीं उभयरूप ? व त्याचें लक्षण काय ? [वयं कुतः स्म जाताः—] कार्य-करणवान् असलेले आम्ही कोणत्या कारणापासून उत्पन्न झालों कारण जीवांची स्वरूपतः उत्पत्ति वगैरे संभवत नाही. [केन जीवामः—] कोणाकडून उत्पन्न केले गेलेले आम्ही जिवंत राहतों, आमची स्थिति कशी होते ? [क्व च संप्रतिष्ठाः—] आमची संप्रतिष्ठा कोठें होते ? प्रलयकालीं आम्ही कोठें स्थित होतों? [हे ब्रह्मविदः केन अधिष्ठिताः सुखेतरेषु व्यवस्थां वर्तामहे—] हे ब्रह्मवेत्त्यांनो,

कोणाकडून नियमित झालेले आम्ही सुख-दुःखांतील व्यवस्थेचें अनुवर्तन करितों? आमची सृष्टि-स्थिति-प्रलय व नियमन यांचें निमित्त काय आहे, असा या सर्व प्रश्नांचा संक्षिप्त अर्थ आहे. १—आतां श्रुति ब्रह्मकारणवादाच्या प्रतिपक्षभूत असलेल्या कालादिकांचा निर्देश करिते—

कालः स्वभावो नियतिर्यदृच्छा भूतानि योनिः पुरुष इति चिन्त्यम्।
संयोग एषां न त्वात्मभावादात्माऽप्यनीशः सुखदुःखहेतोः ॥ २

अन्वयार्थ—[कालः योनिः स्यात्—] काल कारण आहे. काल म्ह० सर्व भूतांच्या विपरिणामाचें निमित्त. [स्वभावः—] स्वभाव म्ह० प्रत्येक पदार्थाची प्रतिनियत शक्ति, जसें अग्नीचें उष्णत्व, जलाचें द्रवत्व, अशा प्रकारचा स्वभाव हें कारण आहे. [नियतिः—] नियति म्ह० अविषम पुण्यपापरूप कर्म, तें कारण आहे. [यदृच्छा—] कोणत्याहि कारणावांचून प्राप्ति होणें. जगत् कारणावांचूनच उत्पन्न झालें आहे [भूतानि—] भूतें—आकाशादि भूतें हेंच जगाचें कारण आहे कीं [योनिः—] प्रकृति जगत्कारण आहे, कीं [पुरुषः—] पुरुष—विज्ञानात्मा कारण आहे ? [इति चिन्त्यं—] यांचें निरूपण—विचार करणें उचित आहे. या मंत्रांतील ' योनिः ' हा शब्द ' कारण ' या अर्थी मानून त्याचा काल, स्वभाव, नियति, यदृच्छा, भूतें व पुरुष यांच्याशीं अन्वय करावा किंवा ' योनिः ' म्ह० ' प्रकृति ' हा अर्थ स्वीकारून मागच्या ' किं कारणं ' येथील ' कारण-' शब्दाची अनुवृत्ति करून त्याचा कालादिकाशीं अन्वय लावावा. श्रुति उत्तरार्धानें त्यांतील कालादिकांचें अकारणत्व दाखविते—कालादिकांतील प्रत्येक कारण आहे कीं त्यांचा समूह ? त्यांतील प्रत्येकाला कारणत्व संभवत नाहीं. कारण तसा अनुभव येत नाहीं. तर देश, काल व निमित्त यांचा समुदायच कार्याचें कारण आहे, असा अनुभव येतो. [एषां च संयोगः न—] या कालादिकांचा समूहहि कारण नव्हे. कारण कोणताहि समूह परार्थ—दुसऱ्यासाठीं असतो. म्हणजे त्याला अंगत्व असतें. [तु आत्मभावात्—] शेषी—अंगी आत्मा विद्यमान आहे. त्यामुळें शेषभूत कालादिकांच्या समूहाला स्वातंत्र्य नाहीं. त्याला स्वातंत्र्य नसल्यामुळें तो सृष्टि, स्थिति, प्रलय व नियमन एतद्रूप कार्य करण्यास समर्थ नाहीं. ' तर मग आत्मा कारण असेल ' असें कोणी म्हणेल म्हणून श्रुति सांगते. [आत्मा अपि अनीशः—] जीवाख्य आत्माहि अस्वतंत्र आहे. स्वतंत्र

नसल्यामुळेंच तोहि सृष्ट्यादिकांचें कारण होऊं शकत नाहीं. पण तो अनीश—अस्वतंत्र कसा तें श्रुति सांगते—[सुखदुःखहेतोः—] सुख दुःखाला कारण होणारें पुण्य-पाप विद्यमान असल्यामुळें तो कर्मपरवश असतो. त्यामुळें त्याला स्वातंत्र्य नाहीं. स्वातंत्र्याच्या अभावीं त्याला त्रैलोक्याची सृष्टि, स्थिति व नियमन, यांचें सामर्थ्य नसतें. २.—याप्रमाणें इतर पक्षांचें निराकरण करून कोणत्याहि प्रमाणाचा विषय न होणाऱ्या आत्म वस्तूविषयीं दुसरा प्रकारच संभवत नसल्यामुळें त्या ऋषींनीं ध्यानयोगानें त्या परम मूल कारणाला स्वतःच जाणलें असें श्रुति सांगते—

ते ध्यानयोगानुगता अपश्यन्देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम् । यः कारणानि निखिलानि तानि कालात्मयुक्तान्यधितिष्ठत्येकः ३

अन्वयार्थ—[ध्यानयोगानुगताः ते—] ध्यान—चित्ताचें ऐकाग्र्य, हाच योग म्ह० ध्यातव्य वस्तूच्या स्वीकाराचा उपाय, त्याला अनुगत झालेले म्ह० त्या उपायाला अनुसरलेले—ध्यानयोगानें समाहित—शांतचित्त झालेले ते ऋषि [देवात्मशक्तिं—] देवाच्या आत्मशक्तीला [अपश्यन्—] पहाते झाले. (पहिल्या मंत्रांत असे प्रश्न उत्थापित केले होते—ब्रह्म कारण आहे कीं कालादिक कारण आहेत ? ब्रह्म कारण आहे कीं तें कार्यकारणविलक्षण आहे ? तें कारण आहे कीं अकारण आहे ? त्याला कारणत्व जर असेल तर तें कारण कोणतें ? उपादान कीं निमित्त ? त्या उभय कारणरूप ब्रह्माचें लक्षण काय ? ब्रह्म अकारण असेल तर त्या अकारण ब्रह्माचें लक्षण काय ? या प्रश्नांचा परिहार असा—ब्रह्म कारण नाहीं व अकारणहि नाहीं. तें कार्य-कारणोभयरूप नाहीं व अनुभयरूपहि नाहीं. तें निमित्त नाहीं, उपादान नाहीं व निमित्तोपादानहि नाहीं. याचा सारांश असा—अद्वितीय ब्रह्माला—परमात्म्याला स्वरूपतःच कारणत्व-उपादानत्व किंवा निमित्तत्व संभवत नाहीं. उपाधीमुळें त्याच्या ठिकाणीं तें सर्व संभवतें. अर्थात् ज्या उपाधीनें युक्त अशा परमात्म्याचें कारणत्वादि संभवतें ती उपाधिच त्याहून पृथक् करून दाखवितात—[देवात्मशक्तिं—] प्रकाशयुक्त देवाची—मायावी महेश्वराची आत्मभूत—अस्वतंत्र—त्याच्या अधीन असलेली जी शक्ति म्ह० सांख्यशास्त्रकारांनीं कल्पिलेल्या प्रधानादिकांप्रमाणें पुरुषाहून पृथक्—स्वतंत्र शक्ति नव्हे, तर परमात्मपराधीन असलेली जी शक्ति ती जगाचें कारण आहे असें पाहते झाले,

याच उपनिषदांत ' मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरं ' असें पुढें प्रमाणभूत वाक्य आहे. ब्रह्म पुराणांत ' एषा चतुर्विंशतिभेदभिन्ना माया परा प्रकृतिस्तत्समुत्था '—ही सांख्यपरिकल्पित चोवीस भेदांहून अगदीं भिन्न असलेली माया परा प्रकृति आहे, ती परमात्म्याच्या सत्तेनें सत्तायुक्त झाली आहे, असें म्हटलें आहे. श्रीगीतेंतहि—' मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरं'—सु.गी.९.१०. पृ. १७९ पहा.— असें वचन आहे. त्या देवात्मशक्तीचें विशेषण—[स्वगुणैः निगूढां—] प्रकृतिकार्यभूत पृथिव्यादिकांच्या योगानें अत्यंत गूढ—आच्छादित झालेली अशा त्या प्रकृतीला त्यांनी पाहिलें. कार्याच्या आकारानें कारणाचा आकार झांकून जातो. त्यामुळें तें कार्याहून पृथक् उपलब्ध होत नाहीं. ' सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः '—सु. गी. १४. ५. पृ. २६६.—असें गुणांचें प्रकृतिकार्यत्व व्यासांनीं सांगितलें आहे. किंवा ' स्वगुणैः ' म्ह० ईश्वराच्या सर्वज्ञत्वादि गुणांनीं ' निगूढां '—कार्यकारणशून्य पूर्णानंद अद्वितीय ब्रह्मरूपानेंच उपलब्ध होणाऱ्या शक्तीला त्यांनीं पाहिलें. 'अहोपण, ज्याची ही अशी विश्वजननी शक्ति मानतां तो देव कोण?' [यः एकः तानि कालात्मयुक्तानि निखिलानि कारणानि अधितिष्ठति—] जो एक—अद्वितीय परमात्मा पूर्वोक्त काल व पुरुष यांनीं युक्त अशा सर्व कारणांचें नियमन करितो त्याची शक्ति कारण आहे, असें त्यांनीं पाहिलें. स्वभावादिकांना कारणत्व नसून अज्ञानालाच कारणत्व आहे. याचा विस्तार पुढें श्रुति करणार आहे.३—आतां त्या सर्वात्म्याचें ब्रह्मचक्ररूपानें वर्णन—

तमेकनेमिं त्रिवृतं षोडशान्तं शतार्धारं विंशतिप्रत्यराभिः ।
अष्टकैः षड्भिर्विश्वरूपैकपाशं त्रिमार्गभेदं द्विनिमित्तैकमोहम् ॥ ४

अन्वयार्थ—[तं—] जो एक परमात्मा सर्व कारणांचें नियमन करितो त्या [एकनेमिं—] एकनेमीला—योनि, कारण, अव्याकृत, आकाश, परम व्योम, माया, प्रकृति, शक्ति, तम, अविद्या, छाया, अज्ञान, अनृत, अव्यक्त इत्यादि शब्दांनीं बोलली जाणारी जी एक कारणावस्था ती चक्राच्या नेमीप्रमाणें ज्या अद्वितीय अधिष्ठात्या परमात्म्याची नेमि—सर्वाधार आहे त्या एकनेमीला [त्रिवृतं—] सत्त्व, रज व तम या तीन प्रकृतिगुणांनीं वृत—आच्छादित—युक्त अशा [षोडशान्तं—] पंचभूतें व अकरा इंद्रियें हा ज्या ईश्वराचा अन्त—अवसान—विस्तार—

समाप्ति आहे त्या षोडशान्ताला किंवा प्रश्नोपनिषदांत सांगितलेल्या प्राणादि सोळा कला हा ज्याचा अन्त आहे अशा [शतार्धारं–] सांख्यशास्त्रांत सांगितलेले पन्नास विपर्यय-अशक्ति-तुष्टि-सिद्धिसंज्ञक प्रत्ययभेद ज्याचे अर आहेत, त्या शतार्ध-अराला [विंशतिप्रत्याभिः–] दहा इंद्रियें व त्यांचे दहा विषय या प्रत्ययांनीं युक्त अशा [षड्भिः अष्टकैः–] भूम्यादि प्रकृति-अष्टक, त्वक्-चर्म-मांस-रुधिर-मेद-अस्थि-मज्जा-शुक्र, हें धातु-अष्टक, अणिमादि-ऐश्वर्याष्टक, धर्म-ज्ञान-वैराग्य-ऐश्वर्य-अधर्म-अज्ञान-अवैराग्य-अनैश्वर्याख्य भावाष्टक, ब्रह्म-प्रजापति-देव-गंधर्व-यक्ष-राक्षस-पितृ-पिशाच हें देवाष्टक, व भूतदया, शांति, अनसूया, शौच, अनायास, मंगल, अकार्पण्य, अस्पृहा, ह आत्मगुणाष्टक, अशा सहा अष्टकांनीं युक्त [विश्वरूपैकपाशं–] ज्याचा स्वर्ग-पुत्रादि विषयभेदांनीं नानारूप कामाख्य एक पाश आहे त्या विश्वरूपैकपाशाला [त्रिमार्गभेदं–] धर्ममार्ग, अधर्ममार्ग व ज्ञानमार्ग असे ज्याचे तीन मार्गभेद आहेत त्या त्रिमार्गभेदाला व [द्विनिमित्तैकमोहं–] पुण्य व पाप या दोन कारणांनीं होणारा जो मोह म्ह० देह, इंद्रियें, मन, बुद्धि, जाति, इत्यादि अनात्म्यामध्यें आत्माभिमान त्या द्विनिमित्त-एक मोहाला, अर्थात् एकनेमि इत्यादि विशेषणांनीं विशिष्ट अशा ईश्वराला ते ऋषि पहाते झाले, अशी मागच्या ' अपश्यन् ' या क्रियापदाची येथें अनुवृत्ति करावी किंवा पुढच्या ' अधीमः '–आम्ही अध्ययन–स्मरण करितों, या क्रियापदाशीं याचा अन्वय लावावा. ४.–याप्रमाणें चक्ररूपानें ईश्वराचें वर्णन करून आतां नदीरूपानें संसाराचें वर्णन करितात––

पञ्चस्रोतोम्बुं पञ्चयोन्युग्रवक्रां पञ्चप्राणोर्मिं पञ्चबुद्ध्यादि-
मूलाम् । पञ्चावर्तां पञ्चदुःखौघवेगां पञ्चाशद्भेदां पञ्चपर्वामधीमः॥५

अन्वयार्थ––[पंचस्रोतोंबुं–] चक्षुरादि पंचज्ञानेंद्रियें हेंच ज्या नदींतील जल आहे, [पंचयोनि-उग्रवक्रां–] कारणरूप पंचमहाभूतांनीं जी नदी वक्र व उग्र झाली आहे, [पंचप्राणोर्मिं–] पंचप्राण किंवा पंचकर्मेंद्रियें याच जिच्यांतील ऊर्मि आहेत, [पंचबुद्ध्यादिमूलां–] चक्षुरादिजन्य पंचज्ञानांचें कारण मन–अन्तःकरण आहे, सर्व ज्ञानें मनोवृत्तिरूप असल्यामुळें तें मन हेंच या संसारनदीचें मूळ आहे. [पंचावर्तां–] शब्दादि पांच विषय हेच जिच्यांतील आवर्त–भोंवरे आहेत, त्या विषयरूप आवर्तांत प्राणी निमग्न होतात, [पंचदुःखौघवेगां–] गर्भदुःख,

जन्मदुःख, जरादुःख, व्याधिदुःख व मरणदुःख हीं पाच दुःखें हाच ज्या संसारनदींतील ओघवेग आहे, [पंचाशद्भेदां–] पांच इंद्रियछिद्रें, पांच ज्ञानेंद्रियें, पांच महाभूतें, पांच असुरवृत्तिप्रधान इंद्रियें, पांच वक्रगमनें–असुरविषयग्रहणें, पांच प्राण, पांच शब्दादिविषयभेद, पांच विषयसंबंधी इच्छाभेद, पांच दुःखें व पांच सुखें अशा पन्नास भेदांनीं किंवा वर ' शतार्धारं ' येथें सांगितलेल्या पन्नास भेदांनीं ती युक्त आहे. [पंचपर्वां–] अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश, हे पांच क्लेश हींच जिच्यांतील पंच पर्वें–विभाग आहेत अशा संसारनदीचें आम्ही[अधीमः–]चिंतन–अधिक स्मरण करितों.५.–अविद्यायुक्त ब्रह्माचें संसारचक्ररूपत्व सांगितलें. आतां आपल्या कार्यासह ती अविद्या हाच जीवाचा बंध व ब्रह्मज्ञान हें त्याच्या मोक्षाचें साधन आहे असें श्रुति सांगते–

सर्वाजीवे सर्वसंस्थे बृहन्ते तस्मिन्हंसो भ्राम्यते ब्रह्मचक्रे ।
पृथगात्मानं प्रेरितारं च मत्वा जुष्टस्ततस्तेनामृतत्वमेति ॥६

अन्वयार्थ—[सर्वाजीवे–] सर्व प्रकारें जें जीवन तो आजीव, ज्यांत सर्वांचा आजीव–समंतात् जीवन होतें तें सर्वाजीव होय, त्यांत [सर्वसंस्थे–] सर्वांची संस्था म्ह० मरण किंवा स्थिति ज्यामध्यें होते तें सर्वसंस्थ, त्यांत [बृहन्ते–] अतिशय मोठ्या–वृद्धियुक्त [तस्मिन् ब्रह्मचक्रे–] अशा तीन विशेषणांनीं युक्त असलेल्या त्या ब्रह्मचक्रामध्यें–चिदानंदैकरस ब्रह्माच्या अज्ञानविलासरूप संसारचक्रांत–ब्रह्म याच चक्रावर [हंसः–] संसारचक्रांत जो जाणे तो हंस म्ह० जीव [भ्राम्यते–] धर्माधर्मकुलालाकडून–धर्म व अधर्म याच कुंभाराकडून अविद्या, काम, वासना इत्यादिरूप दंडानें भ्रमण करविला जातो. हाच बंध व बंधकारण आहे. आतां श्रुति मोक्षोपयोगी ब्रह्मज्ञान सांगते–[पृथक्–] सोपाधिकसंसारचक्राहून अन्यरूप अशा [आत्मानं च–] सर्वांहून अत्यंत प्रिय अशा प्रत्यग्भूत आत्म्यालाच [प्रेरितारं मत्वा–] सकारण संसारचक्राचा प्रवर्तक मानून –आत्माच प्रेरक ईश्वर आहे, असें मानून–मननादि उपायांनीं साक्षात् पाहून (आतां श्रुति मोक्ष सांगते–) [ततः–] त्या साक्षात्कारामुळें [तेन–] ईश्वराकडून [जुष्टः–] स्वरूपाच्या अभेदानें परम प्रीतीला प्राप्त केला गेलेला जीव [अमृतत्वं एति–] अविद्यालेशशून्य स्वयंप्रकाश परमानंदरूपास प्राप्त होतो. ६.

—ज्याच्याकडून परमप्रीतीला प्राप्त केलेला जीव अमृतत्वास प्राप्त होतो तेंच निरुपचरित ब्रह्म आहे, असें ही श्रुति सांगते—

उद्गीतमेतत्परमं तु ब्रह्म तस्मिंस्त्रयं स्वप्रतिष्ठाऽक्षरं च। अत्रान्तरं ब्रह्मविदो विदित्वा लीना ब्रह्मणि तत्परा योनिमुक्ताः ॥ ७

अन्वयार्थ—[उद्गीतं—] सर्व वेदांमध्यें अधिकत्वानें कथन केलेलें असें [एतत्—] हें सोपाधिक रूपाचें प्रीतिजनक [परमं तु ब्रह्म—] जें उत्कृष्ट ब्रह्म —देश-काल-वस्तुपरिच्छेदशून्य तत्त्व [तस्मिन्—] त्या परम ब्रह्मामध्यें अविद्या-दर्शेत [त्रयं—] लोहित-शुक्ल-कृष्णरूप किंवा जगाचें जन्म-स्थिति-नाशरूप, केवल एवढेंच नव्हे तर [स्वप्रतिष्ठा—] जिची आत्म्यामध्यें आश्रयत्वानें व विषयत्वानें प्रतिष्ठा आहे ती अविद्या स्वप्रतिष्ठा [अक्षरं च—] व अक्षर म्ह० ब्रह्मैक्य-ज्ञानावांचून ज्याचा विनाश होत नाहीं म्हणून अक्षर; त्रय, स्वप्रतिष्ठा व अक्षरहि त्यांत आहे, हें सुचविण्यासाठी 'च-'कार आहे. [अत्र—] या अक्षराधार ब्रह्मामध्यें—जगत्कारणामध्यें [अन्तरं—] जीवात यांशीं तादात्म्य पावलेल्या चिदानंदरसाचा भेद [ब्रह्मविदः—] वेदार्थज्ञानवान्—श्रवणादिमान् [विदित्वा—] ब्रह्मसाक्षात्कारानें जाणून [ब्रह्मणि लीनाः—] देश-काल वस्तुपरिच्छेदशून्य ब्रह्मामध्यें लीन होत्साते (ब्रह्मांतील लयाचा उपाय—) [तत्पराः—] ब्रह्मैकचित्त—केवल ब्रह्मामध्यें ज्यांचें चित्त आहे ' आम्हीच ब्रह्म ' असे निरंतर ज्ञानवान् (आतां लयाचा प्रकार सांगतात—) [योनिमुक्ताः—] ब्रह्मवेत्त्यांनीं पाहिलेली जी आत्मशक्ति—अविद्यायोनि तिच्यापासून मुक्त झालेले—तिच्या लेशानेंहि सर्वथा रहित झालेले असे होतात. (सर्व वेदांमध्यें ज्याचें वर्णन केलें आहे असें जें निरतिशय प्रीतीचा विषय परब्रह्म त्याच्यामध्यें अविद्या व तिचें कार्य सुप्रतिष्ठित आहे. वेदार्थवेत्ते ब्रह्मसाक्षात्कारानें त्याला जाणून मुंजातृणापासून जशी ईषीका त्याप्रमाणें जीव-पराविवेक करून केवल ब्रह्मपर होणें या उपायानें ब्रह्मामध्यें लीन होतात. ते अविद्या व अविद्याकार्य यांपासून सर्वथा मुक्त होतात.) ७.—ब्रह्म अद्वितीय आहे, असें मानल्यास जीव व ईश्वर यांचाहि विभाग संभवत नाहीं. त्यामुळें जीवांची ब्रह्मैकपर लयश्रुति अनुपपन्न होते, अशी आशंका घेऊन व्यवहारदर्शेत जीवेश्वरांचा औपाधिकभेद दाखवून श्रुति त्याच्या विज्ञानानें अमृतत्व सांगते—

संयुक्तमेतत्क्षरमक्षरं च व्यक्ताव्यक्तं भरते विश्वमीशः । अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृभावाज्ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ ८

अन्वयार्थ—[व्यक्ताव्यक्तं—] व्यक्त—विकारजात अव्यक्त—कारण तें दोन्ही [क्षरं अक्षरं च—] क्षर व अक्षर आहे. व्यक्त क्षर—विनाशी आहे व अव्यक्त अक्षर—अविनाशी आहे. [एतत् संयुक्तं विश्वं—] या परस्परसंयुक्त जगाचें [ईशः—] ईश्वर [भरते—] धारण करितो.—सु. गी.१५.१६-१७पृ.२८५-८६ पहा.—ईश्वर केवल त्या व्यक्ताव्यक्ताचें धारण करितो इतकेंच नाहीं तर—[अनीशः च आत्मा भोक्तृभावात् बध्यते—] तो आत्मा अनीश्वर होऊन अविद्या व अविद्याकार्यभूत देहेंद्रियें, यांनी भोक्ता या स्वरूपानें बद्ध होतो. याचा भावार्थ असा—परस्परसंयुक्त व्यष्टि-समष्टिरूप ईश्वर आहे. त्याचा व्यष्टिभूत देहेंद्रियात्मक अनीश जीव आहे. याप्रमाणें समष्टि-व्यष्टिरूपानें जीव व पर यांचा औपाधिक भेद विद्यमान असल्यामुळें जीव ईश्वरोपाधीची उपासना करून तिच्याद्वारा निरुपाधिक ईश्वराला जाणून मुक्त होतो. त्यामुळें जीवब्रह्मैक्यवादामध्यें अनुपपन्न असें कांहीं नाही जीवेश्वरांचा औपाधिक भेद अनेक श्रुति-स्मृति-पुराणांवरून सिद्ध होतो. असो; [देवं ज्ञात्वा सर्वपाशैः मुच्यते—] देवाला—स्वप्रकाश आत्म्याला साक्षात् जाणून जीव सर्वपाशांपासून मुक्त होतो ८.—जीव व ईश्वर यांचें आणखी वैलक्षण्य—

ज्ञाज्ञौ द्वावजावीशनीशावजा ह्येका भोक्तृभोग्यार्थयुक्ता ।
अनन्तश्चात्मा विश्वरूपो ह्यकर्ता त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत् ॥ ९

अन्वयार्थ—ईश्वर व्यक्ताव्यक्ताचें धारण करितो व अनीश होऊन बद्ध होतो, इतकेंच नव्हे तर [ज्ञाज्ञौ ईशनिशौ द्वौ अजौ—] ज्ञ—ईश्वर व अज्ञ—जीव हे दोघे अज—ज-मादिरहित आहेत. कारण अविकृत ब्रह्मच जीवेश्वररूपानें अवस्थित आहे. 'ईशनीशौ' या जागीं 'ईशानीशौ' असें रूप पाहिजे. पण 'ईशनीशौ' हा छांदस प्रयोग आहे. पण अद्वैतवादामध्यें अशा अत्यंत विलक्षणस्वभावाच्या जीवेश्वरांची किंवा प्रपंचाचीहि सिद्धि होऊं शकत नाहीं, अशी आशंका घेऊन सांगतात—[हि एका अजा भोक्तृभोग्यार्थयुक्ता—] कारण अजा—उत्पन्न न होणारी—अनादि प्रकृति, जिला श्रुति-स्मृति-पुराणांत माया असें म्हटलें आहे, अशी विश्वजननी एक व स्वविकारभूत भोक्त्यांच्या

विषय-भोगासाठीं प्रवृत्त होणारी देवात्मशक्ति ईश्वराच्या जवळ राहते. त्यामुळें तोहि मायावान् महेश्वर मायोपाधीच्या सांनिध्यामुळें कार्यरूप देहादिकांनीं देहादिमान् असल्यासारखा, त्यांच्या विभागांनीं विभागवान् असल्यासारखा होऊन ईश्वरादिरूपानें अवस्थित होतो. त्यामुळें परमात्मा एक आहे, असें जरी मानलें तरी जीव-ईश्वर इत्यादि सर्व लौकिक-वैदिक भेदव्यवहार सिद्ध होतो, आणि अनिर्वाच्यत्वामुळें माया परमार्थवस्तु नसल्याकारणानें द्वैतवादाचीहि प्राप्ति होत नाहीं. ज्याअर्थीं ती अजाच भोक्त्रादिरूप आहे त्याअर्थीं तिनें स्वीकार केलेल्या वस्तूला मिथ्यासिद्धत्व संभवत असल्यामुळें [अनन्तः च आत्मा—] आत्मा अनन्तच आहे. त्याचा देशतः, कालतः व वस्तुतः परिच्छेद होत नाहीं. [विश्वरूपः—] विश्व हेंच त्याचें रूप आहे. [हि अकर्ता—] ज्याअर्थीं अनन्त व विश्वरूप आहे त्याअर्थीं आत्मा अकर्ता—कर्तृत्वादि सर्वसंसारधर्मशून्य आहे. पण तो अशा पूर्णानंदैकब्रह्मरूपानें अवस्थित केव्हां होतो ? उत्तर— [यदा त्रयं एतत् ब्रह्म विन्दते—] जेव्हां हें भोक्ता-भोग-भोग्यरूप त्रय मायात्मक असल्यामुळें अधिष्ठानभूत ब्रह्माहून भिन्न नाहीं तर ब्रह्मच आहे असें समजतो, तेव्हां सर्वसंसारधर्मशून्य शोकरहित कृतकृत्य होऊन राहतो, किंवा त्रय म्ह० ज्ञ, अज्ञ व अजा; म्ह० ईश्वर, जीव व प्रकृति एतद्रूप ब्रह्म, जेव्हां त्याला प्राप्त होतें तेव्हां तो मुक्त होतो ' ब्रह्मं ' हा मकारान्त पाठ नारायणांतील 'ब्रह्ममेतु मां' याप्रमाणें छांदस आहे. ९.—जीवेश्वरांचा विभाग दाखवून त्यांच्या विज्ञानानें अमृतत्व सांगितलें. आतां प्रधान व ईश्वर यांचें वैलक्षण्य दाखवून ईश्वराच्या विज्ञानानें श्रुति अमृतत्व दाखविते—

क्षरं प्रधानममृताक्षरं हरः क्षरात्मानावीशते देव एकः ।
तस्याभिध्यानाद्योजनात्तत्त्वभावाद्भूयश्चान्ते विश्वमायानिवृत्तिः ॥

अन्वयार्थ—[प्रधानं क्षरं—] प्रधान क्षर आहे. [हरः अमृताक्षरं—] अविद्यादिकांचें हरण करणारा हर—परमेश्वर अमृत असें अक्षर म्ह० ब्रह्म आहे. [एकः देवः क्षरात्मानौ ईशते—] तो चित्सदानंद अद्वय परमात्मा क्षर—प्रधान व आत्मा—पुरुष यांचें ईशन—नियमन करितो, [तस्य अभिध्यानात्—] त्या परमात्म्याच्या अभिध्यानानें—चिंतनानें, तें कसें ? [योजनात्—] जीवाचा परमात्म्याशीं संयोग केल्यानें [भूयः तत्त्वभावात्—] मी ब्रह्म आहें, अशा वारंवार

केलेल्या तत्त्वभावनेनें [अन्ते–] प्रारब्धकर्माच्या अन्तीं किंवा स्वात्मसाक्षात्काराचा उदय होण्याची वेळ आली असतां त्यावेळीं [विश्वमायानिवृत्तिः–] सुख-दुःख-मोहात्मक सर्व प्रपंचरूप मायेची निवृत्ति होते. १०.–आतां आत्मज्ञ व त्याचें ध्यान करणारा यांना ज्ञानामुळें व ध्यानामुळें प्राप्त होणारें भिन्नभिन्न फल श्रुति दाखविते–

ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ।
तस्याभिध्यानात्तृतीयं देहभेदे विश्वैश्वर्यं केवल आप्तकामः ॥ ११

अन्वयार्थ—[देवं ज्ञात्वा सर्वपाशापहानिः–] ' तो देव हा मी आहें,' असें साक्षात् जाणून पाशरूप अविद्यादि सर्व क्लेशांची निवृत्ति होते, त्यांचा क्षय होतो. [क्षीणैः क्लेशैः जन्म-मृत्युप्रहाणिः–] क्षीण झालेल्या क्लेशांनीं म्ह० अविद्यादि क्लेश क्षीण झाले असतां तत्कार्यभूत जन्म-मरणादि दुःखनिमित्तांचा नाश होतो. हें ज्ञानाचें फल आहे. आतां श्रुति ध्यानाच्या फलांतील क्रममुक्तिरूप विशेष सांगते–[तस्य अभिध्यानात्–] त्या परमेश्वराच्या अभिध्यानानें–चिंतनाने [देहभेदे–] शरीरपातोत्तरकाली–मरणोत्तर अर्चिरादि देवयान मार्गानें जाऊन परमेश्वरसायुज्यास प्राप्त झालेल्या त्याला [तृतीयं विश्वैश्वर्यं–] विराड्रूपाच्या अपेक्षेनें तिसरें–अव्याकृत परमाकाश कारणेश्वरावस्थ विश्वैश्वर्यरूप फल प्राप्त होतें. [केवलः आप्तकामः–] तो त्या फलाचा अनुभव घेऊन तेथेंच निर्विशेष आत्म्याला जाणून समस्त ऐश्वर्य व त्याची उपाधिसिद्धि यांचें निरसन करून–अव्याकृत परमाकाश कारणेश्वरात्मक तृतीयावस्थ विश्वैश्वर्य टाकून–त्याचा त्याग करून आप्तकाम, आत्मकाम, पूर्णानन्द, अद्वितीय ब्रह्मरूप होऊन राहतो. याचा भावार्थ असा–तत्त्वज्ञानाचा नित्य निर्विषय आत्मवस्तु हा विषय असल्यामुळें तत्त्वसाक्षात्कारानंतर अविद्या व अविद्याकार्य यांचा त्याग करून पुरुष पूर्णानन्द अद्वितीय ब्रह्मस्वरूपानें अवस्थित होतो. पण बुद्धि सहसा निराकार वस्तूमध्यें प्रवृत्त होत नाहीं. त्यामुळें सविशेष ब्रह्म हाच त्याचा विषय आहे. यास्तव ' तं यथा यथोपासते ' या न्यायानें सविशेष विश्वैश्वर्यलक्षण ब्रह्मप्राप्तीनें–विश्वैश्वर्याचा अनुभव घेऊन निर्विशेष पूर्णानन्द ब्रह्मात्म्याला जाणून केवल आप्तकाम–सर्वपुरुषार्थयुक्त–मुक्त होतो. ११. –ज्याअर्थीं ज्ञानानंतर परमपुरुषार्थासिद्धि आहे त्याअर्थीं—

एतज्ज्ञेयं नित्यमेवात्मसंस्थं नातः परं वेदितव्यं हि किंचित् ।
भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा सर्वं प्रोक्तं त्रिविधं ब्रह्ममेतत् ॥१२

अन्वयार्थ—[एतत् नित्यं एव ज्ञेयं–] हें प्रकृत केवल आत्माकाशरूप ब्रह्मस्वरूप नित्य–नियमानेंच ज्ञेय–जाणण्यास योग्य आहे, तें दुसऱ्या कोठें संस्थित आहे, असें जाणावें कीं काय ? नाहीं, तर [आत्मसंस्थं–] तें स्वात्म्यामध्यें संस्थित आहे, असें जाणावें. बाह्य अनात्म्यामध्यें स्थित आहे, असें जाणूं नये. किंवा [एतत् नित्यं एव आत्मसंस्थं ज्ञेयं–] हें जें अपरोक्ष प्रत्यगात्मतत्त्व तें नित्य म्ह० अविनाशी व स्वमहिम्यामध्यें स्थित असलेलें ब्रह्मच जाणावें. [हि–] कारण [अतःपरं वेदितव्यं किंचित् न अस्ति–] त्याहून दुसरें वेद्य असें कांहीं नाहीं. तें कसें ज्ञेय आहे, तें श्रुति सांगते–[भोक्ता भोग्यं प्रेरितारं च इति एतत् सर्वं त्रिविधं प्रोक्तं ब्रह्म मत्वा–] जीव, इतर सर्व भोग्य व प्रेरिता–अन्तर्यामी परमेश्वर, हें सर्व त्रिविध पूर्वोक्त ब्रह्मच आहे. भोक्ता, भोग्य इत्यादि सर्व भेदांचें निरसन करून निर्विशेष ब्रह्मच आत्मा आहे, असें जाणावें. १२. –आतां प्रश्नोपनिषदादि इतर श्रुतींना अनुसरून ध्यानाच्या अंगत्वानें श्रुति प्रणवाला प्रदर्शित करिते—

वह्नेर्यथा योनिगतस्य मूर्तिर्न दृश्यते नैव च लिङ्गनाशः ।
स भूय एवेन्धनयोनिगृह्यस्तद्वोभयं वै प्रणवेन देहे ॥ १३

अन्वयार्थ—[यथा योनिगतस्य वह्नेः मूर्तिः न दृश्यते–] ज्याप्रमाणें अरणीमध्यें असलेल्या अग्नीची मूर्ति–स्वरूप मंथनाच्या पूर्वी दिसत नाहीं. [च लिंगनाशः न एव–] व त्याच्या लिंगाचा–सूक्ष्म देहाचा विनाशहि होत नाहीं. [सः एव भूयः इन्धनयोनिगृह्यः–] पण तोच अरणींतील अग्नि पुनः पुनः मंथन केल्यानें इंधन म्ह० काष्ठें याच कारणाचें मंथन–तीं एकावर एक घांसणें या मंथनानें ग्राह्य होतो, दिसतो. [तत् उभयं वा–] या दोन गोष्टींप्रमाणें म्ह० मंथनाच्या पूर्वी न दिसणें व मंथनानें व्यक्त होणें, यांप्रमाणें [प्रणवेन वै देहे–] अग्निस्थानीं असलेला आत्मा उत्तर अरणीच्या स्थानीं असलेल्या प्रणवानें चिंतन केल्यामुळें अधर अरणीच्या स्थानीं असलेल्या देहांत ग्राह्य होतो, व्यक्त होतो. १३.–याचाच विस्तार—

स्वदेहमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम् ।
ध्याननिर्मथनाभ्यासाद्देवं पश्येन्निगूढवत् ॥ १४

अन्वयार्थ—[स्वदेहं अरणिं कृत्वा–] स्वदेहाला अधरारणि–खालची अरणि करून [च प्रणवं उत्तरारणिं कृत्वा–] व प्रणवाला वरची अरणि करून [ध्याननिर्मथनाभ्यासात्–] ध्यान हेंच निर्मथन–वेगानें घुसळणें, त्याच्या वारंवार अभ्यासानें [देवं निगूढवत् पश्येत्–] ज्योतीरूप आत्म्याला अरणींत अत्यंत गूढ असलेल्या अग्निप्रमाणें साक्षात् पहावें. १४–याच उक्तार्थाच्या दृढतेसाठीं श्रुति पुष्कळ दृष्टान्त सांगते—

तिलेषु तैलं दधिनीव सर्पिरापः स्रोतःस्वरणीषु चाग्निः ।
एवमात्मात्मनि गृह्यतेऽसौ सत्येनैनं तपसा योऽनुपश्यति ॥ १५

अन्वयार्थ—[तिलेषु तैलं–] तिळांना घाण्यांत चिरडून त्यांतील तेल काढून घेतात, [दधिनि सर्पिः–] दह्यांतील तूप मन्थनादि उपायांनीं प्राप्त होतें, [स्रोतःसु आपः–] नद्यांतील आटलेलें पाणी तेथील भूमीला खणणें इत्यादि उपायानें संपादन केलें जातें. [अरणीषु च अग्निः इव–] व अरणीतील अग्नि मन्थनानें जसा प्राप्त होतो, [एवं असौ आत्मा आत्मनि गृह्यते–] त्याचप्रमाणें हा आत्मा मननानें सर्व उपाधींचा प्रविलाप करून निर्विशेष पूर्णानन्द स्वात्म्यामध्येंच ज्ञात होतो. (पण कोणत्या पुरुषाकडून आत्मा स्वात्म्यामध्येंच ग्रहण केला जातो तें श्रुति सांगते–) [यः सत्येन तपसा एनं अनुपश्यति–] जो सत्य व तप यांच्या योगानें या आत्म्याला शास्त्राचार्यांच्या उपदेशानुसार पाहतो तो त्याचें स्वात्म्यामध्यें ग्रहण करितो. सत्य म्ह० भूतांना हितकर होणारें यथार्थवचन आणि तप म्ह० मनाचें व इंद्रियांचें ऐकाग्र्य हेंच परम तप, त्यांच्या योगानें आत्मा स्वात्म्यांतच ग्राह्य होतो. १५–याला कसें पाहतो, तें श्रुति सांगते—

सर्वव्यापिनमात्मानं क्षीरे सर्पिरिवार्पितम् । आत्मविद्या-
तपोमूलं तद्ब्रह्मोपनिषत्परम् तद्ब्रह्मोपनिषत्परम् १६

इति श्वेताश्वतरोपनिषदि प्रथमोऽध्यायः ॥ १

अन्वयार्थ—[सर्वव्यापिनं–] प्रकृतीपासून विशेषापर्यंत सर्वकार्य-कारणाला व्यापून अवस्थित असलेल्या, केवल देह-इंद्रियादि-अध्यात्ममात्र-अवस्थित नव्हे–अशा [आत्मानं–] आत्म्याला [क्षीरे सर्पिः इव अर्पितं–] दुधामध्यें जसें

घृत साररूपानें व्यापून असतें त्याप्रमाणें निरंतरतेनें आत्मत्वानें सर्वांमध्यें अर्पित —अर्पिलेल्या आत्म्याला [आत्मविद्या-तपोमूलं तत्–] आत्मविद्या—आत्मज्ञान व तप यांचें मूळ किंवा आत्मविद्या व तप हें ज्याच्या लाभाचें मूळ—कारण आहे त्या आत्म्याला [ब्रह्म परं उपनिषद् अनुपश्यति–] ब्रह्म—परम रहस्य पाहतो. (सत्यादि साधनांनीं युक्त असलेला जिज्ञासु सर्वव्यापी आत्म्याला दुधांतील घृताप्रमाणें सर्वांमध्यें व्यापक, आत्मविद्या व तप यांचें मूळ असें, तें परम श्रेयोरूप ब्रह्म पाहतो. आत्मदर्शी पुरुषांकडून सर्वगत ब्रह्म आत्म्यामध्येंच पाहिलें जातें. असत्यादियुक्त परिच्छिन्न ब्रह्म अन्नमयादिरूपानें पाहिलें जात नाहीं. 'तद्ब्रह्मोपनिषत्परं' ही द्विरुक्ति अध्यायपरिसमाप्त्यर्थ आहे. १६. (१)

अथ द्वितीयोऽध्यायः ।

—प्रथमाध्यायांत परमार्थदर्शनाचा उपाय या रूपानें ध्यान सांगितलें. आतां त्या ध्यानाला अपेक्षित असलेल्या साधनांचें विधान करण्यासाठीं हा दुसरा अध्याय आरंभिला जातो. पण त्याच्या आरंभी ध्यानाच्या सिद्धीसाठीं सूर्याची प्रार्थना—

युञ्जानः प्रथमं मनस्तत्त्वाय सविता धियः ।
अग्नेर्ज्योतिर्निचाय्य पृथिव्या अध्याभरत ॥ १

अन्वयार्थ—[प्रथमं–] ध्यानाच्या आरंभी [मनः युञ्जानः–] मनाला परमात्म्यामध्यें संयुक्त करणारा—मन परमात्म्यामध्यें संयुक्त करावें, असा भावार्थ. [धियः–] इतर प्राणांना—इंद्रियांनाहि किंवा बाह्य विषयज्ञानांनाहि परमात्म्यामध्यें संयुक्त करावें. (कशासाठीं ?) [तत्त्वाय–] तत्त्वज्ञानासाठीं. मन व इतर सर्व इंद्रियें किंवा बाह्यविषयज्ञानें परमात्म्यामध्यें संयुक्त करावीं. [सविता–] जगाला प्रसवणारा देव [धियः–] बाह्य विषयज्ञानापासून [अग्नेः ज्योतिः निचाय्य–] अग्नीचा प्रकाश पाहून [पृथिव्याः अधि–] या शरीरांत [आभरत्–] त्याचें आहरण करिता झाला. (सविता ज्ञान संपादन करावयास प्रवृत्त झालेल्या माझ्या मनाचा बाह्य विषयज्ञानापासून उपसंहार करून त्याला परमात्म्यामध्येंच

संयुक्त करण्यासाठीं अनुग्राहक देवतारूप अग्न्यादिकांचें जें सर्ववस्तुप्रकाशन-सामर्थ्य तें आमच्या वागादिकांत संपादन करो. कारण सवित्याच्या प्रसादानेंच योग प्रवृत्त होतो, असा भावार्थ.) १.—तत्त्वज्ञानासाठीं मनाला युक्त करणारा योगी अनुग्राहक देवतेच्या शक्तीचें आधान करून देहेंद्रियांना जेव्हां दृढ करितो तेव्हां—

युक्तेन मनसा वयं देवस्य सवितुः सवे । सुवर्गेयाय शक्त्या ॥ २

अन्वयार्थ—[वयं युक्तेन मनसा–] आम्ही सवित्यानें परमात्म्यामध्यें संयुक्त केलेल्या मनानें [देवस्य सवितुः सवे–] प्रकाशरूप सवित्याची अनुज्ञा झाली असतां [सुवर्गेयाय–] स्वर्गप्राप्तिसाधनभूत ध्यानकर्मासाठीं [शक्त्या] स्वसामर्थ्यानुसार [प्रयतामहे–] प्रयत्न करितों. येथील ' स्वर्ग-'शब्द परमात्मवाचक आहे. कारण हें प्रकरण परमात्म्याचें आहे. ' स्वर्ग-'शब्द सुखवाचक आहे व परमात्मा सुखस्वरूप आहे. बाकीचीं सर्व सुखें हा त्याचाच अंश आहे. २. —पुनरपि तो असें करो, अशी प्रार्थना—

युक्त्वाय मनसा देवान्सुवर्यतो धिया दिवम् ।
बृहज्ज्योतिः करिष्यतः सविता प्रसुवाति तान् ॥ २

अन्वयार्थ—[मनसा देवान् युक्त्वाय–] मनःप्रभृति सर्व देवांना म्हणजे इंद्रियांना योजून–संयुक्त, समाहित करून, देवांचेंच विशेषण–[सुवर् यतः देवान्–] सुवर् म्ह० स्वर्ग–सुख–पूर्णानन्द ब्रह्म, त्यास प्राप्त होणाऱ्या–शब्दादि विषयांस प्राप्त होणाऱ्या मन-आदि इंद्रियांस नव्हे, आणखीं विशेषण–[धिया दिवं बृहज्ज्योतिः करिष्यतः तान्–] तत्त्वज्ञानानें द्योतनस्वभाव चैतन्यैकरस महत् ब्रह्माला–प्रकाश–प्रकट करणाऱ्या–पूर्णानन्द ब्रह्माला प्रकट करणाऱ्या देवांना [सविता प्रसुवाति–] सविता अनुज्ञा देवो. (सर्व इंद्रियें विषयांपासून निवृत्त व आत्माभिमुख होऊन आत्मप्रकाशच करतील अशी सविता त्यांस अनुज्ञा देवो, अशी त्यांस प्रेरणा करो.) ३.—अशी अनुज्ञा देणाऱ्या त्याची स्तुति करावी, असें वेद सांगतो—

युञ्जते मन उत युंजते धियो विप्रा विप्रस्य बृहतो विपश्चितः ।
वि होत्रा दधे वयुनाविदेक इन्मही देवस्य सवितुः परिष्टुतिः ॥ ४

अन्वयार्थ—[ये विप्राः मनः युञ्जते–] जे विप्र मनाला आत्म्यामध्यें समाहित करितात [धियः उत युञ्जते–] आणि ज्ञानेंद्रियांनाहि समाहित–शांत करितात त्या विप्रांनीं [विप्रस्य बृहतः विपश्चितः देवस्य सवितुः मही परिष्टुतिः कर्तव्या–] विशेषतः व्याप्त, महान्, सर्वज्ञ, ज्योतिःस्वरूप सवित्याची मोठी स्तुति करावी. त्या सवित्याचेंच विशेषण–[यः एकः वयुनाविद् होत्राः विदधे–] जो अद्वितीय सर्वसाक्षी क्रियांचें विधान करिता झाला त्या सवित्याची स्तुति करावी, असा संबंध (अर्थात् जे ब्राह्मण मन-आदि इंद्रियांना विषयांपासून परतवून–त्यांचा उपसंहार करून त्यांना आत्म्यामध्येंच योजितात त्यांनीं सर्वव्याप्त, फार मोठ्या व सर्वज्ञ सवित्याची अतिशय स्तुति करावी. त्या सर्वसाक्षी अद्वितीय सवित्यानें कर्मांचें विधान केलें आहे.)४.–तसेंच––

युजे वां ब्रह्म पूर्व्यं नमोभिर्वि श्लोक एतु पथ्येव सुरेः ।
शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा आ ये धामानि दिव्यानि तस्थुः ॥५

अन्वयार्थ––[वां ब्रह्म पूर्व्यं नमोभिः युजे–] तुमच्या कारणभूत चिरंतन ब्रह्माला नमस्कारांनीं–चित्तप्रणिधानादि उपायांनीं मी समाहित करितों. [एषः श्लोकः सुरेः पथि एव वि एतु–] याप्रमाणें सम हित करणाऱ्या माझा हा श्लोक–यश सन्मार्गांतच विविधपणें येवो. [ये दिव्यानि धामानि आतस्थुः ते विश्वे अमृतस्य पुत्राः शृण्वन्तु–] जे द्युलोकांतील–दिव्य धामांमध्यें राहतात ते हिरण्यगर्भाचे सर्व पुत्र हें प्रार्थनारूप वाक्य ऐकोत. ५.–मनाचा योग वारंवार सांगितला; पण मनाला कोठें स्थिर करावें तें सांगितलें नाहीं, यास्तव योगाचें स्थान सांगितलें जातें–

अग्निर्यत्राभिमथ्यते वायुर्यत्राभियुज्यते ।
सोमो यत्रातिरिच्यते तत्र संजायते मनः ॥ ६

अन्वयार्थ––[यत्र अग्निः अभिमथ्यते–] ज्या आधारामध्यें दाह-पाककारी अग्नीचें मंथन केलें जातें. म्ह० तो जेथें मंथनानें उत्पन्न केला जातो, (म्ह० अरणि कीं काय? उत्तर–नव्हे.) [यत्र वायुः अभियुज्यते–] जेथें वायु सर्व बाजूंनीं निरुद्ध केला जातो–अस्त पावतो, (तर मग आकाश कीं काय? नव्हे–) [यत्र सोमः अतिरिच्यते–] ज्या स्थानीं सोम–चंद्र व सर्व ज्योति पराभूत होतात [तत्र मनः संजायते–] त्या स्थानीं अन्तःकरण उत्तम प्रकारें युक्त केलें जातें. तेथें चित्ताला स्थिर करावें. ६.

सवित्रा प्रसवेन जुषेत ब्रह्म पूर्व्यम् । तत्र
योनिं कृणवसे न हि ते पूर्तमक्षिपत् ॥ ७

अन्वयार्थ—[प्रसवेन सवित्रा—] आधिक्यानें उत्पन्न होणारा म्ह० जगाचें कारण अशा सवित्याकडून [जुषेत—] निरतिशय प्रीतिमान् केलेला, असें व्हावें. (पण 'मी ब्रह्म आहें' असें जाणणारा सवित्याकडून प्रीतिमान केला जातो हें म्हणणें विरुद्ध आहे! उत्तर—) [ब्रह्म पूर्व्यं—] ज्याच्याकडून हा ज्ञानी प्रीतिमान् केला जातो तें ब्रह्म आहे. पण येथें ब्रह्म म्ह० ब्राह्मण, वेद, ब्रह्मदेव वगैरे नव्हे तर तें सर्वांच्या पूर्वी असणारें, सर्वकारण ब्रह्म आहे. (असो; याप्रमाणें योगावस्थ मनाचें स्थान सांगून योगसंपन्न मंत्रद्रष्टा आपल्या योगयुक्त मनाला उद्देशून म्हणतो—) [तत्र योनिं कृणवसे—] त्या पूर्व ब्रह्मामध्यें तूं स्थान करतेस. किंवा तूं त्या ब्रह्मामध्यें समाधिलक्षण निष्ठा कर. [हि ते पूर्तं न अक्षिपत्—] कारण तुझें कूप-तडागादि पूर्त कर्म—तुझें कोणतेंहि शुभाशुभ कर्म तुला बहिर्मुख करीनासें झालें आहे. तें तुला पुनः भोगासाठीं बद्ध करणार नाहीं. कारण ज्ञानाग्नीनें त्याचा सबीज दाह झाला आहे.७—याप्रमाणें वरील सात मंत्रांनीं मनाचा निग्रह परम पुरुषार्थाचें साधन आहे, असें सांगून मनोनिग्रह उपायावांचून दुष्कर असल्यामुळें दयालु श्रुति म्हणते—

त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं हृदीन्द्रियाणि मनसा संनिवेश्य ।
ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान्स्रोतांसि सर्वाणि भयावहानि ॥ ८

अन्वयार्थ—[शरीरं त्रिरुन्नतं समं स्थाप्य—] शरीर त्रिरुन्नत करून—उर, मान व मस्तक हीं तीन उंच करून किंवा वायुपूरणानें उदर, खांदे व मध्यभाग उंच करून त्याला काठीप्रमाणें सरळ स्थापावें. (अर्थात् विनाशी शरीरावरील आस्था सोडून वायुप्रकोप होऊं न देतां स्वाधीन आसनावर निद्रा-तंद्रा वगैरे टाकून बसावें. केवल बसूनच योगसिद्धि होत नाहीं तर तशा आसनावर बसून इंद्रियांचा प्रत्याहार करावा, असें श्रुति सांगते—) [हृदि इंद्रियाणि मनसा संनिवेश्य—] हृदयकमलांत ज्ञान व कर्म यांची साधनें—इंद्रियें इंद्रियाश्वांच्या लगामाप्रमाणें असलेल्या मनानें—प्रविष्ट करून त्यांना हृदयकमलांत प्रवेश करावयास लावून—त्यांचें हृदयांत नियमन करून [विद्वान् ब्रह्मोडुपेन सर्वाणि भयावहानि स्रोतांसि प्रतरेत—] ब्रह्मज्ञानी पुरुषानें ब्रह्मरूप नौकेनें—तरणसाधनानें

प्रेत-तिर्यगादि पुनर्जन्मरूप भय प्राप्त करून देणाऱ्या संसारनदीप्रवाहांचें उल्लंघन करावें. येथें ब्रह्म म्ह० प्रणव. स्वाभाविक अविद्या, काम व कर्म यांच्या योगानें प्रवृत्त झालेल्या भयंकर–पुनर्जन्म देणाऱ्या संसारप्रवाहाचें उल्लंघन करावें. ८.–प्राणायामाच्या योगानें ज्याचे मनोमल क्षीण झाले आहेत अशा पुरुषाचें चित्त ब्रह्मामध्यें स्थित होतें, यास्तव प्राणायामाचा निर्देश केला जातो–

प्राणान्प्रपीड्येह स युक्तचेष्टः क्षीणे प्राणे नासिकयोच्छ्वसीत ।
दुष्टाश्वयुक्तमिव वाहमेनं विद्वान्मनो धारयेताप्रमत्तः ॥ ९

अन्वयार्थ—[इह प्राणान् प्रपीड्य–] या शरीरांत नऊ द्वारांनीं बाहेर पडणाऱ्या प्राणांचा अतिशय निरोध करून [सः युक्तचेष्टः–] त्या प्राणनिरोध कर्त्यानें युक्तचेष्ट व्हावें. चेष्टा म्ह० शरीरेंद्रियव्यापार, केवल शरीररक्षणाच्या उपयोगी असेल तेवढीच चेष्टा करणारा, अशा योग्यानें प्राणाच्या क्षयास प्राप्त व्हावें. [क्षीणे प्राणे–] आणि प्राणाचा क्षय झाला असतां म्ह० सर्व द्वारांपासून निवृत्त केलेला वायु एकत्र स्थिर झाला असतां [नासिकया उच्छ्वसीत–] नासिकेच्या दोन पुटांनीं मंद मंद श्वास सोडीत रहावें. नासापुटांनीं श्वासक्रिया करावी. (श्रुति योग्याचें आणखीं कर्तव्य सांगते–) [दुष्टाश्वयुक्तं इव एनं वाहं मनः–] दुष्ट–अशिक्षित घोड्यांनीं युक्त असलेल्या रथनियंत्याप्रमाणें या इंद्रियाश्वाच्या प्रग्रहस्थानीं असलेल्या प्रत्यक्ष मनानें [विद्वान् अप्रमत्तः धारयेत्–] विद्वान् योगाभ्यासी पुरुषानें सावधान राहून–कामक्रोधादिरहित होऊन बुद्धिसारथ्याकडून मनाचें धारण करावें. (प्राणनिरोध केल्यावर दोन्ही नासापुटांनीं हळू हळू श्वासोच्छ्वास करावा व शरीरादि सर्व व्यापार अगदीं कमी करावे. शरीरधारणाला अवश्य तेवढेच आहार-विहारादि करावे. उन्मत्त घोड्यांचें नियमन करणाऱ्या लगामाप्रमाणें असलेल्या मनानें दुष्ट इंद्रियांचें नियमन करून बुद्धिरूप सारथ्याकडून त्या प्रग्रहस्थानीय मनाचेंहि नियमन करवावें, असा याचा भावार्थ. आसनावर शरीर सुस्थित केल्यानें कर्मेंद्रियें आपापला व्यापार सोडतात. आसनाचा हाच उपयोग. प्राणायामानें प्राणाच्या स्वेच्छाविहारास प्रतिबंध होतो. त्यासाठींच प्राणायाम करण्याची आवश्यकता आहे, मनाचें आत्म्यामध्यें स्थैर्य हाच योग. त्यासाठीं हे सर्व उपाय आहेत. प्राणायाम पूरक, कुंभक व रेचक असा तीन प्रकारचा आहे. अगोदर नाड्यांचें शोधन करावें.

ह्मणजे या प्राणायामाचा अधिकार प्राप्त होतो. अंगठ्यानें उजवी नाकपुडी दाबून डाव्या नाकपुडीनें बाहेरचा वायु आंत यथाशक्ति ओढून घ्यावा. लागलीच डावी नाकपुडी दाबून उजवीनें तो सोडावा. तशीच डावी नागपुडी दाबून उजवीनें वायु ओढून घ्वावा व डावीनें लागलाच सोडावा. असें तीनदा किंवा पांचदा, दिवसा चार वेळ व रात्रीं चार वेळ, पंधरा दिवस किंवा महिनाभर करावें, म्हणजे नाडीची चांगली शुद्धि होते. मग पूरक-कुंभक-रेचक करावे. उजव्या किंवा डाव्या नाकपुडीनें वर सांगितल्याप्रमाणें वायु ओढून घेणें हा पूरक, त्याला घटांतील जलाप्रमाणें मस्तकादिकांत निश्चल धारण करणें हा कुंभक व पुनः त्याला बाहेर सोडणें हा रेचक होय सोळा प्रणवोच्चार होत तों—तेवढ्या कालांत पूरक व रेचक आणि त्याच्या चौपट वेळ कुंभक करावा. याच्यायोगानें मन लवकर स्थिर होतें व आरोग्यादि अवांतर फलहि प्राप्त होतें.) ९.—आतां आसनासाठीं विशेष देश श्रुति सांगते—

समे शुचौ शर्करावह्निवालुकाविवर्जिते शब्दजलाश्रयादिभिः ।
मनोऽनुकूले न तु चक्षुपीडने गुहानिवाताश्रयणे प्रयोजयेत् ॥ १०

अन्वयार्थ—[समे—] उंच-सखल नसलेल्या [शुचौ—] शुद्ध—केंस-अस्थि इत्यादि अशुद्ध द्रव्यांनीं दूषित न झालेल्या, [शर्करा-वह्नि-वालुकाविवर्जिते—] बारिक खडे, अग्नि, वाळू यांनीं रहित, [शब्द-जल-आश्रयादिभिः विवर्जिते—] कलहादि किंवा दुसरे वर्णरूप व ध्वनिरूप शब्द, सर्व प्राण्यांना पिण्यास योग्य असा जलाशय किंवा दलदलीचा शीतल प्रदेश, व्याघ्र-सिंहादिकांचा आश्रय, यांनीं रहित अशा, [मनोऽनुकूले—] मनाला रम्य वाटणाऱ्या [न तु चक्षुपीडने—] जेथें चक्षूला पीडा देणारा पदार्थ समोर नसेल अशा म्ह० अतिशय दर्शनीय व मनःस्वास्थ्यकर अशा [गुहानिवाताश्रयणे—] गुहेसारख्या एकांत व निर्वात आश्रयस्थानीं बसून [प्रयोजयेत्—] अष्टांग योगाभ्यास करावा, किंवा चित्ताला परमात्म्यामध्यें स्थिर करावें. मु.ब्र.पृ.४३९, पहा. १०. —आतां योगाभ्यासी पुरुषाला योग प्रवृत्त झाला असतां कोणतीं चिह्नें दिसतात तें श्रुति सांगते—

नीहारधूमार्कानलानिलानां खद्योतविद्युत्स्फटिकशशिनाम् ।
एतानि रूपाणि पुरःसराणि ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे ॥ ११

अन्वयार्थ—[नीहार-धूम-अर्क-अनल-अनिलानां—] धुकें, धूर, सूर्य, अग्नि, वायु, यांच्या वर्णांसारखे म्ह० शुभ्र, कृष्ण, पिंगल, लोहित, नील वर्ण दिसूं लागतात. [खद्योत-विद्युत्-स्फटिक-शशिनाम्—] काजवा, वीज, स्फटिक व चंद्र यांच्या वर्णांसारखे वर्ण दिसतात, किंवा अन्तरिक्ष काजव्यांनीं भरल्यासारखें दिसतें. केव्हां विजा चमकत असल्याचा भास होतो, केव्हां स्फटिकाकृति दिसते. केव्हां चंद्रमंडल प्रतीत होतें. [योगे—] योगाभ्यास करूं लागलें असतां व [ब्रह्मणि—] ब्रह्माचा आविर्भाव होऊं लागला असतां [एतानि रूपाणि पुरःसराणि अभिव्यक्तिकराणि—] हीं सर्व रूपें पूर्वीं दिसूं लागतात. तीं ब्रह्माचीं अभिव्यक्ति करणारीं म्ह० अविद्यारूपी पटलानें आच्छादित झालेल्या ब्रह्माला प्रकट करणारीं आहेत. हीं चिह्नें दिसूं लागलीं असतां ब्रह्मसाक्षात्कार आतां अगदीं समीप आला आहे, असें जाणावें. एखाद्या गांवांतील मंदिराचें शिखर दिसूं लागलें असतां हा गांव आतां अगदीं जवळ आहे, असें प्रवाशी जसे समजतात त्याप्रमाणें शब्द-स्पर्श-रूपादि विषय अतिशय अनुकूल झाले असतां योग्यानें ब्रह्मदर्शन आतां अगदीं समीपवर्ती आहे, असें जाणावें. पण योग्यानें असल्या अनुकूल विषयांत आसक्त होऊं नये. ११.—याप्रमाणें समाधिस्थाच्या सिद्धि सांगून आतां व्युत्थित व अव्युत्थित या दोन्ही दशेंतील साधारण सिद्धि सांगतात—

पृथ्व्यप्तेजोऽनिलखे समुत्थिते पञ्चात्मके योगगुणे प्रवृत्ते ।
न तस्य रोगो न जरा न मृत्युः प्राप्तस्य योगाग्निमयं शरीरम् १२

अन्वयार्थ—[पृथ्वी-अप्-तेजः-अनिल-खे समुत्थिते—] पृथिवी, जल, तेज, वायु व आकाश या पांच भूतांपासून उत्पन्न झालेल्या या पंचभूतात्मक शरीरांत [पंचात्मके योगगुणे प्रवृत्ते—] गंध-रस-रूप-स्पर्श-शब्दात्मक योगगुण प्रवृत्त झाला असतां [योगाग्निमयं शरीरं प्राप्तस्य तस्य न रोगः न जरा न मृत्युः—] योगाग्नीनें ज्याच्या शरीरांतील सर्व दोष जळून गेले आहेत अशा निर्दोष शरीरास प्राप्त झालेल्या त्या योग्याला रोग होत नाहीं, जरा प्राप्त होत नाहीं व अपमृत्यु येत नाहीं. (पंचीकृत पंचमहाभूतांचें कार्य अशा या शरीरांत स्वाभाविक गंधादि गुणांची प्रवृत्ति झाल्यामुळें अनासक्ति हा योगगुण प्रवृत्त होतो. त्यानंतर त्याच्या शरीरांत जरा, रोग, अकालीं मरण संभवत नाहीं, हें योगाचें

अवांतर फल व विषयांविषयीं अप्रीति–वैराग्य हें मुख्य फल आहे.) १२. –योगप्राप्तीचीं आणखीं चिह्नें—

लघुत्वमारोग्यमलोलुपत्वं वर्णप्रसादं स्वरसौष्ठवं च ।
गन्धः शुभो मूत्रपुरीषमल्पं योगप्रवृत्तिं प्रथमां वदन्ति ॥ १३

अन्वयार्थ—[लघुत्वं आरोग्यं अलोलुपत्वं०–] शरीराचा हलकेपणा, आरोग्य–सर्वोत्साहयुक्तत्व, विषयलांपट्याचा अभाव, शरीरकांति नेत्रांना आनंद देणारी होणें, स्वराचें माधुर्य, सर्व प्राण्यांना आनंद देणारा शुभ गंध, पुष्कळ अन्न खाल्लें व पुष्कळ पाणी प्यालें तरी मूत्र-पुरीषांचें अल्पत्व हीं अष्टांगयोगप्रवृत्तीचीं पूर्वचिह्नें सांगतात. १३.–याप्रमाणें योगाच्या अवांतर सिद्धि सांगून श्रुति मुक्ति ही मुख्य सिद्धि सांगते—

यथैव बिम्बं मृदयोपलिप्तं तेजोमयं भ्राजते तत्सुधान्तम् ।
तद्वाऽऽत्मतत्त्वं प्रसमीक्ष्य देही एकः कृतार्थो भवते वीतशोकः १४

अन्वयार्थ—[यथा एव तेजोमयं बिंबं मृदया उपलिप्तं–] ज्याप्रमाणें सोन्याचें किंवा रुप्याचें बिंब–मंडल प्रथम मृत्तिकादिकांनीं उपलिप्त–लिंपलेलें–मलिन केलेलें असावें व मागून [तत् सुधान्तं–] तें निर्मल जलानें धुवून स्वच्छ करावें, मग तें जसें [भ्राजते–] चमकतें, त्याप्रमाणें [तत् वा आत्मतत्त्वं प्रसमीक्ष्य–] तेंच आत्मतत्त्व साक्षात् पाहून [देही एकः कृतार्थः वीतशोकः भवते–] देहवान् आत्मा अद्वितीय कृतार्थ–कृतकृत्य व सर्वशोकशून्य होतो. (किंवा येथें तेजोमय बिंब म्ह० सूर्याचें किंवा चंद्राचें मंडल घ्यावें. तें मृत्तिकेनें उपलिप्त म्ह० आच्छादित झालेलें असून कांही निमित्तानें त्यावरील आच्छादन निघून गेलें असतां जसें प्रकाशित होतें त्याप्रमाणें आनंदात्मरूप 'तेंच मी' अशा अनुभवानें साक्षात् ज्ञात झालें असतां पूर्वीं देहाभिमानी असलेला योगी सर्वभेदशून्य, कृतकृत्य व तृप्त होतो. सूर्यादिकांच्या ठिकाणीं मातीचा लेप जसा संभवत नाहीं, त्याप्रमाणें आत्म्यामध्यें मायालेप संभवत नाहीं. 'तद्वात्मतत्त्वं' याच्या स्थानीं 'तद्वत्सतत्त्वं' असा पाठभेद आहे. त्याचा अर्थ–'त्याचप्रमाणें आत्मस्वरूप साक्षात् पाहून' असा करावा.) १४.–आत्म्याला जाणून वीतशोक कसा होतो ? उत्तर—

यदात्मतत्त्वेन तु ब्रह्मतत्त्वं दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत् ।
अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ १५

अन्वयार्थ—[तु यदा इह युक्तः—] पण ज्या अवस्थेंत आत्म्यामध्येंच योगयुक्त झालेला योगी [दीपोपमेन आत्मतत्त्वेन ब्रह्मतत्त्वं प्रपश्येत्—] दीपासारख्या स्व-परप्रकाशक आत्मस्वरूपानें ब्रह्मस्वरूपालाच साक्षात् पाहतो. मीच स्वयंप्रकाश आनंदरूप त्रिविधपरिच्छेदशून्य ब्रह्म आहें, असें जाणतो, परमात्म्याला आत्मरूपानें साक्षात् अनुभवितो तेव्हां [अजं—] जन्मादिविकारशून्य [ध्रुवं—] निश्चल—अपरिणामी [सर्वतत्त्वैः विशुद्धं—] अविद्येसह सर्व भूत व भौतिक तत्त्वांनीं रहित—अत्यंत शुद्ध [देवं—] स्वयंप्रकाशाला [ज्ञात्वा—] जाणून —त्याचा साक्षात् अनुभव घेऊन [सर्वपाशैः मुच्यते—] अविद्या व तत्कार्य अशा अहं-ममाभिमानरूप सर्व बंधांपासून मुक्त होतो. १५.—आतां हा आत्मानुभव कसा संभवतो तें श्रुति सांगते—

एष ह देवः प्रदिशोऽनु सर्वाः पूर्वो ह जातः स उ गर्भे अन्तः । स
एव जातः स जनिष्यमाणः प्रत्यङ्जनांस्तिष्ठति सर्वतोमुखः ॥ १६

अन्वयार्थ—[एषः ह देवः प्रदिशः अनु सर्वाः—] हाच देव प्राच्यादि दिशा व सर्व उपदिशा आहे. (यानें त्याची अव्याकृतरूपता सांगितली) [पूर्वः ह जातः सः उ गर्भे अन्तः—] सर्वांच्या पूर्वी सूत्रात्मतेनें—हिरण्यगर्भरूपानें झालेला तोच गर्भांत ब्रह्मांडरूपानें राहणारा असून तोच उत्पन्न झालेला विराडात्मा शिशु आहे व पुढें [सः जनिष्यमाणः—] सर्व जीवांमध्यें उत्पन्न होणाराहि तोच आहे. [सः सर्वतोमुखः जनान् प्रत्यङ् तिष्ठति—] ज्याचीं सर्व प्राण्यांमध्यें मुखें—उपलब्धिद्वारें आहेत तो सर्वतोमुख देव सर्व प्राण्यांमध्यें प्रत्यग्रूपानें—सर्वान्तर्यामिरूपानें राहतो. १६.—याप्रमाणें सर्वात्म्याचें सर्वात्मत्व सांगून विभूतियुक्त प्राण्यामध्यें राहणाऱ्या त्याला श्रुति नमस्कार करिते. किंवा योगाप्रमाणेंच नमस्कार हें साधनहि श्रुति सांगते—

यो देवोऽग्नौ योऽप्सु यो विश्वं भुवनमाविवेश । य
ओषधीषु यो वनस्पतिषु तस्मै देवाय नमो नमः ॥ १७

अन्वयार्थ—[यः देवः—] जो हा स्वयंप्रकाश देव [अग्नौ—] अग्नींत, [यः अप्सु—] जो जलामध्यें, [यः विश्वं भुवनं आविवेश—] व जो प्रसिद्ध

देव स्वतःच रचलेल्या सर्व विश्वांत—भुवनांत सर्वतः प्रविष्ट झाला आहे [यः ओषधीषु—] जो शाल्यादि औषधींमध्यें [यः वनस्पतिषु—] व जो अश्वत्थादि वनस्पतींमध्यें प्रविष्ट झाला आहे [तस्मै देवाय नमः नमः—] त्या विश्वात्म्याला सर्व भुवनांच्या मुळाला—परमेश्वराला नमस्कार असो. ' नमः-'शब्दाची आवृत्ति आदरार्थ व अध्यायसमाप्त्यर्थ आहे. १७.

इति श्वेताश्वतरोपनिषदाचा दुसरा अध्याय समाप्त झाला.

अथ तृतीयोऽध्यायः ।

—पण अद्वितीय परमात्म्याला ईशितृ-ईशितव्यभाव कसा तें, किंवा 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचें अर्थज्ञान होण्यासाठीं प्रथम ब्रह्मपदाचा अर्थ, श्रुति सांगते—

य एको जालवानीशत ईशनीभिः सर्वाँल्लोकानीशत ईशनीभिः ।
य एवैक उद्भवे संभवे च य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ १

अन्वयार्थ—[यः एकः जालवान्—] जो एक—अद्वितीय परमात्मा जाल म्ह० माया—अविद्यामहेंद्रजाल, जालवान् म्ह० मायावान्—मायावी—मायोपाधि होऊन [ईशनीभिः ईशते—] आपल्या शक्तींनीं सर्वांचें ईशन—नियमन करितो. कोळी जसें तंतूंचें जाळें पसरतो त्याप्रमाणें हें महेंद्रजाल पसरून विक्षेपरूप अविद्याशक्तींनीं त्यांचें नियमन करितो [सर्वान् लोकान् ईशनीभिः ईशते—] या भूरादि सर्व लोकांचें त्या परमशक्तींनीं नियमन करितो व [यः उद्भवे संभवे च एकः एव—] जो उत्पत्ति व संहार आणि त्याचप्रमाणें स्थिति, या त्रिकालीं एकटाच असतो. [ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति—] जे कोणी अधिकारी या ईश्वरस्वरूपाला आत्मत्वानें जाणतात ते आनंदात्मरूपानें अमरणधर्मी होतात. १. त्रिकालीं एकच ईश्वर असतो, असें जें म्हटलें त्याचें उपपादन—

एको हि रुद्रो न द्वितीयाय तस्थुर्य इमाल्लँोकानीशत ईशनीभिः । प्रत्यङ्जनांस्तिष्ठति संचुकोचान्तकाले संसृज्य विश्वा भुवनानि गोपाः ॥ २

अन्वयार्थ—[हि–] ज्याअर्थीं [एकः रुद्रः–] जगाच्या उत्पत्तीच्या पूर्वी एकच चिदानंदरस रुद्र असतो, रुत् म्ह० दुःख, त्याचा नाश करणारा. पण अविद्यानिवृत्तीवांचून दुःखनाश संभवत नाहीं, ह्मणून हा रुद्र अविद्यानाशक आहे, ज्याअर्थीं तो स्वतः एक आहे, त्याअर्थीं [द्वितीयाय न तस्थुः–] परमार्थदर्शी दुसऱ्या वस्तूसाठीं स्थित झाले नाहींत. त्यांनीं दुसऱ्या वस्तूमध्यें आस्था ठेविली नाहीं. [यः इमान् लोकान् ईशनीभिः ईशते–] जो या सर्व लोकांचें आपल्या परमशक्तींनीं नियमन करितो, ह्मणून वर म्हटलें, [जनान् प्रत्यङ् तिष्ठति–] जो सर्व जनांमध्यें सर्वान्तर्यामी होऊन राहतो [यः अन्तकाले संचुकोच–] जो जगाच्या संहाराचे वेळीं त्याचा आपल्या स्वरूपांत संकोच–उपसंहार करिता झाला (काय करून संहार करितो ? उत्तर–) [विश्वा भुवनानि संसृज्य–] सर्व–चतुर्दश भुवनांना उत्पन्न करून [गोपाः–] त्यांचा गोप्ता–रक्षक होऊन प्रलयसमयीं त्यांचा संहार करितो. २.–उत्पत्ति-स्थिति-संहार करण्यास हा स्वतंत्र आहे, याविषयीं हेतु–

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात् ।
सं बाहुभ्यां धमति सं पतत्रैर्द्यावाभूमी जनयन्देव एकः॥ ३

अन्वयार्थ—[विश्वतः चक्षुः–] ज्याचे सर्वतः चक्षु आहेत [उत विश्वतः मुखः–] तसेंच सर्वतः मुखें आहेत [विश्वतः बाहुः–] ज्याचे सर्वतः बाहु [उत् विश्वतः पात्–] व सर्वतः पाय आहेत म्ह० जीं कांहीं चक्षुःश्रोत्रादि इंद्रियें किंवा कोणत्याहि प्राण्याचें प्राणादि जें कांहीं आहे तें सर्व याचेंच आहे. कारण हा परमात्मा सर्वात्मक आहे. त्यामुळें तो असंग-उदासीन जरी असला तरी मायावशात् त्याचें सर्वतश्चक्षुरादिक संभवतें आणि त्याला सर्वतश्चक्षुरादिमत्त्व असल्यामुळें सृष्टि-स्थिति-संहार करण्यास तो स्वतंत्र आहे. [बाहुभ्यां संधमति–] धर्माधर्मसंज्ञक दोन बाहूंनीं विश्वाला उत्पन्न करणारा तो उत्पत्तिसमयीं उत्पाद्य-उत्पादकादिरूप विविध शब्द करितो. किंवा बाहूंनीं या सर्वांचा उत्तम प्रकारें संयोग करितो. कारण धातूंचे अनेक अर्थ असतात. ' धम ' हा धातु अग्निसंयोग–संताप देणें या अर्थीं प्रसिद्ध आहे. यास्तव त्या धात्वर्थाला अनुसरून हा धर्माधर्मानुसार सुखदुःखकारी आहे असेंहि व्याख्यान करावें. [पतत्रैः द्यावाभूमी सं जनयन्–] पतनशील पंचीकृत पंचमहाभूतांनीं ब्रह्मांडाचीं

द्यावा-पृथिवीरूप दोन कपालें उत्पन्न करणारा—अर्थात् त्यांची स्थिति व संहारहि करणारा हा [देवः एकः—]स्वयंप्रकाश देव एक आहे.३.—पण हा ईश्वर अचेतनांचा उत्पादक आहे, चेतनांचा नाहीं, असें कोणी समजेल, म्हणून श्रुति म्हणते—

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च विश्वाधिपो रुद्रो महर्षिः ।
हिरण्यगर्भं जनयामास पूर्वं स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥ ४

अन्वयार्थ—[यः देवानां प्रभवः च उद्भवः च—] जो प्रसिद्ध परमात्मा वागादि किंवा अग्न्यादि देवांचा प्रभव—उत्पत्ति, उद्भव—स्थिति व संहार आहे, [विश्वाधिपः—] सर्व विश्वाचा अधिपति—पालक, [रुद्रः—] अविद्यानाशक, [महर्षिः—] महान् ऋषि—सर्वज्ञ आहे. [हिरण्यगर्भं पूर्वं जनयामास—]—ज्यानें जगदुत्पत्तीच्या पूर्वी हिरण्यगर्भाला—ज्ञानक्रियाशक्त्यात्मक सूक्ष्मतम चैतन्याधिष्ठित प्रथम कार्याला उत्पन्न केलें [सः—] तो हिरण्यगर्भोत्पादक [नः शुभया बुद्ध्या संयुनक्तु—] आम्हांला ब्रह्मविषयक बुद्धीनें संयुक्त करो.४.—मंत्रद्रष्टा ऋषि त्या हिरण्यगर्भाच्या उत्पादकाची प्रार्थना करितो—

या ते रुद्र शिवा तनूरघोराऽपापकाशिनी ।
तया नस्तनुवा शंतमया गिरिशन्ताभिचाकशीहि ॥ ५

अन्वयार्थ—[रुद्र या ते शिवा अघोरा अपापकाशिनी तनूः—] हे अविद्यानाशक रुद्रा, जी तुझी मंगलरूप, अरौद्र, पुण्यप्रकाशिका तनु—मूर्ति [तया शंतमया तनुवा—] त्या अतिशय सुखरूप तनूनें [गिरिशंत—] हे पर्वतावर बसून सुख वाढविणाऱ्या रुद्रा, [नः अभिचाकशीहि—] आम्हांला सर्वतः प्रकाशित कर—आमचें कल्याण कर. ५.

यामिषुं गिरिशंत हस्ते बिभर्ष्यस्तवे । शिवां
गिरित्र तां कुरु मा हिꣳसीः पुरुषं जगत् ॥ ६

अन्वयार्थ—[गिरिशंत—] हे गिरिशंता, [अस्तवे यां इषुं हस्ते बिभर्षि—] पापी लोकांवर टाकण्यासाठीं ज्या बाणाला तूं आपल्या हातांत धारण करितोस [गिरित्र तां शिवां कुरु—] हे पर्वताचें किंवा अस्थिपंजररूप देहाचें रक्षण करणाऱ्या, त्या बाणाला मंगलरूप कर. [पुरुषं मा हिंसीः—] आमच्या पुत्रादि पुरुषाची हिंसा करूं नको [जगत्—] व या स्थावर-जंगमात्मक जगाचीहि हिंसा करूं

नको. ६.—आतां त्याचेंच कारणरूपानें अवस्थान सांगून श्रुति ज्ञानानें अमृतत्व-प्राप्ति होते, असें सांगते—

ततः परं ब्रह्म परं बृहन्तं यथानिकायं सर्वभूतेषु गूढम् ।
विश्वस्यैकं परिवेष्टितारमीशं तं ज्ञात्वामृता भवन्ति ॥ ७

अन्वयार्थ—[ततः परं ब्रह्म—] त्या कार्यब्रह्मरूप हिरण्यगर्भाहून कारण ब्रह्म पर—व्यापक आहे. आतां 'ब्रह्म-'शब्दाचा अर्थ—[परं बृहन्तं—] अतिशय अधिक—देश-काल-वस्तुपरिच्छेदशून्य—महद्व्यापी आहे. [यथानिकायं सर्व-भूतेषु गूढं—] तें जसा जसा स्थूल, सूक्ष्म, मनुष्य, पशु, पक्षी, कीट इत्यादि देह असेल तसें तसें होऊन, त्याच्या आंत गुप्त राहिलें आहे. [विश्वस्य परिवेष्टितारं एकं तं ईशं ज्ञात्वा अमृताः भवन्ति—] सर्व विश्वाच्या—चराचर जगाच्या संहर्त्याला—आत्मयाथात्म्यज्ञानानें विश्वाचा उपसंहार करणाऱ्या किंवा सर्व जगाला आपल्या स्वरूपांत धारण करणाऱ्या त्या एक—अद्वितीय ईश्वराला आत्मत्वानें जाणून मरणशून्य होतात. ७.—आतां मंत्रद्रष्टा आपला अनुभव सांगून त्या पूर्ण आनंदात्म्याला जाणल्यानेंच परम पुरुषार्थाची सिद्धि होते, ज्ञानावांचून मोक्ष नाहीं, असें निश्चयपूर्वक सांगतो—

वेदाहमेतं पुरुषं महान्तमादित्यवर्णं तमसः परस्तात् ।
तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥ ८

अन्वयार्थ—[अहं एतं पुरुषं महान्तं आदित्यवर्णं तमसः परस्तात् वेद—] मी—मंत्रद्रष्टा या परिपूर्ण, सर्वांहून अधिक—व्यापक, सूर्याप्रमाणें ज्याचा वर्ण आहे अशा—स्वयंप्रकाश, अविद्यातमाच्या अगदीं पलीकडे—तमःसंबंधरहित ब्रह्माला जाणतों. ('अहोपण, आत्मज्ञानासाठींच इतका यत्न कशाला करावयास पाहिजे, सुखप्राप्ति व दुःखनिवारण यांचे दुसरे अनेक उपाय आहेत ' उत्तर—) [तं एव विदित्वा—] त्या ब्रह्मरूप आत्म्यालाच साक्षात् जाणून [अतिमृत्युं एति—] मृत्यु म्ह० आवरणशक्ति—विक्षेप उत्पन्न करणारी, दुःखवृक्षाचें बीज, मरणादि-परंपरा देणारी अविद्या.तिचें—त्या अविद्यामृत्यूचें उल्लंघन करून जातो [अयनाय अन्यः पन्थाः न विद्यते—] संसारसागराच्या परतीरास जाण्याचा—अविद्यानिवृत्तीचा दुसरा मार्ग—आत्मज्ञानाहून निराळा उपाय नाहीं. ८.—आत्म्याचेंच स्वरूप—

यस्मात्परं नापरमस्ति किंचिद्यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति कश्चित् ।
वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकस्तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम् ॥ ९

अन्वयार्थ—[यस्मात् परं अपरं च किंचित् न अस्ति–] ज्या आत्म्याहून उत्कृष्ट किंवा अपकृष्ट दुसरें कांहीं नाहीं. कारण त्याहून भिन्न वस्तुच नाहीं. [यस्मात् अणीयः न ज्यायः न कश्चित अस्ति–] ज्याहून अत्यंत अणु–अल्प किंवा अधिक मोठें असें कांहीं नाहीं. कारण तो आत्मा अणूंहून अत्यंत अणु –सूक्ष्म व महत्-हून अत्यंत महान् आहे. [वृक्षः इव स्तब्धः दिवि एकः तिष्ठति–] तो एखाद्या महा वृक्षाप्रमाणें स्तब्ध–निश्चल स्वयंप्रकाश स्वरूपांत सर्वभेदशून्य राहतो. ' तर मग तो वृक्षासारखा परिच्छिन्न असेल ! ' नाहीं– [तेन पुरुषेण इदं सर्वं पूर्णं–] त्या एका आत्माख्य पुरुषानें हें सर्व विश्व भरलें आहे. ९.–आतां ब्रह्मालाच कार्य-कारणत्व आहे हिरण्यगर्भाला नाहीं, असें सांगून ज्ञान्यांना मोक्ष व अज्ञांना संसारित्व प्राप्त होतें असें श्रुति सांगते––

ततो यदुत्तरतरं तदरूपमनामयम् । य एतद्विदु-
रमृतास्ते भवन्त्यथेतरे दुःखमेवापियन्ति ॥ १०

अन्वयार्थ—[ततः यत् उत्तरतरं–] त्या हिरण्यगर्भाहून किंवा या जगाहून जें पूर्ण ब्रह्म अधिक उत्तर म्ह० पूर्व-कारणांचेंहि कारण, [तत् अरूपं अनामयं–] तें रूपरहित व दुःखनिमित्त जी अविद्या तिनें राहित–अविद्याशून्य आहे. [ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति–] जे या ब्रह्माला जाणतात ते अमृत–अमरणधर्मी होतात. [अथ इतरे दुःखं एव अपियन्ति–] पण त्यांहून निराळे अज्ञानी दुःखालाच–संसारालाच प्राप्त होतात. १०. आत्म्याचें सर्वात्मकत्व दाखवून भेदबुद्धि घालवितात––

सर्वाननशिरोग्रीवः सर्वभूतगुहाशयः । सर्व-
व्यापी स भगवांस्तस्मात्सर्वगतः शिवः ॥ ११

अन्वयार्थ—[सर्वाननशिरोग्रीवः–] सर्व मुखें, मस्तकें व ग्रीवा–माना ज्याच्या आहेत म्ह० जो आत्माच सर्व प्राण्यांचे मुखादि अवयव आहे, तथापि तो शरीररूप नव्हे, कारण–[सर्वभूतगुहाशयः–] सर्वभूतांच्या गुहेंत म्ह० बुद्धींत राहतो, [सः भगवान् सर्वव्यापी–] तो सर्व ऐश्वर्यादिसंपन्न असलेला–भगवान्

सर्वव्यापी आहे [तस्मात् सर्वगतः शिवः—] त्यामुळेंच सर्वत्र प्राप्त व मंगलस्वरूप आहे. ११.—आतां त्याचें मंगलत्व अमर्याद आहे, असें श्रुति सांगते—

महान्प्रभुर्वै पुरुषः सत्त्वस्यैष प्रवर्तकः ।
सुनिर्मलामिमां प्राप्तिमीशानो ज्योतिरव्ययः ॥ १२

अन्वयार्थ—[महान्—] अतिशय अधिक मंगलरूप [प्रभुः वै—] प्रसिद्ध समर्थ, कारण [पुरुषः—] तो परिपूर्ण आहे. [एषः सत्त्वस्य प्रवर्तकः—] हा स्वप्रकाश—चिदानन्दरूप आत्मा सत्त्वाचा—अन्तःकरणाचा—ज्ञान-क्रियाशक्तिरूप हिरण्यगर्भाचा प्रवर्तक—उत्पादक आहे [सुनिर्मलां इमां प्राप्तिं ईशानः—] अत्यंत निर्मल—अविद्यामलरहित, मोक्षरूप, विद्वानांच्या प्रत्यक्ष अनुभवास येणारी, अशी जी प्राप्ति—परम पदप्राप्ति तिचा ईश्वर [ज्योतिः अव्ययः—] स्वयंप्रकाश ज्योतिःस्वरूप व अविनाशी आहे. १२.—त्याच्या सर्व-भूतगुहाशयत्वाचें उपपादन—

अङ्गुष्ठमात्रः पुरुषोऽन्तरात्मा सदा जनानां हृदये संनिविष्टः ।
हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ १३

अन्वयार्थ—[अंगुष्ठमात्रः—] आत्म्याच्या अभिव्यक्तीचें स्थान जें हृदयछिद्र त्याच्या अपेक्षेनें अंगुष्ठप्रमाण [पुरुषः—] पूर्णत्वामुळें किंवा शरीरपुरांत राहत असल्यामुळें पुरुष [अन्तरात्मा—] सर्वभूतांच्या बुद्धीत राहणारा, [अंगुष्ठमात्रत्वाविषयीं उपपत्ति—) [जनानां हृदये सदा संनिविष्टः—] उत्पन्न होणाऱ्या प्राण्यांच्या हृदयकमलांत सर्वदा चांगल्याप्रकारें बसलेला, ('अहोपण, सर्व शरीरांत प्रविष्ट झालेला तो नुस्त्या शरीरांतच संनिविष्ट कसा ?' उत्तर—) [मनीषा हृदा मनसा अभिक्लृप्तः—] मनाचें नियमन करणाऱ्या हृदयानें म्ह० संकल्पविकल्प करणाऱ्या मनाचें नियमन करणाऱ्या अन्तःकरणानें सर्वतः कल्पिलेला—सर्व शरीरांत प्रविष्ट झालेला असला तरी अंगुष्ठप्रमाण हृदय छिद्रांत कल्पिलेला आहे. [ये एतत् विदुः ते अमृताः भवन्ति—] जे अधिकारी या निरुपाधिक परमानंदस्वप्रकाश आत्मस्वरूपाला साक्षात् जाणतात ते अमृत होतात. १३.—अंगुष्ठमात्रत्व सांगितल्यामुळें प्राप्त झालेल्या अल्पत्वाचें सर्वात्मत्वकथनानें निवारण—

सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स
भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ १४

अन्वयार्थ—[सहस्रशीर्षा–] ज्याला अनंत मस्तकें आहेत असा [पुरुषः–] परिपूर्ण–पुरुष [सहस्राक्षः सहस्रपात्–] अनन्तचक्षु, अनन्तचरण, [सः भूमिं विश्वतः वृत्त्वा–] तो सहस्रशीर्षादि पुरुष या ब्रह्मांडकटाहरूप पृथ्वीला सर्वतः–सर्भोवार आच्छादित करून [दशांगुलं अत्यातिष्ठत्–] त्याच्या पलीकडे अनंत प्रमाणानें व्यापून राहिला आहे. त्याची व्याप्ति अपरिमित आहे. किंवा नाभीच्या वर दशांगुल अन्तरावर असलेल्या अंगुष्ठप्रमाण हृदयांत अधिष्ठित आहे, तेथें उपलब्ध होतो. किंवा भूमीला सर्वतः व्यापून स्थित आहे. कारण तो सर्वांचें उल्लंघन करून सर्वांच्या पलीकडे आहे. १४–' जर हा सर्वांचें उल्लंघन करून स्थित आहे तर त्याहून भिन्न असेल !' उत्तर—

पुरुष एवेदꣳसर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ १५

अन्वयार्थ—[यत् भूतं यत् च भव्यं तत इदं सर्वं पुरुषः एव–] जें भूतकालीन कार्यजात, जें भविष्यत्कालीन कार्यजात व जें हें वर्तमानकालीन कार्यजात तें सर्व हा परिपूर्ण पुरुषच आहे. (' तर मग हा ईश्वर नव्हे. तो संसाररूप आहे ! ' उत्तर–) [उत अमृतत्वस्य ईशानः–] तो मोक्षाचाहि ईश्वर आहे. अर्थात् या सर्वांचा तर ईश्वर आहेच आहे. [यत् अन्नेन अतिरोहति–] कारण हा भक्षणीय अन्नाच्या योगानें अधिक वृद्धि पावतो. (त्यानेंच ' अमुक पदार्थानें अमुक स्वभावाचें व्हावें,' असा नियम केला आहे. पदार्थांच्या स्वभावाचें नियमन तोच करितो. म्हणून ईश्वर होय.) १५. –तथापि हा भगवान् निर्विशेष आहे, असें वर्णन—

सर्वतःपाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १६

अन्वयार्थ—[तत सर्वतः पाणिपादं सर्वतोऽक्षिशिरोमुखं सर्वतः श्रुतिमत् लोके सर्वं आवृत्य तिष्ठति–] तें ईश्वरस्वरूप सर्वतः ज्याला हात-पाय, सर्वतः नेत्र-मस्तक-मुख आहेत, असें आहे. तें सर्वतः श्रोत्रयुक्त असून या कर्मफलरूप संसारांत आपल्या ब्राह्मरूपानें सर्वांला आच्छादित करून राहतें. अर्थात सर्वात्मत्वामुळें त्याची अन्नानें अतिवृद्धि होते. देहाप्रमाणें नव्हे.–सु. मी. पृ २४९–पहा.१६. –श्रुति त्याचें इंद्रियात्मत्व सांगून इंद्रियज्ञानरूपत्व व विषयरूपत्व सांगते–

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् । सर्वस्य प्रभुमीशानं सर्वस्य शरणं बृहत् ॥ १७

अन्वयार्थ—[सर्वेंद्रियगुणाभासं–] सर्व इंद्रियांचे गुण म्ह० त्यांच्या वृत्ति रूपादि ज्ञानें व आभास म्ह० घटादि विषयस्फुरण, त्यांवरून त्याचा आश्रय घटादिक लक्षित होतो. अर्थात् सर्व इंद्रियांचे गुण व आभास ज्याच्यामध्यें तादात्म्यानें स्थित आहेत, तें सर्वेंद्रियगुणाभास, किंवा अन्तर्बाह्य इंद्रियांच्या निश्चय-संकल्प-श्रवणादि गुणांनीं तें गुणयुक्त असल्यासारखें भासतें म्हणून सर्वेंद्रियगुणाभास, तें तत्त्व जणुंकाय सर्वेंद्रियांच्या व्यापारांनीं व्यापारयुक्त असल्यासारखें भासतें. पण वस्तुतः तें [सर्वेंद्रियविवर्जितं–] सर्व इंद्रियांनीं रहित आहे. त्यामुळें त्याचा इंद्रियव्यापार वास्तविक नव्हे. (सु. गी. पृ. २५० पहा.) [सर्वस्य प्रभुं ईशानं–] सर्व समर्थ व त्या सामर्थ्यामुळेंच सर्व चराचर जगाचें नियंतृ–नियमन करणारें [सर्वस्य बृहत् शरणं–] सर्वांचा फार मोठा आश्रय, तें ईश्वरस्वरूप आर्तांचें रक्षण करणारें आहे. 'बृहत्' या पदाच्या जागीं 'सुहृत्' असा पाठ आहे. त्याचा अर्थ–'सर्व चराचरांवर निरपेक्ष उपकार करणारें' असा करावा. १७.–याप्रमाणें तत्पदार्थ सांगून श्रुति 'त्वं-'पदार्थ सांगते–

नवद्वारे पुरे देही हंसो लेलायते बहिः । वशी सर्वस्य लोकस्य स्थावरस्य चरस्य च ॥ १८

अन्वयार्थ—[नवद्वारे पुरे देही–] दोन कान, दोन नेत्र, दोन नासिकापुटें व मुख अशीं शरीरांतील सात द्वारें व दोन अधोमुख द्वारें–पायु-उपस्थ अशा नऊ द्वारांनी–छिद्रांनीं युक्त असलेल्या पुरांत–धातूंनीं भरलेल्या शरीरांत देहसंबंधी–विज्ञानात्मा [हंसः–] बुद्ध्युपाधि होऊन जातो तो हंस किंवा अविद्याकार्याला मारतो तो हंस [लेलायते–] चालतो–जातो. कोठें ? [बहिः–] रूपादिकांमध्यें बहिर्मुख होऊन विषयग्रहणासाठीं जातो. जो हंस तोच [सर्वस्य स्थावरस्य चरस्य च लोकस्य वशी–] सर्व स्थावर व चर लोकाचा व जडाचाहि वशी आहे. सर्व त्याच्या अधीन आहे. १८.–याप्रमाणें सर्वात्मक ब्रह्माचें प्रतिपादन केलें. आतां निर्विकार आनंदरूपानें व अस्तोदयशून्य ज्ञानरूपानें अवस्थित असलेल्या परमात्म्याचें प्रदर्शन करण्यासाठीं श्रुति म्हणते—

अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः। स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम्॥ १९

अन्वयार्थ—[अपाणिपादः—] तो कर-चरणरहित, पण [जवनः—] वेगवान् व [ग्रहीता—] ग्रहण करणारा [अचक्षुः पश्यति—] चक्षूरहित असूनहि पाहतो. [सः—] जीवाभिन्न ईश्वर—स्वयंप्रकाश चिदानन्दस्वरूप आत्मा [अकर्णः शृणोति—] कर्णरहित असून ऐकतो. [सः वेद्यं वेत्ति—] तो सर्व वेद्यवस्तुजात जाणतो. [च तस्य वेत्ता न अस्ति—] पण त्याचा वेत्ता—ज्ञाता, त्याला जाणणारा कोणी नाही. [तं अग्र्यं पुरुषं महान्तं आहुः—] ब्रह्मवेत्ते सर्वांचें कारण असल्यामुळें सर्वांच्या पूर्वी—प्रथम असलेल्या त्या परिपूर्ण पुरुषाला सर्वांहून अधिक म्हणतात. १९.—पुनः त्याचेंच स्वरूप सांगून महत्पुण्याच्या उदयामुळें ईश्वरानुग्रह होणें हेंच आत्मसाक्षात्कारचें कारण श्रुति सांगते—

अणोरणीयान्महतो महीयानात्मा गुहायां निहितोऽस्य जन्तोः। तमक्रतुं पश्यति वीतशोको धातुः प्रसादान्महिमानमीशम्॥ २०

अन्वयार्थ—[अणोः अणीयान्—] तो अणूहून अतिशय अणु—सूक्ष्म व [महतः महीयान्—] महत्-हून अतिशय महान्, [आत्मा—] असा सर्वान्तर्यामी आत्मा [अस्य जन्तोः गुहायां निहितः—] या ब्रह्मादि-स्तंबपर्यंत प्राण्यांच्या बुद्धिरूप गुहेंत स्थित आहे. [तं अक्रतुं—] त्या सर्वसंकल्परहित [महिमानं—] अधिक गुणरूप [ईशं—] नियंत्यास [वीतशोकः—] ज्याची अविद्या निवृत्त झाली आहे तो [पश्यति—] साक्षात् 'तो मी आहें' असें पाहतो. किंवा जो त्या विषयभोगसंकल्परहित [महिमानं—] आत्म्याच्या महिम्याला [ईशं—] कर्मनिमित्त वृद्धि-क्षयशून्य ईश्वराला साक्षात आत्मरूपानें जाणतो तो शोकरहित होतो. साक्षात्कारचें कारण—[धातुः प्रसादात्—] ईश्वराच्या प्रसादामुळें पाहतो. ईश्वर प्रसन्न झाला असतां त्याच्या स्वरूपाचें ज्ञान होतें. २०.—याविषयीं मंत्रद्रष्टा आपला अनुभव सांगतो—

वेदाहमेतमजरं पुराणं सर्वात्मानं सर्वगतं विभुत्वात्। जन्मनिरोधं प्रवदन्ति यस्य ब्रह्मवादिनो हि प्रवदन्ति नित्यम्॥ २१

इति श्वेताश्वतरोपनिषदि तृतीयोऽध्यायः॥३

अन्वयार्थ—[अहं एतं अजरं पुराणं सर्वात्मानं वेद–] मी या जरारहित, सर्वदा एकरूप सर्वात्म्याला जाणतों. कारण तो अजर असल्यामुळें पुराण–सदा एकरूप व पुराण असल्यामुळें सर्वात्मा, [विभुत्वात् सर्वगतं–] विभु–व्यापी असल्यामुळें सर्वगत–सर्वत्र प्राप्त, अंशा आत्म्याला मी जाणतों. पण मूढ–अविवेकी [यस्य जन्मनिरोधं प्रवदन्ति–] या आत्म्याचा जन्म व नाश होतो, असें सांगतात. [ब्रह्मवादिनः हि नित्यं प्रवदन्ति–] तथापि आत्मसाक्षात्कारवान् त्या प्रसिद्ध आत्म्याला नित्य सांगतात. आत्मतत्त्व जन्म-मरणशून्य अविनाशी आहे, असा याचा भावार्थ. किंवा ब्रह्मवेत्ते याचा नित्य जन्माभाव सांगतात. २१. (३).

अथ चतुर्थोऽध्यायः ।

–हा परमात्मरूपी अर्थ अति गहन असल्यामुळें पुनः पुनः सांगावा, म्हणून चवथा अध्याय आरंभिला जातो—

य एको वर्णो बहुधा शक्तियोगाद्वर्णाननेकान्निहितार्थो दधाति । विचैति चान्ते विश्वमादौ स देवः स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु । १

अन्वयार्थ—[यः एकः वर्णः निहितार्थः अनेकान् वर्णान् बहुधा शक्तियोगात् दधाति–] जो एक वर्ण–पदार्थ (किंवा अवर्ण असें पद तोडून जो एक जात्यादि वर्णरहित–निर्विशेष परमात्मा) ज्याला कोणत्याहि प्रयोजनाची अपेक्षा नाहीं, असा स्वार्थनिरपेक्ष होत्साता अनेक चिज्जडरूप पदार्थांस विविधशक्तिवशात् धारण करितो.[आदौ विश्वं व्येति च–]आरंभीं–सृष्टीच्या पूर्वी चराचर विश्वाला प्राप्त होतो. [सः अन्ते च–] तो अन्त–प्रलयकालीं व मध्यावस्थेतहि त्यास प्राप्त होतो, [सः देवः नः शुभया बुद्ध्या संयुनक्तु–] तो स्वप्रकाश परमात्मा आम्हांला शुभ–परमात्मविषयक बुद्धीनें संयुक्त करो. १.–ज्याअर्थी तोच स्रष्टा व लयकर्ता आहे त्याअर्थी तोच सर्व आहे. त्याहून भिन्न कांहीं नाहीं, असें तीन मंत्रांनीं श्रुति सांगते—

तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चन्द्रमाः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदापस्तत्प्रजापतिः ॥ २

अन्वयार्थ—[तत एव अग्निः—] तें आत्मतत्त्वच अग्नि आहे, [तत आदित्यः०—] तेंच आदित्य, तेंच वायु व तेंच चंद्रमा आहे. [तदेव शुक्रं—] तेंच अत्यंत शुद्ध असलेलें सर्व पदार्थजात, [तत् ब्रह्म—] तेंच हिरण्यगर्भ [तत् आपः—] तेंच जल व [तत प्रजापतिः—] तेंच प्रजापालक विराड् आहे. २.

त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी । त्वं
जीर्णो दण्डेन वञ्चसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥ ३

अन्वयार्थ—[त्वं स्त्री त्वं पुमान् असि—] तूंच स्त्री व तूंच पुरुष आहेस. [त्वं कुमारः उत वा कुमारी—] तूंच कुमार व कुमारीहि आहेस. [त्वं जीर्णः दण्डेन वञ्चसि—] तूं वृद्ध होऊन हातांत काठी घेऊन चालतोस, [त्वं जातः—] तूं उत्पन्न होऊन सत्तेचा अनुभव घेतोस व [विश्वतोमुखः भवसि—] सर्वतोमुख होतोस—नाना अवस्थांस प्राप्त होतोस. म्ह० स्त्री, पुरुष इत्यादि नांवांचा व प्रत्ययांचा विषय तूंच आनन्दात्मा आहेस. ३.

नीलः पतङ्गो हरितो लोहिताक्षस्तडिद्गर्भ ऋतवः समुद्राः ।
अनादिमत्त्वं विभुत्वेन वर्तसे यतो जातानि भुवनानि विश्वा ॥ ४

अन्वयार्थ—[हरितः नीलः—] हिरव्या दूर्वांकुरासारखा नीलवर्ण, [लोहिताक्षः—] रक्तनयन, [पतंगः—] शुकादिक पक्षी तूंच आहेस, [तडिद्गर्भः—] ज्याच्या उदरांत विद्युत् आहे तो तूं मेघ आहेस. [ऋतवः समुद्राः—] वसंतादि ऋतु व समुद्र आहेस. (किंवा तूं हरित-नीलवर्ण, तडिद्गान्, ऋतु व समुद्र ज्याचे पंख आहेत असा पक्षी आहेस.) [त्वं अनादिमत्—] तूं आदिमान् नाहींस. तुझें कांहीं कारण नाहीं. [विभुत्वेन वर्तसे—] तूं विभुत्वानें राहतोस. [यतः विश्वा भुवनानि जातानि—] ज्याच्यापासून कर्मफलरूप सर्व भुवनें उत्पन्न झालीं आहेत. ४.—आतां छान्दोग्यांत प्रसिद्ध असलेल्या तेज-अप्-अन्नरूप प्रकृतीचें अजारूपानें वर्णन—

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः ।
अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ॥ ५

अन्वयार्थ—[अजां—] बकरी—उत्पन्न न होणारी—अनादि म्हणून अजा [एकां—] तीहि एकच, [लोहितशुक्लकृष्णां—] तेज-अप्-अन्नस्वरूप—तेजाचें लोहित, आपाचें शुक्ल व अन्नाचें कृष्णरूप आहे, असें छांदोग्यांत सांगितलें आहे. (पृ. ४२६ पहा) [सरूपाः बह्वीः प्रजाः सृजमानां—] आपल्या आकाराची विविध प्रजा उत्पन्न करणारी अशा त्या अजेचा—अनादि अविद्यात्मक प्रकृतीचा [एकः अजः हि जुषमाणः अनुशेते—] एक अज—अनादि-काम-कर्म-वासनांनीं बद्ध झालेला विज्ञानात्मा जीव ' मीच हें सर्व ' असें मानणारा तिचें सेवन करीत राहतो. तिच्या द्वारा सुख-दुःखानुभव घेत राहतो. पण [अन्यः—] दुसरा—ज्यानें आचार्योपदेशरूप प्रकाशानें अविद्यांधकार घालविला आहे असा अधिकारी अज—ईश्वर [भुक्तभोगां एनां—] जिनें भोग घेतला आहे, अशा या अजेचा त्याग करितो. (आत्मा असंग-उदासीन व निर्गुण आहे. त्याची शक्ति मायाहि जर तशीच कल्पिली तर चराचर जगाची उत्पत्ति कारणावांचून—असत्-पासूनच झाली, असें म्हणावें लागेल. मग तसल्या—असंग-उदासीन-निर्गुण मायेची कल्पनाच करण्याचें कारण रहात नाहीं. यास्तव जसें कार्य तशाच मायेची—प्रकृतीची कल्पना करणें भाग आहे. प्रत्येक कार्यामध्यें त्रैगुण्य दिसतें. यास्तव त्याचें कारण जी माया तीहि तशीच त्रिगुणात्मिका असली पाहिजे. अविद्यावान् जीव तिच्यामध्यें आसक्त होऊन राहतो व विद्यावान् तिचा त्याग करितो; अज्ञ जीव बद्ध आहे व ज्ञानी मुक्त—ईश्वर आहे. सु.ब्र.पृ.११०पहा.)

५.—आतां श्रुति परमार्थवस्तूचा निश्चय करण्यासाठीं सूत्रभूत दोन मंत्रांचा उपन्यास करिते—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्योऽभिचाकशीति ॥ ६

अन्वयार्थ—[द्वा—] दोन—विज्ञानात्मा व परमात्मा [सुपर्णा—] ज्यांचें पतन—गमन शोभन आहे असे किंवा पक्षिसादृश्यामुळें जे दोन सुपर्ण—सुंदर पंखांनीं युक्त असे पक्षी [सयुजा—] सर्वदा संयुक्त असलेले [सखाया—] समान आख्यानाचे—ज्यांच्या अभिव्यक्तीचें कारण समान—एकच आहे, असे दोघे (येथें ' द्वा सुपर्णा सयुजा सखाया ' असे छांदस प्रयोग आहेत. त्याचे ' द्वौ सुपर्णा सयुजौ सखायौ' असे लौकिक प्रयोग समजावे.) अशाप्रकारचे ते दोन पक्षी

[समानं वृक्ष परिषस्वजाते–] एकाच वक्षाचा म्हणजे विनाश पावणाऱ्या शरीराचा सर्वतः आश्रय करून राहिले आहेत. (विनाश–छेद पावणें या सादृश्यामुळें शरीराला येथें वृक्ष म्हटलें आहे.) [तयोः अन्यः स्वादु पिप्पलं अत्ति–] त्या दोघांतील एक अविद्या-काम-वासनाश्रय लिंगोपाधि विज्ञानात्मा सुखदुःखरूप–अनेक विचित्र वेदना-अनुभवात्मक कर्मफल खातो–भोगतो–अविवेकामुळें विचित्र कर्मफलाचा अनुभव घेतो व [अन्यः अनश्नन् अभिचाकशीति–] दुसरा नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभाव परमेश्वर तसें कर्मफल न भोगितां केवल तें–सर्व जीवांचा संसारानुभव–पहात राहतो. ६.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥ ७

अन्वयार्थ—[समाने वृक्षे निमग्नः पुरुषः–] त्याच एका वृक्षावर–शरीरांत, भार लादलेला भोपळा जसा समुद्रांत बुडतो त्याप्रमाणें अविद्या-काम-कर्मफलासक्ति यांच्या फार मोठ्या भारानें जड झालेला भोक्ता जीव ' निमग्न ' होतो निश्चयानें देहात्मभावास प्राप्त होतो. ' हें शरीरच मी, अमक्याचा पुत्र, कृश, स्थूल, गुणवान्, निर्गुण, सुखी इत्यादि ' मानूं लागतो. त्यामुळें [अनीशया–] मी कोणाचें कांहीं करण्यास समर्थ नाहीं. माझा पुत्र नष्ट झाला, भार्या मृत झाली, आतां माझ्या जीविताचा काय उपयोग, अशा प्रकारचा जो दीनभाव तीच अनीशा, तिच्या योगानें [शोचति–] संतप्त होतो. [मुह्यमानः–] अविवेकामुळें अनेक प्रकारच्या अनर्थांनीं विचित्रतेस प्राप्त झालेला असा तो संतप्त होतो. पण तोच अनेक जन्मांतील पुण्यसंचयामुळें गुरुकृपेनें साधनसंपन्न होऊन [जुष्टं–] अनेक योगमार्गांनीं सेवा केलेल्या [अन्यं ईशं–] निरुपाधिक–असंसारी सर्वान्तर परमेश्वराला [यदा पश्यति–] जेव्हां ' हाच मी ' अशा आत्मरूपानें पाहतो [अस्य महिमानं इति–] व हें जगत् ही त्याची विभूति –महिमा आहे, असें जाणतो तेव्हां [वीतशोकः–] तो सर्व संसारसंतापरहित होतो. सर्व शोक-सागरांतून मुक्त व कृतकृत्य होतो. हे दोन्ही मंत्र मुंडकांत–पृ. १५३-५४पहा– आले आहेत.७.–आतां श्रुति ब्रह्मज्ञाची कृतार्थता सांगते–

ऋचोऽक्षरे परमे व्योमन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः ।
यस्तं न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥ ८

अन्वयार्थ—[ऋचः अक्षरे–] ऋचा–गायत्र्यादि पादबद्ध वर्ण वेदत्रय वेद्य अक्षरांत अधिष्ठित आहेत. पण तें अक्षर म्हणजे वर्ण नव्हेत तर–[परमे व्योमन्–] परम आकाशात्मक अक्षरांत म्ह० परब्रह्मांत अधिष्ठित आहेत. [यस्मिन् विश्वे देवाः अधिनिषेदुः–] ज्या शब्दाधिष्ठानभूत अक्षरांत अग्न्यादि किंवा वागादिक सर्व देव–अर्थरूप प्रपंच अधिष्ठित–अवस्थित आहेत. [यः तं न वेद किं ऋचा करिष्यति–]जो त्या परमात्म्याला जाणत नाहीं तो ऋग्रूप अपर ब्रह्मशब्दानें काय करणार? नुस्त्या वेदाध्ययनाचा त्याला काय उपयोग होणार?[ये इत् तत् विदुः ते इमे समासते–] पण जे कोणी त्याला जाणतात ते हे विद्वान् कृतकृत्य होऊन राहतात. ८.–आतां त्याच अक्षराचें मायोपाधिक जगत्स्रष्टृत्व व जगन्निमित्तत्त्व श्रुति भिन्न भिन्न सांगते–

छन्दांसि यज्ञाः क्रतवो व्रतानि भूतं भव्यं यच्च वेदा वदन्ति ।
अस्मान्मायी सृजते विश्वमेतत्तस्मिंश्चान्यो मायया संनिरुद्धः ॥ ९

अन्वयार्थ—[छन्दांसि–] ऋग्यजुः-साम-अथर्वांगिरससंज्ञक वेद [यज्ञाः–] देवयज्ञादिक यूपसंबंधरहित विहित क्रिया [क्रतवः–] ज्योतिष्टोमादि क्रिया, [व्रतानि–] चांद्रायणादि व्रतें, [भूतं भव्यं यत् च–] भूत, भविष्यत् व वर्तमान वस्तुजात [वेदा वदन्ति–] वेद सांगतात [विश्वं एतत्–] तें हें सर्व विश्व [अस्मात् मायी सृजते–] या अक्षर ब्रह्मापासून मायावी ईश्वर उत्पन्न करितो. कूटस्थ ब्रह्माचेंहि स्वशक्तिवशात् सर्वस्रष्टृत्व उपपन्न होतें. [च मायया अन्यः तस्मिन् संनिरुद्धः–] व मायेमुळेंच जणुंकाय अन्य–निराळा भोक्ता बनून तो मायाकल्पित भूतादिप्रपंचांत बद्ध–अविद्यावशवर्ती होऊन संसार-सागरांत भ्रमण करितो. (अविद्येनें सर्वथा बद्ध झालेला व त्यामुळेंच ईश्वराहून जणुंकाय भिन्न वाटणारा जीव धर्माधर्मवशात् संसार करितो.) ९.–पूर्वोक्त प्रकृतीचें मायात्व, तदधिष्ठातृ सच्चिदानन्द ब्रह्माचें त्या उपाधिवशात् मायित्व व त्या चिद्रूप आत्म्याच्या मायाकल्पित शरीरेंद्रियसंघातरूप अवयवांनीं जगद्व्यापित्व श्रुति सांगते—

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयवभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ॥ १०

अन्वयार्थ—[प्रकृतिं तु मायां विद्यात्—] 'जगत्प्रकृति' या नांवानें वर जिचा उल्लेख केला आहे त्या प्रकृतीला चिदात्म्याहून अगदीं विलक्षण अशी माया समजावें. प्रकृतीलाच माया जाणावें. [महेश्वरं मायिनं विद्यात्—] महान् ईश्वरालाच मायी—त्या मायेला सत्ता व स्फूर्ति देणारा व अधिष्ठानत्वानें प्रेरक समजावें. [तस्य अवयवभूतैः इदं सर्वं जगत् व्याप्तं तु—] त्या प्रकृत परमात्म्याच्या मायिक अवयवानी हें सर्व जगत् भरलेलेंच आहे. १०—माया व मायाकार्य इत्यादिकांची योनि—कारण अशा कूटस्थाचें अधिष्ठातृत्व, आकाशादि कार्यांचें उत्पत्तिहेतुत्व व त्याच्याच सच्चिदानंदरूपानें साक्षात्कारात्मक ज्ञानानें मुक्ति श्रुति सांगते—

यो योनिं योनिमधितिष्ठत्येको यस्मिन्निदं सं च वि चैति सर्वम्।
तमीशानं वरदं देवमीड्यं निचाय्येमां शान्तिमत्यन्तमेति ॥ ११

अन्वयार्थ—[यः एकः योनिं योनिं अधितिष्ठति—] जो अद्वितीय परमात्मा मूल प्रकृति माया व अवांतर प्रकृति आकाशादिक यांना सत्ता-स्फूर्ति देणारा या रूपानें अन्तर्यामी होऊन राहतो, [यस्मिन् इदं सर्वं सं-एति च वि-एति—] ज्या सर्वाधिष्ठात्यामध्यें—ईश्वरामध्यें हें सर्व जगत् संहारकालीं लय पावतें व पुनः उत्पत्तिसमयी आकाशादिरूपानें नाना—अनेकाकार होतें [तंईशानं वरदं देवं ईड्यं निचाय्य—] त्या नियंत्या, मोक्षप्रद, प्रकाशरूप, वेदादिकांनीं स्तुत्य अशा ईश्वरास निश्चयानें—'मी ब्रह्म आहें' अशा अनुभवाने जाणून [इमां शांतिं अत्यन्तं एति—] या सुषुप्तीत प्रत्यक्ष अनुभविलेल्या सर्व उपरमरूप—सर्वलोकप्रसिद्ध शांतीला—सर्वदुःखशून्य सुखैकरूप मुक्तीला अत्यंत प्राप्त होतो म्ह० अविद्या-तत्कार्यादि विश्वमायानिवृत्तीनें पुनरावृत्तिशून्य अवस्थेला प्राप्त होतो. ११ —सूत्रात्म्याला संमुख सतत पाहणाऱ्या परमेश्वराची अखंडित तत्त्वज्ञानसिद्धीसाठीं प्रार्थना—

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च विश्वाधिपो रुद्रो महर्षिः। हिरण्यगर्भं
पश्यत जायमानं स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥ १२

अन्वयार्थ—[यः देवानां प्रभवः च उद्भवः च०—] जो परमात्मा देवांची उत्पत्ति व स्थिति आहे, जो विश्वाचा पालक, अविद्यानाशक, महान् सर्वज्ञ, जो उत्पन्न होणाऱ्या हिरण्यगर्भाला पाहतो तो आम्हांला शुभ बुद्धीनें संयुक्त करो.

(हा मंत्र तिसऱ्या अध्यायांत एकदा येऊन गेला आहे पृ.९३३ पहा) १२.
—पुनः मुमुक्षूंची प्रार्थना—

यो देवानामधिपो यस्मिँल्लोका अधिश्रिताः। य ईशेऽस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १३

अन्वयार्थ—[यः देवानां अधिपः—] जो देवांचा स्वामी आहे, [यस्मिन् लोकाः अधिश्रिताः—] ज्या सर्वाधिष्ठान परमेश्वरामध्ये भूरादि लोक अध्यस्त आहेत, [यः अस्य द्विपदः चतुष्पदः ईशे—] जो या मनुष्यादि द्विपद व पश्वादि चतुष्पद भूतांचें नियमन करतो [कस्मै देवाय हविषा विधेम—] त्या आनंदरूप स्वयंप्रकाश देवाची आम्ही चरु-पुरोडाशादि द्रव्यानें परिचर्या करितों. (या मंत्रांत मुमुक्षूंनीं चित्तशुद्धीच्या द्वारा तत्त्वज्ञानाची सिद्धि होण्यासाठीं परमेश्वराच्या—ब्रह्मादिदेवांचें स्वामित्व, आकाशादि लोकांचें अधिष्ठानत्व व जीवांचें नियंतृत्व या गुणांचा अनुवाद करून प्रार्थना केली आहे) १३.—परमात्म्याचें अतिसूक्ष्मत्व, जगच्चक्रामध्यें साक्षित्वानें अवस्थितत्व, सर्व जगत्स्रष्टृत्व, सर्वात्मकत्व व त्याच्याशीं तादात्म्य पावलेल्या लोकांची मुक्ति, यांचें या पूर्वी पुष्कळ वर्णन केलें आहे, तथापि त्यांचें ज्ञान सुकर होण्यासाठी पुनः दुसऱ्या शब्दांनी वर्णन—

सूक्ष्मातिसूक्ष्मं कलिलस्य मध्ये विश्वस्य स्रष्टारमनेकरूपम्। विश्वस्यैकं परिवेष्टितारं ज्ञात्वा शिवं शान्तिमत्यन्तमेति ॥ १४

अन्वयार्थ—[सूक्ष्मातिसूक्ष्मं—] पृथिव्यादि उत्तरोत्तर सूक्ष्म-सूक्ष्मतर पदार्थांच्या अपेक्षेनें परमात्मतत्त्व अतिसूक्ष्म आहे [कलिलस्य मध्ये विश्वस्य स्रष्टारं—] अविद्या-अविद्याकार्यात्मक या गहन सृष्टींत तो स्थित आहे, विश्वाचा स्रष्टा, [अनेकरूपं—] उपादान-उपादेयादि अनेक आकार बनलेल्या [विश्वस्य एकं परिवेष्टितारं—] विश्वाचा एक परिवेष्टा—व्यापणारा अशा [शिवं—] सर्व मंगलांच्या मंगलाला [ज्ञात्वा—] साक्षात् जाणून ज्ञानी [शांतिं अत्यन्तं एति—] निरतिशय मुक्तिरूप शांतीला पूर्णपणें प्राप्त होतो. १४.—परमेश्वराचें साक्षिरूपानें अवस्थितत्व, सनकादिक व ब्रह्मादि अधिकारिपुरुषांना आत्मत्वानें प्राप्यत्व व साधनचतुष्टयसंपन्न जीवांची मुक्ति श्रुति सांगते—

स एव काले भुवनस्य गोप्ता विश्वाधिपः सर्वभूतेषु गूढः। यस्मिन् युक्ता ब्रह्मर्षयो देवताश्च तमेवं ज्ञात्वा मृत्युपाशांश्छिनत्ति ॥ १५

अन्वयार्थ—[सः एव काले भुवनस्य गोप्ता—] तोच प्रकृत परमात्मा भूत-कालीन कल्पांतील जीवांच्या संचित कर्माचा परिपाक होण्याच्या वेळीं भुवनाचा तत्तत्कर्मानुरूप रक्षक आहे. [विश्वाधिपः—] विश्वाचा स्वामी व [सर्वभूतेषु गूढः—] ब्रह्मादि-स्तंबपर्यंत सर्व भूतांमध्यें साक्षिरूपानें अवस्थित आहे (यास्मिन् ब्रह्मर्षयः च देवताः युक्ताः—] ज्या चिद्घनानंदामध्यें सनकादि ब्रह्मर्षि व ब्रह्मादि देवता ऐक्य पावल्या आहेत [तं एवं ज्ञात्वा मृत्युपाशान् छिनत्ति—] त्याच ईश्वराला आत्मत्वानें जाणून जीव मृत्युपाशांस—अविद्यातमोरूप पाशांस तोडतो. १५.—परमात्म्याचें अतिसूक्ष्मत्व—आनंदातिशयवत्त्व, निर्दोषवत्त्व, जीवांमध्यें अतिसूक्ष्मत्वामुळें स्वरूपानें अवस्थितत्व, सर्वांना सत्ता-स्फूर्ति देणारा असल्या-मुळें व्यापित्व व त्याच्या एकत्वज्ञानानें पाशाची हानि श्रुति दाखविते—

घृतात्परं मण्डमिवातिसूक्ष्मं ज्ञात्वा शिवं सर्वभूतेषु गूढम् ।
विश्वस्यैकं परिवेष्टितारं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ १६

अन्वयार्थ—[घृतात् परं मंडं इव—] घृतावरील साररूप सायीप्रमाणें [सर्वभूतेषु गूढं अतिसूक्ष्मं शिवं—]सर्व भूतांमध्यें गूढ असलेल्या अतिसूक्ष्म शिवाला [विश्वस्य एकं परिवेष्टितारं देवं ज्ञात्वा—] विश्वाच्या एका परिवेष्टन करणाऱ्या स्वयंप्रकाशाला जाणून [सर्वपाशैः मुच्यते—] सर्व पाशांपासून मुक्त होतो १६.

एष देवो विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये संनिविष्टः ।
हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ १७

अन्वयार्थ—[एषः देवः विश्वकर्मा महात्मा सदा जनानां हृदये संनि-विष्टः—] हा प्रकाशात्मा विश्वकर्मा आहे. म्ह० सर्व विश्व हें याचें मायावशात् कार्य आहे तो व्यापक व सर्व प्राण्यांच्या हृदयांत जलांतील सूर्यप्रतिबिंबाप्रमाणें सदा अवस्थित आहे. [मनीषा हृदा मनसा अभिक्लृप्तः—] मनाचें नियमन कर-णाऱ्या अन्तःकरणानें सर्वतः कल्पिलेला आहे. [ये एतत०—] जे त्याला जाण-तात ते अमृत होतात. (हा उत्तरार्ध तिसऱ्या अध्यायांत आला आहे. पण सर्व-गत असलेल्या त्याला हृदयांत अवस्थितत्व कसें तें सांगण्यासाठीं येथें त्याचा अनुवाद केला आहे.) १७.—हा जीव मुक्त केव्हां होतो तें श्रुति सांगते—

यदातमस्तन्न दिवा न रात्रिर्न सन्न चासच्छिव एव केवलः ।
तदक्षरं तत्सवितुर्वरेण्यं प्रज्ञा च तस्मात्प्रसृता पुराणी ॥ १८

अन्वयार्थ—[यदा अतमः—] जेव्हां तो परमात्मा विद्येनें अविद्यातमाचा नाश करून केवल आत्मस्वरूपानें अवस्थित होतो किंवा जेव्हां [न तमः—] तो तम नाहीं, 'तर मग तमाच्या अभावीं दिवस असेल' नाहीं—[न दिवा—] दिवसहि नाहीं, [न रात्रिः—] रात्र नाहीं, [सत् न च असत् न—] तो कार्यकारणात्मक सत् नाहीं व तदभावरूप असत्हि नाहीं तर [केवलः शिवः एव—] केवल—निरुपाधिक शिवच आहे. [तत् अक्षरं—] तें अविनाशी स्वरूप आहे. [तत् सवितुः वरेण्यं—] तें आदित्यमंडलाभिमानी देवाचें सेवनीय तत्त्व आहे. [तस्मात्—] अशा प्रकारें तें अतिशय शुद्ध असल्यामुळें त्याच्यापासूनच [पुराणी प्रज्ञा प्रसृता—] गुरूपदेशामुळें 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यापासून उत्पन्न होणारी अनादिसिद्ध बुद्धि संन्याशांमध्यें विशेषेंकरून व्यक्त होते.—१८.तें कोठेंहि अग्राह्य, अद्वितीय असल्यामुळें अनुपम व अपरिच्छिन्न यशोरूप आहे, असें श्रुति सांगते—

नैनमूर्ध्वं न तिर्यञ्चं न मध्ये परिजग्रभत् । न
तस्य प्रतिमा अस्ति यस्य नाम महद्यशः ॥ १९

अन्वयार्थ—[एनं न ऊर्ध्वं न तिर्यञ्चं न मध्ये परिजग्रभत्—] तो परमात्मा, अपरिच्छिन्न, निरंश वगैरे असल्यामुळें त्याचें वर, खालीं, सभोंवार व मध्यभागीं ग्रहण करितां येत नाहीं. [तस्य प्रतिमा न अस्ति—] तो अखंड सुखानुभवरूप व अद्वितीय असल्यामुळें त्याला प्रतिमा—उपमा नाहीं. [यस्य नाम महत् यशः—] ज्याचें नांव 'महत् यश'—सर्वत्र परिपूर्ण कीर्ति आहे १९. —ईश्वराचें अविषयत्व, प्रत्यग्रूपत्व व त्याच्या ऐक्यज्ञानानें मोक्ष श्रुति सांगते—

न संदृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ।
हृदा हृदिस्थं मनसा य एनमेवं विदुरमृतास्ते भवन्ति ॥ २०

अन्वयार्थ—[अस्य रूपं संदृशे न तिष्ठति—] या ईश्वराचें निर्विशेष स्वरूप चक्षुरादि इंद्रियांच्या विषयामध्यें स्थित होत नाहीं. तें इंद्रियाचा विषय होत नाही. [कश्चन एनं चक्षुषा न पश्यति—] कोणी याला चक्षूनें पहात नाहीं. [ये मनसा हृदा हृदिस्थं एनं एवं विदुः—] जे मनानें नियत झालेल्या शुद्ध बुद्धीनें हृदयांत स्थित असलेल्या याला अशा प्रकारें जाणतात [ते अमृताः भवन्ति—] ते अमृत—अमरणधर्मी होतात. २०.—आतां ईश्वरप्रसादानेंच इष्टप्राप्ति व अनिष्टपरिहार होतो, अशा आशयानें दोन मंत्रांनीं त्याचीच प्रार्थना—

अजात इत्येवं कश्चिद्भीरुः प्रतिपद्यते । रुद्र यत्ते दक्षिणं मुखं तेन मां पाहि नित्यम् ॥ २१

अन्वयार्थ—[यस्मात् अजातः इति-एवं कश्चित् भीरुः प्रपद्यते–] ज्या अर्थी तूंच जन्म-जरा-मृत्यु-अशनाया-पिपासाशून्य आहेस व इतर सर्व विनाशी दुःखयुक्त आहे, त्याअर्थी जन्म-जरादि सर्व दुःखनिमित्तांनीं युक्त असलेल्या संसाराला भिऊन कोणी एखादाच जीव तुला शरण येतो. [रुद्र यत् ते दक्षिणं मुखं तेन मां नित्यं पाहि–] हे रुद्रा, तुझें जें आह्लाद देणारें दक्षिण मुख आहे, त्यानें माझें सर्वदा रक्षण कर. २१.

मा नस्तोके तनये मा न आयुषि मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः । वीरान्मा नो रुद्र भामितोऽवधीर्हविष्मन्तः सदमित्वा हवामहे ॥ २२

इति श्वेताश्वतरोपनिषदि चतुर्थोऽध्यायः ॥ ४

अन्वयार्थ –[नः तोके तनये मा रीरिषः–] हे रुद्रा, आमच्या पुत्राची व पौत्राची हिंसा करूं नको. [नः आयुषि मा गोषु मा नः अश्वेषु मा रीरिषः–] आमच्या आयुष्याचा, गायींचा, अश्वांचा विनाश करूं नको. [हे रुद्र भामितः नः वीरान् मा वधीः–] हे रुद्रा, तूं क्रुद्ध होऊन आमच्या वीर–पराक्रमी भृत्यांचा वध करूं नको. कारण [हविष्मन्तः वयं सदमित्वा हवामहे–] हवीनें युक्त होऊन आम्ही तुझें सदाच रक्षणासाठीं आवाहन करितों. आमच्या रक्षणार्थ तुला बोलावितों. २२.

इति श्वेताश्वतरोपनिषदांचा चवथा अध्याय समाप्त झाला.

अथ पंचमोऽध्यायः ।

चवथ्या अध्यायांतीलच अवशिष्ट राहिलेल्या अर्थाचें प्रतिपादन करण्यासाठीं हा पांचवा अध्याय आरंभिला जातो—

द्वे अक्षरे ब्रह्मपरे त्वनन्ते विद्याविद्ये निहिते यत्र गूढे । क्षरं त्वविद्या ह्यमृतं तु विद्या विद्याविद्ये ईशते यस्तु सोऽन्यः ॥ १

अन्वयार्थ—[अनन्ते परे ब्रह्मणि (ब्रह्मपरे) तु द्वे अक्षरे–] देश-कालादिकांनीं परिच्छिन्न न झालेल्या परब्रह्मामध्येंच किंवा 'ब्रह्मपरे'–हिरण्यगर्भाहून श्रेष्ठ असलेल्या अक्षर ब्रह्मामध्यें दोन अक्षरें राहतात. (येथें अक्षरें म्ह० शब्द-कारणभूत अविद्यारूप ब्रह्मशब्दवाच्य अक्षरें.) [यत्र विद्याविद्ये गूढे निहिते–] ज्या दोन अविद्यारूप अक्षगंत श्रुत्युक्त विद्या व अविद्या गुप्त आहेत. लोकांना जाणतां न येतील अशा रीतीनें ठेवलेल्या आहेत. (श्रुति त्या विद्याविद्यांचें स्वरूप सांगते–) [क्षरं तु अविद्या–] विनाश पावणारें कार्यच अविद्या आहे, असें जाणावें. ती अविद्या कारण-अक्षरामध्यें प्रतिष्ठित आहे, असें समजावें. [तु अमृतं विद्या–] पण अमृत म्ह० मोक्षाचें साधन असें जें आत्मज्ञान ती विद्या आहे. विद्या शाब्दब्रह्मामध्ये प्रतिष्ठित आहे, असें जाणावें [तु यः विद्याविद्ये ईशते सः अन्यः–] पण जो या विद्या-अविद्यांचें नियमन करितो तो त्यांहून अगदीं विलक्षण आहे. त्यांचा साक्षी आहे. १.–तो कोण? उत्तर––

यो योनिं योनिमधितिष्ठत्येको विश्वानि रूपाणि योनीश्च सर्वाः ।
ऋषिं प्रसूतं कपिलं यस्तमग्रे ज्ञानैर्बिभर्ति जायमानं च पश्येत् ॥ २

अन्वयार्थ—[यः एकः योनिं योनिं अधितिष्ठति–] जो अद्वितीय परमात्मा मूलप्रकृति माया व अवांतर प्रकृति आकाशादिक यांना सत्ता-स्फूर्ति देणारा या रूपानें अन्तर्यामी होऊन राहतो. (आतां श्रुति त्याच्या भेदाची व्यावृत्ति करिते–) [विश्वानि रूपाणि च सर्वाः योनीः–] जो सर्व कार्ये व त्यांचीं कारणें आहे. म्ह० तोच कार्यरूप वस्तु व कारणरूप वस्तु आहे. किंवा सर्व रूपें व उत्पत्तिस्थानें यांचें नियमन करितो, (तथापि तो कारणरूपानेंच अधिष्ठाता असेल, चेतनरूपानें नव्हे ! उत्तर–) [ऋषिं–] अतींद्रिय ज्ञानवान् व अतींद्रिय वस्तूंना पाहणाऱ्या [प्रसूतं–] आधिक्यानें उत्पन्न झालेल्या [तं कपिलं–] वासुदेवांशभूत सगरपुत्रांना जाळणाऱ्या कपिलाला (हा सांख्यदर्शनकर्ता कपिल नव्हे, कारण सुस्त्या नामसादृश्यामुळें त्याचें ग्रहण केल्यास अतिप्रसंगदोष येईल. किंवा 'ऋषिं'–अतींद्रियद्रष्ट्या, 'प्रसूतं'–अव्याकृताच्या प्रथम कार्यभूत 'कपिल'–विचित्र वर्ण–ज्ञानक्रियाशक्त्यात्मक हिरण्यगर्भास) [यः अग्रे ज्ञानैः बिभर्ति–] जो प्रसिद्ध परमेश्वर त्या कपिलाला जगदुत्पत्तीच्या पूर्वी भूत-वर्तमान-भविष्यत्-दूर-समीप-प्रवृत्ति-निवृत्ति इत्यादि विषयक ज्ञानांनीं–चित्तवृत्तींनीं धारण

करितो—त्याचें पोषण करितो. (इतकेंच नव्हे तर) [जायमानं च पश्येत्—] उत्पन्न होणाऱ्या कपिलाला किंवा दुसऱ्या सर्व विश्वाला पाहतो. म्ह० तो सर्वद्रष्टा आहे.) २.—आतां श्रुति त्याचेंच जगत्स्रष्टृत्वादि कर्म सांगते—

एकैकं जालं बहुधा विकुर्वन्नस्मिन् क्षेत्रे संहरत्येष देवः ।
भूयः सृष्ट्वा पतयस्तथेशः सर्वाधिपत्यं कुरुते महात्मा ॥ ३

अन्वयार्थ—[एकैकं जालं बहुधा विकुर्वन् एषः देवः—] देव-मनुष्यादि प्रत्येक प्राण्यामध्यें व्यवस्थित असलेलें जे संसारजाल त्याला अनेक प्रकारचें करणारा हा प्रकाशरूप परमात्मा [अस्मिन् क्षेत्रे संहरति—] या सुप्रसिद्ध क्षेत्रांत—सर्व प्राण्यांच्या मायात्मक उत्पत्तिस्थानांत संहृत करितो—त्यांत त्यांचा उपसंहार करितो. [भूयः च तथा पतयः सृष्ट्वा—] पुनरपि पूर्वीप्रमाणेंच लोकांच्या मरीच्यादि प्रजापतींना उत्पन्न करून [ईशः महात्मा सर्वाधिपत्यं कुरुते—] ईश्वर—नियंता महान् आत्मा त्या सर्वांचें आधिपत्य करितो—त्यांचा परिपालक होतो. ३.—शिवाय—

सर्वा दिश ऊर्ध्वमधश्च तिर्यक्प्रकाशयन्भ्राजते यद्वनड्वान् ।
एवं स देवो भगवान्वरेण्यो योनिस्वभावानधितिष्ठत्येकः ॥ ४

अन्वयार्थ—[सर्वाः दिशः ऊर्ध्वं अधः च तिर्यक् प्रकाशयन्—] प्राच्यादि—पूर्वादि सर्व दिशा वर, खाली व आजू-बाजूंस प्रकाशित करणारा [भ्राजते—] स्वतःच्या चैतन्यज्योतीनें प्रकाशमान होतो. (तो कसा ? उत्तर—) [यत् उ अनड्वान्—] ज्याप्रमाणें जगच्चक्राला प्रकाशित करण्यासाठी नियुक्त केलेला आदित्य आपल्या संचारानें सर्वांना प्रकाशित करितो [एवं—] त्याप्रमाणें तो सर्वांना प्रकाशित करितो. [एकः देवः भगवान् वरेण्यः सः योनिस्वभावान् अधितिष्ठति—] अद्वितीय, प्रकाशरूप देव, भगवान्—ऐश्वर्यादिसंपन्न व उत्तम प्रकारें भजन—सेवन करण्यास योग्य असा असलेला तो पृथिव्यादि कारणस्वभाव पदार्थांचें नियमन करितो. ४.

यच्च स्वभावं पचति विश्वयोनिः पाच्यांश्च सर्वान्परिणामयेद्यः ।
सर्वमेतद्विश्वमधितिष्ठत्येको गुणांश्च सर्वान्विनियोजयेद्यः ॥ ५

अन्वयार्थ—[यत् च विश्वयोनिः स्वभावं पचति—] जो जगत्कारण ईश्वर अग्नीचें उष्णत्व, जलाचें द्रवत्व इत्यादि स्वभावास उत्पन्न करितो, किंवा

कार्य-कारणरूप अथवा षड्भाव विकाररूप स्वभावाचा परिपाक करितो. [च यः सर्वान् पाच्यान् परिणामयेत्–] व जो परिपाकास योग्य असलेल्या सर्व पदार्थांचा विपरिणाम करितो [एकः सर्वं एतत् विश्वं अधितिष्ठति–] जो अद्वितीय ईश्वर या सर्व विश्वाचें नियमन करितो [यः सर्वान् गुणान् च विनियोजयेत्–] जो सत्त्वादि सर्व गुणांचा विनियोग करितो; (सत्त्वानें अमुक कार्य करावें, रजानें अमुक करावें, अशी त्यांची नियति निश्चित करितो.) ५.

तद्वेदगुह्योपनिषत्सु गूढं तद्ब्रह्मा वेदते ब्रह्मयोनिम् । ये पूर्वं देवा ऋषयश्च तद्विदुस्ते तन्मया अमृता वै बभूवुः ॥ ६

अन्वयार्थ—[ब्रह्मा तत् ब्रह्मयोनिं वेदगुह्योपनिषत्सु गूढं वेदते–] हिरण्यगर्भ त्या अमर्याद ब्रह्माला–सर्व कारणाला व वेदाच्या गुह्य उपनिषदांत–तत्त्वमस्यादि महावाक्यांत गूढ–गुप्त असलेल्या ब्रह्माला जाणतो (किंवा ब्रह्मयोनिं म्ह० वेद हेंच ज्याच्याविषयीं प्रमाण आहे अथवा जें हिरण्यगर्भाचें कारण आहे त्याला हिरण्यगर्भ जाणतो–) [पूर्वं ये देवाः च ऋषयः तत् विदुः–] आमच्या पूर्वी उत्पन्न झालेले जे अधिकारी रुद्रादि देव व वामदेवादि ऋषि त्याला साक्षात् जाणते झाले [ते तन्मयः अमृताः वै बभूवुः–] ते तदात्मभूत होत्साते अमृतच झाले. (त्यांच्याच प्रमाणें आतांचेहि आत्मज्ञ त्यालाच जाणून अमृत होतात.) ६. येथपर्यंत तत्पदार्थाचें वर्णन केलें. आतां 'त्वं-'पदार्थाचें वर्णन करण्यासाठी पुढील मंत्र आहेत—

गुणान्वयो यः फलकर्मकर्ता कृतस्य तस्यैव स चोपभोक्ता । स विश्वरूपस्त्रिगुणस्त्रिवर्त्मा प्राणाधिपः संचरति स्वकर्मभिः ॥ ७

अन्वयार्थ—[गुणान्वयः–] कर्म-ज्ञानकृत वासनामय गुणांशीं किंवा शुक्ल-नीलादि नाडीरूप गुणांशीं ज्याचा संबंध आहे [फलकर्मकर्ता–] फलासाठीं कर्म करणारा, किंवा सुखदुःखरूप फल व धर्माधर्मरूप कर्म यांचा कर्ता, (म्हणजे ईश्वर कीं काय ? उत्तर–नाहीं) [कृतस्य तस्य एव च उपभोक्ता–] स्वतः संपादन केलेल्या त्याच सुखदुःखांचा उपभोग घेणारा, [यः–] अशा प्रकारचा जो [सः विश्वरूपः त्रिगुणः त्रिवर्त्मा–] तो नानारूप, सत्त्वादि गुणत्रयवान्, देवयान, पितृयाण व अधोगति या मार्गांनीं जाणारा, ज्याच्या परलोकगमनासाठीं हे तीन मार्ग आहेत असा, [प्राणाधिपः–] पंचवृत्ति प्राणाचा किंवा प्राण व

इंद्रियें यांचा अधिपति—स्वामी आहे [स्वकर्मभिः संचरति—] तो स्वकर्मांनीं संचार करितो. ७.

अङ्गुष्ठमात्रो रवितुल्यरूपः संकल्पाहंकारसमन्वितो यः ।
बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव आराग्रमात्रो ह्यपरोऽपि दृष्टः ॥८

अन्वयार्थ—[अंगुष्ठमात्रः—] हृदयछिद्राच्या अपेक्षेनें ज्याचें प्रमाण अंगुष्ठमात्र आहे, [रवितुल्यरूपः—] सूर्याप्रमाणें प्रकाशस्वरूप, [यः संकल्पअहंकारसमन्वितः—] जो संकल्प व अहंकार यांनीं युक्त आहे, [बुद्धेःगुणेन आत्मगुणेन च युक्तः—] कामादि बुद्धिगुणांनी व विषयसुख-ज्ञानादि आत्मगुणांनीं युक्त आहे, [आराग्रमात्रः—] अणीच्या अग्रासारखा अतिशय सूक्ष्म असा [हि अपरः अपि दृष्टः—] अपर आत्माहि ज्ञानरूपानें पाहिलेला आहे. तो औपाधिक जीवात्माहि जलांतील प्रतिबिंबाप्रमाणें संभवनीय आहे. विद्वान् त्याला अशा प्रकारें पाहतात. ८. त्याच्या सूक्ष्मत्वाचेंच वर्णन—

बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च । भागो
जीवः स विज्ञेयः स चानन्त्याय कल्प्यते ॥ ९

अन्वयार्थ—[बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य भागः सः जीवः विज्ञेयः—] केंसाच्या अग्राचे शंभर भाग करून त्याचे आणखी शंभर विभाग केले असतां जो भाग होतो तोच जीव आहे म्ह० जीवाचें प्रमाण तितकें सूक्ष्म आहे, असें समजावें कारण लिंगशरीर अतिशय सूक्ष्म असल्यामुळें तदुपाधिक लिंगात्माहि जणुंकाय तितकाच सूक्ष्म आहे. त्याचा तशा सूक्ष्मत्वानें निर्देश करितात. पण [सः च आनन्त्याय कल्पते—] तो स्वरूपानें अनन्तत्वास पात्र आहे. स्वरूपानें तो अनन्त—अपरिच्छिन्न परमात्मरूप आहे. (स्वरूपानें तो ब्रह्मरूप होण्यास समर्थ आहे.) ९.—वस्तुतः—

नैव स्त्री न पुमानेष न चैवायं नपुंसकः ।
यद्यच्छरीरमादत्ते तेन तेन स रक्ष्यते ॥ १०

अन्वयार्थ—जीव स्वतः अद्वितीय अपरोक्ष ब्रह्मस्वभाव असल्यामुळें [न एव स्त्री—] तो वस्तुतः स्त्री नव्हे, [एषः पुमान् न—] हा पुरुष नव्हे, [न च एव अयं नपुंसकः—] व हा नपुंसकहि नव्हे. तर [यत् यत् शरीरं आदत्ते तेन तेन सः रक्ष्यते—] तो जें जें स्त्रीशरीर, पुरुषशरीर व नपुंसकशरीर धारण

करितो—स्वीकारतो त्या त्या शरीरानें तो रक्षित होतो. त्या त्या शरीरधर्मांचा आत्म्यामध्यें अध्यारोप करून तें शरीरच मी असा अभिमान धरितो. १०. —तो शरीराचा स्वीकार कशामुळें करितो ? उत्तर—

संकल्पनस्पर्शनदृष्टिमोहैर्ग्रासांबुवृष्ट्यात्मविवृद्धिजन्म ।
कर्मानुगान्यनुक्रमेण देही स्थानेषु रूपाण्यभिसंप्रपद्यते ॥११

अन्वयार्थ—[संकल्पन-स्पर्शन-दृष्टि-मोहैः—] इष्टानिष्टाविषयीं संकल्प करणें हा मानस व्यापार, स्पर्श करणें, हा बाह्य इंद्रियव्यापार 'दृष्टिः'—त्यांची दृष्टि—मला हा विषय हवा हा नको, इत्यादि दर्शन 'मोहः'—त्यामुळें होणारा अविवेकरूप मोह, यांच्या योगानें शुभाशुभ कर्में होतात, [कर्मानुगानि रूपाणि—] त्या कर्मांच्या अनुसार स्त्री-पुं-नपुंसकादि रूपें—शरीरें [देही—] हा मर्त्य [स्थानेषु—] देव-तिर्यक्-मनुष्यादि स्थानांमध्यें [अनुक्रमेण—] कर्मपरिपाकाच्या अपेक्षेनें [अभिसंप्रपद्यते—] अभितः धारण करितो. त्याविषयीं दृष्टान्त—[ग्रासांबुवृष्ट्या च आत्मविवृद्धिजन्म—] ग्रास-अन्न-अंबु—जल या अनियत अन्न-जलांच्या वृष्टीनें—अन्नजलामुळें शरीराची विशेष वृद्धि जशी होते त्याचप्रमाणें कर्मपरिपाकानुसार तो शरीरास प्राप्त होतो (किंवा संकल्पनादिक व अन्नपानादिक यांच्या योगानें कर्मानुसार शरीरादिकांचा जन्म, वृद्धि व इष्टानिष्टप्राप्तिपरिहार यांस हा सर्वतः प्राप्त होतो.) ११. —त्या रूपांचेंच वर्णन—

स्थूलानि सूक्ष्माणि बहूनि चैव रूपाणि देही स्वगुणैर्वृणोति ।
क्रियागुणैरात्मगुणैश्च तेषां संयोगहेतुरपरोऽपि दृष्टः ॥ १२

अन्वयार्थ—[देही स्थूलानि सूक्ष्माणि बहूनि च एव रूपाणि स्वगुणैः वृणोति—] देहवान्—विज्ञानात्मा 'स्थूल' या शब्दाला व प्रत्ययाला कारण होणारीं, 'सूक्ष्म' या शब्दाला व प्रत्ययाला कारण होणारीं अशीं अनेक प्रकारची रूपें स्वगुणांनीं म्ह० विहित-प्रतिषिद्ध-विषयानुभवसंस्कारांनीं स्वीकारतो. [क्रियागुणैः आत्मगुणैः च अपरः तेषां संयोगहेतुः अपि दृष्टः—] क्रियाशक्ति जो प्राण त्याच्या शरीरव्यापारादि गुणांनीं व आत्मा म्ह० अन्तःकरण आत्म्यामध्यें तादात्म्याध्यास पावलेल्या त्याच्या अदृष्ट-इच्छा-ज्ञानादि गुणांनीं त्याचप्रमाणें क्रिया-ज्ञानशक्तींनीं जीव त्या शब्दादि विषयस्वरूपाच्या संयोगाचा हेतु

–निमित्त होतो, हेंहि सर्व प्राणिप्रत्यक्ष आहे. कारण तो 'हा मी हें य फलासाठीं करितों,' असें ह्मणूनच प्रवृत्त होतो, हें सर्वप्रसिद्ध आहे. १२. –आतां तो आत्मज्ञानानेंच मुक्त होतो, असें श्रुति सांगते–

अनाद्यनन्तं कलिलस्य मध्ये विश्वस्य स्रष्टारमनेकरूपम् ।
विश्वस्यैकं परिवेष्टितारं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ १३

अन्वयार्थ––[अनाद्यनन्तं०–] आद्यन्तरहित, गहन–गंभीर संसारामध्ये विश्वाला उत्पन्न करणारा, अनेकरूप, विश्वाला स्वरूपानें व्यापून राहणारा, अशा अद्वितीय परमात्म्याला जाणून जीव सर्व पाशांपासून मुक्त होतो. पृ ९३४ पहा. १३.–आतां संक्षेपतः सांगितलेल्या या उपाय-उपेयाचा उपसंहार––

भावग्राह्यमनीडाख्यं भावाभावकरं शिवम् ।
कलासर्गकरं देवं ये विदुस्ते जहुस्तनुम् ॥ १४

इति श्वेताश्वतरोपनिषदि पञ्चमोऽध्यायः ॥ ५

अन्वयार्थ––[भावग्राह्यं–] भाव म्ह० अतिशुद्ध अन्तःकरण त्यानें ग्राह्य–ग्रहण करण्यास योग्य, [अनीडाख्यं–] अशरीर या नांवाचा ('अनिलाख्यं' असा पाठ घेतल्यास 'प्राणस्य प्राणं' अशी वायूची संज्ञा ज्याला आहे तो.) [भावाभावकरं–] भाव म्ह० अविद्या व तिचें कार्य, त्यांचा आत्मसाक्षात्कारानें अभाव करणारा [शिवं–] मंगलरूप स्वयप्रकाश-आनंद-आत्मस्वरूप [कलासर्गकरं–] प्रश्नोपनिषदांत (पृ. १२४) सांगितलेल्या प्राणादि सोळा कलांना उत्पन्न करणारा अशा [देवं–] स्वयंप्रकाशाला [ये विदुः–] जे जाणतात [ते तनुं जहुः–] ते अविद्येसह शरीराचा त्याग करितात. पुनः त्याचें ग्रहण करण्याचा प्रसंग येणार नाही, अशा रीतीनें त्याचा त्याग करितात. १४.(५)

अथ षष्ठोऽध्यायः ।

धात्याच्या प्रसादाचा उपाय त्याची प्रार्थना वगैरे करणें हा आहे, धाता जगत्कर्तृत्वादि गुणयुक्त आहे, असें दाखविलें. पण वाद्यांनीं त्याचे गुण अशीं जीं तत्त्वें तीं अनंत मानलीं आहेत. तेव्हां कोणत्या चिद्धातूचा प्रसाद मीं संपादन करावा, असा संदेह उत्पन्न झाल्यामुळें ज्याचें चित्त व्याकुल झालें आहे, अशा

अधिकाऱ्याला पाहून दयाळु श्रुतिमाता कालादिकांचा पूर्वपक्षत्वानें अंगीकार करून फलरूप स्वयंप्रकाश आनंदात्म्याचें प्रतिपादन करण्यासाठीं हा शेवटचा अध्याय आरंभिते—पहिल्या अध्यायांत हा अर्थ सांगितला आहे, तथापि हा अध्याय त्याच्याच अधिक व्याख्यानासाठी आहे.

स्वभावमेके कवयो वदन्ति कालं तथान्ये परिमुह्यमानाः ।
देवस्यैष महिमा तु लोके येनेदं भ्राम्यते ब्रह्मचक्रम् ॥ १

अन्वयार्थ—[एके कवयः स्वभावं वदन्ति—] कांहीं बुद्धिमान् प्रत्येक पदार्थाचा असाधारण शक्तिरूप स्वभावच जगत्कारण सांगतात. [तथा अन्ये परिमुह्यमानाः कालं वदन्ति—) तसेच—स्वभाववादी ज्या प्रमाणांनीं व ज्या युक्तींनीं स्वभावपक्ष प्रतिपादितात त्याच प्रमाण-युक्तींनी दुसरे कालवादी सर्वतः संमोहित होऊन कालच जगत्कारण आहे, असें सांगतात. (आतां सिद्धान्त—) [तु देवस्य एषः महिमा—] पण स्वयंप्रकाश देवाचा ' मी अज्ञ आहें ' इत्यादि प्रकारें प्रत्यक्ष अनुभवास येणारा हा महिमा—महत्त्व आहे. [लोके—] या संसारमंडलात [येन इदं ब्रह्मचक्रं भ्राम्यते—] ज्या अविद्यारूप महिम्यामुळें हें विविध प्रत्ययगम्य—अविद्याप्रदर्शित ब्रह्मचक्र भ्रमण करितें, या अविद्याप्रत्ययाकडून तें भ्रमण करविलें जातें. वायु आकाशांत मेघमंडलाला जसें भ्रमण करावयास लावतो त्याप्रमाणें अविद्यामहिमा ब्रह्मविवर्तरूप पूर्वोक्त—पृ. ९१३—संसारचक्राला फिरवितो. १.—आतां ज्याचा हा महिमा आहे तो देव कोण तें श्रुति सांगते—

येनावृतं नित्यमिदं हि सर्वं ज्ञः कालकालो गुणी सर्वविद्यः ।
तेनेशितं कर्म विवर्तते ह पृथ्व्याप्यतेजोऽनिलखानि चिन्त्यम् ॥ २

अन्वयार्थ—[येन इदं हि सर्वं नित्यं आवृतं—] ज्या प्रसिद्ध देवानें हें सर्व विश्व सर्वदा समंतात् आकाशाप्रमाणें आच्छादित केलें आहे, ('तर मग तो आकाशाप्रमाणें अचेतन असेल ! ' उत्तर—] [ज्ञः—] जो बोधस्वभाव—ज्ञानरूप आहे. [कालकालः—] सर्वांचा विनाश करणारा जो काल त्याचाहि विनाश करणारा, [गुणी—] अविद्याध्यासानें जो अविद्यागुणवान् आहे त्यामुळें बोधस्वभाव असूनहि [यः सर्वविद्—] जो सर्वज्ञ आहे, [तेन ईशितं—] त्या सर्वज्ञाकडून अधिष्ठित झालेलें [कर्म विवर्तते—] पुरुषाकडून

अनुभविलें जाणारें हें सर्व क्रियात्मक तत्त्व पूर्वरूपाचा परित्याग करून अवयविरूप बनतें. [ह पृथ्व्याप्यतेजोऽनिलखानि–] हें विवर्तन ज्याअर्थीं सुप्रसिद्ध आहे त्याअर्थीं पृथिवी, आप्, तेज, वायु व आकाश हीं पांच भूतें पृथिव्यादि भूताकारानें परिणाम पावतात. [चिन्त्यं–] यास्तव त्या ईश्वरस्वरूपाचें चिंतन करावें. २.–पण मन अतिशय अस्थिर आहे, तेव्हां त्याचें चिंतन कसें संभवणार? उत्तर—

तत्कर्म कृत्वा विनिवर्त्य भूयस्तत्त्वस्य तत्त्वेन समेत्य योगम् ।
एकेन द्वाभ्यां त्रिभिरष्टभिर्वा कालेन चैवात्मगुणैश्च सूक्ष्मैः ॥ ३

अन्वयार्थ—[कर्म कृत्वा–] ज्योतिष्टोमादि कर्म करून [विनिवर्त्य–] मननादि कर्मापासून मनाला परतवून [भूयः तत्त्वेन तत्त्वस्य योगं समेत्य–] पुनरपि कार्यसह अविद्यातत्त्वाच्या आनंदात्मस्वरूपाशीं योगास–'तेंच मी' अशा तादात्म्यास प्राप्त होऊन [तत् चिन्त्यं–] त्या ईश्वराच्या रूपाचें चिंतन करावें. (आतां ज्याच्या योगास प्राप्त व्हावयाचें तो कोण? उत्तर–) [एकेन–] अविद्यारूप एकाशीं [द्वाभ्यां–] धर्म व अधर्म या दोहोंशीं, [त्रिभिः–] रक्त-शुक्ल-कृष्णरूप तीन पदार्थांशीं [अष्टभिः वा–] मन, बुद्धि, अहंकार यांसह पांच महाभूतांशीं (केवल इतक्यांशींच नाहीं तर–) [कालेन च एव–] सृष्टि-स्थिति-संहारकालाशीं [सूक्ष्मैः च आत्मगुणैः–] व सूक्ष्म कामादि आत्मगुणांशीं योगास–तादात्म्यास प्राप्त होऊन ईश्वररूपाचें चिंतन करावें. ३.–तसेंच—

आरभ्य कर्माणि गुणान्वितानि भावांश्च सर्वान्विनियोजयेद्यः ।
तेषामभावे कृतकर्मनाशः कर्मक्षये याति स तत्त्वतोऽन्यः ॥ ४

अन्वयार्थ—[गुणान्वितानि कर्माणि आरभ्य–] पूर्वोक्त लोहित-शुक्ल-कृष्ण गुणांनीं युक्त अशीं क्रियमाण कार्यें उत्पन्न करून [सर्वान् च भावान्–] आणि आत्म्यामध्यें अध्यस्त अशा अविद्या, अविद्यासंबंध व त्यांच्या उपाधि या सर्वांस उत्पन्न करून [यः विनियोजयेत्] जो त्या सर्वांचा त्यांच्या कार्यांत विनियोग करितो, असा तो तत्पदार्थ–ईश्वर आहे. (अहोपण, ईश्वर जरी असा असला तरी भावांचा काय उपयोग? उत्तर–) [तेषां अभावे कृतकर्मनाशः–] त्या अविद्यादि पदार्थांच्या अभावीं–त्यांचा अभाव झाला असतां अनुष्ठित पुण्य-पापांचा नाश होतो. तीं कर्में व्यर्थ होतात [कर्मक्षये याति–] आणि कर्माचा

क्षय झाला असतां–कर्मे व्यर्थ ठरली असतां [सः तत्त्वतः अन्यः–] अदृष्ट विषयामध्यें प्रमाणभूत असलेला वेदहि तत्त्वतः अप्रमाणभूत होतो. किंवा त्या सर्व भावांचा विनियोग करणारा ईश्वर जरी असला तरी त्याच्या साक्षात्कारानें अविद्यादिकांचा नाश झाला असतां जीवाच्या कृतकर्मांचा नाश होतो व तो कर्मक्षयामुळें संसारसागराच्या परतीरास जातो. कारण तो अविद्यादिकांहून तत्त्वतः अगदीं भिन्न आहे. त्यामुळें अविद्यादिकांचा नाश झाला असतां तो स्वरूपानें अवस्थित होतो. ४.–हाच अर्थ दृढ करण्यासाठीं पुढील मंत्र—

आदिः स संयोगनिमित्तहेतुः परस्त्रिकालादकलोऽपि दृष्टः ।
तं विश्वरूपं भवभूतमीड्यं देवं स्वचित्तस्थमुपास्य पूर्वम् ॥ ५

अन्वयार्थ—[सः आदिः–] तो आदि म्ह० सर्वांचें कारण आहे. [संयोगनिमित्तहेतुः–] शरीराच्या संयोगाचें निमित्त, अशा अविद्यादिकांचें निमित्त आहे. [त्रिकालात् परः–] भूत-वर्तमान-भविष्यत् कालांहून अगदीं भिन्न आहे. [अकलः अपि दृष्टः–] तो प्राणादि कलाशून्य असूनहि त्याला ब्रह्मवेत्यांनीं साक्षात् जाणलें आहे. (आतां मंत्रदृष्टा आपला अनुभव सांगतो–) [तं विश्वरूपं भवभूतं ईड्यं स्वचित्तस्थं देवं उपास्य पूर्वं विदाम–] ते निष्कल, नानारूप, संसारात्मक, स्तुत्य, आपल्या बुद्धींत स्थित असलेल्या देवाची 'तोच मी' अशी उपासना करून प्रथमतः आम्ही त्याला जाणतों.५–पुनः त्याचेंच स्वरूपवर्णन–

स वृक्षकालाकृतिभिः परोऽन्यो यस्मात्प्रपञ्चः परिवर्ततेऽयम् ।
धर्मावहं पापनुदं भगेशं ज्ञात्वात्मस्थम तं विश्वधाम ॥ ६

अन्वयार्थ—[सः वृक्ष-कालाकृतिभिः परः–] तो विश्वरूप ईश्वर संसारवृक्षाकाराहून व कालाकाराहून किंवा संसार, काल व अविद्या यांहून उत्कृष्ट व [अन्यः–] अत्यंत भिन्न–विलक्षण–प्रपंचशून्य आहे. [यस्मात् अयं प्रपंचः परिवर्तते–] ज्याच्या पासून हा भौतिक कार्य-करणसंघातरूप प्रपंच सर्वतः निघतो –बाहेर पडतो, प्रवृत्त होतो [धर्मावहं पापनुदं भगेशं–] त्या स्वभक्तांना सुखहेतु धर्म सर्वतः प्राप्त करून देणाऱ्या, दुःखहेतु पापाचा विनाश करणाऱ्या, षड्गुणैश्वर्याच्या नियंत्याला, [आत्मस्थं अमृतं विश्वधाम–] बुद्धिस्थ, अविनाशी व विश्वाचें तेज किंवा स्थान अशा त्याला [ज्ञात्वा–] साक्षात् जाणून उपासक तद्रूप होतो.६.

तमीश्वराणां परमं महेश्वरं तं देवतानां परमं च दैवतम् ।
पतिं पतीनां परमं परस्ताद्विदाम देवं भुवनेशमीड्यम् ॥ ७

अन्वयार्थ—[तं ईश्वराणां परमं महेश्वरं–] त्या हिरण्यगर्भादि ईश्वरांच्या परम महेश्वरास, सर्वोत्तम नियंत्यास [तं देवतानां च परमं दैवतं–] त्या अग्नि-इंद्रादि देवतांच्या परम दैवतास [पतीनां परमं पतिं–] त्या प्रजापतींच्या सर्वश्रेष्ठ पतीला–पालकाला [परस्तात्–] अक्षराख्य अविद्येच्या अगदीं पलीकडे असलेल्या [भुवनेशं ईड्यं देवं विदाम–] भुवनांचा ईश्वर व स्तुत्य अशा देवाला आम्ही जाणतों. ७ अतां श्रुति म्हणते–

न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते ।
परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥ ८

अन्वयार्थ—[तस्य कार्यं करणं च न विद्यते–] त्या प्रसिद्ध ईश्वराचें–आत्म्याचें कार्य–अविद्याविक्षेपजात व करण–अविद्याकारणहि विद्यमान नाहीं किंवा कार्य–शरीर व करण–इंद्रियजात त्याला नाहीं. [तत्समः च न–] त्या आत्म्याच्या तुल्य–त्यासारखाहि कोणी नाही [च अभ्यधिकः न दृश्यते–] व त्याहून सर्व प्रकारें अधिक असाहि कोणी दिसत नाहीं. [अस्य परा शक्तिः विविधा एव श्रूयते–] या सर्व कारणाची सर्वोत्तम शक्ति–सर्वकार्योत्पादनादि सामर्थ्यरूप अविद्या स्वविक्षेप विलासांनीं अनेक रूपच श्रुत आहे–ती शास्त्रावरून अवगत होते. (पण ती आगंतुक नाही तर–) [स्वाभाविकी–] ती स्वाभाविक–अनादिसिद्ध आहे. (तिचें विविधत्वच श्रुति सांगते–) [ज्ञानबलक्रिया च–] अविद्यावृत्ति व वस्तूला प्रकाशित करणारी अन्तःकरणवृत्ति हें ज्ञान, बल म्ह० प्राण–उत्साह व क्रिया–व्यापारमात्र हेंच तिचें विविधत्व आहे. किंवा ज्ञानक्रिया–सर्व विषयज्ञानप्रवृत्ति व बलक्रिया–केवल स्वसांनिध्यानें सर्वांला वश करून त्याचें नियमन करणें. सु. ब्र. पृ. १४८ पहा.८.–सर्व शक्तिमान् दक्षादि प्रजापतींचा पति हिरण्यगर्भ आहे. तसाच याचाहि दुसरा कोणी असेल अशी शंका घेऊन श्रुति त्याचें महेश्वरत्व सांगते–

न तस्य कश्चित्पतिरस्ति लोके न चेशिता नैव च तस्य लिङ्गम् ।
स कारणं करणाधिपाधिपो न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः ॥९

अन्वयार्थ—[लोके तस्य कश्चित् पतिः न अस्ति—] या संसारांत त्या सर्वेशक्ति आत्म्याचा कोणी पति—पालक नाहीं. [न च ईशिता—] नियन्ताहि नाहीं. [तस्य लिंगं च न एव—] त्याचें ज्यावरून अनुमान करितां येईल असें लिंग—शरीरहि नाहींच. [सः कारणं—] तो सर्वांचा हेतु—निमित्त आहे. [करणाधिपाधिपः—] इंद्रियांच्या अग्न्यादि अधिष्ठात्यांचाहि तो अधिप—अधिष्ठाता होऊन पालक आहे. [अस्य कश्चित् जनिता च अधिपः न—] याचा कोणी उत्पादक किंवा अधिष्ठाता होऊन पालक नाहीं. सु. ब्र. पृ. १९७ पहा.९.—आतां मंत्रद्रष्टा ब्रह्मज्ञानोपादनार्थ त्याची प्रार्थना करितो—

यस्तूर्णनाभ इव तन्तुभिः प्रधानजैः स्वभावतः ।
देव एकः स्वमावृणोति स नो दधातु ब्रह्माव्ययम् ॥ १०

अन्वयार्थ—[यः तु एकः देवः ऊर्णनाभः तंतुभिः इव प्रधानजैः तंतुभिः स्वभावतः स्वं आवृणोति—] पण जो एक अद्वितीय प्रकाशात्मा, कोळी आपल्या तंतूंनी जसा, त्याप्रमाणें प्रधानापासून म्ह० अव्याकृत-आत्म्यावर आवरण घालणारी जी अविद्या, तिच्यापासून झालेल्या तंतूंसारख्या सूक्ष्म कार्यांनी स्वभावतःच —कांहीं प्रयोजनावांचून लीलान्यायानें स्वतःला आच्छादित करितो—अविद्याकार्यांनीं स्वतःला जणुंकाय झांकून घेतो [सः नः अव्ययं ब्रह्म दधातु—] तो ईश्वर आमच्या अव्यय अविनाशी ब्रह्माचें धारण करो. तो आम्हांला ब्रह्मसाक्षात्कार करून देवो. १०.—याप्रमाणें विद्वान् मंत्रद्रष्टा त्याची प्रार्थना जरी करीत असला तरी त्याच्यामध्यें प्रार्थ्य, प्रार्थना, प्रार्थक अशी त्रिपुटी नाही, असें श्रुति सांगते—

एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेताः केवलो निर्गुणश्च ॥ ११

अन्वयार्थ—[एकः—] सर्वभेदशून्य, [देवः—] स्वयंप्रकाश, [सर्वभूतेषु गूढः—] जरायुजादि चार जीवजातींमध्यें अनादि अविद्येनें व अहं-ममाभिमानानें आच्छादित झालेला—साक्षिचैतन्यरूपानें गुप्त, [सर्वव्यापी—] तथापि परिच्छिन्न नाहीं, तर आकाशाप्रमाणें सर्व स्थूल-सूक्ष्म कार्यांना व्यापून राहणारा, (तरमग आकाशासारखाच अनात्मा कीं काय? नाहीं—) [सर्वभूतान्तरात्मा—] सर्व जरायुजादि प्राण्यांच्या बुद्धींत राहणारा—बुद्धीच्या पलीकडे, तिच्याहून भिन्न, तिचा साक्षी—चेतन आत्मा, [कर्माध्यक्षः—] शुभाशुभ फल देणाऱ्या धर्माधर्मसंज्ञक

कर्मांचा नियंता, [सर्वभूताधिवासः–] सर्व भूतांमध्यें त्यांच्या आत्मत्वानें राहणारा, [साक्षी–] मी सुखी, दुःखी इत्यादि प्रत्ययांचा द्रष्टा, वाद करणाऱ्या व सुखी-दुःखी होणाऱ्या लोकांचा जसा एखादा साक्षी–सुखदुःखशून्य असतो तसा उदासीन राहून सर्व बुद्धिप्रत्ययांना पाहणारा, [केवलः चेताः–] केवल बोद्धा–शरीरादिमान् नव्हे, (' तथापि ज्ञान हाच त्याचा गुण असेल ! ' उत्तर–) [निर्गुणः च–] निर्गुण, गुण-गुणी इत्यादि भेदशून्य, अर्थात् स्वयंप्रकाश–बोधैकस्वरूप आनन्दात्मा, असा याचा भावार्थ. ११.–पण या एका देवाला जे जाणतात, त्यांना कोणता लाभ होतो व इतरांची कोणती हानि होते ? उत्तर–

एको वशी निष्क्रियाणां बहूनामेकं बीजं बहुधा यः करोति ।
तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम् ॥ १२

अन्वयार्थ––[एकः–] भेदरहित [बहूनां निष्क्रियाणां वशी–] अनेक क्रियाशून्य जड पदार्थांचा नियन्ता, [यः एकं बीजं बहुधा करोति–] जो आवरणरूपानें भेदशून्य असलेल्या अविद्यास्वरूपाला भूत-भौतिक आकारानें अनेक प्रकारचें करितो, अनेक विक्षेपरूपांनीं अंकुरित करितो, [तं–] त्या अविद्याबीजाला अनेकाकार करणाऱ्या कर्त्याला [आत्मस्थं–] आपल्या अन्तःकरणांत स्थित असलेला [ये धीराः अनुपश्यन्ति–] जे जितेंद्रिय अधिकारी वेदान्तवाक्यश्रवणानंतर पाहतात–'आम्हींच ब्रह्म' असें साक्षात् जाणतात [तेषां–] त्या ब्रह्मज्ञांनाच [शाश्वतं सुखं–] नित्य आनन्दस्वरूपाचा अनुभव येतो, [इतरेषां न–] अब्रह्मज्ञांना त्या स्वरूपसुखाचा अनुभव येत नाहीं. १२.–पण जीवहि नित्य चेतन आहे, तेव्हां तोच ज्ञातव्य आहे कीं काय ? उत्तर––

नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानामेको बहूनां यो विदधाति कामान् ।
तत्कारणं सांख्ययोगाधिगम्यं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥ १३

अन्वयार्थ––[नित्यानां नित्यः–] आकाशादि नित्य पदार्थांचाहि जो नित्य –अविनाशी आहे, [चेतनानां चेतनः–] सोपाधिक ज्ञानवान् जीवांचाहि जो चेतन–नित्य ज्ञानस्वरूप आहे, [यः एकः बहूनां कामान् विदधाति–] जो एक देवादि अनेकांना भोग–सुखदुःखादि फलें देतो, [तत् कारणं–] त्या सर्वकारणाला [सांख्ययोगाधिगम्यं देवं ज्ञात्वा–] ज्या विवेकरूप विज्ञानानें आत्मतत्त्व उत्तम प्रकारें प्रकाशमान होतें तें सांख्य व योग म्ह० वैदिककर्मानुष्ठान

किंवा जीव-परमात्म्याचें तादात्म्यज्ञान हें फल देणारा अष्टांग योग यांनींच ज्ञात होणाऱ्या ज्योतिर्मय आत्म्याला जाणून [सर्वपाशैः मुच्यते—] अविद्यादि सर्व पाशांपासून पुरुष मुक्त होतो. १३.—आतां तो चेतनांचाहि चेतन कसा, तें श्रुति सांगते—

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।
तमेव भान्तमनु भाति सर्वं तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥ १४

अन्वयार्थ—[तत्र सूर्यः न भाति—] त्या परमात्म्यामध्यें सर्वांना प्रकाशित करणाराहि सूर्य प्रकाशमान होत नाहीं, सर्वावभासक सूर्यहि त्या ब्रह्मात्म्याला प्रकाशित करीत नाहीं, [न चंद्रतारकं—] चंद्र व नक्षत्रें त्याला प्रकाशित करीत नाहींत, [इमाः विद्युतः न—] या विद्युत् त्याला प्रकाशित करूं शकत नाहींत, [अयं अग्निः कुतः—] मग हा अग्नि त्याला कोठून प्रकाशित करणार? फार काय पण [तं एव भान्तं अनु सर्वं भाति—] स्वयंप्रकाशरूप असा तो आपल्या नित्य ज्योतिःस्वरूपानें प्रकाशमान होत असतांनाच त्याच्या प्रकाशानें हें सर्व त्याच्या मागोमाग भासतें, [तस्य भासा इदं सर्वं विभाति—] त्याच्या नित्य चैतन्यज्योतीनेंच हें सर्व सूर्यादि प्रकाश-अप्रकाशमय अनात्मजात प्रकाश पावतें. १४.—' देवाला जाणून मुक्त होतो ' असें वर सांगितलें. पण त्यालाच जाणून कां मुक्त होतो, दुसऱ्या कोणाला जाणून मुक्त कां होत नाही ? उत्तर—

एको हꣳसो भुवनस्यास्य मध्ये स एवाग्निः सलिले संनिविष्टः ।
तमेव विदित्वातिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥ १५

अन्वयार्थ—[अस्य भुवनस्य मध्ये एकः हंसः—] या त्रिभुवनामध्यें तोच एक अविद्यादि बंधकारणांचा विनाश करणारा आहे, [सः एव अग्निः—] तोच अग्नि अविद्यादिकांना जाळणारा किंवा आपांचें कारण तेज आहे. [सलिले संनिविष्टः—] तोच आपांमध्यें त्यांच्या कारणरूपानें प्रवेश करून राहिलेला आहे. [तं एव विदित्वा अतिमृत्युं एति—] त्यालाच साक्षात् आत्मत्वानें जाणून मुमुक्षु अतिमृत्यूला—अमरणत्वाला प्राप्त होतो. [अयनाय अन्यः पंथाः न विद्यते—] मोक्षप्राप्तीसाठीं आत्मज्ञानावांचून दुसरा मार्ग—उपाय—साधन नाहीं. १५. —परमपदाच्या प्राप्तीसाठीं श्रुति विशेषतः त्याचेंच स्वरूपप्रदर्शन करिते—

स विश्वकृद्विश्वविदात्मयोनिर्ज्ञः कालकारो गुणी सर्वविद् यः।
प्रधानक्षेत्रज्ञपतिर्गुणेशः संसारमोक्षस्थितिबन्धहेतुः ॥ १६

अन्वयार्थ—[सः विश्वकृत्–] तो विश्वाचा कर्ता, [विश्ववित–] विश्वाला जाणणारा, [आत्मयोनिः–] आत्मरूप योनि–सर्वकारण, [ज्ञः–] ज्ञाता–जाणणारा ग्रह० सर्वांचा आत्मा, सर्वांचें कारण व सर्वज्ञ–चैतन्यज्योति आहे. [कालकारः–] कालाचा कर्ता [गुणी–] अपहतपाप्मत्वादि गुणवान् [यः सर्वविद्–] व जो सर्व जाणणारा, [प्रधान-क्षेत्रज्ञपतिः–] अव्यक्त व विज्ञानात्मा यांचा पालक, [गुणेशः–] सत्त्व-रजः-तमांचा ईश्वर–नियंता, [संसार-मोक्ष-स्थिति-बंधहेतुः–] अहं-ममाभिमानरूप संसारापासून मोक्ष, त्या मोक्षांतील नित्य स्थिति व अहं-ममाभिमानरूप बन्ध यांचें कारण आहे. १६.–तथापि तो प्रधान व क्षेत्रज्ञ यांहून भिन्न नाहीं, असें श्रुति सांगते—

स तन्मयो ह्यमृत ईशसंस्थो ज्ञः सर्वगो भुवनस्यास्य गोप्ता ।
य ईशेऽस्य जगतो नित्यमेव नान्यो हेतुर्विद्यते ईशनाय ॥ १७

अन्वयार्थ—[सः तन्मयः–] तो प्रसिद्ध आत्मा विश्वात्मा, किंवा ज्योतिर्मय किंवा प्रधान-क्षेत्रज्ञरूप आहे. [हि अमृतः–] तसाच तो प्रसिद्ध मरणधर्मशून्य आहे. [ईशसंस्थः–] ईशामध्यें–स्वामीमध्यें–आत्मस्वरूपांत–भूमाख्य तत्त्वांत–स्वमहिम्यांत तो उत्तम प्रकारें स्थित आहे. [ज्ञः सर्वगः अस्य भुवनस्य गोप्ता–] ज्ञाता, सर्वव्यापी व या त्रिभुवनाचा रक्षक आहे. [यः अस्य जगतः नित्यं एव ईशे–] जो या जगाचें नियमानेंच नियंत्रण करितो, [ईशनाय अन्यः हेतुः न विद्यते–]याच्या नियमनाचा या एकावांचून दुसरा कोणताहि हेतु नाहीं.१७ –त्याच्या प्रसादप्राप्तीचा तच्छरणता हा उपाय सांगतात—

यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ।
तꣳह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥ १८

अन्वयार्थ—[यः पूर्वं ब्रह्माणं विदधाति–] जो परमात्मा सृष्टीच्या आरंभीं हिरण्यगर्भाला विविध सामर्थ्यानें युक्त असा उत्पन्न करितो. [यः वै तस्मै वेदान् च प्रहिणोति–] व जो प्रसिद्ध आत्मा त्या हिरण्यगर्भाला ऋग्वेदादि महत्शास्त्रें देतो [तं ह आत्मबुद्धिप्रकाशं देवं अहं मुमुक्षुः वै शरणं प्रपद्ये–] त्याच आत्मबुद्धिसाक्षी स्वयंप्रकाशाला मी मुमुक्षु शरण जातों, तोच माझा रक्षक आहे,

अशा दृढ भावनेनें त्याचाच आश्रय करितों. (परमेश्वर प्रसन्न झाला असतां बुद्धि निष्प्रपंच ब्रह्माकारानें अवस्थित होते, म्हणून आत्मबुद्धिप्रकाश, किंवा आत्मा हीच बुद्धि व तोच ज्याचा प्रकाश आहे तो आत्मबुद्धिप्रकाश होय. १८. —त्या शरण्य ईश्वराचेंच स्वरूप श्रुति सांगते—

निष्कलं निष्क्रियꣳशान्तं निरवद्यं निरञ्जनम् ।
अमृतस्य परꣳसेतुं दग्धेन्धनमिवानलम् ॥ १९

अन्वयार्थ—[निष्कलं—] अवयवरहित, किंवा प्राणादि कलारहित, [निष्क्रियं—] क्रियाशून्य, [शांतं—] सर्वविपरिणामरहित, [निरवद्यं—] निर्दोष, अविद्यादि सर्वदोषशून्य, [निरंजनं—] निर्लेप किंवा कारणशून्य [अमृतस्य परं सेतुं—] मोक्षाचा परम सेतु—संसारमहासागरांतून तरून पार जाण्याचा उपाय—साधन किंवा अविनाशी मोक्षाचा सर्वोत्तम आधार [दग्धेन्धनं अनलं इव—] ज्यानें सर्व काष्ठांना जाळून भस्म केलें आहे असा जणुंकाय धगधगीत अग्निच आहे, त्यालाच मी शरण जातों. १९.—अहोपण, ब्रह्मज्ञानासाठीं हा सर्व उद्यम आहे व ब्रह्मज्ञानहि दुःखनाशासाठी हवें असतें, पण तो दुःखाचा नाश जर अन्य उपायानें होत असेल तर हें ज्ञान व्यर्थ आहे, अशी शंका घेऊन श्रुति म्हणते—

यदा चर्मवदाकाशं वेष्टयिष्यन्ति मानवाः ।
तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति ॥ २०

अन्वयार्थ—[यदा मानवाः चर्मवत् आकाशं वेष्टयिष्यन्ति—] जेव्हां मानव मूर्त चामड्याप्रमाणें अमूर्त आकाशाला गुंडाळतील, [तदा देवं अविज्ञाय दुःखस्य अन्तः भविष्यन्ति—] त्यावेळीं या नित्यज्ञानस्वरूप देवाला न जाणतां दुःखाचा अन्त होईल. २०.—संप्रदायपरंपरेनें प्राप्त झालेली ब्रह्मविद्याच मोक्ष देते व अभाग्यवानांना ती केव्हांहि प्राप्त होत नाहीं, हें दाखविण्यासाठीं संप्रदाय व विद्याधिकारी यांचें कथन—

तपःप्रभावाद्देवप्रसादाच्च ब्रह्म ह श्वेताश्वतरोऽथ विद्वान् ।
अत्याश्रमिभ्यः परमं पवित्रं प्रोवाच सम्यगृषिसङ्घजुष्टम् ॥ २१

अन्वयार्थ—[तपःप्रभावात्—] कृच्छ्र-चांद्रायणादि किंवा नित्य स्वधर्मानुष्ठान यांच्या प्रभावानें—तसेंच मन व इंद्रियें यांचें ऐकाग्र्य हेंच परम तप त्याच्या योगानें प्राप्त होणाऱ्या सामर्थ्यानें [च देवप्रसादात्—] व स्वयंप्रकाश

आनंदात्म्याच्या अनुग्रहानें किंवा देवाच्या म्ह० द्योतनस्वभाव अन्तःकरणाच्या निर्मलतेनें [श्वेताश्वतरः इ ब्रह्म विद्वान्–] श्वेताश्वतरनांवाचा प्रसिद्ध ऋषि ब्रह्माला जाणता झाला. (ज्याचे अश्व ह्म० इंद्रियें श्वेत ह्म० अन्तर्मुखत्वामुळें निर्दोष झालीं आहेत तो श्वेताश्व, जो अतिशय जितेंद्रिय तो श्वेताश्वतर–अष्टांगयोगनिष्ठ असा या ऋषीच्या नांवाचा मूळ अर्थ आहे) ब्रह्माचें गुरुमुखानें संप्रदायशुद्ध ज्ञान संपादन करून ' तेंच मी ' अशा दृढ साक्षात्कारानें युक्त झालेल्या त्या मुनीनें [अथ–] स्वानुभव दृढ झाल्यावर [अत्याश्रमिभ्यः–] परमहंस संन्याशांना [ऋषिसंघजुष्टं–] वामदेव-सनकादि ऋषींच्या संघांनीं आत्मत्वानें सेविलेलें–प्रियतम आनंदरूपानें साक्षात् जाणलेलें [परमं पवित्रं सम्यक् प्रोवाच–] परम पवित्र ब्रह्म उत्तम प्रकारें सांगितलें. (श्वेताश्वतरानें परम पवित्र ब्रह्म अत्यंत विरक्त परमहंसांना सांगितलें.) २१. –शिष्याचा अधिकार पाहूनच ब्रह्मविद्या सांगावी, अनधिकाऱ्याला ती सांगितल्यास मोठा दोष लागतो, ही विद्या वेदोक्त आहे, गुप्त आहे व संप्रदायपरंपरेनें प्रतिपादित आहे, असें श्रुति सांगते—

वेदान्ते परमं गुह्यं पुराकल्पे प्रचोदितम्। नाप्रशान्ताय दातव्यं नापुत्रायाशिष्याय वा पुनः॥ २२

अन्वयार्थ—[वेदान्ते–] सर्व उपनिषदांमध्ये [परमं] परम पुरुषार्थस्वरूप [गुह्यं–] अत्यंत गुप्त असें हें ब्रह्मज्ञान [पुरा कल्पे–] पूर्व कल्पांत [प्रचोदितं–] उत्तम प्रकारें उपदेशिलेलें आहे. तें [अशान्ताय अपुत्राय अशिष्याय वा पुनः न दातव्यं–] ज्याचें चित्त रागादि मलानें रहित झालेलें नसतें अशा अपुत्राला किंवा अशिष्याला सांगूं नये. तर शांत–समाहितचित्त पुत्राला किंवा शिष्यालाच सांगावें. अनधिकाऱ्याला कधींहि सांगूं नये. २२.–जो देवता व गुरु यांच्या भक्तीनें युक्त असतो त्यालाच गरूनें सांगितलेली विद्या आत्मानुभव देऊं शकते, असें आतां श्रुति सांगते—

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः प्रकाशन्ते महात्मन इति॥ २३

' पूर्णमदः पूर्णमिदं० ' ' भद्रं कर्णेभिः० ' ' सह नाववतु सह नौ भुनक्तु०' ॥ इति शान्तिः ॥

इति श्वेताश्वतरोपनिषदि षष्ठोऽध्यायः ॥६

अन्वयार्थ—[यस्य—] ज्या अधिकारी पुरुषाची [देवे—] देवाच्या ठिकाणीं —येथवर सांगितलेल्या अखंड एकरस सच्चिदानन्द पर ज्योतिःस्वरूप परमात्म्यावर [परा भक्तिः—] उत्कृष्ट—निरुपचरित भक्ति—प्रीति असते [यथा देवे तथा गुरौ—] व जशी त्या देवावर तशीच ब्रह्मविद्येचा उपदेश करणाऱ्या गुरूवरहि श्रद्धा—भक्ति असते [तस्य महात्मनः हि कथिताः एते अर्थाः प्रकाशन्ते—] त्या उत्तम अधिकाऱ्यालाच या उपनिषदांत श्वेताश्वतरानें सांगितलेले हे विषय—प्रयोजनरूप अर्थ स्वानुभव देण्यास समर्थ होतात. (क्षुधिताला भोजनावांचून कांहीं सुचत नाहीं, त्याप्रमाणें संसारदुःखानें संतप्त झालेल्या ज्याला आत्मज्ञानावांचून कांहीं सुचत नाहींसें होतें तोच या विद्येचा अधिकारी आहे व त्यालाच सांगितलेला हा आत्मरूप अर्थ स्वानुभव देऊं शकतो. ' प्रकाशन्ते महात्मनः ' या पदांची आवृत्ति उपनिषत्समाप्ति सुचविण्यासाठीं आहे.)२३.

इति श्वेताश्वतरोपनिषदाचा सहावा अध्याय समाप्त झाला.

श्वेताश्वतरोपनिषदाचें सिंहावलोकन.

हें कृष्णयजुर्वेदाच्या श्वेताश्वतरशाखेचें उपनिषद् आहे. याचे सहा अध्याय असून तें सर्व मंत्रमय आहे. त्याच्या आरंभीं वेदवेत्ते जगत्कारणाविषयीं आपसांत विचार करूं लागले. त्यांनीं ब्रह्माच्या कारणत्वाविषयीं अनेक विकल्प करून, आमची उत्पत्ति, स्थिति, जीवन वगैरे कोणामुळें होतें, आमचें नियमन कोण करितें, असे प्रश्न उपस्थित केले. काल, स्वभाव, नियति, इत्यादि अनेक कारणवादांचा उपन्यास करून त्यांतील दोषहि दाखविले. नंतर ते ध्यानयोगानें जगत्कारण शोधूं लागले. तेव्हां त्यांना स्वयंप्रकाश आत्म्याची स्वगुणांनीं झांकलेली शक्ति हेंच जगत्कारण आहे, असा प्रत्यय आला. त्या गूढ शक्तीचा आधार परमात्माच कालादि सर्व कारणांचा अधिष्ठाता आहे. अर्थात् त्या परम कारणाचें त्यांना ध्यानयोगानें ज्ञान झालें. त्यानंतर त्यांनीं त्या कारणाचें—सर्वात्म्याचें ब्रह्मचक्ररूपानें व संसाराचें नदीरूपानें वर्णन केलें. पुढें क्रमानें-कार्यासह अविद्या हाच जीवाचा बंध व ब्रह्मज्ञान हेंच मोक्षाचें साधन, जीवावर

अनुग्रह करणारें ब्रह्म, जीवेश्वरांचें ऐक्य व त्याच्या ज्ञानानेंच मोक्ष, औपाधिक जीवेश्वरांचें वैलक्षण्य, प्रधान व ईश्वर यांचें वैलक्षण्य व ईश्वरज्ञानानें मोक्ष, आत्म्याचा ज्ञाता व त्याचें ध्यान करणारा यांचें मोक्ष व ब्रह्मलोक हें फल, या आत्मतत्त्वालाच जाणावें, आत्मज्ञानानेंच परम पुरुषार्थसिद्धि होते. काष्ठांतील गुप्त अग्नि जसा मंथनानें व्यक्त होतो तसा देहांतील गुप्त आत्मा प्रणवानें चिंतन केल्यास व्यक्त होतो. स्वदेहाला खालची अरणि व प्रणवाला उत्तर अरणि करून ध्यानरूप मंथनाच्या अभ्यासानें अग्नीप्रमाणें गुप्त असलेल्या त्याला पहावें. तिलांतील तेल, दह्यांतील लोणी, नद्यांतील आटलेलें पाणी, काष्ठांतील अग्नि उपायानें प्राप्त होतात. तोच न्याय आत्मज्ञानाला लागू आहे. सत्य, तप, ध्यान या उपायांनी सर्वव्यापी व सर्वकारण आत्म्याचें शरीरांतील बुद्धातच ज्ञान होतें (१)

पहिल्या अध्यायांत परमार्थदर्शनाचा उपाय ध्यान सांगून दुसऱ्या अध्यायांत त्याचीं साधनें सांगितलीं आहेत. प्रथम ध्यानसिद्धीसाठीं सवित्याची प्रार्थना व स्तुति केल्यावर मनाचा निग्रह कोठें करावा, तें—आत्मरूप स्थान, मनोनिरोधाच्या साधनभूत शरीराचें स्थापन, इंद्रियांचा निग्रह व प्रणवरूप नौकेनें भयंकर संसारनदीचें उल्लंघन करावयास सांगितलें आहे. प्राणायामानें मनाचे मल क्षीण होतात, म्हणून प्राणायामाचा विधि, मनानें इंद्रियांचें व बुद्धीनें मनाचें नियमन, ध्यानोपयोगी आसनासाठीं योग्य प्रदेश, योगप्रवृत्तीचीं चिह्नें योगाचीं अवान्तर फलें, योगप्राप्तीचीं आणखी चिह्नें, मोक्ष ही मुख्य सिद्धि, आत्मानुभव व शेवटीं त्या सर्वात्म्याला नमस्कार—आदरानें नमस्कार करणें हें साधन सांगितलें आहे. (२)

तिसऱ्या अध्यायांत अद्वितीय ईश्वराला ईशितृ-ईशयितव्यभाव कसा, तें सांगितलें आहे. महावाक्यांच्या अर्थज्ञानासाठीं त्यांतील 'ब्रह्म' या पदाचा अर्थ प्रथम सांगितला आहे. तो देव एक आहे, तो कोळ्याप्रमाणें मायाजाल पसरून आपल्या विचित्र शक्तींनी त्याचें नियमन करितो. तो त्रिकालीं एक आहे. तोच उत्पत्ति-स्थिति-संहारकर्ता आहे. तो सर्वतश्चक्षु, सर्वतोमुख, वगैरे आहे. त्यामुळें जगदुत्पत्त्यादि करण्यास तो स्वतंत्र आहे. तो देवांचेंहि कारण आहे. त्यानेंच पूर्वी हिरण्यगर्भाला उत्पन्न केलें. तो आम्हांला परमात्मविषयक शुभ बुद्धि देवो, अशी प्रार्थना करून मंत्रद्रष्ट्या ऋषीनें 'या ते रुद्र शिवा तनूः०'

इत्यादि रुद्राध्यायांतील मंत्रांनीं त्याची स्तुति केली आहे. तो रुद्राख्य परमात्माच कारणरूपानें अवस्थित आहे.त्याच्या ज्ञानानेंच मोक्षप्राप्ति होते.मंत्रद्रष्टा ऋषि म्हणतो'मी पूर्ण प्रकाशरूप परमात्म्याला जाणतों.त्याच्याच ज्ञानानें जीव संसारबंधापासून मुक्त होऊन अविद्याख्य मृत्यूचें उल्लंघन करितो.संसारसागराच्या परतीरास जाण्याला ज्ञानावांचून दुसरा उपायच नाहीं. परमात्म्याहून उत्कृष्ट किंवा अपकृष्ट असें दुसरें कांहीं एक नाहीं, तो महावृक्षाप्रमाणें स्तब्ध—निश्चल आहे. तो स्वयंप्रकाश स्वरूपांत सर्वभेदशून्य होऊन राहतो. त्या पुरुषानेंच हें सर्व भरून सोडलें आहे. तें ब्रह्मच सर्व कार्यांचें कारण आहे. त्याला जाणणारे मुक्त होतात व न जाणणारे बद्ध होतात, संसारदुःखांत पडतात. तोच प्राण्यांचे मुख-मस्तकादि सर्व अवयव आहे. तो सर्व भूतांच्या बुद्धींत राहतो. तो भगवान् सर्वव्यापी शिव आहे. तो महान्, समर्थ, परिपूर्ण, हिरण्यगर्भाचा प्रवर्तक आहे. अविद्यामलशून्य परमपदप्राप्तीचा ईश्वर आहे. स्वयंप्रकाश ज्योतिःस्वरूप व अविनाशी आहे. हृदयाकाशांत अभिव्यक्त होणारा हा अंगुष्ठप्रमाण आत्मा परिपूर्ण आहे. तो लोकांच्या हृदयांत नित्य स्थित आहे. तो सर्व शरीरांत प्रविष्ट झालेला असला तरी मनाचें नियमन करणाऱ्या बुद्धीनें त्याची हृदयांत कल्पना केली आहे. जे अधिकारी या आत्मस्वरूपाला जाणतात ते अमृत होतात. तो हृदयाकाशाच्या अपेक्षेनें अंगुष्ठप्रमाण जरी असला तरी ' सहस्रशीर्षा, सहस्राक्ष सहस्रपात् ' आहे. तो सर्व जगाला व्यापून त्याच्या पलीकडे अनंत प्रमाण पसरला आहे. तोच हें सर्व आहे. तो मोक्षाचा ईश्वर आहे. तो सर्वतः हात, पाय, नेत्र, शिर, मुख, श्रोत्र यांनीं युक्त आहे. तो सर्वाला व्यापून राहिला आहे. तो सर्व इंद्रियांचें गुण व आभास यांनीं युक्त असल्यासारखा जरी भासला तरी सर्वेंद्रियशून्य आहे. त्याला सर्वतः श्रोत्रेंद्रियें आहेत. तो सर्वांचा प्रभु—ईश्वर, सर्वांचा फार मोठा आधार आहे. नऊ द्वारांनीं युक्त असलेल्या शरीरनगरांत तो जीवरूपानें प्रवेश करून बाहेर विषयग्रहणासाठीं जातो. पण तो सर्वचराचर लोकांचा नियंता आहे. तो हस्त-पादरहित असूनहि मोठा वेगवान् व सर्वांचें ग्रहण करणारा आहे. तो चक्षूवांचून पाहतो व श्रोत्रावांचून ऐकतो. चक्षुः-श्रोत्ररहित असूनहि दर्शनादि शक्तिमान् आहे. तो सर्व विषयजात जाणतो, पण त्याला जाणणारा कोणी नाहीं. तो सर्वकारण व पूर्ण—महान् आहे,

अणूहून अणु व महत्-हून महान् असलेला हा आत्मा ब्रह्मादिस्तंबपर्यंत प्राण्यांच्या हृदयाख्य गुहेंत स्थित आहे. जो या सर्वसंकल्पशून्य आत्ममहिम्याला—या ईशाला 'हा मी' असें साक्षात् जाणतो तो सर्वशोकरहित होतो. ईश्वराच्या प्रसादानेंच त्याला तादात्म्यज्ञान होतें. मंत्रद्रष्टा म्हणतो—मी या अजर, पुराण, विभुत्वामुळें सर्वगत असलेल्या सर्वात्म्याला जाणतों. ब्रह्मज्ञ याचा नित्य जन्माभाव सांगतात. (३)

चवथ्या अध्यायांत अतिशय दुर्ज्ञेय परमात्म्याचेंच स्वरूप सांगितलें आहे. तो स्वतः एक असून स्वार्थनिरपेक्ष होऊन चराचर अनेक पदार्थांस आपल्या विविध शक्तींनी धारण करितो. जो उत्पत्ति-स्थिति-प्रलयसमयीं विश्वाला प्राप्त होतो, तो देव आम्हांला—आत्मविषयक शुभ बुद्धि देवो. तोच अग्नि, सूर्य, वायु, चंद्रमा, अत्यंत शुद्ध असलेलें सर्व पदार्थजात, हिरण्यगर्भ, जल व प्रजापालक विराडात्मा आहे. तोच स्त्री-पुरुषादि सर्व शरीरें आहे. तोच नाना अवस्थांस प्राप्त होतो. तोच एक जणुंकाय विचित्र पक्षी आहे, मेघ, ऋतु, समुद्र आहे. अनादिमत्, विभु, आहे. त्याच्यापासून सर्व भुवनें झालीं. त्याची शक्ति—मायाख्य प्रकृति अनादि एक त्रिगुणात्मिका आहे. ती आपल्याच सारखी असंख्य प्रजा उत्पन्न करिते. तिच्या अधीन झालेला अविद्यावान् एक विज्ञानात्मा तिचा उपभोग घेतो. पण दुसरा ज्ञानी भोग घेतलेल्या तिला सोडतो. एकाच शरीराचा आश्रय करून राहणारे दोन मित्र पक्षी परस्पर संयुक्त होऊन राहतात. त्यांतील एक अविवेकी—विज्ञानात्मा कर्मफल भोगतो व दुसरा—साक्षी तें केवल पाहतो. त्याच एका शरीराख्य वृक्षावर आसक्त झालेला जीव दुर्बलतेमुळें मोहित होऊन संतप्त होतो; पण तोच जेव्हां त्या दुसऱ्या मित्राला साक्षात् पाहतो तेव्हां सर्व संतापरहित होतो. वेद-वेदान्तावरून ज्ञात होणाऱ्या त्याचा आश्रय करून सर्व देव राहतात. त्याला न जाणणाराला वेदाध्ययनाचा काय मोठा उपयोग होणार ! तोच मायावान् ईश्वर जगाचा स्रष्टा व जगाचें निमित्त आहे. पण तोच अविद्यावश व स्वतःहून भिन्नसा होऊन संसारसमुद्रांत भ्रमण करितो. माया ही प्रकृति आहे व तिचा अधिष्ठाता मायावी ईश्वर आहे. त्याच्या कल्पित अवयवांनीं हें सर्व जगत व्यापलें आहे. सर्व योनींत तोच अधिष्ठित होतो, सर्व कार्यांची उत्पत्ति त्याच्यामुळेंच होते. त्याच्याच एकत्वज्ञानानें मुक्ति

मिळते. तोच देवादिकांचा उद्भव व प्रलय आहे. तो विश्वाधिप, अविद्यानाशक, सर्वज्ञ वगैरे आहे. तो आम्हांला आत्मबुद्धि देवो. तो देव, लोक, द्विपद्, चतुष्पद् इत्यादि सर्वांचें नियमन करितो. त्याचीच आम्ही चरु-पुरोडाशादिकांनीं परिचर्या करितों. त्या सूक्ष्माहून सूक्ष्म इत्यादि स्वरूपाच्या देवाला जाणूनच परम शांति प्राप्त होते. सर्वांचें सार, अशा त्याला जाणल्यानेंच जीव सर्व मृत्युपाशांपासून मुक्त होतो. त्याचें ज्ञानच सर्व अनर्थनिवृत्तीचा उपाय आहे. तो विश्वकर्ता सर्वांच्या हृदयांत स्थित आहे. त्याला आत्मत्वानें जाणल्यानेंच जीव अमरण धर्मवान् होतो. तो केवल—सर्वधर्मशून्य शिव आहे. त्याचा विशेष देश नाहीं. तो निरुपम आहे. 'महत् यश' हें त्याचें नांव आहे. तो इंद्रियांचा विषय होत नाहीं. तो प्रत्यगात्माच आहे. त्याच्याच साक्षात्कारानें मोक्ष होतो. त्याच्या अनुग्रहानेंच इष्टप्राप्ति व अनिष्टपरिहार होतो. त्यासाठीं त्याचीच प्रार्थना करावी. (४)

पांचव्या अध्यायांतहि प्रायः वरच्या सारखेंच ईश्वरस्वरूपाचें वर्णन केलें आहे. सर्व श्रेष्ठ अनन्त ब्रह्मामध्यें दोन अक्षरें स्थित आहेत. एक कारणभूत अक्षर व दुसरें शब्दरूप अक्षर. त्यांत अविद्या व विद्या गुप्त राहतात. विनाश पावणारें कार्य ही अविद्या व मोक्षसाधन ज्ञान ही विद्या. अविद्या कारण-अक्षरांत स्थित आहे व विद्या शाब्द-अक्षरामध्यें आहे. पण त्यांचा नियामक ईश्वर त्यांहून अगदीं विलक्षण आहे. तो मूल प्रकृति माया व अवांतर प्रकृति आकाशादिक यांस सत्ता-स्फूर्ति देणारा आहे. तोच कार्य-कारणरूप आहे. तो जड-चेतन या सर्वांचा अधिष्ठाता आहे. तोच वासुदेवांश कपिलाला सर्व ज्ञानांनीं संपन्न करितो व सर्वांची उत्पत्ति पाहतो. प्रत्येक प्राण्यामध्यें व्यवस्थित असलेल्या संसारजालाला अनेक प्रकारचें करणारा हा परमात्मा त्यांचा अविद्याक्षेत्रांत संहार करितो. तो मरीच्यादि प्रजापतींना उत्पन्न करून सर्वांचें पालन करितो. सूर्याप्रमाणें सर्व दिशांना सर्वतः प्रकाशित करणारा तो भगवान् कारणस्वभाव पदार्थांचें नियमन करितो. जो जगत्कारण ईश्वर अग्न्यादिकांच्या उष्णत्वादि स्वभावांस उत्पन्न करितो किंवा कार्य-कारणरूप किंवा षड्भावविकाररूप स्वभावाचा परिपाक करितो, विश्वाचें नियमन व गुणांचा विनियोग करितो. हिरण्यगर्भ त्या वेदान्तैकवेद्य जगत्कारणाला जाणतो. प्राचीन देवर्षि त्याच्या साक्षात्कारानें कृतार्थ झाले. तसेच आतांचेहि ज्ञाते कृतार्थ होतील. याप्रमाणें 'तत्-'पदाचा अर्थ

सांगून 'त्वं-'पदार्थाचें वर्णन केलें आहे. जो वासनारूप किंवा नाडीरूप गुणांशीं संबद्ध होणारा, सुखदुःखरूप फलासाठीं धर्माधर्माख्य कर्म करणारा, कृत कर्माचें फल भोगणारा, नानारूप, सत्त्वादि गुणत्रयवान्, देवयानादि तीन मार्गांनीं जाणारा, इंद्रियें व प्राण यांचा स्वामी, तो स्वकर्मांनीं संचार करितो. तो अंगुष्ठप्रमाण, प्रकाशस्वरूप, संकल्प व अहंकार यांनीं युक्त, कामादि बुद्धि-गुणांनीं व विषयज्ञानादि आत्मगुणांनीं युक्त आहे. अशा प्रकारच्या त्याला विद्वान् जलांतील प्रतिबिंबाप्रमाणें पाहतात. लिंगशरीररूप उपाधीमुळें त्याचा अति सूक्ष्मत्वानें निर्देश करितात. पण तो अनन्त परमात्माच आहे. तो स्त्री, पुरुष वगैरे कांहीं नाहीं. जें जें शरीर धारण करितो 'तेंच मी' असें मानून त्याचे धर्म आत्म्याच्या ठिकाणीं आरोपित करितो. अन्तर्बाह्य इंद्रियव्यापारांनीं व अविवेकानें शुभाशुभ कर्में करून तो विविध शरीरें धारण करितो. प्राण व अन्तःकरण यांच्या व्यापारांनींच तो सशरीर होतो. पण पूर्वोक्त ईश्वराला जाणून सर्व पाशांपासून मुक्त होतो. मंगलरूप परमात्म्याचा आत्मत्वानें साक्षात्कार झाल्यावर तद्रूप झालेले जीव प्राप्त शरीराचा त्याग करितात व पुनः दुसरें शरीर धारण करीत नाहींत. (५.)

जीव व ईश्वर अविद्येच्या अधीन आहेत, असें सांगितलें.त्यांच्या स्वरूपाचें ज्ञान होण्यासाठीं काल, स्वभाव इत्यादि अवांतर कारणांचा विचार करावा. कालादिक उत्पन्न होणारे आहेत. त्यामुळें त्यांना मूलकारणत्व नाहीं, हें उघड आहे. पण स्वयंप्रकाश आत्म्याचा जो मायाख्य महिमा त्याला मूल कारण म्हणणें युक्त आहे. अग्नि, इत्यादिकांची उत्पत्ति झाली कीं त्यांच्याबरोबर त्यांचा स्वभाव उत्पन्न होतो. यदृच्छा, पंचभूतें, प्रधान हें सर्व मायेपासून होणारें मायाकार्य आहे. माया जन्मरहित—अजा आहे. यास्तव तिलाच मूलकारणत्व आहे. कालादिकांना अवांतर कारणत्व असो; पण मूल कारणत्व मायेलाच आहे. प्रधान, पुण्यपाप, सत्त्वादि तीन गुण, भूम्यादि आठ प्रकृति यांपासून शरीर होतें. भूतादि तीन कालांच्या पलीकडे असलेला जो मायावी महेश्वर तो त्या शरीराचें मूळ अधिष्ठान आहे. त्या स्वचित्तामध्यें स्थित असलेल्या महेश्वराची उपासना करून त्याला प्रसन्न करावें. कालादिशाखांनीं युक्त असलेल्या संसारवृक्षाहून तो अगदीं भिन्न आहे. तो धर्माची प्राप्ति करून देणारा व पापाचा नाश करणारा आहे.

आपल्या चित्तांत असलेल्या त्याला साक्षात् पहावें. विष्णु, ब्रह्मा इत्यादि ईश्वरांचा जो परम महेश्वर व देवाचा परम देव त्याला आम्ही त्याच्याच प्रसादानें जाणतों. त्याला शरीर व इंद्रियें नाहीत, त्याच्या सारखा किंवा त्याहून अधिक कोणी नाहीं. त्याची सर्वश्रेष्ठ शक्ति बल, ज्ञान, क्रिया इत्यादि नाना प्रकारची आहे. तो अधिष्ठानत्वानें सर्वांचा कर्ता आहे. तो सर्वांचें कारण आहे. तो इंद्रियांचा स्वामी आहे. सर्व जीवांचा पालक आहे. त्याचा स्वामी कोणी नाहीं. 'कोळी तंतूंनीं जाळें करून त्यांत आपल्यालाच जसें अडकवून घेतो त्याप्रमाणें ज्या अद्वितीय परमात्म्यानें प्रधानापासून झालेल्या नाम-रूप-कर्मांनीं आपल्याला आच्छादित केलें आहे तो माझें ब्रह्माशीं तादात्म्य करो,' अशी प्रार्थना करावी. तो अद्वितीय परमात्मा सर्व देहांमध्यें गूढ आहे. सर्वव्यापी, सर्व प्राण्यांचा अन्तरात्मा, सर्व कर्मांचा अध्यक्ष, सर्व भूतांचा आश्रय, साक्षी, निर्गुण, शुद्ध चिद्रूप आहे. त्याला जे ज्ञानी साक्षात् पाहतात त्यांना शाश्वत सुख होतें. त्या नित्यचेतनाला जाणून अक्षय शांति प्राप्त होते. ज्या सुखाचें शब्दांनीं वर्णन करितां येत नाहीं, त्याचा अनुभव येतो, असें तत्त्वज्ञ सांगतात. विवेक व योग असे त्याच्या ज्ञानाचे दोन उपाय आहेत. तत्त्वविवेकानें यथाशास्त्र त्याचें विवेचन करून दृढ योगानें त्याचा अनुभव घेतात. सूर्य-चंद्रादिक सर्वांना प्रकाशित करणारे असूनहि त्या सुखाला प्रकाशित करण्यास समर्थ नाहींत. उलट ते सूर्यादिकच त्याच्या कडून प्रकाशित होतात. स्वप्रकाश चित्सुखात्मा प्रथम स्वतःच भासतो. त्याच्या चित्प्रकाशानें सूर्यादिक प्रकाशित होतात. सूर्याप्रमाणें एक असलेला तो सर्वांना प्रकाशित करीत सर्व दृश्याला व्यापितो. अशा त्या चिदात्म्याला जो जाणतो तो ईश्वरच होय. ईश्वरत्वाचें दुसरें कांहीं निमित्त नाही. ज्ञानीच विश्वकर्ता, कालाचा काल, सत्त्वादिकांना प्रकाशित करणारा, प्रधान व जीव यांचा स्वामी, संसार व मोक्ष यांचा हेतु आहे. हें विद्याफल कदाचित् बहिर्मुखतेनें बाधित होईल, म्हणून बहिर्मुखतेच्या निवारणासाठीं मुमुक्षूनें त्या ईश्वराची 'यो ब्रह्माणं०' या मंत्रानें प्रार्थना करावी. त्याचा सारांश असा--जो हिरण्यगर्भाला उत्पन्न करून त्याला वेद देतो त्या स्वात्मबुद्धिप्रकाशक परमात्म्याला मी मुमुक्षु शरण आलों आहे. निरवयव, क्रियाशून्य, शांत, शुद्ध, निर्लेप, स्वप्रकाश, माया-तत्कार्यशून्य, अशा परमात्म्याला जाणूनच पुरुष मुक्त होतो. ज्ञानावांचून दुसऱ्या शेकडों साधनांनींहि

मुक्ति नाहीं. मानव चामड्याप्रमाणें आकाशाला जर गुंडाळूं शकतील तरच आत्मज्ञानावांचून मुक्त होतील. पण त्या दोन्ही गोष्टी अशक्य आहेत. तपानें परमात्म्याची आराधना करून श्वेताश्वतरमुनीनें ऋषीना प्रिय असलेली ब्रह्मविद्या परमहंसांना सांगितली. वेदान्तांतील हें परम गुह्य अनधिकाऱ्याला सांगूं नये. योग्य बुद्धिमान् शिष्यालाच सांगावें. ज्याची परमात्म्यावर व तशीच गुरूवर परम भक्ति असते त्याच महात्म्याला सांगितलेले हे अर्थ कळतात. अन्तर्यामीच आमचा मुख्य गुरु आहे. तो आत्मविद्याप्रकाशनानें सर्वांवर अनुग्रह करो.

हें मंत्रमय उपनिषद् मायाशक्ति, अद्वैत आत्मतत्त्व, वैदिक सांख्य व योग, जीव-ईश्वररूप इत्यादि अनेक पदार्थांचें प्रतिपादन करणारें आहे. काठकाप्रमाणेंच याचा भगवद्गीतेशीं साक्षात संबंध आहे. ब्रह्ममीमांसेंतहि यांतील वचनांचा विचार केला आहे. त्यामुळें हें फार महत्त्वाचें आहे. सु. ब्र. पृ. ११०, १४८, १५०, १९७, २१५, ४३९ पहा.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील श्वेताश्वतरोपनिषदाचा सहावा अध्याय सिंहावलोकनासह समाप्त झाला.

इति कृष्णयजुर्वेदीया श्वेताश्वतरोपनिषद्.

अथ जाबालोपनिषद् ।

[मूळ, अन्वयार्थ, स्पष्टीकरण व सिंहावलोकन यांसह.]

ॐ 'भद्रं कर्णेभिः०' इति शांतिः ॥

या शांतिचा अर्थ मागें पृ. ९१ वर पहा.

—ब्रह्मज्ञानाचा उपाय असा जो संन्यास त्याचा अधिकार नसलेल्या मुमुक्षूंसाठीं शतरुद्रीयजप व श्रवणादिकांच्या अधिकारी विज्ञासूंना सर्वसंगपरित्याग —संन्यास या उपनिषदांत सांगितला जातो. त्यांतील आख्यायिका आचारविधि सुचविण्यासाठीं आहे. एकदा मिथिलानगराच्या उपवनांत योगीश्वर याज्ञवल्क्य शिष्यसंघ, राजा जनक व इतर मुनि यांसह बसला असतां—

ॐ बृहस्पतिरुवाच याज्ञवल्क्यं यदनु कुरुक्षेत्रं देवानां देवयजनं सर्वेषां भूतानां ब्रह्मसदनम्। अविमुक्तं वै कुरुक्षेत्रं देवानां देवयजनं सर्वेषां भूतानां ब्रह्मसदनम्। तस्माद्यत्र क्वचन गच्छति तदेव मन्येतेतीदं वै कुरुक्षेत्रं देवानां देवयजनं सर्वेषां भूतानां ब्रह्मसदनम् ॥ अत्र हि जन्तोः प्राणेषूत्क्रममाणेषु रुद्रस्तारकं ब्रह्म व्याचष्टे येनासावमृतीभूत्वा मोक्षीभवति तस्मादविमुक्तमेव निषेवेत अविमुक्तं न विमुञ्चेदेवमेवैतद्याज्ञवल्क्यः ॥ १

अन्वयार्थ—[बृहस्पतिः याज्ञवल्क्यं उवाच–] देवेंद्राचा गुरु बृहस्पति याज्ञवल्क्यास म्हणाला–[यत् अनु कुरुक्षेत्रं–] जें दुसऱ्या सर्वांहूनहि अधिक प्रसिद्ध असें पुण्यकर्मफलभूत कुरुक्षेत्र–कुरु म्ह० पापकर्म, त्याच्या नाशाला कारण होणारें क्षेत्र (क्षेपणात् क्षेत्रं) किंवा कु म्ह० पृथ्वी, तिच्यामध्यें 'रौति'–जो प्राण शब्द करतो त्याचें निवासस्थान म्हणून कुरुक्षेत्र [देवानां देवयजनं] इंद्रियांच्या स्वयंप्रकाश आत्म्याच्या पूजेचें अधिकरण. कारण या शरीररूप कुरुक्षेत्रांतच इंद्रियें विविध विषयरूप उपहारांनीं परमात्म्याची पूजा करितात. [सर्वेषां भूतानां ब्रह्मसदनं–] इंद्रियांच्या अधिष्ठातृ-भूतांचें किंवा प्रसिद्ध भूतांचें

ब्रह्मसदन—सर्वपरिच्छेदशून्य ब्रह्माचें निवासस्थान (हें रूपक आहे. जसें प्रसिद्ध बाह्य कुरुक्षेत्र देवांच्या हविर्भागप्राप्तीचें कारण, यज्ञाचें स्थान व सर्व भूतांच्या दृष्टादृष्टप्राप्तीचें कारण आहे तसें आंतर कुरुक्षेत्र कोणतें? यावर याज्ञवल्क्याचें उत्तर-) [अविमुक्तं वै—] अविद्या-काम-क्रोधादिकांपासून विशेषतः मुक्त, असा चिदानंदरस आत्मा आहे, पण तोच अविद्यावस्थेंत अविमुक्त होतो. तत्स्वरूप अविमुक्त प्रसिद्ध आहे. म्ह० विविध धर्मांना स्वतःमध्यें मानणारें सोपाधिक ईश्वराचें रूपच अविमुक्त, असा याचा भावार्थ.[कुरुक्षेत्रं देवानां देवयजनं०—] तेंच कुरुक्षेत्र, देवांचें देवयजन, सर्व भूतांच्या ब्रह्माचें सदन आहे आणि ज्याअर्थीं असें आहे [तस्मात् यत्र क्वचन गच्छति—] त्याअर्थीं ज्या कोठेंहि गंगा-प्रयागादि स्थानीं किंवा त्याहून भिन्नस्थानीं मनुष्य गमन करील [तत् एव अविमुक्तं मन्येत—] तेंच अविमुक्त आहे, असें त्यानें समजावें. [इति इदं वै कुरुक्षेत्रं देवानां०—] याप्रमाणें मला प्राप्त झालेले हें स्थान अविमुक्तच आहे. इतकेंच नव्हे तर तें कुरुक्षेत्र देवांचें देवयजन व सर्व भूतांचें ब्रह्मसदन आहे. [अत्र हि जंतोः प्राणेषु उत्क्रममाणेषु रुद्रः तारकं ब्रह्म व्याचष्टे—] या कुरुक्षेत्रादिरूप कोणत्याहि अविमुक्त स्थानीं प्राण्याचे प्राण शरीर सोडून जाऊं लागले असतां दुःखनाशक रुद्र—सदाशिव किंवा वामन तारक ब्रह्माचा उपदेश करतो. संसारसमुद्रांतून तरून जाण्याचें साधन असें जें सत्यज्ञानादि लक्षण ब्रह्म तेंच तारक ब्रह्म होय. [येन असौ अमृती भूत्वा मोक्षी भवति—] ज्या ' अहं ब्रह्मास्मि ' या तारक ब्रह्मोपदेशानें हा जीव अमृत होऊन मुक्त होतो. अविद्यादशेंत ' मी कर्ता भोक्ता आहें ' इत्यादि अभिमानानें अमृती होऊन अविद्यादशेमध्यें बद्ध झालेला तो ब्रह्मज्ञानानें अविद्येची निवृत्ति झाल्यामुळें लागलाच मुक्त होतो. आपल्या स्वयंज्योतिःस्वरूप आनंदरूपानें अवस्थित होतो आणि ज्याअर्थी असें आहे [तस्मात् अविमुक्तं एव निषेवेत—] त्याअर्थीं ब्रह्मज्ञानाचा उदय होण्यापूर्वी सोपाधिक अविमुक्ताचेंच निरंतर ध्यान करावें [अविमुक्तं न विमुंचेत्—] ब्रह्मज्ञान उत्पन्न होईपर्यंत आपलें उपास्य असा जो सोपाधिक ईश्वर त्याला केव्हांहि सोडूं नये. (बृहस्पति म्हणतो—) [एवं एव—] होय, तें सोपाधिक रूपच अविमुक्त कुरुक्षेत्र उपास्य आहे. त्याचेंच यावज्जीव उपासन करावें (श्रुति म्हणते—)

[एतत् याज्ञवल्क्यः—] याज्ञवल्क्य बृहस्पतीला हें असें अविमुक्त कुरुक्षेत्र सांगता झाला (१).

अथ हैनमत्रिः पप्रच्छ याज्ञवल्क्यं य एषोऽनन्तोऽव्यक्त आत्मा तं कथमहं विजानीयामिति ॥ स होवाच याज्ञवल्क्यः सोऽविमुक्त उपास्यो य एषोऽनन्तोऽव्यक्त आत्मा सोऽविमुक्ते प्रतिष्ठित इति ॥ सोऽविमुक्तः कस्मिन्प्रतिष्ठित इति ॥ वरणायां नास्यां च मध्ये प्रतिष्ठित इति ॥ का वै वरणा का च नासीति सर्वानिन्द्रियकृतान्दोषान्वारयतीति तेन वरणा भवतीति ॥ सर्वानिन्द्रियकृतान्पापान्नाशयतीति तेन नासी भवतीति ॥ कतमं चास्य स्थानं भवतीति ॥ भ्रुवोर्घ्राणस्य च यः संधिः स एष द्यौर्लोकस्य परस्य च संधिर्भवतीति । एतद्वै संधिं संध्यां ब्रह्मविद उपासत इति ॥ सोऽविमुक्त उपास्य इति । सोऽविमुक्तं ज्ञानमाचष्टे । यो वैतदेवं वेदेति ॥ २

अन्वयार्थ—[अथ ह अत्रिः एनं याज्ञवल्क्यं पप्रच्छ—] त्यानंतर ब्रह्मपुत्र अत्रि या याज्ञवल्क्याला विचारूं लागला- [यः एषः अनन्तः अव्यक्तः आत्मा—] जो हा तारक ब्रह्म म्हणून सांगितलेला देशादिपरिच्छेदशून्य, अव्यक्त—अमूर्त आत्मा—'अहं—मी' या प्रत्ययाचा लक्ष्य अर्थ [तं अहं कथं विजानीयां इति—] त्याला मी कोणत्या प्रकारानें जाणूं शकेन, असा त्यानें प्रश्न केला. [सः ह याज्ञवल्क्यः उवाच—] तो याज्ञवल्क्य त्याला म्हणाला—[सः अविमुक्तः उपास्यः—] कुरुक्षेत्रादिरूपानें सांगितलेला जो अविमुक्त सोपाधिक आत्मा तो निर्गुण आत्मज्ञानासाठीं उपास्य—उपासना करण्यास व साक्षात् जाणण्यास योग्य आहे. कारण [यः एषः अनन्तः अव्यक्तः आत्मा—] जो हा अपरिछिन्न, अव्यक्त आत्मा [सः अविमुक्ते प्रतिष्ठितः इति—] तो—तूं विचारलेला निर्गुण आत्मा या सोपाधिक अविमुक्तामध्यें विविधशक्तियुक्त होऊन प्रतिष्ठित आहे. म्हणून ईश्वरामध्यें हाच साक्षात् जाणण्यास योग्य आहे. (पण तो सोपाधिक आत्माहि दुर्विज्ञेय असल्यामुळें अत्रि त्याच्या उपलब्धीचें स्थान विचारितो—) [सः अविमुक्तः कस्मिन् प्रतिष्ठितः—] निर्गुणस्वरूपाचा जणुंकाय आधारच असा तो सोपाधिक ईश्वर या देहाच्या कोणत्या अवयवामध्यें—उपलब्धिस्थानामध्यें

प्रतिष्ठित–सर्वदा संनिहित आहे, [इति–] असा अत्रीनें प्रश्न केला. याज्ञवल्क्य म्हणतात–[वरणायां नास्यां च मध्ये प्रतिष्ठितः इति–] वरणा व नासिका यांच्या मध्यभागीं म्ह० दोन भुवयांच्यामध्यें तो प्रतिष्ठित आहे. येथील व यापुढीलहि ' इति-'शब्द प्रश्न व उत्तरें यांच्या समाप्तीसाठीं आहेत, असें समजावें. अत्रि–[का वै वरणा का च नासी इति–] वरणा कोणती व नासी कोणती ? याज्ञवल्क्य–[सर्वान् इंद्रियकृतान् दोषान् वारयति इति तेन वरणा भवति–] इंद्रियांमुळें होणाऱ्या सर्व दोषांचें निवारण करिते म्हणून त्यामुळें ती वरणा होते [सर्वान् इंद्रियकृतान् पापान् नाशयति इति तेन नासी भवति इति–] इंद्रियकृत सर्व पापांचा नाश करिते, त्यामुळें नासी होते. तो वरणा व नासा यांच्यामध्यें प्रतिष्ठित आहे, यावरून नासापुटांच्या मध्यें अवस्थित आहे, असें सामान्यतः प्रतीत होतें. तथापि चार अंगुळें लांब असलेल्या नासिकेच्या कोणत्या विशेषस्थानीं तो रहातो. अशा आशयानें अत्रि म्हणतो–[अस्य कतमत् च स्थानं भवति इति–] त्या नासिकेंत या अविमुक्ताचें स्थान–त्याच्या ध्यानाचें स्थान कोणतें आहे ? याज्ञवल्क्य–[भ्रुवोः घ्राणस्य च यः संधिः–] दोन भुंवया व घ्राण या तिहींचा जो संधि–मध्यवर्ती प्रदेश [सः एषः द्यौः लोकस्य परस्य च संधिः भवति इति–] तो हा मस्तक-कपालरूप स्वर्गलोकाचा व हनुवटीपर्यंत भूलोकाचा संधि आहे. [एतत् वै संधिः–] हें अविमुक्तच संधि आहे. कारण सर्व यांत जोडलें–उत्तम प्रकारें ठेवलें जातें, म्हणून संधि–ब्रह्मस्वभाव. [संध्यां ब्रह्मविदः उपासते इति–] भुंवया व घ्राण यांच्या या संधीमध्यें ब्रह्मज्ञानकुशल ज्याअर्थीं त्या अविमुक्ताला साक्षात् जाणतात त्याअर्थीं [सः अविमुक्तः उपास्यः इति–] त्या अविमुक्ताची उपासना करावी. (ही पुनरुक्ति उपसंहारासाठीं आहे. ' इति ' वाक्याच्या समाप्तीसाठीं आहे. याचें फल सांगतात–) [यः वै एतत् एवं वेद–] जो कोणी उपासक तें निर्गुण आत्मस्वरूप हें अविमुक्त स्वरूपच आहे, त्याहून भिन्न नाहीं, असें उक्त स्थानादिकांसह जाणतो–त्याचें चिंतन–ध्यान करितो त्याला [सः अविमुक्तं ज्ञानं आचष्टे–] तो अविमुक्त अविमुक्ताचें–वस्तुसाक्षात्काराचें साधनभूत ज्ञान अन्तकालीं उपदेशितो. २.

अथ हैनं ब्रह्मचारिण ऊचुः किं जाप्येनामृतत्वं ब्रूहीति । स होवाच याज्ञवल्क्यः । शतरुद्रीयेणेत्येतान्येव ह वा अमृतनामधेयानि । एतैर्ह वा अमृतो भवतीति । एवमेवैतद्याज्ञवल्क्यः ॥ ३

अन्वयार्थ—[अथ ह एनं ब्रह्मचारिणः ऊचुः—] त्यानंतर याज्ञवल्क्याला अविमुक्तामध्यें मन स्थिर ठेवण्यास असमर्थ असलेले शिष्य म्हणाले—[किं जाप्येन अमृतत्वं ब्रूहि इति—] कशाचा जप केल्यानें मोक्ष प्राप्त होतो तें सांग. [सः ह याज्ञवल्क्यः उवाच—] तेव्हां तो याज्ञवल्क्य आचार्य त्यांस म्हणाला—[शतरुद्रीयेण इति—] 'नमस्ते रुद्र मन्यवे०' या रुद्राध्यायाच्या जपानें मोक्ष प्राप्त होतो. [एतानि एव ह वै अमृतनामधेयानि—] हींच रुद्राध्यायांतील नांवें मोक्षरूप रुद्रार्चाच नावें आहेत. [एतैः ह वै अमृतः भवति इति—] नित्य जप केल्या जाणाऱ्या या अतिप्रसिद्ध रुद्राच्या नांवांनीं मुमुक्षु मोक्षाला पात्र होतो. श्रुति म्हणते—[याज्ञवल्क्यः एवं एव एतत्—] याज्ञवल्क्यानें जें सांगितलें तें तसेंच—अगदीं खरें आहे. ३.

अथ ह जनको ह वैदेहो याज्ञवल्क्यमुपसमेत्योवाच भगवन् संन्यासमनुब्रूहीति । स होवाच याज्ञवल्क्यः । ब्रह्मचर्यं समाप्य गृही भवेत् । गृही भूत्वा वनी भवेत् । वनी भूत्वा प्रव्रजेत् । यदि वेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेद्गृहाद्वा वनाद्वा । अथ पुनरव्रती वा व्रती वा स्नातको वास्नातको वोत्सन्नाग्निरनग्निको वा यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् ॥ १

अन्वयार्थ—[अथ ह—] ब्रह्मचाऱ्यांच्या प्रश्नानंतर [वैदेहः ह जनकः याज्ञवल्क्यं उपसमेत्य उवाच—] विदेहदेशाचा अधिपति जनक याज्ञवल्क्यापाशीं येऊन म्हणाला—[भगवन् संन्यासं अनुब्रूहि इति—] हे पूज्य मुने, संन्यासाचें विधान—तो कोणीं, केव्हां, कसा करावा ? तें मला सांग. तेव्हां अविरक्ताला कालप्राप्त संन्यास सांगण्यासाठीं आश्रमव्यवस्था—[सः ह याज्ञवल्क्यः उवाच—] तो याज्ञवल्क्य सांगूं लागला. [ब्रह्मचर्यं समाप्य—] विरक्तिशून्य पुरुषानें ब्रह्मचर्य या प्रथम आश्रमाला संपवून स्नातक व्हावें. पण त्या ब्रह्मचर्याश्रमांतच जर प्रेम असेल तर मरेपर्यंत त्याच आश्रमांत नैष्ठिक ब्रह्मचारी होऊन गुरुकुलांत गुरु-अग्नि-शुश्रूषापरायण होऊन रहावें. पण त्यांत प्रेम नसेल तर आठव्या वर्षीं वेदग्रहणाच्या

अंगभूत संस्काररूप ब्रह्मचर्य स्वीकारून एक-दोन-तीन किंवा सर्व वेद म्हणावे, किंवा षडंगांसह आपली शाखाच यथाशास्त्र गुरुशुश्रूषापूर्वक म्हणून समावर्तन-विधीनें त्या आश्रमाची समाप्ति करून यौवनकाल प्राप्त झाला असतां [गृही भवेत्—] स्त्रीपरिग्रहरूप, श्रौत-स्मार्त सर्व कर्मानुष्ठानसंपादक, धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचें कारण, अशा गार्हस्थ्याचा स्वीकार करून गृही—गृहवान् व्हावें. पण त्याचीहि इच्छा निवृत्त झाल्यास [गृहात् वनी भूत्वा प्रव्रजेत्—] त्या आश्रमापासून वनी व्हावें. म्ह० कंद-मूल-फलादि आहारानें, अग्निहोत्रासह किंवा अग्निहोत्राला सोडून, वन हेंच ज्याचें निवासस्थान आहे, असें व्हावें. पण वनी होऊन कांहीं कालानें त्याचीहि इच्छा नाहींशी झाल्यास चतुर्थाश्रमांत जावें. हा चार आश्रमांचा अनुक्रम झाला. पण ज्याला दुसऱ्या आश्रमांत जाण्याची इच्छा नसेल त्यानें एकेकाच आश्रमांत यावज्जीव रहावें. संन्यासाला सोडून बाकीच्या तीन आश्रमांचा अनुक्रमहि नियत आहे. यालाच आश्रमसमुच्चय-पक्ष म्हणतात. यांचा प्रतिलोम म्ह० उलट क्रम केव्हांहि शक्य नाही. म्हणजे संन्यासापासून वन, वनांतून गृह, गृहस्थ होऊन ब्रह्मचारी, असा प्रतिलोम क्रम शास्त्रविहित नाहीं. पण आतां वैराग्य असल्यास संन्यासाचा विशेष सांगतात—[यदि वा—] किंवा दुसऱ्या विकल्पपक्षीं [इतरथा—] याहून निराळ्या प्रकारें —संसाराची इच्छा नसल्यास ज्यानें वेदांतासह स्वशाखेचें अध्ययन केलें आहे किंवा सर्व वेदान्तांचें—उपनिषदांचें अध्ययन केलें आहे अशा विरक्तानें थोडा वेळ आचरिलेल्या ब्रह्मचर्याश्रमापासूनच संन्यास करावा. परमहंस व्हावें. 'प्रव्रजेत' या साधारण श्रुतीवरून कुटीचक, बहूदक व हंस या तीन संन्यास-प्रकारांचीहि प्राप्ति होते. पण पूर्ण वैराग्य ही सामग्री असतांना संन्यासाचा संकोच करणें अयोग्य असल्यामुळें 'परमहंस' हा श्रेष्ठ संन्यासप्रकार स्वीकारणेंच उचित आहे. 'ब्रह्मचर्यात' असें पद असल्यामुळें ज्याचें उपनयन झालेलें नाहीं त्याला संन्यासाचा अधिकार नाहीं, असें सिद्ध होतें. आतां ज्यानें जन्मांतरीं सांग वेदाध्ययन केलेलें असून या जन्मीं त्याचा अर्थ आपोआप आठवत आहे त्याला उपनयनाचा कांहीं उपयोग नाहीं, हें खरें; पण त्या दृष्टीनें पाहिल्यास त्याला विधिप्राप्त परमहंसत्वाचाहि कांहीं उपयोग नाहीं, कारण त्याच्यामध्यें तें स्वतःसिद्धच असतें. असो; [गृहात् वा—] किंवा गृहाश्रमांतून—मग धर्मादि तीन पुरुषार्थ

सिद्ध झाले असोत कीं नसोत [वनात् वा–] किंवा वनाश्रमांतून–त्याला विहित असलेल्या धर्माचें अनुष्ठान झालेलें नसलें तरी प्रव्रजन–संन्यास करावा. 'वा-' शब्दावरून ब्रह्मचर्याश्रमापुढील दोन्ही किंवा एका आश्रमाचा स्वीकार केल्यावांचूनहि वैराग्य असल्यास संन्यासाधिकार आहे, असें सिद्ध होतें. [अथ पुनः–] आतां एखाद्या विधुरासारख्या अनाश्रमी पुरुषास पूर्ण वैराग्य प्राप्त झाल्यास तो [व्रती वा अव्रती वा–] मासोपवास, जप इत्यादि व्रतांनीं युक्त असो कीं नसो –अव्रती असो, त्यानेंहि वैराग्यबलावर संन्यास करावा. त्याचप्रमाणें [स्नातकः वा अस्नातकः वा–] सर्व वेदांचें सांग अध्ययन करून स्नानकर्म केलेला स्नातक असो कीं केवल स्वशाखेचें अध्ययन करून स्नान केलेला अस्नातक असो, त्यानेंहि वैराग्य प्राप्त होतांच संन्यास करावा. [उत्सन्नाग्निः अनग्निकः वा–] गृहस्थांमध्येंहि कांहीं अग्निस्वीकार केलेले असतात, कांहीं भार्यामरणादि निमित्तानें उत्सन्नाग्नि–नष्टाग्नि झालेले असतात व कित्येक भार्या असतांनाहि अग्नीचा परिग्रह न केलेले असतात, त्यांतील शेवटच्या दोन कल्पांप्रमाणें एखादा उत्सन्नाग्नि असो कीं अनग्निक असो, त्यानें वैराग्याच्या बलावर संन्यास करावा. (याप्रमाणें आश्रमी व अनाश्रमी पुरुषांच्या संन्यासाचें विधान करून संन्यासाला कालाचाहि विशेष नियम नाहीं, असें सांगतात–) [यत् अहर् एव विरजेत् तद् अहर् एव प्रव्रजेत्–] ज्या दिवशीं विरक्ति येईल त्याच दिवशीं संन्यास करावा.–सु.ब्र.पृ.३९६ व ४१२पहा–आतां संन्यास करणाऱ्या साग्निक गृहस्थाला एका इष्टीचें विधान करितात––

तद्धैके प्राजापत्यामेवेष्टिं कुर्वन्ति। तदु तथा न कुर्यादाग्नेयीमेव कुर्यात्। अग्निर्ह वै प्राणः प्राणमेवैतया करोति। पश्चात्त्रैधातवीयामेव कुर्यात्। एतयैव त्रयो धातवो यदुत सत्त्वं रजस्तम इति। अयं ते योनिर्ऋत्वियो यतो जातो अरोचथाः। तं जानन्नग्न आरोहाथा नो वर्धया रयिम्। इत्यनेन मन्त्रेणाग्निमाजिघ्रेत्। एष वा अग्नेर्योनिर्यः प्राणः प्राणं गच्छ स्वाहेत्येवमेवैतदाह ॥

अन्वयार्थ––[तत ह–] त्याविषयीं खरोखर [एके–] कांहीं आचार्य [प्राजापत्यां एव इष्टिं कुर्वन्ति–] प्रजापति जिची देवता आहे अशी प्राजापत्य

इष्टिच करितात. [तत् उ तथा न कुर्यात्–] पण त्यांनीं जरी तसें करावयास सांगितलें आहे तरी तें करूं नये. तर [आग्नेयीं एव कुर्यात्–] अग्निदेवताक इष्टिच करावी. (त्याविषयीं उपपत्ति–) [अग्निः ह वै प्राणः–] हा प्रसिद्ध साधनरूप अग्निच प्राण–सूत्रात्मा किंवा परमात्मा आहे. कारण तोच देवांमध्यें पहिला असून त्याचेंच परमात्मत्व ' अग्निरग्रे प्रथमो देवतानां ' इत्यादि श्रुतींत सांगितलें आहे. यास्तव तोच स्वरूपाला पोंचवितो. म्हणून [प्राण एव एतया करोति–] त्या पूर्वोक्त प्राणालाच या आग्नेयी इष्टीनें करितो. (जेथें प्राण तेथें मन, जेथें मन तेथेंच सर्वेंद्रियें व जेथें सर्व इंद्रियें तेथेंच विषय असतात. त्या आग्नेयी इष्टीनें प्राणसिद्धीच्या द्वारा सर्व सिद्ध होतें.) [पश्चात् त्रैधातवीयां एव कुर्यात्–] त्यानंतर ' यः कामयेतान्नादःस्यामिति तस्मात एतं त्रिधातुं निर्वपेत् ' या वाक्यानें विहित असलेली राजा-अधिराज-सुराजगुणयुक्त इंद्रदेवताक इष्टिच करावी. (त्याविषयीं उपपत्ति–) [एतया एव त्रयः धातवः–] या त्रैधातवी इष्टीनेंच तीन धातु वृद्धि पावतात. (ते धातु कोणते ? उत्तर–) [यत् उत सत्त्वं रजः तमः इति–] जें अग्नीचें सत्त्व–शुक्ल, रज–लोहित व तम–कृष्ण रूप तेच तीन धातु वाढतात. (याप्रमाणें यथाशास्त्र इष्टि करून–) ' अयं ते योनिः० ' या मंत्रानें अग्नीचें आघ्राण करावें. (त्या मंत्राचा अर्थ–) [अयं ते योनिः ऋत्वियः–] हा प्राण तुझें कारण आहे. प्राण कसा ? ऋतुसंबंधी किंवा ऋत्विक्-संबंधी किंवा ऋतूंनीं कल्पिलेला प्राण तुझें कारण आहे. [यतः जातः अरोचथाः–] ज्याच्यापासून उत्पन्न झालेला तूं दीप्त झाला आहेस. [अग्ने तं जानन्–] हे अग्ने त्या आत्मजनक प्राणाला जाणणारा तूं [आरोह–] त्यावर आरोहण कर. तूं प्राणमात्र हो. [अथा नः रयिं वर्धया इति–] त्यानंतर आमचें धन वाढीव. येथें धन म्ह० सम्यक् अर्थबोध. लौकिक सुवर्ण नव्हे. ' इति-' शब्द मंत्रसमाप्तीसाठीं आहे. ' अथा ' व ' वर्धया ' हे दीर्घपाठ संहितापाठासाठीं आहेत. [अनेन मंत्रेण अग्निं आजिघ्रेत्–] या मंत्रानें अग्नीचें आघ्राण करावें (हा पूर्वोक्त मंत्रार्थ स्वतः श्रुति सांगते– [यः प्राणः एषः वै अग्नेः योनिः–] जो प्राण तोच अग्नीची योनि कारण आहे. [प्राणं गच्छ स्वाहा इति–] प्राणाला प्राप्त हो. ती तुझी वाक् मी आहें, असें ज्याअर्थीं वाक् म्हणले त्याअर्थीं स्वाहा. (या विषयीं तैत्तिरीयक अग्निब्राह्मणांत ' तं वाक्-

अभ्यवदत् जुहुधि इति । सोऽब्रवीत्कस्त्वमसीति । स्वैव ते वागित्यब्रवीत् । सोऽजुहोत्स्वाहेति । तत्स्वाहाकारस्य जन्म०' इत्यादि प्रमाण आहे. " त्या अग्नीला वाक् ' होम कर ' असें म्हणाली. अग्नि म्हणाला–' तूं कोण आहेस ? ' ' मी तुझीच आहें ' असें वाक् म्हणाली. तेव्हां त्यानें ' स्वाहा ' असें म्हणून होम केला. तोच स्वाहाकाराचा जन्म आहे." असा त्याचा अर्थ आहे.) ' इति ' हा शब्द मंत्राच्या समाप्तीसाठी आहे. [एवं एव एतत् आह–] असेंच हें हा मंत्र म्हणाला.–आतां निरग्नींचा संन्यास—

ग्रामादग्निमाहृत्य पूर्ववदग्निमाघ्रापयेत् । यद्यग्निं न विन्देदप्सु जुहुयात् । आपो वै सर्वा देवताः । ॐसर्वाभ्यो देवताभ्यो जुहोमि स्वाहेति हुत्वा समुद्धृत्य प्राश्नीयात्साज्यं हविरनामयं मोक्षमन्त्रस्त्रय्यं वं विन्देत्तद्ब्रह्मैतदुपासितव्यम् । एवमेवैतद्भगवन्निति वै याज्ञवल्क्यः ॥ ४

अन्वयार्थ—[ग्रामात् अग्निं आहृत्य–] गांवांतून–श्रोत्रियादिकांच्या घरांतून अग्नि आणून अन्वाधान करून [पूर्ववत् अग्निं आघ्रापयेत्–] पूर्वीप्रमाणेंच ' अयं ते योनिः० ' इत्यादि मंत्रानें अध्वर्यूनें संन्याश्याकडून अग्नीचें आघ्राण करवावें [यदि अग्निं न विन्देत–] पण जर अग्नि न मिळाला तर [अप्सु जुहुयात्–] तडागादिकांच्या जलामध्यें होम करावा. कारण [आपः वै सर्वाः देवताः–] आप्च सर्व देवता आहेत. (त्यांतील विशेष मंत्र–) ['ॐ सर्वाभ्यः देवताभ्यः स्वाहा' इति हुत्वा–] पूर्णाहुतीच्या वेळीं उदकस्थली ' ॐ सर्वाभ्यः० ' या मंत्रानें होम करून [समुद्धृत्य प्राश्नीयात्–] हुतशेष वर उचलून खावा. [साज्यं हविः अनामयं–] आज्ययुक्त–घृतयुक्त हवि हुतशेष असल्यामुळें रोगदोषशून्य आहे. (आतां संन्याश्याला जप करण्यास योग्य असलेला मंत्र सांगतात–) [मोक्षमंत्रः त्रयी–] मोक्षाला कारण होणारा मंत्र प्रणव हा आहे. कारण तो वेदत्रयीरूप आहे. [एवं विन्देत्–] पुढें सांगितलेल्या प्रकारानें त्याला जाणावें. [तत् ब्रह्म–] तो प्रणवच सत्यज्ञानादिलक्षण ब्रह्म आहे. [एतत् उपासितव्यं–] त्या ओंकाररूपाचेंच उपासन करावें. जनक म्हणतो– [एवं एव एतत् भगवन्–] तूं सांगितलेला हा संन्यासविधि असाच आहे.

हे पूज्य मुने, तूं सांगितलेला हा संन्यास असाच आहे. श्रुति म्हणते–[इति वै याज्ञवल्क्यः–] याज्ञवल्क्यानें असें सांगितलें. (४)

अथ हैनमत्रिः पप्रच्छ याज्ञवल्क्यम्। पृच्छामि त्वा याज्ञवल्क्य अयज्ञोपवीती कथं ब्राह्मण इति। स होवाच याज्ञवल्क्यः। इदमेवास्य तद्यज्ञोपवीतं य आत्मा प्राश्याचम्यायं विधिः परिव्राजकानाम्। वीराध्वाने वा अनाशके वाऽपां प्रवेशे वाऽग्निप्रवेशे वा महाप्रस्थाने वा। अथ परिव्राड्विवर्णवासा मुण्डोऽपरिग्रहः शुचिरद्रोही भैक्षणो ब्रह्मभूयाय भवति। यद्यातुरः स्यान्मनसा वाचा वा संन्यसेत्। एष पन्था ब्रह्मणा ह्यनुवित्तस्तेनैति संन्यासी ब्रह्मविदित्येवमेवैष भगवन्निति वै याज्ञवल्क्यः ॥ ५

अन्वयार्थ—[अथ ह अत्रिः एनं याज्ञवल्क्यं प्रपच्छ–] त्यानंतर अत्रि त्या याज्ञवल्क्याला असें विचारूं लागला–[याज्ञवल्क्य पृच्छामि त्वा–] हे याज्ञवल्क्या! मी तुला विचारतों [अयज्ञोपवीती कथं ब्राह्मणः इति–] लौकिक ब्राह्मण स्नान-आचमनादि क्रियांगभूत यज्ञोपवीतानें युक्त असतो. पण हा संन्यासी यज्ञोपवीतरहित असतो. तेव्हां तो ब्राह्मण कसा? ' इति ' प्रश्नसमाप्त्यर्थ आहे. [सः ह उवाच याज्ञवल्क्यः–] तेव्हां तो याज्ञवल्क्य त्याला म्हणाला–[यः आत्मा इदं एव अस्य तत् यज्ञोपवीतं–] जो स्वयंप्रकाशसच्चिदानंद आत्मा तेंच या परमहंसाचें यज्ञोपवीत आहे. [तप, योग, स्वाध्याय, ज्ञान इत्यादि नानाप्रकारच्या श्रौत-स्मार्त यज्ञांच्या सामीप्यानें विशेषतः–नित्यसंयोगानें जें प्राप्त असतें तें ' यज्ञ-उप-वि-इतं-' यज्ञोपवीत होय. 'अहं–मी' या प्रत्ययाचा साक्षी आत्मा सर्व यज्ञांमध्यें बाह्य सूत्रमय लौकिक यज्ञोपवीताहून नित्य संनिहित–सामीप्यानें प्राप्त आहे. यास्तव परमहंसाचें तेंच यज्ञोपवीत आहे. [प्राश्य आचम्य अयं परिव्राजकानां विधिः–] ' प्राश्य आचम्य-' इत्यादि वाक्यानें परिव्राजकांचा संन्यासविधि सांगितला जातो. (' प्राश्य ' येथील ' श-'कार छान्दस आहे. प्रास्य म्हणजे टाकून किंवा ' प्राश्य ' असाच पाठ घेतल्यास यज्ञोपवीताला दोन्ही हातांनीं व्याप्त करून किंवा हें व्याप्त आहे, असें मानून असा अर्थ करावा.) [प्रास्य–] प्रैषोच्चारणानंतर ' समुद्रं गच्छ

स्वाहा ' या मंत्रानें शिखेसह यज्ञोपवीताचा प्राप्त उदकांत त्याग करून, तीन वेळ आचमन करून, परमहंसाचा 'आत्मा यज्ञोपवीतं' हाच उपनिषदांत सांगितलेला कर्तव्यतापकार आहे. क्षत्रिय व वैश्य यांना परमहंसलिंगधारण विहित नाहीं. यास्तव अशा अनधिकाऱ्यांनीं किंवा कांहीं कारणानें आश्रमापासून भ्रष्ट झालेल्या, प्रायश्चित्त न केलेल्या, शिष्टांकडून व्यवहार न केल्या जाणाऱ्या किंवा असाध्य रोगानें ग्रस्त झालेल्या किंबहुना श्रवणादि करण्यास असमर्थ असलेल्या संन्याश्यांनीं अशा प्रकारें मरावें—[वीराध्वाने—] संग्रामांतून परत न फिरतां, गो-ब्राह्मण-बाल-स्त्री यांच्यासाठीं, कांटे, विंचु, सर्प, सिंह, व्याघ्र यांना न भिणाऱ्या वीरांच्या मार्गामध्यें शरीराचा त्याग करावा. [अनाशके वा—] किंवा अन्नोदकांचा त्याग करून, [अपां प्रवेशे वा—] किंवा गंगा-प्रयागादि पुण्यस्थानीं प्रवेश करून, [अग्निप्रवेशे वा—] प्रदीप्त अग्नीत प्रवेश करून, [महाप्रस्थाने वा—] किंवा महत् म्ह० आवृत्तिशून्य—परत न फिरतां सर्प-व्याघ्र-सिंहादिकांनीं युक्त असलेल्या विषमभूमीचा त्याग न करितां शरीरपात होईतों गमन करणें, या महाप्रस्थानानें, यांतील कोणत्याहि प्रकारानें शरीराचा त्याग करावा. (आतां अशा अनधिकाऱ्यांहून अगदी उलट असलेल्या अधिकारी परमहंसानें काय करावें तें सांगतात—) [परिव्राट्—] परमहंस [विवर्णवासाः—] काषायवस्त्रें परिधान करणारा, [मुंडः—] शिखारहित, [अपरिग्रहः—] कन्था-कौपीन-अंगवस्त्र यांवांचून दुसऱ्या कशाचाहि परिग्रह न करणारा [शुचिः—] बाह्य—मृत्तिका-जलादिकांनी व आंतर मनःशुद्धीनें शुचि—पवित्र, [अद्रोही—] शरीरानें, मनानें किंवा वाणीनें भूतांचा द्रोह न करणारा, [भैक्षाणः—] प्राणधारणासाठीं यथाशास्त्र माधुकरादि भिक्षाचर्य करणारा, असा परमहंस [ब्रह्मभूयाय भवति—] ब्रह्मसाक्षात्कारानें ब्रह्म होतो. [यदि आतुरः स्यात्—] जर रोगादिकांनीं किंवा चोरादिकांनीं पीडित झाला असेल व संन्यासाश्रम करण्यास असमर्थ असेल तर [मनसा वाचा वा संन्यसेत्—] त्यानें मनासह वाणीनें प्रैषोच्चार करावा. पण तो बोलण्यासहि असमर्थ असेल तर नुस्त्या मनानेंच—संकल्पानें संन्यास करावा. [एषः पन्थाः ब्रह्मणा ह अनुवित्तः—] ब्रह्मप्राप्तीचें साधन असा हा संन्यासमार्ग ब्रह्माधिकारी पुरुषाकडून प्राप्त केला गेला आहे. किंवा वेदांत प्रसिद्ध आहे. तो वेदांत उपलब्ध होतो. वेदानें त्याला अनुज्ञा दिली आहे. [तेन

संन्यासी एति—] त्या मार्गानें एषणात्रयशून्य सर्वसंगपरित्यागी परमहंस जातो व [ब्रह्मविद् भवति—] ब्रह्मसाक्षात्कारवान् होतो. म्ह० संन्यासानें ब्रह्मज्ञान होतें व ब्रह्मज्ञानानें कैवल्य प्राप्त होतें. अत्रि म्हणतो—[इति एवं एव एषः भगवन्—] हे भगवन्, हा संन्यासमार्ग आपण सांगतां तसाच आहे. श्रुति म्हणते—[इति वै याज्ञवल्क्यः—] असें याज्ञवल्क्य सांगता झाला. ५.—आतां याज्ञवल्क्य श्रोत्यांची श्रद्धा उत्पन्न करण्यासाठीं या आश्रमाचें मोठमोठ्या ज्ञानी पुरुषांनीं अनुष्ठान केलें आहे, असें सांगतात—

तत्र परमहंसा नाम संवर्तकारुणिश्वेतकेतुदुर्वासऋभुनिदाघ-जडभरतदत्तात्रेयरैवतकप्रभृतयोऽव्यक्तलिङ्गा अव्यक्ताचारा अनुन्मत्ता उन्मत्तवदाचरन्तस्त्रिदण्डं कमण्डलुं शिक्यं पात्रं जलपवित्रं शिखां यज्ञोपवीतं चेत्येतत्सर्वं भूः स्वाहेत्यप्सु परित्यज्यात्मानमन्विच्छेत्। यथाजातरूपधरो निर्द्वंद्वो निष्परिग्रहस्तत्त्वब्रह्ममार्गे सम्यक्संपन्नः शुद्धमानसः प्राण-संधारणार्थं यथोक्तकाले विमुक्तो भैक्षमाचरन्नुदरपात्रेण लाभालाभौ समौ भूत्वा शून्यागारदेवगृहतृणकूटवल्मीक-वृक्षमूलकुलालशालाग्निहोत्रगृहनदीपुलिनगिरिकुहरकन्द-रकोटरनिर्झरस्थण्डिलेषु तेष्वनिकेतवास्यप्रयत्नो निर्ममः शुक्लध्यानपरायणोऽध्यात्मनिष्ठोऽशुभकर्मनिर्मूलनपरः संन्यासेन देहत्यागं करोति स परमहंसो नाम स परमहंसो नामेति॥६

'भद्रं कर्णेभिः०' इति शान्तिः॥

अन्वयार्थ—[तत्र परमहंसाः नाम—] असे हे पुढें सांगितलेले परमहंस परिव्राजक—चतुर्थाश्रमाच्या आचाराचें अनुष्ठान करणारे प्रसिद्ध आहेत. [संवर्तक-आरुणि-श्वेतकेतु-दुर्वास-ऋभु-निदाघ-जडभरत-दत्तात्रेय-रैवतक-प्रभृतयः—] अग्नीचा अवतार संवर्त प्रजापति, उद्दालक, त्याचा पुत्र श्वेतकेतु, ब्रह्मपुत्र ऋभु, त्याचा शिष्य निदाघ, ऋषभपुत्र राजाभरत, विष्णूचा अंश दत्तात्रि—त्याचा पुत्र दत्तात्रेय, प्रसिद्ध रैवतक, व 'प्रभृति-'शब्दानें सौभरि वगैरे दुसरेहि अनेक परमहंस [अव्यक्तलिंगाः—] ज्यांचीं कपालावरील पंच-मुद्रादि लिंगें अव्यक्त आहेत, [अव्यक्ताचाराः—] ज्यांचें सदसद्रूप कर्म लोकांना

समजत नाहीं, [अनुन्मत्ताः—] जे लोकद्वयविचारशून्य, विद्यादिमदवान् ते मत्त, जे तसे मत्त नसतात ते अनुन्मत्त, पण [उन्मत्तवत् आचरन्तः—] उन्मत्तांप्रमाणें—वेड्यांप्रमाणें आचरण करणारे, लोकांसमक्ष, आपल्या ठिकाणीं त्यांची श्रद्धा बसूं नये, म्हणून बुद्धिपूर्वक नानाप्रकारें चेष्टा करणारे, असे ते असतात. (याप्रमाणें परमहंसत्व सांगून आतां संन्यासाश्रमाच्या कुटीचकादि अवशिष्ट तीन भेदांचें उपलक्षणन्यायानें परमहंसत्व सांगतात—[त्रिदंडं—] वेळूचे तीन दंड, [कमंडलुं—] भोपळ्याचा किंवा लांकडी कमंडलु, [शिक्यं—] दर्भ, मुंजातृण इत्यादिकांच्या दोरीनें केलेले भिक्षापात्राधारभूत शिंकें, [पात्रं—] भोपळ्याचें किंवा काष्ठाचें दृढ भिक्षापात्र, [जलपवित्रं—] सर्वदा आचमनादिप्रसंगीं पाणी गाळण्यासाठी वीतभर लांबी-रुंदीचें चौकोनी त्रिदंडाला बांधलेलें वस्त्र, त्रिदंडी संन्याश्यांच्या अशा या त्रिदंडादि पांच मात्रा आहेत. त्यांतील एखादीहि मात्रा कमी झाल्यास त्रिदंडी संन्याश्यांना प्रायश्चित्त करावें लागतें. [शिखां यज्ञोपवीतं च—] पूर्वकर्मांगभूत शिखा व यज्ञोपवीत आणि पूर्वीच्या त्रिदंडादि पांच मात्रा [इति एतत् सर्वं अपि—] हें सर्वहि—अर्थात् गायत्र्यादिकहि [भूः स्वाहा इति—] 'भूः स्वाहा'—हें सर्व सत्तामात्र चिदानंदरस आहे, या मंत्रानें [अप्सु परित्यज्य—] त्यावेळीं जें प्राप्त असेल त्या उदकांत टाकून सद्गुरूच्या चरणाशी येऊन श्रवण-मननादिकांच्या योगानें [आत्मानं अन्विछेत्—] स्वयं ज्योतिश्चैतन्यात्म्याला साक्षात् जाणावें. (शास्त्रीय आत्मज्ञानानें शिखासूत्रादिकांचा त्याग केल्यावर उत्तरमार्गांतील गमनप्रकार सांगतात—) [यथाजातरूपधरः—] जशा प्रकारच्या रूपानें उत्पन्न झाला होता तशा रूपाला धारण करणारा—दिगंबर होऊन उत्तर मार्गांत जावें. त्यानंतर संन्यासदीक्षा देणाऱ्या अध्वर्यूनें ज्याचें निवारण केलें आहे अशा त्यानें श्रवणादिकांच्या सिद्धीसाठीं व लोकानुग्रहार्थ असें व्हावें—[निर्द्वंद्वः—] शीतोष्ण-सुखदुःखादि द्वंद्वांना सहन करणारा, किंवा ' निर्ग्रंथः' असा येथें पाठ आहे. त्याचा अर्थ—उपनिषत्संबंधरहित शास्त्रांशीं संबंध न ठेवणारा, [निष्प्रतिग्रहः—] कन्था, कौपीन व अध्यात्म पुस्तकादि यांवांचून कोणताहि प्रतिग्रह न करणारा, [तत्त्वब्रह्ममार्गे सम्यक् संपन्नः—] अबाधित रूप जें अखंड ब्रह्म त्याच्या मार्गांत म्हणजे ज्ञानांत संशय-विपर्ययशून्य होऊन संपन्न—ज्ञाननिष्ठ झालेला [शुद्धमानसः—]

ज्याचें मन काम-क्रोध-संकल्पादि मलरहित झालें आहे, असा होत्साता [प्राण-संधारणार्थं–] प्राणाच्या रक्षणार्थ [यथोक्तकाले–] मैत्रायणी श्रुतींत सांगितलेल्या कालीं–मध्याह्नानंतर सायंकालपर्यंत गृहस्थांच्या घरांतून धूर येईनासा झाला असतां शास्त्रोक्त प्रकारानें [विमुक्तः–] सर्व बंधनशून्य होऊन [भैक्षं आचरन्–] माधुकरादिरूप भिक्षाचर्य करणारा, असें व्हावें. भिक्षाचर्य करावें, हा नियम-विधि होय. (भिक्षापात्र सांगतात–) [उदरपात्रेण–] उदर हेंच पात्र त्यानें म्ह० भिक्षा आणली असतां तोंड उघडावें. [लाभालाभौ समौ भूत्वा–] भिक्षा मिळाली किंवा न मिळाली तरी क्रमानें हर्ष व विषाद करूं नये. अर्थात् दोन्ही प्रसंगीं त्या लाभालाभांना सम मानून भिक्षाचर्य आचरावें. (आतां परमहंसाचीं स्थानें सांगतात–] [शून्यागारं देवगृहं–] शून्य–ओसाड गृह, शिव-विष्णु इत्यादि देवालय [वृक्षमूलं–] वट-अश्वत्थादि वृक्षाचें मूळ, [कुलालशाला–] कुंभाराचीं भांडीं ठेवण्याचें स्थान, [अग्निहोत्रं–] अग्निगृह, [नदीपुलिनं–] महानदीच्या तीराजवळचा प्रदेश, [गिरिकुहरं–] पर्वतावरील गहन प्रदेश, [कन्दरं–] गिरि-गुहादि स्थल, [कोटरं–] वृक्षाची ढोल, [निर्झरः–] जलस्रावस्थान–झरा, [स्थंडिलं–] अतिशय शुद्ध आवरणशून्य भूप्रदेश, (श्रुतींत हे सर्व शब्द द्वंद्वसमासयुक्त सांगितले आहेत. पण आम्हीं त्याचीं पदें तोडून व्याख्यान केलें आहे.) [शून्यागारादिस्थंडिलान्तेषु अनिकेतवासी–] या शून्यागारापासून स्थंडिला-पर्यंत सांगितलेल्या प्रदेशांतील कोठेंहि नियतस्थान न करितां राहणारा [अ-प्रयत्नः–] त्यांतहि नानाप्रकारचीं सुखोपकरणें संपादन करण्यासाठीं प्रयत्न न करणारा, [निर्ममः–] कोणत्याहि वस्तूवर ममत्व–' ही माझी ' असा ममभाव न ठेवणारा, [शुक्लध्यानपरायणः–] प्रणव किंवा सर्वदोषशून्य स्वयंप्रकाश आनंदात्मा, त्याचें निरंतर ध्यान हेंच एक ज्याचें परम साधन आहे असा, [अध्यात्म-निष्ठः–] आत्मनिष्ठ–अन्तर्मुख [अशुभकर्मनिर्मूलनपरः–] अनेक जन्मार्जित पापांचें निर्मूलन करण्यांत तत्पर झालेला असा जो [संन्यासेन देहत्यागं करोति–] दीर्घकाल किंवा स्वल्प काल केलेल्या संन्यासानें शरीराचा त्याग करितो [सः नाम परमहंसः–] तोच प्रसिद्ध परमहंस होय. ' सः परमहंसो नाम ' या वाक्याची द्विरुक्ति व ' इति-'शब्द उपनिषत्समाप्तीसाठीं आहे. ६.

इति जाबालोपनिषत् समाप्त झालें.

जाबालोपनिषदाचें सिंहावलोकन.

अथर्ववेदाच्या जाबालशाखेचें हें उपनिषद् आहे. त्याचे सहा खंड आहेत. पहिल्या खंडांत देवगुरु बृहस्पतीनें याज्ञवल्क्याला 'देवांचें देवयजन व सर्व भूतांचें ब्रह्मसदन असें कुरुक्षेत्र काय आहे?' असा प्रश्न केला तेव्हां याज्ञवल्क्यानें 'अविमुक्त-सोपाधिक ईश्वराचें स्वरूपच तें कुरुक्षेत्र आहे. यास्तव अविमुक्तोपासकानें कोणत्याहि स्थानीं त्याचेंच चिंतन करावें अशा अविमुक्तोपासकाचे प्राण शरीर सोडून जाऊं लागले असतां रुद्र त्याला तारक ब्रह्माचा उपदेश करितो. त्यामुळें तो अमरणधर्मवान् व मुक्त होतो. यास्तव मरेपर्यंत त्या अविमुक्ताचेंच निरंतर ध्यान करावें,' असें सांगितलें. (१)

अत्रि म्हणाला—"अव्यक्त अनन्त आत्म्याचें ज्ञान मला कसें होईल?" याज्ञवल्क्य—"पूर्वोक्त अविमुक्ताचीच उपासना करावी. तो अनन्त अव्यक्त आत्मा अविमुक्तांत प्रतिष्ठित आहे. अविमुक्त वरणा नासीमध्यें प्रतिष्ठित आहे. जी इंद्रियकृत सर्व दोषांचें निवारण करिते ती वरणा व जी इंद्रियकृत सर्व पापांचा नाश करिते ती नासी. दोन भुंवया व नासिका यांचा जो संधि तोच मस्तककपालरूप स्वर्ग व हनुवटीपर्यंत भूलोक यांचा संधि आहे या सधींतच ब्रह्मज्ञानकुशल ब्रह्मस्वरूपाला साक्षात् पाहतात. यास्तव अविमुक्ताची उपासना करावी. उपासकाला तो सोपाधिक ईश्वरच ज्ञानोपदेश करितो."(२)

नंतर अविमुक्तोपासना करण्यास असमर्थ असलेले शिष्य म्हणाले—"ज्या जप करण्यास योग्य असलेल्या अध्यायाच्या जपानें मोक्ष मिळतो तो अध्याय सांगा." याज्ञवल्क्य—"नमस्ते रुद्र मन्यवे० इत्यादि रुद्राध्यायाच्या जपानें मोक्ष मिळतो. रुद्राध्यायांत सांगितलेलीं रुद्राचीं नावें हीं अमृताचींच—मोक्षाचींच नावें आहेत. त्यामुळें त्यांच्या जपानें मुमुक्षु मुक्त होतो."(३.)

जनक म्हणाला—"भगवन्, मला संन्यासाचा प्रकार सांगा. तो कोणी, केव्हां कसा करावा?" याज्ञवल्क्य—"ब्रह्मचर्य संपवून कर्मानुष्ठानाची इच्छा असल्यास गृहस्थ व्हावें. किंवा मरेपर्यंत नैष्ठिक ब्रह्मचारीच रहावें. गृहस्थाश्रम स्वीकारून

कांहीं काल कर्मानुष्ठानादि करून त्याविषयीं अरुचि झाल्यास वानप्रस्थ व्हावें. पुढें त्याचीहि विरक्ति आल्यास चतुर्थाश्रम स्वीकारावा. किंवा गृहस्थाश्रमादि इतर आश्रमांची इच्छा नसल्यास ब्रह्मचर्यापासूनच संन्यास करावा. ब्रह्मचर्यादि इतर आश्रमांतील व्रती-अव्रती, स्नातक-अस्नातक, साग्नि, निरग्नि, विधुर इत्यादि जे अवांतर भेद आहेत, त्यांतील ज्या कोणालाहि ज्या दिवशी वैराग्य येईल त्याच दिवशीं त्यानें संन्यास करावा." असें सांगून याज्ञवल्क्यांनीं त्याचें सर्व विधान सांगितलें आहे. तें मुळावरूनच स्पष्टपणें कळण्यासारखें आहे. (४.)

अत्रि म्हणतो—"भगवन्, यज्ञोपवीतरहित असलेला संन्यासी ब्राह्मण कसा?" याज्ञवल्क्य—"आत्माच त्याचें यज्ञोपवीत आहे. परिव्राजकांनीं शिखेसह यज्ञोपवीताचा उदकांत त्याग करून आचमन करावें. त्यांच्यासाठीं हा विधि आहे." नंतर संन्यासाचे अनधिकारी क्षत्रियादि व इतर भ्रष्ट, रोगी वगैरे यांनीं शरीरत्याग कसा करावा तें सांगून "परमहंसानें काषायवस्त्रें, मुण्डन, अपरिग्रह, शुचि, अद्रोही होऊन भिक्षाचर्य करावें," असें सांगितलें आहे "असा परमहंस मुक्त होतो. व्याधि, चोर इत्यादिकांनीं पीडलेल्या विरक्तानें मानसिक किंवा वाचिक संन्यास करावा. हा ब्रह्मज्ञानप्राप्तीचा मार्ग आहे." (५)

सहाव्या खंडांत याज्ञवल्क्यानें श्रोत्यांच्या मनांत श्रद्धा उत्पन्न करण्यासाठीं प्राचीन परमहंसांचा उल्लेख करून, त्यांचा आचार व संन्यासविधि सांगितला आहे. तो मुळावरूनच सहज कळण्यासारखा आहे. संन्यास-आश्रमाची योग्यता, परमहंसाचे सर्वोत्तम धर्म व त्याला येथेंच प्राप्त होणारें जीवन्मुक्तिरूप फल यांचें या उपनिषदांत वर्णन आहे. गीतेंतील ज्ञाननिष्ठेचें स्वरूपहि यावरून अधिक स्पष्ट होतें. याचा ब्रह्ममीमांसेंतहि विचार केला आहे. संन्यासाचा अधिकार नसलेल्या गृहस्थांना मोक्षासाठीं रुद्राध्यायाचा जप सांगितला आहे. त्यामुळें हें उपनिषद् सर्वोपकारक आहे. (६.)

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत सुबोध उपनिषत्संग्रहांतील जाबालोपनिषद् सिंहावलोकनासह समाप्त झालें.

इति शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रह समाप्त.

श्रीकृष्णार्पणमस्तु

कांहीं ठळक चुकांचें शुद्धिपत्र.

——:०:——

पृ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
२७	१८	प्रतिष्ठति	प्रतितिष्ठति
३३	२२	व्रणे	वृणे
३७	७	वरणामेष	वराणामेष
४१	१२	मज्जति	मज्जन्ति
५३	१५	स्वःच्या	स्वतःच्या
७०	१२	यस्मिन्नेतावपा०	यस्मिन्नेतावुपाश्रितौ
७२	२६	बहुनां	बहूनां
९५	२५	ुनरावर्तन्ते	पुनरावर्तन्ते
१८६	१	ब्रह्मयर्चसं	ब्रह्मवर्चसं
१९२	१७	श्चतुर्था	श्चतुर्धा
,,	१८	....	इति पंचमोऽनुवाकः
२१७	१३	विद्वानाला कर्तृत्व	विज्ञानाला कर्तृत्व
३२४	७	आदित्यो	आदित्य
३४०	१२	सर्व ्	सर्व्
५३२	१	प्रजापत्याः	प्राजापत्याः
५३४	१७	श्रोत्रमुचूस्त्वं	श्रोत्रमूचुस्त्वं
६५२	२	ज्या ब्रह्म	ज्या ब्रह्माचा

सूचना—अशाच आणखीं कांहीं चुका आढळल्यास त्या दुरस्त करून ग्रंथ वाचावा.

ॐ

यो वै भूमा तत्सुखं नाल्पे सुखमस्ति भूमैव सुखं भूमा त्वेव विजिज्ञासितव्यः

सु. उ. पृ. ४६२

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप। सु. गी. पृ.९५.

ही पुस्तकांची यादी वाचा व या ज्ञानयज्ञास हस्तें-परहस्तें साह्य करा.

—सर्व पुस्तकांचा टाईप, कागद, छपाई, बाईंडिंग उत्तम आहे.—

सुबोध संपूर्ण वेदान्तप्रस्थानत्रय.

१. **शांकरभाष्यानुसार सुबोधगीता**—[अवतरण, मूळ श्लोक, अन्वय, सरळ व सुबोध अर्थ स्पष्टीकरण व सिंहावलोकन,] शरीररथ व श्रीकृष्ण यांचीं चित्रें. पृष्ठें ३९० किंमत रु. २ ट. ख. ८८

२. **शांकरभाष्यानुसार सुबोध उपनिषत्संग्रह**—[मूळ श्रुति, अन्वयार्थ, स्पष्टीकरण प्रत्येक उपनिषदाचें सिंहावलोकन यांसह] ईश-केन-कठ-प्रश्न-मुंड-मांडूक्य-तित्तिरि-ऐतरेय-बृहदारण्यक-छांदोग्य-कौषीतकि श्वेताश्वतर-जाबाल अर्थात् ब्रह्मसूत्रांत ज्यांचा विचार केला आहे, अशीं महत्त्वाची तेरा उपनिषदें, प्रस्तावना सविस्तर अनुक्रमणिका. किं. रु. ५॥ ट. ख. १ रु.

३. **शांकरभाष्यानुसार सुबोध ब्रह्मसूत्र**—[वैयासिकन्यायमालेसह] प्रत्येक अधिकरणाचें नांव—सूत्रें—सूत्रार्थ—विषय—संशय—पूर्वपक्ष—संगति—सिद्धान्त—वैयासिकन्यायमालेचे श्लोक—अन्वयार्थ—प्रस्तावना सविस्तर अनुक्रमणिका यांसह पृ. ५६०किं. ३ रु ट. ख. ८१०.

सवलत—हे तिन्ही ग्रंथ एकदम घेणारांस टपाल खर्चासह रु. १०

४. **सुबोध पंचदशी**—[मूल—अन्वयार्थ—स्पष्टीकरण प्रत्येक प्रकरणाचा माथितार्थ—प्रस्तावना—सविस्तर अनुक्रमणिका. सर विठ्ठलदास ठाकरसी यांचें चरित्र यांसह] पृ. ७५० किंमत पातळ प्रत ३॥ रु. जाड प्रत ४. रु. ट. ख. क्रमानें ।।≈ व ।।।८ वेगळा.

सवलत—चारी पुस्तकें एकदम मागविल्यास ट. ख. सह १३रुपये

५. श्रीमद्भगद्गीताभाष्यार्थ—मूळ श्लोक, अन्वयार्थ, शांकर भाष्य, त्याचा सरळ व सुबोध अन्वयासह अर्थ, गीतारहस्यपरीक्षणात्मक विस्तृत टीपा, प्रस्तावना, सविस्तर विषयानुक्रमणिका, वादग्रस्त व अनेकार्थी शब्दांचा कोश १ श्रीशंकराचार्य, २ शरीररूपी रथ, ३ चतुर्भुज श्रीकृष्ण अशीं तिन सुंदर चित्रें व ४ सर विठ्ठलदास ठाकरसी यांचा फोटो, यांसह. पृष्ठें १३४०; जाड कागदाची दोन भागांत बांधलेली प्रत–लायब्ररी एडिशन–किंमत रुपये १०; पातळ पण उत्तम ग्लेज कागदाची एका भागांत सोनेरी उत्तम बाइंडिंगची प्रत किं. रु. ७॥; तूर्त ट. खर्च निराळा नाहीं

सवलत—वरील पांची पुस्तकें एकदम घेतल्यास किं. ट. सह २० रु. गीताभाष्यार्थाच्या जाड प्रती फार थोड्या शिल्लक आहेत. त्या या सेटमध्यें नाहींत.

दशोपनिषद्भाष्यार्थ—ईश ८६, केन ८८, काठक ८१२ प्रश्न ८१०, मुंडक ८८, गौडपादीय कारिकांसह मांडूक्य २॥ रु. तैत्तिरीय १॥, ऐतरेय १॥, छान्दोग्य ४॥, बृहदारण्यक ७॥, या दहा उपनिषदांचा–मूळ श्रुति, अर्थ, शांकरभाष्य व त्याचा सरळ अर्थ यांसह–सेट एकदम घेणारास ट. ख. सह २० रु.

सूचना—वरील सर्व पुस्तकें रेलवे पारसलनें मागविल्यास खर्च कमी येईल व त्याचा फायदा आम्ही ग्राहकांस देऊं.

ब्रह्मसूत्रशारीरभाष्यार्थ—वेदान्त-प्रस्थान-त्रयांतील हें तिसरें प्रस्थान–मूळ सूत्र, सरळ सूत्रार्थ, शांकर भाष्य व त्याचा सरळ व अत्यंत सुबोध स्पष्टीकरणासह भाष्यार्थ–यांसह २ भागांत प्रसिद्ध करीत आहों. शके १८४६ साली दोन्ही भाग प्रसिद्ध होतील. शेवटच्या भागांत तिन्ही प्रस्थानांवरील आचार्यांच्या भाष्याचा सविस्तर उपसंहार लिहिणार आहों. त्यांत सर्ववाद व आचार्यांनीं ठिकठिकाणीं केलेलें त्यांचें खंडन यांचें स्वरूप अगदीं विशद करणार आहों प्रत्येक भागाची किंमत सुमारें ५ रु. ठेवूं. तरी **श्रीशंकराचार्य, सनातन वैदिक धर्म** आणि **वेदान्तशास्त्र** यांविषयीं आदर बाळगणाऱ्या प्रत्येकानें या सुबोध व सभाष्यार्थ वेदान्तप्रस्थानत्रयाचा **संग्रह अवश्य** करावा, अशी विनंति आहे.

विष्णुशास्त्री बापट.

सपादक—ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला, २७० सदाशिव पेठ, पुणें सिटी.
किंवा–पर्णकुटी, पोष्ट येरवडा (पुणें.)